महाराजा सयाजीराव गायकवाड

चरित्रसंग्रह

भाग १

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
डॉ. राजेंद्र मगर



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराजा सयाजीराव गायकवाड

चरित्रसंग्रह

भाग १

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
डॉ. राजेंद्र मगर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह : भाग १

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
डॉ. राजेंद्र मगर

पहिली आवृत्ती : २०१८
प्रतींची संख्या : ११००

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवीन्द्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.

© **प्रकाशकाधीन :**

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे - ४११ ००१.

किंमत : रुपये ४२८/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

महाराजा सयाजीराव गायकवाड

संपादक व सहसंपादक अल्पपरिचय

यमाजी बाळाजी मालकर

दैनिक सकाळ, पुणे आणि औरंगाबादचे माजी संपादक. दैनिक दिव्य मराठीचे माजी सल्लागार संपादक. अर्थक्रांती प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि अर्थपूर्ण मासिकाचे संपादक.

'ड्रीम्स फ्रॉम माय फादर' या, अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्या इंग्रजी आत्मचरित्राचा मराठी अनुवाद प्रसिद्ध, 'डेटलाईन' 'आहे, उत्तर आहे', 'मराठवाड्याच्या यशकथा' ही पुस्तके प्रसिद्ध. 'झपाटलेपण ते जाणतेपण' या पुस्तकाचे सहलेखक. 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' (२०१०) या कॉपी टेबल बुकचे संपादक. अर्थक्रांती चळवळीत सक्रिय. जागर ब्लॉगवर लेखन.

डॉ. राजेंद्र सर्जेराव मगर

सोलापूर जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षक या पदावर २००४ पासून कार्यरत, 'सयाजीराव गायकवाड यांच्यावरील चरित्रांचा अभ्यास' या विषयावरील प्रबंधास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची 'पीएच.डी.' ही पदवी प्रदान. महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने समिती साठी दाजी नागेश आपटे यांच्या चरित्राचे संपादन. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्यासंबंधी विविध नियतकालिकात लेख प्रकाशित.

सयाजीराव महाराज यांचे चरित्रलेखक

काशीनाथ नारायण गोत्री
यशवंत रामकृष्ण दाते
विश्वनाथ पांडुरंग दांडेकर
गोविंद सखाराम सरदेसाई
ब. न. फाटक

अध्यक्षांचे निवेदन

महाराजा सयाजीरावांचे चरित्र अनमोल सांस्कृतिक वारसा

स्वातंत्र्यपूर्व काळात जनकल्याणाचा ध्यास घेत एक आदर्श सुप्रशासनाचे उदाहरण दाखवून देणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारताचे एक शिल्पकार आहेत. त्यांनी ज्ञानाची महती ओळखून तोच प्रगती अन् परिवर्तनाचा एकमेव मार्ग आहे हे ओळखले. त्यासाठी शिक्षणाची कास धरून रयतेला सक्तीचे मोफत शिक्षण दिले. देशाची नवनिर्मिती शिक्षण, नवतंत्रज्ञानातून होत असली तरी त्याला ज्ञानात्म प्रबोधनाची जोड दिली. एवढेच नाही तर वैचारिक, सामाजिक, राजकीय, शेती-उद्योगाच्या बांधणीत कल्याणाचा ध्यास घेतलेले ते एक प्रज्ञावंत दूरद्रष्टा राजा होते.

देशभरातील बहुतांश युगपुरुषांना त्यांनी जबाबदारीने मदत केली. त्यातील प्रमुखात पितामह दादाभाई नौरोजी, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित मदन मोहन मालवीय, लाला लजपतराय, श्यामजी कृष्ण वर्मा, स्वा. सावरकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर वि. रा. शिंदे, न्या. महादेव गो. रानडे या काही आणि अनेकांना महाराजांनी मदत केली. एवढेच नाही तर स्वातंत्र्यवीरांचे ते एकमेव राजा आहेत की, ज्यांनी आयुष्यभर क्रांतिकारकांचे पाठीराखे होऊन बलाढ्य सत्तेशी संघर्ष केला. सुप्रशासनाचे अनेक प्रयोग राबविले. कोणत्याही राष्ट्राची संपत्ती जशी शेती-उद्योग-धंद्यात असते, तेवढीच ती तेथील साहित्य, कला, संगीत, शिल्पकला या सांस्कृतिक वारशातही असते, हे ओळखून ते या सर्वांचे पोशिंदे झाले.

अशा सयाजीराव महाराजांची मराठीत आतापर्यंत प्रकाशित सतरा चरित्रग्रंथांपैकी या खंडात पाच चरित्रांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे प्रमुख संपादक यमाजी मालकर आणि सहसंपादक डॉ. राजेंद्र मगर यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या 'चरित्रसंग्रह' या खंडात पाच चरित्रांचा अनमोल सांस्कृतिक वारसा एकत्रित पुनर्प्रकाशन करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास आनंद होत आहे.

बाबा भांड
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई

दि. २२/३/२०१८

संपादकाचे निवेदन

आधुनिक भारताचे एक शिल्पकार सयाजीराव

बडोदा संस्थानाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या ६४ वर्षांच्या कारकिर्दीत रयतेचा राजा म्हणून जे काम केले, त्याला इतिहासात तोड नाही. स्वतंत्र भारतात जे बहुजन हिताचे निर्णय आता तरी घेतलेच पाहिजेत, असे आपण आज म्हणत आहोत, ते निर्णय घेण्याचे धाडस महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी केले होते. बडोद्याच्या गादीवर महाराज ज्या नाट्यमयरीत्या बसले, तेथपासून या संस्थानाने राजेशाहीचा एक आदर्श घालून दिला. समाजाच्या संक्रमणात आज बहुतेक देशांनी लोकशाहीचा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अंगीकार केला आहे; पण ज्यावेळी राजेशाही हाच राजमार्ग होता, तेव्हा रयतेचे कल्याण होण्यासाठी राजाचे चारित्र्यच महत्त्वाचे ठरत होते. राजा म्हणजेच सर्वसत्ताधीश, निरंकुश सत्ता हे सर्व मान्य केले जात होते आणि त्यात मिळणाऱ्या स्वातंत्र्यावर समाधान मानावे लागत होते. राजाचे चारित्र्य आणि राजघराण्यातील उलथापालथ हेच रयतेचे नशीब होते आणि याचा वाईट अनुभव बडोदा संस्थानातील जनताही त्यापूर्वी घेतच होती. यादरम्यान योगायोगाने राजपद मिळालेल्या सयाजीरावांनी जो राज्यकारभार केला, तो त्या संस्थानाचा आज उज्ज्वल इतिहास तर झालाच; पण आदर्श राज्यकारभाराचे जगासमोर एक उदाहरण झाले आहे.

राजाचा इतिहास हाच त्या संस्थानाचा किंवा देशाचा इतिहास, असे मानले गेले आहे आणि ते खरेही आहे; पण त्यामुळे अनेकदा खरा इतिहास समोर येत नाही. त्यात भारतात इतिहास लेखनाला अनेक मर्यादा राहत आल्या आहेत; पण या बाबतीतही बडोदा संस्थान भाग्यवान म्हटले पाहिजे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्या संस्थानात लोककल्याणाची इतकी प्रचंड कामे केली की त्याची दखल म्हणून त्या वेळच्या लेखक, इतिहासकारांना त्याची दखल घ्यावीच लागली. त्यामुळे इतिहासकारांनी सयाजीराव महाराजांचे चरित्र लिहायला घेतले तेव्हा त्यांनी केलेल्या सामाजिक, प्रशासकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक सुधारणांची विशेष नोंद घेतलेली दिसते. महाराजांचा सहवास लाभलेल्या लेखकांनी महाराजांचे चरित्र लिहून ठेवले, हे

त्यामुळेच महत्त्वाचे ठरते. सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र हे राजाचे चरित्र म्हणून लिहिले गेले असले तरी तो एकप्रकारे बडोदा संस्थानात होत असलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक सुधारणांचा लेखाजोखा आहे. हा असा लेखाजोखा आहे, जो बडोद्यासारख्या एका छोट्या संस्थानात आकार घेत होता; पण स्वतंत्र भारताला मार्गदर्शक ठरेल, अशा अनेक सुधारणा त्यात अंतर्भूत होत्या. सयाजीराव गायकवाड नावाच्या राजाचे हे चरित्र अशा विविध अंगांनी महत्त्वाचे आहे. आजच्या आधुनिक पिढीसमोर ते सदोदित राहिले पाहिजे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा त्यातील काही चरित्रांचे प्रकाशन करण्याचा निर्णय म्हणूनच स्वागतार्ह आहे.

महाराजांची मराठीत एकूण सतरा चरित्रे लिहिली गेली आहेत. सयाजीराव गायकवाड यांच्या चरित्रसंग्रहाच्याया पहिल्या खंडात का.ना. गोत्री, य. रा. दाते, वि. पां. दांडेकर, गो. स. सरदेसाई आणि ब. न. फाटक यांनी लिहिलेल्या चरित्राचा समावेश आहे. काशीनाथ नारायण गोत्री हे महाराजांच्या खासगी खात्यात सेवक होते आणि महाराज करत असलेल्या सुधारणांमुळे प्रभावित होऊन त्यांनी महाराजांचे चरित्र लिहिले आहे. महाराज गादीवर बसून २५ वर्षे झाली होती, तेव्हा हे चरित्र लिहिले गेले, त्यामुळे या सुरुवातीच्या काळात संस्थानात नेमके काय घडले आणि महाराजांनी संस्थानाला कसे वळण दिले, हे या चरित्रात उत्तमरीत्या उमटले आहे. गोत्री हा सर्व बदल अगदी जवळून पाहत होते, त्यामुळे या पहिल्या चरित्राला अतिशय महत्त्व आहे. हे चरित्र संक्षिप्त स्वरूपात असले तरी त्यात राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणा तसेच राजकीय प्रसंग, महाराजांचे नैसर्गिक गुण, महाराजांची लोकप्रियता, महाराजांस अगत्याची विज्ञप्ती उपसंहार असे भाग केलेले आहेत. एवढेच नव्हे तर श्री. सौ. चिमणाबाई महाराणीसाहेब यांचे भाषण, श्रीमंत महाराजासाहेब यांचे धार्मिक विषयासंबंधीचे महत्त्वाचे व्याख्यान आणि 'माझा युरोप व हिंदुस्थान देशातील कार्यक्रम आणि दिनचर्या' ही सयाजीरावांच्याच विचारांची जोड त्याला दिल्यामुळे ते या चरित्राला पूरक झाले आहे.

महाराजांचे दुसरे मराठी चरित्र हे य. रा. दाते यांनी लिहिले आहे. दाते हे महाराजांचे समकालीन साहित्यिक. १९३३ साली महाराजांच्या वयाला ७१ वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त 'श्रीसयाजीगौरवग्रंथ' लिहिला गेला. दाते यांनी त्यावेळी लिहिलेले हे चरित्र आहे. शिवाय त्यावेळी महाराजांनी राज्यकारभार हाती घेण्यास ५८ वर्षे पूर्ण झाली होती, त्यामुळे गोत्री यांनी लिहिलेल्या चरित्राच्या तुलनेत ३३ वर्षांच्या कारकिर्दीची भर पडली होती. त्यामुळे हे चरित्र अधिक परिपूर्ण म्हणता येईल. शिवाय साहित्यिक असल्याने चरित्राची भाषा प्रभावी असून घटना घडामोडींचा विशेष अभ्यास त्यांनी केलेला दिसतो. दाते यांनी लिहिलेले चरित्र पूर्ववृत्त अशा प्रकरणाने सुरू होते आणि उपसंहाराने संपते. सयाजीरावांच्या आयुष्यातील सर्व महत्त्वाच्या घटना आणि त्यांनी राज्यात केलेल्या सुधारणांवर दाते यांनी सूत्रबद्ध पद्धतीने तसेच शैलीदार लेखन केले आहे.

महाराजांचे तिसरे चरित्र हे वि. पां. दांडेकरांचे. दांडेकर हे महाराजांचे समकालीन आणि त्यावेळचे नामांकित लेखक असल्याने त्यांच्या चरित्राला महत्त्व आहे. त्यांना त्यांच्या मित्राने

महाराजांचे चरित्र लिहिण्यास प्रवृत्त केले आणि दांडेकर यांनी ते आनंदाने स्वीकारले. एक लेखक म्हणून त्यांनी चरित्रलेखनाचा केलेला विचार आणि इंग्रजी ग्रंथांचा घेतलेला आधार, यामुळे लेखनशैली आणि माहिती अशा दोन्ही अंगांनी ते परिपूर्ण झाले आहे. महाराजांचे चरित्र म्हणजे सुधारणांचा इतिहास, हे सूत्र सर्वच चरित्रांत पाहायला मिळते; पण गृहसाख्य, दिल्ली दरबार, आवडी निवडी, स्वभाव व शेवट, आठवणी व आख्यायिका अशा प्रकरणांचा समावेश करून दांडेकर यांनी सयाजीराव यांचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे.

इतिहासलेखनाचे व्यासंगी, रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई हे महाराजांकडे वाचक, राजपुत्रांचे शिक्षक आणि खासगी हिशेबनीस अशा विविध पदांवर तब्बल ३७ वर्षे काम करणारे नोकरदार. महाराजांचा असा सहवास आणि इतिहासलेखनाची व्यापक दृष्टी असा योगायोग 'श्री सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासांत' या १९५६ साली प्रसिद्ध झालेल्या चरित्रग्रंथात जुळून आला आहे. रियासतकारांचे हे पुस्तक म्हणजे खरेतर चरित्रग्रंथ नव्हे; पण रियासतकारांनी महाराजांचे जीवन आणि राज्यकारभार इतका जवळून पाहिला आहे की, त्यांच्या या मांडणीला विशेष महत्त्व प्राप्त होते. शिवाय त्यांनी हे लेखन महाराजांच्या सेवेतून निवृत्ती घेतल्यानंतर तीस वर्षांनी आणि भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लिहिले आहे. त्यामुळे तेथे नोकरदार म्हणून त्यांच्यावर जो प्रभाव होता, तो बाजूला सारून या आठवणी लिहिल्या गेल्या आहेत. महाराजांच्या राज्यकारभारातील अनेक बारकावे या लेखनात वाचायला मिळतात. विशेषतः स्वातंत्र्य चळवळीत महाराजांचे योगदान आणि त्यांची राष्ट्रीय दृष्टी समजून घेण्यासाठी हे लेखन अतिशय महत्त्वाचे ठरते. स्वतंत्र भारताची घडी बसविताना महाराजांच्या प्रशासकीय सुधारणांचा कसा उपयोग झाला, हेही या लेखनातून पाहायला मिळते. महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अनेक बुद्धिवंत आणि कर्तबगार माणसांची राज्यकारभारात मदत घेतली. त्यामुळेच महाराजांचे परदेश दौरे, आजारपण आणि वैयक्तिक आयुष्यातील उलथापालथीत बडोदा संस्थानाचे प्रशासन उत्तम पद्धतीने चालत राहिले. माणसांची ही निवड महाराजांनी केली आणि त्यांना सांभाळले, याविषयीचे उल्लेखही महत्वाचे ठरतात. 'माणसाला मोठे होण्याची संधी दिली म्हणजे माणसे मोठी होतात', हे या ग्रंथाच्या प्रस्तावनेतील वा. ग. जगताप यांचे वाक्य यादृष्टीने बोलके आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताच्या उभारणीत सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा संस्थानातील सुधारणांचा आदर्श घेतला जावा आणि महाराजांनी त्यावेळी बजावलेल्या ऐतिहासिक भूमिकांचा गौरव व्हावा, असे आपल्याला वाटणे साहजिक आहे; पण तसे झाले नाही. किमान मराठी राजा म्हणून महाराष्ट्राने तरी त्यात पुढाकार घ्यावा, असा एक विचार महाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्त (१९६३) झाल्याचा उल्लेख 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड' या ब. न. फाटक यांच्या चरित्रग्रंथांतत्यांच्याच प्रस्तावनेत मिळतो; पण चीन आक्रमणामुळे जन्मशताब्दी साजरी करण्यात अनेक मर्यादा आलेल्या दिसतात. यातून एकच झाले, ते म्हणजे सयाजीराव यांच्या मृत्यूनंतर मराठीतील त्यांचे पहिले चरित्र प्रसिद्ध होऊ शकले. फाटक यांनी लिहिलेले हे चरित्र छोटे असले तरी त्यात अनेक बारकावे आले आहेत. सयाजीराव महाराज एक राजा म्हणून कसे आदर्श होते

आणि त्यांनी घेतलेल्या राष्ट्रीय भूमिकांचे महत्त्व, यावर फाटक यांनी केलेले भाष्य महत्त्वाचे ठरते. कारण हे लेखन महाराज यांच्या मृत्यूनंतर झालेले आहे.

अतिशय सामान्य घरात जन्म घेऊन सयाजीराव गायकवाड यांना मिळालेले राजपद, त्या पदाला न्याय देण्यासाठी त्यांनी केलेले कष्ट, राजा आणि प्रजा यातील अंतर कमी करण्याचे त्यांनी केलेले प्रयत्न, सामाजिक आणि आर्थिक सुधारणा बहुजनांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनात त्यांनी केलेले आमूलाग्र बदल, विकसित जग पाहून त्या जगातील चांगल्या गोष्टींची आपल्या राज्यात अंमलबजावणी व्हावी, यासाठी त्यांनी केलेली धडपड, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक संस्थांची उभारणी आणि त्यांचा देशभर प्रसार व्हावा यासाठीचे जाणीवपूर्वक प्रयत्न आणि बडोदा संस्थान हे अंतिमतः भारत नावाच्या स्वतंत्र होऊ घातलेल्या देशाचा भाग आहे, याचे एका राष्ट्रीय विचाराच्या राजाला असलेले भान अशा सर्व दृष्टीने सयाजीराव गायकवाड यांची कारकीर्द आधुनिक भारताच्या इतिहासात महत्त्वाची आहे. आधुनिक भारताचा पाया रचणारे आणि तो रचणाऱ्या अनेकांना अडचणीच्या काळात उभे करणाऱ्या सयाजीरावांची ही यशस्वी कारकीर्द सतत भारतीयांच्या समोर असावी, अशी आहे. या चरित्रसंग्रहाचे प्रकाशन त्यादृष्टीने महत्त्वाचे आहे.

ही पहिली पाच चरित्रे आज काही मोजक्या ग्रंथालयांतच उपलब्ध आहेत. त्यामुळे अभ्यासक आणि वाचकांना उपलब्ध होण्यात अनेकअडचणी आहेत. त्यामुळे या चरित्रांचे पुनर्प्रकाशन केले जाते आहे.

अकलूज येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक श्री. राजेंद्र मगर यांनी अलीकडेच सयाजीराव गायकवाड यांच्या चरित्रांवर पीएच.डी. केली. त्यामुळे त्यांनी या ग्रथांचे सहसंपादन करणे, संयुक्तिकच आहे. त्यांनी या चरित्रांचा खोलात जाऊन अभ्यास केला असून त्याचा प्रत्यय त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत येतोच. हे सर्व मूळ स्वरूपात अभ्यासकांवर पोहोचविण्याची जबाबदारी साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड यांनी माझ्यावर सोपविली. त्यामुळे हा ऐतिहासिक महत्त्व असलेला बहुमोल ठेवा महाराष्ट्रासमोर ठेवणे शक्य झाले आहे. आधुनिक भारताची घडण समजून घेणाऱ्या जाणकार आणि वाचकांसाठी हा चरित्रसंग्रह भूत, वर्तमान आणि भविष्यकाळाची शृंखला जोडण्याचे काम करेल, असा विश्वास वाटतो.

यमाजी मालकर, पुणे
१५ मार्च २०१८

अ नु क्र म

अध्यक्षांचे निवेदन / ७
संपादकाचे निवेदन / ९
प्रस्तावना / १५

१. श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड
यांचे संक्षिप्त चरित्र - काशीनाथ नारायण गोत्री / ८१
२. श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे चरित्र - यशवंत रामकृष्ण दाते / १६९
३. सयाजीराव गायकवाड - विश्वनाथ पांडुरंग दांडेकर / २५३
४. श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात - गोविंद सखाराम सरदेसाई / ३३७
५. माझी संसारयात्रा - गोविंद सखाराम सरदेसाई / ४२३
६. सयाजीराव गायकवाड - ब. न. फाटक / ४९७

प्रस्तावना

कवळण्यासारख्या खेडेगावातून अचानक बडोदा संस्थानचा नृपती होणे ही तशी अनाकलीन परंतु वास्तव घटना होती. या एका घटनेमुळे एका सामान्य कुटुंबात जन्मलेला गोपाळ बडोदा संस्थानाचा राजा झाला. दत्तक विधानानंतर त्यांचे नामकरण सयाजीराव गायकवाड (तिसरे) असे करण्यात आले. गोपाळ ते सयाजीराव महाराज हा प्रवास दत्तकविधानाबरोबर घडला. मात्र, त्यापुढचा प्रवास निश्चित सोपा नव्हता. त्यांनी दत्तकविधानानंतर बडोदा संस्थानाची केलेली प्रगती उल्लेखनीय व विश्वस्तरीय होती. सयाजीराव महाराजांच्या जीवनाचा प्रवास सामान्य ते असामान्य असा घडला. त्यांचा जीवनप्रवास शुन्यातून विश्व निर्माण करणे असा वैशिष्टपूर्ण होता. संस्थानात सुधारणा करताना प्रजेच्या मूलभूत प्रश्नापासून ते जगातील सर्वोत्तम त्या सुधारणा संस्थानात आणणे, हा ध्यास त्यांनी घेतला होता. आणि तो पूर्णही केला. त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने, आधुनिक सुधारणांनी हिंदुस्थानातील समकालीन सर्व संस्थानात पुढारलेले बडोदा संस्थान निर्माण केले. राजकिय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्य, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रांत ठसा उमटवणारे महाराजांचे व्यक्तिमत्त्व होते. असे व्यक्तिमत्त्व असल्यामुळेच साहजिकच त्यांच्याविषयी नानाविध लेखकांनी लिहिले. त्यांच्या चरित्रग्रंथांची निर्मिती झाली. त्यापैकी काही चरित्रांचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ करणार आहे. ही अत्यंत अभिनंदनीय बाब आहे.

या खंडाला मी लिहिलेली प्रस्तावना वर्णनात्मक आहे. सयाजीराव महाराज आणि चरित्रकारांविषयी मी केलेली विधाने ही चरित्रकारांच्या विधानाला अनुसरून केलेली आहेत. महाराजांविषयीचे माझे आकलन मी वेळोवेळी अत्यंत समतोलपणे मांडले आहे. या पुनर्प्रकाशित चरित्रांचे संपादन करण्याची संधी मंडळाचे अध्यक्ष मा. बाबा भांड यांनी मला दिली, हे मी माझे सद्भाग्य समजतो.

महाराजांच्या मराठी चरित्रनिर्मितीची सुरुवात इ. स. १९०५ साली झाली. पहिले चरित्र काशीनाथ नारायण गोत्री या त्यांच्या सेवकाने लिहिले. गोत्री यांनी चरित्र लिहिताना साधनसामग्री जमवत, वेगवेगळ्या घटना -प्रसंगाची योग्य निवड करत अतिशय चिकाटिने हे चरित्र लिहिले. त्यानंतर यशवंत रामचंद्र दाते (इ. स. १९३३), वि. पां. दांडेकर (इ. स. १९३३), दाजी नागेश आपटे (इ. स.१९३६), गोविंद सखाराम सरदेसाई (रियासतकार सरदेसाई) (इ. स. १९५६) आणि ब. न. फाटक (इ. स. १९६३) यांनी महाराजांची चरित्रे लिहिली. त्यानंतरही

निंबाजीराव पवार (इ. स.१९८६), व्ही. के. चावडा (अनुवाद-स. गं. मालशे) (इ. स.१९८७), गणेश अग्निहोत्री (इ. स.२००३), स्मिता भागवत, अविनाश कप्तान (इ. स.२००४), गंगाधर गाडगीळ (इ. स.२००८), दा. वि. नेने (दादुमिया) (इ. स.२०१०), बाबा भांड (इ. स.२०१३), गौतम निकम (इ. स.२०१३), उल्हास पाटील (इ. स.२०१४), चंद्रलेखा बेलसरे (इ. स. २०१५) यांनी महाराजांची चरित्रे लिहिली. महाराज हयात असताना काशीनाथ नारायण गोत्री, यशवंत रामचंद्र दाते, वि. पां. दांडेकर आणि दाजी नागेश आपटे यांनी चरित्रे लिहिली.

या खंडात का. ना. गोत्री, य. रा. दाते, वि. पां. दांडेकर, गो. स. सरदेसाई ('श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत' हे महाराजांचे चरित्र आणि 'माझी संसारयात्रा' हे सरदेसाई यांचे आत्मचरित्र) आणि ब. न. फाटक यांनी लिहिलेल्या चरित्रांचा समावेश आहे. महाराजांची ही चरित्रे दुर्मिळ आहेत. ती बडोद्यासह महाराष्ट्रातील अत्यंत कमी ग्रंथालयात उपलब्ध आहेत. हा दुर्मिळ ठेवा या निमित्ताने पुनर्प्रकाशित होत आहे. ही आनंदाची बाब आहे. सयाजीराव महाराजांचा सहवास लाभलेल्या लेखकांनी ही चरित्रे लिहिली आहेत. त्यामधील गोत्री, सरदेसाई महाराजांचे सेवक होते. दाते आणि दांडेकर हे महाराजांचे समकालीन आहेत. ते बडोदा संस्थानातील नामांकित लेखक होते. फाटक यांनी महाराजांचा कार्यकाळ अनुभवला होता. त्यांच्या कार्याचे चिंतन केले होते. त्यामुळे या खंडातील चरित्रांना ऐतिहासिक महत्त्व आहे.

एका मराठी राजाने प्रजेशी समरस होत, परप्रांतात राज्य केले. त्यांना आपलेसे केले. फक्त राज्य केले असे नाही तर सर्व परिस्थिती प्रतिकूल असताना जनतेच्या कल्याणाच्या सुधारणा केल्या. पुढारलेल्या पाश्चात्य देशासारख्या सुधारणा संस्थानात आणल्या. जनतेप्रती आपुलकी ठेवणारे महाराज खरोखरच युगद्रष्टा, लोकपाळ राजा होते. त्यामुळे त्यांच्या चरित्रांना ऐतिहासिक महत्त्व आहे. महाराजांची चरित्रे निर्माण होत असताना इतरही राजा महाराजांची चरित्रे निर्माण होत होती. त्यापूर्वीही झाली होती. आणि नंतरही झाली. सयाजीराव महाराजांच्या चरित्रांच्या निमित्ताने सयाजीराव महाराजांच्या चरित्रांच्या पूर्वीची आणि समकालीन चरित्रांची परंपरा पाहणे महत्त्वाचे ठरेल.

मराठी साहित्यविश्वाला चरित्रांची फार मोठी परंपरा आहे. 'लीळाचरित्र'पासून सुरू झालेली परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे. महाराजांच्या चरित्रांअगोदर ऐतिहासिक चरित्रांची परंपरा होती. मराठीतील पहिले अनुवादित मुद्रितचरित्र 'राजा प्रतापदित्याचे चरित्र' आहे. त्यानंतरही ऐतिहासिक चरित्रे निर्माण होत होती. अनुवादित ऐतिहासिक चरित्रांमध्ये 'कोलंबसाचा वृत्तांत', 'रोम बादशहाचा वृत्तांत', 'साक्रेतिसचा इतिहास', 'खुसरू राजाचा इतिहास' या प्रामुख्याने चरित्रात परदेशी चरित्रनायकांची चरित्रे आहेत. आपल्या देशातील ऐतिहासिक पुरुषांचे पहिले चरित्र 'नाना फडणवीस यांची बखर' हेही अनुवादितच आहे. म्हणजेच स्वदेशातील ऐतिहासिक पुरूषांची चरित्रे निर्माण होण्याअगोदर परदेशातील व्यक्तींच्या चरित्रांचा अनुवाद स्वदेशीय चरित्रकारांनी केला. त्यानंतर मात्र काही भाषांतरे तर काही स्वनिर्मीती अशा प्रकारे चरित्रांची निर्मिती होत गेली. स्वदेशातील ऐतिहासिक पुरुषांमध्ये शिवाजी महाराज, संभाजी महाराज

आणि शिवाजी महाराजांच्या नंतर मराठेशाही सांभाळणाऱ्या राजांची चरित्रे लिहिली गेली. मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, माधवराव पेशवे, पेशवाईच्या काळातील कर्त्या पुरुषांची चरित्रे लिहिली गेली. ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे पाहता आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या कर्तृत्ववान चरित्रनायकांची चरित्रे निर्माण होत होती.

मराठीतील पहिला ग्रंथ इ. स. १८०५ साली मुद्रित झाला. आणि पहिले चरित्र इ. स. १८१६ साली मुद्रित झाले. त्यानंतर साधारणपणे शंभर वर्षांनी म्हणजेच इ. स. १९०५ साली सयाजीराव महाराजांचे पहिले चरित्र प्रकाशित झाले. या खंडात समाविष्ट चरित्र निर्मितीचा कालखंड इ. स. १९०५ ते इ. स. १९६३ च्या दरम्यानचा आहे. या कालखंडात हिंदुस्थानात स्वातंत्र्याची मागणी जोर धरत होती. इ. स. १९४७ साली देशही स्वतंत्र झाला. इ. स. १९०५ ते इ. स. १९६३ या कालखंडातील अन्य चरित्रांकडे पाहिले असता या कालखंडात ऐतिहासिक चरित्रे मोठ्या प्रमाणात तयार झाली. स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. लोकांना प्रेरणा मिळावी, स्फूर्ती मिळावी, स्वातंत्र्यासाठी लोकांनी प्रेरीत व्हावे यासाठी ऐतिहासिक चरित्रनायाकांची चरित्रे लिहिली जात होती. याकाळात शिवाजी महाराजांची चरित्रे अधिकाधिक लिहिली गेली. त्यावेळीच इतरही ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे लिहिली जात होती.

सयाजीराव महाराजांनी संस्थानात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्या अद्वितीय तर होत्याच पण प्रजेच्या जीवनात अमूलाग्र बदल घडवणाऱ्या होत्या. साहजिकच त्यांच्या सुधारणांचा बोलबाला हिंदुस्थानभर होत होता. आणि त्यामुळेच त्यांच्या चरित्रांची निर्मिती सुरू झाली. सयाजीराव महाराजांनी केलेल्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणा समाजमान्य होत्या. सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनी त्यांच्या सुधारणा डोक्यावर घेतल्या. त्यांच्या सुधारणांना मान्यता मिळत गेली. देशासाठी, समाजासाठी अनेक थोर लोकांनी कार्य केले. परंतु त्यामधील काहींच्या पदरी उपेक्षाच आली. त्यामध्ये सयाजीराव महाराजांचा समावेश होतो. सयाजीराव महाराज गुजरातमध्ये राज्य करत होते. त्यामुळे बहुधा महाराष्ट्रातील लोकांचे त्यांच्याकडे लक्ष नसावे. महाराष्ट्रात त्यांच्यावरती कमी प्रमाणात लिहिले गेले. महाराजांच्या पदरी महाराष्ट्रात उपेक्षाच आलेली दिसते. त्यांना कमी प्रसिद्धी मिळाल्याचे दिसते. त्यांच्या मराठी चरित्रांची संख्या कमी आहे. महाराज हयात असताना काही चरित्रांची निर्मिती झाली. त्यांच्या जीवनकार्याचे विलेश्षण, व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करणारी चरित्रे कमी आहेत. एकंदरीत सयाजीराव महाराजांच्या पदरी त्यांच्या कार्याच्या तुलनेत चरित्रांच्या आणि प्रसिद्धीच्या बाबतीत निराशा आली.

बडोदा संस्थान गुजरात राज्यात होते. सयाजीराव महाराज (तिसरे) यांच्या चरित्रांच्या निमित्ताने मराठी सेनापतींनी गुजरातमध्ये संस्थान कसे निर्माण केले याचा इतिहास पाहणे महत्त्वाचे ठरते.

छत्रपती शिवाजी महाराजांपासून मराठ्यांचा गुजरातशी संबंध आला. महाराजांनी इ. स. १६६४ आणि इ. स. १६७० मध्ये पुन्हा सुरतेवर हल्ला केला. तसेच इ. स. १६७२ साली सुरतेच्या बाजूला असणारे 'नेरा' आणि 'बागलाणा' हे दोन्ही किल्ले जिंकले. तेंव्हापासून पुढे कायमच मराठे सरदारांचा गुजरातशी संबंध येत राहिला. यापाठीमागे प्रामुख्याने खंडणी वसुली आणि राज्यविस्तार हे दोन उद्देश होते. मोगलांच्या तुलनेत मराठ्यांना हा प्रदेश वरील दोन्ही

उद्देशांसाठी जवळ, सोयीस्कर होता. गुजरातमधून महाराष्ट्रात येण्यासाठीच्या मार्गावरील साल्हेरचा किल्ला मराठा सेनापती मोरो त्र्यंबक पिंगळे यांनी जिंकला. त्यानंतरच्या पुढच्या सरदारांनी सुद्धा गुजरात राज्यात आपला वावर चालूच ठेवला. हंबीरराव मोहिते या मराठा सेनापतीने इ. स. १६७५ साली नर्मदा पार करत अगदी 'भडोच' पर्यंतचा प्रदेश आपल्या टापूखाली आणला. आणि खंडणी वसुलीसाठी अधिकाऱ्यांची नेमणूक केली. त्यानंतर मराठ्यांचे तिसरे सेनापती खंडेराव दाभाडे यांनी गुजरात प्रातांत चांगलीच दहशत बसवली. मराठ्यांना कायम वस्ती करून राहता येईल अशी परिस्थिती निर्माण केली. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांनी सुद्धा गुजरात प्रांतातील राज्य विस्ताराला बळ दिले. त्यांनी इ. स. १६९९ मध्ये खंडेराव दाभाडे यांना कर वसुलीसाठी बागलाणात पाठवले. परंतु दाभाडे फक्त खंडणी वसूल करत बागलाणात राहिले नाहीत, तर त्यांनी आपली मजल सुरतपर्यंत मारली. राज्यविस्तार चालू ठेवला. पुन्हा दाभाडे सरदारांनी मोठ्या ताकतीने इ. स. १७०५ मध्ये बऱ्हाणपूर, काठेवाड आणि सौराष्ट्रापर्यंत मजल मारली. त्याभागातही खंडणी वसुली सुरू केली. एकूणच काय तर मराठा सरदार खंडेराव दाभाडे यांनी सोयीचे पडेल तेंव्हा कधी एका मोगल सरदाराला तर कधी दुसऱ्या मोगल सरदारांना मदत करत तर कधी त्यांच्याविरूद्ध पवित्रा घेत आपला राबता, विस्तार गुजरात प्रातांत कायम चालू ठेवला. या सर्व घडामोडीत दाभाडे सरदारांबरोबर पहिले दमाजीराव गायकवाड यांचा सिंहाचा वाटा होता. हेच दमाजीराव गायकवाड 'गायकवाड संस्थाना'चे आद्य निर्माते होते. ते दाभाड्यांचे उजवा हात होते. दमाजीराव गायकवाड हे दाभाडे सेनापती बरोबर गुजरातेत शौर्य गाजवत होते. त्यांच्या या गुणांची कदर शाहू छत्रपतींनी केली. त्यांनी दमाजीराव गायकवाडांना इ. स. १७२१ मध्ये 'समशेर बहाद्दर' हा किताब दिला. तसेच नायब सेनापती म्हणून नेमणूकही केली. या किताबाचा गायकवाडांना अभिमान वाटे. तसेच यामुळे गायकवाडांची काही प्रमाणात का होईना पेशव्यांशी बरोबरी झाली.

खंडेराव दाभाडे आणि दमाजी गायकवाड यांचा कालांतराने मृत्यू झाला. त्यानंतर खंडेरावांच्या जागी त्र्यंबकराव दाभाडे यांची सेनापती म्हणून नेमणूक झाली. तर दमाजीराव गायकवाडांना औरसपुत्र नसल्याने त्यांचे नायब सेनापती हे पद पुतण्या पिलाजीराव गायकवाडांकडे गेले. या पिलाजीरावांचे वंशज बडोदा संस्थानाचे सत्ताधीश झाले. पिलाजीराव ते सयाजीराव गायकवाड(तिसरे) हा प्रवास निश्चितच सरळ, सुखरूप नव्हता. या मधल्या काळातील अनेक घडामोडी घडल्या. पुढे अनेक अडथळे पार करत गायकवाडांची सत्ता बडोद्यात बहरत गेली. खंडेराव दाभाडेंकडून त्र्यंबकराव दाभाडेंकडे सेनापती पद आले. या दरम्यान दाभाडेंनी इ. स. १७२४-२५ मध्ये खानदेशच्या जवळील नवापूरच्या फौजेचे नेतृत्त्व गायकवाडांकडे सोपवले. पिलाजीरावांनी सोनगड याठिकाणी आपल्या फौजेचे मुख्य ठिकाण वसवले. याच काळात एकमेकांच्या प्रदेशावर हुकूमत गाजवण्याची स्पर्धा गुजरातमध्ये सुरू होती. आणि या स्पर्धेच्या चक्रात पिलाजीराव अडकले. आपल्या शत्रूंचा एकदा पराभव करून आपण वर्चस्व गाजवावे असा मानस मनात ठेवला. त्यामुळे त्यांनी पेशव्याबरोबर लढाई केली. मात्र इ. स. १७३१ भिलापूच्या लढाईत दाभाडे - गायकवाड या जोडीचा दारूण पराभव झाला. सेनापती त्र्यंबकराव दाभाडे मारले गेले. तर

पिलाजीरावांना रणांगणातून पळ काढावा लागला. त्यामुळे दाभाड्यांचा अल्पवयीन मुलगा यशवंतराव यास सेनापती बनवण्यास आले. पेशव्यांनी पिलाजीरावांना आपला शत्रू न मानता त्याला आपल्या बाजूला वळविले. पिलाजीरावांना 'सेना खाससेल' हा किताब दिला. यशवंतराव लहान असल्याने आपोआपच 'दाभाडे - गायकवाड' सैन्याची सर्व सुत्रे पिलाजीरावांनी स्वतःच्या ताब्यात घेतली. म्हणजेच, एका अर्थाने पिलाजीराव गायकवाड सेनापती बनले. पिलाजीराव ताकदवान बनत चालले होते. आजूबाजूच्या प्रदेशावर आपली सत्ता असावी अशा निश्चयाने त्याने जोधपूरच्या अभयसिंग राजावर चाल केली. कालांतराने पिलाजीराव इतके ताकदवान झाले होते की, त्यांना हरवणे अवघड बनत चालले होते. त्यामुळे मोगल सुभेदाराने विश्वासघाताने पिलाजीराव गायकवाडांचा डकोर येथे इ. स. १७३२ मध्ये खून केला. पिलाजीरावांच्या ताब्यात असणारे बडोदे जिंकले. पिलाजीरावांच्या मृत्यूनंतर सोनगड याठिकाणी असणारे दमाजीराव दुसरे हे या सैन्यांचे प्रमुख बनले. दमाजीराव दुसरे पराक्रमी निघाले. त्यांनी बडोदे ताब्यात घेण्यासाठी पुन्हा दोनच वर्षांनी इ. स. १७३४ पुन्हा हल्ला करून बडोदे जिंकले. तेंव्हापासून बडोदे गायकवाडांकडे राहिले ते कायमचेच. दरम्यानच्याच काळात मोगलांच्या अंतर्गत बंडाळीचा दमाजीरावांना फायदाच झाला. अभयसिंग या मोगल सरदाराला हरवण्यासाठी मोमीनखान या सरदाराने दमाजीरावांचीच मदत घेतली. त्याबदल्यात दमाजीरावांना अहमदाबाद आणि विरमगाव या जिल्ह्यांचा अर्धा महसूल देवू केला. यामुळे दमाजीराव दुसरे अधिकच ताकतवान बनले. त्यांचे सामर्थ्य वाढले.

दमाजीराव (दुसरे) यांचे सामर्थ्य वाढल्याने, तसेच पेशवे बंगालमध्ये गेल्याचे समजल्याने पेशव्यांचा पराभव करण्याच्या दृष्टीने ते इ. स. १७४३ मध्ये दक्षिणेत आले. परंतु पेशवे बंगालमधून लवकर परत आल्याने त्यांनी दमाजीराव गायकवाड आणि रघोजी भोसलेंचा पराभव केला. अशा प्रकारे पेशव्यांविरूद्ध गायकवाड लढाई करत. परंतु त्यात त्यांचा पराभव होत होता. पुन्हा इ. स. १७४९ मध्ये दमाजीरावांनी साताऱ्याचे शाहू महाराजांची बाजू घेऊन पेशव्यांशी लढाई केली. त्यामध्ये सुद्धा त्यांना पराभव स्वीकारावा लागला. आणि पेशव्यांच्या कैदेत दोन वर्ष राहावे लागले. या काळात गुजरात मधला कारभार केदारजी गायकवाड यांनी पाहिला. नंतर पेशव्यांशी तह करून दमाजीरावांनी आपली सुटका करून घेतली.

मराठ्यांचे राज्य वाढत असतानाच इ. स. १७६१ मध्ये पानिपतचा घनघोर रणसंग्राम झाला. या लढाईत दमाजीराव आणि त्यांचा बंधू प्रतापराव होते. लढाईत हार होताच दमाजीराव बडोद्याच्या दिशेने परत निघाले. प्रतापरावही निघाले. परंतु वेगवेगळ्या दिशांनी गेल्यामुळे त्यांची भेट झाली नाही.

काही दिवसानंतर पेशवाईत अंतर्गत कलह माजला. दमाजीराव या काळात रघुनाथरावांच्या पक्षास मिळाले. माधवरावाचा पराभव करण्यासाठी दमाजीरावांनी आपला मुलगा गोविंदरावाला पाठवले. परंतु त्यासही इ. स. १७६८ मध्ये पराभव पत्करावा लागला. हा गायकवाडांचा पेशव्याविरूद्धचा तिसरा पराभव होता. पराभव आणि करारानंतर दमाजीरावांचा मृत्यू झाला. त्यानंतर मात्र दमाजीरावांची मुले सयाजीराव (पहिले), फत्तेसिंगराव आणि गोविंदराव यांची

सत्तेसाठी आपांपसात भांडणे होवू लागली. यामध्ये फत्तेसिंगराव यांनी गोंविदराव यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी पेशव्यांबरोबर मैत्री केली. पेशव्यांनी फत्तेसिंग यांना इ. स. १७७८ मध्ये 'सेनाखासखेल' ही पदवी दिली. तसेच बडोद्याचा राज्यकर्ता म्हणून मानण्याचे ठरले. याच काळात इंग्रजांबरोबर पेशव्यांनी, गायकवाडांनी मैत्री केली. काही काळ फत्तेसिंगराव यांनी शांततेत राज्यकारभार केला. परंतु इ. स. १७८९ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे गोविंदराव यांनी पुन्हा सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु सयाजीराव (पहिले) अद्यापही जिवंत होते. पेशव्यांनी सयाजीराव यांना गादीचा मालक आणि मानाजीराव यांना मुतालिक नेमले. त्यामुळे गोविंदराव यांचा निभाव लागला नाही. परंतु अल्पावधीतच इ.स. १७९३ मध्ये मानाजीराव आणि इ. स. १७९२ मध्ये सयाजीराव यांचा मूत्यू झाला. त्यामुळे गोविंदरावांच्या राजसत्तेचा मार्ग मोकळा झाला. काही काळ सत्ता भोगल्यावर गोविंदराव यांचाही इ. स. १८०० मृत्यू झाला. गोविंदरावांना आनंदराव, सयाजीराव (दुसरे) आणि फत्तेसिंगराव हे पुत्र होते. गोविंदरावांच्या मृत्यूनंतर आनंदराव गादीवर आले. त्यांनी फारशी कर्तबगारी केली नाही. या आनंदराव गायकवाडांनी आपली सत्ता वाचवण्यासाठी दिवाण रावजी अप्पाजी फणसे यांच्या मदतीने इस्ट इंडिया ब्रिटीश कंपनीबरोबर ६ जून १८०२ रोजी मैत्रीचा करार केला. या कराराने गायकवाड ब्रिटिशांचे मित्र झाले. या करारानंतर दोन वर्ष बडोद्यात अंदाधुंदी होती. या काळाबद्दल व्ही. के. चावडा म्हणतात, ''तह व तरतुदी, युती व प्रतियुती, हिस्से, खंडण्या आणि गहाणखते यांचा एकच गदारोळ दोन वर्षेपर्यंत चालू होता.''[१] अंदाधुंदी, गदारोळ चालूच होता. रेसिडेंट बडोद्यात आल्यामुळे इंग्रजांचा हस्तक्षेप वाढला. तसेच इंग्रजांच्या मदतीने बंडखोरी करणाऱ्या छोट्या मोठ्या शत्रूंचा पराभव गायकवाडांनी केला. मधल्या काळात इंग्रज आणि बडोद्याचे शासनकर्ते यांच्यांत अनेक करार झाले. अगदी इ. स. १८१७ सालच्या करारानुसार पुन्हा तैनाती फौज वाढवण्यात आली. इंग्रजांचे 'अजिंक्य मित्र' अशी गायकवाडांची ओळख झाली. आनंदराव गायकवाडांच्या नंतर इ. स. १८१९ साली सयाजीराव (दुसरे) गादीवर आले. मात्र तेथून पुढच्या बडोद्याच्या सर्वच राज्यकर्त्यांचे इंग्रजांबरोबर खटके उडत गेले. सयाजीराव (दुसरे) आपल्या हक्कांसाठी लढत असताना इ. स. १८४७ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यांना गणपतराव, खंडेराव आणि मल्हारराव हे तीन पुत्र होते. सयाजीराव महाराजांच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ पुत्र गणपतराव गादीवर आले. त्यांच्या राज्य कारभाराविषयी व्ही. के. चावडा म्हणतात, ''रस्तेबांधणी, बालहत्याप्रतिबंध, मुलांच्या विक्रीवरील बंदी, रोगप्रतिबंधक लस टोचण्याचा उपक्रम आणि रेल्वेचा प्रारंभ या गोष्टी रेंसिडेंटच्या प्रभावाची साक्षच पटविणाऱ्या होत्या.''[२] त्यांचा इ. स. १८५६ साली मृत्यू झाला. त्यानंतर द्वितीयपुत्र खंडेराव महाराज गादीवर आले. या खंडेराव महाराजांना इ. स. १८५७ च्या उठावात इंग्रजांविरूद्ध न लढता त्यांनी इंग्रजांना सहकार्य केले. इंग्रजांनी त्यांना 'जी. सी. एस. आय' (ग्रॅड कमांडर स्टार ऑफ इंडिया) किताब दिला. त्यांना दोन राण्यांपासून मुलगा झाला नसल्याने इ. स. १८६६ साली जमनाबाईंशी विवाह केला. त्यांच्यापासूनही त्यांना पुत्र नव्हता. मात्र इ. स. १८७० साली त्यांच्या मृत्यूसमयी जमनाबाई गरदोर होत्या. खंडेरावांच्या अकाली मृत्यूमुळे व त्यांना पुत्र नसल्याने त्यांचे कनिष्ठ बंधू मल्हारराव

महाराज गादीवर आले. जमनाबाईंना मुलगा की मुलगी होईल हे समजेपर्यंत मल्हाररावांना इंग्रजांनी पूर्ण अधिकार दिले नाहीत. इ. स. १८७१ साली जमनाबाईंनी कन्येला जन्म दिल्याने मल्हाररावांचे राजपद कायम झाले. दैवाने लाभलेले राजपद त्यांना व्यवस्थित सांभाळता आले नाही. दादाभाई नौरोजी सारख्या मातब्बर माणसांनी त्यांना दिवाण म्हणून मदत केली. परंतु आपल्या बेताल वर्तणूकीने त्यांना तुरूगांत जावे लागले. ब्रिटिश रेसिडेंट फायरे यांना विष देवून मारण्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला. त्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आली. दोषी आढळताच त्यांना बडतर्फ करून तुरूगांत टाकण्यात आले. इंग्रजांनी जमनाबाईंना दत्तक पुत्र घेण्यास काही अटींसह परवानगी देण्यात आली.

इथपर्यंत बडोद्याचा राजकिय घडामोडी पाहिल्यानंतर आपणाला पुन्हा इ. स. १७६१ च्या पानिपत युद्धापर्यंत पाठीमागे जावे लागेल. कारण इंग्रजांनी दत्तकपुत्र घेण्याची परवानगी जमनाबाईना दिली. तो दत्तकपुत्र दमाजीरावांबरोबर पानिपतच्या युद्धात असणाऱ्या प्रतापराव या भावाच्या घराण्यातील घेण्यात आला. पाठीमागे पाहिल्याप्रमाणे प्रतापराव पानिपतच्या युद्धातून परतल्यावर खानदेशातील गिरणारे या गावी स्थायिक झाले. काही कालखंडानंतर ही गावे पेशव्यांनी परत घेतली. त्यामुळे त्यांनी कवळणा या गावची पाटीलकी शंभर रूपयात घेतली. या गावातच प्रतापरावांचा वंशज वाढला. बडोद्यात एकामागून एक राजे होत होते. तिकडे कवळण्यातही एक एक पिढी पुढे सरकत होती. बडोद्यात दत्तकपुत्राचा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी प्रतापरावांची पाचवी पिढी कवळणा गावात होती. कवळण्यात काशीराव आणि त्यांचे बंधू होते. काशीराव धाडसी, कष्टाळू होते. त्यांनी व त्यांचे बंधू उखाजीराव यांनी बडोद्यातील गायकवाडांशी आपले नातेसंबंध जोडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना फारशे यश मिळाले नाही. परंतु दत्तकपुत्राचा प्रश्न निर्माण होताच इंग्रज अधिकाऱ्यामार्फत कवळणा शाखेची चौकशी करण्यात येऊ लागली. त्यापाठीमागची कारणेही तशीच होती. कारण इंग्रजांना बडोद्यातील अंदाधुंदी संपवायची होती. त्यासाठी त्यांनी काही अटी घातल्या. 'एकतर तो राजपुत्र बडोद्याबाहेरचा असावा. आणि जमनाबाईंपेक्षा वयाने लहान असावा.' या अटींसह दत्तकपुत्र निवडण्याची परवानगी देण्यात आली होती. बडोद्यात गायकवाडांचे निरनिराळे गट होते. एका गटाचा दत्तकपुत्र निवडला तर दुसरा नाराज होणार होता. त्यामुळे बडोद्यातील दत्तकपुत्र घेण्यास इंग्रजांची परवानगी नव्हती.

बडोदा शाखा औरस आहे की, नाही याबद्दल पुरावे गोळा करण्याचे काम नाशिकचे कलेक्टर इलिएट यांच्याकडे सोपवण्यात आले. इलियट यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण कष्ट घेतले. पूर्वीच्या काळी तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी गेल्यानंतर वंशपरंपरागत एकाच ब्राह्मणाकडे उतरण्याची प्रथा होती. कवळण्यातील गायकवाड घराणे त्रिंबकेश्वरमधील धोडोपंत शुक्ल आणि नाशिकमधील विनायक भट दीक्षित यांच्याकडे उतरत असत. इलियट यांना भारतीय परंपरांचा अभ्यास होता. त्यांनी शुक्लांकडे आणि दीक्षितांकडे असणारी गायकवाडांची वंशावळ तपासली. त्यांनी खात्रीलायक पुरावे गोळा करून बडोद्यातील गायकवाड घराणे आणि कवळण्यातील गायकवाड घराणे एकच असल्याचे त्यांना कळाले. त्यांनी परिस्थितीजन्य अनेक पुराव्यानिशी बडोद्यातील गायकवाडांचे घराणे औरस असल्याचे सिद्ध केले. पुढे स्वतः कवळण्यात जाऊन काशीरावांचे घर शोधले.

लहान मुलांची चौकशी केली. त्यांना भावाच्या मुलांसह नाशिकला कलेक्टर बंगल्यावर येण्यास सांगितले. या निरोपामुळे काशीराव आपल्या आनंदराव, गोपाळ आणि संपतराव आणि आपले बंधू उखाजीरावांचा मुलगा दादासाहेब यांच्यासह नाशिकला कलेक्टर बंगल्यावर दाखल झाले. तेथून त्यांना मुंबई मार्गे बडोद्याला नेण्यात आले. बडोद्यात या चौघांमधून दत्तकपुत्र निवडण्याचे ठरले. राजमाता जमनाबाई मल्हारारावांच्या काळात सुरक्षेच्या अभावी पुण्यात राहत होत्या. मल्हारारावांच्या अटकेनंतर त्यांना सन्मानाने बडोद्यात आणण्यात आले. त्या चाणाक्ष, हुशार होत्या. त्यांना दत्तकपुत्र निवडण्याची मुभा दिली असली तरी, त्यांनी जाणकार माणसांबरोबर विचार विनिमय केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. त्यांनी सर्व मुलांना एक प्रश्न विचारल्याची नोंद सर्व चरित्रांत आहे. तो प्रश्न असा होता, 'तुम्हांला इथे कशासाठी आणलं आहे?' त्यावर गोपाळ सोडता एकालाही या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देता आले नाही. गोपाळने मात्र विश्वासपूर्वक, 'मी राजा होण्यासाठी आलो आहे.' असं उत्तर दिलं. या एका प्रश्नाच्या उत्तराने गोपाळची दत्तकपुत्र म्हणून निवड निश्चितच झाली नसेल. इतरही अनेक निकषांसह, निरीक्षणांसह इ. स. १८७५ साली निवड केली. या निवडीसह गोपाळचे सयाजीराव महाराज (तिसरे) असे नामकरण करण्यात आले. महाराजांना दत्तकविधानानंतर सहा वर्ष औपचारिक शिक्षण देण्यात आले. या शिक्षणासाठी एफ. ए. एच. इलियट या शिक्षकाची नेमणूक करण्यात आली. या शिक्षणाच्या आधारे महाराजांनी प्रगती केली. प्रजेच्या गरजा लक्षात घेऊन त्या गरजांचा पाठपुरावा केला. त्या पूर्णत्वास नेल्या. त्या सुधारणा उल्लेखनीय होत्या.

सयाजीराव महाराजांविषयी अनेक विद्वान, जाणकार आणि प्रसिद्ध व्यक्तींनी गौरव उद्गार काढले आहेत. महात्मा गांधीजींनी इ. स. १९३३ साली येरवडा जेलमधून सयाजीराव महाराजांना पत्र लिहिले. त्या पत्रात ते म्हणतात, "There can be no doubt that His Highness the Maharajah Saheb Gaekwad of Baroda Deserves the warmest congratulations of us all for his treatment of Harijans and his withdrawing all state recognition of untouchability."[3] गांधीजींबरोबर मदन मोहन मालवीय, रविंद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, स्वामी विवेकानंद, अरविंद घोष, महात्मा जोतिराव फुले, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, जगदीशचंद्र बोस, न. चि. केळकर, भगवंत पाळेकर यांसह अनेक मान्यवरांनी महाराजांविषयी गौरवोद्गार काढले. फक्त गौरवोद्गार काढले असे नाही तर त्यांच्या लोकोपयोगी, समाजधार्जीण्या कर्तृत्वाविषयी जगभरातील विद्वानांनी मान्यता दिली. त्यांच्या आदर्श सुधारणांचा बोलबाला हिंदुस्थानात होता. त्या सुधारणा उल्लेखनीय असल्याने आणि त्यांच्यात सुधारणावादी व्यक्तिमत्त्व असल्याने त्याच्यावरती लेख, चरित्रे लिहिली जावू लागली.

सर्वप्रथम इ. स. १९०५ साली महाराजांकडे सेवक म्हणून असणाऱ्या काशीनाथ नारायण गोत्री यांनी महाराजांचे मराठी चरित्र लिहिले. म्हणून या चरित्राला ऐतिहासिक महत्त्व आहे. इतिहासामध्ये चरित्राचा समावेश होतो, असे का. ना. गोत्री यांनी या चरित्राच्या प्रस्तावनेत जरी म्हटले असले तरी, ते इतिहासाप्रमाणे घटनांची जंत्री न देता महाराजांनी केलेल्या सुधारणांचे

निवेदन करतात. महाराजांचे सुधारणावादी, आदर्शात्मक व्यक्तिमत्त्व रेखाटण्याचा प्रयत्न करतात. ते प्रस्तावनेत म्हणतात, ''देशाचा इतिहास वाचल्याने जसे ज्ञान होते. तसेच देशातील शहाणे, सदाचरणी, शूर वगैरे अनेक गुणांनी लोकमान्य झालेल्या मनुष्यांची चरित्रे वाचल्यानेही पुष्कळ बोध होतो.'' (गोत्री, प्रस्तावना, पृ. ८५) म्हणजेच या चरित्रनिर्मितीचे मूल्य लक्षात घेतले तर आदर्शात्मक बोधवादी दृष्टिकोनातून चरित्राची निर्मिती झाल्याचे लक्षात येते. चरित्र वाचल्याने वाचकाने बोध घ्यावा, आदर्श घ्यावा अशी प्रस्तुत चरित्र निर्मितीमागची लेखकाची भूमिका आहे. चरित्रकार सयाजीराव महाराजांचे समकालीन असल्याने त्यावेळच्या वास्तव परिस्थितीचे त्यांनी व्यवस्थित अवलोकन दिसते. चरित्रकारांनी चरित्र लिहिताना महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा काळ विचारात घेतला आहे. त्या वेळच्या परिस्थितीच्या, काळाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे कर्तृत्व आणि त्यांना मिळालेली प्रजेची मान्यता या चरित्रातून दिसते.

या खंडातील दुसरे चरित्र य. रा. दाते यांनी 'श्रीसयाजीगौरवग्रंथ' या ग्रंथात लिहिले होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त 'श्रीसयाजीगौरवग्रंथ' समर्पित करण्यात आला होता. हा ग्रंथ 'श्री. महाराज सयाजीराव गायकवाड वाढदिवस मंडळा'ने पूर्णत्वास नेला. ग्रंथ साकारण्यासाठी रामचंद्रराव शामराव मानेपाटील, दामोदर सावळाराम यंदे, चिंतामण विनायक जोशी, यशवंत रामकृष्ण दाते, गोकुळदास मथुरादास शहा, विष्णू पाडुरंग नेने या साहित्यिकांनी कष्ट घेतले. ग्रंथ सहा भागात विभागला आहे. पहिल्या भागात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र आणि श्रीमंत महाराणी चिमणाबाई गायकवाड यांचे चरित्र अनुक्रमे यशवंत रामकृष्ण दाते आणि सदाशिव विनायक देशपांडे यांनी लिहिले आहे. दुसऱ्या भागात महाराजांच्या कार्याचा गौरव करणारे तेहतीस लेख आहेत. त्याचबरोबर तिसऱ्या भागात संकीर्ण अठरा लेख आहेत. चौथ्या भागात महाराजांविषयी पंधरा कविता आहेत. पाचव्या भागात रामचंद्र चिंतामण भावे यांनी 'श्रीसयाजीसुक्तीसंग्रह' लिहिला आहे. तर सहाव्या भागात सयाजीराव महाराज यांच्या सबंधीच्या इतरांच्या आठवणी आहेत. संपूर्ण ग्रंथात वेगवेगळी एकतीस छायाचित्रे आहेत. हा ग्रंथ सयाजीराव महाराजांचा विलक्षण जीवनप्रवास समजावून घेण्यासाठी महत्त्वाचा आहे. तसेच य. रा. दाते यांनी या ग्रंथात लिहिलेल्या चरित्रासाठी प्रसिद्ध आहे. दाते यांचे साहित्यातील कार्य प्रामुख्याने शब्दकोश या प्रांतात येते. त्यांनी महाराष्ट्र शब्द कोश (खंड- ७), सुलभ शब्दकोश (भाग ६), महाराष्ट्र वाक्यसंप्रदाय कोश (खंड २) अशा कोशांची निर्मिती केली. सोलापूर येथे भरलेल्या मुद्रक संमेलनाचे ते अध्यक्ष होते. सयाजीराव महाराजांनी दाते यांच्या 'महाराष्ट्र शब्दकोशा'स दहा हजार रुपयाची मदत केली. दाते यांची शब्दकोश सोडून सयाजीराव महाराजांचे चरित्र ही वेगळी साहित्य निर्मिती होती. महाराज आणि दाते यांचे सलोख्याचे, जिव्हाळ्याचे संबंध होते. हा ग्रंथ इ. स. १९३३ साली प्रकाशित झाला. १९३३ सालापर्यंत महाराजांनी संस्थानात 'न भुतो न भविष्य' असा वैश्विक, आश्वासक, लोकोपयोगी बदल केला होता. बडोदा संस्थानातील प्रजा या बदलाची, अनेक सुधारणांची फळे चाखत होती. आपण हिंदुस्थानातील पुढारलेल्या राज्यात राहत आहोत याचा त्यांना अभिमान वाटत होता. फक्त बडोदा संस्थानातील प्रजा या बदलाची लाभधारक नव्हती तर देशातील इतर

प्रांतातील लोकांनाही या संस्थानाचा आधार वाटत होता. हिंदुस्थानातील नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यातील कलाकार आपल्या कलेला वाव मिळण्यासाठी, आपल्या ज्ञानाची वृद्धी करण्यासाठी, शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी बडोद्याकडे धाव घेत होते. साहजिक महाराजांच्या नावाभोवती आधुनिकतेचे वलय निर्माण झाले होते. परिणामस्वरूप त्यांच्याविषयी लिहायला अनेकांनी लेखणी उचलली होती. त्याचाच परिणाम म्हणजे 'श्रीसयाजीगौरवग्रंथ' आणि प्रस्तुतचे य. रा. दाते लिखित चरित्र होय.

'श्रीसयाजीगौरवग्रंथा'व्यतिरिक्त एकाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त महाराजांच्या कार्याची महती सांगणारे इतरही अनेक ग्रंथ निघाले. त्यामध्ये वि. पां. दांडेकर यांनी लिहिलेल्या या चरित्राचाही समावेश आहे. दांडेकर महाराजांचे समकालीन आहेत. दांडेकर महाराजांच्या काळातील बडोद्याच्या साहित्य विश्वातील नामांकित लेखक होते. त्यांनी चिं. वि. जोशींच्या मदतीने बडोद्यात ८ फेब्रुवारी १९३१ रोजी 'मराठी वाङ्मय परिषद, बडोदे' या संस्थेची स्थापना केली. 'मराठी वाङ्मय परिषद, बडोदेः गेली पंचवीस वर्षे' आणि 'मराठी साहित्याची रूपरेषा' असे ग्रंथ निर्माण केले. साहित्य विश्वाशी संबंधित असणारे चरित्रकार असल्याने चरित्राने एक प्रकारची लय पकडली आहे. चरित्र एकूण अकरा भागात संपविले आहे. महाराजांचा एकाहत्तरावा वाढदिवस जवळ येताच दांडेकरांनी हे चरित्र लिहिले. दांडेकर महाराजांचे निकटवर्तीय, समकालीन असल्याने बडोद्यातील राज्यव्यवहार, सुधारणा त्यांनी जवळून पहिल्या होत्या. त्यामुळे महाराजांचे हे चरित्र महत्त्वाचे आहे. वि. पां. दांडेकरांनी चरित्र लिहिण्यापूर्वी काशिनाथ नारायण गोत्री, यशवंत रामचंद्र दाते या मान्यवरांनी महाराजांची मराठीत चरित्रे लिहिली होती. दाते लिखित चरित्र या चरित्राआगोदर काही दिवस प्रकाशित झाले. तरीही महाराजांकडे बघण्याची आपली दृष्टी कशी सकस आणि निर्भेळ आहे हे दांडेकर यांनी चरित्रातून स्पष्ट केले.

गोविंद सखाराम सरदेसाई (रियासतकार सरदेसाई) सयाजीराव महाराजांकडे सदतीस वर्ष नोकरीला होते. त्यांची महाराजांचे वाचक म्हणून प्रथम नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी राजपुत्रांचे शिक्षक, हिशेबी खाते अशा विविध खात्यात काम केले. सयाजीराव महाराजांनीच त्यांना लिखाणाला प्रवृत्त केले. आपल्या इतिहासविषयक लिखाणाला त्यांनी बडोद्यात असताना सुरुवात केली. त्याबद्दल सरदेसाई म्हणतात, ''आमचे सर्व कुटुंब बडोद्याच्या अन्नानेच पोसले हा योग मला कधी विसरता येणार नाही. महाराजांच्या सेवेतच मला जीवनातील अनेक बहुमोल लाभ प्राप्त झाले. मी नोकरीत रुजू झालो तेव्हा मला त्यांनी `Machiavellis Prince' व Seeley's Expansion of England' या दोन इंग्रजी ग्रंथांचे मराठी भाषांतर करण्याची संधी दिली. म्हणूनच लेखन व्यवसायात माझा प्रवेश झाला. 'राजधर्म आणि इग्लंड देशाचा विस्तार' ही दोन माझी पहिली पुस्तके पुष्कळशी गचाळ बनली खरी; पण पाण्यात पडल्याशिवाय पोहता येत नाही या न्यायाने माझा धीर चेपून आता तर मी रियासतकार म्हणून मिरवितो त्याचे श्रेय मुख्यतः त्या महाराजांस आहे. (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३५३) रियासतकार सरदेसाई यांनी अनेक रियासती लिहिल्या. इतिहास लेखनात अद्वितीय कार्य केले. या लिखाणाचे बीजारोपण बडोद्यात महाराजांच्या सहवासात घडले.

रियासतकार सरदेसाई महाराजांच्या काही आठवणी प्रथम 'स्वराज' या वर्तमानपत्रात लिहिल्या. प्रथम ते दहा लेख होते. त्यामध्ये चार आठवणी वाढवून 'श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत' हा ग्रंथ सिद्ध केला. हे महाराजांचे समग्र चरित्र नाही. सरदेसाई यांना महाराजांचा सहवास लाभला होता. महाराजांच्या राजवाड्यात त्यांनी पूर्ण नोकरी केली. राज्यकारभार जवळून पहिला. ते राज्यकारभारात सहभागी होते. ज्या घटना - प्रसंगात सरदेसाई यांचा सहभाग आहे. जे घटना- प्रसंग रोमहर्षक आहेत. ते सरदेसाई यांनी लिहिले आहेत. म्हणून या आठवणी महत्त्वाच्या आहेत.

या खंडात 'माझी संसारयात्रा' हे रियासतकार सरदेसाई यांच्या आत्मचरित्रातील काही भागाचाही समावेश आहे. रियासतकार सरदेसाई यांनी महाराजांकडे सदतीस वर्षे नोकरी केली. त्यामुळे सरदेसाई यांच्या निवृत्तीपर्यंतचे निवेदन सयाजीराव महाराजांच्या व्यक्तिमत्त्वांनी प्रभावित झालेले होते. महाराजांच्या अनेक चांगल्या सवयींचा परिणाम सरदेसाई यांच्या व्यक्तित्वावर होता. सयाजीराव महाराजांच्या अनेक गुणांचे दर्शन या आत्मचरित्रातून होते. म्हणून या आत्मचरित्राचा समावेश या खंडात केला आहे. सरदेसाई यांनी वयाच्या नव्वदीत हे आत्मचरित्र लिहिले. एका थोर इतिहासकाराचे आत्मचरित्र आणि त्यातील सयाजीराव महाराजांचे उल्लेख यामुळे या आत्मचरित्राचे महत्त्व अधोरेखित होते.

सयाजीराव महाराजांच्या जन्माला इ. स. १९६३ साली शंभर वर्ष पूर्ण झाली. या अगोदर मराठीमध्ये महाराजांचे चार चरित्रग्रंथ आणि रियासतकार सरदेसाई यांनी त्यांच्या आठवणी लिहिल्या होत्या. चार चरित्रग्रंथ महाराज हयात असताना लिहिले होते. महाराजांचा मृत्यू इ. स. १९३९ साली झाला. त्यानंतर रियासतकार सरदेसाई यांनी त्यांच्या काही आठवणी लिहिल्या होत्या. परंतु ते समग्र चरित्र नव्हते. दाजी नागेश आपटे यांचे चरित्र होते; परंतु त्यात काही उल्लेख आले नाहीत. महाराजांचे संपूर्ण चरित्र इ. स. १९६३ सालापर्यंत लिहिले गेले नाही. महाराष्ट्र शासनाने महाराजांचे जन्मशताब्दी वर्ष इ. स. १९६३ साली साजरे केले. या जन्मशताब्दीनिमित्त ब. न. फाटक यांनी महाराजांचे संपूर्ण चरित्र लिहिले. एका अर्थाने ती कसर फाटक यांनी पूर्ण केली. चरित्र छोटे असले तरी संपूर्ण जीवनाचा आढावा प्रथमच फाटक यांनी घेतला. त्यामुळे हे चरित्र महत्त्वाचे आहे.

यातील गोत्री यांनी इ. स. १९०५ साली चरित्र लिहिले. तर या खंडातील शेवटचे चरित्र फाटक यांनी इ. स. १९६३ साली लिहिले. एकंदरीत हे पाचही ग्रंथ पन्नास वर्षाच्या कालखंडात लिहिले. गोत्री, दाते आणि दांडेकर यांनी लिहिलेले चरित्रग्रंथ स्वातंत्र्यापूर्वीचे आहेत. तर रियासतकार सरदेसाई आणि फाटक यांनी लिहिलेली चरित्रे स्वातंत्रप्राप्तीनंतरची आहेत. वेगवेगळ्या चरित्रकारांनी या चरित्रग्रंथांची निर्मिती केली. प्रत्येक चरित्र वेगळ्या राजकीय, सामाजिक पार्श्वभूमीवर लिहिले आहे. मात्र सर्व चरित्रांचे नायक सयाजीराव महाराज आहेत.

सयाजीराव महाराजांचे जीवन चरित्रकारांसाठी समान आहे. जन्म आणि मृत्यू या दोन सीमारेषेत घडलेले सर्व घटना- प्रसंग समान आहेत. व्यक्तित्व समान आहे. महाराजांच्या जीवनातील

परिस्थिती समान आहे. मग वेगवेगळी चरित्र कशासाठी हा एक प्रश्न आहे. परंतु प्रत्येक चरित्रकाराची महाराजांच्या जीवनाकडे बघण्याची दृष्टी वेगळी आहे. ठराविक कालखंडानंतर नवीन सुधारणा महाराजांनी केल्या. जसजसा कालखंड जाईल तशी निरनिराळी साधनसामग्री उपलब्ध होऊ लागली. साहजिकच नव- नवीन चरित्रांची निर्मिती होऊ लागली. कोणत्या चरित्रात कमतरता आहे, आणि कोणते चरित्र सत्यनिष्ठ आहे, हे पाहण्याची प्रस्तुत जागा नाही. कारण त्या काळात ते - ते चरित्र आदर्शवत आणि योग्यच होते. प्रत्येक चरित्रांची निर्मिती वेगवेगळ्या कारणांसाठी झाली. त्यावेळी त्या चरित्रांची गरज होती.

चरित्राची सुरुवात आणि शेवटही महत्त्वाचा असतो. या खंडातील चरित्रे वेगवेगळ्या काळातील, वेगवेगळ्या लेखकांची आहेत. चरित्रकारांनी आपल्या कल्पनेप्रमाणे चरित्रांची सुरुवात करतात. गोत्री लिखित चरित्राची सुरुवात मल्हारराव महाराज बडोद्याचे राजे असल्यापासून होते. गोत्री यांनी मल्हारराव महाराजांच्या काळात बडोद्यातील एकूणच वातावरणाचे संश्लेषात्मक, मूल्यमापक निवेदन केले. आणि लगेच आत्ताच्या (इ. स. १९०५ साली) म्हणजे सयाजीराव महाराजांच्या काळात त्यात किती सुधारणा झाली आहे यांचेही निवेदन येते. म्हणजेच बडोद्याच्या राज्यकारभारातील घडलेल्या बदलाची नोंद घेताना आत्ता राज्यकारभार व्यवस्थित सुरू आहे याचे निवेदन करतात. उत्कंठा वाढवणारा चरित्राचा प्रारंभ केला आहे. गोत्री म्हणतात, ''सुमारे पस्तीस वर्षापूर्वी बडोदे राज्याची स्थिती किती निकृष्ट व कष्टप्रद झाली होती हे सर्वश्रुत आहेच. त्या वेळेस येथे श्री. कै. मल्हारराव महाराज गायकवाड यांची कारकिर्द सुरू असून, त्यांचे व प्रजेचे दुर्दैवाने राज्यात दुर्गुणी लोकांची भरती होऊन, कोणी कोणाचा धनी ना गोसावी अशी स्थिती प्राप्त झाली होती. चहूकडे अनीती, दूराचार, बेअब्रू व भ्रष्टता यांचे साम्राज्य होऊन, प्रजेचे जीविताची व वित्ताची शाश्वती मुळीच राहिली नव्हती. ह्या स्थितीचा अनुभव घेतलेले कित्येक गृहस्थ हल्ली येथे हयात आहेत, व त्यावेळच्या स्थितीची वर्णनात्मक पुस्तकेही उपलब्ध झालेली आहेत. ती पाहिली किंवा त्या वेळच्या वृद्धांचे तोंडून तत्संबंधी हकीकत ऐकिली म्हणजे, मनास उद्वेग व तिरस्कार वाटल्यावाचून राहत नाही. परंतु ईश्वराच्या कृपेने तशा स्थितीचा निरास होऊन, हल्ली ज्या शांत व सुखमय छत्राखाली आपण सर्व प्रजाजन सुखानंद अनुभवीत आहोत.'' (गोत्री, पृ.९५) एकूणच बदलेल्या राज्यकारभाराची, सुधारणांमुळे घडलेल्या बदलांची, प्रजेच्या जीवनात आलेल्या सुखमय स्थितीचे वर्णन आहे. वाईट राज्यकारभारानंतर चांगला राज्यकारभार असे निवेदन येते. उत्कंठावर्धक प्रारंभ आहे. तर चरित्राच्या शेवटी महाराजांकडून अपेक्षित सुधारणांबद्दल महाराजांना सूचना केल्या आहेत. महाराजांना सुचवणे किंवा सूचना करण्यावरून लक्षात येते की, महाराज आणि सेवक यांच्यामध्ये किती सौहदर्यापूर्वक वातावरण होते. या ठिकाणी महाराजांनी लोकांच्या हाती सत्ता सोपवण्याचा जो प्रयोग केला होता त्यास पुष्टी मिळते. त्या सूचना 'महाराजांस अगत्याची विज्ञप्ती' या शीर्षकाखाली दिल्या आहेत. एकूणच चरित्राचा प्रारंभ आणि समाप्ती वैशिष्टपूर्ण आहे.

दाते चरित्राच्या प्रारंभीच राजसत्ता कशी समाजोपयोगी आहे, याबद्दल मत प्रकट करतात. ''समाजसंस्थेच्या इतिहासाकडे नजर फेकल्यास असे दिसून येईल की, समाजाची अखंड प्रगती

होत राहण्यासाठी समाजातील व्यक्तींनी आपल्यातील शक्तींचा एक एक बिंदू एकत्र करून जी एकमुखी व प्रातिनिधिक अशी सत्ता निर्माण केली तिचेच नाव राजसत्ता होय. सर्व जगात इतर कोणत्याही संस्थेपेक्षा समाजाची राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक उन्नती करण्याचे कामी फार मोठा उपयोग झालेला आहे.'' (दाते, पृ. १७७) राजसत्ता चांगल्या व्यक्तीच्या हाती असेल आणि तिचा उपयोग जनकल्याणासाठी होत असेल, तर ती सत्ता फलद्रूप ठरते. दाते यांनी राजसत्तेचे मूल्यमापन सकारात्मकतेने केले आहे. या परिशिलनाच्या शेवटी ते सयाजीराव महाराजांना मानाचे स्थान देतात. ''हिंदुस्थानच्या इतिहासात गायकवाड घराण्याने अशा काही श्रेष्ठ व्यक्तीस जन्म राष्ट्रोन्नती व सामाजोन्नतीच्या कार्यास पुष्कळच हातभार लाविलेला आहे. त्या सर्व व्यक्तींमध्ये श्रीमंत सयाजीराव महाराज (तिसरे) हे अग्रगण्य होत.'' (दाते, पृ. १७७) राजसत्ता चांगल्या व्यक्तीच्या हाती असून उपयोग नाही. तिचा उपयोग जनकल्याणासाठी झाला पाहिजे. हे सकारात्मकतेने सांगण्यापाठीमागचे कारण सयाजीराव महाराजांच्या राज्यकारभार करण्याच्या पद्धतीत दडले आहे. राजसत्ता हाती आहे म्हणून तिचा उपयोग स्वतःसाठी केला, त्या सत्तेचा लाभ आप्तेष्टांना दिला तर ती राजसत्ता प्रजेला मारक ठरते. नेमके याच्या उलट सयाजीराव महाराजांनी राजसत्तेचा उपयोग लोकशाही पद्धतीने केला. त्यांनी त्यासाठी 'धारासभा'[४] निर्माण केली. ग्रामपंचायतींचे पुनर्जीवन केले. नगरपालिकांना बळ दिले. मोठ्या शहरात महानगरपालिका स्थापन केल्या. तेथील सभासद निवडण्याची मुभा प्रजेला दिली. प्रजेच्या हाती सत्ता देणारा जगातील एकमेव राजा होता. नेमके यावर प्रकाश टाकत दाते यांनी राजसत्तेचे समर्थन केले आहे. थोडक्यात फक्त राजसत्तेचे समर्थन नाही तर सयाजीराव महाराजांच्या कार्याचे, केलेल्या सुधारणांचे आणि त्यांच्या विचारांचे समर्थन आहे.

दांडेकर यांनी चरित्राची सुरुवात कुतूहल वाढवणाऱ्या प्रसंगाने केली आहे. कवळाणा या लहान गावी सकाळी सकाळी पोलीस दाखल होतात. 'काशीराव गायकवाडांच्या आणि त्यांच्या बंधूंच्या मुलांना दत्तकनिवडीसाठी बडोद्यात बोलावणे आहे' हा निरोप देण्यासाठी आले होते. याप्रसंगाने वाचकांची उत्सुकता वाढीला लागते आणि शेवटपर्यंत चरित्र वाचावे असे कुतूहल निर्माण होते. महाराजांच्या निवडीच्या वेळचा एक प्रसंग देऊन त्या प्रसंगातून बडोद्याचे भावी चित्र कसे विकसित असेल याची कल्पना देतात. ''या बाबतीत एक मजेशीर गोष्ट बडोद्यात प्रसिद्ध आहे, ती अशी : आनंदराव, गोपाळराव व संपतराव या तिघांना जेव्हा जमनाबाई साहेबांसमोर उभे करण्यात आले त्या वेळी त्यांनी तिघांनाही तुम्ही येथे का आलात असा प्रश्न विचारला, त्या प्रश्नाचे उत्तर आनंदराव आणि संपतरावांना देता आले नाही; पण गोपाळरावांनी 'महाराजा होण्याकरिता आलो' असे स्पष्टपणे जमानाबाईसाहेबांना सांगितले. हे पाहून त्या खुश झाल्या; व गोपाळरावांना पसंत केले.'' (दांडेकर, पृ. २६४) हा प्रसंग तसा छोटाच पण गोपाळरावांनी दिलेले उत्तर आणि भविष्यातील अनेक सुधारणा यामधील दुवा जोडला तर या उत्तराचे महत्त्व अधोरेखित होते. दांडेकरांच्या या उदाहरणातून सयाजीराव महाराजांचे व्यक्तिमत्त्व कसे विकासाभिमुख होते हे लक्षात येते.

रियासतकार सरदेसाई यांनी महाराजांकडे तब्बल सदतीस वर्ष नोकरी केली. 'माझ्या जन्माचा योगायोग' या आठवणीने सुरुवात करतात. या आठवणीत महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकतात. ते म्हणतात, ''काय योगायोग असेल माझ्या जन्माचा की, कोकणच्या अज्ञात खेड्यातील एक मुलगा एकदम बडोद्याचे राज्यात नोकरीला लागला! आज माझी नव्वद वर्ष उलटून गेली. तेविसाव्या वर्षी मी बी. ए. झालो आणि आकस्मिक रीतीने एकदम बडोद्यास सयाजीरावांचे पदरी जाऊन पडलो.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासात, सरदेसाई, पृ. ३४९) सरदेसाई यांची नोकरीची सुरुवात कशी झाली याची मांडणी करत या आठवणींची सुरुवात करतात. आणि प्रथम भेटीतच महाराजांच्या शिस्तीचा फटका कसा बसला या महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूचे निवेदन करतात.

या खंडातील पाचही चरित्रापैकी रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी लिहिलेले चरित्र सर्वांपेक्षा वेगळे आणि नाविण्यपूर्ण आहे. 'श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत' या ग्रंथात सरदेसाई यांनी महाराजांच्या आठवणी समरस होऊन देतात. त्या आठवणी लिहिण्यापाठीमागची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात, ''मी काही सयाजीरावांचे काटेकोर ऐतिहासिक चरित्र बनवत नव्हतो. योगायोगाने त्यांच्याशी माझा दीर्घ सहवास घडला, तेवढ्या अवधीतील कित्येक विशिष्ट प्रसंग व व्यक्ती निवडून माझ्या मनावर जे संस्कार घडले त्याचे शब्दचित्र मी रेखाटले.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासात, सरदेसाई, प्रस्तावना, पृ. ३४३) रियासतकार सरदेसाई यांनी त्यांच्या समोर घडलेल्या घटना-प्रसंग देताना रोमहर्षक प्रसंग निवडले आहेत. हे एकूण चौदा प्रसंग आहेत.

फाटक यांनी चरित्राची सुरुवात महाराजांच्या गौरवाने केली आहे. ते म्हणतात, ''जगात सुधारलेले राष्ट्र म्हणून डौल मिरवणाऱ्या ब्रिटिशांना आपल्या सुधारणा पुढे लाजेने खाली मान करावयास लावणारे एकच एक सयाजीराव महाराज गायकवाड होऊन गेले, त्यांचे कर्तृत्व कोणत्याही काळातील राज्यकारभाराला मार्गदर्शक ठरावे, अशा योग्यतेचे होते''. (फाटक, पृ. ५०५) पुढे चरित्रात काय आहे अशी वाचकांना उत्सुकता लावणारी या चरित्राची सुरुवात आहे. सयाजीराव महाराजांच्या पूर्वी बडोदा संस्थानाची स्थिती अत्यंत वाईट होती. आणि आत्ता ती अचानक कशी सुधारली असे नाविण्यपूर्ण निवेदन करतात.

चरित्रनायकाचे जीवन सलग असते. त्याचे भाग पडता येत नाहीत, किंवा एक भाग दुसऱ्या भागापासून वेगळा करता येत नाहीत. परंतु सयाजीराव महाराजांची ही चरित्रे अभ्यासली असता लक्षात येते की, त्यांचे जीवनचरित्र सहा भागात विभागले आहे. १. महाराजांचे पूर्वज, २. महाराजांचे बालपण, ३. शिक्षण, ४. राज्यारोहण, ५. महाराजांचे कार्य आणि ६. महाराजांची विचारमूल्ये. चरित्रकारांनी सर्वसाधारणपणे या सहा भागात चरित्राची मांडणी केली आहे. हे भाग कालखंडानुसार अगदी काटेकोर नाहीत.

१.

सयाजीराव महाराजांचे चरित्र लिहायचे असल्याने चरित्रकारांनी महाराजांच्या पूर्वजांची माहिती देणे बंधनकारक समजले आहे. आणि ते उचितही आहे. कारण विषयप्रवेश करण्यापूर्वी चरित्रनायकांच्या पुर्वसुरींची माहिती दिल्याने चरित्रनायकाने कोणत्या पार्श्वभूमीवर कार्य केले हे समजते. चरित्रकार यापूर्वीचे गायकवाड घराण्यातील पूर्वज आणि संस्थानचे राजे यासंबंधीची माहिती देतात. सयाजीराव महाराजांचे कोणत्या पार्श्वभूमीवर राज्यारोहण झाले हे पाहणे महत्त्वाचे ठरते. याबाबत गोत्री म्हणतात की, सयाजीराव महाराजांच्या पूर्वी संस्थानाची घडी विस्कटलेली होती. जनता त्रस्त होती. अब्रूदार घराण्यातील स्त्रियांना रस्त्यावरून एकटे फिरणे मुश्कील झाले होते. राजकर्त्यांना ताळतंत्र राहिला नव्हता. बडोदा संस्थानाचा राज्यकारभार सुव्यवस्थित नव्हता. संस्थानात अंदाधुंधी होती. गोत्री हे पूर्वजांच्या बाबतीत फार पाठीमागे गेले नाहीत. तर महाराजांच्या पूर्वी राज्यावर असणाऱ्या मल्हारराव महाराजापर्यंत जावून कशी राज्यव्यवस्था बिघडली होती याचे थोडक्यात निवेदन करतात.

गोत्री, दाते, दांडेकर हे सयाजीराव महाराजांचे समकालीन होते. या गैरराज्यकारभाराबद्दल या चरित्रात माहिती येते. दाते म्हणतात, ''बडोदे राज्यात गोंधळ व बखेडा माजविल्याबद्दल मल्हाररावांना गादीवरून काढून खंडेरावांच्या पत्नी महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या मांडीवर कोणी तरी दत्तक देण्यात यावा तशा प्रकारची शिफारस केली. स्टेट सेक्रेटरीकडून तशा प्रकारची मंजुरी मिळवल्यावरून ता. १९ एप्रिल १८७५ रोजी सरकारने जाहीरनामा काढून मल्हाररावास राज्यावरून दूर केल्याचे व त्यांच्या वंशाचा हक्क नष्ट केल्याचे सर्व लोकांस कळविले आणि लागलीच तीन दिवसांनी त्यांना मद्रासेकडे नेण्यात आले.'' (दाते, पृ. १८५)

दांडेकर म्हणतात, ''मल्हारराव महाराजांनी आपल्या कलंकित कारकिर्दीला सुरुवात केली. राजवाड्यात नाचतमाशे, रंगढंग, विलास, अत्याचार वगैरे सुरू झाले. शहरातील कुलीन स्त्रियांना रस्त्यातून जाण्याची भीती उत्पन्न झाली. कोणाची अब्रू कोणीही केव्हाही लुटावी असा प्रकार सुरू झाला. महाराजांच्या पदरी बदमाश, हलकट लोक होते. त्यांनी चोहीकडे हाहाःकार उडविला. जे नागरिक त्यांच्या नीच हेतूंना कबूल होत नसत त्यांचे अन्वितपणे हाल करण्यात येत. लोकांना कोणीच त्राता उरला नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली.'' (दांडेकर, पृ. २७०) सयाजीराव महाराजांचे दत्तक विधान होण्याअगोदर बडोद्यात अंदाधुंदी होती. प्रजा बिघडलेल्या राज्यकारभाराला कंटाळली होती.

ब. न. फाटक यांनी सुद्धा मल्हारराव महाराज राज्यकारभाराला कसे लायक नव्हते ते सांगितले, ''राणीसाहेब (जमनाबाई खंडेराव महाराजांच्या पत्नी) यथाकाल प्रसूत होऊन त्यांना मुलगी झाल्याचे समजल्यावर मल्हाररावांचा आनंद कडेलोटास पोचला. आपले राज्यपद यापुढे निर्वीघ्न असल्याच्या खात्रीमुळे मल्हाररावांनी आपल्या वागणुकीत कसलाच ताळतंत्र ठेवला नाही. अशा स्वच्छदपणाचा ओघात तेव्हाच्या रेसिडेंटावर विषप्रयोग केल्याचे प्रकरण उदभवून त्या पायी मल्हाररावांना राज्यपदास मुकावे लागले'' (फाटक पृ. ५०६) महाराजांचे दत्तक विधान होण्याअगोदर संस्थानाची घडी विस्कटली होती. ती काही प्रमाणात सुरळीत करण्याचे

काम टी. माधवराव यांनी केले. या ठिकाणी एक महत्त्वाची बाब चरित्रकार लक्षात आणून देतात, ती म्हणजे सयाजीराव महाराजांचे दत्तकविधान होण्याअगोदर संस्थानाची परिस्थिती सर्वच बाबतीत खराब होती. या पार्श्वभूमीवर महाराजांचे दत्तकविधान झाले. आणि नंतर महाराजांनी संस्थानाची सुधारणा केली. चरित्रांची सुरुवात सयाजीराव महाराजांच्या सामान्य रूपाने करतात आणि त्यांचे कर्तृत्ववाचे निवेदन करत विशिष्टाकडे नेतात.

२.

सयाजीराव महाराजांना बडोद्यात दत्तक घेतले. परंतु त्या पूर्वी महाराजांचे बालपण कवळणा या नाशिक जिल्ह्यातील खेडेगावात गेले. दत्तक विधानापुर्वी महाराजांचे नाव गोपाळ होते. या बालपणातील फारसे पुरावे उपलब्ध नाहीत. वयाच्या बारा वर्षापर्यंत गोपाळ कवळणा गावी राहिला. गावात शाळा असुनसुद्धा गोपाळ शाळेत गेला नाही. कारण तशी गरज कोणाला वाटत नव्हती. गोत्री बालपणाविषयी म्हणतात, ''महाराजांचा जन्म दक्षिणेत खानदेशात चाळीसगावानजिक मौजे कवळणे गावी, गायकावाडांचे मूळ पुरुष दमाजीराव यांचे नातवांचे नातू श्री. कै. काशीराव गायकवाड यांचे उदरी सुमूहुर्तावर मिती फाल्गुन वद्य ६ मंगळवार शके १७८४ (सन १८६३) रोजी झाला. काशीराव यांची स्थिती श्रीमंतीची नव्हती. परंतु त्यांचे कुटुंब त्या गावात खाऊनपिऊन सुखी, अब्रूदार व कुळवान असे मानीत असत; व त्यांचा स्वभाव अतिशय कनवाळू व सदाचरणी असे.'' (गोत्री, पृ. ९६) म्हणजे सामान्य मुलाप्रमाणे महाराजांचे बालपण गेले. चरित्रकार दाते म्हणतात, ''बहुधा महापुरुषाचा जन्म असाच खेडेगावातील झोपडीत अगर रानावनात झालेला असतो.'' (दाते, पृ. १८६) महाराजांच्या वयाच्या बारा वर्षापर्यंतची थोडीफार माहिती देत चरित्रकार पुढे जातात. गोत्री, दाते, दांडेकर आणि सरदेसाई महाराजांचे समकालीन आहेत. परंतु महाराजांचे बालपण खेडेगावात गेले. बालपणातील फारसे पुरावे उपलब्ध नसल्याने चरित्रकार बालपणातील हकीगतीत अडकून पडत नाहीत.

फाटक यांनी मात्र दोन आठवणी दिल्या आहेत. 'बालपणी पोहताना एक मुलाने खडकावरती उडी मारल्याने तो जखमी झाला. सर्व मुले घाबरली. मात्र गोपाळने त्याला उचलून घरपोच केले' तर दुसऱ्या प्रसंगात 'एका पोळाने(बैलाने) शिंगावर उचलले मात्र गोपाळ धाडशी असल्याने शिंगे पकडून तेथेच बसून राहिला. काशिरावांनी हे पाहताच त्या पोळला अडवून गोपाळला खाली उतरून घेतले.' त्यामुळे बालपणातील घटना - प्रसंगात भर पडते. बालपणातील फारसे पुरावे उपलब्ध नाहीत, परंतु मौखिक गोष्टीच्या आधारे ते लिहिले गेले. तरी चरित्रकारांनी कवळणा गावातील गायकवाड कुटुंब, घडलेले एक दोन प्रसंग देत चरित्रात सयाजीराव महाराजांचे व्यक्तित्व उभे केले आहे. चरित्रकारांच्या वर्णनानुसार महाराज बालपणी वडिलांप्रमाणे धाडशी होते. त्यांची निरीक्षण शक्ती, विचार करण्याची ताकद जबरदस्त होती.

३.

इंग्रजांनी मल्हारराव महाराजांना पदच्युत केले. खंडेराव महाराजांच्या राणी जमनाबाईसाहेब यांना दत्तकपुत्र घेण्याची काही अटीसह परवानगी देण्यात आली. त्यातील महत्त्वाची अट अशी होती की, दत्तकपुत्र बडोद्याबाहेरचा असावा आणि वयाने जमनाबाईपेक्षा वयाने लहान असावा.

आणि अशा दत्तकपुत्राचा शोध सुरू झाला. वर म्हटल्याप्रमाणे गायकवाडांचे एक घराणे महाराष्ट्रातील कवळणा गावी वाढत होते. इंग्रज अधिकाऱ्यांनी याचा शोध घेतला. कवळणा गावातील काशीराव गायकवाड आणि त्यांच्या बंधूंच्या मुलांना बडोद्यात बोलावणे धाडले. आणि त्यापैकी एकाची निवड करण्याचे ठरले. ती निवडप्रक्रिया अतिशय महत्त्वाची आहे. चरित्रकारांनी त्यातील काही अटी आणि त्या अनुषंगाने घडलेल्या हकिगती दिल्या आहेत. गोत्री म्हणतात, ''श्री. गोपाळराव म्हणजे प्रस्तुत चरित्राचे नायक आपले भाग्यशाली प्रभू सयाजीराव यांजला मासाहेबांनी पसंत केले ही पसंती करण्यात मासाहेबांनी जे चातुर्य दाखवले आहे, ते अनुपमेय होय; व त्याबद्दल त्यांची जेवढी स्तुती करावी तेवढी थोडी आहे. ज्या पुरुषाचे हाती पुढे मोठी राजसत्ता प्राप्त होऊन लोकांचे जीवित व अब्रू सुरक्षित राखण्याची जबाबदारी यावयाची आहे, व पुढील स्थितीची सर्वतोपरी आशा ज्यावर अवलंबून आहे, अशा पुरुषाची निवड करण्याचे काम सामान्य नाही. परंतु राज्याच्या पुण्याईने व प्रजेच्या सुदैवाने, ते काम मासाहेबांनी उत्तम रीतीने बजाविले आहे. व त्याचा गोड रसस्वाद आपण नित्य अनुभवित आहो. याबद्दल आपण मासाहेबांचे अत्यंत आभारी आहो यात संशय नाही.'' (गोत्री, पृ. ९७) त्यावेळी जमनाबाईसाहेबांनी खरोखरच हुशारी दाखवली होती.

दत्तक निवडीच्या वेळी कवळणा गावातून आलेल्या प्रत्येकाला जमनाबाई यांनी एक प्रश्न विचारला होता. 'तुम्हांला येथे का आणण्यात आले हे ठाऊक आहे काय?' असा प्रश्न विचारताच गोपाळ सोडता एकालाही उत्तर देता आले नाही. मात्र गोपाळने न घाबता 'मी राजा होण्यासाठी आलो' असे उत्तर दिले. फक्त एवढ्यावरच त्यांची निवड निश्चितच झाली नाही. मात्र या प्रश्नाला चरित्रकारांनी चरित्रात स्थान दिले आहे. कारण महाराजांच्या बालपणीच्या व्यक्तिमत्त्वातील साहसी, हजरजबाबी या महत्त्वपूर्ण पैलुंचे दर्शन चरित्राच्या सुरुवातीलाच करतात. एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग चरित्रात देण्याची प्रथा त्या काळात दिसते. दत्तक निवडीचा हा प्रसंग दाते (पृ. १८८), दांडेकर (पृ. २६४) आणि फाटक (पृ. ५०७) हेही चरित्रकार देतात.

दत्तकविधानानंतर महाराजांना औपचारिक शिक्षण देण्याचे ठरले. इंग्रजांनी तशी योजना तयार केली. महाराजांनी केलेल्या पुढील सुधारणांचा पाया या शिक्षणात आहे. त्यामुळे गोत्री, दाते, दांडेकर, सरदेसाई आणि फाटक या चरित्रकारांनी महाराजांच्या शिक्षणाचे महत्व ओळखत निवेदन केले. गोत्री महाराजांचे गुरू निवडीसंदर्भात महत्त्वाचे निवेदन करतात, ''वृक्षारोपणापासून गोड व मधुर फळे मिळावी अशा हेतूने माळी लहानपणी त्यास अनुरूप अशीच त्याची जोपासना करीत असतो. कारण जोपासना करण्यात चूक झाली तर, पुढे त्यास गोड व मधुर फळे येणे शक्य नाही. त्याचप्रमाणे या वेळी गुरूची योजना करण्यात चूक झाली असती तर, आज जी गोड फळे आपण चाखीत आहो त्यास पारखे झालो असतो.'' (गोत्री, पृ. ९९) महाराजांना चांगले शिक्षण मिळाले यामुळे संस्थानाचा उत्कर्ष झाला. महाराजही विद्या ग्रहणासाठी पात्र असल्यानेच हे शक्य झाले. त्यासाठी गोत्री जमीन आणि बीज यांची उपमा देतात, ''जमीन चांगली नसेल तर उत्तम असूनही त्याचा काही उपयोग होत नाही. या न्यायाने विद्या ग्रहण करणारा विद्यार्थी तशाच योग्यतेचा असावा लागतो हे उघड आहे.'' (गोत्री, पृ. ९९) सयाजीराव महाराज

अध्ययनासाठी योग्य होते. त्याचप्रमाणे विद्या देणारेही त्याच क्षमतेचे होते. त्यामुळे महाराजांचे शिक्षण होऊ शकले. दाते म्हणतात, ''उत्तम, कार्यक्षम व कर्तबगार विद्यार्थी निपजावयास ज्या अनुकूल साधनांची जरूर असते त्यामध्ये विद्यादान करणाऱ्या गुरूची भूमिका अत्यंत जबादारीची व महत्त्वाची असते. श्रीमंत सयाजीराव यांचे पहिले गुरू व नंतरचे गुरू मि. इलिएटसाहेब यांनी सयाजीरावांच्या शिक्षणासंबंधी अत्यंत प्रशंसनीय, कळकळीची व आस्थापूर्वक मेहनत किती घेतली हे पुढे सांगेलच.'' (दाते, पृ. १९०) तर दांडेकर म्हणतात, ''कुशल बागवानाने एखाद्या रोपाचे कलम करून नंतर ते जमिनीत लावावे आणि मग त्याच्याभोवती आळे करून व त्याला नित्य नियमाने खतपाणी घालून, त्याला कीड लागत नाहीना ते पाहावे; त्याची वाढ चांगली होते किंवा नाही हे पाहावे; त्या प्रमाणे जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव, व इलियट ही मंडळी दत्तक घेतलेल्या या मुलाकडे बघू लागली.'' (दांडेकर, पृ. २७६) चरित्रकारांनी महाराजांच्या शिक्षणाला चरित्रकारांनी महत्त्वाचे स्थान दिले आहे. वेगवेगळ्या उपमा देत महाराजांना गुरू कसे उत्तम भेटले हे सांगतात. तर सरदेसाई यांनी, ''सतत परिश्रमाने एक क्षणही फुकट न घालवता त्यांनी आपली प्रतिष्ठा एकसारखी वाढवीत नेली. शाळा- कॉलेजात त्यांना जे शिकता आले नाही ते त्यांनी आपल्या रोजच्या व्यवहारात भरपूर कमावले.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३५८) महाराजही शिक्षणाला अनुकूल असल्याने शिक्षकांनी त्यांना उत्तम प्रकारे शिकवले आणि राज्यकारभारासाठी तयार केले. शिक्षणाची व्यवस्था केल्यामुळे राज्यकारभार करणे सोपे झाले. फाटक यांनीही महाराजांच्या शिक्षणाचा उल्लेख केला आहे.

महाराजांच्या शिक्षणात खरा हातभार जमनाबाईसाहेब, टी. माधवराव आणि इलियट यांचा होता. चरित्रकारांनी याचा उल्लेख केला आहे. जमनाबाईसाहेब, टी. माधवराव आणि शिक्षक इलियट यांची महाराजांच्या शिक्षणाबद्दलची मते चरित्रकारांनी दिली आहेत. या तिघांचा शिक्षणाबद्दलचा अभिप्राय महत्त्वाचा ठरतो. दिवाण टी. माधवराव लिहितात, ''महाराजांच्या शिक्षणासंबंधाने मातुश्री महाराणी जमनाबाईसाहेब अत्यंत काळजी घेतात. महाराजांवर जरी त्यांची ममता असली तरी त्यांच्या शिक्षणाच्या आड त्या येत नाहीत. त्यांच्या शिक्षणाच्या ज्या सोयी त्यांनी करून दिल्या आहेत त्याहून जास्त सोयी, कोणत्याही देशी संस्थानात आढळावयाच्या नाहीत. त्यांच्या शारीरिक व नैतिक शिक्षणावर महाराणीसाहेबांची चांगली देखरेख आहे.'' (दाते, पृ. १९३) तर महाराजांचे गुरू इलियट यांचा अभिप्राय अत्यंत बोलका आहे. त्यांच्या (महाराजांच्या) ''ठिकाणी दोष ठेवायला मला कधीही जागा सापडली नाही. इतका सरस व प्रेमळ विद्यार्थी क्वचितच पाहायला सापडेल.'' (दांडेकर, पृ. २७९) म्हणजे महाराजांच्या शिक्षणाकडे या तिघांचे जाणीवपूर्वक लक्ष होते. दांडेकर यांनी या तिघांचे महाराजांच्या शिक्षणाकडे कसे विशेष लक्ष होते याची नोंद आवर्जून करतात. आणि त्यांचा महाराजांवर विशेषतः इलियट यांचा प्रभाव होता यांचे विस्तृत विवेचन करतात. या सर्व शिक्षणाच्या सोयीचा लाभ घेण्याच्या योग्यतेचे महाराज होते. स्वतः सयाजीराव महाराज मात्र एवढ्या शिक्षणावर खुश नव्हते. त्यांना आणखी शिकावे असे वाटत होते. त्याबद्दलचा अभिप्राय त्यांनी पत्रात लिहिला, ''अजून मला दोन तीन वर्ष अभ्यास करता आला असता, तर फार बरे झाले असते. कारण बारीक सारीक

गोष्टी अजून पुष्कळ शिकण्यासारख्या व लक्षात ठेवता येण्यासारख्या होत्या" (दाते, पृ. १९४) महाराजांना शिक्षणाची आस कशा प्रकारे होती हे चरित्रकार दाते आणि दांडेकर यांनी नेमके ओळखले आहे.

महाराजांच्या विषयशिक्षणाबरोबर इतरही शिक्षण देण्यात आले. त्यामध्ये, ''पाच वाजता शाळा सुटल्यावर शाळेच्या मैदानात आट्यापाट्या, खो-खो, फरीदगा, कवाईत वगैरे देशी खेळाचाही व्यायाम होत असे.'' (फाटक, पृ. ५१०) त्याचबरोबर धर्मशिक्षणाचे शिक्षण देण्यात आले. अशाप्रकारे महाराजांना सर्वच प्रकारचे शिक्षण दिले जात होते. महाराजांचे शिक्षण चालू असताना सकाळी सहा वाजल्यापासून ते रात्री दहा वाजेपर्यंत प्रत्येक बाबीसाठी ठराविक वेळ ठरलेला होता. दिनक्रम अत्यंत काटेकोर होता. या दिवसांतील दिनक्रम दाते आणि फाटक तासवार देतात.

महाराजांचे शिक्षण संपताना राज्यकारभार कसा करावा यासाठी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. ही अत्यंत महत्त्वकांक्षी योजना होती. यामध्ये प्रत्येक खात्याचा एक तज्ज्ञ काही व्याख्यानाद्वारे आपला विषय संपवत असे. राज्यरोहणाच्या अगोदर नऊ महिने ही व्याख्यानमाला सुरू केली. आणि राज्यरोहणाच्या पूर्वी पंधरा दिवस ती संपविण्यात आली. चरित्रकारांनी या योजनेचे महत्त्व ओळखले होते. गोत्री यांनी याचा उल्लेख केला नाही. दाते, दांडेकर, सरदेसाई आणि फाटक व्याख्यानमाला महत्त्वाची होती हे स्पष्ट करतात. यामधील व्याख्याने निःसंशय उत्तम होती. मात्र दाते, दांडेकर, फाटक यांच्या मतानुसार संस्थानचे दिवाण टी. माधवराव यांनी दिलेली व्याख्याने बहुमोल आहेत. ''ब्रिटीश रेसिडेंटाशी कसे वागावे, आपल्या हक्कास कसे जपावे, दिवाणगिरी कोणास द्यावी, अधिकारी नेमताना कोणते धोरण डोळ्यापुढे ठेवावे, नोकरचाकरांशी, हुजऱ्याशी, स्वतःच्या कुटुंबीयाशी व आप्तस्वकीयांशी कसे वागावे व त्यांच्याकडून आपली कामे कशी करून घ्यावीत, भेटीस येणाऱ्या मंडळीपैकी कोणास जवळ करावे व कोणास दूर करावे, सार्वजनिक पैशाचा व्यय कसा करावा, शिल्लक कशी व कोठे गुंतवावी, सार्वजनिक कार्यास किती व काही मदत करावी, वर्तमानपत्रे कोणती व केव्हा वाचावीत, इतर संस्थानाचे व ब्रिटीश रीयासातीचे वार्षिक अहवाल वाचल्याने कोणते फायदे होण्यासारखे आहेत व (त्यांच्यापासून) आपणास काय शिकावयाचे इत्यादी महत्त्वाची माहिती सर टी. माधवरावांनी आपल्या शिष्यास या व्याख्यानाद्वारा करून दिली.'' (दाते, पृ. १९६) टी. माधवरावांची ही व्याख्याने `Minor Hints' या ग्रंथात दिली आहेत. हा ग्रंथ आजच्या स्थितीतही उपयोगी आहे. या ग्रंथाने मा. नरेंद्र मोदी इतके प्रभावित झाले. नंतरच्या गुजरातच्या मुख्यमंत्र्याने या ग्रंथाचे गुजरातीत भाषांतर करून घेतले. आणि आपल्या राज्य कर्मचाऱ्यांना त्याच्या प्रती वाटल्या. चरित्रकारांच्या मते व्याख्यानमालेमुळे महाराज राज्यकारभार करण्यास सक्षम झाले. त्यामुळे चरित्रकारांना ही व्याख्यानमाला महत्त्वाची वाटते.

चरित्रकार महाराजांच्या शिक्षणाला महत्त्वाचे स्थान देतात. महाराजांनी या शिक्षणाच्या जोरावरच संस्थानात सुधारणा केल्या. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाराज या शिक्षणावर शांत न बसता आयुष्यभर आपले अध्ययन चालूच ठेवले. चरित्रांत याचीही नोंद घेतली गेली आहे. या

चरित्रकारांपैकी रियासतकार सरदेसाई तर काही काळ महाराजांचे वाचक होते. त्यामुळे साहजिकच इतरांपेक्षा सरदेसाई यांनी महाराजांच्या शिक्षणविषयक महत्त्वाच्या आठवणी दिल्या आहेत. तसेच सरदेसाई आत्मचरित्रातही या बाबीची नोंद घेतात. महाराज इंग्रजी व्याकरण शिकत असताना रात्री - अपरात्री सरदेसाई यांना बोलावून आपल्या शंकांचे निरसन करून घेत. याठिकाणी चारित्रकारांना महाराजांची शिकण्याची जिद्द, चिकाटी, ज्ञानलालसा दिसते.

या खंडातील सर्वच चरित्रकारांनी महाराजांना शिक्षणामुळे अनेक बाबींची प्राप्ती झाल्याचे निवेदन करतात. शिक्षणामुळे महाराजांचे व्यक्तिमत्त्व बदलले. त्यांच्या बुद्धीचा विकास झाला. स्वतंत्र विचार करू लागले. प्रत्येक गोष्टीच्या खराखोटेपणा बारीकपणे पाहू लागले. दृढनिश्चय, उद्यमशीलता, कडक शिस्त, दुसऱ्यास हुकुमात ठेवण्याची कला अशा अनेक बाबी ते शिक्षणातून शिकले. याबद्दल दाते यांचे म्हणणे योग्य ठरते. ''आजकालच्या बडोद्यातील सुधारणा म्हणजे महाराजांस मिळालेल्या सुशिक्षणाचे दृश्य फल होय हे कोणीही कबूल करील.'' (दाते, पृ. १९४) राज्यकारभारासाठी आवश्यक असणारी सर्व पूर्वतयारी या शिक्षणामुळे झाल्याची चरित्रकार सांगतात.

सयाजीराव महाराजांची एकाएकी कवळणा गावातून थेट बडोदा संस्थानाच्या राजपदी निवड झाली. कवळणा गावात ते स्वच्छंदी होते. बडोद्यात आल्याबरोबर ते बंधनात अडकले. त्यांना कवळणा गावातील कोणालाही भेटण्याची मुभा नव्हती. दिनक्रम अतिशय काटेकोर होते. त्या वेळचा एक प्रसंग फाटक देतात, ''आपण राजप्रासादात राहू लागलो तरी पूर्वीप्रमाणे आपल्या पित्याचे दर्शन वारंवार घडावे आणि राजा झालेला आपला गोपाळ नित्य आपल्या दृष्टीस पडावा ही उत्सुकता या बाप - लेकांमध्ये बराच काळ वसत होती. दोघांना एकमेकांशी उभ्या उभ्या सुद्धा बोलण्याची मोकळीक नव्हती. बापलेकांच्या नजरानजरीलाही राणी जमनाबाईचा डोळा चुकविल्याखेरीज सवड मिळत नव्हती. राणीसाहेब धर्मकार्यात गर्क असतील अशासारखी एखादी वेळ आगाऊ ठरवून बापाने वाड्याखालून जावे आणि मुलाने वाड्यातून (कदाचित प्रणामपूर्वक) हातवाऱ्याने आपली खुशाली बापाच्या निदर्शनास आणावी.'' (फाटक, पृ. ५१०) महाराजांच्या मनाचा वेध घेणारा एवढा एकच पुरावा बरेच काही सांगतो.

४.

गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि फाटक यातील प्रत्येक चरित्रकार हा व्यासंगी साहित्यिक होता. साहित्याचा गाढा अभ्यासक होता. त्यांनी इतरही साहित्याची निर्मिती केली होती. त्यामुळे त्यांना महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रत्ययकारक आणि लोभस वर्णन करता आले. यातील प्रत्येक चरित्रकार हा कोणत्या ना कोणत्या कारणाने महाराजांशी, बडोद्याशी निगडीत होता. फाटक सोडता प्रत्येकाला महाराजांचा सहवास लाभला होता. महाराजांच्या अनेक कृती, निर्णय, राज्यकारभार जवळून पहिले होता. त्यामुळे त्यांना चरित्राचे निवेदन समरसपणे करता आले. यातील एक महत्त्वाचा भाग असा की, वरील सर्वच चरित्रकारांनी महाराजांच्या पूर्वजांचे (विशेषतः मल्हारराव महाराज) वर्णन करताना ते कसे वाईट होते असे करतात. एका संस्थानांच्या अधिपतीच्या पूर्वजांचे असे वाईट वर्णन तेही लिखित आणि चरित्रात

करणे म्हणजे एक प्रकारचे धाडस होय. परंतु हे धाडस या चरित्रकारांनी केले, या पाठीमागे सयाजीराव महाराजांचे अभय असावे. महाराजांनी साहित्यिकांना सत्य लिहिण्यासाठी मोकळीक दिली असावी. हा महाराजांच्या मनाचा मोठेपणा आहे. त्यांना सुशिक्षणातून मिळालेले हे शहाणपण होय. आणि याचा नेमका फायदा घेत चरित्रकारांनी चरित्रे वाचनीय, सत्यनिष्ठ केली आहेत.

महाराजांचे औपचारिक शिक्षण चालू असताना महाराजांचा विवाह झाला. त्यानंतर काही दिवसातच त्यांचे राज्यारोहण झाले. फाटक सोडता इतर चरित्रकार महाराजांचे समकालीन आहेत. त्यामुळे महाराजांच्या आयुष्यातील कुटुंबातील अनेक खाजगी बाबी सहजपणे मांडता आल्या. महाराजांचे लग्न ही राज कुटुंबातील पहिली महत्त्वाची घटना होती. त्याचे वर्णन दाते करतात, ''लग्न मंडपात कुलदेवातांच्या पुजाअर्च्या होत होत्या. वधू व वर होमापुढे हात जोडून लग्नविधीत गुंतले होते. लग्नाची घटका भरल्याबरोबर वधूस बुरखा घालून शृंगारून आणण्यात आले. दिव्यांचा चकचकाट हंड्याझुंबारांची आरास निरनिराळ्या अलंकारभूषणांनी सजलेल्या स्त्रिया, फुलांच्या अत्तराचा घमघमाट, मिलिटरीचे बँडवादन अशा समारंभात उपाध्ये, जोशी वगैरेनी मंगलाष्टके म्हणून वधूवरांच्या मस्तकावर मंत्राक्षदा टाकल्या.'' (दाते, पृ. १९५) दांडेकर म्हणतात, ''नजरबाग राजवाड्याची शोभा या प्रसंगाची काय बरे वर्णावी? देवतांच्या पूजा, ग्रहांची शांती, सर्वसाधारण देवप्रार्थना सारख्या सुरू होत्या. लग्नाची वेळ जवळ आली, तसे वधूवरांना अंतरपाटाआड उभे करण्यात आले. मंगलाष्टके म्हणायला सुरवात झाली, वधूवरांच्या मस्तकावर मंगलाक्षता पडू लागल्या, आणि शेवटी पाणीग्रहण विधी झाला. मोहित्यांनी आपली पुतणी सयाजीराव महाराजांना विधीपूर्वक अर्पण केली. आणि अशा तऱ्हेने हा परम मंगल समारंभ पार पडला.'' (दांडेकर, २९१) असे वर्णन करत लग्नाचा प्रसंग हुबेहूब आपल्या समोर उभा करतात. इतरही चरित्रकारांनी हा महत्त्वाचा प्रसंग दिला आहे.

शिक्षणाचा कालावधी संपल्यावर महाराजांना राज्याचे पूर्ण अधिकार देण्यात आले. त्यावेळी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सर जेम्स फर्ग्युसन उपस्थित होते. यावेळी अनेक लोकांना निमंत्रित करण्यात आले होते. विवाह समारंभाप्रमाणे हाही समारंभ थाटाचा झाला. या प्रसंगी झालेल्या भाषणाचा उल्लेख सर्वच चरित्रकारांनी केला आहे. प्रथम जेम्स फर्ग्युसन यांनी भाषण केले. त्याचा आशय दांडेकर यांनी दिला आहे. ''त्यावेळी जेम्स यांनी केलेले भाषण फारच चांगले झाले. त्यात उपयुक्त असा उपदेश केला होता. सर जेम्स यांनी महाराजांना अत्यंत यशस्वी व सुखी आयुष्य लाभेल असे भविष्य वर्तविले. पण ते भविष्य घडवून आणण्याची जबाबदारी त्यांनी महाराजांवर टाकली. असा एक काळ इतिहासात होऊन गेला (आणि अजूनही काही काही देशात तीच स्थिती आढळते) की त्यावेळी राजेलोक आपले राज्य व आपली प्रजा यावर अनियंत्रित सत्ता चालवू शकत असत. राज्य आणि प्रजा या दोन उपभोग्य वस्तू आहेत, असे त्या काळात राजांना वाटे. पण आता हा काळ अगदी बदलला आहे. राजा आणि राज्य यांचा उपयोग व कार्य अगदी निराळी व उच्च प्रकारची आहेत. राजाने प्रजाहित आपल्या नजरेसमोर सतत ठेवले, प्रजेकरिता वाटेल तो स्वार्थत्याग करावयाला तो प्रवृत्त झाला, तर त्याचे फळ त्याला मिळाल्यावाचून कधीच

रहात नाही. प्रजेचे प्रेम असेल त्या राजासारखा सुखी मनुष्य नाही असेच म्हटले आहे.'' (दांडेकर, २८३) सयाजीराव महाराजांना मार्गदर्शनपर केलेल्या भाषणाचा सार देत महाराजांनी राज्य कसे करावे, प्रजाहित कसे जपावे या बाबींचा समावेश केला आहे. या प्रसंगी महाराजांचेही भाषण झाले. ''आजमितीपासून बडोदे राज्याचा अधिकार आम्ही आपल्या हातात घेत आहोत. आमची प्रजा संतुष्ट रहावी आणि उत्तरोत्तर तिच्या सुखात वाढ होत जावी. अशी आमची अंतःकरणापासून इच्छा आहे. आमचा हेतू सिद्धीस नेण्याचे कामी आमचे सर्व अधिकारी, मानकरी, दरकदार व अखिल प्रजा अत्यंत राजनिष्ठेने आमच्याशी वर्ततील व सहकार्य करतील असा आम्हास भरवसा वाटतो. हे आरंभलेले कार्य सुफल होवो.'' (दाते, पृ. १९७) ही दोन भाषणे इथे देण्याचे कारण म्हणजे महाराजांच्या विचारातून प्रजेच्या कल्याणाबद्दल प्रथमपासूनच आस्था होती. आणि कल्याण करण्यासाठी महाराजांनी तसा आयुष्यभर प्रयत्न केला. महाराजांच्या विचार आणि कृतीत फरक नसे. त्याचे प्रत्यय त्यांच्या पुढील कारकिर्दीकडे पाहिल्यास आपणाला येतो. महाराजांच्या वैचारिक धनाचा उल्लेख पुढे येणार आहे.

चरित्रकार राज्यारोहणासंबंधी इतरही माहिती देतात. गोत्री म्हणतात, ''या समारंभास एकंदर ११ लक्ष रुपये खर्च झाला होता.'' (गोत्री, पृ. १००) त्यावेळी एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यामध्ये महाराजांनी आपण अधिकार हाती घेतल्याचे जाहीर केले आहे. तो जाहीरनामा फक्त गोत्री देतात. तर रियासतकार सरदेसाई यांनी महाराजांना मुख्य कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी मानपत्रे दिल्याचे सांगतात. त्याबद्दल ते म्हणतात, ''दुसऱ्या दिवशी (राज्यारोहण कार्यक्रम दोन दिवस होता) मानपत्रांचा दरबार झाला. त्यात पुण्याच्या सार्वजनिक सभेचे मानपत्र घेऊन आलेले पाहुणे होते. त्यांनी ते वाचून दाखविले. हे मानपत्र सुप्रसिद्ध राष्ट्रपुरुष महादेव गोविंद रानडे यांनी स्वतः तयार केलेले होते. त्यात पूर्वीच्या मराठी राज्याचा उल्लेख देऊन सर्व महाराष्ट्राची नजर तूर्त बडोद्यावर खिळलेली आहे. मराठी बाणा संभाळून महाराजांना महाराजांनी इंग्रजांना नमुनेदार धडा घालून द्यावा, असा आशय होतो.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३५९) महाराजांचे राज्यरोहण आणि त्या संबंधीची हकीगत देत चरित्रकार महाराजांच्या कार्याचा पाया कसा पक्का होता याचे निवेदन करतात. एकंदरीत महाराजांनी उभारलेला कर्तृत्वाचा डोंगर हा मजबूत पायावरती उभा होता असे चरित्रकार म्हणतात.

राज्यरोहणानंतर महाराज शांत बसले नाहीत. त्यांनी दरवर्षी राज्याच्या एका एका भागाचा दौरा केला. त्या दौऱ्याला 'हुजूर सवारी' असे म्हणत. चरित्रकार गोत्री, दाते आणि फाटक यांनी या 'हुजूर सवारी'ला महत्त्वाचे स्थान दिले आहे. कारण प्रजेच्या सुधारणेसाठी, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी दौरे करणारा हा प्रजाप्रेमी राजा होता. त्यांच्या या वेगळेपणाची नोंद चरित्रकारांना घेणे क्रमप्राप्त होते. पहिल्या काही हुजूर सावरीवर असताना महाराजांबरोबर खूप मोठा लवाजमा असे. त्यावर जास्त खर्च होऊ लागला, म्हणून महाराजांनी पुढील हुजूर सवारीत हा लवाजमा कमी केला. आणि पैशाची बचत केली. या सवारीबाबत चरित्रकारांनी काही निष्कर्ष काढले आहेत. दाते म्हणतात, ''वास्तविक पाहता स्वतः विशेष मेहनत न करता सर टी. माधवरावांसारख्या

कुशल, राज्यकार्यधुरंधर मंत्र्यावर राज्यकारभार टाकून महाराजांस खुशाल स्वस्थ आराम घेत बसता आले असते. परंतु त्यांनी तसे न करता प्रारंभापासून सर्व विषयात मन घालून स्वतः उद्योग करून राज्यकारभारावर आपली छाप पूर्णपणे बसविली. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे केव्हाही वाईटच. तसेच पुस्तकी विद्येबरोबर अनुभवाचे शिक्षण अत्यंत आवश्यक किंबहुना फार महत्त्वाचे आहे. ही गोष्ट महाराजांस पुरेपूर पटली आहे." (दाते, पृ. २०१) राज्यकारभाराच्या बाबतीत दुसऱ्याच्या आधारावर अवलंबून राहणे महाराजांस आवडत नव्हते. प्रत्येक बाब बुद्धीरुपी तराजूत ठेवत आणि योग्य निर्णय घेत. या दौऱ्यात प्रजेच्या स्थितीचे अवलोकन केले, त्यांच्या अडचणी काय आहेत, त्या कशा प्रकारे सोडवता येतील. प्रजेच्या जीवनमानात काय बदल करता येईल. याचा अभ्यास केला. आणि त्यासाठी अनेक 'हुजूर हुकुम'[५] काढले.

५.

सयाजीराव महाराजांच्या कार्याची सुरुवात या हुजूर सवारीपासून होते. गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि फाटक या सर्व चरित्रकारांनी लिहिलेल्या चरित्रांचा गाभा म्हणजे महाराजांचे कार्य आहे. महाराजांच्या पूर्वजांपासून ते राज्यरोहणापर्यंत चरित्रकारांनी कालक्रमे निवेदन करतात. त्यानंतर मात्र कालक्रम पाळला गेला असे नाही. कारण काही सुधारणा या लगेच झाल्या. तर काही दीर्घकाळ चालल्या. त्यामुळे ठराविक कालक्रमानुसार लेखन सोपे नव्हते.

महाराजांनी राज्यकारभार हाती येताच सर्वप्रथम त्यांनी 'राज्यकारभारातील' सुधारणा केल्या. त्या करण्यापाठीमागील कारण स्पष्टच होते. महाराजांना सुनियंत्रित राज्यकारभार हवा होता. परंतु तो ताबडतोब करणे शक्य नव्हते. त्या काळात हिंदुस्थानात राज्यकारभार करणे सोपे राहिले नव्हते. याचे अचूक निवेदन रमेश वरखेडे यांनी केले आहे. "खिळखिळी होणारी सरंजामशाही, व्यापाऱ्यांची भांडवलशाही, राजकारणात रस नसलेले आणि आपापल्या चरितार्थात अडकलेले सामान्यजन आणि ब्रिटीश वसाहतवादाची दहशत अशी आजूबाजूची परिस्थिती असताना संस्थानाचा राज्यकारभार चालविणे तितके सोपे नव्हते."[६] इंग्रजांची धाक दडपशाही, बडतर्फ करण्याची टांगती तलवार, रेसिडेंटची करडी नजर, संस्थानातील अंतर्गत कलह, राजघराण्यातील कलह या सर्वांच्या पार्श्वभूमीवर महाराजांनी राज्यप्रशासन इंग्रजांपेक्षा उत्तम केले. या पाठीमागे महाराजांचे शिक्षण, बाहेरच्या जगाशी असणारा संबंध, महाराजांचा व्यासंग, अनेक देशांच्या राज्यकारभाराचा अभ्यास होता.

सयाजीराव महाराजांच्या पूर्वी मल्हारराव महाराज राज्य करत होते. पाठीमागे म्हटल्याप्रमाणे त्यावेळी राज्यकारभाराची घडी विस्कटली होती. ती काही प्रमाणात दिवाण टी. माधवराव यांनी बसवली. महाराजांचा राज्यकारभार करण्याची पद्धत अनोखी होती. सयाजीराव महाराज आणि शाहू महाराज समकालीन होते. त्या दोघांचा राज्यकारभार व्यवस्थित होता. दोघांच्या राज्यकारभाराची तुलना डॉ. सदानंद मोरे 'लोकमान्य ते महात्मा' (खंड-१) या ग्रंथात करतात. "सयाजीरावांची प्रतिपक्षाला हाताळण्याची पद्धत गनिमी काव्याची होती. याउलट शाहू छत्रपतींची पद्धत होती. तिची तुलना शिकारीशी करता येईल. स्वतः शाहू महाराज उत्तम शिकारी होते; पण सावज गाफील असताना त्याला टिपणे महाराजांना आवडत नसे. हाका मारीत, रान उठवत

सावजाला सावध करून, बचावाची संधी देऊन, इतकेच नव्हे, तर अंगावर घेऊन लोळवणे त्यांना पसंत पडे. 'साप बी मर जाए और लाठी भी ना टूटे' ही सयाजीरावांची शैली. उलट दोन-चार काठ्या मोडल्याशिवाय साप मारण्याचे समाधान शाहू महाराजांना मिळायचे नाही, असा प्रकार. सयाजीराव थंड डोक्याने डावपेच आखणार. शाहू महाराजांना डावपेच येत नव्हते, अशातला भाग नाही; पण ते भावनाप्रधान होते. एखादी गोष्ट मनाला फार लावून घेत. सयाजीरावांच्या दीर्घयुष्याचे आणि छत्रपतींच्या लवकर जाण्याचे एक कारण त्यांच्या त्या त्या मनोवृत्तीही असाव्या, हे लक्षात ठेवले पाहिजे."[७] सयाजीराव महाराज शांत राहून आपला कार्यभाग उरकत. टीकाकारांना कधी उत्तर देत नसत. मात्र, त्यावर योग्य अमलबजावणी करत.

सयाजीराव महाराजांच्या चरित्रकारांनी राज्य प्रशासन सुधारण्यासाठी महाराजांनी केलेले प्रयत्न देतात. गोत्री राज्यकारभार सुधारणेत प्रथम करण्यात आलेली छोटी छोटी कामे देतात. "राज्यातील प्रत्येक खात्याची कामे कशी चालवावीत, व त्या खात्यातील अंमलदारांनी किती अधिकार कसे वापरावेत, याजबद्दलचे, व खात्यातील कामाच्या अंर्तव्यवस्थेचे व बारिकसारिक गोष्टीचेही नियम करण्यात आले आहेत. त्यामुळे राजकीय कामात फार सुधारणा झाली असून, रयतेस दाद मिळणे सोयीस्कर झाले आहे." (गोत्री, पृ. ११३) त्यानंतरही कामास पात्र माणसांची नेमणूक करणे. पत्रव्यवहार सोपा आणि सुटसुटीत करण्यासाठी उपाययोजना करणे. ही कामे छोटी असली तरी शिस्तबद्ध राज्यकारभारासाठी महत्त्वाची आहेत. गोत्री याची नोंद घेतात.

कायदे तयार करण्यासाठी 'कायदा कमिटी' तयार करणे, 'स्मालकाज कोर्ट ॲक्ट', 'कोर्टात वकील नेमताना परीक्षा घेणे', 'न्याय व अमलबजावणी खात्याची विभागणी करणे', 'स्टॅप ॲक्ट' आणि 'नोदणी ॲक्ट' फौज व पोलीस खात्यात सुधारणा, 'आज्ञापत्रिका'[८] सुरू करणे, लोकनियुक्त लोकप्रतिनिधी निवडण्याची मुभा देणे, 'धारासभा' निर्माण करणे. या सुधारणांची यादी सर्वच चरित्रकार देतात. या व्यतिरिक्त महाराजांनी नाविन्यपूर्ण सुधारणा केल्या. त्या पुढीलप्रमाणे : महाराज कधी कधी राज्यकारभार चालतो, त्या वास्तूबाहेर कामाच्या वेळी घड्याळ घेऊन थांबत. त्यामुळे उशिरा येणाराला जरब बसे. महाराज दुपारी या वास्तूत कामकाज कसे चालते ते पाहत. ते पाहत असताना त्यांना आढळले की, काही अधिकारी कार्यालयातच दुपारची वामकुक्षी घेत आहेत. महाराजांनी लगेच टेबल आणि खुर्चीची व्यवस्था केली. सुचलेला विचार नष्ट होऊ नये म्हणून स्वतःजवळ ते कागद व पेन्सील ठेवत. ग्रहण असेल त्या दिवशी अधिकारी सुट्टी घेत. ती सुट्टी महाराजांनी कायद्याने बंद केली. राज्यकारभार सुधारण्यासाठी महाराजांनी केलेल्या कामाच्या यादीवरून महाराज राज्यकारभार सुधारण्यासाठी किती कष्ट घेत होते याची कल्पना चरित्रकार देतात.

महाराजांचा राज्यकारभार किती सुधारलेला होता याबद्दलची एक आठवण रियासतकार सरदेसाई यांनी दिली आहे. ते म्हणतात, "एक शतकाच्या त्या काळात पाच-चारशे संस्थानांपैकी ही एकच व्यक्ती हिंदी राजकारणात क्रांतिकारक बनली. एका अर्थाने इतर संस्थानिकांचे गुरूच बनले. म्हैसूर, इंदूर, ग्वाल्हेर, त्रावणकोर, धार, देवास, सावंतवाडी, मुधोळ, अशा अनेक ठिकाणाचे

सत्ताधीश अनेकवार बडोद्यास येऊन सयाजीरावांच्या शिकवणीचा लाभ घेत.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३९९) तर 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्रात म्हणतात, ''स्वतः एक क्षण फुकट वाया न घालविता दुसऱ्या कोणालाही ते रिकामे बसू देत नसत. त्यामुळे माझी नियमित उद्योग करण्याची उत्कंठा सदैव वाढत गेली.'' (माझी संसारयात्रा, सरदेसाई, पृ. ३५८) आदर्श राज्य कसे करावे यासंबंधी महाराजांनी अभ्यास केला होता. त्यामुळे ते राज्यकारभार सुधारणांच्या बाबतीत इतरांना मार्गदर्शन करत. चरित्रकार महाराजांनी राज्यकारभार सुधारणेसाठी केलेल्या प्रयत्नांकडे जाणीवपूर्वक लक्ष वेधतात.

गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि फाटक यांनी राज्यकारभार सुधारणा महत्त्वाच्या मानल्या आहेत. ज्या काळापर्यंत त्यांनी चरित्र लिहिले त्या काळापर्यंत केलेल्या आदर्श सुधारणा मांडल्या आहेत. महाराजांना आदर्श राज्यपद्धती अपेक्षीत होती. चरित्रकार राज्यकारभार सुधारणेमुळे प्रजेची कशी सोय झाली याचे सोदाहरण निवेदन करतात.

महाराजांच्या शिक्षणविषयक सुधारणा ह्या सुवर्णाक्षरांनी नोंदिवल्या आहेत. चरित्रकारांना महाराजांच्या शिक्षणविषयक सुधारणा आणि शिक्षणविषयक विचार निर्देशित केल्याशिवाय चरित्र पूर्ण करणे अशक्य आहे. स्वतःच्या शिक्षणामुळे महाराजांची दृष्टी विश्वव्यापी बनली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक सुधारणा झाल्या. परिणामस्वरूप महाराजांना प्रजेच्या शिक्षणाविषयी अत्यंत तळमळ होती. राज्यकारभार हाती येताच शिक्षणासाठी महाराजांनी काय सुधारणा केल्या याबाबत गोत्री यांनी दिलेले उदाहरण बोलके आहे. ते म्हणतात, ''महाराजांनी राज्यकारभार धारण करण्यापूर्वी १८७९-८० साली विद्याखात्याचा खर्च रु. २१४१५४ झाला असून सन १८८०-८१ साली विद्याखात्याचा खर्च रु. ४३४३४७ झाला आहे. म्हणजे राज्याधिकार मिळताच हा खर्च एकदम दुप्पट वाढीवण्यात आला; व हल्ली सन (१९०८-०९ साली) या कामाकडे खर्च रु. १२८४९११ झाल्याचे प्रसिद्ध झाले आहे.'' (गोत्री, पृ. १११) शिक्षणावरील खर्चाच्या रकमावरून समजते की, महाराज शिक्षणाबाबत अत्यंत जागरुक आणि दक्ष होते. या पाच चरित्रकारांमध्ये दाते यांनी शिक्षणात बडोदा संस्थानाने प्रत्येक स्तरावरील केलेली प्रगती स्पष्ट केली आहे. यामध्ये प्राथमिक स्तरावरील मोफत आणि सक्तीच्या निर्णयाचा समावेश आहे. शिक्षणाबाबत झालेला हा निर्णय जागतिक पातळीवरचा विशेष आणि सर्वसमावेशक होता. प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, ओद्योगिक शिक्षण आणि स्त्रीशिक्षण या सर्वच स्तरावर केलेले बदल, किंवा निर्माण केलेल्या नवीन सुधारणा या वेगळ्या होत्या. प्रजेने शिक्षित व्हावे, सुसंस्कारीत व्हावे, हा महाराजांचा ध्यास होता.

मागील परंपरेने चालू असलेले शिक्षण हे कुचकामी आहे. मानवीजीवाचा उत्कर्ष करणारे नाही. असे महाराजांचे ठाम मत होते. काळानुसार शिक्षणात अमुलाग्र बदल झाले पाहिजेत, असे मत ते प्रत्येक वेळी व्यक्त करत. गोत्री यांनी महाराजांनी विविध प्रसंगी केलेल्या भाषणांचा चरित्रात समावेश आहे. पहिली तीन भाषणे विविध शिक्षण संस्थामध्ये केलेली आहेत. त्या भाषाणामधून शिक्षणविषयक विचार मांडताना त्यांनी फक्त हिंदुस्थानातील शिक्षण पद्धतीचे दोष काढले नाहीत तर जगाच्या तुलनेत आपण कसे सुधारले पाहिजे, शिक्षण पद्धतीत बदल

कसे केले पाहिजे याचा परामर्श घेतला आहे. अलमेरा येथील संस्कृतपाठशाळेत केलेल्या भाषणात म्हणतात, 'कोणत्याही विषयाचे अध्ययन करणे म्हणजे केवळ त्याची उपस्थिती असणे नव्हे; तो विषय पूर्णपणे समजला पाहिजे. त्या प्रमाणे एक विषयाला अनुसंगिक जे इतर विषय असतील त्यांची माहिती असली पाहिजे, नाहीतर मोठे प्रमाद घडण्याचा संभव आहे. सबब हल्लीच्या पश्चिमात्य उदात्त शिक्षणपद्धतीप्रमाणे एखादे विषयाचे ज्ञान उत्तम असून इतर अनुषंगिक विषयाचे साधारण ज्ञान संपादन करणे अवश्य आहे. वैय्याकरणीयास व्यत्पत्तीचे ज्ञान नसावे किंवा नैय्यायिकास व्याकरणाचा गंधही नसावा ही शिक्षणपद्धती बरोबर आहे असे आम्हांस वाटत नाही.' महाराजांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, शिक्षणविषक महाराजांचे विचार समाजातील शेवटच्या घटकाला समविष्ट करणारे आहेत. फक्त सद्यस्थितीतील शिक्षणाचा विचार करत नाहीत तर येणाऱ्या काळातील शिक्षण कसे असावे याबद्दल म्हणतात, 'हल्लीच्या कालमानाप्रमाणे केवळ संस्कृत भाषेचे अध्ययन करून निभावणूक होईल असे नाही. त्याचबरोबर इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे अगदी जरुरीचे आहे कारण सरकार दरबारात सर्व पत्रव्यवहार या भाषेत होत असतो. शिवाय सर्व शास्त्रीय विषयांवर कलाकौशल्याचे संबंधाने व व्यापाराधंद्याचे बाबतीत या भाषेत ग्रंथ विपुल आहेत.' आपल्या भाषणांतून सयाजीराव महाराज शिक्षणविषयक क्रांतिकारक, हिंदुस्थानातील शिक्षण विचार बदलणारे विचार मांडतात.

दाते शिक्षणविषयक भौतिक सुधारणांचा चढता आलेख मांडतात. परंतु त्यागोदर या सुधारणांची सुरुवात महाराजांच्या शिक्षणविषयक विचाराने करतात. महाराजांना उन्नत राष्ट्र (संस्थान) निर्माणासाठी शिक्षण हे महत्त्वाचे वाटत होते. प्रत्येक व्यक्ती जर शिक्षित झाली तर समाजाची, संस्थानाची प्रगती करणे अधिक सुलभ होईल, असा महाराजांचा कयास होता. प्रत्येक सुधारणेमागे शिक्षण महत्त्वाचा घटक आहे. आणि शिक्षणाला पर्याय नाही. या विचारावर महाराज ठाम होते. यासाठी सक्तीचे आणि मोफत शिक्षण हा कायदा लागू केला.

स्त्रियांच्या शिक्षणासाठी महाराज अत्यंत जागरुक आणि दक्ष होते. स्त्रियांना फक्त पुस्तकी ज्ञान देणे आवश्यक आहेच पण, त्यांना 'संसारिक' शिक्षण देणे अगत्याचे आहे असे मत महाराज नेहमी मांडत. त्यापुढेही जावून त्यांनी स्त्रियांच्या शारीरिक शिक्षणाची सोय केली होती. फक्त स्त्रियांसाठी जिमखाने उभारले होते. स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल दाते म्हणतात, ''बडोद्यात स्त्री शिक्षणासाठी 'श्रीमहाराणी चिमणाबाई स्त्री उद्योगालय' नावाचे उद्योग मंदिर महाराणी साहेबांच्या नावे स्थापन करण्यात आले आहे. त्यात शिवणकाम, वीणकाम, पाकशास्त्र रोग्याची शुश्रुषा वगैरे विषय शिकवण्यात येतात. अनाथ विधवांना व गरीब स्त्रियांना येथे शिष्यवृत्त्या देण्यात येतात. याशिवाय मुंबई इलाख्यात उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थीनीना शिष्यवृत्त्या देण्याकरिता महाराणीसाहेबांनी एक लक्ष रुपयाची देणगी दिली आहे.'' (दाते, पृ. २२७) स्त्रियांच्या प्रगतीसाठी, त्यांच्या उन्नतीसाठी महाराज आणि महाराणी हे दांपत्य कष्ट घेत होते.

चरित्रकार महाराजांच्या शिक्षण विषयक सुधारणा देताना एकंदरीत शिक्षणामुळे बडोद्यात झालेला परिणाम देतात. दांडेकर हे शिक्षणाच्या सुधारणांची आकडेवारी देतात. ''बडोद्याच्या

साडेचोवीस लाख लोकसंख्येपैकी प्राथमिक शिक्षण घेणारी मुले- मुली मिळून एकंदर विद्यार्थी अडीच लाख आहेत. या अडीच लाख विद्यार्थ्यांचे पालक शिकलेले आहेत असे मानल्यास साक्षर लोकांची संख्या सुमारे साडेदहा लाख भरेल." (दांडेकर, ३१५) महाराजांच्या या सुधारणेचा फायदा बडोद्यातील जनतेने घेतला होता. म्हणजे महाराजांना अपेक्षीत असणारी प्रगती लोक साधत होते. महाराजांच्या या सुधारणेला रियासतकार सरदेसाई आणि फाटक अत्यंत मोजक्या शब्दांत स्थान देतात. मात्र या विषयाचे महत्त्व अधोरेखित करतात.

सयाजीराव महाराजांनी उच्च शिक्षणासाठी अनेकांना शिष्यवृत्या दिल्या. यामुळे शिष्यवृत्या घेऊन शिकलेल्यांना आपल्या समाजबांधवांसाठी कार्य करता आले. या शिष्यवृत्तीबद्दल दाते म्हणतात, ''महाराजांनी आजपर्यंत शेतकी, बागाईत, सूपशास्त्र, गायनशास्त्र, घड्याळकाम, विद्युतशास्त्र, यंत्रशास्त्र, मुद्रणकला, शिक्षण, कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, वेदांत, पुस्तकालये, शिल्प इ. शास्त्रांच्या अध्ययनासाठी व त्या त्या विषयात प्राविण्य मिळवण्यासाठी अनेक विद्यार्थी परदेशी पाठविले आहेत. व असे लोक तेथून शिकून आल्यावर आपल्या ज्ञानाचा फायदा हिंदुस्थानास देत आहेत." (दाते, पृ. २२५) या परदेशी जाणाऱ्या विद्यार्थांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश होता. या चरित्रकारांपैकी दाते आणि दांडेकर यांनी याचा उल्लेख करतात. दाते म्हणतात, ''अस्पृश्यांचे सध्याचे पुढारी डॉ. भीमराव आंबेडकर यांचे शिक्षण महाराजांनीच केले आहे." (दाते, पृ. २२४) तर दांडेकर म्हणतात, ''अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर हे बडोदे सरकारकडून मिळत असलेल्या पैशांवर शिकून आले. आणि असे असून ते आपणाला कोणीही मदत केली नाही, असे पुष्कळ वेळा म्हणतात, त्यावर काही मंडळी स्वाभाविकपणे त्यांच्यावर नाराज आहेत. पण स्वतः महाराज त्यांच्यावर नाखूष तितकेसे नाहीत. परवा जातीभेद मोडण्यासंबंधाने डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात पत्रव्यवहार सुरू होता. त्यावेळी डॉक्टरसाहेबांनी आपली बाजू फार कसोशीने आणि भक्कमपणे पुढे मांडली होती. महाराज त्या वेळी दिल्लीस होते. तो पत्रव्यवहार पाहून महाराज म्हणाले, 'माझे पैसे फुकट गेले असे मला वाटत नाही. डॉक्टर आंबेडकरांना आपल्या हक्कांची जाणीव झाली यातच माझ्या पैशाचे चीज झाले. लोकांना द्यावयाचे ते एवढ्याच करिता." (दांडेकर, पृ. ३३२) महाराजांनी डॉ. आंबेडकर यांना शिक्षण दिले. याचा उल्लेख दाते आणि दांडेकर करतात.

सयाजीराव महाराजांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, भौतिक क्षेत्रात सुधारणा केल्या. त्यांनी राज्यकारभाराला, कार्याला सुरुवात केली त्यावेळची नेमकी सामाजिक परिस्थिती काय होती हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये बौद्धिक सुधारणा आणि मानवतावादी चळवळीस प्रारंभ झाला. समाजजागृती होऊ लागली. यातूनच पुढे तार्किक व विज्ञानवादी विचारसरणी पुढे आली. आणि युरोपियन प्रगतीला सुरुवात झाली. त्याचवेळी हिंदुस्थानावर इंग्रजांचे राज्य असल्याने पाश्चात्य शिक्षण इथल्याही पिढीला मिळू लागले. या शिक्षणामुळे हिंदुस्थानातला शिक्षित समाज प्रभावित झाला. तार्किक व विज्ञानवादी विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावरती पडला. या शिक्षणामुळे प्रभावित झालेल्या लोकांनी हिंदुस्थानात

सामाजिक आणि धार्मिक सुधारणांना सुरुवात केली. हिंदुस्थानातील लोकांत यामुळे नवचैतन्य आले. सर्वच सुधारणा पटापट झाल्या असे नाही. परंतु सुधारणांची आवश्यकता जाणवू लागली.

सयाजीराव महाराजांनी इ. स. १८८१ साली राज्यकारभार हाती घेतला. त्या काळाच्या मागेपुढे महाराष्ट्रात समाजसुधारकांनी समाजसुधारणेला प्रारंभ केला. त्यामध्ये जगन्नाथ शंकरशेठ, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, न्या. महादेव गोविंद रानडे, म. धोंडो केशव कर्वे, वि. रा. शिंदे अशा अनेक महापुरुषांनी महाराष्ट्रात सुधारणांची ज्योत कायम पेटती ठेवली. आणि माणसांच्या घराघरात नव्हे तर मनामनात प्रकाश पडला. वरील महनीय व्यक्तींमध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचेही नाव आदराने घेतले जाते. महाराष्ट्रातील समाजसुधारणा पुढे चालू ठेवण्याचे श्रेय महाराजांना आहे.

कोणत्याही बाबींची सुरुवात स्वतःपासून केली तर त्या व्यक्तीचा विकास झपाट्याने होतो. त्याच्यावर असणारी सामाजिक बंधने जर दूर झाली तर ती व्यक्ती स्वतःचा विकास अधिक प्राधान्याने करू शकते. म्हणून महाराजांनी सामाजिक सुधारणा करण्यासाठी सर्वप्रथम लोकांचे मत अनुकूल केले. आणि त्यानुसार कायदे केले. सामाजिक सुधारणा किती अवघड आहेत, याबद्दल दाते म्हणतात, ''कोणत्याही सुधारणा लेखणीच्या फटकाऱ्यानिशी किंवा दंडुकेशाहीच्या जोरावर होऊ शकत नाही; त्यातूनही धार्मिक अंधश्रद्धा, सामाजिक बंधने हटवादिपणा, जातीजातीतील परस्पर द्वेष, कोते विचार यांचा पगडा समाजावर बसला असेल हे विचारण्याची सोय नाही, आणि या सर्वांच्या जोडीला निरक्षरता व अज्ञान असले म्हणजे सारा कारभार आटोपला. तशात एखाद्याने प्रचलित रुढीविरुद्ध सुधारणा करू म्हटले तर उपहास, मानहानी, तिरस्कार याशिवाय अन्य काही त्यांच्या वाट्यास यावयाचे नाही.'' (दाते, पृ. २३३) महाराजांना वरील सर्व उपेक्षेला सामोरे जावे लागले. अशा बिकट परिस्थितीत त्यांनी समाज सुधारणा चालूच ठेवल्या. समाजाचा कल पाहून त्यांनी सुधारणा चालू ठेवल्या. एखादा कायदा करणे अत्यंत सोपे पण त्याची अंमलबजावणी करणे अवघड होते. त्याच्या अंमलबजावणीला घाई केल्यास ती योजना फसू शकते. याची महाराजांना कल्पना होती.

महाराजांनी बालविवाह रोखण्यासाठी कायदे केले. त्याविषयी गोत्री म्हणतात, ''बालविवाह प्रतिबंधक कायदा ता. २१.०७.१९०४ पासून अमलांत आला असून त्यात मुलाचे वय १६ व मुलीचे वय १२ वर्षाचे पूर्ण झाल्यावर त्यांचा विवाह करण्याचे ठरविले आहे. व हा कायदा तोडणारास शंभर रुपयाहून जास्त नाही इतका दंड करण्याचे फर्माविले आहे.'' (गोत्री, पृ. १२४) वरील वयातही टप्प्या - टप्प्याने वाढ करण्यात आली. महाराजांचा बालविवाहाला अत्यंत टोकाचा विरोध होता. त्यासाठी कायदा करून थांबले नाहीत तर चूक करणारास दंडाचीही योजना केली. त्याप्रमाणे कृती केली. महाराजांचे राजपुत्र फत्तेसिंहराव यांचा विवाह या कायद्यानुसार केला. विवाह वेळी युवराजांचे वय वीस वर्ष होते तर युवराज्ञीचे वय चौदा वर्ष होते. त्यानंतर महाराजांनी गोषाबंदी केली. त्याचीही सुरुवात स्वतःच्या राजवाड्यापासून केली. महाराणी चिमणाबाई यांच्यापासून याची सुरुवात करण्यात आली. त्यांचा गोषा काढून टाकण्यात आला.

'अस्पृश्यता' उच्चाटन करणे ही महाराजांची महत्त्वाची सामाजिक सुधारणा होती. महाराजांच्या या सुधारणेला महात्मा गांधीजींचे शाबासकीचे प्रमाणपत्र मिळाले आहे. महात्मा गांधीजींनी या बाबतीत फार मोठा लढा दिला होता. त्यामुळे या प्रश्नाची तीव्रता गांधीजींना माहित होती. गांधीजीं सयाजीराव महाराजांच्या या कार्याबद्दल काय म्हणाले ते या प्रस्तावनेत अन्यत्र उल्लेख आला आहे. हिंदू धर्मातील अस्पृश्यता ही अतिशय वाईट, त्याबद्दल महाराज म्हणतात, ''वरचे लोक खालच्या लोकांस वाईट रीतीने वागविताना पाहून मला फार दुःख होते, कुलशील माणसाच्या वर्तनावरून ठरते, त्याशी जन्माचा काही संबध नाही. नंतर अस्पृश्यता काढून टाकण्यासंबंधी ते म्हणतात, आपली भरभराट होण्यास व आपले वैभव वाढण्यास हा जातीजमातीचा संकुचितपणा नाहीसा होऊन आपले ऐक्य झाले पाहिजे.'' (दाते, पृ. २३५) मुळातच महाराजांना जातीभेद मान्य नव्हता. त्यांनी सर्वप्रथम राजवाड्यातील पंगती भेद दूर केला. वेगवेगळ्या पंगतीमधील अंतर कमी केले. कालांतराने फक्त शाहाकारी आणि मांसाहारी अशा दोनच पंगती ठेवल्या. महाराजांनी स्वतः अस्पृश्यांच्या पंगतीला बसले. त्याबाबत सरदेसाई म्हणतात, ''त्यांनी आपल्या धर्मखात्याची आमुलाग्र सुधारणा केली, त्यात माझा कार्यभाग महत्त्वाचा होता. एवंच राजपुत्र विद्यालयातील माझ्या नोकरीचे पहिले दशक (स.१८९० - १९००) माझ्या बुद्धीचा फैलाव होण्यास अत्यंत महत्त्वाचे बनून आले. न समजता ह्या सर्व सुधारणा आमच्या कुटुंबात रुजल्या. मांसान्नाचा बाऊ होता तो गेला. मी वाड्यात उघडपणे महाराजांच्या पंक्तीस जेवू लागलो.'' (माझी संसारयात्रा, सरदेसाई, पृ. ४८८) बडोदा संस्थानात शिक्षणाच्या अनेक सोयी केल्या. परंतु त्यांना अस्पृश्य आणि अंत्यजांच्या शिक्षणासाठी शिक्षक मिळाले नाहीत. तेंव्हा त्यांनी मुसलमान आणि ख्रिस्ती शिक्षकांची मदत घेतली. महाराजांनी अस्पृश्य निवारणासाठी असे अनेक प्रयत्न केले. त्यामध्ये कन्याविक्रीबंदी करणारा कायदा, घटस्फोटाचा कायदा, स्त्रियांच्या हक्कासंबंधीचा कायदा असे अनेक लोकोपयोगी आणि वंचित घटकाला फायदा होणारे कायदे केले. परिणामस्वरूप इ. स. १९०४ साली राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षस्थांनी त्यांची निवड झाली. त्यानंतर इ. स. १९१८ साली मुंबई इथे भरलेल्या 'भारतीय अस्पृश्यतानिवारक परिषद'चे महाराज अध्यक्ष होते. इ. स. १९२१ साली परोपकारी संस्थेने महाराजांस 'पतितपावन' ही पदवी दिली. महाराजांच्या अस्पृश्यता निर्मुलनासाठीच्या कार्याची यादी खूप मोठी आहे. चरित्रकार या सर्व सामाजिक सुधारणेची दखल घेतात.

महाराजांच्या सहकार्याने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता संपवण्यासाठी खूप मोठे कार्य केले. सयाजीराव महाराज या कामी माझे प्रेरणास्थान आहेत असे उद्गार अनेक वेळा महर्षींनी काढले आहेत. 'श्रीसयाजीगौरवग्रंथात' ते म्हणतात, ''श्रीमंत सयाजीराव महाराजांचे कार्य विस्तृत व दूरगामी आहे. केवळ राज्यकर्ते या नात्याने एक वटहुकुम काढून त्यांना अस्पृश्यतेचे कार्य करता आले असते. लोकमताचा पाठिंबा नसताना असली समाजसुधारणेची कामे केवळ हुकुमाच्या जोरावर करणे जवळ, जवळ अशक्य, निदान दुर्घट तरी असते. पण जपानचे बादशाह व तुर्कस्तानचे सर्वाधिकारी केमलपाशा ह्यांनी काही झटपट सुधारणा केवळ दंडनीतीच्या द्वारे करून दाखविल्या आहेत. पण ह्या महाराजांना असे एखादे डोळे दिपवणारे दिव्य दाखवायचे

नसून एका बाजूने ते अस्पृश्योद्धारकही आहेत. हे भावी इतिहास भावी पिढ्यांना गंभीर रवाने गर्जून सांगेल ह्याची खात्री पटते."[९] महर्षी शिंदे महाराजांची शिष्यवृत्ती घेऊन पदेशात शिकून आले होते. त्यांनी अस्पृश्यता संपवण्याची प्रेरणा महाराजांकडून घेतली होती. त्यामुळे महाराजांचे या संबंधातील प्रयत्न महर्षींना अवगत होते.

गोत्री, दाते, दांडेकर, सरदेसाई आणि फाटक यांनी महाराजांच्या सामाजिक सुधारणांचा अजेंडा मांडताना केलेल्या सुधारणा आणि त्याचे परिणाम देतात. छोट्या छोट्या तपशिलात न जाता अस्पृश्यतानिवारणाच्या परिणामाची चर्चा करतात. परिणामस्वरूप या चरित्रांतून महाराजांची अस्पृश्यता निवारणाची तळमळ दिसते.

महाराजांनी समाजसुधारणेबरोबर धार्मिक सुधारणेला महत्त्व दिले. धर्म सुधारणा आणि सामाजिक सुधारणा मानवी उन्नतीसाठी आवश्यक आहेत असे महाराजांचे ठाम मत होते. गोत्री, दाते, दांडेकर, सरदेसाई यांनी महाराजांच्या धर्मसुधारणा जवळून पहिल्या होत्या. अनुभवल्या होत्या. तद्वतच त्याच्या परिणामांची चर्चा करतात. धर्मसुधारणा करणे म्हणजे एक प्रकारे जनतेचा रोष ओढून घेण्यासारखे काम आहे. जनतेपेक्षा ज्या समूहाचा किंबहुना ज्या वर्गाचा उदरनिर्वाह धर्मातील अंधश्रद्धा आणि अनिष्ट बाबी यावर चालतो त्यांचा धर्मसुधारणेला प्रखर विरोध होतो. महाराजांनी मात्र या सर्वांवर मत करत आपल्या सुधारणा चालू केल्या. आणि काही कालखंडानंतर पूर्ण केल्या.

गोत्री वेगवेगळ्या धर्मसुधारणा देतात. महाराजांनी राजवाड्यात 'वेदोक्त कर्म' सुरू केले. या बाबीची नोंद सर्वच चरित्रकार करतात. महाराजांनी कोल्हापूरसारखा या प्रकरणाचा बोभाटा होऊ दिला नाही. आपली सर्व कौशल्ये वापरत हे प्रकरण बिनबोभाट मिटवले. महाराजांची धार्मिक मते समानतेच्या आधारावर होती. गोत्री म्हणतात, ''ते जसे अंधपरंपारागत जुन्या मतास चिकटून राहणारे नाहीत, तसेच इंग्रजी शिक्षणप्रभावास दिपून जाऊन नास्तिकही बनलेले नाहीत. त्यास स्वधर्माचा योग्य अभिमान आहे. व देशकालानरूप त्यात सुधारणा व्हावी अशी त्यांची इच्छा आहे." (गोत्री, पृ. १२३) महाराजांनी आपल्या राज्यकारभाराच्या प्रारंभीच धर्माबद्दलची आपली मते स्पष्ट केली होती. त्यांनी केलेल्या धर्मातील सुधारणा पाहताना याची प्रचीती येते. धर्माच्या नावाखाली शेती उपयोगी जनावरांची हिंसा बंद केली, ग्रहणाची रजा बंद केली, परदेशगमन केल्याबद्दल करावयाचे प्रायश्चित्त कायद्याने बंद केले. अशा सुधारणा चालू असताना धर्म नेमका काय आहे यासाठी उपलब्ध असणाऱ्या साहित्याची मराठीत भाषांतरे केली. ''ब्रिटीश सरकारप्रमाणेच महाराजांनी आपल्या प्रजेस धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. स्वतः हिंदू तेव्हा हिंदू धर्मियांनाच काय उत्तेजन द्यायचे व परधर्मीयांचा छळ करावयाचा अथवा त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर व तदनुषंगिक न्याय्य हक्कावर गदा आणावयाची असले संकुचित ध्येय त्यांनी डोळ्यापुढे ठेवले नाही. त्यांनी प्रत्येक धर्मातील धर्मपुस्तकांची मराठीत भाषांतरे करविली आहेत." (दाते, पृ. २३६) सयाजीराव महाराज प्रत्येक धर्माला समान न्याय आणि समान वागणूक देणारा धर्मनिरपेक्ष राजा होता. दाते धर्माच्या बाबतीत महाराजांची तुलना अकबराशी करतात.

महाराज प्रत्येक बाबतीत आधुनिकता आणत. सर्व बाबतीतील सुधारणा या डोळस असत. धर्मातील सुधारणा आणि सामाजिक सुधारणा करताना त्यांना अनेक अडथळे पार करावे लागले. दक्षिणा वाटण्याबाबत ही त्यांनी अशाच निर्णय घेतला. ''श्रावणात ब्राह्मणांना जी दक्षिणा वाटली जात असे, ती येईल त्या ब्राह्मणांना देण्याएवजी निरनिराळ्या जुन्या शास्त्रांच्या परीक्षा घेऊन त्यात ते उतरतील त्यांनाच दक्षिणा द्यावी, अशी महाराजांनी नवीन पद्धत सुरु केली.'' (फाटक, पृ. ५२१) हा कायदा केल्यानंतर महाराजांना रोषाला सामोरे जावे लागले मात्र त्यांनी निर्णय फिरवला नाही.

सयाजीराव महाराजांच्या सुधारणात सामाजिक आणि धार्मिक विषयालाही वरचे स्थान होते. गोत्री यांनी महाराजांच्या विविध भाषणांचा समावेश चरित्रात केला आहे. 'श्रीमात्स्वामी हंसस्वरूप यांचे व्याख्यानास दिलेले उत्तर' या भाषणातून महाराज खरोखरच सामाजिक पुनर्स्थापना करण्यासाठी किती अनुकूल होते हे स्पष्ट करतात. जुन्या चालीरीती चालू ठेवताना त्या चिकित्सकपणे पारखून, निरखून पुढे चालू ठेवायला पाहिजेत अशी धारणा महाराज ठेवत. धर्मातील अंधश्रद्धा कशी घातक आहे याबद्दलही ते म्हणतात, ''आमच्या धर्मातील ऋषी, मुसलमानातील काजी व मुल्ला, ख्रिस्ती लोकातील पाद्री वगैरेची स्थिती सर्वत्र एकच असल्याचे आढळेल. एका अर्थी या लोकांचे अशा प्रकारचे महत्त्व लोकसमाजाच्या मनावर दृढ होऊन बसणे साहजिक आहे. कारण प्रथमदर्शनी अदभूत वाटणाऱ्या गोष्टी अशा धूर्त लोकांना अगोदरच साधल्या असतात व त्याचा ते फायदा करून घेतात.'' (गोत्री, पृ. १५०) धर्मातील वाईट बाबी त्यांनी ओळखल्या होत्या आणि त्यांपासून आपण दूर राहिले पाहिजे असा सल्ला देतात. ''फक्त धर्मावर श्रद्धा असून चालणार नाही तर वेळप्रसंगी ती आचरणात आणली पाहिजे. नुसती आमचे धर्मावर श्रद्धा आहे असे म्हणण्यात काही तात्पर्य नाही; प्रसंग पडल्यास ती आपपरतेचा भेद न ठेविता व्यक्त होईल तरच उपयोग, याकरिता आपण सर्वांनी आपल्या धर्मातील हरएक जातीशी सहानभूती दाखवली पाहिजे.'' (गोत्री, पृ. १५४) आपण एकाच धर्मात राहून जातीपाती पाळतो, अन्य जातीतील लोक दुःखी कष्टी असताना मदत न करणे धर्मबाह्य असे महाराजांना वाटत होते. धर्मातील सुधारणा फक्त बळाच्या किंवा कायद्याच्या जोरावर शक्य नाहीत हे महाराज ओळखून होते. त्यासाठी जनमत अनुकूल करत त्या सुधारणा केल्या पाहिजेत असे महाराज म्हणत. याचा परामर्श आपल्या भाषणांतून घेतला आहे. सयाजीराव महाराजांचे धार्मिक आणि सामाजिक पुनर्स्थापना करण्याचे मत या भाषणांतून स्पष्ट होते.

महाराजांनी धर्म आणि माणूस यावर आपले विचार अनेक वेळा प्रकट केले. त्यातील त्यांचे विचार वाचल्याने महाराजांची धर्माबद्दलची मते समजतात. महाराज दुसऱ्या जागतिक धर्मपरिषदेचे अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणातून धर्म ही संकल्पना नीटपणे मांडली. ते म्हणाले, ''जगातील सर्व मोठ्या धार्मिक चळवळींचा प्रारंभ धर्माच्या अशा मूल्य परिवर्तनानेच व धर्माला सर्वसुलभ करण्यानेच होत असतो. गौतम बुद्धाने आपल्या वेळच्या ब्राह्मण धर्मात जे परिवर्तन घडवून आणले ते त्या धर्माच्या सर्वसुलभ अंगावर सर्व भर देऊन व धर्मचर्चेसाठी प्राकृत लोकांची भाषा वापरूनच घडवून आणले. आजही धर्मातील कितीतरी व्याख्या बदलून नव्या करण्याची वेळ

आली आहे. धर्मपालन करताना व्यक्तीवर तो जाच न ठरता सरळपणे पालन करता यावे. यासाठी धर्मातील काही संकल्पना आणि क्लिष्ट बाबी बदलाव्या लागल्या तर चालतील अशी महाराजांची धारणा होती."[१०] असा स्पष्ट विचार त्यांनी या भाषणातून मांडला. गोत्री यांनी दिलेली महाराजांची ही भाषणे मुळातून अभ्यासण्यासारखी आहेत.

शेती आणि शेतकरी हा राज्याच्या उत्पनाचे मुख्य साधन आहे. याची महाराजांस पूर्ण कल्पना होती. गोत्री यांनी इ. स. १९०४ सालापर्यंतचे चरित्र (प्रथम आवृत्ती) लिहिल्याने तिथपर्यंतच्या शेती आणि इतर सुधारणा देतात. बडोदा पेढा कंपनी, बडोदा गिरणी, साखरेचा कारखाना, अग्रीकल्चर बँक, लोकोपयोगी कारखाण्यास मदत या सुधारणा त्यांनी केल्या. शेती सुधारावी हा महाराजांचा महत्त्वाचा उद्देश होता. सयाजीराव महाराजांनी प्रजेस कर्ज देण्याची व्यवस्था केली होती. गोत्री प्रथम आवृत्तीत म्हणतात, 'बडोदा पेढा कंपनी. हिची स्थापना संवत १९४० मित्ती कार्तिक शुद्ध १ रोजी (सन १८८४ साली) करण्यात आली असून, बाजारातील शेठसावकार लोकास, व पदरचे नोकरास हलके कर्ज देण्याची व सेव्हिंग बँकाप्रमाणे कर्ज देण्याची योजना करण्यात आली आहे.' महाराजांनी इ. स. १८८१ साली राज्यकारभार हाती घेतला आणि १८८४ साली साली कर्ज देण्याची योजना अमलात आणली. राज्यकारभार हाती घेतल्यापासून अत्यंत कमी कालावधीत महाराजांनी संस्थानाच्या आर्थिक विकासाला सुरुवात केली. शेतकऱ्याला मदत करण्यास सुरुवात केली. शेतकऱ्याची आर्थिक स्थिती मजबूत करण्यास प्रारंभ केला. यावरून महाराजांची अर्थनीती स्पष्ट होते.

इ. स. १९०५ नंतर महाराजांनी शेतीकडे अधिक लक्ष दिले. दाते यांनी शेतीसाठी केलेल्या कामाची इत्यंभूत माहिती दिली आहे. सन १९०९ साली शेतीचे स्वतंत्र खाते निर्माण करण्यात आले. आणि शेतकऱ्यांना मदत करण्यात येऊ लागली. शेतकऱ्यांना कर्ज देणे, सावकारांच्या तावडीतून सोडविणे, बीबियाणे पुरवणे, आधुनिक शेती कशी करावी यासाठी वेगवेगळे प्रयोग, प्रदर्शने, मार्गदर्शन करण्यात येऊ लागले. शेतीखाते तपासणीसाठी फिरते तपासनीस नेमले, बीबियाणे, जनावरांची व कोंबड्यांची पैदास यासंबंधाने माहिती आणि हस्तपत्रके वाटण्यात आली. जनावरांसाठी दवाखाने काढण्यात आले. पाण्याची पूर्तता होण्यासाठी विहिरी खोदण्यात आल्या. शेतीसाठी सुधारीत साधनांची माहिती व्याख्यानाद्वारे पुरविण्यात आली. तसेच आधुनिक शेतीचे नमुने जगुदन, नवसारी, व बडोदे या ठिकाणी तयार करण्यात आले. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शेतकी शाळा उघडण्यात आल्या. शेतकरी कर्जबाजारी राहू नये यासाठी पतपेढ्या, शेतकरी सहाय्यक मंडळे आणि परस्पर सहाय्यकारी संस्था संस्थान करण्यात आल्या. शेतीसाठी आवश्यक असणारी मदत महाराज सरकार दरबारातून करत होते.

शेतीमधील आधुनिकता हा महाराजांचा आवडीचा विषय होता. दाते यांनी याची दोन उदाहरणे दिली आहेत. '१९०५ साली काश्मीरमधील रेशिमाच्या पैदाशीच्या पद्धतीचे शिक्षण घेण्यासाठी रावजीभाई पटेल यांना पाठविले होते. तसेच बंगालच्या शेतकी खात्याचे असिस्टंट डायरेक्टर व सिल्क एक्सपर्ट मि. एन. जी. मुकर्जी यांना बडोद्यात काही महिन्यापुरते बोलावून नवसारी व बडोदे येथे रेशिमाची पैदास उत्तम रीतीने कशी करता येईल याबद्दल महाराजांनी

विचारविनिमय केला.' (दाते, पृ. २३१) शेतकऱ्यांना कमी श्रमात, आधुनिक हत्यारे वापरत अधिक उत्पादन मिळावे अशी महाराजांची अपेक्षा होती. आणि जगातील शेतीविषयी असणाऱ्या आधुनिक सोयी संस्थानात आणण्यासाठी महाराज झटत होते. त्या सोयी साकारण्यासाठी ते प्रयत्न करत. चरित्रकार समकालीन असल्याने शेतीसुधारणेतील सर्वच बाबींची ते नोंद देतात.

शेतकऱ्यांना शेतसारा सरकारला जमा करावा लागे. त्याचा महाराजांनी अभ्यास केला. त्यात अनियमितता होती. ज्या वर्षी शेतीचे उत्पादन कमी होत, त्या वर्षी शेतसारा देण्याची ऐपत नसे. शेतकरी कर्जबाजारी होत. म्हणून राज्यकारभार हाती येताच त्यात सुधारणा करण्यासाठी 'सर्व्हे - सेटलमेंट' नावाचे खाते तयार केले. दांडेकर या सुधारणेची माहिती देतात. ''एका शेताची लागत ठरविताना आदल्याच वर्षी त्या शेतात किती उत्पन्न आले होते ते प्रथम पाहायचे. नंतर गेल्या कित्येक वर्षात किती उत्पन्न आले ते पहावयाचे. नंतर पुढे अंदाजी काय उत्पन्न येईल हे ठरवावयाचे. जमिनीच्या लागतीत, जमिनीच्या दरात वाढ झाल्याखेरीज, वाढ करावयाची नाही, हे लक्षात ठेवून लागत ठरवावयाची. जमिनीच्या उत्पन्नांतून शेतकऱ्याची मजुरी, औत वगैरे जिनसाबद्दूल होणारा खर्च किंवा त्याप्रीत्यर्थ वाया जाणारे व्याज, वगैरे वजा करून नंतर जे उत्पन्न बाकी राहील त्यापैकी निम्यापेक्षा अधिक रक्कम लागतीदाखल मुळीच घ्यावयाची नाही.'' (दांडेकर, पृ. ३०९) शेतसारा ठरवताना लहान - लहान बाबींचा विचार केला होता. ज्यामुळे शेतसारा वसूल केल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत नव्हता. दांडेकर यांनी शेती संबंधाने केलेल्या प्रशासकीय सुधारणांना महत्त्व दिले आहे. पूर्वी शेतसारा कसा चुकीच्या पद्धतीने आकारला जात होता हे सांगतात. त्यामध्ये 'हळबंदी, माचव्यावरून शेतसारा ठरविणे, मालगुझारी पद्धत, मेहवसी पद्धत, कोमणारी पद्धत'[११] अशा शेतसारा पद्धतीचा आढावा घेतात. परंतु महाराजांनी राज्यकारभार हाती घेताच वेगवेगळ्या प्रांतात असणाऱ्या वेगवेगळ्या पद्धती बंद केल्या. सर्वांना समान न्याय देणारी, सर्वसमावेशक अशी सारा वसुलीची पद्धत सुरु केली.

शेतकऱ्यांचे दुष्काळात अतोनात हाल होतात. त्यांच्याजवळ असणारी पुंजी संपली तर त्याला कोणीही वाली उरत नाही. सयाजीराव महाराज राज्य करत असताना सुद्धा महाराजांना याचा अनुभव आला. प्रत्यक्षात महाराजांनी हे हाल पहिले होते. इ. स. १८९९-१९०० साली बडोदा संस्थानात भयंकर दुष्काळ पडला. महाराजांनी या दुष्काळात प्रत्यक्षात प्रजेची स्थिती जाणून घेतली. त्यांना मदत केली. राज्याकोशातून दुष्काळासाठी विशेष निधी मंजूर केला. स्वतःच्या खाजगी निधीतूनही दुष्काळ निवारणासाठी निधी दिला. त्यांनी तात्पुरती मदत केली. त्यापेक्षा अधिक दीर्घकालीन उपययोजना केल्या. दुष्काळ निवारणासाठी `Famine Code' चे व्यवस्थित आकलन केले. त्यात काही सुधारणा केल्या. महाराज अशा प्रकारे मोठ्या संकटावर मात करत. चरित्रकार शेती सुधारणेबाबत मुळातून केलेल्या सुधारणा देतात.

फाटक यांनी दुष्काळातील एक हृद्यद्रावक प्रसंग दिला आहे. ''महाराज व खासेराव रोज सकाळी सातच्या सुमारास न्याहारी वगैरे उरकून घोड्यावरून बाहेर पडत ते बारा - एक वाजेपावतो सारखे हिंडत. मग मुक्कामावर आल्यावर आंघोळ, जेवण उरकत. एक दिवसी रस्त्याने ठिकठिकाणी पडलेल्या प्रेतामधून मार्ग काढीत थकून गेल्यावर दोघेही दोन प्रहरी स्नान -

भोजनासाठी तंबूवर परतले. मेलेल्या माणसांचे सापळे पाहून खासेरावांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. महाराजांची वृत्ती सहज भावनाविवश होणारी नव्हती." (फाटक, पृ. ३७८) अशी परिस्थिती असताना महाराजांनी स्वतः लक्ष घालून सर्व उपाययोजना केल्या. काही चरित्रकरांनी हा दुष्काळ आणि महाराजांनी केलेल्या उपाययोजना जवळून पहिल्या. त्या कारणाने त्यांनी दुष्काळाचे संकट घालवण्यासाठी महाराजांनी कसे कष्ट घेतले. उपाययोजना केल्या. याचे घटना - प्रसंग देतात.

शेतीसाठी अनेक सुधारणा केल्या. तरीही त्यांना त्या कमी वाटत होत्या. तशी कबुली त्यांनी आपल्या भाषणांतून दिली. ''माझ्या राज्यातील शेतकरी वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी आज पंचवीस वर्षे झाली. नानातऱ्हचे प्रयत्न मी करून पहिले आहेत. जमिनीच्या साऱ्याची आकारणी अधिक सारासारविचाराने केली. जुन्या कायद्यांना सोपे, सरळ रूप देऊन ते अधिक लोकोपयोगी व शेतकरी लोकांची हमखास प्रगती साधतील असे कायदेही केले. शेतीच्या कामी उपयोगी पडतील अशा सडका बांधल्या व रेल्वे सुरू केल्या आणि जरूर तर पाटाचे पाणी शेताला मिळावे म्हणून जिथे जिथे तलाव बांधणे शक्य होते, तिथे तिथे ते बांधले गेले आहेत व अजूनही बांधले जात आहेत. मोफत शिक्षणाची सोय सर्व गावांतून करून दिली आणि ग्रामवाचनालये सुरू केली. शेती व व्यापार यांच्याकरता स्वतंत्र खातीच काढून दिली आहेत आणि व्यापारविषयक परिस्थिती संपूर्ण रीतीने पाहणीदेखील करून घेतली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जग्रस्ततेचा प्रश्न काही तज्ज्ञ लोकांकडे सोडविण्यास दिला व त्यांनी नुकत्याच केलेल्या सूचनांचा मी काळजीपूर्वक विचार करीत आहे. हे सर्व प्रयन्त म्हणजे शेतकऱ्यांच्या सुधारणेचा फक्त श्रीगणेशा आहे."[१२] महाराजांचा दिखाऊ सुधारणा करण्यापेक्षा दीर्घकालीन आणि परिणामकारक सुधारणा करण्यावर भर होता. आणि या सुधारणा करून महाराज समाधानी नव्हते. आणखी कित्येक सुधारणा करू पाहत होते. याचा प्रत्यय वरील भाषणातून येतो.

महाराजांनी शेती सुधारण्यासाठी प्रयत्न तर केलेच, पण शेतीपूरक उद्योगाच्या वृद्धीसाठी जाणीपूर्वक लक्ष दिल्याचे चरित्रकार निवेदन करतात. दाते यांनी बडोदागिरणी, साखरेचा कारखाना, शेतकी बँक, लोकोपयोगी कारखान्यास मदत व उत्तेजन, खनिज द्रव्याचा शोध अशा विविध उद्योगांच्या वृद्धीसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती देतात. दाते यांनी बडोदा संस्थानात उद्योगधंदयाची प्रगती म्हणावी अशी नाही असे स्पष्ट करतात. तरीही किती आणि कोणते उद्योग उभारले ते उदाहरणासह देतात. आयात निर्यात मालावरील जकात कमी केली, उद्योगांना पाणी पुरवठ्यात सवलती दिल्या. वेगवेगळ्या उद्योगासाठी अनेक तज्ज्ञ बोलावले. तर बडोदा संस्थानात त्यावेळी रंग देण्याचा कारखाना, कापड गिरणी, मंगलोरी कौले, रासायनिक कारखाने, चामडे बनविण्याचा कारखाना, साखर कारखाने, विटा, साबू, तेल यांचे कारखाने आहेत. या कारखानांमुळे आर्थिक प्रगती होण्यास मदत होत होती. चरित्रकरांनी महाराजांच्या प्रगतीशील सुधारणाची माहिती देताना कोणकोणत्या सुधारणा कशा हितावह ठरल्या याचे विवेचन करतात.

सुधारणा करताना स्वदेशातील प्रजेला कशा उपयोगी ठरतील याबाबत ते नेहमी विचार करत. दाते यांनी महाराजांचे स्वदेश प्रेम ओळखून त्याची नोंद केली. `Swadeshi is our last

chance' हे महाराजांचे महत्त्वाचे विचार देतात. उद्योगांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करताना स्वदेशातील उद्योगधंदे वाढले पाहिजेत आणि देशी मालाचे उत्पादन वाढले पाहिजे ही दूरदृष्टी ठेवली होती. दाते यांनी याची अचूक दखल घेतली आहे.

एखाद्या राष्ट्राची उन्नती पहायची असेल तर त्या राष्ट्राचे साहित्य पाहावे असे म्हणतात. सयाजीराव महाराजांनी देशी भाषेतील साहित्य वृद्धीसाठी अपार प्रयत्न केले. महाराजांनी ग्रंथ निर्मितीसाठी कशी मदत केली हे गोत्री यांनी ग्रंथांच्या नावासहित सांगतात. ''सूपशास्त्र, संगीत शास्त्र, क्रीडाशास्त्र, इतिहास वगैरे अनेक विषयांवर हजारो रुपये खर्च करून कित्येक विद्वान ग्रहस्थाकडून अनेक पुस्तके लिहविली आहेत. व ती 'राष्ट्रकथामाला', 'महाराष्ट्र ग्रंथमाला', 'सयाजी ज्ञानमंजुषा', 'क्रीडामाला' वगैरे अनेकरुपाने प्रचलित झाली आहेत; तसेच विद्वान व होतकरू ग्रंथकारस आश्रय व उत्तेजन देऊन त्यांचे करवी पुष्कळ उत्तम पुस्तके लोकसमुहापुढे आणविली आहेत; व आणखी आणवीत आहेत.'' (गोत्री, पृ. १३३). राष्ट्र प्रगत, विचारी व्हायचे असेल तर साहित्याची निर्मिती वाढली पाहिजे हे महाराजांचे धोरण कायम होते. महाराजांनी साहित्य निर्मितीसाठी आर्थिक मदत करत होते.

दाते हे त्या काळातील प्रमुख साहित्यिक होते. दाते यांनी साहित्यनिर्मितीसाठी महाराजांच्या आर्थिक लाभाचा फायदा घेतला होता. त्यांनी तयार केलेल्या शब्दकोशांच्या अनेक प्रती महाराजांनी विकत घेतल्या होत्या. रोख मदतही केली होती. त्यामुळे या क्षेत्रातील मदतीबद्दल दाते माहितीगार होते. वरील ग्रंथमालांचा उल्लेख करून त्या अंतर्गत तिनशे ग्रंथांची निर्मिती झाल्याचे सांगतात. देशी भाषा वाढण्यासाठी महाराजांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल म्हणतात, देशी भाषांना परकीय भाषांचे जे ग्रहण लागले आहे ते सुटण्यासाठी महाराजांनी विशेष प्रयत्न केले आहेत. 'श्रीसयाजीशासन शब्दकल्पतरू' ने परकीय भाषेतील पारिभाषिक शब्दांचे देशी भाषेवरील आलेले दडपण कमी होऊन आपले सर्व व्यवहार आपल्या भाषेत करणे सुकर झाले आहे. (दाते, पृ. २२८) या व्यतिरिक्त महाराजांनी कायद्यातील पारिभाषिक शब्दांचा कोश एका मंडळामार्फत तयार करून घेतला. पुण्याच्या शब्दकोश मंडळास त्यांनी उदारहस्ते मदत केली.

महाराजांनी अनेक साहित्यिकांना राजाश्रय दिला. ''तसेच त्यांनी सयाजीपदक व वर्षासन देऊन कंटावाला, चिंतमणराव वैद्य, विठ्ठल रामजी शिंदे वगैरेंचा केला आहे व कवी चंद्रशेखर यांची राजकवी म्हणून नेमणूक करून त्यांस मासिक बिदागी दिली आहे.'' (दाते, पृ. २२९) साहित्यिकांचा मान - सन्मान करणे म्हणजे एक प्रकारे साहित्याला प्रोत्साहन देणे होय. महाराज विद्याभिलासी होते. अनेक देशांचे भ्रमण केले होते. जगातील उच्च दर्जाचे साहित्य वाचले होते. त्यामुळे आपल्या राज्यातील जनतेनेही याचा लाभ घ्यावा अशी महाराजांची धारणा असे. त्याबाबत दाते म्हणतात, ''महाराजांचा जीवन हेतू आपल्या प्रजेस सर्वांगीण शिक्षण देणे व उच्च साहित्योपार्जन करणे हा होय.'' (दाते, पृ. २२९) दाते यांनी यासंबंधी अचूक मूल्यमापनात्मक विधान केले आहे.

सयाजीराव महाराजांच्या सेवेत असताना रियासतकार सरदेसाई यांनी लिखाणाला प्रारंभ केला. आपल्या आठवणीत त्याचा उल्लेख करतात. ते म्हणतात, ''मी रियासतकार म्हणून

मिरवितो त्याचे श्रेय मुख्यतः त्या महाराजांस आहे.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३५३) महाराजांमुळे आपणाला लेखनाची कशी सवय लागत गेली याबाबत त्यांनी 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्रात माहिती देतात. आपण लिहित गेलो यापाठीमागे महाराजांचा हातभार मोठा होता. हे प्रांजळपणे कबूल करतात.

महाराजांना वाईच्या प्राज्ञ पाठशाळेमध्ये धर्मकोश निर्मिती होणार असल्याचे पत्रकाद्वारे कळविण्यात आले. महाराजांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना भेटीसाठी बोलावून धर्मकोशाची इत्यंभूत माहिती घेतली. आणि नंतर मदत केली. महाराजांनी धर्मकोशास सर्व बाबींची पडताळणी करून मदत केल्याचे फाटक सांगतात. सयाजीराव महाराज हे फक्त बोलके सुधारक नव्हते. तर कर्ते सुधारक होते. ते ज्या सुधारणेविषयी मत व्यक्त करत, त्यांना हमखास मदत करत. साहित्यासारख्या विभागाला भरीव मदत केली होती. आदर्श पिढीनिर्मितीसाठी साहित्य आवश्यक आहे. याची महाराजांना कल्पना होती.

पाठीमागे म्हटल्याप्रमाणे दाते सयाजीराव महाराजांच्या काळातील उच्च दर्जाचे साहित्यिक होते. त्यांनी साहित्य क्षेत्राला केलेली मदत जवळून पहिली होती. म्हणून साहित्यविषयक महाराजांचा दृष्टीकोन कसा होता याबाबत अचूक मूल्यमापन करत भाष्य करतात. ''वीरपुरुष हा सर्वच ठिकाणी वीर असतो. ही शेक्सपिअरची उक्ती महाराजांस लागू पडते. असा आधुनिक विद्वनांचा, कवीजनांचा, लेखक व कादंबरीकारांचा पोशिंदा आहे हे जाणून, 'आधुनिक भोजराज' श्रीमन्महाराज सयाजीराव यांच्या आजवरच्या कामगिरीचा कळस म्हणूनच की काय, त्यांच्या वयाच्या ७०व्या वर्षी अखिल महाराष्ट्र जनतेने त्यांना साहित्य परिषदेचे अध्यक्षस्थान दिले होते. महाराजांनी एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ या भरतवाक्याने परिषदेचा यथार्थ करून 'संहति कार्य साधिका' हा धडा सर्वत्रांस गिरविण्यास सांगितले आहे.'' (दाते, पृ. २२९) महाराज साहित्याकडे निकोप दृष्टीने पाहत याचे उत्तम उदाहरण दाते देतात.

महाराज स्वतः उच्च दर्जाचे साहित्य वाचत. त्यावर अनेक वेळा टिपणे तयार करत. वर उल्लेखल्याप्रमाणे नवीन साहित्य निर्मितीला मदत करत. ते साहित्य वाचून प्रजा सुजाण आणि सुसंस्कृत बनावी अशी महाराजांची इच्छा होती. महाराजांनी स्वतःही साहित्यनिर्मिती केली होती. चरित्रकारांच्या साहित्यविषयक विवेचनावरून महाराजांची साहित्यिक दृष्टी स्पष्ट होते.

'जनतेचे आरोग्य व्यवस्थित असेल तर त्यांची क्रयशक्ती वाढते.' (४ मार्च १९३८ रोजी नवसारी कॉटन ॲण्ड सिल्क मिल्सच्या उद्घाटन प्रसंगी केलेले भाषण) महाराज स्वतःही आरोग्य या बाबीला अत्यंत महत्त्व देत. त्यांच्या आरोग्याच्या सवयी पुढे पाहणार आहोत. महाराजांनी जनतेच्या आरोग्य सुधारावे म्हणून काय उपाययोजना केल्या याची चरित्रकारांनी काय नोंद घेतली ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. याबाबत गोत्री म्हणतात, ''बडोदे हे राजधानीचे शहर असून, येथील लोकसंख्या १०३७९० आहे. (सन १९०१ चा खानेसुमारी रिपोर्ट) एवढे मोठे लोकवस्तीचे शहरास, पूर्वी पाण्याचे असे दुर्भिक्ष होते. व त्यामुळे येथील हवापाणी व आरोग्य चांगले रहात नसे. ही मोठी उणीव भरून काढण्यासाठी बडोद्यापासून सुमारे १३

मैलावर आजवा गावी सुमारे चाळीस लक्ष रुपये खर्च करून 'श्रीसायाजी सरोवर' नावाचे मोठे विस्तीर्ण बांधकाम व तळे श्रीमंतांकडून बांधविण्यात आले आहे. व ह्याच तळ्याच्या पाण्याचा पुरवठा प्रस्तुत शहरात होत असतो." (गोत्री, पृ. ११६) शहराला पाणी पुरवठा करून महाराज थांबले नाहीत तर पाणी ही एक राष्ट्रीय संपती आहे असे महाराजांचे मत होते. त्याचा त्यांनी वेळोवेळी पुनःच्चार केला. गोत्री आणि दाते यांनी धर्मार्थ दवाखाने काढल्याचेही म्हटले आहे. मोफत औषधउपचार करणारे ९३ दवाखाने आहेत. आणि बडोदा शहरात 'लेडी डफरीन' हा मुख्य दवाखाना आहे. आणि त्या दवाखाण्यात प्रत्येक रोग्याकरिता वेगवेगळे वार्डस आहेत. त्या दवाखाण्यातून गरीब व व्याधीग्रस्त लोकांस फुकट औषधे देण्याची व्यवस्था केली होती. या मोफत दवाखाण्यावर दरवर्षी सुमारे तीन लाख रुपये खर्च करण्यात येत होता. ज्यावेळी बडोदा संस्थानात प्लेगची साथ आली त्यावेळी आणि दुष्काळात सुद्धा त्यांनी स्वतः संस्थानातल्या सर्व भागात दौरे करत जनतेला मदत केली. त्यामुळे कमीत कमी लोकांचा मृत्यू झाला. हे महाराजांचे जनतेप्रती असणारे प्रेम चरित्रकार गोत्री, दाते आणि दांडेकर यांनी अचूक नोंदविले आहे.

प्रजेच्या आरोग्यासाठी महाराज किती जागरुक होते याची अनेक उदाहरणे चरित्रकार दाते यांनी दिली आहेत. ''सन १८९१ साली आरोग्यखाते काढण्यात आले आणि त्याकडे ग्रामपंचायतींच्या कचेऱ्या, देवी टोचणे, जन्ममृत्यूसंबंधी नोद, मॅजिक लॅटर्नच्या सहाय्याने व्याख्याने देणे, सिनेमा, प्रदर्शन यांच्या द्वारे शिशुसंगोपानाचे व आरोग्यसंबंधीचे प्रचारकार्य या बाबी सोपिवण्यात आल्या आहेत." (दाते, २०५) आरोग्यासंबंधी अनेक लहानसहान बाबी महाराजांच्या नजरेतून सुटत नव्हत्या. महाराजांना आरोग्याच्या काही बाबींत कायदे करावे लागले. दांडेकर यांनी 'वॅक्सिनेसन ॲक्ट' (सन १९१४) केल्याचे सांगतात. आपल्या प्रजेचे आरोग्य चांगले राहावे यासाठी महाराज काळजी घेत.

सयाजीराव महाराजांनी प्रजेच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी बडोद्यात अनेक वास्तू बांधल्या. त्या काळात या वास्तूंनी बडोदा शहराचे सौंदर्य वाढविले होते. बडोदा शहरात आजही या वास्तू दिमाखाने उभ्या आहेत. आणि एक - दीड शतकानंतरही लोकांच्या उपयोगाला येत आहेत. गोत्री यांनी या वास्तूंची सरकारोपयोगी आणि लोकोपयोगी अशा दोन भागात वर्गीकरण करत नावे दिली आहेत. या वास्तूंच्या यादीवरून वास्तूंची उपयोगीतता लक्षात येईल. ''लक्ष्मीविलास राजमहाल, मकरपुरा येथील नवीन राजवाडा, नजरबागेतील नवीन राजवाडा, मिलिटरी ऑफिस, चिमणाबाई न्याय मंदिर, कडी प्रांतातील मुख्य ऑफिसे, राहण्यासाठी म्हैसणा येथे बांधलेले भव्य व सुंदर 'गव्हर्मेंट हाऊस', आजवा व मरोळी येथील डाक बंगले, उमराठ येथील राजवाडा व क्यांप, दिवणाची व इतर मुख्य कचेऱ्याकरिता बांधलेलेल्या इमारती, या सरकारोपयोगी इमारती आहेत. तर बडोदा कॉलेज, बडोदा हायस्कूल, बडोदा फिमेल हायस्कूल, सरदार स्कूल, डफरीन इस्पितळ, चिमणाबाई टावर, आजवा वाटरवर्क्स, पब्लिक गार्डन, जोजवा वाटर वर्क्स, कादरपुरचे तळे, नवसारी, पादरा व बडोदे येथील मार्केट या लोकोपयोगी वास्तूंचा समावेश होतो." (गोत्री, पृ. ११७) गोत्री यांनी इ. स. १९०५ साली हे चरित्र लिहिले. राज्यकारभार हाती घेतल्यापासून

जेमतेम फक्त पंचवीस वर्षात या दिमाखदार वास्तू उभ्या केल्या. यावरून महाराजांच्या कलात्मक आणि आधुनिक विकासाची ओळख होते. त्यानंतरही महाराजांनी हा क्रम असाच चालू ठेवला. त्यामध्ये किर्तीमंदिर आणि कलाभुवन ही बांधकामे उल्लेखनीय आहेत.

बडोद्यात बांधलेल्या अनेक इमारती ह्या शिल्पकलेच्या अतिसुंदर नमुने आहेत. दांडेकर याची अचूक नोंद घेतात, ''बडोद्यात बरीच प्रेक्षणीय स्थळे आहेत. लक्ष्मीविलास राजवाडा सन १८९० साली बांधून पूर्ण झाला. हा राजवाडा इंडो - सारसिनिक पद्धतीप्रमाणे बांधण्यात आला आहे. याची लांबी ५१२ फुट व रुंदी २०० फुट आहे. बडोदा कॉलेजचा घुमट विजापूरच्या गोलघुमटाप्रमाणे बांधण्यात आला आहे. हिंदुस्थानात विजापूर सोडल्यास बडोदा कॉलेजसारखा भव्य व सुंदर घुमट नाही असे तज्ज्ञ म्हणतात. मकरपुरा राजवाडा, नझरबाग राजवाडा, नवीन कलाभवन, सेक्रेटरियेट बिल्डिंग स्टेट, जनरल हॉस्पिटल, हायस्कूल, म्युझियम व पिक्चर गॅलरी, खंडेराव मार्केट ही सर्व शिल्पकलेच्या दृष्टीने उत्तम ठरलेली आहेत.'' (दांडेकर, पृ. ३१८) रियासतकार सरदेसाई, फाटक यांनी महाराजांच्या या वास्तूंची दखल घेतली नसली तरी इतर निवेदनात याचे प्रतिबिंब दिसते. महाराजांना आपले राज्य आधुनिक सोयीसुविधांनी स्वयंपूर्ण असावे असे वाटत होते. त्यानुसारच त्यांनी या इमारती आकर्षक आणि विविध शिल्पकलेच्या विविध नमुन्यांनी परिपूर्ण अशा बांधल्या. इंग्रजांच्या वास्तूंची बडोद्यातील वास्तूंशी तुलना करता महाराज सरस होते. इंग्रजांना हेवा वाटेल अशा सुंदर इमारती त्यांनी बांधल्या होत्या.

६.

महाराजांची विचारमूल्ये चिरंजीव आहेत. आजही त्यातील कित्येक विचारांचा व्यवहारात उपयोग होतो. चरित्रकारांनी महाराजांचा हा उच्च वारसा चरित्रांतून वाचकांसमोर मांडला आहे. त्यांचे उच्च विचार महाराजांनी लिहिलेल्या लेखांतून, वेगवेगळ्या ग्रंथातून, विविध प्रसंगी केलेल्या विद्वतापूर्ण भाषणातून समजतात.

गोत्री यांनी चरित्राचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागात चरित्र आहे. तर दुसऱ्या भागात सयाजीराव महाराज यांनी स्वतः लिहिलेले लेख, भाषणे आणि चिमणाबाई यांच्या भाषणांचा समावेश आहे. चरित्रात लेख भाषणे समाविष्ट केल्याने चरित्राची सत्यता आणखी वाढली जाते. ही भाषणे महाराजांनी महत्त्वाच्या प्रसंगी दिली आहेत. त्या भाषणातून एखादा विषय अभिव्यक्त करण्याची महाराजांची पद्धत समजते. महाराज आपल्या भाषणातून छोटी छोटी उदाहरणे देतात. आपले विचार समोर बसलेल्यांच्या गळी उतरवण्याची महाराजांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. आत्ता आणि पुढे अनेक वर्ष सयाजीराव महाराजांच्या विचारांचा वारसा उपयोगी पडणारा आहे. त्याचे पुन्हा पुन्हा विश्लेषण, संश्लेषण घडणारे आहे. त्यातून अनेक तथ्ये बाहेर पडणारी आहेत. हा वैचारीक वारसा महाराजांच्या लिखाणातून, भाषणातूनही उपलब्ध आहे. म्हणून गोत्री यांनी लेख, भाषणे दिली असावीत. महाराजांच्या विचारातील प्रगल्भता, विचार करण्याची पद्धत यांमुळे भाषणे आणि लेख महत्त्वाचे ठरतात. गोत्री यांनी तो वारसा नजरेआड केला नाही. हेही महत्त्वाचे आहे. 'हिंदुस्थानातील राजपुत्रांचे शिक्षण' या लेखात त्यांनी हिंदुस्थानातील राजपुत्रांच्या उत्तम शिक्षणामुळे देशाची प्रगती कशी होईल याचे

विवेचन केले आहे. त्यांनी या लेखात कुठेही 'संस्थानाची प्रगती' असा उल्लेख केला नाही. यावरून महाराजांच्या ध्यानीमनी एकसंघराज्य ही कल्पना पूर्वीपासूनच होती असे समजते. त्याचा उल्लेख त्यांनी स्पष्टपणे पुढे आपल्या भाषणातून केला आहे. राजपुत्रांची शिक्षणव्यवस्था सुधारल्यानंतर कशी सुधारणा होईल याबाबत ते लिहितात, 'अशा प्रकारे तयार झालेले काही राजपुत्र आपले राज्यात नवीन ज्ञानाचे योगाने होत असलेल्या सुधारणा वृद्धिंगत करतील. असे झाले म्हणजे त्यास हल्लीच्या पद्धतीत असलेला उणेपणा समजण्यात येऊन त्यातील चुकीची दुरुस्ती करून देशाची सुधारणा करण्याकडे बरेच लक्ष देण्याची जरुरी वाटेल. व या योगाने देशाची एकदम उन्नती होण्यास वेळ लागणार नाही.' शिक्षण निर्भेळ मिळावे आणि मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग राष्ट्रउन्नती करीता करणे गरजेचे आहे. अशी महाराजांची धारणा होती. फक्त राजपुत्राच्या शिक्षणातून राष्ट्र उद्धार होईल एवढी भाबडी आशा न बाळगता 'हिंदुस्थानातील मागासलेल्या वर्गाचे शिक्षण' (हा लेख प्रथम आवृत्तीत समाविष्ट होता.) या लेखातसुद्धा हीच अपेक्षा व्यक्त करतात, 'शिक्षणाभावामुळे मनुष्याचे सांपत्तिक नुकसान होते. तो परिस्थितीचा गुलाम बनतो. यामुळे राष्ट्राचेही अतोनात नुकसान होते. हा काळ राष्ट्रांराष्ट्रांतील कठीण व प्रचंड चढाओढीचा असल्यामुळे ज्या देशातील सर्व लोक शिक्षित तो देश या शर्यतीत पुढे जाणार व अशिक्षित लोकांचा देश पाठीमागे राहणार.' शिक्षणाचे महत्त्व सांगताना सयाजीराव महाराज देशादेशाची तुलना करतात, अमेरिकेला इंग्लडपेक्षा प्राथमिक साधने कमी होती व जर्मनीपेक्षा शास्त्रीयज्ञानही कमी आहे, पण सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रसारामुळे या दोन्ही देशाला व्यापारी चढाओढीत मागे टाकण्याला तो देश समर्थ झाला आहे.' पाश्चात्य देशातील शिक्षणामुळे झालेली प्रगती महाराजांच्या नजरेतून ज्याप्रकारे सुटत नाही त्याचप्रकारे हिंदुस्थानातील शिक्षणाची दुरावस्थाही सुटत नाही. 'हिंदुस्थानच्या काष्ठवत स्थितीकडे पहा! मानवीय साधनांचा दोषार्ह असा व्यर्थ नाश होत आहे व याचमुळे सार्वत्रिक शिक्षणाचा मुद्दा दृढ होतो. ज्ञान किंवा यश यांच्या उच्च शिखरावर सर्वांस आरुढ होता यावयाचे नाही; पण ज्ञान व बुद्धिमत्ता यांचे सामान्य प्रमाण जितके वाढेल तितकी देशाची सामवायिक शक्तिही वाढेल.' देशाची खरी उन्नती आर्थिक विकासात नाही तर शिक्षणातून मनुष्यबळ सक्षम होण्यात आहे. आणि ते सर्वदूर शिक्षणामुळेच होईल यावर महाराजांचा ठाम विश्वास आहे.

महाराजांचा शिक्षणाबद्दल असणारा दृष्टीकोन अनेकांच्या लिखाणातून पहावयास मिळतो. महात्मा फुले यांना महाराजांकडून खूप अपेक्षा होत्या. महाराजांच्या सुधारणा पाहून त्यांनी त्यांच्यावरती पोवाडा रचला होता, पोवाडारुपी पत्रात ते शिक्षणाबद्दल त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतात,

'अक्षरशून्य शुद्रदिका काहीच कळेना
अशा मुक्याचे बाप आता तुमीच का व्हाना'[१३]

महाराजांच्या शिक्षणाची आस पाहून इतर सुधारकानांही महाराजांविषयी आत्मयीता वाटत होती. त्यांच्याकडून अपेक्षा वाढल्या होत्या. त्याप्रमाणे सयाजीराव महाराजांनी उन्नत समाजाबरोबर सामाजिक अनिष्ट प्रथांनी दबलेल्या, मागास जातीतील मुलांच्या शिक्षणाची सोय केली. सयाजीराव

महाराजांच्या राजपुत्राच्या शिक्षणाचा आणि मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणाच्या संदर्भातील दोन्ही लेखांचा चरित्रात (प्रथम आवृत्तीत) समावेश केल्यामुळे शिक्षणाबद्दलचे महाराजांचे असणारे आधुनिकवादी स्पष्ट मत समजते. केवळ शिक्षणाबद्दल असणारे मत व्यक्त करून महाराज थांबत नाहीत तर पुढील काळात त्यादृष्टीने संस्थानात केलेल्या उपाययोजनाही सांगतात, आणि त्या उपयोजनाही करतात. त्याची अंमलबजावणी करतात. अमरेळी प्रातांत प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत सुरू केले. सयाजीराव महाराज फक्त बोलणारे नव्हे तर मनातील विचार कृतीद्वारे प्रत्यक्षात उतरवणारे कृतीपारायण कर्ते पुरुष होते.

महाराजांनी लिहिलेल्या 'माझा युरोप व हिंदुस्थान देशांतील कार्यक्रम व दिनचर्या' या लेखाचा समावेश आहे. वस्तुतः या लेखाच्या शीर्षकावरून महाराजांच्या दिनक्रमाबाद्दल माहिती असावी असे वाटते. परंतु महाराजांनी या लेखात संस्थानातील राज्यकारभाची सुधारणा कशी केली आणि स्वतः महाराज त्यासाठी किती कष्ट घेतात हे स्पष्ट करतात. या लेखाच्या प्रारंभीच सयाजीराव महाराजांनी आपण आजही अध्ययन करतो. ते लिहितात, ''व्यायाम करून परत आल्यावर मी तत्त्वज्ञानासारखे विषय वाचतो व आमच्या तत्त्वज्ञान पद्धतींशी ग्रीस देशातील तत्त्वज्ञानपद्धतीशी तुलना करतो. तसेच इंग्लड, हिंदुस्थान, ग्रीस व रोम या देशाचे इतिहास वाचतो, गीबनकृत इतिहास मला फार आवडतो. या ग्रंथावर मी एक लहानसा निबंध लिहिला आहे. ब्राइची डीमॉक्रसी (लोकसत्ता), टाकव्हील, मिल व फॅासेट यांचे ग्रंथ हेही मी वाचतो. हर्बर्ट स्पेन्सरच्या शिक्षणमीमांसेतील विचारसरणी मला अभिमत आहे. परंतु त्याचे तत्त्वशास्त्रावरील ग्रंथ मी वाचीत नाही. मी शेक्सपिअरचा लक्षपूर्वक अभ्यास केला आहे व बेन्थमचे कायदेशास्त्र व मेनचा प्राचीन कायदा ही पुस्तके मला फारच आवडतात." (गोत्री, पृ. १५७) फक्त हाती आलेल्या सत्तेच्या उपभोग न घेता त्यात सुधारणा करण्याची मनीषा बाळगून आधुनिकता आणणे ही महाराजांची अभ्यासामागची भूमिका होती. विकास करताना तो भक्कम पायावर उभा करणे जेणेकरून भविष्यात तिचा कळस ताठ राहिला पाहिजे ही भूमिका महाराज विसरत नव्हते.

हिंदू धर्म आणि त्यातील अनिष्ठ प्रथा, त्यात करावयाचा सुधारणा या अनुषंगाने महाराज आपले स्पष्ट मत देतात. ते म्हणतात, 'हिंदुस्थानात एकत्र जेवण्याचा प्रघात फार दक्षतेने सुरू केला पाहिजे, म्हणजे या प्रघाताला पूर्ण यश येण्याची खात्री आहे.' महाराज हिंदू धर्माकडे डोळसपणे पाहत होते. त्यात आवश्यक सुधारणा झाल्या पाहिजेत असे म्हणत. महाराज आपली दृष्टी विश्वव्यापक बनवू पावत होते. राज्यकारभाराच्या सुधारणा करताना कोणती भूमिका घेतली, काय उपाययोजना केल्या हे अवगत करून घेण्यासाठी हा लेख मुळातून वाचणे सोयीस्कर ठरेल.

गोत्री यांच्या पहिल्या आवृत्तीत या तीन लेखानंतर महाराजांच्या विविध प्रसंगी केलेल्या भाषणांचा समावेश आहे. पहिली तीन भाषणे विविध शिक्षण संस्थामध्ये केलेली आहेत. त्या भाषाणामधून शिक्षणविषयक विचार मांडताना त्यांनी फक्त हिंदुस्थानातील शिक्षण पद्धतीचे दोष काढले नाहीत, तर जगाच्या तुलनेत आपण कसे सुधारले पाहिजे, शिक्षण पद्धतीत बदल

कसे केले पाहिजे याचा परामर्श घेतला आहे. अलमेरा येथील संस्कृतपाठशाळेत केलेल्या भाषणात म्हणतात, 'कोणत्याही विषयाचे अध्ययन करणे म्हणजे केवळ त्याची उपस्थिती असणे नव्हे; तो विषय पूर्णपणे समजला पाहिजे. त्या प्रमाणे एक विषयाला अनुषंगिक जे इतर विषय असतील त्यांची माहिती असली पाहिजे, नाहीतर मोठे प्रमाद घडण्याचा संभव आहे. सबब हल्लीच्या पश्चिमात्य उदात शिक्षणपद्धतीप्रमाणे एखादे विषयाचे ज्ञान उत्तम असून इतर अनुषंगिक विषयाचे साधारण ज्ञान संपादन करणे अवश्य आहे. वैय्याकरणीयास व्यत्पत्तीचे ज्ञान नसावे किंवा नैय्यायिकास व्याकरणाचा गंधही नसावा ही शिक्षणपद्धती बरोबर आहे असे आम्हांस वाटत नाही.' महाराजांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, शिक्षणविषक महाराजांचे विचार समाजातील शेवटच्या घटकाला समविष्ट करणारे आहेत. फक्त सद्यस्थितीतील शिक्षणाचा विचार करत नाहीत, तर येणाऱ्या काळातील शिक्षण कसे असावे याबद्दल म्हणतात, 'हल्लीच्या कालमानाप्रमाणे केवळ संस्कृत भाषेचे अध्ययन करून निभावणूक होईल असे नाही. त्याचबरोबर इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे अगदी जरुरीचे आहे. कारण सरकार दरबारात सर्व पत्रव्यवहार या भाषेत होत असतो. शिवाय सर्व शास्त्रीय विषयांवर कलाकौशल्याचे संबंधाने व व्यापाराधंद्याचे बाबतीत या भाषेत ग्रंथ विपुल आहेत' पहिल्या तीन भाषणातून सयाजीराव महाराज हिंदुस्थानातील शिक्षणविषयक, शिक्षणाची दिशा बदलणारे क्रांतिकारक विचार मांडतात.

सयाजीराव महाराजांच्या शिक्षणसुधारणाप्रमाणे सामाजिक विषयालाही वरचे स्थान होते. 'श्रीमात्स्वामी हंसस्वरूप यांचे व्याख्यानास दिलेले उत्तर' या भाषणातून महाराज खरोखरच सामाजिक पुनर्स्थापना करण्यासाठी किती अनुकूल होते हे स्पष्ट होते. ते म्हणतात, ''आपल्या देशाची पूर्वीची परिस्थिती ज्याअर्थी बदलेली आहे, त्याअर्थी आपणास आपल्या धर्माचे स्वरूप कायम राखण्याकरिता कालमानाप्रमाणे काही फेरफार केले पाहिजेत. धर्मवृक्षाची पूर्ण वाढ होण्यास राजाश्रयाची अनुकूलता लागते, व यामुळे क्वचित नवीन कायदे करण्याचेही प्रसंग येतात; परंतु हे कायदे असले म्हणजे तेवढ्याने भागते असे नाही. त्याचा खरा फायदा करून घेण्यास वस्तुतः लोकांकडून तशा प्रकारचे वर्तन होत गेले पाहिजे. यापासून खरोखरच अमुक एक फायदा आहे. असे लोकास पूर्णपणे समजले म्हणजे स्वाभाविक या नवीन दिशेने लोक प्रयत्न करू लागतात मनुष्य जसजसा शहाणा व अनुभवी होत जातो तसतसा तो मानाप्रमाणे आपली स्थिती सुधारण्याचे कामी उद्युक्त होतो; व स्वतःची प्रगती योग्य मार्गाकडे होत आहे की नाही हेही पहात असतो.'' (गोत्री, पृ. १५२) महाराज जुन्या चालीरीती चालू ठेवताना त्या चिकित्सकपणे पारखून, निरखून पुढे चालू ठेवायला पाहिजेत अशी धारणा ठेवत. धर्मातील अंधश्रद्धा घातक आहेत असे मत नेहमी व्यक्त करत. धर्मातील वाईट बाबी त्यांनी ओळखल्या होत्या आणि त्यांपासून आपण दूर राहिले पाहिजे असा सल्ला ते नेहमी देत. फक्त धर्मावर श्रद्धा असून चालणार नाही तर वेळप्रसंगी ती आचरणात आणली पाहिजे. आपण एकाच धर्मात राहून जातीपाती पाळतो, अन्य जातीतील लोक दुःखी कष्टी असताना मदत न करणे धर्मबाह्य असे महाराजांना वाटत होते. धर्मातील सुधारणा फक्त बळाच्या किंवा कायद्याच्या जोरावर शक्य

नाहीत हे महाराज ओळखून होते. त्यासाठी जनमत अनुकूल करत त्या सुधारणा केल्या पाहिजेत असे महाराज म्हणत.

गोत्री यांनी चरित्राच्या पहिल्या आवृत्तीत 'महाराजांच्या वाढदिवसानिमित्त दरबारात केलेले भाषण', 'निलगीरीहून परत येताना केलेले भाषण', 'मद्रास येथील पंचाईअप्पा कॉलेजकडून मानपत्र मिळाले त्यावेळी केलेले विद्वताप्रचूर भाषण', 'अजुमन इस्लाम सभेकडून मानपत्र मिळाले त्यावेळी केलेले भाषण', मुक्या जनावरांची संस्था पाहण्यासाठी गेल्यावर केलेले भाषण', 'इ. स. १९०२ साली प्रदर्शन खुले करण्याप्रसंगी केलेले विद्वतापूर्ण दीर्घ भाषण', 'धर्म शिक्षणाची जरुरी या विषयावर केलेले भाषण', 'द्वारकानिवासी यांच्याडून मिळालेल्या मानपत्रास उत्तर', 'पोलोटूर्नामेंट या खेळाच्या प्रसंगी केलेले भाषण', 'युवराज फत्तेसिंहराव याच्या विवाह प्रसंगी केलेले भाषण', 'मुबारक दरबार प्रसंगी केलेले भाषण', आणि 'युरोपियन मंडळीसमोर केलेले भाषण' अशा विविध भाषणांचा समावेश आहे. महाराज आपल्या भाषणाची शैली जाणीवपूर्वक सुधारत होते. सर्व भाषणांतून सोपी सोपी उदाहरणे देऊन आपल्या मताची, विचाराची छाप श्रोत्यांवर सोडतात. छोटी छोटी वाक्ये, सरळ विचार मांडण्याची पद्धत दिसते. या सर्व भाषणांतून महाराजांच्या व्यक्तित्वाची चरित्रात राहिलेली कसर भरून निघते. गोत्री यांनी भाषणांची विचारपूर्वक निवड केली आहे.

गोत्री यांच्याप्रमाणे इतर चरित्रकारांनी महाराजांनी लिहिलेल्या लेखांचा, भाषणांचा समावेश चरित्रांत करत नाहीत. मात्र घटना- प्रसंगानुसार त्यांच्या विचारांचा उपयोग करत चरित्रे लिहिली आहेत. दाते महाराजांचे शिक्षणविषयक विचारपुष्पे देत महाराजांच्या शिक्षणविषयक सुधारणा नोंदवतात.

त्यांनी केलेल्या शिक्षणाच्या भौतिक सुधारणा देऊन हा भाग उरकणार नाही हे दाते जाणतात. त्यामुळे त्यांचे शिक्षणाविषयीचे विचार महत्त्वाचे वाटतात. दाते यांनी 'शिक्षणविषयक प्रगती' सांगताना महाराजांचे शिक्षणाविषयीचे मत उदधृत करतात, "Education is absolutely necessary for the realization of my abmbition and wishes and for success of my policy." (दाते, पृ. २२२) आपले राष्ट्र प्रगतीचे मिशन 'शिक्षण' आहे असे महाराज मत वारंवार प्रकट करतात. Education is the basis of all reforms and is the only way of solution from our present condition." (दाते, पृ. २२२) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शिक्षणात आहे. निरनिराळ्या ठिकाणी केलेल्या भाषणात शिक्षणाविषयीचे विचार सोप्या भाषेत मांडतात.

महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी अपार मेहनत घेतली. दाते यांनी याबद्दलचे महाराजांचे विचार नोंदविले आहेत. ''जर घरात सुशिक्षित स्त्री असेल तर ती ज्ञानाचा व गृहसौख्याचा उज्ज्वल प्रकाश घरात पाडण्यास समर्थ होईल; व आजूबाजूच्या लोकांच्या निर्दय व आपमतलबी कपट युक्त्यात अशिक्षित स्त्री जशी फसते तशी फसणार नाही.'' (दाते, पृ. २२६) ते स्त्री शिक्षणाविषयी पुढे म्हणतात, ''स्त्रियांना शिक्षणाचा लाभ न दिल्याने आपण आपल्या राष्ट्राची अर्धी संधी गमावीत आहोत. आपल्या मुलांना सुशिक्षित मातांचा लाभ देण्याचे नाकारीत

आहोत. आणि मतांच्या मानसिक शक्तीची वाढ खच्ची करून भावी पिढ्यांचे भयंकर नुकसान करीत आहोत. इतकेच नव्हे तर यामुळे आपल्या घरात दुही माजविण्याचा मदत करत असून जुने तेवढे उराशी बाळगून बसणारा असा एक अजिबात निराळा वर्ग तयार करीत आहोत." (दाते, पृ. २२७) स्त्रियांच्या उद्धारासाठी शिक्षणाची गंगा संस्थानात सुरू केली. ते शिक्षण स्त्रियांच्या उन्नतीसाठी होतेच पण त्याद्वारे सुजाण आणि राष्ट्र उन्नतीसाठी अभिप्रेत असणारी स्त्री त्यांना घडायची होती.

महाराजांनी विविध प्रसंगी विद्वतापूर्ण भाषणे दिली. चरित्रकारांनी या भाषणांचा समावेश चरित्रात केला आहे. दाते यांनी मात्र उपसंहार या अखेरच्या प्रकरणात महाराजांच्या भाषणांवर भाष्य केले आहे. दाते म्हणतात, ''महाराजांची व्याख्याने म्हणजे अनेक दलांचे कमळ. अनेक विषयावरील महाराजांचे वेळोवेळी प्रकट झालेले विचार या कमळाच्या प्रत्येक पाकळी गणिक साठवलेले आहेत. एकएक पाकळी जरी घेतली तरी सुंदर व पूर्ण सुगंधयुक्त. मग संबंध कमळाचे रूप व गंध काय वर्णावा!" (दाते, पृ. २४६) महाराजांची विचार मांडण्याची एक प्रकारची रीत होती. छोटी - छोटी उदाहरणे देत महाराज कठीण विषय समजवून सांगत. ऐकणाराचा वयोगट, प्रदेश, त्यांची समज, आणि त्यांना अभिप्रेत असणारा घटक ते आपल्या व्याख्यानातून समजून सांगत. आणि समोरच्यावर छाप सोडत. दाते महाराजांच्या व्याख्यानाचे सार नोंदवतात, ''महाराजांच्या व्याख्यानांचे सार १. विद्येची महती फार थोर आहे, २. उद्योगाचे श्रेष्ठत्व सर्वमान्य असावे, ३. उच्चनीच भावनांचा त्याग करावा. ४. प्रत्येकाने सुखदुःखाविषयी उदासीन होऊन कर्तव्यदक्ष असावे, ५. स्वार्थनिरपेक्षपणे कोणतेही कार्य करावे, या पाच तत्त्वात सामाविले आहे. त्यांचे विशाल वाचन, सर्वसंग्राहकता, बुद्धीची अनुभवजन्य परिपक्वता, निरनिराळ्या संस्कृतीचा तौलनिक अभ्यास व जबर व्यासंग वगैरे गोष्टींचे प्रतिबिंबच अशी ही व्याख्याने व भाषणे आहेत." (दाते, पृ. २४६) महाराजांनी कोणतेही भाषण हे विद्वतापूर्ण आणि व्यासंगपूर्ण आहे. महाराजांच्या भाषणांमधून प्रगल्भ विचार समजतात. चरित्रकारांनी त्याचा उपयोग चरित्रांत केला आहे.

महाराज आपले विचार भाषणांतून व्यक्त करत. ती भाषणे जास्तीत जास्त अचूक आणि दर्जेदार कशी होतील याकडे लक्ष देत. यासंबंधीची आठवण रियासतकार सरदेसाई देतात. ''अलीगड युनिव्हर्सिटीच्या समारंभास येण्याचे आमंत्रण त्यांना आले ते त्यांनी स्वीकारले. सकाळी नऊ वाजता मुक्कामावरून निघताना मला बोलावून ते म्हणाले, 'तुम्ही येणार का सभेला?' मी म्हटले, 'माझी इच्छा आहे. साधले तर येतो.' त्यावर ते म्हणाले, 'मी सांगतो तसे करा. डोक्यास पागोटे न घालता टोपी घाला आणि सभेत दूर एखाद्या कोपऱ्यात जाऊन बसा आणि माझ्या भाषणाचे निरीक्षण करून त्यातले बरेवाईट प्रकार मागाहून मला मुद्दाम सांगा. माझा आवाज दूरपर्यंत ऐकू जातो की नाही, माझे हावभाव बरोबर वठतात की नाही, भाषणात चुका वगैरे काय होतात या सर्व गोष्टी तुम्ही मला निःशंकपणे मागाहून कळवा. म्हणजे माझ्या चुका मला सुधारता येतील." (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३६१) सरदेसाई 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्रात महाराजांच्या व्याख्यानासंबंधी माहिती देतात, ''एखाद्या

समारंभास भाषण करावे लागे, तेंव्हा ते ते पुष्कळ वेळा वाचून मला अगोदर म्हणून दाखवीत. प्रत्यक्ष भाषणाचा विषय, मुद्दे किंवा मसुदा ते स्वतः ठरवीत किंवा तोंडी सांगून लिहवित." (माझी संसारयात्रा, सरदेसाई, पृ. ४९०) आपल्या व्यक्तिमत्त्वात वारंवार सुधारणा करावी असे वाटत होते. आपले विचार जाणीवपूर्वक सर्वांपर्यंत पोहोचावेत अशा महाराजांचा मानस असे. आपली विचारमूल्ये स्पष्ट करताना वरीलप्रमाणे काळजी घेत.

रियासतकार सरदेसाई यांनी महाराजांचे विविध विषयांवरील विचार दिले आहेत. त्यामध्ये हंसस्वरूपस्वामी या सनातनी वृत्तीच्या इसमाच्या व्याख्यानाला दिलेल्या उत्तराचा काही भाग देतात. गोत्री यांच्या चरित्रातील भागात हा भाग आल्याने पुन्हा इथे विचारात घेणे गरजेचे नाही. या व्याखानाच्या संबंधाने सरदेसाई म्हणतात, ''त्या दिवशी महाराज भाषण करतील ही अपेक्षा नव्हती. दहापाच मिनिटे बोलायला उठले तर चांगला दीडतासपावतो अस्खलित वाणीने उलटपक्ष अशा युक्तीवादाने त्यांनी इंग्रजीत मांडला की, स्वामीच्या व्याख्यानावर त्यांनी विरजण घातले आणि पाश्चात्य शास्त्रीय सुधारणा आपण स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. ही भूमिका पटवून दिली." (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ४०१) महाराजांनी आपले विचार दुसऱ्या पुढे मांडताना ते अधांतरी मांडत नसत. तर त्यासाठी भक्कम असा नैतिक आणि वैचारिक अधिष्ठान ठेवत.

रियासतकार सरदेसाई अनेक वेळा महाराजांच्या सल्ल्याने त्यांची भाषणे तयार करून देत. किंवा महाराजांनी सांगितलेले मुद्दे लिहून काढत. त्यामुळे महाराजांच्या आदर्श विचारांमध्ये सरदेसाई यांचा वाटा महत्त्वाचा होता. महाराज त्यामध्ये अनेक वेळा बदल करत. आपल्या विचारातून प्रबोधन करत. महाराज आपले विचार प्रजेपर्यंत कसे व्यवस्थित जातील याची काळजी घेत.

फाटक महाराजांच्या वैचारिक गोष्टींना चरित्रात स्थान देतात. महाराजांच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने अनेक संस्थांनी महाराजांचे सत्कार केले. त्यांचे अभिनंदन केले. अनेकांनी मानपत्रे दिली. पुण्याच्या नगरपालिकेनेही महाराजांना मानपत्र दिले. त्याला उत्तर देताना महाराजांनी विद्वतापूर्ण भाषण केले. त्या भाषणाचे सार फाटक यांनी चरित्रात नोंदविले आहेत. ''आपल्या राज्यातील सर्व वर्गाच्या लोकांशी मिळून मिसळून वागून जेणेकरून रयतेच्या सुखाची वृद्धी होईल अशा रीतीने आपल्या राज्यकारभाराचे धोरण ठेविले तर त्याच्या राज्यात सुधारणा जरूर होतील असे मला वाटते. लोकांमध्ये आत्मविश्वास वाढवून त्यांना कार्यक्षम बनवावे लागते. सुधारणा साधावयाची म्हणजे लोकांमध्ये ज्ञानप्रसार प्रथम केला पाहिजे." (फाटक, पृ. ५३३) महाराजांनी जनतेला ज्ञानाची आवश्यकता, रयतेचे आरोग्य, शारीरिक शिक्षण, ललितकलांच्या वाढीसाठी राजाश्राय, त्यामध्ये आवश्यक ते आधुनिकीकरण या बाबींचा उहापोह एखाद्या तत्वज्ञाप्रमाणे केला आहे. चरित्रकार महाराजांच्या विचारांना घटना-प्रसंगपरत्वे चरित्रांत स्थान देतात.

सयाजीराव महाराजांचे कार्य विस्तृत आहे. त्याचबरोबर त्यांचे विचार महत्त्वाचे आहेत. महाराजांचे विचारधन अतिशय समृद्ध आणि बहुआयामी आहे. पुढच्या अनेक पिढ्यांना पुरेल

इतका वैचारिक वारसा महाराजांच्या विचारात आहे. तो लिखित स्वरुपात उपलब्ध आहे. या विचारधनाच्या मोहात चरित्रकार पडले नाहीत. त्याची दाखल घेतली नाही असे नाही, परंतु विस्तृत आणि चिकित्सक मांडणी करण्याचा मोह टाळला आहे. महाराजांच्या चरित्रकारांनी या विचारला चरित्रात स्थान दिले आहे. परंतु ते एका ठराविक मर्यादेपर्यंत. म्हणजे महाराजांचे वैचारिक चरित्र लिहिण्याच्या भानगडीत पडले नाहीत. महाराजांच्या व्यक्तित्वाला चरित्रात प्राधान्य दिले आहे, चरित्रकारांनी 'कार्य आणि विचार'ची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. फक्त गोत्री यांनी चरित्राच्या दुसऱ्या भागात विचार लेखातून, भाषणातून दिले आहेत. इथेही विस्तृत आणि चिकित्सक मांडणी करण्याचा मोह टाळला आहे. फक्त लेख, भाषणे आहे तशीच दिली आहेत. इतर चरित्रकारांनी घटना - प्रसंगानुसार त्यांच्या भाषणाचा, लेखाचा उपयोग केला आहे. यामुळे चरीत्रकारांच्या हातून 'कार्य आणि विचार' याबद्दल होणारी अनावश्यक मूल्यमापनात्मक भाष्ये आपोआपच टाळली गेली आहेत.

प्रवास हा सयाजीराव महाराजांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. देशात नव्हे तर परदेशात त्यांनी अनेक वेळा भ्रमंती केली. पहिल्या पत्नी चिमणाबाई यांच्या निधनाने आणि संस्थानच्या सुधारणेसाठी अविरत केलेल्या कष्टामुळे त्यांना निद्रानाश जडला. प्रथम - प्रथम त्यांनी निद्रानाशावर उपाय म्हणून प्रवास केला. मात्र त्यानंतरच्या प्रवासाची कारणे परिस्थितीजन्य वेगवेगळी होती.

महाराजांना पहिल्या प्रवासावेळी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. त्या अडचणी किती होत्या हे समकालीन चरित्रकार गोत्री यांनी समर्पक शब्दांत मांडले आहे. ''श्रीमंताची स्वारी प्रथमच युरोपात जाण्याचे ठरली तेंव्हा त्यात आप्तस्वकीय, नोकरचाकर, प्रजाजन वगैरे घरची बाहेरची पुष्कळ मंडळी प्रतिकूल होती. कारण युरोप खंडाचा प्रवास फार लांबीचा, पुष्कळ मुदतीचा, कष्टप्रद व धर्मशास्त्रविरुद्ध असून, बहुतेक जोखमीचा होता. व तिकडील देशाचाराचा व लोकरिवाजाचा कोणास अनुभव नसल्यामुळे, त्यांना युरोपात जावयाचे म्हटले म्हणजे, मृत्यू लोकाहून स्वर्गलोकांत जाण्यासारखे कष्टप्रद व भीतीदायक वाटत असे. त्यांतून धर्मशास्त्ररित्या परदेशगमन निंद्य मानिले असल्यामुळे, युरोपात न जाण्याच्या संबंधाने जी अनेक कारणे दाखवीत त्यात धर्मशास्त्राची प्रतिकूलता व युरोपातून परत आल्यावर स्वज्ञातीत दाखल होण्याची अडचण, ही ठराविक कारणे नेहमी पुढे आणीत असत.'' (गोत्री, १०५) परदेशात जाणे निषिद्ध असताना या सर्व खुळचट कल्पना मोडीत काढत महाराजांनी जग प्रवास केला. एवढेच नव्हे तर धर्मशास्त्राबद्दलची अडचण महाराजांनी कायदा करून बंद केली. (काळे पाणी ओलांडले म्हणून प्रायश्चित्त घेण्याची पद्धत होती. ती कायद्याने बंद केली.) या प्रवासाचा फायदा काय याची अचूक नोंद गोत्री यांनी केली आहे. ते लिहितात, ''महाराजांनी वरप्रमाणे जो अनुभव मिळवला व देशाचार आणि लोकस्थिती अवलोकन केली, त्यापासून घेण्यासारख्या सुधारणा त्याही बडोदे राज्यात सुरु करून या कामी खर्च केले द्रव्य व श्रम यांचे सार्थक केले आहे, असे विचारपूर्वक पाहणारास तेंव्हाच दिसून येईल.'' (गोत्री, पृ. १०७) महाराजांनी देश - विदेशात प्रवास केल्यामुळे अनेक महत्त्वाच्या सुधारणा बडोदा संस्थानात सुरू केल्या.

महाराजांनी इ. स. १८८७ सालापासून जवळजवळ दरवर्षी परदेशात प्रवास केला. दाते यांनी सर्व प्रवासाची तारीखवार आणि कोणकोणत्या देशांना भेटी दिल्या याची इत्यंभूत माहिती दिली आहे. इ.स. १८८७ पासून मे इ.स. १९३१ पर्यंत त्यांनी एकवीस वेळा जगप्रवास केला.

प्रथम, प्रथम महाराजांनी आरोग्यासाठी प्रवास केला होता. त्यापुढील काळातील प्रवास मात्र फक्त आरोग्यासाठी नक्कीच नव्हते. चरित्रकार महाराजांच्या प्रवासाचे अनेक उद्देश देतात. गोत्री म्हणतात, ''प्रवासापासून मनुष्याचे मन कसे प्रगल्भ बनत जाते, व त्याजला अनेक प्रकारचा अनुभव प्राप्त होवून तो कशा स्थितीत जाऊन मिळतो, हे आमचे महाराज म्हणजे प्रत्यक्ष उदाहरण आहे.'' (गोत्री, पृ. १०७) तर दाते म्हणतात, ''निरनिराळ्या देशात प्रवास केल्याने महाराजांना त्या - त्या देशांच्या संस्कृतीचा तौलनिक अभ्यास करण्यास पुष्कळ मदत झाली.'' (दाते, पृ. २१९) महाराजांच्या भाषेत प्रवासाचे महत्त्व सांगायचे झाले तर, ''प्रवास हा तरुण जनांच्या शिक्षणाची परिपूर्ती होण्यास व प्रौढ जनांच्या अनुभवज्ञानाची परिपक्वता होण्यास फार आवश्यक आहे. परदेशगमन हे शिक्षण आहे व प्राचीन हिंदू ग्रंथकारांच्या मताप्रमाणे ज्ञानार्जनाचे एक साधन होय.'' (दाते पृ. २२०) सुधारलेल्या राष्ट्रात प्रवास केलेल्यामुळे काय घडते याबाबत महाराज म्हणतात, ''त्या लोकांची सद्यस्थिती, त्यांचे आचारविचार व निरनिराळ्या संस्था प्रत्यक्ष पाहण्यात आल्याने त्यांच्या उन्नतीची कारणे समजण्यास सुगम होते व त्यामुळे आपली स्थिती सुधारण्यास कोणत्या उपायांची योजना पाहिजे हे कळते.'' (दाते, पृ. २१७) दाते महाराजांना प्रवासापासून होणारे अनेक फायदे सांगतात, ''प्रवासापासून आणखी एक फायदा म्हटला म्हणजे निरनिराळ्या माणसांच्या होणाऱ्या ओळखी. 'उदंड ओळखी होता, उदंड भाग्य येतसे.'' (दाते २२०) प्रवासापासून आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हटला म्हणजे आपल्या देशातील व इतर देशातील राजकीय परिस्थितीचे यथायोग्य आकलन होऊ शकते हा होय.'' (दाते, पृ. २२१) सयाजीराव महाराजांनी प्रवासाचे फायदे ओळखत परदेश केला.

दाते यांनी महाराजांच्या प्रवासाची विस्तृतपणे नोंद घेतली आहे. सर्व प्रवासाचा महाराजांनी कसा उपयोग करून घेतला याबद्दल दाते म्हणतात, ''महाराजांनी देशपर्यटनापासून मिळवलेले ज्ञान व माहिती राज्य कारभार सुधारण्याकडे व नवीन कायदे करून प्रजोन्नती करण्याचे कामी अनेक प्रकारे खर्च केलेली आहे.'' (दाते, पृ. २२१)

दांडेकर यांनी परदेश प्रवासाबद्दल अधिक स्पष्टपणे विचार मांडले नसले तरी, परदेशगमन हा महाराजांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. आणि त्याचा उपयोग बडोदा संस्थानाची उन्नती साधण्यासाठी केल्याचे म्हटले आहे. रियासतकार सरदेसाई महाराजांच्या सेवेत अनेक वर्ष होते. त्यांनी अनेक वेळा महाराजांबरोबर परदेशप्रवासही केला होता. त्यांनी आपल्या आठवणीत वरील उद्देश सांगितले आहेत. त्याचबरोबर देश स्वतंत्र करण्यासाठी झटणाऱ्या क्रांतिकारकांना मदत करण्यासाठी महाराज परदेशात जात. स्वतंत्र राष्ट्र निर्माणासाठी केलेला महाराजांचा प्रयत्न या प्रवासातून दिसतो. या प्रवासाचे फायदे स्वतः लाही झाल्याचे सरदेसाई म्हणतात, ''ह्या

(परदेश) प्रवासात सरकारी खर्चाचा चोख हिशेब मला सादर करावा लागला. त्यामुळे माझ्या अंगी बिनचूक हिशेब, टापटीप व नियमितपणा हे गुण वृद्धी पावले.'' (माझी संसारयात्रा, सरदेसाई, पृ. ४५८) याशिवाय प्रवासामुळे झालेल्या अनेक फायद्याची नोंद सरदेसाई आठवणी आणि आत्मचरित्रात करतात.

फाटक महाराजांच्या परदेशप्रवासाचे परिशीलन करताना म्हणतात, ''सयाजीरावांची वृत्ती, खुशालचेंडू किंवा उधळपट्टीची नव्हती. परदेशात असताना देखील सतत त्यांच्या मनात बडोद्याच्याच उत्कर्षाचा विचार चालू असे. युरोपातील उत्तम गोष्टी बडोद्यात कशा रुजवता येतील याचे चिंतन करीत.'' (फाटक, पृ. ५१४) महाराजांनी परदेशप्रवासातून आपल्या संस्थानाला काय फायदा होतो याचा ध्यास घेतला होता. परदेशप्रवास हा केवळ देशपर्यटन न करता आपली, संस्थानाची उन्नती कशी होईल याकडे त्यांनी लक्ष दिले. म्हणजे महाराज परदेशात असले तरी स्वदेश आणि प्रजेच्या सुखसोयी वाढवण्याकडे त्यांचे लक्ष कायम असे.

बडोदा संस्थान आणि इंग्रज यांचा मैत्रीचा करार होता. त्यामुळे इतर संस्थानिकांपेक्षा कमी त्रास होता असे वरवर वाटत असले तरी महाराज आणि इंग्रज यांचे खटके नेहमी उडत. नेहमी संघर्ष होई. राज्यरोहानंतर प्रथम - प्रथम इंग्रजांबरोबर सख्य होते. महाराज जसे सुधारणा करत गेले तसे इंग्रज आणि महाराज यांच्यात बेबनाव निर्माण झाला. चरित्रकारांनी या वितुष्टाचे संघर्षमय वर्णन केले आहे.

खंडेराव महाराजांच्या महाराणी जमनाबाईसाहेब यांना इंग्रजांनी दत्तकपुत्र घेण्याची परवानगी दिली. आणि जमनाबाई यांनी सयाजीराव महाराजांना दत्तक घेतले. महाराजांच्या शिक्षणाची सोय त्यांनी केली. सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर काही काळ ते इंग्रजांचे लाडके राजपुत्र होते. 'महाराजांना इंग्रजांनी इ. स. १८७७ साली 'फर्झंन्द - नु - खास' व 'दौलत- इ -इग्लिशिया' हे दोन किताब त्यांना देण्यात आले. त्यानंतर इ. स. १८८७ साली 'जी. सी. एस. आय.' हा किताब दिला. त्यांच्या योग्यतेनुरूप सार्वभौम सरकारकडूनही त्यांचा बहुमान करण्यात आला आहे.' (गोत्री, पृ. १२६) महाराज आणि इंग्रज यांच्या सलोख्याच्या संबंधाबद्दल गोत्री अभिप्राय नोंदवतात. तसेच बापट प्रकरणाबद्दल भाष्य करतात. गोत्री यांनी इ.स. १९०४ सालापर्यंतचे चरित्र लिहिल्याने महाराज आणि इंग्रज यांच्या जास्त संघर्षाचे मुद्दे येत नाहीत.

दाते महाराज आणि ब्रिटीश राजसत्ता यांच्या संबंधाबद्दल अधिक भाष्य करतात. इंग्रजांनी आपली राजसत्ता वाढवताना अनेक संस्थानिकांचे अधिकार कायम ठेवले. त्यांच्याकडून त्याबदल्यात कर वसूल केला. बडोद्यातील गायकवाड संस्थानाशी त्यांचा मैत्रीचा संबंध होता. परंतु मैत्रीचा संबंध असला तरी इंग्रज अधिकारी आपली हुकमत नेहमी गाजवत. त्यामुळे संस्थानिकांची अवस्था वाईट असे. ''संस्थानिकांची स्थिती म्हणजे तोंड दाबून बुक्क्याचा मार अशा प्रकारची. लोकमत, अधिकारी किंवा ब्रिटीश सरकार यापैकी कोणीच त्यांचा वाली नाही. त्यांच्या अडचणी लोकचर्चेत येऊ न शकल्या कारणाने लोकांना त्यांच्या स्थितीची कल्पनाही करता येत नाही.'' (दाते, पृ. २०७) महाराजांचीही अवस्था या पेक्षा निराळी नव्हती. ''महाराजांचा स्वतंत्र बाणा,

स्वभिमान, उद्योगप्रियता, सर्वसंग्रहात्मक बुद्धी, निर्भीडपणा, पदेशातील नूतन सुधारणा आत्मसात करण्याची विलक्षण हातोटी बहुश्रूतपणा इत्यादी गोष्टीमुळे डोईजडपणाची धास्ती ब्रिटीश रेसिडेटास वाटणे स्वाभाविक होते." (दाते, पृ. २०७) सयाजीराव महाराज डोईजड होतील अशी धास्ती इंग्रजांना वाटत होती. त्यामुळे काहीतरी कारण काढून महाराजांवर सूड उगवण्याचा प्रयत्न करत.

गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि फाटक यांनी 'बापट प्रकरणा'ची (या प्रकरणाचा वृत्तांत मुळातून वाचण्यासारखा आहे.) सविस्तर चर्चा केली आहे. इंग्रज अधिकारी कसे मुजोर होते. महाराजांना कसे अडचणीत आणत. ते संस्थानात नसताना कसे उद्व्याप करत याबद्दलचे अभिप्राय चरित्रकार देतात.

चरित्रकारांनी महाराज आणि ब्रिटीश सत्ता यांच्यात झालेल्या संघर्षाच्या प्रसंगाचे वर्णन करतात. त्या प्रसंगात महाराज कसे वरचढ ठरत याची आवर्जून दखल घेतली आहे. दाते यांनी महाराज आणि इंग्रज सत्ता यांच्यातील पुढील प्रसंगाची दखल घेतली आहे. 'महाराज परदेशात असताना सर्व अधिकार कौन्सिलला देण्यास भाग पडले', त्याबद्दल दाते यांचा अभिप्राय अत्यंत महत्त्वाचा वाटतो. ''कौन्सिलला व दिवाणाला जादा अधिकार देण्यासंबंधाने महाराज नाखूष केव्हाच नव्हते. परंतु बडोद्याच्या राज्यकारभाराची सूत्रे सिमल्याहून हालली जावीत ही गोष्ट त्यांना पटत नव्हती." (दाते, पृ. २०९) महाराज प्रकृती स्वास्थ्यासाठी आणि इतर कारणासाठी वारंवार परदेशात जात. ही कृती लॉर्ड कर्झन यांना पटली नाही. आपली हुकमत गाजवण्यासाठी त्यांनी प्रवास करताना ब्रिटीश सरकारची परवानगी घ्यावी अशा आशयाचे पत्रक काढले. त्या पत्रकाचा खरा रोख सयाजीराव महाराजांकडे होता. त्यावेळी महाराज रागाने म्हणाले होते, ''आम्हाला संस्थानिक म्हणण्यात येते, परंतु पगारी नोकरापेक्षाही तुच्छतेने वागविण्यात येते." (दाते पृ. २०९) असा सारांश दाते देतात. महाराजांनी या 'कर्झन सर्क्यलर' बद्दल उघडपणे नाराजी व्यक्त केली. याप्रमाणेच दाते यांनी दुसऱ्या परिपत्रकाचा उल्लेख केला आहे. इ. स. १९०३ साली कर्झन यांनी दुसरे मानहानी करणारे परिपत्रक काढले. 'सातवे एडवर्ड यांच्या राज्यरोहनानिमित्त दिल्ली येथे दरबार भरवण्याचे लॉर्ड कर्झन यांनी ठरविले. या दरबारानिमित्त मिरवणूक निघणार होती. त्यामध्ये सर्व संस्थानिकांनी सहभागी व्हावे असे फर्मान काढले. फर्मान काढून संस्थानिकांकडून या फर्मानाबद्दल अभिप्राय मागविले.' याला महाराजांनी दिलेले उत्तर सडेतोड होते. ते म्हणतात, ''संस्थानिकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला पाहिजे, बुद्धीपरस्पर त्यांनी तसे न केल्यास त्यांचा अपमान केला जाईल. अशा प्रकारची सक्ती सार्वभौमसत्तेने केल्यास महाराज समारंभात भाग घेतील, परंतु ही गोष्ट त्यांना अंतःकरणापासून पसंत आहे म्हणून नव्हे." (दाते, पृ. २१०) महाराज इंग्रजांना अशा प्रकारे विरोध करत. आपल्या स्वाभिमानी वृत्तीचे दर्शन घडवत. त्याबद्दल दाते म्हणतात, ''एकंदरीने कर्झनशाहीची झळ महाराजांसही लागली. परंतु महाराजही तोडीस तोड होते." (दाते, पृ. २११) यानंतरही बडोदा 'संस्थानातील राजद्रोहा'बद्दल महाराजांवर करण्यात आलेले आरोप महाराजांनी स्पष्टपणे फेटाळले. या विषयी आपलेले मत प्रकट करतात. ५ डिसेंबर १९११ च्या दिल्ली दरबारात महाराजांनी इंग्रजांच्या

बादशहा आणि महाराणी यांचा अवमान करण्यात आला असे आरोप करण्यात आले. दाते यांच्या मतानुसार महाराजांच्या जीवनातील हे सर्वात मोठे वादळ होते. याचे वर्णन करताना ते म्हणतात, महाराजांविरुद्ध यावेळी बरीच मोठी झोड उठली. निरभ्र आकाशात शांत ढग येऊन एकदम वीज कडकडावी त्याप्रमाणे दरबारप्रकरणाने मोठीच खळबळ उडवून दिली.'' (दाते, पृ. २१२) यावेळी विविध इंग्रजधार्जीण्या वृत्तपत्रांनी महाराजांवर टीका केली. काही वर्षानंतर हे प्रकरण आपोआप थंड झाले. परंतु यावेळी महाराजांना खूपच मानसिक त्रास झाला.

यानंतरही इंग्रजांच्या अनेक खटपटी चालूच राहिल्या. राजद्रोहाबद्दल महाराजांच्या नोकरांवर आरोप करण्यात आले. महाराजांनी अशा लोकांवर काही कारवाई करण्याअगोदर केशवराव देशपांडे आणि डी. एल. पुरोहित यांनी नोकरीचे राजीनामे दिले. तर खासेराव जाधव यांना पहिल्यापेक्षा कमी पदावर नेमले. वरील अडचणी सोडवत असताना बडोदा संस्थानातल्या सैनिकांचा गणवेश बदलण्याचा आदेश इंग्रजांच्या अधिकाऱ्यांनी दिला. तसेच इंग्रजांच्या हट्टापायी संस्थानाला मीठ तयार करण्याचे थांबवावे लागले. जकाती बाबतही संस्थानाला नमतीचे धोरण स्वीकारावे लागले. दाते यांनी या सर्व बाबींचा समावेश केला आहे.

दांडेकर संस्थानात उद्भवलेल्या 'बापट प्रकरणा'वर सविस्तर भाष्य करतात. तर रियासतकार सरदेसाई यांनी 'राजद्रोह, देशपांडे - प्रकरण' यामधून केशवराव देशपांडे आणि खासेराव जाधव यांच्यावरील राजद्रोहाच्या आरोपानंतर महाराजांनी केलेली कार्यवाही यावर प्रकाश टाकतात. या प्रकराणावेळी रियासतकार सरदेसाई संस्थानात होते. त्यामुळे त्यांचे निवेदन आणि प्रकरणावरील अभिप्राय महत्त्वाचा ठरतो. फाटक यांनी 'महाराज आणि क्रांतिकारक' या प्रकरणात 'महाराज आणि क्रांतिकारक' यांच्या संबंधाबद्दल भाष्य करत महाराजांचे क्रांतिकारकांशी संबंध नव्हते असे स्पष्ट केले आहे.

महाराजांना राज्यकारभार करताना इंग्रजांच्या मनमानी कारभाराचा फटका बसला. परंतु महाराजांनी कधी नमतीचे धोरण घेतले. तर कधी मुत्सद्देगिरीने त्यावर मात केली. गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि फाटक या चरित्रकारांनी महाराजांनी त्यांचावरील संकटांचा सामना कसा केला याची आवर्जून नोंद घेतात.

इंग्रज महाराजांवर अधिकार गाजवत. इंग्रज नेहमी त्यांना आपल्या स्वामित्त्वाची आठवण करून देत. वेळोवेळी छोट्या-छोट्या बाबींवरून महाराजांना विचारणा करत. त्यांच्या अधिकारात कपात करत. किंवा महाराजांच्या नोकरावर तपासणीचा तगादा लावत. इंग्रजांचा महाराजांच्या राज्यकारभारात नेहमी हस्तक्षेप असे. महाराजांची प्रगमनशीलता त्यांना रुचत नसे. गोत्री, दाते, दांडेकर, आणि रियासतकार सरदेसाई या चरित्रकारांनी इंग्रजांच्या या खटपटी जवळून अनुभवल्या होत्या. त्यामुळे त्यांनी या बाबीचा समावेश चरित्रांत करता आला.

थोडक्यात, महाराज आणि इंग्रज यांचे संबंध नेहमी ताणलेले असत. या संबंधावर गोत्री, दाते आणि दांडेकर यांनी भाष्य केले. इंग्रजांच्या विरोधात आणि महाराजांची बाजू घेत चरित्रे लिहिली. ही चरित्रे स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आहेत. चरित्रकरांची ही कृत्ये धाडसाची म्हणावी लागतील.

महाराजांचा जीवनक्रम अनेक रोमहर्षक घटना - प्रसंगांनी ओतप्रोत भरलेला होता. त्यातील निवडक घटना देत चरित्रकारांनी महाराजांचे चरित्र सजविले आहे. त्या घटना - प्रसंगात काही प्रसंग महाराजांच्या खाजगी आयुष्यातील आहेत. प्रस्तावनेच्या निमित्ताने चरित्रकारांनी दिलेल्या काही घटना -प्रसंगाचे अवलोकन करणे महत्त्वाचे ठरेल. चरित्रकारांनी त्या घटना- प्रसंगाचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

महाराजांचा जन्म कवळणा या छोट्या गावी झाला. या खंडातील सर्वच चरित्रकारांमध्ये जन्म तारखेबाबत मतभेद असले असले तरी, ठराविक तारीख सांगून प्रत्येक चरित्रकार पुढे जातात. दाजी नागेश आपटे यांनी इ. स. १९३६ साली अनेक प्रकारची साधनसामग्री शोधात तीन खंडात चरित्र लिहिले. त्यानंतर चरित्रकार ११ मार्च १८६३ अशी जन्मतारीख देतात. त्याअगोदर लिहिलेल्या चरित्रात १७ मार्च १८६३ अशी जन्मतारीख दिली आहे. त्या- त्या काळात ती - ती जन्मतारीख विश्वसाहार्य मानली जात असावी.

सयाजीराव महाराजांचा जन्म १८६३ झाला. ते वयाच्या बारा वर्षापर्यंत महाराज कवळणा गावात राहिले. चरित्रकार या काळातील घटना- प्रसंग अत्यंत कमी देतात. किंवा आजीबात देत नाहीत. फाटक यांनी महाराज बडोद्याला येण्यापूर्वी कवळणा गावात घडलेले दोन प्रसंग देतात. ''एकदा आपल्या सवंगड्यांबरोबर ते पोहण्यास गेले असता एका सोबत्याने उंचावरून पाण्यात उडी मारली. ज्या ठिकाणी उडी पडली त्या ठिकाणी पाणी खोल नव्हते व पाण्याखाली दगड होता. त्या मुलाची उडी त्या दगडावर पडल्यामुळे त्याचे डोके फुटून तो रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध पडला. इतर मुलांना काय करावे हे सुचेना. पण गोपाळने पुढाकार घेऊन त्या रक्तबंबाळ मुलाला बाहेर काढले व त्याच्या घरी पोचते केले.'' (फाटक, पृ. ५०८) तर दुसरा प्रसंग, ''दुसऱ्या प्रसंगात प्रत्यक्ष गोपाळचा प्राणात्न नसला तरी जबर दुखापत घडण्याची वेळ आली होती. यावेळी मित्रांच्या समवेत गोपाळ रस्त्याने खेळत चालला असताना एका पोळाने अचानकपणे धावत येऊन त्याला आपल्या अणकुचीदार शिंगामध्ये उचलले. हा प्रकार बघताक्षणी मुलेच काय पण आजूबाजूची लोकही ओरडू लागले. त्यापैकी काहीजण त्या पोळाच्या मागे धावू लागले. ज्या मार्गाने पोळ पळत होता तिकडूनच गोपाळचे वडील काशीराव येत होते. एका मुलास शिंगावर घेऊन एक पोळ भरधाव पळत आहे हे दृश्य त्यांना दिसताच ते पुढे होऊन त्यांनी त्या धावणाऱ्या बैलाची शिंगे दोन्ही हातांनी पकडून त्याला अडविले आणि वाकविले. बैलाची धाव थांबताक्षणी इतका वेळ शिंगावर अडकलेल्या गोपाळने सावधपणे उडी मारली व तो पळाला.'' (फाटक, पृ. ५०८) महाराजांनी आपल्या आयुष्यात धैर्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर सुधारणा केल्या ते गुण बालपणापासून त्याच्या अंगी वसत होते. फाटक यांनी वरील दोन प्रसंग देताना महाराजांच्या अंगी असणाऱ्या धैर्य, प्रसंगसावधान, आत्मविश्वास या गुणांची ओळख करून देतात.

बडोद्यात दत्तकविधानाचा प्रसंग उद्भवल्यावर कवळणा येथील गायकवाड घरांची चौकशी करण्यात आली. त्यावेळी 'बडोद्याला मुलांना बोलावणे आहे.' हा निरोप देण्यासाठी नाशिकचे कलेक्टर स्वतः कवळणा गावी गेले. नाशिकचे कलेक्टर आणि काशीराव गायकवाड यांच्यातील

संवाद रियासतकार सरदेसाई यांनी दिला आहे. ही घटना सयाजीराव महाराजांच्या जीवनाला वेगळे वळण देणारी होती. त्यामुळे सर्वच चरित्रकारांनी या घटनेला चरित्रात स्थान देतात.

एका खेडेगावातील मुलाची संस्थानाच्या प्रमुखपदी निवड होणे, ही तशी अनपेक्षित परंतु वास्तव घटना होती. ही घटना महाराजांच्या आयुष्यातली महत्त्वाची घटना होय. त्या घटनेबद्दल चरित्रकार दांडेकर म्हणतात, ''श्रीमंत सयाजीराव महाराज पुराणकाळात जन्माला आले असते, तर हा प्रकार दैवी चमत्कार म्हणून सहज एखाद्या पौराणिक कथेचा विषय होऊन बसत; पण सध्याच्या बुद्धिप्रधान युगातही काही कमी महत्त्व आहे असे नाही.'' (दांडेकर, पृ. २६६) म्हणजे 'रंकाचा राव होणे' अशा दृष्टीकोनातून चरित्रकार या घटनेकडे पाहतात.

गोपाळ आणि इतर मुले दत्तकपुत्र निवडीसाठी बडोद्यात गेली. त्यावेळी या मुलांमधून एक निवडला जाणार होता. ही निवडप्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती. परंतु राजमाता जमनाबाई आणि दिवाण टी. माधवराव यांनी यशस्वीपणे पार पाडली. त्यावेळची एक हकीगत दाते, दांडेकर आणि फाटक हे चरित्रकारांनी देतात. मी राजा बनायला आलोय, या आख्यायिकेला महत्त्वाचे स्थान देतात. कारण महाराजांची विलक्षण बुद्धिमत्ता यातून दिसते, महाराजांची तर्कसंगत विचार करण्याची शक्ती दिसते. महाराजांनी पुढे उभारलेल्या सुधारणांचा पाया त्यांना या उत्तरात दिसतो.

महाराजांचा शिक्षणक्रम चालू असताना महाराजांचा विवाह समारंभ पार पडला. बडोदा संस्थानातील बऱ्याच कालखंडानंतरचा महत्त्वाचा आनंदोत्सव होता. गोत्री हे महाराजांचे चरित्रकार महाराजांच्या या शाही विवाह समारंभात उपस्थितीत होते. त्यामुळे त्या समारंभाचा थाट त्यांनी पुढीलप्रमाणे वर्णिला आहे. ''महाराजांचा विवाहसमारंभ तारीख ०६.०१.१८८० रोजी मोठ्या थाटाने बडोदे शहरी करण्यात आला. यावेळेस मोठमोठे राजेरजवाडे, सदगृहस्थ, आप्तस्वकीय, सरदार, दरखदार, असमदार, कामदार, वतनदार वगैरे मंडळीस निमंत्रणे करण्यात आली असून, त्यांचे स्वागताचा योग्य प्रकारे बंदोबस्त ठेविला होता.'' (गोत्री, पृ. १००) महाराजांच्या जीवनातील हा प्रसंग महत्त्वाचा होता. तरीही त्याचे वर्णन सर्वच चरित्रकार मर्यादित शब्दांत करतात.

लग्नानंतर दोनच वर्षांनी सयाजीराव महाराजांकडे राज्यकारभाराची सूत्रे आली. राज्यकारभाराची हाती घेण्याच्या समारंभ झाला. हा अधिकारप्राप्तीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. या समारंभाचे वर्णन करताना गोत्री म्हणतात, ''या समारंभास एकंदर ११ लक्ष रुपये खर्च झाला होता, हे वाचकवर्गास समजले म्हणजे तो समारंभ किती थाटाचा झाला असेल याची कल्पना त्यास सहज होणार आहे.'' (गोत्री, पृ. १००) तर दाते यांनी याप्रसंगी महाराजांनी केलेले भाषण देऊन कार्यक्रमाची महती स्पष्ट करतात. तर याप्रसंगी केलेल्या भाषांवर दांडेकर अधिकचे भाष्य करतात, ''अशा प्रसंगी केलेली भाषणे ही पुष्कळ शुष्क, दिखाऊ, डामडोलाची असतात. त्यात भाषेचे सजावट असते पण अन्तःकरणाचा उमाळा नसतो. महाराजांच्या किंवा सर जेम्स यांच्या भाषणाविषयी मात्र असे म्हणता येणार नाही.'' (दांडेकर, पृ. २८३) चरित्रकारांनी या समारंभाचे महत्त्व ओळखले होते. असे असले तरी त्याच्या वर्णनात न अडकता पुढील सुधारणांकडे वळतात.

वरील सर्व घटनांची नोंद प्रत्येक चरित्रकारांनी घेतली आहे. त्याव्यतिरिक्त इतरही घटना चरित्रकार देतात, महाराजांचा जीवनक्रम जस - जसा पुढच्या टप्प्यावर जाईल तशा घटना वाढल्या आहेत. गोत्री यांनी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या काही घटना देतात. म्हणजे 'युवराजांचा जन्म'. 'महाराणी चिमणाबाई यांचे निधन', 'दुसरा विवाह समारंभ' अशा काही घटना देत चरित्र रेखाटतात. दाते आणि दांडेकर यांनी इ. स. १९३३ सालापर्यंतचे चरित्र लिहिल्याने त्यापुढील घटनांची येत नाहीत. तर रियासतकार सरदेसाई यांनी महाराजांच्या आठवणी मांडल्यामुळे त्यांच्याशी निगडीत आणि कुतूहल वाढवणाऱ्या गोष्टीची दखल घ्यावयास विसरत नाहीत. सयाजीराव महाराजांच्या जीवनातील घटना - प्रसंगांचे वर्णन करताना हे चरित्रकार कमीत कमी शब्दांत करतात. तर महाराजांनी केलेल्या सुधारणांचे निवेदन सविस्तर आणि विश्लेषनात्मक रीतीने करतात.

रियासतकार सरदेसाई आणि फाटक यांनी 'महाराज आणि क्रांतीकारक' हा नवीन विषय देतात. महाराज क्रांतिकारक यांचे जवळचे संबंध होते. याचे स्पष्ट उल्लेख करतात. तसेच महाराजांचा मृत्यू झाला ही दुःखद घटना रियासतकार सरदेसाई आणि फाटक चरित्रात देतात. त्यावेळच्या बडोद्यातील दुःखमय प्रसंगाचे वर्णन करतात. ''चिमणाबाईचे पुत्र धैर्यशील विद्यमान होते, त्यांनी स्वहस्ते सर्व अंत्यक्रिया केली. तीन तासपावेतो 'लक्ष्मीविलास' मध्ये यात्रेची गर्दी सीमेपार बनून आली. अश्रूंचा पाऊस पडला. तो त्या वेळचा शोकजनक प्रसंग वर्णन करण्यास कोण समर्थ आहे!'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ४०८) तर फाटक म्हणतात, ''महाराजांची महायात्रा बारा वाजण्यास सुमारास सुरू झाली. ज्या बडोदे जनतेने आजवर महाराजांच्या मिरवणुकी व राजवैभव अनेक वेळा पाहिले होते, ती जनता आज सयाजीरावांची शेवटची मिरवणूक पाहण्यासाठी जमली होती.'' (फाटक, पृ. ५३५) चरित्रकार सयाजीराव महाराजांच्या जीवनातील अखेरच्या प्रवासाचे हृद्यद्रावक वर्णन करतात.

सयाजीराव महाराजांच्या जीवनात अनेक दुःखी घटना घडल्या. त्यातील काही घटना संसारीक आहेत तर काही राजकीय आहेत. चरित्रकारांनी हे घटना- प्रसंग देत महाराजांनी या प्रसंगांना कसे सामोरे गेले याचे अभिप्राय देतात.

गोत्री यांनी प्रथम इ.स. १९०४ पर्यंतचे चरित्र लिहिले. त्यामुळे पहिल्या पत्नी चिमणाबाई यांचे निधन, मातुश्री व चुलती यांचे निधन हे दुःखद प्रसंग सोडता इतर दुःखद घटनांची नोंद नाही.

दाते यांनी 'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' या शीर्षकाखाली महाराजांच्या कौटुंबिक घटना-प्रसंगांची दखल घेत चरित्रात त्याची नोंद घेतात. ते म्हणतात, ''जे राजे प्रजेचे कल्याण तेच आपले कल्याण असे समजतात, प्रजेच्या हितासाठी अहर्निश झटत राहतात, त्यांच्या वाट्यास कौटुंबिक सुख फार थोडे येते असे म्हणतात. रामराज्य स्थापणारे प्रभू रामचंद्र यांना तरी कोठे कौटुंबिक सुख कितीसे मिळाले? प्रथम चौदा वर्ष वनवास भोगला, रावणासारख्या बलाढ्य शत्रूशी टक्कर दिली व अखेर राज्य मिळाले तरी लोकरंजनार्थ सीतेचा त्याग करावा लागला. तात्पर्य राजाला कौटुंबिक सुख फार थोडे मिळू शकते. तीच गोष्ट सयाजीरावांची.

(दाते, पृ. २३८) महाराजांना कौटुंबिक सुख फार थोडे मिळाले. याची कारणेही देताना दाते म्हणतात, महाराजांना राज्यकारभार करताना सुधारणा महत्त्वाच्या वाटत होत्या. त्याकडे आपली सर्व शक्ती खर्च करावी लागत होती. वेळ द्यावा लागत होता. त्यामुळे कौटुंबिक सुख फार थोडे मिळाले. या विवेचनाच्या शेवटी दाते यांनी महाराजांच्या कौटुंबिक दुःखाचे आणखी एक एक कारण देताना राजघराण्यातील व्यक्तींचे मृत्यू असे देतात. ''महाराजांच्या देखत त्यांच्या मातुश्री जमाबाईसाहेब, भगिनी ताराराजे, प्रथम पत्नी महाराणी चिमणाबाईसाहेब, तीन वयात आलेले मुलगे, एक सून, एक जावई श्री. जितेंद्रनारायण, बंधू आनंदराव, ही सर्व मृत्यू पावली. अर्थात त्यांना कौटुंबिक सुखाचा लवलेशही नाही असेच कोणी म्हणेल व स्वतः महाराजही असेच मत प्रकट करतात, `I havae no domestic life.'' (दाते, पृ. २४०) दाते यांनी इ.स. १९३३ पर्यंतचे चरित्र लिहिले. तोपर्यंत महाराजांचे जनक माता, पिता आणि वरील सर्वांचा मृत्यू झाला. त्यानंतरही महाराजांचे कनिष्ठ बंधू संपतराव यांचा मृत्यू झाला. एकंदरीत महाराजांना जवळच्या नात्यातील तेरा- चौदा लोकांचे मृत्यू पाहावे लागले. त्यामुळे साहजिकच चरित्रकारांनी महाराजांना मोठ्या कौटुंबिक दुःखाला सामोरे जावे लागल्याचे म्हटले आहे.

दांडेकर म्हणतात, ''एकामागे एक अशा पुत्रनिधनामुळे महाराजांच्या भावनांना जो धक्का बसला तो कायमचाच. पुत्रजन्मासारखा आनंद नाही. आणि पुत्रनिधनासारखा शोक नाही, असे म्हणतात. श्रीमंत महाराज व श्रीमंत सौ. महाराणीसाहेब या दोघांनाही पुत्रशोकामुळे आयुष्यात मुळीच बरे वाटत नसेल.'' (दांडेकर, पृ. २९४) दांडेकर यांनी महाराजांच्या 'गृहसौख्या'ची आवर्जून दखल घेतात. आनंदी घटनांबरोबर दुःखी घटना देताना महाराजांनाही सर्वसामान्यासारखे कौटुंबिक दुःखाला सामोरे जावे लागल्याचा अभिप्राय देतात.

महाराजांच्या जीवनातील अनेक घटना प्रसंगात रियासतकार सरदेसाई सहभागी होते. त्यांच्या जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग जवळून पाहिले होते. त्यासंबंधीच्या आठवणी त्यांनी 'जीवनातील सुखदुःखाचे अनुभव' या वेगळ्या प्रकरणात लिहिल्या आहेत. ते लिहितात, ''रजेवरून बडोद्यात दाखल झालो तो तेथील राजकुटुंबाचे वातावरण अत्यंत खिन्न बनलेले आढळले त्याचे मुख्य कारण म्हणजे महाराजांकडून बादशाहांचा अपमान झाला त्याचा गवगवा. (इ. स. १९११ चा दिल्ली दरबार) आणि दुसरे कारण माधवराव शिंदे व सयाजीरावांची कन्या इंदिरा यांचा ठरलेला विवाह मोडला. दोन्हीही प्रकरणांनी महाराजांचे मनःस्वास्थ जे एकदा बिघडून विपरीत बनले ते पुनः परत आलेले मी कधी पहिले नाही. माझ्या मते महाराजांच्या एकंदर जीवनातील ही एक प्रचंड क्रांती होय. त्यांची पूर्वीची आनंदी व हौशी वृत्ती सर्वथा मावळून त्यांच्या चेहऱ्यावर विषण्णतेची कळा उद्भवलेली ती पुन्हा कधी सुधारली नाही. तद्नंतर त्यांचे अठ्ठावीस वर्षाचे जिणे निराशेचे व भीषण उद्विग्नतेचे होत गेले.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३८४) तर सरदेसाई आत्मचरित्रात म्हणतात, ''स. १९०२ च्या सुमारास महाराज चाळीशीस पोचतात तोच त्यास मुलांच्या दुराचाराचा पहिला तीव्र धक्का मिळाला. तदुत्तर त्यांची पहिली हसण्याखेळण्याची प्रफुल्लीत वृत्ती मावळत गेली.'' (माझी संसारयात्रा, सरदेसाई, पृ. ४९०) महाराजांची दुःखे सरदेसाई यांच्यापेक्षा दुसऱ्याला कदाचित माहित नसावीत. सरदेसाई महाराजांचे निकटतम सेवक असल्याने त्यांना याची माहिती होती.

फाटक यांनी 'कौटुंबिक जीवन' या या शीर्षकाखाली महाराजांच्या जीवनातील आनंदी आणि दुःखद अशा दोन्ही घटना देतात. ''त्यांच्या कौटुंबिक जीवनाचे निरीक्षण केल्यास गादीवर आल्यानंतर पहिल्या राणीच्या मृत्यूनंतरच्या वीस वर्षात कौटुंबिक सुखात खेद वाटण्यासारखी महत्त्वाची हानी घडली नसल्याचे दिसून येते.'' (फाटक, पृ. ५२९) त्यानंतर मात्र महाराजांना अनेक दुःखद घटनांना सामोरे जावे लागले. अगोदरच्या चरित्रकारांनी वर्णिल्याप्रमाणे राजघराण्यातील व्यक्तींचे मृत्यू ह्या घटना अधिक क्लेशदायक होत्या. फाटक म्हणतात, ''मनुष्य मनाचा कितीही खंबीर असला तरी वाढत्या वयामध्ये कुटुंबाचा भरारलेला वृक्ष आपल्या डोळ्यांदेखत झाडू लागल्याचे दुःख दबा धरून मानसिक बळ पोखरीत राहते. मनुष्य दिनचर्या पर पडतो, पण तिच्यात उत्साह व आनंदाचा भाग नसतो. तो केवळ सवयीच्या बलात्काराने आपली कामे बजावतो. महाराजांना प्रत्येक आघाताचा धक्का बसे. या धक्क्यांनी त्यांची बुद्धी हादरून जाऊन कर्तव्यदक्षतेत कसलीही चलबिचल उडाली नाही, हा त्यांच्या स्वभावाचा काहीसा अलौकिक विशेष समजला पाहिजे.'' (फाटक, पृ. ५२९) महाराजांनी आपल्या कौटुंबिक दुःखाचा राज्यकारभारावर काही परिणाम होऊ दिला नाही. तरीही महाराज अंतर्मनाने दुःखी होते.

सयाजीराव महाराजांना कौटुंबिक पातळीवर दुःखाला सामोरे जावे लागले. तसेच महाराजांच्या सार्वजनिक जीवनात महाराजांना अनंत अडचणी आल्या. महाराजांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक अनुभवाचे, अडचणींचे चित्रण जागोजागी करतात. तसेच राज्यकारभार करताना इंग्रजांबरोबरही संघर्ष करावा लागला होता. चरित्रकारांनी या दोन्ही पातळीवरील संकटाचे घटना - प्रसंग आवर्जून देतात.

सयाजीराव महाराजांना फक्त संकटाना सामोरे जावे लागले असे नाही, तर त्यांच्या जीवनात काही आनंदाचे, उल्हालासाचे प्रसंगही आले. या आनंदी घटना चरित्रकार नोंदवतात.

गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि फाटक यांनी दत्तकासाठी निवड, महाराजांचे दोन्ही विवाह, राज्यकारभार हाती घेण्याचा प्रसंग, युवराजांचा जन्म अशा सुरुवातीच्या काळातील काही घटना देतात. युवराजांच्या जन्माबद्दल गोत्री म्हणतात, ''पुत्रजनन होताच गावातील हजारो स्त्रिया दुधाचे व पाण्याचे हेल राजवाड्यापुढे नेऊन टाकू लागल्या. शहरात सरदार, दरखदार, असामदार, शेटसावकार, व कामदार वगैरे मंडळींकडे व कॅम्पात मे. रेसिडेंट साहेब यांजकडे हत्तीवरून साखर वाटण्यात आली. व युवराज जननाची खबर नामदार हिंदुस्थानचे व्हायइसराय साहेब व मोठमोठे राजेरजवाडे, बडेलोक यांजकडे तारेने देण्यात आली; व त्यांजकडूनही उलट आनंदप्रदर्शक तारा, खलिते व बहुमान पोशाख पाठविण्यात आले.'' (गोत्री, पृ. १०२) महाराजांचा जन्मसोहळा आनंदाची घटना होती. साहजिकच त्याचा समावेश गोत्री करतात.

दाते यांनी 'दोन महोत्सव' या अंतर्गत महाराजांच्या कारकिर्दीच्या आनंदाच्या घटना देतात. इ. स. १९०७ साली महाराजांच्या कारकिर्दीला पंचवीस वर्ष पूर्ण झाली. त्या वेळी 'रोप्य महोत्सव' साजरा करण्यात आला. त्या प्रसंगाच्या निमित्ताने दाते म्हणतात, ''महाराजांनी आपल्या पंचवीस वर्षाच्या कारकिर्दीत केलेल्या लोकोपयोगी सुधारणांमुळे ते आपल्या प्रजेचे किती आवडे झाले होते हे निदर्शनास आले.'' (दाते, २४१) यावरून महाराजांची लोकप्रियता लक्षात येते. प्रजा महाराजांवर प्रेम करत होती. संधी येताच प्रजा त्याचे प्रदर्शन करत असे.

इ.स. १९२५ साली महाराजांच्या कारकिर्दीला पन्नास वर्ष पूर्ण झाली. तो 'सुवर्ण मोहत्सव' अतिशय मोठ्या प्रमाणात साजरा केला गेला. ११ जानेवारी ते १५ जानेवारी १९२६ हे पाच दिवस महाराजांचा 'सुवर्ण मोहत्सव' साजरा करण्यात आला. चरित्रकार या 'सुवर्ण मोहत्सवा'चे वर्णन करतात. प्रत्येक दिवशीच्या कार्यक्रमाची रूपरेषा दाते देतात. ''प्रत्येक दिवशी कोणता समारंभ होता याची विस्तृत विवेचन करतात. ते थोडक्यात असे, पहिल्या दिवशी वारशा परेड ग्राऊंडवर मोठा दरबार भरविण्यात आला. त्याच दिवशी विविध मान्यवर संस्थांनी महाराजांना मानपत्रे दिली. त्या संस्थांची नावे पाहिल्यास महाराजांची लोकप्रियता लक्षात येते. ती नावे अशी, १. मिल ओनर्स असोसिएशन, २. पुण्याची शिक्षक प्रसारक मंडळी, ३. अखिल भारतीय हिंदू महासभा ४. सुरत म्युनिसिपलिटी ५. मराठा समाज, ६. सुनी अंजुमान, बडोदे, ७. बडोदे अत्यंज संस्था, ८. नवसारी जिल्ह्यातील नागरिक, ९. बडोद्यातील मुसलमान, १०. पारशी, ११. रोमन कॅथॉलिक इ. समाजातर्फे महाराजांना मानपत्रे देण्यात आली.'' (दाते, पृ. २४२) महाराजांनी बडोदा संस्थानाबरोबर संस्थानच्या बाहेरही मदत केली होती. त्यामुळे महाराजांकडे एक आदर्श सुधारक म्हणून प्रजा पाहत होती. दुपारीही लक्ष्मीविलास राजवाड्यात दुसरा दरबार भरवल्याचे दाते सांगतात. आणि संध्याकाळच्या कार्यक्रमाची रूपरेषा देतात.

दुसऱ्या दिवशी सार्वजनिक बागेत नाच, गाणे कार्यक्रम झाला. तिसऱ्या दिवशी सकाळी शिपायांची महाराजांसमोर कवाईत झाली. त्याच दिवशी गोरगरिबांना अन्नदान करण्यात आले. चौथ्या दिवशी जादा सरकारी गॅझेट काढण्यात आले. आणि महाराजांनी प्रजेला काही सवलती जाहीर केल्या. पाचव्या दिवशी महाराजांनी 'किर्तीमंदिरची' पायाभरणी केली. दाते प्रत्येक दिवशीचा कार्यक्रमांचे नियोजन देतात. महाराजांच्या राज्यकारभाराचा 'सुवर्ण मोहत्सव' मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आल्याचे दाते यांनी म्हटले आहे. दाते यांनी हा कार्यक्रम पाहिला असण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळेच दाते यांनी संपूर्ण इत्यंभूत माहिती दिली आहे.

यानंतर दाते यांनी महाराजांच्या जीवनातील आनंददायी प्रसंग दिला आहे तो म्हणजे ''महाराजांचे नातू 'युवराज प्रतापसिंह यांचा विवाह.' प्रथम पत्नी चिमणाबाई यांचे राजपुत्र फत्तेसिंहराव यांचा मुलगा प्रतापसिंह. त्यानंतर या युवराजांना पुत्र प्राप्ती झाली. युवराजांच्या पत्नी श्रीमंत सौ. शांतादेवी या २ एप्रिल १९३० रोजी प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झाले. हे आनंददायक वृत्त ऐकून महाराजांना संतोष वाटला. अशा प्रकारे महाराजांनी पतवंड पहिले व हिंदुधर्मांच्या समजुतीप्रमाणे त्यांना काशीयात्रा घडली! हे भाग्य लहानसहान नाही.'' (दाते, पृ. २४४) महाराजांच्या मृत्यूनंतर युवराज प्रतापसिंह बडोदा संस्थानचे राजा झाले. दाते यांनी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाचे आनंदी प्रसंग देत महाराजांच्या आयुष्य काही काळ तरी आनंदी आणि सुखमय होते, असे वर्णन करतात.

मानवी जीवन हे दुःखमय आणि आनंदी प्रसंगांनी भरलेले आहे. चरित्रकार सुद्धा महाराजांच्या दुःखी आणि आनंदी अशा परस्पर विरोधी घटना - प्रसंग देत चरित्र लिहितात. चरित्रकारांच्या मते, महाराजांच्या सार्वजनिक आयुष्यात, जीवनात आनंदी, उत्साहपूर्ण घटना अधिक घडल्या. तर कौटुंबिक जीवनात आनंदी घटना - प्रसंग कमी आणि महाराजांना क्लेशकारक प्रसंग अधिक

घडले. इथे चरित्रकारांनी घटना - प्रसंगाची संख्यात्मक तुलना केली नाही. मात्र सयाजीराव महाराजांचा सहवास ज्यांना घडला त्यांनी अशा प्रकारे मत व्यक्त केले आहे.

या पाच चरित्रांपैकी गोत्री लिखित चरित्रांचे एक वैशिष्ट आहे. ते म्हणजे महाराजांना केलेल्या सूचना आणि 'केसरी' या वृत्तपत्राने महाराजांना केलेला उपदेश चरित्रात देणे. कोणताही चरित्रनायक हयात असताना त्याच्या जीवनाबाबत सूचना करणे ही अनोखी बाब म्हणावी लागेल. परंतु गोत्री यांनी, 'महाराजांस अगत्याची विज्ञप्ती' देत नऊ सूचना केल्या आहेत. त्यामध्ये, कायदे अंमलात आणणे, कर कमी करणे, उद्योगधंद्याची वृद्धी करणे, प्रजेस अधिकार देणे, वर्तमानपत्रास जास्त स्वातंत्र देणे, महाराजांनी खात्याची तपासणी स्वतः करावी, लवाद कोर्टाची स्थापना करणे, बडोदे शहरात गटारे करणे आणि वेदपठनाच्या शाळा उघडणे अशा सूचना केल्या आहेत. या सूचना इ. स. १९०५ साली केल्या आहेत. त्या काळापर्यंत आणि नंतरही महाराजांच्या सुधारणा चालूच होत्या. वरील सर्व सूचना त्या काळात किती व्यवहार्य होत्या. हे आज सांगणे कठीण आहे.

महाराजांचा राज्याभिषेक झाला त्यावेळी 'केसरी' या वर्तमानपत्राने अभिनंदनपर आणि उपदेशपर लेख प्रसिद्ध केला होता. त्या लेखाचा सारांश गोत्री यांनी चरित्रात दिला आहे. गोत्री यांनी पाच मुद्द्यांच्या आधारे प्रकाशित केलेल्या लेखाचा सारांश दिला आहे. ''राजे लोकांनी आपल्या बुद्धीचे क्षालन केले पाहिजे. त्यांच्या अंतःकरणांत मदमत्सरादी कुबुद्धी वारा अगदी अगदी उपयोगी नाही. त्यांची मने उदात्त, गंभीर, प्रगल्भ व धैर्यवान आणि विचारी अशी पाहिजेत. स्वतःसंबंधाने एवढी तयारी झाल्यावर, मंत्रीपरिक्षणाची. उत्तम मंत्री, निवडता येणे काय ते राजाचे खरे चातुर्य. तिसरी गोष्टी. राजा मुलखावर राज्य करीत असेल तेथील लोकांच्या चांगल्यासाठी झटणे. चवथी गोष्ट. लोकांच्या आपली खरी गाऱ्हाणी सरकारच्या कानावर घालता यावी यासाठी त्यांना तक्रार करण्याची व वर्तमानपत्रे काढण्याची पूर्ण स्वतंत्रता यावी. पाचवे. प्रजेस विद्या देणे हे राजाचे मुख्य कार्य होय. प्रजा सुशिक्षित नसली तर राजाला फार त्रास पडतो.'' (गोत्री, पृ. १३५) अशा प्रकारे महाराजांनी आपल्या राज्यकारभारात सुधारणा करावी आणि राज्य प्रजेला कसे उपयोगी पडेल यासाठी या सूचना आहेत. चरित्रनायकाला चरित्रात अशा प्रकारच्या सूचना करण्याची पद्धत नव्हती. परंतु गोत्री यांनी या सूचना करण्याचे धाडस केले. महाराजांनी त्या उदार मनाने स्वीकारल्या असतील. कारण महाराजांचे संपूर्ण चरित्राचे निरीक्षण करता वरील सूचनांवर महाराजांनी अंमलबजावणी केली होती. आणि सुचविलेल्या सुधारणा केल्या.

सयाजीराव महाराजांचा स्वभाव हा चरित्रकरांच्या दृष्टीने आव्हान होते. परंतु या पाच चरित्रकारांपैकी गोत्री, दाते, दांडेकर आणि रियासतकार सरदेसाई यांनी महाराजांना जवळून अनुभवले होते. त्यामुळे महाराजांचा स्वभाव त्यांच्या आवडीनिवडी त्यांना माहित होत्या. चरित्रनायकाचा स्वभाव आणि आवडीनिवडी वेगळ्या द्यायच्या की घटना - प्रसंगातून द्यायच्या हा प्रश्न निर्माण होतो. परंतु चरित्रकारांनी त्यावर मार्ग काढला आहे. त्या- त्या काळात चरित्राला योग्य असा निर्णय घेत चरित्रनायकाच्या स्वभावाचा समावेश चरित्रांत केला आहे.

गोत्री यांनी 'महाराजांचे नैसर्गिक गुण' या प्रकरणात महाराजांच्या स्वभावाची चर्चा करतात. ते म्हणतात, ''महाराजांचा स्वभाव शांत व सुविचारी असून अंतःकरण निर्मळ, कृपाळू व परमन्यायी आहे. व त्यांच्या अंगी दृढनिश्चय, कार्यतत्परता, चतुरता, आप्तस्वकीय आणि पदरचे लोकांविषयी सहानभूती अनुराग, व गुणग्राहकता हे गुण चांगल्या रीतीने वास करीत आहेत, याचा अनुभव अनेक वेळा आलेला आहेच; पण यापेक्षाही त्यांची नितीमत्ता, उदारता, विद्यासक्ती, निर्व्यसनता, एकपत्नित्व, व त्यांचा अहिर्निश सुरू असलेला जबरदस्त व्यासंग, हे गुण लक्षात ठेवण्यासारखे, लहानपणापासून थोरापर्यंत, गरीब व श्रीमंतांनीही, अत्यंत अनुकरण करण्यायोग्य आहेत.'' (गोत्री, १३१) गोत्री महाराजांचे सेवक असल्याने महाराजांना त्यांनी जवळून पाहिले होते. त्यांच्या गुणांची ओळख झाली होती. महाराजांच्या अंगी असणारे सद्गुण त्यांनी अनुभवले होते. त्याकारणाने ते स्वभाव आणि इतर बाबींचे वर्णन करू शकले.

गोत्री यांनी महाराजांच्या सद्गुणांची चर्चा केली आहे. त्यामध्ये, काम करण्याची हातोटी, चांगल्या कामाची बूज राखणे, महाराजांचे राहणीमान, विद्यासक्ती, शिक्षणाचे महत्त्व, ग्रंथ प्रसार करणे, उदारता, निर्व्यसनता, व्यासंग, घोड्यावर बसणे, आणि शिकार करणे अशा अनेक गुणांचा समावेश केला आहे. महाराज सद्गुणांची खाण होते. त्यामुळे महाराजांच्या सानिध्यात आलेलेल्या अनेकांना त्याचा अनुभव आला होता.

दाते यांनी महाराजांचे गुण गोत्री यांच्यासारखे वेगळे दिले नाहीत. विविध घटना - प्रसंगात त्यांचा कोणता गुण दिसला हे त्या त्या प्रसंगानुसार स्पष्ट करतात. 'उपसंहार' या शेवटच्या प्रकरणात मात्र त्यांनी महाराजांचे गुण एकत्रित नोंदवतात. ''श्री. सयाजीराव महाराजांची मूर्ती पहिली की, आपण एका साध्या पण नीतिमान नृपशिरोमाणीच्या सानिध्यात राहण्याचा अलभ्य लाभ घेत आहोत याबद्दल स्वतःला धन्यता वाटू लागते. दुसऱ्याच्या ज्ञानाबद्दल आदर, अनेक विषयाबद्दलची रसिकता, स्वतःची तीव्र ज्ञानलालसा, विचारांची सचोटी, बारीक चिकित्सेची आवड, दांडगी स्मरणशक्ती, नवे जोडावे पण जुने सोडू नये हा बाणा, उज्ज्वल देशभक्ती, असामान्य कर्तव्यनिष्ठा, प्रबोधनशक्ती, असामान्य स्वार्थत्यागबुद्धी, 'अनुभवे आले अंगा, तेचि देतसे या जगा' अशी वृत्ती, यामुळे त्यांच्याशी सहवास घडणाऱ्या इसमावर त्यांची विलक्षण छाप बसते.'' (दाते, पृ. २४५) महाराजांच्या गुणांची आणि स्वभावाची ओळख दाते यांना चांगली होती असे दिसते. महाराजांचा अनेक विषयाबद्दल व्यासंग होता. त्यामुळे त्यांच्या पदरी अनेक कलावंत आणि विविध क्षेत्रातील मान्यवर असत. किंवा ज्ञानी कलावंताना महाराज बोलावून घेत. त्यांच्या अंगी असणाऱ्या गुणांची कदर करत. त्या गुणांचा उपयोग आपल्या संस्थानासाठी, प्रजेसाठी करून घेत. या गुग्राहकतेबद्दद्ल महाराजांचा नेहमी आदर केला जाई. दाते हे महाराजांकडे नेहमी जात. त्यामुळे त्यांना त्यांच्या गुणांची ओळख जवळून झाली.

गोत्री यांच्याप्रमाणे दांडेकर यांनी महाराजांच्या गुणांची वेगळी ओळख करून देतात. 'आवडीनिवडी व स्वभाव' या प्रकरणात त्याची माहिती देतात. महाराजांच्या आवडीनिवडी देताना अगदी पोषाखापासून ते अनेक क्षेत्रातील त्यांची निवड कशी अभ्यासपूर्ण होती याची नोंद दांडेकर करतात. कोणतेही काम करताना ते व्यवस्थित व्हावे असे त्यांना वाटे. दांडेकर म्हणतात,

''ज्याला इंग्रजीत System म्हणतात ती महाराजांना फार फार प्रिय आहे. स्वतः महाराज म्हणजे त्या System चे मूर्तिमंत उदाहरण होय. प्रत्येक गोष्ट करताना विशिष्ट पद्धतीने (System) ती करावी, असे महाराजांना वाटते. ज्या कामात पद्धत नाही ते काम चांगले होणे शक्य नाही; जर आपणाला आपले काम चांगले व लवकर व्हावेसे वाटत असेल तर ते पद्धतीने व व्यवस्थितपणे आपण केले पाहिजे. महाराजांनी जेवढ्या सुधारणा केल्या तेवढ्या सर्व त्या सिस्टिमचे तत्त्व डोळ्यासमोर ठेवून केल्या.'' (दांडेकर, पृ. ३२२) महाराजांनी सुधारणा करताना त्या दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक अशा केल्या. महाराज आपल्या अंगी अनेक सद्गुण जाणीवपूर्वक रुजवत, सुधारणा करत. त्यामुळे त्यांना संस्थानाचा शाश्वत विकास करता आला.

दांडेकर यांनी महाराजांचा वागण्यातील, बोलण्यातील आणि पोशाखातील साधेपणा, स्वच्छतेची आवड, शिस्त, कार्यतत्परता, प्रत्येक कामाचे पृथःकरण करण्याची पद्धत, निडरपणा, बेधडकपणा, टीका शांतपणे ऐकून घेण्याची क्षमता, न्यायबुद्धी, भूतदया, दयाबुद्धी, व्यसन नसणे, व्यवस्थितपणा असे अनेक गुण एकत्रित सांगतात. शेवटी ते चरित्राच्या प्रथम आवृत्तीत म्हणतात, ''त्यांच्याविषयी सांगायचे म्हणजे सयाजीराव महाराज सज्जन आहेत, सयाजीराव महाराज थोर आहेत, आणि सयाजीराव महाराज ज्ञानी व गुणग्राही आहेत.'' दांडेकर यांनी महाराजांच्या सद्गुणांची चर्चा करताना महाराजांच्या अंगी असणारे दुर्गुणही सांगतात. ते म्हणतात, ''महाराजांच्या ठिकाणी ज्याला दुर्गुण म्हणता येतील असे नाहीतच, पण एकदोन गोष्टीत सद्गुणांचा अतिरेक त्यांच्या ठिकाणी दोषासारखा वाटतो.'' (दांडेकर, पृ. ३२५) महाराजांच्या अतिशिस्तीबद्दल आणि अतिव्यवस्थितपणा यामुळे समोरच्या व्यक्तीला त्रास होतो. ते गुण दांडेकर यांना दोषपूर्ण वाटतात.

रियासतकार सरदेसाई महाराजांच्या सहवासात अनेक वर्ष होते. त्यामुळे महाराजांचे सद्गुण त्यांना अधिक चांगले माहित होते. कामाच्या व्यासंगाबद्दल सरदेसाई म्हणतात, ''महाराजांचा एक मोठा हव्यास असा होता की, दररोज स्वतः आपण दहा-बारा तास काम करायचे आणि समस्त नोकरांकडूनही तसेच भरपूर काम करून घ्यावयाचे. त्यांच्या एकंदर व्यवसायाचे वेळापत्रक अत्यंत रेखीव असून त्यात बहुधा ते कोणताही व्यत्यय येऊ देत नसत.'' (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३४९) ते घडाळ्याच्या काट्यावर लक्ष ठेवून काम करत. महाराज सतत कामात व्यग्र असत. त्यांची दिनचर्या सरदेसाई यांनी दिली आहे. या दिनचर्येवरून महाराजांचा दिनक्रम किती व्यस्त होता हे लक्षात येते. सरदेसाई यांनी गोत्री आणि दांडेकर यांच्यासारखे महाराजांचे गुण वेगळे न देता घटना- प्रसंगातून देतात.

अनेक वेळा चरित्रकार सनावळ्या, घटना - प्रसंग यामध्ये अडकतात. तसेच चरित्रात सत्यता येण्यासाठी उपलब्ध साधनसामग्री आहे अशी दिली जाते. अशी साधनसामग्री दिल्यामुळे चरित्र आकाराने वाढते. ज्या सामग्रीचा थोडाबहुत चरित्रनायकाशी संबंध आहे, ती दिल्यामुळेही चरित्राचा आकार वाढतो. त्यामुळे चरित्र एकंदरीत सत्यनिष्ठ होते. परंतु चरित्राची कलात्मकता हरविते. गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि फाटक या पाचही चरित्रकारांनी घटनांची जंत्री मांडली नाही. या चरित्रकारांनी त्या - त्या स्थलकालाचा यथासांग तपशील दिला

नाही. महाराजांच्या जीवनाचे चरित्र ज्या सालापर्यंत लहिले आहे, तिथपर्यंत चरित्रपट रेखाटला आहे. या चरित्रात कलात्मकता आहे. त्याबरोबर आवश्यक त्या ठिकाणी आवश्यक ती साधनसामग्री वापरत सत्यता आणली आहे. चरित्र लिहिताना हे बंधन चरित्रकारांनी जपले आहे. यामधील दोन चरित्र लेखनाच्या कालखंडामध्ये बरेच अंतर आहे. ती चरित्रे त्या - त्या काळातील सर्वोत्तम चरित्रलेखन होते. या चरित्रकारांनी महाराजांची साधार, कलात्मक चरित्र लिहिली आहेत. चरित्राचा फाफटपसारा होणार नाही याची दक्षता घेतली आहे.

साधनसामग्रीच्या बाबतीत गोत्री लिखित चरित्राचा विचार केला तर साधनसामग्रीचा वापर तारतम्याने केलेला प्रकर्षाने दिसतो. गोत्री घटना - प्रसंग अत्यंत मोजक्या शब्दांत देतात. याबाबत एक घटना निर्देशित करावीशी वाटते. ती म्हणजे महाराजांच्या देशांतर्गत प्रवासाची. सयाजीराव महाराजांनी जगाबरोबर हिंदुस्थानातही प्रवास केला होता. गोत्री त्याची सर्व माहिती एका वाक्यात देतात. त्याबद्दल ते म्हणतात, ''हिदुस्थानातील मोठमोठाली शहरे हवेशीर व प्रेक्षणीय स्थळे, आणि लहान मोठी संस्थाने अवलोकन करून तेथील रितीरिवाज व राज्यपद्धती कशा प्रकारची आहे, ही माहिती मिळवण्यासाठी व त्याचप्रमाणे सद्यकाली सुधारणेचे केवळ माहेरघर होऊन बसलेल्या युरोपखंडात जाऊन ते पाहण्याची व तेथील योग्यत्या सुधारणा आपले राज्यात करण्याची महाराजांस फार उत्कट इच्छा उत्पन्न झाली, व त्याला अनुसरून आजपर्यंत त्यांनी दक्षिणेस मुंबई, लानोली, देवळाली, पुणे, सोलापूर, विजापूर, महाबळेश्वर, बेळगाव, बंगलोर, म्हैसूर, मद्रास, तंजावर, कुनुर, उटकामंड, सिलोन वगेरे उत्तरेस अमदाबाद, आबू, रतलाम, माहू, अजमीर, इंदूर, ग्वालेर, जयपूर, जोधपुर, दिल्ली, आग्रा, बनारस, कलकत्ता, लाहोर, अमृसर, मरी, गंगोत्री, सिमला, नैनीताल, काश्मीर, वगेरे अनेक प्रेक्षणीय व हवेशीर स्थळे व त्या त्या भागातील लहानमोठी संस्थाने कित्येकवेळा अवलोकन करून पुष्कळ अनुभव व माहिती मिळवली आहे.'' (गोत्री, पृ. १०४) गोत्री यांनी अशा प्रकारे चरित्रात मोजके, महत्त्वाचे घटना - प्रसंग देत चरित्र रेखाटले आहे.

चरित्रकारांनी चरित्र लेखन करताना परिश्रम घेतलेले दिसतात. का. ना. गोत्री लिखित सयाजीराव महाराजांच्या या चरित्रातील घटना, प्रसंग सत्य आहेत. ते सत्य आहेत यासाठी पडताळा सूची काय असा विचार केला तर लक्षात येते की, चरित्रकार महाराजांचे समकालीन आहेत. त्यामुळे त्यांना साधनसामग्रीची गरज काय? परंतु चरित्रकारांनी आवश्यक त्या ठिकाणी योग्य त्या साधनसामग्रीचा वापर करून त्याचा निर्देशही केला आहे. महाराजांनी अधिकारप्राप्तीनंतर लगेच सुधारणा चालू केल्या होत्या. त्याबद्दल तत्कालीन लेखकांनी लिहून ठेवलेल्या ग्रंथातील उतारे आपल्या मताच्या समर्थनासाठी दिले आहेत. त्यामध्ये, कै. बळवंतराव अनंत देव यांनी लिहिलेल्या 'श्री. कै. मल्हारराव महाराज गायकवाड यांचा खरा इतिहास,' गोपाळराव हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी लिहिलेल्या 'गुजरात देशाचा खरा इतिहास' या ग्रंथातील उतारे दिले आहेत. चरित्रकारांनी प्रस्तावनेतच साहाय्य केलेल्या नानासाहेब धुळप, ग्रंथपाल श्रीसयाजी पुस्तकालय बडोदे यांनी ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. म्हणजेच चरित्र लिहिताना साधनसामग्री आवश्यकता जाणतच या चरित्राची निर्मिती केली

आहे. परंतु चरित्रकार समकालीन असल्याने, महाराजांचे सेवक असल्याचे साधनसामग्रीसाठी त्यांची अधिकतर भिस्त ही आठवणींवर अवलंबून आहे. चरित्रकाराने आठवणी तपासून घेतल्या आहेत. आठवणींची मांडणी अत्यंत समतोलपणाने ठेवली आहे. अशा आठवणींबद्दल द. न. गोखले म्हणतात, ''इतिहास किंवा चरित्र यात वास्तवाचे प्रतिबिंब पडून त्यांचे इतिहासमूल्य वाढवण्यासाठी ही पद्धती अत्यंत उपयुक्त आहे. अशा पद्धतीने जे चरित्र निर्माण होते त्यात जरी तपशिलाच्या काही चुका राहिल्या, पाच - दहा तारखा चुकल्या, काही नावांत गफलत झाली, तरी ते चरित्र साक्षात निरीक्षणाचा आधार नसलेल्या, पण कागदपत्रांच्या आधारे साक्षेपाने लिहिलेल्या चरित्राहून एका अर्थी श्रेष्ठच होय.''[१४] या तत्त्वानुसारच गोत्री यांनी आपल्या आठवणी या चरित्राच्या मुख्य आधार मानल्या आहेत. आणि ते संयुक्तही आहे. कारण कोणत्याही चरित्रनायकाच्या पहिल्या चरित्राची निर्मिती ही बहुतांश चरित्रकाराच्या स्वतःच्या किंवा इतरांच्या आठवणींवर अवलंबून असते. तरीही चरित्रकारांनी त्यांना आवश्यक वाटणाऱ्या ठिकाणी चरित्रात संदर्भ वापरले आहेत.

दाते यांनी 'श्रीसायाजीगौरवग्रंथात' महाराजांचे चरित्र लिहिले. त्यामध्ये दाते यांना अनाकलनीय अशा बाबी देताना, चरित्रातील सत्यता वाढण्यासाठी साधनसामग्रीचा उपयोग केला आहे. त्यामध्ये स्टेनले राईस लिखित महाराजांच्या इंग्रजी चरित्राचे दोन खंड, फिलीप सर्जन्ट लिखित 'रुलर्स ऑफ बरोडा', प्रो. विडगरे यांनी संपादित केलेली महाराजांची भाषणे, श्रीरामशर्मा यांचे 'सयाजी चरितामृत', का. ना. गोत्री यांनी लिहिलेले 'सयाजीराव महाराजांचे चरित्र', सयाजीराव महाराज यांची मराठी आणि गुजराती भाषणे, `Baroda Administration Report 1930-31' आणि `Gazeteer Of Baroda' इत्यादी साधनांचा उपयोग केला आहे. दाते सयाजीराव महाराजांचे समकालीन होते. ते आठवणीवर चरित्र लिहू शकले असते. परंतु त्यांनीही या साधनसामग्रीचा वापर केल्याने चरित्र अधिक साधार झाले आहे. दाते शब्दकोश निर्मितीसाठी प्रसिद्ध असल्याने वाक्यरचना आणि शब्द विशिष्ट प्रकारचे आहेत. ती वापरताना कल्पकता वापरली आहे. त्यांनी महाराजांच्या भाषणांचा उपयोग करत महाराजांचे विचारही चरित्रांतून दिले आहेत.

दाते आणि दांडेकर यांनी एकाच कालखंडात चरित्र लिहिले. त्यांनीही चरित्रातील सत्यता येण्यासाठी साधनसामग्रीचा वापर केला आहे. दांडेकर महाराजांचे समवयस्क, साहित्य क्षेत्रातील नामांकित व्यक्ती होते. तरीही त्यांनी साधार चरित्र लिहिले. त्यामुळे हे चरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे.

रियासतकार सरदेसाई यांनी 'श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत' ग्रंथात लिहिल्या. या आठवणीत सरदेसाई स्वतः उपस्थित असल्याने त्यांना साधनसामग्रीची काही गरज पडली नाही. सत्यनिष्ठ आठवणी लिहिल्या आहेत. सर्वच चरित्रकारांनी सत्यतेला प्राधान्य देत चरित्रे साधार करण्याचा प्रयत्न केला आहे.

फाटक यांनी साधनसामग्रीचा उल्लेख केला नाही. परंतु प्रस्तावनेत त्यांनी महाराजांची चरित्रे कोणीकोणी लिहिली हे आवर्जून सांगतात. त्यामध्ये, ''इ.स.१९११ साली निहालसिंग नावाच्या

इसमाने महाराजांचे छोटे इंग्रजी चरित्र लिहिले. इ.स. १९३६ साली दाजी नागेश आपटे यांनी तीन खंडात चरित्र लिहिले. सरदेसाई यांनी त्यांच्या आठवणी छापल्या. इंग्रजीत स्टॅनले राइस, सार्जंट व टॉटनहॅमबाई यांनी चरित्रे लिहिली." (फाटक, प्रस्तावना, पृ. ५००) या चरित्रांचा उपयोग त्यांनी केला आहे. एकूणच सर्व चरित्रकारांनी साधनसामग्रीचा वापर करत चरित्रे साधार लिहिली आहेत.

गोत्री, दाते, दांडेकर, रियासतकार सरदेसाई हे महाराजांचे समकालीन चरित्रकार आहेत. त्यांचा बडोद्यात वावर होता. त्यामुळे बडोद्यातील घडामोडींशी ते परिचित होते. गोत्री आणि सरदेसाई तर महाराजांचे सेवक होते. त्यामुळे त्यांनी सामग्रीचा वापर कमी केला आहे.

चरित्रकारांनी आपली स्वतःची एक शैली वापरत, परिशीलन करत महाराजांच्या, सुधारणांविषयी, इंग्रजांना केलेल्या विरोधाबद्दल, महाराजांच्या एकूणच जीवनाबद्दल काही निष्कर्ष काढले आहेत. ते पाहणे महत्त्वाचे ठरेल.

गोत्री एक एक सुधारणा सांगतात. त्यामध्ये महाराजांचे व्यक्तित्व कसे दिसले याचे विवेचन करतात. महाराज खूप मोठा लवाजमा घेऊन हुजूर सवारीला बाहेर पडत. त्या कारणाने भरपूर पैसा खर्च होई. नंतर त्यांनी हा लवाजमा कमी केला त्याबद्दल गोत्री म्हणतात, ''रयतेचे पैशाचा अपव्यय होतो, तो होऊ नये म्हणून त्या बाबतींचा खर्च आता प्रत्येक वेळी करण्यात येत नाही. यावरून निरर्थक डामडौलाचा कंटाळा, प्रजेच्या पैशाचा दुरुपयोग न करण्याकडे मनाची थोर प्रवृत्ती, व प्रजेच्या कल्याणाविषयीची अत्यंत कळकळ हे गुण श्रीमंतांच्या अंगी चांगले रीतीने वसत आहेत, असे स्पष्ट दिसून येते." (गोत्री, पृ. १०२.) महाराजांच्या परदेशी दौऱ्यांविषयी त्याकाळात अनुकूल मत नव्हते. तरीही सर्व अडचणींवर मात करत महाराजांनी परदेश दौऱ्यासाठी लोकांना तयार केले. त्यांच्या या गुणांबद्दल गोत्री म्हणतात, ''परंतु अशा प्रसंगी महाराजांच्या दृढ निश्चयाची व धैर्याची वाखाणणी करावी तेवढी थोडीच आहे." (गोत्री, पृ. १०६) प्रत्येक सुधारणा किंवा घटना प्रसंगानंतर महाराजांचे कोणते गुण दिसले यांचे सारांशात्मक विवेचन चरित्रकार करतात. याची आणखी उदाहरणे देता येतील. महाराजांनी गरीब लोकांसाठी मोफत दवाखाने काढले त्याबद्दल म्हणतात, ''यावरून महाराजांचा कनवाळूपणा व दातृत्व उघड दिसून येत आहे." (गोत्री, पृ. १२२) तर महाराजांची धार्मिक मते आणि दुरभिमानता याच्या निवेदनानंतर गोत्री प्रथम आवृत्तीत म्हणतात, 'यात महाराजांची शालीनता व सत्यप्रिती हे गुण स्पष्ट दिसत आहेत.' म्हणजे महाराजांचे कार्य, कर्तृत्वाचे निवेदन प्रथम करायचे आणि त्यामध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे दिसले, व्यक्तित्व कसे दिसते यांचे निष्कर्षात्मक परिशीलन करायचे असा गोत्री यांच्या चरित्राचा एकंदरीत ढाचा आहे. चरित्राची मांडणी वेगवेगळ्या प्रकरणात केलेली असली तरी, गोत्री यांनी चरित्राचा एकसंघपणा दृष्टीआड केला नाही. त्यांनी चरित्रात एकजिनसीपणा आणताना फक्त नि फक्त महाराजांसंबंधी असणाऱ्या बाबी, घटना, प्रसंग यांना स्थान दिले आहे.

दाते महाराजांच्या जीवनावर भाष्य करताना म्हणतात, ''अगदी भोजनासारख्या साध्या बाबीपासून तो थेट धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय बाबीपर्यंत, विरोधाच्या, प्रच्छन्न

वैरभावाच्या वावटळीवर वावटळी उठल्या तरी शांत, स्थितप्रज्ञ राहून विरोधकास आपल्या बुद्धिबलाच्या प्रभावर आत्मसात करावयाचे. तडजोड नेहमीची वृत्ती खरी, परंतु कोणी सत्वावर किंवा पिढीजात हक्कावर घाला घालू पाहील, अथवा विनाकारण डिवचू लागेल तर अशा प्रतिपक्षाशी कोटीक्रमाने, युक्तीवादाने, पुराव्याने, विशिष्ट पद्धतीच्या उपहासाने, प्रसंविषेशी सत्तेचा, अधिकाराचा उपयोग करून प्रतिपक्षास नामोहरण करावयाचे. त्यात सहसा माघार घ्यावयाची नाही." (दाते, पृ. २४६) महाराजांच्या या धोरणामुळे अनेक वेळा इंग्रजांविरुद्ध ते नैतिक आधारावर तर जिंकत. महाराजांच्या सुधारणा आणि आदर्श जीवन यावर चरित्रकार भाष्य करतात. "महाराजांनी आपल्या मनचक्षूपुढे संकुचित ध्येय केव्हाही ठेविले नाही. स्वतः पुरते किंवा आपल्या संस्थानापुरतेच पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन नसून अखिल हिंदुस्थानचे किंबहुना आपल्या सर्व देशबांधवांचे कल्याण जेणेकरून होईल. त्यासाठी अहर्निश झटत असावयाचे, हेच महाराजांचे सर्वव्यापी उदात्त अंतिम ध्येय आहे." (दाते, पृ. २५०) महाराजांच्या जीवनाचे ध्येय हे अखिल मानव जातीच्या उन्नतीसाठी होते. त्यामुळे चरित्रकारांच्या नजरेत महाराज नेहमी आंतरराष्ट्रीय नेते ठरत होते.

दांडेकर महाराजांच्या दोन्ही संसाराविषयी (एक कौटुंबिक संसार आणि दुसरा राज्यकारभाराचा) मत व्यक्त करतात, "श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या आयुष्याकडे पाहिले असताना हीच गोष्ट प्रत्ययास येते. त्यांनी स्वतःचा संसार केला; नाही असे नाही. पण तो संसार करीत असताना ते त्यात गुरफटून गेले नाहीत. आपल्या राज्यसंसाराची त्यांना कधीही विस्मृती झाली नाही, व होत नाही. एकवेळ त्यांना संसाराचा विसर पडेल. पण राज्याचा संसार ते कधीही विसरणार नाहीत. कारण कर्तव्याची जाणीव त्यांच्या ठिकाणी इतकी प्रखर आहे." (दांडेकर, पृ. २९५) माणूस संसाराकडे दुर्लक्ष करत नाही. दुर्लक्ष केले तर त्याची घडी बिघडते. महाराजांच्या कार्यांची संसाराशी तुलना दांडेकर करतात. तर त्यांच्या जीवनाचे परिशीलन करतात. महाराजांच्या संपूर्ण कार्याविषयी लिहिताना प्रत्येक चरित्रकार त्यांच्या कार्याविषयी बोलतो. त्यांच्या सद्गुणाबद्दल सारांशाने लिहितो.

रियासतकार सरदेसाई यांनी महाराजांचे जीवन जवळून अनुभवले होते. त्यामुळे ते महाराजांच्या प्रत्येक चांगल्या बाबीबद्दल मत प्रकट करतात. "विद्वता, बुद्धिमत्ता, स्वार्थत्याग अशागुणात सयाजीरावांची गणना करता येणार नाही हे मलाही मान्य आहे. पण राज्यकर्तृत्वाच्या बाबतीत सयाजीराव अद्वितीय होते असे मला अद्यापि वाटते. इतिहासकार राजवाड्यांनी महाराष्ट्रातील शंभर वर्षाच्या कर्तृत्ववान व्यक्तीची मोजदाद घेणारा बहुमोल लेख चाळीस वर्षापूर्वीच पसिद्ध केला, त्यात त्यांनी पहिले नाव सयाजीरावांचे नमूद केले आहे." (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, आत्मनिवेदन, पृ. ३४३) सुधारणाबाबत रियासतकार सरदेसाई म्हणतात, "भारताच्या सामाजिक व वैचारिक जीवनाच्या सुधारणेत सयाजीरावांचा भाग केवढा मोठा आहे याची आता बाहेर फारशी कोणास कल्पना नाही. हळूहळू पन्नास-साठ वर्षे ही सुधारणा केवळ सयाजीरावांच्या पुरस्काराने सर्व देशात न समजता घडून येत होती." (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, सरदेसाई, पृ. ३९९) सयाजीराव महाराजांची चरित्रे वैयक्तिक जीवनातील बाबीपेक्षा सार्वजनिक बाबींनी भरलेली आहेत. कारण त्यांच्या राज्यकारभाराच्या कामाचा व्याप फार मोठा होता. त्यांना प्रजा सुजाण तर बनवायची होती, पण उद्याच्या एकसंघ

हिंदुस्थानचे स्वप्न उराशी बाळगून होते. महाराज ते स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने कोणतीही सुधारणा संस्थानात करीत.

सरदेसाई यांनी आपल्या आत्मचरित्रात महाराजांच्या संबंधित अनेक वेळा समतोल भाष्य केले आहे. महाराजांच्या आदर्श जीवनाचा प्रभाव सरदेसाई यांच्यावर होता. सरदेसाई यांनी महाराजांचे गुण आत्मसात केल्याची कबुली देतात. त्यातील एक अभिप्राय महत्त्वाचा आहे. ''बडोद्याच्या ह्या नोकरीत मला स्वतः पुष्कळ नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळाली, तसे अवांतर फायदेही पुष्कळच प्राप्त झाले. राज्यात महाराजांची जशी सर्वांगीण दृष्टी होती, तशा मलाही एकंदर जीवनात पुष्कळ सुधारणा करता आल्या. बडोदे शहराचा कित्ता जसा इतर संस्थानिक घेऊ लागले, तसेच माझ्या स्वतःच्या संसाराचे झाले. माझे सर्व बंधू व आप्तवर्ग शिक्षणाच्या बाबतीत त्वरेने पुढे सरसावले, माझ्या मुलांच्या शिक्षणाच्या सोयी सहज प्राप्त झाल्या.'' (माझी संसारयात्रा, सरदेसाई, पृ. ४८६) महाराजांमुळे आपल्या जीवनाला नव्हे तर आपल्या कुटुंबाला स्थिरता आणि प्रगती प्राप्त झाल्याचे म्हणतात.

फाटक यांनी महाराजांचे संपूर्ण चरित्र लिहिले. सयाजीराव महाराजांच्या चरित्राकडे आदर्श राजाचे चरित्र म्हणून पाहतात. तसे निरीक्षण त्यांनी वेळोवेळी चरित्रात नोंदविले आहे. ते म्हणतात, महाराजांना इ. सन १८८१ च्या अखेर राज्याधिकार मिळाल्यापासून तो १९३९ सालात मृत्यू येईपर्यंत महाराजांनी आदर्श राज्य निर्मून एक असामान्य कर्तृत्वाचा राज्यकर्ता अशी कीर्ती मिळविली. त्यांच्या बडोदे या राजधानीचा विचार करू लागल्यास ही राजधानी म्हणजे जगातील प्रसिद्ध राजधान्यांचे एक लहानसे प्रतिरूपच अशी तिची योग्यता दिसून येते. (फाटक, पृ. ५३०) महाराजांनी आदर्श राज्याची छोटी प्रतिकृती निर्माण केली होती. अनेक देशांना भेटी दिल्याने ते आंतरराष्ट्रीय पर्यटक ठरले होते. त्यांची जागतिक पातळीवर विद्वान राजा अशी ओळख होती.

सयाजीराव महाराज यांच्यावरील या चरित्रांमधून त्यांचा सामान्य ते असामान्य असा जीवनप्रवास दिसतो. ही चरित्रे स्पष्ट करतात की, प्रामाणिकपणे कष्ट केले, देशबांधवांवर प्रेम केले तर आपापल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी मारता येते. त्यामुळे ही चरित्रे स्वतःचे, देशाचे भवितव्य घडवू पाहणाऱ्या विद्यार्थी, राजकारणी, विविध क्षेत्रात कार्य करणारांना प्रेरणादायी आहेत. थोडक्यात दूरदृष्टी, प्रामाणिकपणा, देशप्रेम आणि बंधुत्वाची शिकवण हा या चरित्रांचा गाभा आहे. माणूस जन्माने नव्हे, तर त्याच्या कर्तृत्वाने संस्मरणीय ठरतो. हेही या चरित्रांमुळे पुन्हा अधोरेखित होते.

- डॉ. राजेंद्र स. मगर,
निमगाव (म.), जि. सोलापूर.

संदर्भटीपा -

१. व्ही. के. चावडा, 'सयाजीराव गायकवाड', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, १९८७, पृ. ६.
२. तत्रैव, पृ. ९.
३. महात्मा गांधी यांचे येरवडा जेलमधून सयाजीराव महाराजांना पत्र, ८ मार्च १९३३, 'श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा महाराष्ट्रातील सत्कार' (संपादक- रा. शा. पाटील), सरकारी छापखाना, बडोदे, १९३३, पृ. १६१.
४. धारासभा - महाराजांनी राज्यकारभार करण्याचे शिक्षण घेतले. परंतु त्यांना आपल्या जोडीला एक सल्लागार मंडळ असावे असे वाटत होते. म्हणून त्यांनी प्रथम इ. स. १८८३ साली न्याय, जमाबंदी, अंमलबजावणी आणि खाजगी खात्याच्या प्रमुखांचे एक 'सल्लागार मंडळ' नेमले. परंतु त्यामध्ये काळानुसार बदल करत इ. स. १९०७ साली यामध्ये सुधारणा करत सल्ला देण्यासाठी 'धारासभा' निर्माण केली. त्यामध्ये लोकनियुक्त सभासद घेतले. या धारासभेत प्रथम सतरा सभासद होते. टप्प्याटप्प्याने ही संख्या वाढवून ती सत्तावीस करण्यात आली. ते सत्तावीस सभासद असे होते, ६ सभासद - दिवाण आणि पाच सरकारी अधिकारी (अधिकाऱ्यात न्याय, जमाबंदी, खात्याचे प्रमुख, न्यायमंत्री, वरिष्ठ कोर्टाचा सरकारी वकील व सरसुभे मिळून पाच,) ११ सभासद - सरकारने नेमलेले सभासद यात सात अधिकारी व चार निमसरकारी १० - सभासद लोनियुक्त सभासद (बडोदा ३, कडी ३ , नवसारी २, अमरेळी २)
५ . हुजूर हुकुम - सयाजीराव महाराज संस्थानात नवीन नियम करीत, त्यावेळी ते लिखित स्वरुपात असे. कारण तोंडी सांगितलेला नियम कायमस्वरूपी लक्षात राहील किंवा नाही याची शाश्वती नसे. त्यासाठी त्यांनी लिखित नियम ठेवणे क्रमप्राप्त केले. महाराज दौऱ्यावर असताना, झोपताना, अगदी घोड्यावर असताना सुद्धा कागद आणि पेन्सिल त्यांच्या जवळ बांधलेले असत. कारण कोणताही सुचलेला विचार नष्ट होऊ नये, म्हणून तो लगेच लिहून काढावा यासाठी ही सोय असे. त्यांनी एकूण पंच्याहत्तर हजार हुजूर हुकुम काढले.
६. वरखेडे रमेश, 'सयाजीराव गायकवाड यांची भाषणे' (खंड-३), प्रस्तावना, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ.,२०१३, पृ. ९.
७. मोरे सदानंद, 'लोकमान्य ते महात्मा', राजहंस प्रकाशन, पुणे, २००७, पृ. २७५.

८. आज्ञापत्रिका - बडोदा राज्यात केलेले कायदे लोकांना समजावेत, त्याबद्दल लोकांचा गैरसमज होऊ नये, राज्यकारभार कसा चालतो हे लोकांना समजावे, यासाठी दर गुरुवारी साप्ताहिक 'आज्ञापत्रिका' काढण्यात येत असे. त्यामध्ये राज्यकारभारासंबंधी माहिती देण्यात होती.

९. शिंदे वि. रा., 'श्री. महाराजांचे अस्पृश्योद्धारक कार्य,' समाविष्ट, 'श्रीसयाजीगौरवग्रंथ' (भाग - ३) (संपादक - माने पाटील रा. शा.), वाढदिवस मंडळ मुंबई व बडोदे, १९३३, पृ. ८०

१०. 'सयाजीराव गायकवाड', 'सयाजीराव गायकवाड यांची भाषणे' (खंड-१), साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३, पृ. १०१.

११. सयाजीराव महाराजांच्या पूर्वी बडोदा संस्थानात वेगवेगळ्या प्रांतात सारा वसुलीच्या वेगवेगळ्या पद्धती होत्या. त्या पद्धतीची ही नावे आहेत.

१२. 'सयाजीराव गायकवाड', 'सयाजीराव गायकवाड यांची भाषणे' (खंड-४), साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१४, पृ. ३५.

१३. कीर धनंजय, मालशे स. गं. आणि य. दि. फडके (संपादक), 'महात्मा फुले यांचे समग्र वाङ्गमय', म.रा. सा.आणि सं. मं. मुंबई, २००६, (प्र.आ.१९६९) पृ. ६११.

१४. गोखले द. न., 'चरित्र - चिंतन', मौज प्रकाशन, मुंबई, १९८५, पृ. ३१.

१

गुर्जर खंडाधीपती

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचे संक्षिप्त चरित्र

काशीनाथ नारायण गोत्री

गुर्जरखंडाधिपती

श्रीमंत महाराज

सयाजीराव गायकवाड

यांचें

संक्षिप्त चरित्र.

आवृत्ति दुसरी.

हें पुस्तक,

काशीनाथ नारायण गोत्री

यांनीं तयार करून

" इंदुप्रकाश " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १९१० इ.

किंमत १२ आणे.

अर्पण पत्रिका

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सरकार
सेनाखासखेल समशेर बहादूर
जी. सी. एस. आय.
फरजंदे-खास-ए-दौलत-ए-इंग्लिशिया,
इत्यादी यांस

त्यांची विद्वत्ता, चतुरता, निर्व्यसनीयता, दृढनिश्चय, स्वदेशाची व स्वप्रजेच्या उन्नतीची
स्पृहणीय कळकळ, लोकमान्यता व विद्याभिरुची
इत्यादी प्रशंसनीय गुणांच्या संस्मरणार्थ,
हे लहानसे पुस्तक
त्यांच्या परवानगीने अत्यंत नम्रतापूर्वक
अर्पण केले आहे
हुजूरचा अत्यंत नम्र सेवक
ग्रंथकार

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड

जन्म : मिती फाल्गुन वद्य ६, मंगळवार, शके १८७४

प्रजा हाच की वत्स भूधेनुकेचा
नृपा तू करी फार सांभाळ याचा
स्ववत्साचिया जाण वात्सल्य योगे
अभिष्टार्थ देईल हे भूमी वेगे

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

इतिहासाचे महत्त्व आज कोणास नव्याने सांगितले पाहिजे असे नाही. त्याची सर्वमान्यता सुप्रसिद्धच आहे. त्यातच चरित्र लेखनाचाही अंतर्भाव होतो. देशाचा इतिहास वाचल्याने जसे ज्ञान होते, तसेच देशांतील शहाणे, सदाचरणी, शूर वगैरे अनेक गुणांनी लोकमान्य झालेल्या मनुष्यांची चरित्रे वाचल्यानेही पुष्कळ बोध होतो. त्यांचे स्वभाव, गुण, वर्तन, गृहस्थिती ही नीटपणे आपल्यास कळतात. तसेच त्यांच्या जीवनयात्रेत त्यास काय अडचणी आल्या, त्यांचे नुकसान कसे व कशाने झाले, त्याचे निवारण करून ते कसे उदयास आले व त्यांनी आपला हेतू कशा रीतीने तडीस नेला वगैरे गोष्टी कळून आल्याने आपल्यास आयुष्यक्रमण करण्यास फार उपयोग होतो, कारण अनुकरण करण्याविषयी सामान्यतः मनुष्यांची फार प्रवृत्ती असते. एखाद्याने चांगले कृत्य केले आणि त्यामुळे त्याचे हित झाले असे पाहिले म्हणजे आपणही त्याचप्रमाणे करावे असे मनुष्यांस साहजिक वाटते. तसेच एखाद्याची दुर्वर्तनामुळे अमूक प्रकारे हानी झाली असे समजले असता तशा वर्तनापासून दूर राहण्याविषयी मनुष्य सावध राहतो म्हणजे पुढच्यास ठेच मागचा शहाणा ही म्हण खरोखर प्रत्ययास येते. यास्तव अशा व्यक्तिविशेषाच्या सर्व कृत्यांचे, आचरणाचे व त्याच्या परिणामाचे वर्णन असते ते चरित्र ग्रंथ अत्यंत हितावह व बोधप्रद होत. अशी चरित्रे इंग्रजी भाषेत पुष्कळ आहेत. आपल्या मराठी भाषेतही आता बरीच चमकू लागली आहेत. त्यांचा पुष्कळ भरणा व्हावा व लोकांना वाचण्यास मिळावीत म्हणजे आज जी आमची शोचनीय स्थिती दिसते त्यापेक्षा काही सुधारणा दिसल्यावाचून राहणार नाही. अशा हेतूने हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

वस्तुतः अशा प्रकारचा हा माझा पहिलाच प्रयत्न असून त्यास लागणारे सामर्थ्य आणि विद्वत्ता यांची माझे ठिकाणी उणीव आहे व त्यामुळे ग्रंथ लेखनात पुष्कळ चुका राहिल्या असतील हे मी प्रांजळपणे कबूल करितो. चरित्र लेखनास लागणारी भाषाप्रौढी, निरीक्षणपटुता व वर्ण करण्याची हातोटी वगैरे गुणांची ज्यास साह्यता आहे अशा एखाद्या विद्वान पदवीधर गृहस्थांकडून

हा चरित्र लेख लिहिला गेल्यास चरित्र नायकाच्या वर्णनीय गुणसमुच्चयामुळे तो लोकादरास अधिक पात्र होईल यात संशय नाही. तसा सुयोग केव्हा घडून येईल तो येवो, तोपर्यंत दुधाची तहान ताकाने भागवावी, या म्हणीस अनुसरून हा चरित्र लेख लिहिण्याचे मी धाडस केले आहे. तरी हंसक्षीर न्यायाने यातून ग्रहण करण्यासारखा भाग वाचकांनी ग्रहण करावा अशी विनंती आहे.

या ठिकाणी एक गोष्ट मला सांगितली पाहिजे ती ही की, मी श्री. गायकवाड सरकार यांचा पिढीजाद नोकर असून महाराजांचे खासगी खात्यात सुमारे अठरा वर्षे झाली नोकरी करीत आहे व त्यामुळे श्रीमंतांचे सान्निध्यात सेवा करण्याचा व तदनुरोधाने त्यांचे समागमे काही वर्षे प्रवास करण्याचा व त्यांचे निकट सहवासाचा अनुपम लाभ सुदैवाने प्राप्त होऊन त्यांच्या अनेक प्रशंसनीय गुणांचा मला अनायासे परिचय झाला आणि त्यामुळे त्यांजविषयीची पूज्यबुद्धी व स्वामीनिष्ठा स्वाभाविकपणे अधिक दृढ झाली. त्याचेच प्रस्तुतचे पुस्तक हे फळ होय. अर्थात त्या संतोषकारक सेवेचा हा परिणाम असल्याने त्यांचे यश श्रीमंतांकडे आहे.

हा ग्रंथ लिहिण्याच्या कामी रा. सा. गोविंदराव सखाराम सरदेसाई, बी. ए. यांनी कित्येक उपयुक्त सूचना केल्या व ग्रंथ छापत असताना त्याच्या पहिल्या भागाची प्रूफे तपासून देण्याची विनंती मान्य करून प्रूफे तपासून दिली. या त्यांच्या थोर उपकृतीबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणे रा. ब. शंकरराव विष्णू पुराणिक, बी. ए. व रा. ब. शंकरराव विठ्ठल पुणेकर, माजी पर्सनल मॅनेजर नि. श्री. गायकवाड सरकार यांनी वेळोवेळी मला प्रोत्साहन दिले. रा. रा. नानासाहेब सूर्याजीराव धुळप, माजी लायब्ररियन श्री सयाजी पुस्तकालय, बडोदे यांनी वेळोवेळी लागतील ते ग्रंथ पुस्तकालयातून दिले आणि श्री. माणेकलाल अंबाराम डॉक्टर, श्री.गुजराथी सयाजी विजय पत्राचे मालक यांनी पुस्तक प्रकाशनाचे काम अंगावर घेऊन ते शेवटास नेले त्याबद्दल त्या सर्वांचा मी आभारी आहे.

या पुस्तकात सन १९०४ च्या फेब्रुवारी मास अखेरपर्यंतचा श्रीमंतांचा आयुष्यक्रम, त्यांनी केलेली भाषणे व लिहिलेले सार्वजनिक लेख यांचा समावेश केला आहे. त्यानंतरही मुंबई, कलकत्ता, युरोप वगैरे ठिकाणी श्रीमंतांची राजकीय, सामाजिक वगैरे विषयांवर महत्त्वाची भाषणे झालेली आहेत व होत आहेत, त्यांचा समावेश या पुस्तकात करिता आला नाही, तो या पुस्तकाची द्वितीयावृत्ती काढण्याचा सुप्रसंग आल्यास त्यात करण्यात येईल.

बडोदे, बऱ्हाणपुरा
तारीख १२-९-१९०५ ग्रंथकर्ता

प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात हिंदुस्थानात अनेक संस्थाने होती. संस्थानावर राजे राज्य करीत होते. ते राज्य करीत असले तरी त्यांवर इंग्रजांचा अंकुश होता. त्यांना नावापुरते स्वातंत्र्य होते. रेसिडेंट नावाचा इंग्रज अधिकारी संस्थानावर नजर ठेवून असे. संस्थानिकांना कोणताही निर्णय घेताना रेसिडेंटला विचारात घ्यावे लागत असे. परंतु काही प्रमाणात त्यांना स्वातंत्र्य असे. ते संस्थानात सुधारणा करू शकत होते. प्रजाहित जपण्याचे स्वातंत्र्य त्यांना होते. परंतु अनेक संस्थानात अनाचार, डामडौल याचा उच्छाद असे. तर मोजकेच संस्थानिक प्रजाहित जपत होते.

जे संस्थानिक प्रजेचे हित जपत होते, त्यामध्ये बडोद्याचे नृपती सयाजीराव महाराज (तिसरे) आघाडीवर होते. सयाजीराव महाराजांनी आपल्या संस्थानात इंग्रजांनाही दिपवून टाकणाऱ्या सुधारणा केल्या. पुढारलेल्या पाश्चात्य देशापेक्षा अधिक सुधारणा केल्या. त्या काळात आवश्यक असणाऱ्या क्षेत्रात सुधारणा केल्या. त्यामुळे प्रजेचे जीवनमान सुधारले. प्रजा सुखी झाली. वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविला. महाराज फक्त सुधारणांचे उद्गाते न राहता आधुनिक जगात आदर्श राज्यकर्ते ठरले.

त्यामुळे त्यांच्या राज्यकारभाराच्या पद्धतीविषयी आणि सुधारणांविषयी अनेक श्रेष्ठ व्यक्तींनी गौरवउद्गार काढले आहेत. महात्मा गांधी म्हणतात, 'कायद्याने अस्पृश्यतेचा कलंक पुसून शिक्षण देणारे सयाजीराव गायकवाड पहिले आहेत.' स्वामी विवेकानंद म्हणतात, 'सर्व राजात देशाभिमान व बुद्धीमत्तेबाबत सयाजीरावांचा माझ्यावर विशेष प्रभाव आहे.' चक्रवर्ती राजगोपालचारी म्हणतात, 'हिंदुस्थानात दोनच खरे राजे. छत्रपती शिवाजी महाराज आणि सयाजीराव गायकवाड.' लोकमान्य टिळक म्हणतात, 'बडोदे स्वतंत्र भारताच्या राज्यकारभाराची प्रयोगशाळा आहे.' रवींद्रनाथ टागोर म्हणतात, 'साहित्य, कला आणि संस्कृतीच्या जपणुकीची दूरदृष्टी व दातृत्व सयाजीराव होत.' याशिवाय महाराजांच्या कार्याची महती अनेक महनीय व्यक्ती स्पष्ट करतात.

सयाजीराव महाराजांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, ओद्योगिक, आरोग्य, शेती, लोकशाही रुजविणे, जलसिंचन, महिला सबलीकरण, सार्वजनिक ग्रंथालये, कला, देशाचे स्वातंत्र्य, देशाचा एकसंघपणा आणि इतर अनेक क्षेत्रात आपल्या कामगिरीने ठसा उमटविला. एका शेतकऱ्याचा मुलगा अचानकपणे बडोदा संस्थानचा राजा होतो. जगातील सर्वोत्तम त्या सुधारणा बडोदा संस्थानात आणतो. या बाबी चरित्रकारांना आकर्षित करणाऱ्या ठरल्या. त्यामुळे साहजिकच सयाजीराव महाराजांची चरित्रे निर्माण झाली.

सयाजीराव महाराजांचे पहिले मराठी चरित्र काशिनाथ नारायण गोत्री या त्यांच्या सेवकाने लिहिले. गोत्री स्पष्ट करतात की, ''मी श्री. गायकवाड सरकार यांचा पिढीजात नोकर असून महाराजांचे खाजगी खात्यात सुमारे अठरा वर्ष नोकरी करत आहे व त्यामुळे श्रीमंतांचे सानिध्यात सेवा करण्याचा, व तदनुरोधाने त्यांचे निकट सहवासाचा अनुपम लाभ सुदैवाने प्राप्त होऊन त्यांच्या अनेक प्रशंसनीय गुणांचा मला अनायासे परिचय झाला. आणि त्यामुळे त्यांच्याविषयी पूज्यबुद्धी व स्वामीनिष्ठा स्वाभाविकपणे दृढ झाली. त्याचेच प्रस्तुतचे पुस्तक हे फळ होय.'' (प्रस्तावना, पृ. ८६) गोत्री यांनी अतिशय चिकाटिने हे चरित्र लिहिले. सयाजीराव महाराजांचा 'रौप्य महोत्सव' इ. स. १९०७ साली साजरा झाला. त्याअगोदर इ. स. १९०५ साली गोत्री यांनी महाराजांचे चरित्र प्रथम लिहिले. त्यामध्ये इ. स. १९०४ सालापर्यंतचे निवेदन येते. या वर्षापर्यंत महाराजांनी केलेल्या सुधारणा, त्यांच्या जीवनातील प्रमुख सुख - दुःखाचे प्रसंग नोंदविले आहेत. सयाजीराव महाराजांचे पहिले मराठी चरित्र, त्यांच्या सेवकांनी लिहिलेले चरित्र यामुळे या चरित्राला ऐतिहासिक महत्त्व आहे.

चांगल्या व्यक्तींची चरित्रे वाचल्याने मनुष्याच्या जीवनात प्रगती होते. सयाजीराव महाराजांचे चरित्र वाचल्याने असाच फायदा होईल असे गोत्री यांना वाटते. त्यामुळेच त्यांनी चरित्र लिहिल्याचे ते प्रस्तावनेत म्हणतात, ''एखाद्याने चांगले कृत्य केले आणि त्यामुळे त्याचे हीत झाले असे पाहिले म्हणजे आपणही त्याचप्रमाणे करावे असे मनुष्यास साहजिक वाटते. तसेच एखाद्याची दुर्वतनामुळे अमुक प्रकारे हानी झाली असे समजले असता तशा वर्तनापासून दूर राहण्याविषयी मनुष्य सावध राहतो म्हणजे, पुढच्यास ठेच मागचा शहाणा. ही म्हण खरोखर प्रत्ययास येते. यास्तव ज्यात व्यक्तीविशेषांच्या सर्व कृत्यांचे, आचरणाचे, व त्याच्या परिणामांचे वर्णन असते ते चरित्र ग्रंथ अत्यंत हितावह व बोधप्रद होत.'' (प्रस्तावना, पृ. ८५) महाराजांनी प्रजेसाठी उभारलेल्या सुधारणा, आदर्श व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवण्यासाठी प्रस्तुत चरित्रग्रंथाची निर्मिती झालेली दिसते.

या चरित्राच्या पहिल्या आवृत्तीचे स्वरूप पाहिले तर लक्षात येते की, चरित्राची मांडणी दोन भागात केली आहे. पहिल्या भागात 'श्रीमंत महाराज सयाजीराव यांचे संक्षिप्त चरित्र' दिले आहे. तर दुसऱ्या भागात महाराजांनी स्वतः लिहिलेले तीन लेख, त्यांनी विविध प्रसंगी केलेली अठरा भाषणे, चिमणाबाई यांचे भाषण, सर जमशेटजी जिजीभाई यांचे भाषण आहे. चरित्राची अशी वैविध्यपूर्ण रचना आहे. दुसऱ्या आवृत्तीत दुसऱ्या भागात फक्त 'निशाणी - ३' दिल्या आहेत. चरित्र जरी वैविध्यपूर्ण असले तरी पहिल्या भागामध्ये एकप्रकारची सुसुत्रता आहे. एकामागून एक घटना, प्रसंग येतात. त्या घटना, प्रसंगातून चरित्रनायकाचे व्यक्तित्व समजते.

गोत्री सयाजीराव महाराजांचा पूर्वजांच्या इतिहास न सांगता त्यांच्या चरित्राच्या निवेदनाला सुरुवात करतात. सयाजीराव महाराजांच्या पूर्वी मल्हारराव महाराज राजे होते. त्यावेळी बडोद्यात असणाऱ्या वाईट परिस्थितीचे वर्णन करत आत्ता सयाजीराव महाराजांच्या काळात परिस्थिती कशी सुधारली आहे याची तुलनात्मक नोंद घेतात. महाराजांचे चरित्र किती बोधप्रद आहे हे

चरित्राच्या सुरुवातीला स्पष्ट करून प्रारंभ करतात. तर 'महाराजांस अगत्याची विज्ञप्ती' या शीर्षकाखाली काही सूचना करत चरित्राचा शेवट केला आहे. चरित्राचा प्रारंभ आणि शेवट नाविण्यपूर्ण आणि वैशिष्टपूर्ण आहे.

गोत्री महाराजांचे सेवक असल्याने इतर चरित्रकारांनी न दिलेल्या बाबी या चरित्रात येतात. त्यामध्ये बडोद्यात सुरू असलेली वर्तमानपत्रे, त्यांना महाराजांनी दिलेले स्वातंत्र्य, लोकसंस्था यांचा समावेश आहे. (पृ. ११३) तर 'सांसारिक प्रसंगा'मध्ये वडिलधाऱ्या व्यक्तीविषयी महाराजांच्या वंदनीय विचारांचे दर्शन घडवतात. (पृ. १२७) सयाजीराव महाराजांनी राजपद हाती घेतल्यानंतर वडीलधाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला.

चरित्रात घटना, प्रसंग सुटे-सुटे दिले आहेत. सुधारणांचे निवेदन करताना मुख्य शीर्षकाखाली उपशीर्षके देत निवेदन येते. म्हणजेच मुख्य विषय समजावा हा उद्देश आहेच त्याचबरोबर वाचकांना त्यातील लहान - लहान बाबी समजाव्यात असा चरित्रकारांचा हेतू दिसतो. उदाहरणार्थ, 'धार्मिक सुधारणा' या शीर्षकाखाली त्यांनी, वेदोक्त कर्म सुरू केले, जातीनिर्बंध न ठेवितां धर्मादाय देण्याची पद्धत सुरू केली, वैदिक धर्मास उत्तेजन, धर्मार्थ दवाखाने काढले, शेतकीच्या उपयोगी जनावरांची हिंसा बंद केली, ग्रहणाची रजा बंद केली. परदेशगमनाचे प्रायःचित्त बंद केले, महाराजांची धार्मिक मते आणि दुराभिमानता इत्यादी उपमुद्दाच्या साहाय्याने आपले मत सुक्ष्म स्वरूपात मांडतात. त्याचबरोबर 'औद्योगिक सुधारणा', 'सांसारिक सुधारणा', 'ब्रिटीश सरकारांवरील प्रेम व निष्ठा', 'सांसारिक प्रसंग', 'राजकीय प्रसंग', 'महाराजांचे नैसर्गिक गुण', 'महाराजांस अगत्याची विज्ञप्ती' या शीर्षकाखालीही उपशीर्षके देत चरित्र पुढे जाते. प्रसंग कोणता त्याचे शीर्षक डाव्या बाजूला देतात. त्यात अत्यंत संक्षेपाने वर्णन करतात.

चरित्राच्या आरंभीच गोत्री यांनी गरीबांच्या दुःखाचे परिमार्जन करण्यासाठी गरीब व्यक्तीच सत्ताधीस व्हावा आणि तोच जनमाणसाची दुःखे निपटून काढू शकतो असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे सयाजीराव महाराजांनी सुधारणांचा डोंगर उभारून जनतेच्या समस्या कमी केल्या त्याबद्दल गोत्री गरीबीत जन्मलेल्या मुलाचे आणि राजवाड्यात जन्मलेल्या राजपुत्राची तुलना करतात. ते म्हणतात, ''श्रीमंतीतच ज्यांचा जन्म झाला असतो, त्यांना गरीबांची दुःखे व अडचणी समजून घेऊन, त्याचे परिमार्जनाचे उपाय करावे लागतात; परंतु माजी महाराजांचे अमलात येथील प्रजेस जो अत्यंत दुःखानुभव येत गेला, त्याचे परिमार्जन होण्यास, गरीब कुटुंबात जन्म घेऊन त्यातील अनुभवाचा स्वाद घेतलेले पुरुषाकडून ती दुःखे नाहिशी करण्याचे उपाय होणे जास्त श्रेयस्कर व सुखावह असल्याने, ईश्वरानेंच तशी योजना मुद्दाम लोकहितार्थ कृपाळू होऊन केली होती असे म्हटले तरी चालेल.'' (पृ. ९६) पुढील सुधारणांची कल्पना किंवा महाराजांनी ज्या काही सुधारणा केल्या त्याविषयी उत्सुकता निर्माण केली आहे. 'दत्तक देण्याची योजना' आणि 'दत्तकाची निवड' या दोन भागात गोत्री महाराजांची निवड कशी रास्त, योग्य होती याचे निवेदन करतात. ''आशा पुरुषाची निवड करण्याचे काम सामान्य नाही. परंतु राज्यांचे पुण्याईने व प्रजेच्या सुदैवाने, ते काम मासाहेबांनी उत्तम रीतीने बजावले आहे.'' (पृ. ९७) महाराजांची दत्तकपुत्रासाठी झालेली निवड दैवयोगाने झालेली आहे.

परंतु या निवडीने बडोद्याचे भाग्य कसे उजाडले, याचीही माहिती देतात. यानंतर सर टी. माधवराव यांनी महाराजांचे शिक्षण चालू असताना संस्थानच्या राज्यकारभार कसा व्यवस्थित केला हे सांगतात. महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना प्रसंगाचे निवेदन करतात. त्यामध्ये दत्तकविधानाचा समारंभ, विद्याभ्यास, प्रथमविवाहसमारंभ, राज्यारोहणसमारंभ, प्रजेस दिलेली सनद, प्रजेच्या स्थितीचे अवलोकन, श्री. सौ. मा. चिमणाबाईसाहेब कैलासवासी झाल्या, युवराजाचे जन्मवृत्त, महाराणींचे स्मारक, दुसराविवाहसमारंभ अशा घडलेल्या घटनांची कालक्रमे नोंद घेत चरित्र पुढे जाते. ज्याप्रमाणे महाराजांना उत्तम शिक्षण मिळाले, शिक्षणामुळे उन्नती कशात आहे हे समजले, त्याचप्रमाणे दुसऱ्या महाराणींनी सुद्धा बहुश्रुत व्हावे असे महाराजांना वाटत होते. महाराणींच्या शिक्षणाबद्दल गोत्री लिहितात, ''त्यांचा मराठी, गुजराती व इंग्रजी अभ्यास उत्तम प्रकारचा झाला असून स्त्रीवर्गाची उन्नती होण्यास त्यांस वेगवेगळ्या प्रकारचे उत्तम शिक्षण मिळाण्याची आवश्यकता आहे; व शिक्षणाशिवाय स्त्री किंवा पुरुषवर्गाची उन्नती होणार नाही अशी त्यांची दृढ समजूत झालेली आहे.'' (पृ. १०३) यातून महाराजांचा शिक्षणाविषयी असणारा सकारात्मक दृष्टीकोन स्पष्ट करतात. तसेच चरित्रनायच्या सानिध्यातील व्यक्तींची अत्यंत तारतम्याने निवेदन केलेले समजते. महाराजांच्या आयुष्यातील पहिला युरोप प्रवास महत्त्वाचा होता. कारण इ. स. १८८६ - ८७ साली परदेशगमन निशिद्ध मानले जात होते. त्या काळात एका राजाच्या प्रमुखाने परदेश प्रवास करण्याचे ठरविल्याने गजहब माजला होता. कारण परदेश प्रवास धर्मशास्त्राविरूद्ध होता. मात्र महाराजांनी त्यावर अत्यंत कुशलतेने मात केली. गोत्री महाराजांचे सेवक असल्याने या विषयाची माहिती त्यांना असणे क्रमप्राप्त होते. परंतु महाराजांनी त्यावर कशी मात केली याबद्दल ते म्हणतात, ''त्यांचे (सयाजीराव महाराज) मन या प्रवासापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असे. महाराजांचे मन दुखू नये म्हणून, कित्येक बाह्यात्कारी त्यांचे तोंडावर अनुकूलता भासवीत; परंतु खरोखर अंतकरणापासून त्यांची संमती नसे. हे सर्व प्रकार महाराज मनात जाणून होते. परंतु या प्रवासापासून कोणकोणते फायदे आहेत, हे या मंडळीस समजत नसून धार्मिकपणाच्या फाजील बंधनामुळे व महाराजांच्याठायी असलेल्या पूर्ण प्रीतीमुळेच ही असंमती दर्शवण्यांत येत आहे, हे जाणून त्यांनी आपला निश्चय यत्किंचितही ढळू दिला नाही.'' (पृ. १०५) महाराजांच्या जीवनातील ठळक, घटना प्रसंग सांगून झाल्यावर गोत्री सुधारणांकडे वळतात. सुधारणांच्या सुरुवातीला गौरव न करता समकालीन लेखकांनी त्यांच्याविषयी काय म्हटले आहे याचे लेख संदर्भासाठी देतात. चरित्र साधार करण्याचा चरित्रकारांचा प्रयत्न आहे.

या चरित्राच्या पहिल्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात सयाजीराव महाराज यांनी स्वतः लिहिलेले लेख, भाषणे, चिमणाबाई यांचे भाषण आणि जिजीभाई मेहता यांच्या भाषणांचा समावेश आहे. चरित्रात लेख भाषणे समाविष्ट केल्याने चरित्राची सत्यता आणखी वाढली जाते. ही भाषणे महाराजांनी महत्त्वाच्या प्रसंगी दिली आहेत. त्या भाषणातून एखादा विषय अभिव्यक्त करण्याची महाराजांची पद्धत समजते. महाराज आपल्या भाषणातून छोटी छोटी उदाहरणे देतात. आपले विचार समोर बसलेल्यांच्या गळी उतरवण्याची महाराजांची हातोटी वाखाणण्याजोगी

आहे. आत्ता आणि पुढे अनेक वर्ष सयाजीराव महाराजांच्या विचारांचा वारसा उपयोगी पडणारा आहे. त्याचे पुन्हा पुन्हा विश्लेषण, संश्लेषण घडणारे आहे. त्यातून अनेक तथ्ये बाहेर पडणारी आहेत. हा वैचारीक वारसा महाराजांच्या लिखाणातून, भाषणातूनही उपलब्ध आहे. म्हणून गोत्री यांनी लेख, भाषणे दिली असावीत. महाराजांच्या विचारातील प्रगल्भता, विचार करण्याची पद्धत यांमुळे भाषणे आणि लेख महत्त्वाचे ठरतात. गोत्री यांनी तो वारसा नजरेआड केला नाही.

या चरित्रात महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना- प्रसंग आहेत. महत्त्वाच्या प्रसंगी केलेली भाषणे आहेत. चरित्राचा फाफटपसारा होऊ न देता प्रत्येक प्रसंग थोडक्यात आटोपला आहे. परंतु तो प्रत्येक प्रसंग आशयपूर्ण आहे. असे चरित्राचे निवेदन येते. सयाजीराव महाराजांची ओळख, कार्य आणि विचार थोडक्यात समजण्यासाठी हे चरित्र उपयोगी आहे.

- डॉ. राजेंद्र स. मगर,
निमगाव (म.), जि. सोलापूर.

अनुक्रम

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना / ८५

संपादकाची प्रस्तावना / ८७

१. उपोद्‌घात / ९५

२. जाहीरनामा / १००

३. राजकीय सुधारणा / १०९

४. धार्मिक सुधारणा / १२०

५. सामाजिक सुधारणा / १२४

६. सांसारिक सुधारणा / १२५

७. सांसारिक प्रसंग / १२७

८. राजकीय प्रसंग / १२८

९. महाराजांचे नैसर्गिक गुण / १३१

१०. महाराजांची लोकप्रियता / १३६

११. महाराजांस अगत्याची विज्ञप्ती / १३९

१२. उपसंहार / १४०

(निशाणी १)

श्रीमंत सौ. चिमणाबाई महाराणीसाहेब यांचे भाषण / १४२

(निशाणी २)

श्रीमंत महाराजासाहेब यांचे धार्मिक विषयासंबंधाने महत्त्वाचे व्याख्यान / १४५

(निशाणी ३)

माझा युरोप व हिंदुस्थान देशातील कार्यक्रम आणि दिनचर्या / १५६

गुर्जरखंडाधिपती
श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड
यांचे संक्षिप्त चरित्र

सुभाषित.*
सरस्वती स्थिता कंठे लक्ष्मीः करसरोरुहे ।।
राजेंद्र कुपिता कीर्तिस्तेन देशांतरं गता ।।१।।

उपोद्घात

सुमारे ३५ वर्षांपूर्वी बडोदे राज्याची स्थिती किती निकृष्ट व कष्टप्रद झाली होती हे सर्वश्रुत आहेच. त्या वेळेस येथे श्री. कै. मल्हारराव महाराज गायकवाड यांची कारकीर्द सुरू असून, त्यांच्या व प्रजेच्या दुर्दैवाने राज्यात दुर्गुणी लोकांची भरती होऊन कोणी कोणाचा धनी ना गोसावी अशी स्थिती प्राप्त झाली होती. चहूकडे अनीती, दुराचार, बेअब्रू व भ्रष्टता यांचे साम्राज्य होऊन प्रजेच्या जीविताची व वित्ताची शाश्वती मुळीच राहिली नव्हती.

या स्थितीचा अनुभव घेतलेले कित्येक गृहस्थ हल्ली बडोदे येथे हयात आहेत व त्या वेळच्या स्थितीची वर्णनात्मक पुस्तकेही उपलब्ध झालेली आहेत, ती पाहिली किंवा त्या वेळच्या वृद्धांचे तोंडून तत्संबंधी हकीकत ऐकिली म्हणजे मनास उद्वेग व तिरस्कार वाटल्यावाचून राहत नाही; परंतु ईश्वराच्या कृपेने तशा स्थितीचा निरास होऊन, हल्ली ज्या शांत व सुखमय छत्राखाली तेथील सर्व प्रजाजन सुखानंद अनुभवीत आहेत व त्यांच्या उन्नतीकरिता तनमनधनेकरून ज्यांचे प्रयत्न अहर्निश सुरू आहेत, ते प्रस्तुतचे महाभाग्यशाली, प्रजाप्रिय, चतुर, विद्वान, लोकाग्रणी व सकलगुणैश्वर्यसंपन्न श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल समशेर बहादूर,

---

* अर्थ : हे राजा। सरस्वती तुझ्या कंठाशी वास करित आहे (पक्षी - कंठालिंगन करिते आहे), आणि लक्ष्मी तुझ्या हस्तकमलाच्या ठायी आहे, म्हणजे तू मोठा दानशूर आहेस, (पक्षी - करांनी लक्ष्मीचे लालन करितो आहेस), यास्तव कीर्तिस (सवतीमत्सरास्तव) राम येऊन ती (झिटकाऱ्याने तुला टाकून) देशांतरांस रुसून गेली। (पक्षी - तुझी कीर्ति सर्व देशांतरात प्रसृत झाली आहे.

जी.सी.एस.आय., फरजंदे-खास-ए-दौलत-ए-इंग्लिशिया इत्यादी यांचे चरित्र अनेक दृष्टीने अत्यंत प्रेमळ व अनुकरणीय असून, उदात्त विचारांनी आणि उदार राजनीतीने ओतप्रोत भरलेले असल्यामुळे इतर राजेरजवाडे यांसह मनन करण्यास योग्य आहे व सामान्य लोकांसही त्यापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. यासाठी ते संक्षेपतः सादर करण्याचे योजिले आहे.

जन्मवृत्त व लहानपणचे वर्तन

महाराजांचा जन्म दक्षिणेत खानदेशात चाळीसगावानजीक मौजे कवळाणे गावी, गायकवाडांचे मूळ पुरुष दमाजीराव यांचे नातवांचे नातू श्री. कै. काशीराव गायकवाड यांचे उदरी सुमुहूर्तावर मिती फाल्गुन वद्य ६, मंगळवार शके १७८४ (सन १८६३) रोजी झाला. काशीराव यांची स्थिती श्रीमंतीची नव्हती; परंतु त्यांचे कुटुंब त्या गावात खाऊनपिऊन सुखी, अब्रूदार व कुलवान असे मानीत असत व त्यांचा स्वभाव अतिशय कनवाळू व सदाचरणी असे. त्यांच्या पवित्र सहवासाचा लाभ, सुमारे १२ वर्षांपर्यंत महाराजांस घडला असून, पुढे ते राज्यावर अधिष्ठित झाले. ती हकीकत क्रमशः पुढे दिलेली आहे.

महाराज राज्यावर अधिष्ठित होईपर्यंतच्या मधील काळात लिहिण्यासारखी विशेष हकीकत घडून आलेली नाही; परंतु या भाग्यशाली नरशार्दूलाचे ते लहानपणचे तेज व वर्तन पाहूनच पुढे हे फार मोठे योग्यतेस येतील, असे सर्वत्रांस वाटत असे. त्यांचा तो सदृढ व मोहक चेहरा पाहून त्यांचे मातापितरांस अत्यानंद होणे साहजिक आहे; परंतु इतर सुखवस्तू लोकासही त्यांचे अल्पवयातील समंजस वर्तन पाहून फार कौतुक वाटत असे. ज्या पुरुषाचा भाग्योदधी काही काळाने उचंबळावयाचा असतो, त्याचे प्राथमिक गुणही आरंभी तशाच प्रकारे दृष्टीगोचर होत असतात, हे इतिहासवाचनप्रिय जनांस आढळून आले असेलच. त्याप्रमाणे यांचेही गुण पाहून पाहणारास तशाच प्रकारचे तर्क उत्पन्न होत असत यात नवल नाही.

श्रीमंतीतच ज्यांचा जन्म झालेला असतो त्यांना गरिबांची दुःखे व अडचणी समजून घेऊन त्यांचे परिमार्जनाचे उपाय करावे लागतात; परंतु माजी महाराजांचे अमलात येथील प्रजेस जो अत्यंत दुःखानुभव येत गेला त्याचे परिमार्जन होण्यास, गरीब कुटुंबांत जन्म घेऊन त्यातील अनुभवाचा स्वाद घेतलेल्या पुरुषांकडून ती दुःखे नाहीशी करण्याचे उपाय होणे जास्त श्रेयस्कर व सुखावह असल्याने ईश्वरानेच तशी योजना मुद्दाम लोकहितार्थ कृपाळू होऊन केली होती, असे म्हटले तरी चालेल व त्याप्रमाणे प्रभूने उत्तरोत्तर लोकांच्या हिताकरिता कशा रीतीने परिश्रम घेतले आहेत, काय योजना केल्या आहेत व त्यांचा लोकांस कसा उपयोग घडत आहे, हे त्यांच्या पुढील चरित्रात योग्य स्थळी दर्शित केले आहे.

दत्तक देण्याची योजना

श्री. कै. मल्हारराव महाराज यांच्यावर बडोदे येथील रेसिडेंट कर्नल फेअर यास विष दिल्याचा खटला होऊन, त्यांची रवानगी तारीख २२-४-७५ रोजी मद्रासेस केल्यावर पूर्वीपासून चालत आलेला श्री. गायकवाड सरकारचा स्नेहसंबंध व श्री. कै. खंडेराव महाराज गायकवाड यानी सन १८५७ सालच्या बंडाच्या धामधुमीत नामदार ब्रिटिश सरकारास केलेली मदत लक्षात घेऊन

त्या उपकारस्मरणाबद्दल त्यांचे कुटुंब श्री. कै. महाराणी जमनाबाई साहेब यांच्या मांडीवर दत्तकपुत्र देऊन राज्यकारभार चालविण्यात येईल, म्हणून नामदार ब्रिटिश सरकारांनी शहरात जाहीरनामे लावून प्रसिद्ध केले व त्याप्रमाणे श्री. कै. महाराणी जमनाबाई साहेब यांची स्वारी पुण्यास जाऊन राहिली होती. तेथून त्यांजला बडोदे येथे तारीख २-५-७५ रोजी आणून तारीख ३-५-७५ रोजी सुमुहूर्ताने राजवाड्यात त्यानी प्रवेश केला व महाराजांच्या अल्पवयात राज्याचे काम सुरक्षितपणे चालविण्यासाठी इंदूर संस्थानचे दिवाण राजा सर टी. माधवराव, के. सी. एस. आय. यांची बडोद्याच्या दिवाणाच्या जागी नेमणूक होऊन ते तारीख ३-५-७५ रोजी बडोद्यास आले. त्यांनी तारीख १०-५-७५ रोजी कामाचा चार्ज घेतला आणि त्यांना तारीख १६-५-७५ रोजी रीतीप्रमाणे दिवाणगिरीची वस्त्रे देण्यात आली.

सर टी. माधवराव यांचा लौकिक

या राज्यकारणी पुरुषाने येथे आल्यावर जी व्यवस्था केली व जी सुधारणा करून दाखविली ती अद्याप लोकांचे स्मरणातून गेली नसून पेशवाई बुडाल्यावर एल्फिन्स्टन साहेबांनी सुव्यवस्था केल्याबद्दल अद्याप लोक त्यांची कीर्ती गात आहेत. त्याचप्रमाणे या विद्वान व राजकारस्थानी पुरुषाबद्दलही बडोदे येथील लोक त्यांची कीर्ती गाताना आढळून येतात. असो.

दत्तकाची निवड

याप्रमाणे व्यवस्था झाल्यावर दत्तकपुत्र पसंत करण्याकरिता नामदार ब्रिटिश सरकारच्या अनुमताने श्री. कै. काशीराव बाबासाहेब गायकवाड यांचे त्रिवर्गपुत्र श्री. आनंदराव, गोपाळराव व संपतराव यांजला बडोदे येथे आणविले होते, ते मासाहेब यांस दाखविण्यात आले. यापैकी मध्यम पुत्र श्री. गोपाळराव म्हणजे प्रस्तुत चरित्राचे नायक आपले महाभाग्यशाली महाराज सयाजीराव यांना मासाहेबांनी पसंत केले. ही पसंती करण्यात मासाहेबांनी जे चातुर्य दाखविले आहे, ते अनुपमेय होय व त्याबद्दल त्यांची जेवढी स्तुती करावी तेवढी थोडी आहे. त्या पुरुषाच्या हाती पुढे मोठी राजसत्ता प्राप्त होऊन लोकांच्या जीवित व अब्रू सुरक्षित राखावयाची जबाबदारी यावयाची आहे व पुढील स्थितीची सर्वतोपरी आशा ज्यावर अवलंबून आहे, अशा पुरुषाची निवड करण्याचे काम सामान्य नाही; परंतु राज्याच्या पुण्याईने व प्रजेच्या सुदैवाने ते काम मासाहेबांनी उत्तम रीतीने बजाविले आहे व त्याचा गोड रसास्वाद आपण सर्व नित्य अनुभवीत आहोत. याबद्दल आपण सर्व मासाहेबांचे अत्यंत आभारी आहोत, यात संशय नाही.

जेव्हा त्रिवर्ग चिरंजीव मासाहेब यांच्या पसंतीसाठी नेले, तेव्हा त्यांचे थोडा वेळ मासाहेबांशी जे वर्तन व संभाषण झाले त्यात श्री. महाराज साहेब यांचे भाषण व वागणूक यांना फार पसंत पडली व हा उपजत गुण अद्यापही श्रीमंतांचे अंगी पूर्णपणे वसत आहे. कोणी कसाही माणूस येवो, त्याने श्रीमंतांचे दर्शन घेऊन १०-५ मिनिटे त्यांच्याशी संभाषण केले म्हणजे श्रीमंतांबद्दल त्यांच्या मनात लागलीच पूज्यबुद्धी उत्पन्न होते. हा अनुभव पुष्कळांस आलेला आहे. तेव्हा त्यांची मासाहेबांवर लागलीच छाप बसली यात नवल नाही.

दत्तविधानाचा समारंभ

ही आपली पसंती मासाहेबांनी राजा सर. टी. माधवरावमार्फत नामदार ब्रिटिश सरकारास कळविली व त्यावरून तारीख २७-९-७९ रोजी सुमुहूर्ताने श्रीमंतांचे दत्तविधान जुन्या राजवाड्यात गादीच्या कचेरीत समारंभाने झाले. या वेळेस सर्व सरदार, दरखदार, असामदार, ऑफिसर्स, शेटसावकार व सद्गृहस्थ वगैरे हजर असून, श्री. कै. मल्हारराव महाराज यांची स्वारी येथून मद्रासेस गेल्यावर गादीसंबंधाने सर्वत्रांस जी फिकीर वाटत होती, ती सर्व लयास जाऊन प्रभू स्थानापन्न झालेले पाहून, सर्वत्रांचे चेहरे प्रसन्नमुख झालेले दिसत होते. हा दिवस सर्वांनी सणाप्रमाणे पाळला. इतकेच नव्हे, तर गायकवाडांची गादी गोब्राह्मणप्रतिपालक असल्याने त्या पुण्याईचाच हा प्रभाव आहे, असे भाविक लोक म्हणू लागले. काही असो, गायकवाडांचा इतिहास अवलोकन केला तर गायकवाड सरकारांवर येथील प्रजेची फार भक्ती असल्याचे पूर्वापार दिसून येते. सन १७३२ सालात श्री. कै. पिलाजीराव गायकवाड यांजपासून अमदाबाद येथील मोगलांचा सुभेदार अभयसिंग याने बडोदे शहर काबीज केले, तेव्हा प्रजेने त्यांजला बडोद्यावर आपला अंमल स्थापन करण्याच्या कामी फार हरकती घेतल्या. शेवटी गायकवाडी प्रजेची आपले प्रभूवर फार प्रसन्न मर्जी असल्याने येथे राज्य चालविणे कठीण आहे, असे समजून तो तेथून निघून गेला. (लोकहितवादिकृत गुजराथचा इतिहास-पान २४६) त्याचप्रमाणे हल्ली बडोद्यास दरसाल आषाढ शुद्ध महाएकादशीस श्रीमंतांची स्वारी सर्व लवाजम्यानिशी समारंभाने देवदर्शनास मिरवत जाण्याचा पूर्वापार जो प्रघात सुरू आहे तो येथील भाविक गुर्जर प्रजेने या पवित्र दिवशी ईश्वरास मानलेल्या राजाचे दर्शन घडणे पुण्यकारक आहे, अशा समजुतीने स्वारी निघत जाण्याविषयी विनंती करून या स्वारीचा खर्च आपण होऊन दिल्यामुळे त्यांची निस्सीम राजभक्ती पाहून सुरू झालेला आहे असे समजते. यावरून या राजघराण्यावर प्रजेची भक्ती पूर्वापार कशी चालत आली आहे हे दिसून येईल. स्वराज्याबद्दल आपल्या मनात प्रीती असणे साहजिक आहे; परंतु पूर्वकाळी प्रीतीचा इतका उद्भव होण्यास तत्कालीन राजांच्या अंगात प्रजापालनाचे उत्तम गुण असले पाहिजेत हे उघड आहे व हल्लीच्या स्थितीवरूनही तो सद्गुण आनुवंशिक रीतीने या राजघराण्यास प्राप्त झाला आहे असे दिसून येते. तो असाच उत्तरोत्तर वृद्धींगत होत जावो, अशी प्रभूचरणी प्रार्थना आहे.

विद्याभ्यास

महाराजांची राज्यावर स्थापना झाली तेव्हा त्यांचे वय अवघे १२ वर्षांचे होते, हे वरील हकीकतीवरून लक्षात येईलच. तेव्हा त्यांचा विद्याभ्यास उत्तम प्रकारचा होण्यासाठी नामदार राजे सर टी. माधवराव यांनी मि. एफ. ए. एच. इलियट साहेब, त्या वेळचे सातारा जिल्ह्याचे कलेक्टर या सिव्हिलियन व विद्वान गृहस्थाची मागणी करून त्यांची मुख्य शिक्षकाच्या जागी योजना केली. खरोखर ही योजना करण्यातही श्री. कै. मासाहेबांप्रमाणे राजे सर टी. माधवराव यांनी अत्यंत चातुर्य प्रकट केले असे म्हटले पाहिजे किंवा विधिघटनाच चांगली म्हणून असा योग जुळून आला. कारण उत्तम विद्यार्थी तयार होण्यास ज्या अनुकूल साधनांची जरूरत लागते, त्यात

ज्यांच्यापासून विद्या ग्रहण करावयाची त्या गुरूंची भूमिका फार जबाबदारीची आहे. महाराष्ट्र शिरोभूषण श्री शिवछत्रपती महाराजांचा उदय होण्यास सुदैवाने जी अनुकूल साधने प्राप्त झाली होती त्यात महाराजांच्या मातुश्री जिजाबाई व गुरू दादोजी कोंडदेव व उपगुरू श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या सहवासाचा व शिक्षणाचा जो अनुपम लाभ महाराजांस घडून आला तो प्रसंग अत्यंत महत्त्वाचा मानिला पाहिजे.

वृक्षरोपणापासून गोड व मधुर फळे मिळावी अशा हेतूने चतुर माळी लहानपणी त्यास अनुरूप अशीच त्याची जोपासना करीत असतो. कारण जोपासना करण्यात चूक झाली, तर पुढे त्यास गोड व मधुर फळे येणे शक्य नाही. त्याचप्रमाणे यावेळी गुरूची योजना करण्यात चूक झाली असती तर आज जी गोड फळे आपण चाखीत आहोत त्यांस पारखे झालो असतो, हे वेगळे सांगितले पाहिजे असे नाही. तेव्हा गुरूची योजना करण्यात व गुरूकडून योग्य शिक्षण देण्यात जे चातुर्य, समयसूचकता व प्रशंसनीय कळकळ दाखविण्यात आली ती त्यास व गुरूसही अत्यंत भूषणास्पद आहे. त्याचप्रमाणे गुरूकडून विद्या ग्रहण करण्यात महाराजांनी जी पात्रता व कार्यतत्परता दाखविली ती त्यांचे एकंदर वैभवास, गुणांस व शालीनतेस शोभण्यासारखीच आहे यात संशय नाही. जमीन चांगली नसेल तर उत्तम बीज असूनही त्याचा काही उपयोग होत नाही, या न्यायाने विद्या ग्रहण करणारा विद्यार्थीही तशाच योग्यतेचा असावा लागतो हे उघड आहे. यावेळी ईश्वरी प्रसादाने गुरू-शिष्यांची जोडी तशीच लाभली होती, त्यामुळे महाराजांनी इलियट साहेब यांच्या शिक्षणाखाली उत्तम प्रकारचा विद्याभ्यास करून बडोद्याचा राज्यकारभार स्वतंत्रपणे चालविण्यास आपण सर्वोपरी पात्र आहोत असे लवकरच दृष्टोत्पत्तीस आणले.

महाराजांचा विद्याभ्यास चालू असताना तारीख २३ माहे नोव्हेंबर सन १८७५ रोजी त्या वेळचे प्रिन्स ऑफ वेल्स म्हणजे ख्रिस्तवाशी हिंदुस्थानचे सातवे एडवर्ड बादशहा यांचे आगमन बडोदे शहरी झाले होते. त्यावेळी त्यांचे स्वागत उत्तम प्रकारचे करण्यात आले. या वेळेस महाराजांचे वर्तन व उत्तम विद्याभ्यास पाहून त्यांची स्वारी फार खुश झाली व हिंदुस्थानातून परत युरोपात गेल्यावर इकडील ज्या काही विशेष गोष्टी त्यांना दिसून आल्या. त्यात ''महाराजांचा विद्याभ्यास व वर्तन पाहून आपल्यास फार कौतुक वाटले व हे पुढे चांगले राज्यकर्ते निपजतील,'' अशा प्रकारचे उद्‌गार त्यांनी आपल्या मातुश्री श्रीमती चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया यांच्यापाशी काढल्याचे प्रसिद्धच आहे. सारांश, खुद्द बादशहापासून तो साधारण सुशिक्षित गृहस्थापर्यंत ज्यांना महाराजांच्या अभ्यासाची व वर्तनाची यत्किंचितही ओळख होण्याचा सुयोग येत असे, अशा सर्व लोकांचे मत त्यांजविषयी फार चांगले दिसून येत होते व यावरून महाराजांच्या भावी कारकीर्दीबद्दल बडोदे राज्याचे प्रजेस फार फार आशा व भूषण वाटत असे व लिहिण्यास अत्यानंद वाटतो की, त्या सर्व आशा प्रभूकडून सफलही होत चालल्या आहेत. महाराजांच्या सुव्यवस्थेमुळे पुढे एक सुदिन असा येईल की, त्यावेळेस बडोदे संस्थान सर्व संस्थानांत उत्तमोत्तम गणण्यास पात्र होईल, अशी सर्व प्रजेस बळकट आशा आहे.

प्रथम विवाह समारंभ

महाराजांचा विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर त्यांचे कुलशीलास व गुणांस योग्य अशी पत्नी शोधण्याचे व राज्यशकट चालविण्यास त्यांना पूर्ण अधिकार प्राप्त होण्याच्या संबंधाने नामदार राजे सर टी. माधवराव यांनी योग्य उपायांची योजना चालविली होती. त्याप्रमाणे मद्रास इलाख्यापैकी तंजावरच्या प्रसिद्ध राजघराण्यातील वधू निश्चित करून महाराजांचा विवाहसमारंभ तारीख ६-१-८० रोजी मोठ्या थाटाने बडोदे शहरी करण्यात आला. यावेळेस मोठमोठे राजेरजवाडे, सद्गृहस्थ, आप्तस्वकीय, सरदार, दरखदार, असामदार, कामदार, वतनदार वगैरे मंडळीस निमंत्रणे करण्यात आली असून, त्यांच्या स्वागतास योग्यप्रकारे बंदोबस्त ठेविला होता, अशा रीतीने लग्न समारंभ उत्तम रीतीने शेवटास नेला आणि आलेले पाहुणेमंडळीस व पदरचे नोकरचाकर मंडळीस ज्याचे त्यांचे योग्यतेप्रमाणे बहुमान पोशाख देऊन खुश करण्यात आले होते. या महोत्सवाचे स्मरण बडोदे येथील प्रजेस पुष्कळ दिवस होत राहील, असे आम्हास वाटते.

राज्यारोहण समारंभ

पुढे लवकरच महाराज स्वतंत्र रीतीने राज्यरकारभार चालविण्यास योग्य झाले आहेत, असे नामदार ब्रिटिश सरकारच्या लक्षात येऊन त्यांजला तारीख २८-१२-८१ रोजी अधिकार देण्याचा समारंभ त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर नामदार लॉर्ड सर जेम्स फर्ग्युसनसाहेब यांच्या हस्ते करण्यात आला. या महोत्सवाप्रसंगी मुंबई इलाख्यातील एकंदर प्रसिद्ध व निवडक गृहस्थांना आमंत्रण केले असून, त्या समारंभाकरिता शेकडो नेटिव व युरोपियन लोक जमले होते. यासंबंधाने जास्त वर्णन लिहिण्याची सवड नाही. तथापि, या समारंभास एकंदर ११ लक्ष रुपये खर्च झाला होता, हे वाचकवर्गास समजले म्हणजे तो समारंभ किती थाटाचा झाला असेल याची कल्पना त्यांना सहज होणार आहे.

प्रजेस दिलेली पहिली सनद

महाराजास राज्याधिकार प्राप्त झाल्याबद्दल त्यांनी गायकवाडी प्रजेस जो "मॅग्नाचार्टा" ऊर्फ पहिली सनद दिली, ती अत्यंत महत्त्वाची असून, पुढे राज्यशकट कोणत्या धोरणाने चालविण्यात येणार, याची दर्शक असल्याने ती साद्यंत याखाली दिली आहे. :-

जाहीरनामा

श्री. सरकार सयाजीराव महाराज गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, फरजंदे-खास-ए-दौलत-ए-इंग्लिशिया :-

१. सर्व लोकांस प्रसिद्ध व्हावे की, आजमित्तीपासून बडोदे राज्याचा अधिकार आम्ही आपल्या हाती घेतला आहे.

२. आमची प्रजा सुखी राहावी व दिवसेंदिवस तिच्या कल्याणाची वृद्धी व्हावी, अशी आमची अंतःकरणापासून इच्छा आहे.

३. नामदार इंग्रज सरकारच्या स्नेहाने व साह्याने हा हेतू सिद्धीस जाईल व तो सिद्धीस नेण्यात आमचे सर्व कामदार, सरदार व दरकदार लोक व सर्व प्रजा राजनिष्ठेने वर्ततील असा आम्ही भरवसा राखतो.

४. आज आरंभिलेले कार्य ईश्वरी प्रसादाने सफल होवो.

तारीख :- २८-१२-८१

□□□

ही सनद गुजराथेत गायकवाडांचे राज्य स्थापन झाल्यापासून गायकवाडी प्रजेस प्रथमच देण्यात आली आहे व तिची रचना सन १८५७ च्या धामधुमीनंतर महाराणी व्हिक्टोरिया यांजकडून हिंदुस्थानच्या प्रजेस जी सनद देण्यात आली आहे, त्या धर्तीवर थोडक्यात व शहाणपणाची करण्यात आली आहे. यावरून महाराजांचा थोरपणा, कर्तृत्व, विद्वत्ता आणि प्रजावात्सल्य व पदरच्या लोकांविषयीचा अनुरागही स्पष्ट दिसून येत आहे व याच कारणाने या महोत्सवाप्रसंगी जमलेल्या सर्व लोकांस व बडोद्याच्या प्रजेस अत्यानंद झालेला दिसत होता.

प्रजेच्या स्थितीचे अवलोकन

याप्रमाणे राज्यसूत्रे धारण केल्यावर आपल्या प्रजेची स्थिती कशा प्रकारची आहे, त्यांना काय अडचणी आहेत व त्यात काय सुधारणा केली पाहिजे, हे समजण्याच्या हेतूने दरसाल राज्यातील एका भागात स्वतः जाऊन तेथील लोकस्थिती अवलोकन करण्याचा क्रम श्रीमंतांनी चालू ठेवला होता. त्याप्रमाणे सन १८८२ साली कडी प्रांत, सन १८८३ साली नवसारी प्रांत, सन १८८४ साली बडोदे प्रांत व सन १८८६ साली अमरेळी प्रांतात श्रीमंतांची स्वारी जाऊन आली. याप्रसंगी प्रजेची राजभक्ती व श्रीमंतांचे प्रजेवरील पुत्रवत प्रेम ही चांगली निदर्शनास आली. जेथे जेथे श्रीमंतांचे आगमन होत असे, तेथील सर्व लोक, महाजन, शेटसावकार, इनामदार, जहागीरदार, वतनदार व सार्वजनिक संस्था यांच्याकडून त्यांचा आदरसत्कार उत्तम प्रकारचा ठेवण्यात येत असे व श्रीमंतांकडूनही अशा लोकांच्या भेटी घेण्याची, त्यांच्या हकीकती ऐकून घेण्याची व ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे त्यांजला बहुमान, पोषाख वगैरे देऊन संतुष्ट करण्याची यथायोग्य व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय स्वारीत एक तपासणी ऑफिसर बरोबर ठेवून प्रजेकडून अर्ज्या घेण्याची व स्थानिक कचेऱ्या तपासण्याची तजवीजही चालू होती. याप्रसंगी महाराजांनी प्रजेच्या व राज्याच्या सुधारणुकीविषयी कित्येक महत्त्वाचे हुकूम दिले आहेत.

खेड्यांतील लोकांना राजवैभव अवलोकन करण्याचा व राजदर्शन घडण्याचा क्वचित योग येत असून, आपल्या प्रजाप्रिय प्रभूचे दर्शन घेऊन आपली हकीकत निवेदन करण्याची प्रजेची अतिशय आतुरता असल्याने अशा प्रसंगी लोकांच्या झुंडीच्या झुंडी एकत्र होत असत व हा त्यांचा हेतू पार पाडण्यासाठी श्रीमंतांची स्वारी समारंभाने जात असे व तेथे गेल्यावर शाळेतील मुला-मुलींचे मेळे, गावचे वतनदार, पाटील व प्रमुख वगैरे लोकांच्या खासगी भेटी व नजराण्याच्या कचेऱ्या आणि रात्री लोकरंजनार्थ आतषबाजी सोडणे वगैरे गोष्टींची व्यवस्था उत्तम करण्यात

आली होती आणि आपली दुःखे व अडचणी श्रीमंतास विदित करण्याची संधी लोकांस मुद्दाम प्राप्त करून देण्यात येत असून, त्यामुळे परस्परांवरील प्रेम चांगले व्यक्त होऊन वृद्धिंगत होत असे. या अनुपम सुखाचा अनुभव खालशांतील प्रजेस मिळणे दुर्घट आहे ! असो. हाच लोकनिरीक्षणाचा क्रम अद्यापिही श्रीमंतांनी चालू ठेवला आहे. मात्र पुष्कळ लवाजमा बरोबर घेऊन समारंभाने जाण्यापासून रयतेचे पैशाचा अपव्यय होतो, तो होऊ नये म्हणून त्या बाबतीचा खर्च आता प्रत्येक वेळी करण्यात येत नाही. यावरून निरर्थक डामडौलाचा कंटाळा, प्रजेच्या पैशाचा दुरुपयोग न करण्याकडे मनाची थोर प्रवृत्ती व प्रजेच्या कल्याणाविषयीची अत्यंत कळकळ हे गुण श्रीमंतांच्या अंगी चांगल्या रीतीने वसत आहेत, असे स्पष्ट दिसून येते.

युवराजांचे जन्मवृत्त

याप्रमाणे महाराजांच्या उज्ज्वल कारकीर्दीची सुरुवात होत आहे, तोच परमेश्वर कृपेने श्री. सौ. मा. चिमणाबाई महाराणी साहेब यांच्या उदरी तारीख ३ ऑगस्ट सन १८८३, शनिवार, श्रावण शुद्ध १, शके १८०५ रोजी सुमुहूर्तावर श्री. युवराज फत्तेसिंहराव दादासाहेब महाराज यांचा जन्म झाला. हे वृत्त ऐकून सर्व प्रजेचा आनंद गगनातही मावेनासा झाला. कारण श्री. गायकवाड सरकारचे राजघराण्यात हा अपूर्व योग तीन पिढ्यांत घडून आला नाही. त्यामुळे महाराणीसाहेब गरोदर आहेत हे समजल्यापासून लोकांची आतुरता फार वाढत चालली होती व ईश्वरी प्रसादाने युवराज जनन झाल्याचे वृत्त जेव्हा त्यांच्या श्रवणी पडले तेव्हा त्यांना अत्यानंद होणे साहजिक आहे.

पुत्रजनन होताच गावातील हजारो स्त्रिया दुधाचे व पाण्याचे हेल राजवाड्यापुढे नेऊन टाकू लागल्या. शहरात सरदार, दरखदार, असामदार, शेटसावकार व कामदार वगैरे मंडळींकडे व कॅम्पात मे. रेसिडेंटसाहेब यांजकडे हत्तीवरून साखर वाटण्यात आली व युवराज जननाची खबर नामदार हिंदुस्थानचे व्हाईसरायसाहेब, मोठमोठे राजेरजवाडे व बडे लोक यांच्याकडे तारेने देण्यात आली आणि त्यांच्याकडूनही उलट आनंदप्रदर्शक तारा, खलिते व बहुमान पोशाख पाठविण्यात आले. त्याचप्रमाणे पदरचे नोकरचाकरांस बहुमान पोशाख, बक्षिसे वगैरे देऊन संतुष्ट करण्यात आले. याप्रमाणे सर्व गायकवाडी राज्यात आनंदीआनंद होऊन गेला होता.

श्री. सौ. मा. चिमणाबाई महाराणी साहेब कैलासवासी झाल्या

अशा प्रकारे सर्व गायकवाडी प्रजा आनंदात निमग्न असताना पुढे दैवदुर्विलासाने श्री. सौ. मा. चिमणाबाई महाराणी साहेब यांना दुर्धर क्षयरोगाने तारीख ७ माहे मे सन १८८५ रोजी देवाज्ञा झाली. त्या वेळेस त्यांचे वय २१ वर्षांचे होते. त्यांचा स्वभाव सदाचरणी, मायाळू, उदार व धर्मशील होता. त्याचप्रमाणे त्या सुशिक्षित असून, त्यांचे पतिप्रेम अढळ होते. त्यांच्या तरुणावस्थेत त्यांजवर निर्दय काळाने झडप घातल्याचे ऐकून सर्व प्रजेस व बडोदे राज्याच्या हितचिंतकांस अत्यंत खेद वाटला व त्यांजकडून दुःखप्रदर्शक तारा व दुखोटे पाठविण्यात आले. याप्रसंगी श्रीमंतांचे एकपत्नीव्रत व निर्व्यसनता हे गुण कसास लागल्यासारखे होऊन स्वभाव अत्यंत कनवाळू असल्यामुळे व श्रीमंत युवराजाचे बाळंतपणातच त्यांच्यावर असा कठीण प्रसंग उद्‌भवल्यामुळे महाराजांना फार फार दुःख झाले.

महाराणींचे स्मारक

यांच्या चिरस्मरणार्थ बडोदे येथे घीकाट्यांत "चिमणाबाई क्लॉक टॉवर" नावाचा एक सुंदर मनोरा बांधण्यात आला असून, त्यावर एक सुबक व सप्तसुरात्मक मोठे घड्याळ बसविण्यात आले आहे आणि शहराच्या मध्यवस्तीत न्यायखात्यातील सर्व कोटे एकाच ठिकाणी बसण्यासाठी "चिमणाबाई न्यायमंदिर" या नावाची सुंदर व भव्य इमारत बांधविण्यात आली असून, त्यात या महाराणीचा संगमरवरी शुभ्र पुतळा मुख्य दिवाणखान्याच्या मध्यभागी स्थापन करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या पवित्र दर्शनाचा लाभ आबालवृद्धास साहजिक रीतीने घडून येतो व महाराणीचे गुणानुवाद आठवून त्यांच्याबद्दलची पूज्यबुद्धी जास्त दृढ होते.

दुसरा विवाह समारंभ

महाराणीसाहेब कैलासवासी झाल्यावर महाराजांच्या दुसऱ्या विवाहाची पुनः योजना करण्यात आली व कुल, शील, रूप आणि योग्यता याहीकरून युक्त अशी वधू पाहण्याच्या कामी वेगवेगळ्या प्रदेशी मंडळी पाठविण्यात आली. त्यांनी ज्या कन्या पाहिल्या त्यात देवासच्या राजघराण्यापैकी श्री. रा. रा. बाजीराव साहेब घाटगे यांची कन्या पसंत ठरल्यावरून वधूपक्षाकडील मंडळी बडोद्यास बोलावून तारीख २८ डिसेंबर सन १८८५ मिती मार्गशीर्ष वद्य ७ रोजी दुसरा विवाह मोठ्या समारंभाने करण्यात आला. याप्रसंगीही पूर्वीच्या विवाहाप्रमाणे सर्व प्रकारची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या आमच्या प्रस्तुतच्या महाराणीसाहेबही सुशिक्षित, दयाळू, उदार, सदाचरणी व स्त्री शिक्षणाभिमानी असल्याचे सुप्रसिद्धच आहे आणि या त्यांच्या अनेक गुणांस लोलुप होऊन सन १८९३-९४ साली त्यांची स्वारी युरोपात गेली असताना श्रीमती चक्रवर्तिनी व्हिक्टोरिया महाराणीसाहेब यांनीही त्यांचे उत्तम स्वागत करून "क्रौन ऑफ इंडिया" हा किताब व रत्नखचित पदक त्यांस स्वहस्ते अर्पण केले आहे. यावरून त्यांची योग्यता वाचकांच्या ध्यानी येईलच.

श्री. महाराणीसाहेबांची राहणी, विद्याभ्यास व स्त्री शिक्षणाविषयीची कळकळ

हल्ली यांचा विद्याभ्यास सतत सुरू असून, त्याचे सुपरिणाम यांच्या ठिकाणी उत्कृष्ट निदर्शनास येतात. यांची राहणी साधी व निरभिमानयुक्त आहे व त्यांना शिवणकाम, भरतकाम, रुद्रवीणावादन आणि सोपपत्तिक गायनाची चांगली माहिती झाली आहे. त्याचप्रमाणे श्रीमंत व थोर मंडळींच्या स्त्री समाजात अत्यावश्यक असलेल्या अशा सूपशास्त्राच्या अभ्यासाविषयीची अनास्था, आळस किंवा तिरस्कार नेहमी आढळून येतो. तो त्यांच्या ठिकाणी मुळीच वास करीत नसून मधून मधून वेगवेगळ्या तऱ्हेचे रुचकर पदार्थ तयार करण्याचे श्रम त्या स्वतः हौसेने व आनंदाने घेत असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. शिवाय क्षात्रधर्मास अनुरूप अशा बंदूक व निशाण मारणे आणि शिकार करणे वगैरे मर्दुमकीच्या कामातही या निष्णात झाल्या आहेत. त्यांचा मराठी, गुजराथी व इंग्रजी अभ्यास उत्तम प्रकारचा झाला असून, स्त्री वर्गाची उन्नती होण्यास त्यांस वेगवेगळ्या प्रकारचे उत्तम शिक्षण मिळण्याची आवश्यकता आहे व शिक्षणाशिवाय स्त्री किंवा पुरुष वर्गाची उन्नती होणार नाही अशी त्यांची दृढ समजूत झालेली आहे व त्याला अनुसरून आपले राजपुत्र,

राजकन्या व राजस्नुषा (युवराज्ञी) यास व इतर सर्व स्त्रीवर्गास शिक्षणाचे महत्त्व समजावून देऊन त्यांची शिक्षणद्वारा प्रगती करण्याचे त्यांचे अहर्निश प्रयत्न सुरू असतात. त्यांनीही यासंबंधाने प्रसंगविशेषी आपले विचार प्रदर्शित केले आहेत. त्यातील एक महत्त्वाचे भाषण निशाणी १ चे यासोबत साद्यंत जोडले आहे. त्यावरून यांची विद्वत्ता, प्रजावात्सल्य व स्त्री शिक्षणाभिमान कशा प्रकारचा आहे, हे वाचकास स्पष्ट दिसून येईल.

स्वराज्याबाहेरचा प्रवास व अनेक स्थळांचे निरीक्षण

असो. हा दुसरा लग्न समारंभ पुरा झाल्यानंतर श्रीमंतांची स्वारी स्वराज्यापैकी अमरोळी प्रांती जाऊन येण्याची राहिली होती, ती तिकडे जाऊन आली, हे वर निर्दिष्ट करण्यात आलेच आहे व स्वराज्य फिरणे झाल्यावर हिंदुस्थानातील मोठमोठी शहरे, हवेशीर व प्रेक्षणीय स्थळे आणि लहान-मोठी संस्थाने अवलोकन करून तेथील रीतीरिवाज व राज्यपद्धती कशा प्रकारची आहे, ही माहिती मिळविण्याची व त्याचप्रमाणे सद्यःकाळी सुधारणेचे केवळ माहेरघर होऊन बसलेल्या युरोप खंडात जाऊन ते पाहण्याची आणि तेथील योग्य त्या सुधारणा आपल्या राज्यात करण्याची महाराजांना फार उत्कट इच्छा उत्पन्न झाली व त्याला अनुसरून आजपर्यंत त्यांनी दक्षिणेस मुंबई, लानोली, देवळाली पुणे, सोलापूर, विजापूर, महाबळेश्वर, बेळगाव, बंगलोर, म्हैसूर, मद्रास, तंजावर, कुनूर, उटकमंड, सिलोन वगैरे व उत्तरेस अमदाबाद, आबू, रतलाम, महू, अजमीर, उदेपूर, इंदूर, ग्वाल्हेर, जयपूर, जोधपूर, दिल्ली, आग्रा, मथुरा, बनारस, कलकत्ता, लाहोर, अमृतसर, मरी, मसुरी, गंगोत्री, सिमला, नैनिताल, काश्मीर वगैरे अनेक प्रेक्षणीय व हवेशीर स्थळे व त्या त्या भागांतील लहानमोठी संस्थाने कित्येक वेळा अवलोकन करून पुष्कळ अनुभव व माहिती मिळविली आहे.

युरोप खंडाचा प्रवास

त्याचप्रमाणे युरोप खंडांतही सुमारे सात वेळा श्रीमंतांच्या स्वारीचे प्रयाण झाले असून, यंदा चीन, जपान व अमेरिका वगैरे ठिकाणी श्रीमंतांची स्वारी प्रवासास गेली आहे आणि तेथील देशस्थिती व लोकरिवाजांची माहिती ते करून घेत आहेत. युरोप खंडात असताना त्यांनी फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, स्वीत्झर्लंड, इटली, स्वीडन वगैरे अनेक देशांत प्रवास करून तेथील बडे व विद्वान लोकांच्या भेटी घेऊन आणि सरकारी, सार्वजनिक व औद्योगिक वगैरे अनेक संस्थांचे अवलोकन करून तिकडील देशस्थितीची व लोकरिवाजाची प्रत्यक्ष माहिती करून घेतली व पुष्कळ अनुभव मिळविला. या कामी त्यांस अत्यंत श्रम सोसून अतोनात द्रव्य खर्च करावे लागले आहे व लागत आहे. यासंबंधाचे सविस्तर वर्णन लिहावयाचे म्हटल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होईल; परंतु प्रस्तुत तितका स्थलावकाश नाही. तथापि श्रीमंतांची स्वारी सन १८८६-८७ साली प्रथमच युरोपात गेली. तेव्हा युरोपात जाण्यासंबंधाने लोकमत किती प्रतिकूल होते, त्यास काय अडचणी आल्या व त्यातून दृढनिश्चयाने आणि शहाणपणाने त्यांनी आपला हेतू कशा रीतीने तडीस नेला, यासंबंधाची त्रोटक हकीकत याखाली दिली आहे. त्यावरून यासंबंधाची काहीशी कल्पना वाचकांना करता येईल.

युरोपातील पहिल्या स्वारीच्या वेळच्या अडचणी

श्रीमंतांची स्वारी प्रथमच युरोपास जाण्याचे ठरले तेव्हा त्यांस आप्तस्वकीय, नोकरचाकर, प्रजाजन वगैरे घरची व बाहेरची पुष्कळ मंडळी प्रतिकूल होती. कारण युरोप खंडाचा प्रवास फार लांबीचा, पुष्कळ मुदतीचा, कष्टावह व धर्मशास्त्राविरुद्ध असून, बहुतेक जलमार्गांचा अर्थात जोखमीचा होता व तिकडील देशाचाराचा व लोकरिवाजाचा प्रथम कोणास अनुभव नसल्यामुळे त्यांना युरोपात जावयाचे म्हटले म्हणजे मृत्यूलोकातून स्वर्गलोकातच जाण्यासारखे कष्टप्रद व भीतिदायक वाटत असे. त्यातून धर्मशास्त्ररीत्या परदेशगमन निंद्य मानले असल्यामुळे ते युरोपात न जाण्याच्या संबंधाने जी अनेक कारणे दाखवीत त्यात धर्मशास्त्राची प्रतिकूलता व युरोपातून परत आल्यावर स्वज्ञातील दाखल होण्यास अडचण, ही ठरीव कारणे नेहमी पुढे आणीत असत आणि 'हा प्रवास अत्यंत श्रमाचा व जोखमीचा आहे.' 'महाराजांचे जाणे त्यांच्या निकट आप्तसंबंधी लोकांस प्रिय नाही. सबब कोणत्याही कारणाने हा प्रवास करणे योग्य असले तरी, त्यांची मने न दुखवतील ही काळजी घेण्याचेही महाराजांचे कर्तव्य आहे.' अशा एक ना दोन शेकडो अडचणी व विचार ज्यास जसे सुचतील तसे तो हुजुरांस कळवून त्यांचे मन या प्रवासापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असे. महाराजांचे मन दुखू नये म्हणून कित्येक बाह्यात्कारी त्यांस तोंडावर अनुकूलता भासवीत; परंतु खरोखर अंतःकरणापासून त्यांची संमती नसे. हे सर्व प्रकार महाराज मनात जाणून होते; परंतु या प्रवासापासून कोणकोणते फायदे आहेत, हे या मंडळीस समजत नसून धार्मिकपणाच्या फाजील बंधनामुळे व आपल्या ठिकाणी असलेल्या लोकांच्या पूर्ण प्रीतीमुळेच ही असंमती दर्शविण्यात येत आहे, हे जाणून त्यांनी आपला विलायतेस जाण्याचा निश्चय यत्किंचितही ढळू दिला नाही.

या स्वारीत बरोबर जी मंडळी घ्यावयाची त्यांची मने वळविण्यापासूनची सर्व तयारी श्रीमंतांस स्वतः श्रम घेऊन करावी लागली, हे वरील विवेचनावरून दिसून येणार आहे. कित्येकांस 'तुम्ही हुजूरचे पिढीजाद व राजनिष्ठ नोकर असून, स्वारीबरोबर परदेशगमन करण्यासारख्या क्षुल्लक गोष्टीसही तयार नसाल, तर दुसरे नेकीचे व जोखमीचे काम काय करू शकाल?' कित्येकास 'कितीही अडचणी असल्या तरी स्वारीबरोबर यावे हे तुमचे कर्तव्य आहे.' कित्येकांस 'स्वारीतून आल्यानंतर धर्माच्या वगैरे संबंधाने ज्या अडचणी येतील त्याबद्दल शक्य ती मदत सरकारातून देण्यात येईल,' वगैरे प्रकारची संभाषणे करून व आश्वासने देऊन किंवा प्रसंगविशेषी भिडेचा उपयोग करून व उपदेशपर गोष्टी सांगून त्यांच्यात प्रवासजन्य स्फूर्ती, अनुकूलता व कर्तव्यतत्परता उत्पन्न होईल व लोकापवादाच्या भ्रामक कल्पनांचे निरसन होईल, अशा प्रकारचे प्रयत्न करावे लागले.

त्याचप्रमाणे प्रवासात आगबोटीतून प्रकृतिमानाप्रमाणे व सवयीप्रमाणे खानपानाची कोणत्याही प्रकारची अडचण पडू नये व युरोपात ज्या वस्तू मिळणे दुर्मिळ असते अशा प्रकारच्या लहान-मोठ्या सर्व जिनसा, जास्त काय लिहावे - हिंग, जिरे, लोणची, पापड वगैरेसुद्धा सामान प्रवासाच्या मुदतीत तूट न पडेल अशा बेताने समागमे घेतले होते व तिकडील प्रदेश थंड असल्याने तेथील हवा समागमे येणारे मंडळीस मानवेल किंवा नाही हे समजण्यासाठी त्यांच्या

प्रकृतीची डॉक्टरांकडून तपासणी करून तिकडील देशाचारास अनुसरून प्रत्येकास सरकारातून कपडे करवून देण्यात आले. शिवाय भट, शागीर्द, आचारी, पाणके, गाई वगैरे धार्मिक व व्यावहारिक कृत्यास अडचण पडणार नाही अशी सर्व सामग्री समागमे घेऊन श्रीमंतांची स्वारी तारीख ३१ माहे मे सन १८८७ रोजी युरोप खंडात रवाना झाली.

यावेळी महाराजांची सर्व प्रजा, आप्तस्वकीय व सेवकवर्गाची स्थिती अत्यंत चिंतातुर व हताश झालेली दिसत होती. त्यास महाराजांचे वियोगजन्य दुःख व प्रवासाबद्दल अत्यंत काळजी वाटत असे. महाराजांची खास गाडी (स्पेशल ट्रेन) बडोद्याहून मुंबईस रवाना झाली तेव्हा रेल्वेस्टेशनावर जी मंडळी पोहोचविण्यास गेली होती, ती खास गाडी (स्पेशल ट्रेन) चालू होताच खिन्नवदन झाली व त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्या वेळचा देखावा फारच हृदयद्रावक दिसत होता. या एकंदर हकीकतीवरून स्वारी युरोपात जाण्याच्या संबंधाने लोकमत कशा प्रकारचे होते व ते का प्रतिकूलता दाखवीत असत, यांचे वाचकास सहज अनुमान होईल; परंतु अशा प्रसंगी महाराजांच्या दृढनिश्चयाची व धैर्याची वाखाणणी करावी तेवढी थोडीच आहे. प्रजेचे व आप्तांचे वियोगजन्य दुःख इतरांप्रमाणे महाराजांसही वाटत होतेच; परंतु अशा वेळी त्या दुःखाचा प्रभाव बाहेर दिसू दिल्यास लोक जास्त अधीर होतील, असे समजून त्यांनी यावेळी गंभीर मुद्रा धारण केली होती. शिवाय सामान्य लोकांपेक्षा त्यांना अशा प्रसंगी मागचे पुढचे धोरण, स्वारीच्या पश्चात राज्याची व्यवस्था व बंदोबस्त राखणे व बहुतेक लोक प्रतिकूल असताना आरंभिलेला प्रवास सुखरूप शेवटास जाण्याची फिकीर ही अधिक होती; परंतु या सर्व अडचणीस न जुमानता त्यांनी आपला हेतू फलद्रूप करून दाखविला. यावरून त्यांची कोणतेही कठीण वाटत असलेले काम उत्तम रीतीने शेवटास नेण्याची हातोटी, मानसिक धैर्य, चातुर्य व दृढनिश्चयही आपले अनुभवास आल्यावाचून राहत नाहीत.

तसेच, कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी ती आरंभी जितकी साहसाची, श्रमाची व कठीण वाटत असते, तितकी त्या गोष्टीचे साहचर्य झाल्यावर मुळीच वाटत नाही. मात्र ती साध्य करण्याचा करारीपणा व दृढनिश्चय अंगात असावा लागतो. याचा अनुभव या वरील हकीकतीवरूनच दिसून येणार आहे.

महाराजांची स्वारी पहिल्याने युरोपात जाण्याच्या प्रसंगी किती श्रम व अडचणी त्यांना सोसाव्या लागल्या व जो अतोनात खर्च (या स्वारीचा खर्च सुमारे चाळीस लाख रुपये झाल्याचे समजते.) करावा लागला त्याची काही कल्पना वरील हकीकतीवरून वाचकांना होऊ शकेल; पण पुढे पाच-सात वेळा श्रीमंतांची स्वारी प्रकृती वगैरेच्या कारणामुळे पुन्हा युरोपात गेली, तेव्हा अशा रीतीच्या व इतक्या अडचणी त्यास मुळीच भासल्या नाहीत व तिकडील स्थितीरीतीचा अनुभव आल्यामुळे पहिल्या खेपेइतका खर्चही करण्यात आला नाही.

त्यानंतर दुसऱ्या खेपेस सर्व नाही तरी काही मंडळींनी स्वारीबरोबर जाण्याच्या खुशीने कबूल केले व त्यानंतरच्या स्वारीत युरोपात स्वारीबरोबर जाण्याची कित्येकांची बरीच आतुरता दिसून येऊ लागली. हल्ली तर बडोदे राज्यात कोणी पाहिजे तो माणूस युरोप खंडांत व अन्यत्र देशी जाण्यास एका पायावर तयार आहे, अशी स्थिती दिसून येते. तेव्हा श्रमाने व सतत प्रयत्नाने

कोणतेही कार्य साध्य होते. एवढेच नव्हे; परंतु प्रत्यक्ष उदाहरणाने लोकांची खात्री करून दिली म्हणजे त्यांच्या भ्रामक समजुती नाहीशा होण्यास फार अवधी लागत नाही. ही गोष्ट राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक कोणतीही सुधारणा करू इच्छिणारांनी पूर्ण रीतीने लक्षात वागविण्यासारखी आहे. असो.

महाराजांनी वरप्रमाणे जो अनुभव मिळविला व देशाचार आणि लोकस्थिती अवलोकन केली, त्यापासून घेण्यासारख्या सुधारणा त्याही बडोदे राज्यात सुरू करून या कामी खर्च केलेले द्रव्य व श्रम यांचे सार्थक्य केले आहे, असे विचारपुरस्सर पाहणारास तेव्हाच दिसून येईल.

प्रवासात जेथे जेथे श्रीमंतांचे आगमन होत असे, तेथील राजेरजवाडे, अंमलदार व सद्गृहस्थ वगैरेंकडून श्रीमंतांचा आदरसत्कार उत्तम प्रकारचा ठेवण्यात येत असे व युरोप खंडांत गेल्यावर खुद्द इंग्लंडच्या महाराणी साहेबांकडून त्यांचा सत्कार उत्तम प्रकारचा करण्यात आला होता. त्यांनी महाराजांकरिता स्वतः बसण्याची चार घोड्यांची गाडी व स्वतःचा लवाजमा 'बॉडिगार्ड' त्यांच्या तैनातीकडे देऊन त्यास विंडसर राजवाड्यात मेजवानीस बोलावून स्वतःचे पंक्तीचा लाभ दिला होता. (खुद्द महाराणीच्या पंक्तीचा लाभ मिळणे हा युरोपात मोठा सन्मान मानला आहे.) व महाराजांकडूनही या प्रीतिपूर्वक सन्मानाच्या आठवणीनिमित्त महाराणीसाहेबांकरिता एक चांदीचा रेहकला (बैलगाडी)- गुजराथेत बैल व बसण्याच्या गाड्या चांगल्या होतात - या गोष्टीचे द्योतक म्हणून येथे आल्यावर महाराणीकडे युरोपात पाठविण्यात आला. या एकाच गोष्टीवरून महाराणींचे महाराजांवरील प्रेम उघड दृष्टोत्पत्तीस येते. अशा प्रकारचे प्रेम व आतिथ्य सर्वत्रांकडून संपादन करण्यास अंगात तशाच प्रकारचे गुण व पात्रता असावी लागते, हे चाणाक्ष वाचकांस वेगळे सांगणे नको.

प्रवासापासून मनुष्याचे मन कसे प्रगल्भ बनत जाते व त्याजला अनेक प्रकारचा अनुभव प्राप्त होऊन तो कशा उच्च स्थितीला जाऊन मिळतो, हे आमचे महाराज म्हणजे प्रत्यक्ष उदाहरण आहे. आजपर्यंत इतका प्रवास गायकवाडांचे घराण्यात तर नाहीच; परंतु इतर राजेरजवाड्यांतही कोणी केल्याचे दिसून येत नाही; पण केवळ सार्वजनिक कल्याणासाठी अशा प्रकारच्या मुशाफऱ्या व तदंगभूत अनेक प्रकारचे श्रम व गैरसोय महाराजांनी आनंदाने सोसली आहे व अद्यापही ते सोशीत आहेत. यावरून त्यांचा दृढनिश्चय, कार्यतत्परता व दूरदृष्टीही चांगल्या प्रकारे निदर्शनास येतात.

भावी कारकीर्द व त्याविषयीचे लोकमत

याप्रमाणे महाराजांनी राज्याधिकार धारण केल्यापासून राज्याचे व प्रजेचे कल्याणासाठी त्यांचे तनमनधनेकरून अविश्रांत श्रम चालू आहेत व ही त्यांच्या राज्यकर्तृत्वाची पूर्वचिन्हे, त्यांना अधिकारप्राप्तीनंतर तात्काळच दिसून येऊ लागली होती. त्यावेळेसही महाराजांसंबंधाने लोकमत कशा प्रकारचे होते, हे समजण्यासाठी एक-दोन प्रसिद्ध पुस्तकांतील उतारे याखाली दिले आहेतः-

१. कै. बळवंतराव अनंत देवकृत श्री. कै. मल्हारराव महाराज गायकवाड यांचा खरा इतिहास, पान ३८३ -

''महाराजांनी राज्यकारभार हाती घेऊन थोडकेच दिवस झाले नाहीत तोच, अकबर बादशहाप्रमाणे लोक महाराजांची कीर्ती गाऊ लागले आहेत, या दोन भाग्यशाली पुरुषांचे भाग्यसादृश्य बरेच जमते. अकबर यासही दिल्लीची गादी बाराव्या किंवा तेराव्या वर्षी मिळाली आणि महाराजांस राज्यपद १२ वे वर्षी प्राप्त झाले. अकबरशहा यांनी बादशाहीचा कारभार १८ वे वर्षी आपले हाती घेतला आणि अकबरशहा याने जाहीरनामा प्रसिद्ध करून लोकांस आश्वासन दिले, तसेच महाराजांनी आपले राष्ट्रातील लोकांस दिले. याप्रमाणे या पुरुषांचे साम्य आहे. बहिराम यांनी अकबर यांस लहानाचे मोठे करून व विद्याभ्यास करवून साम्राज्याचा कारभार पाहण्यास योग्य झाल्याबरोबर राज्यसूत्र अकबरशहा याचे हातात दिले. त्याप्रमाणे राजा सर टी. माधवराव यांनी महाराजांचा अधिकार महाराजांचे स्वाधीन करून जे यश मिळविले, ते अपरिमेय आहे...''

ते आणखी लिहितात :-

''महाराजांनी आपल्या मनोवृत्ती अगदी मर्यादित ठेवल्या आहेत. त्यांचे भोजन परिमित असून, साधे जेवण मिळाले म्हणजे झाले. घोड्यावर बसणे व शिकार करणे याशिवाय दुसरे व्यसन नाही, मद्यप्राशन केल्याने मनुष्याची वृत्ती पशुतुल्य होते. आपल्या मनातील सामान्य विचारही आपल्यास शेवटास नेता येत नाहीत, आयुष्य क्षीण होते, भोवतालचे लोक बाहुल्याप्रमाणे नाचवितात व धिक्कार करितात. मद्याच्या लहरीत काय करावे याचे भान राहत नाही. शत्रू उत्पन्न होतात व त्या योगाने जीवित दुःखरूप होते, मग पश्चात्ताप करून फल होत नाही. वगैरे मद्याचे दुष्ट परिणाम महाराजांचे मनात इतके ठसले आहेत की, ते त्यांस शिवतही नाहीत. राज्याचा आणि खाजगीचा कारभार आटोपला की, घोड्यावर बसून स्वारी निघालीच, अंतःकरण पराकाष्ठेचे निर्मल आहे. स्वभाव अगदी शांत असून, धर्मावर श्रद्धा आहे. इतके मोठे ऐश्वर्य व संपत्ती प्राप्त झाली आहे, तरी दुरभिमान नाही. श्री. मा. जमनाबाईसाहेबांच्या ठिकाणी परमभक्ती आहे. आप्तजनांविषयी अनुराग असून, आश्रित जनाविषयी अभिमान आहे व मनुष्यांची परीक्षा आहे. यात अतिशयोक्ती मानली तरी एकंदरीने शुभ लक्षणे पुष्कळ आहेत आणि त्यावरून महाराज प्रजेचे उत्तम पालन करतील व तिच्या भक्तीस आणि इंग्रज सरकारांबरोबर निर्मळ मनाने वर्तन करून त्यांच्या मैत्रीस प्राप्त होतील, अशी आशा आहे.''

२. कै. सरदार रा. ब. गोपाळराव हरी देशमुख प्रसिद्ध लोकहितवादीकृत, गुजराथ देशाचा इतिहास, पान ३१७.

''श्री. सयाजीराव महाराजांच्या कारकिर्दीत बडोद्याच्या प्रजेस फार सुख होईल, अशी सर्वांना मोठी आशा आहे आणि सुदैवाने त्या आशेचे साफल्य करण्यासारखा हा तरुण राजा आहे. विद्या, विनय, गांभीर्य, शालीनता, सारासारविचार आणि मागचे पुढचे धोरण हे जे मुख्य गुण राजपुरुषांत अवश्य असावयाचे, ते प्रस्तुतचे महाराजांत पूर्णपणे वसत असल्याचे दिसत आहे व

तसेच ते गुण पुढेही राहतील अशी खात्री आहे. या महाराजांमध्ये अत्यंत वंद्य व स्तुत्य गुण म्हटला म्हणजे त्यांची असाधारण निर्व्यसनता. ही तर तशी फारच थोड्या कुलीन राजपुत्रांत सापडते. लोक तर अशी आशा बाळगून आहेत की, एकंदर सर्व गायकवाड वंशजांकडून जे सुख व जी सुव्यवस्था आजपर्यंत आपल्यास कधी मिळाली नाही, ते सुख व ती सुव्यवस्था श्री. सयाजीराव महाराजांकडून आपल्यास मिळेल व आपण इंग्रज सरकारच रयतेपेक्षा कित्येक गुणात भाग्यशाली होऊ. इंग्रज सरकारच्या रयतेपेक्षा गायकवाडी रयत स्वराज्यात आहे, हे तर तिला विशेष भूषण व अभिमानास कारण आहेच आणि त्यातच तिजमध्ये महाराजांचे सद्‌बुद्धीने, साम्राज्याने व सत्प्रेरणेने, स्वातंत्र्य, विद्याप्रसार, यंत्रकलावृद्धी आणि अनेक उद्योग व व्यवसाय निघून, ज्या ज्या मुख्य गोष्टीत व नावलौकिकांत आजपर्यंत बडोदे अगदी मागे होते, ते याप्रमाणे शनैः शनै उत्तमोत्तम संस्थानात गणण्यासारखे होईल, अशी आशा व उमेद आहे. या महाराजांनी आपले बंधू विलायतेस विद्याभ्यासाकरिता पाठविले असून, अनुकूल संधी मिळाल्यास त्यांचा स्वतःचा युरोप खंडांतील मुख्य मुख्य राष्ट्रे पाहण्याचा हेतू आहे. या महाराजांस व त्यांच्या युवराजांस दीर्घायुष्य होऊन त्यांच्या हस्ते गुजराथेतील या मुख्य संस्थानाचे उत्तम रीतीने हित व कल्याण घडवून आणण्याचा भाग ईश्वराधीन आहे. त्याप्रमाणे तो महाराजांस अनुकूल व साह्य असो."

यावरून महाराजांची योग्यता केवढी मोठी आहे व त्यांच्या एकंदर गुणांवर लुब्ध होऊन, भावी कारकीर्दीबद्दल लोक किती आशाप्रचुर बनले होते हे चांगल्या प्रकारे दिसून येते व त्यातही विशेष संतोषाची व अभिमानाची गोष्ट ही आहे की, लोक ज्या भावी आशा करीत असत त्यापेक्षाही किती तरी पटीने जास्त सुख व सुधारणा महाराजांकडून त्यास प्राप्त झाल्या असून आणखी वाढविण्याचा क्रम अव्याहत सुरू आहे, हे त्यांच्या पुढील चरित्रावरून दिसून येईल.

महाराजांच्या कारकीर्दीत वाढलेले सुख व झालेली सुधारणांची यादी

महाराजांनी केवळ राजकीय बाबतीतच सुधारणा करण्याचे प्रयत्न चालविले आहेत असे नाही, तर औद्योगिक, धार्मिक, सामाजिक व सांसारिक वगैरे अनेक बाबतीत त्यांच्याकडून सुधारणा होत आहेत. त्याचे विस्तृत विवेचन करू म्हटल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होईल; पण तसे करण्यास स्थलावकाश नाही. यासाठी फक्त मुख्य गोष्टीचे दिग्दर्शन अथवा यादी याखाली दिली आहे.

राजकीय सुधारणा

जमिनीचा सर्व्हे करून प्रतवाराने सारा घेण्याचे ठरविले

१. पूर्वीचे कारकीर्दीत राज्यातील जमिनीचा सर्व्हे झाला नसल्याने पुष्कळ जमिनी पडीत असून, कमी महसुलाच्या जमिनीवरही एकसारखा सारा घेण्यात येत असे. ही वहिवाट सरकारास व रयतेसही नुकसानकारक असल्याने राजा सर टी. माधवराव यांनी सर्व्हे खात्याची योजना करून ते काम सुरू करविले होते. हल्ली ते सर्व काम पुरे झाले असून, जमिनीचे मगदुराप्रमाणे उत्तम, मध्यम, कनिष्ठ प्रतवारीचे दर लावून सरकार सारा

घेण्याची पद्धत सुरू झालेली आहे व त्यापासून रयतेस फार सुख झाले आहे. हे काम महाराजांनी राज्याधिकार घेण्यापूर्वी जरी सुरू झाले होते, तरी त्याची सुरुवात या महाराजांच्या कारकीर्दीतच होऊन व अधिकार मिळाल्यावर त्यांनी ते काम नेटाने चालवून व त्या कामावर विद्वान व अनुभवशीर अंमलदारांची योजना करून, त्यांस त्यांनी वेळोवळी महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत आणि या कामाची अखेरची अंमलबजावणी त्यांच्याच हातून पुरी झाली असल्यामुळे त्याचे यश महाराजांकडेच येत आहे.

एक कोटी रुपये जमीनबाबीच्या घेण्याची सूट दिली

२. शेतकरी लोकांकडे मागील कारकीर्दीतील जमीनबाबींचे घेणे, सुमारे एक कोटी रुपये चालत होते. ते वसूल करून घेण्यासारखी रयतेची स्थिती राहिली नाही व अंमलदारांकडून वसूल घेण्याचे उपाय सक्तीने योजण्यात येतात. त्यामुळे रयतेस फार दुःख होते असे दिसून आल्यावरून केवळ दयार्द्रदृष्टीने हे सर्व घेणे श्रीमंतांनी माफ केले आहे.

वेठबिगारीचे नियम केले

३. गुजराथेत पूर्वीच्या कारकीर्दीत गावच्या लोकांवर वेठबिगारीबद्दल फार सक्ती होत असे व त्यामुळे गावची आबादानी चांगली होत नसून रयतेस फार त्रास पोहोचतो, असे हुजूरच्या नजरेस येऊन वेठबिगारीबद्दल नियम* करण्यात आले. त्यात गैरशिस्त रीतीने कोणास त्रास पोहोचू नये, असा बंदोबस्त केला असून, सरकारी कामासाठी वेठबिगारी घेतले गेल्यास अमूक दराप्रमाणे त्यांजला मजुरी देण्यात यावी म्हणून ठरविण्यात आले आहे व त्याप्रमाणे प्रस्तुत वहिवाट सुरू आहे.

किरकोळ व स्पेशल कर 'वेरे' घेण्याचे बंद केले

४. शेतकऱ्यांकडून जमीनबाबीशिवाय गादी नजराणा, अंबारी-वेरा, लग्न किंवा पुत्रोत्सव वगैरे समारंभाबद्दल "स्पेशल कर" वगैरे अनेक कर घेण्यात येत असून, शिवाय गावात राहणारे इतर धंद्यांच्या लोकांकडूनही घांचीवेरा, काछीवेरा, खादीवेरा, नळियेवेरा वगैरे अनेक प्रकारचे वेरे व कर घेण्यात येत असत व सरदार, दरकदार, कामगार वगैरे लोकांकडून नजराणे घेण्यात येत असत. यामुळे रयत जिकिरीस येऊन उद्योगधंद्यास उत्तेजन मिळत नसे. सबब असे स्पेशल व किरकोळ सर्व वेरे घेण्याचे बंद करण्यात आले आहे व त्या ऐवजी लोकल फंड व प्राप्तीवरील कर घेण्याचे धोरण नुकतेच सुरू करण्यात आले आहे.

म्युसिनिपालिटी, पोर्ट ट्रस्ट यांची स्थापना व सिटी सर्व्हेची सुरुवात

५. लोकांचे आरोग्य वाढावे व राज्याची आबादानी आणि शोभा वाढावी, एतदर्थ लहान-मोठ्या गावांत म्युनिसिपालिटीची स्थापना करण्यात आली असून, सिटी सर्व्हेचे काम

---

* वेटबिगारीचे नियमांत दुरस्ती करून हल्लीपेक्षा अधिक सवलती देण्याची वाटाघाट सुरू आहे त्याचा निकाल रयतेस अधिक हितकारक होईल, अशी आशा आहे.

सुरू केले आहे आणि गावातील रस्ते व घरे कशी असावीत याजबद्दलचे नियम करण्यात आले असून, त्याप्रमाणे हजारो रुपये खर्च करून कामे सुरू करविली आहेत आणि या कामांसाठी नुकतीच "पोर्ट ट्रस्टची" स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे शोभा व आरोग्य यांची वृद्धी होईल अशी आशा आहे.

सुमारे वीस-पंचवीस वर्षांपूर्वी ज्यांनी बडोदे शहराचे अरुंद व घाणेरडे रस्ते, खारट व मचूळ व तेही बहुशः दुर्मिळ पाणी आणि त्यामुळे उत्पन्न होणारा क्लेश अनुभविला आहे, त्यांना हल्लीचे विस्तृत व सुंदर रस्ते, शहरांमध्ये ठिकठिकाणी उभारलेल्या शोभायमान इमारती व गोड आणि मधुर पाण्याची विपुलता, हवेशीर उद्यानभूमिका आणि विजेच्या व गॅस लाईटच्या दिव्यांचा स्वच्छ प्रकाश हे पाहून सानंदाश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. ज्यांनी रा. सापकरकृत "बडोदे शहरवर्णन" हे पुस्तक वाचले असेल त्यांना याबद्दलची काही कल्पना करता येईल. असो.

स्वराज्यात रेल्वेची वाढ

६. लोकांचे आपसातील दळणवळण वाढावे व व्यापारधंद्यांस उत्तेजन यावे, यासाठी राज्यातील बहुतेक भागांत श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या खास मालकीची व स्वराज्य आणि परराज्य यांच्या मिश्रणाच्या ठिकाणी भाग ठेवून, जिकडे तिकडे रेल्वेचे विपुल साधन करून देण्यात आले आहे, यामुळे लोकांच्या चालीरीतीत सुधारणा होऊन ते उद्योगी व सधन बनत चालले आहेत. तसेच रेल्वेचे उत्पन्न येऊ लागल्यामुळे राज्याचे उत्पन्नही वाढले आहे.

शिक्षणप्रसार, त्यासाठी दीर्घोद्योग व होणारा खर्च

७. सुमारे वीस-पंचवीस वर्षांपूर्वी बडोदे राज्यात विद्येचा प्रसार म्हणण्यासारखा झाला नव्हता व त्यामुळे लोक अज्ञान स्थितीत असून, कोणत्या बाबतीबद्दल कोठे दाद मागावी हेही त्यांना चांगले कळत नव्हते; परंतु हल्ली श्रीमंतांची कृपा व विद्याभिलाष. यामुळे अनेक प्रकारच्या विद्येचा प्रसार पुष्कळ झाला असून, शिक्षणावाचून प्रजेची उन्नती व्हावयाची नाही, असे त्यांचे ठाम मत असल्याने त्याजला उत्तरोत्तर उत्तेजन देण्यात येत आहे. त्यापासून शिक्षणप्रसार व लोकांची प्रगती किती झपाट्याने सुरू आहे, हे पुढील त्रोटक हकीकतीवरून दिसून येईल.

महाराजांनी राज्याधिकार धारण करण्यापूर्वी सन १८७९-८० साली विद्या खात्याचा खर्च रु. २,१४,१५४ झाला असून, सन १८८०-८१ साली राज्याधिकार धारण केल्यावर खर्च रु. ४,३४,३४७ झाला आहे. म्हणजे राज्याधिकार मिळताच हा खर्च एकदम दुपटीने वाढविण्यात आला व हल्ली (सन १९०८-०९ साली) या कामाकडे खर्च रु. १२,८४,९११ झाल्याचे प्रसिद्ध झाले आहे. यावरून शिक्षणाच्या कामी किती उदार बुद्धीने खर्च करण्यात येत आहे हे उघड दिसून येईल.

बडोदे राज्याचे एकंदर क्षेत्रफळ ८,२२६ चौरस मैल व लोकसंख्या (सन १९०१ च्या खानेसुमारीच्या रिपोर्टाप्रमाणे) १,९५,५२,६९२ आहे. त्यातून हल्ली १,२५,९९६ मुले व ४४,३८७ मुली मिळून एकंदर १,७०,३८३ मुले शिक्षणाचा लाभ घेत आहेत. तसेच वेगवेगळ्या धंद्यांचे व कलांचे शिक्षण देण्यासाठी प्राथमिक शाळा, हायस्कुले, कॉलेज, कलाभवन, (यात यंत्रकला, शिल्पकला, रंगकला वगैरे अनेक कलांचे प्रत्यक्ष व सोपपत्तिक रीतीने फुकट व शिष्यवृत्त्या देऊन शिक्षण देण्यात येत असते.) कृषिकर्म शाळा, पाकशाळा, गायनशाळा व किंडरगार्डन पद्धतीप्रमाणे लहान मुलांस शिक्षण देण्याच्या शाळा स्थापन झाल्या आहेत व 'सक्तीचे शिक्षण' देण्याची पद्धत सर्व राज्यात सुरू करण्यात आली आहे. यापासून राज्याची व प्रजेची सुधारणा झपाट्याने होईल, अशी प्रजेस फार आशा आहे. ही पद्धती फार खर्चाची आहे, अशा सबबीवर ब्रिटिश राज्यांतही सुरू झालेली नाही; परंतु महाराजांचा विद्याभिलाष व प्रजेविषयीची अनुकरणीय कळकळ यामुळे त्यांनी खर्च वाढेल या सबबीस विशेष महत्व न देता ही पद्धती आपल्या राज्यात एकदम सुरू करून आपली कीर्ती अजरामर केली आहे व आपल्या उपकृतीने प्रजेस आजन्म ऋणी करून ठेवले आहे, यात संशय नाही. सक्तीचे शिक्षण सुरू केल्यामुळे या राज्यात एकंदर सुमारे ३,०८१ गावे आहेत. त्यातून आतापर्यंत (सन १९०८ - ०९) २,८३२ शाळा स्थापन झाल्या आहेत. त्यावरून शिक्षणाची वाढ किती झपाट्याने सुरू झाली आहे हे निदर्शनास येते.

इतकेच नव्हे, तर मुलांप्रमाणे मुलींच्या व प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाचीही काळजी घेण्यात येत असल्यामुळे स्त्री शिक्षणाचा प्रसार विलक्षण रीतीने होत चालला आहे असे दिसून येते.

साल	कन्याशाळा	मुलींची संख्या
सन १८७५	२	२२
सन १८९०	३५	३४१५
सन १९०३	१०५	८२३५
सन १९०९	३३४	२३९७५

याप्रमाणे ३४ वर्षांत शाळांची संख्या १६७ पटीने व मुलींची संख्या ११०० पटीने वाढलेली दिसते. याशिवाय मुलांच्या शाळेत शिकणाऱ्या मुलीसुद्धा एकंदर ४४,३८७ मुली शिकत आहेत. यात ९ मराठी २९२ गुजराथी व २५ उर्दू कन्याशाळा असून, ५ अत्यंजकन्याशाळा आणि जनानावर्ग गायनवर्ग व नवसारी येथील एक टाटा कन्याशाळा (खासगी) यांचा समावेश होत असून, सर्व राज्यात स्त्री शिक्षण झपाट्याने सुरू आहे व प्रौढ विद्यार्थिनींकरिता 'स्त्री शिक्षणपद्धती पाठशाळा' स्थापन झाली असून, त्यात १६६ प्रौढ स्त्रिया दाखल झाल्या आहेत व यांची लवकरच चांगली भरभराट होईल अशी चिन्हे

दिसत आहेत. सर्व स्त्रियांस शिक्षण फुकट देण्यात येते ही हकीकत वाचून स्त्री शिक्षणाभिमानी लोकांस अत्यानंद होईल, यात संशय नाही.

पंचवीस वर्षांपूर्वी बडोदे राज्यात एकही वर्तमानपत्र निघत नसून, एकही लोकसंस्था अस्तित्वात नव्हती व सभा किंवा व्याख्याने यांचेही नावही अश्रुतपूर्व वाटत असे. ती स्थिती शिक्षणप्रसारामुळे हल्ली अगदी पालटली असून, खाली दर्शविल्याप्रमाणे वर्तमानपत्रे व लोकसंस्था अस्तित्वात आल्या आहेत व उत्तरोत्तर जास्त येत आहे.

	वर्तमानपत्रे*		**लोकसंस्था**
१	सयाजीविजय (१ गुजराथी व १मराठी).	१	सहविचारिणी सभा
२	बडोदा गॅझेट.	२	ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळी
३	हिंदविजय.	३	क्षत्रिय - मराठा समाज
४	नवसारी प्रकाश - नवसारी	४	अंजुमने - इस्लाम सभा
५	भारतमित्र	५	दशाश्रीमाळी समाज
		६	विसनगरसमाज, विसनगर
	मासिक पुस्तके		**लायब्रऱ्या**
१	केळवणी	१	श्रीसयाजी पुस्तकालय
२	महाकाळ	२	स्टेट लायब्ररी
३	प्रातःकाळ	३	श्री. फत्तेसिंह लायब्ररी, पाटण
४	कलाशिक्षण	४	पेटलाद लायब्ररी, -पेटलाद
५	भाईबंद	५	नवसारी लायब्ररी, नवसारी

येणेप्रमाणे संस्था अस्तित्वात आल्या असून, मधून मधून विद्वान व्याख्यात्यांच्या जाहीरसभा व व्याख्याने यांचा लाभ सरकारकडूनही लोकांना होतच असतो. हे महाराजांच्या विद्याभिलाषाचे व प्रजोन्नतीच्या कळकळीचे उत्तम फळ होय आणि याबद्दल सर्व प्रजा चिरकाल महाराजांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानीत राहील, यात नवल नाही.

राज्यातील कामे करण्याचे नियम ठरविले

८. राज्यातील प्रत्येक खात्याची कामे कशी चालवावी व त्या खात्यातील अंमलदारांनी किती अधिकार कसे वापरावेत, याबद्दलचे व खात्यातील कामाच्या अंतर्व्यवस्थेचे व बारीकसारीक गोष्टीचेही नियम करण्यात आले आहेत. त्यामुळे राजकीय कामात फार सुधारणा झाली असून, रयतेस दाद मिळण्यास सोयिस्कर झाले आहे.

---

* खाली दर्शविलेली वर्तमानपत्रे व मासिकपुस्तके येथे निघत असलेली हल्ली बंद पडली आहेत, त्यामुळे वरील यादीत लिहिली नाहीत.

वर्तमानपत्रे : १. विचारसागर, २. अर्जदार, ३. चंद्रशेखर, ४. बडोदावत्सल, ५. फत्तेसिंग गॅझेट, ६. देशभक्त, ७. बाणावळी, ८. पुढारी. मासिक पुस्तके : १. धंदेशिक्षक, २. वालांकुर.

पदवीधर व लायक लोकांस नोकरीत ठेवण्यात येत आहे.

९. सरकारी कामे वक्तशीर व चांगली व्हावीत, यासाठी त्या त्या कामातील निष्णात असे विद्वान व पदवीधर लोक नोकरीस ठेवण्याची पद्धत सुरू करण्यात आली असून, हल्ली प्रत्येक खात्यात पदवीधरांची बरीच संख्या दिसून येत आहे व आणखी वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय ज्या त्या खात्यातील कामाबद्दल परीक्षा घेण्याची पद्धतही सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे कामात निष्णात असे नोकर मिळण्याची उत्तम सोय झाली आहे.

पत्रव्यवहाराचे काम कमी करण्याची योजना

१०. सरकारी कामात पत्रव्यवहार फार वाढून कामाचे निकाल होण्यास दिनावधी लागते. तसे होऊ नये म्हणून व्हिजिटबुके, ताकीदबुके, ऑर्डरबुके यांची योजना करण्यात आली असून, नुकतीच पत्रलेखनाची नवीन पद्धत (इंग्रजी लेटर-सिस्टीम) सुरू करण्यात आली आहे आणि हिशेबी व इतर माहितीच्या कामाबद्दल नमुने मुक्रर करून छापून देण्यात आले आहेत. त्यामुळे श्रम कमी पडून कामाचे निकाल लवकर होण्यास चांगले साह्य मिळते.

कायदे सुधारले व नवीन केले

११. रयतेस तात्काळ व योग्य न्याय मिळावा म्हणून मुंबई सरकारच्या कायदे कौन्सिलातील अनुभविक, पोक्त व प्रसिद्ध कायदेपंडित, माजी लीगल रिमेंब्रन्सर मे. नेलरसाहेब यांना येथे बोलावून व त्यांजला मेहनतान्याबद्दल मोठीशी रक्कम देऊन व त्यांच्या मदतीकरिता राज्यातील कायदेपंडित व अनुभविक अंमलदारांची ''लॉ कमिटी'' नेमून त्यांच्याकडून गायकवाडी राज्याकरिता ब्रिटिश सरकारच्या धर्तीवरच; परंतु योग्य फेरफाराने, दिवाणी व फौजदारी कायदे रचण्यात आले आहेत. हल्ली कायदे करण्याच्या कामावर बंगाल्यांतील प्रसिद्ध गृहस्थ मि. बी. ए. गुप्त यांची न्यायमंत्री या हुद्यावर नेमणूक करण्यात आली असून, नवीन कायदे करण्याचे व आहेत त्या कायद्यात दुरुस्ती करण्याचे काम पद्धतशीर रीतीने सुरू आहे. क्षुल्लक रकमेच्या दाव्यासाठी लोक तीन कोर्टे भांडून पैशाचा व कालचा अपव्यय करितात, तो होऊ नये म्हणून ''स्मॉलकाज कोर्ट ॲक्ट'' सुरू करण्यात आला आहे. त्यात विशेष हे आहे की, अशा दाव्यांचा निकाल खालशाप्रमाणेच एका न्यायाधीशाकडून करण्यात येत नसून वादी- प्रतिवादी यांजकडून पंच नेमून घेऊन त्यांच्या अनुमताने अगर पंच नेमावयाचे नसतील तेव्हा दोन न्यायधीश बसून त्यांनी एकमताने निकाल देण्याचे ठरविले आहे. यामुळे लोकांत कुरकुर काढण्यास जागा राहत नसून इन्साफही योग्य प्रकारे होतात. दु:खाची गोष्ट ही आहे की, अशा कामात पंच नेमण्याचा लोकांस जो अधिकार देण्यात आला आहे त्याचा उपयोग असमंजसपणामुळे लोक करून घेत असल्याचे दिसून येत नाही; परंतु लोकांत शिक्षणप्रसार जसा जास्त वाढत जाईल व त्यांजला आपले हक्क चांगल्या रीतीने कळू लागतील, तेव्हा त्यात सुधारणा होण्याची आशा आहे.

सरदार न्यायाधीशीची स्थापना व वकिलांची परीक्षा घेणे व सनदा देणे

त्याचप्रमाणे सरदार लोकांच्या योग्यतेप्रमाणे त्यांचा इनसाफ व्हावा म्हणून त्यांजकरिता ''सरदार न्यायाधीशी'' वेगळी स्थापन करण्यात आली आहे आणि न्यायाचे काम चांगले होण्यासाठी जशी विद्वान न्यायाधीशांची योजना करण्यात येत असते, तशी त्यांच्या मदतनीस वकील लोकही चांगले सुशिक्षित, समंजस व कायद्याचे वाकूबगार असण्यासाठी त्यांच्या परीक्षा घेऊन त्यांस सनदा देण्याचे ठरविण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर ब्रिटिश राज्यातील डिस्ट्रिक्ट जज्ज, तसेच हायकोर्टात काम करणारे लायक वकील व बॅरिस्टर यांना त्यांची खुशी असल्यास या राज्यातील कोर्टात काम करण्याच्या सनदा देण्यात येत आहेत.

न्याय व अंमलबजावणीच्या कामांची विभागणी केली

न्याय व अंमलबजावणीची कामे एकाच अंमलदाराकडे सोपविल्यापासून पुष्कळ अनर्थ ओढवतात, यासाठी इन्साफाची कामे स्वतंत्र न्यायाधीशाकडे सोपविण्यात यावीत, अशाबद्दल पुष्कळ दिवसांपासून लोकांची ओरड सुरू आहे व याबद्दल काँग्रेसमधूनही दरसाल ठराव पास करण्यात येत आहेत. त्याप्रमाणे ब्रिटिश राज्यात सुधारणा होईल तेव्हा खरी; पण या महत्त्वाच्या बाबीकडे महाराजांचे लक्ष यापूर्वीच जाऊन त्यांनी कामाच्या सोयीसाठी शेकडा १५ टक्के इन्साफाची कामे मुलकी अंमलदारांकडे देऊन बाकीच्या कामांचे निकाल न्यायखात्यातील स्वतंत्र न्यायाधीशांकडून होत जाण्याविषयी ठरविले आहे. ही पद्धत लोकांस सुखावह असल्याने लवकरच सर्व इन्साफी कामे स्वतंत्र न्यायाधीशांकडे देण्यात येतील, अशी आशा करण्यास जागा आहे. कारण हल्ली ''अधिकार व विभागणी कमिशन'' नेमून या प्रश्नाचा कायमचा निर्णय करण्याचे काम चालू आहे.

ऑनररी मॅजिस्ट्रेट व जूरर नेमणे आणि ग्राम्य न्यायाधीशांच्या स्थापना

याशिवाय राज्यांतील सुशिक्षित, वजनदार व लायक लोकांस ''ऑननरी मॅजिस्ट्रेट'' व महत्त्वाच्या फौजदारी खटल्यात पंच (जूरर) नेमण्यात येत असून, गावच्या पाटलास ''ग्राम्य न्यायाधीशी''चे अधिकार देऊन कामे घेण्याची पद्धत नुकतीच सुरू करण्यात आली आहे. यावरून राज्यातील लायक लोकांची बूज व्हावी व रयतेस तात्काळ व योग्य न्याय मिळावा, अशी महाराजांची सदिच्छा दिसून येते.

स्टँप ॲक्ट व नोंदणी ॲक्ट सुरू केला

१२. लोकांच्या देवघेवीचे व्यवहार सुरळीत चालावे व अज्ञान लोकांस लबाडी करून कोणी फसवू नये म्हणून दस्तऐवज नोंदणी ॲक्ट व स्टँप ॲक्ट सुरू करण्यात आला आहे. सन १८८९ साली स्टँप ॲक्ट सुरू केला तेव्हा हा एक नवीनच कर लोकांवर बसतो आहे अशा समजुतीने राज्यातील व्यापारी व महाजन लोकांनी संप करून सुमारे १५ दिवस राज्यात हरताळ पाडला होता. त्यावेळेस श्रीमंतांची स्वारी बडोदे येथे नसून निलगिरीस असल्याने त्यांजला ही खबर लागल्यावर बडोदे येथे येऊन लोकांच्या तक्रारींचे समाधान

करण्यात आले व लोकांनीही आपली राजनिष्ठा व श्रीमंतांवरील प्रेम व्यक्त करून हरताळ बंद केला आणि राजानुज्ञेप्रमाणे ''स्टॅप ॲक्ट'' सुरू करण्यास आपली संमती प्रदर्शित केली. हे महाराजांच्या चतुरतेचे उत्तम उदाहरण आहे.

फौज व पोलीस सुधारणा

१३. राजाच्या एकंदर कर्तव्यांपैकी, लोकांच्या जीवितांचे व वित्ताचे संरक्षण करणे हे मुख्य कर्तव्य मानले आहे. त्याला अनुसरून पोलिस खात्याची योग्य सुधारणा करण्यात येत आहे. कारण पोलिस खात्यात सुशिक्षित व रेग्युलर लोकांची उणीव असल्याने त्या खात्याचे काम समाधानकारक होत नाही, अशी लोकांची कुरकुर असल्यामुळे या खात्यास मिलिटरी खात्याचे कित्येक नियम लागू करण्यात आले असून, खात्यातील अंमलदार उच्च कुळांतील, सुशिक्षित व पदवीधर पाहून नेमण्यात येत आहेत व हल्ली हे खाते उत्तम नावाजलेल्या, पदवीधर, अशा एका* गृहस्थाच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्यामुळे या खात्यात लवकरच सुधारणा होईल अशी आशा करण्यास हरकत नाही. हल्ली (सन १९०१ मध्ये) पोलिसांची संख्या ४,३६५ असून त्याजबद्दल खर्च रुपये ६,७४,१७१ होत आहे व फौजखात्याबद्दल खर्च रुपये ३२,३६,२१३ होत आहे. त्यात मिलिटरीकडील लोकांची संख्या ५,६६५ असून, त्यांच्याबद्दलचा खर्च रुपये १४,५८,३६७ होत आहे. यावरून राज्याच्या बंदोबस्ताच्या कामी योग्य उपाय व खर्च करण्यात येत आहे, असे दिसून येईल.

आज्ञापत्रिका सुरू केली

१४. हुकुमांची अंमलबजावणी तात्काळ व्हावी व राज्याचे काम कशाप्रकारे चालते हे लोकांस समजून त्याबद्दल त्यांचा गैरसमज होऊ नये या हेतूने ब्रिटिश सरकारच्या 'गव्हर्नमेंट गॅझेट' प्रमाणे सुमारे १८ वर्षे झाली. या राज्यात दर गुरुवारी 'आज्ञापत्रिका' काढण्यात येत आहे. यामुळे सरकारी कामकाजात सुलभता झाली असून लोकांनाही राज्याप्रकरणी योग्य ती माहिती मिळू शकते व त्यामुळे लोकमत समजून येण्यासही साधन झाले आहे.

पाण्याची विपुलता केली

१५. बडोदे हे राजधानीचे मुख्य शहर असून, येथील लोकसंख्या १,०३,७९० आहे. (सन १९०१ च्या खानेसुमारी - रिपोर्ट) एवढ्या मोठ्या लोकवस्तीच्या शहरास पूर्वी पाण्याचे अत्यंत दुर्भिक्ष होते व त्यामुळे येथील हवा, पाणी व आरोग्य चांगले राहत नसे. ही मोठी उणीव भरून काढण्यासाठी बडोद्यापासून सुमारे १३ मैलांवर आजवा गावी सुमारे चाळीस लक्ष रुपये खर्च करून 'श्री सयाजी सरोवर' नावाचे मोठे विस्तीर्ण बांधकाम व तळे श्रीमंतांकडून बांधण्यात आले आहे आणि याच तळ्याच्या पाण्याचा पुरवठा प्रस्तुत शहरात होत असतो. या वर्णनीय व अत्यंत लोकोपयोगी कृत्यामुळे लहानापासून थोरापर्यंत

---

* मे. युसफअल्ली जमादार बॅरीस्टर-एट-लॉ हे गृहस्थ हल्ली पोलिस कमिशनर आहेत.

जे सुख झाले आहे, त्यामुळे महाराजांच्या एकंदर कीर्तीत पुष्कळ भर पडली असून, हे महत्‌कृत्य म्हणजे महाराजांनी आपले 'चिरंतन स्मारक' करून ठेवले आहे यात बिलकूल संशय नाही.

सरकारी व लोकोपयोगी बांधकामे

१६. महाराजांच्या कारकीर्दीत सरकारोपयोगी आणि लोकोपयोगी जी प्रसिद्ध बांधकामे करण्यात आली आहेत, ती खाली लिहिल्याप्रमाणे :-

	सरकारोपयोगी		**लोकोपयोगी**
१.	लक्ष्मीविलास राजमहल	१.	बडोदा कॉलेज
२.	मकरपुरा येथील नवीन राजवाडा	२.	बडोदा हायस्कूल
३.	नजरबागेतील नवीन राजवाडा	३.	बडोदा फिमेल हायस्कूल
४.	मिलिटरी ऑफिस	४.	सरदार स्कूल
५.	चिमणाबाई न्यायमंदिर	५.	डफरीन इस्पितळ
६.	कडी प्रांतातील मुख्य ऑफिसे राहण्यासाठी म्हैसाणा येथे बांधलेले भव्य व सुंदर 'गव्हर्नमेंट हाऊस	६.	चिमणाबाई टॉवर
७.	आजवा व मरोळी येथील डाक बंगले.	७.	आजवा वॉटर-वर्क्स
८.	उमराठ (या राज्यातील नवसारी प्रांतातले सानिटेरियम) येथील राजवाडा आणि कॅम्प	८.	पब्लिक गार्डन (कमेटी बाग)
९.	दिवाणाकरिता व इतर मुख्य कचेऱ्यांकरिता बांधलेल्या इमारती	९.	जोजवा वॉटर - वर्क्स (बडोदा प्रांतात संखेडा गावी दिलेले नळाचे पाणी.)
		१०.	कादरपूरचे तळे (कडी प्रांतांत शेतीचे उपयोगासाठी पाणी देण्याकरिता केलेले बांधकाम)
		११.	नवसारी, पादरा व बडोदे येथील मार्केटस

याशिवाय राज्यातील बहुतेक तालुक्यात वहिवाटदार कचेरी, मुनसफकोर्ट, दवाखाना व शाळा, यांच्याकरिता इमारती बांधण्यात आल्या असून, खेडेगावातून चौरे ऊर्फ चावड्या नवीन करविण्यात आल्या आहेत व कोठे कोठे जुन्यांची दुरुस्ती केली आहे आणि एका गावाहून दुसऱ्या गावी जाण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी रस्ते व पूल तयार करण्यात आले आहेत. यामुळे सरकारी नोकरास व रयतेस फार सुख झाले असून, या कामाकडे जो लक्षावधी रुपये खर्च झाला व होत आहे, त्यामुळे लोकांच्या चरितार्थास पुष्कळ मदत झाली आहे.

लोकनियुक्त मेंबरांच्या निवडणुकीचा हक्क

१७. वरील यादीतील कलम ११ यात दर्शविलेल्या हकीकतीवरून राज्यातील वजनदार, सुशिक्षित व लायक अशा लहान-मोठ्या लोकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणे अधिकार देऊन राजकीय कामांत नैपुण्य मिळविण्याची संधी त्यांना प्राप्त करून द्यावी, अशी हुजूरची जिज्ञासा असल्याचे दिसून आले असेलच, त्याअन्वये खुद्द बडोदे शहरातील म्युनिसिपालिटीच्या कामासाठी लोकांची मते घेऊन लोकनियुक्त मेंबर निवडण्यात येतात व अन्य ठिकाणी सरकारातूनच काही सरकारी अंमलदार व काही गावातील बिन नोकरियात सद्गृहस्थ निवडून त्यांची योजना करण्यात येते व त्यांच्या अनुमताने शहर सुधराईचे काम करण्यात येत आहे. अशिक्षितपणामुळे लोकांस अद्यापि या कामाचे महत्त्व कळू लागले नाही व यामुळे यापासून होणारे फायदे तूर्त जरी दिसून आले नाहीत, तरी कालांतराने यापासून राजाचे व प्रजेचे हित वाढण्यास पुष्कळच मदत होईल यात तिळमात्र संशय नाही आणि हा त्याचा आरंभीचा पायाच हुजूरच्या हातून रोवला गेला आहे, असे म्हटले तरी चालेल.

धारा सभेची स्थापना

१८. राजकीय सत्ता केवळ सरकारच्या हाती न ठेवता तिचा योग्य तो भाग लोकांच्या हाती दिल्याने राज्याचे व प्रजेचे पुष्कळ हित वाढणार आहे व ही उदार राजनीती श्रीमंतांस संमत असून, तिचे अनुकरण करण्याची पद्धती सुरू करण्यात आली आहे, हिचा जास्त प्रसार करण्यास सुशिक्षित लोकांची उणीव दाखविण्यात येते; परंतु हल्ली राज्यात शिक्षणप्रसार झपाट्याने सुरू असून, श्रीमंतांच्या कृपेमुळे व विद्यासक्तीमुळे बरेच सुशिक्षित आणि पदवीधर लोक बडोदे राज्यात पुढे येऊ लागले आहेत. त्यांजला प्रोत्साहन देऊन राजकीय कामात लायक बनण्याची संधी प्राप्त करून दिल्यास या सुधारणेचा पाया घातल्याचे महद्यश श्रीमंतांस प्राप्त होऊन राज्याची बरीच जोखीम विभागली जाईल. यासाठी बडोदे येथे एक "प्रतिनिधिसत्ताक सभा" स्थापन करावी व त्यात काही सरकारपक्षाच्या व काही लोकपक्षांच्या लोकांची योजना करून त्यांना नवीन कायदे करण्याची व राज्याच्या बजेटावर वादविवाद करून सुधारणा सुचविण्याची तूर्त मोकळीक देण्यात यावी, अशी लोकांची आशा आहे. तिचा हुजुरांतून विचार व्हावा, अशी या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीत श्रीमंतांना उद्देशून विज्ञप्ती करण्यात आली होती. त्याप्रमाणे ही महत्त्वाची सुधारणा महाराजांनी सन १९०८ च्या जानेवारी महिन्यात बडोदे राज्यात "धारासभा या नावाची संस्था" स्थापन केली असून, या सभेत खाली लिहिल्याप्रमाणे सतरा सभासद नेमण्यात आले आहेत.

४	सरकारी एक्स आफिशियो,
४	कामकाजाशी संबंध असलेले अंमलदार,
३	सरकारकडून निवडलेले लोकनियुक्त सभासद,
६	प्रजापक्षीय सभासद
१७	

येणेप्रमाणे नेमले असून, अध्यक्षस्थानी नामदार दिवाण साहेब यांची योजना करण्यात आली आहे. या सभेचा आजपर्यंतच्या कामाचा अनुभव पाहता सभेचे काम संतोषकारक चालले आहे असे दिसून येते, हे येथे नमूद करण्यास फार संतोष वाटतो. तथापि महाराजांच्या या उदार देणगीचा लोकपक्षीय पुढाऱ्यांनी उत्तरोत्तर सदुपयोग करून दाखवावा, अशी त्यांस आमची नम्र सूचना आहे.

लवाद कोठे व लोकल बोर्ड यांची स्थापना

१९. प्रजेच्या द्रव्याचा, कालाचा व श्रमाचा अपव्यय न होता त्यास लवकर न्याय मिळावा व आपल्या ''ग्रामपंचायती''च्या जुन्या पद्धतीचे पुनरुज्जीवन व्हावे यासाठी या राज्यात ''लवाद कोर्टे'' स्थापन होण्याची अत्यंत आवयश्यकता आहे, अशी आम्ही दुसरी विज्ञप्ती केली होती. त्या विज्ञप्तीसही यश आले असून, हल्ली राज्यात सर्वत्र ''लवाद कोर्टे'' व ''लोकल कोर्टे'' स्थापन करण्यात आली आहेत. यापासून हितकारक परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. यावरून राज्यात योग्य सुधारणा करण्यास महाराज किती उत्सुक असतात हे स्पष्ट दिसून येते.

विद्यार्थी युरोपात पाठविले

२०. राज्यातील सरदार व दरखदार लोकांकडे पूर्वीच्या कारकीर्दीत ती मर्दुमकीची, शौर्याची व स्वामीनिष्ठेची कामे सोपविण्यात येत होती, ती काल-स्थित्यंतरानुरूप हल्ली बंद झाली आहेत. तथापि, राज्याच्या या विशिष्ट अंगाचा व त्याजकडे होत असलेल्या खर्चाचा चालू स्थित्यनुरूप योग्य उपयोग व्हावा, अशा स्तुत्य हेतूने यांपैकी बहुतेक घराण्यांतील तरुण व होतकरू मुलांना 'त्यांच्या घरातील जुन्या मतांच्या वडील मंडळींची नाखुशी असतानाही त्यांना समुपदेश करून व प्रसंगविशेषी काही लालूच वगैरे दाखवून येथील सरदार स्कुलांत पाठविण्याची व युरोप खंडात जाऊन तेथील अनुकरणीय शिक्षण मिळविण्याची संधी हुजुरानाही केवळ दयार्द्र दृष्टीने व त्यांच्या आणि राज्याच्या उन्नतीच्या अत्यंत कळकळीच्या हेतूने त्यांना प्राप्त करून दिली होती; आणि या कामी हजारो रुपये खर्चाची झीज सोसण्यासही त्यांनीही मागेपुढे पाहिले नाही. यानंतर काही गरीब स्थितीतील मुलेही निवडून काढून त्यांजलाही सरकारी खर्चाने युरोप खंडांत वेगवेगळ्या धंद्यांचे शिक्षण मिळविण्यासाठी महाराजांकडून पाठविण्यात आले. त्यांपैकी काही जण शिकून बडोदे राज्यात नोकरीस लागले आहेत; परंतु स्वतंत्र रीतीने एखादा धंदा काढून त्यात आपले नैपुण्य दाखविण्याची आपल्यास प्राप्त झालेल्या शिक्षणाचा लाभ आपल्या स्वदेशबांधवास करून देण्याची जिज्ञासा दाखवून एवढ्या दीर्घोद्योगाचे साफल्य अजून विशेष कोणी करून दाखविले नाही. मुलांची निवड करण्यात किंवा दुसऱ्या काही बाबतीत चूक झाली आहे असे ते सामान्यतः लोकमत दिसून येते, ते खरे असावे असे वाटण्यास कारण झाले आहे. असो. प्रस्तुत सरकारी आश्रयाने जी विद्यार्थी मंडळी युरोपखंडात व जपान वगैरे देशांत सुशिक्षणाचा लाभ मिळवीत आहेत, त्यांनी तरी

याउपर या कामी खर्च होत असलेला पैसा, श्रम व काल यांचे सार्थक्य करून दाखवावे व हुजूरची सदिच्छा शेवटास न्यावी, अशी त्यांस प्रेमपूर्वक सूचना आहे.

धार्मिक सुधारणा

वेदोक्त कर्म सुरू केले

२१. सुशिक्षणाचा उत्तम परिणाम म्हणजे आपण कोण, आपली योग्यता काय व आपले कर्तव्य काय हे चांगले समजू लागावे हा होय. हीच त्याची कर्तव्यता मानली आहे. त्याला अनुसरून महाराजांकडून अनेक प्रकारचे यत्न सुरू आहेत. त्याचप्रमाणे धार्मिक पद्धतीतही शिरलेली कुधारणा काढून टाकण्याची त्यांस जिज्ञासा प्राप्त व्हावी यात नवल नाही. महाराज हे ''क्षत्रियकुलावंतस'' आहेत. याबद्दल सुशिक्षित लोकात मतभेद असेल असे मानण्यास कारण नाही. असे असताना राजवाड्यात शूद्रवत् पौराणिक कर्मे आचरण्यात येत असत. हे वेदप्रणीत धर्माप्रमाणे उचित नसल्यामुळे क्षत्रिय ज्ञातीस अनुरूप अशी कर्मे करण्याची त्यांना आवश्यकता दिसू लागली व त्याप्रमाणे महाराजांनी पोक्त विचाराने आपला उपक्रम सुरू केला आहे. आरंभी गतानुगतिक न्यायाने व एका विद्वान इतिहासकर्त्याने लिहिल्याप्रमाणे अंधकारमय युगात जी कामे करण्यात येत होती त्यात एकदम फेरफार होऊ लागल्यामुळे या वेदोक्त प्रकरणाबद्दल लोकांत बरीच तीव्रता दिसू लागली होती व हिंदुस्थानरूपी जरठ वातावरणात अनेक जातित्वामुळे जी एक प्रकारची शिथिलता प्राप्त झाली आहे, त्यास ही कृती आणखी साह्यभूत होते की काय, अशी सुशिक्षित समाजास भीती वाटत होती; परंतु महाराजांच्या चतुर सुव्यवस्थेमुळे त्या भीतीचा विनाश होऊन हल्ली राजवाड्यात व क्षत्रियांचे येथे वेदप्रणीत कर्मे ब्रह्मवृंद आनंदाने करू लागले आहेत व त्यामुळे दुराभिमान घालवण्याचे व वेदप्रणीत धर्मांची उन्नती करण्याचे श्रेय हुजुरांकडे येत आहे.

राजपुत्रांच्या मुंजी लाविल्या

त्याचप्रमाणे वेदोक्तधर्मानुसार क्षत्रियांचे मौंजीबंधन होणे इष्ट असल्यामुळे महाराजांनी आपले त्रिवर्ग राजपुत्र (श्री. कै. फत्तेसिंहराव, श्री. जयसिंहराव व श्री शिवाजीराव) यांच्या मुंजी तारीख २८-३-९८ रोजी उमराठ मुक्कामी मोठ्या समारंभाने लावून या कामी खर्च रुपये २३,२९९ केला आहे.

अपंग आणि गरीब लोकांस जातिनिर्बंध न ठेवता धर्मांदाय देण्याची पद्धती सुरू केली

२२. पूर्वीच्या काळी रेल्वेसारखी प्रवासाची सुखकर व सोयिस्कर साधने अस्तित्वात नसल्यामुळे लांबीचा प्रवास करणे फार जोखमीचे व कष्टावह वाटत असे आणि गुजराथेत मराठ्यांचा अंमल प्रस्थापित करण्याच्या कामी बडोदे येथे दक्षिणी लोकांची वस्ती होण्याची आवश्यकता होती. तेव्हा दक्षिणी प्रवासी लोकांच्या सोयीसाठी व त्या लोकांची बडोदे येथे वस्ती व्हावी म्हणून आणि परकीय देशांत वास्तव्य केल्याने त्यांचा निर्वाह चालविणे एकपक्षी असून,

हिंदू धर्माप्रमाणे ब्राह्मणांस अन्न दिले असता महत्पुण्य लागते या धार्मिक समजुतीमुळे ब्राह्मणांवरील पूर्वापार भक्तीमुळे सन १७८२ सालापासून त्यांना दररोज राजवाड्यात भोजन देण्यात येत असे. पुढे लोक फार येऊ लागले व भोजनाची व्यवस्था वेळी अवेळी लावणे गैरसोयीचे वाटू लागल्यावरून येतील तितक्या दक्षिणी ब्राह्मण लोकांस कोरडी खिचडी (२ भाग तांदूळ, १ भाग डाळ याप्रमाणे) श्री केदारेश्वरी देण्याची वहिवाट सन १८०८ पासून सुरू झाली. त्याचप्रमाणे श्री. कै. खंडेराव महाराज यांची मुसलमानी धर्मावर अत्यंत श्रद्धा होती हे सुप्रसिद्ध आहे. तेव्हा त्याही मुसलमान लोकांनाही दररोज मुक्तद्वार भोजन देण्यासाठी ग्यारमीचा कारखाना सन १८५८ साली स्थापन केला. यात दररोज येतील तितक्या मुसलमानास भोजन देण्यात येत असे व ग्यारमी* एकविसमीच्या दिवशी मिठ‡ पुलावाचा खाना व रोकड चिराखी‡ देण्यात येत असे. अशी वहिवाट आजपर्यंत अव्याहत चालू आहे. हरदूरकारखाने मिळून हल्ली सुमारे एक लक्ष रुपये खर्च दरसाल होत आहे. यात पात्रापात्रतेचा काही विचार होत नसल्याने हे कारखाने म्हणजे निरुद्योगी, आळशी, व्यसनी व धष्टपुष्ट लोकांना पोसण्याचे एक साधन होऊन बसले होते. अशी स्थिती अव्याहत सुरू राहणे, देशकालवर्तमानानुरूप अहिताचे असल्याने खरोखर धर्मादाय घेण्यास पात्र असे निराश्रित, अपंग, आंधळे, पांगळे वगैरे लोक आणि विधवा बाया व पोरकी मुले यांची कमेटीने निवड करून व त्यात जातीनिर्बंध न ठेवता सर्व जातींचा समावेश करून त्यांना पास देण्यात यावे व पास पाहून त्या लोकांना दररोज खिचडी दिली जावी. असा नियम तारीख १६ जून सन १८९३ पासून करण्यात आला आहे. हा उपक्रम करतेवेळी मतलबी व अज्ञानी लोकांनी पुष्कळ गवगवा सुरू केला होता; परंतु त्यांना न जुमानता महाराजांनी आपल्या सद्हेतू योग्य रीतीने शेवटास नेला. यावरून त्यांचा दृढनिश्चय व सत्पात्री दान करण्याची सदिच्छाही चांगली दिसून येते.

एका ठिकाणी म्हटले आहे :-

अन्नदानात्परं नास्ति विद्यादानं ततः परं ।।
अन्नेन क्षणिकातप्तिर्यावज्जीवं तु विद्यया ।।१।।

धनाचा विनियोग बीजाप्रमाणे वृद्धीकरिता झाला पाहिजे. हेच धोरण सांप्रतचे धर्मादायास ठेवण्यात येत आहे, ते यथायोग्य होय.

---

* मुसलमानी धर्मात, मुसलमानी महिन्याचा अकरावा व एकविसावा दिवस पवित्र मानिला असून, या दिवशी धर्मादाय दिल्यास महत्पुण्य लागते अशी त्यांची समजूत आहे. अकरावे दिवसास (ग्यारमी) व एकविसावे दिवसास (एकविसमी) म्हणतात.

‡ साखरभात.

‡ दक्षणा.

वैदिक धर्मास उत्तेजन

२३. राजवाड्यात दररोज निष्क्रय गोप्रदाने देण्याचे व दरसाल श्रावणमासी रमणा करून दक्षिणी व गुजराथी ब्राह्मणास अनुक्रमे रुपया व आठ आणे दक्षणा देण्याची वहिवाट चालत होती. हा खर्चही निरर्थक व अपात्री होतो असे दिसून आल्यावरून रमणा देण्याचे बंद करण्यात आले असून, गोप्रदानांचा ऐवज अपंग, वृद्ध व निराश्रित गरीब लोकांस वाटून देण्यात येत असतो आणि वैदिक धर्मानुसार व्याकरण, न्याय, मीमांसा, शास्त्रे, ज्योतिष, हरिदास पुराणिक वगैरेंची जे लोक परीक्षा देतील, त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणे दक्षणा-कमिटीने परीक्षा देऊन दरसाल श्रावणमासी दक्षणा देण्याचे धोरण* चालू ठेवण्यात आले आहे व त्याप्रमाणे परीक्षा देऊन दक्षणा घेण्याकरिता दरसाल दूरदूरच्या प्रदेशांतील ब्राह्मणसमुदाय येथे एकत्र होत असतो. यामुळे वैदिक धर्मास व विद्वान ब्राह्मणांना चांगले उत्तेजन मिळत आहे.

धमार्थ दवाखाने काढले

२४. याशिवाय हल्लीच्या पद्धतीस अनुसरून गरीब व व्याधिग्रस्त लोकांस सरकारातून फुकट औषधे देण्यासाठी मोठमोठ्या शहरांतून व तालुक्यांतून धमार्थ दवाखाने उघडण्यात आले आहेत व त्यांजवर आजारी माणसांच्या समजाप्रमाणे औषधोपचार करण्यासाठी विद्वान डॉक्टर, वैद्य व हकीम यांची योजना करण्यात आली आहे. या बाबतींचा खर्च दरसाल सुमारे ३,००,००० तीन लक्ष रुपये होत आहे व यावरून महाराजांचा कनवाळूपणा व दातृत्व उघड दिसून येत आहे.

शेतकीच्या उपयोगी जनावरांची हिंसा बंद केली

२५. धर्माच्या नावाखाली अज्ञान लोक शेतकीच्या उपयोगी जनावरांची हिंसा करतात, असे होणे अनिष्ट आहे. यासाठी येथे दरसाल दसऱ्याच्या दिवशी रेड्याचा बळी देण्यात येत असे. ती वहिवाट बंद करून त्याऐवजी मेंढरू बळी देण्याचे ठरवून तशी वहिवाट सुरू झाली आहे.

ग्रहणाची रजा बंद केली

२६. पृथ्वीची छाया चंद्रावर पडते त्यास 'ग्रहण' म्हणतात, हे सर्व सुशिक्षित लोकांना ठाऊक आहेत; परंतु भोळे व भाविक लोक या दिवशी राहू किंवा केतू हे पापग्रह चंद्रास किंवा सूर्यास पीडा करतात, अशा समजुतीने तो दिवस धार्मिक कृत्यात किंवा बहुतेक निरुद्योगात घालवितात. ही त्यांची अज्ञान समजूत दूर व्हावी व त्यांना उद्योगाचे महत्त्व कळावे म्हणून बडोदे राज्यातील सरकारी कचेऱ्यात ग्रहणाच्या दिवशी रजा पाळीत असत, ती बंद

---

* यंदापासून ही दक्षणा देण्याचे बंद करावे असे 'एज्युकेशन कमिशन' ने ठरविले होते; परंतु तसे करणे योग्य नाही, सबब ही दक्षणा चालू ठेवावी. असा महाराजांनी हुकूम केला आहे. यावरून त्यांचा स्वधर्माभिमान स्पष्ट दिसून येत आहे.

करण्यात आली आहे व फक्त धार्मिक कारणानेच कोणास रजा पाहिजे असेल, तर त्याने रिपोर्ट करून रजा घ्यावी, असे ठरविले आहे. यात लोकांच्या धार्मिक समजुतीसही महत्त्व दिल्याचे दिसून येते.

परदेशगमनाचे प्रायश्चित्त घेणे बंद केले

२७. आपल्या शास्त्रात परदेशगमन फार निंद्य मानले आहे; परंतु हल्ली आपल्या देशाची स्थिती पाहता अनेक कलाकौशल्याच्या व उद्योगधंद्यांच्या वृद्धीसाठी आपल्याला परदेशगमनाची अत्यंत आवश्यकता भासू लागली आहे व याबद्दल आता मतभेद राहिला नसून परदेशगमनाबद्दल येणाऱ्या अडचणी नाहीशा करण्याकडे आपल्या पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे. अशा प्रसंगी महाराजांसारख्या सुशिक्षित व लोकाग्रणी राजांकडून योग्य उपक्रम होण्याची अत्यंत आवश्यकता होती. त्याप्रमाणे महाराजांनी स्वतः युरोप खंडात सात वेळा जाऊन यासंबंधाच्या तीव्र समजुतीस बरेच शैथिल्य आणले आहे व आंग्लप्रदेशी जाऊन आल्याबद्दल समाजात बराच गवगवा होऊन प्रायश्चित्ताबद्दल खर्च करावा लागत असे, त्या खर्चास त्यांनी हळूहळू फाटा दिला आहे. इतकेच नव्हे, तर सरकारी नोकरीसाठी किंवा अन्य कारणाने कोणास बाह्यप्रदेशी पाठविले असताना सरकारातून प्रायश्चित्ताबद्दल द्रव्याद्वारे मदत देण्यात येणार नाही, असा त्यांनी नियम प्रसिद्ध केला आहे.

महाराजांची धार्मिक मते व दुरभिमान

२८. महाराजांची धार्मिक मते कशा प्रकारची आहेत, हे वरील हकीकतीवरून वाचकास चांगले कळून येईल. तथापि एवढे स्पष्ट केल्यावाचून राहवत नाही की, ते जसे अंधपरंपरागत जुन्या मतास चिकटून राहणारे नाहीत, तसेच इंग्रजी शिक्षणप्रभावास दिपून जाऊन नास्तिकही बनलेले नाहीत. त्यांस स्वधर्माचा योग्य अभिमान आहे व देशकालानुरूप त्यात सुधारणा व्हावी, अशी त्यांची इच्छा आहे. ते आर्यसमाजिष्ठ स्वामी नित्यानंद, कडकडीत सुधारक कै. प्रो. राजारामशास्त्री भागवत, किंवा जनरल वूथसारख्या रेव्हरंडाची व्याख्याने जितक्या प्रेमाने ऐकतात, तितक्याच प्रेमाने स्वामी हंसस्वरूप, वेदशास्त्रसंपन्न काशीनाथशास्त्री लेले किंवा वामनशास्त्री इस्लामपूरकर व विदुषी ॲनी बेझांटबाई यांची व्याख्याने ऐकतानाही दिसून येतात. सन १९०० साली श्रीहंसस्वरूप स्वामींचे येथे आगमन होऊन त्यांनी आपल्या सुश्राव्य धार्मिक व्याख्यानांनी बडोदे शहरातील लोकांस तल्लीन करून सोडले होते. त्यांची कीर्ती ऐकून महाराजांपुढेही काही दिवसांनी त्यांची काही सुश्राव्य व्याख्याने झाली. त्यावेळी स्वामींची व्याख्याने संपल्यावर महाराजांनी जे औपचारिक भाषण केले. (हे नि. २ येथे जोडले आहे.) त्याबद्दल बऱ्याच लोकांचा गैरसमज होऊन वर्तमानपत्रात टीका येऊ लागली होती व पुण्याच्या प्रसिद्ध 'केसरी' पत्रातून "अशा प्रकारचे भाषण करणे योग्य नसून वेदांतासारख्या गहन विषयावर मत देण्याचा महाराजांना अधिकार नाही," असेही उद्‌गार काढले होते; परंतु महाराजांनी

केलेल्या उपदेशाप्रमाणेच ते नवे व जुने यातून घेण्यासारखा भाग ग्रहण करीत आहेत. कोणत्याही पक्षाभिमानाचा दुराग्रह धरीत नाहीत. हे खरोखरच त्यांना अत्यंत भूषणास्पद होय. अशा प्रकारची वृत्ती होणे किती कठीण आहे व त्यांना केवढी विद्वत्ता व समंजस शक्ती असावी लागते याचा सुज्ञ वाचकांनीच विचार करावा.

खनिज द्रव्याचा शोध

२९) बरेच दिवसांवर, राज्यांतील खनिज द्रव्य शोधन करण्याचे खाते व व्यापारधंद्यांची माहिती मिळवून त्यात उन्नती होण्यास काय केले पाहिजे, त्याचा रिपोर्ट करण्यास हुजूर हुकुमाने कमेटी स्थापन झाली होती. त्याचे पुढे काय झाले ते समजले नाही; परंतु प्लेग व दुष्काळासारख्या आकस्मिक संकटांमुळे ही कामे बाजूस पडली असावीत, असे अनुमान आहे. तथापि योग्य संधी येताच त्याचा पुनः उपक्रम करण्यात येईल, अशी बळकट आशा आहे.

अनेक कलावृद्धीचा प्रयत्न

३०) गुदस्त साली अमदाबाद येथे महाराजांच्या प्रमुखत्वाखाली भरलेल्या कॉंग्रेस प्रदर्शनात हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यासंबंधाने महाराजांनी जे कळकळीचे व विद्वतप्रचुर भाषण केले आहे, ते वाचले म्हणजे या संबंधी महाराजांची मते व कळकळ कशा प्रकारची आहे हे चांगले दिसून येते. यासाठी त्या भाषणाचा निवडक सारांश यासोबत परिशिष्टात जोडण्यात आला आहे. यावरून स्वराज्यात महाराजांकडून अनेक उद्योगधंद्यांची प्रसिद्धी होईल अशी आशा साहजिक उत्पन्न होते.*

सामाजिक सुधारणा

बालविवाह व पुनर्विवाह

१) आपल्या समाजात बालविवाहाची चाल किती अनिष्ट आहे व विशिष्ट जातीत पुनर्विवाह करण्याच्या प्रतिबंधामुळे किती घातुक परिणाम घडत आहेत, हे आज आपणास नव्याने सांगण्याची गरज उरली नाही. याबाबतीत महाराजांनी कायदे‡ करून समाजास प्रोत्साहन दिले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन 'सोशल कॉन्फरन्स' मधून व कित्येक वर्तमानपत्रांतून झालेच आहे. व हा महाराजांचा प्रयत्न पुष्कळ सुज्ञ लोकांस पसंत आहे असे दिसून येते.

---

* शेती, उद्योगधंदे व व्यापार या कामाकडे हुजूर हुकूमाने रा.रा.छोटालाल बाबरभाई पटेल बी. ए. यांची नेमणूक ''डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर आणि इन्डस्ट्रिज'' या हुद्द्याने झाल्याबद्दल २८-७-०४ ची आज्ञापत्रिका पान १३०५ यात प्रसिद्ध झाले आहे.

‡ बालविवाह प्रतिबंधक कायदा ता. २१-७-१९०४ पासून अमलात आला असून त्यात मुलाचे वय १६ व मुलीचे वय १२ वर्षांचे पूर्ण झाल्यानंतर त्यांचा विवाह करण्याचे ठरविले आहे. व हा कायदा तोडणारास शंभर रुपयांहून जास्त नाही इतका दंड करण्याचे फर्माविले आहे.

प्रौढ मुला-मुलींचे विवाह

२) येथे जो नुकताच श्री. युवराज फत्तेसिंह महाराज यांचा लग्नसमारंभ साजरा करण्यात आला, त्या *प्रौढ मुला-मुलींचे विवाह घडवून आणण्याचा व काटकसरीने खर्च करण्याचा धडा लोकांस प्रत्यक्ष कृतीने श्रीमंतांकडून घालून देण्यात आला आहे. त्याचे लोक समंजसपणे अनुकरण करतील अशी आशा आहे.

गोषा बंद करणे

३) त्याचप्रमाणे आपले समाजात गोषाची चाल बिलकूल चांगली नाही व त्यामुळे स्त्रियांचे अतोनात नुकसान होत आहे, हे लक्षात घेऊन श्री. सौ. युवराज्ञीचा गोषा काढून टाकण्यात आला आहे. रुचिवैचित्र्यामुळे या संबंधाने लोकांत अनुकूल प्रतिकूल टीका होत असल्याचे दिसून येते. परंतु या प्रसंगी महाराजांनी जे नीतिधैर्य दाखविले आहे, ते अत्यंत प्रशंसनीय होय. भवभूतिकृत उत्तर रामचरिताच्या आरंभी सूत्रधाराने म्हटले आहेः

सर्वथा व्यवहर्तव्ये कुतोहा वचनीयता ।।
यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः ।।१।।

कोणी नाव ठेविल्याखेरीज जनात राहणे फार कठीण आहे. तेव्हा महाराजांनी विवाहाप्रसंगी नुकताच जो श्री. युवराजांस उपदेश केला आहे. ज्यात, कशाही प्रसंगी शुद्ध आचरण व निर्मळ दानत याने मनुष्यास आपला बचाव व मनाचे समाधान उत्तम रीतीने करिता येते, असे स्पष्ट सांगितले आहे. तोच न्याय प्रकृत स्थळी लागू करणे योग्य होय.

सांसारिक सुधारणा

पत्नीस व मुलांस शिक्षण

१) महाराजांनी आपल्या पत्नी श्री. सौ. चिमणाबाई महाराणीसाहेब व श्री. युवराज फत्तेसिंहराव महाराज यांस उत्तम प्रकारचे शिक्षण देऊन, त्यांजवरील अत्यंत जबाबदारीच्या कामांस, त्यांस लायक बनविले आहे. महाराणींचे सदाचरण, शिक्षण व प्रजेविषयीची कळकळ वर्णनीय असून श्री. युवराजांनीही मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिकची परीक्षा देऊन, युरोपातील प्रसिद्ध ऑक्सफर्ड विद्यालयात बी. ए. चा अभ्यास केला आहे, व त्यांची विद्वत्ता, सौजन्य, शालीनता, प्रजेच्या कल्याणाविषयीची उत्कट इच्छा ही आतापासूनच दिसून येऊ लागली आहेत.

त्याचप्रमाणे महाराजांनी आपले दुसरे चिरंजीव, राजपुत्र जयसिंहराव यांस विद्याभ्यासाकरिता प्रस्तुत युरोपात ठेवले असून बाकीचे राजपुत्र व राजकन्या यांचा विद्याभ्यास येथे मि. फ्रेंच या विद्वान गृहस्थाच्या देखरेखीखाली उत्तम प्रकारचा चालविला आहे. व प्रवासाचे आणि

---

* युवराजांचे वय २० व युवराज्ञीचे वय १४ वर्षांचे होते.

सुधारणेचे महत्त्व कुटुंबातील व आप्तइष्ट मंडळीस चांगले कळू लागावे म्हणून आपले बंधू, काका, आप्त व इतर मानकरी व कामदार वगैरे मंडळीस लाखो रुपये खर्च करून युरोप खंडातील प्रवासजन्य सुख अनुभविले आहे. यावरून त्यांचे सर्वांवरील प्रेम, त्यांच्या उन्नतीची उत्कट इच्छाही स्पष्ट दिसून येते.

२) मुंबई येथील 'ईस्ट आणि वेस्ट' या प्रसिद्ध मासिक पुस्तकाच्या माहे जानेवारी सन १९०२ च्या अंकात महाराजांनी राजकुमारांच्या विद्याभ्यासासंबंधाने एक उत्कृष्ट लेख लिहिला आहे आणि यांत इतर राजेरजवाडे व हिंदुस्थान सरकार यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्याही मनन करण्यासारख्या आहेत. त्याचप्रमाणे त्याही 'मागासलेल्या लोकांच्या शिक्षणबद्दल' व 'स्वतःच्या दिनचर्येबद्दल'ही लेख लिहिले आहेत. ते सर्व महत्त्वाचे असल्यामुळे साद्यंत या सोबत जोडले आहेत अशा प्रकारचे विद्वत्ताप्रचुर लेख, हिंदुस्थानातील संस्थानिकाकडून प्रसिद्ध होण्याचा हा पहिलाच सुयोग होय, हे मनात येऊन अत्यानंद वाटल्यावाचून राहत नाही व त्यावरून महाराजांची विद्वत्ता व स्वदेशोन्नतीची कळकळही मनात येऊन त्यांजविषयी स्वाभाविकरीत्या पूज्यबुद्धी उत्पन्न होते.

ब्रिटिश सरकारांवरील प्रेम व निष्ठा

३) महाराज जशी आपल्या राज्याची व कुटुंबांची वेगाने सुधारणा होण्याची काळजी घेत आहेत, त्याचप्रमाणे नामदार ब्रिटिश सरकारच्या ठिकाणी त्यांचे प्रेम, निष्ठा व सहानुभूतीही चांगली निदर्शनास येते. महाराजांच्या बाळपणात, त्यावेळचे प्रिन्स ऑफ वेल्स म्हणजे आपले हल्लीचे बादशहा, यांचे आगमनाप्रसंगी त्यांचे उत्तम स्वागत केल्याची हकीकत प्रारंभी आलीच आहे. कैलासवासी महाराणी यांचे नातू प्रिन्स व्हिक्टर यांची १८९० साली स्वारी आली होती. त्याचप्रमाणे महाराणीचे हिंदुस्थानातील प्रतिनिधी लॉर्ड डफरीन, लॉर्ड एल्जिन, लॉर्ड कर्झन व मुंबईचे गव्हर्नर फर्ग्युसन, लॉर्ड रे व लॉर्ड हॅरिस यांच्या स्वाऱ्या येथे आल्यावेळी, महाराजांकडून त्यांचे उत्तम स्वागत करण्यात आले होते. त्याबद्दल व ब्रिटिश सरकारचे ठायी असलेल्या प्रेमाबद्दल त्यांनी महाराजांचे अभिनंदन केले आहे. इतकेच नव्हे, तर महाराजांचे प्रेम व निष्ठा लक्षात वागवून नामदार ब्रिटिश सरकारांकडून खाली लिहिलेल्या प्रसंगी त्यास पदव्या व बहुमान देऊन त्यांचा गौरव व सत्कार करण्यात आला आहे.

४) सन १८७७ साली चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया यांनी हिंदुस्थानच्या बादशाहीचा मुकुट धारण केल्याबद्दल दिल्ली येथे जो प्रेक्षणीय दरबार भरविण्यात आला होता, त्याप्रसंगी महाराजांची स्वारी तेथे गेली असता, बादशाहीण महाराणीचे हिंदूस्थानातील प्रतिनिधी, यांनी महाराजास खास ए दौलत ए इंग्लिशिया, स्टार ऑफ इंडिया हा किताब देण्यात आला.

यानंतर सन १८८७ साली महाराणींचा 'ज्युबिली महोत्सव' झाला तेव्हा महाराजांस आणखी एक किताब देण्यात आला आहे.

याप्रमाणे त्यांच्या योग्यतेनुरूप सार्वभौम सरकारकडूनही त्यांचा बहुमान करण्यात आला आहे.

महाराजांचा विवेक व चतुरता

महाराजांच्या आजपर्यंतच्या आयुष्यक्रमात त्यांच्यावर सांसरिक व राजकीय जे प्रसंग ओढवले, त्यांचे निरसन त्यांनी अत्यंत विवेकाने व चतुरतेने केले आहे. त्यातील प्रसंग याखाली दर्शविण्यात येत आहे.

सांसारिक प्रसंग

मातुश्री व चुलती यांचे निधन

१) महाराजांच्या मातुश्री श्रीमती महाराणी जमनाबाई साहेब यांस तारीख २९ नोव्हेंबर १८९८ रोजी क्षयाच्या विकाराने देवाज्ञा झाली व महाराजांच्या चुलती श्री मा. राधाबाई साहेब या तारीख १५-२-०२ रोजी निवर्तल्या. या दुर्धर प्रसंगी महाराजांनी अत्यंत विवेकाने सर्वांचे समाधान करून आपले दुःख बाहेर दिसू दिले नाही. त्याचप्रमाणे आपल्या मातुश्री महाराणी जमनाबाई साहेब यांची श्रीशंकरावर फार भक्ती असल्याने त्यांच्या शेवटच्या इच्छेप्रमाणे त्यांनी स्थापन केलेले श्रीतारकेश्वर महादेवाचे संस्थानास, दरसाल सहा हजार रुपयांची नेमणूक करून देऊन या शिवालयाचे पूजा-नैवेद्याचा उत्तम प्रकारचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. व या महाराणींचे चरित्र अनेक कारणांनी उपयुक्त असून त्यांची धार्मिकता व उदारता प्रशंसनीय असल्यामुळे ते एका सुशिक्षित गृहस्थांकडून लिहवून त्यांचे चिरस्मरणीय स्मारक करून ठेविले आहे. त्याचप्रमाणे श्री मा. राधाबाई साहेब यांचे नावाने एक रक्कम शाळा खात्याकडे देण्यात आली असून, त्याचे व्याजातून स्त्रीविद्यार्थिनीस शिष्यवृत्त्या देण्याची योजना करण्यात आली आहे. ही हकीकत वाचून कोणास समाधान वाटणार नाही?

वडीला विषयी आदर

२. महाराजांच्या दुसऱ्या चुलती श्री मा. रेवाबाईसाहेब या वयाने सर्व खास मंडळीपेक्षा वडील असून त्यांचे भ्रतार मोठे होण्यापूर्वी अल्पवयात निवर्तल्यामुळे त्यांना राजकीय मान (मिलटरी सलामी) देण्यात येत नसे व त्यांच्यापेक्षा वयाने लहान; परंतु मानाने जास्त अशा श्री कै. जमनाबाईसाहेब व श्री कै. राधाबाईसाहेब यांना हा मान देण्यात येत होता. तेव्हा त्यांच्यात भेदाभेद दिसू नये व वडिलांचा मान चांगले रीतीने राहावा अशा सद्हेतूने सन १८८६ सालापासून त्यांस मिलिटरीची सलामी देत जाण्याचा हुजूर हुकूम झाला. त्याप्रामाणे प्रस्तुत वहिवाट सुरू आहे. यावरून कुटुंबातील वडील माणसांविषयी महाराजांचे मनात किती आदरबुद्धी वास करीत आहे हे दिसून येते.

राजकीय प्रसंग

सब्सिडियरी फौज कमी करणे

१. नामदार इंग्रज सरकारच्या मदतीस व बंदोबस्तास रेवाकांठा, महीकांठा व काठ्यावाड एजन्सीत, प्रत्येकी १००० प्रमाणे ३००० स्वारांची फौज श्री. गायकवाड सरकारकडून राहत असे; पण प्रस्तुत दंगेधोपे कमी होऊन चहूकडे शांतता झाल्यामुळे अशा फौजेची व मदतीची नामदार ब्रिटिश सरकारास जरूरत राहिली नाही. यासाठी ही फौज कमी करून तिच्या खर्चाची सुमारे तीन लक्ष रुपयांची रक्कम दरसाल आपणास रोख मिळत जावी, अशी त्यांनी मागणी केली. केवळ खर्चाच्या दृष्टीने श्री. गायकवाड सरकारचे यात काही नुकसान नव्हते; परंतु ही फौज कमी केल्यामुळे पुष्कळ गरीब लोकांच्या चरितार्थास अडचण पडेल असे समजून त्यांनी ब्रिटिश सरकारकडे याबद्दल पुष्कळ रदबदली केली; परंतु द्रव्यार्जनाच्या अतिशय लोभामुळे त्यांना ती मानवली नाही व शेवटी ही फौज कमी करावी लागली. याप्रसंगी महाराजांनी या लोकांबद्दल जी कळवळ व सहानुभूती दाखविली ती अत्यंत प्रशंसनीय होय. यापैकी जे लोक तरुण, होतकरू व नोकरी करण्यालायक होते त्यांजला राज्यात नोकऱ्या देऊन आपल्या आश्रयास ठेविले व जे वृद्ध, अशक्त वगैरे कारणाने नोकरी करण्यास असमर्थ होते त्यांना पेन्शन व ग्र्याच्युट्या वगैरे देऊन त्यांच्या निर्वाहास पुष्कळ मदत केली.

पिलवई केस

२. राज्यात सर्व्हेचे काम सुरू असताना कडी प्रांतातील विजापूर महालापैकी पिलवई गावचे लोकांनी सन १८९८ साली दंगा करून सर्व्हेकडील नोकरांस व दंग्याच्या बंदोबस्तासाठी गेलेल्या सरकारी अंमलदारास मारहाण केली व नामदार ब्रिटिश सरकारची टपाल नेण्या-आणण्याची बंदी केली. हे या लोकांचे करणे अनुचित, अन्यायाचे व अडाणीपणाचे होते. तत्राप याचा बंदोबस्त शांततेने होण्यासाठी प्रथम या लोकांच्या समजुती घालण्याचे पुष्कळ प्रयत्न करण्यात आले, त्यांस न जुमानता त्या लोकांनी गावास मोर्चेबंदी करणे, गैरकायदा पुष्कळ मंडळींचा जमाव एकत्र करणे, हत्यारे गोळा करणे असे प्रकार सुरू केल्यामुळे निरुपायाने तेथे 'मिलिटरी लॉ' म्हणजे लष्करी कायदा सुरू करून त्यांचा बंदोबस्त करावा लागला. यावेळेसही महाराजांची नेहमीची शांतवृत्ती व कनवाळू स्वभाव अनुभवास आल्यावाचून राहिला नाही. त्यांस या अज्ञानी लोकांची पुष्कळ कीव वाटत असे व यासाठी बनेल तेथपर्यंत त्यांच्याशी शांततेने, समजुतीने व न्यायाच्या रीतीने काम घेण्याविषयी त्यांनी हुकूम दिले होते. त्याप्रमाणे शेवटी या दंग्याचा मोड करून व त्यांच्या अडाणी पुढारी लोकांचा न्यायासनापुढे इन्साफ करून मग ज्याच्या त्याच्या गुन्ह्याप्रमाणे त्यांस शिक्षा करण्यात आल्या व पुनः असा प्रकार न होण्यासाठी तेथे जादा पोलीस ठेवण्यात आले. यावरून त्यांची न्यायप्रिती निदर्शनास येते.

बापट केस

३. सन १८९२ साली कै. दि. ब. मणिभाई जसभाई हे विद्वान आणि मुत्सद्दी गृहस्थ बडोद्याचे दिवाण असून, श्रीमंतांची स्वारी युरोपात गेली असताना बडोदे राज्याचा कारभार यांच्या अध्यक्षतेखाली कौन्सिल नेमून चालत होता व त्यावेळी राज्यात दक्षिणी व गुजराथी अशा दुफळ्या उत्पन्न होऊन प्रसिद्ध *''बापट केस''चा उदय झाला होता; परंतु महाराजांनी या कामाच्या चौकशीसाठी हजारो रुपये खर्च करून व तिऱ्हाईत आणि योग्य असे अंमलदाराचे कमिशन नेमून दोन्ही पक्षांना मान्य होईल अशा रीतीने या कामाचा निकाल अत्यंत चतुरतेने केला व वरील दुफळ्या लवकरच मोडून टाकल्या आणि आता त्यांचा मागमूसही दिसत नाही. यावरून त्यांचे राज्यकर्तृत्व उत्तम दिसून येते.

बाबाशाई रौप्य नाणे प्रचारातून बंद करणे

४. बडोदे राज्यात बाबाशाई (गायकवाडी नाणे) नाण्याचा प्रसार व्हावा व सुधारलेल्या राष्ट्राच्या नाण्याप्रमाणे ते नाणे पारखून घेण्यास व संग्रह करण्यास सोयीस्कर व्हावे म्हणून नवीन शियाशाई (सयाजी शाई) नाणे पाडण्याची (या नाण्याची रचना कलदार नाण्यांप्रमाणे असून, त्यांचवर श्रीमंतांचा सुंदर मुखवटा दाखल करण्यात आला होता.) सुरुवात केली होती व कडी प्रांतात शिक्कई नाणे (जुनाट बादशाही नाणे) चालत होते. ते बंद करून तेथेही हे नाणे दाखल करण्यात आले; परंतु दरम्यान नामदार हिंदुस्थान सरकारांनी ''करन्सी ॲक्ट'' सुरू करून हिंदुस्थानातील टाकसाळी बंद केल्यामुळे येथीलही टाकसाळ व नवीन नाणे पाडण्याचे बंद झाल्यामुळे बाजारात बाबाशाई नाण्यांची तूट येऊन बाबाशाई शिक्क्याचे जुने, घासलेले, खोचरलेले, पत्रीचे, गांगडे व ढबू वगैरे रुपये प्रचारात येऊ लागले व त्यांचे नानावटी लोकांनी रुपयाचे पंधरा आणे, चौदा आणे देण्याचा क्रम सुरू केला होता. याशिवाय व्यापाराच्या हरएक मालाची किंमत कलदार नाण्यात द्यावी लागत असून, त्या नाण्यांची ब्रिटिश राज्यातही ओढ सुरू झाल्यामुळे त्यांना पूर्वी शेकडा १५ पासून १८ पर्यंत बट्टा पडत असे. त्याचा भाव ४०-४५

---

* या केसची साद्यंत हकीकत स्थलाभावामुळे येथे देता येत नाही; परंतु ती त्यावेळी अनेक वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली असून बडोद्यास तर 'श्री सयाजी विजय' पत्राच्या मालकांनी जादापत्र काढून प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला होता. यात राजा व प्रजा यांचे हक्काबद्दल, प्रजेस व एका विविक्षित अमलदारास मिळणाऱ्या न्यायाबद्दल, व परस्पर समाजातील ऐक्याबद्दल, वगैरे अनेक गोष्टींशी तिचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे तिला त्यावेळी बरेच महत्त्व प्राप्त होऊन ती एक लोकचर्चेचा प्रधान विषय होऊन बसली होती. ही केस चालविण्यास आरोपी रा. बापट यांचे तर्फे कै. महादेव चिमणाजी आपटे मुंबई हायकोर्टाचे वकील व रा. रा. बाळ गंगाधर टिळक आणि सरकार तर्फे ब्यारिस्टर ब्रान्सन् व नामदार मि. फेरोजशहा मेहेता आदि करून प्रसिद्ध वाक्पटु व कायदेपंडित मंडळी बडोद्यास आली होती. आणि या केसच्या चौकशीकरिता महाराजांनी विवक्षित जातीच्या विद्वान् अंमलदाराचे 'स्पेशल कमिशन' नेमिले त्यांचे पुढे ही केस सुमारे तीन महिने चालू होती. यावरून या केसला केवढे महत्व प्राप्त झाले होते ते सहज दिसून येणार आहे.

पर्यंत वाढला, म्हणजे १४५ बाबाशाई रुपये द्यावे तेव्हा कलदार १०० रुपये मिळू लागले. यामुळे गायकवाडी रयत अगदी जिकिरीस आली. देशात धान्याची सुबत्ता असूनही बडोद्यास दुष्काळ स्थितीप्रमाणे धान्य व इतर जिनसा पुष्कळ महाग विकू लागल्या आणि ईश्वरी प्रकोपामुळे मागाहून त्यात भयंकर दुष्काळाचीही भर पडली. त्यामुळे गरिबांचे जे हाल व उपासमार झाली ती लिहिता येणे शक्य नाही. अशी चहूकडून विपन्न स्थिती व लोकांची ओरड वाढल्यामुळे महाराजांना आपल्या पुत्रवत प्रजेची कीव व दया येऊन त्यांनी यासंबंधाने नामदार ब्रिटिश सरकारशी पत्रव्यवहार सुरू केला व शेवटी लोकहितार्थ कृपाळू होऊन पोक्त विचाराने व निरुपायाने "पन्नास वर्षांच्या मुदतीसाठी" कलदार रौप्य नाणे या राज्यात सुरू करण्याचे ठरविले व बाबाशाई रौप्य नाणे ता. १३/२/०१ पासून प्रचारातून बाद केले. हल्ली राज्यात बाबाशाई तांबानाणे सुरू ठेवले आहे; परंतु बाबाशाई रौप्यनाणे तूर्त तरी प्रचारातून कमी होणे हा हक्काचा व महत्त्वाच्या घडामोडीचा प्रश्न असल्यामुळे कित्येकांकडून याबद्दल नाखुषी दर्शविण्यात आली होती; परंतु या गोष्टीचा साधक-बाधक रीतीने विचार केला असता या कामी महाराजांनी प्रस्तुतची स्थिती व मागचे-पुढचे धोरण पाहून व आपली समंजस शक्ती कसोटीस लावून राज्याचे मुख्य कर्तव्य जे प्रजाहित पाहणे ते उत्तम रीतीने बजाविले आहे व प्रसंगी आपल्या हक्कांकडेही दुर्लक्ष करून प्रजावात्सल्य व्यक्त केले आहे, असे दिसून येईल आणि यापेक्षा या प्रश्नाचा अधिक चांगला निकाल कोणासही करता आला नसता, असे विचारांती कबूल करावे लागेल.

दिवाणांच्या नेमणुका

५. महाराजांच्या कारकीर्दीत आजपर्यंत खाली लिहिल्याप्रमाणे दिवाणांच्या नेमणुका झाल्या आहेत :-

१. नामदार राजे सर टी. माधवराव, के. सी. एस. आय.
२. खानबहादूर काजी शहाबुद्दीन, सी. आय. ई.
३. दिवाणबहादूर लक्ष्मण जगन्नाथ वैद्य.
४. दिवाणबहादूर मणिभाई जसभाई.
५. दिवाणबहादूर श्रीनिवास राघव आयंगार, सी. आय. ई.
६. दिवाणबहादूर रामचंद्र विठोबा धामणस्कर.
७. खानबहादूर केरशारप रुस्तमजी, एम., ए. एलएल. बी.
८. सर रोमेशचंद्र दत्त, सी. आय. ई.

ही सर्व मंडळी विद्वान व राजकार्यकुशल असल्याने त्यांची निवड करण्यात महाराजांनी आपले चातुर्य उत्तम रीतीने प्रगट केले आहे, यात संशय नाही. तसेच यापैकी नंबर १ व ४ च्या गृहस्थांस रजा दिल्यानंतर त्या जागी दुसरे गृहस्थांची निवड करून योजना करण्याच्या प्रसंगी महाराजांचे तेज, राज्यकर्तृत्व, दूरदृष्टी ही लोकांच्या चांगली निदर्शनास आली आहे.

मि. दत्त यांची कारकीर्द

शेवटचे दिवाण सर रोमेशचंद्र दत्त हे अत्यंत विद्वान, लेखक, वक्ते व राज्यकार्यकुशल असून, हिंदुस्थान देशातील एक प्रमुख पुढारी होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत महाराजांस योग्य प्रकारचा सल्ला देऊन ग्रामपंचायती, लोकल बोर्डे व धारासभा यांची स्थापना केली आणि राज्यातील व्यापार धंदे भरभराटीस यावेत म्हणून सन १९०९ सालापासून सरहद्दीवरील जकातीची ठाणी उठवून राज्यातील तमाम अमदानी व रवानगी जकात माफ करविली. या सुधारणेमुळे बडोदे राज्याच्या उत्पन्नात सुमारे चार लाख रुपये कमी झाले आहेत; परंतु प्रजेच्या व देशाच्या भावी उन्नतीकरिता हे नुकसान सोसण्यासही महाराजांनी माघार घेतली नाही, ही सामान्य गोष्ट नव्हे. प्रजेच्या दुर्दैवाने मि. दत्त यांना काळजाच्या विकारामुळे तारीख ३० नोव्हेंबर सन १९०९, मंगळवार रोजी एकाएकी देवाज्ञा झाली. यामुळे "नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता" अशा प्रकारच्या राज्यकार्य धुरंधर पुरुषास बडोदे राज्याची प्रजा तूर्त तरी विन्मुख झाली आहे, ही दुःखाची गोष्ट होय. हल्ली बडोदे राज्याच्या दिवाणाचे काम मि. सेडन आय. सी. एस. हे विद्वान सिव्हिलियन गृहस्थ ॲक्टिंगप्रमाणे करीत आहेत; परंतु या महत्त्वाच्या जागेवर लोकमान्य व राजमान्य अशा कोणत्या हिंदी गृहस्थाची निवड महाराज करितात याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत आणि आजपर्यंतच्या अनुभवावरून या जागेकरिता महाराज योग्य ती निवड करतील, असा सर्वत्रांस भरवसा वाटत आहे.

प्लेग व दुष्काळ

६. सन १८९८ साली पहिल्यानेच बडोद्यास प्लेग आला व सन १९०० साली गुजराथेत भयंकर दुष्काळ पडला होता. या दोन्ही प्रसंगी महाराजांनी उदारपणे* खर्च करून व स्वराज्यातील प्रत्येक भागात स्वतः हिंडून रयतेस धीर देऊन व स्वतः श्रम घेऊन या भयंकर संकटातून तिची मुक्तता केली आहे. त्यांच्या या प्रजावात्सल्याचे स्मरण प्रजेस पुष्कळ दिवस होत राहील, यात बिलकूल संशय नाही.

महाराजांचे नैसर्गिक गुण

स्वभाव

महाराजांचा स्वभाव शांत व सुविचारी असून, अंतःकरण निर्मळ, कृपाळू व परमन्यायी आहे आणि त्यांच्या अंगी दृढनिश्चय, कार्यतत्परता, चतुरता व आप्तस्वकीय आणि पदरच्या लोकांविषयी सहानुभूती, अनुराग व गुणग्राहकता हे गुण चांगल्या रीतीने वास करीत आहेत, त्याचा अनुभव अनेक वेळा आलेला आहेच; पण यापेक्षाही त्यांनी नीतिमत्ता, उदारता, विद्यासक्ती, निर्व्यसनता,

---

* दुष्काळासंबंधाने एकंदर खर्च रुपये १,२६,३५,०२८ झाल्याने दुष्काळ रिपोर्टात प्रसिद्ध झाले आहे. व ही रक्कम राज्याच्या एक सालच्या उत्पन्नाजवळ जवळ असल्याने खर्च बऱ्याच सढळ हाताने केला आहे असे दिसून येते.

एकपत्नीत्व हे गुण लक्षात ठेवण्यासारखे व लहानापासून थोरापर्यंत गरीब व श्रीमंतांनीही अत्यंत अनुकरण करण्यायोग्य आहेत.

काम करण्याची हातोटी

महाराज कोणतेही काम उतावीळपणे किंवा दूराभिमानाने करीत नाहीत, तर जे काम करावयाचे असेल त्याचे साधक-बाधक बाजूंचा पूर्ण विचार करून व त्यासंबंधाने लोकमत कशा प्रकारचे आहे व त्यास किती महत्व दिले पाहिजे, हे समजून घेऊन मग करीत असतात. तसेच ते जेव्हा राज्यकारभाराचे काम पाहात असतात, तेव्हा कोणत्याही विकारास वश न होता ईश्वराने जी मोठी जबाबदारी आपल्या शिरावर ठेवली आहे, तिला ओळखून केवळ निर्मळ मनाने व न्याय्य अंतःकरणाने हुकूम देत असल्याचे नेहमी आढळून येते. त्याचप्रमाणे जे काम करावयाचे ते उपयुक्त व चांगले आहे, अशी त्यांच्या मनाची खात्री झाली म्हणजे, ते साध्य होण्यास कितीही अडचणी आल्या तरी न डगमगता धैर्याने, शहाणपणाने ते आपला हेतू उत्तम रीतीने शेवटास नेतात.

चांगल्या कामाची बूज करणे

कोणी आपले कर्तव्य उत्तम रीतीने बजाविल्याचे त्यांस दिसून येते तेव्हा त्याचा आदर, सत्कार व बहुमान करण्यासही ते कधी चुकत नाहीत व या वृत्तीस अनुसरून त्यांनी वेळोवेळी लोकपक्षांचे पुढारी, आप्तस्वकीय व पदरच्या लोकांस पोशाख, पदके, इल्काब, छत्र्या, मशाली, हत्ती, पालख्या वगैरे बहुमान देऊन संतुष्ट केले आहे व अशा रीतीने त्यांच्या चांगल्या कृत्यांची बूज करून त्यांस प्रोत्साहन दिले आहे व अशा रीतीने त्यांच्या चांगल्या कृत्यांची बूज करून त्यांस प्रोत्साहन दिले आहे.

राहणी

महाराजांची नीतिमत्ता फार मोठी आहे. साधारण सुखवस्तू लोकांपासून श्रीमंतांपर्यंत दिसून येणारा गर्व किंवा ताठा त्यांच्या ठिकाणी बिलकूल नाही. एवढे मोठे ऐश्वर्य व अधिकार त्यांना प्राप्त झाला आहे, तरी लहानांपासून थोरांपर्यंत त्यांची वर्तणूक अत्यंत प्रेमळ व शालीनतनेची दिसून येते आणि राहणी डामडौलाची नसून अगदी साधी असते. यामुळेच त्यांचे दर्शन घडताच पाहणारांस सानंदाश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

विद्यासक्ती

महाराजांचा विद्याभिलाष सुप्रसिद्धच आहे. त्यांस जरा कोणते व्यसन किंवा नाद असेल अगर या जगात प्रिय अशी कोणती वस्तू वाटत असेल, तर ''सतत विद्याव्यासंग'' हा त्यांच्या ठिकाणी पूर्ण बिंबला आहे, असे म्हटले पाहिजे. तेव्हा या सरस्वती देवीच्या निःस्सीम उपासकांना कीर्तिरूपी वधूने अत्यंत प्रेमपूर्वक माळ घालावी यात नवल नाही.

शिक्षणाचे महत्त्व

शिक्षणाचे महत्त्व केवढे मोठे आहे, हे ते पूर्णपणे जाणतात व त्याचा प्रसार झपाट्याने झाल्याशिवाय आपल्या देशाची व समाजाची उन्नती व्हावयाची नाही, असे त्यांचे ठाम मत असून, ते अनेक प्रसंगी त्यांनी व्यक्त केले आहे. इतकेच नव्हे, तर हल्ली बडोदे राज्यात सक्तीचे शिक्षण सुरू करून त्यांनी आपली विद्याभिलाषा सर्वत्रांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

ग्रंथप्रसार करणे

आपले राज्यात विद्याप्रसार झपाट्याने व्हावा एतदर्थ महाराजांचे अहर्निश प्रयत्न सुरू आहेत. त्यांचे दिग्दर्शन वरील चरित्रात योग्य स्थळी करण्यात आलेच आहे; पण त्याशिवाय त्यानी सूपशास्त्र, संगीतशास्त्र, क्रीडाशास्त्र, इतिहास वगैरे अनेक विषयांवर हजारो रुपये खर्च करून कित्येक विद्वान गृहस्थांकडून अनेक पुस्तके लिहविली आहेत व ती ''राष्ट्र कथामाला'', ''महाराष्ट्र ग्रंथमाला'', ''श्रीसयाजी ज्ञानमंजूषा '', ''क्रीडामाला'' वगैरे अनेक रूपाने प्रचलित झाली आहेत, तसेच विद्वान व होतकरू ग्रंथकारास आश्रय व उत्तेजन देऊन त्यांच्याकरवी पुष्कळ उत्तम पुस्तके लोकसमूहापुढे आणविली आहेत व आणखी आणवीत आहेत. त्याचप्रमाणे उत्तम व्याख्यात्यांची व्याख्याने आपण ऐकून लोकसमूहास ऐकविण्याचा व स्वतःही योग्य प्रसंगी सुश्राव्य व्याख्याने देण्याचा व अनेक महत्त्वाच्या विषयांवर लेख लिहिण्याचा त्यांचा उपक्रम सुरू असतो. हे सर्व प्रकार पाहिले म्हणजे त्यांची जबरदस्त विद्यासक्ती अनुभवास येते.

उदारता

महाराजांची उदारता व सत्यापात्री दान करण्याची हातोटीही वाखाणण्यासारखी आहे. त्यांच्याकडून बडोद्याच्या व बाह्य ठिकाणच्या बहुतेक सार्वजनिक कृत्यांना, ग्रंथकारांना, कलाकौशल्यास, प्रसिद्ध व थोर गृहस्थांच्या स्मारकास व विद्योत्तेजनास नेहमी उदार आश्रय देण्यात येतो. कोणी काही चांगले कृत्यास मदत मागितली व त्यांस न मिळता तो माणूस विन्मुख गेला, असे सहसा घडून येत नाही. याशिवाय दानधर्म, देणग्या वगैरे नेहमीने खर्च चालू आहेत.

निर्व्यसनता

महाराजांची निर्व्यसनता व एकपत्नीत्व हे गुण राजे लोकांत तर काय पण सामान्य लोकांतही क्वचित आढळून येतात. कित्येक राजे त्यांना प्राप्त झालेल्या संपत्तीच्या बलावर आपल्या कर्तव्यास पराङ्मुख होऊन निर्दय, द्रव्यलोभी, गर्वयुक्त, मदिरास्त्री द्यूतादी विषयासक्त झाल्याची उदाहरणे आहेत व व्यसनातिरेक झाल्यामुळे राजपदास मुकलेल्या राजाची उदाहरणे इतिहासात अनेक आहेत व नित्यशः पाहण्यातही येतात; परंतु महाराजांच्या मनात या दुर्व्यसनाचे भयंकर परिणाम इतके ठसले आहेत की, ते मद्य वगैरे कैफी पदार्थास तर शिवतही नाहीत; परंतु पानसुपारीसारख्या सामान्य व्यसनापासूनही ते निर्मुक्त आहेत.

व्यासंग

याशिवाय त्यांचा सर्वांत मुख्य गुण म्हटला म्हणजे ''त्यांचा जबरदस्त व्यासंग'' होय. महाराज सकाळी उठल्यापासून तो रात्री निजेपर्यंत त्यांचा एक क्षणही रिकामा जात नाही. नेहमी काहीना काही व्यासंग सुरू असतो. कधी ते राजकीय कामात गुंतलेले असतात, तर कधी धार्मिक व सामाजिक सुधारणेबद्दल त्यांचा उपक्रम सुरू असतो. कधी ते भगवद्गीता, उपनिषदे वगैरेंसारख्या वेदांत विषयांचे परिशीलन करतात, तर कधी औद्योगिक प्रदर्शनासारख्या संस्थेच्या उन्नतीकडे त्यांचे मन निमग्न झालेले असते. हे पाहिले म्हणजे ते आपल्या राज्यकर्तृत्वाचे जबाबदारीचे व अत्यंत महत्त्वाचे काम सांभाळून अशा प्रकारच्या अनेक विषयांकडे कसे लक्ष पुरवितात, याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

दिनचर्या

महाराज युरोपात असताना त्यांनी आपल्या दिनचर्येबद्दल तेथील 'नाइन्टीन्थ सेंचुरी' नावाच्या प्रसिद्ध मासिक पुस्तकात स्वतःच एक सुंदर लेख लिहिला आहे. तो वाचकांच्या माहितीसाठी यासोबत निशाणी ३ येथे जोडण्यात आला आहे. त्यावरून त्यांच्या आयुष्यक्रमाची व उदात्त विचारांची बरीच कल्पना होईल. तथापि त्यांचा नित्यक्रम साधारणतः याखाली देण्यात येत आहे :-

६	वाजता प्रातःकाळी निजून उठणे.
७	वाजेपर्यंत प्रातर्विधी, स्नान, पूजा, न्याहारी, कपडे घालणे वगैरे होऊन स्वारी बाहेर फिरावयास निघते.
७ ते ८।।	घोड्यावर अगर गाडीतून फिरणे व त्यावेळी अनेक कामांची व कारखान्यांची पाहणी करणे, व्यायाम.
८।। ते १०।।	अभ्यास व विशिष्ट ऑफिसरांच्या भेटी.
१०।। ते १२	जेवण, विश्रांती व टपाल.
१२ ते ४	राज्यकारभाराचे काम पाहणे.
दुपारी ४ ते ४।।	अल्पोहार
सायंकाळी ४।। ते ५	कुटुंबातील मंडळीशी संभाषण व विश्रांती.
सायंकाळी ५ ते ६	खासगी वाचन, भेटी घेणे.
६ ते ७	व्यायाम.
७ ते ८	भोजन.
८ ते ९	करमणूक खेळ वगैरे.
९ ते ११	उपयुक्त विषयांवरील लेखन किंवा वाचन व पुढे निद्रा.

याप्रमाणे दिनचर्या चालू असते. यात काही विशेष कारणाशिवाय फेरफार होत नाही. यावरून त्यांच्या जबरदस्त व्यासंगाची व अहर्निश चालू असलेल्या श्रमांची कल्पना करता येईल.

घोड्यावर बसणे व शिकार करणे

महाराज घोड्यावर बसण्याच्या व बंदूक आणि निशाण मारण्याच्या कामात अत्यंत प्रवीण आहेत. त्यांनी क्षात्रधर्मास अनुसरून आजपर्यंत अनेक वेळा हरिण, चित्ते, वाघ वगैरे वन्य व हिंस्त्र श्वापदांच्या शिकारी केल्या आहेत व हमेशा करीत आहेत, तसेच तालीम करण्याचा व देशी आणि इंग्रजी मर्दुमकीचे वगैरे खेळ खेळण्याचाही त्यांना व्यासंग आहे.

एक उपदेशपर लेख

महाराजांस राज्याधिकार प्राप्त झाला तेव्हा त्याबद्दल व महाराजांच्या भावी कारकीर्दीबद्दल अनेक वर्तमानपत्रांतून अभिनंदनपर व उपदेशपर लेख आले होते. त्यात पुण्याच्या प्रसिद्ध केसरी पत्रातून (वर्ष १, अंक ५२) 'बडोद्याचे सयाजीराव महाराज यांस दोन उपदेशपर शब्द' या मथळ्याखाली एक लेख आला होता. तो महाराजांनीच काय; पण लहान-मोठ्या सर्व संस्थानिकांनी मनन करण्यास योग्य आहे. तो साद्यंत या ठिकाणी उतरून घेण्याची सोय नाही; परंतु त्यातील काही महत्त्वाचे विचार याखाली दर्शित करण्यात येत आहेत व त्यावरून या सदुपदेशाचे महाराजांनी कसे सार्थक्य करून दाखविले आहे, तेही वाचकांना ताडून पाहता येईल.

१. प्रपंचात वागणाऱ्या प्रत्येक मनुष्यावर थोडीफार जबाबदारी असतेच; परंतु प्रजापालन हे ज्यांचे कर्तव्यकर्म होय, त्यांच्या माथी या जबाबदारीचा जेवढा बोजा असतो, तेवढा कोणाच्याच शिरावर नसतो. सामान्य मनुष्याच्या बऱ्यावाईट वर्तनाचा संसर्ग दूरवर जाऊन पोहोचत नाही; परंतु राजा हा राष्ट्र कुटुंबाचा अधिपती व चालकात्मा असल्यामुळे त्याच्या गुणावगुणाचा परिणाम सर्व प्रजेवर तत्काळ होतो. यासाठी नृपतीचे वर्तन अत्यंत विचारशील असले पाहिजे.

२. राजा आणि प्रजा यांचे हिताहितामध्ये 'द्विधात्वाचा' आविर्भाव होणे हे उभयतांच्याही कल्याणाचे नाशक असते. या परस्परांच्या हिताची एकात्मता असली पाहिजे. हिचा नाश किंवा विध्वंस उभयतांना अपायकारक असतो. ही एकात्मता राखणे हे राजनीतीचे सारतत्त्व होय.

३. देशाच्या स्थित्यनुमानाप्रमाणे त्यात शुद्ध एकसत्ताक, अनेकसत्ताक किंवा मिश्रसत्ताक असे राज्य असते. प्रजासत्ताक किंवा अनेकसत्ताक राज्याकडे जगाची प्रवृत्ती होणे साहजिक आहे. इच्छा स्वाभाविक ओघास प्रतिबंध करणारे राजे असमंजस होत. तथापि योग्य काळ आल्यावाचून प्रजासत्ताक राज्याची स्थापना व्हावयाची नाही.

४. आपल्या सदाचरणाने लोकांस संतोषित ठेवून त्यांनी त्याची अपेक्षा होऊ न देणे हे राजे लोकांचे परमभूषण होय. राजे लोकांनी आपल्या बुद्धीचे क्षालन केले पाहिजे. त्यांच्या अंतःकरणात मदमत्सरादी कुबुद्धीचा वारा अगदी उपयोगी नाही. त्यांची मने उदात्त, गंभीर, प्रगल्भ व धैर्यवान आणि विचारी अशी असली पाहिजेत. स्वतःसंबंधाने एवढी तयारी झाल्यावर दुसरी गोष्ट मंत्रिपरीक्षणाची. उत्तम मंत्री निवडता येणे यात काय ते

राजाचे खरे चातुर्य. तिसरी गोष्ट राजा ज्या मुलुखांवर राज्य करीत असेल तेथील लोकांच्या चांगल्यासाठी झटणे. चौथी गोष्ट लोकांना आपली खरी दुःखे सरकारच्या कानावर घालता यावीत, यासाठी त्यांना सभा करण्याची व वर्तमानपत्रे काढण्याची पूर्ण स्वतंत्रता असावी. पाचवे प्रजेस विद्या देणे हे राजाचे मुख्य कर्तव्य होय. प्रजा सुशिक्षित नसली तर राजाला फार त्रास पडतो. कारण एक तर राज्यशकट ओढण्यास त्याला तिच्यापासून चांगले साह्य होत नाही. इतकेच नव्हे, तर उलट ती त्याच्या सदुद्देशास व सदुद्योगास प्रतिबंधक होते. सारांश ऐहिक आणि पारमार्थिक सुख जोडण्याचे मुख्य साधन विद्या होय. राज्याची बळकटी, इभ्रत, स्वातंत्र्य, भरभराटी ही सर्व प्रजेच्या सुशिक्षिततेवर अवलंबून असतात.

५. लेखी कायदे असावे. खासगी आणि सरकारी खाती पृथक असावीत. न्याय थोड्या खर्चाने व थोड्या काळात मिळण्याची सोय असावी. करभार प्रजेवर जितका कमी पडेल तितका पाडावा. घेतलेल्या कराचा प्रजेच्या कल्याणार्थ होईल तितका विनियोग होत जावा.

याप्रमाणे हा अत्यंत कळकळीचा व उदात्त लेख ज्या उद्देशाने लिहिला आहे त्या उद्देशाचे पूर्ण सार्थक्य महाराजांनी करून दाखविले आहे. हे त्यांच्या वरील गुणांवरून दिसून येऊन प्रत्येक देशाभिमानी गृहस्थास फार संतोष होईल यात संशय नाही.

महाराजांची लोकप्रियता

महाराजांच्या अनेक गुणांस लोलुप होऊन येथील प्रजेची महाराजांविषयीची लोकप्रियता अनेक प्रसंगी निदर्शनास आली आहे. महाराजांची स्वारी जेव्हा-जेव्हा युरोपात जाण्यासाठी रवाना होत असे, त्यावेळची त्यांची खिन्नता व स्वारी येथे येऊन सुखरूप दाखल झाल्यावर त्यांचे आगमनोत्सवाची आतुरता ही ज्यांनी-ज्यांनी पाहिली आहे त्यांस या गोष्टीचा चांगला प्रत्यय आला आहे. महाराजांची स्वारी येथे यावयाची त्या दिवशी रेल्वे स्टेशनपासून राजवाड्यापर्यंत नागरिकांच्या व आसपास खेड्यांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी एकत्र होऊन रस्ता अगदी गजबजून जात असे व सर्व रस्त्यांवर गुढ्या, तोरणे, वेलकम वगैरेच्या पाट्या व निशाणे लावून व श्रीमंतांवरून सुवासिक किंवा सोने- चांदीची फुले उधळून व कित्येक प्रसंगी त्यांजला मानपत्रे वगैरे अर्पण करून लोकांनी आपले प्रेम व आनंद प्रदर्शित केला आहे. सन १८९१/९२ साली श्रीमंतांची स्वारी पाठीच्या विकाराने बरीच आजारी झाली होती. त्यातून त्यांना आरोग्य झाल्यावर श्रीमंतांची स्वारी पहिल्यानेच शहरातून फिरावयास निघाली. तेव्हा नगरवासी लोकांनी त्यांचे आरोग्यचिंतन व सत्कार फारच उत्कंठेने व उत्तम प्रकारचा केला होता. या दिवशी येथील प्रसिद्ध नागरिक रा. गोविंदराव विष्णू देव या गृहस्थांनी श्रीमंतांची तुला करून (श्रीमंताच्या भारोभार रुपये तोलून) त्या रकमेतून येथे गोवागेट स्टेशनजवळ एक उत्तम शिवालय, धर्मशाळा व पाण्याची विहीर धर्मार्थ बांधली आहे व ती श्रीमंतांच्या आरोग्य चिंतनार्थ बांधल्याचा लेख वर लिहिला आहे. ही श्रीमंतांच्या लोकप्रियतेची चिरकालीन उत्तम साक्ष होय.

रौप्य-जुबिली-महोत्सव

२. श्री. महाराजसाहेब यांनी राज्यसूत्रे धारण केल्यास तारीख २८ डिसेंबर सन १९०६ रोजी पंचवीस वर्षे पूर्ण झाली. या अवकाशात श्रीमंतांची स्वकर्तव्यदक्षता आणि प्रजावात्सल्य अनेक प्रसंगी निदर्शनास आल्यामुळे या दीर्घकालीन राज्यकर्तृत्वाबद्दल महाराजांचे अभिनंदन व सत्कार होणे स्वाभाविक आहे. त्याप्रमाणे त्यांची सर्व प्रजा व समस्त नोकर वर्गाच्या लोकांनी सन १९०७ च्या मार्च महिन्यात "रौप्य जुबिली महोत्सव" करून महाराजांचा अपूर्व सन्मान व अभीष्टचिंतन केले. याप्रसंगी बडोदे राज्यातील सर्व भागांत श्रीमंतांच्या अभीष्टचिंतनार्थ प्रजेकडून सभा भरविण्यात आल्या होत्या आणि त्यांजकडून व राज्यातील आणि राज्याबाहेरील लहान- मोठ्या अनेक संस्थांकडून महाराजांस आनंदप्रदर्शक विद्युत्संदेश व मानपत्रे अर्पण करण्यात आली. या महोत्सवप्रसंगी बडोदे शहरातील प्रमुख वकील, महाजन, संभावित गृहस्थ व बडोदा कॉलेजातील विद्यार्थी, प्रोफेसर वगैरे मंडळींनी कॉलेजपासून लक्ष्मीविलास राजवाड्यापर्यंत महाराजांची मिरवणूक काढली होती. या मिरवणुकीत महाराजांची सर्व प्रजा आनंदाने सामील झाली असून, बडोदा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी महाराजांच्या गाडीचे घोडे सोडून गाडी स्वतः ओढण्याचा उपक्रम सुरू केल्यामुळे त्या वेळचा लोकांचा उत्साह व महाराजांविषयीची एकनिष्ठता ही समारंभ पाहणारांस स्पष्ट दिसून आल्यावाचून राहिली नाही. इतकेच नव्हे तर बडोदा कॉलेजच्या प्रोफेसरांनी व प्रमुख वकील वगैरे विद्वान मंडळींनी "सर्चलाईटच्या" मशाली स्वतः धारण करून महाराजांचा अपूर्व सन्मान केला. यावेळी महाराजही आपल्या प्रजेचे पुत्रवत प्रेम पाहून त्यांच्यात अगदी मिसळून गेले होते. त्यांनी लोकोत्साहास अडथळा येऊ नये म्हणून मिरवणुकीच्या बंदोबस्तास असलेल्या पोलिसांनी श्रीमंतांजवळ जाण्यास कोणासही अटकाव करू नये, असा हुकूम दिला होता. त्या वेळची महाराजांची प्रसन्न मुद्रा व प्रजेवरील प्रेम आणि प्रजेचा उत्साह व राजनिष्ठा पाहून पुराणांतरी वर्णन केलेल्या रामराज्याच्या वैभवाची ही पुनरावृत्ती होय. असे महोत्सव पाहणारांच्या मनात येऊन त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहत होते. अशा प्रकारच्या अनुपम सौख्याचा लाभ अन्यत्र मिळणे दुर्लभ आहे. अशा प्रकारचे अनुपमेय महद्यश उपभोगण्याची पात्रता व भाग्य थोड्याच राजांच्या नशिबी असू शकते यात काही संशय नाही. महाराजांनी अशा प्रकारचे महद्यश व लोकप्रियताही आपल्या अंगच्या अनेक गुणांनी संपादन केली आहेत. हे त्यांच्या चरित्रात सुवर्णाक्षरांनी नोंदून ठेवण्यासारखे आहे.

महाराजांनी दिलेल्या देणग्या

वरील महोत्सवप्रसंगी महाराजांनीही कृपावंत होऊन आपल्या प्रजेस कित्येक देणग्या अर्पण केल्याबद्दल ता. ५/३/१९०७ रोजी आज्ञापत्रिकेचा जादा अंक काढून त्या वेळचे दिवाण स्वा. ब. केरशास्प रुस्तमजी यांनी प्रसिद्ध केले आहे. त्यांची नोंद याखाली घेण्यात आली आहे. त्यावरून महाराजांचे प्रजेवरील पुत्रवत प्रेम, आश्रित जनांविषयीचा अनुराग व उदारता ही स्पष्ट दिसून येतील.

(१) पेटलाद तालुक्यातील लोकांना जमीन महसूल भारी पडतो. असे वाटत असल्याने संवत् १९६२ अखेर जमीन महसुलाबद्दलची असलेली बाकी माफक केली आहे.

(२) आयपत वेरा (इन्कमटॅक्स) रुपये ७५० च्या उत्पन्नाच्या आतील लोकांपासून घेण्याचे माफ केले.

(३) बडोदे शहरात अनाथ, अपंग लोकांकरिता ''अनाथाश्रम'' काढण्याचा हुकूम दिला.

(४) लायक ग्रामपंचायतीस दिवाणी फौजदारी काम चालविण्याचे अधिकार दिले.

(५) खंडेराव मार्केट, बडोदे शहर म्युनसिपालिटीस बक्षीस दिले.

(६) बडोदे शहरात सार्वजनिक लोकांच्या हितासाठी ''विहारस्थान'' तयार करण्याचा हुकूम दिला.

(७) राज्यात पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी नवीन विहिरी बांधण्यास साडेपाच लक्ष रुपयांची मंजुरी दिली. यात निकृष्ट जातीच्या लोकांच्या सोयीकडे विशेष लक्ष द्यावे, असे फर्माविले आहे.

(८) राज्यात सक्तीचे शिक्षण सुरू झाले आहे. तथापि लोकांना अधिक सोयीचे पडावे म्हणून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची फी माफ केली आहे.

(९) पाटण आणि अमरोळी येथे साठ विद्यार्थी राहू शकतील अशी दोन वसतिगृहे (बोर्डिंगे) काढण्याची मंजुरी दिली.

(१०) राज्याच्या खर्चाने दरसाल पाच विद्यार्थी परदेशात विद्याभ्यासाकरिता पाठविण्याचे मंजूर केले.

(११) लांब व कमी वस्तीच्या प्रदेशात लोकांना औषधपाण्याची सोय व्हावी म्हणून तिलकवाडा, वेळाछा आणि खांबा तेथे तीन दवाखाने काढण्याचा हुकूम दिला.

(१२) बडोदे शहरात स्त्रियांसाठी 'सूतिकागृह' काढण्याचा हुकूम दिला.

(१३) बावीस कैद्यांची मुक्तता केली. यात एक फाशीच्या शिक्षेचा व पाच जन्मठेप कैदेचे होते.

(१४) बडोदे प्रांतापैकी चोरंदा, संखेडा, शिनोर, तिलकवाडा, बडोदे, डभोई आणि पादरा महालात कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा जमीन महसुलाचा एक हप्ता घेण्याचे एक वर्ष तहकूब केले.

(१५) रिसाले, बॉडीगार्ड व तोफखान्याच्या सर्व नोकर लोकांचे पगार वाढविले व घोडे, चंदीघास आणि ड्रेसांच्या रकमा वाढवून दिल्या. या बाबतीबद्दल दरसाल रु. ९५,६४२ जास्त खर्च करण्याची परवानगी दिली.

(१६) राज्यात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या शाळा उघडण्याकरिता १,६०,००० रुपयांची ग्रांट दिली आहे. त्याशिवाय रुपये ३०,००० एकवेळच्या खर्चासाठी मंजूर केले व शाळा उघडणे बाकी असलेल्या ६२२ गावांत शाळा उघडण्यासाठी रुपये १,००,००० एक लक्ष खर्चाची मंजुरी दिली.

अशा प्रकारची महाराजांची आजपर्यंतची कारकीर्द यशस्वी व सुखदायी निवडली आहे व यापुढे त्यांच्याकडून आणखी महत्त्वाच्या सुधारणा होण्याची व प्रजेचे सुख वाढण्याची सर्वत्रांस आशा लागून राहिली आहे. यासाठी काही अगत्याच्या सूचना कराव्याशा वाटतात. त्या याखाली नमूद केल्या आहेत.

महाराजांस अगत्याची विज्ञप्ती

कर कमी करणे

१. अलीकडे लोकांवर, लोकलफंड, प्राप्तीचाकर, भंगीपट्टी, पाणीपट्टी वगैरे बरेच कर वाढत चालले आहेत. त्यामुळे लोकांत बरीच चर्चा व नाखुशी दिसून येते व महाराजांची वर्तणूक पूर्वी ''लिबरल'' होती; परंतु आता ''कांझरवेटीव'' होत चालली आहे, असेही लोक म्हणतात. कसेही असो. कराच्या असह्य भाराखाली प्रजेला पिळून काढणे कोणत्याही राजास योग्य नाही. प्रजा आबाद असेल तर राजासही सुख मिळणार आहे, हे कोणी नव्याने सांगितले पाहिजे असे नाही. दुष्काळ वगैरे कारणाने खर्च वाढल्यामुळे असे कर वाढवावे लागले असावेत; परंतु ती कारणे नष्ट होताच असे त्रासदायक कर कमी करून महाराजांनी आपल्या धवल कीर्तीस अधिक शोभा आणावी, अशी त्यांना नम्र प्रार्थना आहे.

वर्तमानपत्रकारास जास्त स्वातंत्र्य देणे

२. महाराजांचे प्रजावात्सल्य व विद्यासक्ती यामुळे राज्यात वर्तमानपत्रांचा प्रसार वाढत चालला आहे; परंतु या लोकपक्षाच्या पुढारी संस्थेस, स्वातंत्र्य व सवलत फार थोडी दिली आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय विषयाची निर्भीडपणे चर्चा करण्याचे काम बरेच कठीण व जोखमीचे झाले आहे. वर्तमानपत्राचे व लोकमताचे महत्त्व महाराज चांगल्या प्रकारे जाणतात व म्हणूनच त्यांनी होऊन या संस्थेचे बीजारोपण केले आहे तरी ते त्यांचे उदात्त हेतू शेवटास जाण्यासाठी व राजा आणि प्रजा या उभयतांच्या कल्याणासाठी त्यांना अधिक सवलती व स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता आहे.

महाराजांनी सर्व खात्यांची तपासणी स्वतः करावी

३. महाराजांनी अलीकडे प्रत्येक खात्यात जाऊन पाहणी करण्याचा जो क्रम आरंभिला आहे तो अत्यंत स्तुत्य व राजा आणि प्रजा या उभयतांचे हिताचा आहे. अशा रीतीने वरवर पाहणी करण्यातही पुष्कळ चुका दुरुस्त होऊन अनेक सुधारणा होऊ शकतात व अंमलदार लोक आपल्या कामात दक्ष होतात, असे दिसून येते. तेव्हा त्यांचे संपूर्ण इष्ठ परिणाम प्राप्त होण्यासाठी महाराजांनी वर्षातून निदान एका खात्याची संपूर्ण तपासणी स्वतः करीत जावी. म्हणजे त्यापासून पुष्कळ हित होईल व महाराजांच्या विशाल अनुभवाचा व सुव्यवस्थेचा लोकांना साहजिकच फायदा मिळेल.

शहारात गटारे करणे

४. बडोदे शहरात पाण्याची विपुलता करून हुजुरांनी अनुपम श्रेय मिळविले आहे; परंतु पाण्याच्या विपुलतेबरोबर त्याच्या निकालाची योजना झाली नसल्यामुळे बडोदे हे नेहमी तापाचे माहेरघर झाले आहे व यापासून दरसाल पुष्कळ प्राणहानी होत आहे. महाराज आरोग्याचे महत्त्व चांगल्या प्रकारे जाणतात हे लोकांसही कळू लागावे. म्हणून सॅनिटरी कमिशनर हे हुजूर हुकुमाने त्यासंबंधाची व्याख्यानेही देत आहेत. हा सर्व प्रकार ठीक आहे; परंतु वरील कारणाने शहरात गटारांची योजना लवकर होण्याची फार जरूरत आहे. हे काम मोठ्या खर्चाचे असल्यामुळे पैशाच्या अभावामुळे तूर्त सर्व करण्याची सवड नसेल, तर दरसाल शहरातून एका भागातून गटारे करण्याची योजना अमलात आणली, तरी हे काम सोयी-सोयीने दहा-पाच वर्षांत पूर्ण होईल व लोकांची प्राणहानी वाचून शहराचे आरोग्य वाढविल्याचे पुण्य व श्रेय हुजुरांस मिळेल.

वेदपठणाच्या शाळा उघडणे

५. महाराजांनी वेदोक्त कर्माचा उपक्रम केला. तेव्हा ब्राह्मणांत दुफळ्या उत्पन्न होऊन येथील 'वेदपठणाच्या शाळा' बंद झाल्या आहेत; परंतु प्रस्तुत तशी अडचण राहिली नाही व महाराज वैदिक धर्माभिमानी असून विद्याभिलाषी आहेत. तेव्हा वेदविद्येचा ऱ्हास होऊ नये म्हणून वेदपठणाच्या शाळा उघडण्याची पुनः कृपा करतील व त्या विद्येस उत्तेजन दिल्याचे अधिक श्रेय जोडतील, अशी वैदिक धर्माभिमान्यांना आशा आहे
याप्रमाणे हल्ली स्थितीला अनुसरून मुख्य गोष्टी हुजुरापुढे मांडल्या आहेत. त्यांचा त्यांजकडून कृपाळूपणे विचार होऊन प्रजेचे सुख आणखी वाढण्याची ईश्वर त्यांना नेहमी सद्‌बुद्धी व सामर्थ्य देवो, असे आम्ही चिंतितो.

उपसंहार

संतती

महाराज जशी प्रजेच्या उन्नतीविषयी अत्यंत कळकळ बाळगतात त्याप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या उन्नतीविषयी सर्व राजांचा राजा सच्चिदानंद प्रभूही अत्यंत कळकळ बाळगीत आहे, असे दिसून येते. ईश्वरकृपेकरून शरीरसंपत्ती, विद्वत्ता व लक्ष्मी याहीकरून महाराज मंडित असून, गायकवाडांच्या तीन पिढ्यांत जो योग घडून आला नाही, तो संतत्योपभोग त्यास उत्तम रीतीने प्राप्त झाला आहे. हल्ली महाराजांना खाली लिहिल्याप्रमाणे अपत्ये आहेत :

नाव	जन्मतिथी
२. श्री. राजपुत्र जयसिंहराव महाराज	वैशाख शुद्ध १, शके १८१०
३ श्री. राजपुत्र शिवाजीराव महाराज	श्रावण शुद्ध १५, शके १८१२
४ श्री. राजपुत्र धैर्यशीलराव महाराज	श्रावण वद्य ५, शके १८१५
५ श्री. राजकन्या इंदिराराजा	माघ वद्य ६, शके १८१३.

याप्रमाणे महाराज संतती, संपती, सरस्वती, अधिकार, दया, क्षमा, शांती, दातृत्व इत्यादी अनेक साधनांनी सकलगुणैश्वर्यमंडित आहेत व त्यांचा वैभवसूर्य आपल्या सर्व कलांनी सतेज दिसत आहे. अशाच रीतीने ते पुत्रपौत्रासह निरंतर सुखानंद अनुभवोत, असे आम्ही इच्छितो.

त्याचप्रमाणे या भरतखंडात भूषणरूप झालेल्या आमच्या लोकप्रिय महाराजांना प्रभू निरंतर सुख व उदंड आयुष्य देऊन त्यांच्याकरवी या देशाचे व गुर्जरप्रजेचे पुष्कळ कल्याण करो, अशी प्रार्थना करून हा चरित्र लेख समाप्त करतो.

कमलभूतनया वदनांबुजे ।।
वसतु ते कमला करपल्लवे ।।
वपुषि ते रमता कमलांगजः ।।
प्रतिदिनं हृदये कमलापतिः ।।१।।

अर्थ :- हे राजा तुझ्या मुखाच्या ठायी कमल भूतदया म्हणजे सरस्वती वास करो. हस्ताच्या ठायी कमला म्हणजे लक्ष्मी वास करो. शरीराच्या ठायी कमलांगत म्हणजे सौंदर्य विहार करो आणि हृदयाचे ठायी नेहमी कमलापती म्हणजे भगवान विष्णू वास करो. सारांश, वक्तृत्व, दातृत्व, सौंदर्य आणि भक्ती ही तुझे ठायी नांदोत.

(निशाणी १)

श्रीमंत सौ. चिमणाबाई महाराणीसाहेब यांचे भाषण

प्रिय भगिनींनो, आज भाषण करण्याचा माझा पूर्वी बेत नव्हता; पण कार्यक्रमातील सर्व कामे पाहून मला आयत्या वेळी बोलण्याची एकदम स्फूर्ती झाली, म्हणून मी चार शब्द बोलणार आहे.

आज हा आनंदाचा प्रसंग आम्हांला लाभला त्याचे श्रेय मिस भोर व त्यांच्या मदतनीस मंडळीस आहे. मिस भोर सारखी माणसे आमच्या राज्यात आहेत, त्याचे आम्हांस मोठे भूषण वाटते. स्त्री जातीची प्रगती होत जावी, ही माझी सतत इच्छा असल्यामुळे आजच्याप्रसंगी दिसलेल्या सर्व गोष्टींनी मला संतोष झाला आहे. तसेच आजच्या समारंभास आमची काही मोठमोठी पाहुणे मंडळी आली आहेत. म्हणून मला आनंद वाटत आहे व याबद्दल मी त्यांचे आभार मानते. आता मी चार शब्द बोलणार आहे. त्यामुळे कोणास आपला उपमर्द झाला असे वाटू नये, माझ्या मनातून जे काही बोलावयाचे आहे, ते मी उघडपणे बोलते.

स्त्रियांची कर्तव्ये कोणती व त्यांचे वर्तन कसे असले पाहिजे, याविषयी मिस भोर यांच्याशी माझे अनेक वेळा बोलणे झाले आहे. हल्ली असे दिसते की, थोडेसे शिक्षण मिळाले की, त्यांना आपण फार विद्वान आहोत असे वाटते. खरी शिकलेली माणसे असतात ती नम्र असून विचारी असतात; पण अर्धवट शिकलेली माणसे विचार न करता दुसऱ्याचे अनुकरण करतात. कित्येकांचे तर इंग्रजी पोशाख म्हणजे बूट इत्यादिकांवाचून तर चालेनासेच होते. आजकाल त्याला पोलका म्हणतात. तो स्त्रियांनी घालावयाची चाल पडली आहे. तो आम्हांस शोभत नाही व सोईचाही नसतो. पोलका घालावावयाचा तो गरज असेल तेव्हाच घालावा. उगीच लोक घालतात म्हणून घालू नये. आपल्या देशाचे हवापाणी, आपली राहणी व आपली स्थिती यांस अनुसरूनच आपल्या पोशाखाची योजना केलेली आहे. तोच आपल्याला शोभणारा व सोईस्कर आहे. शिवाय पुष्कळांची ऐपत बेताबाताची असल्याकारणाने हा एक रिकामा खर्चाचा बोजाच होऊन बसतो. असे असूनही बायकांत ही चाल वाढत चालली आहे. यात काही स्त्रियांचाच दोष आहे

असे नाही. त्यांना बरे-वाईट दाखविण्याचे काम ज्यांचे आहे, त्या पुरुषांनादेखील चांगले, वाईट कोणते ते पुरते कळत नसते, त्यामुळे असे होते.

आपली स्थिती, आपला देश, मुलाबाळांविषयी आपले कर्तव्य याविषयी त्यांच्या भलभलत्या कल्पना असतात. हा सारा अर्धवट शिक्षणाचा व अविचारीपणाचा परिणाम होय. माझी आपणांस अशी सूचना आहे की, श्रीमंत महाराज साहेब यांस आपल्या प्रजाजनांची जी कळकळ आहे, जिच्यामुळे ते एवढे श्रम घेत असतात. त्याचे खरे चीज स्त्रियांनी केले पाहिजे म्हणजे त्यांचे विचार सुधारले पाहिजेत. ते असे की, आपली स्थिती आपल्या देशाची अवस्था व ती कशी सुधारावी, इत्यादी गोष्टी मनात आणून त्यांनी नेहमी आपल्या हितास जपले पाहिजे.

पुरुषांच्या आचरणातसुद्धा फार अविचारीपणा दिसून येतो. इंग्रजी व्यसने म्हणजे चिरूट ओढणे, इंग्रजी कपड्यांची हौस आपल्या देशाची अनास्था, आपल्या लोकांचा कंटाळा इत्यादी तरुण पुरुषांच्या समजुती अगदी गैर होत. खरी सुधारणा म्हणजे काय व कोणत्या दिशेने झाली पाहिजे, हे चांगल्या ग्रॅज्युएटांससुद्धा कळत नाही असे दिसते. नुसते इंग्रजी फॅशनचे कपडे घातल्याने, म्हणजे पोशाख बदलल्याने आपण त्यांच्यासारखे थोर होऊ असे नाही किंवा पोशाखात काही सुधारण येऊन राहिलेली नाही. खरी सुधारण म्हटली, तर आपल्या देशाचे व लोकांचे खरे हित कशात आहे, ते ओळखून ते करण्याच्या मार्गास लागणे होय.

आताशा पाहावे तो पुरुषांनी पुष्कळ चमत्कारिक चाली उचलल्या आहेत. चांगल्या रीतिभाती म्हणजे काय हे त्यांना कळत नसते. तहान लागली की सोडावॉटर हवे ! जणू काही पाण्याला अगदी तोटाच पडला आहे. ते पिणे म्हणजे आपल्या थोरवीस कमीपणा येतो, असे पुष्कळांना वाटते.

श्रीमंत महाराज साहेबांच्या कृपेने मला युरोपचा प्रवास दोन-तीन वेळा घडला. त्यात मला तेथील स्त्रियांचा अनुभव आला. त्यावरून मी असे म्हणते की, त्यांचे वर्तन व स्वकर्तव्याविषयी उत्सुकता, दक्षता व ज्ञान, संसार चालविण्याचे चातुर्य ही खरोखरच प्रशंसनीय आहेत. त्यांना आपल्या जातीचा व आपल्या देशाचा मोठा अभिमान असतो व त्याच्या हितासाठी त्या नेहमी झटत असतात. हा त्यांचा मोठा गुण आहे व त्यांचे अनुकरण आपण केले तर मोठे हित होणार आहे.

आता मी स्वत:विषयी थोडेसे सांगते, ते कोणास आत्मप्रशंसा केल्यासारखे वाटू नये. ईश्वराच्या कृपेने मला काही उणे नाही, सर्व काही यथास्थित आहे, तरी पण गृहिणीला योग्य अशी घरातील लहान-सहान स्वयंपाकादी कामेसुद्धा मी कधी-कधी हौसेने करीत असते व ती केल्याने माझ्या मनास फार संतोष वाटतो. इंग्लिशांचे अनुकरण करू नये, असे मी म्हणत नाही. चांगल्या गोष्टींमध्ये अवश्य करावे; पण आज जे अनुकरण दिसत आहे, ते पाहून मोराची पिसे लावणाऱ्या डोंबकावळ्याची आठवण होते. अथवा लांड्या कोल्ह्याची गोष्ट सर्वांना ठाऊक आहेच. आपले न्यून झाकण्याकरिता दुसऱ्यास भलताच उपदेश करणारी माणसे जगात पुष्कळ असतात. नुसती मोराची पिसे लावून कावळ्याचा कोठे मोर होत नाही, तसा यत्न करण्यात व्यर्थ दोहीकडून फजिती मात्र होते. केवळ दुसऱ्याचे पाहून अनुकरण करणाऱ्या माणसांची स्थिती लांडग्या

कोल्ह्याच्या अवस्थेसारखी होते. आपले शेपूट सावरून न घेता दुसऱ्याला ठकविण्यासाठी त्याने असा आव घातला की, शेपटी नसणे ही एक भूषणाची नवी तऱ्हा आहे; पण त्याचे बोलणे कितपत खरे आहे, हे शहाण्यांनी तेव्हाच ओळखिले. तशीच नुसते दुसऱ्याचे अनुकरण करणाराची स्थिती होते. ज्यांच्या चाली ते उचलतात व ज्यांना उपदेश करावयाला जातात, ते दोन्ही प्रकारचे लोक त्यांची किंमत ओळखून असतात. एवढेच नव्हे, तर असल्या लोकांचा दोन्हीकडचे लोक तिटकाराच करतात. त्यामुळे त्यांच्या हातून स्वतःचे, देशाचे अथवा समाजाचे काहीच कल्याण होत नाही. एकंदरीत एवढेच की, आपण आपली हल्लीची विपन्नावस्था, देशाची स्थिती, यांचा विचार करून सर्वांनी कर्तव्य ओळखण्यास शिकावे व आचरण करावे, म्हणजे सर्वांचे कल्याण होईल.

स्त्रियांनी भलताच अभिमान व भलतीच आवड धरून आपल्या कर्तव्यास व रीतीरिवाजास कंटाळू नये. आपल्या माणसांचा तिटकारा मानू नये; पण सर्वांत चांगले असेल ते शोधून काढून ग्रहण करावे. असो. आता थोडक्यात आटोपते.

आजचा हा जो सुप्रसंग आला आहे, तो आमचे ज्येष्ठ पुत्र श्री. फत्तेसिंहराव यांच्या लग्नोत्सवामुळे आला आहे. तेव्हा त्यांना व त्यांच्या या नवपरिणित वधूस आपण दीर्घायू व सुख चिंतून त्यांच्यावर ईश्वराची कृपा असो असे मागावे, एवढेच सांगून मी आपले भाषण पुरे करिते.

●●●

(निशाणी २)

श्रीमंत महाराजसाहेब यांचे धार्मिक विषयासंबंधाने महत्त्वाचे व्याख्यान

(श्रीमत्स्वामी हंसस्वरूप यांचे व्याख्यानास दिलेले उत्तर :-)

स्वामींनी आता स्पष्ट आणि अस्सखलित शब्दांनी जे चटकदार भाषण केले, ते ऐकून सर्व श्रोतृवृंदांची मने आनंदित झाली असतील.

स्वामींनी जे विषय प्रतिपादिले आहेत त्या सर्वांचा विचार करू गेल्यास बराच वेळ लागेल व कदाचित माझ्या अंगी तसे करण्याचे सामर्थ्यही नसेल; परंतु सध्या या महत्त्वाच्या विषयावर मला जे चार शब्द सुचत आहेत ते मी सांगतो.

स्वामींनी आत्ताच जे भाषण केले त्याचा विचार दोन प्रकारांनी करता येईल. पहिला प्रकार म्हटला म्हणजे, त्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींवर केवळ विश्वास ठेवणे हा होय व दुसरा प्रकार या गोष्टींचे विवेचन करून त्याचा आपल्या मनाशी अनुभव पाहणे हा होय.

स्वामी काल धर्माच्या उत्पत्तीबद्दल व ईश्वराबद्दल जे काही बोलले ते सर्वांना सहज समजण्यासारखे नाही. कोणत्याही गोष्टीचा आपण शोध करू लागलो म्हणजे तो शोध करताना ज्या साधनांचा व मार्गाचा (methods) आपण उपयोग करतो, तीच साधने व मार्ग ही प्रथम बरोबर आहे की, नाहीत हे पाहिले पाहिजे. कारण साधने व मार्ग हीच शोधापेक्षा फार महत्त्वाची असतात. आपण भलत्याच मार्गाने जर एखादा शोध करू लागलो, तर त्या बाबतीत केलेले सर्व प्रयत्न फुकट जाऊन आपल्या विचारापासून काहीच निष्पन्न होणार नाही. जसे एखाद्या दुर्बिणीतून दूरचे पदार्थ पाहण्यापूर्वी त्या दुर्बिणीच्या शक्तिमर्यादेप्रमाणे तिची अंतररचना तपासल्यावाचून जर ती दुर्बीण उपयोगात आणली, तर कदाचित तिजमधून दिसणारे पदार्थ वाकडे व चमत्कारिक दिसतील व त्यामुळे आपणांस भ्रांती होईल, तसाच प्रकार या ठिकाणीही होण्याचा संभव आहे. विषयांचे विवेचन करण्यापूर्वी तुम्ही आपल्या शरीर रचनेची थोडीशी कल्पना करा, म्हणजे मी काय म्हणतो हे तुम्हांला सहज कळून येईल.

शरीर रचनेवरून पाहिले असता मन, बुद्धी, चित्त, चैतन्य वगैरेंची शक्ती कितपत आहे व त्यांच्या साहाय्याने काढलेले सिद्धांत अथवा प्रमाणे कितपत बरोबर येतील याचा विचार केला पाहिजे. आपली मानसिकशक्ती मर्यादित असल्यामुळे तिच्या साहाय्याने काढलेले शोध हेही काही अंशी लटपटीत, संशयात्मक व अपूर्ण असे ठरतील आणि अशा अनुमानांनी काढलेल्या सिद्धांतावरून खऱ्या वस्तुस्थितीचे ज्ञान होणे शक्य असेल असे वाटत नाही. ज्या गोष्टी मनुष्याच्या अकलेबाहेरच्या आहेत, त्याबद्दल निरनिराळ्या कल्पना करून काही तरी गृहीत धरावयाचे व अशा डळमळणाऱ्या पायावर विश्वासाची मोठी इमारत बांधावयाची, तर ती इमारत किती वेळपर्यंत टिकेल? प्रत्यक्ष अनुभवाने खात्री होत चालली की, अशा ठिकाणचा विश्वास उडत जाणारच. ज्या गोष्टीचा विचार करिताना मनुष्याची अक्कल गुंग होऊन जाते व त्याचे विचार कुंठित होतात. त्या गोष्टीबद्दल माझ्यासारख्याने खात्रीपूर्वक किंवा निश्चयात्मक काही सांगणे फारच कठीण आहे.

ईश्वर सर्वव्यापी आहे, त्याच्यापासून अमूक निर्माण झाले, वगैरे वाद आज हजारो वर्षे चालत आला आहे व तो कधी संपेल हे सांगता येणार नाही.

अगदी आरंभी मनुष्याच्या मनात विचाराचा अंकुर जेव्हा उत्पन्न झाला असेल, तेव्हा सृष्टीतील चंद्र, सूर्य, वायू, आकाश, पर्वत, समुद्र, नद्या, वृक्ष, अग्नी इत्यादी चमत्कार त्याला दिसले असतील व हे चमत्कार काय आहेत, याची तो चौकशी करू लागला असेल. हे सर्व चमत्कार मनुष्याच्या कर्तृत्वशक्तीच्या बाहेरचे असल्यामुळे त्या सर्वांच्या ठिकाणी त्याची एक प्रकारची आदरबुद्धी उत्पन्न होऊन चंद्र, सूर्य, समुद्र, नद्या, झाडे इत्यादीकांची पूजा-अर्चा करणे सुरू झाले असावे. (Fetichism or Hylozoism). नंतर चमत्कारासंबंधी विचार सुरू होऊन पुढे (Materialism) म्हणजे देहात्मवाद, (Idealism) म्हणजे चैतन्यवाद, (Scepticism) म्हणजे आज्ञेयवाद, (Mysticism) म्हणजे गूढात्मवाद, (Pantheism) म्हणजे अद्वैतवाद आणि शेवटी (Eclectieism) म्हणजे मिश्रणवाद असे अनेक तऱ्हेचे वाद चालू असावेत; परंतु कोठेही पाहू गेले, तरी याविषयी आपल्याला अनिश्चितपणाच दिसून येईल. कोणताही वाद घेतला, तर त्यात आपापल्यापरीने जगाची उत्पत्ती वगैरे विषय पूर्णपणे प्रतिपादिलेले असतात व त्यावरून इतर वाद खरे नव्हेत असेच म्हणण्याची पाळी येते. तेव्हा या निरनिराळ्या वादांपैकी अमकाच खरा असे कळण्यास मार्ग नाही. पहिल्याने स्त्री उत्पन्न झाली असावी की पुरुष निर्माण झाला असावा वगैरे चर्चा प्रत्येक वादात आहे; परंतु हे वाद निष्कारण असून, ते करीत बसणे हे केवळ वेळ फुकट घालविणे होय.

ज्या वादात ईश्वर मानला आहे त्यातदेखील त्याच्या अस्तित्वाची कल्पना एक तऱ्हेचा विश्वास मानूनच खरी धरावी लागते. याचा खरोखर अनुभव येणे मनुष्यास शक्य नाही. कारण जगात काही गोष्टी अशा आहेत की, त्यांची प्रत्यक्ष साक्ष पटणे शक्य नसते. असे जरी आहे तरी ईश्वर नाही असे मात्र माझे म्हणणे नाही. ईश्वर आहे असे मानून चालले असताना बरे. ज्याप्रमाणे एखाद्या प्रदर्शनात कित्येक जातीचे प्राणी, पक्षी व जनावरे पाहून त्याचे आपोआप रूपांतर कसे होत गेले हे समजते. त्याप्रमाणे तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या पद्धतींचा अभ्यास केल्याने मनुष्याच्या

मनाची व विचारांची कालांतराने वाढ कशी होत गेली हे समजते व त्यापासून आपल्या मनाला फार समाधान आणि आनंद होतो. आपण अज्ञानी, अशिक्षित वगैरे मानून अशा प्रश्नांचे विवेचन करणे सोडून देऊ नये. कोणत्या मनुष्याची विचारशक्ती किती आहे हे सांगता येणार नाही. आपणांस निरनिराळ्या विषयांसंबंधी निरनिराळे विचार ऐकावयास मिळून आनंद होतो व असे विचार करण्यास आपले मनास उल्हास येतो. म्हणून त्यांचा विचार करून या गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न यथाशक्ती प्रत्येकाने केला पाहिजे व असे झाले म्हणजेच प्रत्येक मनुष्यास थोडाबहुत तरी फायदा होण्याचा संभव आहे. आपण विद्वान आहोत असे समजणाऱ्या लोकांनी तर हा प्रयत्न करणे अवश्यच आहे. मात्र अशा कामी त्यांनी वेळेचा फाजील अपव्यय करू नये. अशा प्रयत्नापासून प्रत्येकास काहीना काही फायदा क्वचित होईल व निरनिराळ्या वादांतील महत्त्वाच्या समजुती व त्यांतील भेद हे सर्वांना समजतील. अशा तऱ्हेचा फायदा होणे म्हणजे केवळ धर्माची किल्लीच समजणे होय. याचा सर्व लोकांनी नेहमी विचार केला पाहिजे. आता ह्या गोष्टीचे ज्ञान होण्यास इंग्रजीच ग्रंथ पाहिले पाहिजेत असे नाही. ज्यांना इंग्रजी येत नसेल त्या लोकांकरिता आपले भाषेतही अलीकडे बरेच ग्रंथ झाले असल्याचे दिसून येईल व ही मोठी समाधानाची गोष्ट होय.

काल स्वामींनी वर्ण, आश्रम, धर्म आणि राजांची उत्पत्ती याबद्दल सांगितले; पण त्याविषयी आता सर्व बाबतीचा पूर्णपणे विचार जरी करता येणार नाही, तरी त्यांतील काहीचे मी थोडेसे विवेचन करतो.

वेदांनी, गीतेने, एखाद्या कायद्याने किंवा आजापणजांनी एखादे गोष्टीबद्दल काही सांगितले आहे म्हणूनच आपण तसे मानून चालणे व त्यावर विश्वास ठेवून चालणे हे बरोबर नाही. त्यांनी काहीही सांगितले असले, तरी त्याची योग्यायोग्यता पाहिलीच पाहिजे. त्यांचे सांगणे योग्य असले- तरी ते का? याचा शोध केला पाहिजे. त्यांनी काही एक विशेष आचरण सांगितले असले, तरी ते सांगण्याचा हेतू काय असावा ह्याजबद्दल चौकशी केली पाहिजे. असे कोणी करू लागला, तर लोक कदाचित त्याला नास्तिक म्हणतील; परंतु तेथे उपाय नाही. कोणा मनुष्याचे विचार आकुंचित असतील किंवा कोणाची एखाद्या विषयाबद्दल खात्री झाली नसेल, तर अशा मनुष्याने शंका घेतल्याशिवाय त्याच्या भ्रमाचे निरसन व्हावे कसे? अशा भ्रमनिरसन करून घेऊ इच्छिणाऱ्यास लोक खुशाल नास्तिक म्हणोत; परंतु हा नास्तिकपणा पत्करणे जरूरी आहे. कारण दुसऱ्याच्या मतावर सर्व काळ अवलंबून राहणे ही गोष्ट ज्ञानशक्तिसंपन्न मनुष्यास केव्हाही शोभणार नाही. हे परावलंबन सुटणे हे एका अर्थी व्यक्तीच्या व राष्ट्राच्या प्रगतीचे चिन्ह आहे. अलीकडे इंग्रजी शिकलेले लोक याच तऱ्हेने वागतात, म्हणून त्यांच्या विचारसरणीवर जुन्या समजुतीच्या लोकांकडून टीका होते; परंतु असे होणे चांगले नाही. इंग्रजी येत असलेल्यांचा ते फक्त इंग्रजी शिकले म्हणून तिरस्कार करणे किंवा त्यांच्यावर एक प्रकारचा कटाक्ष ठेवणे, हे योग्य नाही. त्याचप्रमाणे नवीन प्रकारचे शिक्षण मिळालेल्या लोकांनीही शास्त्री वगेरे जुन्या समजुतीच्या लोकांचे नुसते दोष काढीत राहणे हेही बरोबर नाही. माझे म्हणणे इतकेच की, प्रत्येकाने

मनुष्यमात्राकडे निरनिराळे लक्ष पुरवून प्रत्येकाचे विचार वगैरे नीट ध्यानात आणून नंतर त्याबद्दल काय ते मत ठरवावे.

ज्यावेळी वेद व गीता, बायबल, कुराण इत्यादी झाली, त्यावेळी मनुष्याची जी स्थिती व समजूत होती तीच आता आहेसे दिसत नाही. ज्याप्रमाणे मनुष्याची, देशाची अगर राष्ट्राची काळाकाळाने स्थिती बदलत जाते, त्याप्रमाणेच मनुष्याचे विचार, समजुती व कल हेही बदलत गेलेच पाहिजेत आणि ते तसे बदलतातही.

जगाच्या कारणासंबंधाने आज जे समज प्रचलित आहेत, तेच आणखी काही वर्षांनी कायम राहतील असे कशावरून? उत्तरोत्तर मनुष्य हा जास्ती शहाणा व अनुभवी होत जातो आणि त्याच्या ज्ञानात अधिकाधिक भर पडत गेल्यामुळे ते उत्तरोत्तर पूर्णत्वास येत जाते. वेदादिकांच्या वेळची परिस्थिती जर आज दिसत नाही, तर त्या वेळच्या समजुती अगर विचार हे तरी आपणास खरे व बरोबर कसे वाटतील? अमुक गोष्ट अशी आहे असे सांगून असे धरून चाला असे म्हणणे किंवा वेदांत, गीतेत अथवा शास्त्रात असे सांगितले आहे, यावर विश्वास ठेविल्यावाचून त्याचा अनुभव येणार नाही हे म्हणणे मला बरोबर दिसत नाही. खरा मार्ग म्हटला म्हणजे प्रत्येक मनुष्याने कोणतीही गोष्ट पाहिली किंवा ऐकिली, तर ती एकदम खरीच आहे असे मानून घेण्यापूर्वी त्याने तिजबद्दल अगोदर पूर्णपणे चौकशी करून नंतरच आपले काय ते ठाम ठरवावे. असे करण्याने प्रारंभी काही वेळ त्रास वाटेल हे अगदी खरे आहे, तरी खरोखर विचार करू गेल्यास अशा मार्गाच्या अनुसरणापासून नुकसानापेक्षा फायदा होण्याचा विशेष संभव आहे. कारण कोणत्याही विषयाची चर्चा करिताना दुसऱ्या लोकांची निरनिराळ्या प्रकारची मते आपणास समजतात व त्यापासून आपले स्वतःचे ज्ञानात भर पडते. माझ्या अल्प समजुतीप्रमाणे आता आपण सुधारण्याच्या मार्गास खास लागणार. कारण मनुष्यात चौकस बुद्धी उत्पन्न झाली म्हणजे ती त्याला अज्ञानप्रवर्तक स्थितीपासून सोडवून वस्तुस्थितीचे ज्ञान करून घेण्याविषयीची जिज्ञासा त्याचे ठिकाणी उत्पन्न करिते व हे सुधारणेचे द्योतक होय. अशी चौकशी करीत असताना आपल्या समजुतीत चुका कोणत्या आहेत व आपण कोठे सुधारले पाहिजे, हे हळूहळू समजू लागते आणि अर्थातच एकदा त्याचादुराग्रह नाहीसा झाला म्हणजे त्याला फायदा होऊ लागतो. दुराग्रह हा मनुष्याच्या प्रगतीस फार मोठा अडथळा आहे. हल्लीची साधारण स्थिती पाहू गेल्यास दिसून येईल की, पिढीजाद चालत आलेल्या ज्या अनेक प्रकारच्या लोकांच्या निरनिराळ्या समजुती आहेत, त्यांच्या खरेपणाबद्दल कोणास काही शंका वाटली, तर ती शंका उच्चारिल्याबरोबर तो मनुष्य अयोग्य, अज्ञानी, नास्तिक इत्यादी प्रकारच्या विशेषणांस पात्र मानिला जातो व त्याच्या शंकेचे वास्तविक समाधान करण्यासही सहसा कोणी तयार होत नाही. तीच शंका शांतपणे ऐकून तिचे समाधान करण्याचा प्रयत्न झाला असता उभयपक्षीही अज्ञानाचा नाश व ज्ञानाची प्राप्ती होण्याचाच विशेष संभव असतो.

वर्ण व आश्रम याबद्दल निश्चित असे जरी काही सांगता येत नाही, तरी मनुष्य उत्पन्न झाला तेव्हाच ईश्वराने जाती निर्माण केल्या असतील असे असंभवनीय वाटत नाही. मनुष्याच्या शरीररचनेवरून आरंभी फक्त स्त्री व पुरुष एवढाच काय तो भेद असावा असे दिसते. स्वामींनी कर्माचे आणि

भक्तीचे जे वर्णन केले आहे त्यात माझ्या मते अतिशयोक्तिचा भाग विशेष आहे व या वर्णनापासून लोक समाजाला वास्तविक विषयाचे ज्ञान करून देणे एका बाजूसच राहून उलटपक्षी त्यांचा काही तरी चुकीचा समज होण्याचा विशेष संभव आहे असे मला वाटते.

आपल्यामध्ये आजमित्तीला जशा आपण जाती अगर वर्ण पाहतो, तशाच प्रकारच्या काही अंशी जाती अगर वर्ण निरनिराळ्या देशांतही यापूर्वी होऊन गेल्या आहेत. ग्रीक, रोमन, इजिप्शियन, पेरुव्हियन, मेक्सिकन वगैरे लोकांतही निरनिराळ्या जाती एक वेळी होत्या. फार तर काय, आपल्या देशात सूर्यवंशी, सोमवंशी आपणांस म्हणविणारे लोक जसे आजमित्तीस आहेत, तसेच लोक पेरू, मेक्सिको इत्यादी देशांतही एके वेळी होते. यावरून असे म्हणता येईल की, वरील देशांत ईश्वरनिर्मित जाती आहेत असे मानण्याचे कारण दिसत नाही. इजिप्शियन लोकांची सुधारणा जरी हिंदू लोकांच्या सुधारणेपूर्वी झाली असे म्हणता आले नाही, तरी त्याची सुधारणा आपले इतकीच प्राचीन काळची नव्हती असे निश्चयाने सांगण्यास आपलेपाशी काय साधन आहे? पोशाखाची तऱ्हा, केश बांधण्याची पद्धती इत्यादी कित्येक गोष्टींत आमच्या लोकांचे व इजिप्शियन लोकांचे पुष्कळ साम्य आहे व यावरून हे दोन्ही देश कदाचित एकाच वेळी एकसारखे सुधारत गेले असण्याचाही संभव वाटतो. आता एवढे खरे आहे की, त्या देशाची सुधारणा आता अनेक कारणांनी लयास गेली व तिच्या बरोबर त्या देशांतील जाती व पंथ यांचाही अंत झाला. आपणांतील जाती अद्यापि कायम राहिल्या आहेत. या सर्व गोष्टींचा कार्यकारणसंबंध सांगू गेल्यास पुष्कळच विस्तार होईल. सबब तो विषय मी इतकाच सोडून देतो. जगात सुधारणा व फेरफार हे चक्रनेमिक्रमाने (चक्राकार भ्रमणाच्या पद्धतीने) होत जातात. आपल्या देशात वर्ण अगर जाती झाल्या, त्या याच कारणाने व त्या जशा उदय पावल्या तशा कालचक्राच्या सपाट्यात त्या नामशेष होतील यात संशय नाही व त्या कायमच्या राहतील असे म्हणणे विचारसरणीसही जुळण्यासारखे वाटत नाही. जगात कोणतीही परिस्थिती कायमची राहणे संभवनीय नाही. तीत फेरफार नेहमी होतच असतात. यामुळे निरनिराळ्या परिस्थिती निरनिराळ्या देशात आगे-मागे येऊ शकतात. जाती वगैरेसंबंधाने इजिप्त वगैरे देशाची जी स्थिती झाली, तीच आपल्या देशाची केव्हाना केव्हा तरी होणारच ! ही गोष्ट ध्यानात येऊन कोणास पुढील स्थिती वाईट येणार म्हणून भयही वाटेल; पण असे भय मानण्याचे वास्तविक काही कारण नाही. आज जाती आहेत, त्या उद्या गेल्या तरी त्यापासून तात्त्विक दृष्टीने नुकसान होईल, असे वाटत नाही. मी हे म्हणतो यावरून तुम्ही सर्वांनी मुसलमान, ख्रिस्ती अथवा परधर्मी व्हावे असे माझे बिलकूल म्हणणे नाही. मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, जातीसंबंधाने आमच्या लोकांत हल्ली जी एक विलक्षण कल्पना झाली आहे, ती चुकीची झाली आहे. जाती ईश्वरनिर्मित आहेत, असा कोणी दुराग्रह धरू नये. स्वामींच्या बोलण्यात जातीचा अगर वर्णव्यवस्थेचा विषय आला होता; परंतु माझ्या मते या विषयाच्या त्यात दोन्ही बाजू याव्या तशा आल्या नव्हत्या. विषयासंबंधानेच बोलणे झाल्यास दोन्ही बाजू व्याख्यानकारांनी आपल्या श्रोत्यांपुढे मांडल्या पाहिजेत, म्हणजेच श्रोत्यांना त्या दोन्हींचा योग्य विचार करून कोणते मत योग्य हे ठरविण्यास साधन मिळते.

स्वामींच्या सांगण्यात पूर्वी ब्राह्मण राजे असून, जेव्हा राज्य करणे हे त्यांच्या ईश्वरावरील भक्तीस विरोधकारक होऊ लागले, तेव्हा त्यांनी क्षत्रियास राज्य दिले व त्यांना राजे केले, असे जे आले, ते समाधानकारक दिसत नाही. लहान मुलांच्या खेळात आपण पाहतो की, त्या सर्व मुलांत जो अधिक सशक्त व बलवान असेल तोच त्याच्या खेळात सर्वांचा राजा किंवा मुख्य बनतो. त्याप्रमाणे आरंभी म्हणजे मनुष्य रानटी स्थितीत असताना तो सर्वांत शूर व सशक्त व ज्याचे शरीरसामर्थ्य सर्वांहून अधिक ठरले असेल त्याचाच धाक त्याच्या जवळच्या लोकांस वाटू लागून ते त्याला थोर मानू लागले असावे. प्रारंभी एखाद्या लहान कुटुंबात राजा म्हणून मानला जाणे हा क्षत्रिय वर्णाचा मूळचा आरंभ असावा व त्यालाच कालक्रमाने आजूबाजूच्या परिस्थितीचे साहाय्य मिळून व अनेक प्रकारचे लोक आपापल्या स्वार्थाकरिता त्याला सामील होत गेल्याने त्या कुटुंबातल्या राजापासून हळूहळू 'राजा' शब्दाचा विस्तीर्ण अर्थ झाला असावा. राजे लोकांनी राज्ये स्थापिल्यावरही राहिलेल्या लोकांतून जे कित्येक बुद्धिवान लोक असतील त्यांनी राजे व इतर राजे लोक यांच्या समजुती अगर कल पाहून धूर्तपणाने वागणे व सर्व लोकांचा प्रसंगानुसार विश्वास संपादन करून घेऊन असलेल्या परिस्थितीपासून स्वतःचा फायदा करून घेऊ पाहणे या गोष्टी साहजिक आहेत. राजे लोकांनादेखील स्वतःच्या राज्याच्या बळकटीकरिता अशा लोकांच्या मदतीची जरूरत वाटून त्यांनी या लोकांना हाती धरले असावे व त्या लोकांनीही कायमच्या व्यावहारिक महत्त्वाचे घोडे पुढे लोटिता लोटिता धार्मिक बाबती येथपर्यंत नेऊन भिडविले असावे. इतर देशांचे इतिहास आपण पाहाल तर तेथे हा असाच प्रकार झाल्याचे आपणांस दिसून येईल. आमच्या धर्मातील ऋषी, मुसलमानांतील काजी व मुल्ला, ख्रिस्ती लोकांमधील पाद्री वगैरेची स्थिती सर्वत्र एकच असल्याचे आपणांस आढळेल. एका अर्थी या लोकांचे अशा प्रकारचे महत्त्व लोकसमाजाच्या मनावर दृढ होऊन बसणे हेही साहजिकच आहे. कारण समाजाला प्रथमदर्शनी अद्‌भुत वाटणाऱ्या गोष्टी अशा धूर्त लोकांना अगोदरच साधलेल्या असतात व त्यांचा ते फायदा करून घेतात. जादूटोणे, भूतपिशाच, छाछूं, मंत्रतंत्र हीच या लोकांची रामबाण हत्यारे. त्यांचे आघात अगर प्रयोग हे सामान्य लोकांच्या मनावर दीर्घकाळपावेतो आपला अंमल करणारच. ज्या-ज्या ठिकाणी म्हणून आपण इतिहासाचा शोध करू जाऊ त्या-त्या ठिकाणी आपणांस याच प्रकारचा अनुभव येईल. या स्थितीचे अगदी व्यवहारातले आजमित्तीसही अनुभवास येऊ शकणारे एक उदाहरण मी आपणांस सांगतो. आपल्या लोकांत ज्योतिषी, भुते वगैरे अंगात आणणारे, गंडे-दोरे, ताईत वगैरे मंत्रून देणारे लोक पुष्कळदा आपण ऐकले आहेतच. हे लोक ज्या मनुष्यात भूतभविष्यासंबंधी काही सांगावयाचे असेल त्याचा स्वभाव, वर्तणूक, त्याचे समज, विचार वगैरेंचा अगोदरच पूर्णपणे तपास करून ठेवतात व नंतर सदर मनुष्यास भूतभविष्यादी सांगतात, हे सांगत असताना ज्योतिषीलोक जी भाषा वापरतात ती जर लक्षात आणली, तर तिजमध्ये बहुतेक द्विअर्थी शब्दांचाच विशेष भरणा असतो. त्यांच्या सांगण्यात व प्रत्यक्ष अभावात फरक पडला म्हणजे ते तशा तऱ्हेची भाषा वापरत असल्यामुळे सुटून जाण्यासही तयार असतात. असो. सांप्रतकाळी आपल्या देशात जो जातिभेद दृष्टीस पडतो, तो मूळच्या वर्णभेदात क्रमाने पोटभेद पडत गेल्याने उत्पन्न झालेला असावा असे दिसते. मनुष्य सुधारत गेल्याने त्याच्या गरजा

अधिक वाढत जाऊन निरनिराळे धंदे उत्पन्न करण्याची आवश्यकता साहजिकच वाटू लागते व तसे झाल्यामुळेच त्या-त्या धंद्यावरून व क्वचित आगंतुक कारणांनी निरनिराळ्या जाती झाल्या असाव्यात, हीच गोष्ट सर्वत्र दिसून येईल.

काल स्वामींनी नांगराचा फाळ हे आपले पहिले हत्यार असल्याचे सांगितले; पण मला तसे वाटत नाही. स्वामींच्या मते आपल्या देशातील लोकांचा कृषिकर्म पहिला धंदा होता व इतर धंदे मागून उत्पन्न झाले; परंतु असे होणे संभवनीय दिसत नाही. रानटी स्थितीत असताना कंद, मुळे, फळे वगैरे खाऊन उपजीविका करावी, असा मनुष्याचा क्रम असावा असे दिसते. पुढे ती पुरेनाशी झाल्यावर जनावरे हेही निर्वाहाचे साधन झाले असावे. अखेर दोन्हीही दुर्मिळ अशी जेव्हा पाळी आली असेल तेव्हा प्रथम डोंगरी वगैरे प्रदेशांतून जी आयती धान्ये सापडली असतील त्यावर काही काळपावतो निर्वाह चालून मागाहून जमिनीत धान्य लावण्याकरिता हत्यार म्हणून लाकडाची किंवा काठीची योजना झाली असावी. नंतर दगडाच्या कपऱ्या व त्यानंतर तांबे, लोखंड वगैरे धातूंचा शोध लागून त्यांचा नांगर व हत्यारे तयार करण्याच्या कामी उपयोग झाला असावा.

आता धर्माबद्दल पाहू गेले असता 'धर्म' शब्दाचे 'देवभक्ती', 'स्वकर्म,' 'दाने,' 'नैसर्गिक धर्म' (Laws of Nature) इत्यादी अनेक अर्थ होतात; परंतु धर्माचा अर्थ परस्पर भोजन व्यवहार किंवा पाणी घेण्याविषयी नियम ठरविणे असेल तर तो विचाराच्या दृष्टीस पसंत पडणार नाही. धर्मातही जातीप्रमाणे फरक होत जाणारच. मागे सांगितलेली सूर्य, चंद्र, पृथ्वी, वायू, आकाश, समुद्र, नद्या व पर्वत यांची पूजा करण्यापासून धर्मास आरंभ होतो. नंतर त्यास पुष्कळ देवाची पूजा करणे व शेवटी अमूक कोणी एक 'क्ष' हा परमेश्वर नसून केवळ काही तरी अमानुष ईश्वरी शक्ती असावी असे होते. वेदाच्या किंवा गीतेच्या वेळचा धर्म आता कायम नाही, हे उघड आहे. परमेश्वर सर्वव्यापी आहे आणि ब्रह्म हे सर्वत्र असून ते प्राणी, झाडे, गवत, दगड, माती, शेण इत्यादी वस्तूतही आहे. असेही आहे असे म्हणणे म्हणजे एक प्रकारे (Reduction and absurdum) प्रमाणेच होय. ब्रह्म हे प्रत्येक प्राणिमात्रात आहे आणि म्हणूनच प्रत्येक प्राण्याची पूजा केली पाहिजे असे म्हटले, तर ते ब्रह्म आपले देशबांधवांत किंवा धर्मबांधवांत नाही काय? असे आहे तर आपण इतर जातींच्या लोकांना म्हणजे धेड, महार, चांभार, भंगी इत्यादिकांना निर्दयतेने का बरे वागवावे? आपल्यासारखीच तीही ईश्वराची लेकरे आहेत व त्यांना आपण ममतेने वागविले पाहिजे; परंतु तसे करण्यास आपल्यापैकी किती लोक तयार असतील बरे ! जुने तेवढे चांगले असे म्हणण्याकडे बहुशः प्रत्येक जणाची प्रवृत्ती दृष्टीस पडेल. अलेक्झांडर बादशहासंबंधाने मला कोठे तरी एक गोष्ट वाचलेली आठवते. या बादशहाने हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हा त्या वेळच्या ब्राह्मण वगैरेंनी त्यांना नारळ दिला. या गोष्टीवरून अशा लोकांच्या शत्रूमैत्री समतादृष्टीची कोणी कदाचित तरफदारीही करू शकतील; परंतु माझ्या समजुतीने निदान ती त्यांच्या स्वाभिमानास व देशाभिमानास शोभणारी नव्हती, असे म्हणणे भाग पडते. वास्तविक विचार करू गेल्यास त्यांनी ही गोष्ट करणे योग्य नव्हते. अशा ठिकाणी जुन्या चालीरीती अगर रीतीची कल्पना अबाधित ठेवणे खचित अयोग्य होईल. मी म्हणतो, अशा वेळी देशकाळानुसार

धर्मसमजुतीतही फेरफार होणे अवश्य होते. समजुती हे धर्माचे खरे स्वरूप नव्हे, तर काही काळ पावेतो टिकणारे असे केवळ बाह्यांग आहे. धर्माचे खरे स्वरूप तात्त्विकदृष्ट्या राखावयाचे म्हटल्यास बाह्यांग टाकलेच पाहिजे. बाह्यांग नेहमी परिस्थितीवर अवलंबून असते. आपल्या देशाची पूर्वीची परिस्थिती ज्याअर्थी बदललेली आहे, त्याअर्थी आपणांस आपल्या धर्माचे स्वरूप कायम राखण्याकरिता कालमानाप्रमाणे काही फेरफार केले पाहिजेत. धर्मवृक्षाची पूर्ण वाढ होण्यास राजाश्रयाची अनुकूलता लागते व यामुळे क्वचित नवीन कायदे करण्याचेही प्रसंग येतात; परंतु हे कायदे असले म्हणजे तेवढ्याने भागते असे नाही. त्याचा खरा कायदा करून घेण्यास वस्तुतः लोकांकडूनच तशा प्रकारचे वर्तन होत गेले पाहिजे. यापासून खरोखर अमुक फायदा आहे, असे लोकांस पूर्णपणे समजले म्हणजे स्वाभाविकच. या नवीन दिशेने लोक प्रयत्न करू लागतात. मनुष्य जसजसा शहाणा व अनुभवी होत जातो तसतसा तो कालमानाप्रमाणे आपली स्थिती सुधारण्याच्या कामी उद्युक्त होतो व स्वतःची प्रगती योग्य मार्गाकडे होत आहे की नाही हेही पाहत असतो.

धर्मास एक तऱ्हेचे मोठे स्वरूप देण्याच्या इच्छेने मी येथील शाळांतील मुलांना श्रीमद्भगवद्गीता शिकविण्याचा प्रयत्न केला; परंतु आपले येथे अनेक धर्मपंथ व त्यांच्या पोटभेदाची संख्याही मोठी यामुळे तो निष्फळ झाला, तर जो जो शाळांची वृद्धी होत जाईल तो तो प्रत्येक विषयात पूर्वीपेक्षा जास्त प्रगती होईल. प्रत्येकाने हरतऱ्हेचे प्रयत्न करून विद्या संपादन केली पाहिजे व होईल तितके तिचे दानही केले पाहिजे. विद्या ही एक अशी अपूर्व चीज आहे की, तिचे योग्य वर्णनच करता यावयाचे नाही. आपल्या येथे सामान्यतः जिकडे पाहावे तिकडे अतिशय अज्ञानच पसरले आहे. त्यामुळे प्रसंगी मनात आणलेले कार्य ताबडतोब सिद्ध होण्यास अडचण पडते. बाब क्षुल्लक असते; परंतु अशा ठिकाणी खरा उपयोग होण्यास बुद्धीचा विकास असावा लागतो. हा विकास असला तर वेळी एखाद्या हलक्या दर्जाच्या माणसाकडून अगर अल्पवयाच्या मुलाकडूनही उपयोग होण्याचा संभव असतो. आजच्या व्याख्यानाच्या संबंधाने मी माझा एक लहानसा अनुभव सांगतो. व्याख्यानासंबंधाने काही किरकोळ बाबतीत मला काही हुकूम करावयाचे होते; परंतु सांगून पाठविण्याच्या पूर्वी योग्य इसम जवळ नसल्याने मला पाच मिनिटे वाट पाहावी लागली. शेवटी जनानखान्यात एक लहान वयाची हुशार मुलगी होती. तिला जेवताना मध्येच उठवून मी ते हुकूम सांगितले व त्याप्रमाणे त्या मुलीने थोडक्याच वेळात माझ्या सांगण्याप्रमाणे व्यवस्था करविल्या. हे केवळ एक लहानसे उदाहरण सांगितले; परंतु त्याचे तात्पर्य फार मोठ्या महत्त्वाचे आहे. सरकारी बँकेत पैसे ठेवले असताना शेकडा चार टक्के व्याज मिळते; पण विद्येपासून ते आपणांस शेकडा शंभरही मिळू शकेल. विद्येचा खरा प्रसार झाल्यावाचून धर्माच्या विचाराचा अथवा धर्मशिक्षणाचा प्रसार करू पाहणे म्हणजे जमीन चांगली नांगरून तयार केल्याशिवाय तीत वृक्ष लावून त्याच्या उत्तम वाढीची आशा करणे असे होय.

आपली सध्याची स्थिती पाहा, आपल्या लोकांकडे जरा नजर फेका, त्यांचे विचार कोणते. 'कूपमंडूका'प्रमाणे त्यांच्या विचारांची धाव अगदी आकुंचित असते. चांगले सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांचेदेखील विचार पुष्कळप्रसंगी त्याच मासल्याचे आढळतील. हिंदुस्थानच्या बाहेर काही

चांगले असेल असे त्यांना वाटत नाही. जे काही जुने अथवा आपले (हिंदुस्थानातील) तेच काय ते त्यांना प्रिय. तसे न करता हिंदुस्थानच्या बाहेर पडा म्हणजे तुमच्या दृष्टीस खचित असे दिसून येईल की, कित्येक देश सुधारणेच्या कामात आपल्या पुढे जात आहेत व आपण अगदीच मागे पडत चाललो असून, दिवसेंदिवस गुलामाची स्थिती आपणांस येत चालली आहे. जातिबंधने व धर्मबंधने त्याची किंमत आपण मोठी समजतो. तीच सर्वस्वी आपल्या निरुत्साहितेस व नाशास कारणीभूत होत आहेत. इजिप्त हा देश पाहा त्याच्या फार पूर्वीच्या सुधारणेचा विचार करा, म्हणजे तुमच्या दृष्टीपुढचा प्राचीन मोठेपणाचा पोकळ भ्रम (Phanom of greatness) नाहीसा होईल. म्हणून विद्यासंपादन करण्याकरिता बाहेर (परदेशीही) गेले पाहिजे; परंतु आपल्या धर्माची स्थिती आजमित्तीस अशी काही चमत्कारिक झाली आहे की, देशपर्यटन करणे हे धर्मबाह्य आहे असे समजतात. परदेशी गमन करणारास परत जातीत घ्यावयाचे नाही, हा दुराग्रही कटाक्ष ब्राह्मण मंडळीत विशेष असल्यामुळे आपल्या देशाचे अनेक प्रकारे नुकसान होत चालले आहे. आजच्या स्थितीत मानाने पाहून गेले असता परदेशगमनाची धर्मबाह्यता लोक विसरतील तरच खरा तरणोपाय आहे. त्या तरणोपायास न जुमानता नुसती धर्मबंधनेच आपण दृढ धरून बसत आहोत. अशा बंधनाचा परिणाम असा झाला आहे की, आपल्यापेक्षा सुधारलेल्या लोकांत काय अधिक आहे व आपणांस सुधारण्यास काय काय केले पाहिजे हे सहसा व कोणास समजत नाही. आपल्या या घातुक धर्मसमजुतीमुळे आपल्यातून एकमेकास साहाय्य करण्याचे ब्रीद नष्ट झाले आहे. धर्मातील इतर जातींच्या लोकांना आपल्याकडून साहाय्य होत नसल्यामुळे किती तरी परधर्मी झाले व होतही आहेत. नुसता धर्मावर विश्वास ठेवतो म्हणून डौल भोगावयाचा; पण धर्मकृत्ये मात्र हातून घडावयाची नाहीत, तर त्याचा काय उपयोग?

स्वामींनी धर्मावर श्रद्धा व ईश्वराची भक्ती यांचे इतके जरी वर्णन केले, तरी त्या बाबतीत पुढे काहीच प्रयत्न न करिता केवळ वेदपठण किंवा पूजाअर्चा करणे, यापासून आपल्या देशबांधवांना आपला काय उपयोग होणार? नुसत्या भक्तीने किंवा ईश्वर भजनाने काही होणार नाही. आपणांस आपल्या लोकांची नीती सुधारली पाहिजे. जुन्या तत्त्वज्ञानाचा अथवा धर्माचा अभ्यास म्हणजे फक्त ज्ञानासंबंधी चमत्कारिक माहिती मिळविणे होय. जोपर्यंत आपण आपली नीती, सद्गुण, औदार्य व सर्वांची सहानुभूती ही अधिक वाढविण्याचा प्रयत्न करीत नाही, तोपर्यंत अशा निष्फळ वादात अगर नुसते 'विठ्ठल' म्हणत राहण्यात काही अर्थ नाही. थोड्या दिवसांपूर्वी आम्ही माळवा प्रांती गेलो असता तेथे एका खेडेगावात सुमारे १५० मुली नुकत्याच मिशनरी लोकांनी बाटविल्याचे समजले, ही गोष्ट फार शोचनीय होय. आपल्या धर्मातून केवळ पोटास मिळत नाही म्हणून इतक्या मुलींना परधर्मी व्हावे लागले. ही गोष्ट धर्माभिमानी लोकांना शोभत नाही. आमच्या लोकांत स्त्री जातीची स्थिती फारच मागासलेली आहे व त्यांस अनेक प्रसंगी योग्य औषधोपचार होणे जरूरी असता त्याबद्दलची सोय आमच्या समाजाने केली नाही. यामुळे स्त्रियांना अतोनात देहयातना भोगाव्या लागतात; परंतु अशा गोष्टीकडे कोणाचे तरी लक्ष गेले आहे काय? खऱ्या धर्मश्रद्धेने वागणारास ही स्थिती अवश्य दिसली पाहिजे; परंतु तशी श्रद्धा असेल तेव्हाची ती गोष्ट. आजच्या स्थितीत आम्ही फार तर वाचाळ बनतो; परंतु 'क्रियेवीण

वाचाळता व्यर्थ आहे' या रामदासांच्या उक्तीचे आम्हांला मुळीच स्मरण होत नाही. मी म्हणतो, नुसती आमचे धर्मावर आमची श्रद्धा आहे. असे म्हणण्यात काही तात्पर्य नाही. प्रसंग पडल्यास ती आपपरतेचा भेद न ठेवता व्यक्त होईल तरच उपयोग. याकरिता आपण सर्वांना आपल्या धर्मातील हर एक जातीशी सहानुभूती दाखविली पाहिजे. रस्त्यात आपण हजारो आंधळे, लंगडे, रोगग्रस्त व दुर्बळ असे लोक पाहतो व वास्तविक पाहता अशाच लोकांना मदत केली पाहिजे आणि त्यानेच खरा धर्म होतो. समर्थास दान करणे म्हणजे डोंगराच्या माथ्यावर किंवा अफाट समुद्रावर पर्जन्यवृष्टी करणे होय, असे आपल्या नेहमीच्या परिचयातल्या ग्रंथातून वर्णन आलेले मी आपणांस सांगितले पाहिजे असे नाही. माझे म्हणणे इतकेच की, आपल्या देशबांधवांपैकी ज्या प्रकारच्या लोकांना खरोखर मदतीची अपेक्षा आहे, अशांनाच मदत करणे हे प्रत्येकाने आपले पहिले कर्तव्य समजून ते केले पाहिजे.

असो, या विषयाचा पूर्णपणे विचार करण्यास वेळ फार लागेल. तरी या सर्व गोष्टी विचार करण्यासारख्या असल्यामुळे ज्यांना काही शंका असतील त्यांनी त्या स्वामींना विचारून केल्यास आपल्या संशयाचे निरसन करून घ्यावे. स्वामीही जर शंका उत्पन्न करणारांच्या शंकांचे समाधान करून सर्वांची खात्री करून देतील तर त्यापासून फार फायदा होईल.

आपल्या देशात धर्माच्या नावाखाली आश्रय घेणारे जटाधारी गोसावी लोक, तसेच डोकी मुंडवून भगव्या छाट्या पांघरून संन्यासी बनलेले पुष्कळ लोक आहेत. यापैकी कित्येक मनुष्यवस्तीपासून लांब लांब ठिकाणी अरण्यात अगर गिरिकंदरी वास करणारे असतील; परंतु त्यांच्याच जोडीला याच वेशाने सुखासाठी हिंडत राहणारेही शेकडो आढळतील. तत्त्वदृष्टीने आपण या लोकांकडे पाहतच नाही व केवळ बाह्यस्वरूपावरून त्यांच्याविषयी आपण पूज्यबुद्धी बाळगतो. हे कितपत योग्य आहे याचा आपण विचार करा. माणसाच्या उपसर्गापासून दूर राहणाऱ्याचा कोणासही काही उपयोग नसतो. सबब त्यांना आपण काय म्हणून मान द्यावा? तेच जर आजच्या व्याख्यानकार स्वामींप्रमाणे सर्वत्र संचार करून लोकांना उपदेश करतील, त्यांना सद्धर्म शिकवितील? व त्यांना सन्मार्गास लावतील, तरच त्यांना मान देणे योग्य होईल. सामान्यतः पाहू गेल्यास या दोन्ही वर्गांतील बहुतेक लोक गावातून हिंडणारे असून, घरात शिरून काही चोऱ्याही करतात, तर यावरून त्यांचा संन्यास हा केवळ लबाडीचा म्हणजे बोके संन्यास असून, तो निव्वळ भोळ्या भाविक लोकांना फसवून पोट भरण्याचा धंदा म्हणूनच त्यांनी अंगीकारिला की काय, असा भास होतो. आम्हाला अशा प्रकारचे स्वामी अथवा गोसावी नको आहेत. सध्याच्या स्थितीत हेच लोक देशोदेशी, गावोगावी हिंडून लोकांना विद्यादान करू लागतील. अगर त्यांच्या दुःखाचे परिमार्जन करतील, तर त्यापासून केवढा बरे देशाचा फायदा होणार आहे? भोळ्या धर्मवेड्या लोकांना अज्ञानामुळे आजमितीस ज्या काही गोष्टी भासतात, आपला खरा अर्थ लोकांना मुळीच कळू शकत नाही. अडाणी वाढविणे, शास्त्र, धर्म वगैरे गोष्टी भलत्याच प्रकारे भासत राहणे हे अगर मोठेच नुकसान आहे. बहिऱ्यापुढे गायन करणे किंवा आंधळ्या लोकांपुढे सुंदर तसबिरा मांडणे यापासून त्यांना फायदा तो काय होणार? ज्या लोकांना आजकालच्या धर्माचा अगर शास्त्राचा श्रीगणेशाही धड समजत नाही, व्यवहारातील सारासार तत्त्व समजण्याचे सामर्थ्य

नाही, अशा लोकांपुढे गहन विचाराच्या गोष्टी मांडल्यापासून फायदा होण्याचा मुळीच संभव नाही. अशा लोकांना विचारशक्ती येईल असे शिक्षण दिले पाहिजे. त्यांना विद्यामृत पाजणे तेही त्यांच्या शरीर, मन इत्यादिकांच्या स्थितीस शोभेल असेच पाजले पाहिजे व त्यांच्या दुःखाचे परिमार्जन करून त्यांना सुस्थितीस आणले पाहिजे. हे कार्य या गोसावी, तपस्वी, अरण्यवासी वगैरे मंडळींकडून होणे सर्वथैव इष्ट आहे. आजच्या स्थितीत हे लोक जसे आपण पाहतो तसे ते नको आहेत, तर मी आता सांगितल्याप्रमाणे आमच्या आजच्या व्याख्यानकारांसारखे केवळ लोककल्याणाकरिताच जगात वास करणारे व सर्वतोपरी योग्य असेच लोक पाहिजेत. पुष्कळ अंशी अशा मूर्तीवरच इतर सर्व लोकांचे हित अवलंबून असते. आज तीन दिवस या स्वामींनी आपणापुढे व्याख्याने दिली. हे त्यांचे आपणा सर्वांवर मोठे उपकार झाले आहेत व त्यांच्यासारख्या साधू पुरुषांनी देशात सर्वत्र फिरून व्याख्यानांनी किंवा अन्य साधनांनी लोकांवर उपकार केले असता जगाचे फारच कल्याण होऊन सर्वांना आता आपला ऊर्जित काळ जवळ आला असे वाटू लागेल. असो.

आता वेळ फार झाला आहे. सबब हा विषय मी येथेच संपवितो. आज इतका वेळ जे काही चार शब्द बोललो ते अगदी आयतेवेळी व विचार करण्यास संधी न मिळता बोललो. यामुळे त्यात काही दोष वगैरे झाले असतील, अगर बोलण्याच्या भरात काही कमी-जास्ती शब्द तोंडातून निघून गेले असतील, तर याबद्दल माफी असावी.

(निशाणी ३)

माझा युरोप व हिंदुस्थान देशातील कार्यक्रम आणि दिनचर्या

(नाइंटीन्थ सेंचुरीमध्ये लिहिलेला निबंध.)

माझ्या युरोप व हिंदुस्थान या देशांतील कार्यक्रमाच्या व दिनचर्येच्या हकिकतीतील काही गोष्टी मी नमूद केल्या तर इंग्लंडातील लोकांचे नुकतेच अफगाणिस्तानच्या अमिराविषयी प्रसिद्ध झालेल्या हकिकतीप्रमाणे तितक्याच प्रमाणाने नाही तरी मनोरंजन होईल, अशी सूचना करण्यात आली आहे.

काही प्रसंगामुळे व विशेषतः माझ्या प्रकृतीमुळे आता माझी प्रकृती पुष्कळ सुधारली आहे. वेळावेळी हिंदुस्थानीय लोक प्रवास करतात त्याप्रमाणे मला मोठा प्रवासी बनावे लागले; परंतु मी आपला बहुतेक काळ बडोदे मुक्कामीच घालवितो. बडोदे मुक्कामी असताना मी, माझ्या अल्पवयात बांधण्यास सुरुवात झालेल्या व मी गादीवर बसल्यावर तयार झालेल्या राजवाड्यातच राहतो. तळ जमीन व सभोवतालचे आवार यांची किंमत निराळी. नुसत्या राजवाड्याच्या बांधकामासच २,००,००० पौंड खर्च झाला आहे. हिंदू-सारसेनिक (मुसलमानी) शिल्परचना-पद्धतीबर हुकूम हा राजवाडा बांधण्यात आला आहे व माझ्या एकट्याच्या सुखापुरते पाहता यात काही उणिवा दिसत नाहीत. तथापि त्याचा अंतर्भाग, खोल्यांची रचना व आकार याविषयी इतरांस दोष काढता येतील. युरोपियन तऱ्हेच्या घरात ज्या सर्व सोई असतात किंवा हिंदुस्थानातील राजवाड्यात जी सुखसाधने असतात, ती या राजवाड्यात नाहीत.

सन १८८५ पासून मी आजपर्यंत युरोप खंडात ४-५ सफर केल्या व सुमारे तीन वर्षांपर्यंत परदेशात मी राहिलो. तीन वर्षेपर्यंत मी एका व्यथेपासून पीडित झालो होतो. हा रोग मज्जातंतू व्यथा होय. असे पुढे ठरले. माझे वैद्य, कामगार व मित्र यांच्या मी रोगाने पीडिलो आहे. याकडे लक्ष गेले नाही इतकेच नाही; परंतु माझा आजारीपणा खरा नसावा असेही त्यांना वाटले. शेवटी माझी निद्रालोपाची व्यथा इतकी अनावर झाली की, मला युरोपियन वैद्यांचा सल्ला घ्यावा

लागला. मुंबई वैद्यखात्यातील डॉ. सर विल्यम मूर यांनी मी युरोपची सफर करावी, अशी शिफारस केली व परिणामावरून पाहता त्यांनी योग्य तोच सल्ला दिला असे मला वाटते.

बडोदे शहराची हवा फार उष्ण व त्रासदायक आहे व ज्यांना मानसिक श्रम करावे लागतात त्यांना तर विशेषतः फारच त्रास होतो. वर्षातून काही महिने तरी चांगल्या हवेवर बाहेर ठिकाणी जाण्याची मला नेहमीच आवश्यकता वाटणार. पंधरा वर्षांपूर्वी जी कुटुंबे कधीही हवेच्या ठिकाणी जाण्याच्या भानगडीत पडली नाहीत, त्याच कुटुंबात हवेकरिता डोंगरी ठिकाणी जाण्याचा प्रघात आता सार्वत्रिक होत आहे. हिंदुस्थानातील पुष्कळ डोंगरी ठिकाणी लोकांची इतकी गर्दी उडत आहे की, खुद्द युरोपियन अधिकाऱ्यांनादेखील अशा ठिकाणी घरे मिळण्याची मुश्कील पडू लागली आहे. बडोदे संस्थानात असे डोंगरी ठिकाण एकही नाही आणि मला हवापालट करण्याची इच्छा झाल्यास हिमालय, निलगिरी किंवा दुसऱ्या ठिकाणी सहा दिवसांच्या अंतरावर जावे लागते.

मी बहुधा सकाळी सात वाजता निजून उठतो व स्नान करतो. नंतर मला नित्यपूजा सांगणाऱ्या ब्राह्मणांना मी दक्षिणा देतो. अलीकडे ही दक्षिणा ब्राह्मणासच देण्यात येते असे नाही तर इतर वर्णांच्या लोकांसही देण्यात येते. रोज सकाळी दक्षिणेप्रीत्यर्थ सुमारे ३ पौंड खर्च होतात आणि हे ब्राह्मण नेहमीचे घरगुती उपाध्याय असतात किंवा त्यांनी पाठविलेले त्यांचे प्रतिनिधी असतात. उपासनामंत्राचा मतलब मी व माझ्या कुटुंबातील माणसे यांचे पापक्षालन होऊन सर्वांना दीर्घायुष्य मिळावे व संस्थानाची भराभराट व्हावी इत्यादी अर्थांचा असतो.

या नित्यविधीशिवाय घरच्या देवघरातही देवांची पूजा व इतर नैमित्तिक इत्यादी संस्कार होत असतात. नैमित्तिक कृत्यांचे स्वरूप विशिष्ट दिवसांवर किंवा ऋतूवर अवलंबून असते. उदाहरणार्थ श्राद्धविधी, वाढदिवस इत्यादी. कुटुंबांत सुतक आले असता मात्र हे सर्व विधी सुतक संपेपर्यंत बंद राहतात.

माझ्या नित्याच्या उपासनेनंतर मी हलकीशी दूधरोटीची न्याहारी करितो व नंतर गाडीतून किंवा घोड्यावर फिरण्यास जातो. हा व्यायाम करून परत आल्यावर मी तत्त्वज्ञानासारखे विषय वाचतो व आमच्या तत्त्वज्ञान पद्धतीशी ग्रीस देशातील तत्त्वज्ञानपद्धतीची तुला करतो. तसेच इंग्लंड, हिंदुस्थान, ग्रीस व रोम या देशांचे इतिहास मी वाचतो, गिबनकृत इतिहास मला फार आवडतो. या ग्रंथावर मी एक लहानसा निबंध लिहिला आहे. ब्राइसची डिमॉक्रसी (लोकसत्ता), टाक्वव्हिल, मिल व फॉसेट यांचे ग्रंथ हेही मी वाचतो. हर्बर्ट स्पेन्सरचा शिक्षण - मीमांसेतील विचारसरणी मला अभिमत आहे; परंतु त्याचे तत्त्वशास्त्रांवरील ग्रंथ मी वाचीत नाही. मी शेक्सपिअरचा लक्षपूर्वक अभ्यास केला आहे व बेन्थमचे 'कायदेशास्त्र' (Legislation) या मेनचा 'प्राचीन कायदा' ही पुस्तके मला फार आवडतात. अशा वेळी बहुधा कोणी तरी विद्वान, हुशार गृहस्थ मला वाचून दाखविण्यास किंवा मी वाचलेल्या विषयांबद्दल मजशी चर्चा करण्याकरिता येत असतो.

माझे दुपारचे जेवण मुलाबाळांसहित व माझे आप्त, मानकरी वगैरेंसहित ११ वाजता होते. आमच्या उपाहारातील खाण्याचे पदार्थ युरोपियन तऱ्हेने केलेले असतात व ते वाढण्याची

पद्धतीही तशीच असते. तरी त्याबरोबर कित्येक पदार्थ हिंदुस्थानी तऱ्हेनेही तयार केलेले असतात. दारू किंवा मद्याचा अर्क ज्यात आहे असे पेय किंवा गोमांसाचाही संबंध असलेला पदार्थ, हा कधीही खाण्यापिण्यात येत नाहीत. जेवण एक तासभर चालते व नंतर महत्त्वाचे काम नसेल, तर विश्रांती घेतो; परंतु पुष्कळ वेळा मला लागलेच संस्थानच्या कामाकडे पाहावे लागते.

निरनिराळ्या खात्यांतील मुख्य अधिकाऱ्यांनी मजपुढे कामे आणण्याचे मी निरनिराळे दिवस नियमित केले आहेत आणि एखादे काम फारच महत्त्वाचे असल्यास माझे दिवाण ते मजकडे घेऊन येतात. कसेही असो, मला या लोकांचे भेटण्याचे प्रसंग वारंवार येतात.

सरकारी कामाचे कागद दोन-तीन दिवस आगाऊ माझ्या चिटणिसांकडे मी वाचावे म्हणून पाठविण्यात येतात. माझे हुकूम मी लेखीच देतो व काही प्रकरणासंबंधाच्या सर्व हुकुमांवर मी स्वदस्तुरची सही करितो. शिक्क्याचा उपयोग केल्याने किंवा तो दुसऱ्याकडे सोपविल्याने गैरसमज व विपरीत ग्रह उत्पन्न होतात, असे आढळल्यावरून मी स्वतःच्या सहीची व्यवस्था सुरू केली आहे.

एक उदाहरण घेऊ. मरणाची शिक्षा पहिल्याने प्रांतातील न्यायाधीशाकडून देण्यात येते व नंतर कायम होण्यासाठी तीन न्यायमूर्तींकडे हायकोर्टात पाठविण्यात येते. नंतर दयेकरिता माझ्याकडे अपील करण्यात येते. हा अर्ज माझ्याकडे आल्यावर माझा दिवाण या खटल्याबद्दल आपले मत नमूद करतो व नायब दिवाण-जो बहुधा न्यायखात्यातील अधिकारी असतो, तोही आपले मत देतो आणि त्यानंतर मला एखादी शंका आल्यास किंवा अडचण पडल्यास मी माझ्या दुसऱ्या कामदारांची सल्लामसलत विचारितो किंवा खटल्याशी संबंध असलेल्या न्यायाधीशांना बोलावितो.

दिवाणी कज्जे व काही बाबींतील फौजदारी खटले यांचा कायमचा निकाल लावण्यासाठी मी एका मंडळाची मदत घेतो. या कमिटीत तीन कामगार असतात, ते सर्व कागदपत्रे वाचून पाहतात, वकिलांची भाषणे ऐकतात, एक मेमोरेण्डम तयार करतात व निकालासाठी प्रकरण माझ्याकडे पाठवून देतात. या कमिटीस 'न्यायसभा' म्हणतात.

बहुधा मी दररोज दुपारी तीन-चार वाजेपर्यंत एकसारखे काम पाहतो; परंतु कधी कधी कामाची वेळ लांबवावी लागते. कारण संस्थानांतील सर्व खात्यांतील अतिशय महत्त्वाची प्रकरणे माझ्या हुकूमाकरिता मजकडे पाठविण्यात येतात.

माझ्या पूर्वीच्या महाराजांच्या कारकीर्दीत खात्याखात्यांचे काम करण्याचे ठराविक नियम नव्हते; परंतु काही समजुती ठरल्या होत्या व पुष्कळ वेळा दिसण्यात विरुद्ध असेही प्रघात चालू होते. त्यावेळेस सुशिक्षित नोकरांची फारच उणीव होती व संस्थानचा कारभार पाहण्याचा अधिकार सर्वस्वी दिवाणांकडे सोपविण्यात येत असे. फक्त तक्रार कळविण्यास महाराजांजवळ जाण्यास सर्वांना मोकळीक असे.

तथापि माझ्या प्रजेच्या कल्याणाकडे दृष्टी देऊन मी निराळा मार्ग स्वीकारिला आहे. काम करणे अगदी माझ्या अंगवळणी पडले आहे. त्याशिवाय मला चैनच पडत नाही. माझ्या प्रजेसाठी

काम करण्यात मला फार आनंद वाटतो. म्हणून वस्तुतः पाहताना मी घ्यावे त्यापेक्षा अधिक श्रम स्वतः होऊन घेतो.

काम आटोपल्यानंतर चार-पाच वाजता मी जनानखान्यात महाराणींच्या भेटीस जातो. ही मुलाखत एखाद्या कोंडलेल्या एकांत ठिकाणी होते असे नाही, तर राजवाड्यातील ज्या भागात महाराणी राहतात त्या ठिकाणी आम्ही भेटतो. जनाना हा शब्द मी शब्दशः अर्थाने योजिला आहे. याठिकाणी महाराणींच्या समागमात मी एक-दोन तास घालवितो. यावेळी माझी मुले खाजगी शिक्षकांच्या हाताखाली शाळेत शिकत असतात.

यापुढे एक तासानंतर हवा चांगली असल्यास मी गाडीत फिरण्यास जातो. यावेळी माझ्याबरोबर २५ घोडेस्वार रिसाल्याचे व बॉडीगार्डाचे असतात व मी शहराबाहेर गेल्यावर यापैकी पाच ठेवून बाकीचे परत पाठवितो. मी शहरातून फिरत असताना कधीकाळी एखाद्या मनुष्यास अर्ज गुजरावयाचा असतो. असे झाल्यास गार्डांपैकी एक कामगार तो अर्ज घेतो व अर्जदाराने मला किंवा त्याच्या अर्जातील बाबींचा संबंध ज्या खात्याशी असतो त्या खात्याच्या मुख्य कामगारास भेटण्याची वेळ मी ठरवून टाकतो. माझ्या राज्यातील सर्व प्रजाजनांना मला भेटण्यास मिळावे म्हणून आठवड्यातील दोन दिवसांचे काही तास लोकांच्या भेटीकरिता मी निराळे नेमले आहेत.

संस्थानची राज्यव्यवस्था व कामाची व्यवस्था सध्या ब्रिटिश धर्तीवर मुख्यत्वेकरून ठेवली आहे. म्हणून जुन्या काळी जितक्या प्रमाणाने राजकीय प्रकरणे महाराजांकडे पाठविणे जरूर वाटत असे, तितक्या प्रमाणाने सध्या जरूर वाटत नाही. प्रांतातून प्रवास करण्याचे मला पुष्कळवेळा प्रसंग येतात. तेव्हा माझ्या लोकांची स्थिती होईल तितक्या रीतीने मला कळावी म्हणून परवानगीशिवाय भेटण्याची पद्धती मी शिथिल करतो. खेड्यातील पुढाऱ्यांशी मी बोलतो किंवा शेतात कोणी मनुष्य आढळल्यास त्याच्याशी मी बोलत उभा राहतो. अशा प्रसंगी मला कोणी ओळखू नये म्हणून मी यत्न करितो; पण गुप्तपणा ठेवणे कठीण जाते.

केव्हा-केव्हा मी बदके वगैरे लहान शिकार व वाघासारखी मोठी शिकार करितो. काठेवाडीत मी दोन-तीन वाघ व एक सिंह मारले आहेत. सिंहाची जात नाहीशी होत आहे याबद्दल मला वाईट वाटते. नीळगाई किंवा गाईच्या जातीचा दुसरा एखादा प्राणी मी मारीत नाही, हे उघडच आहे.

स्वारी फिरत असताना माझ्या तैनातीतील निरनिराळ्या कामदारांस मी नेमलेल्या कामांची तपासणी करण्यास पाठवितो. लोकांच्या मनोभावना व समजुती यांना न दुखविण्याची मी काळजी बाळगतो. मला मराठी व गुजराथी भाषा चांगल्या अवगत असल्यामुळे माझ्या प्रजाजनांला मजशी बोलण्यास अडचण पडत नाही. कामानिमित्त मला भेटण्यास इच्छिणाऱ्या इसमांशी बोलण्याबद्दल मला अडचण पडत नाही.

सन १८८९ च्या डिसेंबर महिन्यात मला माझ्या १९ व्या वर्षी राज्यकारभाराचा अधिकार मिळाला. आमच्या घराण्यातील ज्या शाखेचे महाराज मल्हारराव गायकवाड होते त्या शाखेहून वडील शाखेतील एका माझ्या पूर्वीच्या महाराजांचा मी प्रत्यक्ष वंशज आहे. तेराव्या वर्षापासून मी मि. इलियट यांच्याजवळ विद्याभ्यास केला. लॉर्ड नॉर्थब्रुक यांना माझे गुरू नेमिले. माझ्या

कुटुंबातील माणसांपासून अलग ठेवण्याचा किंवा प्रजेबद्दलची माझी सहानुभूती नष्ट करण्याचा यत्न झाला नाही, हे सांगण्याला मला फार आनंद होत आहे. राज्यकारभाराचा अधिकार चालविण्याखेरीज महाराजांकडून होणारे सर्व सामाजिक व सार्वजनिक समारंभ माझ्याच हाताने करण्यात येत असतात. माझ्या शिक्षणाचे सिंहावलोकन करता मला असे दिसते की, त्या शिक्षणक्रमात कित्येक बाबतीत फेरफार करून शिक्षणकाळ वाढविता आला असता. उदाहरणार्थ लोकांशी व संस्थानिकांशी माझा सहवास अधिक प्रमाणाने व्हावयास पाहिजे होता व माझ्या संस्थानात व हिंदुस्थान देशात मला अधिक प्रवास करू द्यावयास पाहिजे होते.

माझ्या शिक्षकांनी व पालकांनी मला हिंदूच ठेवला ही फार विचाराची गोष्ट झाली, असे मला वाटते; परंतु या संक्रमण काळात माझ्या मुलांना वरिष्ठ प्रकारचे आधुनिक पाश्चिमात्य शिक्षण देणे मला अवश्य वाटत असल्यामुळे मी त्यांस इटन व बेलियल या ठिकाणी पाठविणार आहे.

जो धर्म माझ्या मुलांनी पाळणे अत्यंत आवश्यक आहे तो धर्म माझ्या मते स्वदेशप्रांती हाच होय व ही भावना त्यांच्या हृदयी कायम राहिल्यास ते खरे चांगले हिंदू राहतील. कर्मठ व आकुंचितपणाच्या काही जुन्या समजुती व चालीरीती कदाचित ते सोडून देतील; पण इंग्रजी पोशाख अंगात असतानाही त्याच्या अंतःकरणात स्वदेश व तेथील लोक यांच्याविषयीच्या कर्तव्याची जागृती राहण्यास हरकत पडणार नाही.

सामाजिकदृष्ट्या विलायतेतील माझ्या प्रवासाचे परिणाम अनुकूल झाले आहेत असे माझे मत आहे. प्रथम मी विलायतेत गेलो त्यावेळी न जाणो मला तेथे कायमचे अडकवून ठेवतील अशी माझ्या प्रजेस शंका व भीती वाटत होती; पण आता ती सर्व नाहीशी झाली आहे.

आपली मुले शिक्षणार्थ विलायतेस पाठवावी, अशी आता माझ्या लोकांना पुष्कळ इच्छा उत्पन्न होत आहे व ही मनःप्रवृत्ती अगदी सर्व दर्जाच्या माणसांत आढळून येते. पूर्वी जे नोकर लोक मोठ्या नाखुशीने माझ्याबरोबर विलायतेस आले त्यांनाच आता पाठीमागे राहणे आवडत नाही व महिना १ पौंड पगार असणाऱ्या नोकरांनीही आपल्या खर्चाने परदेशी जाण्याचे प्रयत्न केले आहेत. अगदीच गरीब खेरीजकरून शेतकरीसुद्धा आपली मुले विद्याभ्यासाकरिता विलायतेत पाठवीत आहेत. याप्रमाणे मुंबई व बडोदे या दोन शहरी जातीची बंधने शिथिल होत चालली आहेत व प्रायश्चित्तविधी व काळेपाणी ओलांडल्यामुळे द्यावा लागणारा दंड ही व्यवहारातून जात चालला आहे. खरोखर पाहता परदेशगमन हे शिक्षण आहे व प्राचीन हिंदू ग्रंथकारांच्या मताप्रमाणे ज्ञानार्जनाचे एक साधन होय, असे लोक मानू लागले आहेत.

युरोपियन लोकांशी होत असलेले सर्व प्रकारचे दळणवळण हिंदुस्थानच्या प्रगतीत फार महत्त्वाचे होय, अशी माझी समजूत आहे. असे दळणवळण बंद करणे म्हणजे या देशाच्या प्रगतीस अडथळा आणणे होय, असे माझे मत आहे. सध्याच्याकाळी चीन जे नुकसान सोशीत आहे, त्याप्रमाणे हिंदुस्थानचे प्राचीन काळी एकलकोंडेपणामुळे पुष्कळ नुकसान झाले होते !

जगाच्या प्रगतीचे व सुधारणेचे ज्ञान हिंदू लोकांना नव्हते व त्यामुळे स्वदेशातील संस्थांची युक्तायुक्तता ठरविण्यास त्यांस साधन नव्हते. अशा दळणवळणाची माझ्या मते इतकी महती आहे की, अंमलबजावणी होईल अशा रीतीने शिफारस करण्याचा मला अधिकार असता, तर

हिंदुस्थान सरकारने दरवर्षी ५०० विद्यार्थी जगातील निरनिराळ्या सुधारलेल्या देशांत कला, शास्त्रे, उद्योगधंदे व व्यापार शिकविण्याकरिता पाठवावे, अशी मी शिफारस केली असती.

सर्व जातींतील, वर्गांतील व धर्मपंथांतील लोकांची सारखी सुधारणा व्हावी म्हणून मी काही विद्यार्थी त्यांच्या बुद्धीची परीक्षा घेऊन व काही मुद्दाम नावे घालून निवडले असते.

विलायतेत अगर या देशी युरोपियन लोकांशी व आमच्यातील निरनिराळ्या जातींच्या लोकांशी माझ्यासारख्या संस्थानिकांचे एकत्र भोजनव्यवहार व्हावे, ही गोष्ट मला फार महत्त्वाची वाटते

दहा वर्षांपूर्वी मी सध्या वागतो तसा वागलो असतो, तर माझ्यावर खरमरीत टीका झाली असती. राज्यकर्त्या संस्थानिकालादेखील, स्थानिक पूर्वग्रहांना व समजुतींना दुखविल्यास अशी टीका सोसावी लागेल; परंतु ही टीका राज्यकर्त्यांच्या स्वभावावर, ज्याप्रमाणाने प्रजेला आपल्या धोरणाने वागण्याचे खरे कार्य त्याच्या हातून घडते व तसे पुढारीपण घेण्यास त्याला मोकळीक मिळते त्याप्रमाणावर पुष्कळच अवलंबून आहे.

हिंदुस्थानातील काही जातींप्रमाणे मराठे लोकांतील जातिदुराग्रह प्रबळ नाहीत, हे महशूरच आहे. महाराणा प्रतापसिंगजीने एका मृत युरोपियनाचे शव वाहून नेण्यास खांदा दिला या कृत्यास बडोद्यातील सर्व लोकांनी आपली स्पष्ट संमती दर्शविली.

मृताच्या जातीतील लोक अंत्यविधीच्या सिद्ध्यर्थ नच मिळाल्यास सर्व हिंदू लोक जो कोणी या प्रसंगी मदत करणार नाही त्यास दूषण देतील, असे मला वाटते. तथापि जातीतील लोकांनी आपापल्या जातीतील मृत माणसांचे प्रेत वाहून न्यावे, अशी चाल पडली आहे. साधारणपणे म्हणता आम्हा मराठे लोकांत जातीतीलच इसमापासून पाणी घेण्याचा निर्बंध आहे; परंतु सध्याचा नवीन विचाराप्रमाणे या बंधनाला शिथिलता येत आहे. माझ्या राजवाड्यातील पिण्याचे पाणी माझ्या जातीतील इसम भरतो व वाढतो.

बडोद्यातील माझ्या गैरहजेरीत मी विलायतेत असलो तर माझ्या हुकूमाकरिता महत्त्वाची प्रकरणे मजकडे पाठविण्यात येतात; पण यामुळे मी हिंदुस्थानात असताना लागेल त्यापेक्षा देहान्त प्रायश्चित्तासारख्या खटल्याचा निकाल होण्यास अधिक अवधी होत नाही. कारण तीन आठवडे लोटल्याशिवाय कोणत्याही प्रसंगी देहान्त शिक्षा अमलात आणता येत नाही.

माझ्या गैरहजेरीत राज्यव्यवस्था पाहण्यासाठी एक मंडळ बहुधा नेमण्यात येते. मी स्वतः होऊन पाहण्यासाठी ठेवलेल्या कामाशिवाय सर्व कामांचा निकाल ही सभा बहुधा करते.

कौन्सिलात सर्व खात्यांच्या मुख्यांचा समावेश होतो व दिवाणाकडे या सभेचे अध्यक्षत्व असते. ब्रिटिश रेसिडेन्टच्या सल्ल्याने ही व्यवस्था लावण्यात येते. कधी-कधी या कामदाराकडे काही अधिकार सोपवावे लागतात व माझ्या परोक्षतेमुळे काय काय परिणाम घडणार, हे या कामदाराच्या विशिष्ट स्वभावावर अवलंबून असते; परंतु सामान्य करून असे म्हणता येईल की, मी नसल्यामुळे असा परिणाम घडतो की, या कामदाराचा मध्यवर्तीपणा (ढवळाढवळ) वाढत्या प्रमाणावर जातो व त्याचा प्रभाव राज्यकारभारात भोगावा लागतो.

या बाह्य व मी बहुतेक असे म्हणेन की, अनावश्यक मध्यवर्तीमुळे माझ्या दूरस्थितीत हलक्या बाबींची संख्या वाढत जाते व त्यांना नसते महत्त्व देण्यात येऊन त्याचा बाऊ करण्यात येतो. त्यामुळे दुसऱ्या अडचणी उत्पन्न होतात व अनिश्चितपणा व एतद्देशीय राज्यकारभाराविषयी विश्वासाभाव वाढत जातात. संस्थानच्या व्यक्तिविषयकत्वास अत्यंत आवश्यक असा संस्थानिकाचा बोजा कमी होतो व त्यांना उत्तेजन न मिळाल्यामुळे आपल्या राज्यव्यवस्थेच्या कायमपणाबद्दलची त्याची कळकळ कमी होत जाते.

विपरीत, विसदृश व आश्चर्योत्पादक गोष्टींचे हिंदुस्थान आगर आहे असे म्हणतात. या म्हणण्यास काही अपवाद असतील. तथापि या म्हणण्याचा सत्यपणा, ब्रिटिश सरकारच्या नेटिव संस्थानिकाशी होण्याच्या वागणुकीत जसा सिद्ध होतो, तसा कोठे अधिक उघड रीतीने स्थापित होतो? अफगाणिस्थानच्या अमिराच्या काबूल येथील राजकीय वर्तनक्रमाची हकिकत आवडीने वाचणाऱ्या ब्रिटिश लोकांना मी परदेशी असताना माझ्याकडे कोणकोणती कामे निकालास येतात, त्याची कल्पना करून घेण्याची इच्छा असे. काही बाबी फार महत्त्वाच्या वाटणार नाहीत. उदाहरणार्थ, ऑर्डरबुकाकडे नजर टाकता मला खालील हुकूम पॅरिस येथे नमूद केलेले आढळले.

'हुकूम नं. ७ वा. - श्रीमंत सरकारची अशी इच्छा होत आहे की, खाली नावे दिलेल्या इसमांस पॅरिस येथील मजा पाहण्यास प्रत्येकी १० शिलिंग देण्यात यावे. ज्या कामाकरिता हे बक्षीस देण्यात येत आहे, त्याचकामी त्याचा व्यय झाला पाहिजे, हे त्यांनी लक्षात ठेवावे.'

'हुकूम नं. ९ वा. - पॅरिसच्या प्रदर्शनात करण्याची विक्री बडोदे येथील पदार्थ संग्रहालयाकरिता माझ्या तैनातीतील मंडळीने निरनिराळ्या जातींची मृण्मय भांडी खरेदी करावी. या वस्तू भारी किंमतीच्या नसाव्यात. अंगभूत किंमत किंवा गुण याबद्दल ही भांडी नामांकित नसली तरी त्यांच्यामुळे निरनिराळ्या मृण्मय भांड्यांच्या जाती दिसण्यात आल्या पाहिजे.'

प्रदर्शनाच्या मजेमुळे आमच्या नेहमीच्या सरकारी कामाच्या शिस्तीला अडथळा आला, हे खाली दाखल केलेल्या त्याच शहरातील हुकूमावरून दिसून येईल.

'हुकूम नं. १९ वा. - नेहमीचे ऑर्डरबुक आमच्याकडे आले नाही, याबद्दल मला फार वाईट वाटते. बऱ्याच अनुभवांवरून व ज्या लोकांशी कामे करण्याचा प्रसंग येतो, यांच्या स्वभाव वैचित्र्याकडे लक्ष पोहोचवून ही पुस्तके सुरू केली आहेत. प्रत्येक बाबीकडे लक्ष दिले असता महत्त्वाची कामेदेखील सहजगत्या पार पडण्याचा फारच संभव असतो. पद्धती व टापटीप ही मला फार आवडतात.'

लंडन शहरी असताना दत्तक मुलाने सुरू केलेली उधळपट्टी बंद होण्याचा हुकूम व्हावा म्हणून मजकडे बडोद्याहून एक अर्ज पाठविण्यात आला व त्या अर्जावर मी पुढील हुकूम सोडला.

'निव्वळ कायद्याच्या व तात्त्विकदृष्ट्या अंमलदाराचे अभिप्राय खरे आहेत. विशिष्ट परिस्थितीमुळे जी जुनीपुराणी इतिहासप्रसिद्ध घराणी आपले खरे हितानहित जाणण्यास असमर्थ असतात व ज्यांच्या अयोग्यतेचा व मूर्खपणाचा फायदा धंदेवाल्यांकडून व नोकरांकडून घेण्यात येतो त्यांच्या हिताकडे काही काळ बारकाईने नजर देणे, अशी तजवीज कायद्यास धरून नसली, तरी कधी-कधी करावी लागते, इतकेच नमूद करण्याची माझी इच्छा आहे.'

सौ. महाराणी साहेबांनी व मी दानधर्माच्या बऱ्याच इंग्रजी कार्यात आमची आवड दर्शविली आहे, हे पुढील हुकूम स्पष्ट दाखवतील.

'ज्या 'लिटल सिस्टर्स ऑफ असम्शन्' आजाऱ्यांची व गरिबांची फुकट शुश्रूषा करतात त्यांना मदत म्हणून १० पौंड धर्मादाय देण्यात यावे.'

कधी कधी क्षुल्लक बाबीबद्दल हुकूम सोडावे लागतात. उदाहरणार्थ :-

'सर एडवर्ड लॉसन यांची भेट महाराजांनी घेतली. या गोष्टीच्या स्मरणार्थ बिकन्सफिल्ड खेड्यातील विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्याकरिता पाच पौंड देण्यात यावेत.'

परंतु ही कामे अशी असतात की, त्यांना थोडा काळ व श्रमही पुरी होतात. माझे लक्ष नेहमी ज्या विषयाकडे लागले होते, असा दुष्काळाचा प्रश्न वारंवार माझ्या विचारापुढे येत असे. लंडन येथे असताना मी खालील हुकूम सोडला :-

'बैलांची खरेदी व रक्षण करण्यासाठी व दुसऱ्या काही शेतकीसंबंधीच्या सवलतींसाठी शेतकरी लोकांना आगाऊ पैसे देण्याची मंजुरी देण्यात येत आहे.'

'लंडन येथून तारेने कळवून मंजूर केलेले दोन लाख पन्नास हजार रुपये धरून दहा लाखांची (६६००० पौंड) मंजुरी दिली जात आहे.'

'ही रक्कम शेतकऱ्यांस थोड्या व्याजाने आगाऊ शेतकी कामासाठी देण्यात खर्च व्हावी. प्रत्येक माणसी आगाऊ देण्यात येणारी रक्कम ५०० रु. (३३ पौंड) पेक्षा अधिक असू नये. तसलमाती वसूल करण्याचा अधिकार सरकार आपणाकडे ठेवते.'

कधी-कधी एखादा क्षुल्लक प्रश्न माझ्यापुढे येतो. असला प्रश्न इंग्लंडमध्ये गैरवाजवी दिसेल.

'करनाळी येथील देवळातील पूजा कारणास्तव गिरधरलाल यांना देण्यात येणाऱ्या वर्षासनासाठी गिरधरलालबरोबर केशवलालचे नाव दाखल करण्यात यावे म्हणून सेटलमेंट कमिशनरनी दाखविलेल्या कारणामुळे त्यांनी केलेली शिफारस मंजूर करण्यात येत आहे.'

'हुकूम नं. ७२ - बडोदे शहरात अलीकडे सुरू असलेल्या प्रचाराप्रमाणे अमरेली येथे दसऱ्याच्या दिवशी रेड्याबद्दल बोकड बळी देण्यात यावा, अशी सरकारची मर्जी आहे.'

हवालाबाचू येथे दुष्काळप्रश्न अन्य रूपाने मजपुढे येतो -

'पाटाच्या पाण्याबद्दलच्या तयार करून ठेवलेल्या योजना प्रस्तुत दुष्काळासारख्या अडचणीच्या व धोक्याच्या प्रसंगी अगणित किमतीच्या होतील. स्वतःकडून व इतर खात्यांकडून या हुकुमाची अंमलबजावणी फारच दक्षतेने व मनःपूर्वक करण्यात येईल. अशी काळजी मुख्य इंजिनिअर बाळगील अशी मला आशा आहे.'

पुनः बजेट विचारासाठी पुढे ते व मी हुकूम देतो की :-

'संस्थानात दरवर्षी नवीन विहिरी वगैरे खोदण्यासाठी सुमारे दोन लाख रुपये (१३,००० पौंड) राखून ठेवण्याचा हुकूम झाल्याप्रमाणे या बजेटात तितक्या रकमेची सोय करण्यात आली पाहिजे होती.'

'या बाबींशी संबंध असणाऱ्या कामदारांकडून ही चूक का घडली, याबद्दल खुलासा व्हावा.'

'ही सोय करण्यासाठी रेल्वेबजेटपैकी एक लाख रुपये कमी करण्यात यावे. ती रक्कम नवीन विहिरी खोदण्याच्या कामी खर्चण्यात यावी.'

'पहिल्या वर्षी नवीन विहिरी पाडण्याची योजना अमरेळी प्रांतात सुरू व्हावी.'

भयंकर फौजदारी गुन्हे अर्थातच वारंवार मजकडे येत. याविषयी खालील उदाहरणे पुरी आहेत.

'हुकूम नं. १०७ - ता. १२ ऑक्टोबर, पॅरिस सन १८९९ - १९०० सालातील १४ नंबरच्या मुकदम्यातील आरोपी नाथा खोजा व शिवा मनोरी यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, असा मी हुकूम करतो.'

'हुकूम नं. ६२ - ता. ७ ऑगस्ट, बुशे डिस्ट्रिक्ट कोर्ट, हायकोर्ट व दिवाण यांचे एकमत मी पसंत करतो व सन १८९९-१९०० सालच्या तहकूब पडलेल्या नंबर ९ च्या खटल्यातील आरोपींपैकी पहिला आरोपी ललू यास झालेली फाशीची शिक्षा मी कायम करतो.'

प्रसंगविशेषी शिक्षणाचे विषय मजपुढे येतात. पॅरिस येथे मी पुढील हुकूम दिला :-

'होमर कवीच्या ऑडिसी नामक काव्याचे पोपकवीचे भाषांतर शिक्षणक्रमात नेमण्यास हरकत नाही. मी वाचलेल्या टेम्पल क्लासिक्स नावाच्या ग्रंथमालेतील आवृत्ती भाषांतरासाठी घ्यावी.'

युरोप खंडात प्रवास करीत असताना जे काम मी करतो त्याच्या स्वरूपाची थोडीशी अटकळ यावरून करता येईल; पण या कामाचा बोजा व त्रास किती पडतो, याची पूर्ण कल्पना त्याच्या निकालावरून करता येणार नाही. संस्थानात असताना माझ्या हातून जेवढे काम होते, त्यापेक्षा अधिक काम मी परदेशी असताना मजकडून होते. म्हणून खरोखर पाहता माझे परदेशातील गमन अर्थाअर्थी गैरसोयीचे होत नाही. टेलीग्राफ, पोस्ट व शीघ्रव्यवहाराची साधने यामुळे अंतराचा लोप झाला आहे.

विलायतेत राहिल्यामुळे श्री. सौ. महाराणीसाहेब यांच्या प्रकृतीस फारच फायदा झाला आहे. प्रकृतीच्या स्वास्थ्यार्थ त्यांच्यावर जो शस्त्रक्रियेचा प्रयोग करावा लागला, ती शस्त्रक्रिया हिंदुस्थानात सुखाने करता आली नसती. लोकहिताच्या कामास गुंतलेल्या अनेक आंग्लस्त्रियांशी इंग्लंडमध्ये असताना महाराणीसाहेबांचा सहवास घडला व या प्रकारच्या कामात पुष्कळ स्त्रियांना त्यांनी मदत केली आहे.

महाराणीसाहेबांनी पुष्कळ स्त्रियांचा पाहुणचार केला आहे. युरोपात असता अशा सर्व स्त्रियांशी त्यांचे मैत्रिणीचे नाते होते.

शस्त्रक्रिया होण्याच्या वेळेस हुशार स्त्रीवैद्य मिसेस शार्लिन यांनी अशी इच्छा दर्शविली की, महाराणीने दुसऱ्या खोलीत क्लोरोफार्म घ्यावा आणि तेथून त्यांना शस्त्रक्रियेच्या मेजावर नेण्यात यावे; पण महाराणीने हे नापसंत केले व धीराने पीडेच्या जागी त्या चालून जाऊन व हास्यमुख करून त्यांनी दुःखदायक शस्त्रक्रियेतील पूर्वभाग उरकून घेतला.

मिसेस शार्लीनबाईप्रमाणे उत्तम शस्त्रवैद्य अशा कीर्तीचा स्त्रीवैद्य हिंदुस्थानात एकही नाही. मरणाची पाळी आली तरी हरकत नाही; परंतु पुरुषांकडून शस्त्रक्रिया करून घेणार नाही, असे

महाराणी म्हणाल्या. या अपरिहार्य अडचणीमुळे विलायतेची सफर करणे भाग पडले आणि परिणामावरून पाहता झाले ते वास्तविकच झाले.

बडोद्यात जे स्वातंत्र्य राणीसाहेबांना भोगण्यास मिळत नाही, ते विलायतेत इच्छेप्रमाणे भोगण्यास मिळते. त्यांना नाटके पाहणे आवडते व पाहिलेल्या खेळांपैकी 'थ्री मेस्केटीयरस' (तीन बंदूकवाले) व 'प्राइस ऑफ पीस' (शांततेची किंमत) हे दोन खेळ त्यांना फारच आवडतात. इंग्लंडात राणीसाहेब एखाद्या श्रीमंत व थोर घराण्यातील स्त्रीप्रमाणे वागतात; परंतु बडोदे येथे पडदपोशीची मुसलमानांची मूळची चाल बहुतेक पूर्णपणे स्वीकारण्यात आली नाही. विलायतेत असताना त्या पहाटेस उठतात व एका मैत्रिणीसह न्याहारीची वेळ होईपर्यंत मुख्यत्वेकरून इंग्रजी वाचीत बसतात. इंग्रजी व नेटिव वर्तमानपत्रे त्या नेहमी वाचतात. दुपारचे त्यांचे जेवण एकटेच किंवा मुलांसहित होते. अतिपरिचयाच्या स्त्रिया हजर असल्यास त्या एकट्याच जेवतात. कारण या वेळेचे हे भोजन नेटिव पद्धतीचे असते. संध्याकाळी त्या तासभर किंवा अधिक काळ राजवाड्यामधील उद्यानात फिरावयास जातात. या बागेत पुरुषांना जाण्यास सक्त मनाई असते.

इंग्रजी व देशी धर्तीवर बनविलेल्या पदार्थांचे रात्रीचे मुलांचे जेवण असते. ते रात्री साडेसात वाजता होते. नंतर पत्ते किंवा दुसरा काही खेळ झाल्यावर अपरात्र न करता ती निजावयास जातात.

राणीसाहेबांचे मत असे आहे की, पडदपोशीची चाल फारच वाईट आहे; परंतु हिंदुस्थानात कोणालाही खुद्द त्यांचा पती मी, त्या मलादेखील ही मराठमोळ्याची चाल बंद करता येणार नाही. हे त्या जाणून आहेत. वस्तुतः राणीसाहेबांना वाटते. त्याप्रमाणे स्त्रियांना सामान्येकरून अधिक मोकळीक असावी हे खरे; परंतु बहुजनसमाज अशिक्षित असल्यामुळे पुरुषांना स्त्रीस्वातंत्र्य किंवा स्त्रीशिक्षण पसंत नाही.

तथापि शिक्षणाच्या उपयुक्ततेबद्दल आमची इतकी पक्की खातरी आहे की, आमच्या एकुलत्या एक मुलीस मुलांप्रमाणेच उत्तम शिक्षण देण्याचा आम्ही निश्चय ठरविला आहे. जर घरात सुशिक्षित स्त्री असेल तर ती ज्ञानाचा व गृहसौख्याचा उज्ज्वल प्रकाश घरात पाडण्यास समर्थ होईल. आपल्या आजूबाजूच्या लोकांच्या निर्दय व आपमतलबी कपटयुक्त्यात अशिक्षित स्त्री जशी फसते तशी ती फसणार नाही. आमच्या हिंदूंतील श्रीमंत कुटुंबांत हा शोचनीय प्रकार आढळून येतो. स्त्रीशिक्षणाबद्दल राणीसाहेबांना फारच आवड आहे व आपल्या कृतीने त्या आपली आवड दाखवितात. गेल्या दुष्काळात गरीब मुलांसाठी अनाथगृहे स्थापण्याच्या कामी त्यांनी मला फारच मदत केली. यावरून पाहताना माझ्या कन्येसही एकंदरीत उत्तम शिक्षण देण्याचा परिणाम घडेल, अशी खातरी आहे. हिंदुस्थानातील स्त्रियांना विलायतेतील स्त्रीस्वातंत्र्य पूर्णपणे मिळेल किंवा मिळणे युक्त आहे, असे राणीसाहेबांचे मत आहे असे नाही. स्त्रीविनयाची पौर्वात्य कल्पना इतकी उच्च आहे की, जेथे पडदपोशी बिलकूल नाही तेथेदेखील पर पुरुषांशी बोलणे चालणे झाल्याने मनाला दुःख होईल एवढा आडपडदा पाळण्यात येतो. हिंदुस्थानातील बहुतेक भागांतदेखील वरच्या प्रतीच्या स्त्रियांतच पडदापोशी आढळते; परंतु त्यांच्या या चालीचा परिणाम गरीब जातीतील स्त्रियांवर घडत नाही.

इस्पितळाच्या व्यवस्थेत अशी इस्पितळे माझ्या संस्थानात पुरेशी आहेत. कलाकौशल्य, उद्योगधंदे, पदार्थ तयार करण्याचे कारखाने व औद्योगिक शाळा याबद्दल इंग्लंडात असताना मी पुष्कळ कळकळ दाखविली आहे.

विलायतेत मी पुष्कळ गोष्टी पाहिल्या आहेत व वाजवी फेरफार करून बडोदे येथे त्या सुरू करण्यापासून फायदा होईल, असे माझे मत आहे. उदाहरणार्थ समाजातील प्रत्येक वर्गात पसरलेली आवश्यक फुकट शिक्षणपद्धती, मला पूर्णपणे अभिमत अशी स्थानिक स्वराज्यव्यवस्था. ग्रामसंस्थेच्या पायावर उभारलेली जुन्या स्वराज्यपद्धतीची व आधुनिक स्थानिक स्वराज्यपद्धतीची मूलतत्त्वे एकच आहेत.

ऑस्ट्रेलिया देशास स्वराज्यव्यवस्थेचा हक्क दिल्याबद्दल इंग्रजी राज्यनीतीची स्तुती करावी तितकी थोडीच आहे. या स्वराज्यव्यवस्थेच्या हक्काकडे हिंदुस्थानातील व ब्रिटिश राज्यातील सर्व देशांतील लोकांचे लक्ष लागून राहिले आहे.

इंग्लंडातील खानगी गृहस्थ या नात्याचा माझा आयुष्यक्रम हिंदुस्थानातील संस्थानिक या नात्याच्या माझ्या आयुष्यक्रमाशी तुलना करता येणार नाही; परंतु इंग्लंडमधील बुद्धीचा उच्चप्रभाव व निरनिराळ्या संस्कृत मनाच्या, उद्योगधंद्यांच्या व हितवैचित्र्याच्या मंडळीशी होणारा माझा समागम. यामुळे माझे आयुष्य, विशेषतः सणावाराचे दिवस आनंदात व शिक्षणात जातात.

तेथील हवामानही शारीरिक व मानसिक चपलता उत्पन्न करते, असेही मला आढळून आले.

युरोपातील खाजगी गृहस्थ, सार्वजनिक कामाबद्दल व गरिबांना मदत करण्यासाठी जो काळ व श्रम खर्च करतात, त्याबद्दल आश्चर्य वाटते; परंतु हिंदुस्थानात श्रीमंत, सुशिक्षित व फुरसद मिळणारा वर्ग फारसा नसल्यामुळे वरील तुलना करून हिंदुस्थानातील लोकांचे गौणत्व दाखविण्याचा माझा मानस नाही.

इंग्रजी लोकांच्या ठायी निःसंशय आढळून येणारे नैतिक उन्नतत्व व स्वभाव तीक्ष्णता ही उत्पन्न होण्यास त्यांची श्रेष्ठ शिक्षणपद्धती व राज्यव्यवस्था कारणीभूत होते. यामुळे त्यांच्या ठिकाणी स्वातंत्र्याचे तेज प्रकाशत असते. हिंदुस्थानात याचा मुळीच अभाव आहे, असे मी म्हणत नाही; परंतु सध्याच्या परिस्थितीमुळे त्याची पूर्ण वाढ होण्यास कठीण पडते, असे मात्र मला पक्के वाटते.

सामान्य जनसमूहावर डोके काढण्याचा प्रयत्न कोणी न केल्यास हिंदुस्थानात त्यास सुखाने राहता येते व वैभव वाढविता येते. बुद्धिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य ही लोकांना रुचत नाहीत व त्याकडे ते साशंक मुद्रेने पाहू लागतात. लोकसमूहास फार काळच्या पारतंत्र्यामुळे, अज्ञानामुळे व दारिद्र्यामुळे सारासार विचार करण्याची शक्ती राहिली नाही. या गुणाचा विकास व उपयोग होण्यास मार्ग नसेल, तर देशात मुत्सद्दी किंवा लढवय्ये शूर पुरुष उत्पन्न होणार नाहीत. समजदार, स्वतंत्र व कार्यसाधक टीकेचा अभाव असल्यामुळे देशीय वाढीच्या (प्रगतीच्या) उच्चतम कल्पना अशक्य होतात.

आधुनिक सरकारांनी ज्याची अनुकूल टीका प्रमाणभूत मानण्यात येते. परकी देशात उगम पावलेले नमुने आपल्या पुढे ठेवले आहेत. या सत्य गोष्टीमुळे विचारस्वातंत्र्य अधिकच कठीण व विरळ होत चालले आहे.

मी स्वतः राज्यकारभाराचा एक अवयव म्हणून ग्रामसंस्था कायम ठेवीन व परिहार्य आहे तेथपर्यंत राज्यकारभाराचे एकीकरण मुख्य ठिकाणी करणार नाही.

मी खेड्यापाड्यांत शाळा, आरोग्य, संरक्षक संस्था, सार्वजनिक कचेऱ्या, न्यायकचेऱ्या, मनुष्याकरिता व इतर प्राण्यांकरिता पिण्याचे पाणी इतक्या सोई करून अनेक व्यापारविषयक व औद्योगिक संस्था सुरू करीन व ज्या ठिकाणी देशातील तरुण लोकांना उच्चप्रतीचे शिक्षण देण्यात येईल, अशी शिक्षण प्रसाराची ठिकाणे स्थापन करीन.

प्रवास करीत असता माझ्या आयुष्यक्रमाचे व मतांचे वर्णन सविस्तरपणे देणे मला अगदीच अशक्य आहे; परंतु या मासिक पुस्तकाच्या संपादकास दिलेले वचन पुरे करण्याचा मी यत्न केला आहे.

सयाजीराव गायकवाड

२

श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे चरित्र

लेखक
श्रीयुत यशवंत रामकृष्ण दाते,
बी.ए.एलएल.बी.मुख्य संपादक,
महाराष्ट्र शब्दकोश, पुणे

प्रस्तावना

सयाजीराव महाराज (तिसरे) यांनी बडोदा संस्थानात अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यामुळे साहजिकच महाराज संपूर्ण हिंदुस्थानात नव्हे, तर जगात प्रसिद्धीस आले. फक्त मराठी आणि गुजराती लेखकांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेतला नाही तर इंग्रजी साहित्यकारांनी त्यांच्यावरती अनेक लेख आणि चरित्रे लिहिली. इ. स. १९३३ साली महाराजांच्या वयाला एकाहत्तर वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्ताने अनेक मान्यवरांच्या हातून 'श्रीसयाजीगौरवग्रंथ' लिहिला गेला. त्यामध्ये य. रा. दाते यांनी महाराजांचे चरित्र लिहिले.

दाते यांनी सयाजीराव महाराजांचे चरित्र लिहिण्यापूर्वी सयाजीराव महाराजांची एक मराठी आणि चार इंग्रजी चरित्रे लिहिली गेली होती. त्याकाळात इंग्रजी चरित्रे हिंदुस्थानातील सर्वसामान्य लोकांना दुर्बोध होती. आणि मराठी चरित्र इ. स. १९१० पर्यंतचे होते. त्यामुळे इ. स. १९१० नंतरच्या महाराजांच्या जीवनाची आणि कार्याची ओळख होणारे मराठी चरित्र नव्हते. गौरवग्रंथाच्या निमित्ताने या नवीन चरित्राची निर्मिती झाली. म्हणून या चरित्राला ऐतिहासिक महत्त्व आहे. हा ग्रंथ इ. स. १९३३ साली प्रकाशित झाला. महाराजांनी इ. स. १९३३ सालापर्यंत संस्थानात प्रजेला सुखी होण्यासाठी आवश्यक तो बदल केला होता. बडोदा संस्थानातील जनतेला या सुधारणांचा फायदा झाला होता. जनता या बदलाची, अनेक सुधारणांची फळे चाखत होती.

एकाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित झालेला 'श्रीसयाजीगौरवग्रंथ' महाराजांच्या संबंधीचा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्यामध्ये हिंदुस्थानातील समकालीन महत्त्वाच्या सर्व महनीय व्यक्तींनी आपले विचार, मांडले आहेत. फक्त विचारच नव्हे, तर त्यांच्या सुधारणा, विचार समाजासाठी कसे उपयुक्त आहेत हे लेखणीतून स्पष्ट केले आहे. यामध्ये सर्वकालीन श्रेष्ठ ठरलेल्या रवींद्रनाथ टागोर, न. चिं. केळकर, भ. ब. पालेकर, वि. रा. शिंदे, कृ. ग. लिमये, चिं. वि. जोशी, दा. ना. आपटे, र. श. पारखी, चिं. ग. कर्वे, वत्सला आंबेगावकर, गोविंद भाटे, वि. पां. दांडेकर, प्रो. ग. य. माणिकराव अशा अनेक मातब्बर लेखकांचा समावेश आहे. तसेच गुजराती आणि इंग्रजी मध्येही त्या - त्या भाषांतील जाणकार मंडळीनी सयाजीराव महाराजांच्या कार्याचे विश्लेषण केले, महत्त्व अधोरेखित केले. म्हणून हा ग्रंथ सयाजीराव महाराजांच्या अभ्यासकांना उपयोगी तर आहेच, त्याचबरोबर एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. गोत्री लिखित चरित्राप्रमाणे 'श्रीसयाजीगौरवग्रंथ'ही दुर्मिळ ग्रंथ आहे.

दाते हे चरित्र एकूण सतरा प्रकरणात पूर्ण करतात. महाराजांच्या पूर्वजांपासून सुरुवात करून 'उपसंहारा'ने चरित्राची समाप्ती करतात. चरित्राच्या दुसऱ्या प्रकरणात दाते चरित्रनिर्मिती मागची भूमिका मांडतात, ''लोकोत्तर, आदर्शवत व भरतभूला ललामभूत नृपती म्हणून त्यांच्या चरित्राचे प्रत्येकाने किती मनन करण्यासारखे आहे व मनोन्नती व समाजोन्नती करणाऱ्यास त्यांचे चरित्र कितपत मार्गदर्शक आहे, हे दाखवण्याचा प्रस्तुत चरित्रपर लेखाचा उद्देश आहे.'' (पृ. १८६). समाजाच्या उन्नतीसाठी झटणाऱ्यांना महाराजांचे जीवन आदर्श आहे. म्हणून चरित्राची निर्मिती केलेली दिसते. दाते यांनी चरित्र निर्मितीचा उद्देश प्रबोधन असा सांगितला असला तरी, चरित्रातून महाराजांनी निर्मिलेल्या अनेक कार्याची दखल घेतली आहे. चरित्राची मांडणी सतरा भागात असली तरी त्याचा क्रम महाराजांच्या जीवनक्रमाप्रमाणे सामान्य ते विशिष्ट असा आहे.

दाते चरित्राच्या प्रारंभीच राजसत्ता कशी समाजोपयोगी आहे याबद्दल मत प्रकट करतात. ''राजसत्ता चांगल्या व्यक्तीच्या हाती असेल आणि तिचा उपयोग जनकल्याणासाठी होतो. तर ती सत्ता फलद्रूप ठरते. दाते यांनी राजसत्तेचे मूल्यमापन सकारात्मकतेने केले आहे. या परिशिलनाच्या शेवटी ते सयाजीराव महाराजांना मानाचे स्थान देतात. हिंदुस्तानच्या इतिहासात गायकवाड घराण्याने अशा काही श्रेष्ठ व्यक्तीस जन्म राष्ट्रोन्नती व सामाजोन्नतीच्या कार्यास पुष्कळच हातभार लाविलेला आहे. त्या सर्व व्यक्तींमध्ये श्रीमंत सयाजीराव महाराज (तिसरे) हे अग्रगण्य होत.'' (पृ. १७७) राजसत्ताही समाजासाठी उपयोगी, लाभकारक ठरू शकते फक्त तिचा राज्यकर्ता हा सुसंस्कारी आणि प्रजादक्ष असावयास हवा. 'प्लेटोला अपेक्षीत असणारी आदर्श राज्यपद्धती महाराजांनी अंमलात आणली होती. तसेच अधिकारी निवडताना महाराज कौटिल्याच्या तत्त्वे विचारात घेत.' अशा शब्दांत दाते महाराजांच्या राज्यकारभाराचे कौतुक करतात.

सयाजीराव महाराज नेहमी कामात मग्न असत. सर्व आघाडीवर महाराजांची घोडदौड चालू होती. अनेक आघाडीवर यशस्वी ठरत होते. परंतु कौटुंबिक पातळीवर दुःखाला सामोरे जावे लागले. दाते यांनी महाराजांच्या जीवनाचा 'कौटुंबिक दुःख' हा पैलू अधिक स्पष्टपणे उलगडून दाखविला आहे. महाराजांची कौटुंबिक परिस्थिती कशी होती याची कल्पना दाते यांनी चौदाव्या भागापर्यंत दिली नाही. मात्र 'जगी सर्व सुखी कोण आहे?' या मथळ्याखाली महाराजांच्या जीवनातील खाजगी आणि कौटुंबिक बाबी अत्यंत मोजक्या शब्दांत देतात. जो प्रजेच्या कल्याणात मग्न असतो, त्या राजाला कौटुंबिक स्वास्थ अत्यंत कमी लाभते. यासाठी ते सयाजीराव महाराजांची तुलना प्रभू रामचंद्राशी करतात. जगात मान असणारा राजा मात्र राजपुत्रांच्या वर्तणुकीने त्यांना फार वाईट वाटे. राजपुत्रांनी ज्ञानी व्हावे, प्रजेची सेवा करावी, आपले संस्थान उच्च दर्जाला न्यावे असे कोणत्याही राजाला वाटणे स्वाभाविक आहे. मात्र त्या तुलनेत राजपुत्रांनी महाराजांची निराशा केली. त्यापैकी काहींनी तर आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडले. या वर्तुनुकीची सौम्य शब्दांत निवेदन असले तरी प्रत्येक राजपुत्राची वर्तणूक ही राजपुत्राला साजेशी नव्हती. स्वाभाविक महाराजांना याचे आंतरिक दुःख अधिक होते.

'वडिलांच्या डोळ्यासमोर मुलाच्या मृत्यू होणे' याच्याइतके दुःख नाही असे म्हणतात. महाराजांना फक्त राजपुत्राच्या वर्तुणूकीचे दुःख नव्हते तर ठराविक काळाच्या अंतराने महाराजांच्या तीन राजपुत्रांचा मृत्यू झाला. तसेच रक्ताच्या नातलगांचा एक - एक करून मृत्यू झाला. महाराजांच्या डोळयासमोर दहा नातलगांचा मृत्यू झाला. महाराज जरी भावनाविवश नसले तरी यामुळे महाराजांची वृत्ती अधिकच काळवंडली. राजकीय जीवनातही इंग्रज अधिकाऱ्यांची मुजोरी अधून - मधून चालूच होती. यामुळे मनस्ताप सहन करावा लागत होता. नातलगांच्या मृत्यूमुळे आणि राज्यकारभारातील संकटे यामुळे साहजिकच महाराजांचे कौटुंबिक जीवन सुखमय होवू शकले नाही. दाते यांनी महाराजांच्या या न दिसणाऱ्या दुःखाचा निर्देश केला आहे.

राजपुत्र जयसिंगरावांचा मृत्यू झाला त्या वेळी महाराजांना आणखी एका प्रसंगाला सामोरे जावे लागले. वर्तमानपत्रांनी जयसिंगराव गायकवाडांचा मृत्यू झाला असे न देता फक्त गायकवाडांचा मृत्यू झाला असे दिल्याने सर्वच प्रमुख वर्तमानपत्रांचा गोंधळ उडाला. सयाजीराव गायकवाडांचा मृत्यू झाला असा समज होवून बातमी दिली. त्यामुळे जगातील सर्वच प्रमुख वृत्तपत्रांनी त्यांचे मुत्यूलेख छापले. दाते म्हणतात, त्याप्रमाणे, 'आपुले मरण पाहिले म्या डोळा,' महाराजांना जिवंतपणीच आपण मेल्यानंतर आपल्याविषयी लोक काय म्हणतात ते वाचावे लागले. काहींनी महाराजांनी राज्यकारभारात कशा आधुनिक सुधारणा केल्या असे छापले; तर काहींनी महाराज इंग्रजांच्या विरोधात कसे होते याचा पाढा वाचला. महाराजांना समाजामध्ये मानसन्मान होता. त्यांची तुलना जगातील अनेक विद्वानांमध्ये होत होती. मात्र कौटुंबिक बाबीविषयी महाराज समाधानी नव्हते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाले तर `I have no domaestic life.' असे ते उद्गार काढतात.

दाते यांनी फक्त दुःखाच्या प्रसंगाची नोंद घेतली नाही तर महाराजांच्या जीवनातील आनंदी घटनांचेही निवेदन करतात. कौटुंबिक बाबतीत असमाधानी असले तरी त्यांच्या जीवनात सुख समाधानाचे क्षण नव्हते असे नाही. तर वेळोवेळी त्यांना समाधान देणारे ही प्रसंग घडले. दाते 'दोन महोत्सव' या शीर्षकाखाली महाराजांनी राज्यकारभार हातात घेतला याला इ. स. १९०७ साली पंचवीस वर्ष पूर्ण झाल्याचा 'रोप्य महोत्सव', आणि इ. स. १९२५ साली पन्नास वर्ष पूर्ण झाल्याचा 'सुवर्ण महोत्सव' मोठ्या थाटामाटात साजरे झाल्याचे वर्णन करतात. ''महाराजांनी इ. स. १९०७ सालापर्यंत महाराजांनी लोकोपयोगी अनेक कामे केली होती. लोकांनाही या सुधारणेचे महत्त्व पटले होते. या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ महाराजांनी पाच लक्ष रुपयाची साराबाकी मांडून वाळली, बडोदे येथे ज्युबलीबाग उघडून बडोदा शहरात मार्केटसाठी एक भव्य इमारत बक्षीस भेट दिली, अंत्यज विद्यार्थ्यासाठी पाटण, अमरेली प्रांतात दोन वसतिगृहे उघडली, राज्यात चार मोठे दवाखाने काढले, व खेडोपाडी विहिरी खणण्यासाठी पाच लक्षाची जादा रक्कम मंजूर केली.'' (पृ. २४१) सर्वच क्षेत्रात राज्याच्या प्रगतीसाठी महाराज सतत झटत होते. शहरातील लोकांपासून ते खेडेगावातील शेतकऱ्यांपर्यंत सर्वांचा विचार ते करत. रोप्य मोहोत्सव आहे म्हणून जवळच्या आणि लहान मोठ्या शहरातील लोकांचा विचार न करता राज्यातील

खेडेगावात राहणारा शेवटचा माणूसही राज्याचा घटक आहे याची जाणीव महाराजांना होती. त्या घटकाचा विचार करत होते.

महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्याला पन्नास वर्ष पूर्ण झाल्याने इ. स. १९२५ साली 'सुवर्णमहोत्सव' साजरा करण्यात आला होता. दाते म्हणतात, 'रोप्य महोत्सवापेक्षा सुवर्ण महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.' इ. स. १९२५ सालापर्यंत राज्यकारभार सलगपणे केल्यामुळे, संस्थानच्या राज्यकारभारात सकारात्मक धोरण ठेऊन बदल केल्यामुळे, महाराजांच्या विद्वतेमुळे, विद्वत्ताप्रचुर भाषणामुळे महाराजांची कीर्ती अखिल हिंदुस्थानात नव्हे तर जगात पसरली होती. विद्वान राजा अशी जगात ओळख झाली होती. सुवर्ण महोत्सवानिमित्त तीन दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सर्व कार्यक्रम अतिशय थाटामाटात साजरा झाले. पहिल्या दिवशी सुवर्ण महोत्सवाचा मुख्य समारोह परेड मैदानावर झाला. त्याचबरोबर त्याचदिवशी लक्ष्मीविलास राजवाड्यात दरबार भरला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरातील एकूण वातावरणाचे मनोहरी वर्णन करून ते प्रसंग आपल्या डोळ्यासमोर दाते उभा करतात. या समारोहाच्या वेळी दाते बडोद्यात होते. परेड मैदानावर झालेल्या कार्यक्रमाचे इतिवृत्त दाते देतात. कार्यक्रम नेत्रदीपक तर झाला त्याचबरोबर महाराजांना विविध संस्थातर्फे मानपत्रे अर्पण करण्यात आली. दाते यांनी दिलेली ही यादी पाहता महाराजांच्या बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते. समाजातील विविध स्तरातील संस्थांनी त्यांना मानपत्रे अर्पण केली. या प्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणतात, ''जुने ते सोने न मानता जुन्यातील चांगला अंश ग्रहण करून नवीन सुधारणा घडवून आणली पाहिजे. तरच हिंदवी संस्कृर्तीचे आपण रक्षण केल्यासारखे होईल.'' (पृ. २४२) महाराज विविध प्रसंगी संधी मिळताच सुधारणावादी विचार मांडतात. त्यापुढेही एकसंघ हिंदुस्थान होण्यासाठीचा विचार त्यांच्या डोक्यातून जात नाही. अनेक वेळा यासंबंधानाने आपले विचार मांडले आहेत. एका संस्थानचा राजा असताना आपले राज्य एकसंघ हिंदुस्थानात सामील करण्याची तयारी असणारा आगळावेगळा नृपती म्हणावा लागेल. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशीही असेच उत्तोमात्तम कार्यक्रम झाले. यातील तिसऱ्या दिवशी 'किर्तीमंदीर' बांधण्यासाठी शुभारंभ करण्यात आला. 'किर्तीमंदीर' ही महाराजांची अनोखी निर्मिती होती. यानिर्मितीच्या निमित्ताने महाराजांवर टीका झाली मात्र टीकेला उत्तर न देणे ही वृत्ती पुन्हा दिसून आली.

दाते यांनी महाराजांचे सुख आणि दुःख या परस्परविरोधी भावनांचे निवेदन केले. त्यामुळे चरित्र उंचीवर जाते. हे चरित्र संपूर्ण नसले तरी, त्यांच्या समकालीन साहित्यिकांनी हे चरित्र लिहिले. त्यामुळे या चरित्रात गौरवाचा अंश आहे. गौरवाचा अंश असला तरी चरित्र वास्तव आणि सत्यनिष्ठ आहे.

-डॉ. राजेंद्र स. मगर,
निमगाव (म.), जि. सोलापूर.

अनुक्रम

प्रस्तावना / १७१

१. पूर्ववृत्त / १७७

२. बालपण / १८६

३. विद्यार्थीदशा / १९०

४. गृहस्थाश्रमात प्रवेश / १९५

५. राज्यसूत्रे हाती आली / १९७

६. स्वभूमीचे संपूर्ण निरीक्षण / २००

७. राज्यव्यवस्थेतील मन्वंतर / २०२

८. महाराज आणि बादशाही सत्ता / २०६

९. महाराजांचे प्रवास / २१७

१०. शिक्षणविषयक प्रगति / २२२

११. शेतकी व औद्योगिक सुधारणा / २३०

१२. सामाजिक सुधारणा / २३३

१३. महाराजांची धार्मिक मते / २३६

१४. जगी सर्व सूखी असा कोण आहे? / २३८

१५. दोन महोत्सव / २४१
१६. युवराजांचा विवाह व नंतर / २४४
१७. उपसंहार / २४५
संदर्भ ग्रंथ / २५२

१.
पूर्ववृत्त

समाजसंस्थेच्या इतिहासाकडे नजर फेकल्यास असे दिसून येईल की, समाजाची अखंड प्रगति होत राहण्यासाठी समाजांतील व्यक्तिंनी आपल्यातील शक्तिचा एक एक बिंदू एकत्र करून जी एकमुखी व प्रातिनिधीक अशी सत्ता निर्माण केली तिचेच नांव राजसत्ता होय. सर्व जगांत इतर कोणत्याहि संस्थेपेक्षा राजसंस्थेचा समाजाची राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक उन्नति करण्याचे कामी फार मोठा उपयोग झालेला आहे. इंग्लंड, जपानसारख्या देशांनी राजसंस्था नाममात्र कां होईना राहू दिली यांतले इंगित हेच होय. राजसत्ता यदृच्छेने एकदा एकाकडे व दुसऱ्यांदा दुसऱ्याकडे अशी फिरती न ठेवता ती एकाच कुलाकडे ठेवल्यामुळे तिच्यांत परंपरेचा अभिमान उत्पन्न होऊन त्यांतून श्रेष्ठ श्रेष्ठतर अशा व्यक्ति-राजे निर्माण झाले. सारांश, कोणत्याही राष्ट्राचा किंवा त्यांतील विशिष्ट समाजाचा किंवा एखाद्या घराण्याचा इतिहास पाहिला तरी हीच गोष्ट सत्य असल्याचे आढळून येईल. हिंदुस्थानच्या इतिहासात गायकवाड घराण्याने अशा कांही श्रेष्ठ व्यक्तींस जन्म देऊन राष्ट्रोन्नति व समाजोन्नतीच्या कार्यास पुष्कळच हातभार लाविलेला आहे. त्या सर्व व्यक्तींमध्ये श्रीमंत सयाजीराव महाराज (तिसरे) हे अग्रगण्य होत. त्यांच्या घराण्याच्या पूर्ववृत्ताकडे थोडेसे लक्ष देऊ या.

पुणे जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत दावडी म्हणून एक गांव आहे, ते गायकवाडांचे मूळ गांव होय. या घराण्याचे नाव 'गायकवाड' पडण्याबद्दल अशी एक अख्यायिका प्रसिद्ध आहे की, नंदाजी नांवाचा एक इसम भोर संस्थानांत एका किल्ल्याचा अंमलदार होता. एके दिवशी एक मुसलमान खाटिक किल्ल्याजवळून कांही गाई घेऊन चालला असता नंदाजीस त्यांची दया येऊन त्याने किल्ल्याचे कवाड (दार) उघडून त्यांचा जीव वाचविला म्हणून त्याचे गायकवाड हे नांव पडले. हा नंदाजी म्हणजे गायकवाड घराण्याचा संस्थापक दमाजी याचा आजा होय.

दमाजी गायकवाड हा सेनापति खंडेराव दाभाड्याच्या सैन्यांतील एक सरदार होता. इ.स. १७२० साली बाळापूर मुक्कामी निजामाशी झालेल्या लढाईत दमाजीने विशेष पराक्रम केल्यामुळे

शाहूने खंडेरावाच्या शिफारसीवरून दमाजीस 'समशेर बहादर' हा किताब दिला. तो अजूनहि बडोद्याचे राजे आपल्या नावापुढे लावतात. दमाजी इ.स. १७२० च्या अखेरीस मरण पावला, त्यानंतर त्याचा पुतण्या (झिंगोजीचा पुत्र) पिलाजी याची सेनापतीच्या मुतालिकाच्या जागी नेमणूक झाली. पिलाजी प्रथम खानदेशांत वस्ती करून राहिला होता; परंतु पुढे गुजराथेत 'सोनगढ' येथे एक किल्ला बांधून ते त्याने आपले कायमचे वसतिस्थान बनविले. तेथे राहून आसपास स्वारी करून पिलाजीने बरीच लूट करून व मुलूख संपादन केला. तसेच इ.स. १७२४ मध्ये मोगल सुभेदार हमीदखान यास त्याच्या शत्रूविरूद्ध मदत करून महीनदीच्या पलीकडील भागावर चौथा बसविण्याचा हक्क मिळविला. हमीदच्या पक्षास कंठाजी कदम बांडे याचीही मदत असल्यामुळे गुजराथच्या चौथाईबद्दल बोडे व गायकवाड यांत तंटा माजला; परंतु अर्धा चौथ घेण्याच्या करारावर दोघांच्या सलोखा झाला. छत्रपति शाहूस यापैकी कोणाचेच करणे पसंत पडले नाही. याच सुमारास बाजीराव पेशवा यांच्यात वाकडे येऊन भिलापूरच्या लढाईत त्रिंबकराव दाभाडे मारला गेला व पिलाजी जखमी झाला. परंतु पुढे त्रिंबकरावाचा मुलगा यशवंतराव दाभाडे यास सेनापतीपदाची वस्त्रे शाहूकडून मिळाली व पिलाजी गायकवाडांस पूर्वीप्रमाणे त्याचा मुतालिक नेमण्याचे ठरले, आणि शिवाय त्यास 'सेनाखासखेल' हा नवीन किताबहि मिळाला.

मराठ्यांच्या प्रगतीस मोगल सुभेदार सरबुलंदखान याने कांहीच अडथळा केला नाही. सबब दिल्लीच्या बादशहाने त्यास परत बोलावून जोधपूरचा राजा अभयसिंग याची गुजराथच्या सुभ्यावर नेमणूक केली. अभयसिंगाने बडोदे शहर काबीज केले व तह करण्याचे आमिष दाखवून विश्वासघाताने पिलाजीचा खून केला. परंतु याचा तादृश फायदा त्यास बिलकूल झाला नाही. आसपासच्या भिल्ल व कोळी लोकांनी बंड केले ते मोडण्यांत अभयसिंगाचे शक्तिसर्वस्व खर्ची पडले. इकडे पिलाजीचा भाऊ महादजी याने बडोदे शहर काबीज केले (इ.स.१७३२) तेंव्हापासून बडोदे शहर गायकवाडांची राजधानी झाली.

पिलाजीचा वडील मुलगा दमाजी याने याच सुमारास सोनगढहून गुजराथेत हल्ले करून बराच मुलूख जिंकीला. इ.स. १७३७ साली त्याने गुजराथच्या नवीन सुभेदारास मदत करून अहमदाबाद शहराची अर्धी सत्ता व वसूलीचा हक्क संपादन केला. तसेच बाजीराव पेशवा उत्तरेकडे गेला आहे असे पाहून सबंध गुजराथचा अर्धा वसूल, विरमगांव जिल्ह्यांतील वसुलाचा कांही भाग मिळवून त्याने माळव्यांत प्रवेश केला. सन १७४८ मध्ये रघूजी भोसले व बाळाजी बाजीराव पेशवा यांच्यांत जी तडजोड झाली त्यांत दमाजीने माळव्यांतून जी खंडणी घेतली तिचा हिशेब त्याने पेशव्यास द्यावा असेहि शाहूने गायकवाड व पेशवे यामध्ये वितुष्ट येऊ नये म्हणून ठरविले.

दमाजीस गुजराथेत स्वैरसंचार करण्यास पुष्कळ वाव मिळाला व त्याने बादशहाची गुजराथेतील सत्ता जवळजवळ नामशेष केली, ही त्याची प्रशेसनीय कामगिरी होय. शाहूच्या मृत्यूनंतर दमाजी ताराबाईच्या पक्षास मिळाला. फौजेसह साताऱ्यास येत असता पेशव्याने त्याजवर हल्ला करून त्यास पकडून कैदेत ठेविले. परंतु दमाजीचा भाऊ केदारजी याने या आणिबाणीच्या वेळी गुजराथ प्रांत सांभाळला. सर्व व्यवस्था नीट राखून सुरत जिल्ह्याच्या वसुलाचा कांही भाग

मिळविला. दमाजीस कैदेत ठेवूनहि गुजराथपासून कांही लभ्यांश प्राप्त होईल असे चिन्ह पेशव्यास दिसेना. तेंव्हा दमाजीशी तह करणेच श्रेयस्कर वाटले. यावेळी १५ लक्ष रूपये देऊन दमाजीने मागील बाकी निकालात काढावी; गायकवाडांकडे जो मुलूख होता व ते पुढे जिंकतील त्याचा अर्धा वाटा पेशव्यास द्यावा. पेशव्यास सैन्याची मदत करावी आणि पेशव्यांनी अहमदाबाद शहर जिंकून गायकवाडांच्या हवाली करावे असे ठरले.

याप्रमाणे सन १७५५ साली राघोबादादा व दमाजी या दोघांचे लष्कर अहमदाबादेवर चालून जाऊन, तोफांच्या भडिमाराने त्यांनी ते शहर काबीज केले; आणि त्याचा अर्धा वसूल पेशवे व गायकवाड यांनी वाटून घ्यावा असे निश्चित करण्यात आले. सालअखेरीस खंबायतच्या नबाबाने अहमदाबाद जिंकून घेतले, पण लागलीच दमाजीने त्यास हूसकून लावले.

इ.स. १७६१ साली पानिपतचे घनघोर युद्ध झाले; त्यांतून जी मंडळी जीव वाचवून परत येऊ शकली त्यांत दमाजी हा होता. त्यानंतर दमाजीने काठेवाडातील बराच मुलूख हस्तगत केला. लाठी संस्थानच्या राजाच्या मुलीशी लग्न केल्यामुळे त्यास आसपासचा बराच मुलूख आंदण म्हणून मिळाला.

माधवराव पेशव्यांविरूद्ध दमाजीने आपला मुलगा गोविंदराव यास राघोबाच्या मदतीस पाठविले. परंतु घोडप येथे सर्वांचा पराभव झाल्यामुळे माधवरावाने दरसाल १५ लाख जादा खंडणी, २३ लाख रुपये दंड, पुण्यास नेहमी ३ हजार फौज व युद्धप्रसंगी जास्त ४ हजार सैन्य इतक्या गोष्टी गोविंदरावापासून कबूल करवून त्याची सुटका केली (१७६८). याच साली दमाजी मरण पावला.

पिलाजी व दमाजी या दोन पुरुषांनी गायकवाड घराणे उदयास आणिले, आणि गुजराथेत गायकवाडांची सत्ता अबाधित स्थापन केली. दमाजीने मोठ्या मुत्सद्दीपणाने वागून पेशव्यांस गुजराथ आपल्या हाताखाली घालण्यास संधी दिली नाही, व इतर भानगडींमुळे गुजराथकडे पेशव्यांस फारसे लक्ष पुरविता आले नाही हेहि खरे. त्यावेळी प्रत्येक माणूस आपल्यापुरते पाहात होता. अशा धामधुमीच्या काळांत वेळ पडेल तसे वागणे आणि वारा वाहील तशी पाठ फिरविणे हेच मुत्सद्दीपणाचे राजकारण असे. दमाजीने या संधीचा चांगल्या रीतीने उपयोग केला, व त्याच्या मृत्यूनंतर जो गृहकलह माजला तो उत्पन्न झाला नसता तर गायकवाडांची सत्ता गुजराथ, खानदेश, माळवा, काठेवाड, राजपुताना ह्या प्रदेशांत निष्कंटक पसरली असती.

दमाजी मरण पावला त्यावेळेस त्यास चार मुलगे होते. सर्वात वडील सयाजी हा दुसऱ्या बायकोचा, पहिल्या बायकोचा मुलगा गोविंदराव हा दुसरा मुलगा आणि तिसऱ्या बायकांचे मानाजी व फत्तेसिंग. दमाजीच्या मरणसमयी गोविंदराव हा पेशव्यांचे अटकेत होता, हे मागे सांगितलेच आहे. त्याने पेशव्याच्या सर्व अटी कबूल करून आपल्या बापाची जागा व सेनाखासखेल हे पद मिळकवले. परंतु फत्तेसिंग याने सयाजी हा वडील मुलगा असल्याने त्याचा हक्क रुजू व्हावा याविषयी खटपट चालविली. पेशवाईतील सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री यांनी दिलेल्या निकालावरून इ.स. १७७१ साली सयाजीस सेनाखासखेल ही पदवी मिळाली व फत्तेसिंग त्याचा मुतालिक बनला. यामुळे गोविंदराव व फत्तेसिंग यांत वैर संपले. इतक्यांत राघोबास पेशवाई पद प्राप्त झाल्यामुळे त्याने गोविंदरावास पुन्हा सेनाखासखेल हे पद दिले व गोविंदरावाने आपला अंमल

बसविण्यासाठी बडोद्यास वेढा घातला. याचवेळी पुण्यांत बारभाईचे कारस्थान होऊन राघोबा पदच्युत झाला. मदतीसाठी दादा गोविंदरावाकडे आले, परंतु त्यांच्या पाठोपाठ पेशव्यांची फौज घेऊन सेनापति हरिपंत फडके हेहि चाल करून आल्याकारणाने गोविंदरावास बडोद्याचा वेढा उठविणे भाग पडले. इकडे फत्तेसिंग व हरिपंत यांची सैन्ये एकत्र होऊन त्यांनी महीतीरी दादासाहेब व गोविंदराव यांचा पराजय केला. तेंव्हा गोविंदराव पालनपूराकडे पळून गेला व रासघोबादादा इंग्रजांचे आश्रयास गेला.

राघोबासह इंग्रजी फौज कर्नल कीटींगच्या हाताखाली गुजराथेत उतरली व गोविंदरावाच्या विनंतीवरून त्यांनी बडोदे घेण्याचे ठरविले. तेंव्हा कठिण प्रसंग जाणून फत्तेसिंगाने त्यांच्याशी समेट केला व राघोबास पैसा व लष्कर यांची मदत करण्याचे अभिवचन दिले. राघोबादादाने गोविंदरावास दक्षिणेत जहागिर द्यावी व इंग्रज सरकारास या तहनाम्याच्या जामिनकीबद्दल भडोच व इतर परगण्यांचा वसूल द्यावा या अटी ठरल्या. या तहाने इंग्रजांचा पुष्कळच फायदा झाला.

पुरंदरच्या तहाने इंग्रज मराठे यामधील युद्ध थांबले. त्या तहांत असे एक कलम होते की, फत्तेसिंगास पेशव्यांच्या हुकूमावाचून कांहीही देण्याघेण्याचा अधिकार नाही असे शाबीत झाल्यास फत्तेसिंगाने इंग्रजांस दिलेले मुलूख परत घ्यावे. फत्तेसिंगास पेशव्यांचे श्रेष्ठत्व अमान्य नव्हते, परंतु त्यांच्या संमतीवाचून कोणासही मुलूख तोडून देता येणार नाही ही गोष्ट यास कबूल नव्हती. इंग्रजांस भडोच वगैरे मुलूख मिळाला याबद्दल पुरंदरच्या तहाच्या आधारे फत्तेसिंगाने पुष्कळ तक्रार केली, परंतु त्याचा कांही उपयोग झाला नाही. इ.स. १७७८ मध्ये त्याने ५ लक्ष रुपये नजराणा पेशव्यास देऊन सेनाखासखेलची वस्त्रे मिळविली.

याच साली इंग्रज व मराठे यांच्यात पुनः युद्ध सुरू झाले. इंग्रज संनापति जनरल गॉडर्ड हा बहुतेक गुजराथ व्यापणार असे ओळखून फत्तेसिंगाने इंग्रजांशी दोस्तीचा तह केला. (२६ जानेवारी १७८०). या तहाने फत्तेसिंगाने तापिच्या दक्षिणेकडील मुलूख, भडोचचे उत्पन्न नर्मदाकाठांवरील सिनोर ही इंग्रजाचे हवाली करावीत आणि त्यांस ३,००० रुपयांची मदत करावी असे ठरले. इंग्रजांनी फत्तेसिंगास मही नदीच्या उत्तरेकडील प्रदेश देण्याची व त्याच्या राज्याचे संरक्षणाची हमी घेतली. अशा प्रकारे हा तह चढावाच्या व बचावाच्या स्वरूपाचा करण्यांत आला.

त्यावेळी फत्तेसिंग अत्यंत सावधपणाने व मोठ्या कौशल्याने राजकारणी डाव खेळत होता. इंग्रजांची फौज वरचढ आहे असे पाहून त्याने इंग्रजांशी दोस्ती केली. नाही तर इंग्रजांनी हा हा म्हणता बडोदे राज्यावर आक्रमण केले असते. पुढे सालबाईच्या तहांत फत्तेसिंगाजवळ असलेला सर्व मुलूख तसाच रहावा मात्र त्याने पेशव्यास नियमित खंडणी द्यावी असे ठरले. यानंतर मरेपर्यंत फत्तेसिंगाने राज्य सुरळीत चालविले.(१७८९).

फत्तेसिंगाच्या मृत्यूनंतर गोविंदरावाने आपणास बडोद्याचा कारभार मिळावा अशी पुणे दरबारास विनंति केली. परंतु ती विफल होऊन त्याचा भाऊ मानाजी यासच अधिकार मिळाला. पुढे महादजी शिंद्याने मध्यस्ती करून पेशव्यांकडून मानाजीची नेमणूक रद्द करविली. त्याने इंग्रजांकडे मदत मागितली. परंतु सालबाईच्या तहान्वये इंग्रजांनी या प्रकरणांत हात घालण्याचे

नाकारले व पेशव्यांनीही तसे करू नये म्हणून खलिता पाठविला. इ.स.१७९३ साली मानाजी वारल्यामुळे गोविंदराव एकटाच वारस होता तरी त्यास कांही करता आले नाही. नंतर गोविंदराव बडोद्यास गेला व थोडीशी चकमक होऊन सयाजीचा मुतालिक म्हणून सर्व राज्यकारभार त्याच्या हातात आला.

आबा शेलकर नावांचा इसम पेशव्यांतर्फे गुजराथेत सुभेदार होता. त्याने गायकवाडी मुलुखांत वसुलीसंबंधी तंटा आरंभिला, परंतु गोविंदरावाने कोणाच्याहि विरोधाला न जुमानता त्यास कैद केले. याच सुमारास पेशव्यांनी गुजराथच्या वसुलाचा भाग पांच वर्षांच्या कराराने गायकवाडास दिला. इ.स.१८०० मध्ये गोविंदराव मरण पावला.

भावाभावांच्या भांडणात तिऱ्हाईतांचे चांगलेच फावते ही गोष्ट सत्य आहे. इंग्रज व पेशवे यांनी गायकवाडांतील गृहकलहामुळे बराचसा मुलूख व खंडणी उकळली. भाऊभाऊ जर समजुतीने वागले असते तर गायकवाडांची सत्ता अबाधित टिकली असती.

गोविंदरावाच्या मृत्यूमुळे राज्यांत बरीच दुही माजली. गोविंदरावाचा मुलगा आनंदराव नाकर्ता असल्यामुळे अनौरस पुत्र कान्होजी याने गादी बळकावली. परंतु आनंदरावाचा दिवाण रावजी अप्पाजी याने इंग्रजांची मदत घेऊन कान्होजी व चुलता मल्हारराव यास हुसकून लाविले. इंग्रजांनी दोघासहि कैदेत ठेविले.

इ.स.१८०२ साली रावजी अप्पाजीशी इंग्रजांनी एक खासगी गुप्त करारनामा करून, त्याच्या वंशजांच्या रक्षणाची हमी घेतली व गायकवाडावर तैनाती फौज लादली. प्रजा या प्रकाराबद्दल रावजीस घरभेद्या, स्वमिद्रोही म्हणू लागली. परंतु इंग्रज म्हणतात की, त्याने राज्याच्या हिताचा मार्ग स्वीकारला. इंग्रजांनी अरब सैन्याचे वर्चस्व पगाराची बाकी मिटती करून नाहीसे केले.

याच सुमारास पेशव्यांनी ब्रिटीशांशी वसईचा तह करून त्यांत पेशवे व गायकवाड यांच्यातील तंटे ब्रिटीशांमार्फत तोडावे ही गोष्ट कबूल केली. वसईच्या तहाने तीन महत्वाच्या गोष्टींचा निकाल लागला. (१) गायकवाड हे बडोद्याचे राज्यकर्ते ठरले. (२) पेशव्यांची सत्ता चोहीकडून संपुष्टात आली. (३) हिंदुस्थानच्या राजकारणांत इंग्रजांचे पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले आणि ते 'म्हणतील ते धोरण व बांधतील ते तोरण' ही गोष्ट सर्वात सूर्यप्रकाशाइतकी उघड झाली. गायकवाडांच्या संरक्षणची हमी घेऊन त्यांनी मेजर वॉकर याची रेसिडेंट म्हणून बडोद्यास नेमणूक केली.

दिवाणपदाच्या बाबतीत रावजी नंतर त्याचा भाऊ बाबाजी व पुत्र सीताराम यांच्यात तंटा लागला. आनंदराव मतिमंद असल्याने रेसिडेंट वॉकर याने सर्वत्र आपली छाप बसविली. रेसिडेंटाचे सर्वांनी ऐकावे असे आनंदरावांनी हुकूम काढून जाहीर केले. आनंदरावास हाताशी धरून रेसिडेंटने काठेवाडांतील मांडलीक संस्थानिकांकडून द्यावयाच्या खंडणीची कायमची व्यवस्था लाविली. नवानगर, पोरबंदर, ओखामंडळ या भागात माजलेली बंडाळी मोडली व चोहीकडे शांतता व सुव्यवस्था अंमलात आणली. राज्याची व्यवस्था लागल्यामुळे इंग्रजांचे गायकवाडांकडे जे कर्ज होते ते बहुतेक फिटले होते, तरी पण इंग्रजांनी रेसिडेंट तसाच ठेवून दिला होता. वॉकरने गायकवाडांच्या खासगी गोष्टीतही ढवळाढवळ केली होती. गोविंदरावाचा दासीपुत्र मुकुंदराव व

औरसपुत्र मुरारराव यास नेमणुका ठरवून दिल्या. सीताराम याचा दिवाणगिरी मिळविण्याबाबतचा अर्ज नामंजूर करून बाबाजीस दिवाणगिरी देवविली. इ.स.१८११ मध्ये कोडीनार गायकवाडास मोबदल्यात मिळाले, परंतु ते फारसे महत्वाचे नाही.

सन १८१४ मध्ये काठेवाडची खंडणी व अहमदाबादच्या इजाऱ्याचा पट्टा जेंव्हा पुरा झाला तेंव्हा पेशव्याने नवा करार करून देण्याचे नाकारले इतकेच नव्हे तर गायकवाडांनी खंडणी देऊ नये असे काठेवाडातील संस्थानिकास अप्रत्यक्षपणे चिथविले. या गोष्टींचा निकाल करण्याकरता गायकवाडांनी आपला दिवाण गंगाधरशास्त्री यास पुण्यास पाठविले. त्याच्या संरक्षणाचा जिम्मा जरी इंग्रजांनी घेतला होता तरी त्याचा पंढरपूर येथे खून झाला. इंग्रजांनी या प्रकाराबद्दल पेशव्यास गायकवाडांवरील सर्व हक्क सोडण्यास भाग पाडिले. पुढे १८१८ त पेशव्यांचे राज्यच लयास गेल्यामुळे त्यांच्या सर्व देण्याघेण्यापासून गायकवाड मुक्त झाले.

गंगाधरशास्त्र्यांच्या खुनांत रावजीचा मुलगा सीताराम यांचे अंग असल्याचे उघडकीस आल्यावरून इंग्रजांनी त्यास कैद केले. इ.स.१८०६ मध्ये रीजंट म्हणून नेमलेला फत्तेसिंग आता स्वतंत्रपणे वागू लागला. इंग्रजांची सत्ता त्यास खपेना. त्यावेळचा रेसिडेंट कार्नाक याने आपल्या पसंतीचा दिवाण नेमण्याबद्दल आग्रह धरला व लागलीच ही गोष्ट स्वतः अंमलात आणली. ओखामंडळात याच वेळी बंड झाले. तेंव्हा अव्यवस्थेच्या सबबीवर इंग्रजांनी सर्व ओखामंडळ (द्वारकेशिवाय) खालसा केले व संस्थानिकांच्या खंडणीवसुलीचा अधिकारहि त्यांनी बजाविण्यास सुरूवात केली. पेशवाई अस्तंगत झाल्यावर फिरून गायकवाडांशी तह करून तैनाती फौजेच्या वाढीबद्दल बराच मुलूख इंग्रजांनी हस्तगत केला.

या सर्व प्रकारावरून बडोद्याच्या राजकारणी लोकांत इंग्रजांविषयीचा आदर नाहीसा झाला, याच सुमारास आनंदराव (१८१८) व फत्तेसिंग (१८१९) दोघेहि मरण पावले व सयाजीराव दुसरे गादीवर आले. फत्तेसिंगाची बायको राधाबाई व तख्ताबाई यांनी रीजंट होण्याचा प्रयत्न केला, परंतु सयाजीरावांनी स्वतःच रीजंटचे अधिकार घेण्याचे ठरविले. सयाजीराव हे अत्यंत हुषार व पाणीदार निघाले.

प्रजेला अत्यंत आवडते, अतिशय धूर्त, चाणाक्ष, दृढनिश्चयी, बाणेदार, उद्योगी, स्वतःचे अधिकार बजावण्याविषयी तत्पर, काटकसरी, न्यायी व नीतीमान अशा प्रकारचे थोरले सयाजीराव असून त्यांनी मोठ्या चातुर्याने व मोठ्या चिकाटीने आपले गेलेले हक्क ब्रिटीशांकडून पुनः मिळविले. आपले सैन्य इंग्रजांनी वापरल्याबद्दल कांही तरी रक्कम आपणास मिळावी अशी मागणी केली व संस्थानच्या अंतर्गत कारभारांत अतःपर ब्रिटीशांनी हात घालू नये असे मुंबईचे गव्हर्नर एलफिस्टन यास कळविले.

इ.स.१८९०-९१ साली सयाजीराव व एलफिस्टन यांची जी भेट झाली तीत (१) कर्ज फेड करणे, (२) इंग्रजांशी खुला व्यापार व व्यवहार ठेवणे, (३) परराष्ट्राशी इंग्रजांच्या संमतिशिवाय व्यवहार न करणे या तीन अटी एलफिस्टन साहेबांनी पुढे केल्या व या पाळल्यास आपण गायकवाडीतील अंतर्गत कारभारांत हात घालणार नाही असे सांगितले. सयाजीरावांनी सर्व कबूल केले. यावेळी दौलतीस जवळजवळ एक कोटींचे कर्ज होते. त्याबद्दल रेसिडेंट व सयाजीराव

यांमध्ये बराच वादविवाद झाला. अखेरीस अर्ध्या रकमेबद्दल इंग्रज जिम्मेदार राहिले व अर्धी रक्कम सयाजीरावांनी आपल्या खासगीतून द्यावी अगर सावकारांना राज्यांतील महाल लावून द्यावे असे इंग्रजांचे म्हणणे होते. सयाजीरावांनी शेवटपर्यंत लढा लढविला, परंतु त्याचा कांही उपयोग झाला नाही. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या खलित्यावरून एलफिस्टनने पुनरपि २० लाखांचे कर्ज गायकवाडांवर उकरून काढिले व इंग्रजांच्या सांगण्याप्रमाणे व्यवस्था अंमलात न आणल्यास सर्व राज्याचा वसूल करण्याचे काम आपणास करावे लागेल अशी निकड लाविली. सयाजीरावांचा कारभारी वेणीराम यांस इंग्रजांनी राज्यकारभारातून काढून टाकून विठ्ठल देवजीस दिवाण नेमिले; ही गोष्ट सयाजीरावास आवडली नाही. कर्जाबद्दल नऊ महाल पांच वर्षापुरते इंग्रजांनी आपल्या ताब्यांत घेऊन कर्ज काढले. तसेच तैनाती फौजेकरिता पुनः कांही महाल आपल्या अधिकारात घेतले.

याच सुमारास सर जॉन मालकम यांच्या जागी लॉर्ड क्लेअर हे मुंबईचे गव्हर्नर झाले. त्यांनी सयाजीरावांशी सलोख्याचे धोरण ठेवले. त्यावर सयाजीरावांनी आपल्या खासगीतून २५ लाखांची भरती करून दौलतीच्या कर्जदारांची फेड केली. त्यामुळे तारण घेतलेले देऊ परगणे क्लेअर यांनी सयाजीरावास परत दिले. तरी पण बडोद्याच्या अंतर्गत व्यवहारांत मधून मधून हात घालण्याचे धोरण इंग्रजांनी चालूच ठेविले होते. इ.स.१८४७ साली सयाजीराव मृत्यू पावले. त्यांनी सतीची चाल व गुलाम विकण्याची पद्धत बंद केली. एकंदरीत त्यांच्या कारकीर्दीत इंग्रजांनी निरनिराळ्या सबबीवर जप्त केलेला मुलूख त्यांच्या प्रयत्नाने व जबर चिकाटीने सोडविण्यांत आला व गायकवाडास आपला कारभार करण्याचे स्वातंत्र्य मिळाले.

सयाजीरावांच्या नंतर त्यांचे तिघे मुलगे गणपतराव (१८४७-१८५६), खंडेराव (१८५६-१८७०), व मल्हारराव (१८७०-७५) अनुक्रमे गादीवर बसले. त्यात खंडेरावाची कारकीर्द बरीच यशस्वी झाली. गणपतराव महाराजांच्या कारकीर्दीत सुप्रसिद्ध बी.बी.सी.आय् रेल्वे बांधली गेली. खंडेराव महाराज यांच्या कारकीर्दीत मर्दानी व मैदानी खेळास विशेष उत्तेजन मिळाले. यांनीच मकरपुरा राजवाडा बांधला; मौल्यवान हिरे, जडजवाहिर यांचा नमुनेदार संग्रह केला; चांदीच्या तोफा ओतल्या, त्याचप्रमाणे शिकारीसाठी एक राखीव जंगल ठेविले. सध्या साठमारीचे खेळ होतात तो अगडहि यांनीच बांधला. इ.स.१८५७ साली शिपायांच्या बंडांत महाराजांनी ब्रिटीशांशी राजनिष्ठ पाहून बहुमोल मदत केली व तिची परतफेड म्हणून त्यांना दत्तक घेण्याचा हक्क व थोरल्या सयाजीरावांचे कारकीर्दीत बसविलेली जादा ३ लाखांची खंडणी माफ करण्यांत आली. ता. २८ नोव्हेंबर १८७० साली खंडेराव महाराज मरण पावले व त्यांचे बंधु मल्हारराव हे गादीवर बसले.

खंडेरावांच्या पश्चात त्यांच्या पत्नी महाराणी जमनाबाईसाहेब या गरोदर होत्या. त्या प्रसूत होईपर्यंत मल्हारराव यांना रीजंट नेमण्यांत आले. खंडेराव महाराज व मल्हारराव यांची मने एकमेकांबद्दल शुद्ध नसल्यामुळे जमनाबाई साहेबांच्या जिवास अपाय होण्याचा संभव होता. मल्हाररावांनी तर त्यांच्यावर अनेक कुभांडे रचली. शेवटी राजवाड्यांत राहणे सुरक्षित नाही असे समजून इ.स.१८७१ च्या मार्च महिन्यांत त्या रेसिडेंट कर्नल बारसाहेब यांच्या आश्रयास

जाऊन राहिल्या. ता. ५ जुलै १८७१ रोजी त्या प्रसूत होऊन कन्यारत्न झाले. त्या प्रिन्सेस ताराराजे होत. पुत्र झाला असता तर खंडेराव महाराजांच्या मागून त्यांसच बडोद्याची गादी मिळाली असती; पण तशा प्रकारचा योगायोग नसल्याकारणाने मल्हाररावास आता राज्याचा पुरा अधिकार मिळाला. परंतु ते भोळे भाबडे व उतावळ्या स्वभावाचे असल्याकारणाने स्वार्थसाधू व खुशामती लोकांस ही अनायासे एक संधिच प्राप्त झाली. खंडेरावांच्या पक्षाच्या लांकांचा पुरा नायनाट करण्याचा त्यांनी जणू काय विडाच उचलला ! खंडेरावांचा दिवाण भाऊ शिंदे यांस ताबडतोब कारागृह दाखविण्यांत आले आणि तुरुंगातच त्यांचा अंत झाला. ज्यांनी मल्हाररावांचा हुकूम जुमानला नाही त्यांना भर चव्हाट्यावर फटक्यांच्या शिक्षा देण्यात आल्या. याबद्दल इंग्रजांकडे पुष्कळ बोभाटे गेले. खुशामती लोक दूर करून चांगला हुशार मनुष्य दिवाण नेमावा म्हणून सूचना झाल्या. इ.स.१८७३ च्या मार्च महिन्यांत कर्नल बारच्या जागी कर्नल रॉबर्ट फेअर हा रेसिडेंट म्हणून बडोद्यास आला. त्याने राज्यांतील व्यवस्थेबद्दल मल्हाररावांची सडकून कानउघाडणी केली व हिंदुस्थान सरकारासहि बडोद्याच्या राज्यकारभारांत हात घालावा अशी सूचना केली. तेंव्हा हिंदुस्थान सरकारने कर्नल रिचर्ड मीड (अध्यक्ष), मि. रेवेन्स्क्राफ्ट, नबाब फैजअलीखान व कर्नल एथरिज यांचे कमिशन नेमिले. कमिशनने बडोद्यांतील अंदाधुंदी, जुलुमजबरी व बेजबाबदारीचे रसभरित वर्णन करून वरिष्ठ सरकारकडे रिपोर्ट सादर केला. त्यावरून व्हाईसरॉय लॉर्ड नार्थब्रूक यांनी मल्हाररावास एक खरमरीत पत्र लिहून राज्याची सुधारणा करण्याविषयी फर्माविले व यांत कसूर झाल्यास ब्रिटीश सरकारास कारभारांत हात घालणे भाग पडेल अशी धमकी दिली; आणि ब्रिटीश सरकारच्या पसंतीचा दिवाण नेमण्यास सुचविले, व सुधारणा घडवून आणण्यासाठी १८ महिन्यांची मुदत दिली. आता बाजू अंगावर येते असं पाहून मल्हाररावांनी सुधारणा करण्याचा प्रयत्न चालविला. पूर्वीचे दिवाण नाना खानवेलकर यांना कमी केले व सुप्रसिद्ध दादाभाई नौरोजी या पारशी गृहस्थांना दिवाण नेमले (४ ऑगस्ट १८७४). परंतु आंपल्या सल्ल्याने त्यांना नेमण्यांत आले नाही याचा रेसिडेंटास राग आला.

नवीन दिवाणांना बडोदे संस्थानची सुधारणा करता येणे अशक्य आहे असे आपले मत रेसिडेंटाने वरिष्ठ सरकारास कळविले. याच सुमारास मूल नाही या सबबीवर मल्हाररावांनी लक्ष्मीबाई नावांच्या अकुलीन स्त्रीशी दुसरे लग्न केले. परंतु रेसिडेंटाने लग्नास येण्याचे नाकारले म्हणून ता. २ नोव्हेंबर १८७४ रोजी मल्हाररावांनी हिंदुस्थान सरकारकडे रेसिडेंटास परत बोलाविण्याबद्दल लिहिले. फेअर यास बदलून त्याचे जागी सर ल्युइ पेली के.सी.एस.आय. याची स्पेशल कमिशनर व हिंदुस्थानसरकारचे एजंट म्हणून नेमणूक करण्याचे आधीच ठरले होते व त्याप्रमाणे ते बडोद्यास येऊन दाखलहि झाले होते. ता. ९ रोजी फेअरसाहेब यांनी प्यालेल्या सरबतांत अर्सेनिक व हिरकणी यांचा थर पेलाच्या तळाशी बसलेला रेसिडेन्सी डॉक्टरचे नजरेस आला. परंतु रेसिडेंटास अपाय मात्र झाला नाही. आजारांतून बरा झाल्यावर कर्नल फेअर आपल्या कामाचा चार्ज सर ल्युइ पेली यास देऊन निघून गेला. यानंतर ब्रिटीशांच्या गुप्त पोलीसांनी रेसिडेन्सीतल्या दोघा नोकरांकडून रेसिडेंटास विष घालण्याबद्दल मल्हारावांकडून मोठी लाच घेतल्याचा कबुलीजबाब लिहून घेतला व सर्व प्रकरण हिंदुस्थानसरकारकडे पाठविले.

ता. १४ जानेवारी १८७५ रोजी हिंदुस्थानसरकारने मल्हारावांस कैद केल्याचे जाहीर केले व त्यांना ब्रिटीश सैन्याच्या पहाऱ्यांत ठेवण्यांत आले. संस्थानी सैन्याच्या बेशिस्त वर्तनाबद्दल सैन्याधिकारी जनरल डेवीन यास जबाबदार धरण्यांत येईल अशी त्यास सक्त ताकीद देण्यांत आली. सैन्याची मागील सर्व बाकी मात्र चुकती करण्यांत आली. नाना खानवेलकर व दामोदरपंत यांनाहि अटक करण्यांत आली.

रेसिडेंटास विषप्रयोग केल्याच्या आरोपाची चौकशी करण्यासाठी ब्रिटीश सरकारने सर रिचर्ड कूच (चीफ जस्टिस बंगाल) यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी कमिशन नेमिले. त्यांत सर रिचर्ड मीड, मि. पी.एस.मेलविल, ग्वाल्हेरचे महाराज जयाजीराव शिंदे, जयपूरचे महाराज व राजा सर दिनकरराव राजवाडे वगैरे होते. मल्हारारावांच्यातर्फे सार्जंट बॅलेंटाइन, सॉलिसिटर यांना वकीलपत्र घेण्यास ब्रिटीश सरकारने परवानगी दिली व त्याकरता ७,५०० पौंड खर्चहि मंजूर केला. कमिशनपुढे जो पुरावा आला तो अत्यंत असमाधानकारक व परस्परविरोधी होता. साक्षीदारांच्या जबानीत धरसोड व ताळमेळ नाही असे दिसून आले. ब्रिटीश कमिशनर्सनी मल्हाररावाचा रेसिडेंटास विषप्रयोग करण्याचा हेतू होता असे मत दिले, तर हिंदी कमिशनर्सनी तसा आरोप शाबीत धरता येत नाही असे जाहीर केले. याचवेळी महाराणी जमनाबाईसाहेब यांनी हिंदुस्थान सरकारास अर्जाद्वारे विनंती केली की, महाराणी व्हिक्टोरिया यांच्या जाहीरनाम्यान्वये खंडेराव महाराजांस (आपल्या पतीस) दत्तक घेण्याचा अधिकार मिळाला होता. परंतु त्याचा उपयोग त्यांना करून घेता आला नाही; तरी या बाबतीत दत्तक घेण्याचा अधिकार स्वतःला (म्हणजे जमनाबाईसाहेब यांना) मिळावा. हिंदुस्थान सरकारने यावर स्टेट सेक्रेटरी लॉर्ड साल्सबरी यास बडोदे राज्यांत गोंधळ व बखेडा माजविल्याबद्दल मल्हाररावांना गादीवरून काढून खंडेराव महाराजांच्या पत्नी महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या मांडीवर कोणी तरी दत्तक देण्यांत यावा अशी शिफारस केली. स्टेट सेक्रेटरीकडून तशा प्रकारची मंजुरी मिळाल्यावरून ता. १९ एप्रिल १८७५ रोजी सरकारने जाहिरनामा काढून मल्हाररावास राज्यावरून दूर केल्याचे व त्यांच्या वंशाचा हक्क नष्ट केल्याचे सर्व लोकांस कळविले आणि लागलीच तीन दिवसांनी त्यांना मद्रासकडे नेण्यांत आले. रेसिडेंट सर ल्युइ पेली याने बडोद्यांतील प्रमुख सरदार, मानकरी, मुत्सद्दी, व्यापारी यांस एकत्र जमवून इंग्लिश सरकारचा हुकूम व जाहीरनामा वाचून दाखविला आणि संस्थान खालसा करण्याबद्दलच्या सर्व अफवा निराधार असल्याचे सर्वत्रांस कळविले. तरी पण ता. २८ एप्रिल रोजी बडोद्यांत दंगेधोपे झालेच. असिस्टंट रेसिडेंट कॅप्टन जॅकसन व सेनापति जनरल डेवीन याजवर हल्ले झाले. ब्रिटीश शिपाई आणून सर रीचर्ड मीलने सर्व स्थिरस्थावर केले व मल्हाररावाच्या दोन्ही राण्यांस मुंबईस पाठविले. ता. २ मे १८७५ रोजी महाराणी जमनाबाईसाहेब यांना बडोद्यास आणण्यांत आले आणि सर. टी. माधवराव यांस दिवाण नेमून राज्याची कुलमुखत्यारी दिली. त्यानंतर महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या मांडीवर एखादा मुलगा दत्तक घेण्याचे काम ब्रिटीशसरकारकडून सर. टी. माधवराव व खुद्द महाराणीसाहेब यांच्या पसंतीवरच सोपविण्यांत आले व नवीन राजवट सुरू झाली.

●●●

२.

बालपण

मल्हारराव महाराजांच्या कारकीर्दीत बराच गोंधळ माजला होता. परंतु 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे' अशी ग्वाही देणारा भगवान जणू द्रवला आणि त्याने वटोदरस्थ समाजाची विस्कळीत झालेली घडी पुनरपि नीट बसविण्यासाठी एका तेजस्वी,दैदिप्यमान व पराक्रमी बालकांची या कामी योजना केली. हे बालक दुसरे तिसरे कोणी नसून हल्लीचे बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव हे होत. आजमितीस त्यांचे नांव उत्तम राज्यकर्ते, सुधारणांचे निस्सिम भोक्ते, शिक्षणाचे अध्वर्यु स्वातंत्र्यदेवतेचे उपासक म्हणून आसेतुहिमाचल दुमदुमत आहे. त्यांच्या आयुष्यांत रोमांचकारक प्रसंग आहेत, सुवर्ण महोत्सवा (Jubilee) सारखे आनंदातिशयाचे प्रसंग आहेत, मनोधैर्य कसोटीस लावणारे प्रसंग आहेत, राजकारणांत उद्भवणाऱ्या अडचणीचे प्रसंग आहेत. कौटुंबिक आपत्ति व मानसिक व्यग्रतेचे प्रसंग आहेत, सर्व कांही आहे. परंतु लोकोत्तर, आदर्शवत व भरतभूला नृपति म्हणून त्यांच्या चरित्राचे प्रत्येकाने किती मनन करण्यासाराखे आहे व मनोन्नति व समाजोन्नति करणारांस त्यांचे चरित्र कितपत मार्गदर्शक आहे, हे दाखविण्याचा प्रस्तुत चरित्रपर लेखाचा उद्देश आहे.

श्रीमंत सयाजीराव महाराजांचा जन्म १७ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यांत मनमाडपासून सुमारे १८ मैलांवर असलेल्या कवळाणे नावांच्या गावी झाला. बहुधा महापुरुषांचा जन्म असाच खेडेगांवातील झोपडीत अगर रानावनांत झालेला असतो. सयाजीराव हे गायकवाड घराण्यातील सुप्रसिद्ध दमाजी गायकवाड यांच्या प्रतापराव नावांच्या भावापासून पांचव्या पिढीतील काशीराव गायकवाड यांचे द्वितीय चिरंजीव होत. दमाजीने आपला भाऊ प्रतापराव यास खानदेशांतील एका स्वारीत मिळविलेली ४७ गांवे देऊन त्यांची व्यवस्था करण्यासाठी ठेविले होते. परंतु ही गांवे पेशव्यांनी आपल्या ताब्यांत घेऊन त्याऐवजी नवसारी प्रांताचा कांही भाग गायकवाडास दिला. या कारणाने प्रतापरावाचे वंशजास यापुढे निव्वळ शेतीवर उपजीवीका करून रहावे लागले व बडोद्याच्या गायकवाडांस त्यांची आठवणहि राहिली नाही. सयाजीराव महाराज यांचे वडील

काशीराव यांची स्थिती श्रीमंतीची नव्हती; परंतु ते कुटुंब कवळाणे गावी कुलीन, अब्रुदार, खाऊनपिऊन सुखी म्हणून मानले जात असे. काशीराव यांचा स्वभाव अतिशय मायाळू व दिलदार; 'अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ'; आणि बोली गोड व वागणूक सौजन्याची. उत्तम व नामांकित पेहेलवान म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती पसरलेली होती, परंतु खेडेगांवातील परिस्थितीमुळे त्यांस शिक्षण मिळालेले नव्हते.

काशीरावांचे बंधु उखाजी व सखारामराव यांनी गरिबीस कंटाळून व बडोद्याच्या गायकवाडांशी असलेले आपले नाते लक्षांत घेऊन, बडोद्यांस जाऊन महाराजांची भेट घेण्याचा निश्चय केला. त्यावेळी खंडेराव महाराज गादीवर होते. उखाजीने त्यांची भेट घेतली व महाराजांनीही त्यांचा चांगल्या तऱ्हेने मानमरातब ठेविला. परंतु दुर्दैवाने उखाजीस प्रत्यक्ष कांही मदत मिळण्यापूर्वीच खंडेराव महाराज निवर्तले. मल्हारराव गादीवर आल्यावर पुनरपि उखाजीने त्यांची भेट घेतली व त्यांनीही त्यास पोशाख देऊन भरदरबारांत उखाजीचा बहुमान करण्याचा विचार ठरविला; परंतु उखाजीने हा मान आपला वडीलभाऊ काशीराव यास मिळावा अशी इच्छा दर्शविल्यावरून मल्हारराव यांनी काशीराव यास आणवून पोषाख व थोडे पेन्शन देऊन त्याची बोळवण केली.

काशीरावास आनंदराव, गोपाळराव व संपतराव असे तीन पुत्र होते. त्यापैकी आनंदराव हे गोपाळरावाहून पांच वर्षांनी वडील व संपतराव हे २ वर्षांनी लहान. गोपाळराव म्हणजे प्रस्तुत लेखाचे चरित्र नायक श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड, बडोद्याचे महाराज होत. त्यांच्या लहानपणाची हकिकत आजमितीस फारशी उपलब्ध नाही. इ.स.१९२६ साली जेंव्हा महाराज बडोद्याहून प्रथम आपल्या मूळगांवी आले, त्यावेळी त्यांस पूर्वी बालपणांत ज्या गोष्टी फार मोठ्या व भव्य होत्या असे वाटत होते त्या अगदी लहान दिसू लागल्या. जेथे पूर्वी मोकळे मैदान होते तेथे गायकवाड घराण्यांतील निरनिराळ्या लोकांनी बांधलेली घरे दिसून आली. लहानपणापासून सयाजीराव महाराज अत्यंत चलाख, पाणीदार, तेजस्वी असल्यामुळे हे पुढे मोठे भाग्यशाली निपजतील असे सर्वत्रांस वाटत असे. भाग्यवान पुरुषाचे गुण त्याच्या बाल्यावस्थेतच दृग्गोचर होतात. तीच गोष्ट सयाजीरावांची. अर्थात त्यांच्या बालपणाचे मातापितरांस विशेष कौतुक वाटत असल्यास नवल ते काय ?

इ.स.१८७५साली महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या मांडीवर दत्तक देऊन त्या मुलास राज्याधिकार देण्याचे इंग्रजसरकारने विलायत सरकारच्या सल्याबरहुकूम ठरविले आणि दत्तकाची निवड करण्याचे नाजूक व महत्वाचे काम महाराणीसाहेबावर सोपविण्यांत आले हे मागे सांगितलेच आहे. खुद्द बडोद्यास गायकवाड घराण्यापैकी सदाशिवराव, मुरारराव, गणपतराव, खंडेराव असे चौघेजण परंतु सुमारे २३-२४ वयाचे कुमार होते. इंग्रज सरकारची अशी इच्छा* होती की, फार मोठा मुलगा राज्यावर न बसवता एखादा लहानसा मुलगा निवडल्यास कांही वर्षे त्याच्या अज्ञानपणांत मुखत्यारिकी जाऊन राज्यांत सुव्यवस्था स्थापन करण्यास ठीक पडेल व त्या मुलासहि चांगले शिक्षण देऊन राज्यकारभारास योग्य करता येईल. त्यामुळे हे कुमार नापसंत

---

* राईस, प्रथम खंड पृष्ठ ३१

करण्यांत आले. याशिवाय कांही कुमार नाशिक व खानदेश जिल्ह्यातहि होते. अर्थात दूरवर दृष्टी पोचवून मुलाची निवड करण्याचे काम किती अवघड होते हे यावरून दिसून येईल.

'न रत्नं हि अन्विष्यति भृग्यते हि तत्'असे एका विख्यात कविचे अर्थपूर्ण वचन आहे. त्यास अनुलक्षुनच की काय गायकवाड घराण्यांतील कुमाररत्नांची चौकशी करण्यासाठी याच वेळी एक पोलीस पार्टी अकस्मात कवळाणे गांवी आली व त्यांनी गायकवाड आडनांवाच्या सर्व पुरुषमंडळींची चौकशी करून काशीराव व त्याची तीन मुले यांस नाशिक येथे आपल्याबरोबर नेले. तेथे कर्नल एथरिज याने त्यास बडोद्याचे मल्हारराव महाराज यास पदच्युत केले असून गायकवाड घराण्यांतील एखादा योग्य मुलगा दत्तक घ्यावयाचा आहे व त्याकरिता ही चौकशी चालू असल्याचे कळविले.

कवळाणे येथील गायकवाडांचा बडोद्याच्या गायकवाडांशी कांही संबंध आहे किंवा काय या संबंधी बरीच चौकशी करण्यांत आली. नाशिक येथे 'प्रेसकॉट' नांवाच्या अंमलदाराने तेथील उपाध्यायांच्या चोपड्यांतून यासंबंधाने कांही माहीती मिळविली व काशीराव आणि त्याचे तीन मुलगे, यांचा तसा निकट व जवळचा संबंध असल्याचे निदर्शनास आल्यावरून त्या सर्वास बडोद्यास नेण्यात आले. याच वेळी उखाजी व त्याचा मुलगा दादासाहेब हे बडोद्यांतच होते. यावेळी काशीरावाचे तीन मुलगे व उखाजीचा मुलगा अशा चार मुलांतून निवड व्हावयाची होती. बडोद्यास आलेले इतर बायकवाड घराण्यांतील कुमार नापसंत करण्यांत आले. अखेरीस काशीरावांच्या तीन मुलांपैकी मधले गोपाळराव यांस ता. २७ मे १८७५ रोजी पसंत करून 'सयाजीराव' या नांवाने दत्तक घेण्याचे ठरले. यावेळी गोपाळरावांचे वय १३ वर्षांचे होते.

यासंबंधाने अशी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे की, महाराणी जमनाबाईसाहेब यांनी काशीरावांच्या तिघा मुलास 'तुम्हास येथे कां आणण्यात आले हे ठाऊक आहे काय ?' असा प्रश्न विचारला असता सर्वात वडील आनंदराव यांनी काहीच उत्तर दिले नाही; कनिष्ठ संपतराव यांनी मला माहीत नाही असे सांगितले, परंतु गोपाळराव यांनी चटकन 'मी राजा होण्यासाठी आलो' असे चुणचुणीत उत्तर दिले. दुसरी एक गोष्ट अशी सांगतात की, तिन्ही मुलांना खिरीच्या वाट्या देण्यांत आल्या. त्यावेळी गोपाळरावांनी नेमकी सुवर्णाची वाटीच आपल्या वाट्यास घेतली. भोजनाचे वेळी महाराणी जमनाबाईसाहेब ज्या पद्धतीने जेवतात, त्याकडे लक्ष ठेऊन गोपाळरावांनीहि तीच रीत उचलली. या सर्व गोष्टींवरून ही राजचिन्हे आहेत असे महाराणीसाहेबांनी जाणून गोपाळरावांना दत्तक घेण्याचे निश्चित केले असे म्हणतात.

मल्हारराव महाराजांस धरून नेल्यानंतर ता. २ मे १८७५ रोजी महाराणी जमनाबाईसाहेब यांनी मोतीबाग राजवाड्यांत प्रवेश केला. यावेळी ब्रिटीश सरकारने बडोदे संस्थानचा राज्यकारभार सुरळीतपणे हाकण्यासाठी अत्यंत लायक व कर्तबगार दिवाणाची योजना केली होती. हे दिवाण दुसरे तिसरे कोणी नसून प्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी सर टी. माधवराव हे होत. अव्वल ब्रिटीश अमदानीत सर सालारजंग, राजासर दिनकरराव राजवाडे, सर अंगबहादूर व सर टी. माधवराव हे त्यावेळी साडेतीन शहाणे म्हणून गाजत होते.

सर टी. माधवराव यांचा जन्म इ.स.१८२८ साली मद्रास इलाख्यांत तंजावर येथे झाला. मद्रास येथील कॉलेजांत त्यांचे शिक्षण होऊन ते कांही दिवस युनिव्हर्सिटीत प्रोफेसर होते. नंतर त्यांची त्रावणकोर संस्थानचे दिवाण म्हणून नेमणूक झाली. तेथे त्यांनी एकंदर १४ वर्षे प्रधानपदाच्या अधिकाराचा उपभोग घेतला. त्या राज्यातहि त्यांनी पुष्कळ सुधारणा केल्या. त्या नंतर दोन वर्षे इंदूर संस्थानचे दिवाण म्हणून त्यांनी काम केले व आता खुद्द ब्रिटीश सरकारने आपल्या खास विश्वासांतील इसम म्हणून इंदूर सरकारकडून मागून घेऊन त्यांची बडोद्याच्या दिवाणगिरीवर नेमणूक केली.

सर टी. मरधवरावांच्या सल्ल्याने महाराणी जमनाबाईसाहेब यांनी काशीरावाच्या तिघा मुलांना बडोद्यास आणविले, त्यापैकी हुषारी, पाणीदारपणा, बुद्धिमत्ता, समयसूचकता वगैरे बाबतीत मधले पुत्र गोपाळराव यांच्या भाषणाची व वागणूकीची महाराणी जमनाबाईसाहेबावर उत्तम प्रकारे छाप बसली, व ताबडतोब त्यांनी गोपाळरावासच दत्तक घेण्याचे ठरविले, आणि ह्या गोष्टीची खबर एजंटसाहेबास दिली. ता. २७-५-१८७५ रोजी सुमूहूर्ताने गोपाळरावास विधीपूर्वक दत्तक घेऊन मोठा दरबार भरविला. त्यावेळी सर्व सरदार, दरखदार, असामदार, सरकारी ऑफिसर्स, शेटसावकार, वगैरे हजर असून ब्रिटीश सरकारचे एजंट सर रिचर्ड मीड हेहि उपस्थित होते. एजंट साहेबांनी आपल्या भाषणांत गोपाळरावांचे अभिनंदन करून ब्रिटीश सरकारने त्यांस तिसरे सयाजीराव, बडोद्याचे महाराज म्हणून गादीवर बसविल्याचे जाहीर केले. याप्रमाणे गोपाल हा खरोखरच 'गोपाल' म्हणजे 'पृथ्वीपाल' झाला. नंतर तोफांची सलामी, नजराणे होऊन दरबार बरखास्त झाला. रेसिडेंटने महाराणी जमनाबाईसाहेब यांची गांठ घेऊन सयाजीरावांच्या शिक्षणाची व एकंदर राज्याची व्यवस्था सर टी. माधवराव यांचे सल्ल्याने करावी असे सुचविले. ता. २९ रोजी बडोद्यांतील प्रमुख देवालयांत जाऊन महाराजांनी देवतांचे दर्शन घेतले. अशा रीतीने महाराजांच्या १२ व्या वर्षीच त्यांस राजपद प्राप्त झाले व त्यांच्या आयुष्यांत विलक्षण स्थित्यंतर घडून आले.

३.
विद्यार्थी दशा

सयाजीरावांच्या शिक्षणाला ७ जून १८७५ रोजी प्रारंभ झाला. या दिवशी सरस्वतीचे पूजन करून त्यांस केशवराव पंडित व भाऊ मास्तर यांच्या स्वाधीन करण्यांत आले. सरकारवाड्याच्या वरच्या मजल्यावर त्यांची शाळा करण्यांत आली. आणि तेथे दोघेहि शिक्षक आळीपाळीने त्यांस सुमारे ५ तास शिक्षण देत असत. यावेळी त्यांच्याबरोबर त्यांचे धाकटे बंधु संपतराव व चुलतभाऊ दादासाहेब यांचे शिक्षण चालू होते. आरंभी फक्त मराठी भाषाच शिकविण्यांत येत असे. नंतर कांही दिवसांनी गुजराती व उर्दू भाषांचाहि अभ्यास सुरू करण्यांत आला.

रेसिडेंट सर रिचर्ड मीड यांचेहि महाराजांच्या शिक्षणाकडे लक्ष होतेच. सरकार वाड्यांतील जागा व तेथील भोवतालचे वातावरण ही महाराजांच्या शिक्षणांस अनुकुल नव्हती. यामुळे सरदार व इतर मोठे कामगार यांची महाराजांच्याच वयाची मुले एकत्र करून त्यांस शिक्षण देणारी राजपुत्रांची एक शाळा असावी व तिचा प्रिन्सिपॉल एखादा अनुभवशीर व तज्ज्ञ युरोपियन असावा असे रेसिडेंटसाहेबांनी मुंबई सरकारास कळविले. ही सूचना मान्य होऊन ती अंमलात आणावयाचे काम नंतरचे मेलविलसाहेब यांनी पार पाडले.

उत्तम, कार्यक्षम, व कर्तबगार विद्यार्थी निपजावयास ज्या अनुकुल साधनांची जरूर असते त्यामध्ये विद्यादान करणाऱ्या गुरूची भूमिका अत्यंत जबाबदारीची व महत्वाची असते. श्रीशिवछत्रपतींवा उदय होण्यास राजमाता जिजाबाई व गुरू दादोजी कोंडदेव यांचे शिक्षणच कारणीभूत झाले. तद्वतच श्रीमंत सयाजीराव यांचे पहिले व नंतरचे गुरू मि. इलियटसाहेब यांनी सयाजीरावांच्या शिक्षणासंबंधी अत्यंत प्रशंसनीय, कळकळीची व आस्थापूर्वक मेहनत किती घेतली हे पुढे समजेलच.

महाराजांच्या शिक्षणांस सुरूवात झाल्यावर नोव्हेंबर महिन्यांत प्रिन्स ऑफ वेल्स (सातवे एडवर्ड) यांचे हिंदुस्थानांत आगमन झाले व त्यानिमित्त एक दोन महिने महाराजांचे शिक्षण बंदच होते. रेसिडेंट सर रिचर्ड मीड, महाराणी जमनाबाईसाहेब, व महाराज दिवाणसाहेबांसमवेत

ऑक्टोबर १५ रोजी मुंबईस येऊन दाखल झाले. युवराजांच्या स्वागतासाठी व्हाईसरॉय लॉर्ड नॉथब्रूक हेहि मुंबईस आले होते. त्यांच्या आणि महाराणी जमनाबाईसाहेब व महाराज यांच्या मुलाखतीहि झाल्या. ता. ९ नोव्हेंबर रोजी जेंव्हा युवराज मुंबई मुक्कामी येऊन दाखल झाले तेंव्हाहि श्रीमंत सयाजीराव यांच्या व त्यांच्या शिरस्त्याप्रमाणे भेटी व परतभेटी झाल्या. युवराजांनी महाराजांस एक तरवार, चाबूक, रत्नजडित तपकिरीची डबी व एक अंगठी इतक्या वस्तू भेटीदाखल दिल्या आणि बडोद्याच्या सैन्याचीही पहाणी केली.

यानंतर एकाएकी युवराजांचा बडोद्यास भेट देण्याचा विचार ठरला. त्यामुळे त्यांचे स्वागत करण्यासाठी महाराजांची स्वारी मोठ्या तातडीने बडोद्यास आली व स्वागतसमारंभाची जंगी तयारी सुरू झाली. ता. १९ रोजी युवराज बडोद्यास उपस्थित झाले त्यावेळी महाराज, सर टी. माधवराव, नवीन रेसिडेंट पी.एस.मेलविलसाहेब यांनी त्यांचे स्टेशनवर चांगले स्वागत केले. नंतर प्रिन्स साहेबांची सोन्याच्या अंबारीतून खास सरकारी हत्तीवरून मिरवणूक काढण्यांत आली. रेसिडेन्सीत पानसुपारी, हारतुरे वगैरे समारंभ होऊन महाराजांनी युवराजांची रजा घेतली. दुपारी युवराजांनी सरकारी रीत्या महाराणी जमनाबाईसाहेब व सयाजीराव महाराज यांची मोतीबाग राजवाड्यांत भेट घेतली. या प्रसंगी साठमारी, कुस्त्या, बैलांच्या टकरा वगैरे खेळ त्यांच्या स्वागतासाठी मुद्दाम करण्यांत आले होते ते युवराजांनी पाहिले. ता. २० नोव्हेंबर रोजी युवराजांनी चित्याची शिकार केल्यानंतर मोतीबाग राजवाड्यांत त्यांस मोठ्या थाटाची मेजवानी देण्यांत आली. त्यावेळी उत्तरादाखल भाषण करतांना युवराजांनी आपले चांगले स्वागत केल्याबद्दल महाराजांचे आभार मानले व महाराजांनी शिक्षणांत उत्तरोत्तर प्रगति करून आपल्या संस्थानची सर्वांगीण सुधारणा पुढे घडवून आणावी अशी आशा प्रदर्शित केली. युवराज साहेबांचे भविष्य आजमितीस तंतोतंत खरे ठरले, हे महाराजांच्या आतापर्यंतच्या उज्ज्वल कारकीर्दीवरून आपणास स्पष्ट दिसत आहे.

जमनाबाईसाहेबांनी युवराजांच्या पत्नीस आपल्या जवाहीरखान्यांतील एक रत्नजडित मोत्यांचा हार व एक जडावाचा कंठा असे दोन मौल्यवान अलंकार नजर केले.

याप्रमाणे मेजवान्या, दरबार, भाषणे, शिकार, नजराणे वगैरे आगतस्वागताचे सर्व शिष्टांमत प्रकार व पाहुणचार घेऊन युवराजांची स्वारी ता. २३ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या गाडीने मुंबईकडे रवाना झाली.

राज्यकर्त्याला आवश्यक असे शिक्षण देण्यासाठी एखादा युरोपियन शिक्षक महाराजांसाठी नेमण्याची योजना मुक्रर झाली. रेसिडेंट मेलविलसाहेब यांनी त्यांचे एक मित्र रत्नागिरीचे डिस्ट्रीक्ट जज्ज मि. एच.एम.बर्डवूड यांची या बाबतीत सल्लामसलत घेतली. बर्डवूडसाहेबांनी मद्रासच्या पूर्वीच्या ॲक्टिंग गव्हर्नरचे चिरंजीव एफ.ए.एच.इलियटसाहेब I.C.S. यांचे नांव सुचविले. इलियटसाहेबांनी कांही दिवस रत्नागिरीस असिस्टंट कलेक्टरचे व वऱ्हाडच्या शाळाखात्याच्या डायरेक्टरचे काम केले. मेलविलसाहेबांना ही सूचना मान्य झाली व इलियटसाहेबांस शिक्षक नेमण्यांत आले. ता. १२ डिसेंबर १८७५ रोजी ते बडोद्यास येऊन दाखल झाले.

इलियटसाहेब आल्यानंतर महाराज, त्यांचे बंधु, चुलतबंधु व इतर कांही सरदारांची मुले यांच्या शिक्षणक्रमास नियमितपणे सुरुवात झाली. परंतु १८७६ च्या अखेरपर्यंत शिक्षण प्राथमिकच होते. इलियटसाहेब लिहितात, 'शिक्षणाचा प्रारंभ मी अत्यंत सावकाशपणेच केला; कारण पुष्कळ गोष्टी महाराजांच्या मनावर बिंबविण्याच्या होत्या.' सर टी. माधवराव लिहितात, ''महाराजांच्या शिक्षणसंबंधाने मातुश्री महाराणी जमनाबाईसाहेब अत्यंत काळजी घेतात. महाराजांवर जरी त्यांची ममता असली तरी त्यांच्या शिक्षणक्रमाच्या आड त्या येत नाहीत. त्यांच्या शिक्षणाच्या ज्या सोयी त्यांनी करून दिल्या आहेत त्याहून जास्त चांगल्या सोई कोणत्याहि देशी संस्थानांत आढळावयाच्या नाहीत. त्यांच्या शारीरीक व नैतिक शिक्षणावर महाराणीसाहेबांची चांगली देखरेख आहे.''*

जानेवारी १८७७ मध्ये भरणाऱ्या दिल्ली दरबारास जावे लागल्यामुळे महाराजांच्या अभ्यासांत कांही काळ खंड पडला. ता. ७ डिसेंबर रोजी महाराज, मातुश्री जमनाबाईसाहेब, रेसिडेंट, दिवाण यांच्यासमवेत बडोद्याहून निघून ता. १४ रोजी दिल्लीस पोचले. ता. २९ डिसेंबर रोजी कलकत्त्याच्या लाटसाहेबांनी सयाजीराव व जमनाबाईसाहेब यांच्या छावणीत जाऊन त्यांस भेट दिली. ता. १ जानेवारी रोजी दिल्लीस टोलेजंग दरबार झाला. सर्व राजेरजवाड्यांसमक्ष व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांनी सयाजीरावांना इंग्लंडच्या व्हिक्टोरिया महाराणीसाहेबांनी 'फर्जद-इ-दौलत-इंग्लिशिआ' (इंग्लिश साम्राज्याचे खासे पुत्र) हा किताब दिला असल्याचे जाहीर केले. दिल्लीस यावेळी निजाम, शिंदे, होळकर, व म्हैसूरचे महाराज यांच्याशी सयाजीरावांच्या भेटी झाल्या. दिल्लीहून निघाल्यानंतर लखनौ, आग्रा, काशी, प्रयाग, गोकुळ, वृंदावन वगैरे इतिहासप्रसिद्ध, पुराणप्रसिद्ध क्षेत्रे व शहरे पाहून बऱ्याच ठिकाणी यथायोग्य दानधर्म करून महाराजांची स्वारी ५ फेब्रुवारी १८७७ रोजी बडोद्यास येऊन पोचली. बडोद्यास आल्यावर नवीन किताब देऊन ब्रिटीश सरकारने महाराजांचा बहुमान केला याबद्दल ठिकठिकाणी निरनिराळ्या संस्थांतर्फे महाराजांचे अभिनंदन करण्यांत आले. यानंतर त्यांच्या शिक्षणास पुनरपि जारीने सुरूवात झाली.

ता. २६ जुलै १८७७ रोजी महाराजांचे वडील काशीराव मृत्यु पावले. त्यामुळे महाराजांस बरेच दुःख झाले; परंतु शिक्षणांत फारसा व्यत्यय आला नाही. मेलविलसाहेब लिहितात की, महाराजांकरता अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, इंग्रजी, गुजराती या भाषा इंग्लंड व हिंदुस्थान देशांचा इतिहास आणि संभाषणात्मक इंग्रजी या विषयांचा अभ्यासक्रम आखला. इंग्रजी सुधारण्यासाठी मधूनमधून इंग्रजी निबंध लिहवून घेण्यांत येत असत. त्यांचे गणित मात्र अतिशय कच्चे. विद्यार्थीदशेतील त्यांची एक ठोकळ मानाची दिनचर्या मि.फिलिफ सार्जंट यांच्या पुस्तकांत दिली आहे. ती अशीः-

सकाळी ६ वाजता उठणे.

सकाळी ८ वाजता घोड्यावरून फेरफटका, नंतर १ तास अभ्यास.

---

* Ruler of Baroda p.33

सकाळी ९ वाजता महाराणीसाहेबांच्या बरोबर छोटी हजिरी.

सकाळी १०।। वाजता राजवाड्यांतून घोडेस्वरांच्या सरंजामाबरोबर शाळेत जाणे.
१०।। ते ७।। वाजेपर्यंत शाळा; मध्यंतरी १ तासाची फराळासाठी सुट्टी,
५ ते ७।। शाळेच्या मैदानावर हिंदी खेळ, कवायत, पोहणे इ. व्यायाम घेणे
७।। ते ८।। दुसरे दिवशीचा अभ्यास घेणे.
९ ते १० पर्यंत भोजन.
१० वाजता निद्रा.

महाराजांनी बिलियर्डस् खेळण्याचाहि परिपाठ ठेवला होता व पंधरवाड्यांतून एकदा शिकारीस जाण्याचा क्रम सुरू केला होता.*

अशा प्रकारचा साधा कार्यक्रम जरी होता तरी आपण महाराज आहोत ही गोष्ट लक्षांत वागविण्याविषयी त्यांना नेहमी उपदेश केला जाई. यामुळे अर्थात त्यांना कोणी जिवाभावाचा मित्र नव्हता. ठराविक अभ्यास पुरा करण्यासाठी त्यांना कांही जादा वेळ अभ्यासाकडे द्यावा लागे आणि आरंभी अक्षर फारसे चांगले नसल्यामुळे ते घटविण्याकडे वेळ जास्त जात असे.

तरूण गायकवाड सरकारांच्या शिरावर पुढे जी जबाबदारी पडणार आहे ती पत्करण्यायोग्य असेच शिक्षण त्यांना मिळाले पाहिजे असे सर टी. माधवरावांचे मत होते व त्याप्रमाणे त्यांनी अभ्यासनीय विषयांची एक यादी मि. इलियट यांच्याकडे पाठविली, व महाराजांबरोबर त्यांच्या बुद्धिमत्तेच्या तोडीस येईल असा एखादा हुषार मुलगा असावा असेहि सुचविले. तद्नुसार माधवराव गोडबोले नांवांचा एक ब्राह्मण विद्यार्थी आरंभी महाराजांबरोबर अभ्यास करीत असे. परंतु पुढे त्यासहि सरकारी हायस्कूलांत पाठविण्यांत आले.

यानंतर महाराजांना राज्यकारभाराचे ज्ञान लवकर मिळावे म्हणून निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने देण्याची पद्धत निघाली. त्यापैकी २३ व्याख्याने राज्यकारभार, राजपुत्रांची वागणूक या संबंधाची सर टी. माधवराव यांनी दिली. २७ व्याख्याने काजी शहाबुद्दीन (रेव्हेन्यू कमिशनर) यांनी जमीन महसूल या विषयावर दिली.

व्याख्याने	विषय	व्याख्याते
१८	जमिनीचा कायदा	करसेटजी,रस्तुमजी.
७	हिंदु लॉ.	जे.एस.गाडगीळ, हायकोर्ट जज्ज.
६	पोलीस व्यवस्था.	व्ही.जे.कीर्तने, नायब दिवाण.
९	मिलीटरी व सेटलमेंट खाते.	पेस्तनजी जहांगीर.

याशिवाय हिशेब व इतर कायदेकानू यासंबंधाचे कांही पाठ मि. ए.एच.ताम्हने व सी. आर. ठाणावाला यांनी दिले असे सांगतात.

सर टी. माधवरावांची सुयंत्रित राज्यकारासंबंधी महाराजांस दिलेली व्याख्याने निःसंशय बहुमोल आहेत. 'मायनॉर हिंटस' म्हणून त्यांचे एक खाजगी मुद्रित गायकवाडी दप्तरांत ठेवलेले

---

* Ruler of Baroda p.36

आहे. ''ब्रिटीश रेसिडेंटाशी कसे वागावे, आपल्या हक्कास कसे जपावे, दिवाणगिरी कोणास द्यावी, अधिकारी नेमतांना कोणते धोरण डोळ्यांपुढे ठेवावे, नोकराचाकरांशी, हुजऱ्याशी, स्वतःच्या कुटुंबीयांशी व आप्तस्वकीयांशी कसे वागावे व त्यांच्याकडून आपली कामे कशी करून घ्यावीत, भेटीस येणाऱ्या मंडळींपैकी कोणास जवळ करावे व कोणास दूर करावे, सार्वजनिक पैशांचा व्यय कसा करावा, शिल्लक कशी व कोठे गुंतवावी, सार्वजनिक कार्यास किती व कशी मदत करावी, वर्तमानपत्रे कोणती व केंव्हा वाचावीत, इतर संस्थानांचे व ब्रिटीश रियासतीचे वार्षिक अहवाल वाचल्याने कोणते फायदे होण्यासारखे आहेत व (त्यांच्यापासून) आपणास काय शिकावयाचे''* इत्यादी महत्वाची माहिती सर टी. माधवराव आपल्या शिष्यास या व्याख्यानाद्धारे करून दिली.

इ.स.१८८१ च्या डिसेंबर महिन्यांत महाराजांचा शिक्षणक्रम संपला. महाराज आपल्या एका पत्रांत लिहितात, 'अजून मला दोन तीन वर्षे अभ्यास करता आला असता तर फार बरे झाले असते. कारण बारीक सारीक गोष्टी अजून पुष्कळ शिकण्यासारख्या व लक्षांत ठेवता येण्यासारख्या होत्या;' व ही गोष्ट उतार वयांत नेहमी त्यांच्या मनांत येते. अल्पवयांत राज्यकारभाराची जबाबदारी जर त्यांस दोनतीन वर्षे पुढे ढकलता आली असती व तेवढा वेळ तयारी करण्यांत घालवता आला असता, तर त्यांच्या पुढील आयुष्यावर व विशेषतः मानसिक व शारीरीक स्वास्थ्यावर फार मोठा परिणाम झाला असता. याबद्दलची त्यांना वरचेवर जाणीव होते.

एकंदरीने पाहता इलियट साहेबांच्या शिक्षणाचा महाराजांच्या मनावर योग्य सुपरिणाम झाला. कांहींच्या मते आंग्लविद्येने भारल्यामुळे महाराज नास्तिक बनले. पण महाराजांस सर्वांगिण शिक्षण मिळाले, ही गोष्ट कोणासहि नाकबूल करता येणार नाही. महाराजांची बुद्धि जशी चौरस तशी त्यांची दृष्टीही अत्यंत व्यापक परंतु सूक्ष्म होती. इंग्रजी शिक्षणाने व इतिहासाच्या परिशीलनाने त्यांच्या बुद्धिचा विकास झाला. स्वतंत्र विचार करण्याची शक्ति त्यांस प्राप्त झाली. बुद्धिरूपी तराजूत प्रत्येक बाब तोलून जिकडे तिचा (बुद्धिचा) कांटा झुकेल तीच गोष्ट करण्याची त्यांस सवय झाली. दृढनिश्चय, उद्यमशीलता, बाणेदारपणा, कडक शिस्त, दुसऱ्यास हुकुमांत ठेवण्याची कला या गोष्टी ते आपल्या युरोपियन शिक्षकापासून शिकले. राजकीय परिस्थितीचे यथायोग्य आकलन व निरीक्षण करून त्यांतील व्यंगे काढून टाकून सुयंत्रित कारभार चालविणे हे त्यांचे ध्येय ठरले. केवळ रूढी, अंधश्रद्धा किंवा परंपरागत समजूत म्हणून एखादी गोष्ट मान्य करावयाची नाही तर सुराज्यास परिपोषक असे असेल व बुद्धिस पटेल तेवढेच ठेवावयाचे, निरूपयोगी भाग नाहीसा करावयाचा हे धोरण महाराजांनी आखले. आजकालच्या बडोद्यांतील सुधारणा म्हणजे महाराजांस मिळालेल्या सुशिक्षणाचे दृश्य फल होय हे कोणीही कबूल करील.

●●●

---

* सहविचार, ऑक्टोबर १९३०

४.
गृहस्थाश्रमांत प्रवेश

यानंतर महाराजांच्या आयुष्यांतील महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा विवाह ही होय. मातुश्री जमनाबाईसाहेब यांच्या कन्या श्रीमंत ताराराजे यांचाहि विवाह याच सुमारास करण्याचे निश्चित झाले. त्यांची वर योजना सावंतवाडीचे राजे बहाद्दर रघुनाथराव बाबासाहेब सरदेसाई यांच्याशी झाली. तारीख २१ माहे डिसेंबर सन १८७९ रोजी हे लग्न नजरबागेत झाल्यानंतर १७ दिवसांनी सयाजीराव महाराजांचे लग्न झाले. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच मुली पाहण्याचे काम चालू होते. त्याकरिता दिवाणसाहेब स्वतः एकदा पुण्यास गेले होते व त्यावेळी "आपाततः' बऱ्याच थोर कुलांतील उपवर मुलीही आल्या होत्या त्या त्यांनी पाहिल्या. परंतु बहुतेक नापसंत झाल्या. अखेरीस तंजावर राजघराण्याशी संबंध असलेल्या मोहिते कुळांतील प्रिन्सेस लक्ष्मीबाई यांना वधू नेमस्त करण्यांत आले.

ता. ६ जानेवारी १८८० या दिवशी सयाजीराव यांचा तंजावरच्या राजकन्येशी नजरबागेत मोठ्या थाटाने विवाह झाला आणि त्यांचे नांव चिमणाबाई असे ठेवण्यांत आले. वयाने त्या सयाजीरावांपेक्षा १।। वर्षाने लहान होत्या. सर टी. माधवरावांनी मोठ्या चटकदार भाषेत या लग्नाचे वर्णन दिले आहे. त्याचा थोडक्यांत सारांश असा की, लग्न मंडपात कुलदेवतांच्या पूजाअर्चा होत होत्या. वधु व वर होमापुढे हात जोडून लग्नविधीत गुंतले होते. लग्नाची घटका भरल्याबरोबर वधूस बुरखा घालून शृंगारून आणण्यांत आले. दिव्यांचा चकचकाट, हुंड्याझुंबरांची आरास, निरनिराळ्या अलंकारभूषणांनी सजलेल्या स्त्रिया, फुलांचा अत्तरांचा घमघमाट, मिलीटरीचे बँडवादन अशा समारंभात उपाध्ये, जोशी वगैरेंनी मंगलाष्टके म्हणून वधुवरांच्या मस्तकावर मंत्राक्षता टाकल्या. लग्नसमारंभात पोलीटीकल एजंटसाहेब, इतर युरोपियन अधिकारी, सरदार, मानकरी, इतर मांडलीक संस्थानिक, तंजावरचे राजे, कोल्हापुरच्या राणीसाहेब वगैरे मंडळी हजर होत्या. 'धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामी' असे म्हणून सयाजीरावांनी आपल्या भावी गृहीणीचा स्वीकार केला.

अगडांतल्या साठमाऱ्या, तमाशे, खेळ, मिलीटरीच्या कवायती, बँडवादन, आतशबाज्या, नाचरंग, मेजवान्या, मिरवणूकी यांमुळे शहरवासी लोकांना व इतर पाहुण्यांना हा सबंध महिना आनंदाचा व मौजेचा गेला.

लक्ष्मीविलास

ता. १० जानेवारी लक्ष्मीविलास राजवाड्याच्या पायाची कोनशीला बसविण्याचा समारंभ एजंट साहेब मि. मेलविल यांचे हस्ते करण्यांत आला. यावेळी सर रिचर्ड टेंपल मुंबईचे गव्हर्नर व हिंदुस्थानचे कमांडर-इन-चीफ जनरल बार हेहि बडोद्यास आले होते. एजंट साहेब व सर रिचर्ड टेंपल यांनी श्रीमंत सौ. महाराणी चिमणाबाईसाहेबांचे व सयाजीराव महाराजांचे आयुरारोग्य चिंतिले. त्यादिवशी मोतीबागेत युरोपियन पाहुण्यांना बडा खाना देण्यांत आला. त्याप्रसंगीहि मि. मेलविल व महाराज यांची यथोचित भाषणे झाली. नंतर हा समारंभ आटोपला.

लक्ष्मीविलास राजवाड्याचे काम इ.स.१८९०साली पूर्ण झाले. परंतु दुर्दैवाने महाराणी चिमणाबाईसाहेब त्यावेळी हयात नव्हत्या. या वाड्याकडे अजमासे ५० लक्ष रुपयांवर खर्च झालेला आहे व त्यांत राजकुटुंबाला लागणाऱ्या सर्व आधुनिक सुखसोयी आहेत. राजवाड्याच्या आसमंतातला भाग रम्य लताकुंजांनी व बागबगीच्यांनी सजलेला आहे. वाड्याची बांधणी इंडोसॅरसेनिक धर्तीवर आहे. अशा प्रकारचा राजवाडा हिंदुस्थानांतल्या राजवाड्यांमध्ये उत्तम आहे. एवढेच नव्हे तर पॅरिस वगैरे ठिकाणाहून उत्तम तज्ज्ञ, नामांकित शिल्पशास्त्रज्ञ आणून त्याचे बांधकाम करण्यांत आले असल्याने तो युरोपांतील कोणत्याहि देशाच्या राजवाड्याच्या तोडीचा येईल. रविवर्म्यासारखे देशी चित्रकार व विदेशी चित्रकार यांची अमोलिक व दुर्मिळ चित्रे काढलेली आहेत.

५.
राज्यसूत्रे हाती आली

न खलु वयस्तेजसो हेतुः।।*

सयाजीराव महाराज व प्रिन्सेस ताराबाई यांची लग्ने झाल्यावर महाराजांना आता राज्याधिकार मिळावा असे सर्वांच्या मनाने घेतले. सर टी. माधवराव व महाराणी जमनाबाईसाहेब यांनी एजंटसाहेबांच्या कानावर ही गोष्ट घातली. त्यांची संमति मिळून प्रकरण हिंदुस्थानसरकारकडे गेले. हिंदुस्थानसरकारने विलायतेहून मंजूरी आणवून ता. २८ डिसेंबर १८८१ रोजी सयाजीराव महाराजांना राज्याधिकार देण्याचे ठरविले. व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांना बडोद्यास येता न आल्यामुळे मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांचे हस्ते महाराजांना अधिकाराची वस्त्रे देण्याचा समारंभ बडोद्यांस मोठ्या थाटाचा दरबार भरवून करण्यांत आला. दरबारप्रसंगी भाषण करतांना महाराजांनी असे जाहीर केले की, आजमितीपासून बडोदे राज्याचा अधिकार आम्ही आपल्या हातांत घेत आहोत. आमची प्रजा संतुष्ट हावी आणि उत्तरोत्तर तिच्या सुखाची वाढ होत जावी अशी आमची अंतःकरणापासून इच्छा आहे. आमचा हेतू सिद्धीस नेण्याचे कामी आमचे सर्व अधिकारी, मानकरी, दरकदार व अखिल प्रजा अत्यंत राजनिष्ठने आमच्याशी वर्ततील व सहकार्य करतील असा आम्हास भरंवसा वाटतो. हे आरंभिलेले कार्य सुफल होवो (ता. २८-१२-१८८१)

महाराज वयाच्या तेराव्या वर्षी गादीचे मालक झाले व १९ व्या वर्षी त्यांनी राज्यकारभार हाती घेतला. लागलीच एक जाहीरनामा प्रसिद्ध करून प्रजेला त्यांनी सुराज्याचे आश्वासन दिले. याबाबतीत महाराजांचे सादृश्य जुळते. अकबर बादशहाशी वयाचे तेराव्या वर्षी राज्यांत गोंधळ, अल्पवयीन असतांना गादीचे मालक झाले व वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी स्वतंत्रपणे राज्यकारभार हातांत घेतला. अकबराचे शिक्षण बहिरामखान यांच्याप्रमाणेच महाराजांनी प्रजेची सुस्थिती

* तेजस्वी जे वृत्ति ऐशी तयांची। तेथे काही चाड नाही वयाची।।

राहील अशी काळजी घेतली आणि आवश्यक अशा सामाजिक, धार्मिक, राजकीय सुधारणा घडवून आणल्या आहेत.

ता. २९ ऑक्टोबर रोजी दिवाण सर टी. माधवराव यांनी आपले जागेचा राजीनामा दिला. राज्यकारभार हाती आल्यावर महाराज एकदा बरोबर ऑफीसच्या कामाचे वेळी दिवाणाचे कचेरीत गेले. त्यावेळी दिवाण तेथे नव्हते. महाराज तेथून लवकरच निघून गेले. नंतर दिवाणांना ही हकीकत समजली. महाराजांना मुखत्यारी मिळेपर्यंत सर टी. माधवराव त्यांना वेळेची किंमत पढवीत होते. परंतु उतार वयाच्या कारणाने राज्यकारभाराची कामे वेळच्या वेळी न उठली तर उलट आपल्यालाच वेळेची किंमत आपल्या शिष्याकडून पढवून घेण्याचा अनावस्था प्रसंग येईल असा दूरवर विचार करून ते लवकरच दिवाणगिरी सोडून आपल्या देशी चालते झाले. महाराज लिहितात, वास्तविक सर टी. माधवरावांना राज्य स्वतंत्रतेने घालविण्याचा अभ्यास झालेला, ते कमी दर्जाची ताबेदारी कशी पत्करणार ? त्यांच्या मागून काजी शहाबुद्दीन यांची महाराजांनी दिवाणपदाचे जागी नेमणूक केली.

सर टी. माधवरावांची बडोदे संस्थानांतील कामगिरी बहुमोल व भरीव आहे. प्रगतिपर धोरणाचा पाया त्यांनी घातलेला आहे. त्यांनी राज्याच्या उत्पन्नाची सुव्यवस्था लावून सरकारी खजिन्यांत १।। कोटींची बचत केली. पूर्वीची अनियमित सारापद्धति बदलून चोहोकडे रयतवारी पद्धति अंमलात आणली. शेतसारा कमी केला; कांही जकाती उतरविल्या; नवीन खाती उत्पन्न करून त्यामार्फत नवीन व्यवस्था अंमलात आणिली; अनाठायी चाललेल्या दानधर्माच्या खर्चास काट दिली; आरोग्यखाते काढून त्यावर चीफ मेडिकल ऑफीसरची नेमणूक केली; नरमबंदी (Settlement) खाते, सार्वजनिक बांधकाम खाते (P.W.D), शिक्षणखाते ही खाती नवीन उत्पन्न करून त्यावर नवीन अधिकाऱ्यांची नेमणूक केली; सार्वजनिक बागा, सार्वजनिक वाचनालये काढण्यास प्रोत्साहन दिले. त्याचप्रमाणे उत्तम रस्ते, छोट्या छोट्या रेल्वे लाइन्स सुरू करण्यासंबंधी त्यांनी खटपट केली. इ.स.१८७७ साली भरलेल्या दरबारांत सर टी. माधवरावांना इंग्रज सरकारने 'राजा' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला तो किती यथायोग्य होता हे दिसून येईल.

महाराजांना अधिकारप्राप्ती झाल्यानंतर आपल्या कार्यात आपल्या धर्मपत्नीने भागीदार व्हावे यासाठी तिला जरूर ते शिक्षण देण्याचे ठरविले. आणि त्याबरहुकूम श्री. सौ. महाराणीसाहेबांना इंग्रजी शिकविण्यासाठी श्रीमती तन्दबाई नामक विदुषीची मासिक २०० रु. वेतनावर अध्यापिका म्हणून नेमणूक करण्यांत आली व महाराणी साहेबांचा शिक्षणक्रम सुरू झाला. यानंतर आनंदाची गोष्ट म्हणजे ता. ३ ऑगस्ट १८८३ रोजी महाराणीसाहेबांना पुत्ररत्न झाले ही होय. त्यांचे नांव फत्तेसिंहराव असे ठेवण्यांत आले. युवराज जन्माचा हा अपूर्व योग तीन पिढ्यांत घडून आला नसल्याने हा पुत्रोत्सव समारंभ विशेषच झाला. यानंतर पुढल्या वर्षी त्यांना एक कन्यारत्न झाले. पुढे लवकरच ता. ७ मे १८८५ साली महाराणी चिमणाबाईसाहेब यांना क्षयाचा विकार होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. 'त्या अत्यंत प्रेमळ, पतिनिष्ठ व सुस्वभावी होत्या' असे महाराजांनी त्यांच्या संबंधी उद्गार काढले आहेत. महाराणी साहेबांच्या स्मरणार्थ 'चिमणाबाई क्लॉक टॉवर' नांवाचा एक मनोरा व 'चिमणाबाई न्यायमंदीर' नांवाची न्यायकचेरी बांधण्यांत

आली. यानंतर ता. २८ डिसेंबर १८८५ रोजी देवासच्या घराण्यांतील श्रीमंत बाजीराव घाटगे यांची कन्या गजराबाई यांच्याशी महाराजांचा विवाह झाला. ह्याच हल्लीच्या सुशिक्षित व सुविद्य महाराणी चिमणाबाईसाहेब होत. इ.स.१८९३-९४ साली यांना महाराणी व्हिक्टोरिया यांनी 'क्रौन ऑफ इंडिया' हा किताब व एक रत्नखचित पदक बक्षीस दिले आहे. महाराजांची इतर कौटुंबिक हकीकत पुढे निराळी दिली आहे.

६.
स्वभूमिचे संपूर्ण निरीक्षण

'राजा प्रकृतिरंजनात'

कोणतीही सुधारणा करू पाहाणाऱ्यांस तिची खरी तळमळ, सांगोपांग माहिती, व्यापक अवलोकन व सूक्ष्म निरीक्षण पाहिजे. राज्यकारभारांत सुधारणा करणाऱ्यांस ह्या गोष्टी अत्यंत आवश्यक होत. याच हेतूने राज्यसूत्रे हाती घेतल्यानंतर आपल्या प्रजेची स्थिती कशा प्रकारची आहे, तिच्या अडचणी, तक्रारी कोणत्या स्वरूपाच्या आहेत, राज्यांत कोणत्या रीतीच्या सुधारणा अवश्यमेव आहेत हे समजण्याकरता श्री. सयाजीराव महाराजांनी दरसाल राज्यांतील एका भागांत स्वतः जाऊन तेथील स्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन करण्याचा क्रम चालू केला. नोव्हेंबर १८८२ कडी प्रांत, १८८३-८४ नवसारी, १८८४-८५ बडोदे प्रांत, १८८६-८७ अमरेली व कांठेवाड वगैरे प्रांतात जाऊन महाराजांनी तेथील परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले.

यानंतरच्या काळांतहि महाराजांनी आपल्या राज्यांत अनेकवार दौरे काढले असून हा क्रम अद्याप चालू आहे. या दौऱ्यांमुळे महाराजांना आपल्या राज्यांतील सर्व गावांची व तेथे राहणाऱ्या आपल्या प्रजाजनांची बिनचूक माहिती मिळाली असून तिच्या जोरावर त्यांना आपल्या अधिकाऱ्यांसहि फलित करण्यांत येते. या दौऱ्याचे वेळी सर्व लोकांना आपली गाऱ्हाणी महाराजांच्या कानी घालण्याची संधि देण्यांत येते हे लक्षांत ठेवण्यासारखे आहे.

महाराजांचा पहिल्या फिरतीचा प्रवास बहुतेक बैलगाड्यांतून झालेला आहे. त्या फिरतीचे वेळी प्रत्येक गांवांत जाऊन गांवचे प्रमुख लोक, सरकारी अंमलदार यांना बोलावून त्यांच्या अडचणी, तक्रारी, आवश्यक व जरूर त्या सुधारणांसंबंधी त्यांची मते समजून घेणे ह्या गोष्टी महाराजांनी जातीने केल्या. आपला राजा आपुलकीच्या, ममतेच्या भावनेने आपल्या सुखदुःखांची पित्याप्रमाणे चौकशी करीत असलेला पाहून कोणत्या राजनिष्ठ नागरिकांचे अंतःकरण कृतज्ञतेने

उचंबळून येणार नाही ? महाराजांस आतुरतेने पाहावयास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत असत व ठिकठिकाणी त्यांचे थाटाचे स्वागत व आदरसत्कार केला जाई. पहिल्या फिरतीचे वेळी महाराजांच्या बरोबर बराच लवाजमा होता. परंतु प्रजेस इतक्या लोकांचा इतमाम ठेवणे कठीण जाते व अनाठायी खर्च होतो हे ओळखून महाराजांनी पुढे खास नोकर कमी केले. हल्ली तर पांचपंचविसपेक्षा कमी लोक त्यांचे बरोबर असतात. फिरतीच्या वेळी ज्या गांवास महाराज जाण्याचे ठरते तेथे हे लोक अगोदर जाऊन तंबू वगैरे टाकून इतर सर्व कडेकोट तयारी करतात. मग महाराजांची स्वारी त्या ठिकाणी जाते. नंतर शाळा, कचेऱ्या, सरकारी इमारती, पोलिस व इतर अधिकारी, गांवातील पाटिल, तलाठी, लोकपक्षीय पुढारी, प्रमुख संस्थांचे चालक वगैरे मंडळींच्या गांठी-भेटी होऊन संभाषण, तपासणी, मुलाखती आटोपल्यानंतर महाराज दुसऱ्या गांवी जातात. इनामदार, पुढारी वगैरे लोकांना महाराजहि पोषाख वगैरे देऊन त्यांचा गौरव करतात. कांही प्रसंगी जातीने व कांही प्रसंगी तपासणी अधिकाऱ्यांकडून प्रजेच्या अर्ज्या घेऊन त्यांचा निकाल महाराज स्वतः करतात. विशेष महत्त्वाची बाब असल्यास ती आपल्या स्मृतिपत्रकांत नमूद करून ठेवितात व त्याबद्दल हुजूर हुकूम लवकरच निघतो.

अशा पाहणीच्या योगाने नवीन सुधारणांच्यापुढे येणाऱ्या अडचणींचे यथार्थ ज्ञान, प्रजेच्या शक्ताची कल्पना वगैरे गोष्टींचे चित्र महाराजांच्या विवेचक शक्तीवर किंवा बुद्धिपटलावर कोरले गेले. यामुळेच महाराजांना नवीन नवीन सुधारणांचा उपक्रम करणे सुकर झाले. त्याचप्रमाणे या पाहणीमुळे स्थानिक अधिकाऱ्यांवर वचक बसून अव्यवस्था, लांचलुचपत, वसुलाचा गोंधळ, पैशाची अफरातफर वगैरे प्रकारांना आळा बसला. प्रत्येकास आपले गाऱ्हाणे महाराजांना विदीत करण्याची मुभा आपल्याला मिळते व खरा न्याय मिळतो ही प्रजेची भावना दृढ झाली.

वास्तविक पाहता स्वतः विशेष मेहनत न करता सर टी. माधवरावांसारख्या कुशल, राज्यकार्यधुरंधर मंत्र्यावर राज्यकारभार टाकून महाराजांस खुशाल स्वस्थ आराम घेत बसता आले असते. परंतु त्यांनी तसे न करता आरंभापासूनच सर्व विषयांत मन घालून स्वतः उद्योग करून राज्यकारभारावर आपली छाप पूर्णपणे बसविली. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे केंव्हाहि वाईटच. तसेच पुस्तकी विद्येबरोबर अनुभवाचे शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. किंबहुना फार महत्वाचे आहे ही गोष्ट महाराजांस पुरेपूर पटली आहे.

७.
राज्यव्यवस्थेतील मन्वंतर

सयाजीराव महाराजांना राज्याधिकार मिळाल्यापासून आतापर्यंतच्या त्यांच्या सर्व कृत्यांचे सार कोणते असे कोणी विचारल्यास त्यास 'सुधारणा' सर्वांगिण सुधारणा या समर्पक शब्दांत उत्तर मिळेल. राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, कौटुंबिक बाबतीत सुधारणा नवीन नवीन सुधारणा हेच त्यांचे ध्येय असल्याचे आढळून येईल. हीच गोष्ट महाराजांनी एका व्याख्यानाचे प्रसंगी बोलून दाखविली होती. ते म्हणतात, 'कित्येकांना माझे काम व प्रयत्न असमंजसपणाचे वाटत असतील, परंतु त्या सर्वांच्या मुळाशी माझा एकच उद्देश आहे आणि तो म्हणजे माझ्या प्रजाजनांचे हित करणे हा होय. प्रजेचे कल्याण करणे हेच माझे कर्तव्य आणि हाच माझा मोक्ष.' लोकांनी शिक्षण संपादन करून सुधारणेच्या मार्गास लागावे आणि प्रगतीचे शिखर गांठण्याचा प्रयत्न करावा ही महाराजांची मनीषा. आरंभापासून त्यांनी राज्यव्यवहारासंबंधीचे शिक्षण आस्थेने घेतलेले. परंतु सुयंत्रित राज्यकारभार चालविण्यास त्यावेळी त्यांना सल्लागार मंडळाची जरूरी भासत होती. यास्तव इ.स.१८८३ साली न्याय, जमाबंदी, अंमलबजावणी व खानगी खात्यांचे मुख्याधिकारी, व वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश आणि दिवाण यांचे एक 'कन्सल्टेटिव्ह कौन्सिल ऑफ सल्लागार मंडळ' महाराजांनी आपल्यास वेळोवेळी सल्लामसलत देण्यासाठी नेमले. इ.स.१९०४ साली मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या धर्तीवर संस्थानांतील प्रत्येक जिल्ह्यांतून निवडून दिलेल्या सभासदांचे एक कायदे मंडळ बनवावे अशा प्रकारची एक योजना आंखली आणि १९०७ साली या सभेची घटना तयार झाली. आरंभी ह्या कौन्सिलांत फक्त १७ सभासद होते, परंतु १९१२ साली लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढविण्यांत आली. त्याचप्रमाणे सरदार व व्यापारीवर्गाचे मिळून दोन प्रतिनिधी घेण्यांत आले. १९१३ साली अस्पृश्य वर्गाच्या एका प्रतिनिधीची सरकारतर्फे नेमणूक करण्यांत आली. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांतील (धारासभा) सभासदांची संख्या २७ असून त्यांचे वर्गीकरण खाली दिल्याप्रमाणे आहे.*

---

* Baroda Administration Report 1930-31

६	सभासद -	दिवाण आणि पांच सरकारी अधिकारी (अधिकार खाते- न्याय, जमाबंदी खात्याचे प्रमुख, न्यायमंत्री, वरिष्ठ कोर्टाचा वकील मिळून ५.)
११	सभासद -	सरकारने नेमलेले सभासद-यांत ७ अधिकारी व निमसरकारी (तीन राजघराण्यापैकी, व्यापारी व अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी असतात.)
१०	सभासद-	लोकनियुक्त सभासद (बडोदा ३, कडी ३, नवसारी २, अमरेली २)
२७		

सभासदांस सरकारला प्रश्न विचारून लोकांच्या अडचणी सरकारपुढे मांडण्याचा हक्क आहे. तसेच लोकोपयोगी ठराव आणून त्यासंबंधाने कोणत्या सुधारणा जनतेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहेत, हे शिफारसींच्याद्वारे सरकारास कळविण्याचा हक्क आहे.

सध्या बहुतेक सत्ता महाराजांच्या मंत्रिमंडळास (कार्यकारी कौन्सिलास) असून राज्याची सूत्रे दिवाणाकडून हालविली जातात व तो महाराजांना जबाबदार असतो. अंमलबजावणी खात्याची सर्व रचना इंग्रजी पद्धतीवर केलेली आहे.

बडोदा नरेशांनी दुसरी महत्वाची सुधारणा अंमलात आणली ती म्हणजे न्याय व अंमलबजावणी खात्याची विभागणी ही होय. महाराजांनी ही सुधारणा फार हळूहळू व सावधगिरीने अंमलात आणली. सर टी. माधवरावांनी तालुक्याच्या वहिवटदारांचा दिवाणी खटले चालविण्याचा अधिकार काढून तो मुन्सफास दिला. परंतु त्याच वेळी मुलकी अंमलदारांकडे फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार तसाच कायम होता. महाराजांच्या लक्षांत ही गोष्ट पहाणीच्या वेळी चटकन लक्षांत येऊन त्यासंबंधाने त्यांनी असे ठरविले की, प्रथम फौजदारी खटल्यांपैकी तीन चतुर्थांश खटले स्वतंत्र न्यायाधीशांनी म्हणजे मुन्सफांनी चालवावेत आणि बाकीचे एक चतुर्थांश वहिवटदाराकडे सोपवावेत. हा क्रम १९०३ सालापर्यंत होता. परंतु १९०४-५ साली या कामाची पूर्ण विभागणी करण्यांत येऊन वहिवटदारांना न्याय देण्याच्या कामांतून पूर्णपणे वगळण्यांत आले मात्र अशा लोकांच्या फौजदारी खटल्यांसंबंधीचा अनुभव न्यायखात्यास मिळावा म्हणून त्यांतील कांही हुषार लोक न्यायखात्याकडे बदलून घेतले. सन १९०९ साली लॉर्ड मिंटो साहेबांनी महाराजांची या सुधारणेबद्दल स्तुति केली आहे. ब्रिटीश मुलुखांत अंमलात नसलेल्या ज्या सुधारणा महाराजांनी केल्या त्यापैकी ही एक प्रमुख होय.

इ.स.१८८२ साली जुन्या कायदेकानूंचे स्पष्टीकरण करून त्यांची नवीन धर्तीवर रचना करण्यासाठी महाराजांनी एक लॉ कमिटी नेमिली. परंतु तिचे काम समाधानकारक न झाल्यामुळे सन १८९२ साली जे. आर. नेलर व जे. एस. गाडगीळ या कायदेपंडितांच्या मदतीने नवीन पद्धतीवर दिवाणी व फौजदारी कायदे रचण्यांत आले. याच सुमारास इंग्लंडातील प्रिव्ही कौन्सिलप्रमाणे

---

* गॅझेटीअर २-३०५

एक न्यायसभा स्थापण्यांत येऊन तिजकडे महाराजांकडे येणाऱ्या सर्व अर्जांचा निकाल देण्याचे काम सोपविण्यांत आले. मि. नेलर यांना लीगल रिमेंम्ब्रन्सर म्हणून कायम करण्यांत आले. बडोदा न्यायसभेने दिलेल्या निकालांचा आधार ब्रिटीश हिंदुस्थानांतहि घेतला जातो इतके सांगितल्याने त्या कोर्टाची कार्यक्षमता कोणाच्याहि लक्षांत येईल.

महाराजांनी तिसरी सुधारणा म्हणजे लोकांना स्थानिक स्वराज्य देणे ही होय. महाराजांनी ग्रामसंस्थांचा पूर्वापार इतिहास लक्षांत घेऊन गांवकामगिऱ्या तशाच चालू ठेवण्याविषयी हुकूम दिला. गांवकामगारांत शाळा मास्तरांचाहि समावेश करण्यांत आला. सन १९०२ साली महाराजांनी ग्रामपंचायतींसंबंधी नवीन नियम केले. एक हजार लोकसंख्येच्या गांवी निम्मे लोकांनी निवडून दिलेले सभासद असावेत व निम्मे तालुक्याच्या मुख्याधिकाऱ्याने नेमावेत असे ठरले. पंचायतीतील सभासदांची संख्या ५ हून कमी व ९ हून जास्त नसावी; गांवचा पाटील हा त्या सभेचा अध्यक्ष व शाळामास्तर सभासद म्हणून घ्यावेत असे ठरले. अशा प्रकारे निवडणूकीचे तत्त्व पंचायतीत सुरू करून गांवच्या अंर्तव्यवस्थेचे सर्व हक्क पंचायतीस दिले. गांवांतील विहीरी, तलाव, शाळा, धर्मशाळा, देवस्थाने, सरकारी मिळकती व शेते यांच्या पंचायतीची देखरेख असाावी असे ठरविण्यांत आले, तसेच दुष्काळाचे प्रसंगी लोकांस मदत करणे, औषधोपचार करणे वगैरे बाबीहि पंचायतीकडे सोपविण्यांत आल्या. त्याचप्रमाणे पंचायतींना किरकोळ स्वरूपाच्या दिवाणी व फौजदारी खटल्यांचा निकाल देण्याचा अधिकार दिला. पंचायतींच्या सभा दर महिन्यास भरवून बऱ्याच गांवांच्या गटाने आपला एक प्रतिनिधी तालूका पंचायतीत पाठवावा असा नियम करण्यांत आला. अशा प्रकारची रचना तालुका पंचायतींची करण्यांत आली. तालुका पंचायतीचा अध्यक्ष नायबसुभा असून तीस आपला प्रतिनिधी प्रांत पंचायतीत पाठविण्याचा अधिकार असे. सुभा किंवा कलेक्टर हा प्रांत पंचायतीचा अध्यक्ष नेमला जाई. या पंचायतींनी दुष्काळाच्या वेळी उत्कृष्ट काम केलेले आहे. त्या प्रकारची उपयुक्त मदत खुद्द सरकारासहि देता आली नसती. १९०६ साली मोठ्या शहरांतील म्युनिसिपालिट्यांना स्थानिक स्वराज्याचे हक्क देण्यांत आले. ब्रिटीश मुलुखांत ग्रामपंचायतींची सुधारणा अजून अंमलात नाही, ती महाराजांनी अत्यंत पद्धतशीर व यशस्वी रीतीने आपल्या राज्यांत सुरू केली याबद्दल प्रत्येक जण त्यांना धन्यवादच देत राहील. महाराजांनी इलियट साहेबांना एका पत्रांत असे लिहिले आहे की, 'निदान शंभर गांवांत पंचायत निवडणूकींची पद्धति अंमलात आणावी. कारण खेडेगांवाची सुधारणा हा माझ्या सर्व सुधारणांचा पाया होय.' ब्रिटीश हिंदुस्थानांत सध्या 'ग्रामोद्धार' म्हणून जी चळवळ चालू आहे तिची कल्पना महाराजांस १९०० सालीच येऊन त्यांनी या बाबतीत पुष्कळ पुढे पाऊल टाकलेले आपणांस दिसून येईल व या बाबतीत जुन्या संस्था मोडून नव्या स्थापन करण्याऐवजी जुन्याच संस्थांस सुधारून नवे स्वरूप देणे हे अधिक फायदेशीर आहे हेहि दाखविले आहे.

बडोदे संस्थानात आजमितीस लोकोपयोगी सार्वजनिक गोष्टी पुष्कळ करण्यांत आल्या आहेत. राज्यांतील गरीब लोकांकरता लहानमोठे दवाखाने असून मोफत औषध देण्याची सोय करण्यांत आली आहे. असे दवाखाने संस्थानांत एकंदर ९३ असून 'लेडी डफरीन किंवा स्टेट

जनरल हॉस्पिटल' हे मुख्य सरकारी हॉस्पिटल आहे. यामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली रोग्यांकरता वेगवेगळे वार्डस ठेविले असून रोग्यांसाठी एक लहानशी लायब्ररीहि आहे.

सन १८९१ साली आरोग्यखाते (सॅनिटेशन डिपार्टमेंट) काढण्यांत आले आणि त्याकडे ग्रामपंचायतीच्या कचेऱ्या, देवी टोचणे, जन्ममृत्यूसंबंधी नोंद मॅजिक लॅटर्नच्या सहाय्याने व्याख्याने देणे, सिनेमा, प्रदर्शन यांच्याद्वारे शिशुसंगोपनाचे व आरोग्यसंवर्धनाचे प्रचारकार्य या बाबी सोपविण्यांत आल्या.

लोकांच्या जीवीताचे, मालमत्तेचे संरक्षण करणे हे राज्याचे प्रमुख कर्तव्य मानण्यांत येते, त्यांस अनुसरून पोलीस खात्याची घटना बनविलेली आहे. सन १८७८ साली पोलीस लोकांची पलटण तयार करण्यांत आली व १८८१ सालच्या पोलीस ॲक्टान्वये मिलीटरी खात्यापासून हे खाते वेगळे करण्यांत आले. पगारी पोलीस व गांवपोलीस असे दोन भेद पोलीसांत असून एक पोलीस खात्याच्या अधिकाराखाली असून दुसरे रेवेन्यू खात्याकडे दिलेले आहेत.

हुजूर हुकूमांची अंमलबजावणी व राज्यकारभाराची पद्धति लोकांस समजावी या हेतूने ब्रिटीश सरकारच्या 'गव्हर्नमेंट गॅझेट' प्रमाणे 'आज्ञापत्रिका' सुरू करण्यांत आली. तिच्यामुळे लोकांस राज्यकारभार कशाप्रकारे चालतो हे समजण्याचे एक सुलभ साधन झाले.

बडोद्यासारख्या राजधानीस पाणी पुरवठा आवश्यक जाणून तेथून १३ मैलांवर सूर्यानदीला बंधारा बांधून एक तलाव बांधण्याची योजना ता.८ जानेवारी १८८५ साली आंखली. हा तलाव 'सयाजी सरोवर' या नांवाने प्रसिद्ध असून तत्प्रीत्यर्थ ३४ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. अनेक युरोपियन तज्ज्ञांनी केलेल्या योजना गैरसोयीच्या ठरून अखेर बडोदे येथीलच जगन्नाथ सदाशिव नांवाच्या इंजिनियरनी केलेल्या या योजनेचे बांधणीचे काम चांगले झाले आहे. या सरोवरापासून बडोदे शहर व कँप यांना पाण्याचा मुबलक पुरवठा होतो व सरकारलाहि ७० हजार रुपये उत्पन्न मिळते. या तलावाला पुरवणी तलाव म्हणून प्रतापपुरा नांवाचा एक नवीन तलाव १९३० साली महाराजांनी बांधला आहे. याशिवाय राज्यांतील प्रमुख स्थळी व खेड्यांपाड्यांतून महाराजांनी असेच तलाव बांधून व विहिरी खणून आपल्या रयतेस पाण्याची सोय करून दिली आहे.

लोकांच्या देवघेवीचे व्यवहार सुरळीत चालावे यासाठी १८८९ त स्टँप ॲक्ट करण्यांत आला. परंतु त्यावेळी त्याविरुद्ध एकच गिल्ला झाला. तेंव्हा महाराजांनी त्याची उपयुक्तता लोकपक्षीय पुढाऱ्यास बोलावून आणून पटवून दिली. हे महाराजांच्या समयज्ञतेचे उदाहरण म्हणून दाखविता येईल.

सरकारोपयोगी व लोकोपयोगी इमारती लक्षावधि रुपये खर्च करून बांधण्यांत आल्या आहेत. अशा प्रकारच्या नवीन धर्तीवर तज्ज्ञ इंजिनियरांकडून बांधविलेल्या इमारती दुसऱ्या कोणत्याहि संस्थानांत पहावयास मिळणार नाहीत. त्याचप्रमाणे वाहतुकीच्या सोयीसाठी उत्तम रस्ते व सडका तयार करण्यांत आल्या असून पुष्कळ ठिकाणी पूलहि बांधलेले आहेत. यामुळे दळणवळण बरेच सुकर होऊन प्रजेच्या आणि सरकारी नोकरांच्या सुखांत भर पडली आहे.

●●●

८.
महाराज आणि बादशाही सत्ता

ब्रिटीशांनी हिंदुस्थानांत क्रमाक्रमाने व हळूहळू आपल्या सत्तेची स्थिरस्थावर केली, हे हिंदुस्थानचा इतिहास वाचणाऱ्यांस सहज अवगत होण्यासारखे आहे. त्या क्रमांत जसजशी सोय किंवा व्यवस्था कंपनीच्या अधिकाऱ्यांस व मुत्सद्यांस योग्य दिसली त्याप्रकारचे तहनामे किंवा निर्बंध संस्थानांवर घालण्यांत आले. नेपाळसारखी राज्ये अगदी स्वतंत्र आहेत. ग्वाल्हेर संस्थानाशी युद्धप्रसंग होऊन मांडलिक स्वरूपाचे तहनामे झाले आहेत. कित्येक रजपूत संस्थानांनी आपण होऊन ब्रिटीश सत्तेचा अवलंब केला आहे. अशा प्रकारचे निरनिराळ्या संस्थानांचे ब्रिटीश सरकारशी वेगवेगळ्या स्वरूपाचे संबंध आहेत. प्रत्येकाचे तह वेगळे आहेत. बडोद्याच्या गायकवाडांशी ब्रिटीशांचा दोस्तीचा संबंध जडलेला आहे. पेशव्यांशी इंग्लिशांचे युद्ध सुरू असता फत्तेसिंग गायकवाडाने सन १७७९ साली मोठ्या धोरणाने वागून ब्रिटीश जनरल गोडर्ड यांशी बचावाच्या व चढाईच्या स्वरूपाचा दोस्तीचा तह केला. म्हणून गायकवाड हे ब्रिटीशाचे दोस्त होत. परंतु तहांचा मतलब कसाहि असला तरी प्रत्यक्ष राजनीतीच्या व्यवहारांत मनुष्यस्वभाव व परिस्थिति या संबंधाने बरेच फेरबदल व स्थित्यंतरे होतात. आजकाल सर्व संस्थानांची स्थिती सर्वत्र एकसारखीच दिसून येईल. अंतर्गत कारभारांत पूर्ण मुखत्यारी, परंतु परराष्ट्रीय व्यवहार मात्र ब्रिटीश सत्तेच्या मार्फत चालावयाचा. परचक्राचे व परस्पर कलहांचे निवारण व निराकरण ब्रिटीश सरकारकडून व्हावयाचे. सकृद्दर्शनी असे वाटते की, संस्थानिक म्हणजे अत्यंत भाग्यवान व सत्ताधीश. प्रजा काडीचीहि तक्रार न करता निमूटपणे सारा देते व यंत्राप्रमाणे राजाचे सेवक तो बिनबोभाट वसूल करतात. अर्थात त्याची शक्तीही 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम' या स्वरूपाची असणार. परंतु हा निव्वळ आभास आहे. वस्तुस्थिती अगदी निराळी असते. संस्थानिकांचा गळा रेसिडेन्सीच्या जातीने बांधलेला असतो. रेसिडेन्सी डोळ्यांत तेल घालून संस्थानिकांचे कोठे चुकले व 'चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः' या नात्याने त्यांच्या संस्थानांत ढवळाढवळ करून संस्थानिकांच्या हक्कांची पायमल्ली कशी करता येईल व त्यांच्या कारभारावर ठपका आणण्यास कसे व केंव्हा मिळेल याची वाट पाहात असते.

एखादाच रेसिडेंट सुस्वभावी, सरळ व सौजन्याने वागणारा आणि संस्थानी कारभाराकडे सलोख्याच्या वृत्तीने पाहणारा असतो. तात्पर्य, संस्थानिकांची स्थिती म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशा प्रकारची लोकमत, अधिकारी किंवा ब्रिटीश सरकार यापैकी कोणीच त्यांचा वाली नाही. त्यांच्या अडचणी लोकचर्चेत येऊ न शकल्या कारणाने लोकांस त्यांच्या स्थितीची कल्पनाहि करता येत नाही किंवा त्यांच्याबद्दल सहानुभूतीहि उत्पन्न होऊ शकत नाही. संस्थानिक जर खासगी संकटात सापडला किंवा सार्वभौम सरकारशी त्याची तेढ पडली तर प्रजेपैकी किंवा नोकररूपी भाडोत्री यांच्यापैकी कोणीहि त्याच्या सहाय्यास येऊ शकत नाही. उलट अशा संकटसमयी दुर्बलतेने किंवा अज्ञानाने किंवा मूर्खपणाने त्याच्याविरूद्ध कोणी गेले नाही म्हणजे मिळविली. सारांश, संस्थानिकांचे संस्थानिकत्व सार्वभौम सरकारच्या कृपादृष्टीवर अवलंबून राहाते व त्याकरिता रेसिडेंटरूपी देवास वरचेवर आळवावे लागते.

सन १८९५ साली सयाजीराव जेंव्हा युरोपहून परत आले त्यावेळी बडोदे संस्थानांत अत्यंत चमत्कारिक व कठिण परिस्थिती निर्माण झाली होती. महाराजांचा स्वतंत्र बाणा, स्वाभिमान, उद्योगप्रियता, सर्वसंग्रहात्मक बुद्धि, निर्भिडपणा, परदेशांतील नूतन सुधारणा आत्मसात करण्याची विलक्षण हातोटी, बहुश्रुतपणा इत्यादी गोष्टींमुळे डोईजडपणाची धास्ती ब्रिटीश रेसिडेंटास वाटणे स्वाभाविक होते. त्यांतल्या त्यांत महाराजांचे पूर्वीचे शिक्षक व यावेळी सेटलमेंट कमिशनर म्हणून असलेले इलियटसाहेब महाराजांच्या स्वाभिमानाचे व हुषारीचे नेहमी कौतुक करीत. ह्या गोष्टी पुष्कळास सहन होत नसत. रा. वासुदेव सदशिव बापट या नांवाचे गृहस्थ इलियट साहेबांचे असिस्टंट होते. यांच्यावर साहेबांची महाल मर्जी होती. महाराजांनी सेटलमेंट खात्यांत सुधारणा करण्याचे ठरविल्यावर त्या खात्याच्या इनाम कमिशनचे स्वरूप आले. इनामावर आणेवारीचा आकार बसविणे, सनद नसल्यामुळे इनाम जप्त होणे वगैरे गोष्टी घडून आल्या. त्यामुळे इनामदार वर्ग असंतुष्ट झाला व या सर्वास कारण बापट अशी साहजिक सार्वत्रिक समजूत झाली. महाराजांस खासगी सल्लामसलतीत मग रेसिडेंट विरूद्ध का असेना - इलियट साहेबांचा उपयोग होई. या सर्व गोष्टींमुळे महाराज, इलियट, व बापट यांच्याविरूद्ध असंतुष्ट व लांचखाऊ लोकांची जूट झाली. आपल्याकडे वर्तमानपत्रांतून आलेल्या तक्रारींची चौकशी करण्यास रेसिडेंटने दरबारास सुचविले वास्तविक पाहता रेसिडेंटास दरबारांतल्या अंर्तव्यवस्थेत हात घालण्याचा कांहीच हक्क नव्हता. परंतु इंग्रजांच्या सोईप्रमाणे ब्रिटीश सरकारची देखरेख याचा अर्थ हवा तितका विस्तृत व संकुचित होऊ शकतो. इलियटसाहेबांच्या मागून नेमलेले सेटलमेंट कमिशनर मि. मेकॉनकी यांनी बापटांवर तरवार धरली. रेसिडेंट व दिवाण मणीभाईं जसभाई यांची त्यांना मदत होतीच. मणीभाईंना महाराज व रेसिडेंट या दोघांचीही भीती. महाराज युरोपांत असल्यामुळे रेसिडेंटाविरूद्ध जाण्याची दिवाण मणिभाईंची छाती होईना. यामुळे बापटांच्या खटल्याला निष्कारण मोठे स्वरूप आले. मेकॉनची साहेबांना दरबार व कोन्सिलकडून स्पेशल मॅजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले. ता. १३ ऑगस्ट १८९४ साली बापट कमिशन नेमले गेले. फिर्यादीपक्षातर्फे बॅरिस्टर ब्रॅन्सन व फेरोजशहा मेहता काम चालवीत होते आणि बापटांतर्फे दाजी आबाजी खरे व महादेव चिमणाजी

आपटे काम चालवीत असून बापटांचे स्नेही बाळ गंगाधर टिळक त्यांना मदत करीत होते. कमिशनने आपल्याकडे न्याय कोर्टाचा अधिकार आहे अशा समजुतीने वर्तन करून बापटांना ६ महिने साधी कैद व १० हजार रुपये दंड अशी शिक्षा देण्याची शिफारस केली. वस्तुतः ही नुसती चौकशी होती. महाराज १९ जानेवारी १८९५ साली विलायतेहून परत आल्यावर त्यांनी बापट प्रकरण हाती घेऊन दोघा कायदेपंडितांकडे सर्व कागदपत्र सोपविले आणि त्याशिवाय दिवाण (S.k.Iyengar) एक पारशी जज्ज यांचा अभिप्राय घेऊन बापटांना निर्दोषी ठरविले. मात्र त्यांना नोकरीवर रूजू करून घेतले नाही. महाराजांच्या मते अथपासून इतिपर्यंत बापट प्रकरण अत्यंत त्रासदायक होते. त्यांना तर या प्रकरणाची आरंभापासून कांहीच माहिती कळविण्यांत आली नाही. या सर्व प्रकाराबद्दल रेसिडेंटचा महाराजांवर फार मोठा घुस्सा झाला. रेसिडेंटचे म्हणणे की, महाराजांनी परदेशांस जातांना कौन्सिलला सर्वाधिकार देऊन जावे, व दिवाणांनी महत्वाच्या बाबतीत रेसिडेंटचा सल्ला घ्यावा. रेसिडेंटास भेटून महाराजांनी स्वच्छ सांगितले की, रेसिडेंटास संस्थानच्या अंतर्गत व्यवस्थेत हात घालण्याचा बिलकुल अधिकार नाही. परंतु रेसिडेंटने आपला दुराग्रह सोडला नाही, इतकेच नव्हे तर संस्थानांतील बऱ्या वाईट गोष्टींची माहिती आपणांस कळविली पाहिजे असेहि महाराजांस सांगण्याचे धार्ष्ट्य केले. अखिल हिंदुस्थानांत शांतता व सुव्यवस्था नांदावी याबद्दल ब्रिटीश सरकार जबाबदार आहे, ज्याअर्थी त्यांना सर्व हकीकती कळविल्याच पाहिजेत हा रेसिडेंटचा युक्तिवाद. परंतु महाराजांनी निक्षून सांगितले की, संस्थानांत शांतता आहे किंवा नाही ह्यावर देखरेख ठेवणे एवढेच रेसिडेंटाचे काम, अंतस्थ कारभारांत मन घालण्याचे त्यांस कारण काय ? महाराजांनी राज्यकारभारासंबंधी कोणत्याहि प्रकारची माहिती रेसिडेंटास पुरविण्याचे स्पष्टपणे नाकारले (?). यावर रेसिडेन्सीचे व हिंदुस्थानसरकारच्या अधिराज्याचे जू झुगारून देण्याचा हा महाराजांचा प्रयत्न आहे असेहि रेसिडेंटने भासविण्यास कमी केले नाही. यावेळी प्रकृति कामाच्या दगदगीने बिघडली होती. निलगिरी, महाबळेश्वर वगैरे ठिकाणी जाऊनहि त्यांना मनस्वास्थ्य वाटेना. अखेर दिवाणावर राज्यकारभार सोपवून महाराज विलायतेस गेले. इकडे रेसिडेंटने हिंदुस्थानसरकारचे सल्ल्याने महाराजांना आपले अधिकार कौन्सिलला देण्यांस भाग पाडले व दिवाणांना बहुतेक बाबतीत रेसिडेंटाचा सल्ला घ्यावा असे ठरविण्यांत आले. या प्रकाराबद्दल महाराजांनी तीव्र नापसंती आपल्या युरोपियन स्नेह्यांस दर्शविली आहे. मार्च १८९५ साली इलियट साहेबांना पाठविलेल्या एका पत्रांत महाराज लिहितात, एका रेसिडेंटच्या उपद्व्यापामुळे माझ्या इभ्रतीस धोका पोचून मानखंडना झाली आहे आणि नमुनेदार राज्यपद्धति अंमलात आणणे मुष्कील नसले तरी दुष्कर होऊन बसले आहे. या प्रकारामुळे माझे मन अत्यंत व्यग्र व उदास झाले आहे![*]

इ.स.१८९३ साली लॉर्ड लॅन्सडाऊन यांना महाराजांनी एक पत्र पाठवून केलेल्या तक्रारींचे लॉर्ड साहेबांनी जे उत्तर दिले आहे त्यांत महाराजांच्या इभ्रतीस धक्का न बसेल अशाबद्दल खबरदारी घेण्यांत येईल असे महाराजांना आश्वासन दिले आणि प्रकृति बिघडलेली आहे या

---

[*] राइस प्रथम खंड, पृ. १६४

सबबीवर महाराजांनी प्रकरण मिटते घ्यावे असेहि सुचविले. त्याप्रमाणे नाइलाजास्तव महाराजांनी व्हाइसरॉयांना पत्र लिहून दिवाण, २ नायब दिवाण, सैन्य व जमीनमहसूलखात्याचे अधिकारी यांच्या कौन्सिलास आपले हक्क देण्याबद्दल संमति दर्शविली. कौन्सिलला व दिवाणाला जादा अधिकार देण्यासंबंधाने महाराज नाखूष केंव्हाच नव्हते. परंतु बडोद्याच्या राज्यकारभाराची सूत्रे सिमल्याहून हालली जावीत ही गोष्ट यांना पटत नव्हती.

या प्रकारानंतर वरिष्ठ सरकारशी वाद माजण्याला दुसरे एक कारण झाले. १८९५ पासून १९०० पर्यंत महाराज कांही दिवस संस्थानांत, कांही महिने निलगिरी, काश्मीर, उटकमंड, वगैरे थंड हवेच्या ठिकाणी राहू लागले. इ.स.१८९९ साली त्यांनी नवीन व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांची भेट घेतली. कर्झन साहेब 'मोठे हुषार व व्यवहारदक्ष इसम आहेत' असे महाराजांनी नंतर त्यांच्यासंबंधी उद्गार काढले. परंतु या काटेकोर व्यवहारपटुत्वाचा प्रत्यय कर्झनसाहेबांना लवकरच आणून दिला. सन १९०० साली महाराणी चिमणाबाईसाहेब यांच्या ऑपरेशनसाठी महाराजांना युरोपास जाणे भाग पडले. ऑपरेशनमुळे महाराजांना महाराणी व्हिक्टोरिया यांनी राजवाड्यांत दिलेल्या गार्डन पार्टीससुद्धा हजर राहता आले नाही. त्याच साली व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन हे बडोद्याहून ग्वाल्हेरास गेले. बडोद्यास महाराज असल्यामुळे त्यांनी स्वागत समारंभ करून घेण्याचे नाकारले व त्याच सुमारास संस्थानिकांच्या वागणुकीसंबंधी 'कर्झन सर्क्युलर' बाहेर पडले. त्या सर्क्युलरचा आशय असा होता की, नेटिव्ह संस्थानिक हा ब्रिटीश साम्राज्याचा एक घटकावयव आहे आणि या दृष्टीने मी ज्यांना माझे सहकारी व भागीदार समजतो त्याने बेजबाबदारपणे वागून भागणार नाही. युरोपियन हॉटेल, रेसकोर्स, किंवा पोलोग्राऊंड व त्यांचे आगमन लोकांच्या हिताच्या दृष्टीने ठीक नाही. त्यांचे खरे कर्तव्य म्हणजे त्यांनी प्रजेच्या हिताकडे लक्ष देणे हे होय, शिवाय सर्क्युलरमध्ये मुख्य खरी खोच अशी होती की, संस्थानिकांनी व्हाइसरॉयच्या परवानगीशिवाय हिंदुस्थान सोडून जाऊ नये आणि अशा प्रकारची परवानगी देणे सर्वस्वी व्हाइसरॉयसाहेबांच्या मर्जीवर अवलंबून राहील. पुनः वादाचा प्रश्न उभा राहिला. महाराजांचा स्वभाव तर इतका दृढनिश्चयी आणि बाणेदार की, स्वतःच्या अधिकारावर अतिक्रमण त्यांस बिलकुल खपणे शक्य नव्हते. महाराज मोठ्या उद्वेगाने म्हणतात, 'आम्हाला संस्थानिक म्हणण्यांत येते, परंतु पगारी नोकरांपेक्षाहि तुच्छतेने वागविण्यांत येते !' याच सुमारास दादाभाई नौरोजी व सुप्रसिद्ध समाजसुधारक बी. एम. मलबारी यांनी महाराजांना खासगी पत्र लिहून ब्रिटीश सत्तेशी विरोध करून हात दाखवून अवलक्षण करून घेऊ नये म्हणून सुचविले. परंतु राणीसाहेब आजारी असल्यामुळे महाराजांना परत येता येणे शक्य नव्हते. महाराज ता. ८ ऑगस्ट १९०० रोजी दिवाण आयंगार यांना लिहितात, 'या सर्क्युलरमध्ये आमची शरीरप्रकृति व हितसंबंध यांची किंमत कस्पटासमान लेखिली आहे. आम्हांला या गोष्टी अगोदर कळल्या तर आम्ही आमच्या राणीसाहेबांना आजारी पडू नका म्हणून सांगितले असते.' त्यावेळचे प्रिन्स ऑफ वेल्स एडवर्ड यांचेहि असेच मत होते की, 'सर्क्युलरची भाषा सभ्य व सौजन्याची असती तर बरे दिसले असते, आणि त्यापेक्षा मित्रत्वाच्या सूचनेने पुष्कळ कार्य झाले असते.' महाराजांना १९०१ साल उजाडेपर्यंत हिंदुस्थानांत परत येता आले नाही. महाराजांनी परत आल्यावर दिवाणामार्फत 'सर्क्युलर'बद्दल आपली उघड

नापसंती व्हाइसरॉयास व्यक्त केली, परंतु यामुळे कर्झनसाहेबांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. व्हाइसराय झाल्यावर हिंदु लोकांवर सत्ता मिरविण्याची त्यांनी कांही बाकी ठेवले नव्हते. हे बादशहाचे प्रतिनिधी, तेंव्हा प्रतिनिधीपणाचा हक्क गाजवतांना उद्दामपणाच्या मनोधैर्याचा कळस व नानाप्रकारच्या प्रयत्नांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अपमान करण्यांत त्यांनी कोणताहि मोठा मनुष्य शिल्लक ठेवला नव्हता. सन १९०३ साली असाच मजेदार प्रसंग घडून आला. त्यांत कर्झन साहेबांच्या कुटिल राजनितीची व अरेरावीची मजल कोठपर्यंत गेली आहे हे सर्वांस कळून चुकले. या साली सातवे एडवर्ड यांच्या राज्यरोहणानिमित्त दिल्लीस दरबार भरविण्याचे ठरले. बडे लाट कर्झनसाहेब यांनी सदर प्रसंगी सर्व संस्थानिकांनी हजर राहावे म्हणून फर्माविले आणि प्रतयेक संस्थानिकांकडून त्यासंबंधी सूचना मागविल्या. हा दरबार म्हणजे ब्रिटीश सार्वभौम सत्तेचे एक बडे प्रदर्शनच. त्यांतून कर्झनसाहेबांसारखे कट्टर साम्राज्यवादी गृहस्थ व्हाइसरॉय. मग काय विचारता? 'संस्थानिकांनी अफगणिस्तानचे अमीर किंवा इराणचे शहा यांच्याप्रमाणे नुसते खुर्चीवर बसून न राहता दरबारप्रसंगी व हत्तीच्या मिरवणूकीचे वेळी मनःपूर्वक आपल्या राजनिष्ठेचे प्रदर्शन करून समारंभात भाग घ्यावा,' अशा अर्थाचे कर्झनशाही हुकूम सुटले. महाराजांनी ही गोष्ट आपल्यास साफ नापसंत असल्याचे रेसिडेंटास कळविले. तरी पण सार्वभौम बादशहाविषयी आपला यत्किंचीतहि अनादर दाखविण्याची मात्र आपली इच्छा नाही असे महाराजांनी बोलून दाखविले. मिरवणूकीत भाग न घेतल्याने संस्थानिक अराजनिष्ठ ठरतो, तर मग संस्थानिकांशी याबाबतीत विचारविनीमय करण्याची तसदी लाटसाहेबांनी निष्कारण का बरे घेतली? 'संस्थानिकांनी मिरवणूकीत भाग घेतलाच पाहिजे. बुद्धिपुरस्सर त्यांनी तसे न केल्यास त्यांचा अपमान केला जाईल' अशा प्रकारची सक्ती सार्वभौमसत्तेने केल्यास महाराज समारंभात भाग घेतील परंतु ही गोष्ट यांना अंतःकरणापासून पसंत आहे म्हणून नव्हे, अशाप्रकारचे महाराजांनी आपले विचार अगोदर कळविले. दुसरा वादाचा मुद्दा असा की, महाराजांच्या खास नोकरांचे पोषाख निळया रंगाचे होते. निळा रंग सार्वभौमसत्तेचा निदर्शक साम्राज्यपदाची धुंदी चढलेल्या कर्झनसाहेबांस ही गोष्ट कशी खपणार? त्यांनी लगोलग हुकूम काढून अशा प्रकारचे बरोबरीच्या नात्याचे सम्राट प्रतिनिधीस उपमर्दकारक वाटणारे पोषाख संस्थानिकांच्या नोकरांस वापरण्यास मनाई केली.

ता. १ जानेवारी १९०४ रोजी दरबार भरविण्यांत आला. त्याचे आदले दिवशी दिवाणसाहेब, राजघराण्यांतील इतर मंडळी यांच्यासमवेत दिल्लीस पोचले. समारंभास बादशाहाचे बंधु ड्यूक ऑफ कॅनॉट व त्यांच्या पत्नी उपस्थित होत्या. समारंभाचे वेळी बादशहाच्या बंधूस खालची खुर्ची देऊन कर्झनसाहेबांनी वरची घेतली. व्हाइसरॉयचे भाषण झाल्यानंतर बादशहांचे भाषण वाचून दाखविण्यांत आले. यानंतर प्रत्येक संस्थानिकाने बादशहाचे प्रतिनिधी व बंधु यांना प्रणाम करून आपली राजनिष्ठा व्यक्त करावयाची होती. निजामसाहेब शिरस्त्याप्रमाणे कुर्निसात करून परत आपले जागेवर येऊन बसले. यानंतर महाराजांची पाळी होती. महाराजांनी शांतपणाने व्हाइसरॉय यांना उद्देशून 'राज्यारोहण व नूतन वर्षाबद्दल माझा अभिनंदनपर संदेश बादशहांना कळविण्याची तसदी व्हाइसरॉयसाहेबांनी घ्यावी' असे सूचक उद्गार काढून ते आपले जागेवर येऊन बसले. महाराजांचा बाणेदारपणा व स्वाभिमान वरील गोष्टीत प्रतीत होत नाही काय? अखेर शेवटी

कर्झनसाहेबांनी आपल्या हृदयांत दमदमणारा साम्राज्यवादाचा नगाराच नुसता वाजविला. १९०५ सालीहि प्रिंस ऑफ वेल्स (हल्लीचे बादशहा) हिंदुस्थानांत आले त्यावेळीहि अशीच गोष्ट घडली. महाराज त्यावेळी बडोद्यांत नव्हते. व्हाइसरॉय साहेबांनी याबद्दल महाराजांस संस्थान सोडून कोठेहि बाहेर जाण्याची कायमची बंदी करण्याचे ठरविले. परंतु खुद्द बादशहांनी त्यावेळी कर्झन साहेबांचे अंतस्थ कान पिळून तसे करण्यास मनाई केली असे म्हणतात.

एकंदरीने कर्झनशाहीची झळ महाराजासही लागली, परंतु महाराजही तोडीस तोड होते.

यानंतर महाराजांनी काश्मीरची सफर केली. १९०५ साली वंगभंगाची चळवळ सुरू झाल्यावर अरविंद घोष यांनी बडोद्यांतील आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. यावेळी स्वदेशी चळवळीची लाट चोहीकडे उसळली होती. त्याचे पर्यवसान बंगालमध्ये अत्याचार होण्यांत झाले. ऑगस्ट १९०९ साली व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांच्याकडून महाराजास कळविण्यांत आले की, 'देशांत अशांतता व अराजकता माजली असल्याकारणाने तिची पाळेमुळे खणून टाकण्यास संस्थानांनी मदत करावी' परंतु बडोद्यास राजद्रोह होता कोठे? प्रजेचे राजे महाराजे आणि ते तर प्रजेचे अत्यंत आवडते. मात्र ब्रिटीश मुलुखांत राजद्रोहाचे बीज रुजून त्यांचा वृक्ष फोफावण्याची सुरूवात झाली होती.

नोव्हेंबर महिन्यांत व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांनी बडोद्यास भेट दिली. महाराजांनी लक्ष्मीविलास राजवाड्यांत त्यांचे थाटात स्वागत केले. भोजनप्रसंगी महाराजांनी गायकवाड सरकारचे धोरण नेहमी सार्वभौम सभेशी राजनिष्ठ राहील अशी ग्वाही दिली. आपल्या भाषणांत महाराजांनी राजनिष्ठ ही राजा व प्रजा यांच्या परस्पर प्रेमावर अवलंबून राहील; प्रजेला राजसत्तेची अंशभाकू करणे हे राजाचे कर्तव्य होय असे सांगितले. व्हाइसरॉयांनीही आभारप्रदर्शनार्थ इतर महाराजांनी आपल्या राज्यांत केलेल्या सुधारणांबद्दल त्यांची स्तुति गाइली व यानंतर समारंभ खलास होऊन व्हाइसरॉय परत गेले. सन १९१० साली टाइम्सने असे प्रसिद्ध केले की, 'एकट्या गायकवाड सरकारखेरीज करून इतर सर्व संस्थानांनी आपापल्या राज्यांतून राजद्रोहाचे समूळ उच्चाटन करण्यांस संमति दिली आहे. बंगाल्यांतील 'अमृत बझार' नावाच्या जहाल वृत्तपत्राने एक लेख लिहून महाराजांनी वरिष्ठ सरकारला पाठविलेल्या उत्तराबद्दल त्यांची पाठ थोपटली. या गोष्टींचा विपरीत अर्थ करण्यांत येऊन महाराज अराजकतेला उत्तेजन देतात अशाप्रकारचा वरिष्ठ सरकारचा ग्रह झाला. वंगभंगाच्या चळवळीत प्रसिद्धीस आलेले अरविंद घोष व कृष्णवर्मा ह्यांची महाराजांपाशी पूर्वी नोकरी झाली, यामुळे महाराजांवरचा संशय दृढ झाला. १९२६ साली महाराजांनी त्यावेळची आठवण सांगतांना असे प्रतिपादन केले की, 'त्यावेळी मी संस्थानांत केलेल्या सुधारणांमुळे लोक मजला अतिशय चाहत असत. याचा विपरीत अर्थ अँग्लो इंडियन वृत्तपत्रे व ऑफिसर्स यांनी केला.' संस्थानिकाने प्रजेचे आवडते होऊ नये ही ब्रिटीश राज्यांतील तेव्हाची न्यायनिती खरोखर औरच म्हणावयाची. कांही दिवसांनी महाराज युरोपच्या प्रवासास निघून गेले. २२ जून १९११ रोजी विलायतेस झालेल्या राज्यारोहण प्रसंगी महाराज व महाराणीसाहेब जातीने हजर होत्या. दिल्लीस दरबार भरवून हिंदुस्थानचे बादशाहीपद जॉर्ज बादशहा व महाराणी मेरी यांनी धारण करावे असे यानंतर व्हाइसरॉयांनी ठरविले. त्याकरिता सयाजीराव महाराज नोव्हेंबर

महिन्यांत बडोद्यास आले. डिसेंबर ५ रोजी बादशहांची स्वारी दिल्लीस आली. मोठा दरबार भरवून राजेसाहेबांचे भाषण झाल्यावर व्हाइसरॉय व एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर यांनी शिरस्त्याप्रमाणे कुर्निसात करून ते आपापल्या जागांवर जाऊन बसले. नंतर हैद्राबादचे निजाम, गायकवाड, म्हैसूरचे राजेसाहेब, काश्मीरचे राजेसाहेब वगैरेंचा क्रम ठरविला होता.

या समारंभाच्या पूर्वी झालेल्या तालमीस महाराज प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे स्वतः हजर राहू शकले नाहीत. त्यांनी श्री. संपतरावांस पाठविले होते व त्या दिवशी त्यांच्या मनाची कांही खाजगी गोष्टींमुळे चलबिचल झाली होती. त्यादिवशी ते बादशहांनी नजर केलेले स्वस्तिक व पट्टा घालण्याचे विसरले. दरबारास जातेवेळी गाडीत रेसिडेंटसाहेबांनीहि त्यांना या गोष्टीची आठवण करून दिली नाही. दरबारांत कुर्निसात केल्यानंतर महाराजांनी पुढे होऊन प्रणाम केला; परंतु गोंधळून जाऊन ते लगेच पाठ फिरवून परत फिरले.

आपल्या हातून एखादी चूक झाली आहे किंवा काय हे ता. १२ पर्यंत महाराजांस माहीत नव्हते. दरबारानंतर महाराज गव्हर्मेंट होममध्ये गेले. परंतु तेथे लॉर्ड सिडेनहॅम नाहीत, असे त्यांना सांगण्यांत आले. दुसरे दिवशी नामदार गोखले यांनी महाराजांना त्यांच्यासंबंधी उठलेल्या काहुराची बातमी दिली आणि महाराजांपासून माफी लिहून घेण्याचाहि सरकारचा विचार असल्याचे त्यांनी कळविले. त्यानंतर महाराजांनी व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिज यांना पत्र लिहून झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली. ती-'प्रिय लॉर्ड हार्डिज, मी ज्या पद्धतीने सार्वभौम बादशहा व महाराणी यांना प्रणाम केला त्यावर सर्वांचे बरेच प्रतिकूल मत झाले असे मी ऐकिले. सार्वभौमांचा कोणत्याहि प्रकारे भरदरबारांत अपमान न होईल असे वर्तन करण्याची शक्यतोवर मी खबरदारी घेतली होती व सार्वभौमांनी अगर इतर कोणीहि माझ्या राजनिष्ठतेबद्दल साशंक होईल असे कांही न घडावे असेच मजला वाटत होते. ब्रिटीश सरकारशी मी व माझे संस्थान अत्यंत ऋणी व राजनिष्ठ राहिले आहे. उच्चासनापासून परत फिरतांना मजकडून दरबारी शिष्टचाराचा भंग झाला असे सांगण्यांत येते. खरोखरी त्यावेळी मी त्या भव्य दरबारांत गोंधळून गेल्यामुळे मी काय करीत आहे याचे मला भान देखील राहिले नाही. माझे अगोदर एकट्या निजाम सरकारची स्वारीच कुर्निसांत करून गेली होती व त्यावेळेस त्यांच्या बारीक सारीक गोष्टींकडे मला लक्ष देता आले नाही. त्यानंतर लागलीच माझी पाळी असल्यामुळे मी प्रणाम करून बाहेरची वाट पाहण्यासाठी गोंधळून इकडे तिकडे पाहू लागलो व मी योग्य वाटेने मार्गस्थ झालो अशी माझी कल्पना होती. माझ्या या चुकीबद्दल मी अत्यंत दिलगीर आहे.'

महाराजांविरूद्ध यावेळी टीकेची बरीच मोठी झोड उठली. निरभ्र आकाशांत ढग येऊन एकदम वीज कडकडावी त्याप्रमाणे दरबारप्रकरणाने मोठीच खळबळ उडवून दिली. लंडन टाइम्सने महाराजांचा कृष्णवर्मा, घोष इत्यादी क्रांतिकारकांशी संबंध जोडला व त्यांच्या कृत्यास महाराजांची फूस आहे सबब सरकारने महाराजांची बिलकूल गय न करता त्यांना आठवण राहण्याजोगे शासन करावे असे सुचविले. पॅरिसच्या 'ताँ' पत्राने ब्रिटीश राज्याविरूद्ध हिंदुस्थानांत किती असंतोष व अप्रिती आहे हे गायकवाडांच्या दरबारांतील वागणुकीवरून स्पष्ट होण्यासारखे आहे अशी टीका केली.

इंग्लंडातील मजूरपक्षाचे पुढारी कीरहार्डी यांनी 'पायोनियर' पत्रांत लेख लिहून महाराजांच्या कोणापूढेहि मान न वाकविण्याच्या स्वाभिमानाची स्तुति केली , परंतु 'दी वर्ल्ड' पत्रांत महाराजांविरूद्ध आगपाखडण्यांत आली.

ता. ३१ डिसेंबर रोजी महाराजांनी लंडन टाइम्सला पत्र लिहून क्रांतिकारकांशी आपला संबंध असल्याबद्दल त्या पत्रांत आलेली टीका अवास्तव, विपर्यस्त, खोडसाळ भ्रममूलक आहे हे सोदाहरण दर्शविले.

यानंतर सात आठ महिन्यांनी व्हाइसरॉयांचे बंधु व्हायकौंट हार्डिज यांनी एका व्याख्यानाचे प्रसंगी दरबार प्रकरणाबद्दल उल्लेख केला. त्यांत सयाजीराव महाराजांसारखा अनुभवी, सुशिक्षीत व जगभर प्रवास केलेल्या माणसाकडून अशा प्रकारची गोष्ट बुद्धिपुरस्सर होणे शक्य नाही; त्यावेळी ते गोंधळून गेले असले पाहिजेत हीच गोष्ट जास्त संभवनीय आहे असे उद्गार काढले. त्यावर 'पॉलमाल गॅझेट' मध्ये एक कडक टीका आली होती. महाराजांनी २६ जून १९१२ रोजी मि.एम.एच.स्लिपमन यांना पाठविलेल्या पत्रांत ते लिहितात, 'रेसिडेंटसाहेबांनी मला एकदांच प्रणाम करण्यास सांगितले होते. महाराजांनीहि प्रणाम करण्याइतके स्त्रीदाक्षिणात्य माझ्यांत नव्हते असे नाही. रेसिडेंटने एकच प्रणाम करण्यास सांगितले तेंव्हा मला जरा चमत्कारिकच वाटले, पण या बाबतीत प्रश्न करणे हे गैरसोयीचे होते.'

यानंतर ही भडकलेली आग आपोआप थंड झाली व विरोधाचे आभाळ निवळले. परंतु संस्थानांत अराजकतेची बीजे पेरली गेली आहेत हा ब्रिटीश सरकारचा वहीम अजून शिल्लक होताच.

अमरेली प्रांतात सुभे बॅ. के. ग. देशपांडे हे गृहस्थ ब्रिटीशांविरूद्ध प्रचारकार्य करतात, म्हणून त्यांना संस्थानी नोकरीतून काढून टाकण्यांत यावे अशी मागणी हिंदुस्थान सरकारने केली. परंतु देशपांड्यांच्या विरूद्ध तशाप्रकारचा पुरावा मात्र ब्रिटीश सरकारास देता आला नाही. महाराजांनी देशपांडे यांना नुकसानीबद्दल १० हजार रुपये देऊन नोकरीतून रजा दिली. दुसरे उदाहरण म्हणजे बडोदा कॉलेजचे प्रोफेसर डी. एल. पुरोहित हे निरनिराळ्या समाजांचा अभ्यास करण्यास्तव हिंदुस्थानांत हिंडत असतां पांडिचेरीस जाऊन त्यांनी बाबू अरविंद घोष यांची गांठ घातली. अरविंद घोष हे पूर्वी बडोद्यांस नोकरीत होतेच. परंतु हे सरकारच्या मताने बडे क्रांतिकारक. अर्थात पुरोहिताचा हा भयंकर गुन्हा ठरविण्यांत आला व त्यांनाहि बडोद्याच्या नोकरीतून कमी करण्यांत यावे अशी मागणी करण्यांत आली. परंतु पुरोहितांनी पुढील प्रसंग जाणून १९१२ साली आपल्या जागेचा राजीनामा दिला व महाराजांनी तो स्वीकारला.

त्यांच्या सर्व छळवादाच्या मुळाशी दरबारप्रकरण आहे असे त्यावेळी सर्वांच्या मनाने घेतले. वस्तुतः स्वातंत्र्याच्या ध्येयाचा जनतेत प्रसार करणे हा इंग्रजी न्यायशास्त्रान्वये बिलकुल गुन्हा होत नाही. परंतु स्वदेशाभिमान म्हणजे अराजकता असा कांही विपरीत अर्थ त्यावेळच्या राजकारणांत गणला गेला व महाराजांसारख्या स्वाभिमानी व स्वदेशाभिमानी संस्थानिकाविरूद्ध निष्कारण गिल्ला करण्यांत आला, हे आजमितीस कोणासहि सहज कळून येण्यासारखे आहे. महायुद्धांत बडोदे सरकार राजनिष्ठ की अराजनिष्ठ याची प्रचीती सार्वभौम सरकारास आलीच आणि

महाराजांच्या हेतूविषयी अकारण गैरसमज पसरविला याबद्दल सार्वभौम सरकारास त्यावेळी काय वाटले असेल ते असो. महायुद्धांत ब्रिटीश सरकारास मदतीदाखल महाराजांनी ७ लाख रुपये दिले व १ कोटी रुपयांचे चार बॉंडस खरेदी केले. युद्धांत ब्रिटीश सरकारला मदत केल्याबद्दल १९१७ साली महाराजांना जी. सी. आय. ई. ही पदवी बादशहाकडून देण्यांत आली.

महायुद्धानंतर व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांचे भेटीकरिता महाराज सिमल्यास गेले. यावेळी विचारविनीमय करता यावा म्हणून सर्व संस्थानिकांचे एक 'नरेंद्रमंडळ' काढण्यांत आले आणि व्हाइसरॉय साहेबांना त्याचे अध्यक्ष नेमण्यांत आले. इ.स.१९२१ साली प्रिन्स ऑफ वेल्स जेंव्हा बडोद्यास आले त्यावेळी त्यांचे थाटाचे स्वागत करून सर्व जडजवाहीर, प्रेक्षणीय वस्तु महाराजांनी दाखविल्या. युवराज साहेबांचा मुक्काम बडोद्यांस फार थोडा असल्याकारणाने समारंभ लवकरच उरकण्यांत आला.

यानंतर २१ जानेवारी १९२६ रोजी व्हाइसरॉय लॉर्ड रीडींग व लेडी रीडींग यांनी बडोद्यांस भेट दिली. स्वागत समारंभ झाल्यानंतर महाराजांनी त्यांना एक थाटाची मेजवानी दिली. त्याप्रसंगी खालसा मुलुखांतील स्वराज्याच्या चळवळीचा उल्लेख करून महाराज म्हणाले की, हिंदी संस्थानांचे हक्कसंरक्षण साम्राज्यसरकारने अवश्य केले पाहिजे. त्यांचे पूर्वापार चालत आलेले मानमरातब व अधिकार यांस नवीन राज्यघटनेत धक्का बसता कामा नये. आपल्या संस्थानासंबंधी बोलतांना ते म्हणाले की, शंभर वर्षांपूर्वी ब्रिटीशांनी गायकवाड सरकार व त्यांचे मांडलिक यांच्या परस्पर संबंधांच्या बाबी आपल्या हातांत घेतल्या होत्या, आजतागायत तीच व्यवस्था अंमलात आहे. सध्याच्या लोकशाहीच्या नवीन गरजू मांडलिक संस्थनांचा ताबा गायकवाड सरकारास परत देणे हे साम्राज्य सरकारच्या हिताचे आहे, कारण त्यामुळे साम्राज्य सरकारवरील एक जबाबदारी कमी होणार आहे. उत्तरादाखल व्हाइसरॉयांनी असे आश्वासन दिले की, हिंदुस्थानच्या नवीन राज्यघटनेत संस्थानिकांचे हितसंबंध अबाधित राहतील. महाराजांच्या इतर मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल असे त्यांनी अभिवचन दिले. त्यानंतर बडोदा कॉलेजचे सायन्स इन्स्टिट्यूशनचा पायाचा दगड बसविण्याचा समारंभ उरकल्यानंतर व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन व लॉर्ड विलींग्डन यांनीहि बडोद्यांस भेटी दिल्या.

संस्थानिकांच्या प्रश्नासंबंधाने साम्राज्य सरकारने नेमलेल्या बटलर कमिटीपुढील साक्षीत बडोदे संस्थानची जी कैफियत होती त्यांत संस्थानिकांचा संबंध बादशहाशी आहे व नवीन राज्यघटनेत संस्थानिकांचे हक्कसंबंध व तहनामे योग्य रीतीने पाळण्यांत यावेत वगैरे मुद्दे होते. यासंबंधी सांगोपोग विवेचन करण्याचे हे स्थळ नव्हे. आतापर्यंतच्या हकीकतीवरून महाराजांचे राजकीय बाबतीत वरिष्ठ सरकारशी संबंध कोणकोणत्या स्वरूपाचे होते हे कळण्यासाखे आहे. संस्थानिकांचे मध्यवर्ती सत्तेशी संबंध कशा स्वरूपांत असावेत याबद्दल निश्चित योजना हिंदुस्थान सरकारजवळ नाही. तहनामे व करार यांचे अर्थ ब्रिटीश सरकार म्हणेल तसे व्हावयाचे. संस्थानिकांच्या सूचना बिलकूल विचारांत घेतल्या जात नाहीत. ही स्थिती राजकीय प्रश्नासंबंधानेच आहे असे नाही. इतर प्रश्नासंबंधानेहि हीच तऱ्हा आहे. १९०४ साली कर्झन साहेबांनी इंपिरियल सर्व्हिस सिस्टिम संबंधाने जो खलीता सर्व संस्थानिकांकडे पाठविला होता, त्यांत हिंदुस्थानचे

परचक्रापासून संरक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटीशांवर आहे व ती ते सरकार उत्तम रीतीने पार पाडते; यास्तव संस्थानिकांनी ब्रिटीश सरकारला सैन्य व पैसा यांची मदत करणे अवश्य आहे असे म्हंटले होते. महाराजांनी प्रत्युत्तरांत असे प्रतिपादन केले की, साम्राज्य संरक्षणाचा भार जर अंशतः संस्थानिकांनीहि उचलावयाचा असेल तर त्यांना साम्राज्य सरकारच्या कौन्सिलांत प्रतिनिधीत्व देणे क्रमप्राप्तच होय. कर्झनसाहेबांच्या खलित्यास महाराजांनी नकारार्थी उत्तर पाठविले हे सांगणे नकोच. परंतु यानंतर हा प्रश्न पार मागे पडला.

आर्थिक बाबतीत वरिष्ठ सरकारशी बडोदे संस्थानाचा संबंध अफू, मीठ, जकाती या बाबींसंबंधाने आलेला आहे. अफूची निर्यात हिंदुस्थानसरकारने कायद्याने बंद केली व संस्थानांनाहि तसे करण्यास भाग पाडले. त्यामुळे बडोदे संस्थानचे अफूचे उत्पन्न वाढले. त्याप्रमाणे मिठावर हिंदुस्थानसरकारने जकात वाढविली व खाजगी मीठ तयार करण्यांस कायद्याने मनाई केली, आणि गायकवाड सरकारासहि आपल्या राज्यांत मिठागरे बांधण्यास विरोध केला. दरबारने याबद्दल निषेध प्रदर्शित केला. परंतु वरिष्ठ सरकारने आपला हट्ट शेवटास नेला. इ.स.१९०६ साली महाराजांनी एक मेमोरँडम व्हाइसरॉयकडे पाठवून संस्थानांत मीठ तयार करून ते ब्रिटीश जकात देऊन पाठविण्यास हरकत नसावी म्हणून कळविले. परंतु त्यास नकारार्थी उत्तर पाठविण्यांत आले. सध्या ओखाबंदरातून मीठ तयार करून बंगालमध्ये पाठविण्याचा हक्क संस्थानास मिळाला आहे असे समजते.

तिसरी गोष्ट जकातीची. सन १८९४ साली हिंदुस्थानसरकारने सरसकट परदेशी मालावर जकाती बसविल्या व संस्थानांनी आपल्या मुलुखांत तशा प्रकारची व्यवस्था अंमलात आणावी म्हणून त्यांना कळविण्यांत आले. तसे न झाल्यास संस्थानी मुलुखाभोवती हिंदुस्थानसरकार जकातीची नाकी बसवील अशी भीती घालण्यांत आली. सन १९०३ साली कांठेवाडी बंदरातून येणाऱ्या मालावर जकात घेण्यासाठी विरमगांव येथे आयात जकातीचे मोठमोठे तट उभारण्यांत आले. यामुळे व्यापारी लोकांस दुप्पट जकातीचा भूर्दंड भरावा लागला. संस्थानांनी या बाबतीत वरिष्ठ सरकारने कागाळ्या केल्या व बडोदे संस्थानाने जोराची तक्रार केली, तेंव्हा विरमगांवचे ठाणे उठविण्यांत आले. परंतु १९२७ साली पोरबंदर, भावनगर, बेंडी, ओखा वगैरे बंदरांचा व्यापर वाढल्यामुळे पुनः विरमगांव नाके बसविण्यांत आले. महाराजांनी पुनः याबाबतीत पुष्कळ उचल घेतली, कांही अटी सुचविल्या, परंतु हिंदुस्थान सरकारने त्या सर्व नाकबूल केल्या. सध्या हा प्रश्न तसाच अनिर्णित आहे.

सन १९३०-३१साली लंडनला झालेल्या तिन्ही गोलमेज परिषदांत श्री. महाराजसाहेब सभासद होते. परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे त्यांना या परिषदांत जातीने विशेष भाग घेता आला नाही. सन १९२९ सालचा अर्धाअधिक भाग महाराजांनी जगांतील निरनिराळ्या राज्यघटनांचा खोल अभ्यास करण्यांत घालवून आपली स्वतंत्र टिपणे तयार केली. ती खाजगी उपयोगाकरिता त्यांनी छापविली आहेत. सन १९३० सालच्या नोव्हेंबर महिन्यांत पहिल्या गोलमेज परिषदेला सुरुवात झाली. त्याप्रसंगी सुरूवातीस केलेल्या आपल्या भाषणांत त्या प्रसंगाचे महत्व किती आहे हे सांगून हिंदी संस्थानिकांस व हिंदी लोक यांच्या सर्व न्याय्य आकांक्षा पूर्ण

करून सन १८५८ सालच्या राणीसरकारच्या जाहिरनाम्यांतील "हिंदवासीयांचे ऐश्वर्य म्हणजे आमचे बळ, त्यांचा संतोष हीच आमची सुरक्षितता, व त्यांची कृतज्ञता हेच आमचे पारितोषिक" हे शब्द सार्थ करावे असे अर्थपूर्ण उद्गार महाराजांनी काढले होते. नंतर हिंदी संस्थानिकांच्या खासगी चर्चेत व परिषदेत महाराजांनी संयुक्त राज्यघटनेचा (Federation) पुरस्कार करून इतर संस्थानिकांचीहि या राज्यघटनेत सामील होण्यासाठी इतर संस्थानिकांचीहि मने वळविली. दुसऱ्या परिषदेचे सुरवातीसहि महाराजांनी फेडरेशनचा जोराचा पुरस्कार केला होता. संयुक्त विषय (Federal subjects) सोडून इतर बाबतीत संस्थानिकांस पूर्ण स्वातंत्र्य असावे असे महाराजांचे मत असून गेल्या डिसेंबरात सध्याचे व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन हे बडोद्यास आले असतांना त्यांनी आपल्या भाषणांत या गोष्टीवर विशेष भर दिला होता. महाराजांची ही विचारसरणी व्हाइसरॉयांना पटल्याचे त्यांच्या भाषणावरून दिसून आले.

●●●

९.
महाराजांचे प्रवास

केल्याणे देशाटन पंडित मैत्री, सभेत संचार ।
शास्त्रार्थ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ।।

"युरोप अमेरिका येथील लोकांची राहणी, त्यांची सामाजिक स्थिती, त्यांची उन्नति व आपली हिनता इत्यादि नानाप्रकारचे विचार माझ्या मनांत घोळत असत. देशपर्यटन करणे हे ज्ञानाचे मुख्य साधन आहे, या विचारांनेच मी जगभर प्रवास करण्याचे ठरविले." हे महाराजांच्या शब्दांतच सांगावयाचे झाल्यास त्यांच्या प्रवासाच्या आवडीचे एक कारण होय. कांही प्रसंगांमुळे व विशेषतः माझ्या प्रकृतीमुळे, वेळोवेळी हिंदुस्थानीय लोक प्रवास करतात त्याप्रमाणे मला मोठा प्रवासी बनावे लागले, हे दुसरे कारण. पुढे पुढे तर महाराजांस गुडघी रोगाची व्यथा जडली व थारेपालट करणे आवश्यक झाले.

महाराजांच्या शब्दांत दिलेल्या कारणावरून त्यांनी इतर कोणत्याहि संस्थानिकांपेक्षा जास्त प्रवास कां करावा याचा उलगडा होण्यासारखा आहे. महाराजांच्या पहिल्या महाराणी चिमणाबाईसाहेब यांच्या मृत्यूनंतर महाराजांची मनःस्थिती अस्वस्थ होती. कोणतीहि गोष्ट करण्यास त्यांस हुरूप किंवा उत्साह वाटेना, आणि दुसरा विवाह झाल्यानंतरहि प्रकृतीत फेरबदल होण्याचे फारसे चिन्ह दिसेना. डॉक्टरांनी हवाफेर करण्याचा सल्ला दिल्यावरून महाराजांनी इ.स.१८८२ च्या नोव्हेंबरांत सिलोनला जाण्याचे ठरविले. दोन तीन आठवडे तेथे काढून ते परत महाबळेश्वरी आले. परंतु थंड हवेच्या ठिकाणीही त्यांना चैन पडेना. त्यांचे वजनहि बरेच घटले व झोपहि चांगली लागेनाशी झाली. अखेरीस मुंबई सरकारचे त्यावेळचे सर्जन सर विल्यम्स मूर यांच्या सल्ल्यावरून त्यांनी युरोपास जाण्याचे ठरविले. राज्याची सर्व सूत्रे दिवाण लक्ष्मण जगनाथ यांच्या हवाली करून ता. ३१ मे १८८७ रोजी महाराज, महाराणी चिमणाबाईसाहेब, एक खासगी डॉक्टर व नोकर चाकर इत्यादि ५० मंडळी यांच्यासमवेत युरोपच्या पहिल्या सफरीस निघाले. त्यावेळी परदेशी प्रवास करणे म्हणजे अधर्माचरण अशी लोकांची समजूत

होती. अशा माणसास जातीतून बहिष्कृत व्हावे लागे. युरोपचा प्रवास पुष्कळ लांबीचा, बऱ्याच मुदतीचा, त्रासदायक व शिवाय धर्मशास्त्राविरूद्ध असल्याने महाराजांचे सर्व आप्त, इष्टमित्र, नोकरचाकर, प्रजाजन वगैरे सर्व एकसमयावच्छेदेकरून त्या सफरीच्या विरूद्ध होते. महाराजाच्या मातुश्री महाराणी जमनाबाईसाहेब ह्या प्रतिकूल होत्या. परंतु महाराजांनी सर्व अडचणी व विरोध बाजूस सारून युरोपास जाण्याचे ठरविले. अज्ञानाने निष्कारण कांही भ्रामक समजुती उराशी बाळगून धर्मशास्त्राचे व्यर्थ स्तोम माजविणे महाराजांस बिलकूल पसंत नव्हते. या बाबतीत महाराजांचा करारीपणा, मानसिक धैर्य, दृढनिश्चय, हे गुण वाखाणण्याजोगे आहेत. सुधारणाप्रिय मनुष्याने भ्रामक रूढींचे पाश तोडून प्रकाशांत आले पाहिजे. तरच दुसऱ्यांस सुधारता येते.

बोटीवर महाराजांना पुष्कळ बाबतीत स्वतंत्र व्यवस्था करावी लागली. पडदानशीन स्त्रियांकरिता 'खास व खासगी' खोल्या भाड्याने घ्याव्या लागल्या, सोवळ्या ओवळ्या संबंधानेहि कांही विचित्र प्रकार नजरेस आले; कांही कांही ठिकाणी खाणावळीच्या व्यवस्थापकांनी जादा भाडे आकारले, नोकरचाकरांच्या शिष्टचाराविरुद्ध विशिष्ट वागणुकीबद्दल अपमान व अवहेलना करण्यांत आली; अशा एक ना दोन हजार अडचणी या प्रवासांत आल्या. अनुभवाने मनुष्य शहाणा होतो, हे त्रिकालाबाधित सत्य महाराजांस यावेळी पूर्णपणे पटले.

व्हेनीस येथे प्रथम कांही दिवस काढून नंतर महाराज ए-ला-बेन-येथे गेले. सप्टेंबर महिन्यांत त्यांनी आपले बंधु श्रीमंत संपतराव गायकवाड ऑक्सफोर्ड येथे शिकत होते यांच्याकडेच राहण्याचे ठरविले. नोव्हेंबर महिन्यांच्या शेवटी त्यांनी लंडन येथे राहण्यासाठी व्हिक्टोरिया स्ट्रीटवर एक बंगला भाड्याने घेतला. त्यावेळचे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी व्हायकाउंट क्रॉस यांनी महाराज व महाराणी यांना विंडसर राजवाड्यांत नेऊन महाराणी व्हिक्टोरिया यांची भेट करविली. श्री. सौ. महाराणी चिमणाबाईसाहेब त्यावेळी एक बंद गाडीतून अगोदर तेथे गेल्या होत्या. मेजवानीनंतर महाराज कांही दिवस ब्रायटन येथे राहून फेब्रुवारी १८८८ मध्ये बडोद्यास परत आले.

महाराजांनी निरनिराळ्या देशांत मिळून आतापर्यंत एकंदर २१ पर्यटने केली आहेत. त्यांची जंत्री खाली दिली आहे :-

अ.क्र.	निघाल्याची तारीख	देश	परत आल्याची तारीख
(१)	मे १८८७	इंग्लंड	फेब्रुवारी १८८८
(२)	जून १८८८	स्वित्झर्लंड	सप्टेंबर १८८८
(३)	मे १८९२	इंग्लंड, नॉर्वे, व जर्मनी.	जानेवारी १८९३
(४)	मे १८९३	कार्लसबाद ...	ऑक्टोबर १८९
(५)	नोव्हेंबर १८९३	इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, जर्मनी,स्वित्झर्लंड,	जानेवारी १८९५

		इटली (जिनीवा, फ्लॉरैन्स) तुर्कस्तान (कान्स्टॉटिनोपाल)	
(६)	मे १९००	फ्रान्स ...	जानेवारी १९०१
(७)	फेब्रुवारी १९०१	इंग्लंड ...	ऑगस्ट १९०२
(८)	मे १९०५	इंग्लंड,फ्रान्स, स्वित्झर्लंड,अमेरिका.	नोव्हेंबर १९०७
(९)	मार्च १९१०	चीन, जपान, सॅन-फ्रान्सिस्को, कॅनडा, लंडन.	डिसेंबर १९१०
(१०)	एप्रिल १९११	इंग्लंड ...	नोव्हेंबर १९११
(११)	मे १९१३	स्वित्झर्लंड (सेंट मॉरिशस)	नोव्हेंबर १९१३
(१२)	एप्रिल १९१४	इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी.	डिसेंबर १९१४
	जून १९१५	सर्व हिंदुस्थान	
(१३)	सप्टेंबर १९१९	इंग्लंड ...	फेब्रुवारी १९२१
(१४)	मार्च १९२१	युरोप ...	नोव्हेंबर १९२१
(१५)	एप्रिल १९२२	युरोप ...	नोव्हेंबर १९२३
(१६)	एप्रिल १९२४	इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड.	नोव्हेंबर १९२५
(१७)	मार्च १९२६	स्वित्झर्लंड ...	नोव्हेंबर १९२७
(१८)	मार्च १९२७	फ्रान्स,स्वित्झर्लंड, स्वीडन, डेन्मार्क, जर्मनी,युरोप.	जानेवारी १९२८
(१९)	एप्रिल १९२९	युरोप	डिसेंबर १९३०
(२०)	मार्च १९३०	युरोप	फेब्रुवारी १९३१
(२१)	मे १९३१	फ्रान्स, स्वित्झर्लंड, इंग्लंड, जर्मनी, इटली, स्कॉटलंड.	डिसेंबर १९३२

निरनिराळ्या देशांत प्रवास केल्याने महाराजांना त्या त्या देशाच्या संस्कृतीचा तौलनिक अभ्यास करण्यास पुष्कळ मदत झाली. इटलीतील रोमन लोकांची संस्कृती ही लढाऊ लोकांची संस्कृती होती. युद्धशास्त्र हा त्यांचा आवडीचा व्यवसाय व विषय, आणि समरांगण हाच त्यांचा रंगमहाल. रोममधील जुन्या इमारती, देवालये, इत्यादी अवशेष आणि दटालीयन लोकांचे आचारविचार, धार्मिक विधी हे सर्व याच गोष्टीची पूर्णपणे साक्ष देत आहेत असे महाराजांना दिसून आले. फ्रान्स हा केवळ विलासोसुखपोभोगांत दंग असलेल्या लोकांचा देश म्हणून विशेष प्रसिद्ध आहे. आणि सौंदर्यशास्त्रामध्ये जपानची विशेष आघाडी आहे याचे प्रत्यंतर त्या त्या देशांत प्रवास करतांना महाराजांस आढळून आले. 'त्याचप्रमाणे तर्कशुद्ध विचारसरणी व उद्यमशीलता ह्यांत जर्मनी विशेष प्रमुख, परंतु कलाकुसरीच्या बाबतीत अत्यंत मागासलेला आणि ऑस्ट्रियांत तर सारेच गानप्रिय लोक, असे महाराजांचे मत झाले. राजकारणपटु, केवळ उपयुक्ततेवर तेवढी दृष्टी देणारे, सर्वसंग्रह करून जगाला उपदेशामृताचे घुटके पाजणारे अशा इंग्रज लोकांच्या संस्कृतीची, त्यांच्या देशांतील अजस्त्र कारखाने, रम्य उद्याने यांवरून महाराजांना पूर्णपणे कल्पना आली. इजिप्त देशांतील प्रवासांत शिल्पशास्त्रज्ञानांत अचंबा वाटावयास लावणारे पिरॅमिड पाहून त्या संस्कृतीच्या प्राचीनतेची व अव्वल प्रतीच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटते.'

'प्रवास हा तरुण जनांच्या शिक्षणाची परिपूर्ती होण्यास व प्रौढ जनांच्या अनुभवज्ञानाची परिपक्वता होण्यास फार आवश्यक आहे.' असे म्हणतात महाराजांच्या मताप्रमाणे 'परदेशगमन हे शिक्षण आहे व प्राचीन हिंदु ग्रंथकारांच्या मताप्रमाणे ज्ञानार्जनाचे एक साधन होय.' इतर देशांशी दळणवळण ठेवण्याच्या उपयुक्ततेसंबंधी विशेषतः युरोपियन लोकांशी दळणवळण ठेवण्यासंबंधाने महाराज म्हणतात की, ते हिंदुस्थानच्या प्रगतीस फार महत्वाचे होय. कारण स्वदेशांतील संस्थांची युक्तायुक्तता ठरविण्यांस अशा दळणवळणाचा फार उपयोग होतो. यास्तव महाराजांनी दरवर्षी निरनिराळ्या देशांत कृषि, कला, शास्त्रे, उद्योगधंदे व्यापार वगैरेंचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी पाठविण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

'सुधारलेल्या राष्ट्रांत प्रवास करण्यापासून फायदे दर्शवितांना ते म्हणतात, त्या लोकांची सद्यस्थिती, त्यांचे आचारविचार व निरनिराळ्या संस्था, प्रत्यक्ष पाहण्यांत आल्याने त्यांच्या उन्नतीची कारणे समजण्यास सुगम होते व त्यामुळे आपली स्थिती सुधारण्यास कोणत्या उपायांची योजना केली पाहिजे हे कळते. साधारण लोकांना जर प्रवासापासून वरप्रमाणे फायदा होतो तर ज्यांच्या हाती ईश्वराने लक्षावधि लोकांच्या बरेवाईटाची सत्ता दिली आहे, त्यांना अशा प्रकारच्या प्रवासाने किती फायदा होईल हे सांगणे नको.' संस्थानिकांवर परदेशी प्रवास करण्यासंबंधी हिंदुस्थानसरकारने कांही निर्बंध घालण्याचे योजिले आहे असे समजून ते म्हणतात की, ''अशा लोकांच्या प्रवासास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो ही फार दिलगिरीची गोष्ट आहे.''

प्रवासापासून आणखी एक फायदा म्हंटला म्हणजे निरनिराळ्या माणसांच्या होणाऱ्या ओळखी. 'उदंड ओळखी होता, उदंड भाग्य येतसे.' परंतु महाराज तर भाग्यवान होतेच, अर्थात त्यांनी ओळखीबरोबरहि अनेक गोष्टींचे ज्ञान करून घेतले व त्याचा फायदा आपल्या प्रजाजनांना सढळ हाताने मदत करून दिला, हे त्यांनी आपल्या राज्यांत अनेक सुधारणा केल्या त्यावरून उघड होत

आहे. इंग्लंडच्या सहाव्या फेरीत ड्यूक ऑफ कॅनॉट, लॉर्ड हॅरिस, लॉर्ड व लेडी रे, लॉर्ड नार्थब्रूक,. लेडी एडवर्ड, लेडी ट्रीटेल, लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन, सर जॉन वॉटसन, सर जॉन पुलेस्टन, सर एडवर्ड लॉसन, सर जेम्स ब्लीथ वगैरे मोठमोठ्या बड्या लोकांशी महाराजांचा परिचय झाला. महाराज्ञी व्हिक्टोरिया यांचे महाराजांवर मुलाप्रमाणे प्रेम होते. व्हिक्टोरिया मेमोरियल फंडाला महाराजांची एक लक्ष रुपये देणगीदाखल दिले, यावरून महाराजांची त्यांचेसंबंधी निष्ठा व्यक्त होते.

१९०१ मध्ये पॅरिस येथे झालेले जागतिक प्रदर्शन पाहण्यांत महाराजांची कित्येक महिने घालविले. त्याचप्रमाणे वेम्ब्ले प्रदर्शनांसहि त्यांनी १०/१२ वेळा भेटी देऊन त्यांचे सूक्ष्म निरीक्षण केले. यावेळी पाहिलेल्या गोष्टींचा आपल्या संस्थानास व देशास फायदा कसा करून देता येईल याकडे त्यांची सारखी दृष्टि असे, व सुधारणेच्या अनेक गोष्टी त्यांनी यूरोपमधून तारेनेहि सुचविल्या आहेत.

प्रवासापासून आणखी एक महत्वाचा फायदा म्हटला म्हणजे आपल्या देशांतील व इतर देशांतील राजकीय परिस्थितीचे यथायोग्य आकलन होऊ शकते हा होय.

सारांश महाराजांनी देशपर्यटनापासून मिळविलेले ज्ञान व माहिती राज्यकारभार सुधारण्याकडे व नवीन कायदे करून प्रजोन्नति करण्याचे कामी अनेक प्रकारे खर्च केलेली आहे.

प्रवासांत असतांना संस्थानच्या कारभाराकडे त्यांचे सारखे लक्ष असते व येथील परिस्थिति ओळखून नवीन नवीन गोष्टी कोणत्या करता येतील याकडे त्यांची एकसारखी दृष्टि लागलेली असून त्यासंबंधी अनेक विचार त्यांच्या मनांत घोळत असतात.

१०.
शिक्षणविषयक प्रगति

"Education is absolutely necessary for the realisation of my ambition and wishes and for success of my policy."
"Education is the basis of all reforms and is the only way of solution from our present condition."*

आजकाल बडोदे संस्थानचा यशोदुंदुभी अखिल हिंदुस्थानांतच काय पण आशिया, अमेरिका खंडातून वाजत आहे. याचे कारण बडोद्यांतील शिक्षणप्रसार होय. मोफत व सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणामुळे आणि मोफत वाचनालयांमुळे श्रीमंत सयाजीराव महाराजांचे व बडोदे संस्थानचे नांव हिंदुस्थानच्या शिक्षणविषयक इतिहासांत अजरामर होऊन राहिले आहे यांत शंका नाही. राजपुत्रांना उत्तमोत्तम शिक्षण मिळण्याची आवश्यकता प्रतिपादन करतांना महाराज लिहितात, "जबाबदारीची व महत्वाची कामे पार पाडता यावीत आणि राज्यकारभार उत्तम रीतीने चालविता यावा म्हणून राजपुत्रांस देशकालमानाप्रमाणे उच्च प्रकारचे शिक्षण मिळणे अगत्याचे आहे. युरोपातील राजपुत्रांमध्ये अशा शिक्षणाची फार आवड असते." खरोखर पाहता ज्या देशावर राज्य करावयाचे त्यांतील प्रजाजनांची उन्नति करण्यासाठी भावी राजा या दृष्टीने राजपुत्राने जरूर ते शिक्षण घेणे अवश्य आहे. आणि महाराजांच्या मते "कायद्याची साधारण मूलतत्वे अर्थशास्त्र, राजनितीशास्त्र, व इतर राज्यकारभाराविषयक बाबी यांचे शिक्षण राजपुत्रांना दिले असता फार चांगला उपयोग होईल." बडोद्यास राजपुत्र व इतर सरकदरांची मुले यांच्या शिक्षणासाठी 'प्रिन्सेस स्कूल' ही शाळा यांच्याच शिक्षणाच्या वेळी प्रथम स्थापन करण्यांत आली. तसेच राष्ट्राच्या नागरिकांची मने उन्नत व सुसंस्कृत करणे हांच राष्ट्राची उत्तमोत्तम सेवा, आणि महाराजांच्या मताप्रमाणे, सार्वत्रिक शिक्षणची सोय करणे हे प्रत्येक सरकारचे आद्य कर्तव्य. विसाव्या शतकांतल्या लोकशाहीच्या युगामध्ये लोकांस आपल्या नवीन कर्तव्यास व जबाबदारीस तोंड देण्यास सार्वत्रिक शिक्षण

---

* महाराजांची भाषणे, प्रथमखंड.

मिळणे अत्यंत जरूरीचे व महत्वाचे आहे. महाराजांच्या शिक्षणविषयक ध्येयाची यावरून सहज कल्पना करता येईल.

इ.स.१८७१ सालापर्यंत बडोदे संस्थानांत शिक्षणाचे स्वतंत्र खाते नव्हते. त्यासाली सरकारने २ गुजराथी व २ मराठी अशा चार प्राथमिक शाळा बडोद्यांत सुरू केल्या. अशा शाळांची संख्या राज्यांत वाढता वाढता इ.स.१८७८ साली एकंदर १४५ झाली. श्रीमंत सयाजीराव यांना अधिकार प्राप्त झाले त्यावेळी एकंदर १८० शाळा होत्या. पुढे महाराजांनी १८९३ साली अमरेली प्रांतात प्रयोगादाखल सक्तीच्या शिक्षणाची योजना अंमलात आणली व १९०६ साली सर्व राज्यांत शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करण्यांत आले.

प्राथमिक शिक्षण

महाराजांनी शिक्षणप्रसार सार्वत्रिक होण्यास काय काय अडचणी येतील यासंबंधीचा पूर्ण व सांगोपांग विचार करून तशा प्रकारची व्यवस्था अंमलात आणली. प्रथम प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यांत आले. शाळांतून ७ ते १२ वर्षांच्या मुलांस व ७ ते १० वर्षांच्या मुलीस शिकण्यांस पाठविण्याचा पालकांवर निर्बंध घालण्यांत आला व त्यांनी तसे करण्याचे नाकारल्यास त्यांना थोडा फार दंड करण्यांत यावा असेहि ठरविण्यांत आले. खेडेगांवी शेतीच्या कामांत शेतकऱ्यांना आपल्या मुलांच्या मदतीची वाण पडू नये अशा सोईस्कर वेळा शाळोसाठी ठरविल्या. अंत्यज वर्गाच्या मुलामुलींसाठी स्वतंत्र शाळांची योजना सुरू करून त्यांना पुष्कळ सवलती, (मुलास मोफत पाट्या, पेन्सिली, पुरविणे.) देण्यांत आल्या. १८८५ साली काढलेल्या सरकारी हुकुमांत खालील सहा गोष्टींकडे शाळाखात्याने विशेष लक्ष पुरवावे असे म्हंटले होते : (१) नव्या वाचनपाठमाला तयार करणे, (२) मुलांना शारीरीक शिक्षण देणे, (३) मुलींच्या शाळांना स्त्री शिक्षक पुरविणे, (४) मध्यम व कनिष्ठ वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे, (५) शाळांतून पदार्थसंग्रहालये स्थापणे व (६) देशी वाङ्मय वाढविणे. याशिवाय ५० ते ६० हजार रुपये शाळांच्या इमारतीसाठी खर्च करण्यासहि मंजूरी मिळाली होती.

हल्लीच्या सरकारी रिपोर्टावरून* प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या २,२१,६०२ असून अशा प्रकारच्या शिक्षण देणाऱ्या सरकारी संस्था २,५३९ आहेत असे दिसते. खेडेगांवातील शाळांवर एक शिक्षक असणे हा शिक्षणपद्धतीत दोष आहे असे अनुभवांती सरकारास दिसून आल्यावरून कांही जवळजवळ असणाऱ्या शाळांचे एकीकरण करण्यांत येऊन कांही ठिकाणी एकापेक्षा अधिक शिक्षक नेमण्यांत आले.

प्राथमिक शिक्षण देण्यासाठी उत्तम व अनुभविक शिक्षक व शिक्षकिणी तयार करणारी २ वेगवेगळाली ट्रेनिंग कॉलेजे काढण्यांत आली व शिक्षकांना खेडेगांवी उपयोगाचे असे शेती सुधारणा, आरोग्य, परस्पर सहकार्य वगैरे विषय अभ्यासासाठी ठेवण्यांत आले आहेत.

---

* Administration Report 1930-31.page 237

किंडर गार्डन पद्धतीने शिक्षण देणाऱ्या शाळा १९ असून त्यांत १,५२९ मुले हल्ली शिक्षण घेत आहेत. सन १९३०-३१ साली अंत्यजांकरिता २०१ स्वतंत्र शाळा होत्या व त्यांत एकंदर शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या १८,३८८ होती. सन १९३१-३२ साली या स्वतंत्र शाळांपैकी ११० शाळा इतर शाळांस जोडण्यांत आल्या. अंत्यजांकरिता स्वतंत्र शिष्यवृत्या ठेवल्या असून कांही मुलांची जेवण्याखाण्याची सोय सरकारकडून केली जाते. अशा प्रकारच्या सोयी बडोदे, पाटण, नवसारी, व अमरेली या शहरी मुद्दाम करण्यांत आल्या आहेत. अस्पृश्यांचे सध्याचे पुढारी डॉ. भीमराव आंबेडकर यांचे शिक्षण महाराजांनीच केले आहे.

मुसलमानांच्या शिक्षणासाठी निरनिराळ्या ठिकाणी सरकारी ८१ व खासगी १३ उर्दू शाळा आहेत व एकंदर १०,९०० मुले शिकत आहेत.

महाराजांनी 'कालिपरज' व 'वाघेर' या अत्यंत मागासलेल्या अडाणी, जंगली, डोंगराळ मुलुखांत राहणाऱ्या जातींनाहि शिक्षण देण्याची योजना अंमलात आणली आहे. काहींना वसतिगृहांत मोफत ठेवून घेऊन त्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे; आपल्या मुलूखांत परत गेल्यावर त्यांनी इतरांनाहि फावल्यावेळी शिक्षण द्यावे हा सरकारचा हेतु आहे. अशा रीतीने सक्तीचे शिक्षण करण्यांत लोकांना लेखन, वाचन व जुजबी अंकगणित इत्यादींची ओळख करून देऊन साक्षर बनविणे हा प्रमुख हेतु आहे.

दुय्यम शिक्षण

संस्थानांत एकंदर १५ सरकारी हायस्कूल्स असून शिवाय सरकारी मदत असणारी ८ आहेत. त्यापैकी बडोद्यांत ३ आहेत व बाकीची नवसारी, गणदेवी वगैरे ठिकाणी आहेत. त्याचप्रमाणे दुय्यम शिक्षणसंस्था एकंदर ३५ आहेत.

उच्च शिक्षण

खुद्द राजधानीचे शहर बडोदे येथे उच्च (शास्त्रीय व वाङ्मयात्मक) शिक्षण देणारे 'कॉलेज' असून त्यांत एकंदर ९११ विद्यार्थी व विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. इ.स.१८८२ साली डिसेंबर महिन्यांत हे कॉलेज सुरू होऊन मुंबई विश्वविद्यालयास जोडण्यांत आले. आतापर्यंत या कॉलेजमधून २,२०० पदवीधर बाहेर पडलेले आहेत. त्यापैकी १०० च्यावर एम.ए. व एम.एस्सी झालेले आहेत. टेट, लिटलडेल, क्लार्क, मसाणी यासारखे विद्वान व नाणावलेले गृहस्थ या कॉलेजचे प्रिन्सिपाल होऊन गेले. त्याचप्रमाणे सर मन्नुभाई मेहता, टी. के. गज्जर, अरविंद घोष, मि. मिडलटन, आर्ते, विजेरी यांसारखे हिंदुस्थानांतच काय पण जागतिक प्रसिद्धी मिळविलेले गृहस्थ या कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. सध्याचे प्रिन्सिपाल मि. बरो हेहि सुस्वभावी, समतोल बुद्धीचे गृहस्थ आहेत. नुकतीच ता.२६ डिसेंबर १९३२ रोजी या कॉलेजची सुवर्णज्युबिली झाली. त्यावेळी महाराज, महाराणीसाहेब, इतर अधिकारी शहरांतील प्रमुख नागरिक व कॉलेजचे माजी विद्यार्थी उपस्थित होते. आपल्या भाषणांत प्रिन्सिपाल यांनी महाराजांच्या शिक्षणविषयक धोरणाचा गौरव करून सांगितले की,

"It is rare in history for a ruler to attend the 50th anniversary of an institution he has formed."

या कॉलेजचे गुजराथ युनिव्हर्सिटीत रूपांतर व्हावे अशी पुष्कळांची इच्छा आहे. ती सफळ होईल तो सुदीन म्हणावयाचा.

शिष्यवृत्या

१९३०-३१ च्या सरकारी रिपोर्टात २ शिष्यवृत्या सिडेनहॅम कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यासाठी, 'सेवाकदर' शिष्यवृत्ती सरकारी नोकरांच्या मुलांकरिता, सेकंडरी एज्युकेशन कोडमध्ये दिलेल्या शिष्यवृत्या, मराठा मुलींसाठी कांही शिष्यवृत्या मिळून रु.२३,६०७ रुपये खर्च करण्यांत आले असे नमूद करण्यांत आले आहे. त्याचप्रमाणे मराठा जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ४० 'सयाजीराव शिष्यवृत्या' म्हणून आणि मराठा एज्युकेशन फंडाच्या व्याजांतून कांही शिष्यवृत्या देण्यांत येतात. तसेच नेमणूकदार वर्गाच्या मुलांकरतांहि कांही शिष्यवृत्या राखून ठेवण्यांत आल्या आहेत याशिवाय दरवर्षी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंड, अमेरिका, जपान इत्यादि देशांत निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी पाठविण्यांत येते. महाराजांनी आजपर्यंत शेतकी, बागाईत, सूपशास्त्र, गायनशास्त्र, घड्याळकाम, विद्युतशास्त्र, यंत्रशास्त्र मुद्रणकला, शिक्षण, कायदा, अर्थशास्त्र, तत्वज्ञान, वेदांत पुस्तकालये, शिल्प 'इ.' शास्त्रांच्या अध्यनासाठी व त्या त्या विषयांत प्राविण्य मिळविण्यासाठी अनेक विद्यार्थी परदेशी पाठविले आहेत. व असे लोक तेथून शिकून आल्यानंतर आपल्या ज्ञानाचा फायदा हिंदुस्थानास देत आहेत. बनारस हिंदु युनिव्हर्सिटीसारख्या संस्थेला महाराजांचा उदार आश्रय आहेच. नुकतीच महाराजांनी त्या युनिव्हर्सिटीस दोन लक्ष रुपयांची देणगी दिली आहे. महाराज त्या विश्वविद्यालयाचे प्रो-चॅन्सेलरहि आहेत. औद्योगिक शिक्षणाचीहि सोय महाराजांनी आपल्या संस्थानांत केली आहे.

औद्योगिक शिक्षण

आधुनिक शिक्षणक्रमांत औद्योगिक व शास्त्रीय शिक्षणक्रमाचा अंर्तभाव होणे ही अत्यंत आवश्यक गोष्ट गणली जाते. औद्योगिक शिक्षण देणारी संस्था आपल्या संस्थानांत काढण्याचा महाराजांचा १८८६ सालापासून विचार चालू होता. सुप्रसिद्ध प्रो. टी. के. गज्जर हे त्यावेळी बडोदा कॉलेजांत प्रोफेसर होते. त्यांच्या सहाय्याने महाराजांनी 'कलाभवन' ही संस्था स्थापन केली. श्री. गज्जर यांच्याकडून सर्व शिक्षणक्रम ठरविण्याचे सोपविण्यांत आले. प्रथम चित्रकला, कपडे शुभ्र करणे व रंगविणे, कपड्यांवर छपाईचे काम करणे, सुतारकाम एवढेच विषय शिकवत असत. कांही महिन्यांनी पूर्वीचे ट्रेनिंगस्कूल व शेतकीचा वर्ग हेहि त्यास जोडण्यांत आले. कलाभवनांतील सर्व शिक्षण देशी भाषेच्या द्वारे देण्यांत येते. प्रथम उत्पादक व प्रिन्सिपाल टी. के. गज्जर ह्यांनी ह्या संस्थेस बरेच नावारूपास आणिले. त्यांच्यानंतरहि संस्था अतिशय कार्यक्षमतेने व शिस्तीने चालविण्यांत आली आहे. सध्याचे प्रिन्सिपाल सी. एच.व्होरा बी.ए, ए.एम.आय.बी.ई यांच्या देखरेखीखाली ही संस्था अतिशय उत्तम रीतीने प्रगति करीत आहे. यांच्याशिवाय परदेशांत शिक्षण घेतलेले पांच प्रोफेसर शिकविण्याचे काम करीत आहेत. हल्ली मेक्यानिकल इलेक्ट्रिकल व सिव्हिल इंजिनियरिंग; केमिकल टेक्नॉलॉजी (डाईंग, ब्लीचींग, कॅलिडो प्रिंटींग, सोप टेक्नॉलॉजी) टेक्सटाईल मॅन्युफॅक्चर, आर्किटेक्चर. कॉमर्स वगैरे विषय शिकविण्यांत येतात. हिंदुस्थानांतल्या

निरनिराळ्या भागांतले विद्यार्थी या ठिकाणी औद्योगिक शिक्षण घेण्यासाठी येतात. सध्या त्यांची संख्या ५३७ आहे. इ.स.१९३०-३१ साली कलाभुवन व त्यास जोडून असलेली वर्कशॉप्स यावर १ लक्ष ३४ हजार रु.खर्च व त्यापासून उत्पन्न २८ हजार ६०० रुपये झाले आहे. या शाळेतून कांही नाणावलेले रंगकलावेत्ते बाहेर पडले असून मोठमोठ्या गिरण्यांमध्ये काम करीत आहेत. कलाभुवनास जोडलेली प्रयोगशाळा व्यापारी तत्वावर चालविण्यांत येते. म्हणजे राज्यांतील निरनिराळ्या खात्यांना लागणारे लोखंडी व इतर धातूंचे सामान, लाकडीसामान वगैरे तेथून पुरविण्यांत येते. याच संस्थेच्या अंगभूत अशा तीन शाळा अमरेली, पाटण व पेटलाद या ठिकाणी चालू आहेत. नवसारीस जे. एन. टाटा हुन्नर शाळेस सरकारी ग्रँट देण्यांत येते. १९२१साली बंगलोर इंस्टिट्यूटचे प्रो. आल्फ्रेड हाये यांच्या रिपोर्टावरून कलाभुवन बंद करण्याचा महाराजांचा विचार होता, परंतु पुष्कळ लोकांच्या अर्जविनंत्यांवरून तो विचार त्यांनी रहित केला, इतकेच नव्हे तर उलट त्याची वाढ केली ही गोष्ट मोठ्या आनंदाची आहे.

शास्त्री, पुराणिक, पुरोहित यांच्यासाठी एक संस्कृत पाठशाळा काढण्यांत आली असून त्यांत क्षत्रियादि चातुर्वर्णीय हिंदु लोकांचा संस्कृत शिकण्याची सोय करण्यांत आली आहे. देशी भाषेच्या द्वारे शिक्षण देणारे एक व्हर्नाक्युलर कॉलेज होते, पण ते विद्यार्थ्यांच्या अभावी बंद करावे लागले. पाटण येथे एका आयुर्वेदाचे शिक्षण देण्यांत येते. त्याचप्रमाणे अनाथगृहे, गायनशाळा, मूकविद्यालय, रेफमेंटरी वगैरे कित्येक लोकोपयोगी संस्था सरकारकडून चालविण्यांत येत आहेत. यावरून महाराजांना सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय आपल्या संस्थानांत असावी याबद्दल किती कळकळ व आस्था वाटते हे कोणासहि दिसून येईल.

स्त्रीशिक्षण

राष्ट्रांतील स्त्री पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण हे त्या राष्ट्राच्या प्रगतीचे गमक आहे. फार प्राचीनकाळ सोडला तरी एकोणिसाव्या शतकांतील हिंदी स्त्रिया म्हणजे धर्मभोळेपणा, अज्ञान, हटवादीपणा, गुलामगिरी यांच्या मूर्तिमंत पुतळयाच असे एखाद्याने विधान केले तर ते फारसे बेजबाबदार ठरेल असे वाटत नाही. खरोखरी पाहता हिंदुस्थानातील स्त्रियांचा आयुष्यक्रम म्हणजे गृहकृत्ये व उत्तमोत्तम वस्त्रालंकाराचे ज्ञान या व्यतिरिक्त सार्वजनिक कार्य म्हणून एखादी चीज असेल ही कल्पना ध्यानीमनीहि नसते. अशा प्रकारच्या विचारसरणीमुळे स्त्रीशिक्षणाचा प्रश्न अत्यंत घोटाळ्याचा होऊन बसला होता. अशा वेळी महाराजांनी स्त्रीशिक्षणाचा जोराने पुरस्कार करून या प्रश्नास यथायोग्य चालना दिली. सामाजिक सुधारणेचे पाऊल पुढे पडण्यास स्त्रीशिक्षणासारखे दुसरे प्रबळ शस्त्र नाही अशी महाराजांची ठाम समजूत होती. ''जर घरांत सुशिक्षित स्त्री असेल तर ती ज्ञानाचा व गृहसौख्याचा उज्ज्वल प्रकांश घरांत पाडण्यास समर्थ होईल; व आपल्या आजूबाजूच्या लोकांच्या निर्दय व आपमतलबी कपट युक्त्यांत अशिक्षित स्त्री जशी फसते तशी फसणार नाही.'' *एके वेळी त्यांनी असे उद्गार काढलेले आहेत की, ''स्त्रियांना शिक्षणाचा लाभ न दिल्याने आपण आपल्या राष्ट्राची शक्ति गमवीत आहोत. आपल्या मुलांना

---

* महाराजांची भाषणे पृ. ३२

सुशिक्षित मातांचा लाभ देण्याचे नाकारीत आहोत, आणि मातांच्या मानसिक शक्तीची वाढ करून भावी पिढ्यांचे भयंकर नुकसान करीत आहोत. इतकेच नव्हे तर यामुळे आपल्या घरांत दुही माजविण्यांत मदत करीत असून जुने तेवढे उराशी बाळगून बसणारा असा एक अजीबात निराळा वर्ग तयार करीत आहोत.'' अशाप्रकारचे जरी महाराजांचे मत असले तरी पण विवाहितावस्था व गृहकृत्ये ही स्त्रियांची प्रधान कर्तव्ये असल्याने त्यांना ही कर्तव्ये पार पाडण्यायोग्य शिक्षण मिळणे अगत्याचे आहे, ह्या गोष्टीस त्यांचा बिलकूल विरोध नव्हता. हे मत त्यांनी एका व्याख्यानाचे प्रसंगी उघड करून सांगितले आहे. ''स्त्रीशिक्षण म्हणजे त्यांनी नुसत्या परीक्षा पास होणे नव्हे. बायकांना संसारविषयक शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांना आपली मुले कशी वाढवावयाची, आपल्या पतीस वाईट गोष्टांपीसून कसे परावृत्त करावयाचे हेहि त्यांना शिकविले पाहिजे. त्यांना रसायनशास्त्र वगैरे शास्त्रांचे शिक्षण देणेहि अगत्याचे आहे.'' तसेच संसार सुखाचा होण्यास स्त्री पुरूष उभयतां सुदृढ असणे आवश्यक आहेत. या दृष्टीने त्यांना शारीरीक कसरतीची फार आवश्यकता आहे, असे महाराजांचे मत असून त्यांनी फिमेल ट्रेनिंग कॉलेजच्या लेडी सुपरिंटेंडेंट यांना तशी व्यवस्था अंमलात आणण्यास वेळोवेळी सूचना केल्या आहेत. हल्ली बडोद्याच्या शारीरीक शिक्षण घेण्यासाठी स्त्रियांकरता जिमखाना असून पुष्कळ स्त्रिया त्याचा फायदा घेतात. श्रीमंत राणीसाहेब याहि सुशिक्षित असून स्त्रीशिक्षणाच्या कट्ट्या पुरस्कर्त्या आहेत. अखिल भारतीय महिला परिषदेच्या त्या १९२८ साली अध्यक्षाहि होत्या. बडोद्यांत स्त्री शिक्षणासाठी ''श्रीमहाराणी चिमणाबाई स्त्री उद्योगालय'' नावांचे उद्योग मंदिर महाराणी साहेबांच्या नांवे स्थापन करण्यांत आले आहे. त्यांत शिवणकाम, वीणकाम, पाकशास्त्र, रोग्याची शुश्रूषा वगैरे विषय शिकविण्यांत येतात. याशिवाय मुंबई इलाख्यांत उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थीनींना शिष्यवृत्या देण्याकरिता महाराणीसाहेबांनी एक लक्ष रुपयांची देणगी दिली आहे.

वाचनालये

अशाप्रकारे राज्यांत सक्तीचे शिक्षण देण्यावर सुशिक्षितांची संख्या साहजिकच वाढणार व अशा लोकांची ज्ञानपिपासा शमविणे हे सरकारचे महत्वाचे कर्तव्य होय, हे ओळखूनच की काय, महाराजांनी सार्वजनिक वाचनालये आपल्या राज्यांत सुरू केली. १९०५ साली महाराजांनी अमेरिकेच्या प्रवासांत गांवोगांवी व शहराशहरी प्रचंड सार्वजनिक वाचनालये व त्यामुळे होणारा शिक्षणप्रसार हे प्रत्यक्ष अवलोकिले; त्यावेळी आपल्या राज्यांतहि अशाप्रकारचा उपक्रम सुरू करावा असे तत्काळ ठरविले. आणि लोकांनी वाचनालये काढल्यास त्यास सरकार योग्य मदत करील असे आश्वासन दिले.

१९०६-७ साली कांही वाचनालये उघडली; पण १८१०-११ पासून या शिक्षणशास्त्राला अगदी वेगळेच स्वरूप आले. यावर्षी महाराजांनी अमेरिकेहून डॉ. बोर्डेन नांवाच्या लायब्ररीच्या कामांत निष्णांत अशा एका अमेरिकन विद्वानांस येथे आणून त्याची डायरेक्टर ऑफ स्टेट लायब्ररीज या नवीन जागी नेमणूक केली. वाचनालयाचे खाते स्वतंत्र करण्यांत येऊन त्यास नवीन सुधारलेले स्वरूप देण्यांत आले, तसेच नियमांतहि फेरबदल करण्यांत आली. एखाद्या

गांवी लोकांनी वाचनालयाकरिता जी रक्कम गोळा केली असेल त्याच्या दुप्पट रक्कम सरकारने देण्याचे ठरविले. यामुळे पुस्तकालयांची संख्या झपाट्याने वाढू लागली. बडोद्यांतील पूर्वीच्या लायब्ररीचे मध्यवर्ती लायब्ररीत रूपांतर करण्यांत येऊन नगरवाचनालये, प्रांतचाचनालये, ग्रामवाचनालये यांच्या कारभारावरची देखरेख ठेवण्याचा डायरेक्टरांस अधिकार देण्यांत आला. खुद्द महाराजांनी आपला २० हजार पुस्तकांचा दुर्मिळ संग्रह मध्यवर्ति संस्थेस दिला. सध्या वाचनालयांत निरनिराळ्या विषयांवरची लाखांवर पुस्तके असून त्यांतली ८३ हजार पुस्तके लहानथोर वाचकांना वाचावयासाठी मोफत देण्यांत येतात. संदर्भखात्यांतील कांही पुस्तके तेथेच बसून वाचावी लागतात.

मध्यवर्ती लायब्ररीसाठी पूर्वीच्या सरकार वाड्यांस जोडूनच नवीन इमारत बांधण्यांत आली आहे. वृत्तपत्रीयशाखा, स्त्रीवाचकशाखा, संदर्भशाखा वगैरे भाग येथे आहेत. लायब्ररीचे संचालक मि. एन.एम. दत्त यांनी बडोदा लायब्ररी हँडबुक नांवाचे पुस्तकांत लायब्रऱ्यांची सर्व माहिती दिली आहे. संस्कृत लायब्ररी डॉ. विनयतोष भट्टाचार्य यांच्या नेतृत्वाखाली उत्तमप्रकारे चालविण्यांत येत आहे. सध्या या लायब्ररीचे रूपांतर ------- संस्थेत करण्यांत आले आहे.

शिक्षण खात्यावर कमिशनर ऑफ एज्युकेशन किंवा विद्याधिकारी असून त्याच्या हातांत वाचनालये, प्राच्यविद्यामंदिर, पदार्थसंग्रहालये, कलाभवन, गायनकला, स्काऊट संस्था, कॉलेजे व शाळा इत्यादि संस्थांचा कारभार दिलेला आहे. हल्ली रा. भास्कर काशिनाथ भाटे एम.ए. (कँब्रिज) हे विद्याधिकारी असून डॉ. भा. चि. लेले पी. एच. डी, हे त्यांचे मदतनीस आहे.

विद्याप्रसार

देशी भाषेत वाङ्मय तयार करण्याच्या बाबतीत बडोदे संस्थानने किती प्रशंसनीय बहुमोल कामगिरी केली आहे हे महाराजांनी तत्प्रीत्यर्थ लक्षावधि रुपये खर्च करून अनेक उपयुक्त ग्रंथांची भाषांतरे निरनिराळ्या सुशिक्षितांकडून करवून साहित्याच्या अभिवृद्धीत भर घातली यावरून दिसून येईल. खानगी खाते व विद्याखाते या दोन खात्यांकडून अनेक प्रकारच्या ग्रंथास योग्य पारितोषिक किंवा इतर प्रकारांनी उत्तेजन देऊन ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यांत येतात. अशा रीतीने महाराजांच्या आज्ञेने इ.स.१८८६ पासून आतापर्यंत राष्ट्रकथामाला, महाराष्ट्र कथामाला, विविधविषयक ग्रंथमाला, क्रीडामाला, श्रीसयाजी साहित्यमाला, श्रीसयाजी ज्ञानमंजूषा, प्राचीन काव्यमाला, बालसंगीतमाला, वगैरे ग्रंथमालेत ३०० वर गुजराथी, मराठी, हिंदी, इंग्लिश, इत्यादि भाषांत छापून प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. ग्रंथकारांनी एखादा नवीन ग्रंथ आश्रयार्थ पाठविल्यास कांही प्रती विकत घेण्यांत येतात.

भाषाभिवृध्यर्थ प्रयत्न

देशी भाषांना परकीय भाषांचे जे ग्रहण लागले आहे ते सुटण्यासाठी महाराजांनी विशेष प्रयत्न केले आहेत. 'श्रीसयाजीशासन शब्दकल्पतरू' ने परकीय भाषेतील पारिभाषिक शब्दांचे देशी भाषांवरील आलेले दडपण कमी होऊन आपले सर्व व्यवहार आपल्या भाषेत करणे सुकर झाले आहे. या पारिभाषिक कोशासंबंधी महाराजांस एवढी उत्कंठा आहे की, कांही शब्द त्यांनी

स्वतः पॅरिसमधून सुचविले आहेत. कायद्यांतील पारिभाषिक शब्दांचा हा कोश तयार करण्यासाठी महाराजांनी एक मंडळ नेमिले होते, व हिंदुस्थानची एक राष्ट्रीय भाषा असावी या ध्येयास अनुसरून या कोशाचे स्वरूप अष्टाषात्मक असून त्यांतल्यात्यात सर्व भरतखंडात सुलभतेने रुढ होण्यासारखे शब्द अखेरीस सुचविले आहेत. महाराजांनी पुण्याच्या शब्दकोश मंडळास उदार आश्रय देऊन मराठी भाषेचा बृहकोश काढण्यास त्या प्रयत्नाच्या बाल्यावस्थेतच प्रोत्साहन दिले आहे, व त्याचे दृश्य स्वरूप पहिल्या भागाच्या रूपाने नुकतेच प्रकट झाले आहे. महाराजांच्या या प्रचंड साहित्यविषयक कामगिरीबद्दल कोणाचेहि अंतःकरण कृतज्ञतेने भरून येईल. तसेच त्यांनी सयाजीपद व वर्षासन देऊन कांटावाला, चिंतामणराव वैद्य, विठ्ठल रामजी शिंदे वगैरेंचा गौरव केला आहे व कवि चंद्रशेखर यांची राजकवि म्हणून नेमणूक करून त्यांस मासिक बिदागी दिली आहे.

सारांश, महाराजांचा जीवनहेतू आपल्या प्रजेस सर्वांगीण शिक्षण देणे व उच्च साहित्योपार्जन करणे हा होय. खऱ्या शिक्षणाचा हेतू अवलोकनशक्तीचा विकास करणे, उत्तम शील बनविणे, व मानसिक उन्नति करणे हा समजण्यांत येतो. 'विद्या म्हणजे नुसते लिहिता वाचता येणे नव्हे, तर जिच्यामुळे कार्यकारणांचा योग्य संबंध कळतो, इतरांच्या सामाजिक, धार्मिक, औद्योगिक स्थितीची व आपली दुरावस्था कळून तिची कारणे शोधून काढता येतात असणि सर्व विषयांचा न्यायाने व समतेने विचार करता येतो ती विद्या.' ती मात्र विशिष्ट वर्गालाच न मिळता सार्वत्रिक असली पाहिजे याविषयी महाराजांचा कटाक्ष असतो. टेनिसनच्या मताने ज्ञान ही एक शक्ति आहे खरी, पण ते शहाणपणापेक्षा कमी दर्जाचे आहे; म्हणून शहाणपणाची वाढ करणे हे खऱ्या शिक्षणाचे ध्येय असले पहिजे. अशा प्रकारचे खरे शिक्षण देण्याचा महाराजांचा प्रचंड उद्योग पाहिला म्हणजे कोणालाहि आश्चर्य वाटेल. जे ब्रिटीश सरकार आम्ही हिंदी प्रजेस शिक्षण दिले म्हणून सर्व जगभर टिमकी वाजवते त्यांच्यापेक्षा शेकडोपटींनी जास्त महाराजांची साहित्यविषयक कामगिरी आहे व त्यांनी स्वकृतीनी आपले नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर करून ठेवले आहे यांत तिळमात्र शंका नाही. गायकवाड घराण्यांत त्यांच्याइतका विचक्षण, व्यापक बुद्धीचा व बहुश्रुत साहित्यप्रेमी राजा झाला नाही व पुढेहि होणार नाही. आज समशेरबहाद्दरीचा काळ असता, तर महाराजांनी त्यांतहि नांव मिळविले असते. इतका पराक्रम, अलोट बुद्धीमत्ता, अतुल स्वार्थत्याग त्यांचे अंगी वसत आहे. 'वीरपुरुष हा सर्वच ठिकाणी वीर असतो.' ही शेक्सपीयरची उक्ति महाराजांस लागू पडते. असा आधुनिक विद्वानांचा, कविजनांचा, लेखक व कादंबरीकारांचा पोशिंदा आहे हे जाणून, 'आधुनिक भोजराज' श्रीन्महाराज सयाजीराव यांच्या आजवरच्या कामगिरीवरचा कळस म्हणूनच की काय, त्यांच्या वयाच्या ७० व्या वर्षी अखिल महाराष्ट्र जनतेने त्यांना साहित्य परिषदेचे अध्यक्षस्थान दिले होते. महाराजांनी एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ या भरतवाक्याने परिषदेचा यथार्थ समारोप करून 'संहतिः कार्य साधिका' हा धडा सर्वत्रांस गिरवावयास सांगितला आहे.

११.
शेतकी व औद्योगिक सुधारणा

शेतकी

बडोदे राज्यांत शेकडा ६४ लोक शेतीवर उदरनिर्वाह करणारे आहेत. इ.स.१८९९ साली संस्थानांत मोठा दुष्काळ पडला त्यावेळी दुष्काळी कामे सुरू करून सरकारने पुष्कळ लोकांचे जीव वाचविले. महाराजांनी त्याच वेळी एक कमिशन नेमून संस्थानांतील शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल चौकशी करण्याचे ठरविले. शेतकऱ्यांचा कर्जबरजारीपणा, त्यांची सांपत्तिक हलाखी व त्यामुळे शेतकीकडे होणारे दुर्लक्ष वगैरे गोष्टीसंबंधाने कमिशनने एक लांबलचक रिपोर्ट लिहिला. इ.स. १९०९ सालापर्यंत स्वतंत्र असे शेतकी खाते बडोदे संस्थानांत नव्हते. रेव्हेन्यु खात्याकडे शेतकीविषयक कारभार सोपविला होता. त्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्यांत येऊन सन १९०९ साली दि. व्ही. एम. समर्थ ह्यांना अमात्य नेमण्यांत आले.

शेतकऱ्यांना हलक्या दराने कर्जाऊ रक्कम देऊन सावकारांच्या तावडीतून सोडविणे, त्यांना बी-बीयाणे पुरविणे, व शेतकीत कशा सुधारणा कराव्या हे प्रयोग, प्रदर्शने, भाषणे इत्यादि रूपाने शेतकऱ्यांना समजावून देणे वगैरे उद्योग व्याख्यात्याने हाती घेतले. उत्तम नमुनेदार शेते कशी करावी यासाठी सरकारने जगुदन, नवसारी व बडोदे या ठिकाणी नमुनेदार शेती करून एका तालुक्यांत जे धान्य होत नाही त्याची दुसऱ्या तालुक्यांत कशाप्रकारे निपज करता येईल, हे सप्रयोग दाखविण्याची व्यवस्था केली. १९३०-३१ साली अशा सरकारी शेतांवर रु. ५,५८७ खर्च करण्यांत आले. शिवाय सुधारलेली औते, वाफेने चालणारा नांगर, धान्यविध्वंसक जंतूंचा नाश यासंबंधाने शेतकऱ्यांना माहिती पुरविण्यांत आली. हा उपक्रम १९०९-१० सालीच करण्यांत आला. त्यावेळी नवसारी वगैरे प्रांतात मोठी प्रदर्शने भरविण्यांत येत असत. ह्याशिवाय शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शेतकी शिक्षणाचे वर्ग उघडण्यांत आले आणि शेतीचे तुकडे पाडण्यास कायद्याने बंदी करण्यांत आली. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नाहीसा करण्यासाठी शेतकी पतपेढ्या, शेतकी मंडळे, परस्पर सहाय्यक संस्था स्थापन करण्यांत आल्या. १९०५ साली

काश्मिरांतील रेशिमाच्या पैदासीच्या पद्धतीचे शिक्षण घेण्यासाठी रावजीभाई पटेल यांना पाठविले होते. तसेच बंगालच्या शेतकीखात्याचे असिस्टंट डायरेक्टर व सिल्क एक्सपर्ट मि. एन. जी. मुकर्जी यांना बडोद्यांत कांही महिन्यापुरते बोलावून नवसारी व बडोदे येथे रेशमाची पैदास उत्तम रीतीने कशी करता येईल याबद्दल महाराजांनी विचारविनीमय केला. सध्या शेतकीखाते फिरते तपासनीस नेमून शेती सुधारणेसंबंधी प्रयोग, व्याख्यानांद्वारे प्रचारकार्य उत्तम तऱ्हेने करीत आहे. त्याचप्रमाणे बी-बीयाणे, जनावरांची व कोंबड्यांची उत्तम पैदास, डेअरी वगैरे संस्थांची माहिती व हस्तपत्रके यांच्या शेतकऱ्यांमध्ये प्रसार करण्यांत येतो. शेतीच्या जनावरांसाठी निरनिराळ्या ठिकाणी एकंदर २१ पशुरोग चिकित्सालये स्थापिली असून डॉक्टरलोकहि ठिकठिकाणी दौरा काढून मदत करतात. विहीरी खोदण्याचे कामासहि सरकारकडून उत्तेजन देण्यांत येते.

बडोद्याच्या अगदी नजीक असल्यामुळे व्यापाराचा ओघ साहजिक तेथे वळतो. तरीसुद्धा महाराजांच्या प्रगतिपर धोरणामुळे उद्योगधंद्याच्या बाबतीत बडोदे संस्थान महत्वाचे गणले जाते. महाराजांनी व्यापारास उत्तेजन देण्यासाठी बऱ्याच कारखान्यांना सरकारी मदत दिली. आयात निर्गत मालावर जकात कमी केली, पाणी पुरवठा वगैरे इतर सवलती दिल्या, आणि नवीन धंद्याच्या उपक्रमासंबंधी तद्विषय तज्ज्ञ इसमांना बोलावून वस्तुस्थितीत काय सुधारणा करता येतील यासंबंधाने चर्चा करून रिपोर्ट मागविले. मोत्ये शोधून काढण्यासाठी डॉ. हॉर्निल, सीमेंटसाठी अँडर्सन, खनिजपदार्थांसाठी बसफ्रुट, शंभुशिव ऐयर, उद्योगधंद्यासाठी व्हीटनॅक, अमेरिकेत शिक्षण घेतलेले रा. दातार व मि. नानावटी वगैरे इसमांस नोकरीत घेऊन त्यांचेकरवी उद्योगधंद्याची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले. येथील रंगविण्याच्या कारखान्यांचा हिंदुस्थानांत दुसरा नंबर लागतो. त्याशिवाय राज्यांत कापडाच्या गिरण्या असून मंगलौरी कौले, रासायनिक द्रव्ये, चामडे, साखर वगैरे अनेक जिन्नस तयार करण्याचे कारखाने आहेत. बिलीमोरा हे बंदर व रेल्वेस्टेशन असल्याने विटा, साबू, तेले यांचे तेथे मोठमोठे कारखाने आहेत. आसपास जंगल बरेच असल्याने जहाजे बांधण्याचा धंदा चालतो. पण तो खूप वाढविला पाहिजे. कारखान्यांना भांडवल पुरविण्यासाठी सरकारी बँक १९०८ साली स्थापण्यांत आली असून तिचे भांडवल ६० लाखांचे होते. ह्या बँकेच्या शाखा मुंबई, अहमदाबाद, सुरत वगैरे ठिकाणी असून संस्थानांत १०/१५ ठिकाणी उपशाखाहि आहेत. पूर्वीचे गायकवाडी नाणे व ब्रिटीश रुपया यांच्या हुंडणावळीत बाजारांत तफावत पडल्यामुळे महाराजांनी गायकवाडी रौप्यनाणे बंद केले.

महाराजांनी १९०६ साली अखिल भारतीय औद्योगिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना स्वदेशीचा जोराने पुरस्कार केला आहे. 'Swadeshi is our last chance.' हिंदुस्थानने पाश्चात्य लोकांना तत्त्वज्ञानामृत पाजून त्यांच्या मोबदल्यात शास्त्रीयज्ञान पैदा केले पाहिजे असे सांगून राजकारणाचे धोरण आर्थिक पद्धतीवर उभारणे किती जरूर आहे, हे पूर्वीच्या रोम, ग्रीस इत्यादि राष्ट्रांच्या इतिहासावरून स्पष्ट होते. 'अनाठायी होणाऱ्या पैशाचा विनियोग जर उद्योगधंदे उभारण्याकडे होईल तर राष्ट्राचे बलसंवर्धन होईल.' तेंव्हा त्या दृष्टीने धनिकांनी प्रयत्न करावेत अशी कळकळीची विनंति करून महाराजांनी आपले भाषण संपविले

होते. यावरून महाराजांचे औद्योगिक बाबतीतील धोरण स्पष्ट होईल. याचकरता रेल्वे बांधणीच्या प्रचंड कामास महाराजांनी सुरूवात केली.

रेल्वे

श्रीमंत गणपतराव महाराजांनी बी. बी. सी. आय. रेल्वे कंपनीस १८५६ साली संस्थानांत रेल्वे लाईन बांधण्यास परवानगी दिली व त्या भागावरचे दिवाणी व फौजदारी हक्क ब्रिटीशांस दिले. त्याप्रमाणे १८६० साली पहिली आगगाडी बडोद्याहून गेली. खंडेराव महाराजांनी कर्जण्यापासून डभईपर्यंत पहिली संस्थानी रेल्वे ५० हजार रुपये खर्च करून १८६९ साली बांधविली व तीवरील दळणवळण १८७३ साली सुरू झाले. सर टी. माधवराव दिवाणपदावर आल्यानंतर त्यांनी संखेडा-डभई-चांदोद फाटा १८७९ साली सुरू केला व त्यास गोयागेट-विश्वामित्री हा दोन मैल लांबीचा भाग जोडला. श्रीमंत सयाजीराव महाराज ज्यावेळी राज्यारूढ झाले त्यावेळी राज्यांत एकंदर रेल्वे लाईन ५९ मैल लांबीची होती. त्यानंतर ब्रिटीश सरकारकडून कडी प्रांतात रेल्वे गायकवाड सरकारने सुरू करावी अशी सूचना आल्यावरून १८८७ साली मेहसाणा व वडनगर हा फाटा सुरू करण्यांत आला. १८९१साली मेहसाणा ब्रिटीश हद्दीतील विरमगांव स्टेशनांस रेल्वेने जोडण्यांत आले. अशा प्रकारे महाराजांचे हाती राज्यसूत्रे येऊन दहा वर्षे पुरी होतात न होतात तोच कडी प्रांतात ९० मैल लांबीची रेल्वे सुरू झाली. मेहसाणा हे मोठे जंक्शन बनले.

यानंतर महाराजांनी सर्व राज्यांत रेल्वे सूरू करण्याचा प्रश्न हाती घेतला. आपल्या राज्यांत दौरा काढण्यासाठी रेल्वेची सोय असल्यास बरे या हेतूने एकंदर ६४४ मैलांची रेल्वे बांधण्यांत आली. अमरेली व ओखामंडळ प्रांतात १९२१ साली मीटरगेजची लाईन बी. बी. सी. आय. रेल्वेकडून बांधविण्यांत आली. रेल्वेमुळे दुष्काळग्रस्तांस दुष्काळाच्या दिवसांत मदत पोचविण्याच्या कामी व एकंदर व्यापार व उद्योगधंद्याच्या कामी केवढा उपयोग होतो ह्याचा महाराजांनी लिहिलेल्या 'फॅमिन नोटस' मध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. सध्या बोडेली-छोटा उदेपूर रेल्वे, आनेद पेटलाद रेल्वे, मेहसाणा रेल्वे, खिजाडीया-धारी रेल्वे व ओरम रूल्वे इतके फाटे सुरू असून एकंदर भांडवल ५ कोटीपर्यंत घातले आहे व वार्षिक उत्पन्न रु. ५२ लक्ष असून खर्च रु.४० लक्ष पर्यंत आहे. गोयागेट स्टेशनपर्यंत मोठे वर्कशॉप बांधण्यांत आले आहे. रेल्वे नोकरांना प्रॉव्हिडंट फंड, परस्पर सहाय्यक संस्था, पेन्शन फंड वगैरे सर्व सवलती देण्यांत येत आहेत. महाराजांइतकी रेल्वेबांधणी आपल्या देशांत दुसऱ्या कोणत्याहि संस्थानने केली नाही. महाराजांस जरी यांत पुष्कळ आर्थिक नुकसान सोसावे लागले तरी 'Not failure but low aim is crime' हे त्यांचे ध्येय आहे.

१२.
सामाजिक सुधारणा

कोणत्याहि सुधारणेचे लक्षण म्हणजे दरेक व्यक्तीचा उत्कर्ष व समाजाच्या अवास्तव बंधनातून तिची सुटका हे होय. देशाची प्रगति होण्यास ज्या अनेक साधनांची जरूरी आहे, त्यांत सामाजिक सुधारणा अत्यंत आवश्यक होत, स्वतःचे घर सुधारल्याशिवाय देशाची स्थिती सुधारण्याच्या प्रश्नास हात घालणे म्हणजे 'आधी कळस मग पाया रे' अशी स्थिती होणार ! पायावांचून रचलेली इमारत जशी टिकू शकत नाही तद्वतच समाजसुधारणेच्या अगोदर देशोद्धाराच्या बाबतींची चर्चा करणे फुकट होय.

आधी राजकारण का समाजसुधारणा हा वाद बराच जुना असून त्यावर पुष्कळ भवति न भवति झालेली आहे, व या प्रश्नांत शिरण्याचे आपणास कारण नाही. कोणतीहि सुधारणा लेखणीच्या फटकाऱ्यासरशी किंवा दंडूकेशाहीच्या जोरावर होऊ शकत नाही; त्यांतूनहि धार्मिक अंधश्रद्धा, सामाजिक बंधने, हटवादीपणा, जातीजातीतील द्वेश, कोते विचार यांचा पगडा समाजावर बसला असेल तर विचारण्याची सोय नाही, आणि या सर्वांच्या जोडीला निरक्षरता व अज्ञान असले म्हणजे साराच कारभार आटोपला. तशांत एखाद्याने प्रचलित रुढीविरूद्ध सुधारणा करू म्हंटले तर उपहास, मानहानि, तिरस्कार यांशिवाय अन्य कांही त्याच्या वांट्यांस यावयाचे नाही.

परंतु अशा याा बिकट परिस्थितीसहि न जुमानता सुधारणावादी गृहस्थ 'बुद्धिबलाच्या प्रभावाने सर्व लोकांस आपलेसे करून स्वतःचे विचार समाजांत प्रसृत करील तर त्यांस खात्रीने यश मिळेल' अशांची थोरवी काय वर्णावी? हळूहळू लोकहि त्याचा कित्ता गिरवू लागतील व लागतातहि.

श्री. सयाजीराव महाराजांनाहि अशाच प्रकारचा जनापवाद सोसावा लागला आहे. युरोपच्या पहिल्या सफरीचे वेळी त्यांच्या सहकाऱ्यांची व नोकराचाकरांची मते या प्रवासास अत्यंत प्रतिकूल होती. अशा लोकांच्या विरोधाचा पारा उतरावयास व त्यांना सर्वस्वी अनुकूल करून घेण्यांस

भीड, बढती, बक्षिसे, मानसन्मान इ. गोष्टींचा महाराजांनी मोठ्या चातुर्याने उपयांग करून आपले प्रवासकार्य शेवटास नेले. कालांतराने परदेश गमनाबद्दलचा लोकांचा विरोध व तन्निमित्त जातिबहिष्कृत करण्यासंबंधी समाजाचा दुराग्रह व जुलूम या गोष्टी हळूहळू नाहीशा होऊ लागल्या. विद्याभ्यासाकरिता विद्यार्थ्यांना परदेशी पाठविण्याचा महाराजांनी जणू पायंडाच घातला. अशा रीतीने एकेकाळी परदेशगमन गैरसोयीचेच नव्हे तर धोक्याचे वाटत होते व समाजबंधन, रुढी, यांच्या नांवाखाली लोक 'साप साप' म्हणून ओरडत ती केवळ दोरीच आहे, असे महाराजांनी आपल्या उदाहरणाने सर्वास दाखवून दिले.

वस्तुतः समाजाचा पाया म्हणजे कुटुंबव्यवस्था. हिंदी लोकांत बालविवाहाच्या अनिष्ट पद्धतीमुळे कुटुंबव्यवस्थेची निकृष्टावस्था झालेली आहे. 'बालकांच्या शरीरांची व मानसिक शक्तीची वाढ होण्यापूर्वी जी लग्ने होतात त्यापासून भावी प्रजा अशक्त निपजून राष्ट्राचे भयंकर नुकसान होते. बालविवाहामुळे सांसारीक जीवन सुखाचे होत नाही'याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी महाराजांनी 'बालविवाह प्रतिबंधक'कायदा पास केला. या कायद्यान्वये विवाहप्रसंगी वधुवरांची वये निदान १४ व १८ असलीच पाहिजेत असे ठरविण्यांत आले. हा कायदा मोडणाऱ्यांस थोडीशी दंडाची शिक्षा ठेवण्यांत आली. परंतु महाराजांनी याची अंमलबजावणी फारशी कडक रीतीने केली नाही, इतकेच नव्हे तर कांही जातींचा प्रथम प्रथम सवलतीहि देण्यांत आल्या. दुसरी सुधारणा म्हणजे विधवांचे विवाह कायदेशीर समजण्यांत आले.

सुधारणा एकदम अंमलात आणण्यांत किंवा फार घाई केल्यास कार्याचा नास होतो; म्हणून कायदे चातुर्याने करूनहि त्यांचा चातुर्यानेच अंमल करण्यांत राज्यकर्त्यांची खरी कर्तबगारी दिसून येते. ही गोष्ट सयाजीरावांच्या कारकीर्दीवरून उत्तम समजण्यासारखी आहे.

सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्धीस आलेल्या 'वसुविली' च्यापूर्वी सहासात वर्षे बडोदे कौन्सिलांत सर्वतोपरी खल होऊन सिव्हिल मॅरेज ॲक्ट (ऐहिक लग्ननिबंध) पास करण्यांत आला. या कायद्यान्वये असगोत्रत्वाची व सवर्णधर्माची बंधने काढून टाकण्यांत आली. विजातीय विवाह करणाऱ्यांस पूर्वी स्वधर्मास सोडचिठ्ठी द्यावी लागे. महाराजांनी जातिबंधने व रुढ आचार कोणी पाळू नयेत अशाप्रकारचे व्यक्तीस्वातंत्र्यास विघातक नियम मात्र कधीच करण्याचे मनांत आणले नाही, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. कोणतीही सुधारणा म्हणजे समाजोन्नतिकारक नियमांची उभारणी व अयोग्य, समाजघातक नियमांची संहारणी ; हाती सत्ता आहे म्हणून न जुमानता आपले म्हणणे जबरदस्तीने दुसऱ्यावर लादणे योग्य नाही असे महाराजांचे मत. सारांश परिस्थितीप्रमाणे सर्व धोरण आंखले पाहिजे ही त्यांची समाज नियमननिती होय. 'जुने ते सोने' म्हणून व्यर्थ उराशी बाळगून बसण्यांत अर्थ नाही. महाराज म्हणतात की, 'लहान मुलास दुरुस्त करणे असेल तर त्याचे योग्यतेनुरूप इलाज योजिले पाहिजेत वयोवृद्ध व समंजस मनुष्य दुरुस्त करणे असेल तर त्यांचे समजुतीनुरूप निराळे इलाज घेतले पाहिजेत. हेच धोरण फेरफाराने समाजासहि लावावयाचे आहे.' नंतर एके ठिकाणी ते म्हणतात की, सुधारणेत अनीतीचा कोणताही भाग असू नये एवढ्याबद्दल कार्यकर्त्याने खबरदारी घेतली म्हणजे झाले. याप्रमाणे 'राजाची अनुमति व लोकांची सहिष्णुता (Tolerance) असली म्हणजे कोणतीहि सुधारणा

यशस्वी होण्यास विलंब लागत नाही.' अशारीतीने यांचे धोरण आहे. अनेक देशांतील रीतीरीवाज व इतिहासपरंपरा वगैरेंचे सूक्ष्म निरीक्षण करून जे अमूल्य ज्ञान त्यांनी संपादिले त्याचाच हा परिणाम होय. अशा रीतीने स्वसंपादित ज्ञानाच्या व अधिकाराच्या जोरावर त्यांच्या मुखांतून जे उपदेशपर शब्द निघत ते केवळ पोकळ नसून त्याप्रमाणे ते स्वतः लोकांस धडा घालून देत असत उदा. त्यांची प्रियकन्या श्री. इंदिराराजा यांच्या कुचबिहारच्या राजपुत्राबरोबर लग्नास केवळ विजातीय विवाहास उत्तेजन म्हणून त्यांनी संमति दिली.

दुसरे उदाहरण म्हणजे महाराजांनी स्त्रियांची पडदापद्धति नाहीशी केली, व याचा उपक्रम खुद्द महाराणीसाहेबांपासून झालेला आहे. न्यायमंदिरांत झालेल्या बक्षीससमारंभाचे वेळी महाराणीसाहेब गोषा न वापरता प्रथम सभेत आल्या. 'आधी केले मग सांगितले' किंवा 'जैसा बोले तैसा चाले याची वंदावी पाउले' या सदुक्ती प्रमाणे त्यांचा उपदेश सक्रिय होत असे हे यावरून उघड होत आहे.

महाराजांची सहावी सुधारणा 'अस्पृश्यतेचे उच्चाटणे' ही होय. हिंदुधर्म व हिंदुसमाज यांतील तत्त्वांचे व प्रचलीत चालीरीतींचे निःपक्षपातीपणाने जो कोणी निरीक्षण करील त्याला या समाजांतील व धर्मातील एका गहणीय प्रकाराविषयी संताप व तिटकारा आल्यावाचून राहणार नाही. आणि तो लाजिरवाणा प्रकार म्हणजे ज्यांना आपण 'हीन' किंवा 'अतिशुद्र' म्हणून समजतो त्यांच्याशी आपले वर्तन हा होय. 'अस्पृश्यता' हा हिंदुधर्माचा व हिंदुराष्ट्राच्या जिवंतपणाचा प्रश्न आहे, अस्पृश्यता हा हिंदुधर्मावर कलंक आहे. राज्यकर्त्यांकडे न्याय, समता व समान हक्कांची मागणी करण्यांत येते, परंतु एका बहुसंख्यांक वर्गाशी वागतांना या गोष्टी अजिबात विसरल्या जातात हे आश्चर्य नव्हे काय ? महाराज म्हणतात, 'वरचे लोक खालच्या लोकांस वाईट रीतीने वागवितांना पाहून मला फार दुःख होते. कुलशील माणसाच्या वर्तनावरूच ठरते, त्याशी जन्माचा कांही संबंध नाही?' नंतर अस्पृश्यता काढून टाकण्यासंबंधी ते म्हणतात, 'आपली भरभराट होण्यास व आपले वैभव वाढण्यास हा जातीजातींचा आकुंचितपणा नाहीसा होऊन आपले ऐक्य झाले पाहिजे.' जातिभेद देवकृत नाहीत. मनुष्यकृत आहेत असे त्यांनी मत दिले आहे. मागासलेल्या जातींना शिक्षण देण्यासंबंधी ते म्हणतात, 'या कामी हिंदु लोकांची अनुकुलता मिळेना, म्हणून मला मुसलमान व ख्रिस्ती शिक्षकांची मदत घ्यावी लागली. याबद्दल त्यांचे आभार मानणे गैरशिस्त होणार नाही.' महाराजांनी अंत्यजांच्या उन्नतीसाठी, शिक्षणाच्या काय काय सवलती दिल्या आहेत याचे विवेचन मागे आलेच आहे.

सन १९०४ साली भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून महाराजांची निवडणूक करण्यांत आली होती व महाराजांनी आपल्या भाषणांत वरील तत्त्वे सांगितली आहेत. यावरून महाराजांचे सामाजिक बाबतीत किती प्रगतिपर विचार होते यांची कल्पना येईल. नुकतेच कन्याविक्रयासंबंधाने, नवराबायकोच्या घटस्फोटासंब्रधाने व स्त्रियांच्या हक्कासंबंधाने बडोदा असेंब्लीमध्ये कायदे पसार झालेले आहेत. हेहि तेथील सामाजिक प्रगतीचे द्योतक आहे.

१३.
महाराजांची धार्मिक मते

संस्थानिकांना अंतर्गत स्वातंत्र्य असल्यामुळे त्यांना ब्रिटीश सरकारापेक्षा धार्मिक व सामाजिक सुधारणा एकदम कायद्याने करणे शक्य असते. खरे पाहिले तर ब्रिटीश सरकार हे विदेशीय असल्याने हिंदी लोकांच्या धार्मिक बाबतीत सहसा हात घालू इच्छित नाही. ब्रिटीश सरकाराप्रमाणेच महाराजांनी आपल्या प्रजेस धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. स्वतः हिंदु तेंव्हा हिंदुधर्मियांनाच काय ते उत्तेजन द्यावयाचे व परधर्मियांचा छळ करावयाचा अथवा त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर व तदनुषंगिक न्याय्य हक्कांवर गदा आणावयाची असले संकुचित ध्येय त्यांनी डोळ्यांपुढे ठेविले नाही. त्यांनी प्रत्येक धर्मातील धर्मपुस्तकांची मराठीत भाषांतरे करविली आहेत. इ.स.१८८५ साली जैनधर्माच्या इतिहासाचे वाङ्मय मराठीत आणण्यांत आले. १९०४ साली धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यावर ग्रंथ लिहिण्यासाठी ५०० रु. मंजूर केले. सन १९११ साली ख्रिश्चन, जैन, इस्लाम, बौद्ध, हिंदु वगैरे धर्मातील तत्त्वे शिकविणारा एक क्लास काढावयाचे त्यांनी ठरविले होते. या बाबतीत त्यांचे अकबराशी फार जुळते. अकबरबादशहासहि अशा प्रकारच्या निरनिराळ्या धर्माच्या तौलनिक अभ्यासाची फार आवड होती व प्रत्येक धर्मातील उत्तमोत्तम तत्त्वे घेऊन त्याने 'दिने-इलाही' नांवाचा नवीन धर्म स्थापन केला होता हे इतिहासप्रसिद्ध आहे. महाराज जरी तितक्या पायरीपर्यंत गेले नसले तरी सर्व धर्मियांबद्दल त्यांना आदर आहे हे निर्विवाद आहे. मात्र त्यांना व्यर्थ शब्दावडंबर करून धार्मिक स्तोम माजविणे बिलकूल पटत नाही. तसेच रूढीच्या पांघरूणाखाली जी कित्येक थोतांडे किंवा फसवाफसवीचे प्रकार करण्यांत येतात अगर समाजाकडून त्याजकडे कानाडोळा करण्यांत येतो, तो त्यांना नको आहे. धर्माच्या बाबतीत कोणी मध्यस्थ नको. कुलाचार पाळू नयेत असे त्यांचे मत नाही, पण अमूक माणसांनाच किंवा जातीलाच वेदोक्तचा अधिकार आहे, इतरांना नाही, हे मत त्यांच्या बुद्धीस पटत नाही. सर्वच ईश्वराची प्रार्थना करण्याला सर्वांना सारखाच अधिकार पोचतो. ब्राह्मणांस तेवढा वेदोक्तचा अधिकार,

परंतु क्षत्रियांस मात्र पुराणोक्त पद्धति, ही विषमता त्यांना दुःखद वाटते. महाराजांस हिंदुधर्माचा पूर्ण अभिमान, परंतु देशकालानुरूप त्यांत फरक होणे इष्ट आहे असे त्यांचे मत आहे.

महाराजांनी आपल्या कुटुंबातील सर्व मंडळींचे संस्कार वेदोक्त पद्धतीने केलेले आहेत. त्याचप्रमाणे भोजनादिप्रसंगी सोवळे-ओवळे, पंक्तिप्रपंच इत्यादि गोष्टींना अजिबात फाटा दिला जातो. महाराजांचे भोजन जर युरोपियन पद्धतीचेच असते, परंतु सार्वजनिक कार्यक्रमांतहि या समजुतींना थारा देण्यांत येत नाही.

लहानपणी साधू अगर संन्यासी होणे हीही गोष्ट महाराजांना मान्य नाही. महाराज लिहितात, 'विचार प्रौढ व प्रगल्भ झाल्यावर साधु किंवा संन्यासी होणे ही गोष्ट वेगळी; परंतु विरक्ति हणजे काय याची पुरी कल्पनाहि नसते अशा अल्पवयांत साधु होण्याने ऐदी लोकांची संख्या वाढून समाजाचे अनहित होते.' अशा लोकांस दान केल्याने भिक्षेकऱ्यांना एक प्रकारचे उत्तेजन मिळून ते निरुद्योगी बनतात व त्यांना नानाप्रकारची व्यसने जडतात, ही गोष्ट कांही खोटी नाही. महाराजांनी राजवाड्यांतील अशाप्रकारचा दानधर्म सक्तीने बंद करविला. धंदेवाईक भिकारी वाढतात व लोक कंगाल होतात.

हल्लीच्या शिक्षणांत धर्मशिक्षणाचा प्रवेश होणे फार अगत्याचे आहे. धर्मशिक्षणाची रचना नीतीमत्तेच्या पायावर करून शिक्षणामुळे मनुष्याचे विचारक्षेत्र थोर व विशाल होईल अशी तजवीज होणे अगत्याचे आहे, असे सांगून धार्मिक शिक्षणाने आप्पलपोटेपणांस थारा मिळणार नाही असे महाराजांनी मत प्रतिपादिन केले आहे. या मतास अनुसरून महाराजांनी नियमहि केले आहेत. (१) पुजारी नियम-या नियमान्वये देवालयांतील संस्कृत शिकवून त्यांची परीक्षा घेण्यांत येते. देवळाचे पुजारीहि सुशिक्षीत असले पाहिजेत असे महाराजांचे मत आहे. (२) पुरोहित नियम-सन १९१४ साली हिंदु पुरोहितांच्या लायकीविषयी एक कायदा करण्यांत आला. या कायद्यान्वये वाटेल त्या जातीच्या इसमास इतर धंद्याप्रमाणे पुरोहिताचा धंदा करण्याची सवड ठेवण्यांत आली. मात्र पौरोहित्य करू इच्छिणाऱ्याने पुरोहितांची परीक्षा पास होऊन प्रशस्तिपत्र मिळविले पाहिजे. या नियमाचा मुख्य कटाक्ष पुरोहित वर्गाला आवश्यक शिक्षण देण्याकडे व ज्यांना ब्राम्हणेतर पुरोहित हवा असेल तर त्यांना तशी सवलत कायद्याने मिळवून देण्याकडे विशेष लक्ष आहे. अर्थात या नियमांनी पुरोहितांच्या वंशपरंपरागत हक्काचे स्तोम कमी केले असून पुरोहिताने गुणकर्माप्रमाणे आपले समाजातील स्थान मिळवावे, हे स्पष्ट करण्यांत आले आहे. (३) गोप्रदाने-प्रायश्चित्ते, दक्षिणा यावर जो अनाठायी खर्च होतो तो बंद करून त्या पैशाचा विनियोग संस्कृत वाङ्मयास उत्तेजन देण्याकडे करण्यांत आला आहे.

अशा प्रकारची महाराजांची धार्मिक मते असून ती समाजास एकंदर हितकारक आहेत असेच कोणीहि म्हणेल.

●●●

१४.
जगी सर्व सूखी असा कोण आहे ?

जे राजे प्रजेचे कल्याण तेच आपले कल्याण असे समजतात, प्रजेच्या हितासाठी अहर्निश झटत असतात, त्यांच्या वाट्यास कौटुंबिक सुख फार थोडे येते असे म्हणतात. रामराज्य स्थापणारे प्रभु रामचंद्र यांना तरी कौटुंबिक सुख कितीसे मिळाले? प्रथम चौदा वर्षे वनवास भोगला, रावणासारख्या बलाढ्य शत्रुशी टक्कर दिली व अखेर राज्य मिळाले तरी लोकरंजनार्थ सीतेचा त्याग करावा लागला. तात्पर्य राजाला कौटुंबिक सुख फार थोडे मिळू शकते. तीच गोष्ट सयाजीरावांची त्यांचे जीवन थोडेसे विस्तृत सांगणे इष्ट आहे.

श्रीमंत सयाजीरावांना दोघे बंधु. ज्येष्ठ आनंदराव व धाकटे संपतराव. कनिष्ठ बंधु श्रीमंत संपतराव ह्यांनी बॅरिस्टरीची परीक्षा दिली आहे. त्यानंतर महाराजांनी खासगी कारभारी, सरसुभे, एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद वगैरे महत्वाच्या जागांवर त्यांची नेमणूक केली. श्रीमंत संपतराव यांनी सर्व लोकांशी मिळून मिसळून वागून बरीच लोकप्रियता संपादन केली आहे. महाराजांचे वडील बंधु श्रीमंत आनंदराव यांची बहुतेक सर्व नाकरी फौज खात्यांत झालेली होती, ते सध्या हयात नाहीत.

श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या द्वितीय पत्नी श्री. सौ. महाराणी चिमणाबाईसाहेब यांना मराठी, गुजराती, हिंदी,इंग्लीश फ्रेंच भाषांचे शिक्षण घेतले असून स्त्रीशिक्षणाच्या त्या मोठ्या पुरस्कर्त्या आहेत. भारतीय महिलांची स्थिती या नांवाचा त्यांनी इंग्लीश भाषेत एक सुंदर ग्रंथ लिहिला असून त्यांत पाश्चात्य व पौर्वात्य पद्धतींचा मेळ बसेल असे शिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे, स्त्रीभावनांचा परितोष करणारे विषय स्त्रीयांना शिकविले पाहिजेत, युरोपियन स्त्रियांप्रमाणे हिंदी स्त्रियांनी सार्वजनिक कामांत भाग घेतला पाहिजे, असे सुंदर विचार प्रदर्शित केले आहेत. श्री. सौ. महाराणीसाहेबांना एकंदर चार अपत्ये झाली. प्रिन्स जयसिंहराव, प्रिन्स शिवाजीराव, श्रीमंत राजकुमारी इंदिरा राजे व प्रिन्स धैर्यशीलराव.

महाराजांच्या प्रथम पत्नी (पहिल्या) चिमणाबाईसाहेब यांचे पुत्र श्री. युवराज फत्तेसिंहराव यांनी आपला प्राथमिक अभ्यास बडोद्यास "प्रिन्सेस स्कूल" मध्ये संपविल्यानंतर ते मुंबई विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा (मॅट्रीक) उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांना पुढील शिक्षणासाठी इंग्लंडास पाठविण्यांत आले. त्यांचे बरोबर त्यांचे धाकटे सापत्नबंधु प्रिन्स जयसिंहराव व प्रिन्स शिवाजीराव यांना शिक्षणासाठी धाडण्यांत आले. इंग्लंडला गेल्यावर युवराज फत्तेसिंहरावांनी बॅलियल कॉलेजांत प्रवेश मिळविला, पण आपला अभ्यासक्रम पुरा करण्यापूर्वीच ते सन १९०२ साली हिंदुस्थानांस परत आले. महाराजांना याबद्दल अत्यंत वाईट वाटले. आपल्या पुत्रांनी सुशिक्षण घेऊन त्याचा फायदा इतरेजनांना द्यावा अशी कोणत्या पित्याची इच्छा नसणार ? त्यांतून महाराजांची तर होतीच होती. पण दुर्दैव आडवे आल्यावर ते काय करणार ?

सन १९०८ साली युवराज फत्तेसिंहराव मज्जातंतूच्या विकाराने अकाली कालवश झाले. त्यामुळे महाराजास अतिशय वाईट वाटले. महाराजांवर आलेली ही द्वितीय कौटुंबिक आपत्ति होय. श्री. युवराज फत्तेसिंहरावांना मृत्यूसमयी दोन कन्या व एक चिरंजीव अशी तीन अपत्ये होती. या मुलांपैकी श्री. राजपौत्री इंदुदेवींचे श्री. छत्रपति राजाराम महाराज यांचेबरोबर लग्न झाले आहे. श्री. लक्ष्मीदेवींना सावंतवाडीचे हल्लीचे राजेसाहेब यांस दिले असून त्यांना तीन अपत्ये झाली आहेत. श्री युवराज फत्तेसिंहराव यांचे चिरंजीव श्री. युवराज प्रतापसिंह यांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतील इंटरमिजिएटपर्यंतचा अभ्यास पुरा करून राज्यकारभाराचा अनुभव मिळण्यासाठी मुलकीखात्यांतील वहिवटदार, नायसुभे, सुभे व सरसुभे अशा विविध हुद्यांचे काम केले, व सध्या ते कामसचिव या हुद्याचे जबाबदारीचे काम करीत आहेत. राज्यांतील मंत्रिमंडळाचेहि ते सभासद आहेत.

प्रिन्स जयसिंहराव, शिवाजीराव व धैर्यशीलराव यांच्या बाबतीतहि ईश्वरी नेमानेम प्रतिकुल ठरला. जयसिंहराव हे प्रथम हॅरो येथील ग्रामर स्कुलमध्ये शिकत होते. सन १९१० साली त्यांना अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठांत शिक्षणार्थ पाठविण्यांत आले. पण लवकरच प्रकृति नादुरूस्त झाल्याने त्यांना आपला अभ्यास अर्धवट सोडून हिंदुस्थानांस परत यावे लागले. हिंदुस्थानांस आल्यावर त्यांचे लग्न झाले व राज्यांत विविध हुद्याची कामे करण्यांस त्यांनी सुरूवात केली.

महाराजांचे तिसरे पुत्र शिवाजीराव हे निकोप प्रकृतीचे, सुदृढ बांध्याचे व उमद्या स्वभावाचे होते. हिंदुस्थानांत आपला प्राथमिक शिक्षणक्रम संपवून ते पुढील अभ्यासासाठी ऑक्सफोर्डला गेले. थोड्याच दिवसांत त्यांनी क्रिकेट खेळण्यांत तेथे बराच वरचा नंबर पटकाविला व सर्वांकडून वाहवा मिळविली. पुढे ते हिंदुस्थानांस परत आल्यावर त्यांचा विवाह करण्यांत आला व महाराजांनी त्यांना राज्यकारभारात घातले. सन १९१९ साली त्यांना न्यूमोनियाचा ताप आला व त्यांतच त्यांचा दुर्दैवेकरून अंत झाला. त्यांच्या पाठीमागे त्यांच्या पत्नि श्री. राजस्नुषा कमलादेवी,व तीन मुले-प्रिन्स उदयसिंह, खंडेराव व प्रिन्सेस निर्मलराजे-आहेत. मुलांपैकी प्रिन्स उदयसिंह सध्या बडोद्यांतील कॉलेजांत शिकत असून दुसरी दोघे अनुक्रमे बडोदे व पुणे येथील शाळांतून शिक्षण घेत आहेत.

श्री. राजकन्या इंदिराराजे यांचे शिक्षण खाजगी रीतीने होऊन नंतर त्यांनी बडोदा कॉलेजमध्ये शिक्षण घेण्याचे ठरविले; याबद्दल बरीच टीका झाली. महाराजांच्या मनांत ग्वाल्हेरचे महाराज माधवराव शिंदे यांच्याशी इंदिराराजे यांचा विवाह करावा असे होते; परंतु इंदिराराजे यांनी कुचबिहारचे महाराज जितेंद्रनारायण यांच्याबरोबर विवाह करण्याचे निश्चित केले. हा विवाहसमारंभ इंग्लंडमध्ये ब्राह्मोपद्धतीने झाला. पुढे कांही वर्षांनी महाराज जितेंद्रनारायण मृत्यू पावले.

सन १९१९ साली प्रिन्स जयसिंगराव यांची प्रकृती बिघडली तेंव्हा हवापालट व औषधोपचारासाठी त्यांना युरोपांत पाठविण्यांत आले. परंतु त्याचा कांही एक उपयोग न होता २७ ऑगस्ट १८२३ रोजी बर्लिनहून हॉलंडास येत असता त्यांना वाटेत आगगाडीत मृत्यूने गांठले. या वेळी महाराज सेंट मॉस्टिझ येथे होते, परंतु रूटरने बडोद्याच्या गायकवाडांस देवाज्ञा झाली अशी मोघम तार पाठविली 'गायकवाड' म्हणजे सयाजीराव अशी चोहोकडे प्रसिद्धी असल्यामुळे इंग्लंडात व हिंदुस्थानांत निरनिराळ्या वृत्तपत्रांनी महाराजांचे मृत्यूलेख प्रसिद्ध केले. 'आपुले मरण पाहिले म्यां डोळां' या उक्तीप्रमाणे महाराजांस जिवंतपणीच आपल्याविषयी लोक काय बोलतात हे वाचावयास सांपडले. लंडन टाइम्सने महाराजांनी महायुद्धांत इंग्रज सरकारांस केलेल्या मदतीचा गौरवपूर्वक उल्लेख करून 'महाराजांची वृत्ति अतिशय चंचल व भांडखोर होती, आणि सार्वभौम सत्तेशी त्यांचे वरचेवर खटके उडत असत' अशी टीका केली. मॉर्निंग पोस्टने 'महाराज प्रजाहितदक्ष' होते असे म्हटले. डेली हेरल्ड पत्राने बडोदे संस्थान पंजाबमध्ये असल्याचे सांगून हिंदुस्थानविषयी आपले गाढ अज्ञान प्रगट केले तर बडोदे हिंदुस्थानांत मोठे सुधारलेले व भरभराटीस आलेले संस्थान आहे असे सांगून महायुद्धांत महाराज राजनिष्ठ राहिल्याबद्दल डेली टेलिग्राफ पत्राने त्यांना धन्यवाद दिले. मुंबईच्या टाइम्सने 'राजकीय वातावरणांत महाराज ही एक डोईजड व्यक्ती होती' अशा अर्थाची निंदागर्भित स्तुति केली. ते कसेहि असले तरी बहुतेकांनी महाराजांच्या कार्याची स्तुतीही केली. हिंदुस्थानांतील-विशेषतः मुंबई इलाख्यांतील प्रजेला महाराज सुखरूप आहेत हे वृत्त ऐकून किती आनंद वाटला असेल हे सांगणे नलगे.

महाराजांचे सर्वात धाकटे चिरंजीव श्रीमंत धैर्यशीलराव यांचे शिक्षण इंग्लंडातील ऐका पब्लीक स्कूलमध्ये झाले आहे. आपले शिक्षणक्रम पुरे झाल्यावर त्यांनी लष्करी शिक्षण घेतले. ते संपवून बडोद्यास आल्यावर त्यांचे लग्न झाले. सध्या त्यांना पांच अपत्ये असून त्यापैकी चार युरोपांत विद्यार्जन करीत आहेत. राज्यांतील निरनिराळ्या खात्यांतील कामकाजाची त्यांनी माहिती घेतली असून सध्या ते बडोद्यासच राहतात. सन १९२७ साली बडोद्यांस मोठा जलप्रलय झाला, त्यावेळी त्यांनी जलप्रलय निवारणाचे काम चांगल्या रीतीने करून सर्वांकडून वाहवा मिळविली.

या सर्व हकीकतीवरून असे दिसून येईल की, महाराजांच्या देखत त्यांच्या मातुश्री महाराणी जमनाबाईसाहेब, भगिनी श्रीमंत तारांराजे, प्रथम पत्नी महाराणी चिमणाबाई, तीन वयांत आलेले मुलगे, एक सून, एक जांवई, श्री. महाराज जितेंद्रनारायण, बंधु आनंदराव, ही सर्व मृत्यू पावली. अर्थात त्यांना कौटुंबिक सुखाचा लवलेशहि नाही असेच कोणी म्हणेल व स्वतः महाराजहि असेच मत प्रगट करतात. "I have no domestic life"

१५.
दोन महोत्सव

सन १९०७ च्या मार्च महिन्यांत श्री. महाराजसाहेबांचा रौप्य महोत्सव त्यांच्या प्रजेने मोठ्या थाटाने साजरा केला. महाराजांनी आपल्या पंचवीस वर्षांच्या कारकीर्दीत केलेल्या लोकोपयोगी सुधारणांमुळे ते आपल्या प्रजेचे तेंव्हा किती आवडे झाले होते हे निदर्शनांस आले. याप्रसंगी बडोदा कॉलेजांतील समारंभ आटोपून राजवाड्यांत परत जातेवेळी त्यांच्या गाडीचे घोडे सोडून विद्यार्थ्यांनी त्यांची गाडी स्वतः ओढत नेली. या आनंदोत्सवाप्रित्यर्थ महाराजांनी पांच लक्ष रुपयांची साराबाकी मांडून वाळली, बडोदे येथे ज्युबिलीबाग उघडून बडोदा सुधराईस मार्केटसाठी एक भव्य इमारत बक्षिस दिली, अंत्यज विद्यार्थ्यांसाठी पाटण व अमरेली येथे दोन वसतिगृहे उघडली, राज्यांत चार मोठे दवाखाने काढले, व खेडोपाडी विहिरी खणण्यासाठी पांच लक्षांची जादा रक्कम मंजुर केली.

महाराजांचा राज्यरोहण समारंभास सन १९२५ साली ५० वर्षे पुरी झाली. तन्निमित्त त्यांच्या प्रजाजनांनी बडोद्यास व राज्यांतील खेड्यापाड्यांतून थाटाचा सुवर्ण महोत्सव करण्याचे ठरविले. त्यांच्यासाठी एक एक समिती नेमण्यांत आली व तिने या महोत्सवाची अल्पावधीत जंगी तयारी केली. महाराजांचा मुक्काम तेंव्हा युरोपांत असल्यामुळे ते परत नंतर हा समारंभ करण्याचे ठरविण्यांत आले.

ता. २० नवेंबर १९२५ साली महाराजांची स्वारी स्वदेशी परत आली व ता. ११ जानेवारी १९५६ पासून सुवर्ण महोत्सवांस सुरुवात झाली. या दिवशी सकाळी ९-३० च्या सुमारास वारशा परेड ग्राउंडवर मोठा दरबार भरविण्यांत आला. लक्ष्मीविलास राजवाड्यापासून घोडदळ, पायदळ, सोन्याचांदीच्या तोफांसह जंगी तोफखाना या भव्य लवाजम्यासह महाराजांची स्वारी हत्तीवर सोन्याच्या अंबारीत बसून परेड ग्राउंडवर येऊन दाखल झाली. मिरवणूकीच्या अग्रभागी घोड्यावरचा इंग्रजी पद्धतीचा स्फूर्तिदायक बँड वाजत होता. ठिकठिकाणचे रस्ते फुलून गेले होते. मैदानावर मुख्य दरवाजाशी महाराजांची स्वारी अंबारीतून उतरल्यानंतर, दिवाणसाहेब

व इतर अधिकारी यांच्याशी हस्तांदोलन करून ते खास उच्चासनावर जाऊन बसले, त्यांच्या शेजारी श्री. सौ. मा. महाराणीसाहेब व बाजूला श्री. कुचबिहारच्या राणीसाहेब, श्री. प्रतापसिंह व राजघराण्यांतील इतर मंडळी यांच्याकरिता सोनेरी, रुपेरी खुर्च्या ठेवण्यांत आल्या होत्या.

त्यावेळी जमलेल्या सर्व लोकांनी दरबारी पोशाख केलेला होता. मिलिटरीचे अधिकारी आपल्या मिलिटरी युनिफॉर्ममध्ये इकडून तिकडे वावरतांना दिसत होते. महाराजांची स्वारी मंडपांत आल्यावर त्यांनी त्यांना उत्थापन देऊन अभिवादन केले. महाराजांची स्वारी उच्चासनावर विराजमान झाली व त्यांच्या दोन्ही बाजूंस हातात नंग्या समशेरी घेऊन त्यांचे शरीररक्षक उभे राहीले.

दिवाणसाहेबांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत प्रजेच्या वतीने महाराजांचे आयुरारोग्य चिंतिल्यानंतर निरनिराळ्या संस्थांतर्फे मानपत्रे अर्पण करण्याच्या कामास सूरूवात झाली. (१) मिलओनर असोसिएशन, (२) पुण्याची शिक्षणप्रसारक मंडळी, (३) अखिल भारतीय हिंदु महासभा, (४) सुरत म्युनिसिपालिटी, (५)मराठा समाज, (६) सुनी अंजुमान बडोदे, (७) बडोदे अंत्यज संस्था, (८) नवसारी जिल्ह्यांतील नागरिक, (९) बडोद्यांतील मुसलमान, (१०) पारशी, (११) रोमन कॅथॉलिक या समाजातर्फे महाराजांना मानपत्रे देण्यांत आली. ही मानपत्रे मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी, फारसी, अरबी, इंग्रजी या भाषांतून होती. मानपत्रांस उत्तर देतांना महाराजांनी इंग्रजीत विचारपरिलुप्त भाषण करून सांगितले की, बडोदा संस्थानांत सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक एकोप्याने व मित्रत्वाच्या नात्याने राहात आहेत ही फारच आनंदाची गोष्ट आहे. सर्वांनी एकराष्ट्रीयत्वाची भावना ठेवून कोणत्याहि सार्वजनिक प्रश्नाचा विचार करणे फायद्याचे आहे. यामुळे मतभेदांस व जातिभेदास फारशी जागा राहाणार नाही. स्वतःच्या धोरणासंबंधाने महाराजांनी असा खुलासा केला की, सर्व साधकबाधक प्रमाणांचा पुर्णपणे विचार करून कोणतेहि धोरण अंमलात येते. जे राजकीय हक्क प्रजेस देण्यांत आले आहेत त्यांचा तिने योग्यप्रकारे व शहाणपणाने उपयोग करून घेतला पाहिजे. गतकालसंबंधाने ते म्हणाले की, 'जुने ते सोने' न मानता जुन्यांतील चांगला अंश ग्रहण करून नवीन सुधारणा घडवून आणली पाहिजे. तरच हिंदवी संस्कृतीचे आपण रक्षण केल्यासारखे होईल.

महाराजांच्या भाषणानंतर तोफांची सलामी, व बँडवर बडोदे संस्थानचे राष्ट्रगीत म्हणण्यांत येऊन कार्यक्रम आटोपला.

दुपारी लक्ष्मीविलास राजवाड्यांत दुसरा दरबार भरविण्यांत आला, व तदनंतर महाराजांनी न्यायमंदिरात शाळेतील मुलांच्या मेळ्यास उद्देशून छोटेसे उपदेशपर भाषण केले. रात्रौ शहरांत विजेची झगझगीत, नेत्रांस दिपविणारी परंतु प्रेक्षणीय अशी रोषणाई केली होती. बडोद्यांतील सार्वजनिक इमारती, न्यायमंदिर, सयाजीविहार, क्लब, शाळा इ. ठिकाणची रंगीबेरंगी नयनमनोहर रोषणाई अपूर्व दिसत होती. सुरसागर तलावाभोवती दारूकाम उडविण्यांत आले. लाल, हिरव्या, जांभळ्या तारकांची जणू काय दृष्टीच अशातऱ्हेचे कुशलतेचे दारुकाम, तलावाभोवती पाजळलेली दीपपंक्ती, तिचे जलाशयांत पडलेले सुंदर प्रतिबिंब, यामुळे पाहाणाऱ्यास हिऱ्यांच्या दोनचारसरी हारांचा भास होत होता.

ता.१२ रोजी सार्वजनिक बागेत नाच, गाणे इ. कार्यक्रम करण्यांत आले. ता. १३ रोजी सकाळी ८-३० वाजता मकरपुरा रस्त्यावरील मैदानावर लष्करी शिपायांची महाराजांसमोर कवाईत झाली. त्याचप्रमाणे महाराजांनी बालचमूंच्या सैन्याचीहि पाहणी केली. दुपारी गोरगरीबांना अन्नदान करण्यांत आले, व संध्याकाळी युरोपियन स्त्रीपुरूष व शहरांतील प्रमुख लोकांना महाराजांनी थाटाची मेजवानी दिली. त्यानंतर भिल्ल लोकांचा नाच करण्यांत आला व रात्रौ १२ वाजता कार्यक्रम संपला.

ता. १४ रोजी सकाळी जादा सरकारी गॅझेट काढण्यांत येऊन सुवर्णमहोत्सवानिमित्त प्रजाजनांना खलीलप्रमाणे सवलती दिल्याचे जाहीर करण्यांत आलेः-(१) ३ लक्ष रु. जमीन महसुलाची रयतेस सूट. (२) कापसावरील कराची तहकुबी. (३) मोठमोठ्या शहरी टेलिफोनची सोय. (४) केद्यांची मुक्तता.

ता. १५ रोजी विश्वामित्री नदीच्या कांठी केदारेश्वर देवालयानजीक महाराजांनी 'कीर्तीमंदिरा' च्या पायाचा दगड बसविला. रोमच्या 'पॅथिऑन' किंवा इंग्लंडातील 'वेस्ट मिन्स्टर ॲबे' प्रमाणे या इमारतीत गायकवाड घराण्यांतील सर्व राजांचे व नामांकित मुत्सद्यांचे पुतळे किंवा तैलचित्रे ठेवण्यांत येतील असे महाराजांनी समारंभप्रसंगी सांगितले. संध्याकाळी 'सयाजी विहार क्लब' ने महाराजांना जंगी मेजववानी दिली व त्याचबरोबर हा समारंभ समाप्त झाला.

षष्ब्दि हा हिंदुधर्मात एक धार्मिक विधी असून इतर संस्कारांप्रमाणे षष्ठीच्या ६१ व्या वाढदिवशी होमहवन, अन्नसंतर्षण वगैरे धर्माचार पाळावे असे शास्त्रांत सांगितले आहे. युरोपमध्ये व्यक्तीचा आनंद तर असतोच पण इतर इष्टमित्रांच्या सहानुभूतिने तो द्विगुणित होतो. असो. सध्या महाराजांना ७० वे वर्ष चालू आहे. आणखी दोन वर्षांनी त्यांचा रजतमहोत्सवहि अशाच किंबहुना द्विगुणित उत्साहाने साजरा करण्यांत येईल.

●●●

१६.
युवराजांचा विवाह व नंतर

यानंतरचा बडोद्यांतला उत्सव म्हणजे युवराज प्रतापसिंहराजे यांचा विवाह होय. कोल्हापूरचे सरदार मानसिंगराव घोरपडे यांची कन्या श्री. कु. शांतादेवी यांना श्री. महाराजसाहेब व श्री. राजपौत्र प्रतापसिंह यांच्या अनुमतीने वधू नेमस्त करण्यांत आले. हा विवाहसमारंभ ४ जानेवारी १९२९ रोजी मोठ्या थाटाने करण्यांत आला. यावेळी गुजराथेतील व कांठेवाडांतील मोठमोठे राजेरजवाडे, मांडलिक, संस्थानिक, रेसिडेंट वगैरे हजर होते. युवराज प्रतापसिंह यांचे शिक्षण डेक्कन कॉलेजमध्ये झाले असून ते क्रिकेट खेळण्यांत निपुण आहेत. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ असून सर्वांशी ते मोठ्या प्रेमाने वागतात. मागे सांगितल्याप्रमाणे आपले राज्यकारभाराचे शिक्षण संपवून हल्ली जे कर्मसचिव या नात्याने दिवाण अधिकाराची कामे पाहातात. सन १९३० साली प्रतापपुरा तलावाच्या उद्घाटनप्रसंगी महाराजांनी जाहीर रीतीने प्रथमच त्यांना युवराज या नांवाने संबोधिले.

युवराजांच्या पत्नी श्रीमंत सौ, शांतादेवी या २ एप्रिल १९३० रोजी प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झाले. हे आनंददायक वृत्त ऐकून महाराजांना संतोष वाटला. अशा प्रकारे महाराजांनी पतवंड पाहिले व हिंदुधर्माच्या समजुतीप्रमाणे त्यांना काशीयात्रा घडली ! हे भाग्य कांही लहानसहान नाही.

सन १९३१ साली महाराजांनी आपल्या पतवंडास फत्तेसिंह असे नांव ठेवले. यानंतर कांही दिवसांनी श्री. सौ. युवराज्ञींना एक कन्यारत्न झाले.

१७.
उपसंहार

व्यक्तिविषयक

महाराजांचे फोटो, रंगित चित्रे, किंवा साधी छापील चित्रे ही सर्व हिंदुस्थानभर इतकी पसरलेली आहेत की, हे 'सयाजीराव महाराज'असे एकादे मूलही सांगू शकेल. 'मी राजा होण्याकरिता आलो आहे,' हे महाराजांनी दत्तकाची निवड होण्याप्रसंगी दिलेले उत्तर महदाख्यायिकेच्या मालिकेत आढळ स्थान मिळवून बसले आहे, आणि लहान मुलांना ही गोष्ट नेहमी सांगण्यात येते. तात्पर्य, महाराजांचे नांव आज आबालवृद्धांच्या तोंडी आहे. महाराजांना ओळखण्याची खूण म्हणजे मुख्यतः साधा पोशाख, त्यांची गायकवाडी पगडी, पांढरा पायघोळ अंगरखा, सरदारी थाटाची विजार. त्यांच्या एकेकाळच्या आंकडेबाज मिशा, रुंद भव्य कपाळपट्टी, हदयमेदव, खोचक अशी सूक्ष्म दृष्टी, विचारमग्न व मूर्तिमंत मुत्सद्दीपणाची मुद्रा, किंचीत ठेंगणी व पुष्ट शरीरयष्टि, राजपदास शोभेशी उभे राहण्याची लकब, अगर बसण्याची ढब, रोमरोमी विलसणारे व खेळणारे राजतेज, व हातांत राजदंड (सोन्याची मूठ बसविलेली काठी) घेतलेली ती श्री. सयाजीराव महाराजांची मूर्ति पाहिली की, आपण एका साध्या पण नीतीमान नृपशिरोमणिच्या सान्निध्यांत राहण्याचा अलभ्य लाभ घेत आहोत याबद्दल स्वतःला धन्यता वाटू लागते. दुसऱ्यांच्या ज्ञानाबद्दल आदर, अनेक विषयांबद्दलची रसिकता,स्वतःची तीव्र ज्ञानलालसा, विचारांची सचोटी, बारीक चिकित्सेची आवड, दांडगी स्मरणशक्ति, नवे जोडावे पण जुने सोडू नये हा बाणा, उज्जवल देशभक्ति, असामान्य कर्तव्यनिष्ठा, प्रबोधशक्ति व स्वार्थत्यागबुद्धि, 'अनुभवे आले अंगा, तेचि देतसे या जगा' अशी वृत्ति, यांमुळे त्यांच्याशी सहवास धरणाऱ्या इसमावर त्यांची विलक्षण छाप बसते. कायदा व शिस्त ही प्रत्येक गोष्टीत असलीच पाहिजेत हा आग्रह. जेथे व्यवस्था नाही तेथे प्रगति नाही व पराक्रम नाही हे ठाम मत. किंबहुना यावरून महाराजांस शिस्त, व्यावहारिक ज्ञान, सारासार विचार व नियम यांचे बाळकडू पाजले होते की काय असे वाटू लागते. बोलण्यांत शब्द मोजके, रेखीव आणि तोलीव असे असावयाचे. त्यांत सावधानता

दिसावयाची. तरी पण प्रत्येक वाक्यागणिक उद्दिष्टाचे पाऊल पुढे पडत असावयाचे; व दुसऱ्यास त्याचा थांगपत्ताहि लागावयाचा नाही ! 'राजकारण बहुत करावे, परंतु कळोच नेद्यावे' ही खूणगांठ सदैव मनांत ठेवून प्रत्येकाशी बोलावयाचे. ऐकणाऱ्याला शब्द खचिदार व मार्मिक वाटून त्याने महाराजांच्या समयसूचकतेचे, मुत्द्देसूदपणाचे, व आत्मविश्वासाचे कौतुकच करावे. जे स्वतःस पटले नाही, ते कोणासहि सांगावयाचे नाही. याचेच नांव जबाबदारीची जाणीव. निरनिराळ्या सार्वजनिक प्रसंगी भाषण करतांना कांही तरी नवीन मार्ग सुचविल्याखेरीज खुर्ची सोडावयाची नाही. दुसऱ्याची चूक दाखवितांनाहि भाषासरणी मधुर, मूद्देसूद व चित्ताकर्षक वापरावयाची, हेतू हा की, ज्याची चूक झाली असेल त्याचे पूर्ण समाधान व्हावे. परंतु दुसऱ्या कोणाचा बुद्धिपुरस्सर अपमान किंवा अपशब्द यांचा गंधहि नाही. विषय मांडणीत नेहमी नाविन्य, कळकळ, विचारपरिलुप्तता, चटकदारपणा, मोहकता ह्यांचा मालमसाला भरपूर सांपडावयाचा. आपल्यास पसंत आहेत त्या गोष्टी सर्वसंमत रूढीविरूद्ध असल्या तरी तसे प्रांजलपणे, निर्भिडपणे, व स्पष्ट बोलून तद्नुसार आचरण करावयास लागावयाचे. अगदी भोजनासारख्या साध्या बाबींपासून ते थेट धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय बाबींपर्यंत विरोधाच्या प्रच्छन्न वैरभावाच्या वावटळीवर वावटळी उठल्या तरी शांत, स्थितप्रज्ञ राहून विरोधकास आपल्या बुद्धिबलाच्या प्रभुत्वावर आत्मसात करावयाचे. तडजोड ही नेहमीची वृत्ति खरी, परंतु कोणी रस्त्यावर किंवा पिढीजाद हक्कांवर घाला घालू पाहील अथवा विनाकारण डिवचू लागेल तर अशा प्रतिपक्षाशी कोटिक्रमाने, युक्तिवादाने, पुराव्याने, विशिष्ट पद्धतीच्या उपहासाने, प्रसंगविशेषी सत्तेचा, अधिकाराचा उपयोग करून प्रतिपक्षास नामोहरम करावयाचे. त्यांत सहसा माघार घ्यावयाची नाही. आपल्या हक्कांबद्दल झालेल्या रेसिडेंटाशी झालेल्या तंट्यात महाराज किती जागरूक होते हे मागे दाखवलेच आहे. 'कोणीही मोठेपणाच्या पायरीस पोचावयास लागला की, त्याजविरूद्ध आकांडतांडव सुरू झालेच म्हणून समजावे. नानातऱ्हेचे आरोप त्यावर व्हावयाचे.' असे एका कवीचे श्रेष्ठपदवीबद्दल मत आहे. महाराजांना जात्याच युद्धप्रसंग नकोत, पण पेशा पडला राजाचा, सोडून काय मागणार ? टाळावयाचे असले तरी तोंड देणे भाग पडते.

महाराजांची व्याख्याने म्हणजे अनेक दलांचे कमल. अनेक विषयांवरील महाराजांचे वेळोवेळी प्रकट झालेले विचार या कमलाच्या प्रत्येक पाकळीगणिक सांठविलेलेले आहेत. एकएक पाकळी जरी घेतली तरी सुंदर व पूर्ण कृषियुक्त. मग सबंध कमळाचे रूप व गंध काय वर्णावा !

महाराजांच्या व्याख्यानाचे सार (१) विद्येची महती फार थोर आहे, (२) उद्योगाचे श्रेष्ठव सर्वमान्य असावे, (३) उच्चनीच भावनांचा त्याग करावा, (४) प्रत्येकाने सुखदुःखाविषयी उदासीन होऊन कर्तव्यदक्ष असावे, (५) स्वार्थनिरपेक्षपणे कोणतेहि कार्य करावे, या पांच तत्त्वांत सामाविले आहे. त्यांचे विशाल वाचन, सर्वसंग्राहकता, बुद्धीची अनुभवजन्य परिपक्वता, निरनिराळ्या संस्कृतींचा तौलनिक अभ्यास व जबर व्यासंग वगैरे गोष्टींचे प्रतिबिंबच अशी ही व्याख्याने व भाषणे आहेत.

महाराजांचे उद्योग बहुशास्त्री, व अनंत व्यापाचे चक्र नेहमी चालूच. युरोपमध्ये असले काय किंवा हिंदुस्थानांत असले काय, राज्यकारभारासंबंधी महत्वाचे कागदपत्र मागवून स्वतः महत्त्वाच्या

प्रश्नांचा निकाल करावयाचा, कांही कांही प्रश्नांचे बाबतीतील निकालांमध्ये त्यांचा कठोरपणा दिसतो असा काहींचा आक्षेप आहे. इनामदारांची उत्पन्ने त्यांच्या सनदा असूनहि कमी केली, हे उदाहरण म्हणून देण्यांत येते. परंतु महाराजांना कोणीहि स्वस्थ बसून चैनीत खावे प्यावे, ही गोष्ट सर्वात नापसंत आहे, हे टीकाकार विसरतात. श्रम करावे व खावे ह्याबद्दल तर महाराजांचा विशेष कटाक्ष. इनामदार वर्गातले लोक आळशी, निरुद्योगी, व विलासी. त्यांना महाराजांची प्रगतिपर नाविन्यपूर्ण राजवट पसंत पडली नाही. त्यांनी एकवटून गिल्ला केला. परंतु महाराजांनी अशा लोकांनी सरकारी कामे केली तरच त्यांचे उत्पन्न चालविण्यांत येईल असा कायदा करून टाकला. या कृत्याबद्दल त्यांना दोष देणारे देवोत, परंतु केवळ पूर्वजांच्या नांवावर, थोर घराण्यांतील म्हणून एखाद्याने वाटेल तशी चैन करावी किंवा काय, व समाजाने किंवा मुख्य सत्तेने जशी गोष्ट वंशपरंपरा चालू द्यावी किंवा काय, हा राजनितिशास्त्रांतला एक तत्त्वाचा प्रश्न आहे. विषारी प्रतिकूल टीका सहन करूनहि महाराजांनी तो प्रश्न मोठ्या धाडसाने व दृढनिश्चयाने सोडविला, यावरून त्यांची तत्त्वनिष्ठा प्रतीत होत नाही काय ?

इतर राज्यकारभाराची कामे घड्याळाच्या कांट्यांप्रमाणे ठराविक वेळी व अत्यंत नियमितपणे चालावीत यावर त्यांची विशेष नजर. स्वतः महाराजांना कामाचा उरक विलक्षण. पांचपांच सहासहा अंमलदार निरनिराळ्या कामासाठी बोलावून त्यांच्या प्रश्नांचा निकाल करावयाचा, पण त्यांत गोंधळ शपथेला नाही. राज्यकारभारासंबंधी अनेक बाबतींचे विचार नेहमी त्यांच्या डोक्यांत घोळत असत. त्यांनी प्रथम जेंव्हा राज्यसूत्रे हातात घेतली तेंव्हा तर या विचारांनी त्यांना सारी रात्र झोप येत नसे. ही गोष्ट जेंव्हा त्यांनी स्वकीयांजवळ सांगितली तेंव्हा त्यांनी महाराजांस विश्रांतीची आवश्यकता पटवून देण्याऐवजी त्यांच्या निद्राभावाचीच उलट तारीफ करून राजाने जागरूकच असले पाहिजे असे त्यांस सांगितले ! यामुळे त्यांच्या प्रकृतीवर मात्र अनिष्ट परिणाम झाला. महाराजांचे सुधारणा हे ब्रीदवाक्य, आणि सर्व प्रकारच्या दोषांवर, न्यूनतेवर शिक्षण हा त्यांचा जबरदस्त तोडगा. कोठे कांही नवीन पाहिले की, त्याचा उपक्रम आपल्या राज्यांत सुरू करावयाचा हा फार हव्यास. सुधारणांचे रहस्य लोकांस कळावे म्हणून शिक्षण सार्वजनिक, सक्तीचे व मोफत केलेले. प्रजेच्या हिताविषयी नेहमी तळमळ व त्याप्रीत्यर्थ दौरा काढून त्यांची सुखदुःखे समजावून घ्यावयाची. सन १९२७ साली झालेल्या बडोद्यांतील जलप्रलयामध्ये हजारो लोक घरे पडल्यामुळे निराश्रित व निराधार झाले असता त्यांनी खासगीतून लाख रुपयांची देणगी देऊन व दिवाणाकडून फंड वगैरे उभारून आपद्ग्रस्तांना मदत करण्याची सोय करण्यांत तत्परता दर्शविली. या व इतर कित्येक प्रकारांवरून त्यांचे प्रजावात्सल्य व कळकळ ही स्पष्टपणे दृग्गोचर होत आहेत.

विद्वान, साहित्यभक्त यांचा अथोचित सत्कार करून उच्च साहित्योपार्जन करणे हे नेहमीच डोळ्यांपुढे ध्येय. या ध्येयास अनुसरून त्यांनी सर रविंद्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस, सर राधाकृष्णन, कांटावाला, चिंतामणराव वैद्य, गंगनाथ झा, जयस्वाल, राधाकमल, मुकर्जीसारख्या थोर विद्वानांचा सत्कार केला, व त्यांची व्याख्याने करवून आपल्या प्रजाजनास त्यांच्या ज्ञानाचा लाभ करून दिला. हजारो पुस्तककर्त्यांनाहि आजपर्यंत त्यांनी उत्तेजन दिले आहे.

प्रजेला राजकीय हक्क देण्यासंबंधानेहि उदासीनता नाही; पण दिलेल्या हक्काचा कितपत सदुपयोग होतो हे पाहण्याकडे जास्त भर. कोणत्याहि गोष्टीत घाई उपयोगी नाही; साधकबाधक विचार व पूर्ण खल झाल्याशिवाय पुढे पाऊल टाकावयाचे नाही, ही कार्यपद्धति.

कोणी म्हणतात ते फार विकारवश होतात. सर्वव्यापी उद्योगामुळे मनासारखे झाले नाही म्हणजे निराशेची भावना तोंडावरून प्रतिबिंबित व्हावी हे साहजिक. परंतु एखादी वाईट बातमी कानी आली, कौटुंबिक अघात झाला तरी चेहऱ्यावर यत्किंचितहि खेदाची छटा नाही. शांतपणाने सर्व घास गिळावयाचे. तसेच वर्तमानपत्रांतून अवास्तव टीका आल्याचे कोणी सांगितल्यास 'बिचाऱ्याला काय कल्पना'? अशा तऱ्हेने उद्गार काढून स्वस्थ बसावयाचे. एखाद्या कामाला एक मनुष्य लायक आहे असे समजले तरी त्याला दुसरेच काम देऊन त्याचा बहुश्रुतपणा, ग्रहणशक्ति यांचा अजमास करावयाचा. हीच गोष्ट सुधारणांची. एक सुधारणा बरी आहे ना, ठीक; परंतु दुसरी चांगली पाहिजेच ही वृत्ति. विषयाची किंवा कामाची सांगोपांग माहिती असणारा त्यांच्याजवळ टिकेल, 'येरा गबाळाचे काम नोहे.' मोठमोठ्या अंमलदारांचीहि बऱ्याच वेळा त्यांच्यापुढे तिरपिट उडत असे म्हणतात.

प्लेटोच्या मताने आदर्श राज्यपद्धति (ideal government) स्थापन करण्यास गुणसंपन्न व समर्थ माणसाच्या हातांत राजसूत्रे असली पाहिजेत. राज्यकारभार चालविण्यास समर्थ म्हणजे तत्त्ववेत्ता, बाकीचे असून नसून सारखेच व निरूपयोगी. तो म्हणतो की, 'खरा तत्त्ववेत्ता ज्ञानार्थी असतो; त्यास सर्व प्रकारचे ज्ञान संपादन करण्याची उत्कट इच्छा असते; त्याचे सामान्य लोकांप्रमाणे इंद्रियगम्य बाह्य वस्तूंच्या ज्ञानाने समाधान होत नाही; त्याचे तत्त्वाकडे लक्ष असते. सत्य-असत्य, न्याय-अन्याय, बरेवाईट इत्यादिकांचे रहस्य ओळखून घेण्याकडे त्याची प्रवृत्ती असते; साधुत्वाचे धर्म (idea of the good) जाणण्याची त्यास मनस्वी इच्छा असते. तो प्रशांत, उदारमनस्क, थोर मनाचा असून त्याची स्मरणशक्ति दांडगी असते. अशा माणसांचे हातात राजसत्ता दिल्यास तो एकटाच उत्तम व कार्यक्षम राज्यपद्धति स्थापन करू शकेल.' श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या अंगी प्लेटोच्या 'तत्त्ववेत्त्या'चे सर्व गुण तंतोतंत उतरले आहेत किंवा नाहीत, हे आजतागायतच्या त्यांच्या कारकीर्दीचे सिंहावलोकनावरून दिसून येईल. राज्यसूत्रे हातांत दिल्यावर प्लेटोच्या तत्त्ववेत्त्याप्रमाणे आश्चर्यकारक व मतिगुंग होण्यासारखी कार्यक्षमता राज्यशकट हाकतांना त्यांनी प्रकट केली, हे कोणीही कबूल करील. राज्यकर्त्याने मंत्री, सेनाध्यक्ष, अमात्य वगैरे अधिकारी नेमताना व निवडताना भिन्नभिन्न प्रकारांनी त्यांना कसोटीस लावून, कडक परीक्षेत ज्यांचे देशाभिमान, निश्चय, धैर्य, स्वामिभक्ति इत्यादि सद्गुण अचल राहतील अशांनाच निरनिराळ्या जागांवर नेमावे असे कौटिल्याचे मत आहे. सयाजीरावांचा काल तर विद्वान, अनुभवी, मुत्सद्दी, राजकार्यधुरंधर, अत्यंत नाणावलेल्या व पुढारी म्हणून गाजलेल्या लोकांच्या सहवासांत गेलेला. त्यांच्या राज्यांतील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांची नुसती नांवे पाहिली तरी त्यावरून महाराजांच्या चतुर राजनितीची साक्ष पटण्याजोगी आहे. सर टी. माधवराव, श्रीनिवास राघव आयंगार, रमेशचंद्र दत्त, बिहारीलाल गुप्त, मि. सेडन, व्ही. पी. माधवराव इत्यादि हिंदुस्थानांतील नामांकित व राजधुरीण अशा पुरुषांच्या कर्तबगारीचा ठसा बडोद्याच्या कारभारावर उमटलेला आहे. सर टी. माधवराव व मि. इलियट हे तर आरंभी महाराजांचे अध्यापक होते. मि. इलियट तर कैक

वर्षे महाराजांचे विश्वासू सल्लागार होते. सर टी. माधवरावांनी बडोद्याच्या राजवटीत त्यावेळची प्रसिद्ध, विद्वान, नामांकित माणसे मुद्दाम बाहेरून आणविली. काजी शहाबुद्दीन, विनायक जनार्दन कीर्तने, डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, जनार्दन सखाराम गाडगीळ, पेस्तनजी जहांगीर, वगैरे मंडळी त्यावेळी बडोद्याच्या नोकरीत चमकत होती. महाराजांना राज्यकारभार मिळाल्यावर त्यांनी हळूहळू स्वतःची माणसे तयार करण्याचा क्रम सुरू केला. वासुदेव महादेव समर्थ, यशवंत वासुदेव आठल्ये, जयसिंगराव आंगरे, केरशासपजी तसतुमजी, बंबालाल साकरलान, वासुदेव गोपाळ भांडारकर, विनायक महादेव पंडित, गुणाजीराव राजबा निंबाळकर, मनुभाई नंदशंकर मेहता वगैरे मंडळींनी महाराजांच्या हाताखाली काम करून फार मोठा नांवलौकीक संपादन केला. अशा प्रकारची योग्य मंडळी राज्यकारभारांत आणणे यांतच राज्यकर्त्याचे खरे कौशल्य आहे, व सध्याहि अनेक होतकरू मंडळीस विलायतेस पाठवून शिक्षण व संधि देऊन त्यांनी जबाबदारीच्या जागी काम करण्यास तयार केले आहे. हा उपक्रम अखंड चालू आहे. वरील लहान थोर मंडळींशी नानाप्रकारच्या प्रश्नांचे खल करून राज्यकारभार करण्यांत महाराजांचा पुष्कळसा काळ गेल्यामुळे आणि त्यातच स्वतःच्या वाचनाची, दीर्घ व्यासंगाची, व जगभर मिळविलेल्या ज्ञानाची भर पडल्यामुळे महाराजांची योग्यता इतकी वाढली आहे की, त्यांच्याइतका अष्टपैलू, सर्वसंग्रही, मुत्सद्दी, साहित्यदेवतेचा मुकुटमणि हिंदुस्थानांत तर अगदीच विरळा; फार काय मोठमोठे युरोपियन मुत्सद्दीहि त्यांच्या पासंगाला देखील पुरणार नाहीत. निसर्गतःच भिन्न असलेल्या श्री आणि सरस्वति या दोहोंचा अनुपमेय संगम त्यांचे ठिकाणी झाला असल्याने त्यांची सर्वत्र पूजा होत असल्यास नवल ते काय ?

महाराजांची दिनचर्या देणे अगत्याचे आहे. ती साधारणतः खालीलप्रमाणेः-

सकाळी	६ वाजता	निजून उठणे.
”	७	पर्यंत प्रातर्विधी, स्नान, पूजा, गोप्रदान, नंतर ब्रेडस, केळी व कॉफी पान.
”	७-८॥	घोड्यावर अगर गाडीतून फिरणे, कांही कामांची पाहणी.
”	८॥-१०॥	वर्तमानपत्रे वाचणे, विशिष्ट ऑफिरांच्या भेटी.
”	११-१२	टपाल, जेवण,विश्रांती.
दुपारी	१-४	राज्यकारभाराचे काम.*
”	४-५	चहा व मासिके चाळणे.
सायंकाळ	५-७	टेनिस,मोटारीतून फिरणे.
”	७॥-८	भोजन.
”	८-९	बिलियर्ड, ब्रिज.
”	९-११	उपयुक्त विषयांवरील वाचन.
”	११.००	च्या पुढे झोप.

* हल्ल्ली श्री. महाराजसाहेब सकाळी १० ते १ पर्यंत राज्यकारभाराचे काम पाहातात व भोजनोत्तर विश्रांती घेतात.

'सदेवपणाचे लक्षण रिकामा जाऊं चेदी क्षण' या तत्त्वानुसार राहणी, उच्च व तात्विक विचारसरणी, पाश्चात्य व पौर्वात्य ग्रंथांचे परिशीलन व राज्यकारभार हाच महाराजांचा नित्यक्रम होय.

तत्वज्ञान व नीतीशास्त्र हे महाराजांचे दोन आवडीचे विषय आहेत. यांवरील नवे नवे ग्रंथ ते नेहमी वाचीत असतात. इतिहास हा त्यांचा आरंभापासूनचा अत्यंत प्रिय विषय व गिबन हा आवडता ग्रंथकार. 'रोमचा उत्कर्ष व नाश या ग्रंथाची महाराजांनी स्वतः टिपणे काढून त्याचे भाषांतरहि राजारामशास्त्री भागवत यांच्याकडून करविले आहे. तुकाराम हा त्यांचा आवडता कवि असून त्यांनी त्याच्या गाथांचे अनेकवार पारायण केले आहे. काव्यनाटकाचा महाराजांना दृढ परिचय असून त्यांनी अनेक ग्रंथाचे मार्मिक परीशीलन केले आहे. पाश्चात्य देशांतील तुलनात्मक (Comparative) व गुणदोषविवेचकबुद्धि (Critical faculty) स्वीकारून' भाषेचे व निरनिराळ्या विषयांचे अध्ययन करण्याने महारांच्या आचारविचारांमध्ये पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतीचा गोड व सुंदर मिलाफ झालेला कोणासहि आढळून येईल.

ध्येयवाद-महाराजांच्या कोणत्याहि सुधारणेकडे सूक्ष्म दृष्टीने पाहिले असता त्यामध्ये कोणते ना कोणते तरी ध्येय असल्याचे आढळून येईल. मग ते सामाजिक, धार्मिक, राजकीय किंवा कोणत्याहि स्वरूपाचे असो. महाराजांना आपल्या मनचक्षुंपुढे संकुचित ध्येय केंव्हाहि ठेविले नाही. स्वतः पुरते किंवा आपल्या संस्थानापुरतेच पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन नसून, अखिल हिंदुस्थानचे किंबहुना आपल्या सर्व देशबांधवांचे कल्याण जेणेकरून होईल. त्यासाठी अहर्निश झटत असावयाचे, हेच महाराजांचे सर्वव्यापी उदात्त अंतिम ध्येय आहे. एकाच व्यक्तीने, एकाच जातीने, एकाच राष्ट्राने हे कार्य करावयाचे नसून, सर्वांनी प्रयत्न केल्यास सर्वांचीच उन्नति होणे सुसाध्य आहे. स्वातंत्र्याचा व सत्तेचा उपयोग मानवी जातीच्या कल्याणार्थ केला पाहिजे. उन्नतीची मदार नशीब किंवा दैवयोग यावर नसून ती खास पुरूषार्थावर आहे. 'पुष्कळांचे पुष्कळ हित' करणे एकाद्या राजास-व्यक्तीस शक्य असले (आणि महाराजांनी आपल्या उदाहरणाने हे सिद्ध केले आहे.) तरी 'सर्वभूतहितरतत्व' हेच सर्वांचे अंतिम ध्येय असले पाहिजे, ही महाराजांची तात्विक शिकवण आहे. महाराजांची निरनिराळ्या प्रसंगीची भाषणे म्हणजे भिन्नभिन्न संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास करून व त्यांतील तत्त्वज्ञानाचे मंथन करून काढलेले नवनीतच होय. महाराजांची इंग्रजी, मराठी, गुजराथी या भाषांत विविध विषयांवर झालेली भाषणे प्रसिद्ध झालेली आहेत. यांखेरीज त्यांनी वेळोवेळी काढलेले हुकूम (हुजूर ऑर्डर्स) हे अनेक विषयांतील त्यांची सूक्ष्म दृष्टि, मार्मिकता, व विवेचक बुद्धि यांची चांगली साक्ष पटवितात, व ते जर प्रसिद्ध होतील तर जनतेस फारच उद्‌बोधक होतील. तसेच त्यांनी आपल्या मित्रांस, विशेषतः मोठमोठ्या इंग्रज अधिकाऱ्यांस लिहिलेली पत्रेहि अत्यंत महत्वाची असून त्यांची तीक्ष्ण बुद्धि, अनेक विषयांचा खोल अभ्यास, व विचक्षणता यांची द्योतक आहेत. हिही पुढे मागे प्रसिद्ध झाल्यास वाचकांस एक अत्यंत महत्त्वाचे वाङ्मय पहावयास मिळेल अशी खात्री आहे.

उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, गरीब श्रीमंत, काळा गोरा असा कोणताहि भेद महाराजांजवळ नाही. आपल्या देशबांधवांच्या उन्नतीसाठी तळमळणारा महाराजांचा आत्मा जनता जनार्दनाशी

जाणो एकरूपच होऊन अखिल मानवजातीच्या अध्यात्मिक व अधिभौतिक उन्नतीसाठी आपले अंतस्तेज प्रकाशमान करीत असलेला सर्वांस दिसत आहे. आपआपसांतील द्वेशभाव नष्ट हावा, सर्वांच्या हृदयांत ज्ञानाची ज्योत प्रज्वलित व्हावी,वसुधातलावर एका कुटुंबाप्रमाणे एकोपा नांदावा, व्यक्तिस्वातंत्र्यास वाव मिळून 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' अशी वृत्ति निर्माण व्हावी, थोडक्यांत म्हणजे ideal of human unity or humanism हेच ध्येय महाराजांच्या मनावर पूर्णपणे ठसले असून ते जनतेसहि याच मार्गाची ओळख करून देत आहेत. ते म्हणतात 'आपली नीती व अंतःकरण चांगले ठेवा. बाह्य वर्तनावर तसेच डामडौलावर विश्वास ठेवू नका. यांतच खरा ज्ञानाचा उपयोग आहे. सर्वांनी आपल्या देशबांधवांच्या कल्याणाकरिता प्रयत्न करावेत. ते सर्व आपलेच बंधू आहेत असे मानावे व सर्वांवर दया करावी. मनुष्यमात्र एक आहे अशाप्रकारची भावना सगळयांची व्हावी. हे अंतिम साध्य होय.' महाराजांची शिकवण बुद्धिला पटणारी व विचारशक्तीस किती चालना देणारी आहे याची वरील उतारा उत्तम रीतीने साक्ष पटवितो.

महाराजांना हिंदवी संस्कृतीबद्दल अतिशय अभिमान असून कोणतीही गोष्ट तीस नाशक न होता पोषकच व्हावी अशी त्यांची उत्कट इच्छा आहे. हिंदुस्थानचा उदय औद्योगिक व आर्थिक भरभराटीवर अवलंबून असल्याकारणाने शास्त्रीय (Scientific) ज्ञानाच्या प्रसाराची अत्यंत आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली आहे. हिंदुस्थानचा उद्धार होणार तो औद्योगिक व शास्त्रीय उन्नतीनेच होणार.

सारांश, ईश्वराचे ज्ञान जगभर पसरावे व त्याचे प्रत्यक्ष दर्शन आपल्या देशबांधवांनी आधी स्वतः करून घ्यावे, हे जनतेस पटवून देण्यासाठीच महाराजांचा अवतार होय. हे काम त्यांनी कितपत पार पाडले आहे हे पाहण्याचे काम वाचकांवर सोपवून व महाराजांस चिरायुरारोग्य चिंतून येथे तूर्त थांबणे बरे.

तेनार्थवान् लोभपराङ्मुखेन ।
तेज ज्ञाता विघ्नभयं क्रियावान ।।
तेनासलोकः पितृमान् विनेत्रा ।
तेनेध शोकायनुदेव पुत्री* ।।१।।

●●●

* रघुवंश १३-२३

संदर्भ ग्रंथ

1.	Ruler of Baroda	Philip Seargent.
2.	Life of Sayajirao III Vols.2	Stanley Rice.
3.	Speeches of Addresses of H.H.The Maharaja Gaekwar of Baroda. Vol.2	Prof. Widgery.
४.	सयाजी चरितामृत	श्रीरामशर्मा
५.	श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे चरित्र.	का.ना. गोत्री.
६.	श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (मराठी व गुजराती)	
7.	Administration Report 1930-31	
8.	Gazeteer of Baroda. Vols.2	

३

सयाजीराव गायकवाड

लेखक
डॉ. वि. पां. दांडेकर

સયાજીરાવ ગાયકવાડ

NOT TO BE
૫૬૨૨
૫૬૨૨

निवेदन

माझे एके काळचे विद्यार्थी व आताचे मित्र सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गजाननराव ठोकळ यांनी मला पुण्यश्लोक श्रीमंत सयाजीराव महाराज (तिसरे) गायकवाड यांचे लहानसे चरित्र लिहिण्यास सांगताच मी ते काम आनंदाने स्वीकारले. याचे मुख्य कारण म्हणजे या निमित्ताने मला कै. महाराजांची सेवा करता येईल, श्रद्धांजली वाहता येईल, हे होय.

पंडित मदनमोहन मालवीय यांनी महाराजांना 'भारतातील शेवटचा आदर्श राजा' म्हणून जे गौरविले ते किती यथार्थ होते, हे महाराजांच्या चरित्रावरून कळते. आदर्श राजा प्रजेचा पिता असतो. आपल्या प्रजेचे पालन व संवर्धन तो पितृवत करतो. सयाजीराव महाराजांनी विविध सुधारणा करून व आर्थिक उन्नतीच्या अनेक गोष्टी करून आपल्या प्रजेची सर्वांगीण प्रगती साधली. अशा महाराजांचे चरित्र सर्वांना उपलब्ध व्हावे या हेतूने 'ठोकळ प्रकाशनात' त्याचा अंतर्भाव केल्याबद्दल मी श्री. ठोकळ यांचे अभिनंदन करतो.

या चरित्रलेखनाच्या कामी मला पुढील ग्रंथाचा उपयोग झाला : फिलिप सार्जेंटकृत 'दी रूलर ऑफ बरोडा', स्टॅन्ले राइसकृत 'लाइफ ऑफ सयाजीराव द थर्ड', 'बरोडा गॅझेटिअर' व 'सयाजीगौरव ग्रंथ'. कै. सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या स्नुषा श्रीमंत शकुंतलाराजे गायकवाड यांनी आपल्याजवळचा श्रीमंत सयाजीरावांचा फोटो प्रस्तुत चरित्रात वापरण्याकरिता दिला, याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

पुनश्च एकदा माझे मित्र गजाननराव ठोकळ यांचे आभार मानून हे निवेदन मी पुरे करतो.

बडोदे. **वि. पा. दांडेकर**

प्रस्तावना

कवळाणा गावात वयाच्या बारा वर्षापर्यंत वाढलेला गोपाळ नावाचा मुलगा योगायोगाने बडोदा संस्थानाचा राजा झाला. दत्तकविधानानंतर त्यांचे नामकरण सयाजीराव महाराज (तिसरे) केले. या सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानात अतुलनीय आणि अश्विनीय प्रगती केली. त्यामुळे त्यांच्या नावाचा गवगवा हिंदुस्थानात नव्हे, तर जगभर झाला. साहजिकच त्यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी लिहिले जावू लागले, चरित्रांची निर्मिती होऊ लागली. महाराजांना वयाची एकाहत्तर वर्ष पूर्ण झाल्याने बडोद्यातील साहित्यप्रेमी लोकांनी त्यांचा 'गौरवग्रंथ' काढावयाचे ठरवले त्याप्रमाणे तो निघालाही. त्यात अनेक मान्यवरांनी महाराजांविषयी आपली मते व्यक्त केली. 'श्रीसयाजीगौरवग्रंथा'व्यतिरिक्त इतरही अनेक प्रकारचे ग्रंथ महाराजांच्या कार्याची महती सांगणारे निघाले. त्यामध्ये वि. पां. दांडेकर यांनी लिहिलेल्या या चरित्राचाही समावेश होतो. दांडेकर महाराजांचे समकालीन आहेत. त्याचबरोबर महाराजांच्या काळातील बडोद्यातील साहित्य विश्वातील नामांकित लेखक होते. दांडेकर महाराजांचे निकटवर्तीय, समकालीन असल्याने बडोद्यातील राज्यव्यवहार, सुधारणा त्यांनी जवळून पाहिल्याने महाराजांचे हे चरित्र महत्त्वाचे आहे.

वि. पां. दांडेकरांनी हे चरित्र लिहिण्यापूर्वी काशिनाथ नारायण गोत्री, यशवंत रामचंद्र दाते या मान्यवरांनी महाराजांची मराठीत चरित्रे लिहिली होती. दाते लिखित चरित्र या चरित्राआगोदर काही दिवस प्रकाशित झाले. तरीही महाराजांकडे बघण्याची आपली दृष्टी कशी सकस आणि निर्भेळ आहे हे दांडेकर यांनी चरित्रातून स्पष्ट केले. बडोदा आणि महाराष्ट्रातील फारच थोड्या ग्रंथालयात हा चरित्रग्रंथ उपलब्ध आहे.

दांडेकर चरित्राची सुरुवात कुतूहल वाढवणाऱ्या प्रसंगाने करतात. कवळाणा या लहान गावी सकाळी सकाळी पोलीस दाखल होतात. 'काशीराव गायकवाडांच्या आणि त्यांच्या बंधूंच्या मुलांना दत्तकनिवडीसाठी बडोद्यात बोलावणे आहे' हा निरोप देण्यासाठी आले होते. या प्रसंगाने वाचकांची उत्सुकता वाढीला लागते यांनी शेवटपर्यंत चरित्र वाचावे असे कुतूहल निर्माण होते. महाराजांच्या निवडीच्या वेळचा एक प्रसंग देऊन त्या प्रसंगातून बडोद्याचे भावी चित्र कसे विकसित असेल याची कल्पना देतात. ''या बाबतीत एक मजेशीर गोष्ट बडोद्यात प्रसिद्ध आहे, ती अशी : आनंदराव, गोपाळराव व संपतराव या तिघांना जेव्हा जमनाबाई साहेबांसमोर उभे करण्यात आले त्या वेळी त्यांनी तिघांनीही का आलात असा प्रश्न विचारला, त्या प्रश्नाचे उत्तर

आनंदराव आणि संपतरावांना देता आले नाही; पण गोपाळरावांनी 'महाराजा होण्याकरिता आलो.' असे स्पष्टपणे जमानाबाईसाहेबांना सांगितले. हे पाहून त्या खुश झाल्या; व गोपालरावांना पसंत केले." (पृ. २६४) हा प्रसंग तसा छोटाच पण गोपाळरावांनी दिलेले उत्तर आणि भविष्यातील अनेक सुधारणा यामधील दुवा जोडला तर या उत्तराचे महत्त्व अधोरेखित होते. दांडेकरांच्या या उदाहरणातून सयाजीराव महाराजांचे व्यक्तिमत्त्व कसे विकासाभिमुख होते हे लक्षात येते.

दांडेकर यांनी चिं. वि. जोशींच्या मदतीने बडोद्यात ८ फेब्रुवारी १९३१ रोजी 'मराठी वाङ्मय परिषद, बडोदे या संस्थेची स्थापना केली. 'मराठी वाङ्मय परिषद, बडोदेः गेली पंचवीस वर्षे' आणि 'मराठी साहित्याची रूपरेषा' असे ग्रंथ निर्माण केले. साहित्य विश्वाशी संबंधित असणारे चरित्रकार असल्याने चरित्राने एक प्रकारची लय पकडली आहे. चरित्र एकूण अकरा भागात संपविले आहे. पाठीमागे सांगितल्याप्रमाणे पहिला भाग हा उत्सुकता वाढवणारा आहे. अचानक कोणाच्याही ध्यानीमनी नसताना गोपाळ बडोद्याचा राजा होतो. त्याविषयी दांडेकरांनी अत्यंत योग्य शब्दांत निवेदन केले आहे. ''यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणे गोपाळराव बडोद्याचे सयाजीराव महाराज बनले! केवढी अकल्पित व अघटीत घटना हो! कवळणेकरांना ही बातमी समजली असेल तेव्हा त्यांना किती आश्चर्य व आनंद वाटला असेल!" (पृ. २६६) महाराजांचे दत्तकविधान योगायोगे झाले. मात्र त्यानंतर बडोद्यात झालेल्या सुधारणा हे महाराजांनी केलेल्या प्रयत्नांचे फळ आहे. दांडेकरांनी हे जाणून महाराजांनी राज्य कारभार हाती घेतल्यानंतर आणि पुढील पन्नास वर्षात बदललेली परिस्थिती यांची तुलना करत महाराज सुधारणावादी होते अशी चरित्राची मांडणी केली आहे.

सयाजीराव महाराजांच्या चरित्राची सुरुवात उत्सुकता वाढवणाऱ्या प्रसंगाने करून दांडेकर बडोद्यातील गायकवाडांच्या पूर्वजांकडे वळतात. मात्र या ठिकाणी चरित्रकारांनी एक पथ्य पाळले आहे. मराठ्याचा गुजरातेत प्रवेश सतराव्या शतकात झाला. दांडेकरांनी चरित्राची सुरुवात मात्र एकोणिसाव्या शतकापासून केली. सयाजीराव महाराजांच्या पूर्वजांची आणि महाराजांची बडोदा संस्थानाच्या राजपदाची परंपरा देत चरित्राची सुरुवात केली. महाराजांच्या व्यक्तित्वाला महत्व देत, कार्याचे महत्त्व अधोरेखित करत चरित्र पुढे जाते. बडोदा संस्थानचे राजे दुसरे सयाजीराव आणि त्यांची मुले गणपतराव, खंडेराव, मल्हारराव या बडोद्याच्या राजांची कार्यकाळाची, संस्थानात त्यांनी केलेल्या चांगल्या बदलाची नोंद घेतात.

दत्तकविधानानंतर महाराजांचे शिक्षण सुरू झाले. दांडेकर महाराजांच्या शिक्षणाबद्दल माहिती देताना म्हणतात, ''कुशल बागवानाने एखाद्या रोपाचे कलम करून नंतर ते जमिनीत लावावे आणि मग त्याच्याभोवती आळे करून व त्याला नित्य नियमाने खतपाणी घालून, त्याला कीड लागत नाहीना ते पाहावे; त्याची वाढ चांगली होते आहे किंवा नागी हे पाहावे; त्याप्रमाणे जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव, व इलिएट ही मंडळी दत्तक घेतलेल्या या मुलाकडे बघू लागली." (पृ. २७६) महाराजांना राज्यकारभारासाठी तयार करताना जबाबदार व्यक्ती किती

काळजी घेत, हे स्पष्ट करताना दांडेकर कुशल बागवानाशी तुलना करतात. अशा प्रकारे दांडेकर यांनी संपूर्ण चरित्रात अनेक घटना - प्रसंगात अशा उपमा दिल्या आहेत.

महाराजांच्या जीवनक्रमानुसार चरित्राचे निवेदन येते. सयाजीराव महाराजांना कौटुंबिक सुख अत्यंत कमी लाभले. दांडेकर यांनी याची अचूक नोंद घेतात. महाराजांची वृत्ती स्थितप्रज्ञासारखी झाली आहे असे निरीक्षण नोंदवतात. ते म्हणतात, ''श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या आयुष्याकडे पाहिले असता हीच गोष्ट प्रत्ययास येते. त्यांनी स्वतःचा संसार करीत असताना ते त्यात गुरफटून गेले नाहीत. आपल्या राज्यसंसाराची त्यांना कधीही विस्मृती झाली नाही, व होत नाही. एकवेळ त्यांना स्वतःच्या संसाराचा विसर पडेल. पण राज्याचा संसार ते कधीही विसरणार नाहीत. कारण कर्तव्याची जाणीव त्यांच्या ठिकाणी इतकी प्रखर आहे.'' (पृ. २९५) महाराजांना राज्यसंसार अत्यंत प्रिय होता. त्यासाठी ते रात्रंदिवस झटत होते. दांडेकर याचे नेमके मर्म यांनी रेखाटले आहे.

दांडेकर 'बापट कमिशन'ला जास्त महत्त्व देतात. त्याचे कारणही महत्त्वाचे आहे. महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्याच्या सुरुवातीलाच हे प्रकरण उद्भवले. महाराजांनी इंग्रज अधिकाऱ्यांना न घाबरता अत्यंत चाणाक्षपणे, मुत्सद्दीपणाने हे प्रकरण हाताळले. त्यामुळे साहजिकच दांडेकर यांचा या प्रसंगाकडे पाहण्याचा रोख गंभीरतापूर्वक आहे.

महाराजांच्या कोणत्याही चरित्रांचा आत्मा म्हणजे महाराजांच्या सुधारणा. त्याशिवाय महाराजांचे चरित्र पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून दांडेकर म्हणतात, ''महाराजांचे चरित्र म्हणजे एकप्रकारचे या सुधारणांचा इतिहासच होय.'' (पृ. ३०८) प्रत्येक सुधारणांचा आढावा घेत त्यामधून प्रजेला त्याचा कितपत फायदा झाला हे स्पष्ट करतात.

या चरित्राचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे 'आवडीनिवडी व स्वभाव' आणि 'आठवणी व आख्यायिका' वेगळया दिल्या आहेत. महाराजांचा साधेपणा, व्यवस्थितपणा, वक्तशीरपणा, निडरपणा, बेधडकवृत्ती, टीका ऐकणे, योग्य असल्यास बदल करणे, न्यायबुद्धी, भूतदया, दानधर्म, दयाबुद्धी, खाजगी आयुष्य गंगोदकाप्रमाणे पवित्र, निर्व्यसनी, साधेपणा, बोलण्यात प्रेमळपणा, कळकळ आणि ठसकेबाजपणा, स्पष्टवक्तेपणा, शौर्य, सत्यप्रीती असे अनेक गुण दांडेकर सांगतात. आणि शेवटी म्हणतात, 'त्यांच्याविषयी सांगायचे म्हणजे सयाजीराव महाराज सज्जन आहेत, सयाजीराव महाराज थोर आहेत, आणि सयाजीराव महाराज ज्ञानी व गुणग्राही आहेत.' दांडेकरांनी महाराजांच्या सर्व सद्गुणांची ओळख करून दिली आहे.

दांडेकर यांनी 'आठवणी व आख्यायिका' या शेवटच्या प्रकरणात महाराजांच्या संबंधित आठवणी दिल्या आहेत. या आठवणी देताना त्या आठवणी नेमक्या कोणाच्या आहेत हे स्पष्टपणे नमूद केले नाही. 'एक लेखक', 'एक बडे अधिकारी', दुसरे एक अधिकारी', 'छोटे अधिकारी', 'स्वतःला शहाणे समजणारे एक गृहस्थ', 'एक पोलीस अधिकारी', 'ए. सी.डी., 'एका गावातील शिष्टमंडळ', असे प्रत्यक्ष नाव न देता मोघम लोकांच्या आठवणी देतात.

दांडेकर लिखित महाराजांच्या या चरित्रातून महाराजांची पुरोगामित्त्वाची ओळख होते. महाराजांच्या अपार कष्टाची कल्पना येते. महाराजांच्या सुधारणा समजतात. महाराजांचे गुण समजतात. महाराजांच्या अंगी असणारे राष्ट्रहिताचे सद्गुण समजतात. महाराजांचा मृत्यू होऊन आज जवळ - जवळ ऐंशी वर्ष पूर्ण होत आली. तरीही त्यांच्याविषयी लेखकांत कुतूहल आहे. महाराज हयात असताना सुद्धा त्यांच्याविषयी, त्यांच्या कार्याविषयी, कुतूहल होते. त्यामुळे त्यांच्याविषयी त्या काळातही या चरित्रे लिहिली जात होती. त्याचीच निशाणी म्हणजे दांडेकर यांनी लिहिलेले हे चरित्र होय.

-डॉ. राजेंद्र स. मगर,
निमगाव (म.), जि. सोलापूर.

अनुक्रम

निवेदन / २५५

प्रस्तावना / २५७

१. गोपाळरावाचे सयाजीराव / २६३

२. बडोद्यातील बेबंदशाही / २६८

३. शिक्षणाची सुरुवात व शेवट / २७३

४. अधिकार प्राप्ती / २८२

५. राज्यकारभार / २८६

६. गृहसौख्य / २९०

७. बापट कमिशन /२९६

८. दिल्ली दरबार / ३०३

९. विविध सुधारणा / ३०८

१०. आवडी-निवडी, स्वभाव व शेवट / ३२१

११. आठवणी व आख्यायिका / ३२९

१.
गोपाळरावाचे सयाजीराव

इ.स. १८७५ च्या मे महिन्यात मनमाडपासून अठरा मैलांच्या अंतरावर असलेल्या कवळाणा नावाच्या गावात एक मनोवेधक व आश्चर्यकारक प्रसंग घडला. कवळाणा गाव किती लहान. शे-दोनशे घराच्या वस्तीचे. तेथील गरीब गावकऱ्यांच्या आयुष्यात आश्चर्यापेक्षा येथून तेथून सारखेपणाच पसरलेला ! सूर्याने रोज सकाळी उगवावे व संध्याकाळी अस्तास जावे किंवा तारकांनी रोज रात्री आपले नेत्र उघडावे व सकाळी मिटून घ्यावे. अशा प्रकारच्या सतत व एकसारख्या घडणाऱ्या गोष्टीच कवळाणेकरांनी पाहिलेल्या. त्यांच्या आयुष्यात त्यांनी बदल बघितलेला खरा; पण तो ऋतुमान व कालमानाप्रमाणे घडलेला.

पण आजचा प्रसंग काही औरच. कवळाणेकरांनी सकाळी उठून पूर्वेकडे असलेल्या सूर्याचे दर्शन घेतले व गावच्या शिवेकडे बघितले. तो काळे डगलेवाले पोलिस गावाकडे येत असलेले त्यांना दिसले. गावकऱ्यांना साहजिकच आश्चर्य वाटले. अजूनही एखाद्याच्या दाराशी पोलिस आला की, शंका, आश्चर्य, भिती या भावना एकाच वेळी आपल्या मनात उद्‌भवतात. मग ऐंशी-पंचाऐंशी वर्षांपूर्वी पोलिसांना पाहून कवळाणे येथील ग्रामस्थांना काय वाटले असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. सर्वजण भयभीत व आश्चर्यचकीत होऊन गावाकडे येत असलेल्या पोलिसपार्टीकडे बघत राहिले. पोलिस गावकऱ्यांच्या जवळ आले व त्यांच्याशी बोलू लागले; पण आश्चर्य हे की, त्यांच्या नजरेत क्रौर्य किंवा वाणीत कठोरपणा लवमात्र दिसेना. त्यामुळे काही घाबरलेले कवळाणेकरही आपापली मुंडाशी सावरून धिटाईने पुढे आले व पोलिसांच्या चौकशीला मदत करू लागले.

पोलिसांनी चौकशी केली ती काशीराव गायकवाड* व त्यांच्या तीन मुलांविषयी ही तीन मुले म्हणजे आनंदराव, आपले चरित्रनायक गोपाळराव व संपतरावही होत. आनंदरावांचे वय त्या

---

* चरित्रनायक गोपाळराव यांचा जन्म कवळाणे येथे ता. १७ मार्च १८६३ रोजी झाला.

वेळी सतरा वर्षांचे, गोपाळरावांचे बारा वर्षांचे व संपतरावांचे दहा वर्षांचे होते. या तीन मुलांना व त्यांच्या वडिलांना घेऊन पोलिस पार्टी नाशिक येथे गेली. तेथे गेल्यावर कर्नल एथरीज यांनी काशीरावांना जवळ बोलावून घडलेल्या प्रसंगावर प्रकाश टाकला. श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांना बडोद्याच्या गादीवरून पदच्युत करण्यात आले असून, त्यांच्या जागी योग्य व लायक वारस नेमण्याची हिंदुस्थान सरकारची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले. हे ऐकून काशीरावांना बरे वाटले.

त्यानंतर कर्नल एथरीज व नाशिकचे कलेक्टर या दोघांनी मिळून उपाध्यायांच्या साहाय्याने काशीरावांच्या मुलांचा बडोद्याच्या गादीवर वारसा हक्क शाबीत होतो, असे सिद्ध केले. इतके सर्व झाल्यावर काशीराव व त्यांचे तीन पुत्र यांना बडोद्यास पाठविण्यात आले. तिथे काशीरावांचे बंधू *उखाजीराव आपला मुलगा दादासाहेब याच्याबरोबर अगोदरच आलेले होते. तेव्हा खंडेराव महाराजांच्या पत्नी जमनाबाईसाहेब गायकवाड यांनी आनंदराव, गोपाळराव, संपतराव व दादासाहेब या चार हक्कादारांपैकी कोणालाही दत्तक म्हणून घ्यावे असे ठरले. त्यापैकी आनंदराव व दादासाहेब हे दोघे वयाने मोठे म्हणून नवीन शिक्षण संस्कार सुलभतेने ग्रहण करायला अयोग्य असे समजून त्यांना एकीकडे सारण्यात आले.

संपतराव अगदीच लहान असे मानून त्यांचाही प्रश्न निकालात काढण्यात आला. राहता राहिले गोपाळराव. जमनाबाईसाहेबांना गोपाळरावांची तरतरीत मुद्रा व पाणीदार डोळे ही दोन्ही पसंत पडून त्यांनी गोपाळरावांनाच दत्तक घ्यावयाचे ठरविले.

या बाबतीत एक मजेदार गोष्ट बडोद्यात प्रसिद्ध आहे ती अशी : आनंदराव, गोपाळराव व संपतराव या तिघांना जेव्हा जमनाबाईसाहेबांसमोर उभे करण्यात आले त्यावेळी त्यांनी तिघांनाही तुम्ही येथे का आलात असा प्रश्न विचारला. तेव्हा सर्वांत वडील आनंदराव यांनी काहीच उत्तर दिले नाही. कनिष्ठ संपतराव यांनी 'मला माहीत नाही' असे सांगितले; परंतु गोपाळराव यांनी चटकन 'मी राजा होण्यासाठी आलो' असे चुणचुणीत उत्तर दिले. दुसरी एक गोष्ट अशी सांगतात की, तिन्ही मुलांना खिरीच्या वाट्या देण्यात आल्या. त्यावेळी गोपाळरावांनी नेमकी सोन्याचीच वाटी आपल्या वाट्यास घेतली. भोजनाच्या वेळी महाराणी जमनाबाईसाहेब ज्या पद्धतीने जेवीत असत, त्याकडे लक्ष ठेवून गोपाळरावांनीही तीच रीत उचलली. या सर्व गोष्टींवरून या मुलांत राजचिन्हे दिसत आहेत, असे महाराणीसाहेबांनी जाणून गोपाळरावांनाच दत्तक घेण्याचे निश्चित केले असे म्हणतात.

वरील कथांतील सत्यांशाबद्दल आम्हाला जबरदस्त शंका आहे; परंतु ते काहीही असले तरी जमनाबाईसाहेबांनी केलेली निवड मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकार या दोघांनाही पसंत पडून तारीख २७ मे इ. स. १८७५ रोजी हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे काशीरावांनी आपला मुलगा गोपाळराव जमनाबाईसाहेबांच्या मांडीवर दत्तक दिला. त्यानंतर उंची वस्त्रे परिधान करवून

---

* उखाजीराव-काशीराव वगैरे मंडळींचा बडोद्याच्या गायकवाडांशी कसा संबंध पोहोचतो हे दर्शविण्याकरिता जरूरीपुरती वंशावळ पुढील पृष्ठावर दिली आहे.

दमाजी
पिलाजी
दमाजी
गोविंदराव
आनंदराव
फत्तेसिंह
सयाजी
गोविंदराव
(दत्तक)
सदाशिव
मुरार
गणपतराव
खंडेराव
मल्हारराव
सयाजीराव
(दत्तक)
(गोपाळराव)
प्रतापराव
काशीराव
ओखाजी
आनंदराव
दादासाहेब
गोपाळराव
संपतराव

गोपाळरवांना कॅम्पमधून राजवाड्यात नेण्यात आले. तेथे ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी या नात्याने सर रिचर्ड मीड यांनी त्यांना 'तिसरे सयाजीराव' म्हणून बडोद्याच्या गादीवर बसविले. त्यानंतर ब्रिटिश सरकारकडून व बडोदे संस्थानाकडून तोफांची सलामी देण्यात आली व अशा तऱ्हेने हा समारंभ मोठ्या थाटाने पार पडला.

यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणे कवळाण्याचे गोपाळराव बडोद्याचे सयाजीराव महाराज बनले ! केवढी अकल्पित व अघटीत घटना ही ! कवळाणेकरांना ही बातमी समजली असेल तेव्हा त्यांना किती आश्चर्य व आनंद वाटला असेल ! आणि कोणालाही आनंद व आश्चर्य वाटावे असाच हा प्रसंग घडला. भाग्यवान मनुष्याचे भाग्य नेहमीच अशाच फलप्रद गोष्टी घडवून आणते. श्रीमंत सयाजीराव महाराज पुराणकाळात जन्मास आले असते, तर हा सर्व प्रकार दैवी चमत्कार म्हणून सहज एखाद्या पौराणिक कथेचा विषय होऊन बसता; पण सध्याच्या बुद्धिप्रधान युगातही या घटनेला काही कमी महत्त्व आहे असे नाही. अशाच प्रसंगानी मनुष्याच्या प्रयत्नापलीकडे काहीतरी शक्ती आहे याची खात्री बरोबर पटते.

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात दावडी म्हणून एक गाव आहे. ते गायकवाडांचे मूळ गाव होय. या घराण्याचे नाव गायकवाड पडण्याबद्दल अशी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे की, नंदाजी नावाचा एक गृहस्थ भोर संस्थानात एका किल्ल्याचा अमलदार होता. एके दिवशी एक मुसलमान खाटीक किल्ल्याजवळून काही गाई घेऊन चालला असता नंदाजीस त्यांची दया येऊन त्याने किल्ल्याचे कवाड (दार) उघडून गाई आत घेतल्या व त्यांचा जीव वाचविला. म्हणून त्यांचे गायकवाड हे नाव पडले. हा नंदाजी म्हणजे गायकवाड घराण्याचा संस्थापक दमाजी याचा आजा होय.

श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांचे चरित्र म्हणजे सद्भाग्य व गायकवाड सत् प्रयत्न यांच्या सुरुचिर संगमांचे सुंदर फळ होय. 'दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।' हे उद्गार जितक्या उचित अभिमानाने कर्णाने उच्चारले असतील, तितक्याच अभिमानाने; पण थोड्याशा निराळ्या अर्थाने ते सयाजीराव महाराजांनाही उच्चारता आले असते. त्यांना राज्यपद मिळाले ते त्यांच्या सद्भाग्यामुळे यात शंका नाही; पण स्वतःला, तसेच स्वतःच्या राज्याला त्यांनी जे पद प्राप्त करून दिले ते त्यांच्या अहर्निश सत्य प्रयत्नांचेच एकमेव फळ होय असेच कोणीही म्हणेल.

'अथ खलु क्रतुमयः पुरुषः ।' ही उपनिषद्वाणी इतर अनेक थोर पुरुषांप्रमाणे श्रीमंत सयाजीराव याच्या बाबतीतही खरी ठरलेली आढळते. मनुष्य हा क्रतुमय किंवा इच्छामय आहे म्हणून नेहमी सदिच्छा बाळगाव्यात. सदिच्छांना सत्य प्रयत्नांची जोड मिळाली की परमेश्वरी कृपाप्रसाद काही दूर नाही. 'मनुष्य हा स्वतःच्या दैवाचा नियंता आहे' अशा अर्थाची इंग्रजीत एक सुप्रसिद्ध म्हण आहे. या म्हणीचा पाठपुरावा करण्याकरिता एखाद्याला उदाहरण हवे असेल, तर ते सयाजीराव महाराजांच्या चौसष्ट वर्षांच्या उज्ज्वल कारकीर्दीत देता येईल. महाराजांची ही कारकीर्द म्हणजे मनुष्याला प्रयत्नांनी केवढे मोठे भरीव कार्य करून दाखविता येते याची मूर्तिमंद साक्ष होय.

महाराजांना जेव्हा राज्यपद प्राप्त झाले, त्यावेळची बडोद्याची स्थिती अत्यंत गुंतागुंतीची, बिकट व जोखमीची होती. अशा त्या परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन त्यांनी सुयश मिळविले, यातच त्यांच्या चरित्राचे खरे रहस्य साठविले आहे. ही परिस्थिती लक्षात आल्यावाचून श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या कामगिरीची किंमत कळावयाची नाही. अर्थात, काही वर्षे मागे जाऊन बडोद्यातील वस्तुस्थिती त्यावेळी होती तरी कशी, हे आता आपण पाहू या.

●●●

२.
बडोद्यातील बेबंदशाही

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात बडोद्याच्या भाग्यश्रीला उतरती कळा लागली होती. बुडत्याचा पाय अधिक खोल जावा, त्याला आपला तोल सावरता येऊ नये, अशी बडोद्यातील राज्यकारभाराची स्थिती सुमारे इ. स. १८४० ते १८७४ पर्यंत सुरू होती. या चाळीस-पंचेचाळीस वर्षांतून खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीची काही वर्षे अर्थातच वजा करायला हवीत. ती वजा केल्यावर बाकी राहिलेल्या वर्षांत बडोद्याचा कारभार अत्यंत असमाधानकारक होता, असे मोठ्या कष्टाने म्हणणे भाग आहे. दुसरे सयाजीराव व त्यांची तीन मुले गणपतराव, खंडेराव व मल्हारराव यांच्या अमदानीत बडोद्याच्या प्रगतीच्या दृष्टीने चांगल्या गोष्टी थोड्या घडल्या.

दुसरे सयाजीराव विशेष द्रव्यलोभी होते. आपल्या मनाप्रमाणे न वागणाऱ्याचा छळ ते दयाशून्य हृदयाने करीत. त्यांच्या अठ्ठावीस वर्षांच्या अमदानीत त्यांच्या हातून लोकोपयोगी गोष्टी जवळ जवळ घडल्या नाहीतच. शिवाय वरिष्ठ सरकारशी त्यांचा एकप्रकारे बेबनाव होता. त्यामुळे हिंदुस्थान सरकारची बडोद्याकडे पाहण्याची दृष्टी जरा तेढीच होती.

दुसरे सयाजीराव निवर्तल्यावर त्यांचे ज्येष्ठ पुत्र गणपतराव गादीवर आले; पण हे स्वभावाने मऊ, चारित्र्याने कमजोर व विद्येने शून्य असल्यामुळे त्यांची कारकीर्द अशीतशीच झाली. त्यांनी कोणाचे फारसे वाईट केले नाही, तसेच चांगलेही केले नाही. दैवाने त्यांना राजे केले होते त्याला ते काय करणार? गणपतराव इ. स. १८५६ मध्ये वारले.

गणपतरावांच्या नंतर खंडेराव महाराज गादीवर आले. हे कणखर स्वभावाचे, निर्व्यसनी; पण काहीसे हेकेखोर होते. यांना कुस्तीचा व शिकारीचा फार नाद होता. ते स्वतः उत्तम कुस्ती खेळत व त्यांच्या पदरी नामांकीत पहिलवानांचे संघ असत. शिकारीची यांना इतकी आवड होती की, मकरपुऱ्याच्या मागच्या बाजूला एक मोठे वन याकरिता तयार करण्यात आले होते. काम करण्याची याची तऱ्हा फार जलद असे. कुठल्याही गोष्टीचा ते ताबडतोब निकाल करीत. न्यायदानाचे कामही ते फार झपाट्याने करीत.

कित्येक वेळा लोकोपयोगी काम करण्याची पद्धत जरा चमत्कारिक असे. असे सांगतात की, एकदा शहरात पाण्याचा पुरवठा करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली. नर्मदेचे पाणी कालवा बांधून बडोद्याला आणण्याची ती योजना होती. काही कारणांनी ती पुढे सफल झाली नाही. तेव्हा त्या कामाकरिता काढून ठेवलेल्या द्रव्यानिधींतून मकरपुऱ्याचा राजवाडा, दोन चांदीच्या तोफा, काही जडजबाहीर इत्यादी वस्तू निर्माण करण्यात आल्या ! जणू काय या वस्तूंनी लोकांची तृषा शांत होणार होती !

पण एकंदरीत डामडौल, वैभव, विलास यांची त्यांना मनापासून आवड असे. बडोदे येथील जवाहिरखान्यात जे मौल्यवान जवाहीर दिसते ते खंडेराव महाराजांनी खरेदी केले होते. त्याचप्रमाणे मोत्यांची चादर म्हणून जी दाखविण्यात येते, ती त्यांनीच महंमद पैगंबराच्या कबरीवर घालण्याकरिता तयार करविली होती. पुढे ते वारले. त्यामुळे पैगंबराच्या कबरीकडे ती चादर न जाता बडोद्याच्या जवाहिरखान्यातच राहिली.

नजराणे घेण्यादेण्याची पद्धतही श्रीमंत खंडेराव महाराज यांच्या कारकीर्दीत विशेष रूढ होती. महाराजांचा सत्कार करण्याची, त्यांच्याबद्दल वाटत असलेला आदर दर्शविण्याची ती एक सामान्य व सन्मान्य रीत त्यावेळी समजली जाई. सरकारी नोकरांना व आश्रितांना तर तिचा नेहमी अवलंब करावा लागे. किंबहुना ज्याला कोणाला काही फायदा करून घ्यावयाचा असेल त्याला महाराजांना नजराणा अर्पण करणे हा एक बहुमूल्य; पण फलप्रद मार्ग असे. या नजराणे घेण्याच्या पद्धतीमुळे खंडेराव महाराजांच्या पदरी कितीतरी नालायक कारभाऱ्यांचा जमाव जमला होता. असल्या नालायक लोकांमुळे बडोद्याची प्रगती त्या काळी होऊ शकली नाही. त्यातच एकीकडे महाराजांचे धाकटे बंधू मल्हारराव यांची कारस्थाने सुरू होती. बडोद्याची गादी आपल्याला मिळावी म्हणून त्यांनी खंडेराव महाराजांविरुद्ध कट केला. याचा परिणाम म्हणून मल्हारराव महाराज यांना पादरा येथील तुरुंगात इ. स. १८६३ मध्ये टाकण्यात आले.

खंडेराव महाराज गायकवाड यांच्या अमदानीत बडोद्याचे महत्त्व वाढविणारी काही फार कृत्ये घडली नाहीत; पण कारण काहीही असो ते फार लोकप्रिय होते. संगमरवरी दगडाचा त्यांचा एक सुंदर पुतळा सयाजीराव महाराजांनी तयार करवून बडोद्यातील भाजीबाजाराच्या समोर (याला खंडेराव मार्केट म्हणतात) ठेवून एका प्रकारे पितृऋणांतून स्वतःची मुक्तता केली. खंडेराव महराजांचा रुबाबदार भव्य चेहरा, त्याची दातृत्वशक्ती, त्यांचा मायाळू व दिलदार स्वभाव यामुळे बडोद्यातील प्रजाजनांना ते हवेहवेसे वाटत. दूरदूरच्या पहिलवानांप्रमाणे काशी-रामेश्वराकडील पंडितही महाराजांच्या कृपाछत्राखाली काही काळ राहून आपला फायदा करून घेत.

हिंदुस्थान सरकारशीही त्यांचे नाते अत्यंत सलोख्याचे होते. इ. स. १८५७ सालच्या स्वातंत्र्य युद्धाच्या (ज्याला त्या काळी 'बंड' म्हणण्यात येत असे) वेळी खंडेराव महाराजांच्या साम्राज्यनिष्ठेवर अवलंबून हिंदुस्थान सरकारने आपले गुजरातेतील सैन्य काढून ते दिल्ली-लखनौकडे नेले होते आणि त्यावेळी गुजरातेत शांतता राखल्याबद्दल बंडाचा वणवा शांत झाल्यावर हिंदुस्थान सरकारने बडोदे सरकारला पूर्वी जो कर द्यावा लागे त्याची माफी दिली. त्याचप्रमाणे

'हिज् हायनेस दी महाराजा गायकवाड ऑफ बरोडा' ही पदवीदेखील त्याचवेळी मिळाली. याशिवाय खंडेराव महाराज यांना दत्तक घेण्याचा अधिकार देण्यात आला तो वेगळाच.

अशा प्रकारे खंडेराव महाराजांच्या चौदा वर्षांच्या कारकीर्दीत बडोद्याचा भाग्यरवी तळपत असलेला दिसतो न दिसतो, तोच त्या भाग्यरवीला खग्रास ग्रहण लागण्याची वेळ आली. श्रीमंत खंडेराव महाराज ता. २८ नोव्हेंबर १८७० रोजी स्वर्गवासी झाले. त्यांना औरस संतती नव्हती व त्यांनी कोणाला दत्तकही घेतले नव्हते. अशा परिस्थितीत मल्हारराव यांना गादी मिळण्याचा संभव दिसू लागला; पण खंडेराव महाराजांच्या पत्नी जमनाबाईसाहेब या गरोदर आहेत, अशी बातमी बाहेर आल्याने त्यांना अपत्य होऊन काही निकाल लागेपर्यंत मल्हाररावांनी फक्त देखरेख ठेवावी, असा निकाल मुंबई सरकारने दिला. मल्हाररावांचे मन खट्टू झाले व त्यांनी जमनाबाईसाहेबांचा भावी मुलगा आपल्या मार्गात न येईल अशी कपट योजना सुरू केली. जमनाबाईसारख्या सच्छील स्त्रीवर मोठाच प्रसंग ओढवला; पण त्या माऊलीने आलेल्या प्रसंगाला धैर्याने तोंड दिले व रेसिडेंट कर्नल बार यांना आपल्या बाळंतपणाची सोय रेसिडेन्सीत करण्याविषयी सांगितले. त्याप्रमाणे जमनाबाईसाहेब प्रसूत होऊन त्यांच्या पोटी ताराराजे जन्मास आल्या.

मग मल्हाररावांचा आनंद काय विचारता? ते आता खरेखुरे महाराज बनले. ते हत्तीवर बसून आनंदाने गावातून फिरले व लोकांना त्यांनी बक्षिसे वाटली. लागलीच बडोद्यातील बेबंदशाहीला सुरुवात झाली. खंडेराव महाराजांच्या कारभाऱ्यांवर व मदतनिसांवर सूड उगवायला त्यांनी लागलीच सुरुवात केली. खंडेराव महाराजांचे दिवाण भाऊ शिंदे यांना तुरुंगात टाकण्यात आले व मागाहून त्यांच्यावर बहुतेक विषप्रयोग होऊन ते वारले. आपल्या भावाच्या अधिकाऱ्यांऐवजी मल्हाररावांनी स्वतःच्या नालायक माणसांची योजना त्या कामी केली. जमनाबाईसाहेबांना तर हा सर्व प्रकार पाहून खेद झाला व त्या आपल्या मुलीबरोबर पुण्यास निघून गेल्या.

इकडे मल्हारराव महाराजांनी आपल्या कलंकित कारकीर्दीला सुरुवात केली. राजवाड्यात नाचतमाशे, रंगढंग, विलास, अत्याचार सुरू झाले. असे म्हणतात की, शहरातील कुलीन स्त्रियांना रस्त्यातून जाण्याची भिती उत्पन्न झाली. कोणाची अब्रू कोणीही केव्हाही लुटावी असा प्रकार सुरू झाला. महाराजांच्या पदरी बदमाश, हलकट लोक होते. त्यांनी चोहीकडे हाहाकार उडविला. जे नागरिक त्यांच्या नीत हेतूंना कबूल होत नसत, त्यांचे अनन्वितपणे हाल करण्यात येत. लोकांचा कोणीच त्राता उरला नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली.

इतक्यात कर्नल रॉबर्ट फेअर नावाच्या गृहस्थाची रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. तो १८ मार्च १८७३ रोजी बडोद्यास आला. त्याच दिवशी अशी खबर कळली की, शहरात आठ जणांना फटक्याची शिक्षा देण्यांत आली आहे. यापूर्वीच्या बातम्या त्यांच्या कानावर आल्याच होत्या. त्यामुळे चौकशीकरिता कमिशन नेमण्याविषयी त्यांनी ब्रिटिश सरकारजवळ आग्रह धरला. या कमिशनमध्ये कर्नल रिचर्ड मीड व इतर तीन सभ्य गृहस्थ होते. या कमिशनने फारसा कडक निर्णय न देता 'बडोद्यातील राज्यकारभार सुयंत्रित नाही' असा मोघमच दिला. यानंतर त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड नॉर्थब्रुक यांनी एक प्रकारचा निर्वाणीचा खलिता मल्हारराव महाराजांना लिहिला. त्यात त्यांनी राज्यकारभारात सुधारणा करण्याविषयी व बेबंदशाही बंद करण्याविषयी

लिहिले होते. मल्हारराव‌ांनी आपल्या राज्यात सुव्यवस्था करण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर १८७५ ही ठेवण्यात आली व तेवढ्या अवधीत त्यांनी आपले बदसल्लागार बदलून ब्रिटिश सरकारला मान्य होईल असा आपला दिवाण नेमण्याविषयी त्यांना सांगण्यात आले.

या निर्वाणीच्या खलित्याचा थोडासा उपयोग झाला, नाही असे नाही. मल्हारराव‌ांनी आपले दिवाण नाना खानविलकर यांना बदलून त्यांच्या जागी दादाभाई नौरोजी यांना आपले दिवाण नेमले. कर्नल फेअर यांना या दोन्ही गोष्टी आवडल्या नाहीत. दादाभाई ता. ४ ऑगस्ट १८७४ रोजी आपल्याबरोबर बऱ्याच जातीबंधूंना घेऊन आले. बडोद्यातील अधिकाऱ्यांना एक पारशी गृहस्थ आपल्यावर टेंभा मिरवायला आलेला पाहून बरे वाटले नाही. कर्नल फेअर यांना तर हे सर्व नाटकच वाटले.

कर्नल फेअर यांची वागणूक इतकी कडक होती की, दादाभाईंच्या सांगण्यावरून मल्हारराव‌ांनी हिंदुस्थान सरकारला, फेअरला बडोद्याहून काढण्याविषयी पत्र लिहिले. मल्हारराव‌ांना अनुकूल असे या पत्राचे उत्तर आले. कारण त्यात रेसिडेंट फेअर याला रेसिडेन्सी सोडण्याविषयी व कर्नल सर लुई पेली यास नेमले असल्याची हकीकत होती.

पण रेसिडेंटांची अशा तऱ्हेने अदलाबदल होण्यापूर्वी बडोद्यात एक प्रक्षोभकारक गोष्ट घडली. कर्नल फेअर हा ता. ७ नोव्हेंबर रोजी सरबत पिऊन आजारी झाला. सरबताच्या ग्लासमध्ये पाहता त्याच्याखाली काही पदार्थ आढळला. पृथक्करण करता त्यात हिऱ्याची पूड व आर्सेनिक नामक विष आढळले. कोणीतरी कर्नल फेअरवर विषप्रयोग केला होता; पण कोणी केला हे त्यावेळी कळले नाही व कर्नल फेअर यास सर लुई पेली यांना आपल्या जागेचा चार्ज देऊन जावे लागले.

सर लुई व मल्हारराव महाराज यांचे प्रथम काही दिवस ठीक होते; पण पुढे बिनसले. मल्हारराव‌ांनी लक्ष्मीबाई नावाच्या आपल्या रखेलीशी लग्न लाविले होते. हिला डिसेंबरमध्ये एक मुलगा झाला. मल्हारराव त्याला आपलाच मुलगा मानू लागले व त्याचे नाव सयाजीराव ठेवण्यात आले. यावेळी सर लुई हिंदुस्थान सरकारच्या सांगण्यावरून आपली हजेरी द्यावयाला राजवाड्यात गेले नाहीत.

इतक्यात सर लुईचे लक्ष दुसऱ्या एक महत्त्वाच्या गोष्टीकडे वेधले गेले. हिदुंस्थान सरकारने आपले गुप्त पोलिस बडोद्यात ठेवले होते. या गुप्त पोलिसांनी रेसिडेन्सीमधील दोन शिपायांकडून मल्हारराव‌ांनी त्यांना कर्नल फेअरवर विषप्रयोग करण्याकरिता विष दिल असल्याबद्दल कबुलीजबाब घेतले. इतके कळल्यावर काहीतरी इलाज करणे प्राप्तच होते. ता. १४ जानेवारी १८७५ रोजी हिंदुस्थान सरकारने मल्हारराव महाराजांना अटक केल्याचे व पुढील चौकशी संपेपर्यंत बडोद्याचा कारभार आपल्या हाती ठेवल्याचे जाहीर केले.

मल्हारराव‌ांनी अटक करण्याच्या वेळी कोणताही प्रतिबंध केला नाही. त्यांना रेसिडेन्सीत नजरकैदेत ठेवण्यात आले. त्यानंतर सर लुईने नागरिकांना गोळा करून खरी हकीकत समजावून सांगितली. हिंदुस्थान सरकारची इच्छा संस्थान खालसा करण्याची नाही, असेही सांगितले. फौजेचा बाकी राहिलेली पगार देऊन टकल्याने काही गडबड झाली नाही.

पुढे कमिशन नेमण्यात आले. त्यात सर रिचर्ड कौच, सर रिचर्ड मीड व मेलविल हे तीन युरोपीयन व ग्वाल्हेरचे महाराज, जयपूरचे महाराज व सर दिनकरराव हे तीन हिंदी, अशा सह जणांच्या कमिशनपुढे मल्हारराव महाराजांवरील असलेल्या आरोपांची चौकशी झाली. त्यात युरोपीयन व हिंदी सभासदांत भिन्न मत पडल्यामुळे कमिशनचा रिपोर्ट तरी सरकारला मान्य झाला नाही, तरी मल्हाररावांना पदच्युत करण्याचे त्यांनी ठरविले.

याच वेळी जमनाबाईसाहेबांनी खंडेराव महाराज दत्तकाचा अधिकार गाजविल्यावाचून वारल्याची हकीकत सरकारच्या नजरेस आणली. एखादा गायकवाड कुटुंबातील योग्य मुलगा पाहून आपणाला दत्तक घेऊ देण्याविषयी कळविले. सरकारला हा बेत पसंत पडला व त्यांनी १९ एप्रिल रोजी मल्हारराव महाराजांना त्यांच्या दुःशीलाबद्दल व बदराज्य कारभाराबद्दल पदच्युत केल्याचे जाहीर केले.

तीन दिवसांनंतर मल्हाररावांना मद्रास येथे नेण्यात आले. आपल्या जागी आपल्या पुत्राला गादी देण्याविषयी सरकारला विनंती केली; पण ती मान्य करण्यात आली नाही आणि अशा तऱ्हेने बेबंदशाही कारभाराचा शेवट झाला. मल्हाररावांच्या काही अनुयायांनी २८ एप्रिल रोजी छोटेसे बंड करण्याचा विचार केला. त्याप्रमाणे ब्रिटिश अधिकाऱ्यांवर दगडफेक, लाठीमार वगैरे अत्याचाराला सुरुवात केली. मल्हाररावाच्या मुलाला गादी देण्याविषयी हा व्यर्थ खटाटोप होता; पण सर रिचर्ड मीड याने वेळीच सावध होऊन बंड मोडले व बऱ्याच जणांना अटक केली. त्यानंतर त्याने व्यापाऱ्यांना रेसिडेन्सीत बोलावून बडोद्यातील स्वातंत्र्य पूर्वीप्रमाणेच अबाधित असल्याचे सांगितले.

एवढ्या आश्वासनाने लोक खूष झाले. कारण त्यांना मल्हाररावांच्या कारकीर्दीचा कंटाळा आला होता. त्यांना राजा हवा होता; पण तो जुलुमी नको होता. त्यामुळे सर्वसाधारण प्रजाजनांना मल्हारराव गेल्याबद्दल फारसे वाईट वाटले नाही.

त्यातच ता. २ मे रोजी जमनाबाई साहेबांना पुन्हा बडोद्यात परत आलेल्या पाहून लोकांना बरे वाटले. पुढे जमनाबाई साहेबांनी रेसिडेंट मीड व नवीन नेमण्यात आलेले दिवाण सर टी. माधवराव यांच्या सल्ल्याने गोपाळराव गायकवाड यांची बडोद्याच्या गादीवर कशी स्थापना केली ही हकीकत मागील प्रकरणात आलीच आहे.

●●●

३.

शिक्षणाची सुरुवात व शेवट

बाल सयाजीराव यांचे शिक्षण कवळाणे येथे मुळीच झाले नव्हते. त्यामुळे मराठी लिहिण्या-वाचण्यापासून त्यांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. तारीख ७ जून १८७५ रोजी सरस्वती पूजन वगैरे प्राथमिक विधी संपल्यावर त्यांच्या मराठीच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. त्यावेळची त्यांची शाळा राजवाड्याच्याच वरच्या मजल्यावर असे. येथे केशवराव पंडित व व्यंकटेश जोशी ऊर्फ भाऊ मास्तर महाराजांना पाच तास शिकवीत. महाराजांच्या बरोबर दादासाहेब व संपतराव हेही शिक्षण घेत. त्या वेळच्या शाळेचा सयाजीरावांना कितीतरी कंटाळा वाटत असेल ! कवळाण्याच्या मोकळ्या वातावरणात वाढलेल्या बालकाला राजैश्वर्यापासून कितीही सुख मिळत असले तरी ते प्रथम असह्य वाटत असणार. शिवाय कवळाणे येथे मुळीच शिक्षण न झाल्यामुळे महाराजांना शिक्षणाचे बरेच कष्ट सहन करावे लागले; पण प्रथमपासूनच मेहनत करून व लक्ष लावून शिकावयाचे असे त्यांनी ठरविल्यामुळे त्यांची प्रगती बऱ्याच झपाट्याने होऊ लागली. सर्व गोष्टी प्रयत्नाने-दीर्घ प्रयत्नाने साध्य करून घ्यावयाचा बाणा त्यांनी अगदी लहानपणापासून बाळगलेला दिसतो. त्यामुळे राजवाड्यातील शाळेतही त्यांनी अंतःकरणपूर्वक प्रयत्नाला सुरुवात केली.

सर रिचर्ड मीड मात्र या शिक्षणाच्या प्रयोगावर खूष नव्हते. राजवाड्यात शाळा चालू ठेवल्याने, झाला तर तेथील स्त्रियांमुळे थोडासा त्रासच होणार. शाळेला पाहिजे तसले शुद्ध वातावरण तेथे नसल्याने महाराजांना शिक्षणापासून काही फायदा घेता येणार नाही, असे त्यांना वाटले. राजाची एक निराळी शाळा काढून त्यात सरदार व कुलीन गृहस्थांच्या मुलांचा समावेश करण्यात यावा व मुख्यध्यापक इंग्रज गृहस्थ असावा, अशी सूचना त्यांनी मुंबई सरकारला केली.

पण सूचनेप्रमाणे बदल होण्यापूर्वी महाराजांच्या शिक्षणात काही काळ खंड पडला. त्यावेळचे प्रिन्स ऑफ् वेल्स, भावी सातवे एडवर्ड राजे हिंदुस्थानात नोव्हेंबरमध्ये यावयाचे होते. त्याकरिता इतर संस्थानिकांप्रमाणे बडोद्याच्या बाल महाराजांनीदेखील त्यांच्या स्वागतार्थ मुंबईस जाणे

योग्यच होते. त्याप्रमाणे महाराणी जमनाबाईसाहेब व सर रिचर्ड मीड यांच्याबरोबर सयाजीराव महाराज मुंबईस गेले. तेथे गव्हर्नरांची व त्यांची मुलाखत झाली. पुढे व्हाइसरॉय मुंबईस आले व ता. ८ नोव्हेंबर रोजी प्रिन्स ऑफ् वेल्स हेही आले. दुसऱ्या दिवशी त्यांची व महाराजांची लाल बागेत भेट झाली. त्याप्रसंगी प्रिन्स ऑफ वेल्सनी काही वस्तू महाराजांना भेटीदाखल दिल्या व राज्यकारभारात सुयश इच्छीले. तारीख १२ रोजी बडोद्याच्या लष्कराची पाहणी प्रिन्स ऑफ वेल्स यांनी केली व सोन्या-चांदीच्या तोफा पाहून संतोष व्यक्त केला.

पुढे पुण्याहून परत आल्यावर प्रिन्सनी शिकारीकरिता व अगडांतील खेळ पाहण्याकरिता बडोद्यास जावयाचे ठरविले. त्यामुळे त्यांच्या स्वागतार्थ महाराजांना घाईघाईने बडोद्यास परत यावे लागले. १९ तारखेला सकाळी प्रिन्स बडोद्यात आले व महाराज, महाराणी जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव व नवे एजंट मेलविल यांच्यासमवेत रेसिडेन्सीत गेले. दुपारी महाराणी जमनाबाईसाहेब व महाराज यांची प्रिन्सने सरकारीरित्या भेट घेतली व अगडांतील विविध खेळ पाहिले. ता. २० रोजी सकाळी शिकारीत प्रिन्सचा बराच वेळ गेला. संध्याकाळी त्यांना खाना देण्यात आला. त्याप्रसंगी सर टी. माधवराव यांनी महाराणी व्हिक्टोरिया व प्रिन्स यांना शुभायुष्य चिंतिले. नंतरच्या आपल्या भाषणात प्रिन्स ऑफ वेल्स यांनी 'महाराज आपल्या प्रजेच्या व राज्याच्या हितार्थ झटून यश संपादन करतील, अशी आशा आहे,' असे सांगितले. अशा तऱ्हेने हा मोठा समारंभ निर्विघ्नपणे पार पडला. प्रिन्स ता. २३ मे रोजी बडोदे सोडून गेले. या बड्या पाहुण्यांच्या मुलाखतीमुळे महाराजांना पुष्कळ नव्या व चांगल्या गोष्टी शिकावयाला सापडल्या.

प्रिन्स ऑफ वेल्सच्या या मुलाखतीनंतर सर रिचर्ड मीड यांनी शिक्षणाच्या बाबतीत योजिलेला बदल अंमलात आला. सर रिचर्ड मीड आता जागेवर नव्हते. त्यामुळे त्यांची कामगिरी मि. मेलविल यांना पुरी करावी लागली. राजा स्कूलचे मुख्याध्यापक म्हणून मि. इलियट नावाच्या एका सिव्हिल सव्हेंटाची योजना करण्यात आली. मि. इलियट हे वऱ्हाडात डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या जागेवर होते. ते बडोद्यास ता. १० डिसेंबर १८७५ रोजी आले. शाळेची राजवाड्यातील जागा बदलून ती मोती बागेत नेण्यात आली. येथे सकाळी दहा वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत महाराजांचे इतर विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण होऊ लागले. त्यांच्या शिक्षणात आता मराठीच्या जोडीला इंग्रजी, गुजराती व उर्दू हे नवीन भाषा विषय आले. इलियटने आपल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली व तो विद्येत बराच मागासलेला असल्याचे त्यांना कळले, तरी पण त्यांनी हौसेने शिकावयास आरंभ केला व सयाजीराव महाराज यांनीदेखील आनंदाने व उत्साहाने आपल्या नव्या गुरूच्या हाताखाली शिकावयाला सुरुवात केली.

विद्यार्थिदशेतील त्यांची एक ठोकळ मानाची दिनचर्या मि. फिलिप सार्जेंट यांच्या पुस्तकात दिली आहे. ती अशी :-

(१) सकाळी ६ वाजता निजून उठणे.
(२) सकाळी ८ वाजेपर्यंत घोड्यावरून फेरफटका, नंतर १ तास अभ्यास.
(३) सकाळी ९ वाजता महाराणी साहेबांच्या बरोबर छोटी हजिरी.

(४) सकाळी १०।। वाजता राजवाड्यातून घोडेस्वारांच्या सरंजामाबरोबर शाळेत जाणे.
(५) १०।। ते ५ वाजेपर्यंत शाळा. मध्यंतरी १ तासाची फराळाची सुट्टी.
(६) ५ ते ७।। शाळेच्या मैदानावर हिंदी खेळ, कवायत, पोहणे इत्यादी व्यायाम घेणे.
(७) ७।। ते ८।। दुसरे दिवशीचा अभ्यास करणे.
(८) ९ ते १० पर्यंत भोजन.
(९) १० वाजता निद्रा.

नव्या गुरूच्या हाताखाली सुरू होणाऱ्या या नव्या शिक्षणक्रमाला पुन्हा एकदा खंड पडला. १७७६ च्या शेवटच्या काही दिवसांत महाराजांनी हिंदुस्थानच्या लांबलचक ३५८० मैलांच्या सफरीला आरंभ केला. यात मुख्य उद्देश दिल्ली दरबारला हजर राहण्याचा होता. याप्रसंगी राणी व्हिक्टोरिया यांची 'हिंदुस्थानची महाराज्ञी' म्हणून घोषणा व्हावयाची होती. महाराज जमनाबाईसाहेब, ताराराजे, मेलविल व इलियट यांच्याबरोबर दिल्लीस गेले. लॉर्ड लिटन, नवे व्हाईसरॉय नाताळच्या दिवशी दिल्लीस आले. त्यांच्या स्वागतार्थ इतर संस्थानिकांप्रमाणे महाराजही हजर होते. दुसऱ्या दिवशी लॉर्ड लिटन यांनी महाराजांना भगवा झेंडा व व्हिक्टोरिया राणीची मुद्रा असलेले सुवर्णपदक अर्पण केले. इतकेच नाही, तर २९ तारखेस महाराणी व्हिक्टोरिया यांनी कृपावंत होऊन महाराजांना 'फर्जेद-इ-खास-इ-दौलत-इ-इंग्लिशिया' हा किताब दिल्याचे जाहीर केले.

दिल्ली दरबार संपल्यावर ता. ९ जानेवारी १८७७ रोजी महाराज बडोद्यास परत यावयास निघाले. वाटेत त्यांनी आग्रा, बनारस, लखनौ, अलाहाबाद वगैरे स्थळे अवलोकिली व एखाद्या धार्मिक हिंदूप्रमाणे नर्मदा, गंगा, यमुना वगैरेंसारख्या पवित्र नद्यांत स्नाने केली. अशा तऱ्हेने महाराजांच्या प्रवासी आयुष्यक्रमाला येथपासून सुरुवात झाली असे म्हणावयास हरकत नाही. महाराजांनी आपल्या आयुष्यात अनेक दूरदूरच्या प्रदेशांना भेटी दिल्या आणि त्यांना जे जे नवीन व चांगले आढळले त्याचा समावेश त्यांनी आपल्या संस्थानच्या गरजेप्रमाणे केला.

महाराज बडोद्यास परत आल्यावर प्रजाजनांनी त्यांना मिळालेल्या किताबाबद्दल त्यांचा थाटाने सत्कार केला. याचवर्षी मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांनी बडोद्यास मे महिन्यात भेट दिली.

यावर्षी एक गोष्ट मात्र दुःखदायक घडली. ती म्हणजे महाराजांचे पूर्वाश्रमीचे वडील श्रीमंत काशीराव ऊर्फ बाबासाहेब गायकवाड यांच्या मृत्यूची ! **ते तारीख २६ जुलै रोजी बडोदे मुक्कामी वारले. त्यांची छत्री विश्वामित्री नदीच्या काठी आजही पाहावयास सापडते.**

अशा तऱ्हेने शिक्षणक्रमात मधून मधून खंड पडूनही महाराजांची शिक्षणात झपाट्याने प्रगती होऊ लागली. त्या वेळीही ते उद्योगी व दृढनिश्चयी होते. या दोन गुणांचा प्रत्यय पुढे त्यांच्या आयुष्यात लोकांना आला. दीर्घोद्योग, सतत प्रयत्न, सतत सद्विचार यांनी मनुष्यात केवढा मोठा बदल होऊ शकतो, याचे सयाजीराव महाराज हे उत्तम उदाहरण होय. डोंगराकडून निघणाऱ्या नदीच्या प्रवाहआड कितीही दुस्तर खडक आले तरी नदी आपला मार्ग समुद्राला नेऊन मिळवितेच. मनुष्याच्या प्रयत्नांचे झाले तरी असेच आहे. त्यांचा उगम वाह्यतः कठीण अशा मस्तकात होऊन नंतर जगाच्या धकाधकीच्या माध्यमातून त्यांना आपला मार्ग काढावा लागतो. असे झाले की, शेवटी प्रयत्न आणि यश किंवा सिद्धी यांची गाठ पडते.

श्रीमंत महाराजांनी शिक्षणाच्या बाबतीत मनाशी 'अंतःकरणपूर्वक प्रयत्न करावयाचा' अशी खूणगाठ बांधली असावी असे वाटते. कारण १८७७ साली त्यांना शिकविल्या जाणाऱ्या विषयात वाढ करण्यात आली. भाषा विषयाच्या जोडीला हिंदुस्थान व इंग्लंडचा इतिहास त्यांना शिकावा लागला. त्याचप्रमाणे पुढे भूगोल, पोलिटिकल इकॉनॉमी सारखे विषयही त्यांच्या अभ्यासक्रमात घुसले. अशा स्थितीत इतर एखाद्या कच्च्या शिष्याची त्रेधा उडाली असती आणि त्याप्रमाणे महाराजांच्या बरोबर शिकत असलेल्या संपतराव, दादासाहेब वगैरे विद्यार्थ्यांची खरीच त्रैधा उडाली असती आणि त्याप्रमाणे महाराजांच्याबरोबर शिकत असलेल्या संपतराव, दादासाहेब वगैरे विद्यार्थ्यांची खरीच त्रैधा उडाली. याही शिक्षणक्रमाला महाराजांनी धैर्याने तोंड दिले व आपली प्रगती चालू ठेवली. राजवाड्यात ते स्वतःच खूप वाचीत किंवा मदतीला म्हणून केशवराव पंडित, भाऊ मास्तर वगैरे मंडळींना बोलावीत. यामुळे कितीही मोठा अभ्यास असला तरी ते संपविल्याखेरीज ते राहत नसत. त्यांच्याबरोबर अभ्यास करण्याकरिता दुसरी नवीन मुले ठेवण्यात आली; पण याही मुलांना महाराजांच्याबरोबर टिकाव धरता आला नाही. त्यामुळे शेवटी बरेचसे विषय त्यांना एकट्यालाच शिकावे लागू लागले.

ज्याप्रमाणे महाराजांचे अभ्यासाकडे लक्ष होते, त्याचप्रमाणे व्यायाम व इतर देशी-विदेशी खेळांकडेही होते. तलवार व दांडपट्टा फिरविणे, कवायत करणे, पोहणे वगैरेंसारखे मर्दानी व्यायाम ते घेत. दर पंधरा दिवसांनी सर्व मंडळी शिकारीलाही जात. या सर्व व्यायाम प्रकारांमुळे त्यांची प्रकृती चांगली राहू लागली व त्यांचे शरीर अधिकाधिक घाटदार, सरस व सकस बनू लागले.

महाराजांच्या आयुष्यातील या शिक्षणाच्या काळाविषयी लिहीत असताना ज्या व्यक्तींनी त्यांच्या शीलाला व आयुष्याला वळण लाविले त्यांच्याविषयी चार शब्द लिहिणे अप्रस्तुत होणार नाही. त्या व्यक्ती म्हणजे महाराणी जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव व मि. इलियट होत. कुशल बागवानाने एखाद्या रोपाचे कलम करून नंतर ते जमिनीत लावावे आणि मग त्याच्याभोवती आळे करून नंतर त्याला नित्यनेमाने खतपाणी घालून त्याला कीड लागत नाहीना ते पाहावे, त्याची वाढ चांगली होते आहे किंवा नाही ते पाहावे, त्याप्रमाणे जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव व इलियट ही मंडळी दत्तक घेतलेल्या मुलाकडे बघू लागली. मल्हारराव महाराजांची अपकीर्तीकारक कारकीर्द नुकतीच संपली होती. पुन्हा त्याचीच उजळणी होऊ नये, असे जमनाबाई साहेबांना वाटत असणे अगदी स्वाभाविक आहे. म्हणून त्या विशेष दक्षतेने महाराजांच्या हालचालींकडे राजवाड्यात बघत. त्या स्वतः उच्च मराठी कुलांत जन्मल्या होत्या. त्यामुळे त्यांचा स्वतःचा स्वभाव अत्यंत उमदा व उदात्त होता. या त्यांच्या स्वभावाचे प्रतिबिंब महाराजांच्या स्वभावातही पडलेले दिसते. लहानपणी मुलांवर स्त्रियांकडून जेवढे चांगले संस्कार होऊ शकतात, तेवढे पुरुषांकडून होऊ शकत नाहीत. स्त्रिया जात्याच स्वभावाने मायाळू व प्रेमळ असतात. त्यांच्या प्रेमळपणामुळे त्या कोणतेही काम आपल्या बाल शिष्याकडून करवून घेऊ शकतात. जमनाबाईसाहेबांनी एक प्रकारे जरा कडकच दृष्टी महाराजांवर ठेवली होती; पण त्यांच्या स्वतःच्या वागण्यातील सौजन्यामुळे हा कडकपणा महाराजांच्या लक्षात कधीच आला नाही.

महाराणी जमनाबाई साहेबांप्रमाणे महाराजांच्या आयुष्याला वळण लावणारी दुसरी व्यक्ती म्हणजे सर टी. माधवराव. सर टी. माधवराव महाराजांचे राजकीय गुरूच होत. महाराजांची राजकारण व राजकाराणाविषयी मते विशिष्ट प्रकारची बनविण्याचे बरेचसे श्रेय सर टी. माधवराव यांनाच द्यावे लागेल. सर टी. माधवराव यांचा जन्म इ. स. १८२८ मध्ये तंजावर येथे झाला. ते चांगले विद्वान असून, मद्रास युनिव्हर्सिटीत ते काही वर्षे प्रोफेसर म्हणून काम करीत होते. पुढे त्रावणकोर संस्थानचे ते चौदा वर्षे दिवाण होते. मल्हारावांच्या राज्यकारभाराविषयी चौकशी सुरू असताना, निमसरकारी चौकशी करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. हे काम त्यांनी चांगले केल्यामुळे हिंदुस्थान सरकारची त्यांच्यावर दृष्टी होतीच. अशा सर्व गोष्टींमुळे मल्हारावांना जाहीररीत्या पदच्युत केल्यावर सरकारने सर टी. माधवराव यांची बडोद्याच्या दिवाणाच्या जागी नेमणूक केली आणि सर टी. माधवरावही तातडीने आपल्या कामावर रुजू झाले. महाराणी जमनाबाईसाहेब ज्या दिवशी पुण्याहून परत बडोद्यास आल्या त्याच सुमारास सर टी. माधवरावही बडोद्यास आले.

सर टी. माधवराव यांचे शील उत्तम व चारित्र्य सोज्वळ होते. विद्येचे व अनुभवाचे त्यांच्यावर फार चांगले संस्कार झाले होते. एका संस्थानची त्यांनी चौदा वर्षे दिवाणगिरी केली होती व एका युनिव्हर्सिटीत काही वर्षे ते प्राध्यापक म्हणून होते. अशा तऱ्हेने उत्तम राज्यकारभाराची व उत्तम शिक्षकाची जोड त्यांच्या ठिकाणी जमली होती. त्यामुळे महाराजांना त्यांचा या दुहेरी नात्याचा फार उपयोग झाला. सर्वात विशेष आनंदाची व नमूद करून ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही की, सयाजीराव महाराजांना शिकविण्यास त्यांना विशेष उत्साह व अभिमान वाटे आणि असे होणे साहजिक आहे. एका मोठ्या संस्थानाचा अधिपती त्यांना शिष्य म्हणून लाभला होता आणि आपण निरलसपणे त्याला योग्य मार्गावर आणून न ठेवल्यास परिस्थिती भयंकर ओढवेल अशी त्यांना मनातून भिती वाटत होती. कर्तृत्त्वान मनुष्याला अशा परिस्थितीत नेहमीच आनंद वाटतो. ज्या परिस्थितीत आपले गुण कसाला लागतील ती त्याला आवडते. उत्तम पोहणाऱ्याला ज्याप्रमाणे जेवढे खोल अथांग पाणी असेल तेवढा अधिकच आनंद वाटतो, त्याप्रमाणे कर्तृत्त्वान मनुष्याला बिकट परिस्थिती पाहून अधिकच उत्साह वाटतो. सर माधवराव यांचे राष्ट्रीय अंतःकरण अधिक प्रफुल्ल होण्याचे कारण एका देशी संस्थानाची प्रगती करण्याचे सद्‌भाग्य त्यांना लाभले होते. या व अशाच प्रकारच्या कारण परंपरेमुळे त्यांना आपले काम अतिशय आवडले. याचा परिणाम असा झाला की, श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या मनावर त्यांचा जितका ठसा उमटला तितका पुढे कोणाचाही कधीही उमटला नाही. इतर लोकांच्या विद्वत्तेने व बहुश्रुतपणाने महाराज काही काळ त्यांच्याकडे जरी आकर्षिले गेले तरी त्या आकर्षणाला सर टी. माधवराव यांनी महाराजांच्या अंतःकरणावर पाडलेल्या ठशाची सर कधीही येणार नाही.

सर टी. माधवरावांप्रमाणेच मि. इलियट यांनाही सयाजीराव महाराज यांच्या शील संवर्धनाच्या यशाचा काही वाटा द्यावयाला हवा. हे इंग्रज गृहस्थ स्वभावाने शांत व मयाळू होते. आपल्या समोरील जबाबदारीची त्यांना यथार्थ कल्पना होती. प्रथम जेव्हा ते बडोद्याला आले तेव्हा आपला विद्यार्थी अगदी प्राथमिक अवस्थेत असलेला त्यांना आढळला; पण त्या विद्यार्थ्याच्या

अंगी उद्योग करण्याची आस्था फार आहे हेही त्यांनी ओळखिले. महाराजांच्या उद्योगप्रियतेवर खूष होऊनच त्यांनी त्यांचे गुरूपद स्वीकारले. पुढे त्यांना लवकरच असे कळून आले की, आपले परिश्रम मुळीच वाया जाणार नाहीत. पुढे पुढे तर इलियट यांना आपल्या शिष्याविषयी इतका अभिमान वाटू लागला की, 'त्यांच्या ठिकाणी दोष ठेवायला मला कधीही जागा सापडली नाही. इतका चांगला व प्रेमळ विद्यार्थी क्वचितच पाहायला सापडेल', अशा प्रकारचे धन्योद्‌गार त्यांनी आपल्या शिष्याविषयी १८८० मध्ये काढले.

अशा तऱ्हेने या तीन गुरूंच्या देखरेखीखाली सयाजीराव महाराज यांचा शिक्षणक्रम सुरू झाला. कै. सयाजीराव यांना जे मोठेपण प्राप्त झाले होते त्याचा वाटा या तीन गुरूंकडे जातो, असे आम्हाला म्हणावयाचे नाही. महाराजांच्या ठिकाणी उपजतच बरेच चांगले गुण होते आणि म्हणूनच ते मोठ्या पदवीला पोहोचू शकले. केवळ आपल्या गुरूंमुळे ते चांगले झाले असे म्हणावे, तर इतर शिष्यांवर याच गुरूंचा फारच थोडा प्रभाव पडलेला दिसतो. गुरू हा नेहमी त्याला जे सांगावयाचे असते ते तो हुशार तसेच जड विद्यार्थ्याला सारखेच सांगतो; पण शिष्याच्या ठिकाणी असलेल्या नैसर्गिक गुणांवर गुरूंच्या शिकवणीचे यश किंवा अपयश अवलंबून असते. येथे चांगल्या बीजाचाच प्रश्न असतो हे जरी खरे असले, तरी गुरूंचा प्रभाव म्हणून काही असतोच असतो. गुरूंच्या वाणीचा, गुरूंच्या आचरणाचा शिष्याच्या कोवळ्या मनावर जेवढा परिणाम होईल तितका दुसऱ्या कशानेही होत नाही. शिष्याच्या ठिकाणी निसर्गदत्त बुद्धी तर हवीच; पण त्या बुद्धीची जोपासना व वाढ योग्य दिशेने करावयाला सदगुरूची नेहमीच जरूरी असते आणि याच दृष्टीने पुन्हा एक वेळ आम्ही असे म्हणतो की, महाराणी जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव व इलियट यांचा उपयोग महाराजांच्या शीलसंवर्धनाकडे व बुद्धीच्या वाढीकडे फार फार झाला.

इ. स. १८८० च्या सुमारास महाराजांच्या आयुष्यात एक महत्त्वाचा बदल घडून आला. तो म्हणजे त्यांच्या लग्नासंबंधीचा होय. त्यावेळी महाराजांचे वय १७ वर्षांचे असेल. इतक्या लहान वयात लग्न करण्याची कल्पना आपणाला हास्यास्पद वाटते; पण त्यावेळी तसे मानले जात नसे.

महाराजांच्या या लग्नाविषयी आपण पुढे विचार करू. तूर्त त्याचा ओझरता उल्लेख केलेला बरा; पण या वयात त्यांचे शिक्षण चालू असताना स्वतः त्यांना त्याविषयी एकंदर आपल्या परिस्थितीविषयी काय वाटत असेल हे पाहणे मनोरंजक व अगत्याचे होईल. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांची कवळाणे येथून उचलबांगडी करून बडोद्याच्या गादीवर स्थापना करण्यात आली. साधे गोपाळराव होते त्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज बनले. कवळाणे येथील स्वतंत्र, स्वच्छंदी, मोकळे वातावरण बडोद्यात कुठले लाभावयाला? मोकळ्या मनाने माळरानावर कवळाण्यास भटकावयाला सापडत असे; पण बडोद्यात ते सुख कुठले ! कवळाण्यास लहानपणच्या गुजगोष्टी सांगावयाला सवंगडी होते. बडोद्यास कुठले ते दिसायला? आणि येऊ तरी कोण देणार त्यांना? बडोद्यात ऐश्वर्य होते, मानसन्मान होता, मोठेपण होते; पण या सर्वांना कवळाणे येथील विशिष्ट स्वातंत्र्याची सर कशी येणार? त्या काळी महाराजांना आपले आयुष्य एकाकी वाटल्यास नवल

नाही. त्यांचे बडोद्यात कोणी मित्र नव्हते. आपण महाराज आहोत हे कधी त्यांना विसरता येत नसे व कोणी त्यांना विसरूही देत नसत. त्यांच्या आजूबाजूला फिरणारी मंडळी कमी शिकलेली, कमी पगार असलेली व बंदीजनाप्रमाणे असत. ही मंडळी नेहमी 'महाराज, महाराज' करण्यात गुंतलेली असत.

ही परिस्थिती शेवटपर्यंत कमी-अधिक प्रमाणात चालत राहिली. स्वतः महाराजांना आपले महाराजपण विसरायला हवे असे; पण भोवतालची मंडळी त्यांना या उपाधीपासून मोकळेच होऊ देत नसत. याचा परिणाम असा होई की, महाराजांना बडोद्यात असताना पाहिजे तितका मनाचा मोकळेपणा लाभत नसे. खाजगी आयुष्य जणू काही त्यांना नाहीच, असे त्यांच्या भोवतालच्या व्यापावरून वाटते.

महाराजांच्या लग्नानंतर त्यांचा अभ्यासक्रम पुन्हा पूर्वीसारखाच सुरू झाला. या अभ्यासक्रमाला एकाएकी फारच निराळे स्वरूप प्राप्त झाले. महाराजांना आता १८ वे वर्षे लागले होते आणि त्यांची बाल्यावस्था लवकर संपणार होती. राज्याचा भार त्यांच्यावर टाकून त्यांनी तो व्यवस्थितपणे पार पाडावा, अशी इच्छा हिंदुस्थान सरकारची होती. त्या वेळचे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांच्या मते हे काम जितक्या लवकर होईल तितके बरे. त्यामुळे इतर काही मंडळींकडून विरोध होऊनही त्यांनी महाराजांना अधिकार देण्याची तारीख २८ डिसेंबर १८८१ ही ठरविली.

ही तारीख नक्की ठरल्यानंतर स्वाभाविकपणे महाराजांकडून होत असलेल्या भाषा-इतिहासादिकांचा अभ्यास शक्य तितक्या तातडीने उरकण्याचे ठरले. सर टी. माधवराव यांच्या मते महाराजांना त्यांच्यावर लवकरच येऊन पडणाऱ्या जबाबदारीतून कुशलपणे मार्ग जेणेकरून काढता येईल अशा प्रकारच्या शिक्षणाची फार फार जरूरत होती. इतर काही विषय महाराज नाही शिकले तरी चालेल; पण राज्यकारभार सुयंत्रितपणे चालविण्यात मदत करणाऱ्या शिक्षणाची त्यांना जरूरत आहे, असे सर टी. माधवराव यांना वाटले. आपण प्रजेकरिता आहोत, प्रजा आपल्याकरिता नाही, प्रजेचे कल्याण हेच खरोखर आपले कल्याण, प्रजा सुखी तर राजा सुखी, प्रजेकरिता राजाने वाटेल त्या स्वार्थावर तिलांजली द्यावयाला सिद्ध असावयाला पाहिजे, राजाने राज्याचा संन्यास घ्यावयाचा नाही तर आपली स्वार्थी, आपमतलबी विचारांचा. या व अशा आशयाच्या शिक्षणाची सोय लावण्यात सर टी. माधवराव गुंतले. त्यांनी एक योजना तयार केली आणि त्या योजनेप्रमाणे एका नऊ महिन्यांचा राज्यकारभारविषयक शिक्षणक्रम तयार केला.

या गोष्टीमुळे महाराजांवर मोठीच जबाबदारी येऊन पडली. आजपर्यंत चालत असलेल्या शिक्षणाला एकप्रकारे रामराम ठोकण्याची पाळी आली. भाषा, ललितकला, इतिहास, भूगोल वगैरे विषयांच्या शिक्षणाचा लौकिक दृष्ट्या शेवट झाला. महाराजांना स्वतःला ही गोष्ट फारशी संमत नव्हती. आणखी तीन वर्षे शिकायला सापडले असते तर फार चांगले झाले असते, असे त्यांना वाटे. किंबहुना त्यांचे शिक्षण शेवटपर्यंत चालूच राहिले, असे म्हणायला हरकत नाही. नवीन नवीन विषय ते नेहमी शिकतच असत. बडोदा कॉलेजातील एक प्राध्यापक डॉ. फाटक यांच्याजवळ बॉटनीसारखा विषय वयाची पाऊणशे वर्षे झाली असताना ते शिकले. सांगण्याचा

भावार्थ इतकाच की, तेव्हा जो केवळ शिक्षणाचा क्रम चालला होता तसाच आणखी काही वर्षे चालला, तर त्यापासून महाराजांना खूप फायदा झाला असता. मागाहून मोठ्या वयात काही शिकता येत नाही असे नाही. किंबहुना आपण आमरण विद्यार्थिदशेतच असतो, निदान असावयास हवे; पण मोठ्या वयात अडचण उत्पन्न होते ती एकाग्रतेच्या व वेळेच्या अभावाची. आणखी काही वर्षे शिकायला सापडले नाही, याबद्दल महाराजांना जे वाईट वाटे ते याच दृष्टीने.

ते कसेही असले तरी आलेल्या परिस्थितीत त्यांचा चालू असलेल्या शिक्षणाचा शेवट झाला आणि नऊ महिन्यांपर्यंत त्यांना राज्यकारभारविषयक शिक्षण घ्यावे लागले. हा शिक्षणक्रम किती विविध स्वरूपाचा होता हे खाली दिलेल्या हकीकतीवरून कळेल.

सर टी. माधवराव यांनी राज्यशास्त्राविषयी व राजांनी कसे वागावे याविषयी तेवीस व्याख्याने द्यावयाची. काझी शहाबुद्दीन यांनी जमीन महसुलाविषयी सत्तावीस व्याख्याने द्यावयाची. सर न्यायाधीश करसेटजी जमशेटजी यांनी आठ व्याख्यानांत न्यायाची सामान्य तत्त्वे समजावून सांगावयाची. हायकोर्ट न्यायाधीश रा. गाडगीळ यांनी हिंदू व्यवहार धर्मशास्त्राविषयी सात व्याख्यानांत माहिती सांगावयाची. रा. कीर्तने यांनी पोलिस खात्यासंबंधी माहिती सहा व्याख्यानांत करून द्यावयाची. लष्कारासंबंधी व जमिनीच्या तंट्यांसंबंधीची माहिती पेस्तनजी जहांगीर यांनी नऊ व्याख्यानांत करून द्यावयाची.

अशा तऱ्हेने ही व्याख्यानमाला जुळविण्यात आली होती. या सर्व व्याख्यानांत सर टी. माधवराव यांची व्याख्याने अत्यंत सरस झाली, असें इलियटसारखा विद्वानही म्हणतो. ही व्याख्याने माहितीने भरलेली, मनोरंजक व खऱ्या जिव्हाळ्याने दिली जात असल्याने ती चांगली झाली असल्यास नवल नाही. या व्याख्यानांचा सारांश 'मायनर हिंट्स' नावाच्या पुस्तकात ग्रंथित करण्यात आला आहे. सर टी. माधवराव म्हणतात, ''कोणत्याही राजाने इतके श्रम करू नयेत की, ज्यामुळे त्यांच्या प्रकृतीला त्रास होईल. उत्तम दिवाणाची बडोद्यासारख्या संस्थानाला तर अत्यंत जरूरी आहे. बडोदे संस्थानाकडे जितके सरकारचे व लोकांचे लक्ष आहे तितके कोणत्याही संस्थानाकडे नाही. सार्वभौम सत्तेला नेहमी मान देऊन वागले पाहिजे. संस्थान व हिंदुस्थान सरकार यात झालेल्या अटी दक्षतेने पाळल्या जाव्यात. परसंस्थान व परसत्तेच्या वकिलांना आपल्या संस्थानात येऊ देऊ नये. देशी संस्थानांचे तंटे ब्रिटिश सरकारकडे निवाड्याकरिता सोपवावे. हिंदुस्थान सरकारचा सल्ला, विशेषतः व्हाइसरॉय यांचा सल्ला, नेहमी प्रसंगविशेषी घ्यावा.''

बाकीच्या व्याख्यात्यांनी आपली व्याख्याने दिली; पण त्यात विषय प्रतिपादनापेक्षा स्वतःची बुद्धिमत्ता दखविण्याचा प्रयत्न विशेष झाला. बाल महाराजांच्या मनावर आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न या लोकांकडून झाला. सर टी. माधवराव यांनी अंतःकरणापासून व कळकळीने आपला विषय समजावून दिला. या दोन प्रकारच्या व्याख्यानांनी महाराजांची खूप करमणूक झाली असेल, असे आम्हाला वाटते; पण त्यावेळी मात्र त्यांना शक्य तितके लक्ष लावून आपले विषय शिकावे लागले. ते विषय त्यावेळी चांगले समजले असतील असे समजण्याचे मुळीच कारण नाही. आपल्यावर लवकरच काही तरी मोठी जबाबदारी येऊन पडणार, एवढेच त्यावेळी त्यांना व्याख्याने

ऐकून वाटले असेल. आपल्याकडून त्यांनी ही व्याख्याने पचविण्याचा खूप प्रयत्न केला. ऐकलेल्या व्याख्यानांच्या टिप्पण्या (नोटस्) काढाव्यात, वेळ मिळेल तेव्हा त्यांचे मनन करावे आणि अशा तऱ्हेने निरनिराळे विषय आत्मसात करावेत, असा त्यांचा प्रयत्न चालूच होता. व्याख्यानांचा क्रम संपला आणि आजूबाजूच्या जबाबदार मंडळींना असे वाटू लागले की, राज्यधुरा आपल्या अंगावर वाहावयाला आता महाराज समर्थ झाले आहेत. आता त्यांनीच आपल्या राज्यशकट चालवावा हे योग्य.

●●●

४.
अधिकार प्राप्ती

राज्य चालविण्याकरिता उपयुक्त अशा शिक्षणाच्या समाप्तीनंतर इ. स. १८८१ च्या डिसेंबर महिन्यात महाराजांना अधिकार देण्याचा समारंभ साजरा करण्यात आला. या उत्सवाला सुरुवात ता. २४ डिसेंबरपासून होऊन प्रत्यक्ष अधिकार देण्याचा विधी ता. २८ डिसेंबर रोजी मोठ्या थाटामाटाने उरकण्यात आला. याकरिता नजरबाग आठवाड्यात एक मोठा शामियाना उभारण्यात आला होता व त्यात अधिकारदानाचा विधी अपूर्व उत्साहाने पार पाडण्यात आला. व्हाइसरॉय स्वतः येऊ न शकल्याने त्यांच्या वतीने मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे हजर होते. सर जेम्स फर्ग्युसन यांनी महाराजांना राज्याची वस्त्रे अर्पण केली. त्यांना गादीवर बसविले व स्वायत्त महाराज म्हणून जाहीर केले.

त्यावेळी सर जेम्स यांनी केलेले भाषण फारच चांगले झाले. त्यात उपयुक्त असा उपदेश केला होता. सर जेम्स यांनी महाराजांना अत्यंत यशस्वी व सुखी आयुष्य लाभेल, असे भविष्य वर्तविले; पण ते भविष्य घडवून आणण्याची जबाबदारी त्यांनी महाराजांवर टाकली. असा एक काळ इतिहासात होऊन गेला (आणि अजूनही काही काही देशांत तीच स्थिती आढळते) की, त्यावेळी राजे लोक आपले राज्य व आपली प्रजा यावर अनियंत्रित सत्ता चालवू शकत असत. राज्य आणि प्रजा या दोन उपभोग्य वस्तू आहेत, असे त्या काळात राजांना वाटे. आता हा काळ बदलला आहे. राजा आणि राज्य यांचा उपयोग व कार्य अगदी निराळी व उच्च प्रकारची आहेत. राजाने प्रजाहीत आपल्या नजरेसमोर सतत ठेविले, प्रजेकरिता वाटेल तो स्वार्थत्याग करावयाला तो प्रवृत्त झाला, तर त्याचे फळ त्याला मिळाल्यावाचून कधीच राहत नाही. प्रजेचे प्रेम त्याच्यावर बसते आणि जगात ज्या राजावर त्याच्या प्रजेचे प्रेम असेल त्या राजासारखा सुखी मनुष्य नाही, असेच म्हटले पाहिजे.

सर जेम्स यांचे वरील आशयाचे भाषण झाल्यावर महाराजांनी त्यांना उत्तर दिले. त्यात त्यांनी ब्रिटिश सरकारने आपणाला व आपल्या संस्थानाला मदत केल्याबद्दल त्यांचे आभार

मानले. मि. मेलव्हिल, सर रिचर्ड मीड व सर टी. माधवराव यांचा उल्लेख करून महाराजांनी त्या त्या लोकांचे आभार मानले. त्याचप्रमाणे महाराज्ञी व्हिक्टोरिया यांच्या ठिकाणी आपण निष्ठा ठेवू व आपल्या प्रजेच्या कल्याणाकरिता सतत झटू असे त्यांनी आश्वासन दिले.

अशाप्रसंगी केली जाणारी भाषणे ही पुष्कळ वेळा शुष्क, दिखाऊ व डामडौलाची असतात. त्यात भाषेची सजावट असते; पण अंतःकरणाचा उमाळा नसतो. महाराजांच्या किंवा सर जेम्स यांच्या भाषणाविषयी मात्र असे म्हणता येणार नाही. सर जेम्स यांचा उपदेश कळकळीचा होता. सदिच्छा प्रदर्शन अंतःकरणपूर्वक होते. महाराज हे ज्याप्रमाणे बोलले त्याप्रमाणे वागले, असे त्यांच्या चरित्रावरून वाटते. चौसष्ट वर्षांच्या त्यांच्या दीर्घ कारकीर्दीकडे पाहिले असता तीत प्रजाहीत दक्षता ही एक गोष्ट प्रामुख्याने आढळते. लोकांचे कल्याण त्यांच्या सतत नजरेसमोर असलेले स्पष्ट दिसते.

अशा तऱ्हेने अठरा वर्षांचे महाराज खरोखरीचे राज्यकर्ते बनले. अधिकार दानाच्या समारंभानंतर महाराजांना रेसिडेन्सीत नेण्यात आले व तेथे त्यांना असे सांगण्यात आले की, आणखी दोन वर्षे कित्येक बाबतीत आपणाला पूर्ण स्वातंत्र्य आहे, असे आपण मानू नये. या म्हणण्याचा त्यावेळी त्यांना फारसा बोध झाला नाही; पण ब्रिटिश सरकारच्या इच्छेबाहेर न जाण्याचे त्यांनी कबूल केले. दोन वर्षांनंतर पुन्हा पूर्वीप्रमाणेच सर्व व्यवस्था ठेवण्याविषयी त्यांना सांगण्यात आले. ही बाब म्हणजे बडोदे येथील लष्करांसंबंधीची होय. आपले लष्कर चांगले ठेवा असे एकीकडून सांगत असताना दुसरीकडून तसा प्रयत्न करू न देण्याचे कोडे शेवटपर्यंत नीटपणे महाराजांना उलगडले नाही; पण हे कोडे स्पष्टपणे न उलगडताही, उलगडल्या गेल्यासारखे नाही काय? हिंदुस्थानातील देशी संस्थाने म्हणजे जुन्या वेळची शक्ती निर्माण करण्याची स्थाने होती. त्यांच्यावर दाब ठेवणे ब्रिटिश सरकारला आपल्या हिताच्या दृष्टीने आवश्यक वाटणे अगदी स्वाभाविक आहे; पण त्यावेळी महाराजांच्या मनात असे काही विचार आले असणे शक्य नाही. त्यांचे मन आपल्यावर नवीन येऊन पडलेल्या जबाबदारीत गुंतले होते. राज्यशास्त्राविषयी त्यांनी जी तत्त्वे आपल्या गुरूजवळ पठण केली होती ती अमलात कशी उतरता येतील या विचारात ते होते.

सुदैवाने एक गोष्ट अनुकूल होती. श्रीमंत सयाजीराव महाराज यांना राज्याची धुरा जी अंगावर घ्यावी लागली ती बरीचशी चांगल्या स्थितीत. मागे दुसऱ्या प्रकरणात मल्हारराव शाहीचे जे वर्णन आले आहे, तशा स्थितीत जर महाराजांच्या अंगावर राज्यकारभाराची जबाबदारी येऊन पडली तर मोठी कठीण स्थिती निर्माण झाली असती. इ. स. १८७५ साली बडोद्याची स्थिती आंतबट्ट्याची होती. मल्हाररावांनी आपल्या सरदार, सावकार व लष्करातील लोकांना पैसे देण्याऐवजी सरकारी वसुलाचा बराचसा भाग आपल्या खुशालचेंडू मित्रांना देण्याचा परिपाठ ठेवला होता. सरकारी दप्तराची स्थिती शोचनीय होती. राजवाड्यात काय ऐवज आहे, किती जडजवाहीर आहे याची साधी यादीही ठेवण्यात आली नव्हती. सुमारे सहा कोटी रुपयांचे जवाहीर राजवाड्यात असल्याची खात्रीलायक बातमी बाहेर असून, त्याची यादीही नसावी ही किती शोचनीय गोष्ट होय ! प्रजेवर भरमसाट कर लादण्यात आले होते आणि इतके कर घेऊनही लोकांच्या हिताच्या दृष्टीने त्यातील फारसे थोडे खर्च करण्यात येत होते. अशा स्थितीत

सर टी. माधवराव यांनी दिवाणपद स्वीकारल्यावर सुधारणा करायला सुरुवात केली. प्रथम सर माधवराव यांनी एक मध्यवर्ती सरकारची स्थापना करून त्याच्या हाताखाली सतरा मुख्य खाती निर्माण केली. या सर्वांच्यावर मुख्य दिवाण असे. दिवाणी व फौजदारी कायद्यात फेरफार करण्यात आले. खंडेराव महाराजांच्या वेळी दिवाणी व फौजदारी कायद्यांचे प्रबंध रचण्यात आले होते; पण ते अमलात आणणारी चांगली माणसे न मिळाल्याने न्यायाची पुष्कळ वेळा विटंबनाच होत असे. तेव्हा या बाबतीत प्रथम सुधारणा घडवून आणणे इष्ट होते आणि त्याप्रमाणे सर माधवरावांनी केले. जमीन महसूलाच्या (शेतसाऱ्याच्या) बाबतीतही सुधारणा करून रयतवारी पद्धती सुरू करण्यात आली. प्रत्येक शेतकऱ्याने आपला कर परस्पर सरकारात जाऊन भरावा, अशी व्यवस्था करण्यात आली. बडोदे शहरातही पुष्कळ सुधारणा करण्यात आली. शहरात पाण्याचा पुरवठा करण्याकरिता व संस्थानभर वैद्यकीय मदत देण्याकरिता योजना तयार करण्यात आली; पण या सर्वांकरिता पैसा हवा तो कोठून आणावयाचा? गमतीने बोलावयाचे तर पौराणिक काळात इच्छिलेल्या वस्तू देणाऱ्या कल्पलता व कल्पवृक्ष असत. ज्याला जे हवे असे त्याने त्याची त्या लतेजवळ किंवा वृक्षाजवळ जाऊन इच्छा करावी. त्याला ते ताबडतोब मिळे ! ती सोय आता कोठून पैदा करावयाची? पण पैदा करता आली नाही म्हणून स्वस्थ थोडेच बसायचे? सध्याच्या काळात कल्पलता व कल्पवृक्षाची बरोबरी जर कोणाला थोड्याफार अंशाने करता येत असेल तर ती आपण बचत करून संग्रह केलेल्या द्रव्याने. एवढ्याकरिता काटकसरीने वागून काही बचत करता आली तर पाहावी. या हेतूने सर माधवराव यांनी प्रयत्न सुरू केले. त्यांना पुष्कळ खर्च असे सापडले की, जे सहज कमी करता येतील. खुद्द राजवाड्यातच पुष्कळ अस्थानी व अयोग्य खर्च होई. राजाच्या राजवाड्यात कद्रूपणा काय कामाचा? राजवाडा म्हणजे राजवाडा. तिथे औदार्य, दुर्लक्ष, विपुलता यांचे साम्राज्य असावयाला पाहिजे, अशी त्यावेळच्या राजांची समजूत असे; पण या नव्या मनूत हे सर्व पालटले. मल्हारराव‌ांच्या आश्रितांच्या पगारात कपात करण्यात आली व इतर गाणारे, बजवय्ये, पहिलवान वगैरे लोकांत नवीन नेमणुका करण्याचे बंद झाले.

यानंतर बचत करायला दुसरी जागा म्हणजे दानाप्रित्यर्थ होणारा अमर्याद खर्चही होय. सरकारी उत्पन्नापैकी सुमारे १/४ उत्पन्न या दानापायी जाई ! इतक्या विलक्षण कल्पना या दानधर्मासंबंधी मल्हारराव व महाराणी जमनाबाई यांच्या होत्या. मल्हारराव एरव्ही कसेही असले तरी अत्यंत धार्मिक होते. संस्कृत भाषा, संस्कृत शास्त्री व ब्राह्मण यांच्याविषयी त्यांना परम आदर असे. त्यांच्याच अमदानीत बडोद्यात तीन-चार वेदशाळा स्थापन झाल्या होत्या. खंडेराव महाराजांप्रमाणेच त्यांच्या राज्यात पंडितांचा सत्कार होई. इतकेच नाही, तर सुमारे सात हजार हिंदू व तीन हजार मुसलमान यांना खिचडी वाटण्यात येई. बडोद्यात केदारेश्वराच्या देवळाजवळ ही खिचडी मिळण्याची व्यवस्था होती. हल्ली जेथे कीर्तिमंदिर आहे तेथे पूर्वी खिचडी घ्यायला आलेल्या लोकांची मारे झिंमड जमलेली असे. खिचडी घेतल्यावर ताबडतोब ती देऊन दुसऱ्या जिनसा विकत घेता याव्यात म्हणून व्यापाऱ्यांची दुकाने असत. अशा तऱ्हेने वर्षभर मिळत राहणाऱ्या खिचडीवर लोकांना त्यांच्या प्रपंचाला लागणाऱ्या सर्व वस्तू सहज मिळत. खिचडीखाऊ

बुभुक्षित लोक त्या वेळच्या राजांना भरल्यापोटी आशीर्वाद देत असतील यात शंका नाही. लोकांच्या मनावर खिचडीचा नकळत इतका परिणाम झालेला दिसतो की, बुभुक्षित भणंगाला बडोद्यात खिचडीखाऊ म्हणण्याचा प्रघात आहे. या खिचडीपायी सरकारचे सालीना सुमारे तीस लक्ष रुपये खर्च होत. यामुळे खरोखर लोकांची स्थिती काही फारशी सुधारत होती असे मुळीच नाही. उलट या खिचडीने ऐदी, निरुद्योगी, खुशालचेंडू लोकच फार निर्माण केले. खिचडी घेणारे पुष्कळ वेळा चांगले प्रतिष्ठित असत आणि अशा लोकांना रोज खिचडी घ्यायला न जाता एकदम आठ दिवसांची खिचडी मिळू शकत असे. चांगलीच सोय होती म्हणावयाची ! प्रतिष्ठित म्हणून घरी बसावे व खिचडीचे सेवन करावे !

अर्थात, हे सर्व होत होते ते त्या त्या राजाच्या दृष्टीने चांगल्या हेतूनेच होत होते. पारमार्थिक कल्याण आपण जोडीत आहोत अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती आणि त्या कल्पनेप्रमाणे ते हा धर्ममार्ग अवलंबीत होते. आपल्या धर्मकल्पना वेगळ्या प्रकारच्या असतात व आहेत. यामुळे सर टी. माधवराव यांना या बाबतीत एकदम काही बदल करता येईना. विशेष अडचणीची गोष्ट म्हणजे स्वतः जमनाबाईसाहेब याच अशा प्रकारच्या दानधर्माला सर्वस्वी अनुकूल होत्या. त्यांच्या अमदानीत तर ब्राह्मणांना इच्छा भोजने मिळत. त्यामुळे तात्पुरती सुधारणा म्हणून सर माधवराव यांनी मुसलमानांना जो फुकट खाना मिळे तो १८७९ साली अजिबात नाहीसा करून राजवाड्यातील खर्चीत दहा हजार रुपयांची बचत केली.

अशा तऱ्हेने निरनिराळ्या खात्यांत काटकसर व सुधारणा करून सर टी. माधवराव यांनी महाराजांच्या हाती जेव्हा राज्यसूत्रे दिली तेव्हा बडोद्यात राज्यकारभाराला पूर्ण नसली तरी बरीच स्थिरता प्राप्त झाली होती यात शंका नाही. महाराजांनी जेव्हा राज्यकारभार आपल्या हाती घेतला, तेव्हा जुनी कर्ज फेड व्यवस्थित करूनही संस्थानच्या तिजोरीत दीड कोटी रुपये शिल्लक असलेले त्यांना आढळले. अर्थात, हा सर्व सर टी. माधवराव यांचाच प्रताप. त्यांच्याच अमदानीत बांधकाम खात्याची चांगल्या पायावर पुन्हा उभारणी करण्यात आली. देशी शाळा खात्याची स्थापना, बडोदा कॉलेजची स्थापना, वैद्यकीय खात्याची स्थापन वगैरे सुधारणाही याच वेळी झाल्या. सर. टी. माधवराव यांनी बडोदे संस्थानात दिवाण या नात्याने केलेल्या कामगिरीकडे लक्ष देऊनच सरकारने त्यांना 'राजा' ही मानाची पदवी इ. स. १८७७ मध्ये बहाल केली.

●●●

५.

राज्यकारभार

सर. टी. माधवराव यांनी बडोद्याच्या राज्यकारभारात बरीच महत्त्वाची प्राथमिक तयारी करून महाराजांच्या हातात राज्यसूत्रे कशी दिली हे आपण पाहिले. यानंतर राज्यकारभाराचा सारा भार महाराजांनाच वाहावा लागला. त्यावेळेपासून महाराजांच्या मनात वेगवेगळ्या सुधारणा करण्याचे फार होते व ते शेवटपर्यंत राहिले. त्यांनी आपल्या ६४ वर्षांच्या कारकीर्दीत सुधारणा इतक्या मोठ्या व इतक्या सरस घडवून आणल्या की, याच्यापुढे त्यांच्यापेक्षा जास्त सुधारणा क्वचितच कोणाला करता येतील. तरीपण स्वतः महाराजांना आपण केल्या त्यापेक्षा जास्त गोष्टी करू शकलो असतो असे नेहमी वाटे.

त्यांना अशा प्रकारच्या स्थितीत राज्यकारभार हाती घ्यावा लागला की, ज्यावेळी प्रत्येक लहान सहान गोष्टीतही लक्ष द्यावे लागे. त्यांना किती क्षुद्र गोष्टीत मन घालावे लागे याविषयी गमतीची पण घडलेली उदाहरणे प्रसिद्ध आहेत. १८८२ साली एके प्रसंगी ते हत्तीवर बसून रेसिडेन्सीत रात्रीचे गेले असतांना ८ आणे किमतीच्या मेणबत्त्या खर्च झाल्या. दुसऱ्या दिवशी हे ८ आणि मंजूर करण्याविषयी त्यांना विनंती करण्यात आली ! १८८५ साली एका गावातील शाळेकरिता ४ रुपये भाड्याचे घर ठरवावयाचे होते त्याकरिता श्रीमंताच्या परवानगीची जरूरी भासली ! दाराची कडी निघाली म्हणून त्याकरिता किंवा एखादी सतरंजी फाटली म्हणून ती नवी विकत आणण्याकरिता नोकर मंडळी त्यांची परवानगी घेत !

या अशा क्षुल्लक गोष्टीत आपल्या आयुष्याचा बराच काळ फुकट गेल्याबद्दल महाराजांना वाईट वाटे. हा काळ त्यांना चांगल्या कामी सहज उपयोगात आणता आला असता; पण आजूबाजूची अधिकारी मंडळी आपल्या अंगावर जबाबदारी घ्यायला तयार नव्हती. सर्व गोष्टी ते महाराजांच्या निर्णयावर सोपवीत. ही स्थिती अत्यंत अनुचित होय यात शंका नाही. पुढे महाराजांनी यात बदल करण्याकरिता इतके प्रयत्न केले की, नंतर त्यांना असल्या क्षुल्लक गोष्टीकडे मुळीच लक्ष द्यावे लागत नसे. राज्यकारभारात निरनिराळी खाती निर्माण करण्यात

आली व त्या त्या खात्यात असलेल्या अधिकाऱ्यांना अमूक बाबतीत पूर्ण अधिकार देण्यात आले. अमूक रकमेच्या खर्चापर्यंत त्या अधिकाऱ्याने आपली बुद्धी चालवून खुशाल खर्च करावा, असे ठरविण्यात आले. अर्थात, वर तपासणीखाते असल्याने या अधिकाराचा दुरुपयोग सहसा होणे शक्य नव्हते. कामाची विभागणी करण्याकरिता अधिकाराची विभागणी करणे आवश्यक असते, हे तत्त्व महाराजांना पूर्णपणे मान्य होते. त्यांनी आपल्या राज्यात अशी अधिकाराची विभागणी (अधिकार-पत्रके) सर्वत्र केलेली दिसे. प्रत्येक खात्याच्या वर असलेल्या अधिकाऱ्याला विशिष्ट अधिकार असत आणि त्याच्यावर असलेल्या दिवाणाला व कौन्सिलला त्याच्यापेक्षा जास्त अधिकार असत. यामुळे प्रत्येक मनुष्याला स्वतःच्या अधिकारात आपल्या खात्यात वेळोवेळी निरनिराळ्या सुधारणा करता येत. अमूक एका मर्यादेपर्यंत तरी आपण स्वतंत्रपणे बुद्धी चालवून एखादी नवी गोष्ट करू शकू अशी खात्री अधिकाऱ्याला असल्याने त्याला आपल्या कामात आनंद व उत्साह वाटे.

प्रत्येक गोष्टीत महाराजांना व्यवस्थितपणा फार प्रिय असे. काही नवीन नियम तयार करण्यात आल्यास त्यांची अनुक्रमणिका, वर्गवारी, उद्देशांचे कथन, कलम-पोटकलमांची व्यवस्थित रचना अ, ब, क, ड किंवा अशाच सोयिस्कर अक्षरांनी केलेले नियमाचे भाग इत्यादी गोष्टींकडे त्यांचे इतके लक्ष असे की, त्या झाल्या नाहीत तर त्यांना मुळीच समाधान वाटत नसे. नियम, ठराव, योजना, ठाकठीकपणा या गोष्टींचा त्यांना फार नाद असे. प्रत्येक योजना त्यांना विशिष्ट चौकटीत बसविल्याखेरीज बरेच वाटत असे.

अर्थात, अशा फार चौकटी तयार झाल्या की, त्या सर्वांची मिळून एक लोखंडी चौकट तयार होते. या चौकटीतून प्रसंगविशेष निसटणे मोठे कठीण काम असते. चौकटी निर्माण करण्याचा फायदा असतो, नाही असे नाही. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा दुरुपयोग होत नाही व पुष्कळ नुकसान होत असलेले वाचते; पण एखादे वेळी एखादी नवीन परिस्थिती निर्माण झाली आणि ती या चौकटीत बसत नसली म्हणजे मग एखाद्या योजनेची गळचेपी होण्याचा संभव असतो.

अशा वेळी त्या त्या अधिकाऱ्याने आपली बुद्धी (डिसक्रीशन) चालवून विवेक करावा, असे महाराजांचे म्हणणे असे. नियम हे आपल्याकरिता आहेत, आपण नियमाकरिता नाही असेच नेहमी समजावयाचे. नियमांचे पालन शक्य तितके व्हावयालाच पाहिजे; पण एखाद्या परिस्थितीत त्यात बदल करावासा वाटला तरी तो करावा, असे महाराजांना वाटे. हे त्यांचे म्हणणे पूर्णपणे संयुक्तिक आहे असे कोणालाही पटेल. हिंदूधर्मशास्त्राकडे पाहिले असता याचे प्रत्यंतर आढळते. मूळ अमूक एका परिस्थितीत धर्म नियमांची निर्मिती झाली. ते नियम श्रुती नावाच्या एका लोखंडी चौकटीत बसविण्यात आले. पुढे काळ व परिस्थिती झपाट्याने इतकी बदलू लागली की, मूळचे नियम पाळणे कठीण होऊन बसले. तेव्हा चांगल्या जाणत्या ऋषींना मूळ नियम पाळणे कठीण होऊन बसले. तेव्हा चांगल्या जाणत्या ऋषींनी मूळ नियम करणाऱ्यांची इच्छा लक्षात घेऊन पूर्वीच्या नियमांचा निराळ्या पद्धतीने अनुवाद करणाऱ्या विविध स्मृती निर्माण केल्या. या स्मृती निर्माण झाल्या याचा अर्थ मूळचे नियम वाईट होते असा नाही, तर ते आता

गैरलागू झाले असा अर्थ होय. पुढे आणखी परिस्थिती पालटली तेव्हा निरनिराळे निबंधकार निर्माण झाले व त्यांनी त्यावेळी नियमात अनुकूल फेरफार केले.

हे सर्व होऊनही नियम नको असे कोणीच कधीही म्हटले नाही. नियम हे रस्त्याप्रमाणे इच्छित स्थळी सुखकर रीतीने व लवकर नेऊन पोहोचविणारे असतात. नवीन रस्ते करावयाला किंवा जुने दुरुस्त करावयाला जसा प्रत्यवाय नाही, तसेच नवीन नियम करावयाला किंवा जुन्यात दुरुस्ती करावयाला प्रत्यवाय नसतो व नसावा. स्वतः महाराजांची या बाबतीतील विचारसरणी अत्यंत तर्कशुद्ध व समंजपणाची असे. त्यांची तक्रार उलट निराळीच होती. स्वतःची बुद्धी चालवून, पुढाकार घेऊन, हिमतीने एखादी गोष्ट करावयास आपले लोक सहसा धजत नाहीत, असे ते म्हणत. इंग्रज लोकांच्या ठिकाणी ही बुद्धी आढळते, त्यांच्या आयुष्याकडे पाहिले असताना त्यांनी स्वतः अशा प्रकारे पुढाकार घेऊन कितीतरी गोष्टी करून दाखविल्या आहेत. अर्थात, कोणी असे म्हणेल की, त्यांची परिस्थिती निराळी होती. हे म्हणणे थोडेसे खरे आहे; पण त्यामुळे आपण दोषातून मुक्त होतो असे नाही.

महाराजांनी आपल्या राज्याची परिस्थिती लक्षात घेऊन विशिष्ट प्रकारचे राज्यतंत्र निर्माण केले. ते तयार करीत असताना त्यांना कितीतरी प्रयास पडले असतील. कारण अशा प्रकारचे नियमबद्ध राज्यतंत्र संस्थानात पूर्वी तयार नव्हते. सर टी. माधवराव यांचा राज्यकारभार चांगला झाला; पण त्यांच्या अमदानीत व्यवहाराला नियमबद्धता आली नव्हती, ती नियमबद्धता महाराजांनी आणली. अमूक परिस्थितीत अमूक सरकारी नोकराने कसे वागावे, याचे शास्त्र बडोद्यात अगदी ठरून गेलेले असे. त्यामुळे कुठलाही व्यवहार व्यवस्थित होई यात शंका नाही; पण त्याच्याच बरोबर तो व्यवहार रूक्ष व पुष्कळ वेळा कंटाळवाणा होई. त्यात ठराविकपणा फार उत्पन्न झाल्यामुळे तो जिवंत आहेसे वाटत नसे. महाराजांच्या राज्यतंत्रात एक प्रकारे काहीशी अपरिहार्य अशी ही उणीवच असे. त्यांचे राज्यतंत्र एखाद्या यंत्राप्रमाणे ठराविक गतीने, ठराविक पद्धतीने, ठराविक काम करणारे बनले. सुदैवाने ते हयात होते तोपर्यंत त्यांच्या राज्यतंत्राचे हे यांत्रिक स्वरूप कोणाला फारसे अपायकारक झाले नाही. ते स्वतः लागलीच त्यात अनुकूल व योग्य फरक करीत. चांगले समंजस अधिकारी नियमांची अंमलबजावणी करावयाला असल्यावर मग मात्र फारसा त्रास होत नसे.

स्वतः महाराजांनादेखील या यंत्रापासून काही कमी त्रास झाला असेल, असे वाटत नाही. त्यांच्या जीवनालाही एक प्रकारचे यांत्रिक स्वरूप प्राप्त झाले होते. त्यात मानवी अपूर्णतेचा अंशही नसे; पण त्याच्याचबरोबर मानवी सुख-दुःखे त्यात नसत आणि अशा परिस्थितीमुळे आयुष्यात आनंद केवळ आनंद असा महाराजांना क्वचितच प्राप्त झाला असेल, असे आम्हाला वाटते. आपण निरलसपणे प्रजाहिताचे काम करीत आहोत या जाणीवेचे त्यांना समाधान वाटत असे; पण समाधान आणि आनंद या दोन अगदी निराळ्या वस्तू आहेत. काही उपाय नाही असे समजून मनुष्य समाधान मानतो. आनंदाचे तसे नाही. काही जिंकून मिळविल्याचा तो आनंद असतो. इच्छिले होते त्यापेक्षा अपरंपार मिळाले, वाटले होते त्यापेक्षा अधिक सुलभतेने मिळाले असे एखाद्याला स्वतःविषयी वाटू लागले की, त्याला आनंद होतो. येथे एका जुन्या

म्हणीची आम्हाला आठवण होते. 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे' त्यामुळे त्या आंधळ्याला खचित आनंद झाला असेल. एकच डोळा मिळाला असता तर त्याने समाधान मानले असते; पण दोन मिळाल्यामुळे ते आनंदाने नाचू लागला. समाधान आणि आनंद यातील फरक म्हणतात तो हाच. महाराजांच्या कार्यक्षमतेमुळे महाराजांना समाधानाचे सुख मिळत असे; पण आनंदाचे ऐश्वर्य फारसे मिळत नसे. अशाही परिस्थितीत त्यांनी राज्यशकट उत्साहाने हाकीत नेला. हे पाहून कोणाला त्यांच्याविषयी कौतुक व आदर वाटणार नाही!

६.
गृहसौख्य

येथपर्यंत आपण महाराजांच्या चरित्राची सार्वजनिक बाजू अवलोकिली. आता काही वेळ महाराजांच्या खाजगी संसाराकडे वळून तेथे काय काय घडले ते पाहू या.

महाराजांचे पहिले लग्न तारीख ६ जानेवारी १८८० रोजी झाले; पण त्याच्यापूर्वी वधूसंशोधनाचे कार्य बरेच दिवस चालू होते. या कामासाठी गुप्त वेषाने तसेच उघडपणे बरेच विश्वासू लोक बाहेर पाठविण्यात आले. त्याचा परिणाम असा झाला की, महाराणी जमनाबाईसाहेबांकडे परिचयपत्रिका, जन्मलग्न कुंडल्या पाहून त्यातील कुठली कुंडली महाराजांना सर्वांत चांगली आहे हे पाहण्याचा उद्योग आरंभिला.

सर टी. माधवराव स्वतः पुण्यातील काही उच्च मराठ्यांच्या मुली पाहायला गेले; पण तेथील मुलींपैकी एकही त्यांना पसंत पडली नाही. आता काय करावे, असा जमनाबाईसाहेबांना प्रश्न पडला. त्यांनी शेवटी सर टी. माधवराव यांना मुंबई इलाख्याच्या बाहेरचे वधूसंशोधन करावयाला सांगितले आणि दैवयोगही त्याच दिशेने अनुकूल होता. कावेरी नदीच्या किनाऱ्यावर एक कुमारिका महाराजांकरिता तपश्चर्या करीत बसली होती. तंजावर येथे सर टी. माधवराव यांना महाराजांना सर्वस्वी अनुरूप अशी वधू आढळली. ती मुलगी म्हणजे राजकन्या लक्ष्मीबाई या होत. तंजावर येथे मोहित्याच्या राजघराण्यापैकी लक्ष्मीबाई होत्या. त्यांचे वय त्यावेळी चौदा वर्षांचे होते. तंजावरचे घराणे इतिहासप्रसिद्ध असल्यामुळे सर टी. माधवराव यांची पसंदगी जमनाबाईसाहेबांना आवडली. मुंबई सरकारनेही या लग्नाला ताबडतोब संमती दिली.

दुसरे, जमनाबाईसाहेबांची कन्या ताराराजे यांचे लग्न व्हावयाचे होते. त्यांच्याकरिता सावंतवाडीचे राजेसाहेब रघुनाथराव हे वर नेमस्त करण्यात आले. ही दोन्ही लग्ने बडोद्यात एकाच वेळी करण्याचे ठरले. मोहित्यांकडील मंडळी व सरदेसाई यांच्याकडील मंडळी बडोद्यात आली; पण लग्नातिथीविषयी ज्योतिष्यांची भांडणे मिटेनात ! जी तिथी सयाजीराव महाराजांना अनुकूल आहे असे त्यांच्या ज्योतिष्यांना वाटे, तीच तिथी लक्ष्मीबाईंना प्रतिकूल आहे असे त्यांचे ज्योतिषी

म्हणत ! शिवाय दोन्ही गोष्टी जुळून आल्या तरी ताराराजे यांच्या लग्नाकरिता तिथी अनुकूल मिळेना. शेवटी दोन्ही लग्ने बरोबर करण्याचा पूर्वीचा विचार एकीकडे सारून ताराराजे यांचे लग्न तारीख २१ डिसेंबर १८७९ रोजी उरकण्यात आले. त्यानंतर महाराजांच्या लग्नाची तारीख ६ जानेवारी नक्की ठरली. लग्नाची तिथी नक्की ठरल्यावर मग उत्साहाला काय पारावार? सारे शहर ध्वजापताकांनी शृंगारण्यात आले. जिकडे तिकडे प्रचंड कमानी उभारण्यात आल्या. हत्ती, घोडे, उंट मिरवणुकीत होते. रस्त्याच्या दुतर्फावर लष्कर व पोलीस उभे होते. देशी व विदेशी वाद्यांचा जिकडे तिकडे गजर होत होता. महाराजसाहेबांची स्वारी दुपारी तीन वाजता जुन्या राजवाड्यातून निघून प्रथम राजराजेश्वरी लक्ष्मीबाईंच्या काकांचा आशीर्वाद घ्यावयाला गेली. तेथे गव्हर्नर-जनरलांचे एजंट त्यांना सामील झाले. तेथून सर्व मंडळी नजरबाग राजवाड्यात लग्नाकरिता आली.

नजरबाग राजवाड्याची या प्रसंगीची शोभा काय बरे वर्णावी ! देवतांच्या पूजा, ग्रहांची शांती, सर्वसाधारण देवप्रार्थना सारख्या सुरू होत्या. लग्नाची वेळ जवळ आली, तसे वधू-वरांना अंतरपाटाआड उभे करण्यात आले. मंगलाष्टके म्हणायला सुरुवात झाली. वधू-वरांच्या मस्तकांवर मंगलाक्षता पडू लागल्या आणि शेवटी पाणीग्रहण विधी झाला. मोहित्यांनी आपली पुतणी सयाजीराव महाराजांना विधिपूर्वक अर्पण केली आणि अशा तऱ्हेने हा मंगल समारंभ पार पडला.

या लग्नानंतर दहाच दिवसांनी हल्लीच्या लक्ष्मीविलास राजवाड्याचा कोनशिला बसविण्याचा समारंभ झाला. सर रिचर्ड टेंपल यांनी ही कोनशिला बसविली. लक्ष्मीविलास हे नाव राणीसाहेबांच्या नावावरूनच महाराजांना सुचले. लग्नानंतर लक्ष्मीबाईचे नाव महाराणी चिमणाबाई असे ठेवण्यात आले.

महाराणी चिमणाबाई या स्वभावाने अत्यंत शांत, प्रेमळ व पतिनिष्ठ होत्या. त्यांचा जन्म उच्च कुळात झाला असल्यामुळे त्या बाल्यावस्थेपासून शालीन होत्या. आपल्या पतीच्या सुखाकरिता त्या अहर्निश झटत. त्या जितक्या मनाने सुंदर तितक्याच रूपानेही होत्या. त्यांचे एक तैलचित्र लक्ष्मीविलास राजवाड्यात पाहायला सापडते. तसेच न्यायमंदिराच्या सभागृहात त्यांचा एक सुंदर पुतळा बसविण्यात आला आहे. त्यावरून त्यांच्या रूपाची बरीच कल्पना करता येते. चिमणाबाईसाहेबांना प्रथम एक कन्या झाली; पण ती लहानपणीच वारली. त्यानंतर फत्तेसिंहराव जन्मास आले; पण हे आईच्या मुळावर जन्मास आले असे दिसते. कारण त्यांच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे ता. ७ मे १८८५ रोजी महाराणी चिमणाबाईसाहेब कालवश झाल्या. त्यांच्या मृत्यूमुळे महाराजांना फार शोक झाला. बरेच दिवस त्यांची प्रकृती बरी नव्हती. रात्रीची त्यांना झोपही येईना. तेव्हापासून महाराजांना जो निद्रारोग लागला तो जवळ जवळ शेवटपर्यंत पूर्ण बरा झाला नाही.

महाराणी चिमणाबाईसाहेब यांच्या प्रेमळ स्वभावाचा महाराजांच्या मनावर इतका परिणाम झाला होता की, चिमणाबाई न्यायमंदिराची ता. २८ मे १८८५ रोजी कोनशिला बसवीत असताना ते म्हणाले, ''कै. महाराणी साहेबांच्या ठिकाणी वसत असलेल्या सद्‌गुणांचे स्मारक

मला उभारावेसे वाटत आहे. मला त्यांच्याविषयी अत्यंत आदर आहे. त्या नम्र, दानशील व प्रेमळ स्वभावाच्या होत्या. त्या एकनिष्ठ माता व प्रेमळ पत्नी होत्या. या शब्दावरून महाराजसाहेबांना महाराणीसाहेबांविषयी काय वाटत होते ते स्पष्ट होते.

महाराजसाहेबांचा दुसरा विवाह २८ डिसेंबर १८८५ रोजी झाला. हा विवाह देवास येथील सरदार बाजीराव अमृतराव घाटगे यांच्या कन्येशी झाला. या मुलीचे माहेरचे नाव गजराबाई होते व सासरचे नाव दुसऱ्या चिमणाबाई असे ठेवण्यात आले. सुमारे तीन वर्षांपूर्वी त्या दिवंगत झाल्या.

दुसऱ्या महाराणी चिमणाबाईसाहेब याही पतिनिष्ठ होत्या. शिवाय पतीच्या निरनिराळ्या सुधारणाच्या कामी त्या त्यांना मदत करीत असत. स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांनी फारच परिश्रम घेतले. स्त्री शिक्षणाच्या कामात तर त्यांनी विशेष लक्ष पुरविले. बडोदे येथे त्यांच्या नावाची दोन इंग्रजी हायस्कूले व एक स्त्रियांचे कॉलेज अशा तीन शिक्षणसंस्था सुरू असून, त्या भरभराटीच्या स्थितीत आहेत. आपल्या सुधारक पतीचे विचार त्यांनी आत्मसात केले व पडद्याच्या चालीसारखी अनिष्ट चाल त्यांनी १९१४ साली जाहीरपणे सोडून दिली. महाराजांच्या बरोबर त्यांनी पुष्कळ वेळा युरोप, अमेरिका, जपान वगैरे देशांत प्रवास केल्यामुळे त्यांचे विचार प्रगतशील व उदार बनले. आपल्या पतीप्रमाणे त्यांनाही विविध विषयांची आवड असे. त्यांच्या चेहऱ्यावरून त्या रुबाबदार व करारी दिसत.

आता महाराजसाहेबांच्या इतर परिवाराकडे आपण वळू या. पहिल्या महाराणी चिमणाबाईसाहेब यांना एक मुलगी होऊन ती वारल्याचे वर सांगितलेच आहे. दुसरे अपत्य म्हणजे फत्तेसिंहराव हे होत. यांच्या जन्मानंतर त्यांच्या मातोश्री वारल्या. फत्तेसिंहराव दिसायला तरतरीत, घोड्यावर बसण्यात कुशल व शरीराने किरकोळ असे होते. त्यांचा विवाह निंबाळकर घराण्यातील पद्मावती नावाच्या मुलीशी झाला. यांना इंदूमती व लक्ष्मीदेवी नावाच्या दोन कन्या व वेळचे युवराज प्रतापसिंह अशी तीन अपत्ये झाली. युवराज प्रतापसिंह यांच्या जन्मानंतर काही काळाने फत्तेसिंहराव कालवश झाले. त्यावेळी महाराजांना अपरिमित दुःख झाले. फत्तेसिंहराव एकाएकी १९०८ साली वारल्यामुळे तर त्यांना फारच चटका बसला. बरेच दिवस त्यांना या पुत्रशोकापुढे काही सुचेना. पद्मावतीदेवी यांच्यावर तर मोठाच प्रसंग गुदरला; पण त्यांनी आपल्या पतीमागे आपल्या मुलाबाळांचा सांभाळ फारच चांगल्या प्रकारे केला. आपल्या पतीमागे त्या काही वर्षे होत्या; पण आपल्या मुलाबाळांची कार्ये पाहण्याचे त्यांच्या नशिबी नव्हते. त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन्ही मुलींची व युवराज प्रतापसिंह यांची लग्ने महाराजांनी केली. इंदूमतीदेवींचा विवाह त्या वेळचे कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांच्याशी झाला व लक्ष्मीदेवीचा विवाह सावंतवाडीच्या त्या वेळच्या महाराजांशी झाला. त्या वेळचे युवराज प्रतापसिंह यांचा विवाह घोरपडे घराण्यातील एका कन्येशी लावण्यात आला. त्यांचे नाव श्री. सौ. शांतादेवी बाईसाहेब असे ठेवण्यात आले. युवराज प्रतापसिंह यांना सयाजीराव महाराजांच्या मृत्यूनंतर बडोद्याची गादी प्राप्त झाली. ती त्यांनी ११ वर्षे यशस्वीपणे चालविली व हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळताच त्यांनी आपले राज्य इ. स. १९४९ मध्ये भारतात सामील केले. मध्यंतरी केंद्रीय सरकारला त्यांचे आचरण ठीक न

वाटून त्यांनी युवराज फत्तेसिंहराव यांना बडोद्याचे महाराज म्हणून जाहीर केले. सध्या बडोद्याच्या गादीवर आपल्या पणजोबांप्रमाणे ते लोकप्रिय पुढारी म्हणून प्रसिद्ध आहेत. मागे झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ते निवडून आले व पार्लमेंटचे सभासद झाले. यावरून त्यांची लोकप्रियता सिद्ध होते. त्यांना दोन भाऊ व पाच बहिणी असून, श्रीमंत शांतादेवीबाई साहेबांसारख्या सत्त्वशील माता लाभल्या आहेत. त्यांचा विवाह जोधपूरच्या महाराजांच्या बहिणीशी झाला आहे. त्यांचे नाव पद्मावतीबाईसाहेब असे ठेवण्यात आले आहे. पहिल्या महाराणी चिमणाबाईसाहेब यांचा वंश अशा तऱ्हेने वाढत असलेला पाहून कोणालाही आनंदच वाटेल.

दुसऱ्या महाराणी चिमणाबाईसाहेब यांना इ. स. १८८८ मध्ये राजपुत्र जयसिंगराव हे अपत्य झाले. त्यानंतर १८९० साली राजपुत्र शिवाजीराव यांचा जन्म झाला. पुढे इंदिराराजे यांचा जन्म झाला व शेवटी १८९३ साली राजपुत्र धैर्यशीलराव यांचा जन्म झाला. जयसिंहराव यांचे शिक्षण हॅरो (Harrow) येथे झाले. तेथून पुढे ते हावर्ड युनिव्हर्सिटीत आपले शिक्षण पुरे करावयाला गेले. तेथे असताना त्यांना काही व्यसने लागली व त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली. महाराजांनी त्यांना सुधारण्याचे खूप प्रयत्न करून पाहिले; पण ते फुकट गेले. अमेरिकेतून आल्यावर त्यांना राज्यकारभारात महत्त्वाची जागा देण्यात आली; पण त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दाबाला ते मनापासून कंटाळले होते. १९१९ मध्ये ते आजारी झाले आणि त्यांना उपचाराकरिता युरोपमध्ये पाठविण्यात आले. तेथे त्यांच्या प्रकृतीला मुळीच आराम वाटला नाही आणि ते २७ ऑगस्ट १९२३ रोजी हॉलंडमध्ये वारले. त्यांच्या मृत्यूमुळे सर्वांना अतिशय दुःख झाले; पण या दुःखापेक्षा 'रूटर'च्या तारेने उडविलेल्या गोंधळाने सर्वजण चकीत होऊन गेले. जयसिंहराव वारले असताना 'रूटर'ने नुसतेच बडोद्याचे गायकवाड (Prince of Baroda) वारले असे चोहोकडे कळविल्याने जगात खळबळ उडाली. Prince of Baroda म्हणजे सयाजीराव महाराज असे त्यापैकी प्रत्येकाला वाटले. त्यामुळे सर्व प्रमुख वर्तमानपत्रांनी त्यांच्याविषयी शोकप्रदर्शक मृत्यूलेख लिहिले ! त्यावेळी सयाजीराव महाराज सेंट मॉरिस येथे होते. वर्तमानपत्रांनी त्यांच्याविषयी सामान्यपणे चांगले उद्‌गार काढले होते. महाराजांच्या हयातीतच त्यांच्याविषयी मृत्यूलेख आल्याने मोठी गंमतच उडाली. लोक आपल्याविषयी खरोखर काय म्हणतात याचा त्यांना अंदाज लागला. 'आपुले मरण पहिले म्या डोळा' या काव्युक्तिप्रमाणे सयाजीराव महाराज यांना आपल्या मृत्यूची कल्पनिक वर्णने ऐकण्याची पाळी आली. Prince of Baroda या शब्दांनी इतका घोटाळा केला. खुद्द बडोद्यातही मोठाच हाहाकार उडाला. त्या वेळचे दिवाण मनुभाई मेहता यांनी सरकारी तिजोरीला सील वगैरे करून पुढे काय होते हे पाहण्याचे ठरविले. कारण महाराजांकडून त्यांना ४-६ दिवसांपूर्वीच खुशालीची तार आली होती. त्यामुळे महाराजांच्या मृत्यूची वार्ता त्यांना खरी वाटेना; पण 'रूटर'च्या तारेने त्यांनाही घोटाळ्यातच टाकले. अर्थात, मागाहून या प्रकरणाचा निकाल व्यवस्थित लागला. स्वतः महाराजांना जयसिंहराव यांच्या मृत्यूने फारच धक्का बसला. श्रीमंत राजपुत्र जयसिंहरावाच्या पश्चात त्यांच्या पत्नी शकुंतलाराजे बडोद्यात राहतात आणि स्त्रियांच्या उन्नतीकरिता सतत झटत असतात.

राजपुत्र शिवाजीराव यांचे शिक्षणही विलायतेतच झाले. लहानपणापासून त्यांची प्रकृती चांगली होती; पण विलायतच्या राहणीने त्यांचेही शील बिघडले व प्रकृती ढासळली. हिंदुस्थानात आल्यावर १९२० च्या डिसेंबर महिन्यात ते न्यूमोनियाच्या विकाराने कालवश झाले. त्यांच्यामागे त्यांच्या पत्नी कमलादेवी, पुत्र उदयसिंहराजे, खंडेरावराजे व कन्या निर्मलादेवी इतकी मंडळी होती. त्यापैकी उदयसिंहराजे हे केंब्रिजचे एम. ए. होऊन प्रतापसिंह महाराजांच्या राज्यात चांगल्या हुद्यावर होते. ते ११ ऑगस्ट १९६० रोजी निवर्तले. त्यांच्यामागे त्यांच्या पत्नी व एक कन्या इतकी मंडळी आहेत. दुसरे खंडेरावराजे हे मुंबईत आपल्या इस्टेटीचा कारभार पाहत असतात. तिसऱ्या श्रीमती निर्मलराजे भोसले या महाराष्ट्र राज्यात डेप्युटी मिनिस्टर ऑफ एज्युकेशन म्हणून काम करीत असतात.

राजपुत्र धैर्यशीलराव यांची प्रकृती लहानपणी अत्यंत नाजूक होती. दोन मुलांच्या बाबतीत झालेली चूक तिसऱ्याच्या बाबतीत होऊ नये म्हणून महाराजांनी त्यांना ईस्टबोर्न कॉलेजात पाठविले. तेथील शिक्षणक्रम पुरा करून आल्यावर महाराजांनी त्यांना राज्यकारभारातील महत्त्वाच्या खात्यांत शिक्षण घेण्याकरिता ठेविले. राजपुत्र धैर्यशीलराव यांनी इंदूर येथे लष्करी शिक्षणही घेतले. काही दिवस ते राज्यकारभाराचे काम पाहत होते; पण अलीकडे त्यांची प्रकृती ठीक राहत नसल्यामुळे ते बडोद्यासच विश्रांती घेत. त्यांच्या पत्नी विमलाराजे या चांगल्या सुविद्य असून, त्या आपल्या मुलीबरोबर राहत असतात. राजपुत्र धैर्यशीलराव हे मोठे उमद्या स्वभावाचे होते. सयाजीरावांच्या पश्चात काही वर्षांनी ते कालवश झाले.

इंदिराराजे यांचे शिक्षण खासगी रीतीने झाले. ग्वाल्हेरचे माधवराव महाराज शिंद्यांशी त्यांचा विवाह करण्याचे घाटत होते. स्वतः महाराजांना वधू-वरांच्या वयातील अंतर पाहून या विवाहाला संमती द्यावीशी वाटत नव्हती; पण दोन घराण्यांत चांगला संबंध जुळविण्याकरिता त्यांनी कबुली दिली. वास्तविक हे करणे एका दृष्टीने गैर होते. माधवराव महाराज शिंदे यांची पहिली बायको जिवंत असताना त्यांना इंदिराराजे लग्नात देणे बरोबर नव्हते. इंदिराराजे यांनी इकडे लग्नाची वाटाघाट चालली असताना लंडनमध्ये कुचबिहारच्या महाराजांशी ब्रह्मो पद्धतीने लग्न लावले. त्यावेळी या लग्नाची सर्वत्र फार चर्चा झाली. स्वतः महाराजांनाही त्यावेळी हे लग्न फारसे बरे वाटले नाही; पण ते इंदिराराजे यांच्या आड आले नाहीत. कुचबिहारचे महाराज काही वर्षांपूर्वी वारले. त्यांच्या पश्चात महाराणी इंदिराराजे या आपल्या मुलाबरोबर त्यांच्या राज्यात राहत असतात.

येथपर्यंत सांगितलेल्या महाराजांच्या संसार कथेवरून ती इतर चार संसार कथांप्रमाणेच सुखदुःखमिश्रित कशी होती हे सहज दिसून येईल. आपली नातवंडे चांगली शिकून सवरून मार्गाला लागली आहेत हे पाहून त्यांना मनात समाधान वाटत असे; पण या समाधानाचे रूपांतर आनंदात होण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही. पहिल्या पत्नी वारल्या त्याचा शोक. सर्वांत हद्द म्हणजे तीन तरुणबांड अशा पुत्रांच्या मृत्यूमुळे होणाऱ्या शोकाची. या एकामागे एक अशा पुत्र निधनामुळे महाराजांच्या भावनांना जो एक धक्का बसला तो कायमचाच. पुत्रजन्मासारखा आनंद नाही आणि पुत्र निधनासारखा शोक नाही असे म्हणतात. श्रीमंत महाराज व श्रीमंत सौ.

महाराणीसाहेब या दोघांनाही पुत्रशोकामुळे मुळीच बरे वाटत नसे. काही झाले तरी मनुष्य रोजचा व्यवहार करावयाचे सोडीत नाही हे जरी खरे असले, तरी त्या व्यवहारात त्याला गोडी वाटत नाही. व्यवहार करायचा म्हणून तो करतो. अगदी उदासीनपणे करतो.

महाराजांच्या जीवनाविषयी असेच म्हणता येईल. त्यांच्या कामात कधीही खंड पडलेला कोणी पाहिला नाही. नेमल्या वेळी काही झाले तरी ते काम केल्याखेरीज राहत नसत; पण त्यांनी अगदी घड्याळातील काट्याप्रमाणे व्यवस्थित काम केले म्हणून ते आपला शोक विसरले होते असे नाही. गीतेत सांगितल्याप्रमाणे उदासीन वृत्तीने ते आपले कर्तव्य करीत असत आणि पुष्कळ वर्षे अशा प्रकारचे काम केल्याने त्यांची वृत्ती स्थितप्रज्ञाप्रमाणे बनली होती. शोकाने ते विव्हळत नसत किंवा आनंदाने हुरळून जात नसत. 'सुख-दुःख समे कृत्या लाभालाभौ जयाजयौ।' वगैरे गीता वचनात सांगितल्याप्रमाणे ते वागत असत, असे आढळते.

महाराजांच्या ठिकाणी सुखदुःखाच्या भावना नव्हत्या असे आम्हाला मुळीच म्हणावयाचे नाही; पण पुष्कळ वर्षांच्या अनुभवाने भावनाधीन कसे होऊ नये हे ते बरोबर शिकले होते. महाराजांच्या आयुष्यात निर्भेळ आनंद कधी वाटला असेल असे आम्हाला वाटत नाही. कर्तव्याच्या खडतर मार्गाने ते चालत आले. स्वतःच्या सुखदुःखाची पर्वा करायला त्यांना वेळ कुठे होता? मला खासगी आयुष्य नाहीच, असे ते म्हणत. या म्हणण्यात दुःखाची छटा स्पष्ट दिसे. आपणाला हवे असलेले प्रेम, निर्मळ निःस्वार्थी प्रेम महाराज झाल्यापासून आपणाला कधी मिळाले नाही. प्रत्येकजण 'महाराज महाराज' म्हणून आपल्यापासून दूर राही असेही ते म्हणत. गृहसौख्य म्हणून ज्याला म्हणतात ते महाराजांना फारच थोडे मिळाले असेल. राज्यशकट वाहण्यातच त्यांच्या आयुष्यातला सारा काळ गेला. आपल्या मुलाबाळांची व नातवंडांची ते काळजी वाहत; पण या नातवंडांना महाराजांचे आपल्यावर प्रेम आहे असे फारसे वाटत नसे. त्याचे कारण म्हणजे त्यांची वागणूकच अशी उदासीन होती. साऱ्या गोष्टी ते कर्तव्य म्हणून करीत आणि म्हणूनच त्यांच्या आयुष्यात थोडाफार रखरखीतपण आढळे.

अर्थात, ते ज्या स्थनावर बसले होते त्याच्या दृष्टीने हा मोठा गुणच होता. राजा हा व्यक्तीशः स्वतःच्या सुखदुःखातील असावा. तो आपल्या सुखात किंवा दुःखात जर चूर होऊ लागला, तर राज्यकारभाराला खीळ बसेल. त्याची दृष्टी आपल्या प्रजेकडे असावी, त्याने प्रजेच्या सुखदुःखाची पर्वा करावी, राजाची वृत्ती संन्याशाच्या वृत्तीसारखी सुखदुःखातीत असावी. श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या आयुष्याकडे पाहिले असताना हीच गोष्ट प्रत्ययास येते. त्यांनी स्वतःचा संसार केला, नाही असे नाही; पण ते संसार करीत असताना ते कधीही त्यात गुरफटून गेले नाहीत. आपल्या राज्य संसाराची त्यांना कधीही विस्मृती झाली नाही. एक वेळ त्यांना स्वतःच्या संसाराचा विसर पडला असेल; पण राज्याचा संसार ते कधीही विसरले नाहीत. यातच त्यांचा मोठेपणा दिसतो.

●●●

७.
बापट कमिशन

श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या कारकीर्दीच्या पूर्वार्धात गाजलेल्या बापट कमिशनची गणना प्रामुख्याने करायला हवी. १८९४-९५ साली बडोदे संस्थानात व बाहेरही सर्वांच्या तोंडी बापट कमिशनच्या गोष्टी असत. या कमिशनची हकीकत न. चि. केळकरकृत 'लोकमान्य टिळक यांचे चरित्र, भाग पहिला' यात आली असून, ती फारच उद्‌बोधक आहे. ती जशीच्या जशीच मुळात वाचण्याजोगी आहे; पण येथे तिच्यातील महत्त्वाचा भाग दिल्याखेरीज आमच्याने राहावत नाही.

बापट म्हणजे वासुदेव सदाशिव बापट. हे रत्नागिरी जिल्ह्यात एका गरीब घराण्यात जन्मले. ते मोठे तरतरीत व बुद्धीमान होते; पण कॉलेजचा खर्च झेपण्याचे त्राण त्यांच्या अंगी नव्हते. कॉलेजात असताच त्यांना बडोद्यास नोकरी मिळाली. यावेळी बडोद्यास रेव्हेन्यू सर्व्हे सेटलमेंट खात्याचे मुख्य अधिकार मि. इलियट होते. त्यांची मर्जी बापटांवर असून, त्यांनी त्यांना प्रथमच ४० रुपयांची नोकरी दिली. यापुढील मार्ग बापटांनी झपाट्याने आक्रमिला. १८८६ साली त्यांचा प्रवेश इलियट साहेबांच्या खात्यात होऊन, तीन वर्षांनी ते साहेबांचे खास मदतनीस झाले व १८९४ पूर्वीच त्यांचा पगार पावणे सातशेपर्यंत वाढला होता. त्यांच्यावर खटला होऊन मध्येच त्यांच्या जागेची इतिश्री झाली नसती तर ते नायब दिवाणाच्या जागेपर्यंत चढण्याचा फार संभव होता. इलियट साहेबांची मर्जी बापटांवर इतकी बसली की, बापटांनी सांगावे व इलियट साहेबांनी ऐकावे, असा लोकांचा समज होऊन बसला. खरोखरच बापटांनी बडोद्यात आपली कारकीर्द गाजविली. त्यांचे ते घारे डोळे, पांढरा सफेद पोशाख, उमदा काठेवाडी घोडा ही मनावर परिणाम करण्यासारखी होती. त्यांची कारकीर्द गाजली असे दक्षिणी लोकांना वाटण्याला त्यांची कर्तबगारी; पण गुजराती लोकांना तसे वाटण्याला त्यांचा स्वभाव हाच मुख्यतः कारणीभूत होता. स्वभावाने ते तापट होते. कोणाचीही भीड न धरता तापून किंवा तोडून बोलण्यात त्यांचा हातखंड असे. गुजराती लोक दक्षिणी लोकांना पाण्यात पाहतात. अशा भावनेने गुजराती

लोकांचे वाटेत तेथे उट्टे काढण्यास ते कमी करत नसत; पण साहेबांची मर्जी व बिनमुर्वतखोर स्वभाव या दोषांत तिसऱ्या एका गोष्टीची भर पडून बापटांच्या कारकीर्दीला त्रिदोष सन्निपात झाला. ती गोष्ट म्हटली म्हणजे त्यांच्याकडे असलेले सर्व्हे सेटलमेंट खात्याचे अप्रिय काम.

बापट कमिशनच्या कामात लोकमान्य टिळकांनी बापटांच्या बाजूने काम केले. याला कारण त्यांचा परस्परांतील स्नेह हे होय; पण या कामात पडण्यात टिळकांचा हेतू एकेरी नसून दुहेरी होता. स्नेहाच्या संरक्षणाबरोबर श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या कारकीर्दीवर ठपका ठेवण्याचा ब्रिटिश रेसिडेन्सीचा जो गुप्त प्रयत्न यावेळी जोरात चालू होता, त्याचा प्रतिकार करावा अशीही टिळकांची इच्छा होती. बापट कमिशनमध्ये टिळक हे स्वतः जरी आरोपी नव्हते, तरी जणू काय आपणच अपराधी आहोत अशा भावनेने त्यांनी बापटांतर्फे अथपासून इतपर्यंत मुकदम्याचे सर्व काम चालविले. नावाला दुसरे वकील व बॅरिस्टर होते.

बापटांची कारकीर्द संपुष्टात येण्याला व टिळकांनी कमिशनच्या कामात पडण्याला साधारण असे कारण म्हटले म्हणजे बारखळी ऊर्फ सेटलमेंट खात्याद्वारे श्री. सयाजीराव यांच्या कारकीर्दीशी येणारा संबंध हेच होय. त्याविषयी येथे थोडी माहिती देणे जरूरी आहे. ते खाते १८८३ सालच्या ऑगस्टमध्ये इलियट साहेबांकडे आले; पण सगळी मोजणी मापणी पुरी न झाल्यामुळे खात्याचे प्रत्यक्ष काम १८८६ पर्यंत सुरू झाले नाही. महाराज साहेबांनी मंजूर करावयाचे नियम तयार होण्यास आणखी तीन वर्षे लागल्याने बारखळी पोटखात्याचे काम १८८९ च्या मार्चमध्ये सुरू झाले. या खात्यात जेन्किन्स, ऑझॅन, मॅकॉनकी वगैरे गोऱ्या सिव्हिलियन लोकांनी पूर्वी सुपरिटेंडेंट म्हणून काम केले होते; परंतु त्यांच्यावेळी कोणत्याही प्रकारचा गवगवा झाला नाही; पण इलियट साहेबांच्या कारकीर्दीत तो झाला. याचे कारण त्यांच्या कामाला प्रत्यक्ष इनाम चौकशीचे स्वरूप येऊन कोणाच्या इनामावर आणेवारीचा आकार बसणे, सनद नसल्यामुळे कोणाचे इनाम सरकारजमा होणे वगैरे गोष्टी घडून आल्या. इनाम चौकशीचे काम कोठेही लोकांच्या डोळ्यांवर येण्यासारखे असते. उदाहरणार्थ खुद्द ब्रिटिश अमलात त्यापूर्वी ३०-४० वर्षे इनाम कमिशनच्या कारभारामुळे जो खरा अन्याय किंवा अन्यायाचा गवगवा झाला, त्याहून इलियट साहेबांच्या कारभारात अधिक घडून आला होता असे नाही. तथापि, 'धन्याचा धनी कोणी नाही' या म्हणीप्रमाणे मुंबई सरकारच्या इनाम कमिशनविरुद्ध तक्रारी करून कड पोहोचविण्याला दुसरी जागा नसल्यामुळे त्या तक्रारीबद्दल कोणाचा घातपात होऊ शकला नाही. मात्र त्याच तक्रारी बडोद्यासारख्या संस्थानात झाल्याने एकदम त्याचे स्वरूप प्रचंड करून भासविता आले. हे करणारांचा हेतू इनामदारांची दाद लावण्यापेक्षा महाराज सरकारांच्या कारभारावर ठपकाच ठेवण्याचा अधिक होता. सयाजीराव महाराज आपल्या स्वतंत्र बाण्यामुळे किंबहुना आपल्या उद्योगप्रियतेमुळे ब्रिटिश सरकारला म्हणजे एजंट, गव्हर्नर-जनरल यांना अप्रिय झाले होते. इलियट साहेबांवरही व्यक्तिशः रेसिडेन्सीचा तसाच काही राग होता. कारण ते महाराजांचे शिक्षक असल्यापासून त्यांना त्यांचा अभिमान वाटे व जातीने इंग्रज असताही महाराजांच्या स्वतंत्र स्वाभिमानी बाण्याचे ते कौतुक करीत. रेसिडेन्सीच्या मनात जेव्हा जेव्हा महाराजांना चेपावयाचे येई तेव्हा तेव्हा इलियटसाहेब महाराजांना खासगी रीतीने सल्ला देत व उघड त्यांची

तरफदारी करण्यात मागेपुढे पाहत नसत. त्यातच बापट साहेबांच्या अप्रियतेची भर पडली. बापट हुशार, तरतरीत व संस्थानचे काम इमानाने करणारे म्हणून महाराज व इलियट यांची त्यांच्यावर मेहेरनजर; पण इतर कारणांकरिता लोकांची व रेसिडेन्सीची बापटांवर नाराजी. म्हणून बापटांचे देव्हारे माजवू देणारे महाराज व इलियट यांच्यावरही त्यांची नाराजी; पण महाराज, इलियट व बापट हे तिघेही बडोद्यास असल्याने तिघांचा जोपर्यंत एकमेकास जोर होता, तोपर्यंत कोणासही त्यांचे वाकडे करता आले नाही; पण १८९४ च्या सुमारास असा योग जमून आला की, महाराज व इलियटसाहेब दोघेही विलायतेस गेले व इकडे बापट एकटे सापडले. त्याबरोबर रेसिडेन्सी, इनामदार व बापटसाहेबांचे खासगी शत्रू हे सर्व एक होऊन त्यांनी हल्ला चढविला व तो यशस्वी होऊन बापट कमिशनमध्ये त्यांचे पर्यवसान झाले.

इनामाची चौकशी करणे, त्यांच्या सनदा पाहणे, त्यावर योग्य तो आकार बसविणे हे काम बडोदे संस्थानात मुंबई सरकारचे पाहून यापूर्वी सुमारे पाऊणशे वर्षेपर्यंत मधून मधून सुरू होतेच; पण सर्व जमिनीची सरसकट मोजणी व सेटलमेंट करण्याचे काम सयाजीरावांच्या कारकीर्दीपर्यंत कोणी केले नाही. याचे कारण हेच की, खंडेराव, मल्हारराव वगैरे अधिपती राज्यकारभारात पद्धतशीर लक्ष घालणारे नव्हते. राजा सर टी. माधवराव हे सुशिक्षित असताही त्यांना या कामाकडे लक्ष घालण्याला वेळ मिळाला नाही. १८८९ साली नवीन इनाम खात्याचे काम सुरू झाल्याबरोबर इनामदार लोक सहजच खडबडून जागे झाले. खुद्द इलियट साहेबांकडे त्यांच्या खात्याच्या कामाविरुद्ध १८८९ ते १८९२ पर्यंत सुमारे नऊ हजार अर्ज आले व त्यांची व्यवस्थाही लागली. याच अवधीत खुद्द महाराजसाहेब व त्यांचे दिवाण यांजकडेही परस्पर अर्ज आले होते; पण त्यांची संख्या या चार सालांत दीड-पावणेदोनशेवर गेली नव्हती. असे असताना बडोद्याचे त्या वेळचे रेसिडेंट कर्नल बिडल्फ यांनी अव्यापारेषू व्यापार करून अर्जदारांना तक्रारी करण्यास उत्तेजन देण्यास सुरुवात केली. वास्तविक दरबारच्या अंतर्व्यवस्थेत लक्ष घालण्याचा ब्रिटिश सरकारास काहीच हक्क नव्हता; पण संस्थानी दरबारच्या गळ्याभोवती रेसिडेन्सीची तात नेहमीच लागून राहिलेली असे व ती केव्हा आवळून गळचेपी करील याचा नेम नसे. 'ब्रिटीश सरकारची देखरेख' या शब्दांचा अर्थ इंग्रज सरकारच्या सोयीप्रमाणे हवा तितका संकुचित व हवा तितका विस्तृत होऊ शकतो ! पूर्वी कोल्हापूर दरबारात वतने व जमिनी सरकारजमा होण्याचे इतके अनुचित प्रकारे चालले असता ब्रिटिश सरकारने एखादे कमिशन नेमण्यात सुचविल्याचे ऐकिवात नाही; पण सयाजीराव महाराज इलियटसाहेब व रावसाहेब बापट या त्रिवर्गांच्या रागावर कमिशन नेमण्यापर्यंत बडोद्यास पाळी आली. महाराज मात्र ते महाराज म्हणूनच या आगीतून बचावले. इलियट साहेबांना थोडीशी झळ लागली; पण तेही बचावले. गोऱ्या सिव्हिलियनला प्रत्यक्ष कोण काय करणार?

राहता राहिले बापट. तेव्हा 'अजापुत्रं बलि दद्यात्' या न्यायाने त्यांना यज्ञपशु बनविण्यात आले. १८९२ ते १८९३ या दोन साली मिळून सेटलमेंट खात्यावर दोन - तीन निरनिराळ्या दिशांनी हल्ले चढविण्यात आले होते. पहिल्या हल्ल्यात रेसिडेन्सी पक्षाच्या पहिल्या झटपटीतच निकाल लागला व फिर्यादींना आपले शब्द परत घ्यावे लागले. हे फिर्यादी म्हणजे त्या वेळचे

गुर्जर दिवाण मणिभाई जशभाई हे होते. दुसरा हल्ला १८९३ च्या प्रारंभाला महाराज विलायतेस गेले अशी संधी साधून करण्यात आला. त्यावेळी अशी तक्रार करण्यात आली की, इनाम खात्यातील बापट वगैरे अधिकारी सर्वस्वी स्वतंत्र व बेफाम रीतीने वागतात; पण हे कसे ते सिद्ध करा, असा इलियट साहेबांनी आग्रह धरताच हे आरोपाचे डोलारे कोसळले. फिरून दिवाण साहेबांना शब्द परत घ्यावे लागले. येवढेच नव्हे, तर महाराजांनी या खात्यातील लोकांना बक्षिसे व देणग्या दिल्या (६ एप्रिल १८९३) आणि बापटांना तर त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पेन्शन घेतल्यानंतर स्वतंत्र आसामी देण्याचे महाराजांनी जाहीर केले. तिसरा हल्ला बारखळी खात्यावर म्हणजे मुख्यतः बापटावर करण्यात आला. यावेळी इलियटसाहेब विलायतेस रजेवर गेले होते व त्यांच्या जागेवर आलेले मॅकॉनकीसाहेब हे शुंभ, लहरी व खुनशी असल्यामुळे कर्नल विडल्फ यांचे नामी साधले. १८९३ च्या नोव्हेंबरात इलियट साहेब विलायतेहून परत आल्यावर फिरून त्यांनी बापटांवरील आरोपांचे निकारण केले; पण १८९४ च्या एप्रिलमध्ये ते फिरून विलायतेस गेले व महाराजही तिकडेच गेले, असे पाहून दिवाण मणिभाई, रेसिडेंट विडल्फ व सेटलमेंट कमिशनर मॅकॉनकी यांचे त्रिकूट जमले. त्यांनी बापटांविरुद्ध सर्रास अर्ज घेण्यास सुरुवात केली आणि बापटांवर खटला भरण्याचा निश्चय झाला.

या प्रकरणात दिवाण व रेसिडेंट हे चालक असून, मॅकॉनकीसाहेब हे त्यांचे हस्तक बनले होते. मॅकॉनकी साहेबांचा स्वभाव खालसातील लोकांना अपरिचित नव्हता. ते सोलापूर, रत्नागिरी, नगर व नाशिक येथे कलेक्टर असताना त्यांनी आपल्या लहरी स्वभावाचे गुण पाघळलेले लोकांच्या स्मरणात होते. त्यांच्या इतका लहरी, खुनशी सिव्हिलियन झाला नसेल. कर्नल विडल्फ यांच्या कटात ते सामील होते. इतकेच नव्हे, तर आपण सेटलमेंट कमिशनर असता बारखळी खात्यावर बापटांची स्वतंत्र नेमणूक झाली हे त्यास मोठे वैषम्य वाटले होते. बापटांवर लाच खाल्ल्याचे आरोप ठेवून त्यांची चौकशी करण्याचे निश्चित झाल्यावर खुद्द मॅकॉनकी साहेबांनाच स्पेशल मॅजिस्ट्रेटचा अधिकार दरबार कौन्सिलकडून देण्यात आला. बापटांविरुद्ध पुरावा मिळविण्याकरिता बराबाईट कोणताही प्रकार शिल्लक ठेवण्यात आला नाही.

हे सर्व प्रकार चालू असताना बापट कामावरच होते. आपल्याविरुद्ध काहूर उसळत आहे याविषयी त्यांच्या कानावर नित्य नव्या बातम्या येत; परंतु त्यांना उघड हुकूम कोणताच दिला गेला नव्हता. महाराज व इलियट दोघेही विलायतेत. खुद्द दिवाणसाहेब आपल्यावर रुष्ट. चांगले मित्र म्हणविणारेदेखील घाबरून जाऊन बापटांचे काही का होईना; पण दरबारच्या रोषाची धग आपल्या घराला लागू नये म्हणून चार हात दूर राहू लागले. यामुळे रावसाहेब बापट गांगरून गेले असल्यास नवल नाही. अशा वेळी आपले मित्र टिळक यांची त्यांना आठवण होणे स्वाभाविक होते. टिळकांनीही आपल्या स्नेहाला स्मरून त्यांना हरेक प्रकारे मदत करण्याचे आश्वासन दिले. जून १५ च्या सुमारास टिळकांनी उभयतांचे स्नेही वासुदेवराव जोशी यांना बडोद्यास पाठविले व यापुढे बापटांना बडोद्यात राहू देणे हे घातक वाटल्यावरून त्यांना हर प्रयत्नाने पळवून नेण्याचा जोश्यांनी प्रयत्न केला. तारीख १८ जून १८९४ रोजी मुंबईस जाणारी गुजरात मेल बडोदे स्टेशनवर येण्याच्या सुमारास बापट व जोशी स्टेशनवर येऊन दाखल झाले. बरोबर फक्त जोशी

यांचेच सामान असून, बापटसाहेब जणू काय त्यास पोहोचविण्याकरिताच आले होते. बापटामागे पाळत ठेवून असलेले गुप्त पोलीस काही अंतरावर उभे राहून टेहळणी ठेवीत होते ! इतक्यात गाडीची शीळ झाली व गाडी चालू लागताच बापटसाहेबही फूटबोर्डावर पाय ठेवून जोशी यांच्या डब्यात उडी मारून बसले ! जोशी यांनी सेकंड क्लसची दोन तिकिटे आधीच काढून ठेवली होती. बापट डब्यात शिरलेले पाहताच गुप्त पोलिसांनी धावपळ सुरू केली; पण गाडी स्टेशनबाहेर केव्हाच निघून गेली. पोलिसांनी सूरत, नसारीपर्यंत तारा केल्या; पण रेल्वेच्या हद्दीत फौजदारी कायद्याचे सर्व अधिकार इंग्रज सरकारच्या स्वाधीन असल्याने व खात्यातील मॅजिस्ट्रेटाचे वॉरंट नसल्यामुळे बापटांना कोणीही प्रतिबंध करू शकले नाही. जोश्यांबरोबर बापट पुण्यात आले. ते पुढे महिना- दीड महिना फरारी असल्यासारखेच होते. ब्रिटिश पोलिसांच्या साहाय्याने बडोदा पोलिसांनी जंगजंग पछाडले; पण जोश्यांनी बापटांचा यत्किंचितही पत्ता लागू दिला नाही.

पण केवळ बडोद्याहून निघून आल्याने हे संकट टळणे शक्य नव्हते. ते फरारी झाल्यामुळे त्यांच्यावरील हे संकट सहजच बळावले. त्यांच्या शत्रूंना त्यांच्यावर आरोप ठेवण्यास उत्तेजन मिळाले. तारीख ३० जानेवारी १८९४ पासून बापटांना सस्पेंड करण्याचा हुकूम सुटला. तारीख १३ ऑगस्ट रोजी बापट कमिशन नेमले गेले. कमिशन नेमून चौकशी व्हावयाची ठरल्यावर बापटांना बडोद्याच्या बाहेर राहणे इष्ट नव्हते. अर्थात, ते आपण होऊन बडोद्यास परत जाऊन कमिशनपुढे हजर झाले. फिर्यादीतर्फे काम चालविण्याला त्या वेळचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर फिरोजशहा मेथा व नंतर मि. ब्रॅन्सन हे असून, त्यांना मुंबईचे प्रसिद्ध भाईशंकर हे मदत करीत होते. याशिवाय इनाम खात्यातील किडे, असंतुष्ट इनामदार, पैसेखाऊ, चहाडखोर, घरभेदे, कृतघ्न बनलेले नीच लोक वगैरेंची मदत होती ती निराळीच. याच्या जोडीला अप्रत्यक्ष मदत म्हटली म्हणजे महाराज व इलियट हे गैरहजर असल्यामुळे मैदान मोकळे सुटले होते ही होय. दिवाण मणिभाई जशभाई हे एका अर्थाने फिर्यादी असून, शिवाय दरबाराचे कोणते कागद कमिशनपुढे हजर करण्याकरिता परवानगी द्यावी व कोणते मागे ठेवावे, कोणते सापडत नाही म्हणावे व कोणते गुप्त म्हणून दाखवीत नाही असे म्हणावे, या सर्वांचा पूर्ण अधिकार दिवाण साहेबांकडे आलेला होता व तो त्यांनी मनसोक्त बजावलाही.

उलट बापट यांची स्थिती अगदी निराळी होती. दरबाराशी झगडण्याइतके द्रव्यबळ त्यांच्या संग्रही नव्हते. यामुळे त्यांना बॅरिस्टर देता आला नाही. प्रथम काही दिवस मुंबईचे हायकोर्टाचे वकील महादेव चिमणाजी आपटे व काही दिवस दाजी आबाजी खरे यांनी बापटांतर्फे काम चालविले. खुद्द बडोद्याचे वकील रामभाऊ गोखले यांनीही त्यांचे उघडपणे वकीलपत्र घेतले होते. तथापि, खरे बोलायचे म्हणजे वकिलांचे बहुतेक काम स्वतः टिळकांनाच करावे लागले. कमिशनपुढे झालेल्या पुराव्यातील मुख्य भाग फिर्यादीतर्फे साक्षीदारांचा होता व बहुतेक साक्षीदारांच्या पुराव्यात हिशोबी वह्यांचा संबंध येई. टिळक व बापट यांनी मिळून हे हिशोब तपासणीचे व त्यावरून उलट तपासणी करण्याचे काम इतके उत्तम केले की, कित्येक साक्षीदार खोटे ठरले एवढेच नव्हे, तर गिरधरलाल नानाभाईंसारख्या मुख्य साक्षीदाराच्या वह्या म्हणजे हिशोब खोटे आहेत व फिर्यादीच्या हाती या वह्या आल्यानंतरही त्यात खाडाखोडी, शोध घालणे वगैरे

गुन्हेगारीचे प्रकार घडून आले आहेत, असे पुराव्यानिशी त्यांनी फिर्यादीच्या गळ्यात बांधले. त्याचे एक कारण उघडकीस आलेले हे पुराव्याचे बनावट प्रकार होत असे सांगतात.

बापटांचा इन्साफ करण्याकरिता नेमलेले कमिशन इ. स. १८५० च्या ३७ व्या ॲक्टप्रमाणे नेमण्यात आले होते. त्याला डिपार्टमेंटल हेच स्वरूप खरोखर होते. म्हणजे ते न्याय इन्साफाचे कोर्ट नव्हते. बापटावरील लाचलुचपतीचे आरोप हे एक दरबारी प्रकरण होते. तो फौजदारी खटला नव्हता. तथापि, कमिशनने आपल्याकडे न्यायकोर्टाचा अधिकार आहे अशा समजुतीने वर्तन केले. बापटावर सुरुवातीस एकंदरीत ३६ आरोप होते; पण त्यातील अखेर १२ शिल्लक ठेवून त्याजवर निकाल देण्यात आला. त्यातील ११ मध्ये बापटांना दोषी ठरविले एवढेच नव्हे, तर दोषारोपाकरिता बापटास सहा महिने साधी कैद व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा देण्याबद्दल कमिशनने शिफारसही केली. ही गोष्ट त्यांनी सर्वस्वी अधिकाराबाहेरची केली इतकेच नव्हे, तर कायदेकानूनचे ज्ञान किंवा न्यायमनसुबीची खरी पद्धत आणि पुराव्याचा कायदा याचीही कमिशनला फारशी ओळख नाही, असे त्यांनी चालविलेले काम व दिलेला निकाल यावरून दिसून येण्यासारखे आहे. सुदैवाने कमिशनच्या हाती रिपोर्ट करण्यापलीकडे अधिक काही अधिकार नव्हता. अखेरचा हुकूम देणे ही खुद्द महाराजांच्या अधिकारातील गोष्ट होती. यामुळे बापटांना न्याय मिळण्याची आशा होती व अखेर ती काहीशी खरी ठरली. तारीख १९ जानेवारी १८९५ रोजी महाराज विलायतेहून परत आले. लवकरच त्यांनी बापट कमिशनचे प्रकरण हाती घेतले. खटल्यात दाखल झालेले सर्व कागद तसेच बापटांतर्फे मागणी करण्यात आलेले; पण दिवाणांच्या हुकुमाने गुप्त म्हणून ठेवण्यात आलेले सर्व कागद महाराजांनी रा. ब. पंडित व दलाल या दोघा कायदेपंडितांकडे अभिप्रायाकरिता दिले. या दोघांचा अभिप्राय असा पडला की, काही थोड्या अरोपाखेरीज करून इतर सर्व खटल्यात बापट निर्दोषी आहेत; पण थोडीशीही शंका राहू नये म्हणून पुन्हा बडोदा हायकोर्टातील एक पारशी जज्ज व खुद्द दिवाणसाहेब यांचा अभिप्राय घेऊन दोघांच्या अभिप्रायाने निम्म्याहून अधिक खटल्यात बापट हे निर्दोषी ठरल्यामुळे महाराजांनी बापट साहेबांस स्वतः निर्दोषी ठरविले. मात्र नोकरीवर परत रूजू करून घेतले नाही. याचा अर्थ उघडच आहे. तो असा की, बापटांवरील मुख्य आरोपासंबंधाने जरी महाराजाचे मन निःशंक होते, तरी 'जमिनीवर शेण पडले तर ते थोडीबहुत माती घेऊन वर उठते' या म्हणीप्रमाणे काही किरकोळ बाबतीत महाराजांच्या मनात किंतू राहिला. शिवाय ब्रिटिश सरकारच्या क्रोधाचे जे येवढे भूत उभे राहिले ते निदान घासभर तरी बळी घेतल्याशिवाय संतुष्ट व्हावयाचे नाही, हे लक्षात घेऊन महाराजांनी बापटांना प्रत्यक्ष नोकरीवरून दूर करून आपल्या शत्रूंशी समेट केला. तथापि, बापट यांना १२५ रुपये पेन्शन महाराजांनी करून दिले व आमरणान्त त्यांच्यावर त्यांचे प्रेम कायम राहिले होते. सन १९१५ साली बापट साहेब, त्यांचा थोरला मुलगा व त्यांची पत्नी ही सर्व एकदम निवर्तल्यामुळे बापट साहेबांचा धाकटा मुलगा उघडा पडलेला पाहून त्याच्या अभ्यासाकरिता महाराजांनी दरमहा तीस रुपये शिष्यवृत्ती चार वर्षे देण्याचा हुकूम केला. बापट हे कमिशनच्या निकालानंतर पुण्यास येऊन राहिले व त्यांचा अखेरचा काळ टिळकांच्या सान्निध्यात गेला. बापट व टिळक यांच्या स्वभावात जमीनआसमानाचा

फरक असता, दाजीसाहेब खऱ्याप्रमाणेच बापटाशीही टिळकांचा स्नेह आमरण अखंड राहिला. बापट वारल्यावर त्यांच्या मुलाची सर्व प्रकारे व्यवस्था लावून देऊन महाराजांकडे त्याच्याकरिता खटपट करून तो स्नेह त्यांनी बापटांच्या मरणोत्तरही चालविला.

खुद्द सयाजीराव महाराज व टिळक यांची ओळख कमिशनच्या पूर्वीची होती; पण कमिशनमुळे दृढ झाली हे स्वभाविकच होय. कमिशनचे काम करताना टिळक स्वतःच्या स्नेह्याच्या बचावाकरिता झटत होते हे जरी प्रथमदर्शनी खरे असले, तरी अंतरंगात आपण महाराजांनाही मदत करीत आहोत अशी जाणीव जशी टिळकांना होती, तशी ती महाराजांना नसणे अशक्य आहे.

बापट व इलियट या उभयतांच्या संबंधाने चार ओळी लिहून हे प्रकरण पुरे करतो. पुष्कळ लोकांना अशी शंका असावी की, इलियट साहेबांना बापटांची हुशारी पटली असली तरी त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी त्यांची खात्री पटली नव्हती. तशी असती तर विलायतेहून मुद्दाम येऊन त्यांनी बापटांतर्फे कमिशनपुढे साक्ष दिली असती; पण या शंकेचे उत्तर समाधानकारक असून, खुद्द इलियट साहेबांच्या पत्रावरून त्यांचा अभिप्राय असा दिसतो की, ''ज्याअर्थी केवळ बापटांच्या हुकुमावरून निकालात निघालेल्या इनाम चौकशीचा संबंध या लाचलुचपतीच्या खटल्यात आणला गेला होता व या बहुतेक प्रकरणात ज्यांच्याकडून लाच घेतल्याचा आरोप होता. त्यांना कोणतीही फलप्राप्ती झाल्याचा पुरावा फिर्यादीस करता आला नाही, त्याअर्थी मी पुरावा देण्याकरिता आलो नाही तेच बरे. कारण परस्पर निर्णय लागतो. उलट मी आल्याने बापटांवर अधिक आग पाखडली गेली असती.'' ता. ६ डिसेंबर १८९४ च्या पत्रात ते लिहितात : "Do you see why I kept away ? I should have been swept off my legs and the attack would have been without any assistance at the end. I write freely because I am writing privately and above all because I still belive that the charges do not shake my confidence in you."

८.

दिल्ली दरबार : इ. स. १९११

महाराजांच्या कारकीर्दीत गाजलेल्या बापट कमिशनच्या प्रकरणानंतर सुमारे पंधरा वर्षांनी दिल्ली दरबारचे दुसरे उपद्व्यापी प्रकरण निर्माण झाले. बापट प्रकरणातील मुख्य नायकाची भूमिका वासुदेवराव बापट यांच्याकडे असून, स्वतः महाराजांचा त्या प्रकरणाशी दुरचा संबंध होता. दिल्ली दरबार प्रकरणात मुख्य नायकाची भूमिका त्यांच्यावर लादण्यात आली. हे प्रकरण १९११ साली हिंदुस्थानात व हिंदुस्थानच्या बाहेर इतके गाजले की, त्यामुळे महाराजांवर एका पक्षाकडून स्तुतीचा व दुसऱ्या पक्षाकडून अकारण निंदेचा नुसता वर्षाव झाला. तसे म्हटले तर असे होण्याचे काहीच कारण नव्हते, हे खाली दिलेल्या हकीकतीवरून कळेल.

बादशहा पंचम जॉर्ज व महाराज्ञी मेरी ही दोघे बादशहा व महाराणी या नात्याने हिंदुस्थानात आली होती. दिल्ली येथे त्या प्रीत्यर्थ मोठा दरबार ता. १२ डिसेंबर १९११ रोजी भरविण्यात आला. दरबाराप्रीत्यर्थ हिंदुस्थानातील बहुतेक संस्थानिक आपापल्या वैभवासहीत तेथे आले. दरबाराप्रसंगी बादशहाचे भाषण वाचून दाखविणे झाल्यावर व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिज हे सिंहासनाजवळ आले व त्यांनी आपल्या पद्धतीप्रमाणे मुजरा केला. त्यानंतर मुख्य सेनापती आणि गव्हर्नर-जनरलच्या एक्झिक्युटिव कौन्सिलचे सभासद यांचे मुजरे झाले. त्यानंतर हैद्राबादचे निजाम यांनी बादशहाना मुजरा केला नंतर महाराजांची पाळी आली. त्या दिवशी सकाळपासून त्यांचे मन काही खासगी गोष्टीमुळे व्यग्र होते. हैद्राबादच्या निजामांनी कोणत्याप्रकारे मुजरा केला हे पाहण्याच्या मनःस्थितीत ते नव्हते. त्यामुळे त्यांची पाळी आल्यावर ते सिंहासनाजवळ गेले आणि त्यांनी एकदा आपले मस्तक नम्र केले. त्यावेळी कोणीकडून बाहेर जायचे हे माहीत नसल्यामुळे ते फिरले आणि त्यांची पाट बादशहा व महाराणी यांच्याकडे झाली !

झाले, महाराजांना कल्पनाही नव्हती की, अशा तऱ्हेने वागण्यात आपण कोणाचा अपमान करीत आहोत. बडोद्याच्या रेसिडेंटाने त्यांना त्यांनी केला तशा प्रकारचा मुजरा करायला शिकविले

होते, तसेच कुठल्या वाटेने जावयाचे तेही कोणी सांगितले नव्हते. मनात अनादराची अंधुकही कल्पना न ठेवता ते आपला आदर व्यक्त करण्याकरिता सिंहासनाजवळ गेले होते; पण त्यांच्या शत्रूंना त्यांच्या वागणुकीत बादशहा व महारानी यांचा अपमान करण्याची वृत्ती दिसून आली ! त्यातच आणखी एका गोष्टीची भर पडली. महाराज दरबाराला गेले त्यावेळी त्यांनी आपला जी. सी. एस. आय.चा चांद गळ्यात घातला नव्हता. तो त्यांनी मुद्दाम घातला नव्हता, असे नाही. त्यांनी चांद न घातल्याची चूक रेसिडेंटांनीही त्यांच्या नजरेस आणली नव्हती. असे असून त्यांच्यावर स्वामीनिष्ठेचा अभाव असल्याचा आरोप करण्यात आला ! त्यावेळी महाराजांच्या लक्षात ही गोष्ट आली नाही. ते गर्व्हमेंट हाऊसमध्ये लॉर्ड सिडनहॅम यांना भेटायला गेले त्यावेळी ते घरी नाहीत, असे त्यांना सांगण्यात आले ! असे का हे त्यांना त्यावेळी कळले नाही. दुसरे दिवशी गोपाळ कृष्ण गोखले त्यांच्या भेटीला आले व त्यांनी महाराजांच्या वर्तनाबद्दल खूप खळबळ उडाली असल्याचे त्यांना सांगितले, तसेच महाराजांकडून माफीची अपेक्षा सरकार करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यावरून पुढे महाराजांनी व्हाइसरॉय यांना खालील पत्र लिहिले :

''प्रिय लॉर्ड हार्डिंज,

मी सार्वभौम बादशहांना ज्या पद्धतीने मुजरा केला त्या पद्धतीविरुद्ध अप्रिय टीका सुरू आहे असे ऐकतो. खरोखर काय घडले हे कळण्याकरिता मी आपणाला ताबडतोब लिहीत आहे. ज्यामुळे सार्वभौम बादशहा नाराज होतील, असे काहीही करण्याचा माझा हेतू नव्हता. त्यांच्याबद्दल व त्यांच्या सिंहासनाबद्दल मला वाटत आलेली स्वामिनिष्ठा ही ज्या वागणुकीमुळे शंकास्पद ठरेल असे काहीही करण्याचा माझा हेतू नव्हता, असे मी आपणाला आश्वासन देतो. बडोदे संस्थान ब्रिटिश सरकारचे अत्यंत आभारी आहे. त्या सरकारशी मी व माझे संस्थान ही नेहमी कृतज्ञ व एकनिष्ठ राहू. सिंहासनाजवळ येण्यात व तेथून परत जाण्यात माझ्या हातून शिष्टाचाराचा भंग झाला असे सांगण्यात येते. हे खरे असले तर ते बादशहा व महाराज्ञी यांच्या सान्निध्याने मी घाबरल्यामुळे माझे असेल. माझ्यापूर्वी एकट्या निजामांनी मुजरा केला होता आणि दरबारच्या घाईत त्यांनी कसा मुजरा केला हे पाहायला मी विसरलो होतो. मुजरा झाल्यावर मी काही पावले मागे परतलो आणि कोणत्या वाटेने जावयाचे ते विचारू लागलो. रस्ता विचारण्याकरिता मी फिरलो इतक्यात माझ्या मनात गोंधळ उडाला आणि मी गोलगोल फिरत राहिलो. या माझ्या चुकीबद्दल मी फार दिलगीर आहे, असे आपणाला कळवितो.''

व्हाइसरॉय यास महाराजांचे पत्र तारीख १४ डिसेंबर रोजी मिळाले व तारीख १६ डिसेंबर रोजी ते सर्वत्र जाहीर करण्यात आले. लंडन येथे दोन दिवस उशीरा याची हकीकत जाऊन पोहोचली आणि तेथील 'टाइम्स' पत्राने तर महाराजांवर आग पाखडली. १९०५ सालापासून महाराजांच्या राज्यकारभारातील चुका दाखवून ते ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ कसे नाहीत, हे दाखविण्याचा उपद्व्याप टाइम्सकारांनी केला. बडोद्यात बरेच जहाल लोक येऊन राहतात, त्यांना सरकारी नोकऱ्या मिळतात, महाराजांच्या खासगी खात्यातही त्यांचा प्रवेश होतो, वगैरे

हकीकतीही याच पत्रात प्रसिद्ध झाल्या आणि ही सर्व टीका का, तर राष्ट्रीय वृत्तीची जहाल पत्रे कधी सयाजीराव महाराजांवर टीका करीत नाहीत म्हणून !

पॅरिस येथील 'तेम्पस'ने दिल्ली येथील बातमी प्रसिद्ध करून वर असे लिहिले की, गायकवाड ब्रिटिशांविषयी वाटत असलेला द्वेष मुळीच लपवून ठेवीत नाहीत ! 'लंडन टाइम्स'मधील लेखाला महाराजांनी व्यवस्थित उत्तर दिले. क्रांतिकारकांचा व बडोदे संस्थानचा टाइम्सने जोडून दाखविलेला संबंध किती खोडसाळपणाचा आहे, हेही महाराजांनी बरोबर दाखविले. विशेष मौज पुढे अशी झाली की, ज्या क्रांतिकारक गृहस्थांशी महाराजांचा संबंध लावण्यात आला होता त्यानेच पुढे येऊन सांगितले की, गेल्या ४ वर्षांत आपला व गायकवाडांचा पत्रव्यवहारदेखील नाही. उलट आपण त्यांची आपल्या पत्रांत चांगलीच निर्भर्त्सना केली आहे.

या धुमसत असलेल्या आगीत ता. १ जानेवारी १९१२ रोजी तेल ओतण्यात आले. ते अशा रीतीने की, लंडन येथे दिल्ली दरबाराची फिल्म दाखविण्यात आली. त्यात महाराज मुजरा करीत असल्याचा देखावाही होता. त्यामुळे साहजिकच इंग्लंडातील नेमस्त पक्षाचे लोक व कुटील वर्तमानपत्रकार महाराजांवर खूप रागावले. पुढे ऑक्टोबरमध्ये हिंदुस्थानच्या व्हाइसरॉय साहेबांचे बंधू व्हायकौट हार्डिज यांनी आपल्या एका व्याख्यानात दिल्ली दरबाराचा उल्लेख करून त्यात महाराजांना उद्धट, बेमुर्वतखोर म्हटले ! त्याला 'पॉलमाल गॅझेट'मध्ये 'माहितगार' असे नाव घेतलेल्या गृहस्थाने सणसणीत उत्तर दिले व महाराजांची वागणूक मुळीच बेइमानी दर्शविणारी नव्हती, असे सिद्ध केले. पुढे या उत्तराला त्याच पत्रात 'जास्त जाणणारा' या टोपण नावाने दुसऱ्या एकाने प्रत्युत्तर देऊन त्यात व्हायकौट साहेबांची मते पुन्हा एकदा जोरदार भाषेत व शिवराळ शब्दांत मांडण्यात आली.

अशा तऱ्हेने या दिल्ली दरबार प्रकरणाने जिकडे तिकडे बरीच खळबळ उडवून दिली. वास्तविक महाराजांनी दिलगिरीप्रदर्शक पत्र पाठविल्यानंतर हे प्रकरण मिटावयाला हवे होते; पण ते मिटू नये असे महाराजांच्या काही इंग्रज शत्रूंना वाटत होते. म्हणून त्यांनी खाजवून खरूज काढावी त्याप्रमाणे जुन्या गोष्टी उकरून काढून महाराजांची बदनामी सुरू केली. महाराजांविषयी अशा प्रकारची त्यांची मते व्हायला महाराजांच्या दृष्टीने थोडीशी प्रतिकृत कारणे झाली त्याचाही इतिहास मोठा मनोरंजक आहे.

महाराज आपल्या स्वतःच्या व महाराणी साहेबांच्या प्रकृतीच्या स्वास्थाकरिता विलायतेत मधूनमधून जात. त्यांच्याबरोबर त्यांची मुले व अधिकारी मंडळीदेखील जात. हे जाणे कर्झन साहेबांना न आवडून त्यांनी देशी संस्थानिकांना उद्देशून एक फर्मान काढले. कोणत्याही संस्थानिकाने हिंदुस्थान सरकारची परवानगी घेतल्यावाचून विलायतेत जाता कामा नये, तसेच अशी परवानगी मिळाल्यावरही आपण ते काय काय करणार, कोठे कोठे जाणार याविषयी त्याने अगोदर माहिती पुरवावी वगैरे मजकूर त्या फर्मानात होता. 'टाईम्स'पत्रात त्या फर्मानाचा उल्लेख करून शेवटी असे म्हटले होते की, बडोद्याच्या गायकवाडांसारखे जे संस्थानिक आपल्या संस्थानाबाहेर हिंडत असतात त्यांच्यावर या फर्मानाचा चांगला परिणाम होईल असे वाटते. महाराज त्यावेळी विलायतेत

होते. महाराणी साहेबांची प्रकृती नादुरुस्त होती. कर्झन साहेबांचे फर्मान असूनही महाराज काही दिवस आलेच नाहीत. त्यामुळे हिंदुस्थान सरकार व अँग्लो-इंडियन पत्रे यांच्या जिवाचा नुसता तिळपापड झाला. हिंदी संस्थानिकांच्या हक्कांची पायमल्ली होऊ नये म्हणून महाराजांनी त्यावेळी खूप प्रयत्न करून पाहिला; पण हिंदी संस्थानिकांची एकंदर स्थितीच अशी विलक्षण होती की, त्यांना काहीही उघडपणे करता येईना.

अँग्लो-इंडियन पत्रांचा महाराजांवर रोष असण्याचे कारण असे की, देशी वर्तमानपत्रात महाराजांची अनेकवेळा त्यांच्या विविध सुधारणांबद्दल स्तुती येई. 'अमृताबझारपत्रिकें'त महाराज ज्या हिमतीने आपली बाजू पुढे मांडीत त्याबद्दल प्रशंसोद्‌गार येत. या सर्वांचा परिणाम म्हणजे महाराजांविषयी अँग्लो-इंडियन पत्राच्या मनांत अप्रीती उत्पन्न होण्यात झाला. त्यात भर म्हणून इ. स. १९०७-०८ मध्ये काही प्रसंग घडले. त्यावेळी बंगालची फाळणी नुकतीच होऊन हिंदुस्थानभर असंतोषाची लाट पसरली होती. तिला शमविण्याकरिता हिंदुस्थान सरकारने रुद्रावतार धारण करून ठिकठिकाणच्या क्रांतिकारकांना पकडून देशनिकाल करण्याचे व्रत सुरू ठेवले होते. त्यावेळी श्रीमंत सयाजीराव महाराज यांना हिंदुस्थान सरकारने क्रांतिकारकांना पकडण्यात मदत करण्याविषयी लिहिले. त्यावेळी महाराजांनी आपल्या राज्यात कोणी क्रांतिकारक असल्याचे आपल्या ऐकण्या, पाहण्यात नाही असे उलट लिहिले. हे त्यांचे उत्तर काही अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांनी भलत्याच स्वरूपात प्रसिद्ध केले. महाराज हे मनातून क्रांतिकारकांना मदत करीत असतात, असाही आरोप त्या कुटील पत्रांनी केला.

यावेळी महाराजांची स्थिती फारच नाजुक होती. त्यांना आपल्या राज्यांतील प्रजाजनांपैकी उगीच कोणाला सरकारच्या क्रोधाग्नीला बळी द्यावयाचे नव्हते. तसेच आपण साम्राज्याशी एकनिष्ठ आहोत असेही दाखवायचे होते. अशा स्थितीत ब्रिटिश सरकारकडून त्यांच्या राज्यात असलेले मि. के. जी. देशपांडे हे राजद्रोहात सामील असल्याची बातमी आली. रा. देशपांडे अमरेली येथे सुभ्याच्या जागेवर होते. त्यांच्यावर काम चालून राजद्रोहाविषयी काहीच पुरावा सापडेना, तरी पण महाराजांना रा. देशपांडे यांस बडतर्फ करावेच लागले. महाराजांनी देशपांड्यांना दहा हजार रुपये भरपाई म्हणून दिले. ते देताना महाराजांच्या मनात आरोप शाबीत होणे महत्त्वाचे असते, आरोप ठेवणे नसते, हेच असावे असे दिसते.

कर्झनशाहीचे दिवसच असे होते की, मनात शुद्ध हेतू ठेवणाऱ्यावरही सरकारची केव्हा वक्रदृष्टी होईल याचा नेम नव्हता. १९०८-१९०९ साली तर जिकडे तिकडे राजकीय वावटळ उठलेले. त्यात महाराजांचे व रेसिडेन्सीचे ठीक नव्हते. अनेक राज्यकारभाराच्या गोष्टीत महाराज नसले की, रेसिडेन्सीचे लोक ढवळाढवळ करीत. त्यावरून चिडून महाराजांनी एकदा व्हाइसरॉय यांनाही लिहिले होते. संस्थानिकांचा दर्जा कमी कमी केला जात असलेला पाहून महाराजांना वाईट वाटले. १९०३ सालच्या दरबारापासून महाराजांनी निर्भीडपणे स्वतःला वाटेल ते सरकारला लिहून कळविण्याचा परिपाठ ठेवला होता. तसे लिहिण्यात सार्वभौम सत्तेविषयी त्यांचा काही अनादर होता, असे मुळीच नाही; पण ते तत्त्वाकरिता, संस्थानिकांच्या हक्काकरिता भांडत असत. त्यांचे हे करणे कमी बुद्धीच्या रेसिडेटांना व अँग्लो-इंडियन पत्रकारांना शंकास्पद व

दोषास्पद वाटे. दिल्ली दरबार प्रकरणाच्या वेळी त्यांनी जी एवढी कोल्हेकुई केली तिच्या पाठीमागे करणे आहेत. ती वर दर्शविल्याप्रमाणे स्वतः महाराजांच्या ठिकाणी त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांपैकी एकही संभवत नव्हता. केवळ चूक म्हणून करण्यात आलेल्या एखाद्या गोष्टीचा एवढा गवगवा होईल असे त्यांच्या ध्यानीमनीही नव्हते; पण ध्यानीमनी नसलेल्या गोष्टीच कित्येक आगलावे वर्तमानपत्रकार नेहमी करीत असतात. दिल्ली दरबार प्रकरण हे त्यापैकीच एक समजावयाचे.

●●●

९.
विविध सुधारणा

श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या चौसष्ट वर्षांच्या कारकीर्दीची विशिष्टता काय म्हणून कोणी आम्हाला विचारल्यास आम्ही त्याला सुधारणा-सुधारणा-सुधारणा असे त्रिवार सांगू. आयुष्यभर महाराजांनी आपल्या राज्यात नवीन नवीन सुधारणा इतक्या केल्या की, महाराजांचे चरित्र म्हणजे एक प्रकारे या विविध सुधारणांचा इतिहासच होय. महाराज येण्यापूर्वीची बडोद्याची स्थिती काय होती ती आपण मागेच पाहिली. खुद्द महाराजांच्या मनात ती कायम ठेवण्याचें आले असते, तर त्यात त्यांचे काही नुकसान झाले असते असे नाही. हिंदुस्थानातील इतर चार संस्थानिक जसे चैनीत दिवस घालवितात तसे महाराजही करू शकले असते; पण मग आपण त्यांचे चरित्रही लिहिण्याला बसलो नसतो. महाराजांची राजेपणाची कल्पना अगदी भिन्न होती. प्रजाहित, प्रजेची प्रगती, प्रजेचे सुख या गोष्टींत राजेपणा सामावला आहे असे त्यांना वाटे. यामुळे त्यांनी अनेक लोकोपयोगी सुधारणा घडवून आणल्या. त्या कोणकोणत्या ते आता आपण क्रमाक्रमाने पाहू.

सर टी. माधवराव यांनी आपल्या कारकीर्दीत मुलकी खात्यात बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या होत्या. जेथे जमिनीची लागत फार होती तिथे ती त्यांनी कमी केली, जेथे वसूल खूप थकले होते, तेथे त्यांनी सूट दिली. अशा तऱ्हेने त्यांनी काही उपयुक्त गोष्टी केल्या; पण जमिनीची पाहणी, शास्त्रशुद्ध मापणी, शास्त्रशुद्ध विभागणी तसेच नियमांची दुरुस्ती व निर्मिती. वगैरेसंबंधी तपासणी या गोष्टी त्यांनी केल्या नव्हत्या. त्यामुळे महाराजांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यावर ही कामे ताबडतोब सुरू केली. इ. स. १८८३ साली या कामाकरिता सर्व्हे सेटलमेंट नावाचे नवीन खातेच निर्माण करण्यात आले. या खात्याने संस्थानभर मोजणी, मापणी, जमिनीची लागत, मुंबई इलाख्यात चालू असलेल्या पद्धतीप्रमाणे ठेवली. म्हणजे असे की, अमूक एका शेताची लागत ठरविताना आदल्यावर्षी त्या शेतात किती उत्पन्न आले होते ते प्रथम पाहायचे. नंतर गेल्या वर्षांत किती उत्पन्न आले ते पाहावयाचे, पुढे अंदाजी काय उत्पन्न येईल हे

ठरवायचे. जमिनीच्या साऱ्यात, जमिनीच्या दरात वाढ झाल्याखेरीज, वाढ करायची नाही ते लक्षात ठेवून सारा ठरविला जाई. जमिनीच्या उत्पन्नातून शेतकऱ्याची मजुरी, औत वगैरे जिनसांबद्दल होणारा खर्च किंवा त्याप्रीत्यर्थ वाया जाणारे व्याज वगैरे वजा करून नंतर जे उत्पन्न बाकी राहील त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक रक्कम साऱ्यादाखल मुळीच घ्यावयाची नाही. समजा एखाद्या शेताचे उत्पन्न शंभर रुपये आहे, त्यातून मजुरी, औत व बियाणांकरिता होणारा खर्च वजा जाता ३० रुपये निव्वळ उत्पन्न राहील, तर त्या शेतकऱ्याला सरकार सारा म्हणून पंधरा रुपयांपेक्षा जास्त द्यावा लागू नये. म्हणजे ठोकळ हिशोब असा की, एकंदर उत्पन्नापैकी एक-पष्ठांश शेतसारा किंवा निव्वळ उत्पन्नापैकी एक-द्वितीयांश शेतसारा घ्यावयाचा.

जमिनीच्या मापातही बदल करण्यात आला. पूर्वी बडोदे संस्थानात काही ठिकाणी कुंभ्यांची पद्धती होती, तर काही ठिकाणी बिघ्याचे माप होते. मापांचा सारखेपणा राहावा या हेतूने संस्थानात सर्व जमिनी बिघ्याच्या रूपाने मोजल्या गेल्या. त्यानंतरची सुधारणा म्हणजे सर्व्हे नंबर किंवा मापणी अंकाची संस्थानभर असे सर्व्हे नंबर ठरविण्यात आले व ते अमूक एका मापापेक्षा कमी नसत. खुद्द जमिनीसंबंधाने वर्गवारी करण्यात आली. ज्या जमिनीत रुपयास सोळा आणे पीक येते, त्या जमिनीचा सारा बिघ्यास तीन रुपये, ज्या जमिनीत रुपयात आठ आणे पीक येते त्या जमिनीचा सारा बिघ्यास दीड रुपया. अशा तऱ्हेने जमिनीचा कसही ठरविण्यात आला.

एकदा ठरलेल्या शेतसाऱ्यात निदान पंधरा वर्षे तरी बदल करण्यात येत नसे आणि बदल करतानाही जमिनीच्या उत्पन्नात व स्थितीत फरक झाला असल्यावाचून बदल होत नसे. सर्व संस्थानभर रयतवारी पद्धती सुरू होती. प्रत्येक शेतकऱ्याकडून रोकड सारा सरकार स्वतः घेई आणि जोपर्यंत शेतकरी नियमित सारा भरत असे तोपर्यंत जमीन त्याच्या ताब्यात असे.

सर्व्हे सेटलमेंटच्यापूर्वी बडोदे संस्थानात जमिनीसंबंधाने निराळ्या पद्धती होत्या. भागबटाई नावाच्या पद्धतीत शेतसारा रोकड न घेता जे पदार्थ तयार असतील, त्या पदार्थांतच सारा घेण्यात येई. या पद्धतीत एक फायदा असा होता की, जेवढे व जसे उत्पन्न जमिनीत येई, त्या प्रमाणात व तसा शेतसारा म्हणून द्यावा लागे. एखादेवेळी काही द्यावे लागत नसे; पण त्याच्याबरोबर या पद्धतीत तोटे पुष्कळ होते. शेतकऱ्याला आपले पीक अमूक एका ठिकाणी न्यावे लागे. तेथे सरकारी अधिकाऱ्याच्या मनाला येईल तेवढी भागबटाई व्हावयाची आणि सर्वात मोठा त्रास म्हणजे तोपर्यंत शेतकऱ्याला आपल्या पिकाचे काहीच करता येत नसे. सरकारला त्रास होई तो हा की, हे पीक साठविण्याचा व संधी येईल तेव्हा व्यवस्थितपणे विकण्याचा.

दुसरी पद्धत हळबंदी नावाची होती. ती कडी प्रांतात व बडोदे प्रांताच्या एका महालात सुरू केली होती. या पद्धतीत शेतसारा आकारण्यात येई. तो नांगराच्या व बैलांच्या संख्येवर. एखाद्या शेतात दोन नांगर आणि चार बैल काम करीत असले तर त्यांच्याकडून विशिष्ट प्रकारचा आकार घेण्यात येई. या पद्धतीत अर्थातच तर्कशुद्धपणा जवळ जवळ नव्हताच. एखादा शेतकरी नांगर व बैलांची एक जोडी घेऊन आपले १० एकरी शेत नांगरील, तर दुसरा बैलांच्या दोन जोड्या ठेवून तेवढेच शेत नांगरील; परंतु या दोघांत दुसऱ्याला मात्र पहिल्यापेक्षा दुप्पट सारा द्यावा लागे! ही पद्धत उघड उघड अन्यायमूलक होती आणि ती नष्ट करण्यात आली.

तिसऱ्या पद्धतीत शेतसारा टेहळणी करण्याकरिता उभारलेल्या माचव्यावरून अंदाजी ठरविण्यात येई. शेतकरी आपल्या शेतात राखण करण्याकरिता असे माचवे उभारतो; पण असल्या माचव्यावरून शेतसारा ठरविणे म्हणजे विवेकशक्तीला सोडचिठ्ठी देण्यासारखे आहे.

या पद्धतीशिवाय मालगुजारी पद्धतीसारखी नारवादारी पद्धत पेटलाद व भादरण तालुक्यांत सुरू होती. या पद्धतीने अमूक गावाच्या शेतसाऱ्याबद्दल एखादी व्यक्ती जबाबदार असे आणि ती वाटेल त्याला आपल्या इच्छेप्रमाणे वाटेल त्या मुदतीपुरती जमीन देऊ शके. भागदारी पद्धत अशाच स्वरूपाची होती व ती कामरेज तालुक्यात सुरू होती. याखेरीज मेहवसी नावाची पद्धत होती. त्यात ठाकरडे नावाच्या गावातील मुख्यांकडे शेतसारा वसूल करण्याचे काम असे. हे ठाकरडे छोट्याशा संस्थानिकासारखे असत. त्यांच्या गावातील शेतसारा जमा करणे व गावाची देखरेख राखणे वगैरे कामे त्यांच्याकडे असत.

कोमवारी नावाच्या पद्धतीत विशिष्ट कोम किंवा जातीला विशिष्ट कर द्यावा लागे. कोळ्यापेक्षा कुणब्याला तिप्पट सारा द्यावा लागे ! एके काळी ही पद्धत निर्दोष ठरली असेल; पण हल्लीच्या काळात सर्व जाती समान भूमिकेवर येऊ पाहत असताना ही पद्धत चालू ठेवणे अशक्यच होते. त्यामुळे इतर शेतसारा घेण्याच्या पद्धतीप्रमाणे ही पद्धत बंद करण्यात आली. याबद्दल सर्वत्र रयतवारी पद्धत सुरू करण्यात आली. या पद्धतीमुळे लोकांना सारखा न्याय मिळून सरकारचे कामही सोपे झाले. याच खात्यात दुसरी महत्त्वाची सुधारणा महाराजांनी केली, ती लॅंड रेव्हेन्यू कोड तयार करण्याची सर टी. माधवरावांच्या वेळी जमिनीच्या बाबतीत वेळोवेळी हुकूम व फर्मान सोडण्यात येत; पण त्यांना व्यवस्थित नियमांचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे महाराजांनी एक नियमशाखा काढून तिच्याकडे नियम करण्याचे काम सोपविले. हे सर्व नियम तयार झाल्यावर १ एप्रिल १९१५ पासून लॅंड रेव्हेन्यू कोड सुरू झाला.

बारखळी जमीनीच्या बाबतीत अशीच महत्त्वाची सुधारणा महाराजांनी केली. बारखळी म्हणजे बहार-खळी म्हणजे खळ्याबाहेरची. ज्या जमिनीला शेतसारा संपूर्ण द्यावा लागत नसे किंवा काही अंशाने द्यावा लागे तिला बारखळी म्हणत. यात देवस्थान, पीरस्थान, धर्मादाय, चाकरियात, वेचणिया, धारणीया वगैरे प्रकारच्या शेतसाऱ्याची सूट मिळालेल्या जमिनी असत. देवस्थान व पीरस्थान जमिनी हिंदू व मुसलमान यांच्या देवदेवताना दिलेल्या असत. देवतांची सेवा करण्याबद्दल दिलेल्या जमिनींना चाकरियात धर्मदाय म्हणत व ब्राह्मण, भाट, चारण, गोसावी, अतिथी यांना देण्यात आलेल्या जमिनींना जात धर्मदाय म्हणत. याखेरीज इनामी जमिनी असत त्या वेगळ्या. या जमिनी मागच्या महाराजांनी मागचा-पुढचा विचार न करता आपल्या मित्रांना दिलेल्या होत्या आणि अशा तऱ्हेने संस्थानचा पुष्कळ भाग सरकारच्या मालकीतून सुटल्यासारखा होता. तेव्हा या जमिनीचे पुढे भविष्य काय, हे ठरविण्याकरिता एक खाते निर्माण करण्यात आले. या खात्याने बारखळी जमिनीची चौकशी करून खरोखरीचे जे लोक मालक नव्हते त्यांच्यामागे शेतसारा लावला. सरदार, शिलेदार, दरकदार, वतनदार, गाणारे, पारेख, नाचणाऱ्या बाया, बारगीर वगैरे झाडून झटकून सर्व मंडळींच्या हक्कांचे संशोधन होऊन ज्यांचे हक्क योग्य वाटले त्यांच्या जमिनी तशाच ठेवल्या व बाकी सर्व सरकारजमा करण्यात आल्या.

अशा तऱ्हेने जमिनीच्या बाबतीत जो गोंधळ माजला होता तो कमी करण्यात आला. जुन्या काळी निरनिराळ्या प्रकारचे कर लोकांना द्यावे लागत. यांना 'वेरा' म्हणत. वाणिया वेरो, गामवेरो, सराफ वेरो वगैरे प्रकारचे कर असत. त्यांच्याबद्दल आयपत वेरो म्हणजे ऐपतीचा कर सरसहा सर्वांपासून विशिष्ट नियमांप्रमाणे घेण्यात येई. १८९६ साली पादरा तालुक्यात इतर करांच्या ऐवजी सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांकडून अमूक एक उत्पन्नावर हा कर घेण्यात येऊ लागला. पुढे ही पद्धत चांगली व सोयिस्कर वाटल्यावरून सर्व संस्थानभर ऐपतीचाच कर सुरू करण्यात आला.

ग्रामपंचायतींच्या बाबतीत महाराजांनी विशेष लक्ष पुरविले. हिंदुस्थानचे वैशिष्ट्ये खरोखर या ग्रामपंचायतींत आहे. पूर्वीच्या वेळेला प्रत्येक गाव आपापल्या परीने स्वतंत्र व स्वयंपूर्ण असे. प्रत्येक गावात एखादा पाटील, चौकीदार, सुतार, शिंपी, लोहार, तांबट असे इतर धंद्यांचे लोक असत. गावात उत्पन्न होणारे प्रश्न या जातींचे पंच सोडवीत. हिंदुस्थानात राजपूत, मुसलमान, मराठे, इंग्रज वगैरे आळीपाळीने राजे झाले व सार्वभौम सत्ता त्यांनी गाजविली; पण या पुरातन ग्रामसंस्थेत कुणालाही ढवळाढवळ करावीशी वाटली नाही; पण प्रत्यक्ष ढवळाढवळ केली नसली तरी अप्रत्यक्षपणे ढवळाढवळ झाली यात शंका नाही. नवी रयतवारी पद्धती हिंदुस्थानात सुरू झाल्यापासून या ग्रामसंस्थेच्या मुळाशी कुणी कुऱ्हाड मारल्यासारखे झाले. सुदैवाने आपल्या सरकारचे या गोष्टीकडे लक्ष गेले असून, काहीकाही राज्यांतून ग्रामपंचायती सुरू करण्यात आल्या आहेत.

सुदैवाने बडोदे संस्थानात महाराजांनी या जुन्या ग्रामपंचायतींचे पुनरुज्जीवन केले. १९०२ ते १९२० साली ग्रामपंचायतींसंबंधी नियम करण्यात आले. प्रत्येक पंचायतीत कमीत कमी ९ व जास्तीत जास्त १२ सभासद असत. यापैकी दोन तृतीयांश गावकऱ्यांनी द्यावयाचे. पंचायतीचा अध्यक्ष बहुतेक गावकऱ्यांनीच निवडलेला असे. गावात सुधारणा करता याव्यात म्हणून या पंचायतीला सरकारची संमती घेऊन एखादा नवा कर बसविता येई. पंचायतीची निवडणूक तीन वर्षांनी होई. लोकांचे आरोग्य राखणे, पाण्याचा पुरवठा करणे, दानधर्माकडे लक्ष देणे, अमूक प्रकारचे दिवाणी व फौजदारी गुन्हे चालविणे इत्यादी कामे ग्रामपंचायतीकडून केली जात. या पंचायतींना अधिक चांगल्या प्रकारे काम करून आपली योग्यता दाखविल्यास त्यांना जास्त अधिकार महाराजांकडून मिळत. ग्रामपंचायतीप्रमाणे महाराजांनी तालुका व जिल्हा पंचायतीसंबंधाने नियम करून त्यांना विशिष्ट अधिकार दिले. महाराजांची इच्छा अशी की, लोकांनी अशा तऱ्हेने प्रजासत्ताक राज्यपद्धतीची तत्त्वे आत्मसात करून स्वयंसिद्ध व स्वयंपूर्ण बनावे.

प्रजेला स्वतःच्या हक्काची जाणीव व्हावी व तिने राज्यकारभारात सरकारला मदत करावी म्हणून त्याप्रमाणे महाराजांनी ग्रामपंचायती व तालुका पंचायती स्थापन केल्या त्याचप्रमाणे मोठाल्या शहरांतून त्यांनी म्युनिसिपालिट्या स्थापन करून त्यांच्याकडे लोकांच्या आरोग्याच्या व सुखसोयीच्या गोष्टी सोपविल्या. याच हेतूने प्रेरित होऊन महाराजांनी धारासभा किंवा कायदेमंडळ १९०८ साली स्थापन केले. धारासभेत प्रथम सतरा सभासद होते ते पुढे २६ झाले. त्यात

एक प्रेसिडेंट, ६ सरकारी सभासद, ५ निमसरकारी सभासद, ४ लोकनियुक्त सभासद आणि १० निवडून आलेले सभासद अशी विभागणी असे.

न्यायदानाच्या पद्धतीत सुधारणा करण्याचे पहिले श्रेय सर टी. माधवराव यांना द्यायला हवे. खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीत वहिवाटदार हा मुलकी अधिकारी असूनही दिवाणी खटले चालवी. त्यांच्याऐवजी प्रत्येक जिल्ह्यात दिवाणी कोर्ट स्थापन करण्यात आली. वहिवाटदार हा फौजदारी खटल्यांची थोडीशी कामे करीत असे. राजकुटुंबातील मंडळी, सरदार-दरकदार मंडळी वगैरेंकरिता एक सरदार कोर्ट उघडण्यात आले. या कोर्टात मुख्य न्यायाधीश, शिलेदार बक्षी, शिबंदी बक्षी वगैरे अधिकारी असत. या कोर्टातील कामाविरुद्ध हायकोर्टाकडे अपील होई. त्यात तेरा सरदार असे होते की, ज्यांना सरदार कोर्ट काहीच करू शकत नसे. महाराजांच्या परवानगीवाचून या सरदारांवर सरदार कोर्ट काम चालवू शकत नसे. हे सरदार कोर्ट १९०४ पर्यंत चालू होते; पण हा सयामचा हत्ती बाळगण्याचे पुढे सरकारला प्रयोजन दिसेना, म्हणून या साली हे कोर्ट बंद करण्यात आले.

याखेरीज काही सरदारांना शिक्षा व दंड करण्याचे अधिकार पूर्वी होते. स्वतःच्या इनाम गावात त्यांना अपराध्याला शिक्षा करता येई. मल्हारराावानंतर सर लुई पेली याने सरदारांचे हे अधिकार काढून घेतले; पण सर टी. माधवराव यांनी या बाबतीत विचार करून सरदारांना अधिकाराच्या सनदा पुन्हा अर्पण केल्या. या सनदा तीन प्रकारच्या होत्या. पहिल्या प्रतीच्या सनदेप्रमाणे गुन्हेगाराला पंधरा रुपयांपर्यंत दंड किंवा दंड न दिल्यास पंधरा दिवस शिक्षा सरदार करू शके. दुसऱ्या प्रतीच्या सनदेप्रमाणे एखादा सरदार अपराध्याला दहा रुपयांपर्यंत दंड किंवा दंड न दिल्यास दहा दिवस तुरुंगाची शिक्षा देऊ शके. तिसऱ्या प्रतीच्या सनदेप्रमाणे एखादा सरदार एखाद्या अपराध्याला सात रुपयांपर्यंत दंड किंवा दंड न दिल्यास पाच दिवस तुरुंगवासाची शिक्षा देऊ शके.

सर टी. माधवराव यांनी नवीन कायदे संस्थानाकरिता काही केले नाहीत. महाराजांनी हे काम करावे असे त्यांच्या मनातून होते. जेव्हा केंव्हा संस्थानात चालू असलेला कायदा एखाद्या न्यायाधीशाला अपुरा वाटेल तेव्हा त्याने वरिष्ठ कोर्टाचा सल्ला घ्यावा. वरिष्ठ कोर्टाने या बाबतीत ब्रिटिश हिंदुस्थानात चालू असलेल्या कायद्याचा अवलंब करावा, असे सर टी. माधवराव यांचे सांगणे असे. विशेषतः इंडियन पिनल कोडचा उपयोग बडोद्यात विशेष होई; परंतु बडोद्यात चालू असलेल्या कायद्याला निश्चित स्वरूप काही आले नाही. ते स्वरूप महाराजांनी आणून दिले. इ. स. १८८१ मध्ये महाराजांनी कायदे तयार करण्याकरिता एक कायद्याची कमिटी नेमली. या कमिटीचे काम १८९० पर्यंत चालू होते. या अवधीत स्टॅम्प, रजिस्ट्रेशन, पोलिस वगैरेसंबंधी कायदे तयार झाले. या कमिटीत बसणाऱ्या न्यायाधीशांना आपले नेहमीचे न्यायदानाचे काम सांभाळून कमिटीचे काम झपाट्याने करता येईना म्हणून महाराजांनी १८९२ साली रिटायर्ड जज्ज गाडगीळ यांस ब्रिटिश नमुन्याप्रमाणे सिव्हिल प्रोसीजर कोड बनविण्यास सांगितले. त्याप्रमाणे कोड तयार होऊन ते संस्थानात अमलात येऊ लागले. मध्यंतरी महाराजांनी मि. नेलर यांस बडोद्याचे ज्युडिशिअल कमिशनर नेमले. त्यांनी पिनल कोड, क्रिमिनल प्रोसीजर कोड व पोलीस

कोड संस्थानाकरिता तयार केले. तसेच कोडांची भाषा उमगण्याकरिता एक प्रस्तावना खंड प्रसिद्ध केला. ब्रिटिश हिंदुस्थानात चालू असलेल्या कायद्यावर हुकूम बडोद्यात सुरू करण्यात आलेले नवे कोड पुष्कळ वर्षांपर्यंत चालू होते. मि. नेलर १८९५ साली सेवानिवृत्त झाले आणि पुन्हा लॉ कमिटी आपले काम करू लागली. तिचे काम पुढे वरिष्ठ कोर्टाकडे बदलण्यात आले आणि या कोर्टाने ट्रॅन्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट तयार केला व रजिस्ट्रेशन ॲक्टात सुधारणा केल्या. त्यानंतर महाराजांनी १९०२ साली महत्त्वाचे दोन कायदे पास केले. ते म्हणजे हिंदू विधवा पुनर्विवाह निर्बंध व धर्मस्वातंत्र्य निर्बंध हे होत.

इ. स. १९०४ साली याच्याही पुढे जाऊन महाराजांनी लहान मुलांची लग्ने बंद करणारा कायदा तयार करविला. त्यावेळी काही लोकांनी महाराजांचे अभिनंदन केले, तर काहींनी त्यांच्यावर टीकेचा भडिमार केला; पण नेहमीप्रमाणेच महाराजांनी आपले मन शांत ठेवून आपणाला पटते ती सुधारणा केलीच. या कायद्याप्रमाणे मुलाचे लग्न १६ वर्षांपूर्वी व मुलीचे लग्न १२ वर्षांपूर्वी होऊ शकत नसे. या वयाच्या मर्यादेच्या बाहेर जाणाऱ्यास शिक्षा होई. ब्रिटीश हिंदुस्थानात शारदा कायदा काही वर्षांमागे पास झाला; पण त्याच्याही पूर्वी अनेक वर्षे बडोद्यात मुलांच्या लग्नाला मनाई होती. बडोदे जे करते ते हिंदुस्थानात केले जाते असे म्हणत, त्याचे हे उत्कृष्ट प्रत्यंतर होय.

१९०४ साली कायदे तयार करण्याचे काम नवीनच उत्पन्न करण्यात आलेल्या न्यायमंत्री कचेरीकडे सोपविण्यात आले. न्यायमंत्री हा कायदे तर बनवीच; पण त्याखेरीज तो निरनिराळ्या खात्यांना कायद्याचा सल्ला देई. इ. स. १९०५ साली महाराजांनी हिंदू कायदा कोडाच्या स्वरूपात प्रसिद्ध करून जे ब्रिटिश हिंदुस्थानात शक्य झाले नाही ते त्यांनी करून दाखविले. दुसरी एक सुधारण न्यायाच्या बाबतीत महाराजांनी अशीच केली. १९०७ सालापूर्वी ज्युडिशिअल कोर्टात संस्थानाविरूद्ध खटले येऊ शकत नसत ! पण हा भेद महाराजांसारख्या समतावादी पुरुषाला पाहवणे शक्यच नव्हते आणि त्याप्रमाणे त्यांनी हा निर्बंध काढून टाकला. १८९०-९२ सालापर्यंत सर्व प्रकारचे लहान-मोठे खटले एकाच तऱ्हेने चालत. त्यामुळे अकारण लहान गोष्टींत कोर्टाचा वेळ जाई. समजा एकाने दुसऱ्याची कोंबडी चोरली. त्यामुळे दुसऱ्याने कोर्टात खटला भरला. खटला व्यवस्थित चालत असताना २-४ महिने निघून गेले आणि शेवटी खटल्याच्या निकालाला काही दिवस राहिले असताना दोघांनी येऊन कोर्टापुढे राजीनाम दिला ! कोर्टाला राजीनामा घेणे प्राप्तच होते; पण कोर्टाचा वेळ अकारण फुकट गेला त्याचे काय? अशा प्रकारच्या कटकटी किंवा गमती टाळण्याकरिता 'नाना दावानो निर्बंध' नावाचा १८९० मध्ये एक कायदा पास करण्यात आला. याप्रमाणे खटल्याला एकदम सुरुवात होई, साक्षीदारांच्या साक्षी संक्षेपाने घेतल्या तरी चालत आणि सर्वांत विशेष म्हणजे निकालाविरुद्ध कोणाला अपील करता येत नसे. दिवाणी दाव्यासंबंधी केलेली ही सुधारणा लहान-सहान फौजदारी खटल्यांनाही लावण्यात आली.

१९०७-०८ साली महाराजांनी दुसरी एक महत्त्वाची सुधारणा न्यायाच्या बाबतीत केली. १९०४ सालापूर्वी बरेच दिवस महाराजांच्या मनात न्यायखाते व अंमलबजावणी खाते यात

फारकत करावयाचे वाटत होते. बरीच वर्षे वहिवाटदार फौजदारी खटले चालवी वा गावातील मुन्सफ फक्त दिवाणी दाव्यांकडे लक्ष देत. यामुळे एक तर वहिवाटदाराला आपली इतर मुलकी कामे व्यवस्थित करता येईनात व दुसरे जो न्याय देणार तोच अंमल बजावणार असे असल्यावर न्यायाची थोडीफार विटंबना झाल्याखेरीज कशी राहणार? शेतसारा वगैरेच्या बाबतीत जो वादी तोच न्यायाधीश बनल्यावर न्याय मिळण्याची कोणी, का व कशी अपेक्षा करावी? तेव्हा हा अन्याय थांबविण्याकरिता १९०६ साली वहिवाटदाराच्या न्यायदानाच्या कामापैकी तीन-चतुर्थांश काम मुन्सफाने करावे व उरलेले एक-चतुर्थांश काम वहिवाटदाराने करावे असे ठरले; पण हेही एक-चतुर्थांश पाप त्याला का करू द्यावे, असे वाटून १९०७-०८ साली दिवाणी दाव्यांप्रमाणे फौजदारी खटलेही एकटा मुन्सफच चालवू लागला.

लोकांच्या मदतीने न्याय देण्याचे तत्त्व महाराजांना प्रिय असल्यामुळे १९०१ मध्ये त्यांनी बडोदे व नवसारी या दोन ठिकाणी असेसरांच्या मदतीने न्याय द्यावा असे ठरविले. हा प्रयत्न यशस्वी झाल्याने कडी व अमरेली या दोन प्रांतांसही हा नियम लावण्यात आला. पुढे याच दिशेने प्रगती होत होती. १९१० साली ज्युरीच्या मदतीने न्याय देण्याचा हुकूम सोडण्यात आला. लोकांची परीक्षा पाहावयाची व ते योग्य रीतीने दिलेली कामे बजावीत आहेत असे कळल्यावर त्यांना अधिकार द्यावयाला विलंब करायचा नाही, असे जणू काय महाराजांचे कायमचेच तत्त्व ठरून गेलेले असे.

बडोदे संस्थानात वरिष्ठ कोर्ट ही सर्वात उच्च अशी न्याय देणारी संस्था होती; पण वरिष्ठ कोर्टाच्या निकालात बदल करण्याचा अधिकार महाराजांना असे. अर्थात हा अधिकार ते त्यांच्या न्यायसभेच्या मदतीने गाजवीत. महाराजांच्या न्यायसभेत वरिष्ठ कोर्टाच्या न्यायाधीशासह तीन सभासद असत. वरिष्ठ कोर्टाच्या ज्या न्यायाधीशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो या तीन सभासदांत नसे. स्थावर मिळकतीच्या बाबतीत दावा पाच हजार रुपयांच्या वर असला तरच वरिष्ठ कोर्टाविरुद्ध अपील करण्यात येई. १९३०-३१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या व अमलात आलेल्या कायद्यात लग्नविच्छेदाचा किंवा घटस्फोटाचा कायदा अत्यंत महत्त्वाचा होता. ब्रिटिश हिंदुस्थानात त्यावेळी या कायद्याची वार्ताही नव्हती; पण बडोदे संस्थानात महाराजांनी पुढाकार घेऊन हा कायदा पास केला. या कायद्याप्रमाणे कित्येक स्त्रीला अमूक एका परिस्थितीत आपल्या नवऱ्यापासून लग्नविच्छेद करून घेता येई. या कायद्याचा फायदा बडोदे संस्थानाबाहेरच्या लोकांनाही विशिष्ट परिस्थितीत घेता येई आणि त्याप्रमाणे ते घेतही.

यानंतर महाराजांच्या शिक्षणविषयक सुधारणांचा उल्लेख करावयाचा. बडोद्याच्या बाहेरे जो महाराजांचा गौरवपूर्वक उल्लेख केला जाई. त्याला मुख्य कारण म्हणजे त्यांची शिक्षणविषयक कामगिरी. श्रीमंत सयाजीराव महाराज जेव्हा जन्मास आले तेव्हा ते श्रीमंतही नव्हते व महाराज तर नव्हतेच नव्हते. पुढे सुदैवाने ते श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड बनले. लहानपणी त्यांच्या ठिकाणी लक्ष्मीप्रमाणे सरस्वतीचीदेखील अवकृपाच होती. लक्ष्मीची कृपा त्यांनी सुदैवाने संपादिली व सरस्वतीची कृपा मेहनत करून मिळविली. वयाच्या बारा वर्षांपर्यंत त्यांना लिहिता-वाचता मुळीच येत नव्हते. असे असून त्यांनी अठरा वर्षांपर्यंत इतका कसोशीने अभ्यास केला

की, पुढे राज्यकारभाराची जबाबदारीची कामेही ते पाहू लागले. महाराजांनी स्वतः प्रयत्नाने विद्या संपादन केली आणि जे आपण प्रयत्नाने मिळवू शकलो ते आपल्या प्रजेला का मिळविता येणार नाही, अशी त्यांची समजूत असल्यामुळे आपल्या प्रजेला सुशिक्षित बनविण्याचा त्यांनी जणू काय विडाच उचलला होता.

महाराजांच्या शिक्षणविषयक कामगिरीचे खरे स्वरूप लक्षात यायला आपणाला थोडा मागचा इतिहास पाहणे अगत्याचे आहे. इ. स. १८७० साली बडोद्यात विद्याखाते किंवा सरकारी शाळा नव्हती सुमारे दोनशे 'पंड्याजीनी निशाळो' (पंतोजींच्या शाळा) नावाच्या शाळा असत; पण या शाळावर कोणाचीही देखरेख नसे. या शाळातून लिहिणे, वाचणे, गणित करणे वगैरे शिकवण्यात येई. या सर्व शाळा मिळून सुमारे आठ हजार मुले शिक्षण घेत. बडोदे येथील रेसिडेन्सीत एक अँग्लो-व्हर्नाक्युलर शाळा होती व दुसरी सर कावसजी जहांगीर मद्रेसा नावाची नवसारी येथे पारशी विद्यार्थ्यांकरिता होती. १८७१ साली बडोद्यात एक हायस्कूल स्थापन करण्यात आले आणि दोन मराठी व दोन गुजराती अशा चार प्राथमिक शाळा उघडण्यात आल्या. या सर्व शाळांतील शिक्षकांची संख्या सतरा होती. त्यांचा पगार वर्षातून १८०० रुपये होता आणि ८२२ मुले सरकारी शाळांतून जात असत. दोन वर्षांनंतर मल्हारराव महाराजांनी धार्मिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने चार वेदशाळा स्थापन केल्या. तसेच याचवर्षी पेटलाद येथे इंग्रजी शाळा सुरू करण्यात आली. १८७५ साली एक गुजराती मुलींकरिता व एक मराठी मुलींकरिता अशा दोन कन्याशाळा निघाल्या. तसेच याचवर्षी एक उर्दू शाळा मुसलमान विद्यार्थ्यांकरिता निघाली. याचवर्षी पेटलाद व पट्टण येथे शाळा स्थापन करण्यात आल्या. १८७५ साली देशी शाळाखाते स्थापन करण्यात आले. ज्या वर्षी महाराजांनी अधिकारसूत्रे आपल्या हाती घेतली त्यावर्षी १८० प्राथमिक शाळा असून, त्यात सुमारे साडेसात हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते.

या परिस्थितीशी १९३३ सालची परिस्थिती ताडून पाहिली, तर त्यात आपणाला जमीनअस्मानचा फरक आढळेल. १९३१ च्या जनगणनेप्रमाणे बडोद्याची लोकसंख्या २४।। लाख इतकी होती. त्यापैकी प्राथमिक शिक्षण घेणारी मुले-मुली मिळून एकंदर अडीच लाख विद्यार्थी होते. या अडीच लाख विद्यार्थ्यांचे पालक शिकलेले आहेत असे मानल्यास साक्षर लोकांची संख्या सुमारे १०।। लाख भरेल. लोकसंख्येशी ही संख्या ताडून पाहिल्यास साक्षरतेचे प्रमाण अभिनंदनीय नाही, असे कोण म्हणेल? बडोद्यात उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या त्यावेळी सुमारे १४ हजार असून, त्यात १००० वर स्त्रिया होत्या. शाळाखात्याप्रीत्यर्थ बडोदे संस्थान ३४ लाख रुपये खर्च करी आणि प्रत्येक मुलामागे सरकारला १५४ रुपये खर्च येई; पण सर्वांना शिकविण्याची आवड महाराजांच्या ठिकाणी फार असल्यामुळे ते या खर्चाकडे उदारतेने बघत.

शाळाखाते हे महाराजांच्या आवडत्या खात्यापैकी एक होते. शाळाखात्यातील महाराजांची सर्वांत मोठी सुधारणा म्हणजे सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण ही होय. १८९२ साली महाराजांनी अमरेली येथे प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. मुलांच्या बाबतीत प्राथमिक शिक्षणाची सक्तीची वयोमर्यादा ८ ते १४ वर्षांची असून, मुलींच्या बाबतीत ती ८ ते १२ वर्षांची होती.

या वयोमर्यादेच्या आतील मुला-मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण १९०६ सालापासून सर्व राज्यभर करण्यात आले. या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाविरुद्ध त्यावेळी बराच आरडाओरडा करण्यात आला; पण आज त्याची मधुर फळे आपण सर्व चाखीत आहोत. संस्थानात २।। हजार प्राथमिक शाळा होत्या व त्यात मुलींच्या शाळा ३०० वर होत्या.

अशा तऱ्हेने प्राथमिक शिक्षणाची ही अपूर्व पाणपोई बांधल्याबद्दल महाराजांची प्रजा महाराजांना निरंतर दुवाच देत राहील. या प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत एक-दोन उणीवा होत्या. प्राथमिक शिक्षकांचा पगार अपुरा असे आणि गरीब पालकांना आपली मुले शाळेत पाठविल्याने त्यांच्या उत्पन्नात तेवढी तूट येई. गरिब कुटुंबातील प्रत्येक माणसाला कमवावेच लागते. प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे कमवावे व खावे असे त्यांच्या घरात चालते. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्यामुळे कायद्याप्रमाणे त्याला आपल्या मुलाला किंवा मुलीला शाळेत पाठविणे भागच असे; पण शाळेत पाठवून मुलाच्या पोटाची व्यवस्था काय? बरे न पाठवून तरी कसे चालणार? न पाठविल्यास दंड भरावा लागणार. तेव्हा तो गरीब पालक मनाशीच विचार करून ठरवी की, 'काही हरकत नाही, मुलाला शाळेत पाठविणार नाही. दंड करून सरकार किती करणार? एका दिवसाला १ किंवा २ आणे. माझा मुलगा रोजी ८ आणे कमवितो. त्यातून २ आणे सरकारला द्यावे लागेल, तरी मला ६ आणे नफा राहतोच ! तेव्हा असाच परिपाठ ठेवावा. त्या दिवशी मजुरी मिळणार नाही त्या दिवशी मुलाला शाळेत पाठवू. शिकेल तेवढ्यात चार अक्षरे, काही वाईट नाही' - अशी विचारसरणी तत्त्वाच्या दृष्टीने अनुचित असेल; परंतु वस्तुस्थितीला ती धरून आहे यात शंका नाही. तेव्हा सरकारने या बाबतीत धडा घ्यावयाचा तो हा की, गरीब लोकांच्या मुलांना ज्या शिक्षणापासून चार-सहा आणे रोजी मिळू शकतील असे शिक्षण दिल्यास ते आनंदाने घेतील. गरीब पालकांच्या मुलांकरिता उद्योगशाळा काढावयास हव्या. या उद्योगशाळांतून उद्योगाच्या शिक्षणाबरोबर प्राथमिक शाळांतून शिकविले जाणारे विषय शिकवावेत. असे केल्याने मुलांना ज्ञानप्राप्ती व द्रव्यलाभ एकदमच होईल. सध्याच्या राज्य सरकारने या गोष्टीकडे लक्ष द्यायला सुरुवात केली आहे, ही अभिनंदनीय गोष्ट होय.

त्यावेळच्या बडोद्यात प्राथमिक शिक्षणातील वर उल्लेखिलेल्या उणीवा असल्या तरी प्रजेला त्यापासून एकंदरीत फायदाच झाला. प्राथमिक शिक्षणाबरोबरच महाराजांचे लक्ष दुय्यम व उच्च शिक्षणाकडे गेले. बडोदे संस्थानात दुय्यम शिक्षण देणाऱ्या सुमारे पंचाहत्तर संस्था असून, त्यात तेरा हजारांवर मुले शिक्षण घेत होती. उच्च शिक्षणासाठी बडोदे येथे कॉलेज असून, त्याच्या हीरकमहोत्सव काही वर्षांमागे साजरा करण्यात आला. महाराजांनी या कॉलेजची स्थापना केली असल्यामुळे त्यांना त्याविषयी अभिमान वाटे. (या कॉलेजचे रुपांतर महाराज सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बडोदा यात झाले असून, तिच्या आर्टस-कॉमर्स इत्यादी चौदा शाखा आहेत. यात सुमारे सात हजार विद्यार्थी आहेत.) मुलींच्या उच्च शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था बडोद्यात असून, त्यांचे कॉलेज कर्वे युनिव्हर्सिटीला जोडण्यात आले होते. हे कॉलेज आजही अस्तित्त्वात असून, चांगले चालू आहे. प्राथमिक शाळांकरिता शिक्षिका तयार करण्याचे काम 'फीमेल ट्रेनिंग कॉलेज' करी.

येथील स्त्रियांना शिष्यवृत्ती देण्यात येई. स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न अशाप्रकारे त्या काळी सोडविण्यात आला.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केल्याबद्दल ज्याप्रमाणे महाराजांची कीर्ती हिंदुस्थानभर पसरली, त्याचप्रमाणे त्यांनी स्थापन केलेल्या कलाभवनाने त्यांची कीर्ती पसरविली. बडोदे संस्थानात धंदेशिक्षण देणाऱ्या एकंदर पाच संस्था होत्या. त्यास तीन प्राथमिक औद्योगिक शाळा असून, त्या पेटलाद, पट्टण व अमरेली येथे होत्या. 'जे. एन. टाटा हुन्नरशाळा' नावाची संस्था नवसारी येथे असून, बडोदे येथे सुप्रसिद्ध कलाभवन होते व आहे. कलाभवनाची स्थापना १८९० साली होऊन मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, सिव्हिल इंजिनियरिंग, आर्किटेक्चर इत्यादी विषय तज्ज्ञांकडून शिकविले जात. सर्व हिंदुस्थानातून विद्यार्थी शिक्षण घ्यायला येथे येत. त्यावेळी कलाभवनाची फी थोडी व बडोद्याची राहणी मध्यम प्रतीची असे असल्यामुळे बाहेरच्या मुलांना येथे राहून शिक्षण घेणे सोईचे जाई. हल्ली कलाभवनाचे रूपांतर फॅकल्टी ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी नावाच्या संस्थेत झाले असून, येथे डिग्री कोर्सकरिता विद्यार्थी तयार केले जातात आणि पॉलिटेक्निक नावाच्या संस्थेत इंजिनियरिंगच्या विविध शाखांचे डिप्लोमा कोर्सेस शिकवितात.

प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण, उच्च शिक्षण, औद्योगिक शिक्षण या सर्व शिक्षणांबरोबर महाराजांचे लक्ष संगीत शिक्षणाकडेदेखील होते. बडोदे येथे भारतीय संगीत पाठशाळा असून, तिच्यात गायन-वादनादी कला शिकवल्या जात. हल्ली या भारतीय संगीत पाठशाळेचे रूपांतर फॅकल्टी ऑफ म्यूझिक, डान्स ॲण्ड ड्रामामध्ये होऊन ही शाळा म. स. विद्यापीठाला जोडली आहे. कलाभवनाप्रमाणे येथेही डिग्री व डिप्लोमा कोर्सेस आहेत.

पुढारलेल्या जातीच्या शिक्षणाप्रमाणेच मागासलेल्या जातींच्या शिक्षणाकडे महाराजांचे लक्ष होते. मागासलेल्या जातींची सुधारणा करायची असल्यास प्रथम त्यांना शिक्षण दिले पाहिजे, हे तत्त्व महाराजांना पूर्णपणे पटले होते. बडोदे संस्थानात काही जंगली जाती होत्या. त्यांच्या शिक्षणाकरिता सोनगढ, व्यारा इत्यादी सहा ठिकाणी वसतिगृह शाळा स्थापन करण्यात आल्या. या सर्व शाळांचा चांगला परिणाम झाला. या जंगली जातींच्या वरच्या वर्गाशी संबंध येऊ लागल्याने त्यांचा वाईट चालीरिती त्यांनी टाकावयाला सुरुवात केली. दारू पिणे, मांस खाणे वगैरे प्रकारही कमी झाले. या शाळातून प्राथमिक शिक्षणाबरोबरच शेतकी व बागाइतीचे काम, भरतकाम व विणकाम ही कामे शिकवीत.

मुसलमानांच्या शिक्षणाची अशीच चांगली सोय करण्यात आली. मुलांच्या प्राथमिक उर्दू शाळा ७२ असून, मुलींच्या १३ होत्या. एकंदर संस्थानात मुले व मुली मिळून त्याकाळी सुमारे सतरा हजार मुसलमान विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत. अंत्यज किंवा अस्पृष्टांच्या शिक्षणाची सोय होती. बडोदे संस्थानात सुमारे दोनशे अंत्यजांच्या प्राथमिक शाळा होत्या व त्यात सुमारे आठ हजार मुले-मुली शिक्षण घेत.

महाराजांची आणखी शिक्षणविषयक कामगिरी म्हणजे, संस्थानभर त्यांनी पसरलेली वाचनालये किंवा लायब्ऱ्या ही होय. प्राथमिक शिक्षणाबरोबरच वाचनालयाचीही आवश्यकता आहे असे

समजून १९१० साली सुमारे ७०० गावांतून वाचनालये स्थापन करण्यात आली. त्या वेळच्या बडोदे संस्थानच्या सुमारे २४ लक्ष लोकसंख्येपैकी सुमारे १६ लक्ष लोकांना या वाचनालयांचा उपयोग करता येई. या सर्व वाचनालयांत बडोदे येथील सेंट्रल लायब्ररी (मध्यवर्ती पुस्तकालय) ही सर्वांत मोठी असून, तिची रचना आधुनिक पद्धतीवर करण्यात आली आहे. सुमारे १ लाख पुस्तकांचा संग्रह असून, ती पुस्तके वाचकांना अगदी फुकट वाचावयास मिळतात. सेंट्रल लायब्ररी इतर गावींही पुस्तके पेट्यातून पाठविण्याची उपयुक्त गोष्ट करीत असे.

बडोद्यात प्राच्य विद्यामंदिर नावाची संस्था असून, तिच्यात जुन्या संस्कृत ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन चालू असते. याच प्राच्य विद्या मंदिराला भाषांतर शाखा जोडण्यात आली आहे. या शाखेतून 'श्रीसयाजी साहित्य माला', 'श्रीसयाजी बाल ज्ञानमाला', नावाच्या दोन माला सुरू असून, शिवाय ग्रंथकारांना उत्तेजन व पारितोषिकेही मिळतात. श्री. सयाजीराव महाराज यांनी देशी भाषांच्या उत्तेजनार्थ दोन लक्ष रुपये ठेविले होते. त्याच्या व्याजातून 'श्रीसयाजी साहित्य माला' व 'बाल ज्ञानमाला' यातून शेकडो ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. हल्ली सदरहू मालांची कामगिरी म. स. विद्यापीठाकडे सोपविण्यात आली आहे. त्यांची कामगिरी पूर्ववत चांगली चालू आहे.

बडोदे येथील पदार्थ संग्रहालय व चित्रसंग्रहालय या संस्थांचा उल्लेखही महाराजांच्या शिक्षणविषयक सुधारणांचा विचार करीत असताना केला पाहिजे. चित्रसंग्रहालयात पाश्चात्य तसेच पौर्वात्य चित्रकारांची चित्रे ठेवण्यात आली असून, तज्ज्ञाच्या मते ती फार उत्कृष्ट आहेत. पदर्थ संग्रहालयातील संग्रहही मोठा व मौल्यवान आहे. चालचमूंची चळवळही बडोद्यात चांगल्या प्रकारे चालू होती. या चळवळवळीला सुरुवात १ जानेवारी १९१९ पासून झाली. प्रथम एक १०० मुलांचा संघ तयार करण्यात आला व तो चांगला तयार झालेला पाहून त्यात पुढे वाढ करण्यात आली. बडोद्यात मूक, अंधबधिर शाळा प्रथम १९०९ साली खासगी प्रयत्नाने सुरू करण्यात आली. त्यावेळी शाळेत एकच मुकबधिर विद्यार्थी होता. १९१०-११ साली ९ विद्यार्थी शाळेत होते व त्यापैकी दोन मुली होत्या. दोन्ही शाळांना सरकारी मदत मिळत असे; पण ता. १ जानेवारी १९१५ पासून या दोन्ही शाळा सरकारी बनविण्यात आल्या.

बडोद्यातील बांधकाम खात्याने शिक्षण खात्याप्रमाणेच खूप गोष्टी घडवून आणल्या आहेत. बडोद्यात प्रेक्षक म्हणून येणाऱ्या गृहस्थांचे प्रथम कोणी मन वेधून घेत असेल तर त्या बडोद्यातील सरकारी इमारती. असल्या इमारती बऱ्याच आहेत. लक्ष्मीविलास राजवाडा १८९० साली बांधण्यात आला. हा राजवाडा इंडो-सारिसिनिक पद्धतीप्रमाणे बांधकाम करण्यात आला आहे. याची लांबी ५१२ फूट व रुंदी २०० फूट आहे. बडोदा कॉलेजही इंडो-सारिसिनिक पद्धतीवर बांधण्यात आले आहे. कॉलेज बांधण्याचा खर्च त्यावेळी ८ लक्ष रुपये आला. कॉलेजला भव्य घुमट विजापूरच्या गोलघुमटाप्रमाणे बांधण्यात आला आहे. मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, नवीन कलाभुवन, सेक्रेटॅरिएट बिल्डिंग, स्टेट जनरल हॉस्पिटल (श्रीसयाजी रुग्णालय), म्युझियम, पिक्चर गॅलरी, खंडेराव मार्केट या सर्व इमारती शिल्पकलेच्या दृष्टीने उत्तम ठरलेल्या आहेत. श्रीमंत सयाजीराव महाराज यांना इमारती बांधण्याचा शोक होता. यामुळे बडोद्यात सरकारी

इमारती पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेणाऱ्या झाल्या. महाराजांची ही आवड त्यांच्या नावाने चालविलेल्या विद्यापीठातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या ठिकाणी असल्याने विद्यापीठाच्या नवीन नवीन इमारती होतच असतात. महाराजांनी ज्या लोकोपयोगी गोष्टी केल्या त्यात सयाजी सरोवराची गणना होईल. सयाजी सरोवर बांधून बडोद्यातील लोकांना पाणीपुरावठा केल्याबद्दल महाराजांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. सयाजी सरोवराचे काम १८८५ मध्ये सुरू होऊन १८९० मध्ये पूर्ण झाले. सूर्या व विश्वामित्री या नद्यांना बांध घालून सयाजी सरोवरात पाणी घेतले जाते. या सरोवरातून नळावाटे निमेठ्यास पाणी नेण्यात येते व तेथे ते गाळून शुद्ध करण्यात येते. पूर्वी पाणी जमविण्याचे क्षेत्र (कॅचमेंट एरिया) ३६ स्क्वेअर मैल होते, ते वाढवून आता ५० स्क्वेअर मैल करण्यात आले आहे. अशा तऱ्हेने आता दोन वर्षे पाऊस पडला नाही, तरी बडोद्यास पाणी मिळण्याची उत्कृष्ट सोय झाली आहे. सयाजी सरोवरप्रीत्यर्थ त्या काळी सरकारला ३४ लाख रुपये खर्च झाला. बडोद्याप्रमाणे पट्टण, सोजित्रा, शिनोर, नवसारी वगैरे ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

लोकांना औषधोपचार देण्याकरितादेखील महाराजांनी इतकी उत्तम सोय करून ठेवली आहे की, हजारो रोगी महाराजांना अंतःकरणापासून धन्यवाद देतात. खंडेराव महाराजांच्या वेळेसही बडोद्यात एक हॉस्पिटल होते; पण ते विशेषकरून मिलिटरी लोकाकरिता होते. राजा सर टी. माधवराव यांनी १८७६ साली मेडिकल डिपार्टमेंटची स्थापना केली. खंडेरावांच्या वेळेस बरेच वैद्य व हकीम प्रत्येक पलटणीत असत. मेजर टी. कॅंडी यास मेडिकल डिपार्टमेंट सुरू करायला सांगताच त्याने बऱ्याचशा जुन्या वैद्य व हकीमांना घरी बसावयाला लावले व त्यांच्याऐवजी पदवीधर डॉक्टर नेमले. इ. स. १८७७ मध्ये वारसिया कवायत मैदानावर सयाजीराव मिलिटरी हॉस्पिटल उघडण्यात आले. जमनाबाई सिव्हिल हॉस्पिटल याच साली सुरू करण्यात आले. सयाजीराव महाराज यांनी अधिकसूत्रे हाती घेतल्यावर सर्व राज्यभर प्रमुख ठिकाणी सरकारी दवाखाने काढून लोकांना औषधोपचाराची सोय केली. बडोदे येथे डफरिन हॉस्पीटल, लॉर्ड डफरिन व काउन्टेस् डफरिन आले असता उघडण्यात आले. हे हॉस्पिटल हल्ली श्रीसयाजी रुग्णालय नावाने ओळखले जाते. बडोदे संस्थानातील हे सर्वात मोठे हॉस्पिटल असून, येथे औषधोपचार व शस्त्रोपचार उत्तम प्रकारचा केला जातो.

याखेरीज लोकांच्या आरोग्य रक्षणाकरिता सॅनिटरी डिपार्टमेंट इ. स. १८९० मध्ये स्थापन करण्यात आले. शहरात स्वच्छता राखणे, लोकांचे आरोग्य सांभाळणे, आजार व साथीच्या दिवसांत लोकांच्या औषधपाण्याची व्यवस्था करणे, शिशुसप्ताहासारखे सप्ताह भरवून मुलांची जोपासना कशी करावी हे शिकविणे इत्यादी कामे या खात्याला करावी लागत. देवी टोचविण्याची व्यवस्था गणपतराव महाराजांच्या कारकीर्दीपासून म्हणजे १८४७ पासून बडोदे संस्थानात होती. इ. स. १९१४ साली महाराजांनी व्हॅक्सिनेशन ॲक्ट पास करून देवी टोचविणे सक्तीचे केले.

बडोदे संस्थानभर रेल्वेचे जाळे पसरून लोकांच्या प्रवासाची व व्यापाराची महाराजांनी उत्कृष्ट सोय केली. ही रेल्वे पूर्वी बी. बी. सी. आय. रेल्वेच्या देखरेखीखाली होती; पण काही वर्षांनी

सुमारे ५०० मैलांची ही रेल्वे आपल्या देखरेखीखाली महाराजांनी घेतली. ही रेल्वे आता वेस्टर्न रेल्वेला जोडण्यात आली आहे.

येथपर्यंत आपण महाराजांनी केलेल्या मुख्य मुख्य सुधारणांकडे बघितले. याखेरीज महाराजांनी जेल, हिशेबी खाते, सरकारी उत्पन्नाचे खाते या सर्वांत महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. महाराजांच्या ६४ वर्षांच्या कारकीर्दीकडे या सुधारणा नजरेसमोर ठेवून बघितले असता ती किती उज्जवल व लोकोपयोगी आहे हे चटकन कळते. महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेण्यापूर्वी जिकडे तिकडे अव्यवस्था व गबाळेपणा होता. गायकवाडी किंवा बाबाशाही हा शब्द बडोद्यास अव्यवस्थेकरिता किंवा गबाळेपणाकरिता अजूनही वापरतात. सारा बाबाशाही कारभार याचा अर्थ सारा गोंधळ, कशाचा काही मेळ नाही असा घ्यावयाचा. भोजनाचे साताचे आमंत्रण आले असल्यास रात्री नवाला गेले तरी काही फार उशीरा आल्याची जाणीव भासत नाही ! अशा सर्व वागणुकीच्या प्रकारांना समुच्चयाने बाबाशाही म्हणण्याचा बडोद्यात रिवाज आहे. जुन्या वेळच्या सरकारी कचेऱ्यांतून हे बाबाशाहीचे स्वरूप उत्तम दिसे. कचेरीची वेळ ११।। असली तर कारकूनसाहेबच मुळी विडा चघळीत व पोटावरून हात फिरवीत १२ वाजता यावयाचे ! मग मुख्याधिकारी खुशाल घरी वामकुक्षी करून दुपारच्या चहाला कचेरीत येत असल्यास काय नवल! ही सारी पद्धती सयाजीराव महाराजांनी बदलली. पुष्कळ वेळा महाराज स्वतःच कोठी कचेरीच्या जवळ हातात घड्याळ घेऊन ११।। ला उभे राहत व येणाऱ्या अधिकाऱ्याला तो उशीरा आला असल्याचे ते दाखवीत. याचा परिणाम इतका झाला की, बडोद्यातील कचेऱ्या ब्रिटिश मुलुखातील कचेऱ्यांप्रमाणे अगदी व्यवस्थित बनल्या. जुन्या वेळी कारकून व अधिकारी गादी-तक्क्याशी बसून कामे करीत. त्यामुळे एक छान सोय होती. कंटाळा आला असल्यास घरी न जाता जागच्या जागी विश्रांती घ्यायला सापडे ! एकदा महाराज एका कचेरीत गेले असताना त्यांनी बऱ्याच जणांना अशा स्थितीत बघितले ! तेव्हापासून त्यांनी सर्व कचेऱ्यांत टेबल-खुर्च्यांची व्यवस्था केली. खुर्चीवर बसल्याने झोप येऊ शकत नाही व कचेरीत आटोपशीरपणा दिसतो. अशा तऱ्हेने जेथे पूर्वी अव्यवस्था, गबाळेपणा होता तेथे महाराजांनी सुव्यवस्था व नियमितपणा सुरू केला. नोकरांच्या वागणुकीसंबंधाने नियम तयार केले व त्या नियमांप्रमाणे सर्वांना वागायला भाग पाडले. याचे मुख्य कारण म्हणजे स्वतः महाराजांना शिस्त, नियमितपणा, व्यवस्थितपणा, कर्तव्यदक्षता यांची फार आवड असे. ते स्वतः अत्यंत उद्योगी होते. आपल्या प्रजेनेही उद्योगी व्हावे म्हणून त्यांनी बडोदे संस्थानात अनेकविविध सुधारणा अंमलात आणिल्या. बडोद्याच्या भावी इतिहासकाराला अभिमानाने आणि गौरवाने निर्देश करावासा वाटेल, अशा श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या सुधारणा होत्या यात शंका नाही.

●●●

१०.
आवडीनिवडी, स्वभाव व शेवट

बडोदा कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवाचा (२५ डिसेंबर १९३२) तो प्रसंग होता. संध्याकाळी साडेचारपासून समारंभाला सुरुवात व्हावयाची होती. सभास्थानी निमंत्रित पाहुणे व विद्यार्थी बंधू-भगिनी तटस्थ होऊन अर्धवट आपल्या घड्याळांकडे व अर्धवट कॉलेजच्या पोर्चकडे पाहत होते. इतक्यात जवळच्या टॉवरमधील साडेचारचे ठोके मंडळींच्या कानांवर आदळले आणि त्यांनी पोर्चकडे पाहिले तो महाराजांची मोटार हजर ! महाराज सुहास्य वदनाने मोटारीच्या बाहेर आले आणि त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे हसत हसत हात वर करून त्यांनी सर्वांचे अभिवादन स्वीकारले. नेहमीप्रमाणे त्यांचा पोशाख अगदी साधा होता. पांढऱ्या शुभ्र विजारीवर पांढरा अंगरखा, डोक्यावर गायकवाडी पगडी, पायांत काळे मोजे व काळे जोडे आणि हातात एक काठी.

पोशाखाच्या बाबतीत महाराजांना साधेपणाच जास्त प्रिय असे. लहानपणी काही दिवस जुन्या पद्धतीप्रमाणे त्यांनी मखमल, साटीण वगैरेचे कपडे घातले असतील; पण पुढे बरीच वर्षे ते अगदी साधाच; पण व्यवस्थित पोशाख करीत. साधेपणा त्यांना जितका प्रिय तितकीच अस्वच्छता त्यांना अप्रिय. कपड्यावर एकही डाग किंवा एकही सुरकुती पडलेली त्यांना चालत नसे. अगदी स्वच्छ पांढरे शुभ्र कपडे त्यांना आवडत.

पोशाखाच्या एका बाबतीत त्यांचा स्वभाव चोखंदळ म्हणता येईल. प्रत्येकाने आपापल्या जातीचा जे शिष्टसंमत पोशाख असेल तो करावा, याविषयी त्यांचा आग्रह असे. दरबाराप्रसंगी सर्वांनी विशिष्ट प्रकारचा पोशाख केलाच पाहिजे, असे बडोद्यात ठरलेले असे. संपूर्ण दरबारी किंवा मामुली दरबारी असे त्याचे दोन प्रकार होते. महाराजांना भेटायला जावयाचे असेल तेव्हादेखील अमूक पोशाख तुमचा असायलाच पाहिजे. एकदा एक अधिकारी महाराजांना स्टेशनवर भेटायला गेले. ते बुटेड सुटेड म्हणतात तसे होते. महाराजांना पाहून त्यांनी आपली हॅट उंच केली. लगेच महाराजांनी त्यांना हटकले 'महाराजांची भेट कोणत्या पोशाखात घ्यावी हे

तुम्हाला कळावयाला पाहिजे होते.' बिचारे अधिकारी खजील झाले. देशी पोशाखावर महाराजांचा विशेष कटाक्ष असे. प्रत्येकाने देशी पोशाख करावा, जो आपला शिष्टसंमत पोशाख असेल तो करावा, असे महाराजांना वाटे. युरोपियन पोशाख कचेरीत केला तरी चालेल; पण एरवी सर्व ठिकाणी आपल्या अधिकाऱ्यांनी व नोकरांनी देशी पोशाख केलेला महाराजांना आवडे.

पोशाखासंबंधाने ज्याप्रमाणे महाराजांच्या कल्पना ठाम होत्या, त्याचप्रमाणे शिस्तीसंबंधानेही होत्या. प्रत्येकाने व्यवस्थित, आखबंद असावे, कोणीही गबाळेपणाने वागू नये, असे महाराजांना वाटे. प्रत्येकाने ठराविक काम, ठराविक मुदतीत, ठराविक वेळेस व ठराविक पद्धतीने केलेच पाहिजे, अशी त्यांची सक्त ताकीद होती. वेळेची त्यांना फार मोठी किंमत वाटे. स्वतः त्यांचे आचरण अत्यंत शिस्तीचे असे. घड्याळाप्रमाणे व्यवस्थित व बिनचूक वागण्याची त्यांना सवय होती. एखादे यंत्र जितक्या ठराविकपणे आपले काम करते, तितक्याच ठराविकपणाने महाराजही आपले रोजचे ठरलेले काम करीत असत आणि म्हणूनच उतारवयातही त्यांनी आपला वक्तशीरपणा व व्यवस्थितपणा सोडला नाही.

त्याला इंग्रजीत सिस्टिम म्हणतात, ती महाराजांना अत्यंत प्रिय असे. स्वतः महाराज म्हणजे त्या सिस्टिमचे (पद्धतीचे) मूर्तिमंत उदाहरणच होते. प्रत्येक गोष्ट करताना विशिष्ट पद्धतीने ती करावी, असे महाराजांना वाटे. ज्या कामात पद्धत नाही ते काम चांगले होणे शक्य नाही. श्रीमंत महाराजांनी जेवढ्या सुधारणा केल्या तेवढ्या सर्व त्यांनी हे सिस्टिमचे तत्त्व डोळ्यांसमोर ठेवून केल्या.

या पद्धतीच्या अनुषंगाने दुसरी एक गोष्ट महाराजांना आवडे. ती म्हणजे वर्गवारीची किंवा ज्याला इंग्रजीत क्लासिफिकेशन म्हणतात ती होय. प्रत्येक गोष्टीचे भाग पाडावयाचे, प्रत्येक कामाची वर्गवारी ठरवावयाची. आस्फाल्टचे रस्ते करावयाचे ठरल्यावर त्यांनी तज्ज्ञांना बोलावून किती प्रकारचे आस्फाल्टचे रस्ते असतात त्या निरनिराळ्या प्रकारांचे वर्णन, त्यांना येणारा खर्च, त्यापैकी प्रत्येक प्रकार किती दिवस चालू शकतो, त्या प्रत्येक प्रकारात तोटे किंवा फायदे कोणते, असेही त्यांनी विचारिले.

वर्गवारी करण्याची किंवा गट पाडण्याची जशी त्यांना आवड होती, तशीच त्याच्या पृथकरणाची. प्रत्येक प्रश्नाची ते पृथकरण करीत. त्यातील साधक गोष्टी कोणत्या व बाधक गोष्टी कोणत्या त्या अगोदर मनात वागवीत. समजा, प्राथमिक शिक्षण त्यांना सक्तीचे करावयाचे आहे तर ते सक्तीच्या शिक्षणापासून होणाऱ्या फायद्याशी, त्याच्यापासून होणाऱ्या तोट्यांशी तुलना करीत. सक्तीच्या शिक्षणाला किती लोक कसा विरोध करतील हेही ते मनात अंदाजून ठेवीत आणि त्या प्रश्नाचा मनातल्या मनात विचार केल्यावर मग ते अगदी निडरपणे व बेधडकपणे आपली योजना अमलात आणीत.

उर्दूमिश्रीत हिंदी ही राज्यभाषा करावयाचे त्यांच्या मनात घोळत असे. अनेक वर्षे ते हा विचार मनात बाळगून होते. हिंदुस्थानात सर्वसामान्य राजमान्य अशी जर कोणती भाषा होऊ शकेल तर ती हिंदी होय, याविषयी त्यांची पूर्ण खात्री होती. कितीतरी वर्षांपासून प्राथमिक व माध्यमिक शाळांतून बडोद्यात हिंदी शिकविले जाई. भावी संयुक्त राज्यघटनेत हिंदीलाच जास्त

महत्त्व येणार व यावे असे त्यांना वाटत असल्यामुळे बडोद्यात राज्यव्यवहाराची भाषा हिंदी करण्याचे त्यांनी ठरविले होते; पण त्याच्यापूर्वी याविषयी घोषणा करून लोकमत अजमावण्यास सुरुवात केली होती. लोक काय म्हणतील याचा अंदाज त्यांना पूर्वीपासून होता. म्हणून लोकांची टीका ऐकून ते गलितधैर्य झाले नाहीत. उलट सर्व टीका ऐकून त्यांनी लोकांना आपले म्हणणे पटवून दिले. आजही पूर्वीच्या बडोदे राज्यात हिंदी या राष्ट्रभाषेला विरोध नाही, त्याचे बरेचसे श्रेय सयाजीराव महाराजांना दिले पाहिजे.

श्रीमंत सयाजीराव महाराज प्रत्येक गोष्ट शांत चित्ताने ऐकून घेत. आज देशात जेवढे वाणीचे स्वातंत्र्य आहे, तेवढे त्या वेळच्या बडोद्यातही होते. लोकांनी टीका करावी, वाटल्यास प्रखर टीका करावी; पण सदभिरूचीच्या मर्यादा मात्र सोडू नयेत, असे त्यांना वाटे. महाराजांच्या वागण्याबद्दल ज्यांचा टीका करणे हाच केवळ स्वभाव, असे लोक नेहमी टीका करीत; पण महाराज त्या टीकेने कधी रागावले नाहीत, उलट आपली बाजू तपासून पुन्हा कार्यप्रवृत्त व्हावे, असे महाराज नेहमी म्हणत. आपली प्रजा मतप्रदर्शन करू लागलेली पाहून त्यांना आनंद व अभिमानच वाटे. आपण दिलेल्या शिक्षणाने आपली प्रजा विचार करू लागली, तिला आपल्या हक्काची जाणीव झाली, चांगले-वाईट तिला कळू लागले, हे पाहून महाराजांना मनापासून बरे वाटे.

महाराजांच्या ठिकाणी न्यायबुद्धी इतकी प्रखर होती की, जे नियम इतरांना तेच ते स्वतःलादेखील कसोशीने लावीत. सर्वांना त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे; पण न्यायबुद्धीने वागवावयाचे असे त्यांनी राज्यसूत्रे हाती घेतल्यापासून ठरविले होते. आपल्या हातून एखादा प्रमाद घडला असल्यास ते दिलगिरी प्रदर्शित केल्याखेरीज कधीही राहिले नाहीत. उलट दुसऱ्या कोणी काही चूक केल्यास त्यालाही ते तेथल्या तेथे चापल्याखेरीज राहत नसत.

न्यायबुद्धी अणि विशिष्ट नाते यांचा ते कधीही घोटाळा करीत नसत. त्यांचा एखादा मित्र असेल आणि त्याच्या हातून काही चूक घडली असेल, तर त्या चुकीबद्दल त्याला ते रागे भरीत किंवा दंड करीत; पण त्याची मैत्री विसरत नसत. त्यांच्या अधिकाऱ्यांशीदेखील त्यांची अशीच वागणूक असे. एखाद्या नोकराच्या हातून काही आगळीक घडल्यास ते त्याला तेवढ्यापुरता दंड करीत; पण मागाहून मनात काही ठेवीत नसत. त्यांची वृत्ती न्यायाधीशाची होती, सर्पाची नव्हती. साप मनात वैर धरतो असे म्हणतात. न्यायाधीश हा मनात कुठलीही वैराची भावना बाळगीत नाही. ज्यावेळी जसा गुन्हा घडेल त्यावेळी तशी शिक्षा तो करील. मागाहून गुन्हेगाराबद्दल त्याच्या मनात अप्रीती उरणार नाही, महाराज असेच होते. त्यांच्या या स्वभावामुळे काही लोक स्वतःचा गैरसमज करून घेऊन महाराजांवर लबाडीचा आरोप करीत; पण ही खरी वस्तुस्थिती नव्हती. त्यांच्या ठिकाणी दयेचा जेवढा अंश होता त्यापेक्षा न्यायबुद्धी थोडी जास्त असल्याने ते अपराध्याला शिक्षा केल्याखेरीज कधीच राहत नसत, असे म्हणता येईल.

भूतदया महाराजांच्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात खरोखर वसत होती. ते जुन्या पद्धतीचा दानधर्म करीत नसत म्हणून काही लोक त्यांना दयाशून्य समजत; पण वास्तविक तसे नव्हते. अगदी हलक्या जातीपासून तो थेट उच्च जातीपर्यंत, ते सर्वांना सारखे शिक्षण देत. त्यात त्यांची समानता बुद्धीबरोबरच दयाबुद्धी दिसून येईल. जंगली जाती व अत्यंज याच्याकरिता त्यांनी

मोफत वसतिगृहशाळा उघडल्या, त्यात त्यांची दयाबुद्धी दिसते की आणखी काही? बडोदे संस्थानात गोरगरिबांच्या औषधपाण्याची महाराजांनी जी फुकट पण उत्कृष्ट सोय केली होती तीत तरी दयाबुद्धीखेरीज दुसरे काय दिसते? महाराजांच्या ठिकाणी असलेल्या दयाबुद्धीचे आणखी उदाहरण म्हणजे त्यांची आपल्या नोकरांना दिली जाणारी वागणूक. बडोदे संस्थानात एखाद्या माणसाने अगदी अक्षम्य अपराध केल्याखेरीज त्याला आपली नोकरी घालविण्याचा कधीही प्रसंग येत नसे, 'सकाळी सौभाग्यवती आणि संध्याकाळी गंगाभागीरथी' अशी स्थिती बडोद्याच्या नोकरीत कधी घडत नसे. यामुळेच बडोद्यात सरकारी नोकरी करायला लोक राजी असत. महाराजांच्या ठिकाणी असलेल्या न्यायबुद्धी व दयाबुद्धी यामुळेच सर्वच लोकांना आपल्या वित्ताविषयी व अब्रूविषयी बिनधोकपणा वाटे.

महाराजांची धार्मिक मते समानतेच्या तत्त्वावर आधारलेली होती. सर्व धर्मांबद्दल त्यांना आदर वाटे. त्यामुळे निरनिराळ्या धर्माची माहिती देणाऱ्या पुस्तिका त्यांनी प्रसिद्ध करविल्या. 'धर्माधिकारी' नावाचा अधिकारी नेमून त्याच्यामार्फत असली पुस्तके प्रसिद्ध होत. धर्माचा तौलनिक अभ्यास लोकांना करता यावा म्हणून त्यांनी बडोदा कॉलेजात 'तौलनिक धर्माचा प्राध्यापक' नेमला. धर्म किंवा धार्मिक क्रिया करण्याच्या बाबतीत त्यांनी जातीची मक्तेदारी बंद केली. त्यांनी पुजारी नियम, पुरोहित नियम करून त्यांच्या परीक्षेला कोणालाही बसता येईल अशी सोय केली. मनुष्य कोणत्याही जातीचा असो, त्याने पुरोहिताची परीक्षा दिली असल्यास त्याला पुरोहित म्हणून नेमले जाण्याची शक्यता होती. परंपरागत चालत आलेल्या पूजाविधीबद्दल त्यांना फारसा आदर नसे; परंतु कोणाच्याही धार्मिक स्वातंत्र्याच्या आड ते कधीही आले नाहीत. धर्माच्या बाबतीत मध्यस्थाची जरूरी नाही या विचाराचे ते होते. वेदोक्ताचा अधिकार सर्वांना असावा, असेही त्यांचे मत होते. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्यांचा कल अज्ञेयवादाकडे झुकलेला दिसे; पण ज्याला नास्तिक म्हणता येईल असे मात्र ते नव्हते. मनुष्याचा धार्मिकपणा त्याच्या आचरणात, वर्तनात दिसला पाहिजे असे त्यांना वाटे. त्यांच्या धार्मिक मतांना किती मान दिला जाई याचे प्रत्यंतर म्हणजे अमेरिकेत काही वर्षांमागे भरलेल्या सर्वधर्म परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. या बहुमानाला ते सर्वस्वी पात्र होते.

महाराजांचे खाजगी आयुष्य अगदी गंगोदकाप्रमाणे पवित्र होते. त्यांना कोणतेही व्यसन नव्हते. लहानपणी व तरुणपणी त्यांच्याभोवती बायकांचा जमाव खूप असे. मल्हारारावशाहीत जे प्रकार चालू होते तेच पुन्हा सुरू करण्याचा काही लोकांचा इरादा होता; पण महाराजांचा आपल्या मनावरील ताबा इतका विलक्षण होता की, ते कोणत्याही प्रकारच्या मोहपाशात गुंतले नाहीत. इतकेच नाही तर हळूहळू त्यांनी आपल्या भोवतालच्या बायकांचे व हलक्या लोकांचे प्रस्थ कमी केले.

महाराजांच्या आहारात मांसाहार व शाकाहार असे दोन्ही प्रकार होते. मांसाहाराचे सेवन ते फार थोडे व बेताने करीत. मनुष्याला स्वतःचा तरतरीतपणा कायम ठेवायचा असेल तर त्याने थोडे मांस खावे, असे महाराजांचे मत होते. त्यांच्या जेवण्यात एक मौज असे. पंचपक्वान्नांचे जेवण जरी त्यांच्या सुवर्णाच्या पात्रात असले, तरीदेखील तिथेच बाजरीची भाकरी आढळे.

त्यांना बाजरीची भाकरी आवडे म्हणून ते ती खात की, आपल्या लहानपणची गरिबीची आपल्याला स्मृती राहावी म्हणून ते खात, हे आम्हाला माहीत नाही. नियमित आहार व नियमित विहार हे तत्त्व महाराजांना पसंत होते.

महाराज चालणेही मोठे विलक्षण होते. ते फार झपाझप पावले टाकीत चालत. त्यांच्याबरोबर फार थोडी मंडळी चालू शकत. वृद्धापकाळामुळे त्यांचा चालण्याचा व्यायाम थोडा कमी झाला; पण मध्यवयात ते पाच-सहा मैल एका वेळी जोराने चालून जात.

महाराजांच्या ठिकाणी त्यांना दुर्गुण म्हणता येतील असे नव्हतेच; पण एक-दोन गोष्टींत त्यांच्या आवडीनिवडीचा अतिरेक त्यांच्या ठिकाणी दोषासारखा वाटे. व्यवस्थित, पद्धतशीर काम करण्याची त्यांना सवय होती. हे आपण मागेच बघितले; पण सवयीचा त्यांच्या ठिकाणी अतिरेक पाहायला सापडे. प्रत्येक गोष्टीची शहानिशा, प्रत्येक प्रश्नाचा केसनूकेस मोकळा करण्याची त्यांना सवय जडल्यामुळे स्वतः त्यांना व आजूबाजूच्या लोकांना अकारण फार श्रम होत आणि पुष्कळ वेळा हे श्रम वाया जात. एकदा असे सांगतात की, महाराजांनी काही गृहस्थांना एका विषयावर भाषण तयार करावयाला सांगितले. ते भाषण पंचाहत्तर पानांचे असून, मराठीत होते. त्याचे महाराजांनी इंग्रजी भाषांतर तयार करविले. पुढे मुळातल्या भाषणाचा संक्षेप करण्यात आला. त्या संक्षेपाचे पुन्हा इंग्रजी भाषांतर झाले आणि नंतर त्या संक्षिप्त भाषणात महाराजांनी अनुक्रमणिका, विषयसूची, विषयाची वर्गवारी वगैरे करून घेतली ! असे करण्यात कितीतरी जणांची मेहनत फुकट गेली असेल !

पण असल्या काही अत्यंत क्षुल्लक दोषांखेरीज महाराजांच्या ठिकाणी दोष नव्हतेच, ते खरोखरच एक सज्जन व थोर गृहस्थ होते. त्यांची वागण्या-बोलण्याची पद्धत आकर्षक, रम्य व सुसंस्कृत होती. त्यांच्याशी संभाषण करण्याचा ज्यांना ज्यांना प्रसंग आला असेल ते ते स्वतःला धन्य समजतील, अशीच त्यांची बोलण्याची तऱ्हा परिणामकारक होती. त्यांच्या बोलण्यात प्रेमळपणा, कळकळ ओतप्रोत भरलेली असे. हसत हसत ते संभाषण करीत. समोरच्या माणसाला बोलायला ते फारशी फुरसदही देत नसत. त्याला प्रश्न विचारून विचारून ते छेडीत आणि एखादी गमतीदार कोटी करून ते त्याला निरोप देत.

कामाचा त्यांच्यामागे व्याप असूनही ते कधी कंटाळलेले दिसले नाहीत. एखाद्या रूक्ष विषयावर रूक्ष व्याख्यान ऐकून आपण कंटाळून जाऊ; पण महाराज ते लक्ष लावून ऐकत आहेत, असे लोकांना आढळे.

ते क्वचितच रागावत आणि रागावले तरी आपला सज्जनपणा सोडीत नसत. रागावले की ते बोलेनासे होत किंवा बोलले तर अधिकाऱ्याच्या स्वरात बोलत. स्पष्टवक्तेपणा आणि सत्य या दोन गोष्टी त्यांना अत्यंत प्रिय होत्या. एखाद्या माणसाच्या ठिकाणी असलेले शौर्य आणि सत्यप्रीती ही त्यांच्या नजरेस आली की, ते त्याला नेहमी आपलेपणाच्या भावनेने वागवीत. गुणांची पारख त्यांना चांगली होती; पण त्याच्याबरोबर अवगुणांची पारख तर त्यांना फारच लवकर होई.

श्रीमंत सयजीराव महाराज ज्ञानाभिलाषी होते. हे शीक, ते शीक, अशा प्रकारे अनेक विषयांचा अभ्यास त्यांनी वृद्धापकाळीदेखील चालू ठेवला होता. डॉ. फाटक यांच्याजवळ वनस्पतीशास्त्राचा अभ्यास त्यांनी उतारवयातही चालू ठेवल्याचे मागे सांगितलेच आहे. प्रस्तुत लेखकाजवळ त्यांनी टीकाशास्त्र, टीकेचे उद्देश, टीकेचे प्रकार शिकण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. प्रो. अतिसुखशंकर त्रिवेदी आणि डॉ. मगनलाल बूच यांच्याजवळ काही दिवस हे तत्वज्ञान हा विषय शिकले. फ्रेंच भाषेचा अभ्यास त्यांनी काही काळ एका फ्रेंच बाईजवळ केला. याशिवाय युरोपच्या त्यांच्या ज्या सुमारे पंचवीस सफरी झाल्या त्या देशोदेशी अनेक गोष्टींच्या प्रत्यक्ष अवलोकनाने त्यांनी जो अभ्यास केला जो वेगळाच. विद्येची त्यांना खरी अभिरूची होती, ज्ञानाची त्यांना खरी अभिलाषा होती, याचमुळे ते शेवटपर्यंत विद्यार्थी राहिले. आपले शिक्षण संपले असे त्यांना कधीच वाटले नाही. विद्येला मर्यादा नाही, अंत नाही, असे त्यांचे मत होते.

ते आदर्श विद्यार्थी असल्यानेच त्यांच्या ठिकाणी विद्वानांबद्दल आदर वसत असे. त्यांच्या चौसष्ट वर्षांच्या दीर्घ कारकीर्दीत अक्षरशः शेकडो विद्वान, संशोधक, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलावंत बडोद्यात येत. नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत बडोद्यात विद्वानांचा मेळाच भरे. त्या त्या विद्वानाला त्याच्या त्याच्या विद्वत्तेप्रमाणे पैसा मिळे. श्री. सयाजी व्याख्यानमाला (लेक्चर सिरीज) या साधनाच्याद्वारे अनेक पंडितांचा सत्कार बडोद्यात होई. त्यांना प्रिय असलेल्या विषयावर त्यांची व्याख्याने होत. अखिल भारतीय कीर्तीचा विद्वान किंवा संशोधक आहे आणि तो बडोद्यात येऊन गेला नाही असे कधी झालेच नाही. डॉ. रवींद्रनाथ टागोरांसारखा जगमान्य कीर्तीचा कवी, जयस्वालसारखा थोर विद्वान, पंडित मदनमोहन मालवीयांसारखा बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचा संस्थापक, जगदीशचंद्र बोससारखा संशोधक, सर चंद्रशेखर रामनसारखा पदार्थविज्ञानशास्त्री, डॉ. राधाकृष्णनसारखा तत्त्वज्ञ, सरोजिनी नायडूसारखी कवयित्री इत्यादी बडी बडी मंडळी 'सयाजीराव लेक्चर सीरीज'मध्ये व्याख्याने देऊन गेली. ही व्याख्याने बहुतेक महाराजांच्या समोर व त्यांच्या अध्यक्षतेखाली होत. महाराज ही व्याख्याने लक्षपूर्वक ऐकत आणि व्याख्यानाच्या शेवटी समारोप करीत. महाराजांचे इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व होते. त्यांच्या भाषेत गोडवा व प्रसाद होता. त्यामुळे त्यांचे उत्स्फूर्त समारोप मूळ व्याख्यात्यांच्या भाषणाहून सरस होत. प्रस्तूत लेखकाने असले समारोप पुष्कळ ऐकले असून, त्याला ते ऐकायला मिळाल्याचा अभिमान वाटतो. महाराज एका उच्च पातळीवरून विषयाचा समारोप सफाईदार व प्रसादपूर्ण भाषेत करीत आणि त्याचमुळे सर्वांना तो आवडे.

आपल्या प्रजेचे हित, आपल्या प्रजेचे सुख, आपल्या प्रजेची प्रगती साधण्याचा त्यांचा अहिर्निश ध्यास लागलेला असे. रात्रंदिवस ते याचाच विचार करीत. त्यांच्या झोपण्याच्या पलंगाशेजारी एका मेजावर कागद-पेन्सील ठेवलेली असे. झोपी जाताना किंवा झोपेतून मध्ये जाग आल्यावर त्यांच्या मनात राज्यासंबंधी जे काही विचार मनात येत त्यांचे टाचण करण्याकरिता ही सोय त्यांच्या सांगण्यावरून केलेली असे. प्रकृतीच्या स्वास्थ्याकरिता त्यांना युरोपसारख्या थंड हवेच्या ठिकाणी वर्षातून काही महिने राहावे लागे व ते त्याप्रमाणे राहत; परंतु त्याचे सर्व लक्ष आपल्या प्रजेच्या ठिकाणी तेथेही गुंतून राही ! त्यांनी युरोपच्या सुमारे तीस खेपा केल्या; परंतु

यापैकी प्रत्येक खेपेस त्यांनी प्रजाहितार्थ काहीना काही नवीन योजना तिकडून आणून येथे अमलात आणली. महाराज तेथे इंग्लंड देशात असले तरी तेथून ते राज्यकारभार व्यवस्थितपणे करीत. प्रत्येक आठवड्यात त्यांच्याकडे इकडून टपाल व टिपणे जात व तिकडून त्यांच्यावर योग्य तो शेरा होऊन ती परत येत. कामाचे व अधिकाराचे विभाजन त्यांनी इतके उत्तम केले होते की, त्यामुळे दैनंदिन राज्यकारभार सुरक्षित चाले. हुजूर अधिकारातले व अपीलाचे कागद तेवढे महाराज जेथे असत तेथे जात. बाकीचा कारभार कौन्सिलच्या निकालांनी येथेच चालत असे. प्रजेचे हीत लवकरात लवकर कसे साधेल इकडे त्यांचे लक्ष असे. मग ते स्वतः येथे असोत की, युरोपात असोत. यामुळे महाराजांच्या प्रजेचे त्यांच्यावर अलोट व निस्सीम प्रेम होते. या प्रेमापायी प्रजेने त्यांच्या राज्याचे रौप्यमहोत्सव (१९०७), सुवर्णमहोत्सव (१९२५) व हीरकमहोत्सव (१९३६) स्वयंस्फूर्तीने व थाटामाटाने पार पाडले. हीरकमहोत्सवाचा (डायमंड ज्युबिलीचा) मान भारतात फारच थोड्या राजांच्या वाटणीला आला असेल.

आपल्या प्रजेच्या हिताबरोबर सर्व देशांचे, साऱ्या हिंदुस्थानचे हित कशाने साधेल याचाही ते विचार करीत. स्वराज्याची व स्वातंत्र्याची तळमळ त्यांच्याही ठिकाणी होती. बाकीच्या हिंदुस्थानात राजकीय सुधारणा ज्या गतीने होत, त्यापेक्षा थोड्या जास्तच गतीने बडोदे संस्थानात त्या होत. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर आपण आपले बडोदे संस्थान त्यामध्ये विलीन करू, अशा आशयाचे उद्‌गार त्यांनी लंडन येथे भरलेल्या राऊंड टेबल कॉन्फरन्स (गोलमेज परिषद) प्रसंगी काढले होते. आपण आपल्या संस्थानाचे राजे महाराजे असलो तरी आपल्यावर परदेशी सत्तेचा दाब आहेच, याची जाणीव त्यांच्या ठिकाणी प्रखर होती. या जाणीवेने त्यांना दुःख होई व त्यातून निसटण्याचा कायदेशीर मार्ग ते शोधून काढीत. हिंदुस्थानात राजकीय स्वातंत्र्याकरिता चालणाऱ्या लढ्यांतील पुढाऱ्यांविषयी त्यांनी नेहमी आदरयुक्त आपलेपणा वाटे. बाहेर स्वराज्याची चळवळ करणाऱ्या व्यक्तींना बडोदे हे एक आपल्याकडे सहनुभूतीने पाहणारे केंद्र आहे असे वाटे आणि ते त्याचा भरपूर उपयोग करून घेत.

उपकारमूलक, प्रजाहितदक्ष, सेवाभावी अशाप्रकारचे महाराजांचे स्थूलमानाने जीवन होते. प्रजाकल्याणाचा एकमेव ध्यास घेणाऱ्या कर्तव्यप्रेमी महाराजांची चौसष्ट वर्षे सतत तेवत प्रकाशत असलेली जीवनज्योत अखेरीस ता. ६ फेब्रुवारी १९३९ रोजी मुंबई मुक्कामी मालवली. त्यांची जीवनसरिता अनंताच्या सागरात विलीन झाली. त्यांचा जीवात्मा परमात्म्यात एकरूप झाला. मागे राहिली आहे ती त्यांची उज्ज्वल, स्फूर्तिदायक, कीर्ती-स्मृती. रामदास स्वामींच्या म्हणण्याप्रमाणे 'मरावे परी कीर्तीरूपी उरावे' तसे महाराज मरून अमर झाले आहेत !

युरोपच्या स्वारीहून महाराज परत बडोद्यास येण्याकरिता मुंबई मुक्कामी उतरले असताना ते जयमहालमध्ये थ्रॉंबॉसिसच्या विकाराने आजारी पडून सतत तीन महिने जवळजवळ बेशुद्धावस्थेत राहिले. अधूनमधून ते एक-दोन वेळा शुद्धीवर आले व त्यावेळी त्यांनी बडोद्याला जाण्याची इच्छा प्रदर्शित केली; परंतु तशा स्थितीत त्यांना बडोद्यास आणणे डॉक्टरांना योग्य वाटले नाही. डॉक्टरी उपचार पुष्कळ झाले. येथील व परदेशांतील डॉक्टरांचे उपचार चालू होते. स्वित्झरलंडमधील त्यांचे नेहमीचे डॉक्टर जानेरे हे प्रत्यक्ष येऊ शकले नसले, तरी इंग्लडचे डॉक्टर इव्हान्स (Evans)

हे त्यांचा सल्ला घेऊन विमानाने येथे आले व त्यांनी महाराजांवर औषधयोजना सुरू केली; परंतु ईश्वरी योजना काही वेगळी होती आणि त्या योजनेप्रमाणे महाराज ता. ०६ फेब्रुवारी रोजी रात्री ८.४५ वाजता निधन पावले. महाराज दिवंगत झाले त्यावेळी त्यांच्याजवळ युवराज प्रतापसिंह महाराज, महाराणी चिमणाबाईसाहेब आदिकरून आप्त व सर व्ही. टी. कृष्णम्माचारी इत्यादी अधिकारीवर्ग होता.

महाराजांचा मृतदेह स्पेशल गाडीने मुंबईहून ता. ७ रोजी सकाळी बडोद्यास आणण्यात आला. त्यांच्या दर्शनास राजमहालामध्ये लोकांची प्रचंड गर्दी झाली. सर्वांना महाराजांचे अंत्यदर्शन झाले. नंतर महाराजांची प्रेतयात्रा राजमहालापासून पावणेबारा वाजता निघून न्यायमंदिर, ज्युबिली बाग, कोठी या मार्गाने दुपारी अडीच वाजता कुबेरेश्वर स्मशानात पोहोचली. वाटेत जागोजागी महाराजांना पुष्पाहार घालण्यात आले. माणसांचा एवढा मोठा जमाव कधीच बघण्यात आला नव्हता. सव्वातीन वाजता अग्निसंस्कार झाला. नंतर बंदुकांची व दीडशे तोफांची सलामी देण्यात आली. राज्यासन रिकामे राहू शकत नाही म्हणून सकाळी दहा वाजता श्रीमंत प्रतापसिंहराव यांस नवे महाराज म्हणून राजमहालामध्ये जाहीर करण्याचा विधी उरकण्यात आला. दुसऱ्या दिवशी महाराजांप्रित्यर्थ न्यायमंदिरामध्ये सार्वजनिक शोकसभा झाली. त्यात अनेक नामवंत वक्त्यांनी महाराजांच्या गुणांचे संकीर्तन केले. तिसऱ्या दिवशी महाराजांच्या अस्थी सकाळी पावणेदहाच्या स्पेशल गाडीने प्रयाग येथे पाठविण्यात आल्या. बरोबर योग्य असा लवाजमाही होता. महाराजांची गाडी स्टेशनातून निघत असताना हजारोंच्या डोळ्यांतून अश्रू वाहताना दिसले. हा महापुरुष, हा राजयोगी पुन्हा आपणास दिसणार नाही, या जाणीवेपायी निघालेले ते अश्रू होते. प्रयाग येथे महाराजांच्या अस्थिविसर्जनाप्रसंगी झालेल्या सभेत पंडित मदनमोहन मालवीय यांनी स्वयंस्फूर्तीने 'हिंदुस्थानातील शेवटच्या आदर्श महाराजांना आपण मान देण्याकरिता जमलो आहोत.' अशा आशयाने जे उद्‌गार काढले, ते अत्यंत मोलाचे व योग्य असे होते. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड हे खरोखरच भारताचे शेवटचे आदर्श महाराज ठरले. महाकवी कालिदासाने रघुवंश नावाच्या महाकाव्यात राजा दिलीपाचे असे वर्णन केले आहे : 'प्रजानां विनयाघानाद् रक्षणाद् भरणादपि । स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ।।' श्रीमंत सयाजीरावांना हेच वर्णन यथार्थपणे लागू पडते. महाराज हे आपल्या प्रजेला पित्याच्या ठिकाणी होते. प्रजेचे शिक्षण, प्रजेचे रक्षण, प्रजेचे भरणपोषण हे त्यांनी इतक्या उत्तम रीतीने केले की, नात्याने पितृत्त्व मिरविणाऱ्यांना आपल्या मुलांना जन्म देण्याखेरीज काहीच फारसे करावे लागले नाही.

११.
आठवणी व आख्यायिका

महाराज त्यावेळी लहान होते. म्हणजे १२ वर्षांचे नुकतेच ते बडोद्याला आले होते. त्यांच्याबरोबर त्यांचे वडील श्रीमंत काशीराव गायकवाड होते. दत्तकविधान संपल्यावर रेसिडेंट सर रिचर्ड मीड याने त्यांना गादीवर बसविले. त्यावेळी साध्या गोपाळरावांचे श्रीमंत सयाजीराव (तिसरे) महाराज गायकवाड बनले. सर्वांचे मुजरे करणे सुरू झाले. त्यात पहिला मुजरा श्रीमंत काशीराव गायकवाड यांचा होता. महाराजांना त्यावेळी वाईट वाटले; पण त्याच्याहीपेक्षा आपल्या वडिलांविषयी त्यांचा पूर्वीचा आदर व अभिमान दुणावला. 'त्यावेळी मला कळले की, माझ्यावर काहीतरी जबाबदारी येऊन पडली आहे', असे महाराज म्हणत.

●●●

महाराज सर्वांशी इतक्या प्रेमळपणाने आणि सौजन्याने वागत की, जो जो त्यांच्या सहवासात येई त्याला असे वाटे की, महाराज आपल्यावर खूष आहेत, आपण सांगू ते ते करतील. एकदा एका लेखकाला असेच वाटले, म्हणून त्याने आपली सर्व नाटके, सर्व कांदबऱ्या, सर्व लघुकथा खाकोटीला मारल्या आणि तो महाराजांना दिपविण्याकरिता गेला. बाहेरच सेक्रेटरी उभे होते. त्यांनी ते सारे वाङ्मय ठेवून घेतले आणि पुस्तके पावल्याची पोहोच दिली.

●●●

मैत्री आणि न्याय यांची सळभेसळ महाराज कधीही करीत नसत. एकदा एक बडे अधिकारी काही कामांत घोडचूक करून बसले होते. महाराजांनी त्यांच्या घरी बदलीचा हुकूम पाठविला होता व त्यांना भेटायला बोलावणेही पाठविले. महाराजांचे ते स्नेही होते. महाराज संध्याकाळी दोन तास त्यांच्याबरोबर बगीत बसून हिंडले व त्यांच्याशी प्रेमाने बोलले चालले. महाराजांची आपल्यावर पूर्वीसारखीच कृपा आहे असे त्यांना वाटले. त्यांनी घरी जाऊन पाहिले तो त्यांच्या बदलीचा हुकूम येऊन पडलेला !

दुसरे एक अधिकारी होते. लष्करातील कामाबद्दल त्यांच्याविरुद्ध काही तक्रार होती. महाराजांनी त्यांना बोलाविले व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यालाही बोलाविले. छोटे अधिकारी तरुण व स्पष्टवक्ते होते. त्यांना काही सांगायचे होते; पण मोठे अधिकारी समोर बसले असताना त्यांना सांगण्याचे धैर्य होईना. ते आपली डायरी अर्धवट बाहेर काढीत व पुन्हा खिशात ठेवीत. महाराजांच्या हे लक्षात आले व ते त्या छोट्या अधिकाऱ्याला उद्देशून म्हणाले, "So long as you tell the truth and make no false allegations, no harm will be done to you." पुढे त्या तरुण अधिकाऱ्याने त्याला काय सांगावयाचे होते ते सांगितले. महाराजांना त्याचे म्हणणे फारसे पटले नाही; पण त्याचे धैर्य व स्पष्टवक्तेपणा महाराजांना आवडला आणि त्यांनी त्याला आपल्या खास नोकरीत ताबडतोब घेतले.

●●●

महाराजांच्या ठिकाणी प्रेम किंवा कोमल भावना नाहीत, असे काही लोक म्हणत; पण आम्हाला तसे वाटत नाही. आपल्या प्रेमाचा नाटकी आर्विभाव ते करीत नसत हे मात्र खरे. एकदा महाराज, राजपुत्र धैर्यशीलराव व इतर अधिकारी दौडीकरिता गेले होते. महाराज पुढे निघून आले; पण मागे धैर्यशीलरावांच्या घोड्याने उसळी मारून त्यांना जमीनीवर पाडले. धैर्यशीलरावांना थोडी इजा झाली. ते पडल्याची बातमी महाराजांना मिळताच त्यांच्याने राजमहालात राहावेना. ते तसेच पुन्हा घोड्यावर बसले आणि आपल्या मुलाला पाहून आले.

●●●

एकदा स्वतःला शहाणे समजणारे एक गृहस्थ महाराजांना काही शिकविण्याच्या हेतूने बडोद्यास आले. ते महाराजांना म्हणाले, 'आपण मराठे आहात, आपण मराठ्यांकरिता काही केलेच पाहिजे. आपला जन्म मराठ्यांच्या कुळात झाला आहे.' त्यावर महाराज म्हणाले, 'मी सर्वांना सारखे लेखतो. मराठ्यांना किंवा इतर काही जातींना मी सवलती दिल्या आहेत. त्या एवढ्याकरीता की, त्यांनी शिकून इतर जातींच्या बरोबरीला यावे. यापेक्षा मला जास्त काही करता येत नाही.' त्यावर ते गृहस्थ म्हणाले, 'आपण एखादी 'पॉलीसी' (आपले मत) का प्रसिद्ध करीत नाहीत?' ते ऐकून महाराज म्हणाले, 'माझी पॉलीसी अशी की, आपल्यासारखे लोक आमच्याकडे जितके कमी येतील तितके बरे.' हे उत्तर ऐकून त्या गृहस्थांचे काय झाले असेल याची कल्पना केलेलीच बरी.

●●●

मागे बडोद्यात एका पोलिस अधिकाऱ्याने महाराजांच्या पश्चात काही अनन्वित प्रकार केले होते, त्यामुळे लोक फार नाराज होते. महाराज बडोद्यात आल्यावर एका वृत्तपत्राने त्यासंबंधी सरकारला प्रश्न विचारला होता. ज्या वर्तमानपत्रात हा मजकूर आला होता ते विकत फिरणारी पोरे मोठमोठ्याने ओरडत चालली होती. ''राज्य सयाजीरावनु के शंखपाळनु?'' महाराजांची मोटर जात असलेली पाहून मुलांनी जास्तच जोराने ओरडायला सुरुवात केली. त्यावर महाराजांनी

आपली मोटर थांबवायला सांगून ते वर्तमानपत्र विकत घेतले. पुढे त्या पोलिस अधिकाऱ्याला योग्य ती शिक्षा झाली.

●●●

काही वर्षांमागे महाराज पंचगणीहून महाबळेश्वरला चालले होते. वाटेत श्रीयुत पंडित यांचे हिंदू हायस्कूल लागले. हे पाहण्याची महाराजांना इच्छा झाली. बरोबरचे ए. डी. सी. म्हणाले, ''आपण त्यांना कळवल्यावाचून कशाला जावयाचे? त्यांचे आमंत्रणही नाही.'' त्यावर महाराज म्हणाले ''आमंत्रणे आपणाला नेहमीच येतात. आमंत्रण नसतांना शिक्षण संस्था पाहावयात कोणती हरकत? टोपी आणि सदरा चढवायला संस्थेतील लोकांना किती वेळ लागणार? तोपर्यंत आपण थांबू?'' नंतर महाराज हायस्कूलमध्ये गेले. त्यावेळी पंडितांची सर्व मंडळी व मुले जेवत बसली होती. मराठा जातीची मुले विजार व शर्ट घालून बसलेली होती. गुजराती मुले अर्ध्या चड्या घालून बसलेली व ब्राह्मणांची मुले लंगोट्या नेसून बसलेली त्यांनी पाहिली. तेव्हा ते मागाहून ए. डी. सी.ना म्हणाले, ''असा भेदभाव नसावा. सर्वांना एकाच प्रकारचे कपडे घालावयाला हवे. भेद दिसला की, उच्चनीच भाव सुरू होतो.'' शाळेत मोठ्या पुरुषांच्या तसबिरीऐवजी मारुती, गणपती वगैरेंच्या तसबिरी होत्या, तेव्हा त्यासंबंधाने मागाहून ते म्हणाले, ''मुलांसमोर नेहमी शिवाजी, मॅझिनी, बिस्मार्क अशांच्या तसबिरी असाव्यात. अशा तसबिरी असल्या की, मुले मी शिवाजी होईन, मी बिस्मार्क होईन, असे नेहमी म्हणत राहतात.''

●●●

मागे लढाईच्यावेळी रिक्रूटभरती होत असताना बडोद्यातूनही काही व्हॉलंटियर्स तयार झाले होते, त्यावेळी रिक्रूटभरतीच्या विरुद्ध गावातील लोकमत होते. गावात मिलिटरीचे लोक फिरत असताना काही कारणांवरून गोष्टी समोर आल्या. एकमेकात थोडीशी बाचाबाची झाली. यामुळे गावातले लोक चवताळले व त्यांचे एक शिष्टमंडळ महाराजांना भेटायला आले. त्या शिष्टमंडळाची आणि महाराजांची भेट मधल्या काही अधिकाऱ्यांमुळे लवकर होऊ शकली नाही त्यामुळे तर लोक जास्तच चिडले. पुढे भेट झाली तेव्हा महाराजांनी अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. ते पाहून शिष्टमंडळातील लोक शिष्ट बनले आणि म्हणाले, ''महाराज आम्हाला हिंदू राजा किती प्रिय आहे ! मागे मल्हाररावांच्या वेळेला आम्ही 'आमचा राजा द्या ! आम्हाला हिंदू राजा हवा,' असे म्हणालो त्यावरून आपल्यावर आमचे किती प्रेम आहे ते दिसेल. पण... पण... पण...'' असू म्हणून त्यांनी सर्व सांगितले. त्यावर महाराजांनी मोठे छान उत्तर दिले, ''मी आज तुमचा राजा आहे. त्याच्याऐवजी दुसराही कोणी आला असता; पण कोणाला तरी शांतता आणि सुव्यवस्था राखण्याकरिता नेमावेच लागले असते. अधिकारीही माझेच आहेत आणि प्रजाही माझीच आहे. तेव्हा या बाबतीत न्यायकोर्टात जो निकाल होईल तो आपण मानाल, अशी मला आशा आहे.''

●●●

अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर हे बडोदे सरकारकडून मिळत असलेल्या पैशावर शिकून आले आणि असे असून ते आपणाला कोणी मदत केली नाही असे काही वेळा म्हणत. यावर काही मंडळी स्वाभाविकपणे त्यांच्यावर नाराज होती; पण स्वतः महाराज त्यांच्यावर नाखूष नव्हते. काही वर्षांमागे जातीभेद मोडण्यासंबंधाने डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात पत्रव्यवहार सुरू होता. त्यावेळी आंबेडकरांनी आपली बाजू फार कसोशीने आणि भक्कमपणे पुढे मांडली. महाराज त्या वेळी दिल्लीत होते. तो पत्रव्यवहार पाहून महाराज म्हणाले. ''माझे पैसे फुकट गेले असे मला वाटत नाही. डॉ. आंबेडकरांना आपल्या हक्काची जाणीव झाली, यातच माझ्या पैशाचे चीज झाले. लोकांना शिक्षण द्यावयाचे ते एवढ्याकरिता.''

●●●

सन १९२६ च्या हिवाळ्यातील गोष्ट. आदल्याच रात्री जोराचे वादळ होऊन जागोजागी झाडे पडली होती व रस्तोरस्ती चिखल झाला होता. नित्यक्रमाला अनुसरून श्रीमंतांची स्वारी सकाळी पायी सहल करायला निघाली. सोबत मी एकटाच होतो. राजमहालाच्या बागेतून निघून इंदिरा ॲव्हेन्यूने फिरून खाजगी कचेरीपुढील मोठ्या रस्त्याने आम्ही परत येत असता वाटेवर एक मोठे झाड आडवे पडले होते. त्यामुळे मुख्य रस्ता अडला होता व तेथे काटक्या कुटक्या पडून वाट अडचणीची झाली होती. पायी चालणाऱ्यांसाठी पाऊलवाट आणि वाहनांसाठी सडकेचा रस्ता असा रहदारीचा नियम आहे व तो पाळणाऱ्यांमध्ये माझा नंबर बराच वर लागे; पण वरप्रमाणे अडचण व तेथील त्या विस्तीर्ण राज्य रस्त्यावर त्यावेळी काही रहदारीही नव्हती. हे पाहून मी त्या राज रस्त्याच्या कोरड्या भागावरून जाण्यासाठी वळलो व श्रीमंतांनाही तिकडे वळण्याविषयी नम्रतेने सुचविले. तेव्हा ''तुम्ही पाहिजे तर नियम मोडा. मला या पाऊलवाटेने जाता येईल.'' असे म्हणून श्रीमंतांची स्वारी त्या अडचणीतून कशीबशी वाट काढून गेली व मीही मागोमाग गेलो.''

- श्रीधर रामजी शिंदे
(सयाजी गौरव ग्रंथ)

●●●

सन १९१५ सालची गोष्ट. अस्पृश्य वर्गातील एक विद्यार्थी भीमराव आंबेडकर म्हणजे नंतरचे डॉ. आंबेडकर यांस उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्तीची जरूरत होती. ती श्रीमंत महाराजांकडून मिळावी म्हणून ते माझे मित्र रा. केळूसकर यांस घेऊन मजकडे आले आणि महाराजसाहेबांना शिफारस करण्याविषयी त्यांनी मला विनंती केली. श्रीमंतांचा मुक्काम त्यावेळी मुंबईत जयमहालात होता. मी लगेच त्यांस बरोबर घेऊन जयमहालात गेलो. बागेच्या प्रवेशद्वाराजवळ आम्ही दोघे गाडीतून उतरलो आणि मजबरोबर महालात येण्याविषयी रा. आंबेडकरांस आग्रह करू लागलो; पण ते त्यांस पसंत पडेना. ते म्हणाले, ''मी महार आहे. आत कसा येऊ? महाराजांनी बोलावलेच तर येईन.'' त्यांचे म्हणणे मान्य करून मी एकटाच आत गेलो. सायंकाळच्या सुमारास सरकारस्वारी फिरावयास निघते. त्यावेळी नेहमीच्या परिचयातील कोणी मंडळी आल्यास त्यांच्या

भेटी होत. त्याप्रमाणे भेट होताच महाराज म्हणाले, ''मि. यंदे, आज काय बातमी?'' त्यावर मी म्हणालो, ''महाराज अस्पृश्य वर्गातील एका मुलास घेऊन आलो आहे. मुलगा होतकरू आहे. मॅट्रिकपर्यंत शिकला आहे; पण गरिबीमुळे पुढील शिक्षण त्यास घेता येत नाही. महाराजांनी मदत केल्यास त्याची शिकण्याची उमेद आहे.'' महाराजांनी तो मुलगा कुठे आहे असे विचारताच तो बाहेर उभा असल्याचे मी सांगितले. त्यावर ते म्हणाले, ''का, त्यास बाहेर का उभे केले? तुम्ही आपल्याबरोबर आत का आणले नाही?'' मी म्हणालो, ''मी त्यास आत येण्याविषयी सांगत होतो; परंतु तो म्हणाला, ''मी महार आहे. आत कसा येऊ? बोलावले म्हणजे येईन.'' त्यावर महाराज म्हणाले, ''पाहिले मि. यंदे, परंपरेच्या रूढीमुळे आपण अस्पृश्य आहोत अशीच या लोकांची समजूत झाली आहे. बरे, त्यास आत बोलावून घ्या.'' श्रीमंतांची आज्ञा होताच एका हुजऱ्यास पाठवून रा. आंबेडकर यांस आत बोलावून आणले. आत येताच त्यांनी महाराजांस मुजरा केला व ते थोडे दूर उभे राहिले. महाराजांनी त्यांस जवळ बोलाविले आणि किती शिकलात? पुढे कोठपर्यंत शिकण्याची उमेद आहे आणि शिक्षण झाल्यावर पुढे काय करणार असे प्रश्न केले. आंबेडकर म्हणाले, ''महाराजांची आज्ञा होईल त्याप्रमाणे वागण्यास मी तयार आहे.'' त्यावर महाराज म्हणाले, ''शिक्षण संपादन केल्यानंतर तुम्ही आपल्या जातीच्या व विद्येत मागे पडलेल्या लोकांना शिक्षणाचा प्रसार करण्याची कामगिरी हाती घेतली पाहिजे. आम्ही बडोद्यास अस्पृश्य वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम सुरू केले आहे. तुम्ही आपल्या शिक्षणाचा व ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे.'' रा. आंबेडकर यांनी महाराजांचे म्हणणे मान्य केले आणि महाराजांनी त्याच वेळी रा. आंबेडकर यांस दरमहा ५० रुपयेप्रमाणे शिष्यवृत्ती देण्याविषयी विद्याधिकारी यांस बडोद्यास तार केली आणि म्हणाले, ''जा, चांगला अभ्यास करा. चांगली हुशारी दिसून आल्यास तुम्हाला आणखी मदत मिळेल.'' सारांश, अस्पृश्य वर्गातील होतकरू विद्यार्थ्यास साहाय्य करण्याकडे महाराजांचे लक्ष किती होते हे यावरून चांगले लक्षात येते.''

- दामोदर सावळाराम शिंदे
(श्रीसयाजी गौरव ग्रंथ)

●●●

माझे आदरणीय मित्र व बडोद्याचे माजी महसूलमंत्री राजप्रिय रामचंद्रराव शामराव माने पाटीलसाहेब यांनी मला महाराजांच्या साधेपण व थोरपणाविषयी ज्या आठवणी सांगितल्या त्या पुढील आशयाच्या होत. माने पाटीलसाहेब त्यावेळी महाराजांबरोबर लंडन मुक्कामी स्वारी कामदार म्हणून होते. त्यांच्याकडे त्यांच्या घरून म्हणजे बडोद्याहून एक पार्सल आले. त्यात भाकरवड्या आदी खाद्य पदार्थ होते. महाराजांना भाकरवड्या आवडत, म्हणून मानेसाहेब त्या घेऊन महाराजांना द्यायला त्यांच्या खोलीत गेले. महाराजांनी त्यांचा आनंदाने स्वीकार तर केलाच; पण ते म्हणाले, ''माने, तुम्ही भारकवड्या दिल्यात त्याबद्दल आभारी आहे. आम्हाला महाराज, महाराज म्हणून लोक आमच्यापासून दूर राहतात. त्यामुळे घरासारखे कोणी वागले की आम्हाला समाधान वाटते. राजा झाला तरी त्याला खाजगी जीवन काही तरी असतेच; पण या

जीवनाचा कोणी विचार करीत नाही. तुमच्या घरून हे पार्सल आल्याने तुमची मंडळी भेटल्यासारखे तुम्हाला वाटत असणार. हेच खरे जीवन, हेच खरे सुख, हाच खरा आनंद. साध्या माणसाला जे सुख मिळते, मिळविता येते, ते आमच्यासारख्या महाराजांना मिळत नाही, कोणी मिळवून देत नाही."

●●●

दुसरी आठवण बडोद्यातील आहे. लक्ष्मीविलास राजवाड्याच्या मागील लॉनवर सकाळच्या कोवळ्या उन्हात महाराज काही कामाचे कागदपत्र पाहत होते. ते पाहून झाल्यावर तेथून दिसणाऱ्या राजमहालाकडे बघत महाराजांना काय वाटले कोणास ठाऊक, ते जवळच उभ्या असलेल्या माने पाटीलसाहेबांना म्हणाले, "माने, एखादे वेळी असे वाटते की, एवढा मोठा राजवाडा आम्हाला काय करावयाचा आहे? येथेच एखादा बंगला बांधून आपण त्यात राहावे व या राजवाड्याचे म्युझियम किंवा लायब्ररीत रूपांतर करून आमच्या प्रजेला त्याचा उपयोग करून द्यावा." महाराज किती साधे होते व खऱ्या अर्थाने ते किती थोर होते, याचा प्रत्यय या आठवणीवरून खचित येईल. राजा जनक हा जसा भोगी व त्यागी होता, त्याप्रमाणेच महाराजांचे बोलणे झाले असे म्हणावयास चिंता नाही. महाराजांना आपल्या प्रजेच्या सुखाचा ध्यास कसा लागलेला आहे, तेही या आठवणीवरून दिसते.

●●●

महाराजांच्या स्मरणशक्तीविषयी बऱ्याच आठवणी सांगितल्या जातात. त्यांच्या वार्षिक स्वारीत ते त्यांच्या सज्यातील चारी प्रांतांची तपासणी करीत. या तपासणीत ते प्रजेच्या प्रतिनिधींना भेटत, त्यांच्या अडचणी समजावून घेत, त्यांना न्याय मिळवून देत. अशा प्रसंगी ज्या प्रतिनिधींशी त्यांचे बोलणे झालेले असे, त्यांच्या नावासह त्यांची ते आठवण ठेवीत आणि पुढील खेपेत भेट झाल्यावर, "केम छो फुलाभाई, तमारू काम थयु ने? (कसे काय फुलाभाई, तुमचे काम झाले ना)", असे विचारीत. महाराजांच्या स्मरणशक्तीमुळे त्यांना हे बोलता येई व ऐकणाऱ्यालाही महाराजांच्या स्मरणात आपण आहोत, हे पाहून बरे वाटे. माझे मित्र सुप्रसिद्ध वसंतराव कप्तान हे महाराजांच्या स्मरणशक्तीविषयी एक पुढील आशयाची आठवण सांगत असतात. त्यावेळी वसंतराव बर्लिन येथ ऑलिंपिक सामन्याकरिता गेले होते. खेळ संपल्यावर वसंतराव कप्तान महाराजांना त्यांच्या निवासस्थानात भेटायला गेले. बडोद्याहून कोणी भेटायला आलेले पाहताच महाराजांना आनंद झाला. त्यांनी त्यांची विचारपूस केली व बडोद्यात भेटायला सांगितले. त्यावर वसंतराव गमतीने म्हणाले, "महाराजसाहेब, या बर्लिन शहरात एक वेळ सूर्यदर्शन होईल; पण बडोद्यात आपले दर्शन होणे कठीण असते." यावर महाराज मनापासून हसले आणि म्हणाले, "ठीक आहे. आम्हीच तुम्हाला बोलावू, मग तर झाले ना?" नंतर ठरलेल्या वेळी वसंतराव परत बडोद्यास आले व बर्लिनचा प्रसंग विसरून गेले. काही महिन्यांनी महाराजही आपल्या युरोपच्या स्वारीहून परत बडोद्यास आले; पण वसंतरावास विसरले नाहीत. महाराज बडोद्याच्या मुक्कामात ज्यांची खास भेट घ्यायची असेल, त्यांना भोजनाला बोलावीत. तसे त्यांनी वसंतरावांना बोलाविले.

आमंत्रण वाचून त्यात काही चूक झाली असावी, असे समजून वसंतराव राजमहलात प्रथम गेले नाहीत. दुसऱ्या दिवशी पुनः आमंत्रण येताच वसंतराव भोजनाला गेले. भोजन संपल्यावर आलेली मंडळी महाराजांना मुजरा करून गेली. वसंतराव मुजरा करायला जाताच त्यांच्या पाटीवर थाप मारून महाराज म्हणाले, ''काय वसंतराव, तुम्हाला कबूल केल्याप्रमाणे बोलाविले की नाही?'' वसंतराव म्हणतात, महाराजांची ही विलक्षण स्मरणशक्ती पाहून आपण अगदी चकीत झालो.

●●●

४

श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात

लेखक

रियासतकार
गोविंद सखाराम सरदेसाई

श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासांत

लेखक :
रियासतकार
गोविंद सखाराम सरदेसाई

★

१९५६

★

एस्. जगन्नाथ आणि कंपनी, पुणें २.

★

किंमत १॥ रुपया

दोन शब्द

रा. ब. गोविंदराव सरदेसाई यांनी 'श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत' या पुस्तकात श्रीमंत सयाजीराव महाराज यांची ओळख करून दिलेली आहे. श्री गोविंदरावांचे सर्व जीवन महाराजांचे सन्निध गेले. शेवटची काही वर्षे या चाकरीतून सुटण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु तो हितपरिणामी ठरला नाही, हेही त्यांनी सांगितले आहे. महाराजांचे 'कर्तृत्व' मात्र या लेखांवरून वाचकांना सहज पटणारे आहे, असेच कोणीही कबूल करील.

ज्या काळात महाराज गादीवर आले त्या वेळी इंग्रज अधिकाऱ्यांची पकड संस्थानिकांवर फार जबर होती. महाराजांना ब्रिटीशांचे हे वर्तन आवडले नाही. काळ ओळखून ब्रिटीशांचे दास न बनता प्रजेचे हित जेवढे करता येईल तेवढे त्यांनी केले आहे. संस्थान नमुनेदार करण्यासाठी कर्तबगार माणसे लागत असतात, परंतु अशी माणसे बाजारात विकत मिळत नाहीत, ती तयार करावी लागतात. महाराजांनी योग्य माणसांची निवड करून त्यांना युरोपला पाठविले व शिक्षण घेऊन परत आल्यानंतर त्यांना अधिकाराच्या जागा दिल्या. माणसाला मोठे होण्याची संधी दिली म्हणजे माणसे मोठी होतात, हे त्यांनी भारतातील जनतेला दाखवून दिले. सर्व हिंदुस्थानात बडोदे संस्थानचा कारभार आदर्शवत भासू लागला. इतर संस्थानातील अधिकारी बडोद्यास येऊन 'कारभार कसा करावा' हे शिकू लागले. ब्रिटिश विभागात ज्या सुधारणा दिसत नव्हत्या त्या बडोदे संस्थानात पाहावयास मिळत. इंग्रज अधिकाऱ्यांनाही या गोष्टीचा हेवा वाटे.

सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, खेडोपाडी वाचनालये प्रथम बडोद्यात सुरू झाली. सर्व खात्यांचा कारभार सुधारला; कारण महाराज कारभारात स्वतः लक्ष घालीत. नोकराला पेन्शन घेतल्यापासून तीन महिन्यांचे आत पेन्शनची रक्कम हाती पडत असे. ब्रिटिश हद्दीत मात्र तीन वर्ष झाली तरी पेन्शनचा पत्ता नसे. बडोदे संस्थान विलीन करताना आपल्या भारत सरकारनेही या विशेषाकडे पाहिले नाही. बडोदे संस्थानांतील चांगल्या गोष्टी यामुळे लयाला गेल्या, हे पाहून खेद होतो.

मी १९१६ चे फेब्रुवारी महिन्यात बडोदे- महाराजांचे पदरी नोकरी स्वीकारली. प्रथम महाराणी चिमणाबाईसाहेबांचा ए.डी.सी. म्हणून नोकरी स्वीकारली. मी काम केले. ए.डी.सी. म्हणून खाजगी खात्यातील निरनिराळ्या दप्तरांची माहिती मिळवीत असता, काही दिवस रा.ब. सरदेसाई यांचे अकौंट ब्रॅचमध्ये मी घालविले. तेथे प्रथम माझी व रा. ब. सरदेसाई यांची भेट झाली. श्रीमंत सयाजीरावांचे ए.डी.सी. होण्याचा मान मला १९१७ साली मिळाला. ए.डी.सी. मंडळी व प्रिन्स धैर्यशीलराव महाराजांचे धाकटे चिरंजीव बसले असता एकाने माझे ए.डी.सी. झाल्याबद्दल अभिनंदन केले. प्रिन्स धैर्यशीलरावांनी थोडे हसून म्हटले 'ए.डी.सी. झाल्याबद्दल जगतापांचे अभिनंदन करावयाचे की त्यांची कीव करावयाची, हे मला समजत नाही.' हे ऐकून माझे मन चरकले. महाराजांचे हाताखाली काम करणे कठीण असे आजूबाजूचे लोक म्हणत असत. पाच-सहा महिन्यांत मलाही वरील अनुभवाचे बोल पटू लागले व मी नोकरी सोडण्याचा इरादा करून १९१८ चे मेमध्ये पुण्यास आलो व पुढे काही दिवसांनी राजीनामा पाठविला.

'मागासलेल्या वर्गामध्ये शिक्षणाचा पसार व्हावा म्हणून मी एक शाळा काढली आहे' वगैरे कारण मी राजीनाम्यांत दाखविले. माझे हे कृत्य महाराजांना आवडले नाही. त्यावर रा.ब. सरदेसाई व महाराज यांची काही बोलणी झाली व ता. २४ ऑगस्ट १९१८ रोजी मला सरदेसाईच्या सहीचे एक लांबलचक पत्र आले. पुण्यास राहून ज्या प्रकारचे राष्ट्रीय कार्य आपण करू इच्छिता, ते बडोद्यास राहूनच आपणास अधिक यशस्विरितेने करता येईल असे मला वाटते. तरुण राजपुत्राचे श्री. प्रतापसिंहमहाराज शिक्षणाची जबाबदारी तुम्हावर टाकावी, असा महाराजांचा मानस आहे. या संधीचा तुम्ही अवश्य फायदा घ्यावा, असे मला वाटते. मी एक-दोन वर्षात सेवानिवृत्त होणार आहे. त्यापूर्वी माझी जबाबदारी सांभाळणारा माणूस मला तयार करावयास पाहिजे. वगैरे मजकूर त्या पत्रांत होता.

श्री शिवाजी हायस्कूलची सूरुवात जुलै १९१८ मध्ये मी केली व एक-दोन महिन्यांत ५।५० मुले जमली. लोकांनी माझ्यावर विश्वास ठेवून मदत देण्याची आश्वासने दिली. हे कार्य सोडून मी बडोद्यास येऊ शकत नाही, हेच उत्तर मला रा.व. सरदेसाई यांना पाठवावे लागले. श्री. गोविंदरावांसारख्या माणसालादेखील शेवटी शेवटी किती त्रास झाला व महाराजांचे नोकरीतून त्यांना सोडविण्यास दुसरे कोणी मिळू शकले नाहीत, ही दु:खद घटनाच समजली पाहिजे.

महाराजांचे थोर गुण बाहेरच्या माणसांना दिसत, परंतु कधी कधी त्यांच्यातील राजेपणा जागा होऊन जेव्हा तो जवळच्या माणसांना त्रास देई तेव्हा त्याची कल्पना मात्र दूरच्या माणसांना होत नसे. समुद्रावरील लाटा जरी एका दिशेने वाहताना दिसत असल्या तरी त्याखाली विरुध्द दिशेने मोठ्या लाटा वाहत असतात, त्याचप्रमाणे महाराजांचे खोल मनात काय खळबळ चाललेली आहे, हे केवळ त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून कळत नसे व त्यामुळे त्यांना आवडेल असे वर्तन करणे जवळच्या माणसांना कठीण पडत असे. हा स्वभावात दिसून येणारा विरोध सोडल्यास महाराजांचे अगणित गुण प्रजेच्या हितास कारणीभूत झाले आहेत. भारतात बडोदे संस्थान विलीन झाले असले तरी, आजही 'आमची गायकवाडी बरी होती' असे बडोद्यातील मराठेच नव्हे तर काही

गुजराथी बंधूही म्हणत आहेत हे लक्षांत ठेवले पाहिजे. रा.व. सरदेसाई यांनी या उतार वयात महाराजांविषयीच्या आपल्या आठवणी प्रसिद्ध करून महाराजांची ओळख महाराष्ट्राला पटवून दिली, ही त्यांची थोर सेवा होय.

पुणे
ता. २० सप्टेंबर १९५६.

वा. ग. जगताप.

आत्मनिवेदन

पुण्याच्या सुप्रसिध्द सकाळ पत्राचे संपादक डॉ. परुळेकर यांचा-माझा अलीकडे दृढ परिचय जडला. आम्ही वारंवार भेटून विचारविनिमय करतो. मी एखादा लेख निविला की ते त्याचा आदराने स्वीकार करतात. अलीकडे त्यांनी माझे कित्येक लेख प्रसिध्द केले. सहजी बोलतांना मी त्यांना माझे बडोद्यांतले जीवन सांगितले. त्यावरून सयाजीरावांच्या आठवणी प्रसिध्द करण्याची कल्पना निघाली. ते म्हणाले, ''तुम्ही आपले हे अनुभव लिहून काढा. मी ते 'स्वराज्यां'त प्रसिध्द करतो.'' त्याप्रमाणे एकामागून एक असे नऊ लेख मला सुचले तसे मी लिहून काढले आणि डॉ. परुळेकरांनी ते गेल्या साली सप्टेंबरपासून नोव्हेंबरपर्यंत पाठोपाठ नऊ अंकांत प्रसिध्द केले. बऱ्याच वाचकांना ते आवडले असे मला कळले. एकदोघा चिकित्सकांना माझे लेखन अतीरंजीतही वाटले. 'इंग्रजी अमलाच्या गेल्या दशकांत राष्ट्रीय स्फूर्ती देणारे हे सयाजीराव होत,' या विधानाला कित्येकांनी आक्षेप घेतला. टिळक-सुरेंद्रनाथ अशा राष्ट्रपुरुषांत मी सयाजीरावांस बसविले हे काहींना अनुचित वाटले. स्वार्थत्याग अशा गुणांत सयाजीरावांची गणना करता येणार नाही हे मलाही मान्य आहे. पण राजकीय कर्तृत्वाच्या बाबतीत सयाजीराव अद्वितीय होत असे मला अद्यापी वाटते. इतिहासकार राजवाड्यांनी महाराष्ट्रातील शंभर वर्षीच्या कर्तृत्वान व्यक्तीची मोजदाद घेणारा एक बहुमोल लेख चाळीस वर्षांपूर्वीच प्रसिद्ध केला, त्यात त्यांनी पहिले नाव सयाजीरावांचे नमूद केले आहे, मला एवढेच सांगायचे की, माझ्या मतास राजवाड्यांचा पाठींबा आहे.

सयाजीरावांसंबंधाने आणखीही कित्येक मतभेद माझ्या कानावर आले. मला त्यात आश्चर्य वाटले नाही. मी काही सयाजीरावांचे काटेकोर ऐतिहासिक चरित्र बनवित नव्हतो. योगायोगाने त्यांच्याशी माझा दीर्घ सहवास घडला, तेवढ्या अवधीतील कित्येत विशिष्ट प्रसंग व व्यक्ती निवडून माझ्या मनावर जे संस्कार घडले त्यांचे शब्दचित्र मी रेखाटले, ते कित्येकांना मान्य झाले नाही तर तो मी रुचिभेद समजेन. तेणेकरून विषयाचे महत्व कमी होत नाही. उलट अशा चर्चेने ते वाढतच जाईल. काही असले तरी लोकांचे लक्ष या लेखांनी बरेच वेधले हा अनुभव मला

विशेष उत्तेजक वाटला. आणखी त्यात भर घालावी अशाही सूचना मला आल्या. पुण्याचे एक आस्थेवाईक प्रकाशक श्री. गानू राजगुरु प्रेसचे संचालक हे मुद्दाम येथे येऊन मला भेटले आणि 'हे समग्र लेख मी पुन्हा कायम पुस्तकाच्या स्वरुपात प्रसिध्द करू इच्छितो, तुम्ही प्रत दुरुस्त करून द्या', अशी सूचना त्यांनी केली ती मला अत्यंत उचित वाटली. मी ती सूचना तत्काळ मान्य करून तो परिपाक 'श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात' या नावाने आता पुनरपि वाचकांस सादर करीत आहे. याचे सर्व श्रेय श्री. गानू यास आहे.

पूर्वीच्या स्मृती व व्यक्ती अंतःकरणात कोरल्या असल्यामुळे त्यांस नूतन तजेला देणे झाल्यास शक्य तितकी चित्रे पैदा करुन पुस्तकात घालावी अशी इच्छा निर्माण झाली, आणि चित्रे घालणे म्हणजे खर्चाची जोखीम पत्करणे हा प्रश्न उद्‌भवला. पण तोही श्री. गानू यांनी आनंदाने मान्य करून सुमारे पंधरा-सोळा दुर्मिळ चित्रे पुस्तकात स्वीकारली हा त्यांचाच गौरव होय. कित्येक चित्रे बडोद्यातून मुद्दाम पैदा करून आणली. सन १९०५ च्या सप्टेबरांत महाराज समस्त कुटुंबासह सेंट मॉरिट्‌झ येथे होते. त्या वेळी घेतलेला एक फोटो मुद्‌दाम पुस्तकांत घातला आहे. त्यात मागच्या रांगेत मी व दुसरे गृहस्थ आहेत. आज यांपैकी चिमणाबाई व त्यांच्या कन्या इंदिरा या दोघीच हयात आहेत. हे चित्र पाहून माझ्या पोटात कालवाकालव होते. त्यातल्या त्यात कुचबिहारच्या महाराणी इंदिरा नुकत्याच गेल्या साली येथे मला दर्शन देऊन गेल्या, त्या वेळचे त्यांचे चित्र दिले आहे. कारणपरत्वे या मालेत ज्या व्यक्तीचा उल्लेख आला आहे त्यांचे चित्र समोर असणे एवढाच लाभ मानला पाहिजे. सर टी. माधवरावांपासून बारा थोर पुरुषांनी सयाजीरावांचे दिवाण म्हणून लैकिक मिळविला. ते पुरुष मला अत्यंत वंद्य वाटतात. सर्वाची चित्रे एकत्र द्यावी असा विचार होता; परंतु ती मिळू शकली नाहीत. जयसिंगराव आंग्रे ही व्यक्ती अत्यंत आकर्षणीय असून माझ्या नेत्रापुढे वावरते. पण त्यांचे चित्र मिळाले नाही. शंकर मोरो रानडे यांचे दुर्मिळ चित्र मुद्‌दाम दिले आहे. हे एक रसिक साहित्यिक पंधरा-वीस वर्षे मजबरोबरच महाराजांचे पदरी होते.त्यांचे चित्र आदरणीय वाटेल.

या स्मृतिलेखात अमुक एक कालानुक्रम साधला आहे असे समजू नये. सर्व प्रसंग अलग असून ते कशाही क्रमाने वाचले तरी रसोत्पादक वाटतील. जसे आठवत गेले तसे मी लिहिले. आणखीही अनेक देता आले असते, पण माझ्या मते महाराजांचे कर्तृत्व मनात भरण्यास एवढे लेख पुरे आहेत. बापट-कमिशनचा एक लेख मात्र हल्ली मुद्दाम महत्वाचा म्हणून जास्त घातला आहे. महाराजांचा मनस्ताप लक्षात येण्यास या प्रकरणाची जरूर आहे, हे तो लेख वाचणाराच्या लक्षात येईल.

बडोद्याच्या ऐश्वर्यात मी वाढलो. मानवी जीवन कसे क्षणभंगुर आहे याची प्रचिती श्री. सयाजीरावांच्या चरित्राने चांगली येते. महाराष्ट्राने ही माझी अल्प सेवा मानून घ्यावी एवढीच प्रार्थना करतो.

ता. ७ सप्टेबर,
सन १९५६.

गो. स. सरदेसाई,
कामशेत.

प्रस्तावना

बडोदा संस्थान सयाजीराव महाराजांनी केलेल्या सुधारणांमुळे ओळखले जात. महाराज एक गुणग्राहक नृपती होते. महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यावर त्यांना योग्य वाटणारे अधिकारी निवडले. महाराजांच्या या निवडीमुळे सुव्यवस्थित राज्यकारभार करू शकले. महाराजांच्या सुधारणामागे या अधिकाऱ्यांची निवड हे एक रहस्य होते. य. रा. दाते यांचे याबाबतचे मत अत्यंत बोलके आहे. राज्यकर्त्याने मंत्री, सेनाध्यक्ष, अमात्य, वगैरे अधिकारी नेमताना व निवडताना भिन्नभिन्न परिस्थितीत भिन्नभिन्न प्रकारांनी त्यांना कसोटीस लावून, कडक परीक्षेत ज्यांचे देशाभिमान, निश्चिय, धैर्य, स्वामिभक्ती इत्यादी सद्गुण अचल राहतील अशांनाच निरनिराळ्या निरनिराळ्या जागांवर नेमावे अस कौटिल्याचे मत आहे." (दाते, पृ. २४८) महाराज तत्त्वज्ञ 'कौटील्य' यांना अपेक्षीत असणारे अधिकारी आणि सेवक निवडत.

महाराजांच्या कार्यकाळातील अधिकारी आणि इतर सेवकांची यादी पहिली तर कौटील्यांच्या विचाराचे त्यांनी तंतोतंत पालन केलेले दिसते. टी. माधवराव, श्रीनिवास राघव आयंगार, रमेशचंद्र दत्त, बिहारीलाल गुप्त, मि.सेडन, व्ही. पी. माधवराव, मि. इलिएट हे विद्वान, अनुभवी अधिकारी सुरुवातीचा काळात वेगवेगळ्या पदावर काम करत होते. त्यानंतर महाराजांनी मुत्सदी, कर्तबगार, विद्वान, प्रसिद्ध आणि नामांकित माणसे बडोद्यात आणली. तर असे अधिकारी तयार करण्यासाठी त्यांनी पैसे खर्च केले. शिष्यवृत्ती देत अनेकांना शिक्षणासाठी परदेशात पाठविले. महाराजांच्या पदरी नेहमी धुरंधर अधिकारी असत. त्यांच्या काळातील अधिकारी आणि नोकरांची काही नावे पहिली म्हणजे आपली साक्ष पटते. राजरत्न माणिकराव, केशवराव देशपांडे, खासेराव जाधव, संपतराव गायकवाड, अरविंद घोष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मनुभाई नंदशंकर मेहता, वासुदेव महादेव समर्थ, वासुदेव गोपाळ भांडारकर, विनायक महादेव पंडित, गुनाजीराव राजाबा निंबाळकर, जयसिंगराव आंग्रे, मनुबाई मेहता असे अनेक मातब्बर मंडळी महाराजांच्या पदरी होती.

महाराजांकडे सरदेसाई यांनी त्यांचे वाचक, राजपुत्रांचे शिक्षक, खाजगी हिशेबनीस अशा विविध पदावर सदतीस वर्षे नोकरी केली. त्यामुळे महाराजांचा त्यांना निकटतम सहवास त्यांना लाभला. महाराजांचे प्रोत्साहन आणि स्वतःचा व्यासंग यामुळे पुढे ते रियासातकार बनले. आपण रियासतकार बनलो याचे प्रमुख श्रेय सरदेसाई सयाजीराव महाराजांना देतात. महाराजांविषयीच्या अनेक आठवणी सरदेसाई यांच्याजवळ होत्या. त्या आठवणी 'श्री. सयाजीराव गायकवाड यांचे

सहवासांत' या ग्रंथात दिल्या आहेत. महाराजांचा सहवास, महाराजांचे कर्तृत्व, काम करण्याची हातोटी, व्यासंग यामुळे या आठवणी चिरस्मरणीय झाल्या आहेत.

महाराजांच्या आठवणी या ग्रंथात असल्या तरी महाराजांचे थोडक्यात समग्र चरित्र आहे. इ. स. १९२५ सालापर्यंत त्यांनी महाराजांकडे नोकरी केली. त्यानंतर निवृत्ती घेत पुण्याजवळ कामशेतला इतिहास लेखन करत आपला आयुष्यक्रम व्यतीत केला. सरदेसाई यांनी निवृत्ती घेतल्यानंतर तीस वर्षांनी या आठवणी लिहिल्या. या चौदा आठवणी आहेत. आठवणी देताना ज्या घटना - प्रसंगात ते स्वतः हजर होते असे रोमहर्षक प्रसंग निवडले आहेत. त्यामुळे हा ग्रंथ वाचनीय झाला आहे.

महाराजांमुळे आपण घडलो. महाराजांमुळे आपल्या जीवनाला शिस्त निर्माण झाली. महाराजांमुळे आपल्या कुटुंबाचा जीवनप्रवास सुखकर झाला. कुटुंबातील अनेक सदस्यांनी आपला उदरनिर्वाह बडोद्यात सुरू केला. त्यामुळे या आठवणी समरस होत देतात. आठवणीकडे बघण्याची त्यांची दृष्टी कृतज्ञेतेची आहे. ते आठवणींबद्दल म्हणतात, ''मी काही सयाजीरावांचे काटेकोर ऐतिहासिक चरित्र बनवत नव्हतो. योगायोगाने त्यांच्याशी माझा दीर्घ सहवास घडला, तेवढ्या अवधीतील कित्येक विशिष्ट प्रसंग व व्यक्ती निवडून माझ्या मनावर जे संस्कार घडले त्यांचे शब्दचित्र मी रेखाटले.'' (आत्मनिवेदन, पृ. ३४३) सरदेसाई यांनी महाराजांच्या लिहिलेल्या आठवणी उत्कंठावर्धक आहेत. रोमहर्षक आहेत. या आठवणींनी महाराजांच्या कार्याची आणि व्यक्तिमत्त्वाची ओळख होते. सरदेसाई यांचा इतिहास लेखनाचा व्यासंग आल्यामुळे या आठवणी उत्तम रीतीने चितारल्या आहेत.

- डॉ. राजेंद्र स. मगर,
निमगाव (म.), जि. सोलापूर.

अ नु क्र म

दोन शब्द / ३३९

लेखकाचे आत्म-निवेदन / ३४३

प्रस्तावना / ३४५

१. माझ्या जन्माचा योगायोग / ३४९

२. नियतीचा चमत्कार / ३५५

३. इंग्रज सत्ताधीशांशी तेढ / ३६२

४. राजद्रोह, देशपांडे-प्रकरण / ३७०

५. राजद्रोहाचे किटाळ / ३७७

६. जीवनातील सुखदुःखाचे अनुभव / ३८४

७. समर्थ, आंग्रे, भाटे / ३९१

८. दरबाराची रेखीव शिस्त / ३९७

९. बापट - कमिशन / ४०२

१०. देहावसान / ४०६

१.

माझ्या जन्माचा योगायोग

काय योगायोग असेल माझ्या जन्माचा की, कोकणच्या अज्ञात खेड्यातला एक मुलगा एकदम बडोद्याचे राज्यात नोकरीस लागावा। आज* माझी नव्वद वर्षे उलटून गेली. तेविसाव्या वर्षी मी बी. ए.झालो आणि आकस्मित रीतीने एकदम बडोद्यास सयाजीरावांचे पदरी जाऊन पडलो. तदुत्तर माझी तब्बल सदतीस वर्षे त्यांचे निकट समागमांत गेली.

महाराजांनी सहजी विचारले, ''मला एका हुशार बी.ए. झालेल्या इसमाची जरूर असून त्याला मोडी, बालबोध, इंग्रजी अवगत असावे. वाचन, पत्रव्यवहार, वर्तमानपत्रे वगैरे व्यवस्थित रीडरचे काम करण्यास लायक कारकून हवा. तुमच्या खात्रीचा कोणी असेल तर सांगा.'' आठल्यांनी उत्तर दिले, 'आत्ताच एक गृहस्थ मुंबईस बी.ए. च्या परीक्षेस बसलेला आपल्याजवळ राहण्यास योग्य असा मला माहीत आहे. आपण सांगाल तर बोलावतो.' महाराजांनी लगेच कळविले, 'परीक्षा पास झाला तर त्याला ताबडतोब बोलावून घ्या.' म्हणजे माझे जीवनाचे ताट हे अगोदरच नियतीने तयार ठेवले होते. परीक्षेचा निकाल लागून मी यशस्वी झालो आणि लगेच बडोद्यास गेलो. दरम्यान महाराज सयाजीराव मुलाच्या आजारास्तव महाबळेश्वरी गेले होते. तेथेच त्यांनी मला ताबडतोब बोलाविले. महाबळेश्वरात माझ्या नोकरीची सुरुवात ही अशी झाली.

प्रथम वर्ष-सहा महिने त्यांचे लेखनवाचनाचे काम केल्यावर त्यांचा वडील पुत्र फत्तेसिंहराव यांस सातवे वर्ष लागले. नीलगिरीस उटकमंड येथे त्यांचा जन्मोत्सव झाला. त्यावेळी महाराजांचे मनात आले, शिक्षणारंभ करण्याचा हा काल आहे. माझे काम त्या वेळी दररोज पाच-चार तासांहून जास्त नव्हते आणि महाराजांचा एक मोठा हव्यास असा होता की, दररोज स्वतः आपण दहा-बारा तास काम करायचे आणि समस्त नोकरांकडूनही तसेच भरपूर काम करून घ्यावयाचे. त्यांच्या एकंदर व्यवसायाचे वेळापत्रक अत्यंत रेखीव असून त्यात बहुधा ते कोणताही

---

* शनिवार ता. ३ सप्टेंबर, १९५२

व्यत्यय येऊ देत नसत. सर्व कृत्ये घड्याळाच्या गतीप्रमाणे सदा चालू असावयाची. अशा स्थितीत फत्तेसिंहरावांस अक्षरओळख करून देण्याची कामगिरी त्यांनी मला त्या दिवशी सांगितली आणि तीच मला पुढे कायमची मिळाली. बडोद्यास आल्यावर राजपुत्र विद्यालय म्हणून नवीन प्रयोग निर्माण झाला. त्यात प्रत्यक्ष महाराजांची मुले व त्यांचे दहा-पाच सोबती मुले-मुली आप्त असे शिकू लागले. सहजगत्या मी त्या शाळेचा चालक बनलो. वाढता वाढता शाळा पुष्कळ विस्तारली.

व्यायाम, खेळ, अश्वरोहण, गोळीबार, पोहणे, गायनवादन असे सर्व व्यवसाय उत्तरोत्तर या विद्यालयात बनून आले आणि त्या सर्वाचे तज्ज्ञ शिक्षक माझे मदतनीस बनले. मुख्य चालक मी बनल्यामुळे मलाही पुष्कळ नवीन अनुभव मिळू लागला. त्यात माझा स्वतःचा लाभ सांगण्यासारखा वाटतो तो हा की, मूळाक्षरे किंवा अंक लिपीपासून पुढे मॅट्रिक परीक्षेपावेतो मुले वरच्या वर्गात चढत गेली तसा मीही हमेशा नवीन विषय शिकत गेलो. कागद, पेन्सिल, पुस्तके, खेळ अशा खर्चासाठी सालाचे दोन हजार रुपये रक्कम बांधून दिलेली असून त्या खर्चावर माझा पूर्ण ताबा होता. कारणपरत्वे जास्त पैसा लागेल तो महाराज मंजूर करीत. मुलांच्या शिक्षणात त्यांनी काही एक उणे पडू दिले नाही. इंग्रजी धर्तीवर मी देवनागरी व मोडी लिपीची कॉपीबुके तयार केली. मराठी, संस्कृत, व्याकरण, भूगोल, इतिहास अशा सर्व विषयांची मला तजवीज करावी लागल्यामुळे मी शिक्षणाविषयाचा तज्ज्ञ न सांगता बनत गेलो. वामन पंडित, मोरोपंत, रामदास इत्यादी कवीचे भाग मला तयार करावे लागले. त्यामुळे न समजताच मी रियासतकार बनत गेलो.

पंचवीस वर्षे तरी बडोद्यास सरदेसाई मास्तर ही व्यक्ति चांगली मशहूर होती. पुष्कळदा महाराज स्वतः मी राजपुत्रांस शिकवीत असता जवळ येऊन बसत आणि आपल्या अनुभवाप्रमाणे योग्य वाटतील त्या सूचना करीत. शिवाय वारंवार ते सकाळ-संध्याकाळ फिरायला जाताना मला बरोबर बोलावीत तेव्हा नाना विषयांची व जागतिक घडामोडीची चर्चाही भरपूर होई. माझ्या अनुभवाचे हे विषय सहजगत्या माझ्या घरच्या मुलांना व आप्तेष्टांना मिळत गेले. मी बडोद्यात दाखल झालो त्याच सुमारास तेथील सुप्रसिध्द कलाभवन निर्माण झाले. त्यात माझे बंधु रंगकाम, वीणकाम, सुतारकाम शिकून उद्योगास लागले. उद्योगाची व नियमितपणाची शिस्त मुख्यचालकाच्याद्वारे सर्व समाजात कशी पसरत जाते याचे उत्कृष्ट उदाहरण अर्वाचीन काळातले हे सयाजीराव होत. एखादा अव्यवस्थीत धनी मला भेटला असता तर काय झाले असते 'यथा राजा तथा प्रजा' हा दंडक बडोद्याचे जनतेस मानवत गेला. खेळ, नाटके, सभासंभेलने, व्याख्याने, दरबार, कुस्त्या, प्रदर्शने, टेनिस टूर्नामेटस जनावरांच्या टकरा इत्यादी व्यवसाय सारखे चालू राहून बडोदे शहर सदा गजबजलेले असे. माझे दुपारचे भोजन व चहापाणी बहुधा सरकारवाड्यात होई. सकाळी स्नान करून घर सोडायचे ते दिवसभर यंत्रासारखे काम करून रात्र पडल्यावर राजपुत्रांस त्यांचे वाड्यात सोडून मी स्वगृही परत येई. अशा भरगच्च कार्यकमात माझी पंचवीस वर्षे लोटल्यावर राजपुत्र मोठे झाले व ते यथाकाल दिवंगतही झाले. तेव्हा राजपुत्र विद्यालय बंद झाले. तरी महाराजांनी मला अखेरपावेतो वाड्यातच डांबून ठेविले. मी या राजवाड्यातील समस्तांच्या लहरी सांभाळण्यात वैतागून गेलो. आणि मला कोठे तरी दुसरे काम द्या अशी

टोचणी महाराजांस लावली. ती त्यांना मानवली नाही. त्यांनी वाड्यांतच हिशेबी खात्याचे काम मला देऊन कळविले," सरदेसाई, तुमची सर्व नोकरी माझ्याच सान्निद्यात झाली असून वाड्यातील व्यवहाराची माहिती तुमच्याइतकी कोणास नाही. सरकारवाड्यात वावरणारे कौटुंबिक, आप्त, नोकर चाकर या सर्वांवर देखरेख ठेऊन त्यांची योग्य निगा ठेवणारा तुमच्याइतका प्रामाणिक व निःस्पृह इसम दुसरा मजपाशी नाही. प्रकृतीच्या कारणास्तव मला तुमची बडोद्यात अत्यंत जरूर आहे. योगायोगाने तुम्ही-आम्ही एकत्र आलो. तुमचे काम मला पसंत आहे.माझा खासगी पसारा मोठा आहे. व्यवहार तोडून दिलेले असले तरी ते हुकूमाप्रमाणे अमलात आणण्यासाठी तुमची मला जरूर आहे. तुम्ही पेन्शन न मागता अखेरपर्यंत पूर्ण पगार घेऊन बडोद्यातच रहावे. (Here you have to die in this palace, Sardesai.) " हे त्यांच्या तोंडचे शब्द अनेकवार निघालेले असून त्यावरून त्यांचा मजबद्दलचा जिव्हाळा व्यक्त होतो.

महाराजांची इच्छा काही वावगी नव्हती. ते म्हणत, माझी नातवंडे व मुले यांचे नावावर चरणारे लोक काही थोडे नाहीत. पैसा म्हटला की त्यास मुंगळे चिकटणार. मी उत्तर केले, आपण समर्थ आहा, माझ्यासारखे अनेक नोकर आपणास सहज मिळू शकतील. यावर ते म्हणत, नोकर मिळतील, पण ते तुमच्यासारखे माहीतगार कसे मिळणार. नवीन इसमाला सर्व गोष्टी अपरिचित असणार. असा हा उभयतांचा वाद माझ्या उतारवयात निकरावर आला.

महारांजाची कळकळ मान्य करूनसुध्दा मला प्रथम माझी परिस्थिति सांगितली पाहिजे. महाराजांच्या प्रोत्साहनाने व आश्रयाने मी व माझे कुटुंब थोडेबहुत उन्नतीस लागलो. माझा लेखनव्यवयास विस्तारला, मी रियासतकार बनलो. ते काम आपल्या हयातीत पूर्ण करावे, दुसरा कोणी ते करीत नाही, माझे काम अर्धवट राहू नये ही मनाची सारखी ओढ लागली आणि वय होत चालले तेव्हा ही तळमळ जास्तच वाढत गेली. यातून बडोद्याची हवा इतकी खराब की, माझी पचनकिया बिघडून मी अगदी निःसत्व बनलो. आज मी ९० चे वयात तीन-चार मैल सहज चालतो, तर बडोद्यात साठीच्या उमरीत एक मैलही चालवत नसे. तेव्हा मी महाराजांना आग्रह चालविला की, मला पेन्शन देऊन मोकळा करा. बडोद्यात राहिल्यास मला फार काळ जगण्याची आशा नाही. शिवाय माझा पुत्र शामकांत जर्मनीत रसायनशास्त्र शिकत होता त्यात त्याने तीन वर्षात डॉक्टरेटची डिग्री मिळविली. एकच मुलगा. त्याचे मातुश्रीस वाटे, आता तो परत आल्यावर उद्योगास लागेल. तेव्हा आपण त्रिवर्ग उर्वरित आयुष्य एकत्र राहून काढू. अशी माझ्या मनाची व्यग्रता १९२५ साली माझ्या वयाची साठ वर्षे पुरी होऊन आता यापुढे बडोदे सोडण्याचा निश्चय मी केला. या सालचा मार्च महिना होता. महाराज युरोपास निघाले. माझ्या एकंदर आयुष्यांतला अत्यंत स्मरणीय असा प्रसंग उत्पन्न झाला.

आज रात्री महाराज निघणार म्हणून सायंकाळी पाच वाजता मी महाराजांस भेटून सुप्रयाण इच्छिले आणि मी आता नोकरीत राहणार नाही, मला मुक्त करा अशी सूचना केली. त्यावेळी ते काही बोलले नाहीत. मी रोजच्याप्रमाणे घरी गेलो. रात्री दहाचे सुमारास बाहेर सरकारी मोटार आली की, महाराज बोलावतात. आता काय करणार? जन्मभर पैदा केलेली महाराजांच्या लोभाची जोड गमवायची की टिकवायची या विवंचनेत कपडे घालून मी तसाच वाड्यांत गेलो.

हया वेळचा तो हृदयद्रावक प्रसंग अक्षरशः माझ्या अंतःकरणात कायमचाच कोरला गेला आहे. रात्री वाड्यांत पाऊल ठेवतो तो सर्वत्र उद्विग्नतेचे वातावरण दिसले. विजेचे दिवेसुध्दा मुद्दाम अंधुक केलेले मला आढळले. ए.डी.सी. नी मला दारातच कळविले, महाराज तिसऱ्या मजल्यावर आहेत. तुमची वाट पहातात. मी तसाच वर गेलो तो महाराज अत्यंत चिंतामग्न होऊन, तीन नातवंडे जवळ घेऊन, एका आसनावर बसले होते. प्रकाश तर इतका मंद होता की, बहुतेक अंधारच म्हटला तरी चालेल. मी वंदन करताच ''या सरदेसाई, बसा त्या खूर्चीवर,'' असे म्हणाले, ''तुम्हास का बोलाविले समजलात का तुम्ही मला सोडून जाऊ नये. या मुलांना कोणी सांभाळणारा नाही.'' एवढा थोर पुरुष! माझ्यासारख्याची अशी विनवणी करतो आणि तीही अशा कठोर शब्दांत. नातवंडे तीन म्हणजे एक हल्लीचे प्रतापसिंह व दोघी त्यांच्या बहिणी. एक कोल्हापुरात व दुसरी सावंतवाडीस दिलेली. त्यांचे आईबाप निवर्तल्यावर त्यांचे संगोपन महाराजच करीत होते. महाराजांचे शब्द एकून मी अत्यंत गहिवरुन गेलो. तोंडातून शब्द फुटेना. कसेबसे मी बोललो. ''मी पूर्वीच सर्व बोलून गेलो आहे. त्याहून जास्त काही सांगायचे नाही.'' जिवावर आल्यासारखे होऊन हे शब्द मी उच्चारले. ते महाराजांस विशेष झोंबले. माझ्यासारख्या नोकराने त्यांचा असा उघड उपमर्द करावा हा प्रकार त्या मानी व कर्तबगार पुरुषास अत्यंत लागला ''लक्षात ठेवा, पुढे पश्चात्ताप होईल, नीट विचार करून उत्तर द्या.'' असे काही उद्‌गार त्यांचे निघाले आणि जवळचे नोकर कसे खाबू असतात त्यांचे वर्णन त्यांनी चालविले. इतक्यात ए.डी. सी. आत आले आणि म्हणाले, महाराज स्टेशनवर जाण्याची वेळ झाली. तसेच महाराज उठले आणि त्या तीन नातवंडांसह हळूहळू जिने उतरत आम्ही सर्व खाली मोटारीजवळ आलों. महाराज मोटारीत बसले. मी पायरीवर उभा. शेवटचे शब्द ते बोलले. ''नीट विचार करून वागा, तुम्हास पश्चाताप व्हावा असे मजकडून घडवू नका.'' झाले. मोटार स्टेशनावर गेली. दुसरे दिवशी महाराजांची बोट युरोपची वाट चालू लागली.मीही दिवाणास भेटून अर्ज दिला की, मला आतां नोकरीत राहणे नाही.

जन्मभर राहून जी भलाई मी महाराजांकडून कमावली तिचा शेवटी क्षणार्धात असा विरस झाला. पुढे तो माझा यथाकाल महाराजांपुढे रुजू झाला आणि ''नियमाप्रमाणे यांचे पेन्शन मंजूर'' असे शब्द उत्तरात आले. दरमहा २३७ रुपये पेन्शन बसले. मात्र तेव्हापासून माझ्या पूर्वीच्या नोकरीतील उणेपणा शोधून मला काहीतरी शिक्षा करावी असे प्रयत्न महाराजांनी चालविले. दरम्यान एका कंपनीत त्यांनी ठेवलेली ५० लाख रक्कम बुडाली. मी हिशेबी कामगार असल्यामुळे महाराजांनी त्या बाबतीत मला दोषी ठरवून माझे पेन्शनच्या रकमेत शेकडा ६० टक्के कपात केली. मी हे भाकीत पूर्वीपासून जाणून होतो. सर्वच पेन्शन त्यांनी बंद केले नाही हा लाभ मानून मी स्वस्थ बसलो. मजवर महाराजांनी नाहक अन्याय केला याचा बोभाटा फार झाल्याबद्दल प्रतापसिंह, चिमाणाबाई, महाराणी, दिवाण इत्यादींनी महाराजांशी पुष्कळ रदबदली केली, पण त्यांचा मजवरचा राग शांत झाला नाही. मी पेन्शन घेतल्यावर पंधरा वर्षे ते हयात होते. मी बडोद्यास जाऊन त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला, पण ते मला भेटेनात आणि कोणी माझे नाव काढले तर चिडत अशा स्थितीत सन १९३९ साली ते मुंबईस वारले. त्यावर

बडोद्यास प्रतापसिंहांचा राज्यारोहणसमारंभ झाला. त्याला त्यांनी मला आगत्याने बोलावून सत्कार केला. तेव्हापासून पुढे त्यांनी माझे पूर्वी मंजूर झालेले २३७ रुपये पेन्शन पुनः पूर्ण चालू केले. तत्पूर्वीची कपात बारा वर्षे झाली ती काही भरुन निघाली नाही. प्रतापसिंहांनी मला कळविले, ''सयाजीरावांच्या हयातीत त्यांची सत्ता चालू असता मला त्यांचा हुकूम फिरविता येत नव्हता. आता पुढे माझी हुकूमत चालू झाल्याने तुमचा तो पूर्वीचा अन्याय दूर करून पूर्ण रक्कम मंजूर करतो.'' अशी ही विधिघटना आहे. हल्ली मला पूर्वीचे पूर्ण पेन्शन मिळते, म्हणूनच माझी संसारयात्रा सुकर बनली आहे. सदतीस वर्षे राजैश्वर्याची राहणी भोगली तशीच ती त्यापुढील हयातीत अद्यापि मला भोगता येते हा जन्मांतरीचा योग म्हटला पाहिजे.

माझे पहिले दोन भाषांतरीत ग्रंथ

सयाजीरावांची कृपा व अवकृपा मजवर कशी बनत गेली त्याचा हा आढावा. असे अनुभव मानवी जीवनात सर्वांसच येतात. त्यातून प्रत्येक इसम आपली निभावणूक सुचेल तशी करीतच असतो. सयाजीरावांच्या अवकृपेबद्दल माझ्या अंतःकरणात यत्किंचीतही द्वेषबुध्दी वसत नाही. उलट हा माझा देह व आमचे सर्व कुटूंब बडोद्याच्या अन्नानेच पोसले हा योग मला कधी विसरता येणार नाही. महाराजांच्या सेवेतच मला जीवनातील अनेक बहुमोल लाभ प्राप्त झाले. मी नोकरीत रुजू झालो तेव्हा मला त्यांनी "Machiavellis' Prince" व "Seeley`s Expansion of England" या दोन इंग्रजी ग्रंथाचे मराठी भाषांतर करण्याची संधी दिली. म्हणूनच लेखनव्यवसायांत माझा प्रवेश झाला. ''राजधर्म'' व ''इंग्लड देशाचा विस्तार'' ही दोन माझी पहिली पुस्तके पूष्कळशी गचाळ बनली खरी, पण पाण्यात पडल्याशिवाय पोहता येत नाही या न्यायाने माझा धीर चेपून आता तर मी रियासतकार म्हणून मिरवितो त्याचे श्रेय मुख्यतः त्या महाराजांस आहे.

सयाजीराव महाराज एक अलौकिक व्यक्ती भारतभूमीला भूषण आणणारी निर्माण झाली हे लौकिकात आता फार थोड्यांना माहीत आहे. इंग्रजी अमदानीच्या शंभर वर्षात उत्कर्षाची पहिली स्फूर्ति राष्ट्राला दाखविणारी ही विभूती असून त्यांच्याशी मी जीवनाचे पहिले धडे शिकू शकलो हे मी आपले मोठे भाग्य समजतो. त्यांची कित्येक चरित्रे प्रसिध्द झाली, पण ती अनेक कारणांनी आज तरी लुप्तच बनली आहेत. कॉंग्रेस व महात्मा गांधी यांच्या उद्योगाने भारतभूमीचे विमोचन परचक्रातून झाले असे आपण समजतो. पण प्रत्यक्ष राज्यात सुधारणा करून उन्नतीचे खरे मार्ग प्रथम कृतीत आणून इंग्रज राजकर्त्यांनाही सयाजीरावांनी दमवून सोडले. इंग्रजांचा रोष झालेल्या अनेक राष्ट्रसेवकांचा त्यांनी धैर्याने बचाव केला. सक्तीचे शिक्षण व ग्रंथालयाची योजना हिंदुस्तानात प्रथम सयाजीरावांनी निर्माण केली. ते १९३९ मध्ये निवर्तले आणि पुढे थोड्याच अवधीनंतर इंग्रजसत्ता संपून आमची देशी संस्थाने इतकी विलीन झाली की, आज दोनशे वर्षे इंग्रजांप्रमाणेच या आपल्या स्वदेशी राजांचा अंमल भारतभूमीवर होता हा इतिहास आता लूप्त झाला आहे. माझे तर मुख्य आयुष्य सयाजीरावांच्या निकट परिचयात गेल्यामुळे माझ्या आठवणी अद्यापी ताज्या आहेत आणि त्या गोड व स्मरणीय आहेत. त्या निमित्तानेच मी

हे माझे पहिले आख्यान मुद्दाम येथे सांगितले आहे की, त्यावरून वाचकांस पुढील विषयाची कल्पना यावी. भलेपण मिळवायला प्राप्त परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रात भरपूर अवकाश आहे. म्हणूनच सयाजीराव बारा वर्षाचे असता अकल्पित कारणांनी बडोदानरेश बनले. खेडवळ जीवनातून नियतीने त्यांना उचलून एकदम भाग्याच्या परमोच्च शिखरावर आणून बसविले आणि पुढील साठ वर्षांचे दीर्घ कारभारात त्यांनी आपले सर्वांगीण कर्तृत्व प्रकट करून जागतिक किर्ती मिळविली. शिवाजीचा अवतार निराळ्या प्रकारचा झाला. तशाच प्रकारचा भिन्न मार्ग हुडकण्याचे भाग्य सयाजीरावांस लाभले. मी या मंडळीना आर्यसंस्कृतीचे पुण्यश्लोक समजतो. अशा थोर व्यक्तीचे स्मरण समाजात कायम टिकणे अवश्य असून त्यासाठी सयाजीरावांच्या कित्येक नमुनेदार आठवणी मी वाचकांस सादर करू चाहतो.

२.
नियतीचा चमत्कार

स्टॅन्ले राइस यांनी सयाजीरावांचे चरित्र लिहिले आहे. त्यांत ते पुढील सूचक वाक्य लिहितातः "Seldom did fate play a stranger trick than when she selected the little boy of Kavlana and placed him on the throne of Baroda." दैवी घटनेने कवळाण्याच्या एका अल्पवयी मुलास बडोदानरेश म्हणून गादीवर आणले हा चमत्कार होय." या चमत्काराचे इंगित समजून घेणे यात मोठा आकर्षक इतिहास भरलेला आहे. नाशिक जिल्ह्यात कवळाणे नावाचे एक खेडेगाव असून तेथे बडोदेकर गायकवाडांची एक दूरची शाखा पूर्वीपासून नांदत होती. त्या शाखेतील बारा वर्षाचा एक अशिक्षित मुलगा विधिघटनेने एकाएकी बडोद्याचे गादीचा मालक बनला. त्याने शहात्तर वर्षांच्या आपल्या हयातीत एवढे पराक्रम करुन दाखविले की, इंग्रजी सत्तेच्या एका शतकात अशी दुसरी संस्थानिक व्यक्ती निर्माण झाली नाही. ही व्यक्ती म्हणजे नुकतेच दिवंगत झालेले सयाजीराव गायकवाड होत. त्यांचे सर्वच चरित्र ऐतिहासिकदृष्ट्या मनोरम असून अलीकडे देशी संस्थाने विलीन झाल्यामुळे त्यांचे नावही बहुधा लुप्त झालेले दिसते. कोणाला वाटले नव्हते सयाजीरावांची कर्तबगारी अशी राष्टोत्कर्ष चिरस्मरणी होईल म्हणून. इंग्रजांसारख्या बलवान राज्यकर्त्यास एक अत्यंत अनुकरणीय असा राज्याचा मासला प्रत्यक्ष उदाहरणाने सयाजीरावांनी निर्माण करून दिला. बलिष्ट अशा सार्वभौम सत्तेशी झगडून आपले कायदेशीर हक्क शिकस्तीने सांभाळले, समस्त भारतात राजद्रोहाची व खून-जाळपोळीची स्फोटक लाट उसळली, तीत अनेक भारतीय व्यक्ती गोवल्या गेल्या. त्यांचा बचाव सयाजीरावांनी मोठ्या धैर्याने केला की, जेणेकरून हिंदुस्थानास नवीन स्फूर्ती मिळाली. हिंदुस्थानात इंग्रजांच्या सार्वभौम कक्षेत वागणारी पाच-चारशे संस्थाने सर्व निर्माल्यवत बनली असता बडोदे हे एकच संस्थान असे गाजले की, आम्हास कोणी तरी खरा वाली व धनी आहे अशी रयतेची भावना बनली. हा सर्व प्रकार कसकसा सिद्ध होत गेला ते मी आता पूर्वीच्या गोष्टी आठवून वाचकांस सांगणार आहे. अकल्पित गोष्टी कशा घडून येतात व त्यात कार्यकारणभाव किती असतो हेही

सहजी कळून येईल. कोणाला कल्पना झाली असती की, इ. स. १८७५ च्या १९ तारखेला मल्हारराव गायकवाड पदच्युत होतील आणि त्या घटनेत त्या राज्याचे भावी हिताहित निगडित आहे म्हणून. अशा आकस्मिक व अभावित घटनांना इतिहासकार मागाहून 'Contingent unforeseen causes.' अशी गोंडस नावे देतात, आपण त्यांस विधिघटना किंवा अन्नोदक-ऋणानुबंध म्हणतो. 'दैव चैवात्र पंचमम' हे त्यांचे निदान भगवतगीतेने ठरविले आहे, तेच आपण प्रथम उलगडून पाहू.

सन १८५७ च्या उन्हाळ्याचे दिवस. मे महिन्यात एके दिवशी सकाळीच कवळाण्याचे पाटील काशीराव गायकवाड यांचे दाराशी एक शिपाई एकाएकी दाखल झाला आणि म्हणाला, ''चला, पाटील, तुम्हास कलेक्टरसाहेब आताच्या आता बाहेर बोलवताहेत. स्वतः ते पहा झाडाखाली घोड्यावर उभे आहेत. निघा, उशीर करू नका''. पाटलाच्या पोटात धस्स झाले. काय प्रकरण आहे कोणास ठाऊक स्वतः साहेब आपल्या घरी येतात याचे गूढ पाटलास कळेना. तसेच डोईस मुंढासे गुंडाळून अंगावर धोतर पांघरुन ते साहेबाकडे गेले. घरात लहान मुले होती तीही पाठोपाठ मागून गेली. पाटलांनी साहेबास सलाम केला. त्यास मोडके तोडके मराठी येत होते. त्या धाटणीत त्याने विचारले, ''तुम्हास मुले किती आहेत पाटील?''

पाटील : हे बघा हे माझे तीन मुलगे. हा थोरला आनंदा, हा दुसरा गोपाळा आणि हा घाकटा संपती.

साहेब : आणखी तुमच्या घरात बंधूंची मुले असतील ना?

पाटील : आहेत की. काही इथे आहेत. काही बाहेर कामात आहेत. देवाच्या दयेनं दहा-बारा मुले घरात असून मीठ-भाकरी खाऊन गुजराण करतो.

साहेब : बरे आहे. तुम्ही हे तुमचे तीन मुलगे व बंधूचे दोन घेऊन उद्या सकाळी नाशकास आमच्या बंगल्यावर या. चुकू नका बरे।

हुकूमाप्रमाणे काशीराव मुले घेउन साहेबाचे भेटीस गेले. बंगल्यावर जाताच एका कारकुनाने येऊन त्यांस आत नेले. तेव्हा काशीरावांनी त्यास विचाले, काय कारण हो आम्हास येथे बोलावण्याचे त्यावर कारकून म्हणाला, आत येऊन बसा म्हणजे तुम्हांस सांगतो, बसल्यावर काशीराव पाटलास त्या कारकुनाने कळविले, ''बडोद्यास गायकवाडांचे राज्य आहे, तुम्ही जाणता. तुमचेच ते भाइबंद. मल्हारराव गादीवर होते. त्यांनी कारभार केला नाही, म्हणून इंग्रज सरकारने त्यांस राज्य करण्यास अयोग्य ठरवून येथे नेऊन ठेवले आणि त्यांचे वडील बंधु खंडेराव वारले. त्यांची पत्नी जमनाबाईसाहेब म्हणून आहेत. त्यांनी बाराएक वर्षे उमरीचा मुलगा पसंत करून दत्तक घ्यावा आणि त्यास गादीवर बसवावे, तो वयात येईपर्यंत राज्याचा कारभार करीण्यास सरकारने सर टी. माधवराव यांची नेमणूक केली.'' जमनाबाई पुण्यास रहात होत्या. त्या ताबडतोब बडोद्यास गेल्या आणि गादीचा वारस पसंत करण्याची धामधूम चालू झाली. सन १८७५ चा मे महिना बडोदा राजधानीत असा गडबडीत गेला. बडोद्याचे वातावरण कैक वर्षे बिघडलेले होते, म्हणून त्याबाहेरचा सालस मुलगा निवडून त्यास वयात येईतो अवश्य ते शिक्षण देऊन तयार करावे अशीही इंग्रज सरकारची योजना होती.

ता. २५ मे रोजी कवळाण्याचे काशीराव गायकवाड पाच मुले बरोबर घेऊन बडोद्यास दाखल झाले. हत्तीवरुन मिरवणूक काढून मंडळी मुक्कामावर पोचली. गरिबीच्या राहणीतून एकदम राज्यैश्वर्यास पोचल्याची अशी उदाहरणे दुर्मिळच म्हटली पाहिजेत. कोण धांदल त्या बिचाऱ्यांची उडाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. तरी ता. २६ रोजी जमनाबाईंनी सर टी. माधवरावांसमक्ष सर्व मुले पाहून काशीरावांचा मधला मुलगा गोपाळराव यास पसंत केले. ता. २७ रोजी दत्तविधान व राज्यारोहणसमारंभ होऊन गोपाळरावांचे नाव सयाजीराव ठेवण्यांत आले आणि ते राज्याधिपती बनले. त्यांचे वडील बंधु आनंदराव पुढे पुष्कळ वर्षे सेनापतीचे कामावर राहिले आणि धाकटे संपतराव खाजगी कारभारी वगैरे कामे करून लोकांस परिचित झाले. कवळाण्याचे सर्व विस्तृत कुटुंब बडोद्यात आले. त्या मंडळींना लहानमोठ्या नेमणुका बांधून देण्यात आल्या. अद्यपि ते सर्व आप्त बडोद्यात रहात आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या चतुष्कांत बडोद्यात नवीन मनु उद्यास आला. त्यात या नुतन महाराजांनी आपला जम कसा बसविला ते आता सांगावयाचे आहे.

सुदैवाने सर टी. माधवराव व जमनाबाई या दोन व्यक्तींचे मार्गदर्शन प्रथमच या खेडवळ मुलास लाभले. त्यांची पहिली सहा वर्षे विद्याभ्यासात गेली. इलियट नावाचे एक तरुण इंग्रज कलेक्टर वऱ्हाडात होते. त्यांची नेमणूक 'गार्डियन' म्हणून झाली, तीही त्यांच्या भाग्याला अनुकूल बनली. इलियटचा जिव्हाळा महाराजांना एवढा प्रेमाचा बनला की, पुढे त्यासच आपल्या नोकरीत त्यांनी कायमचे घेतले. महाराजांच्या हितास हे गृहस्थ मनापासून झटले म्हणून त्यांजवर पुढे इंग्रज सरकारची इतराजीही झाली ती त्यांनी जुमानली नाही. इलियटसाहेबांच्या आधारावरच सयाजीरावांना अनेक बिकट प्रसंग निभावता आले.

विद्याभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून सर टी. माधवरावांनी शहराबाहेर एक नवीन विस्तृत दालनाचा बंगला बांधून त्यातच सारा वेळ महाराजांचा जावा, राजवाड्यातील नोकरांच्या व आश्रितांच्या घोळक्यातून त्यांनी दूर अलिप्त रहावे अशी सोय केली ती फारच फायदेशीर ठरली. त्या शाळेच्या इमारतीवर महाराजांचा लोभ कायमचाच जडला आणि त्यातच पुढे त्यांच्या मुलांचे राजपुत्र विद्यालय निर्माण झाले. खुद्द इलियटसाहेबांना राहण्यासाठी स्वतंत्र टूमदार बंगला जवळच बांधण्यात आला. हाच या नवीन प्रगतीचा आरंभ होय. जानेवारी सन १८७६त खऱ्या अभ्यासास सुरुवात झाली. तत्पूर्वी महाराजांस अक्षरओळख किंवा अंकही माहीत नव्हते. मराठी, गुजराती, लेखन, वाचन, हिशेब, इंग्रजी व संस्कृत भाषा असे अनेक विषय सुरू होऊन एकाचीही नीट तड पोचू शकली नाही. त्यातल्या त्यात प्रथम साहेबांशी बोलता आले पाहिजे म्हणून वेडेवाकडे इंग्रजी संभाषण त्यास ऐकून थोडेबहुत येऊ लागले हाच काय तो मुख्य अभ्यास. शिवाय दररोज अश्वारोहण, लष्करी परेड, आखाड्यांतला व्यायाम, पोहणे, दांडपटटा असले प्रकारही इतके शिकायचे होते की, त्यातून पुस्तकी अभ्यासास वेळच मिळत नसे. निरनिराळ्या विषयांचे तज्ज्ञ शिक्षक सर्व हजर असत; पण इतका ताण मुलास झेपला पाहिजे! शिवाय सणतेहवार, दरबार, भेटी, धर्मकृत्ये वगैरे रोजचे प्रकार त्यांच्यामागे काही थोडे नव्हते. सन १८७७ साली दिल्ली दरबार भरला त्यास त्यांना हजर रहावे लागले. सन १८७९ साली

त्यांचा विवाह-समारंभ झाला. त्यात पुष्कळसा अभ्यासाचा काळ फुकट गेला. पुढे अठरा वर्षे पुरी होताच त्यांस राज्याधिकार प्राप्त होणार त्यापूर्वी वर्षभर निरनिराळ्या खात्यांचे अंमलदार त्यांस राज्यकारभाराची माहिती देऊ लागले. त्यामुळे शालेय शिक्षणाची पूर्तता त्यांना मुळीच होऊ शकली नाही. बडोद्यास सन १८८१ तारीख २८ डिसेंबर रोजी मोठा समारंभ व दरबार होऊन सयाजीरावांस राज्यकारभाराचे संपूर्ण अधिकार देण्यात आले. तोच त्यांच्या हयातीतला अत्यंत स्मरणीय प्रसंग होय. या प्रसंगाने त्यांचे एकंदरीत जीवनास निराळा रंग प्राप्त होऊन त्यांनी आपले नाव गाजविले. तो प्रकार प्रथम सांगितला पाहिजे.

अधिकारग्रहणाप्रीत्यर्थ मोठा दरबार भरला. त्यासाठी राज्यातले प्रमुख लोक व सन्मान्य पाहुणे येऊन मानपत्रांचे वाचन व त्यास उत्तरे हे प्रकार दोन दिवस चालले. त्यातले दोन विशिष्ट प्रकार असे घडले की, त्यांच्या आंदोलनाने महाराजांचे पुढील सर्व वर्तन सिद्ध झाले, त्यावेळी लॉर्ड रिपन गव्हर्नर जनरल असून त्याने दरबारात वाचण्याचा खलिता बडोद्यास पाठविला. तो मुंबईचे गव्हर्नर सर जेरस फर्ग्युसन यांनी वाचून दाखविला. त्याचा मुख्य आशय असा की, ''ब्रिटीश सरकारशी राजनिष्ठ राहून महाराजांनी लोककल्याणार्थ झटावे. मल्हारराावांनी यात व्यत्यय आणला, म्हणून त्यांची तशी दशा झाली, हा प्रकार विसरू नये.'' हा एका अर्थी कायमचा इशारा महाराजास मिळाला. दुसऱ्या दिवशी मान पत्रांचा दरबार झाला. त्यात पुण्याच्या सार्वजनिक सभेचे मानपत्र घेऊन आलेले पाहुणे होते. त्यांनी ते वाचून दाखविले. हे मानपत्र सुप्रसिध्द राष्टपुत्र महादेव गोविंद रानडे यांनी स्वतः तयार केलेले होते. त्यांत पूर्वीच्या मराठी राज्याचा उल्लेख देऊन सर्व महाराष्ट्राची नजर तुर्त बडोद्यावर खिळलेली आहे. मराठी बाणा सांभाळून महाराजांनी इंग्रजांना नमुनेदार धडा घालून द्यावा, असा आशय होता. अर्थात एका बाजूस ब्रिटिश सार्वभौम सत्तेचा दट्ट्या व दुसऱ्या बाजूस मराठी राष्ट्राचा पाणीदार बाणा या दोहोंचा मिलाफ बनविण्यात महाराजांचे एकंदर कर्तव्य प्रगट झाले. त्यांच्या हयातीत जे काही स्मरणीय प्रसंग घडले त्यांच्या मुळाशी वरील द्विविध प्रेरणा सदैव जागृत दिसते. त्यांचे सर्व प्रवास, भाषण, हर्षामर्षाचे प्रसंग व एकंदर जीवनाचे सुखदुःख या सर्वांची उपपती लावावयाची तर तिचा उगम हा असा अधिकारप्राप्तीच्या प्रसंगातून बनलेला आहे. एका बाजूने आपल्या हक्काकरिता त्यांस इंग्रज अधिकाऱ्यांशी सतत झगडावे लागले आणि त्यात राजद्रोहाचे प्रहार सहन करून दिल्ली दरबारातले अनिष्ट प्रकार नाहक उत्पन्न झाले. खुद्द त्यांच्याशीच माझी या संबंधांत प्रसंगाने भरपूर चर्चा झाली, म्हणूनच त्यांचे जीवन महत्त्वाचे बनले.

सयाजीरावांना जन्भर तारेवरच नाच खेळावा लागला. या खेळातच त्यांचे सर्व शिक्षण बनून आले. सन १८८२ च्या आरंभी मराठी चार इयत्ता शिकलेल्या मुलांपेक्षा सयाजीरावांची बौध्दिक तयारी मुळीच जास्त नव्हती. पण तेव्हापासून केवळ सतत परिश्रमाने एक क्षणही फुकट न घालविता त्यांनी आपली प्रतिष्ठा एकसारखी वाढवीत नेली. शाळा-कॉलेजात त्यांना जे शिकता आले नाही ते त्यांनी आपल्या रोजच्या व्यवहारात भरपूर कमावले. उदाहरणार्थ, एक साधी फाशीची शिक्षा मंजूर करण्याचे काम त्यांजपुढे रुजू झाले. सेशन्स जज्जापुढे काम चालून एक खुनी इसमास फाशीची शिक्षा सांगण्यात आली. पुढे हायकोर्टात काम चालवून प्रत्यक्ष

हुकूम महाराजांचा पाहिजे म्हणून मुख्य न्यायधीश सही घेण्यासाटी त्यांजकडे गेले. त्यांच्या कारकीर्दीचा आरंभच म्हणाना तो! फाशी म्हणजे काय, या इसमाने काय गुन्हा केला, त्यांचे काम कसे चालले, पुरावा काय, त्यातला ग्राह्य कोणता व त्याज्य कोणता असे नानाविध प्रश्न महाराजांनी इतके विचारले की, त्यांची योग्य उत्तरे देऊन त्यांची खात्री पटल्याशिवाय ते प्रकरणावर सही करीतना. चार चार दिवस, आठ आठ दिवस नुसते हे एक काम घेऊन महाराज घाशीत बसत, त्यामुळे पुष्कळदा समजावणारे अधिकारीदेखील रडकुंडीस येत. स्वतःच्या मनाची पूर्ण खात्री पटल्याशिवाय पुढे जायचे नाही हा महाराजांचा स्वभाव बनला. काम एक खरे, पण तेवढ्यात महाराजांनी एकंदरीत न्यायखात्याची व विद्यमान कायद्यांची एवढी भरपूर माहिती पैदा केली की, त्या विषयात ते उत्तरोत्तर प्रवीण बनले. हाच प्रकार वसूल, पोलीस, शाळा, औषधी, इत्यादी खात्यांचा घडून आला. पहिली पाच वर्षे त्यांची अशा या चौकशीत, विषय समजून घेण्यात खर्च झाली. कामे समजावण्यास त्यांजकडे चाणाक्ष, विद्वान अधिकारी येत ते अगदी कंटाळून जात. या तज्ज्ञ मंडळीशी वाद खेळणे हेच महाराजांचे खरे शिक्षण बनले. कॉलेजात प्रोफेसरांच्या व्याख्यानांनी जे विद्यार्जन व्हावयाचे त्याच्या अनेकपट शिक्षण या तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या निकट सहवासात सयाजीरावांना प्राप्त झाल्यामुळे यथाकाल सहज ते मोठमोठ्या शिकलेल्या विद्वानास वादविवादाने कुंठित करू लागले. सदैव शिकाऊ वृत्ती बाळगून मनुष्य आपले सर्व व्यवहार उलगडू लागेल, तर सर्व जग हीच त्याची मुख्य शाळा बनते. महाराजांचे सर्व अधिकारी त्यांना कामे समजावताना अगदी मेटाकुटीस येत. महाराजसुध्दा कंटाळले, तर शांतपणे सांगत, आज आता हे काम असेच ठेवू. उद्या संपवू. वेळ फुकट घालवायचा नाही. पुढे महाराजांचा स्वभाव इतका चौकस बनला की, त्यांची तपासणी म्हणजे एक भिषण दिव्यच होय असे सर्व अधिकाऱ्यांस वाटे. अल्पावकाशात सर्व राज्यावर त्यांनी आपला दरारा बसविला.

रोजची कामे पाहून हुकूम देताना सावधपणाने वागून एकंदर कारभाराचा मेळ ते घालीत. पूर्वी त्यांजपुढे हुकूमासाठी कामे रुजू होत, त्यात काय मुद्द्यावर निर्णय पाहिजे त्याचा पत्ता लागत नसे. ही अव्यवस्था मोडून त्यांनी स्वतःची पध्दत सर्वथा नवीन उत्पन्न केली. तीत निर्णय करण्याचे मुददे क्रमवार शेवटी दाखविलेले असून प्रत्येक मुद्द्यावर खात्यांचा व इतरांचा अभिप्राय अल्प शब्दात नमूद करण्याची शिस्त ठरली. आरंभी प्रकरणावर एक कोष्टक असे, त्यावरून नजर फिरविताना एकदम कामाचे संपूर्ण स्वरुप लक्षात येई. ही पध्दत पुढे उत्तरोत्तर इतकी पसंतीस उतरली की, अनेक संस्थानिकांनी व प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारनेही तिचा पुष्कळसा अवलंब केला. तेणेकरून उगाच भाराभर कागद वाचण्याचे श्रम वाचून निकाल काय पाहिजे ते कळू लागले. महाराजांकडे रुजू होणाऱ्या कामास 'टिपण' हे नाव पडले.

महाराजांचा रोजचा कार्यकम ठरलेला होता. सकाळी उठताच स्नान करून पायी किंवा घोड्यावर फिरण्यास जात. साडेआठचे सुमारास परत येताच स्वतःचे अभ्यासास बसत. दोन-अडीच तास अभ्यास आटोपल्यावर ११ वाजता भोजन व नंतर अर्धा तास विश्रांती. साडेबारापासून तीन-चारपर्यंत रोजची रुजू होणारी सरकारी कामे खात्याचे मुख्याधिकारी ठरलेल्या वाराप्रमाणे घेऊन येत. चार वाजता अल्पोपहार आटोपून रात्री आठ-नऊपर्यंत भोजन आटोपल्यावर

तासभर विलियर्ड अगर इतर करमणूक, कथा, पुराण, गायन असे काही प्रकार चालल्यावर दहा-साडेदहा वाजता रात्रीची निद्रा. या कार्यक्रमांत सहसा बदल हात नसे.

सकाळचा अभ्यास दोन तास चाले. त्यात कोणी तरी तज्ज्ञ बोलावून त्याजपाशी निरनिराळे विषय ते शिकत. चार-पाच वर्षेपर्यंत या वेळात मी त्यांस संस्कृत शिकविले. त्यात त्यांना गोडी वाटू लागली. लहानपणचे शिक्षण शाळेच्या पद्धतीप्रमणे सर्वांगीण झाले नसल्यामुळे व्यवहारात त्यांना पुष्कळ अडचण होई. व्यवहारी अपूर्णांक, क्रियापद, वजनेमापे, हिशेब, व्याकरण हे विषय आरंभी शिकलेले नसल्यामुळे लेखनात किंवा भाषणात कर्ता आहे तर क्रियापद नाही, कियापद आहे तर कर्ता नाही, अशा काही ढोबळ चुका त्यांच्या होत. हे विषय ते मोठेपणी मूद्दाम शिकले. काश्मिरात गुलमर्ग येथे मी त्यांना इंग्रजी व्याकरण शिकविले. युरोपात सेंट मॉरिटझ येथे असता कैक दिवस मी त्यांस व्यवहारी अपूर्णाक शिकविले. तत्पूर्वी त्यांस तीन-चतुर्थांश, पांच-सप्तमांश या शब्दांचा पूर्ण बोध होत नसे. इंग्रजी व्याकरणाची एक आठवण मला स्वतःला कैक दिवस भोवली.

व्याकरणातील पुस्तकांतले धडे वाचून झाल्यावर ते त्यांतील प्रश्नांची उत्तरे लिहून काढीत. ती मी दुसरे दिवशी तपासून देई. सामान्यनामास 'a' किंवा 'the' हें आर्टिकल पाहिजे, विशेषनामास नको असा नियम आहे. त्यात त्यांची काहीतरी गैरसमजूत झाली. रात्री बारा वाजता प्रश्नोत्तर लिहीत असता त्यांस काही अडचण आली. मी पलीकडे दुसऱ्या मकानात दारास आतून कडी लावून निजलो होतो. त्यांनी मजकडे नोकर पाठविला आणि कळविले, 'निजले नसले तर त्यांना बोलवा.' नोकराने दरवाजा वाजविले. तेव्हा मी उठून कडी काढताच नोकर मला म्हणला, 'तुम्ही निजला नसाल तर महाराज बोलावतात.' त्या नोकरापुढे मी उभा असता निजलो आहे म्हणून कसे सांगू कपडे घालून तसाच त्यांजकडे गेलो. सामान्यनाम आणि विशेषनाम या विषयावर दोन तास चर्चा होऊन माझे डोके भणाणून गेले. असा प्रकार लागोपाठ तीन दिवस व्याकरणावरच झाला. त्यांची समजूत पटेना. तीन रात्री माझ्या अशा गेल्यावर वर्ष-दोन वर्षेपावेतो त्यांचा निद्रानाश मलाही जडला. अशा गमती, आठवणी किती म्हणून सांगाव्या तात्पर्यार्थ एकच, आपली चूक होऊ नये, भाषणांत, कामात आपले काही उणे बाहेर दिसू नये याची काळजी ते आतोनात घेत. त्यांचा सर्व ज्ञानसंचय अशा कष्टमय परिश्रमानेच बनलेला होता. मूळची बुध्दी बेताची; पण सतत उद्योगाने त्यांनी आपली लायकी इतकी वाढविली की, मोठमोठ्या सभात किंवा संस्थापुढे ते आपले प्रतिपादन इतर विद्वानाप्रमाणे ठसक्याने परिणामकारक वठवू शकत.

अनेक प्रसंगांनिमित्त महाराजांना लहानमोठी भाषणे करण्याचे प्रयोजन वारंवार पडे. व्हाइसरॉयांच्या भेटीच्या प्रसंगांत मेजवानीचे वेळी 'टोस्ट' सुचविण्यासारखे राजकारणी प्रसंग तूर्त लक्षात घ्यावयाचे नाहीत. पायाभरणी, इमारतीचे किंवा प्रदर्शनाचे उद्घाटन, पदवीदान किंवा बक्षीसवाटणीचे समारंभ या निमित्ताने करावयाची भाषणे आगाऊ लिहून काढणे हे एक महत्वाचे काम महाराजांपुढे असे. ठरीव राजकारणी प्रश्नांचे निराकरण दिवाणांकडून होई. इतर सामान्य बाबतींच्या भाषणासाठी एखाद्या तज्ज्ञाचे, सेकेटरीचे किंवा प्रोफेसरांचे सहाय्य महाराज घेत. प्रथम त्यांस समक्ष बोलावून मुख्य मुद्दे निश्चीत करून केव्हा केव्हा काही मजकूर महाराज

सांगत. काही अरविंदबाबूंसारखे त्यांचे हस्तक भाषणे लिहून काढीत. मी त्यांचा नुसता सांगकाम्या लेखक-वाचक होतो. तयार झालेले भाषण पुन्हा पुन्हा वाचून महाराजांकडून बोलवून घेण्याचे काम पुष्कळदा मला करावे लागे. एकदा सामाजिक परिषदेपुढे महाराजांस भाषण करावयाचे होते. ते अरविंद घोषांनी तयार करून आणले. आम्ही तिघांनी बसून ते वाचलें. त्यावर महाराज बोलले, ' हे भाषण इतके उच्च प्रकारचे उतरलें आहे की, लोकांना तें माझे असे वाटणार नाही. म्हणून तें जरा कमी दर्जावर आणले पाहिजे.'

"Can you not, Aravindbabau, tone it down? It is too fine to appear to be mine." त्यावर किंचित हसून अरविंद म्हणाले, ''मुद्दाम कशाला ती फिरवाफिरव करा! महाराज, तुम्हांला असे वाटते काय की, थोडे गचाळ केले म्हणजे ते तुमचेच आहे असे लोक मानतील चांगले असो, वाईट असो, लोक नेहमीच म्हणणार की, महाराज आपली भाषणे दुसऱ्यांकडून लिहवून वाचतात. विचार तुमचे आहेत ना तोच तुमचा मुख्य अंश.'' महाराजांनी सभेत ते भाषण पुढे वाचले. तेव्हा त्यांची फार वाहवा झाली. अशा सतत परिश्रमाने महाराजांनी आपली लायकी कमावलेली होती. उत्तरोत्तर ते सुंदर भाषणे आयत्या वेळी पूर्वतयारीशिवाय करू लागले हे फळ त्यांच्या उद्योगाचे.

सन १९०२ सालच्या उन्हाळ्यांत महाराज नैनिताल येथें दोन महिने राहिले. परत येतांना अलीगड युनिव्हर्सिटीच्या समारंभास येण्याचे आमंत्रण त्यांना आले ते त्यांनी स्वीकारले. सकाळी नऊ वाजता मुक्कामावरून निघतांना मला बोलावून ते म्हणाले, ''तुम्ही येणार का सभेला'' मी म्हटले, ''माझी इच्छा आहे. साधले तर येतो.'' त्यावर ते म्हणाले, ''मी सांगतो तसे करा. डोक्यास पागोटे न घालता टोपी घाला आणि सभेत दूर एखाद्या कोपऱ्यात जाऊन बसा आणि माझ्या भाषणाचे निरीक्षण करून त्यातले बरेवाईट प्रकार मागाहून मला मुद्दाम सांगा. माझा आवाज दूरपर्यंत एकू जातो की नाही, माझे हावभाव बरोबर वठतात की नाही, भाषणात चूका वगैरे काय होतात या सर्व गोष्टी तुम्ही निःशंकपणे मागाहून कळवा. म्हणजे मला माझ्या चूका सुधारता येतील.'' अशा रीतीने आपली सर्वांगीण सुधारणा अत्यंत दक्षतेने त्यांनी प्रथमपासून कमावली म्हणूनच त्यांना संस्थानिकांमध्ये योग्यतेचा उच्चांक गाठता आला. याचे उलट घसरपट्टीस पोचलेले राजे-महाराजे पुष्कळ झाले ते आपण ओळखतो. 'नर करणी करे तो नर का नारायण होय.'

लेखाची मर्यादा संपल्यामुळे आज येथेच थांबणे अवश्य आहे. पुढील लेखांत राजद्रोह प्रकरणाचे महाराजांचे सार्वभौम सरकारशी कसे व काय खटके उडाले तो प्रकार निवेदन करू.

●●●

३.

इंग्रज सत्ताधीशांशी तेढ

सन १८८१ अखेर सयाजीरावांस अधिकारप्राप्ति झाली तेव्हापासून सन १९३९त त्यांचे देहावसान झाले तोपर्यंत ५७ वर्षे त्यांनी राजसत्ता गाजविली. सत्ताधारणप्रसंगी त्यांस दोन विशिष्ट इशारे मिळाले. एक इंग्रज साम्राज्यांशी राजनिष्टा बाळगण्याचा व दुसरा पुण्याच्या सार्वजनिक सभेकडून मिळालेला महाराष्ट्रबाणा जागृत ठेवण्याचा. या दोन विरोधी भावनांचा मेळ घालणे ही गोष्ट अशक्यप्राय होती, ती घडवून आणण्यातच त्यांचे जीवन खर्च पडले. मराठी बाणा म्हटला की आपले कायदेशीर हक्क करारनाम्यांनी वगैरे ठरविलेले सांभाळणे, प्रजाजनांचे कल्याण अत्यांतिक उपायांनी करून दाखविणे आणि आपले राज्य नमुनेदार बनविणे या गोष्टी इंग्रज अधिकाऱ्याच्या लहरीवर अवलंबून होती. व्हाइसरॉय, मुंबईचे गव्हर्नर्स सोडले तरी गुजरातेत अधिकारावर असणारे इंग्रज अधिकारी, कमिशनर्स, कलेक्टर्स, पोलीस अंमलदार यांच्याशी सयाजीरावांचा नेहमी संबंध येणारा असून, त्यांमध्ये अनेक राजकारणी बाबातीत एकवाक्यता म्हणून नसे. इंग्रज अंमलदारांची वृत्ती संस्थानिकांस निर्माल्यावत बनविण्याची व हुकूमशाही चालविण्याची ही त-हा कोणीहि मानी सत्ताधीशाला मानवणारी नव्हती. महाराजांचे राज्य गुजरातेत. तेही सर्व एकजात सलग नव्हते. पालनपूर, द्वारका, बिलिमोरा एवढ्या त्रिकोणात गायकवाडी मुलूख व इंग्रजांचे जिल्हे अहमदाबाद, खेडा, सुरत इत्यादीची सर्वत्र खिचडी बनलेली असल्यामुळे पोलीसबंदोबस्त, गुन्हे, जकात अशा बाबतीत अमाप तक्रारी सारख्या चालू असत. महाराज वयांत येण्यापूर्वीच मीठ, नाणी, टपाल, असे राज्याचे एक एक हक्क इंग्रजांनी गिळंकृत केले महाराजांना ऐकू येत. त्याची चर्चा लोकांत सारखी चालल्याने महाराज अगोदरच अंतःकरणात जळू लागले व वेळ येताच त्याचा वचपा घेण्याची त्यांची वृत्ती बनत गेली. इलियटसाहेब त्यांचा पाठीराखा बनला. त्याजपुढे रेसिडेंटाची मात्रा चालेना. पुढे सेडन दिवाण असता रेसिडेंट कॉबही असाच फिका पडला.

सर टी. माधवरावांच्या जमान्यांतले पहिले जुने अधिकारी महाराजांना गुरूस्थानी वाटत असत. ते सर्व एकामागून एक पहिल्या पंधरा वर्षात निघून गेल्यावर महाराजांनी आपल्या मर्जीचे नवे अधिकारी कामावर आणले. समर्थ, बापट, श्रीनिवास, राघवयंगार, बाबू अरविंद घोष, धामणकर, पेस्तनजी, दोराबजी असे अनेक तरुण विद्वान अधिकारी हाताशी घेऊन त्यांच्याशी पूर्ण वाटाघाट करुन एक एक काम, सुधारणा किंवा इंग्रजांचे व्यवहार ते स्वतः उलगडू लागले. याच मंडळीत पुढे रमेशचंद्र दत्त, सेडन, व्ही. पी. कृष्णम्माचारी, व्ही. पी. माधवराव वगैरे नामांकित गृहस्थ त्यांनी आपल्या नोकरीत घेतले. अशा रीतीने राज्याच्या प्रगतीत एक एक पाऊल पुढे टाकीत सावधगिरीने महाराज वागत असता कर्झनशाहीचा उदय भारतभूमीवर झाला. तो सन १८९९ पासून १९०५ पर्यत कारभारावर होता हे वाचकांनी संदर्भासाठी स्मरणात वागवावे.

महाराजांचे मनात एक भावना सदैव जागृत होती की, समस्त हिंदी राष्ट्राचे आपण एक घटक असून आपण संस्थानिक असलो तरी तुटके अवयव नव्हे. राष्ट्रोध्दाराची जबाबदारी इतरांप्रमाणे आपल्यावरही थोडी-बहुत आहे. राष्ट्रोध्दाराच्या कामांत सर्व लोक सारखेच गोवलेले असणार ही महाराजांची वृत्ती इंग्रज सत्ताधीशांस मानवणारी नव्हती. 'तुम्ही आपल्यापुरते बोला' हे रेसिडेंटचे म्हणणे महाराजांना कधीच पटले नाही. लहानमोठे भेदाभेद कायम ठेवून 'फोडा आणि ठोका' ही इंग्रजांची राजनीती महाराजांच्या आड येई. दादाभाई नौरोजी, टिळक, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी असे धुरीण पुढारी राष्ट्रोद्योगाची कामे करीत, तिकडे महाराजांनी लक्ष घालू नये, त्यांना पुष्टी देणारे विचार महाराजांनी बोलू नयेत, इंग्रजी राज्यांतील विषयांशी त्यांनी आपले संबंध ठेवू नये, सामाजिक परिषद मुंबई-पुण्यास भरली तर तिचे अध्यक्षस्थान महाराजांनी स्वीकारू नये. मुंबईस मेडिकल कॉलेज वाढविण्याचा समारंभ झाला त्यांत महाराजांनी भाग घेतला तर इंग्रज अधिकारी त्यांजवर जळाफळू लागत. याच वेळी नॅशनल कॉंग्रेसची सालोसाल अधिवेशने होऊन देशांत जागृती झाली. लोक राजकीय सुधारणा व हक्क मागू लागले तशी संस्थानिकांनीही आपली गाऱ्हाणी सरकारास कळविली. रेल्वेचे रस्ते करायचे, तलाव बनवावयाचे, चोऱ्या-माऱ्यांचा बंदोबस्त करावयाचा म्हणजे पावलागणिक महाराजांचा संबंध इंग्रज अधिकाऱ्यांशी येऊन त्यास चोहोंकडून मुस्कटदाबी सहन करावी लागे. त्यामुळे महाराजांचा कोंडमारा होऊन कोणत्याही सुधारणेचे पाऊल पुढे पडू नये अशी वेळ आली.

१८९६-९७ सालापासून देशांत चहूकडे प्लेगचा प्रादुर्भाव होऊन दहा-वीस वर्षेपावेतो उपाययोजनांची मोठी धामधूम चालली. पुण्यास कलेक्टर रँड व ले. आयर्स्ट यांचे खून झाले. तेणेकरून नवीन आपत्ती येऊन लोक हवालदिल झाले. त्यात सयाजीराव मनापासून इंग्रजांना साहाय्य करीत नाहीत, अशी हाकाटी इंग्रजी पत्रांनीच चालविली. तीत महाराज राजद्रोही आहेत, असा प्रतिध्वनी प्रगट होऊ लागला. दरम्यान महाराज प्रकृतीच्या व इतर कारणांनी युरोपास वारंवार जाऊ लागले. फ्रान्स, जर्मनी, अमेरिका इत्यादी ठिकाणी जाऊन आपल्या हिंदी राष्ट्राध्यक्षास प्रगतीचे इलाज ते आपल्या कक्षेत घेऊ लागले की इंग्रजांना मोठे वैषम्य वाटे. प्रवासांत ते आपला दर्जा कसा लपवू शकणार त्याच्या बाजूची 'केसरी'सारखी वर्तमानपत्रे

महाराजांची तरफदारी करीत ती इंग्रजांच्या अंतःकरणाला झोंबू लागली. पॅरीस येथे फ्रेंच प्रेसिडेंटची किंवा जर्मनीत कैसरची महाराजांनी गाठ घेतली म्हणजे इंग्रजांचे डोक्यांत सूळ उठे. अमेरिकेत असताना त्यांना प्रेसिडेंटाने भेट दिली की इंग्रजांना वाटे, सयाजीराव आपले ब्रिटिश साम्राज्य उलथून पाडण्याचा उद्योग करतात. 'नावडतीचे मीठ आळणी' हाच लौकीक न्याय सयाजीरावांना सहन करावा लागला. महाराजांना प्रवासांत थोरामोठ्यांचा पाहुणचार लाभला यात गैर काय.

सन १९०० साली कर्झनसाहेबांचा पहिला ताठा लोकांचे दृष्टीस पडू लागला. हिंदुस्थानात दुष्काळी स्थिती निर्माण झाली. त्याच संधीस महाराणी चिमणाबाईना शस्त्रक्रियेची आवश्यकता उद्‌भवून महाराज युरोपला गेले. त्या साली पॅरिस येथे जंगी प्रदर्शन भरले तेही पाहून घ्यावे हा त्यांचा उद्‌देश. शिवाय फत्तेसिंगराव मॅट्रिक झाले. त्यांना पुढील अभ्यासासाठी ऑक्सफर्ड येथे ठेवले. ती व्यवस्था स्वतः पहाणे त्यांना प्राप्त झाले. निघण्यापूर्वी महाराजांनी सर्व राज्यांत फिरून दुष्काळासंबंधी जरूर ते उपाय व खर्च मंजूर केले आणि उन्हाळा येताच ते युरोपास निघून गेले. अशा स्थितीत कर्झनसाहेबांनी दुष्काळाच्या पाहणीचा दौरा मुद्दाम काढून ते बडोद्यास आले आणि तेथून महाराजास तार केली की, आम्ही बडोद्यास येत आहोत, तर तुम्ही त्यावेळी परत यावे. महाराजांना असे एकाएकी परत येणे शक्य नव्हते. त्यांनी दिवाणास तार करून व्हाइसरॉयांचा योग्य पाहुणचार करण्याची आज्ञा केली. हा कर्झनसाहेबांना मोठा अपमान वाटला आणि त्या दोन जहांबाज व्यक्तींची अशी काही चुरशीची लढत बनून आली की, अभेय पक्षांच्या कलहाच्या कागदांनी मोठमोठी कपाटे भरली. महाराजांची बाजू उत्कृष्ट सजवून कागदावर मांडणारे त्यावेळी बाबू अरविंद घोष आणि दिवाण सुप्रसिध्द विद्वान श्रीनिवास राघवयंगार होते. या दोन व्यक्ती म्हणजे राजकारणाचे अस्सल मेरुमणी म्हणता येतील. त्यातले कांही भाग माझ्या नजरेखालून गेलेले असून हल्ली स्वातंत्र्यप्राप्तीच्या युध्दाचा वृतान्त लिहिला जात आहे त्यात हा भाग अंशतः तरी स्वीकारला जाईल तर राष्ट्रीय उन्नतीच्या विषयात सयाजीरावांनी केवढी कामगिरी केली आहे ते दिसून येईल. सयाजीरावांना आपल्यापुढे नमविण्याचे लॉर्ड कर्झन यांनी जंगजंग पछाडले, पण यांनीच तेवढा आपला माहराष्ट्रबाणा कायम ठेविला. सन १९०० साली कर्झनसाहेबांनी सर्व संस्थानिकांस एका विक्षिप्त हुकूमाने अशी दहशत घातली होती की, राज्य सोडून बाहेर जाणे असल्यास त्यांनी प्रथम सार्वभौम सरकारची परवानगी मिळविली पाहिजे. हा जबरदस्त हुकूम कोण मानणार त्यावर प्रचंड काहूर उठले. संस्थानांच्या हक्कांवर ही मोठीच गदा आली; पण तो हुकूम कागदावरच राहिला.

एकापाठीमागून एक अनेक इंग्रज व्हाइसरॉय अधिकारावर येत गेले. त्या सर्वांना पुरुन उरले असतील तर एकटे सयाजीरावच होत. इंग्रज राज्यकर्ते सत्ताधीश पडले. त्यांच्या पाठीशी समग्र साम्राज्याची वृत्तपत्रसंस्था सारखी उभी, किंबहूना जगभर त्यांना उचलून धरणार लहान-मोठे राजकारणी वीर सिध्द असल्यामुळे महाराजांची बाजू तितक्या तीव्रतेने प्रकाशांत येऊ शकली नाही आणि या नाही त्या गलिच्छ युक्त्यांनी इंग्रजांनी महाराजांना खाली ओढण्याचा चंग बांधला होता असे म्हणता येईल. महाराजांचे एकंदर लक्ष समस्त हिंदी राष्ट्राच्या एकीवर

शिकलेले असल्यामुळे त्यांची दृष्टी एकट्या बडोद्यापुरती संकुचीत नव्हती. इंग्रजांना वाटे. ही बाहेरची उठाठेव महाराज कशाला करतात, बंगालच्या फाळणीचे शतकृत्य संपादून कर्झनसाहेब निघून गेले आणि मागे घाण राहिली ती निस्तरावी लागली हार्डिगसाहेबांस. त्यातून १९११ सालच्या दरबारातील अप्रयोजक वर्तनाचे किटाळ महाराजांवर उठले. त्यांतील खरा अंतर्गत प्रकार प्रकाशात आलेला नाही. माझ्याकडून तो महाराजांनी लिहविला.

इंग्रजी राज्यकर्त्यांनी सुराज्याचा नमुना उत्पन्न करून दाखविण्याची संधी महाराजांनी कधी सोडली नाही. त्यांनी अनेक विशिष्ट सुधारणा कायद्याने कृतीने आपल्या राज्यात चालू केल्या. बंगालची फाळणी झाली तीविरुध्द चळवळ निर्माण होऊन बाबू अरविंद घोष बडोदे सोडून गेले. तेव्हा रमेशचंद्र दत्त या दुसऱ्या थोर व्यक्तीस सयाजीरावांनी आपल्या नोकरीत मुद्दाम आणले. जेणेकरून इंग्रजांचा जळफळाट अधिकच वाढला. दत्तांच्या सहायाने कित्येक नवीन सुधारणा महाराजांनी राज्यांत चालू केल्या. त्यातली पहिली मुख्य म्हणजे आपल्या शाळांतून हिंदी भाषा चालू केली. सर्व राष्ट्राच्या ऐक्यवृध्दीसाठी प्रथम एकभाषा हे मुख्य साधन महाराजांनी स्वीकारले ते इंग्रजांच्या मनास झोंबू लागले. महाराजांनी जातिभेदावर प्रहार करून स्पृश्यास्पृश्यता कायद्याने बंद केली. समस्त स्त्री-पुरुषांना समाजात सारखे हक्क असावे अशा तऱ्हेचे सामाजिक कायदे बनविले निरक्षरता समूळ नाहीशी करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात सर्व शाळांतून सक्तीचे शिक्षण सुरू केले आणि वाचनाची क्षुधा शमविण्यासाठी सुलभ पुस्तकालये स्थापून त्यांचे जाळे असे काही विणून सिध्द केले की, विद्या, उद्योगधंदे, समाज इत्यादी बाबतीत महाराजांची प्रजा आणि शेजारच्या इंग्रजी अमलांतली प्रजा यांच्यात हळूहळू विलक्षण भेद दिसून येऊ लागला. सन १९०९ च्या दसऱ्यास २४ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र साहित्य संमेलनाची बडोद्यास बैठक झाली ती तीन दिवस इतकी गाजली की, तसा विद्वद्विचारविनिमय क्वचित कधी अनुभवास येतो. तिचे मुख्य चालक रमेशबाबू असून मी त्यांचा स्थानिक सेकेटरी होतो. एवढे यशस्वी संमेलन, इतके थोर पुरुष केवळ राष्ट्रप्रेमाने एकत्र आल्याचे दुसरे उदाहरण मिळणार नाही. डॉ. कीर्तिकर व डॉ. भांडारकर हे दोघे अध्यक्ष होते. हरप्रसाद शास्त्री, मदनमोहन मालवीय, जदुनाथ सरकार असे नाना प्रांतांचे विद्वद्वर्य तीन दिवस एकत्र जमून महाराज राष्ट्रसंघटना घडवितात हा स्वातंत्र्ययुध्दातला पहिला डाव होय, असे त्या वेळी सर्वांस वाटले. संमेलनाचे वेळी लोकमान्य टिळक मंडालेस कैदेची हवा उपभोगीत होते; पण त्यांचे दोन चेले खाडिलकर व केळकर यांनी आपल्या उज्ज्वल वाणीने त्या प्रसंगी टिळकांची जागा उत्कृष्ट भरुन काढली.

संमेलनाचे उद्घाटनाचे भाषण सव्वा तास रमेशचंद्रांनी केले ते अद्यापी माझ्या कानांत ठळकपणे दुमदुमत आहे. राष्ट्र म्हणजे काय, आपण परचक्रात सापडलो आहो, त्यांतून सुटकेचा मार्ग इतिहास काय दाखवतो हे दत्तांचे त्या दिवशीचे उद्गार ऐकून सर्व सभा मंत्रमुग्ध बनली. एक स्त्री काशीबाई कानिटकर त्या दिवशी अर्धा-पाउण तास बोलल्या. त्या भाषणाने सर्वांचे नेत्र ओलेचिंब झालेले लोकांनी अनुभविले. अशी संमेलने व परिषदा बडोद्यात महाराजांच्या प्रोत्साहनाने वारंवार किती घडत याची गणती करता येणार नाही. मराठी शिक्षण परिषद, गुजरात साहित्य परिषद, ओरिएंटल कॉन्फरन्स अशा अनेक संस्थांना मार्गदर्शन व वळण

लावन्याचे महनीय कार्य महाराज आस्थेने करीत. तेणेकरून भारताच्या जनतेत त्यांजबददल महान आदर निर्माण झाला आणि हाच त्यांचा सार्वत्रिक बोलबाला इंग्रज अधिकाऱ्यांस दु:सह वाटू लागला. महाराजांच्या प्रोत्साहनाने बडोदे शहर सदानकदा काहीतरी विशिष्ट समारंभांत निमग्न असे. खुद्द महाराजांचे दसऱ्याचे, संक्रांतीचे वगैरे दरबार, महाराणीचे हळदकुंकू, सणावारांची भोजने, इमारतीचे व प्रदर्शनाचे उद्घाटन, हत्ती-रेडे इत्यादीच्या टकरा. मल्लांच्या कुस्त्या, संगीताचे जलसे व शिमग्याचे तमाशे, किर्लोस्कर, गंधर्व इत्यादी कंपन्यांची नाटके, व्हाइसरॉय-गव्हर्नरांच्या भेटी व त्यांचे शिकारीचे व खेळांचे कार्यकम, भोजने व भाषणे, संस्थानिकांचे पाहुणचार, हंसस्वरुप स्वामी, रवींद्रनाथ टागोर, मार्क टवेन, किप्लिग अशांच्या व्याख्यानांचे कार्यक्रम असले प्रकार सारखे चालू असून त्यात बाहेरच्या जनतेसही भाग घेता येत असे. सालोसाल टेनिस टूर्नामेंट्स क्रिकेट मॅचेस, डुकरांच्या, चित्यांच्या व हरणांच्या शिकारी असे नानाविध प्रयोग पाच-पन्नास वर्षे अविचिन्नपणे बडोद्यात चालून सयाजीरावांच्या पुरस्काराने ते भारतभूमीच्या निकट परिचयाचे बनले.बडोदे व सयाजीराव यांचे साहचर्य कौतुकास्पद होते. देशांत राजेमहाराजे पुष्कळ होत; पण जी आपुलकी व आदर सर्वत्र बडोद्यासंबंधाने लोकांस वाटे तो इतरत्र प्रकट झाला नाही. वाटेल त्याला महाराजांची भेट घेऊन विचारविनिमय करता येई. अनुकूल परिस्थितीत व सदिच्छ, उच्च विचारसरणी व साधे जीवन यांच्या योगाने बडोद्याला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले. बडोदे राज्यांत पुस्तकालयांची योजना महाराजांनी हाती घेतली. त्यासाठी डॉ. बोर्डन व मि. व्हिटनॅक या दोघां अमेरिकन तज्ज्ञांस त्यांनी आपल्या नोकरीत कैक वर्षे ठेवले. अर्थात अशा कृत्यांचा संबंध उतावळ्या इंग्रजांनी राजद्रोहाशी जोडला आणि वर्तनामपत्री प्रचारांच्या जोरावर 'महाराज इंग्रजांशी प्रेम ठेवीत नाहीत, त्यांचा द्वेश करतात', असा अपप्रचार चालू केला. पसुण्यातीलच कित्येक पुढारी नरसोपंत केळकर, समर्थ विद्यालयाचे विजापूरकर, हिंगण्याचे अण्णा कर्वे, पांगारकर, प्रो. भानू, आहितन्गि राजवाडे व इतिहासज्ञ विसुभाऊ राजवाडे अशा अनेक व्यक्तीना मीच महाराजांकडे आणून भेटविले.काही तर कैक दिवस माझेच घरी पाहुणे होते. मिळून ज्या कोणाला काही विशिष्ट कसब किंवा उपयोगी हुन्नर दाखवायचा असेल त्याला सयाजीरावांचा उदार आश्रय कसा मिळे त्याची उदाहरणे काही थोडी घडली नाहीत. मराठी 'शब्दकोश' कर्ते श्री. दाते यांस महाराजांनी आपण होऊन बोलावून द्रव्यसहाय्य दिले. इंग्रजी राज्यकर्ते व उद्देशीय संस्थानिक यांतला हा ठळक भेद परभारे बाहेर व्यक्त होत गेला.

लॉर्ड कर्झन काय की मुंबईचा गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क लॉर्ड सिडनहॅम काय, यांस मोठे वैषम्य वाटे की, आम्ही लोकांच्या कल्याणार्थ इतके झटत असतां जी मान्यता जनतेंत सयाजीरावांबद्दल व्यक्त होई ती आपल्याबददल का नाही ते प्रगट करीत या प्रश्नाचे उत्तर त्यांनी आपल्या अंत:करणासच विचारले पाहिजे. हिंदुस्थानच्या सामान्य माणसास नुसती मामलेदारांची भेट घेण्यास कोण मारामार पडते. मग कलेक्टर किंवा गव्हर्नर यांचे तर नावच नको. आधी भाषा परकी, गव्हर्नरांचे सभोवार नेहमी कडक पहारा. खूद्द आपल्या खिशांत पिस्तूल घेतल्याशिवाय ते बाहेर पडायचे नाहीत. थोरा-मोठ्यांची भेटसुध्दा ते अत्यंत साशंकतेने घेणार. शिवाय गव्हर्नर

वगैरे सर्व मुदतबंदीचे नोकर, अधिकार संपून परत गेले की पुन्हा सामान्य जनतेंत जमा. सयाजीरावांचा प्रकार त्यांतला नाही. लहानांपासून थोरांपर्यत त्यांच्या दीर्घ कारकीदीत प्रत्येक प्रजाजनाला अशी खात्री वाटे की, माझी दाद घेतील असे एक गृहस्थ आज विद्यमान आहेत. आपले गाऱ्हाणे कानावर घातले की लगेच माझे संकट खात्रीने निवारण होणार. कोणीतरी मला बंधु किंवा देव आहे. त्यांचे दर्शन घडले की माझे दैव उलगडणार. अशी ही मनोमन खात्री घटकाभर अधिकार गाजविणाऱ्या इंग्रजाबद्दल लोकांना का वाटावी? खिशात पिस्तुले बाळगून का लोकप्रेम संपादन करता येते? मला पक्के आठवते, द्वारकेच्या दूर मामलेदाराचा एक शिपाई होता. त्यांने आपणाला काही अन्याय झाला अशी तकार पैशाच्या कार्डाने महाराजांच्या नावे टपालांतून पाठविली. मी त्यावेळी महाराजांचा 'रीडर' होतो. महाराजांनी सर्व टपाल पाहिले. त्यांत त्यांच्या नजरेत हे कार्ड आले, लगेच त्यांनी ते कार्ड रेव्हेन्यू खात्याचे मुख्याकडे पाठवून हुकूम लिहिला की, द्वारकेच्या शिपायाची तक्रार खरी-खोटी आहे याचा तपास करावा आणि योग्य न्याय केल्याची खबर हुजुरांस जाहीर करावी. दहा दिवसांत निकाल होऊन त्या शिपायाचेच पत्र महाराजांचे नावे आले की, मला न्याय मिळाला, आता माझी तक्रार काही नाही. असा प्रकार इंग्रज कलेक्टर किंवा इतर अधिकाऱ्यांचा कितीसा होतो आणि त्यांना सयाजीरावांसारखी मान्यता का मिळत नाही याचे उत्तर द्यावे. या बाबतीत मागच्या आठवणी म्हणून मला खालील गोष्ट सांगावीशी वाटते, ती मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांचेसंबधीची सन १९१२ चे सुमाराची आहे.

राजद्रोहाचे समूळ उच्चाटन करण्याचा चंग बांधून आलेले हे गव्हर्नर क्लार्क महाउपद्व्यापी होते. त्यांनीच टिळकांना मंडालेची यात्रा घडविली. सयाजीरावांनाही तशीच काही अद्दल घडवावी अशी त्यांची प्रखर मनीषा. मुंबईत उभयंतांच्या भेटी झाल्या. त्यांत क्लार्कसाहेबांनी महाराजांस कळविले, तुमच्या कारभाराची लोक फार वाखाणणी करतात, तो प्रत्यक्ष पाहून घ्यावा असे मला वाटते. लगेच महाराजांनी त्यांना बडोद्यास येण्याचे आमंत्रण दिले. ते त्यांनी स्वीकारून चार पाच दिवस बडोद्यास राहिले. शिकार, खेळ वगैरे मामुली कार्यकम त्यांजकरता मुद्दाम महाराजांनी बनविला. तुमची खाजगी राहणी मला समीप राहून पहावयाची आहे. अशी इच्छा गव्हर्नरांनी महाराजांस कळविली असल्यामुळे त्यांस त्यांनी आपल्या 'लक्ष्मीविलास' राजवाड्यांत आपल्याजवळ राहण्याची जागा नेमली. यास चिमणाबाई महाराणीचा विरोध होता. त्या म्हणाल्या "हे दीर्घद्वेषी कार्यसाधु साहेब जवळ नसावे, भलतेच किटाळ उपस्थित करतील." पण महाराजांचा कारभार उघडा होता. लपवण्यासारखे त्यांत काहीच नसल्यामुळे महाराणींची सूचना अमान्य करून महाराजांनी साहेबांस स्वतःजवळ आणून त्यांची हरएक व्यवस्था ते स्वतः पाहूं लागले. अत्यंत सलगीने आंघोळ, भोजन, चहापाणी असले प्रकार त्यांनी आपण होऊन त्यांचे यथास्थित केले.

कचेऱ्या तपासल्या. दिवाण, कौन्सिल यांची कामे महाराजांनी स्वतः गव्हर्नरास दाखविली; पण एवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांच्या पोटात काही निराळाच भाव वागत असून त्याचा छडा त्यांस लावावयाचा होता. पण तो भाग बोलून दाखविण्याजोगा नसल्यामुळे ते

घोटाळू लागले. एके दिवशी सकाळी सुमारे नऊ वाजले होते. मी काही कामासाठी तेथेच महाराजांजवळ होतो. तेव्हा क्लार्कसाहेब महाराजांना म्हणाले, ''महाराज, मला तुमचा सगळा रहाता वाडा हिंडून पहावासा वाटतो. तुमची सर्वच योजना मोठी चतुराईची दिसते.'' महाराज विचारात पडले. एवढा चार मजली वाडा स्वतः ते कसा हिंडून दाखविणार शिवाय प्रत्येक खोलीन् खोली त्यांना तरी कोठे माहीत होती अशा स्थितीती मी जवळ उभा पाहून महाराज मला म्हणाले, "Will you take His Excellency round and explain whatever he wants to see? मी 'होय' म्हणून वाडा दाखवीत निघालो. तेव्हा ते मला म्हणाले, ''वरचा मजला मला माहीत आहे, मी राहतोच आहे तेथे. आपण खालच्या तळमजळयापासूनच सुरुवात करू.'' तळमजळयावर पाहण्यासारखे काहीच नव्हते. नोकर-चाकर, देवघर, भांड्याकुंड्यांच्या जागा असे सटरफटर भाग होते. साहेब म्हणतात. ''तेच तर मला पाहावयचे महाराजांची बारीक नजर किती आहे ते.'' मी सर्व खोल्या त्यास दाखवीत चाललो. देवघराजवळ सोवळा पुजारी उभा होता. तो म्हणाला, ''आंत येऊ नका. दारातूनच देव पहा.'' पलीकडे दुसरी एक अंधारी कोटडी होती. तिच्या बाहेर पहाऱ्याचे शिपाई बसत. आतल्या बाजूस ते चिलिम वगैरे ओढीत. ते शिपाई मला म्हणूं लागले, कुणीकडे चाललांत साहेबांस घेऊन तिकडे पहाण्यासारखे काहीदेखील नाही. "I thought there was a staircase here leading to the cellar." येथे खाली तळघरांत जाण्याचा जिना असेल असे मला वाटते. "Cellar in this palace?'' वर काय जागा थोडी आहे की खाली स्वतंत्र तळघर असावे. "What?" said His Excellency, "has such a palace as this no cellar? We in England have cellars in most houses for keeping stores of coal and other requisites."

इथेच सगळे बिंग होते ते मला पाठीमागून कळले. वाड्याला तळघर नाही अशी खात्री गव्हर्नरांची पाहणी संपली आणि साहेब आपल्या कामास गेले. मी पुढे हा सर्व प्रकार महाराजांस सांगितला. तेव्हा ते मला म्हणाले, ''गव्हर्नरसाहेबांची समजूत होती की, मी आपल्या राहत्या वाड्याच्या तळघरात दारुगोळा गुप्त ठेवला आहे. कशाला, तर इंग्रजांशी युध्द करण्याकरीता. आहे की नाही इंग्रजी सी. आय. डी. ची बहादुरी'' सयाजीराव गायकवाड जगभर फिरून इंग्रजांविरुध्द एक फलक निर्माण करीत आहेत आणि त्याचा उगम महाराजांच्या राजवाड्यात आहे या तर्काची शहानिशा करण्यापुरतारच हा सर्व भेटीचा गव्हर्नरांचा खटाटोप. महाराजांना त्यांच्या पोलिसांकडून आगाऊ इशारा मिळाला असल्यामुळे ते सावध होते. गव्हर्नरसाहेब एवढया लघळपणाने भेटीस का येतात, घेऊं द्या त्यांना आमचे आतबाहेर जिणे पूर्णपणे पाहून, म्हणजे त्यांची परभारे खात्री होईल, हा महाराजांचा हेतू मला मागाहून समजला. महाराजांच्या राजद्रोहाची ही पूर्वतयारी होय.

सन १९१० साली व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांचे आगमन बडोद्यास झाले. बडोद्यास दाखल होण्यापूर्वी अहमदाबादचे मुक्कामात त्यांजवर बॉंबफेक झाली, तो बॉंब बडोद्यात बनलेला होता आणि बडोद्यात असे बॉंब ठिकठिकाणी बनत अशी ब्रिटिश पोलिसांची तकार पुष्कळ वर्षे चालू होती. खरा प्रकार हुडकून काढण्यास महाराज पूर्ण मदत करीत, परंतु शुध्द खोटे प्रकार

महाराजांच्या गळ्यात बांधण्याचे लपंडाव ते चालू देत नसत. सन १९०२ च्या जॅक्सनच्या खुनापासून राजद्रोहाची लाट देशभर उसळलेली असून तीत पुष्कळसा अंश बनावट असल्यामुळे खरे सत्य शोधून काढणे कठीण जाते. व्हाइसरॉयच्या भेटी म्हणजे कैक वर्षे हिंदी संस्थानिकांना एक मोठे दिव्यच होऊन बसले होते. शिकार, खेळ, मेळावे, सभा वगैरे बिनबोभाट कसे पार पडतात हीच संस्थानिकांची मोठी विवंचना बनलेली असते. मिंटोच्या आगमनांत बडोदा कॉलेजचा क्रिकेट खेळ कार्यकमावर नमूद होता. देशांतील वातावरण अत्यंत तंग होते आणि चहूंकडे राष्ट्रीय शिक्षणाचा उपक्रम चालून शाळा-कॉलेजांचे विद्यार्थी सरकारविरुध्द चळवळ करीत. बडोदा कॉलेजची क्रिकेट मॅच व्हाइसरॉय मिंटोपुढे व्हावयाची. त्यास विद्यार्थ्यांनी विरोध केला. ते म्हणाले, ''आम्ही हा खेळ साहेबांपुढे खेळणार नाही, त्यांना काळी निशाणे दाखवून 'ह्यो' करू.'' अधिकारी मोठ्या पेचात पडले. सायंकाळी चार वाजता खेळ ठरलेला होता. तत्पूर्वी तीन वाजता वाड्यात राणीसाहेबांचा चहा लाटसाहेबांकरता व्हावयाचा होता. शिक्षणाधिकारी मसाणी पारशी होते. ते दुपारी १२ वाजता महाराजांकडे येऊन सांगू लागले, ''तुम्ही मला आगाऊ कळविलेत हे बरे, त्यातून काय मार्ग काढावा तो मी पाहतो.'' मसाणी परत जाऊन ते व्हाइसरॉय येण्याची वाट पहात आतुर झाले होते.

इकडे वाड्यात महाराज-महाराणींनी एकत्र विचार करुन ३ वाजता चहा थोडा लांबविला आणि त्यावेळी मुलीचा नाच व वाद्यांचा जलसा तयार ठेवला. बोलण्याचे सर्व काम चिमणाबाईंनी स्वतःकडे घेतले. तीन वाजता व्हाइसरॉय चहासाठी वाड्यात आले. यावेळी राणीसाहेबांनी पुढे होऊन त्यांस कळविले, ''आमच्या इथला मुलींचा नाच व वाद्यांचा जलसा तुमचे पहाण्यात नसेल. चार वाजता क्रिकेटचा खेळ आहे; पण त्या विषयात तुमच्यासारख्या निष्णांतास बडोदे नवीन काय दाखविणार हे अधिकारी मोठे अप्रयोजक कार्यक्रम उगीचच ठेवतात. तुम्हास मी काही सूंदर चीज दाखवूं म्हणते.'' व्हाइसरॉयना हें म्हणणे सर्वथा पटले. नाचगाण्यांत दोन तास काढल्यावर महाराजांनी मोटार मागवून साडेपाच वाजता त्यांस बाहेर सहल करण्यास नेले. क्रिकेट मॅच जागच्या जागी जिरुन गेली. अंधार पडेपर्यंत वाट पाहून पाहूणे आले नाहीत, म्हणून निराशेच्या भावनेत लोक घरोघर निघून गेले. व्हाइसरॉयच्या भेटी म्हणजे हिंदी संस्थानांना चिंतेत पाडणारा विषय होता.

●●●

४.
राजद्रोह, देशपांडे- प्रकरण

जन्मापासून नानाविध प्रकृतीच्या माणसांशी व्यवहार करण्याचा सारखा प्रसंग येत गेल्यामुळे सयाजीराव यांची दक्षता व सावधानता अगदी पराकोटीस पोचली होती असे म्हणण्यास हरकत नाही. कोणी गृहस्थ भेटीस यावयाचा झाला म्हणजे त्यांचा हेतु, स्वभाव इत्यादी तपशील महाराज युक्तीने आगाऊ काढून घेत. एखादा संस्थानिक किंवा इतर पाहुणा रहाण्यास आला तर त्यांचे इंगित काढण्याची कला त्यांस उत्कृष्ट साधली होती. आपल्या कसबाने ते रेसिडेंट किंवा प्रत्यक्ष व्हाइसरॉयांसही चकवीत. लॉर्ड मिंटो बडोद्यास आल्यावेळची एक आठवण मीच पाहिलेली मजेदार वाटते. व्हाइसरॉय यायचे म्हणजे त्यांचे खिशांत महाराजांकडून संपादून घ्यायची प्रकरणे असावयाचीच. त्यांची थोडीबहूत आगाऊ कल्पना महाराजांनाही असे. परंतु चार दिवसांच्या भेटीत व भरगच्च कार्यकमांत महाराजांनीच सारखी स्वतःची बडबड इतकी चालू ठेवली की, त्यांनी लॉर्डसाहेबांना आपला विषय काढण्यास अवकाशच दिला नाही. शेवटी आज रात्री साहेब निघणार त्यावेळी ते महाराजांना मोटारीतून उतरताना म्हणाले, ''मला तुमच्याशी कित्येक गोष्टी बोलावयाच्या असता अद्यापि वेळच झाला नाही. आपण थोडा वेळ बोलू या.'' त्यावर महाराज म्हणाले, ''मला फार खेद वाटतो की, आताच दुसरे निकडीचे काम मला आहे. आपण असे करा, जे काय विषय बोलावयाचे असतील त्यांचे सारांशरुपाने टिपण लिहून माझ्या सेक्रेटरीकडे द्या. मी लगेच त्याची समर्पक व्यवस्था मोठ्या आस्थेने करीन. कागदावर मांडलेला विषय विचार करण्यास सोपा जातो.'' म्हणजे जो जबाब रस्त्यावरच्या सामान्य अर्जदारास महाराज नेहमी देत तोच त्यांनी पर्यायाने व्हाइसरॉयालाही दिला. सेकेटरी, ए.डी.सी. वगैरे आम्ही सर्व जवळ उभे राहून महाराजांचा हा डाव पाहून अंतःकरणात पोट धरुन हसत होतो की, धन्य आहे या पुरुषाच्या कौशल्याची!

महाराजांचे लहानमोठे अधिकारी सर्व राज्यांत अनेक कामांवर नेमलेले असत. त्यांची कामे, हातोटी, ढिलाई, किंबहुना आर्थिक पैदासीचे बोभाटे अत्यंत धूर्तपणे महाराज आपल्या लक्षात

साठवून ठेवीत. पुढे त्यांनी अशा कित्येक अंमलदारांस चार-दोन दिवस आपले पाहुणे म्हणून वाड्यात बोलावण्याचा प्रघात घातला. निनांवी पत्रांनी, पोलिसांच्या मार्फत किंवा अन्य साधनांनी प्रत्येक इसमाचे गुणदोष त्यांच्या कानावर येत, ते लक्षात ठेवून वाड्यातील पाहुणचाराच्या समयात भोजन, चहापाणी, फिरणे, गप्पागोष्टी करणे असल्या विषयांत ते त्या इसमाची सारखी तपासणी चार-दोन दिवसांत करीत. पोटांतला अंत बाहेर लागू द्यावयाचा नाही. आम्हा जवळच्या लोकांनादेखील महाराजांशी बोलताना अत्यंत धूर्तता बाळगावी लागे. त्यांच्याशी बोलताना एक प्रकारची कोर्टाची उलटतपासणीच होय असे आम्ही समजत होतो. कोठल्या शब्दाचा पाताळयंत्री उपयोग ते कसा करतील हे आम्ही निकटवर्ती सेवक आश्चर्याने पहात असू.

इंग्रजी राज्यात जसे जिल्ह्याचे कलेक्टर तसे त्याच दर्जाचे महाराजांचे सुभे. एकदा एका सुभ्याच्या वर्तनाबद्दल महाराजांच्या लक्षात संशय उत्पन्न झाला. त्यास त्यानी चार दिवस वाड्यात आपल्याजवळ पाहुणचारास बोलाविले. सारखी गोड भाषणे करून त्या गृहस्थाचे अंतःकरण त्यांनी सूक्ष्मतेने तपासून पाहिले व मग त्यास परत त्याच्या कामावर रवाना केले. लगेच चार दिवसांनी त्या गृहस्थावर वॉरंट सुटले आणि कोर्टाचा तगादा पाठीस लागला. शेवटी निकाल काय लागला तो प्रकार महत्वाचा नाही. पण अशावरून महाराजांची धुर्तता मात्र दिसून येते. अशा या कावेबाज राजाला गोत्यांत आणण्याचा प्रयत्न कित्येक क्षुद्रबुध्दी इंग्रज अधिकाऱ्यांनी केला. तो डाव केवळ महाराजांच्या थोर पुण्याईमुळेच फसला. हा प्रकार कैक वर्षे सारखा धुसमत होता. त्याची सुरुवात कर्झनसाहेबांचे वेळी होऊन शेवट पुढे पहिल्या महायुध्दाचे शेवटी चेम्सफर्ड व्हाइसरॉयचे वेळी झाला. मॉंटेग्यु, सेक्रेटरी ऑफ इंडिया, हिदुस्थानात आला. त्याने महाराजांशी दिलजमाई केली. तो मुंबईत उतरला त्या वेळी सयाजीराव तेथे होते. उभयतांच्या भेटी प्रथम तेथेच होऊन मनमुराद बोलणी झाली. पहिल्या महायुध्दांत महाराजांनी ब्रिटिश साम्राज्यास भरपूर सहाय्य केल्यामुळे इंग्रजांचा त्यांजवरचा पूर्वीचा सर्व रोष दूर झाला. जागतिक राजकारणच बदलले. त्यात आता हिंदी संस्थानाही नवीन मनु उत्पन्न झाला यात आश्चर्य नाही.

महाराज इंग्रज सरकारशी विद्रोह करतात हा वर्तमानपत्री प्रचार कर्झनशाहीच्या उद्दामपणांतून उदभवला. महाराजांचे आपल्या राज्याची सर्वांगीण सुधारणा करण्याचे धोरण त्यांना नडले; पण त्याच्या मुळाशी दोन-चार विशिष्ट व्यक्ती महाराजांचे पदरी होत्या त्यांचा संबंध आहे. बाबू अरविंद घोष त्यांतले मुख्य उध्वर्यु आणि या बाबुमहाशयांचे परमस्नेही खाशेराव जाधव व माधवराव जाधव हे बंधुद्वय व त्यांचे स्नेही केशवराव देशपांडे बॅरिस्टर. या चार गृहस्थावर इंग्रज सी.आय.डी. ची फार दिवस वक्रदृष्टी होती. ते सर्व बहुधा एकत्र एकाच घरांत रहात असत. जाधवबंधु महाराजांचे आप्त असून त्यांच्याच सहाय्याने युरोपांत शिक्षण मिळवून महाराजांचे नोकरीत बहुत वर्षे होते. सन १८९५ च्या सुमारास महाराजांनी अरविंदबाबूंस नोकरीत आणले. ते दहा वर्षेपावेतो राहून सन १९०५ त बंगालची फाळणी झाल्यावर परत कलकत्त्यास गेले आणि तेथे 'वंदेमातरम' पत्र काढून त्यांनी स्वराज्याची मोहीम चालू केली. वरील दहा वर्षात या चौघा गृहस्थांचे एक प्रकारचे गूढ चिंतन वा योगाभ्यास चालू असून त्यांत गुरूस्थानी बाबू अरविंद होते. अरविंदबाबू व मी महाराजांजवळ पुष्कळदा एकत्र रहात असून त्यांच्या उच्च

विद्वत्तेचा प्रकाश सहजी मलाही मिळत होता. परंतु आमचे व्यवसाय भिन्न असल्यामुळे त्यांच्या योगाभ्यासासारख्या विषयात माझा प्रवेश झाला नाही. बॅरिस्टर देशपांडे व अरविंदबाबू यांचा परिचय इंग्लडमध्येच सहाध्यायी म्हणून बनलेला होता. महाराजांनी त्यांची पारख करून दोघाही कर्तबगारांस आपल्या नोकरीत घेतले. अरविंदबाबू बडोदा कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. ते इंग्रजी कविता शिकवू लागले की सर्व विद्यार्थी त्यांचा प्रशांत भाषणौघ एकून सर्वथा गुंग बनत. प्रोफेसर असले तरी विशिष्ट कामासाठी महाराज त्यांना आपल्याजवळ बोलावीत. १९०० साली व पुढे कर्झनसाहेबांशी जे वाद महाराज खेळले त्यांतील बरेच लिखाण या बाबूमहाशयांच्या हातचे आहे. मी व ते पुष्कळदा एकत्र फिरायला जात असू. त्यांची नेहमीची वृत्ती अबोल. विचारलेल्या प्रश्नांना 'होय', 'नाही' यापलीकडे न जाणारे एक प्रकारे जिला आपण गूढ म्हणू अशी होती. ते योगाभ्यास करतात, नर्मदेच्या काठी कोणी साधूपुरुष त्यांचा गुरू रहात आहे असे आम्ही ऐकत असूं. पण त्यांच्या भक्तमंडळात माझा प्रवेश नसल्यामुळे मला त्यांची निकट सलगी लाभली नाही. मात्र राजद्रोहासारखे प्रवाद महाराजांविरुध्द उठू लागले. ते अरविंदबाबू १९०५त बडोदे सोडून गेल्यानंतरचे असून त्यांचा प्रादुर्भाव १९०८ ते १९१२ असा पुढचा आहे. याच काळात टिळकांना मंडालेचा अनुभव मिळाला. नाशकात जॅक्सनचा व लंडनमद्ये कर्झन वायली वगैरेचे प्रसिद्ध खून झाले. तेणेकरून ब्रिटिश राज्यकर्ते क्रोधसंतप्त होऊन राजद्रोहाचा नाश करण्यास प्रवृत्त झाले. या हिंसावृत्तीच्या मुळाशी कोण आहेत त्यांचा पाठपुरावा करून सूड घेण्याची वृत्तीही वरील काळात इंग्रज अधिकाऱ्यांच्या ठिकाणी बळावत गेली. ही वृत्ती केवळ बडोद्यालाच लागू होती असे नाही. सर्व प्रांतांतून तिचा फैलाव थोडाबहूत होताच. पण महाराजांवर किटाळ आले त्याचे कारण देशपांडे व खाशेराव जाधव या दोघांमुळे. या दोघा व्यक्तीसंबंधाने जरा जास्त स्पष्टता केली पाहिजे.

देशपांडे - जाधवांची कर्तव्यनिष्ठा

केशवराव देशपांडे व खाशेराव जाधव दोघेही कष्टाळू व अत्यंत कनवाळू वृत्तीचे सुशिक्षीत गृहस्थ असून, पांच-दहा वर्षे इंग्लडमध्ये शिक्षण मिळविल्यावर बडोद्याचे नोकरीत रेव्हेन्यू खात्यात दाखल झाले. ते दहा पंधरा वर्षात सुभ्याचे म्हणजे कलेक्टराचे हुद्द्यापर्यंत चढत गेले. कोणतेही काम हातात असो ते शक्य तितके झटून मोठ्या परिश्रमाने सिध्दीस नेण्याची दोघांची हातोटी अप्रतिम होती. एका विद्वानाने हिंदू धर्माची व्याख्याच अशी बनविली हे, ''कायमचे दुःखतप्तांना प्राणिनामार्तिनाशनम।'' 'दुःखांनी ग्रस्त झालेल्या जनांचे कल्याण माझ्या हातून घडावे एवढीच माझी इच्छा आहे असे समजणारा तो खरा हिंदु.' प्रत्यक्ष कुंतीनेही भगवंताजवळ मागणे एकच मागितले की, देवा, मला सदैव दुःखात ठेव. म्हणजे तुझे स्मरण होईल. ही जी थोरांची पराकोटी आपल्या संस्कृतीत आढळते ती या दोन व्यक्तीमध्ये पुष्कळ उतरली होती आणि हाती कलेक्टरचा अधिकार आला त्याचा भरपूर उपयोग करून त्या हुद्दयाचे खरे कर्तव्य काय ते त्यांनी प्रत्यक्ष कृतीत आणून लोकांस दाखविले हेच त्यांना नडले.

वर सांगितलेच आहे की, गुजरातेत गायकवाडांचे राज्य होते ते एकजात सलग त्यांचेच नव्हते. पेशवाईच्या वेळी समस्त गुजरात प्रदेश गायकवाडांचा होता. पण पुढे अनेक कारणांनी

ब्रिटिशांच्या आकमक धोरणाने सर्व गुजरात व सौराष्ट या प्रांतात अनंत सत्ताधीशांची खिचडी बनत गेली. त्यांत इंग्रज आपणांस सार्वभौम समजत, तर गायकवाड समजत, तुम्ही आम्ही समबल सत्ताधीश. तहातले भाषेत 'अलाइज' म्हणून गाजलेले. अर्थात एकदा घासाघीस सुरू झाली की लगेच प्रत्यक्ष व्यवहारांत सार्वभौमत्वाचा ताठा व समबल मित्र हे नाते कसे टिकावे याच वृत्तीतून महाराजांवर राजद्रोहाचे कुभांड उद्‌भवले. इंग्रजांचे कलेक्टर सुरत, भडोच, खेडा, अहमदाबाद या जिल्ह्यांचे व गायकवाडांचे नवसारी, बडोदा अशा जिल्हयांचे एकत्र येणे अपरिहार्य होते. त्यांतल्या त्यांत इंग्रजांचा ताठा जास्त कणखर, तसाच देशपांडे व मुख्यतः खाशेराव जाधव याचा दोघांचेही ब्रीद आपले कायदेशीर कर्वव्य यथायोग्य बजवावे असे होते. हे दोघे व इंग्रजी जिल्ह्यावर नेमणूक होऊन येणारे चार-पाच कलेक्टर हे सर्व अधिकाराच्या हुद्‌द्याने समान पातळीचे होते. आमचा कलेक्टर एकटा किंवा नुसता एखादा शिपाई बरोबर घेऊन हिंडतो. लोकांना भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकतो, अडीअडचणीत त्यांना सहाय करतो, पिण्याचे पाणी, रोगराई, स्वच्छता, शिक्षण, चोऱ्या वगैरे गुन्हे यांचा जागचे जागी त्वरेने निकाल करून त्यांच्या हिताहिताची काळजी बाळगतो, तर याचे उलट इंग्रजांचा कलेक्टर आपल्याच ताट्यांत वावरणारा, भाषा चांगली येत नसल्यामुळे लोकांची प्रत्यक्ष विचारपूस न करणारा असा हा गृहस्थ परका गणला गेला तर नवल काय! इंग्रजी रयतेची दाद वर लागायला कोण यातायात पडते तो प्रकार सांगूनही कळण्याजोगा नाही. गायकवाडी राज्याचा व इंग्रजी अंमलाचा हा व्यावहारिक विरोध गुजरातेत अत्यंत तीव्र व स्पष्ट दिसू लागला. गायकवाडी प्रजेचा समाचार त्यांचे कलेक्टर कसा घेतात तो प्रकार इंग्रजी प्रजा स्पष्ट बोलून दाखवू लागली आणि उघडपणे इंग्रजी पोलिसांस व अधिकाऱ्यांस हिणवू लागली. सक्तीचे शिक्षण, हिंदी भाषा, औषधांची व पुस्तकालयांची सोय हे बडोद्याचे प्रयोग इंग्रजांस जाचूं लागले. त्यांनी असा बोभाटा चालू केला की, देशपांडे व खाशेराव इंग्रजांना पाण्यात पहातात, राजद्रोही व्यक्तींना जवळ बाळगतात. इंग्रजांचे खून करण्यास उत्तेजन देतात. असे बोभाटे इंग्रजांनी महाराजांविरुध्दही चालविले. इंग्रज कमिशनर, पोलिस सुपरिंडेंट इत्यादींनी गव्हरर्नर व व्हाइसरॉय यांच्याकडे उघड तक्रारी केल्या की, देशपांडे-खाशेराव इत्यादी गृहस्थांचा बंदोबस्त न केला तर गुजरातेतून इंग्रजांचे राज्य नाहीसे झाले असे समजावे. या तक्रारीचा पाठपुरावा गव्हर्नर क्लार्कनेही केला. यास्तव भाषण पेच महाराजांना उत्पन्न झाला. महाराजांकडे रेसिडेंटने उघड मागणी केली की, देशपांडे व जाधव यांस नोकरीतून काढावे व शिक्षा करावी. महाराज म्हणत, त्यांचेविरुध्द पुरावा रुजू करा म्हणजे रीतसर न्यायसनासमोर निवाडा करता येईल. केवळ इंग्रज म्हणतात म्हणून बिनअपराधी इसमास नाहक शिक्षा करण्यात महाराजांचा तरी बोज कसा रहावा! महाराजही आज इतकी वर्षे राज्य करतात की नाहीत!

असें राजद्रोहाचे वातावरण सुमारे तीन-चार वर्षे तंग होते. १९१० पासून १९१२ पावेतो बडोद्यातील लोकांचे जीवन पुष्कळसे धोक्यात होते. त्या तीन वर्षात देशपांडे व खाशेराव यांना जीव मुठीत घेऊन वागावे लागे. इंग्रजांचे गुप्त हेर बडोद्यात व इतरत्र सारखे पेरले गेले होते. देशपांडे नवसारीचे सुभे व खाशेराव बडोद्याचे, त्यांस बाहेर फिरण्याचीसुध्दा चोरी वाटू लागली.

इंग्रजांचे हस्तक त्यांजवर कोठे काय संकट आणतील किंवा अंधारात वगैरे सहजी पकडून मोटारीत घालून एखाद्या इंग्रजी तुरुंगात ठेवतील अशी त्यांची आणीबाणीची अवस्था बनली.

अशा परिस्थितीत १९१०त व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांचे आगमन बडोद्यास झाले. तत्पूर्वी अहमदाबाद येथे ते असता त्यांजवर बॉंब पडला. हे निमित्त करून इंग्रजांनी असा जाहिरनामा केला की, 'हा बॉंब बडोद्यात तयार झाला. बडोदे राज्यात बॉंबचे कारखाने असून त्यांत कित्येक अंमलदारांचे अंग आहे. या अमलदारांना नोकरीत ठेवू नये.' अशी मागणी हिंदुस्थान सरकारच्या सी.आय.डी.कडून महारांजांकडे आली. ती सर्वथा नाकबूल करणें महाराजांस अशक्य झाले. इतक्यांत रमेशचंद्र दत्त दिवाण होते. ते वारले. तेणेकरून महाराजांचा मोठा आधार कमी झाला. तरी त्यावेळी सेडन म्हणून अमात्य होते. ते पूर्वी मुंबई इलाख्यांत कमिशनर असून बडोद्याच्या नोकरीत अमात्य होते. त्यासच महाराजांनी दिवाणगिरीवर नेमले. त्यांनी महाराजांची बाजू बरीचशी सावरुन धरली.

हळूहळू प्रकरण चिडीस गेले. कोणीतरी इंग्रज गृहस्थ पोलीस खात्यावर मुख्य अधिकारी नेमा अशी मागणी हिंदुस्थान सरकारने महारांजांकडे केली. ती नाही होय करतां महाराजांना मान्य करावी लागली. मॅके नांवाच्या एका इसमास इंग्रजांनी नेमून पाठविले. तो सुमारे दोन-एक वर्षे बडोद्याचे पोलिसांवर मुख्य अंमलदार होता. त्यांने बॉंबचे कारखाने, राजद्रोहाचे पुरावे, राजद्रोही ग्रंथ व वृत्तपत्रे इत्यादि हुडकून काढण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला. परंतु कोर्टापुढे पुराव्याने टिकेल असे एकही कृत्य उघडकीस आले नाही. महाराजांची बाजू सांभाळणारे त्यांचेहि हेर चहूंकडे फिरत होते. नवसारीस देशपांडे ज्या घरांत रहात होते, त्या घराच्या आवारांतील विहिरींतून कांही राजद्रोही पुस्तके व बॉंब करण्याचे साहित्य इंग्रज सी. आय. डी. ने बाहेर काढले. आणि पोलिस तपासायला आले त्यांनी विहीर शोधून ते बाहेर आणले त्यावर तपास सुरू झाला. त्यांत असें निष्पन्न झाले की, इंग्रजांच्याच हस्तकांनी ते साहित्य आपणच नेऊन विहिरीत टाकले आणि मग ते बाहेर काढले. ही गोष्ट सिध्द झाल्याने ब्रिटिश व्यूह सर्व ढांसळून पडला आणि मॅके यास वैगुण्य आले. या समयात माझ्यासारख्यावर सुध्दा ब्रिटिश पोलिसांचा डोळा होता. पुण्याचे अलीकडील इतिहासाभ्यासक गंगाधरराव बाबासाहेब देशपांडे कैक दिवस बडोद्यास येऊन राहिले. ते त्या वेळी सी.आय.डी. मध्ये असून क्लीव्हलंड म्हणून जो सी. आय. डी. चा इंग्रज अधिकारी गाजला, त्याचा उजवा हात होते असे आम्हांला त्याच वेळी कळले. मी एक हवेची बंदूक घरांतील मुलांना खेळण्यासाठी आणली होती. ती एकदम कोठे हरवली. त्या बंदुकीचे प्रकरण दोन वर्षे मला जाचले.

देशपांडे-खाशेराव इत्यादिकांबरोबर बडोद्यातल्या अनेक लहान-मोठ्या मंडळीची नावे संशयितांच्या यादीत इंग्रजांनी गोवलेली होती. माझ्या बंधूंचा साबण करण्याचा कारखाना बिलिमोरा येथे होता. अद्यापी तो चांगल्या स्थितीत चालू आहे. १९१२ चा समय असावा. कारखाना तपासण्यात मॅकेसाहेब नवीन पोलीस कमिशनर येणार त्या वेळी बंधूंच्या बोलावण्यावरून मी मुद्दाम तेथे गेलो होतो. मॅकेसाहेबाने दोन-तीन तास हिंडून सर्व कारखाना तपासला. हातांत एक लहानशी छडी कानाकोपऱ्यांत जाऊन यांत काय आहे, त्यांत काय आहे, असे सर्व तपासले

आणि मग शेवटी उघड प्रश्न विचारला की, तुम्ही बॉंबगोळे बनविता म्हणून एकतो. ते कोठे आहेत त्यावर बंधूंनी त्यांना खरमरीत उत्तर दिले ते ऐकून साहेब वरमला, बॉंबगोळे ज्यांना करावयाचे असतील ते थोडेच अशा उघड्यावर करतील साहेबाची अत्यंत निराशा होऊन त्यास परत जावे लागले. दोन वर्षे हा मॅके बडोद्यास होता. पण त्यास महाराजांविरुध्द एकहि राजद्रोहाचा पुरावा सिध्द करतां आला नाही. मात्र दहा-पांच वर्षे या एकंदर मोहिमेने महाराजांना केवढा मनस्ताप झाला असेल, तलवारीची धार सदा मस्तकावर उगारलेली, ती केव्हा कसा वार करील या धास्तीत त्यांचा काळ कसा जात असेल, याची कल्पना करावी. त्यांतल्या त्यांत देशपांड्यांचे प्रकरण महाराजांना मिटवितां येईना. हिंदुस्थान सरकार हटून बसलें की, त्यांना नोकरीतून काढा. महाराज म्हणत, 'कोर्टापुढे त्यांस उभे करून पुराव्याने गुन्हा सिध्द करा म्हणजे मी शिक्षा करीन. नाही तर केवळ तुमच्या मर्जीखातर मला निरपराधी अंमलदारास नाहक शिक्षा करतां येणार नाही.' असे हे देशपांड्यांचे प्रकरण बडोद्यांत महाराज, त्यांचे कौन्सिल व अधिकारी मंडळ यांजपुढे दीर्घकाळ धुसमत होते. दिवाण मि. सेडनच्या व रसिडेंटच्या सारख्या वाटाघाटी कैक दिवस चालल्या. कोर्टापुढे शिक्षा होण्याइतका बळकट पुरावा मॅकेपाशी नव्हता. होतां होतां उभय पक्ष हटून बसले. कैक दिवस दुसरा उद्योग नाही. बडोद्याचे पुष्कळशे लोक त्या वेळी या बाबातीत अत्यंत आतुर बनले होते. महाराजाच्या कौन्सिलने त्यांत सल्ला दिला की, देशपांड्यांना पाहिजे तर पेन्शन किंवा ग्रॅच्यइटी द्या परंतु त्यांस नोकरीतून दूर करून हिंदुस्थान सरकारला शांत करा.

असे हे प्रकरण निकरावर आले महाराज अत्यंत अस्वस्थ झाले. चार-आठ दिवस रोज चार-दोन कौन्सिलच्या बैठकी झाल्या. महाराज स्वतः हजर राहून आपले विचार उघडपणे सांगत. सल्लागारांच्या आग्रहास्तव महाराजांनी शेवटी देशपांड्यांना नोकरींतून निवृत्त करावें, पण पेन्शन नियमाप्रमाणे झाल्या नोकरीबददल त्यांना एकदम दहा हजारांची रक्कम ग्रॅच्युइटी म्हणून द्यावी, असा निकाल करून हुकूमावर स्वतःची सही केली. त्या वेळी दुपारी सुमारें एक-दोन वाजले होते. दिवाण ऑफिसचा हा हुकूम अकौटंट जाऊन तेथून ते काम बडोदा बॅंकेत जाऊन सायंकाळी चार वाजतां दहा हजारांची रक्कम देशपांडे यांच्या पदरात पडली. या दोन-चार कचेऱ्यांतले अंतर दोन-तीन मैल असतां ताबडतोब रक्कम देशपांड्यांना मिळाली. यांत त्यांना जनतचे सहाय केवढे होते हे लक्षांत येईल.

काय चमत्कार पाहा। देशपांडे यांना ग्रॅच्युइटी देण्याचा हुकूम महाराजांनी केला त्याची वर्दी लगेच दोन तासांचे आंत दिवाणांनी रेसिडेंटला पाठविली. तोहि वाटच पहात होता. हुकूम वाचतांच त्यांने महाराजांना खाजगी पत्र लिहून कळविलें, ''देशपांड्यांना तुम्ही निवृत्त केले ते ठीकच. परंतु त्यांस ग्रॅच्यूइटीची रक्कम द्यावयाची ती हिंदुस्थान सरकारची सूचना येईपर्यंत तूर्त आदा करू नये. मी तारेने जबाब मागवीत आहे.'' पत्र वाचून लगेच महाराजांनी स्वहस्ते रेसिडेंटला उत्तरही कळवले. 'हुकुमाचा अंमल होऊन देशपांडे यांस सर्व रक्कम अगोदरच आदा होऊन गेली आहे. ती आतां परत घेणे शक्य नाही.' या उत्तराने रेसिडेंट कसा चाट पडला असेल ते वाचकांनी कल्पनेने जाणावे. पुष्कळांनी त्या दिवशी महाराजांची फार तारीफ केली की,

आपली इभ्रत सांभाळून त्यांनी देशपांड्यांचा बचाव केला. कैक दिवस हा एकच विषय बडोद्यात सर्वतोमुखी गाजत होता. मला त्या दिवसाची एकंदर आठवण अद्यापि ताजी आहे.

पण इंग्रजांचे हेर बडोद्यांत फिरत असल्यामुळे ही दहा हजारांची रक्कम कुठे सुरक्षित ठेवावी याची चिंता देशपांड्यांना पडली. त्यांना स्वतः देखील सहज रस्त्यावरुन जातांना जबरदस्तीने उचलून मोटारीत घातले तर करणार काय! यासाठी बडोद्याबाहेर तीन मैलांवर एका खेडेगावांत झोपडी बांधून तेथे ते चार-दोन वर्षे एकान्तांत राहात होते. गाई बाळगून ते दूधविकीचा वगैरे धंदा करीत हे मला माहीत आहे.

महाराजांवरील राजद्रोहाचे हे प्रकरण एवढ्यावरच संपले नाही. देशपांड्यांचे जोडीदार खाशेराव जाधव यांचीहि कथा पुरी केली पाहिजे. पण तो भाग पुढील लेखांत सांगणे युक्त होईल. १९३९ साली फेब्रुवारीत सयाजीराव वारले. पश्चात तीन महिन्यांनी देशपांडेहि वारले. त्यांचे चिरंजीव कोल्हापुरास राहतात. त्यांनी आपल्या वडिलांचे चरित्र नुकतेच १९५४ त प्रसिध्द केले आहे. त्यांत या सर्व हकिकती विस्ताराने वर्णिलेल्या आढळतील.

५.

राजद्रोहाचे किटाळ

बाबू अरविंद घोष, केशवराव देशपांडे, खाशेराव जाधव हे सर्व उच्च कोटींतील पुरुष होते. तरी प्रत्येकाचे व्यक्तिमत्व वेगळे होते. बाबू अरविंद विद्वान व गूढ देशपांडे, सालस व शांत, खाशेराव तेजस्वी व प्रखर, पण सर्वही एकजात तळमळीचे राष्ट्रभक्त. देशोद्धाराशिवाय दुसरा विषय त्यांना माहीत नाही. स्वार्थ असा एकातही नव्हता, आणि सर्वांचे भले करावे ही प्रत्येकाची जबरदस्त इच्छा. देशपांड्याप्रमाणे खाशेरावही कलेक्टर असून इंग्रजांच्या डोळ्यांत सलत होते, पण खाशेराव एक तर महाराजांचे आप्त व समवयस्क सोबती व प्रत्यक्ष महाराजांच्या कुटुंबात वागणारे असल्यामुळे त्यांजवर उघड प्रहार करण्याची इंग्रजांस छाती झाली नाही. महाराजांचा खाशेरावांवर अत्यंत लोभ होता. आणि शेवटी नातू प्रतापसिंहाचे ते संगोपक असता एकाएकी वारले. सयाजीरावांना पत्राने व समक्ष बोलून सावध ठेवणारे, त्यांच्या हिताची कळकळ बाळगणारे यांच्यासारखे दुसरे एकही गृहस्थ महाराजांना लाभले नाहीत. उभयंतांचे स्वभावभेदहि प्रखर होते. त्यांचे एकच उदाहरण माझ्या देखत घडलेले सांगण्यासारखे आहे. त्यावरून महाराजांना खाशेरावांचा उपयोग जन्मभर झाला हे लक्षात येईल.

खाशेराव नवसारी प्रांताचे सुभे सोनगड तालुक्याच्या जंगली भागांत दुष्काळ व प्लेग यांचा सपाटा चालून पुष्कळ लोक मृत्युमुखी पडले. संकटनिवारणाचे उपाय शक्य तितके खाशेरावांनी केले, पण लोकांना वाचविण्याचे पवित्र कर्तव्य महाराजांचेही असल्यामुळे खाशेरावांनी त्यांना मुद्दाम ते भीषण दृश्य प्रत्यक्ष पाहण्यास बोलाविले. उन्हाळ्याचे दिवस होते. बहुधा १९१२-१३ चा एप्रिल महिना असावा. महाराज एक आठवडाभर नवसारी प्रांताच्या तपासणीस गेले. बरोबर एकटे खाशेराव मात्र होते. दुसरे सेक्रेटरी किंवा ए. डी. सी. कोणी नव्हते. सुरतेहून रेल्वेमार्गाने सोनगडपावेतो व पुढे पन्नास-साठ साल मैल डोंगरी जंगली प्रदेश घोड्यावरुन फिरायचा अशी व्यवस्था होती. त्या निष्पर्ण जंगलात मुक्कामासाठी बरोबर तंबू, त्यातच भोजने, झोप इ. सोय होती. दिवसभर तीव्र उन्हाचा मारा विचारू नये असा होता. अंघोळीचे थंड

पाणीसुध्दा हात भाजण्यासारखे तापलेले. मुंबईहून बर्फ मागविण्याची तजवीज केलेली होती. म्हणजे पिण्यास तरी थंड पाणी मिळावे. मुंबईहून बर्फाचे पार्सल सुरतेवरून सोनगड व तेथून पुढे उंटावरून पन्नास एक मैल पावेतो रोज येत जावे अशी व्यवस्था होती.

महाराज व खाशेराव दररोज सकाळी सातच्या सुमारास चहापाणी आटपून घोड्यावर निघत ते बारा-एकपावेतो सारखे हिडून मुक्कामावर तंबूत येते. एके दिवशी असे फिरत असता रस्त्याने शेकडो प्रेतांच्या राशींतून मार्ग काढीत थकून गळाल्यावर दोघेही दोन प्रहरी स्नान-भोजनासाठी परत आले. मेलेल्या माणसांचे सापळे पाहून खाशेरावांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. महाराजांची वृत्ती अशी भावनावश कधीच नव्हती. आपले मन आवरून धरण्याची हातोटी त्यांना अप्रतिम होती. कर्मधर्मसंयोगाने त्या दिवशी मुंबईचे बर्फाचे पार्सल चुकामूक होऊन वेळेवर दाखल झाले नाही. एकचे सुमारास महाराज स्नान आटपून भोजनास बसले. शेजारच्या तंबूत खाशेराव होते, त्यांस त्यांनी भोजनासाठी बोलावले. त्याच नोकराबरोबर खाशेरावांनी निरोप पाठविला, 'माझे डोके दुखते आहे, सबब मला आज जेवायचे नाही.' अगदी एकट्यानेच जेवण्याचा हा प्रसंग त्या दिवशी महाराजांवर आला. भोजनात पिण्याचे पाणी आले ते तापलले पाहून ते संतापले. बर्फ का नाही आणला म्हणून विचारता काहीतरी घोटाळा होऊन तो येऊ शकला नाही, असे नोकराने सांगितले. लगेच महाराजांनी कागद-पेन्सिल घेऊन चिठ्ठी लिहिली की, बर्फ न येण्यात ज्याची चूक असेल त्यास शंभर रुपये दंड करावा. असे म्हणून ती चिठठी त्यांनी बजावणीकरता खाशेरावांकडे पाठविली. येथे हे सांगितले पाहिजे की, मनात येईल तेव्हा स्वतः हुकूम लिहिता यावा म्हणून भोजनाचे टेबलावर, निजण्याच्या पलंगाखाली किंवा हरएक जागी कोऱ्या चिठ्ठ्यांचे पुडके व दोरीने बांधलेला पेन्सिलीचा तुकडा सदैव जवळ हजर ठेवण्याचा महाराजांचा रिवाज होता. रात्री-अपरात्रीसुध्दा मनात आलेला विषय ते टिपून ठेवीत.

बर्फाच्या दंडाची चिठ्ठी वाचतात खाशेरावांचा मनस्ताप कळसास पोचला. परत आल्यावर कपडेसुध्दा न काढता ते तसेच तोंडावर हातरुमाल घेऊन अश्रुधारा पुशीत पलंगावर पडून होते. तसेच डोक्यावर पागोटे ठेवून ते रागारागाने महाराजांच्या तंबूंत गेले आणि म्हणाले, खाशेराव - लाज नाही वाटत तुम्हाला असले दंड करायला? नसला एक दिवस बर्फ तर काय बिघडलं? मी हा कागद फाडून टाकतो.

महाराज – (शांतपणे व हळू शब्दांत) खाशेराव, असे संतापू नका. त्या मेलेल्या माणसांबरोबर नाही मरायचं. आपण जगू तर त्यांना वाचवू. आपण कितीही आक्रोश केला तरी ती मेलेली माणसं काही उठणार नाहीत कागद फाडू नका. बजावणीसाठी तसाच तो पुढे पाठवा.

दोन व्यक्तीचा इतका मजेदार विरोध बहुधा आढळणार नाही. आणि महाराजांना असले कठोर शब्द तोंडावर बोलणारा एका खाशेरावांशिवाय दुसरा मनुष्य बडोद्यात नव्हता. एक अत्यंत व्यवहारकुशल, तर दुसरे विरुध्द टोकास पोचणारे. सयाजीरावांना हसवावे किंवा रडवावे अशा पैजा लागलेल्या मी पाहिल्या आहेत. पण त्या पैजा कोणीही जिंकू शकला नाही. मी व खाशेराव दोघेच महाराजांचे सेवक असे निघालो की, नोकरीची मुदतवाढ न मागता उलट मागणी आम्हांस निवृत्त करा अशा आग्रहाची. खाशेरावांचा योग्य त्या सेवेतच देहत्याग करण्याचा

होता. मी समजतो सन १९२४त ते वारले. प्रेतयात्रेस मी जवळ होतो. महाराजांना जर कोणी जवळचा मित्र म्हणून असेल तर तो खाशेराव एकच. दोघेही एकमेकांस पूर्ण ओळखून होते. राज्यकारभारांतली अनेक खेंगटी निर्भीडपणे महाराजांचे कानावर घालणारे खाशेरावांसारखे दुसरे कोणी बडोद्यात निघाले नाहीत. त्यांचे वडील बंधुही बाबुराव जाधव पुष्कळ वर्षे बडोद्याचे पोलिस कमिशनर होते. भलेपणाबद्दल त्यांची राज्यात ख्याती होती. तीस वर्षेपावेतो खाशेराव व त्यांचे बंधु ही एक आत्मिकशक्ति बडोद्यांत सर्वमान्य होती.

महाराजांवर इंग्रज सरकारचा रोष सुमारे दहा-बारा वर्षे टिकला. तेवढ्या अवधीत मुंबईला 'टाईम्स ऑफ इंडिया' व तद्नुषंगाने लंडनचे पुराणमतवादी सर्व पत्रकर्ते महाराजांवर सदैव आग पाखडीत असत. हल्लीच्या स्वातंत्र्य मनूतला 'टाइम्स ऑफ इंडिया' जसा सदभिरुचीचा मानला जातो तसा तो ब्रिटिश साम्राज्यशाहीत नव्हता. इंग्रजांच्या राज्यावर सूर्य कधी मावळत नाही. अशा ताठ्याची वृत्ती त्यावेळी सर्वत्र बोकाळलेली होती. त्यांत हा मुंबईचा 'टाईम्स' अग्रगण्य असून पूर्वीपासून त्या पत्राच्या दहा-वीस प्रती राज्यांतून वर्गणी देऊन आश्रयर्थ घेण्याचा रिवाज होता. सर टी. माधवरावांचा वेळेपासून पंचवीस–तीस वर्षे ही वर्तमानपत्री तोंडदाबी बडोद्याने स्वीकारलेली होती. हा प्रकार खुद्द महाराजांनाही फारसा माहीत नसावा. पुढे कर्झनशाहीच्या अंमलांत महाराजांच्या ताठर बाण्यावर प्रखर टीका होऊ लागली, तेव्हा कित्येकदा महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांमार्फत 'One who know' या टोपननांवाने त्या टीकेला जबाब पाठवून खरा प्रकार प्रसिध्द केला. कित्येक वेळी 'केसरी' सारखे संपादक महाराजांची बाजू उचलून धरीत आणि 'टाईम्स' ची विधाने सोडून काढीत. मुंबईचा 'इंदुप्रकाश' तर महाराजांची तरफदारी सारखीच करीत असे. बडोद्याचे 'सयाजीविजय' व मुंबईचा 'इंदुप्रकाश' ही दोन पत्रे श्री. यंदे म्हणून बडोद्याचे एक गृहस्थ होते त्यांच्या मालकीची होती. हिंदी पत्रे महाराजांची कड घेऊ लागली की त्याची उलट बाजू 'टाइम्स' मध्ये प्रसिध्द होई. ही वर्तमानपत्री चुरस कैक वर्षे चालली. तेणेकरून काही बाबतीत महाराजांची कुचंबणा होऊ लागली आणि बडोद्यांतून दहा-वीस प्रती विकत घेण्याचा जो आश्रय 'टाइम्स ऑफ इंडिया' ला मिळे तो महाराजांनी बंद केला. त्यावरून प्रकरण जास्तच चिडले. त्यांतून सार्वभौम सरकारशी चाललेला महाराजांचा वाद सरकारी गुपित असल्यामुळे महाराजांना उघडपणे चव्हाट्यावर मांडता येत नसे. खरे म्हटले तर सर्वच हिंदी संस्थानांना हा तोंड दाबून बुक्कयांचा मार सारखा सहन करावा लागे. हा प्रकार हल्लीच्या स्वातंत्र्याच्या काळांत लोकांना माहीतही नाही; पण सयाजीरावांच्या हयातीत तो जगजाहीर होता. महाराजांनी आपल्या राज्यात सुधारणा केल्या त्या उगाच दिखाऊ व फोल आहेत अशी त्यांच्या कारभाराची सारखी निंदा वर्तमानपत्रांस चालू असे. त्यांत मुंबईचा 'टाइम्स ऑफ इंडिया' प्रमुख होता. देशात इंग्रज अधिकाऱ्यांचे खून पडतात. राजद्रोहाचा फैलाव होतो, याच्या मुळाशी सयाजीराव आहेत असा आरोप वर्तमानपत्रात जाहीर झाला म्हणजे महाराज अत्यंत अस्वस्थ होत. वर्तमानपत्रे भलभल्या कंड्या पिकवू शकतात आणि खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे कसे बनवू शकतात हे सर्व आपण पूर्ण जाणतो. याचा एक असा विशिष्ट मासला एका प्रसंगाने खुद्द मला अनुभवावा लागला तो माहितीसाठी येथे सांगतो.

सन १९११ सालची गोष्ट. त्या सालच्या उन्हाळ्यात पंचम जॉर्ज यांचा राज्याभिषेक व्हावयाचा होता. त्या कारणास्तव सयाजीराव युरोपास गेले. मे महिन्यात आम्ही पॅरिसला पोचलो. समारंभ व्हायचा जून महिन्यात. महाराजांचा मुक्काम आठ-चार दिवस पॅरिस येथे 'एलिसी पॅलेस' नावाच्या सुप्रसिध्द हॉटेलात असून महाराज, राणीसाहेब व त्यांच्या कन्या अशी बरीच मंडळी बरोबर होती. पाचचार खोल्यांचा एक मोठा संच महाराजांसाठी भाड्याने ठेवलेला होता. त्यातील बाहेरच्या लहान खोलीत बसून मी हिशेबाचे व पत्राचे वगैरे काम करीत असे. एके दिवशी दोन प्रहरी चारचे सुमारास माझ्या खोलीच्या दारावर कोणी तरी थाप मारली. लगेच मी म्हटले, उघडा, आत या.' पाहतो तो एक पारशी बाई समोर येऊन मला गुजरातीत म्हणते, ''महाराज आहेत काय? मी मॅडम कामा त्यांच्या भेटीस आले आहे. ते मला ओळखतात. तुम्ही त्यांना वर्दी द्या.'' मी त्यांना खुर्ची दिली आणि बसण्यास संगितले. लगेच मी महाराजांचे दार उघडून त्यांस बाईचे नांव सांगणार तो माझ्या पाठोपाठ त्याही आत घुसल्या. बाईमाणूस एकदम आत आल्यावर महाराज तरी काय करणार, महाराज व महाराणींचा चहा त्यावेळी चालू होता. ही ब्याद आगाऊ न ठरविता कशाला आली याचे वैषम्य महाराजांचे चेहऱ्यावर मी एकदम ओळखले. मॅडम कामा नाव ऐकूनच माझे काळीज चर्रर झाले होते. मॅडम कामा व श्यामजी कृष्णवर्मा या दोन हिंदी व्यक्ति युरोपांत राहून ब्रिटिश राज्याविरुध्द चळवळी करीत होत्या, हा वर्तमानपत्री प्रवाद आम्ही वाचीत होतो. म्हणून मी बाईचे नांव ऐकून साशंक झालो. महाराज धूर्त, त्यांनी लगेच प्रसंग ओळखला आणि ते माझ्यादेखत महाराणींना म्हणाले, ''मला दुसऱ्या कामास जायचे आहे. त्यास अगोदरच उशीर झाला आहे. मी असाच जातो. या बाईंना तुम्ही चहा देऊन जाऊ द्या.'' एवढे शब्द बोलून महाराज लगेच बाहेर पडले. त्यांचे व कामाबाईंचे भाषणसुध्दा झाले नाही. महाराणींनी दहा-पाच मिनिटे बोलून त्यांना निरोप दिला. मागाहून मला कळले की, व्हिशी येथे औषधोपचारासाठी पुष्कळ लोक येतात. ते सहजी एकत्र भेटतात, तितकीच त्या बाईंची महारांजाशी ओळख. नसत्या शाब्दिक वंदनापलिकडे भाषण नाही की बोलणे नाही. दुसऱ्या दिवशी 'लंडन टाइम्स' हाती आला. त्यात मोठ्या जाड आक्षरांत भडक बातमी की, 'काल पॅरिस येथे बडोद्याच्या महाराज-महाराणीसाहेब मॅडम कामांना चहाला बोलावून दोन तास गुप्त चर्चा केली. बोलणी राजकारणी महत्वाची होऊन कित्येक संकेत ठरले.'' महाराजांस गोत्यात आणण्याचे उघड प्रयत्न त्यावेळी कसे खोटे रचण्यात येत त्यांचे हे ठळक उदाहरण मलाच अनुभवायला मिळाले. चारदोन दिवसात आम्ही पुढे लंडनला गेल्यावर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडियाच्या ऑफिसातून आम्हा कित्येकांची तपासणी झाली. मॅडम कामा यांना काही महाराजांनी आमंत्रण पाठविलेले नव्हते. मला त्या माहीतही नव्हत्या. मी त्यांची वर्दी देण्यास महाराजांकडे गेलो तो पावेतो पाठोपाठ त्या मजबरोबर आत घुसल्या. महाराज तर तेथून लगेच बाहेर सटकले. चिमणाबाई स्वतः चहा घेत होत्या. त्यांनी शिष्टाचारास अनुसरुन या बाईंना एक कप दिला, याचा अर्थ चहाला निमंत्रण देऊन राजकारणाची वाटाघाट केली असा होत नाही. सगळा प्रकार दहा-पाच मिनिटांहून जास्त वेळ चालला नाही. देखरेख ठेवण्याकरता पॅरिसच्या त्या हॉटेलात दोन बिनड्रेसी इंग्रज हेर सदा पहाऱ्यावर असत आणि रोजच्या रोज

तारेने वाटेल त्या बातम्या इंग्रजी पत्रांकडे पाठवीत. सारांश, इंग्रज साम्राज्यशाहीच्या भरभराटीत राजद्रोहाच्या बाबतीत भलभलते प्रकार कसे सिध्द होत हे मला बडोद्यात चांगले पहायला मिळाले. महाराजांचे विचार राष्ट्रीय प्रगतीचे होते, ते त्यांनी कधी लपवून ठेवले नाहीत. राजनिष्ठेच्या मर्यादेत वागून जेवढें राष्ट्रकार्य करता येईल तेवढे ते उघडपणे करीत. परंतु घातपात, खून वगैरे करून स्वराज्य मिळेल अशी त्यांनी भावना कधीच नव्हती. अशा अत्याचारांचा ते तीव्र निषेधच करीत. ते म्हणत, ''एखाद दुसऱ्या खुनाने इंग्रजांचे सामर्थ्य गडगडेल असे जे मानीत असतील ते वेड्यातले वेडे होत. इंग्रजांचे सामर्थ्य शास्त्रीय प्रगतीत असून ती सर्वांगीण प्रगती आपण पैदा केली पाहिजे.'' या संबंधात दूसरा एक माझा अनुभव या विषयास लागू पडणारा घडला. तोही महाराजांच्या विचारी शक्तीला शोभणारा आहे म्हणून सांगतो.

१९११ च्या जून महिन्यात महाराज व आम्ही सर्व लंडनला गेलो. जॉर्ज बादशहांचा राज्यारोहणसमारंभ झाला. ती मिरवणूक आम्ही पाहिली. सयाजीरावही त्या प्रसंगास हजर होते. सयाजीरावांची कन्या इंदिरा मॅट्रिक होऊन आमच्याबरोबर तेथे होती. तिचे लग्न ग्वाल्हेरच्या माधवराव शिंद्यांशी ठरले असून पुढे हिंदुस्थानास परत गेल्यावर मुहूर्त ठरुन व्हायचे होते. त्यांची बडदास्त बरोबर ठेवण्याची जबाबदारी आम्हा सयाजीरावांच्या सेवकांस विशेष घ्यावी लागत होती. बिकानेरचे महाराज गंगासिंग, आगाखान असे किती तरी नामांकित पाहुणे त्यावेळी सयाजीरावांच्या भेटीस किंवा चहा-भोजनास वारंवार येत. त्यांची निगा ठेवता ठेवता आमची पुरेवाट होई. त्यातल्या त्यात सयाजीराव पोक्त, विचारी व गंभीर गणले गेले असल्यामुळे अनेक बाबतींची वाटाघाट करण्यासाठी कितीतरी लहानमोठे गृहस्थ महाराजांकडे येत. सर्वांना सयाजीरावांचा धाक मात्र अतिशय वाटे. माधवराव शिंदे तर सयाजीरावांना अति घाबरत.

जॉर्ज बादशहांच्या मुख्य समारंभ उरकला. लहानमोठे दहा-वीस हिंदी संस्थानिक त्या प्रसंगांत लंडनला जमले. त्या सर्वांनी बादशहांस खूष करण्याची अशी एक योजना मनांत आणली की, आपसांत वर्गणी जमवून बादशहांस स्कॉटलंडला शिकारीस न्यावें आणि त्यांचा एखादा पुतळा वगैरे उभारुन त्यांजकडून आपले काही मतलब सिध्दीस न्यावे. पैसे जमण्यास अडचण नव्हती. त्या सर्वांना एक मोठी पंचाईत वाटली. या विषयाचा पुढाकार सयाजीरावांनी घ्यावा ही सर्वांची इच्छा. पण त्यांना विषय पटवून त्यांची अनुकूलता कशी मिळवावी हा प्रश्न पडला. या अंतस्थ वाटाघाटीची थोडीबहूत कुणकुण खुद्द सयाजीरावांनाही होती. म्हणून ते मुद्दामच वाटाघाट करण्याचे टाळून कोठेतरी एकान्ती आपल्या कामात निमग्न राहात. एखाद्या लायब्ररीत जाऊन वाचीत बसत. माधवराव शिंदे तर सयाजीरावांना अति घाबरत, हे त्यांनीच मला अनेक वार बोलून दाखविलेले आहे. सर्वांनी विचार तर केला, पण मांजराच्या गळ्यात घंटा बांधणारा इसम कोण पुढे येणार आमच्या मुक्कामवर वेळी अवेळी अनेक वार येऊन शिंद्यांनी शोध घेतला. पुष्कळदा मला बरोबर घेऊन सयजीराव एकटे हाइड पार्कमध्ये फिरायला जात हें त्यांस समजले. जून १९११ चा शेवटचा आठवडा असावा. इंदिरांनी मला त्यांचा निरोप सांगितला, ''उद्या सकाळी सात वाजता तुम्हांस शिंदेसाहेबांनी आपल्या मुक्कामावर भेटीस बोलाविले आहे. काम

काय मला माहीत नाही. पण तुमची भेट त्यांना एकान्तात पाहिजे. ते सात वाजता निजून उठताच तुम्हांला भेटतील. अवश्य जा.''

ठरल्याप्रमाणे मी सकाळीच शिंद्यांचे भेटीस गेलो. ते उठले नव्हते, पण नोकराने विचारले, ''तुम्ही सरदेसाई काय? महाराजांनी तुम्हांस आत आणण्याचे मला सांगून ठेवले आहे. बसा तुम्ही, इतक्यांत उठतील.'' पांच-दहा मिनिटात नोकराने मला उघडून आंत बोलावले. त्यांनी माझा हात धरुन आपल्या पलंगावरच मला बसविले. तोंड धुऊन चहा आणला. आपल्या हाताने दोन कप भरुन एक मला दिला आणि बोलूं लागले, ''आम्ही सर्व राजांनी मिळून जॉर्ज बादशहांचा गौरव करण्याची एक योजना आंखली असून ती तुम्ही संधि पाहून सयाजीरावांचे कानावर घालून त्यांस पटवून द्यावी हे सांगण्यासाठी मी तुम्हांस मुद्दाम बोलावले. तुम्हांस ते रोज भेटतात, बोलतात, आम्हांस तितकी फुरसतच त्यांजजवळ बोलण्याची मिळत नाही आणि त्यांची खात्री पटविण्याचे कठीण काम आमच्याकडून होणार नाही. त्यांनी उगाच इंग्रज सरकारशी वाद घालून त्यांचा रोष पैदा केला आहे, तो काढून टाकून त्यांचे व बादशहांचे रहस्य जुळवून द्यावे हा माझा मुख्य हेतू असून, त्याची उभारणी तुम्ही त्यांचे मनांत करून द्या, मग पुढची सर्व सिध्दता आम्ही करू. बादशहांस शिकारीला नेऊन एक मोठा खाना देऊन त्यांचा पुतळा उभारून आम्हां संस्थानिकांचे कित्येक हक्क परत मिळविण्याची ही संधि आहे. पैसे सर्व आम्ही जमवितो. सयाजीरावांनी या कामांत मुख्य पुढाकार घ्यावा एवढेंच आम्हांस पाहिजे. कसेही करुन तुम्ही नीट बार भरुन ठेवला म्हणजे पुढची सर्व सिध्दता आम्ही करू.''

सयाजीराव व माधवराव शिदे यांच्या वागणुकीतील फरक माझ्या चटकन लक्षांत आला. सयाजीरावांनी आपल्या पलंगावर शेजारी मला बसवून घेतलें किंवा स्वहस्ताने चहाचा पेला मला दिला असें कधीहि घडले नाही. ते मूर्तिमंत महाराज होते. शिंद्यांची ही वृत्ति सयाजीरावांत उतरलेली नव्हती. त्यांचे म्हणणें एकून मी थोडा दुश्चिंत झालो. लहान तोंडी मोठा घांस कसा घ्यावा, एवढया मोठमोठ्या मंडळीपुढें मी कोण्या झाडाचा पाला असें मला झाले. व तसेंच उत्तर मी त्यांना तेथे केले. मीं म्हटले, ''आपलें जेवढे वजन सयाजीरावांवर पडेल तेवढें माझे कसे पडणार, एका शब्दांत त्यांनी मला धुडकावून दिले तर मी काय करणार ते म्हणाले, ''आम्ही पुष्कळांनी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण ते आम्हांस संधीच देत नाहीत. सर्वांना ते पोरांसारखे वागवितात. तुम्हांस त्यांची माहिती आहे. त्यांच्या मनांत हा विषय ठसवून द्या आणि ते काय म्हणतात तें कळवा म्हणजे पुढचा सर्व उपक्रम आम्ही जुळवूं.'' त्यांच्या आग्रहास्तव मी परत येऊन त्या विषयाच्या चिंतेत मग्न झालो.

दुसऱ्याच दिवशी सकाळी सयाजीराव चहापाणी उरकून बाहेर निघाले. तेव्हा मी पुढे होऊन बोललों, ''दुसरे कोणी बरोबर नाही. मी येऊं का, आज्ञा असेल तर मी एक विषय बोलूं इच्छितो.'' ते म्हणाले, ''चला, आपण खुशाल मोकळेपणी बोलूं.'' लगेच आम्ही हाइड पार्क बागेत शिरलो आणि तींत सुंमारे दोन-तीन मैलांचा पायी फटका त्यांजबरोबर केला आणि प्रथम शिंद्यांनी सुचविलेला सर्व विषय जसा घडला तसा इत्यंभूत त्यांजपढे मांडला. महाराजांनी माझे सर्व म्हणणें अत्यंत शांतपणे ऐकून घेऊन मला विचारले, ''संपले तुमचे म्हणणे की

आणखी कांही सांगावयाचें राहिले आहे." मी संपले म्हटल्यावर ते म्हणतात, "मी आता या विषयाचे खरे स्वरुप तुंम्हास म्हणून मोकळेपणी सांगतो. त्या मंडळींना मी हे सर्व उघड करून सांगू शकत नाही. कारण ही मंडळी पडली राजनिष्ठ बादशहाच्या नाकांतले बाल. मी जर थोडे असे नव्हे असे बोललो तर तसेंच कांही तरी भलतेंच विघ्न निष्पन्न होईल. मला यांचा विश्वास येत नाही. या लोकांना इंग्रज लोकांचे हद्गतच कळत नाही. राजनिष्ठा हे उगाच इंग्रजांचे बुजगावणे आहे. सगळा इतिहास काय बोलतो हे यांस कळत नाही. त्यांना वाटते, पैशाने आपण राजनिष्ठा विकत घेऊ पण इंग्रज राज्यकर्ते पक्के बनिये आहेत. ते आपला स्वार्थ साधतील आणि दोघांच्या डोक्यावरुन पूर्ण हात फिरवतील. वर्गण्यांनी जमावलेला पैसा गिळंकृत करून पुनः पहिल्या पदावर येण्यास त्यांसि वेळ लागणार नाही. इंग्रजांसारखे राजकारणनिपुण लोक पृथ्वीवर दुसरे कोणी नाहीत. त्यांना ओळखून ज्याने त्यांने आपला प्रपंच आपणांस झेपेल तसा सांभाळावा. बादशहा केवळ बिनअधिकारी बाहुले. स्वतः काही करू शकत नाही. अशा स्थितीत मला सुचतें ते मी करतो. शिंद्यांना किंवा बिकानेरवाल्यांना पटेल ते त्यांनी करावे. या गोष्टी मी त्यांशी उघड बोलू शकत नाही आणि सगळ्या जगाला सुधारण्याचा मक्ताहि मी आपल्याकडे घेत नाही. मी एकच गोष्ट जाणतो, मागचा इतिहास डोळे उघडून पहा आणि मग पुढे पाऊल टाका. तुम्ही हा विषय काढलांत म्हणून तुमच्याजवळ मी ही स्पष्टता करतो. त्या मंडळींशी मी हे आख्यान बोलू शकत नाही आणि त्यांच्या योजनेंत मला सामील होतां येत नाही. हे माझे उत्तर तुम्हीच त्यांना कळवा. म्हणजे माझे श्रम वाचले." झाले येथे सर्व प्रकरण संपले. मी शिंद्यांस भेटून निकाल सांगितला आणि तेहि पुढे गप्प बसले. अशी किती तरी अंतस्थ प्रकरणे घडलेली मला माहीत आहेत.

●●●

६.

जीवनातील सुखदुःखाचे अनुभव

सन १९११ च्या जून महिन्यांत बादशहांचा लंडन येथील राज्यारोहणसमारंभ आटपला आणि हिंदुस्थानच्या इंग्रजी राजकारणास नवीन कलाटणी मिळाली. याबाबतचे मुख्य श्रेय व्हाइदसरॉय लॉर्ड हार्डिग यांस आहे. यांतच इंग्रजी राज्यकर्त्यांची धूर्तता निदर्शनास येते. सन १९४७ त प्रधान ॲटलीनें हिंदुस्थानास पूर्ण स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेतला. जवळवळ तशाच अंतर्गत क्रांतीचा निर्णय लॉर्ड हार्डिंग व प्रधान ॲस्विवथ यांनी अत्यंत गुप्तपणे घेतला. हिंदुस्थानांत अत्याचार होतात त्यांचे मूळ त्यांनी शोधून काढले. आणि कर्झननी केलेली बंगालची फाळणी रद्द करून कलकत्त्याला दुषित वातावरणांतून हिंदची राजधानी काढून दिल्लीस नेली. ता. १२ सप्टेंबर १९११ रोजी दिल्लीस बादशहांचा दरबार भरला. त्या दिवशी अनवधानतेमुळे महाराजांकडून बादशहांपुढे पाठवळणी झाली. तो प्रकार जगभर गाजला. मी त्या वेळी दिल्लीस नव्हतो. महाराज-महाराणींबरोबर मी लंडनहून परत येऊन डिसेंबरचे आरंभी मुंबईस उतरलों महाराज लगेच बडोद्यास गेले व तेथून पुढे दिल्लीस गेले आणि मी कोंकणांत थोडे दिवस रजेवर गेलों. रजेवरून बडोद्यास दाखल झालो तो तेथील राजकुटुंब वातावरण अत्यंत खिन्न बनलेले आढळले. त्याचे मुख्य कारण म्हणजे महाराजांकडून बादशहांचा अपमान झाला त्याचा गवगवा, आणि दुसरे कारण माधवराव शिंदे व सयाजीरावांची कन्या इंदिरा यांचा ठरलेला विवाह मोडला. दोनही प्रकरणांनी महाराजांचे मनःस्वास्थ्य जे एकदां बिघडून विपरीत बनलें ते पुनः परत आलेले मी कधी पाहिले नाही. माझ्या मते महाराजांच्या एकंदर जीवनांतील ही एक प्रचंड कांती होय. त्यांची पूर्वीची आनंदी व हौशी वृत्ति सर्वथा मावळून त्यांच्या चेहऱ्यावर विष्णतेची कळा उद्भवली ती पुन्हा कधी सुधरली नाही. तद्नंतर त्यांचे अठ्ठावीस वर्षाचे जीणे निराशेंचें व भीषण उद्विग्नतेचे होत गेले. त्याची चर्चा आम्ही त्यांची निकटवर्ती माणसें आपापल्यापरी एकमेकांत सारखी करीत असू.

महाराजांनी बादशहाचा अपमान तो काय केला आणि तो मुद्दाम जाणून केला की काय, या प्रश्नांची वाच्यता पुष्कळ झाली असल्यामुळें पुन्हा तो कोळसा उगाळीत बसण्याची आवश्यकता नाही. मी बडोद्यास त्यांस भेटल्यावरही या दिल्ली बनावाची एकंदर साद्यंत हकीकत महाराज व महाराणी दोघेही एकत्र बसून मला सांगत आणि मजकडून ती एक-दोन महिने रोज तास बसून लिहविली, तिचा उपयोग त्यांनी पुढे पुष्कळ काळ केला. मी मराठीत लिहिले त्याचे इंग्रजी करून पुढे स्टॅन्ले राईसनें लिहिलेल्या महाराजांच्या चरित्रात या प्रकरणाचे सत्यस्वरुप दाखल आहे. पण त्यातही एक-दोन बारीक गोष्टी अज्ञात आहेत. तेवढ्या येथे सांगणे मला आवश्य वाटतें. उभयतां महाराज आणि महाराणी आणि माझ्यासारखे त्यांचेजवळचे सेंवक यांव्यतिरिक्त डिसेंबर ता. १२ च्या दरबारच्या दिवशी महाराजांची प्रकृती नीट नव्हती ही गोष्ट बाहेर आलेली नाही.

दिल्लीस महाराजांचा मुक्काम पांच-सहा दिवस असून १२ डिसेंबरपूर्वी एक दिवस व नंतर पांच दिवस असे ते तेथे स्वतंत्र बंगल्यात महाराणीसह राहत होते. एक-दोन दिवस त्यांचे पोट बरे नव्हते. जुलाब होत होते. दरबार मंगळवारी सकाळी दहा वाजता भरावयाचा. त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री बाराचे पुढे त्यांस वारंवार शौचास जावें लागून पोट दुखू लागले. पुढे रात्रभर त्यांना झोप नाही. महाराणींनी स्वतः त्या रात्री त्यांची शुश्रूषा केली. सकाळी स्नान केले. खाण्यावर वांच्छा नव्हती. अंग पुसतां येईना. कपडे घालतांना हात सारखे कापू लागले. दरबारास जाण्याचा सर्व पोशाख, बटनं, आकडे वगैरे बरोबर जागच्या जागी महाराजांना घालता येईनात. ते पुष्कळसे भांबावल्यासारखे त्या दिवशी होते. मोठ्या शिकस्तीने महाराणींना तास दोन तास खपून दागिणे अंगठ्या वगैरे सर्व जिथल्या तिथे त्या दिवशी घालून कसेंबसे त्यांस वेळेवर रवाना केले. हीच अवस्था थोड्याबहूत अंशाने त्या चार-पांच दिवसांत त्यांची होती. हा अंतस्थ प्रकार बाहेर कोणासहि ठाउक नव्हता. महाराजांच्या मनास त्या वेळी स्थैर्य बिलकूल नसून भानावर नसल्यासारखे ते दिसत. याच कारणाने दरबारच्या प्रसंगी अवश्य ती सावधनता त्यांना नव्हती. मुद्दाम बादशहांचा अपमान करावा ही क्षुद्र व उल्लू आशयाची कल्पना महाराजांच्या गंभीर व पोक्त स्वभावात कधी साऱ्या जन्मांत विद्यमान नव्हती. ते मूर्तिमंत शिस्तीचे भोक्ते होते. ही त्यांची त्या रात्रीची अंतस्थ मनःस्थिती बाहेर कोणासही त्यावेळी माहीत नसून जर त्यांनी त्या आगीत हा प्रकार जाहीर केला असता तर तो कोणास खराही वाटला नसता आणि हे आतां कांहीतरी मुद्दाम ढोंग करतात असा त्याचा अर्थ लोकांनी घेतला असता. आम्हीहि त्या महिना-पंधरा दिवसांतली हकीकत स्वस्थपणे बसून लिहून काढली, म्हणून मला तरी समजली. तरी योग्य मार्गानं या बाबतीत महाराजांनी बादशहांच्या व त्यांच्याजवळच्या वर्गाकडे पुढे यथाकाल पोचविल्या असे मी समजतो. म्हणूनच त्या अपशम पुढे पूर्ण होऊन महाराजांवर अतिप्रसंग घडला नाही. नाही तर हे इंग्रज पुरा सूड घेतल्याशिवाय राहिले नसते. त्यांची तर खात्रीच बनली की, हे सर्व कुभांड मुद्दाम द्वेषाने उठविलेले वादळ आहे. व्हाइसरॉयांचे बंधू दुसरे लॉर्ड हार्डिग लंडनांत होते त्यांनी खरा प्रकार तिकडे जाहीर केला आणि प्रकरण मिटले.

पण दोन-चार दिवस दिल्लीस तर हे सयाजीराव-प्रकरण अति गाजले नामदार गोखले त्या वेळी तेथे होते. हिंदुस्थान सरकाराचे मंडळीत त्यांचे जाणे-येणे असे. तेथे सयाजीरावांना काही

तरी शिक्षा करावी अशी जोराची वाटाघाट मुख्यतः वर्तमानपत्रकारांत चालली. तेणेकरून गोखले अत्यंत कष्टी होऊन महाराजांच्या भेटीस आले आणि त्यांनी दिवाण सेडनच्या मार्फत महाराजांना गळ घातली की, तुम्ही जाहीर माफी मागा म्हणजे प्रकरण मिटेल. नाही तर अनिष्ट परिणाम होईल. महाराज म्हणत, मी अन्यायच केला नाही तर माफी कशासाठी मागू? जाहीर माफीचा उलट परिणाम असा होईल की, महाराजांनी गुन्हा केला हे लोकांस सत्य वाटेल. तथापि गोखले हटून बसले. माफीचा मसुदाही त्यांनी आपल्याबरोबर खिशांत आणला होता. याच्यावर तुमची सही घेतल्याशिवाय मी परत जाणार नाही असे ते बोलले. नाइलाजास्तव महाराजांनी त्या माफीपत्रावर सही केली आणि लगेच ती मोठमोठ्या पत्रांत प्रसिध्द झाली. या उठाठेवीचा परिणाम महाराजांनी म्हटल्याप्रमाणेच झाला. माफी मागितली यावरुन गुन्हा सिध्द आहे अशा आशयाची टीका समस्त हिंदुस्थानच्या लहान-मोठ्या पत्रांतून सडकून उठली. महाराजच पुढे सहजी बोलतांना वारंवार म्हणत, ''स्वतःची बुध्दी गहाण टाकून केवळ दुसऱ्याच्या आग्रहास्तव यावज्जन्मांत मी एक कृत्य केले ते या दिल्ली दरबाराच्या माफीचे होय. गोखल्यासारख्यांची भीड मला मोडलीच नाही, म्हणून मी गोत्यांत आलो''. असे हे दिल्ली दरबारचे सयाजीरावांचे प्रकरण काही काळ जगभर गाजून आता पूर्ण विराम पावले आहे. एक गोष्ट खरी की, महाराजांच्या धवल कीर्तीवर हा तीव्र प्रहार झाल्यामुळे तदुत्तर त्यांचे नैसर्गिक तेज समाजांतून उतरत गेले.

दिल्ली दरबारांत महाराजांचे आचरण वरप्रमाणे अंतस्थ रीतीने दुसरी एक कौटुंबिक घटना विकोपास जात होती. ग्वाल्हेरकर माधवराव शिंद्यांचे लग्न सयाजीरावांची कन्या इंदिरा यांच्याशी गेल्या एप्रिलात सन १९११ ठरुन वाङ्निश्चय झाला होता. लगेच समारंभ कायमचा उरकला नाही हे वैगुण्य होय. उभय महाराज युरोपास गेले. परत आल्यावर मुहूर्त ठरवून समारंभ उरकू असा बेत येथे ठरला. डिसेंबरात दरबार संपतांच विवाहसमारंभ व्हावयाचा. त्यात दिल्ली येथे माधवराव शिंदे व वधू इंदिरा यांच्या वारंवार भेटी होऊन उभयतांतले प्रेम ओसरले. काय कारणाने तेढ उत्पन्न झाली त्याचा थांग मलाही नीटसा लागला नाही. शिंदे म्हणत, ''इंदिरा म्हणे, ''नवऱ्याचे प्रेम नसेल तर मला केवळ पुत्रवती म्हणवून घेण्याची हौस नाही.'' असा काहीतरी वाद होऊन विवाहसामारंभ फिसकटला. सयाजीराव आपल्या राजकारण विवंचनेत गुरफटलेले असल्यामुळे घरांत या नूतन वधुवरांची काय खलबते चालू आहेत याची दाद त्यांस नव्हती. ते त्यात मन घालते तर काही तरी तडजोडीचा मार्ग निघाला असता. एकंदरीत 'भवितव्यता बलीयसी' एवढेच समाधान आम्हा संसारी जनांना दुनियेत मानावे लागते.

दिल्ली दरबारचा आठवडा संपून मंडळी परत बडोद्यास आली आणि मीहि पुन्हा रजा संपून कामावर दाखल झालो. तोपर्यंत राजपुत्र विद्यालय कायम होते. त्या वेळी इंदिरा व त्यांच्या कित्येत सोबतिणी एवढ्यांनाच शिकविण्याचे माझे काम असून लग्न होताच त्या पतिगृही जाणार व मला काहीतरी दुसरे काम मिळणार असा तो योग होता. परत येतांच महाराजांनी मला एकच मुख्य काम सांगितले की, लग्न होईपर्यंत इंदिराला सारख्या काहीतरी अभ्यासांत गुंतवून ठेवा. रिकाम्या राहिल्यास त्यांच्या चित्तवृत्ति भलभलते तर्ककुतर्क करण्यांत बिघडून जातील. मुलगी मॅट्रिक पास झालेली, संस्कृत जाणणारी, युरोप-अमेरिका वगैरे फिरुन आलेली,

चतुर व विद्येच्या विषयांत आईबापांहून कमी नसून कांकणभर जास्तच. अशा त्या मुलीजवळ वर्ष-सहा महिनेपावेतो मीच एकटा सेवक शिक्षक म्हणून होतो. त्यांचे मन कामांत गुंतविण्यासाठी मी त्यांच्याशी कालिदासाचे शाकुंतल वाचण्यास काढले. रोज तास दोन तास वाचून चार-दोन महिन्यांत ते पुस्तक त्यांजशी चिकित्सेने वाचून संपविले. कालिदासाच्या त्या कृतीचा विषय प्रेमविवाहाचा आणि तोच इंदिराच्या प्रस्तुत मनःस्थितीचा असल्यामुळे त्यांत त्यांचे मन बरेच रमले. वाचनाच्या ओघांत त्या मला आपल्या मनाची करुण स्थिति सांगत. ती ऐकून माझेही अंतःकरण द्रवून जाई. प्रेमाशिवाय पाशवी विवाह काय कामाचा हीच मुख्य चर्चा झाली. शाकुंतलाने त्यास पुष्टि दिली.

मी त्यांना विचारी की, ''तुम्ही माझ्याशी जसे मनमोकळेपणी बोलता तसे ते सर्व तुम्ही आपण होऊन आईबापांशी का नाही बोलत तेच तुमचे मुख्य कळकळीचे हितकर्ते. ते काहीतरी तोड काढतील. मी कसा झालो तरी त्यांचा आज्ञाधारक सेवक''. त्यावर मला त्या म्हणत, ''आईबापांना माझे बोलणे ऐकून घेण्याइतकी स्वस्थता आहे कुठे जरी तोंड उघडले की मजवर खेकसून गप्प बसवितात. सर्व बोलणेच खुंटते. माझा उगदी सर्व तऱ्हेने नाइलाज झालेला आहे.'' ही परिस्थीती पाहून माझ्याही मनात आले की, मी जर या कुटुंबाचा एकनिष्ट सेवक आहे तर माझेही काहीतरी उपाय काढण्याचे सर्तव्य आहेच ना ज्यांच्या आश्रयावर मी पोसलो त्या सर्व राजकुटुंबावर चिंतेची व विषण्णतेची छाया पसरलेली पाहून मला अत्यंत भडभडून येई. या पेचातून – या 'डेड लॉक' मधून काहीतरी उपाय काढावा असे माझ्या मनाने घेतले. बादशहाच्या अपमानाचे प्रकरण महाराजांच्या मनात घोळत असता इकडे महाराणीच्या मनात मुलीच्या विवाहाचा हा विषय सारखा चालू होता. पहिला विषय तर दोघे त्या वेळी माझ्याकडून लिहवीतच होती. दुसऱ्या विषयाची मात्र काही एक दखल महाराजांना नव्हती. माझी खात्री होती की, महाराज विचारी आहेत. त्यांचेपुढे सर्व विषय पूर्णपणे मांडला की ते विचार करून योग्य निर्णय देतील. मी त्यांचेशी प्रत्यक्ष बोलणे त्यांना रुचले नसते, म्हणून इंदिराचे हृदगत त्यांना कळेल अशी युक्ति मी योजू लागलो. प्रथम मी चिमणाबाईंचा ठाव घेतला.

एकदा प्रसंगाने समक्ष भेटून मी आपले विचार चिमणाबाईंना स्पष्ट कळविले. त्यांचे म्हणणे एकच, वचन गेले आहे तर मुलीने शिंदे-महाराजांशीच विवाह केला पाहिजे. दुसरा मार्ग नाही. मी म्हटले की, लग्नासारख्या बाबतीत आईबापांचा आग्रह काय कामाचा प्रौढ, शिकलेली उपवर मुलगी स्वतःच्या इच्छेविरुध्द वागेल ही आशा सोडा. मी स्पष्टच बोललो, ''आपण चार मुलांच्या माता, अनुभवी आहां, मी आपणांस शिकवावेसे नाही. पण मला एक समजते की, सहा महिन्यांचे मुलदेखील आपल्या आईला औषध पाजू देत नाही, मग ही आपली कन्या इंदिरा सुशिक्षित असतां आपले म्हणणे खरें केल्याशिवाय कशी राहील तिच्यावर नजर ठेवा, कदाचित जिवास एखादा अपघात करून घेईल.'' माझ्या या बोलण्याचा अपेक्षित परिणाम होऊन आस्ते आस्ते चिमणाबाईंनी आपला आग्रह सोडून दिला. दिवस गेले तसे नवीन विचारहि सुचू लागले.

हे झाले मातेचे. पण वडिलांच्यापुढे हे प्रकरण कोण मांडणार प्रत्यक्ष इंदिरांना ते सहज धुडकावून देत ती त्यांना समक्ष कांही सांगू शकेना. वास्तविक मुलीने आपले अंतःकरण बापाला

नाही कळवायचे तर दुसऱ्या कोणाला? पण महाराजांचा स्वभावच बनला होती की, कोणाचेही काम आगाऊ ठरविल्याशिवाय कोणीहि वाटेल तेव्हा भेटून एकदम आपले गाऱ्हाणे सांगू नये. प्रत्येकाच्या कामाची आगाऊ माहिती वेळ ठरवून त्यांस सांगावी लागे. मुलगे, सुना, लेकी, आप्त भोजनास वगैरे येऊन त्या प्रसंगाने आपला मतलब बोलू लागत. हा भोंगळ कारभार त्यांनी बंद केला. मुलांनासुध्दा बापाशी एकदम वाटेल ते बोलण्याची मनाई होती. सेक्रेटरी व ए. डी. सी. यांचेमार्फत महाराजांस आगाऊ सूचना द्यावी असा शिरस्ता होता. म्हणजे महाराज म्हणत, आपणांस त्या विषयाचा विचार मनात आगाऊ ठरविता येतो. व्यवहाराला हा त्रिस्थळी कारभार कितीही सोईचा असला तरी मुल त्यांचीच ना त्यांना वाटेल ती गोष्ट वडिलांशी मोकळेपणी बोलण्याचा हक्क नाही काय त्यांनी सुध्दा सेक्रेटरीच्या मार्फत वेळ ठरवून घ्यावी ही रीत घरच्यांना कशी परवडेल इंदिरा काय किंवा इतर मुले काय, माझ्याशी हसून रडून अंतःकरणाच्या कळवळ्याने बोलत, तसा प्रकार त्यांना आईबापांशी करता येत नसे. मी अनेक वार प्रसंगाने हा अनिष्ट प्रकार सयाजीरावांना स्पष्ट बोलून दाखवीत असे. तुमच्या मुलांना खरे आईबाप नाहीत. तुमच्याकडे येऊन त्यांना रडण्याचाही हक्क नाही. हा प्रकार निसर्गविरोधी होय. पण ते म्हणत, व्यवहारासाठी मला असे वागणे भाग पडते.

अशा स्थितीत मी जेव्हा इंदिराला विचारले, 'तुम्ही जे विचार माझ्याशी बोलता तेच तुम्ही आपल्या वडिलांना का नाही सांगत ते अत्यंत विचारी आहेत, तुमचे कल्याणच करतील.' त्यावर त्या रडून म्हणाल्या, ''महाराज माझे म्हणणे ऐकतील तेंव्हा ना केंव्हाही बोलू लागले म्हणजे ते मला धूडकावून लावतात. मला अगदी हा जीवसुध्दा नकोसा झाला आहे.'' त्यावर मी त्यांना एक युक्ति सुचविली. मी म्हटले, ''तुम्ही वडिलांना खुलासेवार एक पत्र लिहा.'' त्या म्हणाल्या, ''पत्र त्यांना पोचणार नाही, आणि पोचले तरी ते वाचणार नाहीत.'' मी सांगितले, 'ती जबाबदारी मी घेतो. पत्र त्यांचे हाती पडावे आणि ते त्यांनी स्वतः वाचावे ही तजवीज मजकडे लागली' आदलेच दिवशी महाराज कडीपटणला गेले असून तिकडे त्यांचा मुक्काम आठ-चार दिवस व्हायचा होता. मी जवळ बसून इंदिराकडून सयाजीरावांना पत्र लिहविले. मीच तिकीट लावून टपालांत टाकले आणि महाराजांबारोबर स्वारीत सेकेटरी होते त्यांस मी स्वतः पत्र लिहिले आहे हे त्यांसच खुद्द पोचले असे करावे.

माझी मात्रा उत्कृष्ट लागू पडली. पत्र महाराजांस मिळून त्यांनी सर्व लक्षपूर्वक वाचून लगेच स्वहस्ताने लांब उत्तर लिहून तो जबाब इंदिरांना आला. मोठा पेच वारला. महाराजांचे उत्तर अत्यंत प्रेमळ होते. त्यांनी मुलीचे समाधान जिव्हाळ्याने केले आणि ''तुझ्या इच्छेविरुध्द मी काही करणार नाही, तुझे कल्याण होईल तितके करावे हीच माझीहि उत्कंठा आहे. लग्नाच्या बाबतीत तुला अपला वर पसंत करण्याची पूर्ण परवानगी आहे. शिंदे पसंत नसतील तर मी आग्रह करणार नाही. तू ठरवशील ते मी मान्य करीन.'' असा वडिलांचा स्पष्ट जबाब आल्याबरोबर इंदिरांचा दिल खुशालला. त्यांची पूर्वीची वृत्ति लगेच बदलली. पुढील वर्ष-सहा महिन्यांत त्यांनी कुचबिहारच्या महाराजांशी आपले लग्न स्वतः जुळविले. सयाजीराव इंदिरासह युरोपात स्वित्झर्लंडला गेले. तेथे त्यांनी इंदिरांना आपल्या सेक्रेटरीबरोबर लंडनला पाठविले. तेथे त्यांचा विवाह ता.

२५ ऑगस्ट सन १९१३ रोजी यथाविधि घडून आला. म्हणजे तब्बल तीन वर्षे हा कन्येचा विवाह सयाजीरावांना अस्वस्थ ठेवीत असून त्यांत त्यांची मानसिक शांतता पुष्कळ खर्च झली. या प्रकरणाचे बारीक तपशील आहेत ते सांगू लागल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होईल.

तीस-चाळीस वर्षे सयाजीरावांच्या निकट सहवासांत वागलेले माझ्यासारखे माणूस फार थोडे होते. पहिली त्यांची वृत्ती अत्यंत आनंदी, खेळाडू, आरडाओरडा करून सर्वांशी समरस होण्याची होती. आट्यापाट्या खेळताना मी त्यांचा गोंगाट पाहिला आहे. हसायला लागले की दूरपर्यंत सर्वांना आश्चर्य वाटे की, काय प्रकार आहे. १९०८ साली वडील चिरंजीव फत्तेसिंहराव वारले. पुढे दिल्लीचे प्रकरण गाजले तेंव्हा पासून महाराजांचे हसण-खिदळणे सर्व बंद पडून एकलकोंडे बनत गेले. एकदा दिवाळीत टोपल्या भरुन लाडू आणले. त्यांनीच चेंडूसारखी मारामार पाचपन्नास लोकांशी चालेली मी पाहिली आहे. उसाचे गाडे आले, त्याजवर महाराजांनी गर्दी करून तोंडानेच ऊस खाण्याचा सपाटा इतरांबरोबर चालविला. असे मनमुराद इतरांशी मिसळलेले मी त्यांना पाहिले आहे. याचे उलट पुढे पुढे ते सर्वथा एकटे एकटे असे राहू लागले की, जेवताना वाढणारा सुध्दा जवळ नसावा. एका टेबलावर भोजन ठेवून नोकराने घंटा वाजवावी व आपण बाजूला जावे. घंटा वाजली तरच आत यावे. इतका त्यांना माणसाचा संसर्ग नकोसा झाला. पाऊणशे ऐंशी वर्षाच्या त्यांच्या हयातीची शेवटची पंचवीस-तीस वर्षे ते असे एकटे वागू लागले. काम, वाचन, उद्योग सर्व चालत, पण जवळ दुसरा माणूस नको. मी बडोद्यास असता रात्री दोन वाजता माझे दारात मोटार आली की महाराज बोलवतात. शहराबाहेर पाच मैल मकरपुरा येथे ते राहत हाते. मी गेलो दाराशी ए. डी. सी. बसले होते. ते म्हणाले, "वर जा, महाराज तुम्हास बोलावतात. मला तुमचेबरोबर जाण्याचा हुकूम नाही." मी त्यांचा माग काढीत जवळ गेलो. पाहताच मला म्हणाले, 'झोप येईना म्हणून काही गप्पा मारण्यासाठी तुम्हांस बोलावले.' तास दीड-तास काहीतरी वाचून बोलून झाल्यावर त्यांनी मला रजा दिली. पहिली तीस व शेवटची तीस इतक्या वर्षातला त्यांच्या वृत्तीतील एवढा पालट सहसा इतरत्र आढळत नाही.

इतक्या एकान्तांत वागतांनाहि त्यानी आपल्या रोजच्या सरकारी कामाची उपेक्षा अशी एकही दिवस केली नाही. त्यांचा मुख्य हव्यास म्हणजे काम, सेक्रेटरी, दिवाण, खात्याचे अधिकारी यांच्याशी बडोद्यास असतांना समक्ष व बाहेर युरोपांत वगैरे टपालाने रोजच्या रोज सर्व काम उरकल्याशिवाय त्यांना कधी चैन पडले नाही. टपालाने येणारी पत्रे वाचून निकाल करणे, रेल्वे, तलाव, इमारती इत्यादीच्या मंजुऱ्या देणे, खर्चावर पै-पैशापासून स्वतःचा दाब ठेवणे अशा सर्व कामी त्यांची दक्षता कधी कमी झाली नाही. आरंभीच्या काळांत त्यांचे हुकूम सुटसुटीत व जरुरीपुरते लहान असत, त्यांत उत्तरोत्तर मोठीच वाढ होत गेली. आपल्या अंतःकरणातले विचार, धोरणे, तत्वज्ञान अशा अनेक बाबतीचा विस्तार होऊन उगाच पल्हाळ लिहीत बसण्याची त्यांची खोड कधी कमी झाली नाही. मात्र सर्व व्यवहारांवर स्वतःची छाप ठेवण्याची त्यांची पध्दत अखेरपावेतो कायम होती. घाशीत बसण्याचा स्वभाव लोकांस व खुद्द त्यांनाही पुढे पुढे फार जाचू लागला.

१९३३ सालची माझी एक बाबत सांगण्यासारखी आहे. १९२५पासून मजवर त्यांची इतराजीच होती. मी कामशेतला राहू लागलो आणि तीन-चार वर्षे पुण्यास पेशवे-दप्तरचे काम केले. ते करताना शेवटच्या वर्षी मुंबई सरकारने आपला खर्च थांबविला त्यायोगे काम अर्धेच अपुरे पडून राहणार हे विघ्न उपस्थित झाले. जदुनाथ सरकार व मी कमीशनरांना भेटलो. ते म्हणाले, सरकार आता काही करू शकत नाही. तुम्ही संस्थानिकांकडून वर्गण्या जमवून पैसा आणला तरच काम पुरे होईल. संस्थानांत तरी ऐपतवान म्हटले तर शिंदे, होळकर, गायकवाड हे तिघे प्रमुख. त्यांतही सयाजीरावच जाणते असल्यामुळे त्यांनी पहिला पुढाकार घ्यावा अशी सूचना आली. तपास करता कळले की, तूर्त ते युरोपात आहेत. मजवर तर त्यांची गैरमर्जी, तेव्हा त्यांजपुढे काम पोचावे कसे? जदुनाथ म्हणाले की, लिहा तर खरे त्यांना युरोपात पत्र, काय जबाब येतो की येत नाही पाहू. लगेच मी महाराजांना इंग्रजी पत्र लिहून राष्ट्रीय इतिहासाच्या या पवित्र कार्यासाठी तीन हजारांची रक्कम मागितली. आपण तीन हजार दिले तर बाकीचे नऊ हजार मी इतर संस्थानिकांकडून मिळवितो; पण पहिली रक्कम आपली पाहिजे. तारेने जबाब मागितला. मला फारशी आशा नव्हतीच, पण वेळेवर त्यांस पोचून त्यांनी लगेच दिवणांस तारेने बडोद्यास कळविले, ''सरदेसाई पुण्यास इतिहासाचे कागद छापतात, त्यांस खरीच खर्चाची अडचण असल्यास तीन हजार त्यांचे हवाली करावे.'' दिवाणांनी मला मुंबईस भेटीस बोलावले आणि त्यांची खात्री पटताच माझे हातात तीन हजारांचा चेक दिला. त्याबरोबर इंदूर, ग्वाल्हेर, धार, सांगली इत्यादी अनेक सत्ताधीशांकडून नऊ हजार पैदा करून बारा हजारांची रक्कम मुंबई सरकारांत भरली तेव्हा आणखी वर्षभर काम चालून पेशवे दप्तराचा व्याप एकदाचा समाप्त झाला. हे काम सिध्दीस जाण्याचे मुख्य श्रेय सयाजीरावांस आहे. माझ्यावर व्यक्तिशः त्यांचा राग असला तरी त्यांची सदसद्विवेकबुध्दि सदैव जागृत असल्यामुळे माझ्या कामाची त्यांना पारख होती. म्हणूनच एक पत्र गेल्याबरोबर त्यांनी ताबडतोब तीन हजार रुपये मंजूर केले हे त्यांचे उपकार मी कधी विसरू शकणार नाही.

सयाजीरावांच्या जीवनांत सन १९०० पासून १९११ पर्यंतचे दशक अत्यंत भरभराटीचे म्हणता येईल. १८९९ त त्यांचे चिरंजीव फत्तेसिंहराव मॅट्रिक परीक्षा पास झाले. तेव्हा सर्व मुले एकामागून एक बुध्दीने चमकू लागली. सन १९०० च्या फेब्रुवारीत कन्या इंदिराचा वाढदिवस होता. त्या दिवशी सायंकाळी चार घोड्यांच्या बागीत महाराजांनी शहरांतून मिरवणूक काढली. बरोबर चार पुत्र व एक कन्या यांच्यासह त्यांनी मला घेतले. गोष्टी बोलताना दशरथाच्या चार पुत्रांचे स्मरण त्यांच्या तोंडून निघाले. मी त्यांचे आनंददायक अभिनंदन केले. त्या दिवसाचा तो त्यांचा अत्यंत आनंदाचा क्षण मी कधी विसरणार नाही. त्यांनीच रामाचे नाव काढल्याबरोबर मी मात्र मनात चरकलो. स्वतःला म्हटले, 'देवा, दशरथावर पुत्रशोकाची पाळी आली तसा काही विपरीत प्रकार या भाग्यशाली पुरुषाचा नाही ना घडणार?' मन चिंती ते वैरी न चिंती सयाजीरावांचे हत्तीसारखे चार पुत्र अकाली निधन पावले आणि त्यांच्या इतका दुःखी प्राणी कोणी नाही अशा मनःस्थितीत त्यांचा अंत झाला.

●●●

७.
समर्थ, आंग्रे, भाटे

पूर्वीच्या गोष्टी आठवू लागले म्हणजे नानाविध विषय मनांत उभे रहातात. त्यावरून अगदी आरंभापासून महाराजांची दृष्टी कशी व्यापक व चहूंकडे फिरणारी होती हे कळून येते. राजा रविवर्मा नावाचे आद्य चित्रकार सयाजीरावांचे पदरी प्रसिध्दी पावले. त्यांचे नाव पुष्कळास माहीत आहे. महाराष्ट्रात चित्रकलेचा फैलाव करणारी पहिली आधुनिक व्यक्ति ही होय. हे मूळचे त्रावणकोरच्या राजकुटुंबातले. अभिजात चित्रकलेची नैसर्गिक रुचि असणाऱ्या या व्यक्तीस दीड-दोन वर्षे सयाजीरावांनी आश्रय दिला. १८८८च्या सुमारास सर टी. माधवरावांच्या शिफारशीने ते बडोद्यास आले आणि सुमारे दीड वर्ष तेथे राहून त्यांनी पाचपन्नास सुंदर चित्रे बनविली. ती सर्व 'लक्ष्मीविलास' राजवाड्याच्या आरसे महालात एकत्र ठेवण्यात आली असून ती पाहण्यास प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी कैक वर्षे येत असत. त्यांच्या लहानमोठ्या नकला व फोटोमुद्रा देशांत चहूंकडे फैलावलेल्या दृष्टीस पडतात. कीचक-सैरंधी, विश्वमित्र-मेनका, अर्जुन-संन्यास, सीता-स्वयंवर अशी त्यांची अनेक चित्रे सुप्रसिध्द आहेत. अभय महाराणी व कित्येक कुटुंबीय यांचीहि चित्रे त्यांनी बनविली. रविवर्म्याची ही चित्रे इतकी लोकप्रिय झाली की त्यांच्या नकला छापण्यासाठी खुद्द महाराज रविवर्मा यांनीच लोणावळ्याजवळ चित्रे छापण्याचा एक नवीन छापखाना स्थापला, तो अनेक स्थित्यंतरांतून अद्यापही टिकून राहिला आहे. सारांश, आधुनिक चित्रकला व्यवयास निर्माण करण्याचा आद्य मान राजा रविवर्मा यांचा असून त्यांचा उगम बडोद्यात सयाजीरावांच्या आश्रयाने बनलेला आहे. पुण्याच्या चित्रशाळेचा लौकीक पाठीमागचा आहे. मी बडोद्याचे नोकरीत दाखल झालो, त्यानंतर लवकरच हे राजा रविवर्माही महाराजांची रजा घेऊन बडोदे सोडून गेले. चित्रकलेचा आधुनिक विकास लक्षात घेताना सयाजीरावांचा हा उपकम फार उपकारक समजला पाहिजे.

चित्रकलेप्रमाणे दुसऱ्याही अनेक कलास महाराजांनी मुद्दाम उत्तेजन दिले. गंधर्व नाटक मंडळीचा पहिला मोठा आश्रय बडोद्यांतून मिळाला. सालोसाल ही मंडळी बडोद्यास येऊन पाच

खेळ सरकारांत व बाकी त्यांचे मर्जीचे लोकांकरीता करण्याचा रिवाज कैक वर्षे चालला. तंजावरी नाच, गायनशाळा, कुस्त्यांचे आखाडे असे किती म्हणून हुन्नर सांगावे दारुकामाचे चमत्कारीक देखावे बडोद्याइतके इतरत्र कधी बनले नाहीत. असे नानाविध व्यवसाय दर्शविलले स्मरणीय आहेत.

आरंभीच्या काळात महाराजांना मार्गदर्शन करणाऱ्या दोन सुप्रसिध्द व्यक्ती माझ्या नजरेसमोर येतात. एक जयसिंगराव आंग्रे व दुसरे वासुदेव महादेव समर्थ. हे पुण्यास डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी, टिळक-आगरकरांचे सहाद्यायी सन १८९१ त महाराजांचे सेकेटरी म्हणून बडोद्याचे नोकरीत आले. त्या वेळी महाराज वयांत आल्यामुळे त्यांना राज्यसत्ता हाती घेण्याची उत्कंठा होती. तन्निमित्त कलकत्त्यास व्हाइसरॉयच्या भेटीस जाऊन त्यांची परवानगी मिळविणे महाराजांना जरुर पडले. समर्थ रुबाबदार होते. सेक्रेटरी होताच महाराजांबरोबर ते कलकत्त्यास गेले. तेथे आपल्या मोहक वाणीने व चातुर्याने लॉर्ड रिपनसाहेबांची खात्री पटवून समर्थांनी त्यांजकडून महाराजांना अधिकार देण्याची परवानगी मिळविली. तेव्हापासून महाराजांचा त्यांचेवर अत्यंत लोभ जडला. कलकत्त्याहून परत येताच अधिकारप्राप्तीचा समारंभ झाला तो मागे सांगितला आहे. तेव्हापासून समर्थ नोकरीत चढत गेले आणि पुढे सदैव अडीअडचणीत महारांची बाजू सांभाळण्यात समर्थांनी उत्कृष्ट कामगिरी बजाविली. थोड्याशा अहंमन्यतेच्या वृत्तिमुळे धन्यापुढे सेवकाने नमते घ्यावे तसा मृदु बाणा समर्थांचा नसल्यामुळे समर्थ दिवाणगिरीस चढू शकले नाहीत. पेन्शन घेऊन ते बडोद्यांतच निवर्तले.

जयसिंगराव आंग्रे यांचा प्रकार मात्र भिन्न बनला. कुलाब्याचे आंग्रे घराण्यांतील हे वंशज असून मानी, रुबाबदार, कणखर वृत्तीचे होते. मॅट्रिक झाल्यावर कॉलेज सोडून बडोद्याचे नोकरीत आले. आकाराने ठेंगू व स्थूल, वर्ण निमगोरा, डोळे गरगरीत पाणीदार, कणखर वाणी अशा कारणांनी त्यांची चोहोंकडे मोठी छाप पडत असे. सयाजीरावांचे ते खाजगी कारभारी असता सन १८८५च्या उन्हाळ्यात महाराजांचे संबंधासाठी नवीन मुली शोधण्याची मोहीम सुरू झाली. आंग्रे खासगी कारभारी असल्यामुळे त्यांनाच मुली पाहण्याची व्यवस्था मुख्यतः करावी लागली. श्रीमंतांच्या घरचे लग्न, मुलींच्या उड्या पडू लागल्या तर नवल नाही.

त्यांतले त्यांत आंग्र्यांनी चार मुली महाराजांच्या पसंतीकरता आणल्या. अर्थात प्रत्येक मुलीची माहिती महाराजांना यथायोग्य करून देणे आणि त्यांच्या पसंतीला सहाय्य करणे ही कामे आंग्र्यांनी अत्यंत कसोशीने केली. बडोद्यात या मुलीचे मुक्काम चारदोन दिवस झाले. दरम्यान महाराजांनी मुली पाहून आपल्या स्वभावानुरुप चिकित्साही केली. प्रत्येक मुलीबरोबर आप्त व सेवकवर्गाचा लवाजमा असून त्यांचा खर्च बडोद्यातून करण्यात आला. महाराजांनी एक मुलगी देवासकर घाटगे यांची (हल्लीच्या चिमणाबाई) पसंत केली. ही पसंती जाहिर होताच नापसंत झालेल्या मुलींनी त्वरा करून बडोदे सोडले. आंग्र्यांनी स्वतः सर्व सिध्दता करून त्यांची परत पाठवणी केली. यातच पुढे त्यांजवर महाराजांचा रोष कसा बनला ते सांगण्यांत मोठी मौज आहे.

मुली पाहण्याचा हा एकंदर व्यवहार झटपट उरकावयाचा असल्यामुळे महाराजांची खर्चासाठी आगाऊ मंजुरी घेणे आंग्र्यांना शक्य झाले नाही. दिवस मोठे धामधुमीचे गेले. मुलगी पसंत होतांच मुहूर्त निश्चित होऊन महाराजांचा विवाहसमारंभ यथाकाल सिद्धीस गेला. प्रचंड खर्च होऊन चुकले. महाराजसुध्दा या कामांत नवशिकेच, कारभाराची घडी बसली नव्हती. आगाऊ मंजुरी घेतल्याशिवाय खर्च करू नये हे तत्व काम करणाऱ्यांच्या अंगी उतरले नव्हते. अशा स्थितीत खाजगी कारभारी आंग्रे यांनी मुली पहाण्यापासून विवाह उरकेपर्यंतचा एकंदर व्यवहाराचा खर्च यथावकाश मंजुरीसाठी महाराजांपुढे रुजू केला. एकंदर आकडा चार-दोन लाखांवर गेलेला पाहताच महाराज चरकले. त्यात मधल्या लोकांनी अफरातफर केली नसेल असेही नाही. खर्च व्हावयाचे ते होऊन गेले. त्यातल्या त्यांत नापसंत मुलींच्या परतपाठवणीचा खर्च सुमारे पंचवीस एक हजार झाला. तंजावरसारख्या दूर दूर ठिकाणांहून मुली आलेल्या. बरोबर आप्त व नोकरचाकर मिळून लोकसंख्याही बरीच होती. त्यांचा भाडेखर्च वाढला. प्रत्येकाची पाठवणीही इतमामाप्रमाणे आंग्र्यांना करावी लागली.

या बाबतीत तत्कालीन परिस्थिति आणि मुख्यतः महाराज व आंग्रे यांचे स्वभावभेद यामुळे त्या उभयतांत तीव्र मतभेद उत्पन्न झाला, तो त्यावेळी चांगला गाजून त्याचे पडसाद कैक वर्षे सरकारी कागदांत व लोकचर्चेत फैलावले. त्यांचाच गोषवारा उत्तर-प्रत्युत्तरांचे रुपांत पुढे सांगतो. मुख्य प्रश्न नापसंत झालेल्या मुलींच्या भाडेखर्चाचा होता. अगोदर मंजुरी घेऊन मग खर्च करावा हे तत्व कितीही मान्य केले तरी व्यवहारांत ते पुष्कळदा शक्य नसते. महाराजांची एका मुलीची पसंती जाहीर होताच बाकीच्यांनी परत जाण्याची निकड लावली. जवळ खर्चास नाही. मोठ्या आशेने बिचारे दूरदूरच्या ठिकाणांहून कशीबशी गुजर करून आले. त्यांना सर्वथा विन्मुख परत न पाठविता अल्पस्वरुप बहुमान व भाडेखर्च पोचवून आंग्रे यांनी त्यांची रवानगी योग्य दिसली तशी केली. त्यांची दृष्टी व्यापक व खानदानीत वाढलेला संस्थानिकाची होती. खाजगी कारभारी या हुद्द्याची जबाबदारी त्यांनी आपल्या मनाशी बाळगली तशी महाराजांची नव्हती. महाराज तरी कैक दिवसपर्यंत हुकूम देण्यासाठी जाग्यावरच कोठे होते. महिना-पंधरा दिवसांनी प्रकरण त्यांच्याकडे रुजू झाले तेंव्हाचा हा पुढील संवाद हमरीतुमरीचा बनलेला आहेः

महाराज- अगोदर खर्चाची मंजुरी घेतल्याशिवाय तुम्ही खर्च केला हे अत्यंत गैर होय. उगाच जास्त खर्च केला त्याची जरुरी नव्हती. नापसंद मुलींना परत पाठविण्याचा खर्च बडोद्यावर का पडावा ते आपखुशीने आले तसे गेले असते तर काय बिघडते या सर्व व्यवस्थेबद्दल तुम्ही खासगी कारभारी जबाबदार आहात, आम्ही खर्च मंजुर करीत नाही.

आंग्रे- मग काय मी हा खर्च पदरचा भरू की काय? काम गायकवाड सरकारचे, त्याचा बोजा मी का उठवीन? मी केले ते सर्व योग्यच होते. मी खासगी कारभारी आहे. माझे काम पसंत नसेल तर मला दूर करा, पण हा खर्च मंजूर केलाच पाहिजे.

महाराज- उगाच भरमसाट खर्च केला आहे, तो आम्ही मंजूर करीत नाही.

आंग्रे- बडोदे राज्याचा लौकिक सांभाळणे माझे काम होते. परत जाणाऱ्या मुलींना भाडेखर्चासाठी शहरात रखडावे लागले तर त्यात बडोद्याचाच लौकीक गेला असता. मी केलेली एकूण एक व्यवस्था योग्य व न्याय अशीच होती. तुम्हांला हे रीतिरिवाज बरोबर कळत नाहीत. मी ते सर्व जाणतो, आणि खासगी कारभारी या हुद्द्याने मी ते काम बजावले याबद्दल मला उलट शाबासकी मिळाली पाहिजे.

महाराज- सगळे खरे, पण मला हा अवास्तव खर्च मंजूर करता येणार नाही.

अशा रीतीने प्रकरण विकोपास गेले आंग्र्यांचा करारी स्वभाव व प्रखर खणखणीत आवाज हे मी प्रत्यक्षांत पाहिलेले मला पक्के आठवतात. कैक दिवस प्रकरण गाजले. महाराजांनी लांबलचक हुकूम लिहून काढला. आंग्रे यांस ठपका देऊन त्यांना खासगी कारभाराचे हुद्द्यावरून काढले. त्यानंतर पुढील पाच वर्षे ते नोकरीत होते. सरसुभ्याचे जागेवर त्यांची नेमणूक झाली. मात्र स्वभावाच्या ताठ्यामुळे त्यांचवर महाराजांची मर्जी कधीच प्रसन्न राहिली नाही. त्यांचा अंत कसा झाला ते महाराजांच्या कारभारांतले एक गुपित सांगून हे गाजलले आंग्रे प्रकरण पूरे करू.

महाराजांच्या कारभारांतील अत्यंत व्यग्रतेची व आणीबाणीची वेळ म्हणजे एका इसमास दिवाणगिरीवरून काढून त्याच्या जागी नवीन नेमणूक करण्याची. या घडामोडीत कित्येक महिने, केव्हा वर्षदेखील निघून जाई. अत्यंत भीषण चिंतेच्या या काळात महाराजांना कोणी भेटायची देखील सोय नसे. एकास काढणे म्हणजे त्या इसमास न दुखवता हळूवारपणे दूर करून नव्याची पारख अगोदर पूर्ण घेऊन तो आपणांस झेपेल की नाही याची खात्री करावी लागते. हा सर्वच कारभार मोठा नाजूक व गुप्त ठेवावा लागतो. उगाच वाच्यता झाली तर बाहेर भलतीच चर्चा जाहीर होते. सन १८८९त लक्ष्मण जगन्नाथ वैद्य निवृत्त झाले आणि त्यांच्या जागी दुसरा इसम दिवणगिरीवर नेमण्याचा महाराजांचा इरादा होता. या संधिकाळात महाराज बहुधा एकटे एकान्तांत काळ काढीत किंवा मुद्दाम कोठे तरी अल्पकाळ दुरच्या ठिकाणी जाऊन राहात. सन १८९० च्या एप्रिलात ते सुरतेजवळ उमरठ येथे राहण्यास थोडे दिवस गेले. मी नुकताच नोकरीत गेलेला बरोबर होतो. त्या वेळी आंग्रे सरसुभे म्हणून कामावर होते आणि मणिभाई जसभाई नायब दिवाण होते. यांपैकी कोणाचीतरी नेमणूक दिवणगिरीवर होणार अशी वंदता होती. महाराज उमरठला गेले त्या वेळी आंग्र्यांनी महाराजांना भेटून सदगृदित अंतःकरणाने कळविले, ''आपणाला माझे काम पसंद नाही हे मी जाणतो, परंतु मी सरदार घराण्यातला खानदानी माणूस आहे. माझी आपणांस एकच अल्प विनंती आहे की, आपण कोणासतरी दिवाणगिरीवर नेमणारच, तरी मला आपण अल्पकाळ त्या जागेचा लाभ द्यावा. महिना-पंधरा दिवस दिवाणगिरीप्रत पोचलो हे समाधान कायमचे मिळवू शकेन. या माझ्या अल्प विनंतीचा आपण अव्हेर न करावा एवढीच आपल्या कृपेची मागणी मी करीत आहे.''

आंग्र्यांनी महाराजांना केलेली ही विनंती बाहेर कोणास ठाऊक नव्हती. पुढे एक-दोन दिवसांत महाराज उमरठला गेले आणि तेथून त्यांनी बडोद्यास तार पाठविली. ती तार लिहिण्याचे काम मी केले. त्या तारेतील मजकूर : ''दिवाण लक्ष्मण जगन्नाथ यांस दिवणगिरीतून मुक्त करण्यांत येत आहे. त्यांनी येथे येऊन, आम्हांस भेटून निवृत्तीचा पोशाख घ्यावा. दिवाणगिरीचा

हवाला तूर्त नायबदिवाण मणिभाई जसाभाई यांस द्यावा." अर्थात आंग्रे यांची विनंती महाराजांनी मानली नाही. हा प्रकार त्या मानी गृहस्थाच्या अंतःकरणास फार झोंबला. दुसऱ्या दिवशी बडोद्याहून महाराजांच्या नांवे तार आली ती अशी : Jaysingrao Angre died in bed last night." तार वाचताच महाराज एकदम दचकले. त्यांना संशय आला की, आंग्र्यांनी आपल्या जिवास अपाय करून घेतला असावा. बडोद्यात हा विषय कैक दिवस चर्चिला गेला. आपणास दिवाणगिरी मिळाली नाही म्हणून वैतागून त्यांनी प्राणघात केला. सगळे बडोदे शहर त्यामुळे हळहळले. पुढे लक्ष्मण जगन्नाथ उमरठला आले तेथे त्यांस मेजवानी व पोषाख देऊन महाराजांनी निरोप दिला. त्या पंक्तिभोजनास मी हजर होतो. दिवाणगिरीचे अंतर्गत अनुभव महाराजांना कसकसे येत गेले याची कल्पना वरील हकीकतीवरून वाचकांना येईल. महाराजांनी दहा तरी दिवाणांच्या नेमणुका केल्या त्या मला अवगत आहेत. मोठे चिंतेचे सर्व प्रसंग.

लोकहिताची बाबत दिसली की महाराज तिचा मोठ्या उत्कंठतेने पुरस्कार करीत. सामाजिक बाबतीत तर ते अग्रगण्य बनले. १९०८ साली गणेश सदाशिव भाटे नावाच्या एका विद्वान तरुणास महाराजांनी नोकरीत घेतले. त्याची हुषारी व चलाखी विशेष कौतुकास्पद होती. नुकतेच ते इंग्लडला अभ्यासक्रम पुरा करून परत आले. तत्पूर्वी त्यांची पहिली तरुण बायको वारली आणि व्दितीय विवाहासाठी वीस वर्षाची एक विधवा बाई त्यांनी पसंत केली. भाट्यांचे वडील-मातुश्री हयात होते. त्यांस हा पुत्राचा विचार पसंत नव्हता. विधवा बाईशी मुलाने पुनर्विवाह केला तर आपण त्यांचे तोंड पहाणार नाही, लग्न मोडून काढू असा धाक त्यांनी मुलास घातला. भाटे कुटुंबाचा व माझा चांगला परिचय असून ही पुनर्विवाहाची अडचण सहजी बोलतांना मी महाराजांचे कानावर घातली. पुनर्विवाह लावण्यास पुरोहित कोणी पुढे होईनात. बडोद्याच्या सनातनी मंडळीनी लग्नांत विघ्न आणण्याचा चंग बांधला. महाराजांनी निश्चय केला की, सुधारणेची ही संधि सहज आली आहे तिचा उपयोग करून आपण त्यांत यश मिळवावे. त्यांनी पदरच्या आश्रितांस कळविले, आपल्या राज्यांत विधवा-पुनर्विवाह रुढ करण्याची आवश्यकता आहे. चिमणबागच्या वाड्याला लागून एक भला मोठा विस्तीर्ण मंडप सिध्द झाला. सरकारांतून तीन-चारशे मंडळीना आमंत्रणे गेली. मुंबई-पुण्याकडचे अनेक नामांकित पाहुणे बोलवण्यांत आले. माघ मासांत सकाळी आठपासून दहापावेतो एकंदर विवाहसमारंभ मोठ्या उत्साहाने पार पडला. महाराज स्वतः हजर राहिले. जिकडे तिकडे आनंदीआनंद पसरला. मुंबईचे बॅरिस्टर मुकुंदराव जयकर समारंभास हजर होते. त्यांचे सुंदर भाषण त्यावेळी लोकांना ऐकण्यास मिळाले. स्वतः महाराजही बोलले. नवरदेव भाटेही बोलले. दोन प्रहरी तीनशे पात्रांचे सुंदर पंक्तिभोजन 'लक्ष्मी-विलास' राजवाड्यांत झाले. त्यास भाट्यांचे वडील हजर राहीनात. त्यांचा या उपक्रमास तीव्र विरोध होता. भोजनास हजर राहणार नाही, असा जबाब त्यांनी पाठविला. त्यावरून महाराजांनी मला त्यांच्याकडे पाठवून कळविले, 'भोजन तुम्हास नको असेल तर करू नका, पण भोजनप्रसंगी महाराजांजवळ बसून गोष्टी बोलण्यास काय हरकत, मग ते पंक्तीस आले. महाराजांचे बाजूस त्यांचा पाट मांडला. समोर मिठाईचे ताट ठेवले. त्यांनी पंक्तीत हिंडून आग्रह व विचारपूस

केली. हा एकंदर प्रसंग इतका यशस्वी झाला की, विधवा-पुनर्विवाहाची पध्दत सहजी राज्यात दृढमूल झाली. त्या लीलाबाई भाटे व त्यांची कन्या कलावती, रोहिणी भाटे पुण्यात राहतात. गणपतराव भाटे मात्र पुढे दहा-पंधरा वर्षांनी एकाएकी वारले.

जुने मोडू नये, नवे करू नये हा राष्ट्रघातकी प्रघात महाराष्ट्रात मराठी राज्यापासून लोकांचे अंगी खिळलेला आढळतो. सन १८९५च्या सुमारास सातारा कोल्हापूरकडे ब्राम्हण व ब्राम्हणेतर असे दोन विरोधी तट पडून त्याचे अनिष्ट परिणाम आजही दृग्गोचर होतात. कलियुगात क्षत्रिय जात विद्यमान नाही, फक्त ब्राम्हण व शूद्र हे दोनच सवर्ग शिल्लक रहिले असा दावा ब्राम्हणांनी सांगून विवाह, श्रावणी, अंत्यविधि इत्यादिकांत वेदमंत्रांचा-उपयोग करायचे नाकारिले. पौरोहित्य फक्त ब्राम्हणवर्गाचे हाती असल्यामुळे क्षत्रिय म्हणविणाऱ्यांची मोठी गैरसोय उत्पन्न झाली. विशेषतः कोल्हापुरात शाहूछत्रपतींनी आपले स्वतंत्र पुरोहित तयार करून ब्राम्हणांची इनामे व उत्पन्न खालसा केली. सत्यशोधक समाज म्हणून अब्राम्हणांनी निराळा वर्ग निर्माण केला. काही वर्ष हा झगडा महाराष्ट्रात विशेष गाजला. त्याचे लोण गुजरात, माळवा इत्यादी प्रदेशासही पोचले. तथापि सयाजीरावांनी बडोद्यात सावधगिरीने हे प्रकरण चिडीस जाऊ न देता समोपचाराने आपले हेतु सिध्दीस नेऊन वेदमंत्रांनी समग्र कृत्ये करण्याचा रिवाज चालू केला. ब्राम्हण म्हणतात ते मंत्र पुराणातले आहेत की वेदातले आहेत हे तपासण्यास माझा उपयोग महाराजांनी केला. एकंदरीत पाच-चार वर्षाच्या प्रयोगात महाराजानी प्रकरण विकोपास जाऊ न देता आपला उद्देश पार पाडले याचे श्रेय त्यांस आहे.

८.
दरबाराची रेखीव शिस्त

सयाजीराव गायकवाडांचे खरे अंतरंग कसे होते याची पूर्ण कल्पना मागील लेखांवरून वाचकांस झालीच असेल. सत्तावन्न सालच्या हिंदी क्षोभास एक शतक पुरे होत आले, तत्पूर्वी संस्थाने खालसा करण्याचा सपाटा चालला. पण त्या क्षोभाचा उपशम करण्यासाठी व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्यांत वचन देण्यात आले की, आता पुढे ही संस्थाने खालसा करता येणार नाहीत. शिंदे, होळकर, गायकवाड हे तीन मराठ्यांचे राजे इंग्रजांचे साहाय करण्यास उद्युक्त झाले म्हणूनच त्या प्रसंगांतून इंग्रजी राज्याचा निभाव लागला असे इतिहास सांगतो. त्या तिघांत भवितव्यतेने सयाजीरावांस उदयास आणले. एक शतकाच्या त्या काळांत पाच-चारशे संस्थानांपैकी ही एकच व्यक्ती हिंदी राजकारणांत क्रांतिकारक बनली. एक अर्थाने इतर संस्थानिकांचे ते गुरूच बनले. म्हैसूर, इंदूर, ग्वाल्हेर, त्रावणकोर, धार, देवास, सावंतवाडी, मुधोळ, अशा अनेक ठिकाणचे सत्ताधीश अनेकवार बडोद्यास येऊन सयाजीरावांच्या शिकवणीचा लाभ घेत. अशा अनेकांशी माझाहि कारणपरत्वे परिचय घडला. इंग्रजांच्या दडपशाहीचे निवारण कसे करावे हाच सर्वांना नडणारा मुख्य प्रश्न पाच-पन्नास वर्षेपावेतो संस्थानिकांपुढे होता. शिवाजीराव होळकर व त्यांचे चिरंजीव तुकोजीराव कित्येक दिवस सयाजीरावांस भेटून विचारविनिमय करून गेले. राज्य कसे करावे हेच मुख्यतः शिकण्यासाठी तुकोजीराव तर महिना-पंधरा दिवस बडोद्यास राहिले. त्या काळात सयाजीरावांनी मलाच तुकोजीरावांजवळ नेमून आपले प्रयत्न त्यांस समजावून देण्याचा आज्ञा केली होती.

उदाहरणार्थ, एकच क्षुल्लक गोष्ट सांगतो. बडोद्यास वर्षाकाठी दहा-पाच लहान मोठे दरबार भरत. दसरा, संक्रान्त, रंगपंचमी, महाराजांचा वाढदिवस असे कित्येक दरबार नामंकित व मोठे महत्वाचे असत. सर्व मंडळी वेळेवर जाग्यावर बसली म्हणजे वर्दी देतांच सयाजीराव मोठ्या गंभीर; पण आनंदी वृत्तीने, पुढे दोन ए. डी. सी. व मागे खासगी कारभारी व एखादा आप्त असे सावकाश पावले टाकीत दरबारांत येत. त्यावेळचे त्यांचे चालणे व चहुकडे नजर देणे सर्वांना

मोठे कौतुकास्पद वाटे. दरबारी मंडळी खाडकन् उठून उभी रहात. त्यांच्या रांगांतून अगदी हळू पावले टाकीत डावी उजवीकडे पाहत पाहत ते स्वस्थानी जात. तो देखावा शब्दांनी सांगणे कठिण आहे. चालतांना लोकांची वंदना स्वीकारणे, कोणाशी किंचित हसणे, कोणाशी एखादा खुशालीचा शब्द बोलणे अशा रीतीने ते प्रत्येकाला भासवीत की, माझी नजर सर्वांवर सारखी फिरत आहे. सोने वाटणे, तिळगूळ किंवा नजराणे स्वीकारणे हे सर्व पाच-चारशे लोकांचे व्यवसाय झटपट उरकून महाराजांना उगाच पुष्कळ वेळ तिष्ठत बसण्याची तकलीफ होऊ नये, अर्धा-पाऊण तासात हारतुरे, अत्तर-गुलाब व पानसुपारी इत्यादि सर्व प्रकार घड्याळाच्या काट्याप्रमाणे त्वरित उरकण्यांत बडोद्याचा नमुना इतरांनीहि पुष्कळसा स्वीकारला. लोक आश्चर्य करीत की, हे सगळे ताबडतोब काही न्यून न पडता उरकते कसे हा एक प्रकार दरबारचा सांगितला तोच प्रकार भोजन, खेळ, कथा-कीर्तन किंवा इतर समारंभांचा. पदरी दहा-वीस दक्ष माणसे या कामांत मुरलेली असत. महाराजांच्या या शिस्तीपुढे इंग्रजांच्या दिल्ली दरबारची शिस्तसुध्दा फिकी पडे. हरएक बाबतीचे नियमाने निबंधन केलेले बडोद्यासारखे दुसरे उदाहरण नाही.

दिल्ली दरबार म्हणजे नाहक सर्व संस्थानिकांस एक प्रकारचा भूर्दंड सहन करविण्याची बाब होती. संस्थानिकांनी हजर राहिले पाहिजे आणि दोन दिवसांच्या मुक्कामाकरिता प्रत्येकाने आपला खर्च करून बागा,बंगले नवीन तयार करावे आणि दरबार आटोपला की परत सर्व मोडून पहिली जागा साफ करून दिली पाहिजे. एवढा हा उपद्व्याप करण्यांत वर्ष-सहा महिन्यांचा वेळ व निष्कारण खर्च राजेलोकांवर पडे. यास काय इलाज करावा, फुकट द्रव्याचा उपयोग कसा करून घ्यावा, हा विचार महाराजांचे मनांत उद्भवला. त्यांनी इंजिनियर व कारागीर जमवून विचार केला आणि एक हलका लांकडी कळसूत्री बंगला पाच-चार खळ्यांचा बनवून त्यांचे सर्व साहित्य आगगाडीने दिल्लीस नेता यावे आणि तेथे तो बंगला कायम ठेवावा, किंवा महाराजांचे उपयोगासाठी तो वाटेल तेंव्हा इतर ठिकाणी घेऊन जावा. ही सुंदर योजना एकट्या सयाजीरावांनीच निर्माण केली. आणि सन १९०३ सालच्या कर्झनच्या दरबारांत त्यांनी असा कळसूत्री बंगला बनविला. तो दिल्लीत एक मोठा प्रेक्षणीय विषयच होऊन बसला. दिल्लीचे मोठमोठे इंजिनियर वगैरे मुद्दाम येऊन त्यांनी या योजकतेचे मोठे कौतुक केले. अद्यापि तो बंगला मी समजतो बडोद्याच्या कमिटी बागेत विद्यामान आहे. त्या कमिटी बागेत चहापाणी किंवा उपहाराची योजना त्या चालत्या बंगल्यात मुद्दाम करण्यांत आली. लोकांच्या झुंडी ते कौतुक पाहण्यास सदैव येत.

बारीक तपशिलाकडे सदैव नजर ठेवून बडोदे शहर व आपले राज्य हरएक बाबतीत नमुनेदार बनवावे हा महाराजांचा हव्यासच बनल्यामुळे त्यांच्या नजरेंतून कोणताहि लहानमोठा विषय सुटला नाही. राज्याचा पैसा उत्पन्न देण्याऱ्या औद्यागिक बाबतीत गुंतवून ठेवण्यासाठी त्यांनी रेल्वेचे जाळे सर्व राज्यांत पसरुन दिले. ती आज काय उत्पन्नाची बाब बनलेली आहे. रस्ते, तलाव, विहिरी, धर्मशाळा, शाळागृहे, चावड्या या बाबी प्रत्येक गावाला त्यांनी मिळवून दिल्या. शहरांत रस्ते व बागा बनविल्या. पुर्वी बडोद्यांत पाण्याचे हाल होत, त्याची आता कोणास

कल्पनाहि करता येणार नाही. मी नोकरीस लागल्यावर दोन-तीन वर्षे हे हाल भोगलेले मनांत जागृत आहेत. गुजराती ब्राम्हण पिण्याचे पाण्याची एक घागर दोन मैलावरून रोज आणी. त्यास दरमहा २ रुपये पडत. संडासास लागणारे सांडपाणी शेजारच्या विहिरींतून आम्हांस काढावे लागे आणि तिसरे पाणी आंघोळ व कपडे धूण्याचे असे तीन प्रकारचे पाणी प्रत्येकास बाळगावे लागे.

हा शहराचा मोठा ताप महाराजांनी प्रथमच बंद केला. बडोद्याचे पूर्वेस तेरा मैलांवर पावागडच्या पायथ्याशी एक मोठा तलाव बनविला आणि त्यास भला मोठा विटांचा बांध दोन मैल लांब व १००-१५० फूट रुंद असा घालून विस्तीर्ण तलाव केला. ते पाणी बडोदे शहरांत नळाने आणले. सन १८९१ च्या एप्रिलमध्ये मोठा समारंभ झाला. महाराजांनी किल्ली फिरवितांच पाच मिनिटाचे आत सुंदर पाण्याचा एवढा मोठा लोंढा शहराचे मध्यभागी बनला की वाटले आता शहर सगळे पाण्यांत बुडते की काय लोकांच्या आनंदास पारावार नाही. जगन्नाथ सदाशिव नावाचा एक कल्पक इंजिनियर नोकरीत होता. त्याची एकट्याची ही सर्व कर्तबगारी. पन्नास लाख खर्च आला.त्या वेळी लोकांत चर्चा चालू झाली कि, विटांचा बांध तलावास केला तो टिकणार नाही. शहर पाण्यांत बुडून जाईल. त्या चर्चेस जगन्नाथ इंजिनियरने समारंभप्रसंगी भाषण करून उत्तर दिले ते मला आठवते. 'बांधाचा खर्च पन्नास लाख आला, तो बांध फुटला तर भरून देण्याची ऐपत मला नाही. पण माझ्या हातांत एकच उपाय आहे. पाण्याचा लोंढा शहर बुडवू लागेल तेंव्हा प्रथम मला तेथे समोर उभा करा. शहर बुडण्यापुर्वी मला पाण्यात बुडवा, मग पुढे व्हावयाचे ते होईल.' आज या गोष्टीस सत्तर वर्षे होत आली. बडोद्याचा आजवा तलाव ही एक त्या नगरची सयाजीरावांची चिरंतन आठवण बनली आहे. गुजरातेत इतके मुबलक गोड पाणी इतरत्र नाही.

सयाजीरावांची आठवण राहील असे महाराजांचे स्मारक आज पदोपदी दृष्टीस पडते. शहर तर सुधारलेच, पण कचेऱ्या, शाळा, कोर्टे, रुग्णालये, म्युझियम, बाग, पुतळे, राजवाडे, बंगले, चित्रकलामंदिर, कीर्तिमंदिर अशा नानाविध इमारती आज दिसतात त्या सर्व एकजात या एका पुरुषाच्या निर्मिती होत. खेद वाटत असेल तर इतकाच की, त्यांच्या निधनानंतरच्या पंधरा वर्षात हे पूर्वीचे वैभव आता सर्व मावळत चालले आहे. कोणी धनी नाही अशी पोरकी स्थिती त्या नगराची पाहून माझ्यासारख्या तत्कालीनांचे अंतःकरण भडभडून येते. आता केवळ कुडी मागे उरली आहे, त्या कुडीतला प्राण निघून गेला हा प्रत्यय ठळकपणे नजरेस येतो.

भारताच्या सामाजिक व वैचारिक जीवनाच्या सुधारणेत सयाजीरावांचा भाग केवढा मोठा आहे याची आत बाहेर फारशी कोणास कल्पना नाही. हळूहळू पन्नास-साठ वर्षे ही सुधारणा केवळ सयाजीरावांच्या पुरस्काराने सर्व देशांत न समजता घडून येत होती. विधवा-विवाह, वधूवरांचे योग्य वय, स्पृश्यस्पृश्य, जातिभेदांचे निर्मूलन इत्यादि विषयांचे कायदे व आचार प्रत्यक्षांत आणणारे पहिले सत्ताधीश सयाजीराव होत. सहभोजनाची निकडीची प्रथा सयाजीरावांनी युक्तीने अंमलांत आणली. त्यांच्या वेळी काही ना काही महत्वाच्या कार्याने शहर सदैव गजबजलेले असे. निरनिराळ्या विचारसरणीचे सुधारक व सनातनी अशा दोन्ही बाजूंचे विचार लोकांपुढे ठासून मांडले जावे यासाठी नामांकित वक्ते व प्रतिपादक मुद्दाम बडोद्यांत आणून त्यांच्या

व्याख्यानमाला बाहेर शहरात व प्रत्यक्ष महाराजांच्या वाड्यांत देखील महाराज करवीत. आपल्या खर्चाने नामांकित पाहुणे बोलावून आणीत व त्यांचा सत्कार करीत. अशा स्वरुपाचा एक गाजलेला प्रसंग माझ्या स्मरणांत ताजा आहे तो असा.

हंसस्वरुपस्वामी नावाचे एक औत्तरीय गृहस्थ सन १९०१ च्या सप्टेंबरांत बडोद्यात आले. हिंदी व इंग्रजी भाषेत परिणामकारक बोलणारे,वादविवादांत इतरांवर छाप बसविणारे असे हे गृहस्थ सनातनी वृत्तीचे पुरस्कर्ते व पाश्चात्य सुधारणेचे विरोधी म्हणून गाजलेले होते. शहरांत त्यांच्या व्याख्यानांनी लोक इतके मोहित झाले आणि अनेकांनी महाराजांना आग्रह केला की, महाराज, आपण या स्वामीची भाषणे जरुर ऐका, म्हणजे आधूनिक सुधारणेचे आपले चुकीचे विचार सुधारल्याशिवाय राहणार नाहीत. महाराजांच्या पदरीहि त्यांना सहमत होणाऱ्या अनेक भिन्न व्यक्ति नोकरीत होत्या. महाराजांची कानउघाडणी करण्याची त्यांना ही एक संधिच परभारे प्राप्त झाली. विचार करून महाराजांनी ते आव्हान स्वीकारुन सर्वांना खऱ्याखोट्याचा निर्णय परभारे करतां यावा अशी घटना बनविली. या कामी मी त्यांचा निकटवर्ती सहायक बनलो. स्वामीस त्यांनी भेटीस बोलावून त्यांच्या व्याख्यानांचा कार्यकम ठरविला. त्यांनी स्वामीस चक्क सांगितले की, तुमच्या या सनातनी ढोंगानेच ही प्राचीन भारतभूमि अधोगतीस गेली आणि पाश्चात्य शास्त्रांचा अवलंब तुम्ही न कराल तर तुमच्या राष्ट्राचा उत्कर्ष कधी होणार नाही. वादांत हरेल त्याने दुस-याचे प्रतिपादन पत्करावे, अशा प्रकारच्या अटीतटीचा हा सामना उद्‌भवला. महाराजांनी स्वामीना विचारले, ''किती व्याख्याने मी आपली ऐकावी अशी आपली इच्छा आहे. स्वामी म्हणाले, ''मी पाच व्याख्याने बोलून आपला विषय संपवीन.'' त्यास अनुसरून सुमारे तीन-चारशे श्रोत्यांना आमंत्रणे काढली. राजवाड्यांत आयनेमहाल म्हणून दिवाणखाना होता, त्यात रात्री ९ ते १० अशी वेळ ठरली. १९०१ सप्टेंबर रविवार, ता. २२ पासून पाच दिवस ही व्याख्याने ठरल्याप्रमाणे स्वामींनी अस्खलित इंग्रजीत व मधूनमधून हिंदी व संस्कृत वचने आधारासाठी सांगून संपविली. गुरुवार, ता. २६ शेवटचा दिवस. स्वामी जवळ एक फळा ठेवून त्याजवर ते काही प्रमाणे लिहून दाखवीत. स्वामी व्यवहारतज्ञ व वक्ते असल्यामुळे त्यांनी आपला विषय स्पष्ट मांडला. पुष्कळदा महाराजांची मला आज्ञा असे की, प्रसंगाने महाराज बोलले तर त्यांचे मुद्दे मी ज्या त्या वेळी बसल्या बसल्या ऐकून कागदावर टिपून ठेवावे. पण व्याख्याने स्वामीनी द्यावयाची, त्यांत महाराज बोलतील हा प्रथम संभव नसल्याने मी त्या दिवशी खिशांत कागद पेन्सिल ठेवली नाही. श्रोत्यांमध्ये बडोद्यांतील जुने नवे सर्व जाणते हजर होते. स्वामींनी भाषण संपविल्यावर महाराजांनी त्यांस उत्थापूर्वक बसवून विचारले, ''तुमचा आशय सर्व संपला की आणखी काही सांगावयाचे आहे'' ते म्हणाले, ''संपले माझे बोलणे.'' त्यावर महाराजांनी श्रोत्यांना विचारले, ''आपण सर्वांनी स्वामीची भाषणे ऐकली. त्याविरुध्द कोणास काही सांगणे असेल तर, येथे बोला.'' पाच-चार मिनिटे झाली, कोणी बोलेना. दहा वाजून गेले होते. सर्व मंडळीच्या गाड्या, वाहने तयार होऊन परत जाण्याची वेळ होती. अशा स्थितीत महाराज स्वतःच उठून म्हणाले, ''स्वामींचे म्हणणे मला काही पटत नाही. पण माझ्या मनांत चार-दोन शंका सहज निघतात, त्यांची उत्तरे स्वामींनी किंवा तत्पक्षीयांनी स्पष्टपणे द्यावी.

आमची सनातनी संस्कृती जर एवढी श्रेष्ठ होती तर देश अधोगतीस का गेला आणि परचक्राखाली आज हजार वर्षे आमची एवढी दैना का उडते आहे?" त्या दिवशी महाराज भाषण करतील ही अपेक्षा नव्हती. दहा-पाच मिनिटे म्हणून बोलायला उठले तर चांगला तास दीडतास पावेतो अस्खलित वाणीने उलटपक्ष अशा युक्तिवादाने त्यांनी इंग्रजीत मांडला की, स्वामींच्या व्याख्यानांवर त्यांनी विरजण घातले आणि पाश्चात्य शास्त्रीय सुधारणा आपण स्वीकारल्या शिवाय गत्यंतर नाही, ही भुमिका पटवून दिली. खुद्द त्या स्वामींनीच एका वाक्यांत आपली कबुली दिली की, ''महाराज, आपले म्हणणे मला मान्य आहे. आपल्याला विरोध करण्याची माझ्यासारख्याची योग्यता नाही. हिंदुस्थानचे पुढारीपण गाजवणिारे आपण एकमेव पुरुष आहांत यांत संशय नाही." इतके अप्रतिम भाषण आम्ही महाराजांचे तोंडून कधी ऐकले नव्हते. उशीर झाल्यामुळे ते लगेच कपडे बदलण्यास आंत गेले. तेंव्हा मला बोलावून म्हणाले, ''आजच्या माझ्या भाषणाची टिपणे तुम्ही लिहून घेतली काय" मी म्हटले, ''आज आपण बोलणार अशी अपेक्षा नव्हती.पाच दहा मिनिटांऐवजी तब्बल दीडतास झाला." त्याची त्यांना स्वतःलाच विशेष धन्यता वाटली.

●●●

९.

बापट-कमिशन

सयाजीरावांच्या पहिल्या अमदानीतील एक मोठी क्रांन्तिकारक घटना म्हणजे हे बापट-कमिशन होय. त्यावेळी हे प्रकरण पाचचार वर्षे चहूंकडे गाजले आणि तेवढया अवधीत महाराजांची मनःस्थिती अत्यंत उद्वेगकर बनली. ती मी प्रत्यक्ष रोजरोज पहात होतो. महाराजांचा भावी कारभार यशस्वी होणार की विपरीत याचा निकाल या घटनेने लावला आणि तेंव्हापासून महाराजांचे स्वतंत्र तेज चहूंकडे फांकू लागले. हा प्रकार लक्षांत येण्यासाठी प्रथम महाराजांची शैक्षणिक व अनुभविक लायकी मनांत वागविली पाहिजे. सन १८८१ त त्यांनी राज्यसूत्रे थोड्याशा अधीरतेने आपल्या हाती घेतली. त्या वेळी सर टी. माधवराव कारभारावर होते. त्यांनी आपल्या सात वर्षाच्या मुदतीत काजी शहाबुद्दीन, विनायक जनार्दन कीर्तने, लक्ष्मण जगन्नाथ वैद्य आणि मणिभाई जसभाई हे चार सदगृहस्थ निरनिराळ्या कामासाठी नोकरीत आणले होते. या सर्वांचा अभिप्राय पडला की, महाराजांनी आणखी चारदोन वर्षे अनुभव मिळवून मग हाती सत्ता घ्यावी. पण महाराजंनी स्वतः कलकत्त्यास लॉर्ड रिपन यांस भेटून अधिकाराची मंजुरी आणली आणि सन १८८१च्या डिसंबरमध्ये ते काम पाहू लागले. हा प्रकार वरील पंचकडीस बिलकूल मानवला नाही, आणि या अल्पवयी मुलास काय कळते अशा भावनेत ते महाराजांस दाबू लागले. ही परिस्थिती फार काळ टिकणे शक्य नव्हते. सर टी. माधवराव तर वैतागूनच सन १८८२ च्या सप्टेंबरात रजेवर म्हणून गेले तर ते पुन्हा परत आले नाहीत. महाराजांनी लगेच काजी शहाबुद्दीन यांस दिवाण नेमून कारभार चालविला. काजीसाहेब फार भले गृहस्थ होते. सुंदर मोडी अक्षर लिहीत व वसुलाच्या बाबतीत ते विशेष प्रवीण होते. काजीसाहेबांनी चार वर्षे दिवाणगिरी केल्यावर ते निवृत्त झाले आणि ता. २ ऑगष्ट सन १८८६ रोजी महाराजांनी लक्ष्मण जगन्नाथ यांस दिवाणगिरीवर आणले. दरम्यान विनायकराव कीर्तने राजीनामा देऊन इंदूरचे दिवाण झाले. तेणेकरून महाराजांच्या गळ्यातली एक धोंड कमी झाली. सन १८९०त लक्ष्मण जगन्नाथ निवृत्त होऊन त्यांचे जागी महाराजांनी ता. ३१ मे सन

१८९० रोजी मणिभाईंची नेमणूक दिवाण म्हणून केली. त्यांच्या अमदानीत हे बापट-प्रकरण निर्माण झाले. ता. २१ नोव्हेंबर सन १८९५रोजी मणिभाईनी दिवाणगिरी सोडली. तेव्हापासून महाराजांची स्वतंत्र छाप चालू झाली. म्हणजे पंधरा वर्षेपावेतो या पहिल्या वृध्द इसमांच्या दडपणाखाली महाराजांना काढावी लागली.

सन १८९५तच महाराजांनी श्रीनिवास राघवायंगार या नामांकित थोर पुरुषास दिवाण नेमून आपली चतुराई प्रकट केली. यांचा तपास आणून त्यांस समाधानाने जवळ आणण्यास महाराजांस एक वर्ष महाप्रयास करावे लागले. सन १८९५त नीलगिरी येथे अय्यंगार यांस त्यांनी भेटीस आणले, तेव्हा मी तेथे महाराजांपाशी होतो. सर टी. माधवरावांपासून व्ही.टी. कृष्णम्माचारीपर्यंत सुमारे बारा गृहस्थांनी सयाजीरावांची दिवाणगिरी साठ वर्षांवर गाजविली. त्यांची ती समग्र प्रभावळ मोठीच म्हटली पाहिजे. त्या सर्वात मला जर कोणी विचारले तर मी या अय्यंगार यांसच प्रथमपद देईन. त्यांनी सहा वर्षे कारभार सांभाळला. त्यांचे खालोखाल रमेशचंद्र दत्त, व्ही. पी. माधवराव, बिहारीलाल गुप्ता इत्यादि मंडळी आपापल्यापरी उच्च कोटीचीच होती. मी या सर्व मंडळीशी चांगला परिचित बनलो असून या बारा विद्वान पुरुषांची नुसती नामावलीच केवढी प्रभावी वाटते ते लक्षांत आणावे. हिंदुस्थानात पाचशे संस्थाने होती, त्या सर्वात या बारा पुरुषांची करामत दुसऱ्या कोणत्याही राजाला लाभली नाही. शिवाय अरविंद घोष वगैरे दुसरे अनेक व्यासंगी सेवक महाराजांनी शोधपूर्वक जवळ आणले. त्यांच्या कांही आठवणी या माझ्या लेखमालेतच उतरल्या आहेत.

मणिभाई दिवाणगिरीवर असता अभावितपणे बापट-प्रकरण महाराजांस जाचू लागले. तत्पूर्वीच इनामे भोगणारे जहागिरदार कोण काय उत्पन्ने उपभोगीत आहेत याचा तपास महाराजांनी चालविला आणि त्या कामावर त्यांनी आपले गुरू इलियट यांस इंग्रज सरकाराकडून मागून घेतले. त्यांनी सन १८८९ त बडोदे राज्यांतील इनामांचा तपास चालविला आणि ज्यांच्याजवळ सबळ पुरावा नसेल त्यांची इनामे जप्त करण्याची तयारी केली. मुंबई इलाख्यात इंग्रजांनी इनाम कमिशन नेमले त्याचीच ही बडोद्याची आवृत्ती. जमीन मोजणीचे कामही त्याबरोबर चालू झाले. या कामावर मुख्याधिकारी इलियट व त्यांचे मुख्य मदतनीस बापट म्हणून एक महाराष्ट्रीयन गृहस्थ होते. दोन-चार वर्षे काम चालल्यावर सरकारकडे अनेक अर्ज आले की, बापट लाच घेऊन खोटे निकाल करतात, त्याचा तपास व्हावा आणि चुकीचे अन्यायी काम रद्द व्हावे. सन १८९४त महाराज युरोपात होते. त्यास मणिभाई दिवाणांनी हा प्रकार कळविला. त्यावर महाराजांनी हुकूम पाठविला की, बापटांवर रीतसर कोर्टापुढे कज्जा चालवून गुन्ह्यांचा निकाल करावा. यावर दिवाणांनी रेसिडेंटच्या सल्ल्याने या प्रकरणासाठी तीन जज्जांचे स्वतंत्र कमिशन नेमून बापटांचा कज्जा चालू केला.

बापट हे गृहस्थ फटकळ वृत्तीचे असून दिवाण मणिभाईशी त्यांची मुख्य तेढ होती. मणिभाईंनी बापटांस वॉरंटाने पकडून कैदखान्यांत रवाना करण्याचा इरादा धरला. सन १८९४च्या जूनपासून दोन-तीन महिने बडोद्यास बापट-कमिशन चालू झाले. त्यासाठी मुंबईहून फिरोजशहा मेहता, महादेव चिमणजी आपटे वगैरे नामांकित गृहस्थ खटला चालविण्यास आणले. तेणेकरून अल्पकाळ

मोठी धामधूम बडोद्यात चालू झाली. बापटांना पकडण्यासाठी मणिभाईंनी वॉरंट सोडले त्याची वार्ता आगाऊ बापटांस कळून त्यांनी हिमतीने बडोद्यातून पलायन केले. एके दिवशी रात्री १०-११ वाजता मणिभाई बडोदे स्टेशनवर कामानिमित्त गेले असता त्याच वेळी त्यांस तेथे बापट दिसले. दिवाणांनी विचारपूस करतांच बापटांनी त्यांस चक्क सांगितले, ''तुम्ही मला तुरुंगाची वाट दाखविणार त्याची तयारी मी करतो आहे. आज मुले माणसे येथून मेलगाडीने रवाना करतो. पश्चात माझे काय व्हायचे असेल ते होईल.'' हे बोलणे होऊन मेलगाडी येताच खुद्द बापटसुध्दा आपल्या माणसांबरोबर गाडीत चढले, आणि रस्त्यात सुरतेहून दिवाणांस त्यांनी तार पाठविली की, एकाएकी आजारी होऊन मी मुंबईस जात आहे. माझी रजा मंजूर करावी. अल्पकाळ मणिभाईचा डाव फसला आणि मुंबईस कायदेशीर इलाज केल्याशिवाय बापट कब्जांत येईनात.

यावेळी पुण्यास लोकमान्य टिळक 'केसरी' पत्र चालवीत असत, त्यांची व बापटांची दृढ मैत्री होती. पुढे बापटांवर वारंट लागू होऊन ते टिळकांना सल्लागार या नात्याने बरोबर घेऊन बडोद्यास आले. जुलै-ऑगस्ट सन १८९४ चे दोन-तीन माहिने कमिशनचे काम चालले. त्यावेळी कोर्टात बापटांबरोबर टिळकही हजर असत. टिळकांस सोडून एक क्षण ते वेगळे राहत नसत. अर्थात गुजरात विरुध्द महाराष्ट्र अशा प्रकारचे स्वरुप या वादास यदृच्छेने येत गेले. महाराजांस हे पूर्ण अमान्य होते. पुढे यथाकाल कमिशनने आपला रिपोर्ट महाराजांकडे रुजू केला आणि बापट तर जामिनावर स्वतंत्र होते. सन १८९५ च्या जानेवारीत महाराज युरोपांतून बडोद्यास परत आले, तेंव्हा कमिशनचा रिपोर्ट त्यांजपुढे रुजू झाला. लांच खाल्ल्याचे वगैरे एकंदर चौदा आरोप बापटांवर दाखल होते. त्यापैकी कित्येकांतून कमिशनने त्यांस मुक्त केले आणि पाच-सहा आरोप त्यांजवर लागू केले. परंतु शिक्षा ठरविण्याचा कोर्टाचा अधिकार कमिशनला नव्हता. म्हणून शिक्षा ठरविण्याचे हे काम पुढे महाराजांस करावे लागले.

बापटांचा बाणा पूर्ण महाराष्ट्रीय होता. अडीअडचणीस ते महाराजांच्या उपयोगी पडत असले तरी त्यांजबद्दल मोठासा उमळा महाराजांस नव्हता. महाराजांची मुख्य अडचण वेगळीच होती. बापटांवर गुन्हा लागू झाला तर त्यांनी केलेले काम रद्द होणार आणि वारखळी खात्याचा कैक वर्षाचा उद्योग सर्व सोडून नवीनच मांडणी करावी लागणार शिवाय बापटांचे वरिष्ठ इलियट होते. त्यांजवरही वरील कामाचे शिंतोडे उडणार हा प्रकार महाराजांस अनिष्ट होता. स्टॅन्ले राइस यांनी महाराजांचे चरित्र लिहिले आहे, त्यांत ते सांगातात, -

"The whole case seems to have degenerated from a real judicial inquiry into a trial of strenght between the Marathi and the Gujrathi parties in the State. Bapat himself was a Maratha and the minister Manibhai a Gujrati. The Maharaja speaks of the affair as of factions, ill-feeling, distrust, uncertainty. Bapat was a small incident in the career of the Baroda State. The whole thing was mismanaged." Vol. I, pp. 165-166.

सन १८९५ च्या जुलईत महाराज बापट-कमिशनचा रिपोर्ट घेऊन उटकमंडला गेले. तेथे श्रीनिवास राघवायंगार यास आणून सर्व चर्चा केली आणि मणिभाईंना दिवाणिगिरीवरुन दूर

केले. नवीन दिवाणांनी पुढील सहा वर्षात मागच्या अनिष्ट आठवणी सर्व बुजवून टाकल्या. बिचारे बापट मात्र सर्वथा नागवले गेले. लांचेने त्यांनी कमाई केली असेल तर ती सर्व खलास होऊन ते निराधार बनले. महाराजांनीच त्यांजवर कृपा करून त्यांस दरमहा दीडशे रुपयांचे निर्वाहवेतन बांधून दिले. ते मला वाटते त्यांनी सुमारे दहा वर्षे भोगले. पुढे ते लवकरच वारले. महाराजांच्या जीवनक्रमांत क्रांती घडविणारे हे बापट-प्रकरण आता सर्वथा विस्मृतीत गडप झाले आहे. पाच वर्षे महाराजांना या प्रकरणाने अस्वस्थ ठेवले. नवे इसम नोकरीत आणून त्यांनी आपला जम बसविला ते इतर लेखांत सांगितलेच आहे.

१०.
देहावसान

पूर्वीच्या लेखांत वर्णिलेला व्याख्यानाचा एक प्रसंग मी मुद्दाम उदाहरणादाखल सांगितला. परंतु पाऊणशे वर्षाच्या त्यांच्या दीर्घ हयातीत शेकडो नामांकित व्यक्ती बडोद्यात येऊन गेल्या. ॲनी बेझंट, रवींद्रनाथ टागोर, मार्क ट्वेन, रडयार्ड किप्लिंग, आहिताग्नि राजवाडे, पांगारकर, शंकराचार्य अशा नानाविध व्यक्तींच्या विद्वेत्तेचा अनुभव बडोद्याच्या जनतेस सदैव मिळत गेल्याने केवढी जागृती समाजांत झाली त्याची आज कल्पना होणार नाही. खुद्द महाराजांची भाषणे तर सर्व छापून प्रसिध्द झाली आहेत.

राज्यकारभाराच्या लोकनियंत्रणेच्या व योग्य सत्ता गाजविण्याच्या व्यावहारिक बाबतीत सयाजीरावांचा हात धारणारे कर्ते पुरुष इंग्रजांत देखील फार थोडे. मग हिंदी संस्थानांत तर विचारावयास नको. त्यांची अंतःकरणाची मोठी हाव इतक्यापुरतीच मर्यादित नव्हती. सामान्य माणसाप्रमाणे आपले रोजचे सर्व व्यवसाय आपले आपण सिध्दीस न्यावे ही त्यांची मोठी इच्छा. पण ती तडीस कशी जावी अनेक बारीक-सारीक गोष्टींची सवय जन्मापासून अंगात मुरावी लागते. ती कामे मोठेपणी मुद्दाम शिकता येणार नाहीत. पाच-पन्नास खेपा त्यांच्या युरोपात झाल्या. पण हातातली छत्री, काठी, वाचण्याचे पुस्तक, डोकीवरची टोपी वगैरे वस्तू प्रवासांत त्यांना सांभाळता येत नसत. आम्ही त्यांची ती कामे करू लागलो म्हणजे ते वैतागून बोलत, "तुम्ही आम्हाला आमची कामे करू देत नाही, मुद्दाम आम्हास परावलंबी बनविता, तुम्हास पुढे पुढे करता यावे म्हणून." आम्ही जवळचे सेवक त्यांस सांगत असे की, या बारीक गोष्टी नोकरांनीच कराव्या. त्या आपण करण्याची आता हाव धरु नये. महाराजपण गाजविण्याची संधी आपणास आहे ही काय थोडी; पण या विषयात त्यांची समजूत कधी पडली नाही. आपले वैगुण्य त्यांना सुधारता आले नाही. त्यांचे एक वृध्द चुलते होते. ते त्यांस थट्टेने नेहमी म्हणत, "तुमच्याबरोबर आम्ही शेकडो लोक युरोपात गेलो. त्यांतला एकही इसम असा नाही की, स्वहस्ताने दाढी करायला शिकला नाही. तुम्हांस मात्र एवढेसे हलके कामही कधी स्वतः करता

आले नाही.'' हात इतका जड की, हजामत करू लागून त्यांनी पुष्कळसे कापून मात्र घ्यावे. लिहिताना अक्षर अगदी वाईट. ते सुधारण्यासाठी मीच त्यांचेपाशी पुष्कळ प्रयत्न करून थकलो. टाक कसातरी धरुन कागदावर जोराने रेटण्याची त्यांची सवय वर्षोगणती खपून सुध्दा कधी सुधारली नाही.

चिमणाबाईंनी एकदा प्रसंगाने त्यांची एक मजेदार गोष्ट मला सांगितली. नुकताच त्यांचा विवाह झालेला. दोघे दोन पलंगावर जवळ-जवळ होती. एकदा अपरात्री महाराजांच्या पायांना फार खाज उठली. खाज थांबेना, तेंव्हा अस्वस्थ होऊन त्यानी महाराणींना हाक मारुन उठविले. चिमणाबाईंनी दिवा घेऊन पाय तपासले. तेंव्हा पायाची बोटे स्वच्छ नसून मातीने बिघडलेली त्यांना आढळली. लगेच त्यांनी विचारले, ''रोज आंघोळ करतांना तुम्ही हातपाय, बोटे, सांधीकोपरा सर्व नीट चोळून धूत नाही काय'' ते म्हणाले, ''पाणी भरलेला हौद असतो त्यांत मी बसलो. माणसे अंगावर आणी ओततात. मी काहीच करीत नाही. मला हे कोणी सांगितले नाही.'' पाण्यांतून महाराज उठले की भला जाडा टॉवेल अंगावर गुंडाळून ते बाहेर येत. अंग पुसणे, सर्व अवयवांचे पाणी पुसून टाकणे ही कामे त्यांच्या अंगवळणी नव्हती. या सवयी लहानपणीच अंगात मुराव्या लागतात. त्या मोठेपणी करू म्हटले तर जमत नाही. चिमणाबाई म्हणाल्या, ''त्या दिवसापासून रोज दोनदा स्वतः महाराजांचे पाय ऊन पाण्याने धुवायचे असा प्रघात कैक दिवस पाळला.'' पतीचे पाय पत्नीने धुवावे हे व्रत अनायसे त्यांना घडले. चेक लिहिणेसुध्दा महाराजांना नीट जमत नसे.

आणखी किती तरी लहानमोठ्या गमती मला सांगता येतील. पण आधुनिक संस्थानिकांच्या मालिकेत सयाजीरावांचे नाव अग्रगण्य मानले पाहिले याचे मर्म बाहेर कळण्यास मला वाटते वरील हकीकत पुरेशी आहे. मोठ्या माणसांची चरित्रे प्रसिध्द झाली असली तरी अशा प्रकारच्या आठवणी त्या चरित्रांस एक प्रकारचा रसोत्पादक जिव्हाळा प्राप्त होतो. सदतीस वर्षाच्या निकट सेंवेत मी एक प्रकारे राजकुटूंबाच्या सुखदुःखाच्या प्रसंगात वाटेकरी बनलो. त्यांचे चिरंजीव फत्तेसिंहराव यांच्या मृत्यूचा प्रसंग या क्षणी मला आठवतो. काय होणार हे महाराजांना पूर्ण माहीत होते. डॉक्टरांना त्यांनी सागितले, शेवटचा क्षण आला म्हणजे मला कळवा. त्याप्रमाणे सकाळी आठचे सुमारास डॉक्टरांनी महाराजांना खबर दिली की, वेळ भरत आली. लगेच महाराज फत्तेसिहरावांच्या खोलीत गेले. पांघरुण घातलेल्या निजलेल्या शरीरास महाराजांनी डोळे भरुन पाहिले. त्यासाठी उशाशी पलंगाचा लोखंडी कठडा होता त्यावर हात टेकून महाराज काही मिनिटे पहात स्वस्थ होते. दरम्यान प्राण गेला. सभोवारच्या जागेत आम्ही सर्व मंडळी जमलो. कित्येक पलीकडच्या दालनांत बसून हलक्या आवाजाने स्मशानयात्रेच्या तयारीस लागले. निदान अर्धाएक तास तरी महाराज स्वतः निचेष्ट स्थितीत मृताच्या पलंगावर ओठंगून उभे होते. कोणी आत जावे आणि त्यांस तेथून बाहेर आणावे मोठा दुर्धर प्रसंग. सर्वत्र शुकशुकाट. रडारड बिलकून नाही. मात्र प्रत्येक ठिकाणी आंतल्या आत मुसमुसणे व डोळे पुसणे हे प्रकार चालले. तयारी होताच खाजगी कारभारी केशवराव पंडित आत गेले त्यांनी महाराजांस हात धरुन बाहेर आणले. महाराज स्वतः मैल दोन मैल पायी चालत पुत्राचे अंत्यविधीस गेले. पुत्राने वडिलांस अग्नि द्यावा, त्याच्या उलट प्रकार महाराजांचे वाट्यास आला.

महाराजांचा स्वभाव विकारवश कधीच नव्हता. त्यांच्या जवळ जाऊन बोलण्यास सुध्दा विचार पडे. जिव्हाळ्याचा स्नेही असा त्यांस कोणी लाभलाच नाही वडील बंधु आनंदराव व एक मानकरी नारायणराव घाटगे य दोनच व्यक्तींशी पुष्कळदा महाराज अंतःकरण खुले करून बोलत. खाशेराव जाधवहि तसेच त्यांचे जिव्हाळ्यांत हाते. त्यांची पहिली भार्या अल्पवयांत वारल्यावर दुसऱ्या चिमणाबाई झाल्या. त्यांचा जन्म ता. १६ नोव्हेंबर सन १८७१ चा असून लग्न १८८५ च्या २८ डिसेंबरास झाले. तेवढ्या एकच काय त्या सारा जन्म पतिसान्निध्यात काढलेल्या आज हयात आहेत. जुन्या गोष्टी बोलायला त्या व मी अशी दोनच माणसे आज इतक्या वर्षानंतर आपापले जीवन कंठीत आहो. महाराजांचा स्वभाव आंतल्या गांठीचा, त्याच्या उलट चिमणाबाईंचा बनला. मला एक मुख्य गोष्ट पक्की माहीत आहे की, आपल्या थोर कर्तव्यांत पतिसंबंधाने त्यांनी अल्प देखील उणे पडू दिले नाही. आज सतरा वर्षे त्या एकांतांत कालक्रमणा करीत आहेत. अद्यापी मला त्या अत्यंत प्रेमाने बोलावून आदर व जिव्हाळा दाखवितात. अलीकडे मीच आता थकून त्यांचे दर्शन घेण्यास असमर्थ बनलो आहे.

महाराजांची प्रकृती मूलतः निकोप होती. मेहनतीने शरीर घट्ट बनत होते. व्यसन म्हणून कांहीएक नव्हते. चहा देखील ते नियमाने घेतच असे नाही.तथापि शेवटच्या पंधरावीस वर्षात त्यांना संधिवाताचा विकार जडला. कशातहि लक्ष न लागून ते उदास बनले. तेव्हा त्यांना डॉक्टरांनी चिरुट व सिगारेट यांचे सेवन सांगितले. ते त्यांनी वर्ष सहा महिने चालवून पुढे सोडून दिले. गोड लागलेल्या पदार्थावर हात मारण्याची इच्छा विशेष असून त्या बाबतीत जवळची मंडळी त्यांस इशारा देत. सन १९३८ सालच्या ऑक्टोबर अखेर ते युरोपांतून आगबोटीने मुंबईस येऊन अतरले. महाराणी मागे लंडनला होत्या. उतरण्यापूर्वीच ते बोटीवर आजारी पडले आणि नेपियन सी रोउवरील आपल्या राहत्या बंगल्यात गेले. बडोद्यास जाण्याची उत्कंठा त्यांस लागली. डॉक्टर म्हणत, जरा आराम पडतांच बडोद्यास जाऊ. महाराणींना ही दुखण्याची खबर तारेने मिळतांच त्या देखील एक तज्ज्ञ इंग्रज डॉक्टर बरोबर घेऊन विमानाने मुंबईस आल्या. नोव्हेंबरपासून जानेवारीपावेतो पुष्कळ इलाज झाले. महाराणी व दिवाण कृष्णम्माचारी यांनी सतत जवळ राहून शक्य ती शुश्रुषा केली. पण महाराज दिवसेंदिवस थकतच गेले. शेवटचे चार-दोन दिवस थोडाबहूत भ्रम होता. मंगळवार, ६ फेब्रुवारी, १९३९ या दिवशी रात्री आठ वाजता मुंबईस त्यांचे देहावसान झाले. लगेच स्पेशल आगगाडीने त्यांचे शव बडोद्यास नेले. बुधवारी सकाळी दहा वाजता अंतयात्रा 'लक्ष्मीविलास' मधून निघाली. त्या अंत्यप्रसंगी सर्व पुढाकार चिमणाबाईंनी अत्यंत कळकळीने घेऊन शेवटच्या पतिसेवेचे पुण्य संपादिले. महाराजांचे शव जवळ घेऊन त्या स्वतः दोन-तीन तास बसल्या, वाटेल त्याने येऊन दर्शन घ्यावे अशी व्यवस्था ठेवली. स्वहस्ताने स्नान घालून सर्व प्रेतशृंगार यथोचित केला. पलीकडच्या दालनात मोठा दरबार भरुन प्रतापसिंहांची व्दाही प्रगट करण्यात आली. चिमणाबाईचे पुत्र धैर्यशीलराव विद्यमान होते, त्यांनी स्वहस्ते सर्व अंत्यक्रिया केली. तीन तासपावेतो 'लक्ष्मीविलास' मधे यात्रेची गर्दी सीमेपार बनून आली. अश्रूंचा पाऊस पडला. तो त्यावेळचा शोकजनक प्रसंग वर्णन करण्यास कोण समर्थ आहे.

चिमणाबाईंच्या मनांतील कालवाकालव, आदल्या रात्री पतिशवाबरोबरचे प्रवासांतील त्यांचे मनोगत विचार व बडोद्याचे संमर्ददर्शनांतले त्यांचे ते मूकव्रत हे प्रकार एखादा अंतर्ज्ञानी पुरुषच ओळखू शकेल. ज्या पुरुषाची सहधर्मचारिणी म्हणून त्या अर्धा शतकाहून जास्त काल त्यांच्या सहवासांत राबल्या तो मृतदेह सारखा डोळ्यापुढे पहातांना सर्व जन्माचा इतिहास त्यांच्या मनांत उभा राहिला असल्यास नवल नाही. मनुष्य केवढाहि मोठा असो, कूडीतून प्राण निघून गेला की सर्व प्राणी पुनःपंचतत्वांत मिळून जणार. व्यर्थ आहे आम्हां मानवांचे जीवन. यापेक्षा सती जाण्याचा प्रघात असता तर मला वाटते चिमणाबाईंनी त्या क्षणी धैर्याने पतिराजंसमवेत आपलाहि देह अर्पण करून इहलोकच्या यातना सर्व संपविल्या असत्या. पतिनिधनानंतरच्या अलीकडील पंधरा वर्षात मी त्यांना वारंवार भेटून त्यांचे हृदगत ओळखीत आहे. मला वाटते, त्यांना स्वतःचा असा आप्त कोणी नाही. वनवाशासारखे आयुष्य कंठीत असतात. सर्व ऐहिक सुखावर त्यांनी पाणी सोडले आहे. कोणाशी मन मोकळे करू, या जगांत माझे काय आहे, हा विचार सारखा त्यांच्या मनास खात असलेला मला दिसतो. मोठ्या धैर्यवान, विचारी व भाग्यशली बाई. आपल्या आठवणी लिहून काढाव्या असे अनेकरवार मी त्यांस विनविले, परंतु जो व्यवसाय माझा तो त्यांचा कसा बनेल त्यांना आपले सर्व जीवन दुःसह झाले आहे.

अशा मनःस्थितीत चिमाणाबाईंनी पतीचे अंत्यदर्शन घेतले. दहा वाजता पालखीतून स्वारी निघाली. ज्या नगराच्या राजरस्त्यांनी त्यांनी आपल्या दीर्घ हयातीत अश्वगजादि वाहनांच्या शेकडो मिरवणुकी अनुभविल्या त्यांची ही शेवटची यात्रा समस्त ऐश्वर्यानिशी बडोदावासीयांनी डोळे भरुन पाहिली. त्या वेळच्या अश्रुप्रवाहांना सीमा उरली नाही. मानवी जीवनाची कृतार्थता एकट्या सयाजीरावांनी खरी करून दाखविली. ती कवि हाफिजने आपल्या सुंदर कवनांत अमर केलेली आढळते, ती ही : – ''जब तुम आये जगतमे जन हासे, तुम रोय अब करनी ऐसी करो तुम हासे और जन रोया (बाबारे, तू जन्मास आलास तो रडत आलास, आता जन्मांत अशी कृति करून दाखव की निर्यणप्रसंगी त्वां हसत जावे आणि इतर जनांनी रुदन करावे)'' तुळशीदास वगैरे संतांनी या वचनाचा अनुवाद केलेला आढळतो. हीच माझी त्यांना शेवटची आदरांजलि.

●●●

श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात

पुरवणी

जुलै
१९५८

गो. स. सरदेसाई

अनुस्मरणी

'सयाजीरावांच्या सहवासांत' या पुस्तिकेची रचना करीत असतां, काय लिहावे व काय लिहूं नये हे विचार सारखे मनांत घोळत होते. कशीबशी ती पुस्तिका बाहेर पडली. तदनंतरच्या काळांत मी आपल्या पुस्तकसंग्रहाची व लेखसंभाराची विल्हेवाट लावीत असतां मागील डायऱ्या वगैरे पाहिल्या तेंव्हा आणखी किती तरी नवीन विषय सुचले. त्यांचे अंतर्भाव पुस्तकांत करणे मला अवश्य वाटले. प्रकाशक श्री. गानू यांस विचारतां त्यांनी सुचविले की, पुरवणीवजा आणखी मजकूर तुम्ही लिहून द्याल तर मी तो त्वरेने छापून त्या पुस्तिकेस जोडीन. मलाही हा विचार पटला. तेंव्हा आणखी कित्येक नवीन विषयांची रचना केली. तो हा नवीन परिपाक पूर्वीइतकाच वाचकांस गोड वाटेल अशा धारणेने येथे दिला आहे. पण त्याबरोबर हेही लक्षांत ठेवले पाहिजे की, मी कांही महाराजांचे समग्र चरित्र लिहीत नाही. त्या थोर विभूतीचे स्वभावनिदर्शन व कर्तृत्वाचे रहस्य एवढेच स्पष्ट दिसावे अशी मर्यादा या लेखास ठेविली आहे. ती वाचकांनी गोड मानून घ्यावी.

- गो. स. सरदेसाई

प्रकरणांचा अनुक्रम

(पूर्वीच्या अनुक्रमास अनुसरून)

अनुस्मरणी / ४१२

११. पहिल्याच भेटीची अपूर्व छाप / ४१३

१२. गणेश जनार्दन आगाशे / ४१६

१३. आबास तय्यबजी / ४१८

१४. जयसिंहरावांचे अकल्पित देहावसान / ४२०

११.
पहिल्याच भेटीची अपूर्व छाप

माझी बडोद्याची नोकरी कशा परिस्थितीत सुरू झाली आणि माझ्या पहिल्याच भेटीत महाराजांना माझी कामगिरी कशी पसंत पडली हे विषय पुढील भावी जीवनांत विशेष संस्मरणीय बनले.महाराज पुष्कळसे बडोद्याबाहेर राहत, आणि त्यांच्या दत्तक मातुश्री जमनाबाई वगैरे बडोद्याहून त्यांस पत्रे लिहीत. त्या बाबतीत काही तरी घोटाळा उत्पन्न झालेला होता. मी नोकरीत आलो तेंव्हा हा प्रकार विशेष जाणवला. तपासाअंती असे कळले की, महाराजांनी महाबळेश्वराहून जमनाबाईंना बडोद्यास पत्र लिहिले त्यांत लेखकाच्या गफलतीमुळे महाराणींना अखंड सौभाग्यवती असा मायना लिहिला गेला. त्या पत्रावर महाराजांची सही होती. त्यावरून जमनाबाई महाराणींनी चवताळून महाराजांना लिहिले की, आमची अशी अप्रतिष्ठा करणारा लेखक तुम्ही एकदम काढून टाका. तुम्हांस कोणी लायक लेखक मिळत नसेल तर मी एक तसा पाठवून देते. मातुःश्रीचा हा टोमणा महाराजांस झोंबला आणि त्यांनी लगेच नायब दिवाण आठल्ये यांस कळविले की, कॉलेजचे शिक्षण घेतलेला, पत्रव्यवहार व मोडी अक्षर जाणणारा असा एक ग्रॅजुएट आम्हांस रीडर म्हणून पाहिजे आहे तो तुम्ही तपास करून सुचवा. त्यावरून त्यांनी माझे नाव महाराजांना कळविले. लगेच माझी नेमणूक रीडर या हुद्दयाने चालू झाली. दरम्यान महाराज महाबळेश्वरला गेले आणि तेथेच त्यांनी मला बोलाविले. महाराजांचे बंधू संपतराव सेकेटरीच्या हुद्दयावर होते, त्यांनी माझ्या नेमणुकीचा हुकूम माझ्या हाती दिला आणि मला महाबळेश्वरास पाठविले. बापूसाहेब आठल्ये बडोद्याहून माझा पुरस्कार करीत होते. मी त्यांजकडून शंभर रुपये उसने घेऊन महाबळेश्वरला गेलो. तेंथेच माझी महाराजांशी पहिली भेट झाली. हा सर्वच प्रकार मला अद्‌भूत वाटला. वाटेत मुंबईत थांबून बूट,पाटलोन, आंगरखे, पागोटे वगैरे दरबारी रिवाज स्वीकारुन आगगाडीने प्रथम पुणे व तेथून वाठार आणि तेथून पुढे चाळीस मैल महाबळेश्वरपर्यंत घोड्याचा टांगा असा प्रवास करून मी जानेवारी १८८९ चे अकरा तारखेस महाबळेश्वरला पोचलो. तेथे ता. १२ पौष शु. ११ या दिवशी दुपारी बारापासून

माझी पहिली भेट तब्बल पाच तास टिकली. हाही योगायोग माझ्या फायद्याचाच बनला. हा सर्वच प्रसंग विचित्र असून येथे सांगण्याजोगा आहे.

सकाळीच स्नान करून पागोटे वगैरे पोषाख चढवून मी महाराजांचे पर्सनल मॅनेजर आपासाहेब पुणेकर म्हणून होते त्यांजकडे गेलो. सकाळचे सुमारे नऊ वाजले होते. आपासाहेब मला म्हणाले, या वेळी महाराज घोड्यावरून फिरायला गेले आहेत ते इतक्यांत येतील. आले म्हणजे तुमची भेट करवितो. तो महाराजही आले आणि लगेच आपासाहेब नजीकच्या बंगल्यात जाऊन त्यांस भेटले. त्यांनी मी आल्याचे वृत्त महाराजांस श्रुत केले. दरम्यान श्मश्रु व स्नान हे विषय उरकावयाचे असल्यामुळे माझ्या भेटीस विलंब झाला. तो सुमारे अकरा वाजले आणि महाराजांचे भोजन तयार झाले. तेणेकरून माझ्या भेटीचा विषय आणखी बारगळला दोन प्रहरी बाराचे अंदाजांत आपासाहेब परत तंबूवर आले. ते मला म्हणाले, तुम्ही आल्याची खबर मी महाराजांस दिली आहे. महाराज बंगल्यात शतपावली करीत आहेत असे सांगून त्यांनी चोपदारास बोलाविले आणि त्याजबरोबर मला त्यांनी महाराजांकडे पाठविले. चुलत बंधु अवचितराव यांचे खांद्यावर हात ठेवून महाराज हातांतील ओले बदाम तोडात टाकीत, अंगांत फक्त एक सदरा, असे मला दिसले. मला पाहतांच त्या उभ्यंतांनी मला नानाविध प्रश्न विचारले. अवचितरावांनी विचारले, नारळ-सुपारीची झाडे तुमच्या गावी आहेत का? पुढे खुद्द महाराजानी विचारले, तुम्ही बी. ए. कधी झालांत? आवडीचा मुख्य विषय काय होता? तुम्हाला मोडी लिहिता येते का मोडीत पत्रे लिहू शकाल का प्रश्नांची उत्तरे मी यथोचित देत गेलो. त्यावर महाराज म्हणाले, आत चला आणि मी सांगतो ते लिहून दाखवा. असे बोलून महाराज मला आंतल्या खोलीत घेऊन गेले. ती खोली लहानच, आत लेखन-साहित्याचे एक टेबल, एक खुर्ची व एक पलंग. महाराजांनी मला त्या खुर्चीवर बसविले, आणि आपण तोंडी मजकूर इंग्रजीत सांगू लागले. माझे भोजन झालेले नाही हा प्रकार महाराजांस ठाऊक नव्हता व मलाही तो प्रकार महाराजांस सांगण्यास अवसरच मिळाला नाही.

येथे वाचकांनी लक्षात ठेंवले पाहिजे की, मुंबईच्या इनाम कमिशनप्रमाणे बडोदेराज्याची इनामे तपासण्याचे नवीन खाते त्या वेळी बनावाच्या स्थितीत होते. त्यावर महाराजांचे विद्यागुरू मि. इलियट साहेब मुख्याधिकारी नेमलेले होते. ते व दिवाण वगैरे अधिकारी यांनी तत्पूर्वीच्या चारदोन दिवसांत सर्व विषयांची एकत्र चर्चा करून त्यावर महाराजांना आपला शेवटचा हुकूम लिहावयाचा होता. या प्रचंड हुकूमाचा पहिला मसुदा महाराज मला तोंडी सांगू लागले आणि मी त्यांचे शब्द झपाझप लिहीत गेलो. असा हा लेखनाचा व्यवसाय चांगला पाचचार तास चालला. दरम्यान आपासाहेब पुणेकर आपले भोजन व वामकुक्षी आटपून दोनप्रहरचा चहापाणी, हुक्का वगैरे केल्यावर महाराज काय करतात ते पहाण्यासाठी बंगल्यावर आले. तपास करता त्यांना कळले की, बारापासून पाचपर्यंत महाराज व मी दोघेही लेखनांत गुंतलो आहोत. दबत दबत आपासाहेब आंत आले अणि महाराजांना सांगू लागले, या गृहस्थांचे भोजन व्हावयाचे आहे. त्याचबरोबर महाराजांनी मला विचारले, तुम्ही जेवला नाही ते मला का नाही कळविले त्यावर मी काहीच उत्तर दिले नाही. अनायासे पहिली परीक्षा खाशी पार पडली. हाच मी फायदा मानून

आनंदाच्या भरांत महाराजांची रजा घेतली. अनायासे एकदशीचा उपवास पदरांत पडला. सुमोर पंचपवीस तरी कोरे ताव एकापाठीमागून एक मी सफाईदार अक्षराने लिहू शकलो, हा प्रकार महाराजांचे नजरेस आल्याने माझ्या बडोद्याचे सेवेची बेडी पायांत कायमची अडकली, आणि मी राजवाड्याच्या त्या भपकेबाज जीवनांत कायमचा गुरफटलो गेलो. सोडवा मला या सेवेंतून आणि बाहेर कोठे तरी बदली करा अशी याचना करून मी थकलो. पण महाराजांनी मला वाड्यांतून कधी बदलले नाही. कांही झाले तरी माझ्या भेटीचा हा पहिला बार उत्कृष्ट उतरला.

१२.
गणेश जनार्दन आगाशे

हे गृहस्थ साहित्यिक म्हणून महाराष्ट्रात गाजले. बहूधा स. १९१७ त इंदूरच्या साहित्य-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. ते काम संपून परत जात असता ते बडोदे पहाण्यासाठी तेथे उतरले. माझे चांगले परिचित असल्यामुळे मी जाऊन त्यांस भेटलो. सहजी बोलतांना मी म्हणालो, बडोद्यास येऊन महाराजांस भेटल्याशिवाय जाणे योग्य नाही. देवळात गेल्यावर देवाचे दर्शन घेतलेच पाहिजे. त्यांनी उत्तर दिले. मला या भेटीची मोठीशी उत्कंठा नाही पण महाराजांनी भेटीची इच्छा दर्शविल्यास मी अवश्य येईन. आज आठाच्या गाडीने मी मुंबईस जाणेचा विचार केला आहे. तत्पूर्वी महाराजांस खबर देऊन त्यांची इच्छा कळवा. मी त्यास एक दिवस जास्त बडोद्यास रहाणेचा आग्रह केला. त्यावर ते म्हणाले, माझा मुंबईचा कार्यकम ठरलेला पार पाडला पाहिजे. सायंकाळी सहा वाजेपर्यंत मी निकाल कळवितो असे सांगून मी त्यांची रजा घेतली. योगायोग असा की, त्या दिवशी अनेक कामांच्या धांदलीत महाराज व्यग्र होते. तासामागून तास गेले पण मला त्यांची भेट घेता येईना. शेवटी नाइलाजास्तव पाच वाजता मी मुद्दाम आत घुसून आगाशांच्या भेटीचा मजकूर सांगणार तो ते चिडून बोलले, मला आता कोणाशी भेट घेणेची सवड नाही, चालते व्हा. माझ्या कामास व्यत्यय आणू नका. एवढे झाल्यावर मी हिरमुसला होऊन तसाच परत घरी गेलो. त्याउपर घटका दोन घटका जातात न जातात तोच महाराजांचे मला बोलावणे आले. मी तसाच आलेल्या मोटारीतून महाराजांकडे गेलो. महाराज मला म्हणाले, तुम्ही कांही तरी सद्हेतूने माझ्याकडे आला असतांना मी तुमचे बोलणे न ऐकून टाकून बोललो. हे गैर झाले. काय तुमचा विषय होता तो मला कळवा. मी अगाशांचे भेटीचा विषय सांगितला. मी म्हणालो, आंम्हा निकटवर्तीयांस महाराजांचे नेहमीचेच सांगणे असते की, एखादे सत्कृत्य करण्याची संधि आली तर तिचा फायदा घेण्याची महाराजांस सूचना द्यावी. आगाशांस भेटण्यांत महाराजांचाच लौकिक होता. महाराजांस गोष्ट पटली, आणि ते म्हणाले, आज भेट घेण्यास आता सवड नाही. त्यांस एक दिवस बडोद्यास थांबवून घ्या. महाराजांनी आणखी सुचविले की, त्यांस राजवाड्यांतच

भोजनास बोलवा. त्यांच्यारिता ब्राम्हणी भोजन तयार ठेवा आणि दुसरे दोघे-तिघे भोजनास बरोबर बोलवा. मी खुशाल होऊन तसाच मोटारीमधून जाऊन आगाशांस भेटलो. दुसरे दिवशी सकाळी दहापासून बारापर्यंत भेटीचा हा उपक्रम फार चांगला वठला. आपण रागाच्या भरांत आवेशाने एखादे कृत्य केले तर त्याचे योग्य निराकरण करण्यांत महाराज किती तत्पर असत हे या उदाहरणांत स्पष्ट होते.

महाराजांच्या अशा अनुनयवृत्तीची अनेक उदाहरणे मला आठवतात. आपल्या कृतीने नाहक कोणाला अन्याय घडू नये याची सावधगिरी ते विशेष ठेवीत. त्यांचे चिरंजीव फत्तेसिंहराव स. १९०८ साली वारले. पश्चात त्यांची विधवा पत्नी-पदमावती कॅन्सरच्या विकाराने आजारी झाली. तिला घेऊन उपचारासाठी महाराज एक दोन महिने मुंबईस राहिले. माझी नेमणूक पदमावतीचा सेकेटरी म्हणून होती. मिरजेचे सुप्रसिध्द डॉक्टर वॉन्ेस यांस त्यांनी उपचारासाठी मुंबईस आणले. दुखण्याचा रंग रोज रोज कसा बदलत आहे याची जरूर तेवढी खबर दररोज सायंकाळी पाच सहा वाजता मी महाराजांस देत जावी असा त्यांचा मला हुकूम झाला. तेथे दिवसभर मलबार हिलवरील त्यांच्या बंगल्यांत काढून रात्रीसाठी गिरगावांत बंधूंकडे जाण्याचा माझा क्रम होता. एके दिवशी सायंकाळी मी रोजच्याप्रमाणे पदमावतीच्या आजाराची वर्दी देण्यास गेलो असता महाराज मजवर एकदम चिडून टाकून बोलले, आणि म्हणाले, ''मी दिवसभर काम करून थकलो आहे हे तुम्हास कळू नये की काय जा, निघून जा.'' याबद्दल मला अत्यंत विषाद वाटला. पण करणार काय सेवा पडली, अपमान सहन केला पाहिजे अशी मनाची समजूत घालून मी सायंकाळी घरी गेलो. चमत्कार असा घडला की, रात्री नऊ वाजता महाराजांची मोटार मला त्यांजकडे नेण्यासाठी बंधूंच्या मुक्कामावर आली. तसाच मी कपडे घालून त्यांजकडे गेलो. पहातो तो एकटीच स्वारी स्वच्छ चांदणे पडले होते त्यांत हातांत काठी घेऊन बागेत हिंडत होती मी जाऊन अभिवादन करुन विचारले, काय काम आहे त्यावर ते म्हणाले, संध्याकाळी मी तुम्हांस टोचून बोललो त्याचा रोष घडणारच. त्यांचे योग्य परिमार्जन करणे हेच आमच्या मानवांचे कर्तव्य आहे. प्रत्येक व्यक्ति स्खलनशील असतेच असे म्हणून त्यांनी मला निरोप दिला. सेवकाचा असा उपराळा महाराज कसा सांभाळीत हे यावरुन दिसून येते.

●●●

१३.
आबास तय्यबजी

या गृहस्थांचे नाव हिंदु-मुस्लीम ऐक्याचे संबंधात समस्त हिदुस्थानांत व मुख्यत्वे महाराष्ट्रात गाजलेले आहे. सुमारे पन्नास वर्षे हे बडोद्याचे नोकरीत होते. आणि बडोद्यांतून त्यांस मिळणारे निवृत्तिवेतन गायकवाडांनी बंद करावे अशी टोचणी इंग्रज सरकारची गायकवाडांस सारखी चालू राहिली. परंतु महाराजांनी ती कधी मान्य केली नाही. इंग्रज सरकारचा गायकवाडांवर रोष होणेस हे आणखी एक कारण घडले. बडोद्यापुरतेच बोलावयाचे तर आबासचे महत्व अगदी भिन्न प्रकारे गाजले आहे. हिंदी राष्ट्राच्या ऐक्यसंघटणेसाठी धार्मिक, सामाजिक, औद्योगिक वगैरे बाबतीतील भेदाभेद काढून टाकणे हा एक मोठाच राष्ट्रीय प्रयोग हिंदी पुढाऱ्यांनी व मुख्यतः आबास यांनी निकराने चालविला. मला पक्के आठवते की, महाराजांनी हिदुस्थानच्या पश्चिम किना-यावरील स्वतःच्या सहलीसाठी झिंगारा नावाची एक टुमदार बोट सर्व सोयींनी उत्कृष्ट शृंगारलेली अशी खरीदी करून आणली, ती त्यांची कामगिरी आबासनी केली. मी तरी नुकताच नोकरीस लागलो होतो. स. १८८९ च्या मार्चात आबास ती बोट बाणकोटच्या बंदरांत ठेवून आपण महाराजांचे भेटीस महाबळश्वरी आलो. तेंव्हा त्यांचा-माझा पहिला परिचय जुळला. खुद्द महाराज लगेच आबास यांस घेऊन त्या नवीन बोटीने बाणकोटाहून सुरतपावेतो प्रवास करून बडोद्यास गेले. त्या वेळी मी त्यांजबरोबर बोटीत होतो. बोटीवर करमणुकीसाठी एक लहानसा टुमदार पुस्तक-संग्रह होता. त्या प्रत्येक पुस्तकावर नांव लिहिण्याची कामगिरी महाराजांच्या हुकूमाने मी केली. त्याच वेळी महाराजांनी आबासच्या मार्फत एक इंग्रज डॉक्टर नेव्हिन्स या नावाचा सोबती म्हणून नोकरीस घेतला. सुमारे पाच वर्षे १८८९ ते १८९४ या गृहस्थांस महाराजांनी नोकरीत ठेवून मग रजा दिली. तदुत्तर नेव्हिन्सचा-माझा पत्रव्यवहार चांगला चाळीस वर्षे चालला. आपल्याकडच्या अडाणी आप्तवाईकांपेक्षा असा हा परका सहचरसोबती महाराजांना जास्त उपयोगाचा वाटला.

स.१८८९ पासून सुमारे स. १९४५ पर्यंत आबास बडोद्याचे नोकरीत होते. स. १९४५ चे आंतबाहेर ते केंव्हातरी वारले. ते बॅरिस्टर असल्यामुळे त्यांनी न्यायाधीशाचीच नोकरी केली. शेवटी ते महात्मा गांधीचे अनुयायी बनले. सामाजिक बाबतीत महाराजांना पूर्ण पाठिंबा देणारे असे हे एकनिष्ठ सेवक महाराजांस लाभल्यामुळे सार्वजनिक हिताचा मोठा फायदा संस्थानास झाला. हिंदु-मुस्लीम ऐक्याचा मूर्तिमंत पुतळा असे अर्धशतक पावेतो बडोद्यास आबासचे नाव गाजले. दर रविवारी ते आपल्या बंगल्यावर चहापार्टी करून त्यासाठी लाहनमोठे अधिकारी मुद्दाम बोलावून आणीत. कित्येक वर्षे पावेतो दर रविवारी मी त्यांचे या समारंभास जात होतो. त्यांनी मला व बायकोला वारंवार भोजनास बोलावून स्पर्शस्पर्श, सोवळे-ओवळे वगैरे बाबतीत पर्णविराम देवविला. आबासची पत्नीही हया बाबतीत नवऱ्याची शिकवण पूर्णपणे अमलांत आणीत असे. मांसाहार आम्ही कधी केला नाही व तत्संबंधी आबासनी कधी आग्रह धरला नाही. बडोद्याचे सामजिक वातावरण या प्रयोगाने साफ बदलून गेले. जातिभेद, स्पर्शास्पर्श हे विषय मागे पडून राष्ट्रप्रगतीला पोषक असे नवीन वळण सुरू झाले महाराजांनी राज्यांत सर्वत्र सक्तीचे शिक्षण सुरू करून हिंदी भाषेचा पुरस्कार आणि खेड्यांपाड्यांतून सुध्दा पुस्तकालयांची सोय करून लोकांना साक्षर बनविण्याचा कार्यक्रम दीर्घकाळ चालविला. अनेक नवीन विषय एकामागूमन एक उत्कर्ष पावले. भावी काळांत राष्ट्रोत्कर्षाचा जो नवीन प्रयोग स्वातंत्र्याच्या युगांत भारतास उगवावयाचा होता त्याचा मूळ पाया देशांत सयाजीरावांनी घालून दिलेला आहे.

●●●

१४.
जयसिंहरावांचे अकल्पित देहावसान

सयाजीरावांच्या हयातीतील शेवटची दहा-पांच वर्षे अत्यंत कष्टांत गेली. या काळांत मी कांही त्यांचे संनिध नव्हतो. मी त्यांची अवज्ञा करुन निवृत्तीचा हट धरला, हा मनोभंग त्यांच्या अंतःकरणावर कायम बिंबला, आणि मी त्यांची भेट घेऊ शकलो नाही. स. १९२४ च्या सुमारास एके दिवशी सहजी बोलत असता त्यांनी पुढील उद्‌गार व्यक्त केले, राजपुत्रांस शिक्षण देण्याचा तुमचा प्रयत्न सरदेसाई अत्यंत अयशस्वी झाला. ही जबाबदारी तुमच्यावर येते. यावर मी काही झणझणीत उत्तर देणार तत्पूर्वीच ते मला बोलले, तुमच्या या अपयशच्या जबाबदारीत पिता या नात्याने मीही तितकाच संविभागी आहे. लगेच वाद मिटला. पण मुद्दा काही मनांतून गेला नाही. सयाजीरावांना चार पुत्र झाले. ते सर्व बुध्दीमान, सुविध, सुशिक्षित, ग्रॅज्युएटच्या योग्यतेस पोचले होते. प्रकृतीनेही सुदृढ होते. मद्यसेवनाचे व्यसन त्यांना ग्रासू लागले. त्यामुळे त्यांचा जीवनव्यवसाय निष्फळ बनत पहिले पुत्र फत्तेसिंहराव पंचविशीच्या वयांत वारले. तेंव्हा इतर पुत्रांस शक्य तितके त्या व्यसनापासून दूर ठेवण्याची खबरदारी महाराजांनी घेतली. इंग्लड, फ्रान्स, इटली, जर्मनी इत्यादि ठिकाणच्या रुग्णालयांत मुलांस ठेवून सुधारणेचा शक्य तितका इलाज महाराजांनी केला. हा एक प्रचंड हृद्‌रोगच त्या निष्पाप मातापितरांस कायमचा ग्रासूं लागला. तिसरे चिरंजीव शिवाजीराव पुण्यास डेक्कन कॉलेजांत शिकत असता बडोद्यास आले असता दुर्वर्तनामुळे स. १९२१ साली एकाएकी निधन पावले. त्या वेळी त्यांचे वय एकातिशीच्या आंत-बाहेर होते. सयाजीराव व चिमणाबाई यांनी मद्यसेवन कधी केले नाही. तरी त्यांस पुत्रशोकाची बाधा सहन करावी लागली. तेंव्हा जयसिंहराव व धैर्यशीलराव हे दोनच पुत्र शिल्लक राहिले. त्यांच्या शुश्रूषेची खबरदारी महाराजांनी मोठ्या शिकस्तीने चालू केली, अनेक गार्डियन्स नेमले. निरनिराळी रुग्णालये धुंडाळली. पण एकदा डाव बिघडला तो पुनः सुधारला नाही.

शिक्षणाच्या बाबतीत प्रत्येक राजपुत्राचा कार्यक्रम मुद्दामच महाराजांनी वेगळा ठेवला. फत्तेसिंहरावांस ऑक्सफोर्ड येथे बेलियल कॉलेजात ठेविले, तर शिवाजीरावांस पुण्यास ठेविले.

आणि जयसिंहरावांची रवानगी अमेरिकेस केली. बुद्धिमत्तेनेच पाहिले तर मी जयसिंहरावास पहिले उच्चपद देईन. तरतरीत बुद्धि व आनंदी वृत्ति हे त्यांचे गुणविशेष मला चांगले स्मरतात. शिशुपणाचा त्यांचा काल इंग्लडांत हॅरो येथे गेला. तेथून कॉलेजशिक्षणासाठी महाराजांनी त्यास अमेरिकेस पाठविले. तेथून ते सवडीनुसार केव्हा केव्हा बडोद्यास येत. सर्व राजपुत्रांचे विवाह-समारंभ यथासांग झाले होते. त्यांच्या बायका विद्यमान आहेत. फक्त फत्तेसिंहांच्या पत्नी पद्मावती दिवंगत झाल्या.

जयसिंहरावांनाही मद्यसेवनाची चटक लागली. आणि सुधारण्याचा शेवटचा उपाय म्हणून त्यास जर्मनीत एका नर्सिंगहोम मध्ये ठेवण्यात आले. तेथे ते दोन एक वर्षे होते. पुत्रांच्या या भानगडींमुळे प्रत्यक्ष महाराज व राणीसाहेब यांचे जीवन अत्यंत कष्टमय बनले. मुलांच्या प्रकृतीची व खर्चाची निगा ठेवणे, विचारपूस करणे आणि शक्य ती सुधारणा करणे हाच त्यांचा मुख्य व्यवसाय बनला. रोज उठून नव्या भानगडी. अशा स्थितीत स. १९२३ सालच्या डिसेंबरात जयसिंहराव जर्मनीत नर्सिंगहोम मध्ये असता तेथील अधिकाऱ्यांची सूचना महाराजांस आली की, इतउत्तर येथे नर्सिंगहोममध्ये रहाण्याची जरुर नाही. उगाच खर्च मात्र वाढतो. त्यापेक्षा त्यास स्वगृही बडोद्यासच रहाणे इष्ट होईल. अशा सूचना आल्यावरून जयसिंहरावास जर्मनीतून काढून परत हिंदूस्थानात आणणेची व्यवस्था महाराजांनी स. १९२३ सालच्या डिसेंबरात केली. त्या वेळी स्वतः महाराज व महाराणी पॅरिस येथे असून डॉ. जीवराज मेहता हे त्यांजजवळ पर्सनल फिजिशियन म्हणून कामावर होते.

●●●

५

माझी संसारयात्रा

लेखक

रियासतकार
गोविंद सखाराम सरदेसाई

माझी संसारयात्रा

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., डी. लेट्
रियासतकार

मूल्य सहा रुपये

प्रस्थान

'सारखे काही तरी काम हातात पाहिजे या दृष्टीने मी हे 'संसारयात्रा' प्रकरण मुद्दाम हाती घेतले. कदाचित हेच माझे अखेरचें लेखन ठरेल', अशा समारोपात्मक शब्दांत रियासतकार सरदेसाई यांनी समाप्त केलेले हे आत्मचरित्र आम्ही वाचकांच्या हाती देत आहो.

रियासतकारांच्या जीवनाची ९० वर्षे गतसाली पुरी झाली. अत्यंत समाधानाने त्यांचा प्रवास चालला आहे. या दीर्घ आयुष्यात त्यांना आलेले विविध भलेबुरे अनुभव त्यांनी आपल्या या आत्मचरित्रात ग्रंथित केलेले आहेत. या बाबतीत त्यांची भूमिका अगदी विनम्र आहे. लोकांना संदेश देण्याचा किंवा उपदेश करण्याचा त्यांचा हेतू नसून उपयुक्त अशा आठवणी व अनुभव यांचा संग्रह करणे एवढेच उद्दिष्ट त्यांनी स्वतःपुढे ठेवले आहे. गेल्या नव्वद वर्षात स्वतःजवळ जमलेला प्रचंड लेखसंभार व पत्रसंग्रह यांचा ''नाश करण्याची छाती होत नाही, तेव्हा त्यातील मथितार्थ स्वतंत्र लिहून'' काढून त्यांनी हे स्वानुभवाचे नवनीत नव्या पिढीपुढे ठेवले आहे.

तेव्हा हे आत्मचरित्र हल्ली रुढ असलेल्या पद्धतीचे नाही, हे ध्यानात घेऊनच वाचले पाहिजे. आता आयुष्याच्या अखेरच्या काळात पूर्वी, फार पूर्वी सोसलेल्या यातना व मानखंडना, लढलेले वादविवाद नि भांडणे, ओढवलेले दारुण प्रसंग आणि संकटे, त्याचप्रमाणे मानवी सौहार्दाचा नि जिव्हाळ्याचा आलेला प्रत्यय, उपभोगलेला आनंद नि सुख ह्या सर्वांचीच उत्कटता नाहीशी झाली आहे. त्यामुळे वाढलेले मनोवैभव हाच जीवन संपवितांना जवळ राहिलेला ठेवा, हीच भूमिका ह्या चरित्रलेखकाची आहे व ह्या दृष्टीनेच त्याने लिहिलेल्या आत्मचरित्राचे रसग्रहण केले पाहिजे. रियासतकारांनी कटुता निर्माण होऊ शकेल अशा प्रसंगांचा व व्यक्तींचा उल्लेख आवर्जून वगळला आहे, हेही त्यांच्या आजच्या शांत मनोधारणेचे द्योतकच आहे.

गेल्या शंभर वर्षात महाराष्ट्रात थोर पुरुषांची जी मलिका निर्माण झाली, तीत रियासतकरांचे स्थान निःसंशय अढळ आहे. बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांचे रीडर व राजपुत्र शिक्षक म्हणून त्यांनी ३५ वर्षे काम केले. या अवधीत त्यांना अनेक बरेवाईट अनुभव

आले. नोकरीची परतंत्रता सोडून उर्वरित आयुष्य एखाद्या शांत ठिकाणी इतिहासलेखनात घालवावे अशी दुर्दम्य इच्छा त्यांच्या मनात बळावून त्यांनी १९२५ मध्ये महाराजांचा अखेरचा निरोप घेतला. इतिहासलेखनाचे कार्य त्यांनी १८९८ पासूनच सुरू केले होते. तेच अखंडितपणे ते आजतागायत करीत आहेत. आज 'रियासतकार' म्हणून त्यांना अखिल भारतीय कीर्ति लाभली आहे. तरी देखील विनम्रभाव हाच त्यांच्या मनोवृत्तीचा स्थायीभाव राहिला आहे.

रियासतकाराचे बहुतेक लेखन प्रकाशित करण्याचा मान आम्हाला मिळाला आहे. आता त्यांचे हे आत्मवृत्त प्रसिद्ध करीत आहो. तरुण पिढीला त्यापासून बरेच शिकता येईल व ध्येयनिष्ठा व व्यासंग यांचे महत्त्व समजून येईल. जीवनाच्या महासागरातील रियासतकारांसारखे दीपस्तंभ आजच्या तरुणांना सतत मार्गदर्शन करीत राहतील. 'सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वा ऽ प्रियम् । प्राप्तं प्राप्तं उपासीत हृदयेनापराजितः ।।' हाच रियासतकारांचा संदेश आहे.

- प्रकाशक

प्रस्तावना

गोविंद सखाराम सरदेसाई (रियासतकार) सयाजीराव महाराजांकडे सदोतीस वर्षे नोकरीला होते. साहजिकच सरदेसाई यांचा तरुणपणीचा काळ बडोद्यात गेला. बडोद्यातील अनेक घटना - प्रसंगाशी ते निगडीत होते. सरदेसाई यांनी आयुष्याच्या शेवटी स्वतःचे आत्मचरित्र लिहिले. एखादी व्यक्ती आपल्या भरभराटीची सदतीस वर्षे एका ठिकाणी, एका नृपतीच्या सेवेत व्यतीत करत असेल तर त्या ठिकाणाचा, त्या नृपतीचा प्रभाव त्या व्यक्तीवर राहणारच. सरदेसाई यांच्या जीवनावर महाराजांचा प्रभाव होता. सरदेसाई यांनी वेळोवेळी हे नमूद केले आहे. या आत्मचरित्रातून महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समजतात. त्यामुळे सरदेसाई यांच्या 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्राचा समावेश या खंडात केला आहे.

सरदेसाई शिक्षण संपल्यानंतर लगेच महाराजांच्या नोकरीत हजर झाले. त्यांना महाराजांची काम करण्याची पद्धत पहिल्या भेटीतच समजली. महाराज स्वतः भरपूर काम करत होते. आणि नोकरांकडूनही तेवढेच काम करून घेत. सरदेसाई यांना या पहिल्या अभूतपूर्व भेटीत सकाळपासून संध्याकाळपर्यंत वीस - पंचवीस ताव लिहून घेतले. हा वृत्तांत चरित्रात देताना म्हणतात, ''मला सहजी एकादशी घडून जीवनाची खरी परीक्षा यशस्वी झाली.'' (पृ. ४५६) महाराजांचा काम करण्याचा धडाका या प्रसंगातून सरदेसाई यांनी समोर ठेवला आहे.

सरदेसाई महाराजांकडे वाचक आणि लेखनिक म्हणून काम करत. त्यानंतर मात्र महाराजांच्या लक्षात आले की, या इसमास तीन - चार तासापेक्षा अधिक काम नाही. त्यानंतर लगेच त्यांनी राजपुत्राचे शिक्षक म्हणून सरदेसाई यांची नियुक्ती केली. सर्वांनी भरपूर काम करावे ही महाराजांची इच्छा होती. महाराज त्यानुसार सर्वांना काम लावत. सरदेसाई यांनी अशा अनेक बाबी या आत्मचरित्रात समाविष्ट केल्या आहेत.

सयाजीराव महाराज नेहमी देशात आणि परदेशात प्रवास करत. त्यामुळे सरदेसाई यांनाही महाराजांच्या सोबत अनेक वेळा देशात आणि परदेशात प्रवासाची संधी मिळाली. सरदेसाई म्हणतात, मला महाराजांबरोबर सालोसाल निरनिराळ्या ठिकाणी प्रवास करावा लागून काश्मीरपासून रामेश्वरपर्यंत व कलकत्त्यापासून पेशावरपर्यंतच्या हिंदभूमीशी माझा परिचय घडला.'' (पृ. ४५८) सरदेसाई यांनी या संधीचा उपयोग करून घेतला. या प्रवासामुळे आपल्या अंगी गुणांची वाढ झाल्याचे नमूद करतात. ''ह्या (परदेश) प्रवासात सरकारी खर्चाचा चोख हिशेब मला सादर करावा लागला. त्यामुळे माझ्या अंगी बिनचूक हिशेब, टापटीप व नियमितपणा हे गुण वृद्धी

पावले. (पृ. ४५८) याशिवाय प्रवासामुळे झालेल्या फायद्याची नोंद सरदेसाई करतात. 'स्वावलंबी उद्योग करण्याची उत्कंठा निर्माण झाली.' 'ऐतिहासिक संशोधन करण्याची संधी मिळाली.' 'आमची हीन स्थिती, आमचे अगाध अज्ञान, पाश्चात्यांच्या पुढे डोके वर उचलण्याची आमची असमर्थता हे प्रकार माझ्या मनात उभे राहून मोठा उद्वेग वाटला.' 'टेम्स नदीत पोहण्याने स्नान आणि व्यायाम साधला.' 'पुस्तके विकत घेतली.' अशा नानाविध फायद्याची आणि अंगी आलेल्या गुणांची कबुली सरदेसाई देतात.

सरदेसाई यांचे आत्मचरित्र विविधांगी आहे. त्यातील प्रकरण एक ते चार या खंडात घेतले आहेत. या प्रकरणात सरदेसाई यांचा निम्मा आयुष्यक्रम येतो. 'जन्म ते सयाजीराव महाराजांच्या सेवेतून मुक्तता' इथंपर्यंतचा भाग येतो. आपल्या आणि कुटुंबाच्या जीवनावर महाराजांचा प्रभाव पडला होता हे सरदेसाई म्हणतात.

सरदेसाई यांचे हे आत्मचरित्र असले, तरी महाराजांच्या जीवनाचे अनेक पैलू या आत्मचरित्रातून समजतात. हे आत्मचरित्र वाचल्यावर लक्षात येते, की महाराजांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी असल्यामुळे त्यांच्या अनेक गुणांचा प्रभाव नोकर आणि सेवकांवरही पडत होता. महाराज नेहमी आदर्श विचार करत, आदर्श सुधारणा करत, प्रजा आपल्या डोळ्यासमोर ठेवत, संस्थानातला शेवटचा माणूस कसा शिक्षित होईल, तो सुसंस्कृत कसा होईल याकडे महाराजांचे लक्ष असे. त्यामुळे सरदेसाई यांचे हे आत्मचरित्र वाचनीय आणि सुसंस्कारी आहे.

-डॉ. राजेंद्र स. मगर,
निमगाव (म.) जि. सोलापूर.

अनुक्रम

प्रस्थान / ४२५

प्रस्तावना / ४२७

१. शिक्षणाचे सुयोग / ४३१

२. ज्ञानार्जनाची संधी / ४५७

३. स्मरणीय अनुभव / ४७२

४. सयाजीरावांची सेवा / ४८३

१.
शिक्षणाचे सुयोग

सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम् ।
प्राप्तं प्राप्तं उपासीत हृदयेनापराजितः ।।

सुख येवो किंवा दुःख येवो, प्रिय मिळो वा अप्रिय मिळों,
त्याचा—जें काय येईल त्याचा—आदर करावा, दम खचू देऊ नये.

१. अंतरंगीचे पडसाद

आत्मचरित्राने प्रसिध्दि मिळविण्याइतके माझे चरित्र महत्वाचे नाही, हे मी जाणून आहे आणि राष्ट्राच्या बौध्दिक संपत्तीत भर घालण्याइतकी माझी ऐपतही नाही. तेंव्हा आत्मचरित्र लिहिण्याच्या किंवा प्रसिध्द करण्याच्या भरीस पडणे अनुचित होय असे मी मानतो. तथापि प्रत्येक व्यक्तीला असे काही थोडेबहुत अनुभव येतात की त्यांच्यापासून बाहेरच्यांस अंशतः तरी फायदा करून घेता येईल. ह्या अर्थाने जगात सर्वथा टाकाऊ असे काही नाही. मनुष्याची प्रगति पुर्वानुभवावर आधरलेली असते. म्हणून माझ्या जीवनांत राष्ट्रोपयोगी अंश विशेष नसला तरी प्रत्यक्ष माझे कौटूंबिक, आप्तइष्ट, सुहृद्वर्ग किंवा व्यवहारसंबंद्ध व्यक्ति अशांचा वर्गही बराच मोठा असून त्यांचा परिणाम माझ्या जीवनावर पुष्कळ झालेला आहे. माझ्या पश्चात माझे रियासतकार एवढेच नाव माहीत असणार, म्हणून माझे सर्व अवान्तर अनुभव एकत्र लेखबध्द झालेले जिज्ञासूंना कळणे इष्ट होय असे विचार माझ्या मनात वारंवार घोळत असतात. तशा सूचनाही अनेकांनी मला केलेल्या आहेत. कामशेतच्या निवान्त स्थानात राहू लागल्यास तीस वर्षे होऊन गेली. एवढया दीर्घ कालात एकटा असतांना मी आपला जपून ठेवलेला पत्रसंचय, वार्षिकी वृत्तांन्त, ऐतिहासिक टिपणे, वादविवादांचा संग्रह, इत्यादी सर्व संथपणे तपासून अनावश्यक वाटले ते कागद नाश केले व ठेवण्यासारखे वाटले ते व्यवस्थित विषयवार लावून ठेवले. हे काम

करतांना जणू काय मी आपले एकंदर जीवन पुनश्च अनुभवीत आहे, लहानाचा मोठा होत आहे, अभ्यास करीत आहे, अडचणी सोशीत आहे, प्रवास करीत आहे, नानाविध प्रसंगांतुन भांडततंडत निभावून जात आहे, असा हृद्यंगम अनुभव मिळून अनेक विचारांचे काहूर मनांत उठले. ह्या काल्पनिक जीवनात व पहिल्या खऱ्या जीवनात फरक इतकाच आहे की संसार-नाटकाचे सर्व पडदे एकदम खुले होऊन खऱ्या जीवनाची अनिश्चीती आता उरली नाही, त्या वेळच्या सुख-दु:खांची क्षिती आता वाटत नाही. पुत्र श्यामाकांन्त परदेशी आजारी असतांना एक एक क्षण कसा दु:सह वाटत होता, तो प्रकार आता संपून भूतकालांत जमा झाला. अर्थात ह्या माझ्या प्रचंड लेखसंग्रहाचा इत्यर्थ संक्षेपाने सुसंगत लिहून ठेवणे गैर नसून उलट व्यावहारिक दृष्टया फायदेशीरच आहे असे मला वाटते.

ह्या संबंधात दुसरा एक विचार सुचला तो असा की आमच्या कुटुंबात मीच सर्वात वडील. आरंभापासून कुटुंबाचा भार मूलतः मला सांभाळावा लागला. कुटुंबाचे मार्गदर्शन, आर्थिक देवघेव, लग्नकार्यादि समारंभ, अडीअडचणी, रागव्देषांचे प्रसंग जितके मला उरकावे लागले व माहीत असून तितके माझ्या कनिष्ठांना अवगत नाहीत. सर्वांची प्रजा वाढत असून ह्या भावी पिढीला माझी माहिती नुसत्या ऐकीव रुपात तुटपुंजी कळण्यापेक्षा ती प्रत्यक्ष मजकडून त्यांस प्राप्त होणे अधिक चांगले. मजजवळ जो प्रचंड लेखसंभार जमला आहे ता इतरांजवळ नाही, इतकेच काय पण आता ह्या संचयाचे पुढे काय करावयाचे माझ्या पश्चात हा कोण सांभाळणार, बरासचा पत्रव्यवहार मोडी लिपीत असल्यामुळे तो वाचणारे तरी किती निघतील, आपल्यादेखत ह्या सर्वांचा नाश करण्याची छाती होत नाही, तेंव्हा त्यांतील मथितार्थ स्वतंत्र लिहून काढण्याची कल्पना मी मुदद्दाम स्वीकारीत आहे.

विव्दता, पराक्रम, इत्यादि गुणांनी मी काही आलौकीक व्यक्ति मुळीच नाही. सतत नियमित उद्योग करण्याची सवय मात्र मला प्रथमपासून आहे, त्यामुळे आजच्या माझ्या दीर्घ हयातीत किती तरी बरे वाईट काम माझ्याकडून झालेले दिसते. केवळ सुदैवाचा हा परिणाम होय, माझ्या करामतीचा नव्हे असे मी मानतो. नशीबवान प्राणी खरा असे माझे मलाच वाटते. ह्याचा अर्थ दु:खाचे किंवा कष्टाचे प्रसंग मला अनुभवावे लागले नाहीत असे नव्हे, पण ह्या सर्व प्रसंगांतून निभावून मी निष्ठेने आपले कर्तव्य करीत राहिलो. माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या हातून रियासतीसारखे लेखनाचे बरेचसे काम सिध्दीस गेले. हे काम करतांना परिश्रमपूर्वक पुस्तकसंग्रह निर्माण झाला, पुष्कळ लहानथोरांशी पत्रव्यवहार घडला, व्यासंगासंबंधाने अभ्यासाची टिपणे तयार झाली. हा सर्व संचय माझ्या पुष्कळ हितचिंतकांना बहूमोल वाटतो. सहज समरस मंडळीशी बोलतांना मी आपले अनुभव सांगू लागलो किंवा कै. सयाजीरावांसारख्यांच्या आठवणी वर्णू लागलो, म्हणजे हे जिव्हाळयाचे स्नेही आग्रह करू लागतात की तुम्ही हे आपले असले अनुभव व ह्या आठवणी लिहून काढा, त्याचा भावी पिढीला मोठा उपयोग आहे. ही सूचना मला सर्वथा पटते असे नाही गोष्टी ऐकायला गोड वाटताात, पण त्यांत टिकाऊ अंश फार थोडा असतो.तरी पण हा माझा लेखसंचय टिकविण्याचे चरित्रकथन हे एकच साधन शक्य आहे ह्यात संशय नाही.

आत्मचरित्र लिहिण्याची पुष्कळदा एक प्रथाच पडलेली दिसते ती मला मान्य नाही. आपणास काही तरी विशिष्ट सांगण्यासारखे नसेल तर आत्मचरित्र लिहिण्याच्या भरीस माणसाने पडू नये. तसे बहूमोल किंवा टिकाऊ आख्यान मला सांगता आले नाही तरी जे अनुभव किंवा आठवणी थोड्याबहूत उपयुक्त अशा मला वाटतात तेवढयांचाच संग्रह मी ह्या लेखात करणार आहे. गरिबीत दिवस काढले, कष्ट सोसून अभ्यास केला, निकृष्ट स्थितीतून डोके वर काढून समाजात काही एक स्थान मिळविले, असले सामान्य अनुभव पुष्कळांस येतात ते सांगण्याचा हेतू मी मनात बाळगीत नाही. मी आपणास भाग्यशाली समजतो तर तसे सुदैवाचे प्रसंग मला कसे लाभले हेच मी मुख्यतः सांगणार आहे. लोकांस उपदेश करण्याची किंवा काही विशिष्ट संदेश देण्याची लायकी माझ्या ठिकाणी नाही. अर्थात ह्या लेखनाला 'आत्मचरित्र' असे भपकेदार नाव न देता 'माझी संसारयात्रा' असे सामान्य अनुभव सांगणारे सूचक अभिधान मी मुदद्राम स्वीकारले आहे. कुटुंबाचे मार्गदर्शन व गेल्या ऐंशी-नव्वद वर्षातील स्थित्यंतराचा आढावा एवढे जरी ह्या लेखांत मी सांगू शकलो तरी माझा कार्यभाग झाला असे मी मानीन, माझे वेळोवळी प्रसिध्द झालेले लेखसुध्दा हेच सांगतील. दुसरे अधिक ते मी काय करणार.

२. पुर्वजांच्या आठवणी

महाराष्ट्रातील प्राचीन ऐतिहासिक घराण्यांत मावळंकर सरदेसाई महशूर असून त्याचा सविस्तर इतिहासही प्रसिध्द झाला आहे. नृसिंहभट सत्यवादी हा घराण्याचा मूळपूरुष पैठणाहून इ. स. १०७५ च्या सुमारास कोकणात संगमेश्वरजवळ मावळंगे येथे येऊन राहिला, त्यावरून त्याच्या वंशजांनी मावळंकर नाव स्विकारले. भारत विधिमंडळाचे लोकनियुक्त चालक गणेश वासुदेव ह्यांनी हे सत्यवादी अभिधान सार्थ करुन दाखविले. कालांन्तराने घराण्याच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. काहींनी सरदेशमुखी मिळाल्यावरून ते सरदेसाई उपनाव लावू लागले, काही अद्यापि मावळंकर हेच नाव लावितात. संगमेश्वर, देवळे, वेरवली अशा शाखा हल्ली आहेत.त्यांतील वेरवलीकरांत माझा जन्म जवळच्या गोवील गावी बुधवार ता. १७ मे स. १८६५ ह्या दिवशी झाला. अर्थात मी आपले वृत्त सांगण्यापूर्वी थोडी पूर्वपीठिका देणे अवश्य आहे. कारण प्रत्येक मनुष्य पूर्वजांचे काही गुण स्विकारून जन्मास येतो आणि पुढे तो परिस्थितीने व स्वपराक्रमाने नवीन गुण पैदा करून आपले जीवन बनवितो. चेहऱ्याची ठेवण, अंगवर्ण, व कित्येक बऱ्यावाईट सवयी त्यास पुष्कळशा पूर्वजांकडून मिळतात. मी इतिहासाचा अभ्यासक असल्यामुळे असे स्वभावाचे पृथक्करण करून प्रत्येकाने पूर्वसंचित आपल्याबरोबर काय आणिले आणि स्वकष्टाने नवीन काय पैदास कोणती केली हे तपासण्याचा मला नाद आहे आणि तदनुसार मी थोडीशी माझीच तपासणी सांगू चाहतो.

आमचे घराणे शिवाजीच्या पूर्वी बाराव्या शतकापासून राज्याच्या उद्योगांत सामील होते. शिवाजीच्या उपक्रमांत ह्या घराण्याने जो कार्यभाग केला तो ह्या घराण्याच्या इतिहासांत वर्णिला आहे. त्या वेळचे ऐतिहासिक कागदही प्रसिध्द झाले आहेत. पूढे पेशवाईच्या काळांत ह्या घराण्याचा संबंध प्रतिनिधींशी येऊन त्याला सरदेसाई उपनाव प्राप्त झाले. त्यांत प्रसंगानुसार त्यांनी वतने पैदा केली. सातारा व पुणे येथे मराठी राज्याचे अधिष्ठान असतांना ह्या सरदेसाई

घराण्याचे पुरुष कामावर असत. त्या कामी ते आपणास नायक हे उपपद लावीत. माझे जनोबा नायक पेशवाईत पुण्यास कामावर असता मराठी राज्य संपले तेव्हा जी काय पैदास हाती लागली ती घेऊन ते रत्नागिरी जिल्ह्यांत वेरवली येथे आपल्या वतनी गावी येऊन राहिले. तदुत्तर त्या प्रांतात जनोबातात्यांची प्रतिष्ठ पुष्कळ वर्षे जाहीर झाली. मी त्यांचा पणतू. कुटुंबविस्तार झाला तेंव्हा माझे वडील वेरवलीचे समाईक घर सोडून जवळच्या गोवील गावी स्वतंत्र घर बांधून राहू लागले. धार्मिक विधिपूर्वक पणजोबांनी माझे मुखावलोकन केले, माझी आजी मला त्यांच्या भेटीस वेरवलीस घेऊन गेली असे ती माला सांगे. मी दोन वर्षाचा असता हे माझे पणजोबा सन १८६७च्या एप्रिल महिन्यात चौऱ्यांशीचे वय असता वारले. पणजोबांचे वडील महादेव आपाजी पुण्यास कारभारावर असता ता. २८ नोव्हेंबर, स. १८१४ रोजी वारले, त्या वेळी जनोबा नायक हे आपल्या वडिलांजवळ पुण्यास होते. वडील वारल्यावर चारच वर्षांनी मराठी राज्य संपले आणि सरदेसाई मंडळींना तेथे काम उरले नाही. जनोबा नायक त्या वेळी ३०-३५ उमरीचे होते. ते लगेच पुण्याचा संसार आटपून थोडीबहुत मत्ता घेऊन कोकणात वेरवलीस घर बांधून राहू लागले. जनोबा नायकांना दहा पुत्र झाले. त्यातील सर्वात वडील महादोबा नायक माझे आजोबा, त्यांना बाबाजीदादा म्हणत. त्यांचा जन्म स. १८०५ साली झाला. पुण्यास असते तर कदाचित त्यांच्या शिक्षणाला स्फूर्ति मिळाली असती. वेरवलीच्या गावठी वातावरणात ते सर्वथा निरक्षर राहिले. गौरवर्ण व शरीयष्टि भव्य असूनही विद्या नसल्यामुळे त्यांना जीवनात महत्व प्राप्त झाले नाही. त्यांचा जन्म माझ्या वडिलांजवळ गोवील येथे गेला. गौरवर्ण, निकोप प्रकृति व दीर्घायुष्य हे माझ्या आजोबांचे गुण माझ्यांत उतरले असावे.

माझी आजी-पितामही वेणू उर्फ पार्वतीबाई हिच्या अनेक गुणांचा मला फार उपयोग झाला असे मला वाटते. माझ्या आईला मुले वरचेवर होऊ लागली, मी सर्वात वडील नातू, आजीचा लाडका, तिच्याच अंगावर खेळून वाढलो. तोंड धुणे, अंघोळ, शरीराची निगा, इत्यादि बाबतीत स्वच्छतेचे बीज मी आजीकडून शिकलो. ती आम्हांस आंघोळ घाली तेंव्हा अंगाची साले निघतात की काय असे आम्हांस वाटे. तिनेच मला प्रथम वेरवलीच्या मराठी शाळेत नेऊन घातले. विस्तृत समाईक कुटुंबाची जबाबदारी सांभाळून जन्मभर तिने जे कष्ट केले ते पाहून मला अद्यापि वाटते माझे भाग्य म्हणून आशी आजी मला लाभली. तिच्या माहेरची थोडी हकीकत येथेच देणे जरूर आहे.

मलकापुर पासून सहा मैलांवर आंबडे म्हणून गाव आहे तेथे राहणारे एक देशस्थ घराणे आंबर्डेकर म्हणून होते, त्यात त्या वेळी राघोपंततात्या नावाचे गृहस्थ प्रतिनिधींच्या पदरी विशाळगडावर राहून धनगरमहालचा मक्ता करीत. सह्याद्रीच्या त्या जंगली प्रदेशात शेतीचा व्यवसाय त्या वेळी नसून मुख्य वस्ती धनगर लोकांची होती. ते गायी-म्हशीचे मोठाले कळप बाळगून दूध, लोणी, तूप ह्यांच्या विक्रयावर निर्वाह करीत. ह्या कारणास्तव त्या वेळी शेतसारा लोकांवर बसविलेला नसून गुरचरणीबद्दल सरकार कर घेत असे. दरसाल ह्या गुरांची मोजदाद करून मालकांजवळून रुपया दोन रुपये खंड प्रत्येक जनावरामागे धनगराने भरावा लागे. ह्याला धनगरमहाल म्हणत. सह्याद्रीच्या पूर्व-पश्चिम डोंगरी प्रदेशाला ही संज्ञा असून मृगारंभी त्या

महालाचे लिलाव करीत. लिलावांत जो कोणी सर्वात जास्त रक्कम सरकारांत भरील त्याच्या नावे दरसाल तो मक्ता कायम करण्यात येई. हे काम मोठे जिकरीचे असे. धनगर लोक आपली जनावरे डोंगरकपारींतून लपवून ठेवीत आणि त्यांचा कर चुकवीत. प्रसंगी मक्तेदारास हे धनगर चोपही देण्यास चुकत नसत. म्हशी, रेडे मस्त झालेले अंगावर येऊन मोजणी करू देत नसत. मोजणीचे काम दसऱ्याच्या सुमारास सुरू होऊन ते पुढे दोन तीन महिने चाले. कैक वर्षे हा धनगरमहालाचा मक्ता राघोपंततात्या आंबर्डेकर व त्यांचे चिरंजीव भिकाजीपंत ह्यांनी सांभाळून त्यात पैदास व प्रतिष्ठा मिळविली. काम फार मेहनतीचे असून घरची जमात चांगली असेल तरच ते व्यवस्थित चालणे शक्य होते. मोजणीदार किंवा मक्तेदार गुरे तपासण्यास आले म्हणजे त्यांस शिधापाणी देऊन संतुष्ट ठेवणे धनगरांचे कर्तव्य असे. माझी आजी त्या राघोपंततात्यांची कन्या. माझे वडील सखाराम नायक पुष्कळ वर्षे मातुलांस ह्या कामी निष्ठेने साहय करीत. मी माझ्या लहानपणी वडिलांबरोबर ह्या धनगरमहारलाच्या कामासाठी डोंगरी मुलखांतून पुष्कळ हिंडलो आहे. खाण्याची मोठी चंगळ असे. शिपाईप्यादे बरोबर असत. सुंदर जिरगे तांदूळ, लोणी, तूप, दूध ह्यांची लयलूट असल्यामुळे रानोमाळ हिंडण्यात मला मोठी मौज वाटे. स्वयंपाकाचे काम मात्र वडिलांस स्वतः करावे लागे. हाताखाली नोकर पुष्कळ असत, धनगरणी येऊन चूल, भांडी, विस्तव सर्व सिध्दता करून देत. दुपारचे भोजन बाहेर ओड्यावर किंवा झऱ्यावर रानांत व रात्री गुरांच्या गोठयांत. माझ्या अत्यंत प्रियकर आठवणींपैकी हे माझे धनगरमहालचे जीवन मनावर चांगले ठसले आहे. माझ्या मुंजीत दोनशे धनगर गोरस घेऊन भोजनास आले होते.

राघोपंततात्या आंबर्डेकर त्या वेळच्या जमान्यातले एक प्रतिष्ठित कर्ते पुरुष गणले जात. धनगरमहालावर त्यांनी कमाईही चांगली केली. त्यांना मुले झाली त्यांत मुलगी वेणू आठ वर्षाची झाली, तेंव्हा ते तिला वर शोधण्याच्या खटपटीस लागले. वेरवलकर सरदेसाई त्यांचे शेजारी असून जनोबा नायकांचा बोलबाला त्या वेळी विशेष होता. जनोबा नायकांचे वडील चिरंजीव महादोबा उर्फ बाबाजीदादा हे आठ नऊ वर्षाच्या वयाचे राघोपंततात्यांनी जावई पसंत केले. ही वेळ मराठी राज्य संपण्याच्या आतबाहेर होती. दोन तात्या-राघोपंत आंबर्डेकर व जानोबा नायक-व्याही बनले. माझी आजी रुपाने गोरीपान व बुध्दीने चलाख होती. तिचे यजमान म्हणजे माझे आजोबा इतके मतिमंद निघतील अशी प्रथम कोणाचीच कल्पना नव्हती. लहानपणी माझ्या मनावर काय संस्कार घडले, त्या वेळी लोकांचे व्यवसाय व परिस्थिती कशा प्रकारची होती आणि तिचा परिणाम माझ्या पुढील आयुःक्रमावर काय झाला हे लक्षांत येण्यासाठी मी धनगरमहाल वगैरेच्या ह्या तत्कालीन गोष्टी मुददाम विस्ताराने सांगत आहे.

धनगरांची राहणी अत्यंत गलिच्छ. पाण्याचे किंवा स्नानाचे त्यांना कधी दर्शन नाही. वडील फिरतीवर असतांना एखाद्या सुंदर ओढयावर किंवा पाण्याच्या जागी स्नान व स्वयंपाक ठरवीत. एकदा आम्ही मुक्कामाहून मैल दीड मैल अंतरावर वाहत्या पाण्याच्या ओढ्यावर भोजनास गेलो. आंघोळ व कपडे धुऊन स्वयंपाक तयार होताच पत्रावळी लावून जेवायला बसलो. आश्विनचा महिना असावा. एकदम आकाश भरुन पाऊस कोसळला, त्याबरोबर जी धावपळ उडाली ती

विचारू नये. ओढयास पूर येऊन अन्नाची पात्रे वाहून गेली. धूम ठोकीत परत मुक्कामावर पोचतो कसे असे झाले. हा प्रसंग अद्यापि माझ्या स्मरणात ताजा आहे.

ह्याच वेळी मला पहिली अक्षर ओळख झाली. वडिलांचा एक भरवशाचा शिपाई भागूजी राऊत नावाचा नेहमी जवळ असे. पंचवीस वर्षे तरी त्याने धनगरमहालावर वडिलांची नोकरी केली. तो आमचा कुटुंबात मिसळलेला नोकर होता. धनगर गुरे चोरून ठेवीत, त्याचा तपास ठेवून अचानक छापा घालून ती गुरे पकडण्यात ह्या भागूजीचा हातखंडा होता. पुष्कळ धनगर त्याला ठार मारण्यास टपले होते, पण त्यास तो पुरून उरला. हा वृध्द भागूजी मी पाहिला होता आणि त्याच्या पश्चात त्याचे मुलगेही आमच्या आश्रयास होते.

दररोज सकाळी तीनचार तास धनगरांना जमवून त्यांची नावनिशी व गायी, म्हशी, बैल ह्यांच्या याद्या तयार करण्याचे काम चाले. वडिलांस बालबोध लिहिता येत नव्हते. सर्व व्यवहार मोडीत ठेवीत. अखंडीत लक्ष्मी आलंकृत असा कित्ता वडिलांनी मला मोडीचा प्रथम घालून दिला. पुढे दोन वर्षांनी मी शाळेत गेलो तेंव्हा मग बालबोध पुस्तक वाचण्यास शिकलो. भागूजी राऊत मोठयाने धनगराचे नाव सांगे, ते वडील मोडीत कागदावर लिहून नावासमोर गायी-म्हशींची संख्या लिहीत. मी जवळ बसून सर्व पाहत असे. असे करतांना महिना पंधरा दिवसांत मी मोडी वाचण्यास शिकलो. उत्तरोत्तर मी अक्षरही बरे बनविले. मोडी शिकण्यास हा प्रयोग मला फार उपयुक्त वाटला. हल्ली राघोपंततात्याचे वंशज हसोळ व वेरवली येथे आहेत. राघोपंतांचे चिरंजीव गणेशपंतबाबा हे त्या बाजूस पुष्कळ वर्षे प्रतिष्ठा पावले. माझ्या वडिलांचा व त्यांचा विशेष घरोबा असून आमच्या घरी ते पुष्कळदा येऊन राहत.

राघोपंतांची कन्या वेणू ही माझी आजी म्हणून सांगितले. तिची सासू दोनतीन मुले होऊन लहानपणी वारली. दरम्यान माझ्या आजीलाही एक कन्या व तीन मुलगे अशी अपत्ये झाली. जनोबा नायकांनी दुसरे लग्न केले, ती सावत्र सासू माझ्या आजीपेक्षा वयाने लहान होती. तिलाही भराभर मुले होऊन तिची बाळंतपणे सुनेला करावी लागली. ह्या सावत्र सासूला सात मुलगे व तीन कन्या अशी दहा मुले झाली. ही दहा व आजीची चार मिळून पंचवीस वर्षात जनोबा नायकांचा कुटुंबविस्तार एवढा वाढला की इतक्यांची बाळग, स्वयंपाक, इत्यादींनी आजीला भारी कष्ट पडले, शिवाय घरांत सावत्र संबंध उत्पन्न झाल्यामुळे आजीच्या मुलांचे हाल होऊ लागले. घरांत वेळेला पोटभर अन्न मिळू नये असा प्रसंग हळूहळू आला. जनोबा नायकांची पुण्याहून आणलेली पुंजी खलास झाली. बरेचसे चोरापोरांनी उडविले. जनोबातात्या आपल्या व्दितीय पत्नीच्या मुलांची निगा ठेवीत तशी ह्या नातवंडांची पर्वा करीत ना. आपल्या मुलांची मुंजी-लग्ने त्यांनी केली, पण नातू त्यांहून वयाने मोठे असूनही त्यांच्या मुंजीची गोष्ट ते बोलेनात. घरी मुलांस शिकविण्यास पंतोजी ठेवला त्यांतसुध्दा पंक्तिप्रपंच दिसू लागला. तो आजीला सहन होईना. माझे भोळसर आजोबा त्यांच्या वडिलांना दृष्टिसमोर नकोसे झाले. हे एक जास्त कारण आजीच्या उव्देगास झाले. ह्या संकटांतून आपणच मार्ग काढला पाहिजे असे तिने ठरविले. कुटुंबविस्तार झाला तशी नवीन पैदास वाढली नाही. जनोबा नायक स्वभावाचे कृपण. आपल्यापुरते पाहत. ही सून त्यांची अत्यंत आवडती, फक्त राबण्यापुरती त्यांना हवी असे, पण तिला वेळेवर

अंगावर वस्त्र मिळते की नाही ह्याची विचारपूस ते करीत नसत. तोंडाने मात्र सारखा जप की ''माझी वेणू आहे म्हणून अन्न मिळते आहे. ती मला कधी अंतर देणार नाही.''

अशा कुचंबणेतून आपली सुटका कशी करावी हाच विचार आजीच्या मनात आहोरात्र घोळू लागला. जनोबा नायकांना एकंदर अठरा मुले, दोघा बायकांची मिळून झाली. *सावत्र संबंधामुळे संसारात तेढ उत्पन्न होणे हे त्या वेळच्या सामाजिक व्यवस्थेत मोठे व्यंग होते. राघोपंततात्या आंबर्डेकर ह्यांच्या घरातही अशी दुही उत्पन्न झाली. ‡ह्या मातुल घराण्याशीच माझ्या वडिलांचा अत्यंत घरोबा जडला आणि त्यांस त्याच घराण्याचा आधार अखेरपर्यंत होता. मातुलाचे धनगरमहालचे काम माझे वडील पाहू लागले. माझ्या आजीला आणखी दोन वडील बहिणी वाराणसी व सखू नावाच्या असून एक कशेळीस जायद्यांकडे व दुसरी मोर्डेकर सरदेसाई वामन नायक ह्यांस दिलेली होती. हे वामन नायक कोल्हापुरास राहत असत. आजीने आपल्या मुलाचे विद्याभ्यास नीट चालावे म्हणून वेरवलीच्या सामाईक कुटुंबातून बाहेर स्वतंत्र पाय काढण्याचे ठरवून बंधू-बहिणीच्या साह्याने तिने तो मार्ग सिध्दीस नेला. झनोबा नायकाचे चुलतबंधु गंगाधर बाजी नावाचे कऱ्हाडास राहत असत. त्यांची बायको वेरवलीस आली असता माझ्या आजीने आपली कष्टमय कहाणी तिला निवेदन केली आणि ती परत कऱ्हाडास जाऊ लागली, तेंव्हा आजीने आपला दुसरा मुलगा गंगाधर ह्यास तिच्या स्वाधीन करून त्याच्या शिक्षणाची व्यवस्था तिकडे परमारे करविली. मलकापूर व कऱ्हाड ही दोनही प्रतिनिधींची संस्थाने असून कऱ्हाडास शिक्षणाच्या व उद्योगाच्या सोयी जास्त होत्या. सरदेसाई प्रतिनिधींचे सेवक होते.

धाकटया मुलाची रवानगी केल्यावर माझी आजी वडील मुलास घेऊन आपल्या बहिणीकडे कोल्हापुरास गेली, पण तितक्यांत बहिणीचे यजमान वामन नायक‡ वारले आणि तिच्या संसाराची वाताहत झाली. अर्थात माझी आजी सुमारे एक महिन्यानंतर कोल्हापूर सोडून वडील बंधू भिकाजीपंत धनगरमहालचे काम मकापुरास पाहत होते त्यांजकडे गेली. तेथे माझ्या वडिलांनी

---

* ह्यांचा तपशील सरदेसाई घराण्याचा इतिहास, उत्तरार्ध, खं.२, पृ. १२०-१२१ वर आहे. भा.१, पृ. ८२ पाहा.

‡ राघोपंततात्यांना प्रथम कुटुंबापासून १२ मुले झाली. पैकी बनाजीपंत व विठ्ठलपंत हे वेरवली बुद्रुक येथे स्वतंत्र घरे करून राहिले. तिसरे भिकाजीपंत वडिलांजवळ राहून धनगरमहालचा कारभार करीत. त्यांनी हसोळ येथे स्वतंत्र घर बांधून वास्तव्य केले. विसाजीपंत म्हणून धाकटे चिरंजीव मलकापुरास प्रतिनिधीजवळ असत. राघोपंततात्यांनी व्दितीय विवाह केला, त्या संबंधापासून त्यांस सहा मुले झाली, त्यात गणेशपंत बाबा आंबर्डेकर हे वेरवलीस राहू लागले, त्यांचे बंधू वासुदेवपंत ह्यांनी आपला संसार कऱ्हाड येथे थाटला. गणेशपंतांच्या तिघी बहिणी आवडी, सई व बाळी ह्या माझ्या लहानपणी कोकणात प्रसिध्दि पावल्या होत्या. जनोबातात्यांचे व्दितीय कुटुंब ताई देसाई व राघोपंत तात्याचे कुटुंब ताई आंबर्डेकर ह्या दोघी त्या वेळी तत्प्रांतीय समाजात नावाजलेल्या बायका होत्या. आंबर्डेकर व सरदेसाई ह्या घराण्यांचा हा निकट संबंध अद्यापि दृष्टीस पडतो. त्यांतील पुढील पिढी माझी समकालीन, पण शिक्षणाच्या बाबतीत मला जे प्रोत्साहन मिळाले ते ह्या आंबर्डेकर तरुणांना मिळाले नाही, हा विषय माझ्या जीवनात विशेष स्मरणीय आहे.

‡ ह्या वामन नायकाचे चिरंजीव दाजीबा ह्यांचा व माझ्या वडिलांचा अत्यंत ऋणानुबंध होता. दाजीबांचे चिरंजीव भालचंद्र हल्ली मुंबईस बालचंद हिराचंद ह्यांजकडे प्रतिष्ठित कामावर आहेत.

काही काळ मधुकरी मागून लेखनवाचन व हिशेब ह्यांचा अभ्यास केला. त्या वेळी भिकाजीपंतांनी नुकतेच आपले घर हसोळ येथे बांधले होते. त्यांची वडील सून बळवंतराव आंबर्डेकरांची बायको बाळंत व्हायची त्यासाठी त्यांनी ह्या आपल्या बहिणीस म्हणजे माझ्या आजीस हसोळास पाठविले, बळवंतराव तरुणपणी लवकर वारले, भावाच्या सुनेच्या बाळंतपणासाठी म्हणून आजी हसोळास आली. त्या सहवासात तिची वेरवलीची दैनयावस्था सर्वास कळली. वेरवलीहून तूर्त ती मुले तेवढी घेऊन बाहेर पडली, पण सासऱ्याचे घर काही तिने कायमचे सोडले नव्हते. तिच्या बंधूंना म्हणजे भिकाजीपंतांना ती आपल्याजवळ राहवी असे वाटे, परंतु ती म्हणे मी नेहमी माहेरी तुमच्याजवळ का राहवे तेंव्हा भिकाजीपंत व त्यांचे चिरंजीव बळवंतराव ह्यांनी अशी तोड सुचविली की आमच्या ह्या हसोळच्या घराशेजारीच सरदेसायांचा वतनी गाव गोवील आहे. त्या गावात तुला स्वतंत्र घर बांधून देतो, म्हणजे तुझा संसार नीट चालेल व एकमेकांना शेजार उपयोगास येईल. आपल्या घरापासून एका हाकेवर गोवीलच्या हदद्रीत एक लहानसे चाळीस रुपये किंमतीचे घर त्यांनी आजीकरिता बांधून दिले आणि त्यात ती आपला संसार थाटून स्वतंत्र राहू लागली. दोघांच्या घरांमद्ये फक्त एका लहानशा ओढ्याची हदद् होती. माझा जन्म ह्या नवीन घरांत झाला.

माझे वडील सखाराम नायक ह्यांचा जन्म चैत्र शु. शके १७५७ तारीख ७ एप्रिल, सन १८३५ च्या रामनवमीस झाला. घरांतील सावत्र चुलत्यांपेक्षा ते वयाने जास्त व संसार पाहण्यास लायक होते. गोविलास स्वतंत्र घर बांधण्यापूर्वी ते वेरवलीस जाऊन जनोबातात्यांस भेटले, ते म्हणाले, ''मी तुमचा वडील नातू, कागदोपत्री वतनास नाव माझे लागले पाहिजे. तशी व्यवस्था करून द्या, नाहीतर मी आपला पंथ वाटेल तसा ठरवीन'' आजोबांचा सर्व प्राण आपल्या सावत्र संततीवर, त्यांना ही माझ्या वडिलांची सूचना पटली नाही. तेंव्हा वडील तसेच वेरवलीचे वडिलोपार्जित घर सोडून रागाने उपाशी गोविलास येऊन स्वतःच्या घरी जेवले. जनोबातात्या सुनेला म्हणाले, ''वेणू मला सोडून गेली, आता तिच्या घरांत मी पाउल ठेवणार नाही.'' अशा रीतीने वडील स्वतंत्र झाले, तेंव्हा माझे आजोबा प्रथम वेरवलीसच होते, त्यांना घरात कोणीच विचारीत नसे एके दिवशी जनोबातात्यांनी त्यांना एक मोलकरीण बरोबर देऊन गोविलास पोचते केले, ते म्हणाले, ''तुझी बायको व मुलगा गोविलास स्वतंत्र राहतात, त्यांच्याच जवळ तू जाऊन राहा. आमच्या घरात तू नकोस.'' तेंव्हा माझे आजोबाही आमच्या घरी गोविलास येऊन राहिले.

आजोबांच्या ह्या येण्यास एका विशिष्ट कारण घडले, त्यांना घरात मुळीच मान्यता नव्हती. त्यांच्या पाठीवर दोन नायटे उठले ते लवकर बरे होईनात. तेंव्हा हा महारोग असावा अशी कुजबूज सूरु झाली. एकदा ते पंक्तीत भोजनास बसले असता सर्वात वडील सावत्र बंधू सीताराम नायक ह्यांनी त्यांस पानावरुन उठवून अपंक्त बसविले. तेंव्हा ते संतापून तसेच आपल्या बायकोजवळ गोविलास आले. नंतर त्यास आजीने सांगितले, ''तुम्ही नरसोबाच्या वाडीस जाऊन देवदर्शन घेत जा म्हणजे हा विकार बरा होईल.'' त्याप्रमाणे ते दरसाल देवदर्शनास जाऊ लागले आणि त्यांचा रोगही बरा झाला. एकदा जे ते गोविलास आपल्या चिरंजिवांजवळ आले ते अखेरपावेतो तेथेच

राहिले. माझ्या वडिलांनी त्यांचा सांभाळ यथायोग्य केला. प्रकृतीने ते निकोप होते. दरसाल नरसोबाच्या वाडीस शंभर मैल पायी चालत जाऊन देवदर्शन करीत. घरच्या संसारात मात्र ते लक्ष अगदी घालीत नसत. माझा मुलगा श्यामकान्त त्यांना पणतू झाला तो सहा महिन्यांचा त्यांनी पाहिला. त्यांचा जन्म शके १७२७ म्हणजे सन १८०५ चा असून ते गोवील येथे ता. १० डिसेंबर, सन १८९९ रोजी ९४ वय होऊन वारले. त्यांच्या पूर्वी तीन वर्षे माझी आजी सवाष्णपणी वारली. ह्यावरुन आमच्या कुटुंबात आयुमर्यादा चांगली दीर्घ दिसते.

माझे वडील सखाराम नायक ह्यांचा अभ्यास थोडाबहूत मलकापुरास झाला. त्यांच्या लग्नाची विचारपूस फारशी कोणी केलीच नाही. एकदा ते गोविलास आपल्या मातुश्रीस भेटण्यास आले असता ती त्यांस घेऊन कशेळीस आपली बहीण जायदे ह्यांजकडे गेली. तेथे त्यांस तिने अभ्यासासाठी ठेवून दिले. सुमारे महिनाभर वडील तेथे राहिले; पण चैन पडेना, कशेळीहून मालाचे मचवे मुंबईस जात त्यांतून ते कोणास न कळविता मुंबईस गेले. त्या वेळी ते सुमारे अठरा वर्षाचे असावेत. मुंबईस तीन-चार महिने राहून मास्तरगिरी केली. थोडी प्राप्ति झाली त्यांतून मुगटा, तांब्या, पंचपात्री, वगैरे भांडी खरेदी केली. दरम्यान मावशीने तपास काढून त्यास परत कशेळीस नेले. पण त्यांना स्थाईक होता आले नाही. ते परत मलकापुरास गेले, तेथे बापूसाहेब तांबे कारभारी होते, त्यांनी त्यास कारकुनाची नोकरी दिली पण तीही फार टिकली नाही. ते पुढे मातुल भिकाजीपंतांजवळ धनगरमहालचे काम पाहू लागले. त्या कामावर असता गूळ, तूप, लोणी, वगैरेची पैदास पुष्कळ होई. तेंव्हा जनोबा नायक व त्यांचे पुत्र कृष्णोबा नायक वगैरे मलकापुरास येऊन वरील जिन्नस बरोबर घेऊन वेरवलीस परत जात. ह्याच वेळी मी हे धनगरमहालचे काम पाहिले.

जनोबा नायकांना दुसऱ्या बायकोपासून मुले होऊ लागली त्याच्या पुर्वीच त्यांचा नातू म्हणजे माझे वडील जन्मास आले. स. १८३५ चा त्यांचा जन्म म्हणजे कोकणात अव्वल इंग्रजीचा अंमल. त्या वेळी सार्वजनिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने घेतली नव्हती. रत्नागिरीस इंग्रजी हायस्कूल होण्याला पुष्कळ अवकाश होता. जनोबा नायकांचे सर्वात धाकटे दोन मुलगे थोडेस इंग्रजी शिकले होते. एकाला त्या शिक्षणावर पुष्कळ दिवस रेल्वेत नोकरी करता आली. रत्नागिरी जिल्हा अत्यंत मागासलेला, दळणवळणाच्या अभावी एकलकोंडा असा होता इंग्रजी राज्यात नवीन सर्व्हे म्हणजे जमीनमोजणी व जमिनीचा प्रतवारी करण्याचे काम सरकारने चालू केले, त्यात त्या वेळच्या पुष्कळ लोकांना नोकऱ्या मिळाल्या. जनोबा नायकांचे तीन चार मुलगे सर्व्हेखात्यात नोकरी करून प्रपंचास मदत करू लागले.

माझ्या वडिलांचे दुसरे बंधू गंगाधर हे त्यांहून दोन-तीन वर्षांनी लहान. त्यांना मातुश्रीने अभ्यासासाठी कऱ्हाडास पाठविले होते हे वर सांगितलेच आहे. त्यांनी अल्पावकाशांत चांगले नैपुण्य मिळवून वकिलीचा अभ्यास केला. शाळेत त्यांना स्कॉलरशिप मिळे. अक्षर उत्कृष्ट होते. पुढे अभ्यास संपून तिकडेच त्यांना नोकरी लागली. तेंव्हा त्यांचे लग्न झाले. लग्नास माझी आजी गेली होती. उंब्रज येथील देवांची मुलगी आजीने सून करून घरात आणिली. माझे वडील मोठे बंधू असता त्यांचे लग्न झाले नव्हते. लहान भावाचे लग्न अगोदर झाले, त्यांजवर आजीचा

अगदी जीव की प्राण होता. माझा जन्म सन १८६५ त झाला ते वर्तमान त्यास कऱ्हाडास कळून त्यांनी खुशालीचे पत्र पाठविले आणि लवकरच मी तुमच्या भेटीस गोविलास येतो असे उत्तर आले. इतक्यात ते एकाएकी आजारी होऊन ता ३० ऑगस्ट, सन १८६५, भाद्रपद शुध्द ९ शके १७८७ ह्या दिवशी दिवंगत झाले. आजी ह्या पुत्रशोकाने अत्यंत विव्हळ झाली. आजाराचे वर्तमान कळताच ती त्यांच्या भेटीस गेली, नुसती दृष्टभेट होऊन आजी कऱ्हाडहून विधवा सुनेस घेऊन परत गोविलास आली. तिचे नाव दुर्गाबाई. ही माझी चुलती फार सात्विक वृत्तीची असून ती पुष्कळ वर्षे गोविलास राहिली. पायात अधू होऊन तिला फिरणे अशक्य झाले. आम्ही बंधुंनी तिची सेवा अखेरपावेतो निष्ठेने केली. साठीच्या उमरीत ती गोवील येथे ता. २७ जुलई, सन १९१० रोजी वारली. पण तिचा शुभाशिर्वाद आमच्या सर्वांच्या शिरी कायम राहिला.

माझ्या वडिलांची पंचविशी उलटून गेली तरी त्यांच्या लग्नाची व्यवस्था बनली नाही. ते मलकापुरास धनगरमहालचे कामावर असत. साखरप्याजवळ भडकंबे येथे राहणारे धोंडभट आठल्ये म्हणून भिक्षुकीवर निर्वाह करणारे गृहस्थ मलकापुरास नवरात्राच्या उत्सवास आले असता, तेथील एक प्रसिध्द पुरुष चिंतोपंत खेर ह्यांच्या मार्फत आठल्यांची व माझ्या वडिलाची ओळख झाली. त्यांची मुलगी साळू दहा-अकरा वर्षांची लग्नाची होती, तिच्या लग्नाची गोष्ट निघून धोंडभटांनी माझ्या वडिलांस जावई करण्याचे ठरविले. प्रथम मुलगी तर पाहिली पाहिजे.त्यासाठी वडिलांना जो विश्वासू शिपाई भागूजी राऊत जवळ होता त्यास त्यांनी मुलगी पाहण्यास भडकंब्यास पाठविले. तो जाऊन मुलगी पसंत करून आला. पुढे स. १८६० च्या फाल्गुनात हे लग्न भडकंबे येथे झाले. त्यासाठी वडील व त्यांचे मोठे मामेबंधू बळवंतराव आंबर्डेकर मलकापुराहून भडकंब्यास गेले. तेथे लग्न उरकून वरात मलकापुरास खेरांच्या घरी आली. आजीला वेळेवर खबर न कळल्याने ती लग्नास येऊ शकली नाही. तेंव्हा गोवीलचे घर झालेले नव्हते. ते पुढे चार वर्षांनी तयार झाले. मीच आईचा सर्वात वडील मुलगा. तिच्या सोळाव्या वर्षी झालो. गोवीलचे घर नवीन बाळंतिणीस कसे मानवेल ह्या शंकेमुळे शेजारी आंबर्डेकरांच्या हसोळच्या घरांत माझ्या आईचे बाळंतपण झाले. बाराव्या दिवशी नामकरणास मला नवीन घरात आणले. तेथील घरदार व परडे परसू तयार होऊन सर्व संसार नवीन थाटण्याचे मुख्य काम माझी आई व आजी ह्या दोघींनी केलेले आहे. वडील बाहेर धनगरमहालावर राहून प्रपंचास साहय करीत. गुरेढोरे, भाजीपाला, शेती ही कामे ह्या बायका पाहत.

गोवीलचे हे ठिकाण पाऊणशे वर्षाच्या आमच्या उद्योगाने फार मनोरम बनले. मात्र पुढील भरभराटीवरून त्याची पहिली स्थिती लक्षात येणार नाही. माझे बालपण त्या ठिकाणी गेल्यामुळे मला त्या वेळचे संस्कार चांगले आठवतात. घरासभोवार डोंगर व जंगल होते. शेते पाडलेली नव्हती. प्रथम लहानशी विहीर पाडून पाण्याची सोय करण्यात आली. पहिले घर म्हणजे लहानसे केंबळी झोपडे. जवळ शेजार तर नव्हताच. सभोवार कोणी धनगर व गौळी गुरे बाळगून राहत. साप किरडू व हिंस्त्र श्वापदे ह्यांचा सुळसुळाट असे. पुढे वडिलांनी हळूहळू जंगले तोडून जमीन साफ केली. शेतीच्या मळया आखल्या. शेजारी ओढा होता, त्यास धरणे बांधून परसात वाहते

पाणी आणिले. आंबे, फणस, सोनचाफे, नारळी, पोफळी, केळी अशांचे सुंदर बगीचे निर्माण झाले. गडी माणसे ठेवून वडील काम ठरवून देत त्याप्रमाणे सर्व उस्तवारी आई व आजी करीत. लहानपणी मी थंडीत किंवा पावसात शेतीच्या कामात किंवा गुरे राखण्यात राबत असे. लहानपणी सृष्टीसौंदर्याचा अनुभव मिळणे हे शिक्षणाचे एक प्रधान अंग होय असे मी मानतो. भूक-तहान, पाऊस-चिखल, वगैरेची सवय होऊन शरीर काटक व निरोगी बनते आणि वृत्ति प्रफुल्लित राहते. आम्ही बंधू मिळविते झाल्यावर पुर्वीचे गवती झोपडे मोडून आम्ही त्याच जागेवर मोठी दुमजली इमारत साग व फणस ह्या उंची लाकडांची उठविली. अशा एखाद्या कुटुंबाचा संसार म्हणजे लहानशा राज्याप्रमाणे वर्षोगणती चालतो तेंव्हाच तो नावारुपास येतो. सन १८६५ त गोवीलचे वास्तव्य निर्माण झाले, ते ठिकाण पुढे सन १९४५ त आम्ही सर्व बंधूंनी विकून टाकले. ते सांभाळण्यास कोणी नाही, परिस्थिती बदलली, उत्पन्न काही नाही आणि खर्चमात्र वाढला. म्हणून तो सर्वच उद्योग सोडून द्यावा लागला. गोवील येथे आमची ही नांदणूक ऐंशी वर्षे टिकली. आता तेथे आमचे काही नाही ह्याची अद्यापि हळहळ वाटते.

३. माझी आई

माझे मातुल घराणे आठल्यांचे. हे भिक्षुकी वृत्तीने भडकंब्यास राहत. सरदेसाई व आंबर्डेकर ह्यांचा बाणा गृहस्थी, तसा आठल्यांचा नव्हता. अलीकडे गृहस्थ व भिक्षुक हा भेद सर्वथा बुजला आहे, तथापि माझ्या लहानपणी तो बराच जाणवत असे. त्याचा उपसर्ग लग्नादि कार्यास पोचत नसे. तथापि आठल्ये घराण्याशी जडलेला हा ऋणानुबंध प्रत्यक्ष माझ्या जीवनाला उपयुक्त कलाटणी देण्यास मुख्यतः कारण झाला. इतकेच नव्हे तर बुध्दीमत्तेच्या सांस्कृतीक विषयात आठल्ये मंडळी आंम्हा गृहस्थांपेक्षा पुष्कळ वरचढ हाती असे आता मला वाटते. शिपोशीच्या आठल्ये घराण्यात आज पन्नास एक कुटुंबे नांदत असून विद्येच्या व कलाकौशल्याच्या कामात त्या मंडळीचे अनेक कर्तबगार पुरुष निपजले, तसे ते इतरत्र फारसे आढळत नाहीत. आज तरी व्यवहारतः सरदेसाई व आंबर्डेकर आठल्यांच्या तुलनेने पुष्कळच मागासलेले म्हणावे लागतील. माझे मातामह धोंडभट आठल्ये सात्विक परोपकारी वृत्तीचे असून बडोदे वगैरे ठिकाणी भिक्षुकी करुन प्रपंच भागवीत. त्यांचे धाकटे बंधू महादेवबाबा घरी संसार चालवीत. सन १८६५ त माझा जन्म झाला त्या सुमारास धोंडभटआबा बडोद्यास भिक्षुकीसाठी गेले ते आठ वर्षे तिकडेच होते. पश्चात त्यांचे कुटुंब प्रसूत होऊन दोन जुळे पुत्र झाले ते माझे मातुल हरि व विठ्ठल माझ्याहून वयाने एका वर्षाने मोठे. माझी मुंज वयाच्या ७ व्या वर्षी स. १८७२ च्या माघांत गोविलास झाली आणि लगेच फाल्गुनात ह्या हरि-विठूंच्या मुंजी मोडर्यास झाल्या, त्या प्रसंगी मी तेथे हजर होतो. हरि, विठू व मी अशा तिघांस धोंडभटआबा संध्या शिकवीत ते मला आठवते. त्यानंतर एकदोन वर्षांनी धोंडभट बडोद्यास गेले आणि तिकडेच स. १८७४ च्या सुमारास वारले. त्यांच्या आजाराची बातमी आल्यावरून त्यांचे वडील चिरंजीव लक्ष्मणभटतात्या भेटीसाठी बडोद्यास गेले, पण त्या पूर्वीच ते आटोपले होते. माझी मातुश्री ही त्याची एकच सर्वात वडील कन्या. हिचा जन्म स. १८४९ चा. तिच्या पाठीवर चार बंधू लक्ष्मण, बळवंत, हरि, व विठ्ठल. माझ्या एकंदर जीवनात ह्या चौघा मातुलांचा आम्हास मोठा उपयोग झाला. बळवंतराव ह्यांनीच

माझी इंग्रजी शिकण्याची सोय रत्नागिरीस केली, त्या योगाने माझे पुढील भवितव्य सर्वथ बदलून गेले. स. १८७२ च्या श्रावणांत माझे मातामह धोंडभट आमच्याकडे गोविलास आल्याचे मला स्मरते. एकदोन दिवस ते आमच्याकडे राहिले. त्या वेळी त्यांनी माझ्या वडिलांस गळ घालून सांगितले,"दररोज विष्णुसहस्त्रनामाचा पाठ करून देवास तुळशी वाहत जा म्हणजे तुमचा भाग्योदय होईल." तदनुसार मी पुढे विष्णुसहस्त्रनाम पाठ केले ते अद्यापि मला येते वडिलांस ते येत नसे. संस्कृत उच्चारांची त्यांस बिलकूल माहिती नव्हती. विष्णुसहस्त्रनाम स्त्रोताचे सुमारे १०० श्लोक असून ते म्हणण्यास १५ मिनिटे लागतात. तू विष्णुसहस्त्रानाम रोज म्हणतोस ना असे आपल्या पत्रात वडिलांनी मला वारंवार लिहिलेले आहे. झोपी जातांना दुसरा उद्योग नसला तर अद्यापि ते म्हणत मी निजतो.

माझी आई व आजी ह्या दोघींच्या कर्तृत्वात पुष्कळ भिन्नता होती. हा विरोध संसारात पूरकच झाला. स्वयंपाक, दूधदुभते, काटकसर, टापटीप हे प्रकार आजीला जसे साधत तसे आईला साधले नाहीत. पाहूणे नेहमी येत ते आजीला म्हणत, तुझ्यासारखा स्वयंपाक व दूधदुभते अन्यत्र कोठे मिळत नाही. घरातल्या व्यवहारांत आजी दक्ष होती, पण घराबाहेरच्या कामात म्हणजे शेतभात, लागवड, झाडझाडोरा हे प्रकार मजूर आणून करणे ही काम आई करी तशी आजीला साधली नाहीत. घरात काही उणे असले की बाहेर खटपट करून आई ते लगेच मागवी. एकंदरीत घरात आजी व बाहेर आई अशी आमच्या कौटुंबिक कामाची वाटणी समान्यतः घडून आली, तेणेकरून प्रत्यक्ष वडील फारसे घरी नसता आरंभी काही वर्षे संसार ठीक चालला.

दोघीच्या स्वभावातही पुष्कळ फरक होता, तो उपकारकच झाला. सासवासुनाचे रहस्य फारसे नव्हते. आजी तापट, करारी व कठोर वृत्तीची तर आईच्या ठिकाणी मृदुता, कनवाळूपणा जास्त होता. ह्यास्तव शेजारी पाजारी सर्व आईला अनुकूल असत. उसनेपासने आणून संसाराचा गाडा चालविण्यात आजीचे लक्ष नसे. स्वयंपाक, देवपूजा, घरातील स्वच्छता, वगैरे बाबातीत आजीचा हात कोणी धरू शकले नाही. आजी व आजोबा ह्यांचे तर कधीच पटले नाही. आजोबा म्हणजे घरातील एक अडगळ असाच जन्मभर समज होता. ते वेळेवर जेवणाससुध्दा यायचे नाहीत. आज मला हे लहानपणचे स्वभावभेद मोठे हृदयंगम वाटतात. कारण समग्र कुटुंबाचे हिताहित अशा स्वभावभेदांनी बनत जाते हे आपण सर्वांनी लक्षात ठेविले पाहिजे.

आजीने मरेपर्यंत कष्ट केले. सन १८८६ साली मी बंधूंना शिक्षणासाठी रत्नागिरीस ठेविले, तेंव्हा दोन एक वर्षे आजी तेथे मुलांना जेवण करून घाली. शंकरराव रायकर माझे एक स्नेही त्यांजवर देखरेख ठेवीत. तेथून परत स. १८८९ त आजी गोविलास आली आणि उत्तरोत्तर थकत गेली. अल्पकाळ शेवटचे पाच चार महिने तिला बुध्दीभ्रंश झाला. त्यातच ती खितपत न पडता सवाष्णपणी कृतकृत्यतेच्या आनंदाने गोवील येथे नव्वद वर्षाच्या वयात रविवार अधिक ज्येष्ठवद्य ११ शके १८१८ ता.जून स. १८९६ ह्या दिवशी परलोकास गेली. तिच्या पश्चात तीन वर्षांनी आजोबा गेले. मातुश्रीच्या मरणसमयी वडिलांनी फार आक्रोश केला. यथाविधि

उत्तरकार्य केले. सासऱ्याचे व वडिलांचे दोन विस्तृत संसार ह्या आजीने जन्मभर सांभाळले. अशा पुण्यवान स्त्रिया फार थोडया आढळतात.

माझे मातुल घराणे व आंम्हा सर्व बंधूंचा परिवार ह्या उभय कुटुंबाप्रमाणे अद्यापि प्रपंचात नांदत आहेत. हा प्रकार सामाजिक घटनेत स्मरणीय होय. अशी एकमेकांचे अगत्य ठेवणारी वृत्ति सर्व समाजात पसरेल तेंव्हाच राष्ट्रास रामर्थ्य येईल. उद्याची संधि येणे आपल्या हातचे नाही. पण तशी संधि थोडयाबहुत अंशाने प्रत्येकास केंव्हा तरी येतच असते. मात्र संधीचा वेळेवर उपयोग करून घेण्याची पात्रता प्रत्येकाने लहानपणापासून झटून पैदा केली पाहिजे. माझ्या शिक्षणाची व्यवस्था लागताच अनुकरणाने आमची व आठल्यांची सर्व मुले आपापल्यापरी उद्योग करून आज आपला योगाक्षेम यथायोग्य चालवीत आहेत. जनोबातात्यांच्या विस्तृत घराण्यात दुसरे पुरुष फारसे पुढे आले नाहीत.

माणसास संधी कशी येते आणि तिचा त्याने उपयोग कसा करावा ह्या संबंधात माझेच उदाहरण सांगण्यासारखे आहे. भडकंब्यास आठल्ये राहत असता शेजारच्या मोर्डे गावाची मालकी सरदेसायांकडे होती. आमची वेरवलकरांची जशी एक कुटुंबशाखा तशी ह्या मोर्डेकराची आणखी एक शाखा निराळी होती. त्या शाखेतील एक मुलगी शिपोशीचे सुप्रसिध्द वासूकाका आठल्ये ह्यांस दिलेली असून ती बापाची एकूलती एक कन्या असल्यामुळे तिच्याकडे वतनाचा वारसाहक्क आला. तिला पुत्र झाले त्यात यशवंत वासुदेव उर्फ बापूसाहेब हे विव्दत्तेने व कर्तबगारीने नामांकित झाले. त्यांच्या मातुश्रीचा मोडर्याचा कारभार हे भडकंब्याचे आठल्ये-माझे मातामह धोंडभटआबा-पाहत असत. धोंडभटांची मुले, माझी मातुश्री व तिचे बंधु लहानपणी सर्व ह्या मोर्डेकर सरदेसायांच्या घरात वाढली. माझी मातुश्री आणि बापुसाहेब व त्यांचे बधु अशाप्रकारे एकत्र राहिले म्हणून त्यांचा जिव्हाळा विशेष होता. मी गोवील येथून शिपोशीस शाळेत जात असे. माझे मातुल विशेषतः बाळूमामा प्रथम रत्नागिरीस वासूकाकांजवळ व पुढे मुंबईस बापूसाहेब ह्यांच्याशी माझा परिचय घडून त्यायोगाने माझ्या भावी शिक्षणाची तयारी सहज घडून आली. माझा पुढील एकंदर आयुष्यक्रम ह्या योगाने निराळा बनला. आठल्ये व सरदेसाई जवळ जवळ शंभर वर्षे एकजीव राहिले. असा अनुभव क्वचीत दृष्टिस पडतो. माझे मातामह व त्यांचे बंधू महादेवबाबा आठल्ये हे अत्यंत प्रेमळ होते. महादेवबाबा मला नोकरी लागल्यावर ता. ३ नोव्हेंबर स. १८८९ रोजी स्वर्गवासी झाले.

४. माझे बालपण, मराठी शाळा

त्या वेळच्या आमच्या गावठी वातावरणात शिक्षणाचे नाव नव्हते किंवा कारकुनीपलीकडे ब्राम्हण समाजाची हाव गेलेली नव्हती. वर्तमानपत्रे नाहीत, आगपेटया किंवा घासलेटचा संपर्क लोकांस पोचलेला नाही, अशा त्या अज्ञानांधकारात माझे बालपण गेले. वडिलांनी मला मोडी चालू केले ते कारकुनी शिक्षणासाठी. शाळेत मुलांस पाठविले पाहिजे अशी भावना माझ्या वडिलांची नव्हती. घरात हिशेबाच्या पावत्या किंवा लग्नमुंजीच्या हस्तलिखित चिठ्या लिहिण्यापलीकडे कागद नव्हता. वडिलांचे एक लहानसे दप्तर असे त्यांत वर्षाकाठी पाचचार पातळ फ्रेंच कागदाचे ताव ते ठेवीत. तेसुध्दा दोन बोटे रुंदीच्या चिरफोळया फाडून ते वापरीत म्हणजे दुर्मिळतेमुळे

कागदाचा वापर संकुचित होता. वडील बहुधा बाहेर फिरतीवर असत, पावसाळी दिवसांत शेतीच्या कामापुरते घरी राहत. त्यांनी धुळीची पाटी बनवुन मला अक्षरओळख केली. घरचा सर्व व्यवहार आजी व आई पाहत. मिळून त्या वेळचे माझ्या दृष्टीचे क्षितिज किती आकुंचित होते ह्याची कल्पना होईल. जोशी किंवा उपाध्या पंचांग सांगण्यास किंवा श्राध्दपक्षास वर्षाकाठी आमचेकडे येई, तेवढयाच परस्थांची आम्हा लहान मुलांस ओळख.

माझ्या लहानपणची सर्वात पहिली आठवण मला होते, ती माझ्या पाठीवर झालेल्या बंधूच्या मृत्यूची मी सुमारे साडेतीन वर्षाचा असतांना मी, मातुश्री व तो लहान चार दोन महिन्याचा भाऊ, अशा तिघांस एकदम देवी आल्या. त्यात तो मुलगा गेला. मातुश्री व मी दहा-पाच फोडया येऊन बरे झालो. रात्री दिव्याजवळ फडक्यात गुंडाळलेले लहानसे मोटकुळे ठेवून जवळ आई, आजी रडत बसल्या होत्या तो देखावा माझ्या दृष्टीपुढे अद्याप उभा राहतो. अर्थात त्यातले बरेवाईट मला त्या वेळी काहीच कळत नव्हते. दुसरी आठवण दृष्ट लागण्याची. कित्येक माणसे ह्या दृष्टीसंबंधाने त्या बाजूस ठळकपणे ठाऊक असत. काही चांगला पदार्थ, पडवळ, दुध्या, भोपळा, वगैरे भाज्यांची आळी अशा माणसांच्या नजरेस पडली की ती सर्व लगोलग खराब होऊन जात. ''काय हो, तुमची ही पडवळे सुंदर आली आहेत,'' अशीव वाहवा त्या माणसाच्या तोंडून निघाली की पुरे. आमच्याच दारातले पडवळरीचे आळे त्या माणसाने पाहताच एक दोन दिवसात सर्व फळे सुकून गळून पडलेली मी पाहिली आहेत. दृष्ट लागणारे हे गृहस्थ आमच्या इतके परिचयाचे असत की ते दुरुन दिसताच आई-आजी आम्हांस सूचना देत की, तो... येतो आहे बरे, त्याच्यापुढे तुमचे चांगले पदार्थ आणू नका. एकदा आमची म्हैस व्याली, तिच्या ओटीची वाखाणणी त्या गृहस्थाने केली. लगेच तिच्या आंचळातून दुधाऐवजी रक्त येऊ लागले. आम्हास तेंव्हा दृष्टीचा हा प्रकार खरा वाटे. आमची आई सालोसाल भाऊबिजेसाठी आम्हा मुलांस घेऊन आपल्या माहेरी जाई. एका सांच्याची गोरी गोमटी तरतरीत मुले बरोबर घेऊन आई दहा मैल चालून जाई तेंव्हा तिला माहेरची माणसे बजावीत, ''अशी आपली मुले रस्त्याने मिरवीत तू आणू नकोस, त्यांना दृष्ट लागेल वाटेने.'' खरेच आम्ही सर्व भावंडे लहानपणी अगदी सारखी दिसत असू. पण आता मी पाहतो तो प्रत्येकाचे व्यक्तिमत्व अगदी भिन्न बनले आहे. एकाच आंब्याच्या कोया आपण शेदोनशे एकदम रुजत घालतो, लहानपणी ती रोपे इतकी हुबेहूब एकसारखी दिसतात की ती निराळी ओळखू येणार नाहीत. पण पुढे त्यांचे मोठे वृक्ष बनले म्हणजे त्यांतला एक देखील तंतोतंत दुसऱ्यासारखा दिसत नाही. आनुवंशिक ठेवण कित्येक बाबतीत संततीच्या ठिकाणी सारखी उतरत असली तरी पुढे परिस्थितीने प्रत्येक इसम अगदी वेगळा बनत जातो हा सृष्टीचा दंडक अनिवार्य आहे.

माझी पहिली सात वर्षे गोवील येथेच गुरे राखण्यात किंवा आई-आजीच्या मागे हिंडण्यात गेली. वडिलांचा व माझा संबंध फार थोडा आला. त्यांचा धाक मात्र आंम्हा मुलांस विशेष वाटे. पहिलाच मुलगा मी, शिवाय वडिलांची त्या वेळी बरीच चलती असल्यामुळे सातव्या वर्षीच माझी मुंज करण्याचे त्यांनी ठरविले. माझा जन्म स. १८६५ च्या वैशाखातला आणि १८७२ च्या माघात माझी मुंज गोवीलच्या मानाने मोठ्या थाटात झाली. शंभर ब्राम्हण तरी जेवावे असे

वडिलांचे म्हणणे, पण दही, दूध, लोणी, तूप वगैरे पदार्थ मुबलक घेऊन शेदोनशे धनगर वडिलांच्या बोलावण्याने जमा झाले आणि त्या सर्वांस उत्कृष्ट भोजन येथेच्छ मिळून ते आनंदाने परत गेले. ब्राम्हणांऐवजी धनगरांच्या जेवणावळीचा हा योगायोग वडिलांना त्या वेळी आवडला, तितकाच तो मलाही आताच्या विचारसरणीने श्रेयस्कर वाटतो.

मुंज होताच आजीने मला वेरवलीच्या शाळेत नेऊन माझे नाव दाखल केले. तेथे तिचा भाचा होता त्याच्या घरीच माझ्या भोजनाची व्यवस्था केली. माझ्याबरोबर माझा आतेभाऊही रामा देसाई नावाचा त्याच वेळी माझ्याचसारखा वेरवलीस येऊन राहिला. सुमारे दीड वर्ष मी ह्या शाळेत राहिलो. आमच्या घरापासून वेरवलीची शाळा सहा मैलांवर होती. रजेच्या वगैरे दिवशी आम्ही कधीकाळी घरी येत असू. पण खाण्याची व्यवस्था चांगली नसल्यामुळे आम्ही दोघेही तेथे अगदी जेरीस येऊन गेलो. दुपारी बारा वाजेपर्यंत आम्हांस पोटाला काहीच मिळत नसे. चहाचा प्रघात त्या वेळी नव्हता आणि अन्न म्हणून दूध घेण्याची प्रथाही नव्हती. कॅंडीकृत मराठी पहिले व दुसरे पुस्तक ही दोन रोज रोज वाचून आमची पाठ झाली. शाळेत घड्याळ नव्हते. निदान ७ ते ११ पर्यंत सकाळी व पुनः २-६ पर्यंत सायंकाळी असे आम्ही सारखे शाळेत डांबलेले. अंधारामुळेच शाळा बंद ठेवावी लागे तेवढीच आमची सुटका. अकरा वाजता शाळा सुटल्यावर पातेरा जमवून पाणी तापवून आंघोळ केल्यावर मग दोन घास तोंडात पडायचे आमच्या घरून तूप, ताक, वगैरे आजी वरचेवर पाठवी, पण पाच सात जेवणारांस ते किती पुरणार पुसाळकर नावाचे शिक्षक होते ते पुस्तक वाचण्यापलीकडे दुसरे काही शिकवीत नसत दोन तास सायंकाळी सर्व मुले मोठमोठ्याने परवचा म्हणत, तेवढीच थोडीशी करमणूक. रामा देसाई व मी ह्या शाळेत आगदी वैतागून गेलो. दोघेही एकदा गोविलास आल्यावर आम्हास ह्या शाळेत जायचे नाही असा त्रागा करून बसलो. वडिलांनी कारण विचारले, पण ते सांगण्याची चोरी, भूक लागते, जेवण वाईट ही आजीच्या भाच्याची निंदा व त्याच्या बायकोचा जाच हे खरे कारण आम्हांस सांगता आले नाही. शेवटी वडिलांनी मला शिपोशीच्या शाळेत नेऊन ठेविले. आमच्या घरापासून ही शाळा अडीच मैल अंतरावर होती, सबब भोजनाची सोय शिपोशीतच शिवरामभटबाबा आठल्ये म्हणून एक सदगृहस्थ होते, त्यांना दरमहा आठ पायली तांदूळ आम्ही द्यावे आणि त्यांजकडे मी कायम राहावे असे ठरून स. १८७४ च्या आरंभी मी शिपोशी गाठली. तो प्रयोग मला अत्यंत श्रेयस्कर ठरला. वेरवलीस माझे वास्तव्य दीड वर्ष झाले.

आठल्यांची शिपोशी म्हणजे बुध्दीमान पुरुषांचे आगर. गावाच्या मधून वाहणारी नदी, काठांवर भातशेती, तिला लागून घरे, लोक उद्योगी, तरतरीत भर पावसाच्या पुरांत नदीत उड्या टाकून कित्येक मैल पोहणारे, वेदाध्यन, शास्त्र, वकिली, शिक्षण, इत्यादि विषयांत प्रवीण, गांवकुटाळीतही कित्येक परिपूर्ण; तीस एक कुटुंबाच्या वसतीत लग्नामुंजीचे किंवा सुवेरसुताचे प्रसंग सदा चालू. हरिहरेश्वराचा कार्तिकीचा वार्षिक उत्सव व तन्निमित्त भजन, नाटक, वगैरे विविध प्रकार चालत ते पाहण्यास शेजारच्या गावांतून मोठा लोकसमुदाय जमत असे. मला त्या वेळी हे सर्व पाहण्याची भारी मौज वाटे. त्याचे संस्कार माझ्या मनरावर कायम ठसलेले आहेत. गावठी नाटके-त्यात रामरावणाचे युध्दप्रसंग, सुत्रधार व विदूषक ह्यांचे विनोदी संवाद, गणपति-

सरस्वतीचे आशीर्वाद हे प्रयोग अत्यंत मनोवेधक वाटत. रावणाला दहा तोंडे सावरण्याची कोण त्रेधा उडे. त्या वार्षिकी उत्सवाशिवाय शिपोशी गावात लग्नमुंजीचे समारंभ, प्रयोजने, पितृपक्षांतील महालयांची धांदल, हेही प्रसंग वारंवार घडून त्यात गावचे लोक झाडलोट, साहित्य, पत्रावळी, स्वयंपाक अशी कामे करण्यात सर्व झटून मदत करीत. त्यात मलाही शक्यनुसार भाग घ्यावा लागे. मुख्यतः पंक्तिभोजनात श्लोक म्हणण्याची पाळी म्हणजे ते एक दिव्यच वाटे. गावांतील बहुधा प्रत्येक घरी आम्हा मुलांस जेवणाचा योग येई. काही गृहस्थ प्रतिष्ठित, सत्प्रवृत्त व उद्योगी होते तर गावकुटाळही काही कमी नव्हते. गोवील येथे माझ्या वडिलांस भेटण्यास शिपोशीचे पुष्कळ स्नेही येत, त्यांच्या गप्पा म्हणजे एक विशिष्ट करमणूक वाटे. सारांश, शिपोशीच्या ह्या सामाजीक जीवनात स. १८७४ पासून १८७९ पर्यंत माझी तब्बल पाच वर्ष स्मरणीय व शिकाऊ वयाची गेली. हा माझा पहिला अपूर्व जन्मायोग होय. ह्याच कारणाने बापूसाहेब आठल्यांसारख्या थोर विव्दानपुरुषाशी माझा संबंध जडून माझ्या जीवनाला उत्कृष्ट कलाटणी मिळाली.

ता. १० एप्रिल, स. १८७४ ह्या तारखेचा एक दाखला वडिलांच्या दप्तरात मला मिळाला, त्यात मजकूर की "विद्यार्थी गोविंद स. सरदेसाई ह्याचे वडील लोकलफंड भरीत आहेत सबब त्यास मासिक फी माफ करावी," असा लेख गोवीलगावच्या पोलिसपाटलाचा आहे. त्यावरून कळते की त्या सालच्या आरंभी मी शिपोशीच्या शाळेत दाखल झालो. तेथे मला मास्तरांनी दुसरीत बसविले. तीन वर्षात तीन इयत्ता पुऱ्या झाल्या. पुढील दोन वर्षात भाषा, गणित, वगैरे थोडे जास्त शिकत राहिलो, पण चौथीच्या पुढील इयत्ता शिकविण्यास शाळेस परवानगी नव्हती. सहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कारकुनी मिळे, पण माझे वय पंधरा पुरे नसल्याने ह्या शाळेतील माझी शेवटची दोन वर्षे बरीचशी फुकट गेली असे मला आता वाटते.

शिपोशीस शिक्षक व पालक दोघेही मला भले मिळाले. विनायकपंत जोशी हे सच्छील, निःस्पृह व शिस्तीचे शिक्षक शाळेवर मुख्य असून गुरुजी ह्या नावाने अद्यापि त्यांचे घराणे शिपोशीत आहे. गणित विषयांत त्यांची गति विशेष होती. त्यांच्या हाताखाली दामोदर नारायण आठल्ये असिस्टंट असून तेही नावाजलेले शिक्षक पुढे सातारा जिल्ह्यांत प्रसिध्दीस आले. ह्या दोन शिक्षकांच्या नजरेखाली माझा अभ्यास चांगला बनला. शिवाय शशिशेखर दामोदर आठल्ये हे दुसरे एक नामांकित विव्दान गृहस्थ त्या वेळी आमच्या वरच्या वर्गात विद्यार्थी होते. मोरोपंतादि कवीच्या कृति ते आम्हा विद्यार्थ्यांना भक्तीने वाचून समजावून देत, हा आणखी एक फायदा आम्हांस सहज मिळाला. पण ह्या सर्वांहून मोठया भाग्याची गोष्ट म्हणजे वेरवलीची कष्टमय आठवण विसरुन जावी असे गृहस्थ ज्यांच्याकडे माझी राहण्याची व भोजनाची सोय वडिलानी करून दिली हाती, ते शिवराम-भटबाबा आठल्ये, त्यांची कुटुंबिनी पार्वतीबाई, त्यांचे दोघे वडील बंधू ही सर्व प्रेमळ माणसे मला भेटली. स्वतःच्या मुलाप्रमाणे त्यांनी माझा सांभाळ केला. शाळेतील शिक्षणास जोड म्हणून शिवरामबाबांनी मला पूजा, रुद्रावर्तन, नैवद्यवैश्वदेव, विष्णूसहस्त्रनाम-शिवकवचदि स्तोत्रपाठ, पुरुषसूक्त, श्रीसूक्त इत्यादि विषय शिकविले. हे कर्मठ वैदिक पुढे कैक वर्षे आमच्या वडिलांचे निकट स्नही बनले. बडोद्याला नोकरी लागल्यावरही माझी प्रेमळ आठवण

ते सारखी बाळगीत. पार्वतीवहिनींचे उपकार तर मला कधी विसरता येणार नाहीत. पूजादि विषयांव्यतिरिक्त दुसरी दोन उपयुक्त कसबे शिवरामबाबा व त्यांचे बंधू ह्यांनी मला शिकविली. एक बांबूच्या टोपल्या, चटया वगैरे बनविण्याचे व दुसरे अंबाडीच्या दोऱ्या वळण्याचे. शिवरामबाबांच्या घरात उत्कृष्टबांबू तयार होत. तोडून त्याचे उपयुक्त जिन्नस बनविणे हे कसब त्यांजबरोबर काम करुन मला साधले व घरी गेल्यावर गोविलास मी त्याचा चांगला उपयोग केला. अद्यापि मला ह्या दोनही कसबांचा नाद असून, अंबाडीचे बी रुजत घालून, झाडे मोठी झाल्यावर तोडून ती पाण्यात कुजवून दोर काढणे व त्या दोराची दावी, दोऱ्या, नांगराच्या जोखडया, बैलाच्या दावणी, वगैरे मी तयार केल्या. हात व बोटे इत्यादीच्या व्यापारात मन गुंतविणे हे शिक्षणाचे एक प्रधान अंग त्या वेळी मला शिपोशीच्या निवासात मिळाले. त्याचा मोठा फायदा झाला असे मला अद्यापि वाटते. असे काही तरी विशिष्ट कसब प्रत्येकाला आवश्य येत असले पाहिजे. शिवरामबाबा पुढे संसारात वैतागल्यामुळे मला त्यांचे घर सोडावे लागले. शेवटचे एक वर्ष गोविलास जेवून मी शिपोशीस शाळेत जात असे.

५. दैन्यावस्था

मी शिपोशीस शिकत असतांनाच आमची गृहस्थिति खालावत गेली तो प्रकार येथे सांगणे जरुर आहे. आरंभी लहान थोडका संसार होता तोपर्यंत वडिलंच्या अल्प प्राप्तीत संसार निभावत गेला, पण उत्तरोत्तर आम्ही अनेक मुले जन्मास येऊन खर्च वाढले. पूर्वीचे लहानसे झोपडे राहण्यास पुरेना. तेंव्हा मूळ घराच्या काटकोनास जोडून एक लाहन सोपा स. १८७६ च्या उन्हाळ्यात वडिलांनी वाढवून नवीन बांधला. त्या वेळी विचार होता की पुढील साली बंधु नारायणरावाची मुंज करावयाची त्यास जागा पुरली पाहिजे. घरात पुढील बेगमीचे धान्य व इतर साहित्य भरपूर ठेवून दरसालप्रमाणे मृगारंभी वडील धनगरमहालच्या उद्योगासाठी कोल्हापुरास निघून गेले. घरात फक्त आम्ही मुले व दोघी बायका. ता. ५ जून, स. १८७६ ह्या दिवशी मध्यरात्रीनंतर आमच्या त्या गवती घरास एकाएकी आग लागून ते अल्पावकाशंत जळून खाक झाले. मी शिपोशीस होतो. दुसऱ्या दिवशी दोन प्रहरी मला तेथे बातमी कळताच मी आलो तो घराचा भीषण देखावा दिसला तो काय वर्णन करावा आग कशाने लागली त्याचा खुलासा कधीच कळला नाही. मी आलो तेंव्हा धान्य वगैरे पेटेलेले धुसमत होते आणि सर्व आवारांतून धूर निघत होता. आई बाहेरची असून मुलांस घेऊन निघाली आणि आजीने सर्व देव ओटीत घेऊन देव्हारा तेवढा ओढीत बाहेर आणला. इतक्यात मेघगर्जना होऊन पावसाचा मोसम सुरू झाला, तेणेकरून आग विझली. घराजवळ दुसरा शेजार नव्हताच. सकाळी बाहेरचे लोक जमा झाले. घराच्या दक्षिण बाजूस टेकडीवर गुरांचा गोठा होता त्यांत आम्ही जाऊन राहिलो. दोनचार दिवसात माझे चुलत आजोबा कृष्णोबा नायक आले, त्यांनी गोविल गावातले एक घर विकत घेऊन ते आमच्या जळालेल्या घराच्या जागेवर उभे केले. त्यात पुनः आम्ही जाऊन राहू लागलो. इतक्यात वडील आले. त्यांना कृष्णोबा आपांनी कळविले, ''पुढील साली वेरवलीस आमच्या घरी लग्ने-मुंजी आहेत, त्यात तूही आपला मुलगा घेऊन ये म्हणजे तुला मुंजीचा निराळा खर्च

नको.'' वडिलांनी तो प्रकार मान्य केला आणि स. १८७७ च्या फाल्गुनात नारायणरावाची मुंज वेरवलीस झाली. तो समारंभ मनाजोगता झाला नाही म्हणून वडिलांस नेहमी त्याचा खेद वाटे.

हाच आमच्या उतरणीचा आरंभ. सन १८७७ हे साल हिंदुस्थानात अवर्षणाने पडलेल्या दुष्काळामुळे गाजलेले आहे. त्या साली धनगरमहालचे मक्ते रदद् होऊन प्रांतात जमीनसारा लागू झाला. वडील आजरी पडले. भर पावसाळ्यात अन्न नाही. उपास पडू लागले. ह्या वेळची माझी पत्रे विद्यमान आहेत, त्यात ता. १० सप्टेबर १८७७ चा खालील मजकूर आहे – ''आईने शेजारणीकडून दोन रुपये उसने आणले. सालपे गावात घाग नावाचा धान्य विकणारा शेतकरी होता, त्याजकडून त्या पैशाचे भात विकत आणले. शिवाय आणखी आणले ते शेते पिकाल्यावर परत करायचे.'' ही जी आमची घसरपटट्री चालू झाली तिचे निवारण पुढे २५ वर्षांनी मला नोकरी लागल्यावर व नारायणरावास रंगाच्या धंद्यात कामाई होऊ लागल्यावर स. १९०२ साली झाले. अर्थात आंम्हा सर्व मुलांचा हा शिक्षणाचा काळ व लग्नमुंजीचे वाढते खर्च ह्यांच्या कर्जाचा जाच किती व कसा झाला ते आता निराळ्या शब्दांनी सांगण्याची जरूर नाही. धनगरमहाल संपल्यावर वडिलांनी आंबेघाटांतले टोलनाके लिलावात तीन वर्षे घेतले, त्यातही त्यांना बूडच आली. पुढे त्यांनी कोल्हापूर संस्थानच हिर्डा जमा करुन विकण्याचा मक्ता घेतला. दोघेचौघे भागीदार जमविले, पण धंद्याच्या खरेदीविक्रीची वगैरे काहीच माहिती वडिलांस किंवा इतरांस नसल्यामुळे व सर्व उद्योग अंगाशी आला. पहिले कर्ज चारदोनशे होते ते चांगले चारदोन हजारांवर गेले. आंम्हा सर्व बंधूंच्या उद्योगाने व एकोप्याने संकट निवारण होऊन पंचवीस वर्षानी वडिलांस कर्जमुक्त केले हा चिरंतन आनंद आम्हास लाभला. आंम्हा सर्व बंधूंच्या त्या वेळच्या पत्रांत हे विषय आज स्पष्ट दिसतात.

६. रत्नागिरीची पाच वर्षे

शिपोशीची शाळा मी स. १८७९ च्या मे महिन्यात सोडली. ता. ५ ऑक्टोबर स. १८७८ च्या माझ्या पत्रात ''आमची पाचव्या यत्तेची परीक्षा पंधरा दिवसात होईल'', असे वाक्य आहे. त्याप्रमाणे परीक्षा होऊन पुढे सहावीचा अभ्यास चालू असता मला रत्नागिरीच्या इंग्रजी शाळेत जाण्याचा योग अकल्पित जमून आला.माझे मातुल बाळूमामा आठल्ये हे रत्नागिरीस वासुकाका आठल्ये वकिली करीत त्यांजपाशी कारकुनीवर होते. स. १८७९ च्या वैशाखात वासुकाकांचे सर्व कुटुंब भाऊसाहेबांच्या लग्नानिमित्ताने शिपोशीस जमले. माझी मातुश्री व बापूसाहेब लहानपणी एकत्र खेळलेले. शिपोशीच्या शाळेस बापूसाहेबांनी भेट दिली त्या वेळी माझी विचारपूस करून त्यांनी मला अगत्याने कळविले, ''आईला सांग, सर्व मुले घेऊन आमच्याकडे लग्नाला ये.'' त्याप्रमाणे आई सर्व मुलांना घेऊन लग्नाच्या दिवशी त्यांजकडे गेली. बाळूमामांनी बापूसाहेबांना आमची सर्वांची नावे सांगून ओळखी करून दिल्या. त्यात माझ्या अभ्यासाची विचारपूस करता इंग्रजी शिक्षण चालविण्याची वडिलांस ऐपत नाही असे ऐकून बापूसाहेब म्हणाले, ''तूर्त रत्नागिरीस तर आमच्या सर्व मंडळीबरोबर जा. तेथे हळू हळू सोय लागेल.'' एवढा आधार पुरेसा झाला. पुढे समारंभ आटोपला आणि जूनचे आरंभी मी रत्नागिरीस गेलो. तेथेही वासुकाकांचे घर होते, खाणवळीत जेवून त्यांजकडे अभ्यासास राहण्याची सोय लागली. घराहून तांदूळ वगैरे आणून

वारांऐवजी चार आठ आणे वर्गणी जमवून खर्चाची निभावणूक होऊ लागली. बाळूमामा अडीअडचणीस कपडे, पुस्तके वगैरे देत. ते आता मुंबईस बापूसाहेबांजवळ कारकुनीवर राहू लागले. स. १८७९ च्या जूनपासून नोव्हेंबर स. १८८४ पावेतो माझे साडेपाच वर्षे रत्नागिरीस गेली. वासूकाकांचे जावई तात्या कुळकर्णी त्यांच्याकडे राहून वकिली करीत. तयाचे माला मोठे मार्गदर्शन झाले. वासुकाकांनी रत्नागिरीस घराजावळ नवीन बंगला बांधला., त्यात मझ्या राहण्याची उत्कृष्ट सोय झाली. त्या बंगल्यात त्यांच्याजवळ मीही राहू लागलो, त्यामुळे निर्मल जीवनाचा लाभ मला सहजी घडला. त्यांच्या विहीरीचे उत्कृष्ट पाणी तर मला अद्यापि चांगले आठवते.

रत्नागिरीचे माझे पहिले वर्ष जम बसण्यांत गेले. स. १८८० च्या आरंभी हायस्कुलात दाखल झालो, तेव्हापासून नियमित अभ्यासाने व सच्छील वृत्तीने मी उत्तरोत्तर चढती पायरी गाठीत गेलो. केंव्हा माफी, केंव्हा एक दोन रुपये मासिक शिष्यवृत्ती मिळाल्याने खर्च भागत गेला, अडचण भासली नाही. वर्षात एकही दिवस गैरहजर नाही अशा विद्यार्थ्याला नियमितपणे बक्षीस – रेग्युलॅरिटी प्राइझ – मिळत असे, ते पाचपैकी दोन वर्षे मला मिळाले. शिवाय एक वर्षी एलिस प्राइझची पुस्तके मिळाली. माझे बहुतेक वर्गबंधू हुशार व अभ्यासू होते. त्यांची माझी चांगली चढाओढ चाले. दोनदा वर्षिक परीक्षेत माझ नंबर पहिला आला. मुटाटचे गणेश अनंत लेले व राजापूरचे सोनार विद्यार्थी हरि सदाशिव बेलवलकर हेच माझे निकट सहाध्यायी व स्नेही असून आम्ही तिघेही पुढे बी. ए. होऊन उद्योगास लागलो. लेले तर माझ्याबरोबर बडोदे संस्थानातच नोकरीस लागले.हे गणपतराव लेले थोडया वर्षापुर्वी कोकणात ता. १३ नोव्हेंबर, स. १९४७ रोजी, नरसोपंत केळकरांनंतर एक महिन्याने व महात्मा गांधीपूर्वी अडीच महिने वारले, म्हणजे स. १९८० पासून १९४९ पर्यंत सत्तर वर्षे त्यांचा माझा ऋणानुबंध टिकून राहिला. बेलवलकर राजापूर हायस्कूल चालवीत होते. ते मात्र लवकर वारले.

सुदैवाने रत्नागिरीस आंम्हास शिक्षकही कळकळीचे व विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे मिळत गेले. माधवराव काशीकर, रामभाऊ गांगण वाणी गोपाळराव करंदीकर, केशवराव रेगे हे दुसरीपासून पाचवीपर्यंत आमचे शिक्षक असून प्रत्येकाचा काही तरी विशिष्ट गुण विद्यार्थ्यांच्या चिरंतन हिताचा बनला. शाळा दररोज तब्बल पाचसहा तास चाले. उगाच वेळ मारुन नेणारा एकही शिक्षक आंम्हास मिळाला नाही. नृसिंहशास्त्री घाटे संस्कृत शिकवीत, हे शास्त्री दोन वर्षेपावेतो आंम्हास घरी खासगी रीतीने दशकुमारचरित शिकवीत, त्याचा उपयोग आंम्हास चांगला झाला. आमचा वर्ग मोठा, साठाचे वर गेला, तेंव्हा त्याच्या दोन तुकड्या करण्यात आल्या. आम्ही वरच्या तुकडीत असू. ह्या तुकडीतील आम्ही २७ विद्यार्थी मॅट्रिकला बसलो, त्यातले २६ उत्तीर्ण झाले. ह्यावरून आमची प्रगति लक्षांत येईल. दर शनिवारी सकाळी आठवड्याची लेखी परीक्षा असे, तिचा आंम्हास फार उपयोग झाला.

ह्या वेळी रत्नागिरी हायस्कुलात एक विलक्षण रुपान्तर घडून आले, त्यामुळे आम्ही पाच वर्षात हायस्कूलचा अभ्यास पूरा करून मॅट्रिक होऊ शकलो. शाळेचे हेडमास्तर नाना साठे म्हणून कडक शिस्तीचे गृहस्थ होते. आमचा त्यांचा फारसा संबंध आला नाही. ते इंग्रजी व गणित बरे शिकवीत. श. १८८१ साली पुण्यास न्यू इंग्लिश हायस्कूल स्थापन होऊन नवीन वळणाचे

केसरी पत्र निघू लागले, ते आम्ही रत्नागिरी येथे आवडीने वाचू लागलो. स.१८८२ च्या होळीच्या रजेत रात्री समुद्रावर आट्यापाट्या खेळून परत येतांना मद्यरात्रीच्या सुमारास हेडमास्तरांच्या घरापुढे मुलांनी जमून शंखध्वनि केला. त्यात हेडमास्तरांच्या मर्जीत नसलेले एक दोन म्होरके-पुण्याहून आमच्या शाळेत आलेले–वाकडा डाव खेळत होते, हे मला किंवा इतरांस त्या वेळी ठाऊक नव्हते. पुढे होळीच्या सुटीनंतर शाळा भरली तेंव्हा नेमून दिलेला अभ्यास झाला नाही ह्या सबबीवर हेडमास्तरांनी ह्या म्होरक्यांस व सरसकट सर्वांस छडीने झोडपून काढण्याचा प्रकार आरंभिला. त्यावेळी एका धटिंगणाने वर्गात छडी हातात धरुन सांगितले, ''सर, मारू बिरू नका, दंड करा किंवा शाळेतून हाकलून द्या, पण छडीचा मार आम्ही सहन करणार नाही.'' त्यावर हेडमास्तर बोलले, ''जा निघून शाळेतून'' असे म्हणताच तो आपली पुस्तके घेऊन बाहेर पडला. पुढे दुसऱ्यास विचारले, तोही तसाच निघून गेला. म्हणता म्हणता बहुतेक सगळा वर्ग बाहेर पडला. लगेच शाळेच्या बाहेर त्या सर्वांनी जमून ही शाळा सोडून पुण्याच्या न्यू हायस्कूलात जाण्याचा ठराव केला. वीसएक विद्यार्थी तरी बाहेर पडले. काही जे खुददू रत्नागिरीचेच होते ते अगतिकत्वामुळे राहिले. मला वाटते शिवराव महादेव परांजपे व वामनराव पोतदार हे ह्या मंडळीचे पुमुख रत्नागिरी सोडून पुण्यास गेले. त्या साली रत्नागिरीतून एकही विद्यार्थी मॅट्रिकला बसू शकला नाही.

रत्नागिरी हायस्कूल म्हणजे सर्व इलाख्यात नमुनेदार गणले जात होते. अगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति सालोसाल रत्नागिरीला मिळायची तो प्रकार नाहीसा होऊन स. १८८२ साली मॅट्रिकला बसणारे विद्यार्थी नाहीत हे वैगुण्य डायरेक्टर चॅटफिल्डना अत्यंत झोंबले. स. १८८३ च्या मे महिन्यात त्यांनी मुददाम नाना साठे ह्यांस भेटीस बोलावून ठपका दिला. नानांनी कळविले, ''माझ्या हाताखाली योग्य शिक्षक नाहीत तर मी सुधारण कशी करणार'' त्यावर सर्व इलाख्याची शिक्षकयादी नानांपुढे टाकून चॅटफिल्ड म्हणाले, ''ह्यांतले वाटेल ते दोन इसम तुम्ही पसंत करा. मी ताबडतोब त्यास रत्नागिरीस दाखल होण्याचा हुकूम देतो.'' त्यावर नानांनी गणेश व्यंकटेश जोशी फर्स्ट असिस्टंट व मोरो वामन कीर्तने दुसरे असे गृहस्थ पसंत केले. मे अखेरच्या वादळी हवेत ह्या दोघांना ५ जून रोजी रत्नागिरीस दाखल होण्याचा हुकूम सुटला. आगबोटीचा दुर्घट प्रवास. बिचारे निमुटपणे बोटीचे हाल सोशीत नोकरीवर रत्नागिरीस आले. व्यक्तिशः हा बनाव मुददाम दैवाने माझ्या हिताचा घडवून आणिला असे नंतर माझ्या प्रत्ययास आले.

आमच्या वर्गातील हुशार विद्यार्थी निवडून सहावीचा नवीन वर्ग बनविण्यात आला आणि कीर्तने ह्यांनी सहा महिन्यात सहावी पुरी करून दिली. ते इंग्रजी व इतिहास हे दोन विषय चांगले शिकवीत. सन १८८३ च्या दिपावळीस परीक्षा होऊन आम्ही लगेच मॅट्रिकच्या वर्गात चढलो, तेंव्हा आमचे गुरू जोशीबाबा बनले. टिळक, रानडे, गोखले, ह्यांच्या तोडीचे हे विद्वान गृहस्थ एक वर्ष आम्हांस लाभले हा आमचा सर्वात मोठा लाभ होय. शांत, सावकाश, अस्खलित असा त्यांचा वचनौघ होता. सायंकाळचा शेवटचा तास सुरू झाला की ते व आम्ही अभ्यासांत एकचित्ताने देहभान विसरून सर्व विषय इतके भराभर शिकलो की अद्यापि त्यांचे ते उच्चार

माझ्या कानात घोळत आहे तसे वाटतात. सायंकाळ होत आली म्हणजे खोलीच्या बाहेर उघड्या जागेत उभ्यांनी काम चाले ते अंधार पडून दिसेनासे होईपर्यंत. ते सर्व टिपणे लिहून पाठ करण्यास देत. आम्ही ती रात्री व सकाळी खपून आत्मसात करीत गेलो. कोणाचा अभ्यास बरोबर झाला नाही तर ते जोशीबाबा अशा कठोर शब्दांनी वर्गात चर्चा करीत की अंतःकरणास जखमाच व्हाव्या. शाकुंतल वगैरेतील श्लोक त्यांनी आंम्हास शिकविलेले मी विसरू शकणार नाही. मजवर त्यांचा लोभ विशेष होता आणि पुढेही माझ्या रियासती वाचून त्यांनी मला अखेरपावेतो चांगले मार्गदर्शन केले. सद्‌गुरू भेटणे ही भाग्याची गोष्ट होय. तशी त्यांजबदद्‌ल आमची पुज्यबुध्दी कायम राहिली.

दुसरे शिक्षक मोरोपंत कीर्तने हे पुढे माझे श्वशुर बनले. जणू काय मुलीला वर शोधण्याकरिताच आठनऊ महिने मला त्यांचा सहवास रत्नागिरीस घडला. मी त्यांचा विद्यार्थी अविवाहीत आहे असे कळताच त्यांनी माझ्या वडिलांस मुलगी पाहण्यास बोलाविले. वडिल आले, त्यांना मी सांगितले, ''आंम्ही आहो एवढ्यांचेच पोषण आज होत नाही, मग आणखी एक प्राणी पोसण्यास का वाढवावा'' मुलगी पाहून त्यांनी पसंत केली, पण माझा हटट्‌ त्यांनी कीर्तने ह्यांस सांगितला, त्यावरुन त्यांनी उलट कळविले, ''आम्ही आज मुलीच्या अंगावर चालचलाऊ दागिने घालू. जावई समर्थ होईपर्यंत तिला माहेरी पोसू आणि माझा कॉलेजच्या अभ्यासाचा खर्च सोसू.'' असे सांगितल्यावर मी निरुत्तर झालो. बापूसाहेब, तात्या कुलकर्णी, इत्यादि हितचिंतकांनी माझी समजूत घातली. ता. २९ फेब्रुवारी, स. १८८४ रोजी रत्नागिरीस विवाह होऊन आमच्या घरी लक्ष्मी आली. पुढील महिन्यांत कीर्तन्यांची बदली पुण्यास होऊन ते तिकडे निघून गेले. एवंच, माझा हायस्कूलचा अभ्यास तर झालाच, पण कॉलेजच्या शिक्षणाचीही तरतूद सिध्द झाली हा माझ्या भाग्यशाली लग्नाचा विषय कोकण प्रांतात कैक दिवस विशेष गाजला.

७. कॉलेजची चार वर्षे

हायस्कुलात जरी माझा नंबर वर राहत गेला तरी कॉलेजच्य अभ्यासात मला नेहमी तिसऱ्या वर्गातच रखडावे लागले. एकंदरीत माझी बुध्दी बेताचीच असून नियमित उद्योगाने मी आपला निभाव करीत गेलो. स. १८८४ च्या डिसेंबरात मॅट्रिकचा निकाल लागताच श्वशुरांनी मला पुण्यास बोलावून जानेवारीत फर्ग्युसन कॉलेज नवीन निघणार होते त्यात दाखल होण्याची सूचना केली. श्वशुरांची नोकरी पुणे हायस्कुलांत सेकंड असिस्टंटची असून ते डोलकर आळीत राहत असत. जवळच गद्रे ह्यांच्या वाडयात नवीन कॉलेज चालू झाले. अर्थात श्वशुरांकडे राहून कॉलेजचा अभ्यास थोडया खर्चात भागण्याची सोय झाली. ता. १ जानेवारी स. १८८५ रोजी मी रात्री मुंबईहून निघून दुसऱ्या दिवशी सकाळी पुण्यास मक्कामावर दाखल झालो. हा माझा पहिला आगगाडीचा प्रवास विशेष स्मरणीय वाटला. कॉलेजात मला फी माफ झाली.

रत्नागिरीहून पुण्याचे वातावरण अगदीच भिन्न. तेथे टारगटपणा व खोडकर वृत्ति मला चहूकडे अनुभवावी लागल्यामुळे माझे मन कधी प्रसन्न राहिले नाही. शिवाय श्वशुरगृहीचा तुरुंगवास, माझी बोली व राहणी कोकणी, कीर्तने घराणे पुण्यात नाणावलेले, त्यांचे जावईही तेथे पुष्कळ, बहूतेक भपकेबाज व ऐपतवान, सणसमारंभानिमित्त दहापाच जावयांचा मेळवाडा जमायचा.

बडोद्याचे नायब दिवाण विनायकराव कीर्तने, त्याचे बंधु नीलकंठराव व माझे चुलत सासरे केशवराव हे सर्व त्या वर्षी पुण्यास जमले, त्या निमित्ताने जावयांच्या पंक्ती झाल्या. त्यात मी अगदी वेगळा पडायचो. कॉलेजच्या प्रत्यक्ष वर्गात स्नेही असे माला कोणी लाभले नाहीत. न्यू इंग्लिश स्कुलातीलच विद्यार्थी कॉलेजात दाखल झालेले, बाहेरचे माझ्याससारखे फार थोडे, त्या सर्वांचे पूर्वीचे शिक्षक तेच आता प्रोफेसर बनलेले. टिळक, आगरकर, आपटे, केळकर, इत्यादिकांशी त्यांचे हे पूर्वीचे विद्यार्थी लगट करीत तशी सलगी आमच्यासारख्या बाहेरच्यांना शक्य नव्हती. वामन मोरेश्वर पोतदार, विनायकराव रानडे, वगैरे माझे सहाध्यायी त्या वेळी ओळखीचे झाले, ते परवापर्यंत साठ वर्षे आम्ही एकत्र परिचित राहिलो. आता मीच तेवढा एकटा मागे एकलाकोंडा राहिलो आहे. हरिभाऊ आपटे कादंबरीकार आमच्या वर्गात होते, पण त्यांचा माझा निकट परिचय पुढील काळात झाला. कॉलेजच्या दिवसात ह्या पुणेकरांचा मला अत्यंत धाक वाटे. या कारणास्तव मी कोणाशी विशेष न मिसळता आपल्या कामात निमग्न राहिलो. फर्ग्युसन कॉलेजला प्रीव्हियसपुरतीच परवानगी होती.

पुण्यास माझे वास्तव्य फार तर सहा सात महिनेच म्हणजे स. १८८५ चे दोन विभाग, पहिला हिवाळी जानेवारी-एप्रिलचा व दुसरा जून-सप्टेंबरचा पावसाळी. ऑगस्टांत श्वशुरांची बदली सोलापुरास झाली आणि कॉलेजचा वार्षिक क्रम संपताच सप्टेंबरात मी मुंबईस बापूसाहेब आठल्यांकडे आलो. नोव्हेंबरात प्रीव्हियस परीक्षा होऊन मी पुढे मुंबईसच एल्फिन्स्टन कॉलेजात दाखल झालो. बापूसाहेबांचा आधार व समागम हे बहुमोल फायदे मला मुंबईतच शक्य झाले. त्यांचे बंधू भाऊसाहेब, दुसरे एक तेथील विद्यार्थी गणेश विष्णू आठल्ये, त्याच घरांत खालील मजल्यावर राहणारे राजारामशास्त्री बोडस ह्यांचे चिरंजीव माधवराव व मी असे चार विद्यार्थी दररोज आगगाडीने चर्नीरोडवरुन महालक्ष्मी स्टेशनला जाऊन तेथून राणीच्या बागेसमोर एल्फिन्स्टन कॉलेज या वेळी होते त्यांत जात असू. माझे भोजन खाणावळीत असून कधी माफी, कधी थोडीशी शिष्यवृत्ती, कधी हायकोर्टातील कागदाच्या नकलांचे काम बापूसाहेबांकडून मिळे त्याजवर निर्वाह चाले. अडीअडचणीस बाळूमामा आठल्ये होतेच. वर्ष दोन वर्षे शिकवणीची प्राप्ती पदरात आली. मिळून अडचण अशी कधी वाटली नाही. एकंदरीत कॉलेजचा तो माझा काळ मजेचा म्हणता न आला तरी जीवनाच्या तयारीत बरा सुखाचा गेला ह्यात संशय नाही. त्यातून माझा सर्व खर्च भागविण्याची सोय श्वशुरांस नव्हती म्हणून त्यांचे आर्थिक साहय न घेता मी स्वावलंबन स्वीकारले हा चिरंतन अभिमानाचा प्रकार मला लाभला.

बापूसाहेबांचे घर म्हणजे निर्मळ आनंदाने वाहणारा सन्नीतीच संतत प्रवाह, तो मला पूर्ण अनुभवण्यास मिळाला. भिन्न पेशाच्या विद्वद्व्यसायांच्या व्यक्तींनी त्यांचे घर सदैव गजबजलेले असे. मंडलिकांसाठी बापूसाहेब मनुस्मृतीचे संपादन करीत होते. खालच्या मजल्यावर राजारामशास्त्र्यांजवळ त्यांचे अध्ययन चाले. युनिव्हर्सिटीच्या वार्षिक परीक्षकांचे सत्र व प्रश्नपत्रिका एम. ए. पासून मॅट्रिकपर्यंतच्या निघावयाच्या त्यात जुने, अनुभवी व सर्वांच्या विश्वासास पात्र असे योग्य सल्लागार एक बापूसाहेब असल्यामुळे, भांडारकर पितापुत्र, काशीनाथपंत तेलंग, विश्वनाथ नारायण मंडलिक, जिनसीवाले, लक्ष्मण रामचंद्र वैद्य, वामन शिवराम व महादेव

चिमणाजी आपटे, बाळ गंगाधर टिळक अशा नानाविध व्यक्ति कामानिमित्त बापूसाहेंबांकडे येत. त्यांच्या निरोप्याचे काम मला मिळून, त्यांचा परिचय घडत गेला. ब्राम्हण सभेचा उगम त्याच वेळी प्रथम बापूसाहेंबांकडे निर्माण झाला. स. १८८५ च्या डिसेंबरात इंडियन नॅशनल कॉंग्रेस ह्या राष्ट्रसभेची पहिली बैठक मुंबईस झाली त्या वेळी प्रथम बापूसाहेबांचे बंधु आपासाहेब मद्रासला डॉक्टरी करीत ते तिकडचे पुष्कळ प्रतिनिधि घेऊन मुंबईस बापूसाहेबांच्या घरी उतरले. आर. रघुनाथ बॅनर्जी, आनंदा चार्लू, पंडित अयोद्यानाथ अशा अनेक राष्ट्रविभूतींचे पहिले दर्शन मला त्या प्रसंगी घडले. बापूसाहेब आठल्ये म्हणजे एक झाकले माणिक, आकृतीने लहान पण विव्दत्तेने थोर. भिन्न प्रकृतीच्या व्यक्तींकडून सहकार्य करवून एखादा इष्ट प्रयोग सिध्दीस नेण्याचे त्यांचे कौशल्य अनुपम होते. सर्वांना ते पूज्य वाटत. त्यांचा निर्णय सर्वांनी मनापासून मान्य करायचा. आदल्या वर्षी पुण्याच्या मुक्कामांत हिराबागेतील वसंत व्याख्यानमालेस हजर राहण्याचा योग आला, त्या वेळी माधवराव कुंठे व माधवराव रानडे ह्यांचे जाब प्रतिजाब ऐकायला मिळाले. ते पुण्याचे वातावरण व मुंबईचे हे भारतीय प्रतिष्ठितांचे संमेलन ह्यांचा मनोरम ठसा माझ्या शिकाऊ वृत्तीवर कायमचा उठला. त्यावरून मी कशा वातावरणांत वाढलो हे दिसून येते.

पण मुंबईच्या या परिसरांत मला कॉलेजचे अभ्यासू जीवन व तेथील वसतिगृहाचा अनुभव मिळू शकला नाही. मी व माझे कित्येक सहाध्यायी शहरात राहून ठरावीक तासांपुरते कॉलेजात जात असू. कॉलजचे पुस्तकालय क्रीडांगण, विद्यार्थ्यांच्या चढाओढी, गमती किंवा प्राध्यापकांचा परिचय ह्यांचा लाभ मला मिळाला नाही. वर्डस्वर्थससारख्यांचे इंग्रजी व्याख्यान मला बिलकूल समजत नसे, ह्याची मला मोठी हळहळ वाटे. एल. आर. वैद्यांनी मालतीमाधव आंम्हास उत्कृष्ट शिकविले, त्यातले पुष्कळसे मला अद्यापि पाठ येते. कादंबरीचा अभ्यास आम्ही घरीच केला. पीटर्सन संस्कृत शिकवीत, त्यांचे ज्ञान यथातथाच असे. हॉथार्नथरोट गणित शिकवीत, त्या विषयांत मी पास झालो. झळकीकरशास्त्री तर्कसंग्रह शिकवीत ते मला आकर्षक वाटले नाही.पण घरी अभ्यास करून स. १८८६ अखेर मी पहिली बी. ए. संपादन केली.

ह्या सालची एक दुःखद आठवण म्हणजे बापूसाहेबांचे धाकटे बंधु आपासाहेब ह्यांचा मृत्यु होय. स.१८८५ साली ते राष्ट्रीय सभेच्या बैठकीस मद्रासहून मुंबईस आले होते. त्यांचा कामाचा व्याप भारी व महत्वाकांक्षा अनिवार, त्यामुळे त्यांना विश्रांती कशी ती मिळत नसे. प्रकृति सांभाळण्याकडे लक्ष नसल्यामुळे स.१८८६ च्या उन्हाळ्यात त्यांना मद्रास येथे उन्मादवायूचा विकार झाला. बापूसाहेबांना मुंबईस बातमी कळताच ते डॉ. नानासाहेब देशमुखांना घेऊन मुंबईस आले. आपासाहेब शुध्दीत नव्हते, अंगावरचे वस्त्र फेकून भुईवर गडबडा लोळत. असे चार आठ दिवस गेल्यावर ता. १ जुलै रोजी सकाळी आपासाहेब वारले. सोनापुरात आम्ही स्मशानयात्रेस गेलो. बरोबर विश्वनाथ नारायण मंडलिक वगैरे पुष्कळ परिचित मंडळी होती. ह्या घटनेचा परिणाम मुख्यतः बापूसाहेबांच्या प्रकृतीवर होऊन ते कुटुंबभाराने खचून गेले. तितक्यातच त्यांची बायको दुखण्याने वारली. तेंव्हा रोजचे कामही त्यांना होईनासे झाले. जीर्णज्वर येऊ लागला. मुंबईच्या राहणीत आराम पडणे अशक्य वाटून त्यांनी बडोद्याची नोकरी स्वीकारली. सयाजीरावांनी मुंबई हायकोर्टाकडे जज्जाच्या जागेसाठी एका तरुण वकिलाची मागणी केली

होती. हायकोर्टाकडून बापूसाहेबांची शिफारस झाली.ता. २ मार्च, स. १८८७ रोजी दरमहा ७०० रुपयांवर बापूसाहेबांनी बडोद्याच्या नोकरीचा स्वीकार केला. लगेच गुढीपाडव्याच्या दिवशी ते तेथे दाखल झाले. नोकरीत मुंबईपेक्षा जास्त आराम मिळेल अशी बापूसाहेबांची अपेक्षा होती ती खोटी ठरली. अधिकाऱ्यांकडून सडकून काम घेण्यांत सयाजीराव अत्यंत दक्ष. शिवाय बडोद्याची हवाही मुंबईहून खराब.बडोद्यातच वैशाखात नवीन मुलीशी त्यांनी लग्न केले अर्थात गृहसौख्य त्यांना कधी लाभलेच नाही. मला मात्र त्यांनी बडोद्याच्या नोकरीत नेले हा माझा फायदा आणि तेथे सतत सात वर्षे मला त्यांचा समागम मिळाला हे विशेष. मार्च १८९४त ते आजारी होऊन मुंबईस गेले आणि लगेच ता. २९ रोजी निवर्तले. बापूसाहेबांच्या तीव्र बुध्दीला निकोप शरीराची जोड नव्हती. आठल्ये घराण्याच्या इतिहासात मी त्यांचे व त्यांच्या वडिलांचे चरित्र लिहिले आहे, त्यावरून मला ह्या घराण्याचा केवढा उपयोग झाला ते कळून येईल. माझ्या कॉलेजकाळाचे हे स्मृतिशेष होत.

बापूसाहेब बडोद्यास गेले, तेंव्हा त्यांचे मुंबईचे घर मला सुटले. नजीकच झावबाच्या वाडीत जनोबा किर्लोस्कर म्हणून बापूसाहेबांचे परिचित व व्यवहारज्ञ गृहस्थ होते, त्यांजकडे मी राहण्यास गेलो. तेथेही माझा काळ चांगला गेला. पण स. १८८७ सालची माझी बी. ए. ची परीक्षा नापास झाली. वास्तविक त्यावेळी फर्स्ट बी. ए. कठीण समजली जाई. तीत मला गोता आला नाही आणि दुसरी बी. ए. अत्यंत सोपी समजली जाई तीत मी दगावलो. त्यामुळे अल्पकाळ खर्चाची कुचंबणा झाली. पण बापूसाहेबांच्याच शिफारसीने गोकुळदास तेजपाळच्या बोर्डिंग संस्थेचा आश्रय मला मिळाला आणि मी गवालिया तलवावरच्या त्यांच्या इमारतीत सुमारे ११ महिने राहिलो आणि स. १८८८ च्या नोव्हेंबरात पुनः परीक्षेस बसून बी. ए. पास झालो. कॉलेजात असतानाच मी एलएल. बी. चा अभ्यासक्रम पुरा करीत होतो. ज्यूरिस्प्रूडन्सची माझी परीक्षा झाली. बी. ए. झाल्यावर तो विषय पुरा करावा अशा विचारात मी असता विधिघटना निराळीच बनली. बडोद्यास महाराजांना स्वतःजवळ रीडर म्हणून वर्तमानपत्रांचे व खासगी पत्रांचे कारकुनी काम करण्यास कोणी असेल तर बी. ए. पास झालेला इसम पाहिजे होता. ''तुमच्या खात्रीचा कोणी असेल तर बोलवा,'' असे महाराजांनी बापूसाहेबांस सांगितले. त्या वेळी मी मुंबईस परीक्षेस बसलो होतो. ''मी खात्री देऊ शकेन असा एक इसम हल्ली परीक्षेस बसला आहे, तो आपणास पाहिजे तर मी बोलावू शकेन,'' असे बापूसाहेबांनी महाराजांस कळविले. त्यावर त्याला अवश्य बोलावून घ्या असा हुकूम महाराजांनी लगेच बापूसाहेबांस दिला. त्यावरून त्यांनी मला मुंबईस लिहिले, ''परीक्षा पास होऊन वकिलीकडे न जाता नोकरी करणे असेल तर तू लगेच बडोद्यास ये.'' म्हणजे परीक्षेचा निकाल होण्यापूर्वी माझे पुढील जीविताचे ताट अगोदरच वाढून सिध्द होते.

स. १८८८ च्या क्रिस्तमसच्या पूर्वदिवशी परीक्षेचा निकाल होऊन मी लगेच बडोद्यास गेलो. दरम्यान महाराज आपल्या आजारी मुलाच्या प्रकृतीसाठी महाबळेश्वरी गेले. त्यांचे बंधु संपतराव सेक्रेटरी होते त्यांनी ता. १ जानेवारी, स. १८८९ रोजी दरमहा ७० रु. पगारावर माझी नोकरी चालू केली आणि महाराजांस कळविले, ''ह्या नवीन गृहस्थास राजवाडयांतील

रीतरिवाजांची वाकबगारी मुळीच नाही, सबब त्यास मी चार दोन महिने येथे बडोद्यात मजजवळ ठेवून तयार करतो अणि मग आपलेकडे पाठवीन.'' त्यावर महाराजांचा जबाब तारेने आला की त्या गृहस्थास येथेच पाठवून द्या, रीतरिवाज तो आमच्याजवळ शिकेल. त्यावरून लगेच मी बापूसाहेबांकडून १०० रु. उसने घेतले आणि बाळूमामांसह मुंबईस आलो. तेथे नवीन कपडे वगैरे सर्व दरबारी थाट, कोट, पाटलोण, बूट, मोजे, पागोटे, वगैरे दोन तीन दिवसांत बनवून पुणे-वाठारपर्यंत आगगाडीचा प्रवास करून तेथून पुढे चाळीस मैल घोड्याच्या मेलतांग्यातून ता.११ जानेवारी, स.१८८९ रोजी सायंकाळी महाबळेश्वराच्या मुक्कामावर पोचलो. महाराजांचे डॉक्टर रामभाऊ तळवलकर स्वारीत महाराजांबरोबर होते, त्यांस बापूसाहेबांनी ओळखीचे पत्र मजजवळ दिले होते. रात्री त्यांजकडे राहिलो. सकाळी मला पर्सनल मॅनेजर आपासाहेब पुणेकर म्हणून होते त्यांस रामभाऊंनी भेटवून मला महाराजांकडे पोचविण्याची तजवीज केली.

शनिवार ता. १२ जानेवारी, स. १८८९, पौष शु. ११ शके १८१० ह्या दिवशी महाराजांशी माझी पहिली भेट कशी विचित्र झाली तो योगायोग अविस्मर आहे. सकाळी आठानंतर स्नान व कपडे करून मी पुणेकरांच्या तंबूवर गेलो. जवळच्या बंगल्यांत महाराज राहत असून ते त्या वेळी घोडयावर फिरायला गेले होते. पुणेकरही कपडे करून मला म्हणाले, ''आताच महाराज घोडयावरून परत येत आहेत. मी जाऊन तुंम्हास भेटवितो.'' मला तंबूत बसवून ते बंगल्यावर गेले. मी आल्याचे वर्तमान त्यांनी महाराजांस कळविले. तितक्यात महाराजांची स्नानाची तयारी झाली. श्मश्रू वगैरे आटोपण्यास साडेदहा वाजले. मी तंबूत तिष्ठात बसलो. महाराज व पुणेकर दोघेही माझा विषय विसरून गेले. ११ वाजता महाराजांचे भोजन चालू झाल्यावर मग पुणेकर १२ च्या अंदाजात परत तंबूवर येतात, तो मला पाहून ते लगेच म्हणाले,''तुमचे नाव मी महाराजांस सागितले आहे. आताच तुमची भेट करवितो.'' असे म्हणून त्यांनी जासुदास बोलावून त्याजबरोबर मला महाराजांकडे पाठविले. त्या वेळी महाराज पुढच्या व्हरांडयात भेजनोत्तरची शतपावली करीत होते. सोललेले ओले बदाम हातात घेऊन तोंडात टाकीत बरोबर त्यांचे चुलत बंधु अवचितराव ह्यांच्याशी बोलत असलेले ते मला प्रथम दिसले. अंगात एक कुडते, पायांत विजार व सपात, डोके उघडे, पण अवचितराव मात्र पागोटयासह पूर्ण वेषात. अशा दोघांस पाहून क्षणभर मला पंचाईत पडली की ह्यातले महाराज कोणते पण जवळ जाताच हा माझा भ्रम निरास पावला. महाराजांच्या सांगण्यावरून अवचितरावांनीच मला तुम्ही कोठले, नाव काय असे काही प्रश्न विचारले. मी उत्तरे सांगताच महाराजांनी, तुम्ही बी.ए. कधी झालात, परिक्षेला विषय कोणते होते, दुसरी भाषा संस्कृत होती की काय त्यांची मी उत्तरे देऊन मला संस्कृत भाषा परिक्षेला होती असे सांगितले. त्यावर मोडी येते काय, इंग्रजी अक्षर कसे आहे, असे विचारून ते मला बोलले, ''आत चला, मला तुमचें अक्षर कसे आहे पाहू.'' मी त्यांजबरोबर आत गेलो. खोली लहानशीच असून तीत एक टेबलखुर्ची व जवळ बिछाना घातलेला एक पलंग, टेबलावर लेखनसाहित्य. ते दाखवून मला महाराज बोलले, ''खूर्ची घ्या आणि मी सांगतो ते लिहा.'' मी कागद टांक घेऊन लिहू लागलो, ते मला तोंडाने इंग्रजी मजकूर सांगू लागले. येथे थोडा पूर्वसंदर्भ सांगितला पाहिजे.

बडोद्यास जमीन-मापणी व इनाम-देवस्थान ठरविण्याचे नवीन खाते नुकतेच सुरू होऊन त्याची रचना ठरविण्यासाठी दिवाण, नायब-दिवाण, सटलमेंट कमिशनर, वगैर अधिकारी महाबळेश्वरी त्यावेळी आले होते. मी येण्यापूर्वी ८-१५ दिवस ह्या विषयाची वाटघाट महाराजांपुढे चालून तदनुसार त्यांना आपला निकाली हुकूम द्यावयाचा होता. महाराजांच्या मनात तत्संबंधीचे विचार असता मी भेटीस आलो, तेंव्हा अनायास माझी परीक्षा पाहण्याच्या हतूेन ते मला तोंडाने मजकूर सांगू लागले. मीही तसाच नेटाने लिहू लागलो. बारखळी, घरणिया, वचाणिया असे किती तरी अपरिचित शब्द महाराज तोंडाने सांगत ते मी तसेच लिहू लागलो. मधून मधून ते फिरत व काही वेळ पलंगावर बसून सांगत. लिहिता लिहिता किती वेळ झाला ते कळल देखील नाही. वीस पंचवीस ताव तरी सहज लिहून झाले. मध्यंतरीत मला यापूर्वीचा मजकूर पुनः वाचण्यास सांगत. त्यांना ठाऊक नाही की मला जेवायचे आहे. मलाही लेखनाच्या ओघात दुसरा विषय बोलता येईना. असे होता होता चार वाजून गेले. ते सारखे सांगताहेत आणि मी उपाशी लिहित आहे.

दरम्यान आपासाहेब आपल्या मुक्कामावर भोजन आटोपून, विश्रांति, चहा वगैर उरकून साडेचारच्या सुमारास नित्यक्रमानुसार बंगल्यावर येऊन महाराज काय करताहेत त्याचा तपास करू लागले. नोकराने त्यांस सांगितले, ''दोन प्रहरी भेटीस आलेले ते नवीन गृहस्थ व महाराज आत लिहीत आहेत.'' हे एकून त्यांना उमज पडली की मी उपाशी आहे. दबत दबत ते आत आले आणि दिलगिरीच्या सुरात महाराजांस म्हणाले, ''ह्या गृहस्थाचे जेवण झालेले नाही.'' महाराजांनी आश्चर्य वाटले आणि ते मला म्हणाले, ''का हो तुमचे जेवण झाले नाही काय? मला का नाही सांगितलेत. ठेवा ते कागद आटोपून आणि जा घरी जेवायला.'' मला सहजी एकादशी घडून जीवनाची खरी परीक्षा यशस्वी झाली. *कॉलेज संपताच मी स्वकष्टाने जीवन कंठू लागलो.

●●●

* ''श्री सयाजी गौरव ग्रंथ'' ह्यांत मी ह्या आठवणी विस्ताराने दिल्या आहेत त्या पाहाव्या.

२.
ज्ञानार्जनाची संधि

१. माझे प्रवास

बडोद्याच्या नोकरीत मला सर्वात मोठा फायदा झाला असेल तर तो प्रवासाचा होय. महाराज महाबळेश्वरी असल्याने तेथे मी प्रथम त्यांच्याजवळ दाखल झालो. महाबळेश्वरास पाच महिने राहून महाराज महिनाभर पुण्यास व तेथून नीलगिरीस चार महिने काढून दिवाळीस बडोद्यास गेले. अर्थात पहिल्या दहा महिन्यांतच मला मुंबई, पुणे, मद्रास, नीलगिरीपावेतोंच्या प्रदेशाची ओळख झाली. केवढे भाग्य नि काय मला रस्त्यांत महाराजांनी मला आरकोनम स्टेशनवरून मद्रासेस सर टी. माधवराव ह्यांजकडे पाठविले. त्या योगाने दोन दिवसपावेतो मला त्या थोर पुरुषाचा निकट समागम लाभला. ह्या माझ्या पहिल्या वर्षाचा पायगुणच काही विलक्षण म्हटला पाहिजे. महाराज, महाराणी, मुले, त्यांचे नातेवाईक, मानकरी, दिवाण, महाराजांचे गुरू एलियट, कारकून, नोकर अशा हजार पाचशे नवीन व आनोळखी मंडळीचा सहवास मला एकाएकी घडून आला. रत्नागिरीच्या कोकणातील एकान्त भूभागाच्या गांवढळ वातावरणांत वाढलेला मी तेवीस वर्षाचा युवा एकाएकी नवीन सृष्टीत येऊन पडलो, हा काय अद्‌भूत योंगायोग असेल त्याची कल्पना करावी. मात्र ह्या अपरिचीत वातावरणाने मी गांगारुन गेलो नाही. जो काही व्यवहार पुढे येईल तो पूर्ण तपासाने समजून घेऊन मी आपले कर्तव्य बजावीत गेलो. निष्कपट शिकाऊ वृत्ति अंगी असल्यामुळे माझे कधी अडले नाही. हा माझ्या नोकरीचा प्रयोग इतका यशस्वी झाला की त्यांनी अखेरपावेतो मला राजवाडयाच्या ठरीव मर्यादेत व एकंदर कुटुंबाच्या शुश्रुषेत कायम कोंडून ठेविले. नीलगिरीस कुनूर व उटकमंड ह्या दोन्ही ठिकाणी महाराजांचे मुक्काम झाले म्हणून त्या प्रदेशाची मला पूर्ण माहिती झाली. दररोज मी पायी फिरण्यास जात असे, त्यात बहुधा महाराजांचे डॉक्टर रामभाऊ तळवळकर हे मला सोबतीस मिळाल्याने राजवाडयातील वर्तनाची, खाण्यापिण्याची व इतर पुष्कळ उपयोगी माहिती मला मिळत गेली. महाराजांनी युरोपातून झिंगारा नावाची एक सहलीची आगबोट ह्या वेळी विकत आणली. तिजवरून महाराजांनी

बाणकोटपासून सुरतपावेतोंचा प्रवास पश्चिम किनाऱ्यावर केला, त्यात मीही त्यांच्याबरोबर असल्याने ती समुद्राची सहल मला अत्यंत स्मरणीय घडली. महाराजांचा व जमनाबाई महाराणींचा कौटुंबिक कलह बरेच दिवस चालू होता, तो बापूसाहेब आठल्यांनी मिटविला. त्या प्रकरणात बापूसाहेबांचा हस्तक म्हणून मीही वावरत राहिलो, तेणेकरून हिंदी संस्थानाच्या जनानखान्याची व अंतर्गत व्यवहारांची माहिती मला कळून आली. ह्याचा मला इतिहासलेखनात पुढे चांगला उपयोग झाला.

नीलगिरीची थंड हवा महाराजांस विशेष पसंत झाल्यामुळे तिकडे त्यांच्या खेपा वारंवार होऊ लागल्या. स. १८८९ पासून स. १९१२ च्या दरम्यान दहा तरी खेपा महाराजांनी उन्हाळयाच्या दिवसात तिकडे केल्या, त्यांचा फायदा मलाही मिळाला. पुढे तर त्यांनी उटकमंड येथे स्वतः चे बंगले बांधून आपली हवी तशी व्यवस्था करून घेतली. शिवाय महाराज लोंनावळा, पुणे, देवळाली, महाबळेश्वर, इत्यादि ठिकाणी जातच असत. अर्थात मलाही हे प्रवास पुनः पुनः घडत गेले. बडोदे राज्यात सुरतेजवळ समुद्रकाठी उमरठ म्हणून गाव आहे तेथे महाराजांचे वाडे व बागा असून आरंभी कैक वर्षे ते उन्हाळ्यांत तेथेच राहत असत, पण पावसाळ्यात ती जागा निरुपयोगी म्हणून पुढे सोडून दिली. समुद्रस्नान, आट्यापाट्या, शिकार, इत्यादि व्यवसाय महाराजांचे उमरठ येथे चालत. मिळून ह्या व्यवसायांनी माझेही जीवन त्या ठिकाणी समरस बनत गेले.

बडोद्याच्या पश्चिमेस वीस मैलांवर मही नदीच्या काठी डबका नावाच्या गावात महाराजांचे वाडे होते. तेथे डुकराच्या शिकारीची विस्तीर्ण मैदाने आहेत. घोड्यावरून किंवा हत्तीवरून येथे सालोसाल महाराज शिकरीस जात. बरोबर दोनचार माणसांचा जमाव असून पुष्कळदा रेसिडेंट व त्यांचे पाहुणे तेथे शिकारीसाठी येत. मही नदीत रात्री दारुकाम सुटे, हंगाम सालोसाल घडून आठ पंधरा दिवस, बोरे, हुरडा, उन्ध्ये वगैरेचे सेवन म्हणजे एक विचित्र टूम अनुभवण्यास मिळे. उन्ध्ये म्हणजे मातीच्या मोठ्या मडक्यात वांगी, बटाटे, गाजरे, वालपापडी असे पदार्थ भरून त्यात मीठमिरचीचे थर घालून तोंडे बंद करून उलटे ठेवतात आणि वरून गवतलाकडाच्या आगीने भाजतात. त्यामुळे आतल्या भाज्या सुंदर शिजतात. ही उन्ध्यांची मेजवानी म्हणजे एक अपूर्व प्रकार असून तो माझ्या स्मरणात कायम आहे. हत्ती, घोडे, उंट किंवा बैलगाडी अशा वाहनांनी आम्ही सर्व हा शिकरीचा प्रवास दरसाल कैक वर्षे केलेला आठवतो.

अशा प्रकारे मला महाराजांबरोबर सालोसाल निरनिराळ्या ठिकाणी प्रवास करावा लागून काश्मीरपासून रामेश्वरपर्यंत व कलकत्त्यापासून पेशवरपर्यंतच्या हिंदभूमीशी माझा परिचय घडला. प्रवासात नानाविध अनुभव येऊन मन प्रफुल्लित राहिले. नवीन माणसे, नवीन देखावे, रोज नवे व्यवसाय अशा अनुभवांनी झटपट बांधाबांध करणे, चहुकडचे व्यवधान ठेवणे, महाराणी-महाराजांनीच व त्यांच्या आप्तवर्गाची हरएक निगा सांभाळणे, राजपुत्रांस नवीन स्थळें दाखविणे ह्या कामात मी अत्यंत तरबेज बनत गेलो. ह्यांतच चार वेळा यूरोपच्या प्रवासाची भर पडल्याने माझा अनुभव विशेष विस्तार पावला. ह्या प्रवासात सरकारी खर्चाचा चोख हिशेब मला सादर करावा लागाला, त्यामुळे माझ्या अंगी बिनचूक हिशेब, टापटीप व नियमीतपणा हे गुण वृध्दी पावले. कधी वस्तु हरवली किंवा चोरी, अफरातफर झाली असा प्रसंग मजवर केंव्हाही आला

नाही. सयाजीरावांसारख्या दक्ष धन्याचे समाधान मी करू शकलो हाच मी आपला मोठा गौरव समजतो. बडोद्याबाहेर नैनिताल, दिल्ली, मसूरी, काश्मीर, बनारस व त्या वाटेतील आग्रा, बरेली, हरीव्दार, अलीगड वगैरे ठिकाणे तसेच आबूचा पहाड, वगैरे हवेची ठिकणे मी पाहिली. जाता येता नवीन शहरे पाहिली, नवीन व्यक्तींचा, संस्थांचा, मंदिरांचा परिचय मला सहजी घडला. रस्त्यांतील नानाविध अनुभव मिळविणे हा महाराजांचा खास उद्देश प्रवासांत कायमचा ठरलेला असे, त्याचा फायदा मलाही आपोआप मिळत गेला.

तथापि मनोविकासाच्या दृष्टीने युरोपचा प्रवास मला अत्यंत फायदेशीर झाला. खुदद् महाराज तर उत्तरकाळात आपला निवास पुष्कळसा युरोपातच करू लागले. शेवटच्या वीस एक वर्षात त्यांचे तीन चार महिने हिंदुस्थानात व बाकीचे युरोपात गेले. स.१८८७ त त्यांनी युरोपचा प्रवास प्रथम केला तेंव्हा त्यांचा परिवार सुमारे दोनशे माणसांचा होता, तो शेवटी शेवटी चार दोन माणसांवर आला. पुढे पुढे ते एकटेच एका ए. डी. सी. सह तिकडे राहू लागले. स. १८९२ साली त्यांची तिसरी खेप झाली तेंव्हा मला ह्या प्रत्यंत देशगमानाची पहिली संधि मिळाली. त्यानंतर स. १९०० साली पॅरिसप्रदर्शन भरले ती माझी दुसरी खेप होय. त्या वर्षी राजपुत्रांचे राहणे ऑक्सफर्ड येथे झाल्याने मला त्या इंग्रजांच्या सरस्वती मंदिरात सुमारे पाच महिने निवांतपणे अभ्यासात घालविता आले. त्या वेळी तेथे रँगलर परांजपे व बॅरिस्टर गोविदिंराव गाडगीळ राहत होते, त्यांचा माझा परिचय जडला. ऑक्सफर्ड येथे मला टीचर्स ट्रेनिंग कोर्स व इतिहास, संस्कृत, मानःशास्त्र इत्यादि विषयांची उत्कृष्ट व्याख्याने ऐकायला मिळाली. त्यानंतर एकदा १९०५ साली व पुनः १९११ साली पंचम जॉर्ज बादशहाचे राज्यारोहण झाले त्या प्रसंगी मी युरोपात होतो. ह्या सर्व खेपात माझा पुष्कळसा काळ स्वित्झर्लंडमध्ये सेंट मॉरिस येथे व लंडन, पॅरिस, रोम, स्कॉटलंड अशा ठिकाणी गेला.

पहिल्या स. १८९२ सालच्या स्वारीस मी जातांना अगदी एकटा गेलो. महाराज अगोदर गेले. त्यांनी तार करून मागाहून मला बोलावले. त्या वेळी मी २६ वर्षाचा असून बडोद्याचाही माझा अनुभव राजवाड्याबाहेरचा काही नव्हता. जुलै १५ ला मी मुंबई सोडली, तेंव्हा अरबी समुद्रात पावसाचा जोर असल्यामुळे एडनला पोचण्यास नऊ दिवस लागले व आगबोटीत हाल झाले म्हणून एडन येथे एक आठवडा विश्रांती घेऊन नंतर सुवेझ, ब्रिंडीझी, मिलानवरून कोमो सरोवरातून एक दिवस आगबोटीचा प्रवास केल्यावर, तेथून पुढे आगगाडी त्या वेळी नसल्याने. घोडागाडीच्या साह्याने दोन दिवसांनी मी सेंट मॉरिसस येथे महाराजांकडे पोचलो. सर्वच नवीन सृष्टि, एकट्याचा प्रवास, भाषा येत नसल्यामुळे इटलीत अनेक अडचणी भासल्या. स्वित्झर्लंडची रचना व राहणी अत्यंत मोहक वाटली. ह्या वेळी मला मांसान्नाचा परिचय नसल्यामुळे बरेच हाल झाले. पण तरुणपणात त्याची मला मौजच भासे. महाराज पुढे पॅरिस-लंडनला गेले ते नोव्हेंबरात परत निघाले. लंडनांत मी शेक्सपियरची तीन नाटके, आठवा हेन्री, किंग लियर व हॅम्लेट ही पाहिली. सुप्रसिध्द नट सर हेन्री अर्व्हिंग व नटी मिस ॲलन टेरी ह्यांचा उत्कृष्ट अभिनय ह्या तीनही नाटकांत मला पहायला मिळाला. हा मी जन्मांतला अत्यंत दुर्लभ लाभ समजतो. सर्वच बाजुंनी माझे पूर्वीचे आकुंचित जीवन विस्तारू लागले. सेंट मॉरिसला पोचेपर्यंत माझ्या डोक्यावर

लांब शेंडी होती तिचा तेथे पोचल्यावर संपतरावांनी उच्छेद केला. परत आल्यावर वडिलांनी मला मुंबईतून घरी गोविलास नेऊन सक्षौर प्रायश्चित्त देवविले, तो प्रकार मी निराळ्या प्रकरणांत सांगितला आहे.

युरोपच्या ह्या प्रवासाने माझ्या राहणीत एकदम मोठासा फरक काहीच झाला नाही. धूम्रपान किंवा मद्य ह्यांस मी कधीच स्पर्श केला नाही म्हणून नैतिक दृष्टया मी अखेरपर्यंत निर्मळ राहिलो. खर्चाची बचत झाल्याने पुस्तके व उपयुक्त जिन्नस विकत घेण्याची ऐपत मला लाभली. महाराजांबरोबर गेलेले पुष्कळ गृहस्थ कर्ज करून परत आले तसा प्रसंग मजवर कधी आला नाही. बायसिकली, शिवण्याचे यंत्र, घरांतील कित्येक उपकरणे, मधमाशा पाळण्याची सामुग्री, कपडे, पेटया अशा कित्येक चिजा मी बरोबर आणल्या. स.१९०५ साली खरीदलेले एक खिशातले घड्याळ व एक टेबलावरचे टाइमपीस अद्यापि माझ्या वापरात असून ती उत्कृष्ट काम देत आहेत. जुन्या वापराच्या वस्तू कायम टिकविण्याचा मला एक प्रकारचा छंदच आहे.

स. १८९९ साली फत्तेसिंहराव मॅट्रिक झाले. त्यास ऑक्सफर्ड येथे ठेवण्याचा महाराजांनी निश्चय केला. महाराणींचीही शस्त्रक्रिया व्हायची होती, म्हणून स. १९०० सालच्या एप्रिलात मला दुसऱ्यांदा युरोपास जाण्याची संधी आली. मार्सल्स बंदरात उतरून आम्ही पॅरिसला गेलो. ह्या वेळी मुले व महाराणी बरोबर असल्याने परिवारही मोठा होता. नोकर, मोलकरणी, इत्यादींचे सामान, त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था आणि प्रवास हे प्रकार मलाच पुष्कळसे पाहावे लागत. लंडनात चारआठ दिवस राहून मग तिघे राजपुत्र, त्यांचे व्यवस्थापक मि. फ्रेंच व मी ऑक्सफर्डला गेलो. तेथील विद्यालयात ते राजपुत्र दाखल झाले. मी नजीकच भाड्याची जागा घेऊन राहिलो. दुकानातून तांदूळ व मसुराची डाळ आणून मी खिचडीवर निर्वाह केला. मालकीण मला खिचडी उकडून देई. बाजारात खोबऱ्याचा कीस व तिखटाची भूकटी (Cayenne Powder) मिळे. त्यांचे मी तोंडी लावणे बनविले. थारेपालट म्हणून मी एखादे वेळी उपाहारगृहात जाऊन बन्न किंवा केक वगैरे घेई. स्ट्रॉबेरी व क्रीम ह्या ऑक्सफर्डच्या चिजा फार मनोहर लागत. त्यावर हात मारण्यास मी आळस करीत नसे. स्नानाची अडचण भागविण्यासाठी मी तीन महिन्यांचे तिकीट काढून दररोज दोन प्रहरी तीनचार वाजता ऑक्सफर्डच्या टेम्स नदीवर पोहण्यास जाऊ लागलो. तेथे ती नदी लहानशा ओढ्यासारखी स्वच्छ असे. व्यायाम व स्नान ह्या दोनही गोष्टी मी यात साधल्या. शिवाय राजपुत्र बायसिकलवर फिरायला जात तेव्हा मलाही त्याजबरोबर जावे लागून मी ती कला सहज शिकलो. ऑक्सफर्डला लागून अबिंग्डन म्हणून कारखान्याचे गाव आहे, तेथची बायसिकल मी खरेदी केली. किंमत महाराजांनी दिली. मध्यंतरी दोन आठवडे मी पॅरिसला जाऊन तेथील जगड्व्याळ प्रदर्शन पाहून आलो. मराठे नावाचे एक नागपूरचे गृहस्थ मजबरोबर ते प्रदर्शन पाहण्यास होते. पुष्कळ मजा दिसली, पण खुद्द मला त्यात शिकण्यासारखे काही नव्हते. आयफेल टॉवरवर चढून पॅरिसची मजा पाहिली. प्रदर्शनाचा हेतू व्यापाराचा होता, तो चांगला सिद्धीस गेला असे लोक बोलत.

बडोद्यात पुढे वीस वर्षेपावतो बायसिकलचा मला चांगला उपयोग झाला. सामान्य राहणीच्या माणसास शहरात वावरण्यास बायसिकलइतके दुसरे वाहन हाताशी नाही. त्याचा खर्च थोडा व

त्रास फारसा नाही. हवेच्या नळीला भोक किंवा पंक्चर झाले तर तेही मला दुरुस्त करता येऊ लागले. अद्यापि हेच वाहन पुष्कळांना उपयोगी पडत असून त्यात पुष्कळ सोयी आहेत. किंबहुना आधुनिक कालचे तेच एक संचार वाहन बहुजनांच्या आटोक्यात आहे. मी परत मुंबईस आलो तेव्हा लगेच आगबोटीने वडिलास भेटण्यास रत्नागिरीस गेलो. बरोबर बायसिकल नेली. त्यामुळे पुढे बोटीतून उतरताच ३० मैल ह्या दुचाकीने जाऊन सकाळी ९-१० वाजता गोवीलचे घर गाठले, तो तिकडच्या लोकास त्या वेळचा एक विक्रमच वाटला. हे तीस मैल बैलगाडीने जाण्यात एक दिवस मोडे. सर्वांस मोठी खुशाली झाली. इतउत्तर प्रायश्चित्ताची वगैरे गरज उरली नाही. पाश्चात्य लोकांनी आपल्या शास्त्रीय ज्ञानाच्या बळावर आम्हा मागासलेल्या आशियनांना कसे जखडून टाकले आहे हा प्रत्यय आमच्यासारख्या युरोपच्या प्रवासाने जनतेच्या मनावर ठसून समाजात जागृति झाली, तेणेकरून महात्मा गांधीसारख्यांना कॉंग्रेसची चळवळ फलद्रूप करता आली.

२. अनुभवानुरूप राहणी

मी केव्हा केव्हा या प्रवासातील महत्त्वाच्या विषयाची टिपणे लिहून ठेवलेली संग्रही आहेत, त्यातील काही उतारे येथे दिल्यास वाचकास मनोरंजक वाटून माझा प्रगतिपर कल कळून येईल.

मु. हिमालया बोट, तांबडा समुद्र,
शुक्रवार ता. १४ डिसेंबर, स. १९००

'' हा जन्म म्हणजे एक लांबच लांब शिक्षण आहे. ते शिक्षण मिळण्याचे जितके जास्त प्रसंग मनुष्यास येतील, तितका तो लायक होत जातो. मिळविलेल्या अनुभवाचा उपयोग जो प्रत्यक्ष आचरणात आणील, त्यास इहलोकच्या सुखाचा मार्ग बराच कळला असे म्हणता येईल. मला युरोपच्या प्रवासाचे दोन प्रसंग प्राप्त झाले, त्यातील पहिल्या प्रवासात स्वावलंबनाने उद्योग करण्याची उत्कंठा मनात उत्पन्न झाली. हल्लीच्या या दुसऱ्या प्रवासात मी काय कमावले हे आता सांगतो.

पहिल्या प्रवासात मी भांबावून गेल्यासारखा होऊन तारांबळ उडाली. त्यामुळे त्याचा कायम फायदा मला करून घेता आला नाही. दुसऱ्या प्रवासात तयारीला चांगला एक महिना सापडला. ठिकाणी पोचल्यावर, ऑक्सफर्डसारख्या विद्येच्या नगरात जवळ जवळ सहा महिने मी राबू शकलो. बुद्धि व उत्सुकता असेल तर येथे शिकण्याचे विषय रगड आहेत. रमेशचंद्र दत्तांच्या ओळखीने इंडिया ऑफिसच्या ग्रंथशाखेत माझा प्रवेश होऊन मी थोडेबहूत ऐतिहासिक संशोधन केले. पॅरिसच्या प्रदर्शनात मी दोन आठवडे घालविले, पण त्यामुळे मला प्रत्यक्ष फायदा असा काही झाला नाही. फक्त सर्व जग त्या प्रदर्शनात एकत्र आलेले एका दृष्टिपथात दिसले. बुद्धिमान मनुष्याने एकाच विषयाचा अभ्यास करण्यास हे प्रदर्शन सोयीचे होते. मागासलेल्या आम्हां हिंदी लोकांस पाश्चात्य सुधारणेचे हे शिखर गाठणे शक्य नाही. अशा प्रदर्शनांनी बलवान् राष्ट्रांचे बल वाढते, त्यामुळे दुर्बलांची जास्तच पायमल्ली होते. कोणत्या ठिकाणी काय जिन्नस पिकतो, त्याचा खप कोठे कसा होतो हे शिकून पाश्चात्य राष्ट्रे आम्हास जास्तच नागवितील.

आमची हीन स्थिती, आमचे अगाध अज्ञान, पाश्चात्यांच्या पुढे डोके वर उचलण्याची आमची असमर्थता हे प्रकार माझ्या मनात उभे राहून मोठा उद्वेग वाटला. त्यातल्या त्यात माझा ऑक्सफर्डचा निवास स्मरणीय बनला. पद्धतशीर उद्योग करण्याची पात्रता मला आली. त्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत :

१. प्रकृतीची काळजी उत्तम प्रकारे घेऊन शारीरिक व मानसिक सुखवृद्धि समस्त कुटुंबात होत राहील असा प्रयत्न करणे.

उद्योग दोन प्रकारचा, एक स्वतःच्या पोटाचा हा मुख्य, दुसरा परहिताचा. या दोहोत प्रमाणबद्धता असावी. शक्य असेल तेवढेच काम आखून घेऊन ते नियमितपणे पुरे करावे. एकंदर आयुष्याची इतिकर्तव्यता ठरवून तिचा सारखा पाठपुरावा करीत जावा."

याव्यतिरिक्त रोजच्या वर्तनाचे कित्येक सामान्य नियम मी ठरविले ते असे :

"घरात अभ्यासाची जागा स्वतंत्र ठेवावी. होता होईतो राहते घर बाहेर मोकळ्या हवेत ठेवावे. सकाळी निदान दोन तास कामाचे म्हणून पवित्र समजावे. सकाळी दिसू लागल्यावर बिछान्यात पडून राहू नये. व्यायाम व आहार या दोन गोष्टीस अत्यंत जपावे. भोजन सावकाश व परिमित असावे. स्वतःचे व निकटवर्तीयाचे वेळापत्रक ठरवून सर्वांनी आपापली कामे वेळेवर उरकावी."

हे सर्व नियम मी पुढे नेहमी यावच्छक्य पाळीत आलो हेच माझ्या उद्योगाचे व दीर्घायुष्याचे बीज होय.

यानंतर पाच वर्षांनी स. १९०५ साली मला पुनः युरोपची यात्रा घडली. स. १९०० साल सयाजीरावांचा परमोच्च भाग्यबिंदु दाखविते. तेथपर्यंतच्या चाळिशीच्या वयात त्यांना गृहसौख्य व बाह्य लौकिक चांगला मिळून, उद्वेग देणारा काही एक प्रसंग त्याजवर आलेला नव्हता. पहिल्या अमदानीतील जुन्या अधिकाऱ्याचे दडपण त्यांना सारखे बोचत होते, ते हळूहळू दूर करून आपल्या पसंतीचे नवीन अंमलदार त्यांनी नोकरीत घेतले. दिवाण मणिभाई यांनी त्याजवर आणलेले किटाळ व्यवस्थितपणे दूर होऊन श्रीनिवास राघवायंगार, बाबू अरविंद घोष, महंमद अली अशा अनेक कर्तबगार व्यक्ति त्यांनी जवळ आणल्या. तितक्यात लॉर्ड कर्झन व्हाइसरॉय म्हणून आले, त्यांच्याशी झगडा करण्याची प्रकरणे उपस्थित होऊन वरील सहायकांच्या मदतीने महाराजांनी कर्झनशाहीच्या अरेरावीवर ताण करून दाखविली.

पण उत्तरोत्तर त्यांच्या भाग्यास उतरती कळा लागली. त्यांची मुले दुर्वृत्त निघून त्यांस आळा घालणे अशक्य झाले. वडील चिरंजीव फत्तेसिंहराव ऑक्सफर्ड येथे अनावर बनले. त्यास महाराजांनी स. १९०२ साली परत आणिले. त्यांच्या संगतीने दुसरी मुले बिघडू लागली. प्रत्येकास वेगळे ठेवणे शक्य झाले नाही. हा प्रकार केवळ बडोद्याचाच नसून थोड्या बहुत फरकाने सर्वच संस्थानिकांचा आहे. सन १९०४ साली महाराज पुनः युरोपस गेले. राजपुत्रास सांभाळण्याचे जोखीम मजवर आल्यामुळे यावेळी मला पूर्वीचे स्वास्थ्य लाभले नाही. त्यावेळची माझी टिपणे उद्वेगकर बनलेली असून आज त्यात ग्राह्यांश असा फार अल्प दिसतो. हा प्रवास लंडन, ईस्टबोर्न, पॅरिस, सेंट मॅरिट्र अशा ठिकाणी होऊन परत येताना व्हेनिस, फ्लॉरेन्स रोम, नेपल्स्,

पांपे, व्हेसुव्हियसचा ज्वालामुखी, इत्यादि स्थळे पाहिली. स्वित्झर्लंडात बर्फाच्या डोंगरावर सफरी केल्या. मोठमोठ्या हॉटेलात मोलवान भोजने झोडून नानाविध देखावे व पाश्चात्यांचे चोचले पाहिले. प्रकृति सांभाळली, मांसान्नाची सवय केली, पण नवीन असे काही शिकलो नाही. फ्रेंच भाषा शिकण्याचा उपक्रम केला, पण महाराजांच्या मुलांची कुलंगडी सारखी चालू राहून महाराजांनाच मनःस्वास्थ्य मिळाले नाही, मग आमच्यासारख्या सेवकांची काय त्रेधा उडाली असेल त्याची कल्पना करावी. आता सर्व राजकुमार अल्पायुषी व दिवंगत झाल्याने झाल्या गोष्टी सांगण्यात स्वारस्यही नाही. आपण जग सुधारले पण स्वतःचे घर सुधारू शकलो नाही, हा महाराजांचा मोठा उद्वेग बनला.

संस्थानी कारभार सर्वथा एकतंत्री मालकाच्या मगदुरावर अवलंबून असतो. महाराजांची कौटुंबिक दुरवस्था वाढत गेली. तिचा परिणाम अनुषंगाने आम्हा सेवकांवर व एकंदर राज्यावर होत गेला. सन १९०८ साली फत्तेसिंहराव वारले. त्यांची तीन अपत्ये मागे राहिली, त्यांची निगा ठेवणे हे आणखी जोखीम महाराजांवर पडले. स. १९०९ सालच्या दसऱ्यास महाराष्ट्र साहित्य संमेलन बडोद्यास भरले ते अनेक विद्वानांच्या पुरस्कारामुळे चिरस्मरणीय बनले. स.१९१०त राजे एडबर्ड दिवंगत होऊन पंचम जार्ज अधिकारारूढ झाले, त्यांचा राज्यारोहण समारंभ स. १९११च्या जून महिन्यात व्हावयाचा त्या निमित्ताने पुनः महाराजांबरोबर मलाही युरोपात जाण्याचा चौथा योग आला. यावेळी मुलांच्या व्यवस्थेशिवाय समग्र स्वारीखर्चाच्या हिशेबाचे सर्व काम मलाच करावे लागले. यास्तव हा माझा शेवटचा प्रवास धंदलीचा, काळजीचा व अस्वस्थतेचा झाला. त्यात मी नवीन असे काही कमावू शकलो नाही. महाराजांची कन्या इंदिरा राजे यांचा विवाह माधवराव शिंद्यांशी ठरून ती दोघेही लंडनमध्ये त्यावेळी हजर असल्यामुळे माझी तारांबळ अतोनात झाली. सुखरूप निभावून परत आलो हे भाग्य. पूर्वी कधी न झाला एवढा म्हणजे नऊ लाखांचा खर्च या स्वारीचा झाला. तो सर्व मला पाहावा लागला. इंग्रज बादशहाच्या राज्यरोहणाचा हा प्रसंग आम्हास विशेष जाणवला तर नवल नाही. सामान्यतः युरोपात महाराजांचा दरमहाचा खर्च अर्ध्या लाखाच्या आसपास असे. यावेळी सात महिन्यात तो नऊ लाखांवर गेला. लंडनमध्ये समारंभाची महागाई, अनेक संस्थानिक तेथे जमलेले, तशात शिंदे सरकार जावई, त्यांचे दोस्त आगाखान, बिकानेरचे महाराज, कापुरथळा, पत्याळा येथील राजे असे किती तरी पाहुणे आमच्या महाराजांकडे असत. त्यांचे हस्तक आम्ही चार दोन सेवक, त्यामुळे आमची त्रेधा कशी उडत असेल याची कल्पना करावी. योगायोगाने लॉयड जॉर्जची व माझी गाठ चार तास निवान्तपणे प्रेक्षकांच्या रांगेत पडून पुष्कळ बोलणे झाले.

एकंदरीत या स्वारीत मला भारी कष्ट पडले. पुष्कळ अनुभव शिकलो. लंडनचा समारंभ आटोपताच महाराणी व इंदिरा राजे महिनाभर जर्मनीत नौहाइम येथे औषधोपचारासाठी गेल्या. बरोबर मी होतो. शिंदे सरकारही तेथे आले. मग माझी धांदल काय विचारावी. माझे मित्र कै. प्रो. पा. दा. गुणे यावेळी थोडे दिवस आमच्याबरोबर जर्मनीत होते. महाराणींनी व आम्ही यावेळी मोटरीच्या सहली पुष्कळ केल्या. जर्मनीतून आम्ही स्कॉटलंडात इन्व्हर्नेसजवळ आख्नाशेलाख म्हणून अगदी उत्तर टोक आहे तेथे दीड दोन महिने राहिलो. हवा उत्कृष्ट परंतु महाराज व

महाराणी अत्यंत उद्विग्न व अस्वस्थ असल्याने तेथे आमचे तरी चित्त स्वस्थ्य कसे राहणार. मुंबईस परत येताच स्वारीचा नऊ लाखांचा चोख खर्च मी रुजू केला. माझा हिशेब रोजच्या रोज नियमित पुरा केलेला असल्यामुळे परत येताच सर्व तयार होता. पूर्वीच्या स्वाऱ्यांचे हिशेब पुरे होण्यास कित्येक महिने लागत. ही माझी तत्परता पाहून महाराजांनी लगेच माझी बदली खाजगी खात्याच्या चीफ अकाउंटंटच्या जागी केली. माझ्या हुशारीचा प्रत्यक्ष फायदा मला मिळण्याचे बाजूस राहून मी अशा जागेवर आलो की आकडेमोडीशिवाय ज्ञानार्जनाची सवड इतउत्तर मला बिलकुल उरली नाही. राजपुत्रांचे शिक्षण संपले आणि मी गोत्यात येऊन वैतागलो. यास्तव महाराजांना दुखवूनही मी १९२५त सेवानिवृत्त झालो. १९११ त परत येताना मी बरीचशी उपयुक्त पुस्तके विकत आणली ती अद्यापि मला सोबत करतात. या स्वारीतील खालील अनुभव मी लिहून ठेवलेले आढळतात.

मोंगोलिया बोट,

शनिवार ता. ४ नोव्हेंबर, स. १९११

या सफरीत प्रकृतीचा व भोजनाचा जो अनुभव सहा महिनेपावेतो मला आला त्यावरून मला घरच्या नेहमीच्या भोजनाचा कित्येक फरक करणे अत्यंत जरूर वाटते. या सहा महिन्यात जेथे जे मिळेल ते मांसान्न मी घेत गेलो. हिंदुस्थानात असता घशाशी व पोटात जळजळ वाटे ती मला युरोपात बिलकुल वाटत नाही. शौच्यास आपोआप साफ होई. कधी डोके दुखले नाही की मूळव्याधीचा विकार जाणवला नाही. काम मरीमर करूनही वृत्ति आनंदित राहिली. झोप चांगली येई ह्यांचे कारण मी हुडकूं लागलो तेव्हा अन्नातील मुख्य फरक म्हणजे युरोपात मसाले व भात सर्वथा वर्ज्य होता. यास्तव पाश्चात्य पद्धतीचे कित्येक पदार्थ आपण स्वीकारले तर निर्मांस भोजनही तितकेच रुचिकर व पौष्टिक बनेल. आमचे हिंदी भोजन चमचमीत असेल, पण असावे तितके पौष्टिक नाही. मसाले, चटण्या, भजी अशावर भर विशेष. पोटाची पिशवी कशी तरी गच्च भरून काढायची, त्यात शरीरपोषणाची दृष्टि नाही. यास्तव मी खालील फेरफार सुचवितो.

१. दूध, क्रीम, लोणी, हे लहान मोठ्यांनी पुष्कळ घेत जावे. मुलास तर भरपूर द्यावे. खीर, फळे, इत्यादिकांत दूध, क्रीम भरपूर वापरावे.
२. आहारात पुष्कळशी फळे खात जावी. पिकलेली फळे, तसेच सुका मेवा, बेदाणा, खजूर, खारीक, द्राक्षे, संत्री, बदाम, पिस्ते, अक्रोड, असे अनेक पदार्थ मुलांससुद्धा भरपूर देत जावे. खिरी, कोशिंबऱ्या, मुरांबे बनवून ते खावे. रुचीसाठी थोडे लिंबू त्यात पिळावे. चहा, कॉफी व कोको यातसुद्धा शक्य तर क्रीम वापरीत जावे.
३. गव्हाचा सांजा साधा शिजवून भातासारखा दूधक्रीम घालून घेतल्यास विशेष पौष्टिक, गोड व रूचकर लागतो. मात्र त्यात गव्हाचा बारीक कोंडा असतो तोसुद्धा वापरावा. सातूचाही असाच सांजा चांगला होतो. इंग्रजाचे ओट पॉरिज ते हेच रोजचे खाणे.
४. तुपापेक्षा लोणीच वापरणे जास्त चांगले.
५. तांदळांच्या पिठाऐवजी मक्याचे पीठ वापरता येईल. आपण मक्याचा उपयोग विशेष करीत नाही पण तो पौष्टिक असून कण्या, उसळ, भाकरी अशा स्वरूपात खाता येईल.

६. आपण गव्हाची चपाती तेवढी करतो, पण त्याच्या कण्या, उसळ, खुसखुशीत गाकर, आरोळ्या, केक, वगैरे पदार्थ बनविता येतील. त्यातच बेदाणा, वगैरे सुका मेवा घालावा. मुलांस तर हे पदार्थ अवश्य द्यावे.

७. हरभरे, वाटाणे, मूग, उडीद, वगैरे समस्त द्विदळधान्ये विशेष पौष्टिक असून ती मोड काढून वापरल्यास शरीरपोषणास हितकर बनतात. उडीद फार पौष्टिक आहेत.

८. बरीचशी आंबट फळे, कच्चे आंबे, पेरू, तूती, द्राक्षे, बोरे, करवंदे, जांभळे, अननस, पपनस जी काही फळे आढळतील ती सर्व शक्य तोवर उपयोगात आणावी. काही फुकट जाऊ देऊ नये. यांचे मिश्रण गव्हाशी करता येईल. इंग्रजीतली ती हीच.

९. मसाल्याऐवजी आले, जिरे, कोथिंबीर, लिंबू, ओली हळद, आंबे हळद, नारळ, खोबरे वगैरे वापरल्यास रूचि व पुष्टि दोन्ही साधतील.

१०. आपण दही ताक वापरतो, ते फार आंबट करू नये. सकाळ सायंकाळ ताजे दही, ताक घ्यावे म्हणजे त्याचा उपयोग चांगला होतो.

११. भाज्या ताज्या व स्वच्छ निसून चांगल्या चिरून खाव्या. नुसत्या पोटभरणीस खाऊ नयेत किंवा तळून चमचमीत करू नयेत. गाजर, बीट, कोबी, काकडी, नोलकोल, टोमाटो, कॉलीफ्लॉवर हे पदार्थ कच्चे किंवा थोडे वाफेवर शिजवून खावे.

१२. पदार्थात शिजताना मसाले घालू नयेत. वेलची, लवंगा, दालचिनी, मिरी अशांची पूड करून जवळ ठेवावी. आपणास पाहिजे तशी पदार्थावर घ्यावी. भुईमुगाचा चुराही पदार्थावर शिंपडावा. जिभेला रूचि कृत्रिम उपायांनी न आणता, ती लाळेने आली पाहिजे. चांगले चर्वण तोंडात करीत जावे.

१३. सॉसिस म्हणजे पिठाच्या लापशीसारखे पदार्थ भाकरी, पुरी व पोळीबरोबर वापरता येतील.

१४. अर्धकच्चे, शिळे, आंबलेले, वगैरे अन्न पोटभरणीस किंवा फुकट जाते म्हणून पोटात कोंबू नये.

१५. बटाट्याचे किंवा वांग्याचे, बीटचे काप, भजी, भरलेली केळी असे किती तरी नवे नवे पदार्थ कल्पनेने बनविल्यास रुचिवैचित्र्य येऊन खाण्यास गोड वाटतील. जे आनंदाने खाल्ले जाते ते पचतेही चांगले. आपल्या भोजनसाहित्यात फेरबदल करणे फार हितावह आहे.

१६. केळीभात, आंबेभात, अननसभात किंवा भाताऐवजी गव्हाचा सांजा, यात फळाचे मिश्रण करावे. यामुळे फार रुचि येईल.

१७. भाज्यांची व फळांची सॅलड्स म्हणजे मिश्रणे किती तरी रुचकर बनविता येतील.

१८. अंडी वापरता आली तर चांगलेच. पण ती न वापरताही वरीलप्रमाणे लक्षपूर्वक स्वयंपाक बनविल्यास अन्नपोषण, हे शरीराचे आद्य प्रयोजन चांगले सिद्धीस जाईल.

सर्वकाळ मोकळी हवा, ताजे थंड पाणी, भरपूर उद्योग व विश्रान्ति या गोष्टी लक्षपूर्वक आचरणात आणल्यास प्रकृति चांगली राहून मनुष्य दीर्घायुषी व यशस्वी बनलाच पाहिजे."

हे विचार मी स. १९११ साली लिहून शक्य तितके कृतीत आणले म्हणूनच आज चाळीस वर्षांनंतरही त्यांची योग्यता वाढतच आहे. अलीकडे व्हिटॅमिन्स वगैरेचे शोध लागले, त्यांचे बीज वरील विवेचनात स्पष्ट दिसते. मी तरी स्वतः या शरीरव्रताचे एक उदाहरणच होय. आज नव्वदीच्या वयात मी उद्योगक्षम व तरतरीत आहे याचे कारण वरील आचारपद्धतीच होय. हे सर्व नियम मी जवळच्यास नुसते समजून दिले इतकेच नाही तर ते लिहून मी सर्वांच्या माहितीकरिता स्वयंपाकघरात टांगले होते. कुटुंबीयांकडून मी त्यांची अंमलबजावणी कसोशीने केली. अलीकडे महार्घता वाढल्याने दूध तूप हे पदार्थ सर्वांस विपुल मिळणे अशक्य झाले आहे, परंतु मी बडोद्यास असता पूर्वी मुद्दाम मुलांमुलींस हवे तितके दूधदुभते वापरास देत असे. महाराजांच्या वाड्यात किंवा त्यांच्या नोकरास हे सर्व विषय मला समजून द्यावे लागल्याने ते मला नित्य सवयीचे झाले आहेत. स्वतः महाराजही ते शक्य तोवर पाळीत असत. बडोद्याचा राजवाडा म्हणजे सर्वांगीण प्रगतीचे एक प्रदर्शनच असून त्यात माझ्यासारखे अनेक गृहस्थ सदा वावरत होते. महाराजांच्या स्वयंपाकासाठी फ्रेंच, इटॅलियन, मोगली पद्धतीचे स्वयंपाकी असून शिवाय दक्षिणी, गुजराती, कानडी, तामीळ या सर्व हिंदी पद्धती त्यांनी मुद्दाम स्वीकारलेल्या होत्या. त्या पद्धतीचे आचारी माझ्या घरी येऊन आपापले कसब दाखवीत असत. पाचसात वर्षेपावेतो राजवाड्यातील नोकरास व दासदासीस गृहव्यवस्था (Domestic Economy), आरोग्य (Hygiene), स्वच्छता (Cleanliness) हे विषय शिकविण्याचे वर्ग महाराजांच्या हुकमाने मला चालवावे लागले, तेणेकरून ते माझ्या अंतःकरणात भिनून गेले आहेत. पाकशास्त्राचे पुष्कळसे नवीन ग्रंथ महाराजांनी बनविले आणि त्या कामी खर्च व श्रमही अतोनात केले. त्यात माझा हात आहे.

या बाबतीत माझी कुटुंबिनी उत्कृष्ट साह्यकर्ती बनली हे मी मोठे भाग्य समजतो. त्यांना रोज नवे पदार्थ करण्याची मोठी हौस असून आमचे घर मुलांमुलींनी सदा गजबजलेले असायचे. त्या सर्वांना यात मोठी मौज वाटे. बडोद्याच्या राजवाड्यात मी प्रमुख असल्यामुळे अशा अनेक सोयी मला सुलभ मिळाल्या. अशा राजाश्रयाशिवाय हे विषय सुधारणे शक्य नाही. बडोद्यास गेस्ट हाऊस म्हणून एक सुंदर भोजनसंस्था खुद्द महाराजांनी चालविली होती. त्यात देशी व युरोपीय पद्धतीची भोजने मिळत. मी तेथे मुलेबायका घेऊन किंवा पाहुणे बोलावून मुद्दाम सवडीनुसार भोजनास जात असे. तेणेकरून आनंद व शिक्षण हे दोनही हेतू साधत. ताटपाटाची हिंदी पद्धति व खुर्च्यामेजांचा युरोपीय थाट दोन्ही तेथे अनुभवात येत. वर्षांतून चारदोन वेळा तरी आम्ही गेस्ट हाऊसमध्ये जेवणास जात असू. भोजनाच्या पदार्थांच्या नाना तऱ्हा तसेच निरनिराळ्या तऱ्हेची नयनमनोहर मांडणावळ हे सर्व तेथे सहज शिकता येई. अलीकडे मी तरी रोज जेवताना चमचा काटा वापरतो, तेणेकरून माझी घाईने जेवण्याची खोड सुधारली. मनुष्यप्राणी प्रगतिपर व सुधारणाप्रिय आहे. तो सदैव नवीन गोष्टी शिकून पुढील मजल गाठीत असतो. सर्वांचे बघावे, अनुभवावे, आस्थापूर्वक समजून घ्यावे, झेपेल ते स्वीकारावे, नको असेल ते टाकावे, आपले जीवन सर्वदा भरीव बनवावे, पण साधेपणा व स्वतंत्र विचार सोडू नये. मला वाटते माईंच्या साह्याने मी आपल्या कुटुंबात नव्याजुन्याचा हृदयंगम मिलाफ घडवून आणिला. माईंना याचा

मोठा अभिमान वाटे आणि सर्वांना या गोष्टी त्या प्रेमाने व आवडीने समजावून देत. फ्रुट सॅलड म्हणजे बिर्याणी हा पदार्थ माईंनीच घरात चालू केला.

या गोष्टी क्षुल्लक दिसतात, पण एकंदर जीवनाशी त्यांचा निकट संबंध असून केवळ प्रवासाने, निरनिराळ्या चालीरीतींच्या निरीक्षणाने आणि त्यांचा विचारपूर्वक संग्रह केल्याने मी त्यात एक प्रकारचा तज्ज्ञच बनलो असे म्हणण्यास चिंता नाही. जीवनरहस्य मी ओळखू शकलो असे मला वाटते. याशिवाय अन्य परमेश्वर मी ओळखीत नाही. माझे सर्व जीवन साधे, प्रगमनशील व अनुकरणीय बनले आहे असे मी म्हटले तर त्यात वावगे काही नाही. पूर्वी मी घरात धोतर नेसत असे, ते अवजड म्हणून टाकून मी आता सुटसुटीत विजारी वापरतो. उगाच शरीराला अनावश्यक भार का द्यावा? पावसात व थंडीच्या दिवसात मी घरी मोजेबूट घालून कामास बसतो, तेणेकरून विशेष तरतरी वाटते. प्रत्येक गोष्ट मी विचारपूर्वक ठरवितो. जग सदैव पुढे जात आहे. ते पूर्वपदावर मागे जाणे कधी शक्य नाही. हे प्रकार प्रवासाने अंगांत मुरतात. तशा प्रवासाची भरपूर संधि मला सयाजीरावांच्या सेवेत मिळाली आणि हे प्रकार अमलात आणण्याचे क्षेत्र पुढील आयुष्यात मला मिळाले, तसेच त्याचे सार्थक अद्यापपावेतो मला कामशेतच्या निवासात करता येत आहे, हाच माझा अप्रतिम योगायोग होय.

३. माझे वाचन व अभ्यास

लेखन जसे कागदावर वठले, तसे माझे वाचन कसे वाढत गेले हे निश्चित स्वरूपात आज दर्शविता येणार नाही. माझे मलाच त्याचे पूर्ण स्मरण नाही. वाचलेल्या पुस्तकांची स्वतंत्र यादी मी ठेवलेली नाही. इतिहासाच्या किंवा इतर विषयांच्या अभ्यासात किंवा राजपुत्रास शिकविण्यात ज्या ग्रंथांची जरूर लागली ते मी वाचीत गेलो. रियासतींच्या ग्रंथांत आधारभूत पुस्तकांचा निर्देश ठिकठिकाणी मी केला आहे. मी घाईघाईने वाचणारा नसून हातात पेन्सिल घेऊन आपणास ग्राह्य भाग कोणता त्याच्या खुणा मी वाचलेल्या पुस्तकात करतो. मात्र ह्या खुणा स्वतःच्या पुस्तकात सर्वत्र चिताडलेल्या आज आढळतात. त्याशिवाय लोकांकडून किंवा लायब्ररीतून अनेक पुस्तके आणून मी वाचली व परत केली, अशांची यादी मोठी होईल. माझ्या स्मरणवह्या पुष्कळ असून त्यात मी जरूरीपुरती केलेली टिपणे व वाचनीय पुस्तकांच्या याद्या पाहता हिंदुस्थानच्या इतिहासावरील बहुधा कोणतेही महत्त्वाचे पुस्तक माझ्या वाचनातून सुटले असे दिसत नाही. माझ्या पुस्तकावर शेवटी मी वाचल्याची तारीख व थोडीबहुत टीका लिहून ठेवल्याचा उल्लेख आढळतो. बडोद्यास खुद्द महाराजांची मोठी खासगत लायब्ररी होती, ती राजपुत्र विद्यालयाच्या इमारतीतच कैक वर्षे असून, त्या इमारतीत माझे वास्तव्य वीसएक वर्षे झाले. आरंभी शिकविण्याचे कामही थोडे होते, म्हणून त्या लायब्ररीतील पुष्कळशी पुस्तके वाचण्याची संधी मला मिळाली, इतिहास व राजकारण हे विषय महाराजांच्या अनुषंगाने माझेही आवडीचे बनले, पण त्याशिवाय शिक्षणविषयक, ग्रंथ, भूगोल, मानसशास्त्र, गृहव्यवस्था, आरोग्य व स्वच्छता, शरीरशास्त्र, सुप्रजाजनन (Eugenies), निरनिराळ्या शास्त्रांची मूलतत्त्वे (Science Primers), आहारमीमांसा (Dieteties) अशा अनेक विशिष्ट विषयांचे ग्रंथ मी सवडीनुसार अभ्यासले. महाराजच स्वतः असे विषय

मुद्दाम वाचीत आणि मी त्यांचा जवळचा रीडर असल्यामुळे त्यांच्या तयारीसाठीही आणि त्यांच्या मुलांच्या संगोपनार्थ असे अनेक व्यावहारिक विषय मलाही शिकावे लागले. जो विषय पुढे येई त्याची भरपूर माहिती मिळवायची हा माझा स्वभावच बनला. पत्नीला गर्भधारण झाल्याचे लक्षात येताच त्या विशिष्ट विषयाची व बालसंगोपनाची वगैरे अनेक पुस्तके मी इंग्लंडातील तज्ज्ञ गृहस्थांकडून मुद्दाम मागवून आणली आणि श्यामकान्त व श्रीवत्स या माझ्या दोघा पुत्राचे संगोपन जितक्या कसोशीने करता येईल तितके मी करीत गेलो. याचा फायदा प्रत्यक्ष महाराजांच्या संततीस व माझ्या आप्त शेजाऱ्यास मिळाल्याशिवाय कसा राहील?

लहानपणापासून मुलांची जिज्ञासाशक्ति मी वाढवीत गेलो. मुले नाही नाही ते प्रश्न विचारून भंडावून सोडतात, तेव्हा त्यांचा हिरमोड कधी न करता उलट त्यास उत्तेजन देऊन मी त्यांचे समाधान करी. सवड नसली तर मुद्दाम पुढे वेळ काढून मी मुलांस अनेक विषय शिकवीत गेलो. सदानसदा आमचा विवाद घरात चालू असायचा. शक्य तोवर आम्ही रात्री बाहेर उघड्या चौकात अगर गच्चीवर सर्वांची आंथरूणे घालून रात्री भोजनोत्तर अर्धा एक तास काही श्लोक, काही गाणी, काही रोजच्या वर्तमानपत्री बातम्या किंवा असेच अन्य विषय बोलून मी मुलांचे मनोरंजन व जीवनविषयक मार्गदर्शन करीत असे. जर्मन युद्ध सन १९१४ साली सुरू झाले त्याच्या रोजरोज येणाऱ्या बातम्या मुले मला उत्कंठेने विचारीत. त्यांची उत्तरे देण्यात सहजगत्या भूगोल, राजकारण, इत्यादि विषयांची ओळख माझ्या मुलास होत गेली. मला वाटते प्रत्येकाने घरातील मुलांचे असे संगोपन करीत राहणे हे त्यांचे पवित्र कर्तव्य आहे. हे करणे नसेल तर मुले न होण्याचा बंदोबस्त करावा. विषय स्वीकारला तर त्याची जबाबदारीही पार पाडलीच पाहिजे. मुले-मुली बरोबर घेऊन सर्वांनी एकत्र भोजन करण्याचा रिवाज मी कधी चुकविला नाही. पुष्कळसे गृहस्थ सायंकाळी क्लबात वगैरे बाहेर राहून रात्री, दुपारी मुलांची भोजने अगोदर आटपतात आणि आपण एकटे मागाहून उशीरा जेवतात. हा प्रकार मी अत्यंत निंदनीय मानतो.भोजन ही एकच वेळ अशी आहे की त्यांत समरस होण्याची उत्कृष्ट संधि प्रत्येक गृहस्थास असते. ती कधी वाया दवडू नये. प्रत्यक्ष महाराजांची मुले आपल्या तक्रारी मन मोकळे करून मला सांगत, त्या मी महाराजांच्या नजरेस आणून त्यांना इशारा देई की तुमची मुले पोरकी आहेत. तुंम्ही त्यांचे आईबाप जन्मदाते खरे, पण तुंम्हीच त्यांच्या पोटात शिरून ममतेची पाखर त्यांस दिली पाहिजे. ही तुमची जबाबदारी आंम्हा सेवकांस कधी साधणार नाही. माझा इशारा ध्यानी घेऊन महाराजही जबाबदारी ओळखू लागले. पण मुलांच्या मनाची पकड त्यांना कधी साधली नाही. म्हणून त्यांचा संसार शोचनीय बनला.

सारांश, सर्व जीवन एकत्र गुंतलेले असून त्याचा आधार वाचन व ज्ञानप्राप्ति हेच आहे हे ओळखून मी आपले वाचन वाढवून त्याचा उपयोग व्यवहारात केला. कादंबऱ्या वाचण्याचा नाद मला नाही. तथापि स्कॉट, व्हिक्टर ह्यूगो, लॉर्ड लिटन, टिकन्स, वॉशिग्टन अर्व्हिंग, मोर्ले, अरेबियन नाइटस् व त्याजवरील सर रिचर्ड बर्टनचा टर्मिसनल एसे, बेकन, मेकॉले, बर्क, मिल्ल, गिबन, प्लूटार्कची चरित्रे, एच. झी. बेल्सचे आउटलाईन ऑफ हिस्टरी, नेल्सन-नेपोलियनची चरित्रे, ग्रीसरोमचे व इंग्लंडचे इतिहास, असे अनेक ग्रंथ माझ्या वाचण्यात आले. शिवाय

रियासती लिहितांना जे उपयोगांत आणले त्यांची यादी त्या त्या पुस्तकांत दिली आहे. बी. ए. चा माझा ऐच्छिक विषय Logic and Moral Philosophy असून तत्संबंधी माझे वाचन कॉलेजातच झाले. त्याचा विस्तार पुढे हळूहळू होत गेला. इंग्लंडचे व अमेरिकेचे पुष्कळ इतिहास मी वाचले. हर्बर्ट स्पेन्सर ह्यांचे ग्रंथ मी सवडीनुसार वाचले. हर्बर्ट स्पेन्सरचे एज्युकेशन हे पुस्तक तर आरंभी मला सुत्रमय वाटले. फ्रोबेलची बालोद्यान पध्दत, मॉन्टेसरी पध्दत, महात्मा गांधीची बेसिक पध्दत ह्या मी हाताळल्या. मुंबईत मूळव्याधीच्या शस्त्रकियेत मी शयासीन असता हॅकलचे रिडल ऑफ दि युनिव्हर्स हे उत्कृष्ट पुस्तक मी वाचले. त्यामुळेच मी जीवनाच्या बुध्दिवादी शिकवणीत एकरुप बनलो.

अशी चिकित्सक व बौध्दीक विचारांची पुस्तके वाचल्यावर माझी पूर्वीची धर्मिक अंधश्रध्दा नाहीशी होऊन मी एक प्रकारचा निरीश्वरवादी, विचारास पटेल ते आचरणात आणणारा स्वतंत्र विचारी बनलो. उपास तापास, भजन पूजन, सोवळे ओवळे ही सोंगे सर्व टाकून मी स्वतंत्र विचाराने शास्त्रीय शोधांचे ग्रहण करीत आलो आहे. घरांतही हे सर्व प्रकार मी मुदद्राम चालू केले. पुष्कळ वेळ प्रवासात आगबोट-आगगाडीत मला काढावा लागल्यामुळे आगाऊ वाचनाची तयारी मी बरोबर ठेवीत असे. आगबोटीवर तर लेखनवाचन हाच मुख्य व्यवसाय. वर आकाश व खाली पाणी, भोजन फराळाची चंगळ, अशा त्या बोटीवरच्या प्रवासांत एकांन्त तंद्रीच्या भावनेत इतिहासविषयक पुष्कळसे लेखन मी केलेले आठवते. आगबोटीच्या कोठल्या तरी दूर कोपऱ्यांत मी एकीकडे मुदद्राम जाऊन बसे. तेणेकरून प्रफुल्लित मनांत विचारसौर्ष्ठ प्रगट होत असे. उटकमंडसारख्या ठिकाणी किंवा खुदद् बडोद्यास बाहेर झाडाखाली बसून लेखन वाचन करण्याचा माझा प्रघात होता. राजपुत्राचे शिक्षणवर्गही पुष्कळदा आंम्ही बाहेर झाडाखाली चालवीत असू. अशा खुल्या वातावरणांत कोणतेही काम प्रफूल्लित मनाने करता येते. हल्ली कामशेतलाही मला ह्या उघड्या हवेचा मोठा फायदा होत आहे. अशा ह्या वाचनाचा उपयोग मी आपल्या लेखनात करीत आलो आहे. इतिहासशास्त्रावर Frederic Harrisons 'Meaning of History'; Renniers 'Method and Purpose fo History'असे अनेक ग्रंथ मी वाचले असून इतिहासाची व्याप्ति दाखविणारी टिपणे व उतारे मी स्वतंत्र ठेवले आहेत.

माझे वर्तमानपत्री वाचनही खोचदार होते. उगाच भाराभर वाचीत बसण्याचा नाद मला नाही.टाइम्स ऑफ इंडिया किंवा बॉम्बे क्रॉनिकलसारखे एखादे दैनिक मी आरंभापासून अंतापर्यंत साक्षेपाने वाचीत असून ते न झाले तर चैन पडत नाही. W. J. Steadचा रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज मी आवडीने वाची. तो पुढे बंद झाल्यावर गांधीचा 'यंग इंडिया' व 'हरिजन' ही पत्रे समग्र वाचल्याशिवाय मी राहिलो नाही. तसाच Modern Review हा माझा आवडीचा प्रबंध असून सारखा चाळीस वर्षे मी त्याचा ग्राहक व वाचक होतो. त्याचा सर्व संच मी अद्यापि संग्रहात जपून ठेवला आहे. त्यात केंव्हा केंव्हा माझेही लेख आले असून सर जदुनाथांचे इतिहासविषयक लेख तर बहुधा दर अंकांत असतातच. टिळकांच्या ह्यातीत 'केसरी' चे अंक मी नियमाने वाचीत आलो. आगरकरांचा 'सुधारक' व हरिभाऊंची 'करमणूक' व पुढे मित्रांचे 'मनोरंजन' व 'विविधज्ञानविस्तार' हेही माझ्या वाचनात असत. जवाहरलालचे 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे ग्रंथ

मला अत्यंत उद्‌बोधक वाटून मी त्यांचे विस्तृत परीक्षण लिहिलेले आहे. रघुनाथराव कर्व्याचे 'समाजस्वास्थ्य' मी नियमितपणे वाचले. त्यातील अवास्तव विचारप्रणाली मला सर्वथा मान्य नसली तरी त्यांतील एकंदर जीवनाचा प्रगतिपर विचार मला स्वीकारार्ह वाटतो. संततिनियमन प्रत्येकाने अवश्य करावे आणि विषयप्रवृत्ति भडकू न देता आवरुन धरावी असे मानणारा मी आहे. अण्णा कर्व्याची मानवी समता तर माला अत्यंत उद्‌बोधक वाटली. थिऑसॉफीत माझे मन रंगले नाही.

इतिहास विषयाचा अभ्यास म्हटला की त्यांस अनेक विषयाची जोड लागते. तसे ग्रंथ मला आढळले व झेपले तेवढे मी वाचून उपयोगात आणले. त्यांची एकंदर यादीच करणे झाल्यास माझ्या रियासतीच्या निरनिराळ्या भागांत विविध ग्रंथांचा व तौलनिक विवेचनाचा निर्देश दिला आहे, तो पाहावा म्हणजे माझ्या उद्योगाचा विस्तार लक्षांत येईल. माझा स्वतः चा पुस्तकसंग्रही बहुतेक सर्व दुर्मिळ पुस्तकांचा, पन्नास साठ वर्षाच्या परिश्रमाने बनविलेला मजजवळ विद्यमान आहे. इ. स. १६००-१९५० ह्या साडेतीन शतकांच्या हिंदुस्थानविषयक इंग्रजी मराठी ग्रंथांचा बहुतेक परिपूर्ण असा माझा संग्रह असून त्यातले मौल्यवान ग्रंथ आता दुर्मीळ व बाजारात न मिळणारे आहेत. हा संग्रह बनविण्यात सर जदुनाथ सरकारांचे साहयच मला विशेष उपयोगी पडले. त्यांच्याजवळ कित्येक ग्रंथांच्या दुप्पट प्रती होत्या, त्या त्यांनी मला कायमच्या दिल्या. वॉरन हेस्टिंग्जच्या कारभाराचे ग्रंथ, फॉरेस्टने निवडलेल्या लेखांचे भाग माझे पूर्ण असून वेस्ली व वेलिंग्टन ह्यांचे खालिते, शीखांचे इतिहास, फोर्ब्स, माल्कन, लोगिन, टॉड, स्लीमन, इत्यादिंचे ग्रंथ, मन्रोचे सुंदर लेख स. १८७५ च्या क्रांतीचे अनेक वृत्तांन्त हि कमिशनचे अहवाल पर्शियन कॅलेंडरची संपूर्ण माला, असे सर्व मी जतन करून ठेवले आहेत मला हा सर्व संग्रह बहुमोल वाटतो आणि माझ्या पश्चात तो निगेसाठी एखाद्या संस्थेस देण्याची व्यवस्था मी हल्ली करीत आहे.

राजपुत्रांना मी मराठी, संस्कृत, अंकगणित, इतिहास व भूगोल हे विषय शिकवीत असें. कारणपपरत्वे महाराज व महाराणी ह्यांनाही मी कित्येक विषय शिकविले आहेत. अर्थात तुकाराम, रामदास, वामन, रघुनाथ पंडित, मोरोपंत इत्यादि मराठी कवींचे ग्रंथ मी वाचले असून हे प्रचंड वाङ्मय आज माझ्या संग्रही नाही ह्याचा भारी खेद वाटतो. बडोद्यात भाड्याच्या घरांत पुस्तकसंग्रह करणे जमले नाही आणि पुढे माझा संग्रह असा वाढत जाईल ही कल्पना प्रथम मनात नव्हती. ह्यास्तव पुष्कळ सुंदर मराठी संस्कृत ग्रंथ केवळ हलगर्जीपणाने हाती आलेले मी घालवले. कामशेतला स्वतंत्र घरात आलो म्हणूनच मला आपला संग्रह चोख बनविता आला. मुंबईपुण्यासारख्या ठिकाणी हे शक्य नव्हते . मी ह्या संग्रहामुळे सदा थोंरांच्या संगतीत वावरतो आहे असाच आनंद अनुभवीत असतो. एकंदर आयुष्याचा कार्यक्रम (Planning) आगाऊ ठरवून तशा धोरणाने प्रत्येक वस्तूचा संग्रह करीत जाणे, सर्वांगीण नजर सारखी ठेवणे हे कठीण काम तर खरेच, पण प्रथम तारुण्यांत त्याची कल्पना येत नाही. माझ्या इतिहासाचा एवढा परिपोष होत जाईल ह्याची मला तरी आरंभी काय कल्पना असणार. ही पुष्कळ पुस्तके निरर्थक गमावली ह्याचा मला आता मोठा खेद वाटतो. मराठीतील अनेक नामांकित ग्रंथ नाटके, कादंबऱ्या, निबंधमाला, स्मारक ग्रंथ

घराण्यचे वृत्तान्त ऐतिहासिक व सामजिक चर्चेचे विषय, मासिकांतले लेख मी बरेच वाचले असून मला कोणी मागासलेला म्हणू नये अशी माझी धडपड सदा चाललेली असते. संस्कृतातल्या मोठमोठ्या कवींच्या कृति, संक्षिप्त रामायण व महाराभारत, शिलालेखांची पुस्तके असे पुष्कळ वाङ्मय मी सवडीनुसार वाचले असून संस्कृत-मराठीचे माझे पाठांन्तरही थोडे नाही. अलीकडे भगवतगीता, उपनिषदांचे भाग मी थोडेबहुत वाचून त्यांचा उपयोग प्रसंगानुसार करीत असतो. गीता बरीच पाठ येते. बडोद्यास असता ह्या विषयांस फुरसत मिळत नसे. कामशेतच्या निवासात अलीकडे कौटुंबिक पाश सर्व संपल्यामुळे वाचनास, लेखनास व पठनास पुष्कळ वेळ मिळतो.

मासिकांत निरनिराळ्या विषयांवर माझे लेख पुष्कळ प्रसिध्द होत असून सुमारे तीनशे फुटकळ लेखांचा संग्रह मी ठेविला आहे. ज्ञानेश्वरी वाचण्याचा प्रयत्न मी केला पण त्यांत मन रमले नाही. टिपणे करून ठेवण्याची मला आवड असून सुभाषिते, उतारे, वेचे ह्यांचा संग्रह मी बराच केला आहे. लेखन सर्व माझे मीच करतो. तोंडाने सांगून दुसऱ्याकडून लिहविणे मला जमत नाही. सर्व कामे झपाझप करण्याची मला सवय असली तरी लेखन-वाचन सावकाश व आगाऊ विचारपुर्वक मुददे् ठरवून मगच करतो. व्याख्यानेही अलीकडच्या पंचवीस तीस वर्षात मी पुष्कळ दिलेली असून त्यांची टिपणे संग्रही आहेत. नागपूर व पटणा येथे मराठी इंग्रजी व्याख्याने दिलेली छापली आहेत. एकंदरीत माझे आयुष्य कारणी लागले असे म्हणता येईल. हीच माझी जीवनाची मुख्य जोड होय.

३.

स्मरणीय अनुभव

१. अत्यंत दुःखाचा दिवस

माझ्या सर्व आठवणीत निरतिशय आनंदाचे असे पुष्कळ दिवस सांगता येतील. पण अत्यंत दुःखाचा असा एक विशिष्ट दिवस माझ्या स्मरणात सदैव जागृत आहे, तो बुधवार ता. ७ डिसेंबर, स. १८९२, मार्गशिर्ष वै. ४ शके १८१४ हा होय. मी युरोपच्या प्रवासास प्रथम १५ जुलई स. १८९२ ह्या दिवशी बडोद्याहून निघालो आणि दुसऱ्या दिवशी बोटीत बसून मुंबई सोडली, तो पुनः परत मुंबईत वरील दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी ८-९ च्या सुमारास धक्क्यावर उतरलो. ह्या वेळी माझे वय २७ असून आमचे राहते बि-हाड बडोद्यास होते, तेथे माई व नारायणराव, आबा वगैरे बंधु राहत होते. अर्थात मुंबईत आंम्हास उतरण्याची अशी घरची सोय नव्हती. स्नेही-सोबती मुंबईत पुष्कळ होते, त्यात मुख्यतः भाऊसाहेब आठल्ये हे तेथे राहत त्यावेळी खंबाला हिलवर मंडलीकाच्या चाळीत राहत होते. तेच मला घेण्याकरिता बंदरांतील धक्क्यावर आले. त्यांजबरोबर बहुधा केशवराव परांजपेही असावे. धक्क्यावरून त्यांनी मला सामानासह व्हिक्टोरिया गाडीत बसवून आंग्रेवाडीत डॉक्टर नानासाहेब देशमुख ह्यांच्या घरी आणिले. सकाळचा सुमारे १०-११ चा अंदाज होता. बोटीतुन उतरतांना मला बिलकुल कल्पना नव्हती की मला नानासाहेबांच्या घरी भोजनास जावे लागेल. भाऊसाहेब गाडीत बसल्यावर मला म्हणाले, "आता जेवणाची वेळ आहे. मी नानासाहेबांना सांगून ठेवले आहे, त्यांनी आग्रह करून तुला आपल्याकडेच जेवायला बोलावले आहे." हल्ली जशी सरदारगृहासारखी प्रवाशांना उतरण्याची सोय आहे तशी त्यावेळी मुंबईत रुढ नव्हती. शिवाय नानासासाहेबांकडे जावे लागेल ही जाणीव नसल्यामुळे मी ऐटीत विलायती सूट घातलेला बोटीतून उतरलो. नेसण्याचे धोतर वगैरे बरोबर काही नव्हते. सामानाच्या पेट्या परस्पर खंबाला हिलवर गेल्या. भाऊसाहेब माझेच वर्गबंधु व स्नेही मला बापूसाहेबांइतकेच पूज्य होते. आज सुंदर हिंदी भोजन मिळणार मग आगबोटीवर विशेष कशाला अशा समजुतीने मी बोटीवर फारसे काही खाल्ले

नाही. शिवाय उतरण्याच्या दिवशी सर्वच आपापल्या धांदलीत व बांधाबांधीत निमग्न. मला घरी येईपावेतो सडकून भूक लागली.

नानासाहेंबाकडे आलो तो त्यांचे सोहळ्यांत देवतार्चन चालू होते. आल्याबरोबर त्यांना वंदन करणे हे पहिले काम. माझ्याजवळ धोतर वगैरे काही नाही. गळ्यात कॉलर नेकटाय व खिशात हातरुमाल. विजार सुध्दा गरम एकेरी, आत दुसरा मांडचोळणा नव्हता. भाऊसाहेबांनी मला एक पंचा नेसण्यास आणून दिला. नाही होय म्हणण्याला अवकाशच नाही. मी मोठ्या संकटाने पंचा नेसून शर्टासह नानासाहेंबापुढे जाऊन नमस्कार केला. ते देवघरात सोवळे होते. बाहेरून नमस्कार करून परत आलो. स्नानाचा प्रश्न निघाला तेंव्हा मी सांगितले की मी स्नान सकाळीच केले आहे. आणखी चार मंडळी होती त्यांच्याशी बोलतांना मी पाश्चात्य रीतीरिवांजांचा बडेजाव बोलू लागलो की लगेच ही मंडळी आपल्या सनातन धर्माचा, सोवळ्या ओवळ्याचा, देवतार्चनाचा एवढा बडेजाव गात की मला ती त्यांची बडबड एकणे सुध्दा सहन होईना. तेथे सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात ती मी एकटाच सुधारपंथी चोर. मला सर्व बोचून खाऊ लागले. पुढे जेवणाची तयारी झाली. तेथे पाहतो ती मोठी पंगत सोवळी व माझे पान दूर लांब एके बाजूस मांडलेले. हा प्रकार पाहून मी अत्यंत कष्टी झालो. सहा महिने युरोपच्या मोकळ्या वातावरणात वावरुन हिंदुस्थानच्या मायभूमीत पाऊल ठेवताच हा बहिष्काराचा प्रकार अनुभवणे जिवावर आले. वाटले ह्या क्षणी तोंड घेऊन कोणीकडे तरी चालते व्हावे. मला पाणी दिले ते सुध्दा विटाळशीसारखे दुरून. न जाणे एखादा तुषार सोवळ्यांत उडेल. मला जेवणही गोड लागले नाही. साधेच जेवण. तिखट वगैरे झणझणीत त्याने तोंड भाजून गेले. त्या दिवशी माझे उष्टे मीच काढले की काय आठवत नाही, पण तो एकंदर अनुभव मी ज्यांना गुरुस्थानी समजे, त्या नानासाहेब देशमुखांच्या घरी मला मिळावा, त्यांचे वडील गोपाळराव हरि कट्टे सुधारक त्यांच्या, कुटुंबात माझी ही अवस्था असे किती व काय विचार मनात आले ते आता सांगता येत नाहीत. सर्व निमुटपणे सोसून भोजन होताच पहिले कपडे घालून मी बाहेर पडलो आणि गाडी करून खंबाला हिलवर खोलीत जाऊन रडत बसलो. माझे अश्रू काही केल्या थांबेनात. एवढ्या अफाट हिंदी जगात माझे असे कोण नाही, मला जागा नाही, खाणेपिणे मिळू नये, अशी काय गुन्हेगारी मी केली. पाश्चात्य मुलखाचा प्रवास करून आल्यावर स्वबांधवांकडून माझे अभिनंदन व्हावे त्याऐवजी मला ह्या मुंबई नगरीत उभे राहण्यास जागा नाही ह्याचा एवढा उव्देग वाटला की सर्वांग भाजत आहे असा भास सर्व दिवसभर मला होत होता. त्या दिवशी सायंकाळी मी जेवलो नाही, चहादेखील घेतला नाही, भाऊसाहेब कोठे तरी आपल्या कामात होते. त्यांना माझ्या यातनांची कल्पनाही आली नव्हती. रात्र झाली. भयंकर उष्मा वाटू लागला. खोलीत गुदमरल्यासारखे वाटून मी अस्वस्थ झालो. ८-९च्या सुमारास एकटाच बाहेर पडलो. त्या वेळी खंबाला हिलवर मोठे जंगल व उंच वृक्ष होते. एका वृक्षाखाली दगडावर बसून दोन तीन तास अश्रु ढाळीत मोठ्या आवेशाने चिंतन करू लागलो. बाराच्या पुढे केव्हा तरी परत येऊन जमिनीवर अंग टाकले. सर्व जग झुगारून देऊन मी आता पुढे आपला स्वतंत्र मार्ग काढायचा निश्चय केला. दुसऱ्या दिवशी बडोद्यास गेलो. त्या दिवसापासून मी जो पक्का स्वयंविचारी बनलो. तो तसा आतापर्यंत वागत आहे.

२. माझे गाजलेले प्रायश्चित्त

समुद्रयानाने प्रत्यन्त देशांत जाऊन आल्याबदद्ल प्रायश्चित्ताने शुध्दि मिळविण्याचा प्रचार कधी निघाला ते निश्चित नाही. आर्यधर्माचा प्रसार पूर्वद्वीपप्रदेशात झाला तेंव्हा समुद्रतरण निषिध्द मानले जात नव्हते. हेमाद्रीच्या वेळेपासून हा निषेध उत्पन्न झाला असावा. पेशवाईत स. १७८२ साली रघुनाथरावदादाचा वकील राजापुरचा ब्राम्हण हणमंतराव व मणियार पारसी असे दोघे लंडनास जाऊन परत आले. तेंव्हा हणमंतराव स्वज्ञातीत परत येऊ शकला नाही. देशत्याग करून तो गुजरातेत भडोचला जाऊन राहिला अशी माहिती मिळते. अलीकडच्या काळी इंदुरचे गणेशशास्त्री व कृष्णराव मुळये वगैरे कित्येक गृहस्थ व मुंबईकडील श्रीपाद बाबाजी ठाकूर अशी मंडळी युरोपात राहून आलेली प्रायश्चित्ताने शुध्द झाली. स. १८८७ त सयाजीराव महाराज शेपन्नासांचा लवाजमा घेऊन आठ महिने युरोपात राहून परत आले, त्या सर्वांच्या शुध्दिकरणास सुमारे तीन लाख खर्च झाला. इतकेही करून त्या सर्वास जातीकडून मान्यता मिळालीच असे नाही. पापपुण्याचा विचार बाजूस राहून भला मोठा द्रव्यदंड उपटण्याची संधि सनातनी समाजास प्राप्त झाली एवढाच ह्या प्रायश्चित्ताचा आधूनिक परिणाम बनला. मला स्वतःला युरोपास गेल्याबदद्ल प्राश्चित्त नको होते. महाराजांनी मला तारेने युरोपात बोलावले, त्यात त्यांनी स्पष्ट इशारा दिला की प्रायश्चित्ताचा खर्च सरकारांतून मिळणार नाही. बापूसाहेब आठल्ये माझे पुरस्कर्ते ते सांगतील तसे वागायचे असे ठरवून मी युरोपास निघून गेलो. बापूसाहेबांना सामाजिक बंडखोरी पसंत नव्हती. शक्त्यनुसार प्रायश्चित्त घेऊन पुढे जावे असा मार्ग त्यांनी मला सुचविला. पापपुण्याचा विचार धर्मवेत्ते ठरवतील तो सर्वांनी मान्य करावा असे ते म्हणत. प्रत्यक्ष विधि करतांना उच्चार करावा लागतो तो असा, ''म्लेच्छ देशगमन, ज्ञाताज्ञात, शूद्रादि सर्वविधसंसर्ग स्नानसंद्योपासनादि नित्यकर्मलोप, भक्ष्याभक्ष्य पेयापेयादि पापांना निरासार्थ'' हे शब्द संकल्पात आहेत. ही पापे युरोपात न जाऊन सुध्दा येथील कोणते इसम रोजरोज करीत नाहीत माझे मन सांगे मी काही एक पाप युरोपात केले नाही. मी प्रवासात असता वडिलांनी कोकणात माझ्या प्रायश्चित्ताची चर्चा कित्येकांशी करून ठरविले की परत येताच मी थेट गोविलास जाऊन तेथे घरचे घरी प्रायश्चित्त विधि उरकावा. पंचक्रोशीतील पुढारी धर्मनिष्ठांनी हा मार्गसुचविला, तदनुसार वडील मुंबईस येऊन मला घेऊन स. १८९३ च्या फेब्रुवारीत घरी कोकणात गेले. तत्पूर्वी त्यांनी प्रायश्चित्तासंबंधाने कित्येक शिष्टांची लेखी संमती मिळविली होती. ह्या एकंदर प्रकरणाचे बनलेले कागद आज माझ्या संग्रही आहेत.

भाऊ पाध्ये, मोघे, कोलधेकर त्या प्रांतांतले नामांकित शिष्ट समजले जात होते, त्यांस आणण्यास वडिलांनी माणसे पाठविली. पण त्यांनी येण्याचे नाकारुन उलट नानाप्रकारच्या सबबी लिहून पाठविल्या. वडिलांचे मातुल गणेशपंत बाबा आंबर्डेकर हे आमच्या घरी ह्या विषयाचा पुढाकार घेऊन निभावणी करीत होते सर्व सरदेसाई मंडळी माझ्या बाजूने एकमताने वागली. परंतु बाहेरचे काही गुंड प्रथमपासून प्रायश्चित्ताच्या निमित्ताने भली मोठी रक्कम उपटण्याच्या विचारास लागले. मी काही तरी घोर अपराध केला आहे. त्यातून मला सोडवा अशी गुन्हेगारीची भावना ते पदोपदी माझ्या पदरी बांधू लागले, त्या दृष्टीने ते वडिलांस नडवू

लागले. प्रायश्चित्ताचा दिननिश्चय, तत्प्रांतीय शिष्टाची पायधरणी, आमंत्रणे, निमंत्रितांचा परामर्श मंडपाची व भोजनाची सोय अशा अनेक बाबतीत अगोदरपासून मोठी यातायात सुरू झाली. एखादे लग्नकार्य बरे असा प्रकार निर्माण झाला. माझे चौघे मातुल व घरचे आप्त सर्व एकजुटीने मनापासुन झटले म्हणूनच तो प्रसंग शेवटी निभावला.

युरोपातून परत आल्यापासून स्वतःच्या घरी देखील मी अपंक्त होतो. मजबरोबर पत्नीही अपंक्तच मानली जाऊन तिचा स्पर्श घरांत नव्हता. वडिलांना मात्र ह्याबदद्ल भारी व्देष वाटला. त्यांचा समज की माझा मुलगा दुर्मार्गगामी होणे शक्यच नाही. ह्यास्तव घरात ते मला दुर न ठेवता भोजनप्रसंगी माझे पान ते नेहमी प्रमाणे आपल्या जवळ घेत. माघ वद्य १२ इंदूवार शके १८१४ ता.१३ फेब्रुवारी स. १८९३ हा दिवस प्रायश्चित्ताचा ठरला. सुमारे दोनशे पात्र व्हावे अशी भोजनाची तयारी केली. सभोवार मोठे मंडप घातले. त्या वेळचे आमचे घर लहान जुने तेच होते. चार दिवसांपासून अगोदर मंडळी जमू लागली. आदल्या रात्री भट भिक्षुक आप्त स्त्रीपुरुष वगैरे शेपन्नास पावेतो जमा झाले. त्या सर्वांची एकसारखी चर्चा चालली, त्या योगाने सर्व आवार गजबजून गेले. वाजंत्री वगैरे शुभ प्रसंगाचे उपचार प्रायश्चित्तांत नसल्यामुळे ह्या समारंभास आनंदोत्सव म्हणता आले नाही. विचारशक्ति गहाण टाकल्याचे कितीतरी प्रकार त्या दोन दिवसात माझ्या नजरेत आले. ते सांगण्यात आता तात्पर्य नाही. सर्वच बाजार अंधश्रध्देचा. प्रत्येकाने मन मानेल तसे बडबडत सुटावे. ह्यामुळे माझ्या मनाला मात्र तीक्ष्ण यातना सारख्या होत होत्या.

थंडीच्या ऋतूतला तो माघ महिना. सूर्योदयीच मला कुलोपाध्यांनी थंड पाण्याचे विपुल स्नान घालून न्हाव्याकडून सक्षौर डोक्याची हजामत वस्त्र्याने करविली. नंतर पुनः स्नान घालून लहान पंचा नेसवून उघड्या शरीराने मला होमाच्या स्थंडिलासमोर पाटावर नेऊन बसविले. पुढे प्रथम संकल्प करायचा त्यांत कोणकोणत्या पापांचे उच्चार व्हावयाचे त्याबदद्ल प्रचंड वाद निरनिराळ्या वैदिकांचा सुरू झाला. त्यांत निश्चित म्हणून होईना. दिवस वर आला, दुपार झाली तरी संकल्पास ठिकाण नाही की होमकुंड चालू होईना. सकाळी सातपासून सायंकाळी चारपावेतो मी ह्या स्थितीत उपाशी बसून कळकळून गेलो. तोंडात पाणी नाही, मग चहा कुठला. जवळ एक गोमुत्राचे मोठे पात्र मात्र भरलेले डोकावत होते. होमाचे व पूजेचे साहित्य सर्व तयार होते. प्रायश्चित्ताचा विषयच इतका अपरिचित होता की त्यांत कोणते विधि कसे करायचे ह्याचे तपशील नक्की होणे व एकवाक्यतेने ते सर्व पार पडणे दुरापास्त झाले. त्यांत पुढे दहा वाजल्यापासून गावोगावची आमंत्रित मंडळी जमू लागून त्यांनी वादात भाग घेतल्यामुळे जास्तच घोटाळा माजला. नवीन गृहस्थ आला त्याला पुर्वीच्या वाटाघाटीची दाद नाही. नाही व्यवस्थित सभा किंवा तिचे नियंत्रण. दुपारपावेतो शेदीडशे मंडळी जमली. त्यांत खरे विव्दान किंवा अधिकारी पेशाने बोलणारे कोणी नव्हते. ह्यामुळे बाचाबाची व गोंधळ उडाला. जे कोणी गावगुंड पैसा उपटण्याच्या मतलबाने बोलत त्यांचा ओरडा अनिवार्य बनला. मी मात्र उघडाबोडका पाटावर बसून गुन्हेगारासारखा सर्व प्रकार निमूटपणे पाहत होतो. दुसरे मी तरी काय करणार बारा वाजले तेंव्हा स्वयंपाक तयार होऊन पाने मांडली. तरी धार्मिक विधीस आरंभ होइना.

गणेशपंत बाबा, कृष्णोबा नायक सरदेसाई अशी अनेक शिष्ट मंडळी समजूत घालतांना रडकुंडीस आली. सर्व लोक जीव तोडून प्रयत्न करु लागले. वाढलेल्या पानांच्या पंक्ति वाऱ्याने धूळ खाऊ लागल्या. आतील बाहेरील सर्व चिंताक्रान्त झाले.

प्रकरण सिध्दीस न जाता जर सर्व फिसकटले तर पुढे काय करायचे ही धास्ती उत्पन्न झाली. विशेषतः वडिलांनीच हा सर्व घाट जुळवून आणला असल्यामुळे ते ह्या ग्रामस्थांच्या कारवाईने अत्यंत संतापून गेले. त्या प्रांतात आमच्या वडिलांचा कोपिष्ट स्वभाव लोकांना परिचित होता. त्यांच्या क्रोधाग्नि भडकूं लागला हे मी दूरुनच ताडले. विशेषतः माझे हाल पाहून त्यांचा जीव कासावीस झाला. कित्येक गुंड नंसता घोळ घालून अडवू लागले, त्यांचे खासगी आचरण जगजाहीर होते. त्यांनी आपल्या मुलाची अशी विटंबना करावी हा विचार दुःसह होऊन वडिलांची कांन्ति लालभडक झाली. सायंकाळच्या चार वाजण्याचा सुमार झाला, तरी सुरुवात नाही, हा काय धर्म, की न्याय अशा भावनेत वडिलांनी रुद्रावतार धारण केला. त्यांचे देहभान सुटले म्हणण्यास हरकत नाही. कित्येकांची खासगी बिगे लोकचर्चेत जाहीर होती ती उच्चारीत वडील पुढे आले आणि मोठ्याने एकएकास नावाने का हाक मारुन सर्वाच्या देखत सांगू लागले ''ए अमक्या, तू घरांत असे असे पाप करतोस की नाही बोल. खोटे सांगशील तर जिव्हा झडून जाईल.'' शेवटी कातावून ते ओरडले, ''तुम्ही माझ्या मुलाला प्रायश्चित्त देण्यास लायक नाही. तुमची पापे एवढी घोर आहेत की प्रथम तुंम्हालाच माझ्या मुलाकडून प्रायश्चित्त देवविले पाहिजे. उठा सर्व लोक, पानावर बसा आणि जेवण झाल्यावर मग पुढचा विचार पाहू.'' हा प्रचंड घोष एकून एकदम चहूंकडे गडबड उडाली. गणेशपंत बाबांनी पुढे येऊन वडिलांस धरून घरात नेऊन बसविले आणि म्हणाले,'' तू आता जास्त बोलू नको. स्वस्थ घरात बस. मी सगळे संपवितो.'' त्यांनी आमच्या उपाध्यास पुढे आणून त्यांजकडून कसा तरी संकल्प सांगवून होमाची सिध्दि केली आणि मंडळीस पानावर बसवून जेवण सुरू केले. भटजींनी माझ्या हातावर गोमूत्र व पंचामृताचे आचमन दिले ते मी कुंडांतील अग्नीस अर्पण केले. पाच मिनिटांत सर्व प्रकार संपला. मी धोतर नेसून पंक्तीत जेवायला बसलो. भोजन होऊन लोक आचवतात तो अंधार पडला. गणेशपंतांनी प्रायश्चित्ताचा मसुदा तयार केला होता, त्यावर भोजनोत्तर सर्वांनी भराभर सह्या केल्या. अशा रीतीने माझा तो दिवस परिणामी पूर्ण यशस्वी बनला.

त्या दिवसाच्या अशा सर्व गमती कागदावर दाखल करणे शक्य नाही. वडिलांनी कित्येकांचा जाहीर दध्दार केला तो लिहिता येत नाही. वडिलांच्या सात्विक आवेशाचा परिणाम होऊन प्रकरण संपले न हेच विशेष. सर्वच मनुष्यप्राणी स्खलनशील आहेत. धर्माचे थोतांड मतलबी लोक उगाच वाढवितात, त्यांत तथ्य नसते. झालेला प्रकार पुढे सर्वांस गोड वाटून चहूंकडे गाजला. कित्येक दिवस हा विषय लोकांच्या तोंडी राहिला. वडिलांच्या सात्विक कोपास यश आले. प्रायश्चित्ताचे हाती घेतलेले कार्य लौकिकात यशस्वी झाले ह्याबदद्ल वडिलांस नेहमी अभिमान वाटे. त्यानंतर अनेकवार मी युरोपास गेलो, पण प्रायश्चित्ताची गोष्ट पुनः निघाली नाही. आता त्या गोष्टीस साठ वर्षे होऊन गेली. ह्या दीर्घकालात धर्माचारात एवढी क्रांन्ति घडून आली आहे

की प्रायश्चित्त म्हणजे काय हेही लोक विसरले आहेत. माणूस करू शकत नाही ते काळ उरकून टाकतो.

ह्या प्रायश्चित्ताच्या निमित्ताने खालील प्रशस्तिपत्र ता. १३ फेब्रुवारी स. १८९३ रोजी मला लिहून दिले. ''यादी ठराव रा. रा. गोविंद सखाराम नायक सरदेसाई, राहणार गोवील हे बडोदे सरकाराकडे नोकर असून सरकारच्या बोलावण्यावरून विलायतेस समागमे जाऊन परत आल्यावर घरी येऊन समस्त ब्रम्हवृंद धर्माधिकारी ज्योतिषी देशाधिकारी ह्यांजकडे विनंती केल्यावरून सर्वाची संमति घेऊन सर्वांनुमते यथाशास्त्र प्रायश्चित्त देऊन मुक्त करून पंक्तिपावन करून घेण्याचा विचार ठरल्याप्रमाणे आजरोजी आंम्ही पंचमहालांतील ब्राम्हणसमुदाय ह्यांनी सरदेसाई ह्यांच्या घरी जमून संस्कार कौस्तुभ, प्रायश्चित्त मुक्तावलि, नारायण भटट्री, धर्मसिंधु इत्यादि ग्रंथांच्या शास्त्राधारे सक्षौर पडब्द प्रायश्चित्त देंऊन पुनरुत्थानादि विधि करून मशारनिल्हे सरदेसाई ह्यांस दोषमुक्त करून पंक्तिपावन करून घेतले आहे. आता ह्यांजविषयी कोणी शंका घेण्याचे कारण नाही.'' ह्याखाली सुमोर दीडशे ब्राम्हणांच्या सह्या आहेत.

प्रायश्चित्त आटोपल्यावर मी बडोद्यास गेलो. महाराजांनी हकीकत ऐकून खुषी दर्शवली किती खर्च आला म्हणून विचारले. मी सांगीतले, रोख दक्षिणा रुपये अडीचशे व भोजनखर्च अडीचशे असा खर्च आला. लगेच महाराजांनी पाचशे रुपये दिले. ह्यापैकी ४० रुपये दक्षिणा म्हणून शंकराचार्यांकडे पाठविले आणि सर्व प्रकार तसाच केसरी पत्रांत प्रसिध्द केला. ता. २८ मार्च स. १८९३ च्या अंकात तो दिला आहे. हे ते पत्र असे –

''रा.रा.केसरी कर्ते ह्यांस,

श्रीमंत बडोदे सरकारांबरोबर मी गेल्या वर्षी युरोपास जाऊन आल्याबदद्ल घरी कोकणात जाऊन यथोक्त प्रायश्चित्त घेतल्याचा आपण आपल्या अंकांत उल्लेख केला होता. त्यानंतर ह्या संबंधात मी जगदगुरु शंकाराचार्याशी पत्रव्यवहार करून त्यांचेही अनुमोदन आणविले. तो पत्रव्यवहार बडोद्याचे नायब दिवाण रा. ब. आठल्ये ह्यांचे श्रींस पत्र व त्यांचे त्यांना व मला आलेले जबाब लोकांस माहीत होणे युक्त वाटल्यावरून ह्यासोबत आपल्याकडे प्रसिध्दीसाठी पाठविले आहेत. त्यांस सवडीनुसार आपल्या पत्रात प्रसिध्दी दिल्यास मी आपला आभारी होईन. प्रायश्चित्ताच्या युक्तायुक्ततेबदद्ल आता फारसा वाद उरला नाही. ते कोणते व कसे घ्यावे व त्यास काय अडचणी समाजात येतात हे लोकांस समजणे इष्ट वाटते. शिवाय ज्या माझ्या ग्रामस्थ बांधवांनी आपली प्रस्तुत कालची जबाबदारी ओळखून इतर ठिकाणाच्या सुशिक्षितांसही कित्ता घालून देण्यासारखे वर्तन केले, त्यांचे प्रसिध्दपणे आभार मानून उतराई होण्याची संधि मला द्यावी. कळावे.'

हे पत्र व सोबतचे ६ कागद त्याच अंकात केसरीने प्रसिध्द केले.

३. जेंव्हाच्या तेंव्हा, जेथल्या तेथे

Desire to improve at every moment and in every detail is the strongest urge for lifes fulfilment.

हे ब्रीद वाक्य माझ्या टिपणांत वारंवार नोंदवून ठेवलेले मला आढळते. त्यातच माझ्या स्वभावाची मुख्य खोच बनली आहे. हो म्हणून कशी तरी वेळ मारुन नेण्याची शक्कल मला जन्मांत कधी साधली नाही. काम अगदी लहान व हलके असो की श्रमाचे व महत्वाचे असो, ते शक्य तितके परिपूर्ण किंवा यथास्थित करण्यांत मी कधी हलगर्जीपणा दाखविला नाही. ते वेळेवर, किंबहूना वेळेच्या अधी आणि आपली सर्व अक्कल खर्चून होईल तितके चांगले करून दाखवायचे ही सवयच माझ्या अंगवळणी पडून गेली. कोणी एखादा लेख मागितला किंवा कोणाला एखादा इतिहासातला किंवा अन्य संदर्भ हवा असला, पत्राने किंवा प्रत्यक्ष तशी पृच्छा आली की शक्य तोवर ती लवकर सिध्दीस नेल्याशिवाय मला चैनच पडाचयचे नाही. ते काम हातावेगळे होईपर्यंत मनास सारखी टोचणी लागलेली असायची. बडोद्याच्या नोकरीत महाराजांकडून दररोज असे काहीं कामे निघायचे, मुलांना शिकवितांना किती तरी प्रश्न क्षणोक्षणी उपस्थित व्हायचे, पण ते मी कधी अंगाबाहेर टाकले नाहीत. आपली शिकस्त करून हरएक कामाची पत पूर्तता हटकून करायची अशी माझी वृत्ति पहिल्यापासून बनल्यामुळे कोणाचीही बोलणी खाण्याची पाळी मला कधी आली नाही. उलट प्रत्येकाची अशी खात्री असे की ह्यांनी कबूल केलेले काम बिनदिक्कत होणार, कधी चुकायचे नाही. पत्राचा जबाब वेळेवर जायचा, पत्रे बिनजबाबाने पडून राहिली असे हधी व्हायचे नाही. स्वच्छता, नीटनेटकेपणा, व्यवस्था, टापटीप, जेथल्या तेथे, जेंव्हाच्या तेंव्हा इत्यादि सर्व काही गुण एकाच मुख्य वृत्तीचे पर्याय आहेत. वेळेवर जेवण, वेळेवर झोप, वेळेवर उठणे, जणू काय सर्व व्यवहार घड्याळाच्या नियमित गतीने चालू असायचे, त्यात व्यत्यय केवळ आजाराच्या किंवा अशाच अपरिहार्य कारणाने आला तरच. हा माझा एकंदर कित्ता जवळच्यांच्या इतका परिचयाचा झाला होता की ज्यांत ज्यांत माझा एकत्र संबंध यायचा त्या कामात ते सर्व मला भिऊन वागत. सर्वांनी वेळेवर जेवायला यायचे, कपडालत्ता, पुस्तके, कागद, व्यवस्थित जागच्या जागी ठेवायचे केंव्हाही कोणी आला तरी घरात त्यास अव्यवस्था म्हणून दिसायची नाही. अशी माझी घरची पध्दत पडून गेल्यामुळे आमचे व्यवहार सुलभ व नियमित उलगडत, सर्व कुटुंबालाच असे वळण लागत गेले. त्यातून सुदैवाने ह्या प्रवृत्तीचे पोषण सयाजीराव महाराजांच्या तशाच रेखीव व नियमित स्वभावामुळे माझ्या अंगवळणी पडत गेले. संगतीने अशा सवयी कायमच्या बनतात.

व्यवहारात हरहमेशा अनेक प्रसंग इष्ट किंवा अनिष्ट घडून येतात. अशा प्रसंगांनी मनाचे स्वास्थ्य बिघडून अंतःकरणास सारखी खिन्नत उत्पन्न होते. घरातल्या मंडळीशी किंवा स्नेहीसोबत्यांशी स्पष्टपणे बोलून कित्येक लोक आपले मन हलके करीत असतील. माझा मात्र ह्या बाबातीतला क्रम बराच वेगळा होता. एखादा विषय मनास त्रास देऊ लागला की मी लगेच बसून त्याचे निदान कागदावरी टिपून ठेवीत असे. कागदावर तपशील मांडू लागले म्हणजे गुणावगुण व दोषार्हता स्पष्ट होते. आपली चूक असली तर पदरात घ्यावी, दुसऱ्याची असली तर ती त्याच्या माथी मारावी ही सोय लेखाने होते आणि ही न्यायाधीशाची भूमिका स्वीकारुन एकदा निवाडा लिहून टाकला की ते प्रकरण संपून मनास पुनः स्थैर्य प्राप्त होते. नवरा-बायकोंतील धुसपूस, कुटुंबीयांचे व्यवहार देवघेवीचे वगैरे विषय, नोकरचाकरांच्या कलागति असले प्रकार हमेशा घडून

आवेशाच्या भरात आपण भलताच शब्द बोलून जातो किंवा भलतेच आचरण करतो. मागाहून त्याचा पस्तावा होतो. असले किती तरी विषय त्या वेळी लिहून ठेवलेले माझ्या टिपणात आज मला आढळतात. मला वाटते आपणच आपला निवाडा निष्पक्षपाताने करणे ह्यांतच माणुसकीची उत्कृष्ट भलाई आहे. ह्या लेखनोपायाचा मला अतिशय उपयोग झाला आणि मी सावधपणा धारण करू लागलो. अद्यापि ती टिपणे मला मार्गदर्शन करितात. विस्तारभयास्तव ती मला येथे देता येत नाहीत.

महाराजांचा मी निकटवर्ती नोकर असल्यामुळे हरहमेशा काहींना काही कारणाने त्यांकडून भलाईचे किंवा ठपक्याचे उद्‌गार निघत. पुष्कळदा माझा काही एक अपराध नसता ते मला कठोर शब्दांनी निष्कारण दोष देत मर्यादा संभाळून मी जबाबही वेळेवर सुचेल तो देई. पण अशा प्रतिजबाबामुळे यांचा राग वाढून ते जास्तच बोलत. उघडच आहे, ते धनी व मी चाकर. चाकराची चुकी नसली तरी ती त्याने आपण होऊन पदरात घेतली म्हणजे यजमानाचे समाधान होते. पण नाहक भलताच दोष पदरात घेण्यास चाकर तरी कसा तयार होणार असे खटके उडाले म्हणजे चाकराची दैना काय विचारावी ''सबबी सांगू नका, जा चालते व्हा येथून,'' असे शब्द निमूटपणे ऐकून कित्येकदा परत यावे लागे. घरी आल्यावर मी ते प्रकारण कागदावर लिहून न्यायाधीशाचा निकाल देई. तेणेकरून मन शांत होई. कधी विषय निघाला तर कल पाहून मी तो निकाल महाराजांचे नजरेस आणी अशा वृत्तीचा एक प्रसंग सांगतो म्हणजे त्यांच्याशी वागण्याची तऱ्हा कळून येईल.

एके दिवशी महाराज सकाळी ९ च्या सुमारास राजपुत्रांच्या शाळेत आले. मुलांची कामे पाहून फार खूष झाले. परत निघाले तेंव्हा तोच विषय बोलत मी चार पावले त्यांजबरोबर चालत गेलो. तोंडाने माझ्या कामाची वाखाणणी ते करीत होते. मी त्यावर त्यांस म्हणालो. ''परवा आपण मला ह्याच बाबतीत ठपका दिला आणि आज ही शाबासकी चालली आहे. खरे म्हणजे मी दोहोंसही पात्र नाही. मी आहे तसाच आहे. शक्य तितक्या काळजीने मी आपले कर्तव्य बजावतो. इतकाच माझा सेवकाचा अधिकार.'' जबाब ऐकून माझा आशय ते समजले. कानउघाडणी सफल झाली.

राजवाडयात नाना वृत्तीचे नोकर असतात. सर्वांशी माझा संबंध येई. पुष्कळदा त्यांस कठोर शब्दांनी ताडणही करावे लागे. असे किती तरी प्रसंग उद्‌भवले की त्या नोकरांनी महाराजांकडे जाऊन माझ्याबदद्‌ल खोट्या चहाड्या कळविल्या. पण पूर्ण तपास केल्याशिवाय महाराजांनीही भलताच निकाल कधी केला नाही. जमादारखान्यांतील एका नोकराची गोष्ट घडली ती मी कधी विसरणार नाही. इतकेच काय पण प्रत्यक्ष महाराणींनी जयसिंहरावांच्या लग्नात होळकरमहाराजांच्या सत्कारात काही व्यंग घडले म्हणून मला १०० रुपये दंड केला. महाराजांनी सर्वप्रकरण कागदावर लिहून पुरावा घेतला. त्यात महाराणींची व माझी अशा साक्षी झाल्या. चूक माझी नव्हती असे माझ्या शिशांतील चोपडीच्या पुराव्याने सिध्द झाले. दंडाची शिक्षा महाराजांनी मंजूर केली नाही. मी मोठ्या पेचातून दोषमुक्त झालो. माझ्या टापटिपीच्या वर्तनाचा हा परिणाम होय.

पुढे आलेले काम यावच्छक्य काळजी घेऊन बजावीत गेले की माणसाचा उदय झालाच पाहिजे अशी माझी ठाम समजूत आहे. उद्याची संधि सर्वांसच सारखी येईल असे नाही, पण बहुधा केंव्हाना केंव्हा अशी संधि प्रत्येकास येते, मात्र ती येईल तेंव्हा तिचा उपयोग करण्याची अंगची पात्रता त्यांने सदैव कमवीत असले पहिजे. शिपोशीच्या शाळेत, रत्नागिरीच्या हायस्कूलात, मुंबईत बापूसाहेब आठल्यांच्या घरी किंवा पुढे बडोद्याच्या महाराजांच्या सेवेत मी आपल्या व्यवस्थित वर्तनाने सदैव भलाई मिळवीत गेलो हा परिणाम माझ्या निरलस वृत्तीचा होय. दुसऱ्याने वाईट केले तर त्याचे फळ तो भोगी, मी होऊन त्याचा सूड घेण्याची भलतीच बुध्दी मनात कधी बाळगली नाही. दुसऱ्याचे अहित करण्यात आपल्याच यातना नाहक वाढतात हे लक्षात ठेवून मी वागलो, म्हणूनच मला वाटते माझ्यासारख्या सामान्य माणसाला काही एक विशिष्ट करामत पैदा करता आली. ''आत्मैवह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः'' हे तत्व मला पूर्णपणे पटते. प्रत्येकाचे बुध्दिसामर्थ्य कमी अधिक असेल, ते अपणास बदलता येणार नाही, पण सद्‌भावना मात्र सर्वस्वी प्रत्येकाच्या हातची आहे. पत्करलेले काम मनोभावनेने पूर्ण करायचये, त्याचा मोबदला मिळो अगर न मिळो, मिळेल तेवढ्यात संतुष्ट राहायचे, ही भगवतगीतेची शिकवण आपण व्यवहारात पाळली की आपला कार्यभाग संपला.*

बडोद्याच्या नोकरीत किंवा पुण्या-मुंबईकडील बाहय वातावरणात अनेक भिन्न वृत्तीच्या व्यक्तींशी माझा संबंध आला, पण मी आपली छाप सर्वांवर बसवू शकलो. सर्व मला एक प्रकारे वचकून असत. खुदद् महाराजांशी माझी तेढ वाढली, तीतही मी आपले सत्व राखीत गेलो. मनस्तापाचे प्रसंगही पुष्कळ अनुभवावे लागले, पण कधी अपयश पत्करावे लागले नाही. सर्व राजपुत्र मला वचकून असत. मनुभाईसारखे वरिष्ठ अधिकारीही मला कधी भलत्या रीतीने वागवू शकले नाहीत. संपतराव, महाराणी अशी अनेक मंडळी मला ओळखून असत. अलीकडील निवृत्तीच्या काही काळात देखील नाना वेध लहानमोठ्या व्यक्तींशी माझा विरोध झाला असताही अखेरीस त्यांजवर मी आपले वजन पाडू शकलो. पेशवे दफतरासारखी मोठी कामे मी संपूर्ण केली, त्यांत कित्येकांनी भलत्याच कारवाया केल्या, परंतु त्या माझे काही वाकडे करू शकल्या नाहीत हा मी आपला एक विजयच समजतो. सर जदुनाथ सरकार म्हणजे एक आधुनिक युगांतली विलक्षण जाज्वल्य व्यक्ति, त्यांच्याशी मी चाळीसपन्नास वर्षाच्या दीर्घ कालांत संपूर्ण गोडवा टिकवू शकलो हाही प्रकार मला लक्षांत भरण्यासारखा वाटतो. आपली सद्भावना कायम असली की तिजपुढे कोणाचे काही चालत नाही. मात्र प्रत्येकाने आपले सामर्थ्य ओळखून झेपेल तेवढीच उडी घ्यावी. ह्याचमुळे रेकॉर्ड कमिशन किंवा इंडियन हिस्टरी कॉंग्रेस अशा कित्येक संस्थास माझी मान्यता वाटते.

गुण मिरविण्याची मला हौस नाही, तशी अंगचे दोष झाकण्याचीही नाही.माझे मलाच कित्येक दोष उघड दिसतात, पण ते आवरता येत नाहीत. उच्चारआचारांत पाचपेच सांभाळण्याची

---

* भगवद्‌गीता, अध्याय १८.२६ यातील सात्त्विक कर्त्याची व्याख्या, तसेच अध्याय १८-५१-५४ यातील निष्काम कर्माचा निर्देश हे सर्वथा रोजच्या व्यवहारासही लागू पडणारे आहेत.

सावधगिरी मला साधत नाही.सहज वाटेल ते बोलून गेल्यावर मागून पस्तावण्याची पाळी येते. वाक्यसंयम व व्यवहारिक पोच मला साधत नाही. माझी स्मरणशक्ति फार कोती आहे. मुलांनी सांगितलेली एखादी साधी गोष्ट सुध्दा माझ्या लक्षात राहत नाही. अमुक प्रसंगी तुंम्ही असे बोललांत असे पुंष्कळ लोक सहज माझ्या पदरात घालतात, ते मला मुळीच साधत नाही. लिहून टिपणे ठेवण्याची सवय जडल्यामुळे स्मरणशक्ति गारठली. जदुनाथ तर तीस चाळीस वर्षापूर्वीचे वाक्य किंवा कृत्य सहज सांगून मला चकित करतात.वाचलेल्या पुस्तकांतील संदर्भ ते लगोलग दाखवितात. मला तसे संदर्भ आठवत नसल्यामुळे पुष्कळ हिरमोड होतो. शिवाय कामे घाईने उरकण्याची सवय जडल्यामुळे लेखांत किंवा भाषणांत दोष राहून जातात, त्याजबदद्ल मागाहून पस्तावा होतो. व्याख्यानांतले मुदद्े मी नीट टिपून घेतो, पण ऐनप्रसंगी बोलतांना व्यवधान राहत नाही आणि कित्येक सुंदर विचार बोलायचे राहून गेल्याबदद्ल मागाहून हळहळ वाटते. अलीकडे मी आपली सर्व व्याख्याने लिहून वाचण्याचा रिवाज स्वीकारला आहे. ह्यामुळे गफलत होत नाही. माझ्या स्वभावात सहनशीलता किंवा सबुरी दमखाऊपणा नाही. दोन द्यावे दोन घ्यावे ही मनाची व्यवहारिक ठेवण अनेक लहान-मोठ्यांना साधते ती मला नाही, त्यामुळे उगाच शुल्लक बाबती मी मनास लावून घेतो. झटपट राग व लगेच शांति असा मनाचा प्रघात बनल्यामुळे व्यवहारांत ठेचा खाव्या लागतात. सयाजीराव तर ह्या बाबतीत अगदी उलट कोटीचे होते. एखादा रागव्देष वर्षोगणति ते मनांत साठवून ठेवतील, बाहेर त्यांचा अंतस्थ कावा कधी दिसायचा नाही. पण वेळ आली म्हणजे पुरेपूर वचपा घेतल्याशिवाय ते रहायचे नाहीत. अशा प्रकारची आपण आपल्या मनाची तपासणी करीत जाणे हा माझा एक नेहमीचा व्यवसायच बनला आहे.

४. कामशेतचा निवास

देव, परमेश्वर इत्यादी काय कल्पना आहेत इत्यादिंचे आकलन मला होत नाही. मला इतकेच कळते की आपण जन्मास आलो खरे आणि आपणाला बरेवाईट ओळखण्याची अक्कलही आहे. मग ही अक्कल वापरुन भलेपण मिळविणे हेच आपले कर्तव्य आहे. हे कर्तव्य प्रत्येकाला साध्य असून त्यावरच समस्त मानवी संसार आधारलेला आहे. तुकारामबोवांनी तरी देवाजवळ दुसरे काय मागितले. ''न लगे मुक्ति धनसंपदा, संतसंग देई सदा.'' देवाची ही देणगी मला भरपूर लाभली असे मी मानतो. 'संतासब्दिः संगः कथमपि हि पुण्येन भवति,' ह्या न्यायाने माझी ह्या जगातील पुण्याई मला महान वाटत नाही.माझ्या पितृ-मातृ कुलांत हिणकस असे काही नव्हते. समजु लागल्यावर शैक्षणिक व्यवसायांत मला गुरू म्हणून भेटले ते यच्चयावत् वंदनिय होते. पुढे कौटुंबिक संबंध जडले ते सर्व सग्दुणी व श्रेयस्कर बनले. प्रथम बापूसाहेब आठल्ये व उत्तरायुष्यांत सर जदुनाथ सरकार ह्यांचे मार्गदर्शन मला लाभले आणि प्राप्त परिस्थितीत हा लाभलेला नरदेह मी सत्कारणी लावला हे समाधान काही लहान नव्हे. 'तुझा विसर न व्हावा' हीच मागणी मी तुकारामबोवांप्रमाणे सदैव मागत राहीन. 'तुझा' म्हणजे 'मानवी कर्तव्याचा' एवढाच बदल फार तर मी करीन. हेच माझे तत्वज्ञान.

प्रत्यक्ष आचारणात हे तत्वज्ञान मला पदोपदी अनुभवास येते. शक्यतोवर दुसऱ्याच्या उपयोगी पडत राहवे ही कौटुंबिक वृत्ति आम्हा सर्व बंधूंच्या ठिकाणी व आमच्याशी सदैव निगडित

असलेल्या आठल्यांच्या मातुल घराण्यांतील मंडळीच्या ठिकाणी दृष्टीस पडते. दोनही कुटुंबातील माणसे आजपावेतो एकमेकांच्या उपयोगी पडत आली. त्यामुळे दोघांचाही सर्वतोपरी उत्कर्ष झालेला दिसून येतो. दोनही कुटुंबांतले तरुण पूर्वीच्या मानाने आज जास्त उत्कर्ष पावलेले दिसतात. त्यांचे रहस्य ह्या कौटुंबिक सहकारात आहे. प्रथम बाळूमामांनी मला इंग्रजी शाळेत घातले म्हणूनच आमचे भावी जीवन प्रगतीच्या मार्गास लागले. हल्ली बाळूमामांची व त्यांच्या बंधूंची मुले आमच्याशी एकाच कुटुंबातल्याप्रमाणे वागतात. तात्यामामांच्या मुली सईताई, गीतूताई व व्दारकूताई आमच्या संसाराशी सर्वथा एकजीव आहेत. माई गेल्यावर मला ह्या सर्वांनी संसारांत उणे भासून दिले नाही. कृष्णा व जयराम ह्यांनीच आरंभाचे कष्ट सोसून कामशेतचा निवास उर्जितावस्थेस आणिला. विठूमामा व हरिमामा ह्यांनी कैक वर्षे आमचा गोवीलचा संसार अत्यंत काळजीने सांभाळला. हरिमामा आमच्याच बरोबर बडोद्यात व इतरत्र उद्योग करून वाढत गेले. सर्पदंशाने त्यांचा मृत्यु गोविलास १८ फेब्रुवारी स. १९१४ ह्या दिवशी झाला. बाळूमामा त्यांच्या पूर्वी थोडे दिवस ता. ६ दि डिसेंबर स. १९१३ ह्या दिवशी भडकंब्यास वारले. त्यांचे वडील बंधू लक्ष्मणतात्या ता. २ मार्च स. १९२५ रोजी मोर्ड्यास वारले. विठूमामा तर सदैव आमच्याच बरोबर राहिले. त्यांचा अंत थोड्या वर्षावर व्दारकेस ता २२ एप्रिल १९३८ ला झाला. आज आठल्ये व सरदेसाई ही दोनही कुटुंबे एकजीव आहेत.

कामशेतच्या निवासात मला शेवटचे परमोच्च स्वास्थय लाभले. त्यामुळेच माझे जीवन इतके समृध्द होऊ शकले. पूर्वायुष्यांत तयारी झाली तिची सांगता ह्या शेवटच्या कालखंडात प्रत्ययास आली. महाराष्ट्रात तर कामशेतचा माझा आश्रम सुविदित आहेच, पण महाराष्टाबाहेरही सरदेसारई व कामशेत हे शब्द दृढमूल बनले आहेत. हे स्थल निवडून तेथे इंद्रायणीच्या पवित्र काठी व एवढा प्रचंड प्रपंच उभारण्याचे भाग्य बंधु भाऊंनी निर्माण केले, त्या कल्पनेची महती काय वर्णावी ता. २६ जानेवारी स. १९१८ च्या पत्रांत त्यांनी मला बडोद्यास लिहिले,

I am getting very busy nowadays and have to spend most of my time in building the Free Ophthalmic Hospital. The work is daily increasing and we want men. Our people are too lazy to utliise their time properly. I latyely heard J. C. Bose speaking in Bombay. He shows by his work what a man can do by patient and persistent hard work. Such a man alone is a saint. I am going shortly to build a small house at Khadkala and would very much wish that you complete your lifes work there away from the worries and cares of life. You have brought us all up and we must pay back our debt to you."

ह्यावरून आंम्हा बंधूंचे कौटुंबिक ध्येय काय बनले ह्याची कल्पना होईल. सरदेसाई- मावळंकर घराण्याचा मूळपुरुष नृसिंहभट सत्यवादी हा अद्यापि आपल्या वंशजास योग्य स्फूर्ति देत आहे. ह्यानंतर कामशेतचे स्थल निर्माण झाले तो प्रकार वाचकांस विदित आहे, येथे सांगण्याची जरूर नाही.

४.
सयाजीरावांची सेवा

भाग्यानि पूर्वतपसा खलु संचितानि
काले फलन्ति पुरुषस्य यथैव वृक्षा

१. आरंभीचा गोडवा

बडोद्यातील माझ्या ह्या नोकरीत प्रवासाचा लाभ जरी मोठा असला तरी बौध्दिक विषयाचे अवांतर फायदे मला काही थोडे मिळाले नाहीत. दुसऱ्या एखाद्या खात्यांत मी लागलो असतो तर पगार कदाचित जास्त मिळाला असता, पण विद्यार्जनाची जी संधि मला महाराजांच्या संगतीत प्राप्त झाली, ती इतरत्र साधली नसती. खास सरकारवाड्यांत राहिल्याने सहजी मला थोरामोठ्यांच्या ओळखी करता आल्या. राजवाड्यांत हरहुन्नराचे लोक महाराजांकडे येत, त्यांची व्याख्याने, कीर्तने, नाटके, गायनादि जलसे, शतावधानींचे नैपुण्ये असे किती तरी प्रकार मला अनुभवता आले. पहिली चारपाच वर्षे हे सर्वप्रयोग मलाच ठरवावे लागत, पुढे राजपुत्रांचे शिक्षण वाढून मला वाड्यांतील अशा कामांस फुरसत मिळेना म्हणून ती मला दूर लोटावी लागली. तरी त्या सर्वांसी माझा संपर्क साफ तुटला असे कधी झाले नाही. राज्यांतील सर्वप्रमुख अधिकाऱ्यांशी माझा निकट परिचय झाला. नाना व्यासंगांची नामांकित माणसे नोकरीत घेण्याची महाराजांची प्रवृत्ति असल्यामुळे अशा पुष्कळ कर्तबगार व्यक्तींचा परिचय मला अनयासे घडला. श्रीनिवास राघव ऐंयंगार, अरविंद घोष, रमेशचंद्र दत्त, व्ही. पी.माधवराव, व्ही. टी.कृष्णमाचारी अशा अनेक थोर पुरुषांशी माझ्या ओळखी झाल्या. म्हैसूर, ग्वाल्हेर, इंदूर, कोल्हापूर अशा संस्थानाचे अधिपति पाहुणे म्हणून बडोद्यास आले असता त्यांची सरबराई ठेवण्याचे काम करतांना त्यांचेही रीतरिवाज मला कळून आले. अब्बास तैयबजी हे एक उदार वृत्तीचे थोर गृहस्थ महाराजांच्या नोकरीत न्यायाधीश असून त्यांच्या सहवासाचा बडोद्यांतील सामाजिक जीवनावर फार मोठा परिणाम झाला. दर रविवारी त्यांजकडे चहापार्टीचा मेळावडा जमे. त्यात आमच्या मनातील

जातिभेद व सामाजिक आकुंचन पार नाहीसे झाले. सारखा वीस पंचवीस वर्षे तैयबजींचा हा उत्कृष्ट प्रयोग यशस्वी बनून बडोद्याचे एकंदर वातावरण उन्नत होत गेले. युंरोपच्या प्रवासातही अशा अनेक व्यक्तींशी माझा परियच घडून माझे स्वतःचे जीवन पुष्कळ विस्तारले.

ह्याचे एक नमुनेदार उदाहरण म्हणून दादाभाई नौरोजी ह्या थोर पुरुषाशी माझी ओळख होण्याचा योग कसा अकल्पित घडला ते सांगतो. स. १८९२ साली मी महाराजांबरोबर पॅरिस येथे होतो. त्यांना लंडनास जावयाचे म्हणून मला त्यांनी पुढे पाठवून तेथील हॉटेलात सर्वांच्या सोयीच्या जागा ठरविण्यास सांगितले. मी पॅरिसहून एकटाच लंडनास जाऊन चेरिंग क्रॉसच्या मध्यवर्ती हॉटेलात उतरलो. मॅनेजरच्या मार्फत महाराजांच्या राहण्याची व्यवस्था ठरवून मी तसे पॅरिसला तारेने कळविले. इतक्यांत महाराजांची प्रकृति थोडी बिघडल्यामुळे मला त्यांनी कळविले, तूर्त तेथेच राहा, आपणास बरे वाटताच येतो. लंडनात माझी कोणाशी ओळख नसल्यामुळे मी त्या भरवस्तीच्या विस्तीर्ण नगरात एकटा कष्टी बनलो. बोलायचे कोणाशी? सकाळी चहापणी झाल्यावर समोरच्या भव्य स्टँड रस्त्यावर इकडून तिकडे शतपावली करीत असता सहजी एकदोन हिंदी गृहस्थ दृष्टीस पडले. धीर करून मी त्यांना भेटून बोललो, ''मी येथे एकटा आहे, तुंम्ही हिंदुस्थानचे दिसता, मला तुमच्यासारख्यांची ओळख पाहिजे. काही कालक्रमणेचे साधन सांगा.'' त्यानी उत्तर दिले, ''हा येथे जवळच नॉर्थब्रुक इंडियन क्लब असून तेथे दादाभाई नौरोजी राहतात. पुष्कळसे हिंदी गृहस्थ तुम्हास तेथे भेटतील. वर्तमानपत्र व लायब्ररी आहे त्यांचा उपयोग करा.'' लगेच त्यांनी मला दादाभाईनकडे नेऊन त्यांस भेटविले. दादाभाई पूर्वी बडोद्यास दिवाण असून महाराजांबद्दल त्यांना आदर होता. पुढे पंधरा एक दिवस पावेतो मी रोज त्या क्लबात जाऊ लागलो. दादाभाईंनी मला प्रेमाने वागवून मार्गदर्शन केले. पुढे महाराजही आले आणि त्यांच्या भेटी झाल्या. दादाभाईंनी ही भेट म्हणजे मला अत्यंत मोलाचा योगायोग वाटतो. पुढे पंचवीस वर्षांनी महाराजांनी दादाभाईंना उत्तरावस्थेच्या आपत्तीत निर्वाह वेतन करून दिले, तेणेकरून महाराजांवरी इंग्रज अधिकाऱ्यांचा रोष झाला तो प्रकार बाहेर मशहूर आहे. मी मोठा नशीबवान असे मला सदैव वाटते त्याचे कारण असले अकल्पित योगायोग होत.

सयाजीरावांसारख्या उद्योगी व टापटिपीच्या यजमानाकडे माझी योजना झाली हाच माझा पहिला मोठा सुयोग होय. धनी जर अव्यवस्थित व अनीतिमाने भेटला असता तर माझ्या जीवनाचे मातेरे होऊन त्याला अनिष्ट वळण लागले असते. टापटीप व नियमितपणा ह्या गुणांची महाराजांची प्रखर शिस्त आमच्या अंगी सदा भिनत गेली. सदतीस वर्षाच्या नोकरीत पहिली पंचवीस तीस वर्षे राजपुत्रांचे शिक्षण व पुढची दहापाच वर्षे खाजगी खात्याचे चीफ अकाउंटंट अशी माझी सर्व नोकरी सरकारवाड्यात निभावली. शेवटी शेवटी मला ह्या रेखीव ताबेदारीचा कंटाळा येऊन मी बदली मागितली तेंव्हा महाराज म्हणाले, ''धनी आपली सोय प्रथम पाहणार, त्यात सेवकाने संतुष्ट राहिले पाहिजे.''

माझ्या नोकरीची सुरुवात रीडर म्हणून झाली. महाराजांचे रोजचे टपाल व वर्तमानपत्रे पाहून ती त्यांच्या सवडीप्रमाणे वाचून दाखविणे खासगी पत्रांची उत्तरे लिहिणे, महाराज पुस्तके वाचीत त्यांतले कठीण शब्द काढून टिपणे करणे. असे हे सामान्य कारकुनी काम फार तर दोन तीन

तास मला पुरे. बाकीचा माझा वेळ रिकामा जातो हे तात्काळ महाराजांच्या नजरेस आले. मॅकिआव्हेलीचे 'प्रिन्स' व सीलीचे 'एक्स्पॅन्शन ऑफ इंग्लड' ही पुस्तके त्यांनी वाचली. मराठीत त्या वेळी ह्या नवीन पश्चात्य विचारांची पुस्तके नव्हती हे जाणून त्यांनी मला त्या पुस्तकांचे मराठी भाषांतर करण्याचे काम दिले. नाही होय म्हणण्याची मला सोय नव्हती. बी. ए. झालो म्हणून मराठी थोडेच लिहिता येणार? मी प्रयत्न केला. कैक दिवस मोठी कुचंबणा वाटली. भाषांतराचे किती काम झाले म्हणून महाराज वरचेवर विचारीत. पोहता न येणाऱ्या माणसास एकदम पाण्यात फेकावे तशी माझी अवस्था झाली. प्रथम एक वर्षाने 'राजधर्म' ह्या नावाने मॅकिआव्हेलीचे पुस्तक व पुढील दोन वर्षात 'इंग्लड देशाचा विस्तार 'हे सीलीचे पुस्तक दोनही महाराजांच्या खर्चाने छापून निघाली. परभारे लेखनव्यवसायांत माझा प्रवेश झाला. माझ्या मते हे पहिलेच लेखनकाम यथातथाच झाले, पण माझा पहिला उद्योग बाहेर आला. सीलीचे पुस्तक मी त्या प्रोफेसरांस केब्रिज येथे स्वतः भेटून नजर केले. ह्याला मी म्हणतो नशीब.

नोकरीच्या पहिल्या दिवसापासून माझ्या लायकीची प्रत्यक्ष खात्री महाराजांस पटत गेली. मी आळशी नसून कामसू आहे हे पाहून ते माझा उपयोग अनेक कामांत घेऊ लागले. पहिल्याच वर्षी महाराज मुलांसह नीलगिरीस असता फत्तेसिहांचा सातवा वाढदिवस साजरा झाला. स्वारीत उपाध्ये होते त्यांनी पत्रिकापूजन वगैरे विधि रिवाजाप्रमाणे केले. महाराजांना वाटले फत्तेसिहांच्या शिक्षणास सुरुवात करण्याचा हा दिवस आहे. पण ते काम स्वीकारणारा गुरू कोणी तेथे नियोजित नव्हता. मी रीडर म्हणून जवळ होतो, म्हणून त्यांनी पत्रिकापूजनांत मला आज्ञा केली ''तुम्ही आतापासून घटका अर्धी घटका रोज मुलांस अक्षरओळख, वाचन, अंक, पाढे, वगैरे शिकवीत जा. तूर्त हे काम थोडे दिवस तुम्ही करा, पुढे बडोद्यास गेल्यावर कायम योजना ठरवू.'' कदाचित काही काळ ह्या कामांत माझी परीक्षा पाहण्याचाही त्यांचा विचार असावा. प्रथम मला शिक्षणकामाची कल्पना नव्हती. पण पुढे आलेले काम लहानमोठे न पाहता आपल्याकडून होईल तितके चोख करायचे असा माझा परिपाठ असल्यामुळे, मी लगेच शिक्षणविषयक पुस्तके आणून लेखनवाचन मनोरंजकन गोष्टी वगैरे मुलांस शिकवू लागलो. श्रावणापासून दिवाळीपर्यंत दोन तीन महिने हा प्रयोग चालला. फत्तेसिहराव चांगले वाचू लागले, लिहूही लागले. मीही नानाविध उपकरणे जमवून मुलांचे मन रिझवू लागलो. त्या वेळी महाराजांचा मुलगा एकच फत्तेसिंहराव व त्याजबरोबर खेळण्यापरी एक दोन नोकरांची मुले होती. दिवाळीस महाराज बडोद्यास येताच स्वतंत्र राजपुत्र विद्यालय बनविण्याचा विशिष्ट प्रयोग सुरू झाला. न बोलता माझी नेमणूक राजपुत्र-शिक्षक म्हणून कायम ठरली.

महाराज स्वतः लहान असता त्यांच्या शिक्षणासाठी एक स्वतंत्र प्रशस्त अशी मोकळी इमारत लक्ष्मीविलास वाडयाला लागूनच सर टी. माधवरावांनी बांधली होती. तीन मोठी दालने व सभोवार रुंद उघडा व्हरांडा अशी ही भरपूर हवाउजेडाची सुंदर इमारत महाराजांच्या आवडीची होती. तीच त्यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाकरिता ठरवून दिली आणि राजपुत्र विद्यालय हे नाव देऊन माझी बदली मुलांस शिकविण्याच्या कामाकडे केली. रीडर हे माझे नाव कागदावर बंद झाले तरी अगदी अखेरपावेतो तोही त्यांचा व्यवसाय मला पाहवा लागे. ह्याच इमारतीत

महाराजांची खासगी लायब्ररी असून प्रथमपासूनच तिचा मला मोठा उपयोग झाला. शालोपयोगी साहित्य, मुलांची बाके, त्यांच्या सोयीच्या लहान सुंदर खुर्च्या टेबले, कपाटे, पेट्या, टेनिस क्रिकेट खेळ, तालीमखाना, पोहण्याचा हौद अशा सर्व सोयी चार दोन महिन्यांत तयार झाल्या. आणि मीच त्या सर्वांचा चालक बनलो. फत्तेसिहरावांबरोबर सहाध्यायी म्हणून तीन ब्राम्हण व दोन तीन स्वजातीय आप्त असे मुलगे पसंत करण्यांत आले. लेखन मास्तर, चित्रकला मास्तर, गुजराती मास्तर, क्रिकेटचे तज्ज्ञ असे नवीन इसम हळूहळू नेमण्यात आले. अश्वारोहण, गोळीबार, शिकार असे नवीन व्यवसाय चालू होऊन त्या देखरेखीत पंधरावीस वर्षेपर्यंत माझा सर्व दिवस त्या शाळेच्या आवारात जाऊ लागला. सकाळी सूर्योदयाबरोबर घरून शाळेत जावयाचे ते रात्र पडल्यावर परत. माझे दुपारचे भोजन, चहापाणी सर्व ह्या वीस वर्षात घरी कधी झाले नाही. सर्व व्यवसाय, मग ते वर्गातील शिक्षणाचे असोत किंवा बाहेरचे असोत, ते नियमितपणे इतरांच्या साह्याने सर्व करवून घेणे हे काम माझे होते. अर्थात अशा सर्व विषयांची तज्ज्ञ मंडळी एक प्रकारे माझ्या हाताखालचे सहायक बनल्याने राजपुत्र विद्यायल ही एक नामांकित संस्था तयार होऊन तीत सर्वांगीण शिक्षणाची सोय झाली. जरुर प्रसंगी महाराजांस भेटून मी सर्व अडचणींचे निराकरण करीत असे. तेही वारंवार शाळेत येऊन आंम्ही शिकवीत असतांना आमचे काम पाहत बसत आणि जरुर त्या सूचना करीत. पुष्कळदा वाड्यांतील आपले नेहमीचे काम आटोपून तेथून ते शाळेत येत, मुलांबरोबर चहाफराळ करीत आणि टेनिस, क्रिकेट वगैरे खेळांत मुलांबरोबर आपणही भाग घेत. सन १८९० त शाळेची सुरुवात झाली ती स. १९११ त श्री. इंदिरा राजांची मॅटिक परीक्षा संपत चालली. ह्या वीसबावीस वर्षात मी स्वतः श्रीगणेशायनमः पासून बी. ए. पर्यंतच्या अभ्यासक्रमात सालोसाल वाढत गेलो. इतर शालेय शिक्षक तोच तो विषय सारखा वर्षानुवर्ष शिकवीत बसतात, तसा प्रसंग मजवर आला नाही. म्हणून मला दरवर्षी नवी तयारी करावची लागे. राजपुत्र विद्यालय चार वर्षे चालल्यावर मुलांना इंग्रजी भाषा शिकण्याची वेळ आली तेंव्हा महाराजांनी मि.फ्रेंच नावाचे एक इंग्रज गृहस्थ मुख्याद्यापक म्हणून नेमले. तेंव्हा मी त्यांचा मुख्य मदतनीस बनलो. सज्जन व करारी वृत्तीचे असल्यामुळे मला त्यांचा पुष्कळ उपयोग झाला. बहूधा ते सर्व मुलांना इंग्रजी व गणित हे विषय शिकतीत. मराठी, संस्कृत, इतिहास वगैरे विषय मी शिकवी. बारा वर्षानंतर महाराजांनी मि. फ्रेंच ह्यांस रजा दिली. दरम्यान फत्तेसिंहराव ऑक्सफर्ड येथे असता खोडकर निघाले, तेंव्हापासून विद्यालयास निराळे स्वरूप लागले. महाराजांच्या जीवनालाही उतरती कळा लागली. फत्तेसिंहराव स. १९०८ साली पंचविशीच्या वयांत दिवंगत झाले.

बडोद्याचा ह्या नोकरीत मला स्वतः पुष्कळ नवीन गोष्टी शिकण्याची संधि मिळाली, तसे अवांतर फायदेही पुष्कळ प्राप्त झाले. राज्यांत महाराजांची जशी सर्वांगीण दृष्टि होती, तशा मलाही एकंदर जीवनात पुष्कळ सुधारणा करता आल्या. बडोदे शहराचा कित्ता जसा इतर संस्थानिक घेऊ लागले तसेच माझ्या स्वतःच्या संसाराचे झाले. माझे सर्व बंधु व आप्तवर्ग शिक्षणाच्या बाबतीत त्वरेने पुढे सरसावले. माझ्या मुलांना शिक्षणाच्या सोयी सहज प्राप्त झाल्या. त्यातून राजपुत्र विद्यालयांतले सर्व शिक्षक खाजगी वेळांत माझ्याही मुलांना घरी शिकवू लागले,

अश्वारोहण, संगीत, निशाणबाजी, पोहणे, कसरत, चित्रकला हे सर्व विषय माझ्या घरची मुले शिकू लागली. बडोद्यास कलाभवन निघाले, त्याचे निर्माते प्रो. गज्जर माझे स्नेही असून त्यांच्या हाताखाली माझे बंधु नारायणराव वर्ष दोन वर्षात उत्कृष्ट रंगारी बनले. इतकेच नाही तर टिकाऊ रंगांच्या निर्मितीत त्यांना मोठी किफायतही सत्वर होऊ लागली. मी बौध्दिक प्रगतीत वृध्दि कमावू लागलो तरी द्रव्याजनात मला अल्पसंतुष्ट राहवे लागले. पण ही उणीव नारायणरावांनी भरुन काढल्यामुळे आमचे सर्व कुटुंब उर्जितावस्थेस येऊ लागले. तिसरे बंधु गणपतराव मॅट्रिक होऊन वीणकामात तयार झाले आणि साबणाचा कारखाना बनवून उद्योगास लागले. चौथे बंधु दिनकरभाऊ हे तर राजपुत्र विद्यालयात फत्तेसिंहरावांचे सहाध्यायी होऊन स्वावलंबानाने अखेरपर्यंत आपला खर्च भागवू शकले. दरम्यान बंधु भगिनींची लग्ने वस्त्रपात्र, कोकणचा संसार अशा वाढत्या खर्चाचे ओझे सहन करण्याची ताकद आंम्हा बंधूस आली. सर्व पुढारपण मजकडे असून सन १९०५ च्या आतबाहेर आमच्या कुटुंबाचे पूर्वीचे दैन्य निवारण झाले. कर्ज वारून आंम्ही कोकणात सूंदर दुमजली घर उभारले. श.१९०२ साली मी व बंधु नारायणराव कोकणात घरी गेलो. सर्व सावकारांस भेटून त्यांच्या तोडी केल्या आणि वडिलांस पाच हजारांचे कर्ज होते त्यांतून त्यांस मुक्त केले. हा काळ आमच्या कुटुंबाचा परमोच्च भाग्याचा होय.

बडोद्यांत सभासंमेलने, व्याख्यान, नाटके, हर्त्तींच्या टकरा, पक्ष्यांचे खेळ, शिकार, स्वाऱ्या, प्रदर्शने, मिरवणुका, अशा अनेक बाबतीत करमणूक व ज्ञानार्जन ह्याचा फायदा माझ्या व्दारा सहजगत्या आंम्हा सर्वांना होऊ लागला. किर्लोस्कर नाटक मंडळी, शाहू नगरवासी, गंधर्व कंपनी अशांना महाराज आश्रय देऊन त्यांच खेळ करवीत, तेही अनायासे माझ्या घरच्या मुलांमुलींस पाहवयास मिळत, वकृत्व समारंभ, टेनिस क्रिकेटचे सामने, कुस्त्यांच्या शर्यती गायनवादाचे जलसे जे इंग्रजी राज्यांत सहसा पाहण्यास मिळावयाचे नाहीत त्यांचा लाभ आंम्हास आपोआप घडत गेला.

बडोद्याची प्रगति सयाजीरावांच्या पुरस्काराने त्वरेने वाढत जाऊन आचारविचारातला पूर्वीचा आंधळेपणा लयास गेला. स्पर्शस्पर्श, शिवाशीव, जातिभेद असले अंध प्रकार हळूहळू निरास पावून समाज विचारसरणीच्या एक बौध्दिक पातळीवर येऊ लागला. चहूंकडे बडोद्याचा बोलबोला होऊन हरएक बाबतीत बडोद्याचे उदाहरण साऱ्या प्रांतांस अनुकरणीय बनले. बडोद्यास बापट कमिशनचे प्रकरण निघाले तेंव्हा लोकमान्य टिळक कित्येक महिने तेथे राहिले तेणेकरून महाराजांच्या राज्यकारभाराची चर्चा समाजात फैलावाली स. १८९५ च्या सुमारास कोल्हापुरास बेदोक्तवादाची लाट निर्माण होऊन ब्राम्हण मराठ्यांचा व्देष वाढू लागला, त्याचा संपर्क बडोद्यासही झाल्याशिवाय राहिला नाही. तथापि सयाजीरावांनी युक्तीने आपले हेतु साधून प्रकरण विकोपास जाऊ दिले नाही. मराठा क्षत्रिय की शूद्र हा प्रश्न ह्या प्रकरणाच्या मुळाशी होता. महाराजांनी आपल्या धर्मकृत्यांत क्षत्रियांचे विधि वेदोक्त मंत्रांनी करण्याचा परिपाठ घातला, पुर्वीच्या उपाध्ये मंडळींना नोकरीतून कमी करून वेदमंत्रांची कर्मे करणारे नवीन उपाध्ये नेमिले. ह्या कामी महाराजांचे हुकूम बरोबर पाळले जातात की नाही, पूजा, श्रावणी इत्यादि प्रसंगांत जे मंत्र म्हटले जातात ते वेदांतले की बाहेरचे हे तपासण्याचे काम त्यांनी मला सांगितले त्यासाठी सर्व सोळा संस्कारांच्या

विधिंचे मराठी भाषांतर करून छापण्याचे काम मी केले. अर्थात हा एक नवीनच धर्मसंशोधनाचा व ज्ञानार्जनाचा लाभ मला अप्रत्यक्षपणे मिळाला स. १८९८ त महाराजांनी आपल्या त्रिवर्ग पुत्रांचे उपनयनविधि वेदोक्त पध्दतीने करून समारंभ गाजविला. उपनयनविधी व तसेच पुढे त्यांचे विवाह झाले ते विधि, शिवाय त्यांच्या वडील-मातुरींची श्राध्दे इत्यादि जे काही प्रकार राजवाडयांत होत त्या सर्वांचे मूळ अर्थ व हेतू महाराजांनी मजकडून समजून घेतले. त्यासाठी दोन तीन वर्षेपावतो मी महाराजांना संस्कृतही शिकवीत होतो. त्यानी आपल्या धर्मखात्याची आमूलाग्र सुधारणा केली, त्यात माझा कार्यभाग बराच महत्वाचा होता. एवंच राजपुत्र विद्यालयांतील माझ्या नोकरीचे पहिले दशक स. १८९० – १९०० माझ्या बुध्दीचा फैलाव होण्यास अत्यंत महत्वाचे बनून आले. न समजता ह्या सर्व सुधारणा आमच्या कुटूंबात रुजल्या. मांसान्नाचा बाऊ होता तो गेला. मी वाड्यात उघडपणे महाराजांच्या पंक्तीस जेवू लागलो. माझ्या घरी सर्व जातीचे स्नेही, ख्रिस्ती, पारसी, मुसलमान व सनातनी असे भोजनास येऊ लागले.

घरच्या बायकाही त्यांना जातिनिर्विशेषाने वाढू करू लागल्या. श. १८९९ साली फत्तेसिंहराव मॅट्रिक परीक्षा पास झाले तन्निमित्त त्यांनी मला एक हजार रुपये बक्षीस दिले. त्यात ५०० रुपयांची एक सुंदर नक्षीची सुवर्णकंठी मला मिळाली ती अद्यापि संग्रही आहे. माझी पत्नी, माई ती कंठी वापरीत, आता ती डॉक्टर भाऊंच्या पत्नीजवळ आहे.

शिक्षकाचा धंदा आणि तोही सर्व साधनांनी अनुकूल आणि सयाजीरवांसारख्या चौकस व दक्ष धन्याच्या देखरेखीत मला चालवावा लागला हा मी आपल्या जीवनातला सर्वात मोठा लाभ समजतो. केंव्हा इतके आयुष्य गेले ते समजले देखील नाही अशी आज भावना वाटते. जे काही लहान मोठे काम करायचे असेल ते आपल्याकडून शिकस्तीच्या प्रयत्नाने सिध्दीस न्यावयाचे असा माझा स्वभाव बनला. आपली पूर्वपरंपरा व संस्कृति टिकविणे आणि रुढी व धर्माच्या नावाखाली चालणारे अनाचार बंद करून नवीनांचा स्वीकार करणे, ह्या दोन विरुध्द कल्पनांचा मिलाफ आचारणात आणणे हे अवघड काम मी संसारांत पुष्कळ अंशी यशस्वी करू शकलो. असे मला वाटते. भोजनात स्पर्शास्पर्श नाहीसा करून स्वच्छतेच्या तत्वावर नवीन प्रघात चालू केले. संद्या, यज्ञोपवीत, शिखा हे प्रकार गेले तर मंत्रपाठांत उपनिषदांतले कित्येक सुंदर वेचे मी चालू केले. संध्येचे बीज केवळ अर्घ्यप्रदानांत आहे. नदीच्या स्वच्छोदकांत स्नान करतांना गायत्री मंत्र म्हणून त्याचा ओंजळभर उदकाने सूर्यास अर्घ्य देऊन सृष्टिकर्त्यांचे उपकार स्मरणे ही पवित्र कल्पना माझ्या मनात रुजली. कामशेतच्या इंद्रायणीत शरदऋतूच्या स्वच्छोदकांत शक्य तितका हा नेम मी पाळला. तसेच भोजनारंभी ईशस्मरण चालू केले, मला वाटते प्रत्येकाने आपले अंतःकरण सदैव तपाशीत गेले पाहिजे. माझ्या लेखनातील विचारांस चालना देणारी माझ्या बुध्दीची तयारी कशी बनत गेली हे माझ्या या आयुःक्रमात निदर्शनास येईल.

माझ्या रीडरच्या कामातून इंग्रजी ग्रंथांची मराठी भाषांतरे प्रसिध्द करण्याची सुरुवात झाली. मला ह्या भाषांतरांचा कंटाळा येऊन वर्गात राजपुत्रांस शिकविण्यासाठी मी इतिहासाच्या गोष्टी मराठीत लिहून काढू लागलो. इतिहास एखाद्या नियमित पुस्तकावरून न शिकविता गोष्टीच्या रुपाने सांगत जावा ही सूचना महाराजांनी मला केली, ती स्वीकारून मी स्वतःचे लेखन करू

लागलो हा प्रकार स. १८९५ च्या सुमारास आहे. त्यापूर्वी Story of the Nations Series ह्या मालेची मराठी भाषांतरे करण्याचे महाराजांनी योजिले. युक्तीने ते काम मी अंगावरुन दूर केले आणि तत्प्रीत्यर्थ शाळाखात्यांत नवीन भाषांतर शाखा महाराजांनी निर्माण केली. दरम्यान माझे लेखन वाढून स. १८९८ त मुसलमानी रियासत हा मी पहिला ग्रंथ प्रसिध्द केला, त्याचा परिपोष उत्तरोत्तर झालेला बाहेर महशूर आहे. ह्याशिवाय सोळा संस्कारांचे मराठी ग्रंथ, क्रिकेट टेनिस वगैरे खेळ, पाकशास्त्राची कित्येक पुस्तके राजवाड्यांत चालणाऱ्या अनेक नित्यनैमित्तिक कृत्यांचे नियम असे बहूविध व्यवसाय महाराजांच्या हुकूमाने मला नेहमीच सांभाळावे लागत. राजपुत्रांचे विवाह झाले, त्यातले कित्येक अहवाल सर्वथा माझ्याच श्रमाने तयार झाले. इंग्रजी भाषेची गृहशिक्षा, ह्या लहानशा चोपडयांत परकीय भाषा झटपट शिकण्याची उत्कृष्ट पध्दत मी जाहीर केली, ती आमच्या कुटुंबात अत्यंत यशस्वी झाली आहे. 'मराठ्याच्या राज्यकथा' हेही माझ्या परिपक वाचनाचे फल होय.

२. उतरती कळा

महाराजाच्या बहुतेक नोकरात मीच बहूधा दीर्घकाल पावेतो अत्यंत निकटवर्ती होतो. एक क्षणही फुकट जाऊ न देण्याची महाराजांची वृत्ति असल्यामुळे श्मश्रू करतांना देखील ते मला वाचण्याचे किंवा पत्रलेखनाचे काम जवळ बसवून करवीत. पुष्कळदा महाराज-महाराणी दोघांच्याही सन्निध बसून मला कामे करावी लागली. उभयतांकडे केंव्हाही जाण्यास मला बहुधा मुभा होती. नोकरीच्या पहिल्या दोन तीन वर्षात तर रात्री महाराजांच्या पलंगाजवळ बसून तासन तास वाचावे लागे. रात्री दहा अकरा वाजता सुरुवात करून पहाटे तीन चार वाजेपर्यंत वाचण्याचे काम मी कैक दिवस केले आहे. निद्रानाश हा महाराजांचा मुख्य विकार असून वेळ जाण्यासाठी वर्तमानपत्रे, इंग्रजी मराठी ग्रंथ, कादंबऱ्या, तुकारामाचे अभंग असे प्रकार मी त्यांस वाचून दाखवीत असे. मात्र खोलीत भडक उजेड न ठेवता बारीक घासलेटचा दिवा उशाजवळ भुईवर घेऊन मी वाचीत बसे. पण त्याही वेळी डोकीचे पागोटे सुध्दा काढून ठेवण्याची आमची छाती नव्हती, अशी महाराजांची शिस्त कडक असे. मी वाचीत असता दुसरे कोणी नोकर पाय दाबीत, तेल वगैरे घाशीत बसत. गोष्टी सांगणारेही रात्री हजर असत. वाचनाचा कंटाळा आला म्हणजे महाराज गोष्टी सांगणारास बोलावीत. मधून मधून विचारीत 'सरदेसाई, किती वाजले?' मग मी घड्याळ पाहून 'दोन तीन वाजले' असे सांगत असे. बाकी चारसहा तास माझे चाललेले वाचन त्यांना किती कळत असे किंवा माझा आवाज तरी किती स्पष्ट राहत असे भगवान जाणे. ए. डी.सी. वगैरे बाहेर हजर असत पण वाचण्याच्या कामी ते बहुतेक मलाच बोलावीत. पुष्कळदा पडसे ताप किंवा सांधे दुखणे वगैरे विकार महाराजांचे चालू असता सकाळी सायंकाळी केंव्हाही ते मला वाचण्यास बोलावीत. मला फार शीण झालासे त्यांना दिसले तर कीव करून मला बजावून सांगत, ''फार वेळ झाला, तुम्ही आता जाऊन निजा, भरपूर झोप घ्या, उद्या मी तुम्हास लवकर बोलावणार नाही.'' अशी त्यांची वाणी माझ्यासंबंधाने सदैव गोड व मृदू असे.

आपण हरएक विषय परिश्रमाने शिकावा, आपणास कोणी नावे ठेवू नयेत, आपले व्यंग लोकांना दिसू नये अशी दक्षता महाराज विशेष बाळगीत. बाराव्या वर्षी दत्तविधान होऊन ते

बडोद्यास आल्यावर पुढील चारपाच वर्षात शिक्षण असे त्यांना फारसे मिळू शकले नाही. अठरा वर्षे होताच अधिकारसूत्रे हाती आली तेंव्हा त्यांना व्यावहारिक गोष्टी मोठेपणी शिकाव्या लागल्या. स्वित्झर्लंडच्या डोंगरात बसून अपूर्णांक गणित, कश्मिरांतील गुलमर्ग येथे मराठी व्याकरण, नैनिताल येथे भाषांतर पाठमाला, मसुरी येथे Kales Lessons in English Translation असे विषय मी त्यांस शिकविले. महाराज स्वतःच्या वस्तू-छत्री, काठी-सांभाळणे, पुस्तक किंवा अन्य वस्तु प्रवासात गहाळ न करणे ह्यासंबंधाने ते आपल्याकडून पुष्कळ दक्षता बाळगीत. पण ही हलकी कामे सर्वदा सेवक करीत असल्यामुळे त्यांना कधी साधली नाहीत. युंरोपात असता पुष्कळदा मी त्यांना आगगाडीत त्यांच्या डब्यात बसवून छत्री-काठी-टोपी-पुस्तक ह्या वस्तु उतरतांना विसरू नका म्हणून बजावी आणि आपल्या जागेवर जाऊन बसे. गाडी थांबताच येऊन पाहवे तो कित्येक वस्तु गाडीत विसरून हे तसेच खाली उतरले आणि गाडी चालू झाली. हिंदुस्थानात त्याचें सेवक सदा सर्व कामे करीत, तशी युरोपात किंवा अन्यत्र आपली कामे आपण करावी ही महाराजांची मोठी हाव मनांत, पण सवयी जडल्या निराळ्या. ह्यासंबंधाने ते पुष्कळदा वैतागत. मी सांगे ही व्यर्थ हाव धरा का? ज्याने त्याने आपले स्थान सांभाळावे प्रत्येकास सर्व कामे कशी येतील? पण ह्यासंबंधाने त्यांची समजूत कधीच पडली नाही.

तथापि नेहमी आपण आपली सुधारणा करीत जावे हा त्यांचा मनोद्य मुळीच वावगा नव्हता आणि पुष्कळ कामे ते मोठेपणी अत्यंत कष्ट घेऊन शिकले. एखाद्या समारंभात भाषण करावे लागे, तेंव्हा ते पुष्कळ वेळा वाचून मला अगोदर म्हणून दाखवीत. प्रत्यक्ष भाषणचा विषय, मुदद्े किंवा मसूदा ते स्वतः ठरवीत किंवा तोंडी सांगून लिहवीत. आणि मला सांगत, तुम्ही सभागृहात दूर कोपऱ्यांत बसून माझे भाषण ऐका, माझा आवाज दूरपर्यंत पोचतो की नाही, उच्चार किंवा हावभाव बरेवाईट कोणते होतात ते मला सांगत जा म्हणजे पुनः प्रसंग येईल तेंव्हा मी आपली सुधारणा करीत जाईन. सारांश, सयाजीरावांची सर्वयोग्यता अत्यंत कष्टाने पैदा केलेली असून नवीन सुधारणेचे प्रकार किंवा प्रसंग त्यांनी कधी फुकट घालविले नाहीत. त्यांच्या वेळी ध्वनिक्षेपक यंत्र प्रचारात नव्हते म्हणून सभेंत बोलतांना ते अत्यंत काळजी घेत. बुध्दि मूळची सामान्य, पण चौकस व कष्टाळू वृत्तीने हिंदुस्थानच्या समकालीन प्रमुख राष्ट्रीय व्यक्तीत त्यांनी उच्च स्थान मिळविले आणि अनेक प्रसंगी आपल्या प्रौढ वाणीने आणि विचारी भाषणाने त्यांनी पुष्कळ लौकिक मिळविला. शेवटी शेवटी पूर्वविचार न करतांही ते इंग्रजी-मराठीत सुंदर भाषणे अस्सखालित करू लागले. त्यांचा कोटिक्रम बहूधा बिनतोड असे. पांगरकर, आहिताग्नि राजवाडे, हंसस्वरुप स्वामी, अशांची प्रवचने ऐकून त्यांनी शेवटी आपल्या समारोपांत त्यांस सर्वथा निरुत्तर केले. मोठमोठे विव्दान अधिकारी त्याच्या शंका निवारण करण्यास असमर्थ बनत. हायकोर्टाने फाशीची शिक्षा फर्मावलेली त्यांजपुढे मंजूरीसाठी आली असता महाराजांचे समाधान करण पुष्कळदा त्या न्यायाधीशांस अवघड पडे.

स. १९०२ च्या सुमारास महाराज चाळिशीस पोचतात तोच त्यांस मुलांच्या दुराचरणाचा पहिला व तीव्र धक्का मिळाला. तदुत्तर त्यांची पहिली हसण्याखेळण्याची प्रफुल्लित वृत्ति मावळत गेली. ह्या दीर्घ कालांत त्यांच्या हातून जरी स्वकर्तव्यात उणेपणा कधी घडला नाही, तरी

ते जास्त जास्त दुःखी कष्टी बनत गेले. होता होता जवळ कोणी मनुष्य नको, कोणाची भेट नको की बोलणे नको असा त्यांचा स्वभाव बनला. पुष्कळदा भोजन सुध्दा ते एकटे एकांन्तांत करू लागले. वाढणाराने टेबलावर सर्व तयारी करून निघून जावे, फक्त तयारीची घंटा वाजवून सूचना द्यावी, पण स्वतः पुढे येऊ नये असा महाराजांचा प्रकार बनला. एका पाठीमागून एक सर्व मुलगे अव्यवस्थित निघाले, हा प्रकार घरांत तर बाहेर राजकारणांत सार्वभौम सरकारची त्यांजवर गैरमर्जी ह्या कारणांनी त्यांना जगात कठोर औदासीन्य प्राप्त झाले. स. १९११ च्या डिसेंबर १२ ला इंग्रज बादशहाचा दिल्ली दरबार भरला, त्या प्रसंगी त्यांच्याकडून गैरवर्तन घडल्याचा बोभाटा झाला, अल्पकाळ त्यांजवर भीषण आपत्ति उत्पन्न झाली.त्यातून अंतिम अनिष्ट परिणाम काही निर्माण झाला नाही तरी हा प्रसंग त्यांच्या उतरत्या कलेचा निदर्शक बनला. त्याच प्रसंगी त्यांची कन्या इंदिरा हिचा ग्वाल्हेरकर माधवराव शिंद्यांशी ठरलेला विवाहसंबंध एकाएकी फिसकटला, तेणेकरून महाराजांना मोठी उद्विग्नता प्राप्त झाली. ह्या घडामोडी कशा व का घडल्या तो प्रकार येथे अप्रस्तूत म्हणून मी सांगत नाही. मात्र ह्यांनंतरचे महाराजांचे जीवन भिन्नपध्दतीचे बनले, त्याचा संपर्क अल्पांशाने मलाही पोचला. स. १९११ नंतर त्यांच्या मुलांनातवंडाचे विवाहादि समारंभ झाले त्यांत मलाही भाग घ्यावा लागला, तरी आवश्यक कर्तव्यापलीकडे खुदद् महाराजांचे अंतःकरण त्या समारंभात रंगले नाही.महाराजांच्या ह्या चित्तवृत्तींतला फरक माझ्यासारख्या निकटवर्तीयांना सहज कळे, आणि त्यांसंबंधाने आपसात आमची पुष्कळ बोलणी चालत. आंम्ही त्याचे जवळचे सेवक त्यांच्या अंतःकरणास तजेला आणण्याचा मनापासून प्रयत्न करीत असू, याचे एक उदाहरण म्हणून माझा अनुभव सांगतो. एके दिवशी सकाळीच मला वाड्यातून महाराजांचे बोलवणे आले. लगेच कपडे करून मी गेलो, तो ते खाली फिरायला जाण्याच्या तयारीने उभे होते. मला पाहतांच म्हणाले. ''चला सरदेसाई आपण थोडे फिरायला जाऊ. मुद्दाम काही मनोवेधक गोष्टी तुंम्ही सांगाव्या म्हणून मी बोलावले. आज मला जरा अस्वस्थता वाटते' हा आशय समजून आंम्ही मोटरीत बसलो आणि मी तोंडाचा पटट्रा चालू केला. मकरपुऱ्याच्या रस्त्याने दोनतीन मैल गेल्यावर ते मोटरीतून उतरुन तासभर पायी चालले. मकरपुऱ्याच्या बागांतील सर्व रस्ते चालून संपले. यानंतर दीडएक तासाने ते परत मोटरीने वाड्यात आले. मोठ्या दरवाजाने आत जातांना मोटार थांबवून त्यांनी मला खाली उतरवून घरी जाण्यास रजा दिली. महाराजांच्या ठिकाणी त्या वेळी काही एक गैर दिसले नाही.

मी घरी गेल्यावर सुमारे अर्धा तास झाला असेल, इतक्यांत फिरुन वाड्यातील निकडीचे बोलावणे आले. त्याबरोबर मी पुनः तसाच गेलो तो खाली भलताच प्रकार नजरेस आला. ए. डी.सी. डॉक्टर, दिवाण खाजगी कारभारी सर्व एकत्र जमून महाराजांच्या अस्वस्थतेची चर्चा करीत होते. मला पाहताच त्यांनी माझी खोदखोदून जबानी घेंतली. त्यांचा समज की मीच काही तरी क्षोभकारक प्रकरणे त्यांस बोललो. त्यांनी अगोदरच महाराजांस वर नेऊन पलंगावर निजवून ठेविले होते. महाराजांच्या अशा अस्वस्थेला मी कारण झालो असा त्यांचा समज होऊन त्यांनी माझी उलट तपासणी चालविली. मी काय त्यांस बोललो आणि त्यांनी काय विचारले. मी झालेला सर्वप्रकार अक्षरशः निवेदन केला. मुळातच काही नाही तर मी तरी त्यांना काय जास्त

सांगणार माझ्याशी बोलताना महाराज रोजच्यासारखे शांत होते, दोन तीन मैल चालून परत आले, एवढेच उत्तर मी केले. तथापि त्या मंडळींनी मला बजावण्यास कमी केले नाही, की भलत्यासलत्या चीड येणाऱ्या गोष्टी महाराजांच्या कानावर तुंम्ही कधी घालीत जाऊ नका. सांगायचे तात्पर्य इतकेच की उत्तरोत्तर महाराजांच्या चित्तवृत्ति क्षुब्ध होत जाऊन त्यांची प्रकृति ढासळत गेली. पहिला तरुणपणचा उत्साह मावळला.

दुसरा एक असाच निराळा प्रसंग मला आठवतो. महाराज एकटेच काही दिवस मकरपुऱ्यास राहत होते. रात्री दोन वाजता शहरात माझ्या घरी एक सरकारी मोटर आली की महाराज बोलावतात. मी तसाच कपडे घालून चार मैल गेलो. वाड्यात खाली ए. डी. सी. होते त्यांस विचारले, 'का बोलावले? मला महाराजांकडे घेऊन चला' ए. डी. सी. म्हणाले, 'मला तुमच्या बरोबर येण्याचा हुकूम नाही, ते वर आहेत, कोठे काय करताहेत मला माहीत नाही. तुंम्ही त्यांस शोधून भेटा.' मी जिन्यावरून वर गेलो. अंधुक प्रकाशात एका टेबलाजवळ स्वारी पुस्तक वाचीत बसेलेली दिसली. मी जवळ जाऊन वंदन केले. मला बोलले, झोप येईना म्हणून काही तरी गप्पा कराव्या म्हणून तुम्हास बोलावले' मग मी पुराणांतल्या कथा चालू केल्या. कालिदास, रघुवंश, तुकाराम, रामदास सर्वादी त्यांजपुढे गणती घेतली आंम्हाला ही नेहमीची सवयच होती. सुमारे तास अर्धातास बोलून त्यांनी मला रजा दिली. साडेचार वाजता पहाटे घरी जाऊन मी पुनः निजलो. अशा घटनेला पुष्कळदा मुलांच्या भानगडीचे व त्यांच्या कौटुंबिक दुरवस्थेचे प्रश्न कारण असून त्यांत गुरफटून गेल्यामुळे महाराज चिडखोर बनत आणि तशा स्थितीत कित्येक दिवस ते सर्वथा मनुष्यसंपर्क वर्ज्य करून एकटे राहत. अशा कष्टमय जीवनांत त्यांची शेवटची दहापंधरा वर्षे तरी गेली. कोठेही असले तरी रोजची सरकारी कामे ते नियमितपणे करीत. सेक्रेटरी ने येऊन कामे दाखवावी. त्यांवर ते सांगतील तो हुकूम तसाच अक्षरशः लिहून घ्यावा. विचारल्याशिवाय त्यांत स्वतः काही बोलू नये असा कामाचा मामला चालू झाला. प्रत्येक बाबत अधिकाऱ्यांशी मोकळेपणे चर्चा करून ठरवावी हा पूर्वीचा त्यांचा प्रकार पुढे बदलून गेला. जो अधिकारी त्यांजला असे नव्हे असे सांगू लागे, त्याची ते बदली करू लागले. नवीन कामगार नेमले जात, त्यांच्या मानाने आता महाराजच वयाने व अनुभवाने श्रेष्ठ, सर्वानी निमूटपणे हुकमाची बजावणी करावी असा त्यांचा प्रघात ह्या शेवटच्या उत्तरायुष्यांत विशेष बनला. दिवाण व्ही. टी.कृष्णमचारी त्यांच्या जवळ असत त्यांनी किती तरी त्या वेळच्या महाराजाच्या गमती मला सांगितल्या. महाराणी चिमणाबाई देखील हा विषय बोलत आणि महाराजांच्या ह्या चिडखोर स्वभावाला कंटाळून जात. स. १९२५त मी सेवानिवृत्त झालो आणि महाराज ता. ६ फेब्रुवारी स.१९३९रोजी मुंबईत दिवंगत झाले. ह्या चौदा वर्षात त्यांचा माझा पूर्वीचा निकट सहवास सर्वथा तुटला. हा योगायोग का व कसा घडला हे सांगणे अवश्य आहे.

३. परिणामांतील कटुता

महाराजांना आपले चरित्र संपूर्ण आपल्या देखत प्रसिध्द व्हावे अशी मोठी हाव होती. मी लेखक व त्यांचा निकटवर्ती सेवक तेंव्हा मला त्यांनी तशी सूचना पुष्कळदा केली. मी सांगितले

माणसाची खरी योग्यता त्याच्या पश्चात आजमावली जाते. मी त्यांचा पगारी नोकर, तोंडावर त्यांचे गुणावगुण कसे लिहू शकणार. तथापि चरित्राची सर्व साधने पत्रे, हुकूम, फोटोग्राफ, भाषणे, प्रासंगिक घडामोडी बनाव हे सर्व साहित्य जमवून एकत्र ठेवणे अवश्य होते. मुलांचे व व्यवहार, प्रवास, विवाहादि समारंभ ह्यांचे बनलेले कागद ठिकठिकाणी अव्यवस्थित होते ते सर्व एकत्र करुन नकोत ते फाडून बाकीचे सांभाळून विल्हेवारीने निगेत ठेवणे हे काम महत्वाचे होते, मी ते सुचविले, त्यांना पटले आणि लगेच चरित्रसंग्रह नावाची स्वतंत्र शाखा काढून माझी त्यांनी त्याकरिता विशेष नेमणूक केली. हाताखाली दोन कारकून नेमले. स. १९९६ च्या डिसेंबरपासून तीन वर्षे मी ह्या स्वतंत्र कामावर राबलो. १. महाराजांनी लिहिलेली समस्त खासगी पत्रे जुन्या बारनिशा वगैरेतून काढून त्यांच्या वीस प्रती छापल्या. २. महाराजांची सर्व भाषणे जमवून ती प्रसिध्द केली. ३. समस्त राजपुत्रांचे कागद, पत्रे, हिशेब, नेमणुका इत्यादि सर्व जमवून प्रत्येकाचे स्वतंत्र संच व्यवस्थित लावून ठेविले. ४. कौटूंबिक व इतर फोटोग्राफ्स सर्व एकत्र जमवून कालक्रमाने व्यवस्थित केले दरसालच्या वाढदिवसास असे महाराजांचे व कुटुंब-दरबारांचे फोटोग्राफ्स घेत ते त्यांच्या चरित्राचे एक मोठे साधन बनले. ५. खाजगी खात्याचे व राज्याच्या व्यवहारांचे महाराजांनी वेळोवळी दिलेले हुजूर हूकूम सर्व एकत्र संच जमवून निराळे ठेविले. असे हुकूम पन्नास वर्षातले निदान वीस हजार तरी होते. तेच महाराजांचे स्वतःचे मोठे लेखन असून त्यांतच त्यांची खरी योग्यता उतरलेली होती. ६. त्यांची व मुलांची हस्ताक्षरे, टिपणे, वसतुसंग्रह असे हुडकून मी एकत्र केले.

ह्याशिवाय महाराजाच्या कारभारांतील मुख्य घडामोडी, त्यांच्या स्वाऱ्या, त्यांचे प्रवास, त्यांनी केलेल्या मुख्य सुधारणा, त्यांचे दरबार व समारंभ, मुलांचे जन्मोत्सव व विवाहादि प्रसंग, खुदद् महाराजांचे दत्तविधान व शिखण, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची काम करण्याची पध्दत, त्यांनी बांधलेल्या इमारीती अशा अनेक विषयांचे वर्णन करणारे लहान मोठे लेख मी मराठीत तयार करून त्यांच्याही वीस प्रती छापून ठेवल्या. वीस प्रतीच छापण्याचे कारण ह्या लेखांचा उपयोग पुढील चरित्र –लेखकास व्हावा इतकाच होता. त्यांची पत्रे देखील सर्वच एकदम पसिध्द करण्याजोगी नव्हती. फक्त जुन्या बारनिशा फाटत चालल्या, त्यातून ही पत्रे वाचून मी एका संग्रहात आणली. सारांश, शिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषाचे चरित्र लिहिण्यांत ज्या अडचणी आज इतिहासकारास भासतात, तशा सयाजीरावांसंबंधाने पुढे भासू नयेत अशी सर्व सिध्दता मी परिपूर्ण करुन ठेविली. सर्व काम मी चोख केले ते त्यांसही पसंत पडले. त्यावरून त्यांची कल्पना तीव्र बनली. की मीच त्यांचे समग्र चरित्र लिहावे. मी स्पष्ट कळविले, मी पगारखाऊ सेवक, चरित्रनायकाचे गुणदोष स्पष्ट सांगण्यास असमर्थ, व्यक्तीच्या पश्चात चरित्र लिहिले जावे हा शहाण्यांचा रिवाज आहे. माझे म्हणणे त्यांस खोडून काढता येईना, पण मनांतला आग्रहही सोडवेना. चरित्रसंग्रहाचे काम मात्र त्यांनी बंद करून पुनः चीफ अकौटंटच्या जागी मला बदलले. त्यांच्या इच्छेस मी उघड विरोध केला हा प्रकार त्यांच्या मानी स्वभावास रुचला नाही. माझ्यावरचा पूर्वीचा त्यांचा लोभ ओसरत चालला हे मला स्पष्ट दिसू लागले.

अशा स्थितीत स. १९२१ साली माझ्या वयाची ५६ व नोकरीची ३३ वर्षे पुरी होऊन मी नियमानुसार सेवानिवृत्तीस पात्र झालो. महाराजही संधिवाताच्या विकाराने अस्वस्थ होऊन उपचारासाठी आपला काळ पुष्कळसा युरोपात काढू लागले. तिकडे त्यांनी लंडन पॅरिसमध्ये स्वतःच्या मालकीचे निवास तयार केले. मलाही बडोद्याच्या निःसत्व हवेने क्षीणता वाटू लागली. पुष्कळसे लोक निवृत्त न होता नोकरीची मुदतवाढ मागतात ती मला नकोशी होऊन मी निवृत्तीची मागणी केली. इच्छा एवढीच की नोकरीची परतंत्रता तोडून उर्वरित आयुष्य एखाद्या शांत ठिकाणी इतिहासलेखनात घालवावे. ह्या उलट महाराजांची इच्छा की मीच एक त्यांचा जुना निकटचा खात्रीचा प्रामाणिक सेवक, तेंव्हा मी अखेरपर्यंत नोकरीत राहून पूर्ण पगार घ्यावा. ते बडोद्याबाहेर राहत असल्यामुळे त्यांचे कुटुंबाचे व्यवहार दक्षतेने सांभाळणारा मी जाग्यावर असावे. ह्या दोन विरोधी मनोवृत्तीचा तीव्र झगडा उत्पन्न झाला. दोघांनीही एकमेकांच्या भावना स्पष्टपणे ओळखल्या. त्यांनी अनेकवार मला काकुळतीने सांगितले तुंम्ही मला सोडू नये. धन्याची मर्जी सांभाळणे हे सेवकाचे पहिले कर्तव्य. ''you must not leave me' you must die here in my palace,'' असे त्यांचे उग्दार वारंवार निघत. दरसाल माझ्या निवृत्ति-वेतनाचा प्रश्न त्यांज़पुढे निकालास जाई, त्यावर ''आणखी एक वर्ष ह्यांना नोकरीत राहू द्यावे'' असा हुकूम ते देत गेले. 'मला आता सोडवा' अशी माझी स्पष्ट मागणी वाचून ते जास्तच चिडून गेले. शिवाय मी त्यांच्या नजरेस आणले की माझ्याबरोबरचे सर्व नोकर दरमहा हजार आठशेच्या कमाईस पोचले, आणि मी मात्र एकटा पाचशेलाही पोचलो नाही. तरी द्रव्यरुपाने मला पूर्ण मोबदला द्यावा. खर्चाच्या बाबतीत महाराजांचा हात सढळ नव्हता. हा एकच त्यांचा दोष सर्व लोकच काय, पण त्याचं कौटुंबिय सुध्दा काढून त्यांना उघड नावे ठेवीत. माझा पगार दरमहा रु. ४८५ होता, त्यांत त्यांनी वाढ केली नाही, उलट ''कृपावंत होऊन ह्यांस आणखी एक वर्ष नोकरीत मुदतवाढ देण्यात येत आहे'' असे त्यांचे हुकूम आले. मीही त्यांच्याइतकाच चिडून गेलो. महाराजांनीही दर्शविले की हटट्याने मी त्यांच्या हुकमातविरुध्द वागल्यास त्याबदद्ल मला पुढे पस्तावे लागेल.

दरम्यान कामशेत येथे जमीन घेऊन तेथे शांतपणे मी लेखनव्यवसाय करणार हा माझा मनोद्यही मी महाराजांस स्पष्ट कळविला, ह्यांत त्यांना आणखी एक वैषम्य वाटले. ते असे आपल्या नोकरांनी बडोद्याचा पैसा बाहेर न नेता तेथेच वास्तव्य करावे ही महाराजांची तीव्र इच्छा असे. तिच्या विरुध्द मी बाहेर जाण्याचे ठरविले ते त्यांना आवडले नाही. मी उघडपणे त्यांचा उपमर्द करतो अशी त्यांची भावना बनली. मलाही ती दुरुस्त करता येईना. स. १९२५ च्या मार्चात महाराज युरोपास निघाले त्या प्रसंगी रात्री १० वाजता मला बोलावून सग्ददित अंतःकरणाने तीन लहान नातवंडांदेखत ते मला बोलले, ''ह्या मुलांचे संगोपन करण्यासाठी तुम्ही येथे राहा. सोडून जाऊ नका.'' क्षणभर मला अवघड वाटले. वाचा फुटेना. मी एवढेच बोललो, ''मला काय सांगायचे ते पूर्वी सर्व स्पष्ट सांगितले आहे, जास्त काही नाही.'' माझ्या ह्या उत्तराने ते क्षणभर विषण्ण बनले. इतक्यात स्टेशनवर जाण्याची वेळ होऊन ते व मी मुलांसह दोन जिने उतरुन हलके हलके खाली आलो. ते मोटरीत बसले, मी पायरीवर उभा होतो, शेवटचे वाक्य

म्हणाले, ''माझी इच्छा ध्यानांत ठेवा, तरच परिणाम ठीक होईल.'' ह्या शब्दांचे इंगित मी ओळखले. ते मुंबईस गेले आणि मी घरी आलो.

लगेच मी अर्ज देऊन दिवाणास कळविले, ''मी आता नोकरीत राहू इच्छीत नाही, मला मुक्त करा आणि अकौटंटच्या जागेवर माझ्या ठिकाणी दुसरा नेमा.'' यथाकाल माझा अर्ज युरोपात महाराजांकडे जाऊन माझे निवृत्तिवेतन नियमाने दरमहा दोनशे साडेसदतीस रुपये बसले ते मंजूर झाले. हुकमात एक वाक्य अधिक होते की ''ह्याच्यासंबंधाने आणखी काही हुकूम देणे आहे तो यथाकाल मागाहून देऊ.'' ह्याचा अर्थ मी तेंव्हाच समजून चुकलो. तेंव्हापासून पाठीमागच्या नोकरीतील माझी उर्मी हुडकून काढण्याचे शुक्लकाष्ठ माझ्यामागे लागून त्यांवर माझे जबाब मागण्यास सुरुवात झाली. मी त्यांची उत्तरे नम्रपणे पण ठासून दिली. त्यावर महाराजांनी हुकूम केला की माझ्या निवृत्तिवेतनात ६० टक्के कपात करावी. ह्या हुकमाने मला पेन्शनचे फक्त दरमहा नव्वद रुपये राहिले. काही दिवस ते मी घेतले नाहीत. पुढे चिमणाबाई वगैरेनी आग्रह केल्यावरून मी ती कपात रक्कम घेऊ लागलो. हा मोठा अन्याय झाला असे पुष्कळांनी महाराजांस सांगितले. पण त्यांनी ते मनावर घेतले नाही. अशी बारा वर्षे माझी रक्कम सुमारे वीस हजार बुडाली. ता. ६ फेब्रुवारी, स. १९३९ रोजी महाराज दिवंगत झाले आणि नातू प्रतापसिंह गादीवर आले. त्यांनाही मी शिकविले असून ते मला स्वतः ओळखीत होते. त्यांचा राज्यारोहणसमारंभ झाला, त्या प्रसंगी त्यांनी मला अगत्यपूर्वक बडोद्यास बोलावून माझे कपात झालेले वेतन पहिल्याप्रमाणे पुढे चालू केले. मात्र बारा वर्षाची झालेली कपात त्यांना भरुन देता आली नाही. आपल्या सत्तेत सयाजीरावांनी केलेला हा हुकूम मी आता फिरविला तर आणखी अनेकांचे असे अर्ज मनावर घ्यावे लागतील, असे आपले समर्थन प्रतापसिहांनी कळविले. माझे हे वेतन पूर्ण मिळू लागले म्हणून मला आता उत्तरावस्थेत स्वावलंबनाने आपला निर्वाह चालविता येत आहे. ज्या सयाजीरावांच्या आश्रयावर मी व माझे सर्व कुटूंब पोसून ऊर्जितावस्थेस पोचलो त्याचा असा खेद जनक परिणाम व्हावा, हा माझाच दैवदुर्विपाक होय. दुसरे काय म्हणावे?

आपले चरित्र लिहिण्याचे अनेक प्रयत्न सयाजीरावांनी केले. सेंट निहालिसिंग त्याच कामावर कैक वर्षे खपले, पण त्यांचा लेखनकलाप महाराजांस पसंत पडला नाही. नंतर Sir stanley Rice Je Mr. Sargeant ह्यांजकडून त्यानी आपली दोन चरित्रे पृथकपणे इंग्रजीत लिहवून प्रसिध्द केली. त्यासाठी त्या दोघांनाही त्यांनी आपल्या पदरी नोकरीत ठेविले. चरित्रलेखनाच्या कामी मी जमविलेले साहित्य त्यांच्या उपयोगी पडले. माझी मराठीत छापलेली सर्व टिपणे इंग्रजीत भाषांतर करून त्यांना पुरविण्यांत आली. तथापि ह्या लेखकांस महाराजांच्या जीवनाचा व साठ वर्षांच्या दीर्घ कर्तृत्वाचा आत्मिक ओलावा अंगी मुरलेला नसल्यामुळे त्यांच्या लेखांत अंतःकरणाची रसोत्पादक तळमळ उमटली नाही असे मला वाटते. महाराजांचा एकंदर व्याप समस्त भारत राष्ट्राच्या उन्नतीचा असून त्यासाठी त्यांनी आपले संस्थान नमुनेदार बनविले. कलाभवन, शाळा, रस्ते, आगगाड्या, सक्तीचे शिक्षण, लायब्रऱ्या अशा नानाविध विषयांत त्यांनी सुराज्याचा एक उत्कृष्ट नमुना प्रत्यक्ष सार्वभौम इंग्रज सरकारास सिध्द करून दाखविला. इंग्रजी अंमलाच्या शंभर वर्षात हिंदी राष्ट्रोध्दाराच्या सर्वांगीण सुधारणेचा जो आदर्श सयाजीरावांनी

अत्यंत परिश्रमाने निर्माण केला आणि ज्याबद्दल ते त्या सरकारच्या नाराजीस पात्र झाले, तो त्यांच्या खऱ्या कर्तृत्वाचा उत्कृष्ट पुरावा होय. ह्या दृष्टीने सयाजीरावांचे राष्ट्रोद्बोधक चरित्र कधी लिहिले गेले नाही, आणि आता सर्व संस्थानेच विलीन झाल्याने पूर्व स्थिति इतकी पालटून गेली आहे की सयाजीरावांची आठवण सुध्दा पुढील पिढीस आहे की नाही कोण जाणे. मी नुकताच स. १९४९ साली बडोद्यास गेलो तेव्हा लक्ष्मीविलास राजवाड्याची व बडोद्याच्या नवीन रुपांन्तराची ती दुरवस्था पाहून माझ्या व तत्सम अनेक अनुभवितांच्या डोळ्यांतून आश्रूधारा गळाल्या. महाराणी शांतादेवी व त्यांची अपत्ये केविलवाणी पाहून माझ्या पोटांत भडभडून आले. सारांश, सयाजीरावांचा अस्त इतका त्वरित व परिपूर्ण झाला हा प्रकार भारताच्या इतिहासांत नमूद होण्याची शक्यता उरली नाही. हा हिंदी राष्ट्राचा अपमान होय असे मी मानतो. महाराजांनी दुसऱ्या कित्यकांकडून आपली चरित्रे इंग्रजीत लिहवून प्रसिध्द केली आणि माझ्या पेन्शनची केलेली बचत त्या कामी भरपूर वापरली, ती प्रत्यक्ष परिचयाच्या अभावी ती उठावदार बनली नाहीत, त्यांत महाराजांच्या कतृत्वाचे हार्दिक स्वरूप उतरले नाही. सयाजीराव ही आधुनिक मनाची एक स्मरणीय विभूति होय. त्यांनीच जगभर प्रवास करून फान्स, अमेरिका इत्यादि राष्ट्रोन्नतीचा भावी मार्ग पतित हिंदी राष्ट्रास दाखवून दिला, सार्वभौम सरकारच्या रोषाची क्षिति कधी बाळगली नाही, प्रत्यक्ष अमेरिकेत तत्वज्ञान परिषरदेचे अध्यक्षपद स्वीकारून भारतीय संस्कृतीचा उच्च दर्जा जगास पटवून दिला. इतकेच काय, पण लोकमान्य टिळक किंवा गोखले, लाला लजपतराय किंवा सुरेंद्रनाथ बॅनर्जी, अथवा शेवटचे महात्मा गांधी ह्या सर्व राष्ट्रपुरुषांना पहिली स्फुर्ति सयाजीरावांनी आपल्या उदाहरणाने पुरविली, हा प्रकार विचारवंतास स्पष्ट दिसतो. अशा थोर पुरुषाचे संपूर्ण चरित्र लिहिण्याची पात्रता मला होती की नाही कोण जाणे, पण विधिघटनेत तसा योग नव्हता, हे विधान निश्चित आहे. हा सर्व प्रकार गतकालीन अंधकारात आता तर गडप झाला असून तत्संबंधीच्या आठवणी मात्र माझ्या स्मरणातून कधी लोपणार नाहीत. तशा थोड्या बहुत आठवणी हल्ली मी प्रसिध्द केल्या आहेत. (स. १९५५.)

६

सयाजीराव गायकवाड

लेखक
ब. न. फाटक

वि. सं. चरित्र

For

9231

श्रीमंत सयाजीराव गायकवाड

मोजणी तपशील - १९९४

५७८ संदर्भ विभाग
सार्वजनिक वाचनालय, नाशिक

दाखल क्रमांक	१२१४१८
पुस्तकाचे नांव	सयाजीराव गायकवाड
लेखक	फाळके, ब. ना.
विषय	चरित्र
उप विभाग	९२३.१
कपाट क्रमांक	

दिनांक ८।११।९८

121418

किंमत १ रुपया

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

प्रस्तावना

भारतीय ब्रिटीश राजवठीच्या इतिहासामध्ये ज्या पुरुषाला रानडे, टिळक, गोखले यांच्या मालिकेत बसविल्याशिवाय गत्यंतर नाही, अशा श्रेष्ठ योग्यतेचे बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज (तिसरे) हे होते. त्यांचा जन्म इ.स. १८६३ सालातला म्हणून यंदा (१९६३) जन्मशताब्दी साजरी करण्याची योजना आखली गेली. अखिल भारतीय स्वरूपाची ही योजना होती, परंतु चीनच्या आक्रमणाचे भयानक संकट गेल्या (१९६२) ऑक्टोबर, नोव्हेंबरात कोसळल्याने ही योजना मागे पडली. महाराष्ट्र राज्यशासनाने श्री. सयाजीरावांच्या चरित्राची साधने महाराष्ट्र, गुजराथ, दिल्ली येथील दप्तरखान्यांतून गोळा करून त्याचा (साधन) ग्रंथ छापण्याचे मनावर घेतले व तसे काम चाललेले आहे. जनतेने ता. १७ मार्च या दिवशी महाराजांची जन्मशताब्दी साजरी केली. वृत्तपत्रांतून महाराजांच्या कर्तृत्वाची ओळख करून देणारे लेख छापले गेले. मुंबईत मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाने ता. १७ तार्च रोजी एक सभा भरवून मला व्याख्यान देण्यास बोलावले. व्याख्यानांचा सराव नसल्याने व्याख्यान लिहून काढले होते व तेच सभेत वाचले. त्याबद्दल श्रोत्यांतील परिचित हितचिंतकाच्या अभिप्राय कानावर घालून ते व्याख्यान छापण्यास सांगितले. अर्धा उलटून गेल्यावर कोणते मासिक हा लेख छापण्यास तयार होईल. पुण्यांतील चित्रमयजगताचे संपादक श्री. रा. प्र. मामासाहेब देवगिरीकर यांनी ही अडचण दूर केली व मासिकाच्या मे महिन्याच्या अंकांत समग्र प्रसिद्ध केला. त्या दोघांप्रमाणे दुसऱ्या हितचिंतक मित्रांना तो लेख पसंत पडून त्याचे एक लहान पुस्तक छापावे, अशी श्री. देवगिरीकरांनी सूचना केली, तेंव्हा सयाजीराव महाराजांच्या चरित्राचा विषय अनेक प्रकाशित, अप्रकाशित साधने पाहून नव्याने लिहिण्यास घेतला. आता हे लेखन चित्रशाळेच्या द्वारे पुस्तकरूपाने लोकांसमोर ठेवले जात आहे. व्याख्यानांप्रमाणेच लेखनाची सवय नसल्यामुळे प्रतिपाद्य विषयाची मांडणी सदेष असणे स्वाभाविक आहे. वाचकांच्या सौजन्यावर विसंबून हे लेखनाचे धार्ष्ट्य स्वीकारले. सयाजीराव महाराजांच्या चरित्राचे ज्ञान असणाऱ्यांना माझ्या लेखनांत कांही नवे

सापडण्याचा संभव नाही. थोडक्यांत महाराजांचे चरित्र जिज्ञासूला समजावे, एवढाच या पुस्तकाचा उद्देश आहे.

सयाजीराव महाराजांचे चरित्र लिहिण्याच्या कार्याचे सूत उवाच १९११- १२ मध्ये संत निहालसिंग नांवाच्या इंग्रजी भाषेत लेखन करणाऱ्या एका गृहस्थाने आरंभले होते. याला महाराजांच्या कारकीर्दीचे कागद पाहण्याची परवानगी मिळाली होती. त्याने एक लहान चरित्र आधी लिहिले होते. कागदपत्रांच्या आधारे मोठे चरित्र मात्र शेवटास गेले नाही. तथापि या चरित्राचे टंकलिखित बाड बडोद्याच्या दप्तरखान्यांत असल्याचे कळते. इ. सन. १९२३-२४ च्या सुमारास पुनः चरित्रलेखनाचा विषय उपस्थित होऊन त्या कार्याची जबाबदारी महाराजांच्या सान्निध्यांत पुष्कळ वर्षे घालविलेले रियासतकार गोविंद सखाराम उर्फ नानासाहेब सरदेसाई यांकडे सांपविले होते. त्यांना मदतनीस म्हणून श्री. वाकसकर यांची योजना कराण्यांत आली होती. पुढे लवकरच रियासतकार सरदेसाई बडोद्याच्या नोकरीतून बाहेर पडल्याने ते काम तसेच राहून गेले. त्यानंतर बडोद्याचे कै. दाजी नागेश आपटे यांनी १,३०० पानांचे चरित्र तीन खंडात इ. स. १९३६ मध्ये महाराजांच्या हीरकमहोत्सवानिमित्त लिहून छापून काढले. कै. आपटे यांनी प्रस्तावनेत महाराजांनी हस्तलिखित पाहिल्याचा निर्देश केला नसला तरी माहितगारांकडून हे चरित्र महाराजांच्या नजरेखालून गेले असल्याचे कळते. आज मराठीत हेच चरित्र अधिकृत समजण्याच्या योग्यतेचे आहे. सरदेसायांनी महाराजांच्या निधनानंतर आपल्या आठवणींचे पुस्तक छापले. इंग्रजीत स्टॅनले, राइस, सार्जेंट व टॉटनहॅमबाई यांनी लिहिलेली तीन चरित्रे आहेत. याशिवाय बीडनसाहेबाने त्यांच्या एका वर्षातील सहवासावर लिहिलेले एक पुस्तक असून त्याच पद्धतीचे श्री. देसाई नावांच्या इसमाने महाराजांवर बडोद्यांतील ४० वर्षे या नावाचे पुस्तक लिहिले आहे. या ग्रंथाचा व महाराष्ट्र राज्याच्या सरकारी दप्तरखान्यांतील व बडोद्याच्या दप्तरखान्यांतील कागदपत्रांचा मी उपयोग केलेला आहे. त्याकरिता निःसंकोचपणे मदत केल्याबद्दल डॉ. पु. म. जोशी, श्री. खोबरेकर व श्री. कामत यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ज्यांनी व्याख्यानास प्रवृत्त केले ते मुंबई मराठी संग्रहालयाचे कार्यवाह श्री. वा. वि. भट, प्रस्तुत संग्रहालयाच्या इतिहासमंडळाचे संचालक श्री. वा. सी. बेंद्रे, ज्यांनी व्याख्यानाचे कौतुक करून छापण्याचे प्रोत्साहन दिले ते हितचिंतक श्रोते, चरित्र लिहिण्याची कल्पना सुचवून ती फळास आणणारे श्री. मामासाहेब देवगिरीकर व श्री. रा. प्र. कानिटकर, तसेच चित्रशाळा मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. दामुअण्णा जोशी, ज्या मराठी, इंग्रजी ग्रंथांचा आधार घेतला ते पूर्वोक्त लेखक या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

शेवटी उल्लेख होत असला तरी आभारासंबंधात ज्यांचा मान वस्तुतः पहिला आहे, ते श्री. मानसिंगराव गायकवाड होत. श्री. मानसिंगराव मुंबईराज्याच्या पोलीसखात्यांत उच्चाधिकाऱ्यांवर असतांना व निपृत्त झाल्यावर संवादाची संधि मिळाली की महाराजांच्या थोरवीबद्दल ते अत्यंत तळमळीने बोलत. दूरान्वये असला तरी कृतज्ञपणे हे नमुद करणे अवश्य आहे की, महाराष्ट्र सरकारामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथाचे प्रेरक श्री. मानसिंगरावच आहेत.

ब. न. फाटक

प्रस्तावना

महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांनी बडोदा संस्थानात अनेक बदल केले. त्यांच्या या कार्यामुळे जगात बडोदा संस्थान ओळखले जावू लागले. त्यामुळे सयाजीराव महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती आदर्श प्रशासक, सुधारणावादी महाराज, जागतिक पर्यटक अशी अनेक वलये निर्माण झाली. महाराजांचा गौरव वेळोवेळी होत होता. आजही होत आहे.

महाराजांचा जन्म इ. स. १८६३ साली झाला. इ. स. १९६३ साल महाराजांच्या जन्मशताब्दी वर्ष होते. महाराष्ट्र शासनाने जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याचे ठरविले होते. परंतु इ. स १९६२ च्या चीन आक्रमणाने ही योजना काही प्रमाणात मागे पडली. मात्र ब. न. फाटक यांनी जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराजांचे चरित्र लिहिले.

महाराजांचे हे चरित्र छोटे आहे. परंतु महाराजांच्या मृत्यूनंतर लिहिलेले हे पहिले चरित्र आहे. महाराज हयात असताना अनेक मराठी, गुजराती आणि इंग्रजी चरित्रे लिहिली गेली. परंतु महाराजांच्या पश्चात महाराजांच्या संपूर्ण जीवनाचे निवेदन करणारे चरित्र १९६३ सालापर्यंत लिहिले गेले नव्हते. ती उणीव फाटक यांनी भरून काढली. फाटक यांनी प्रथम जन्मशताब्दी वर्षानिमित्त सयाजीराव महाराजांच्या जीवनावर व्याख्यान दिले. त्यानंतर त्यांना चरित्राची कल्पना सुचली. असे चरित्राच्या प्रस्तावनेत स्पष्टपणे म्हणतात. चरित्राची मांडणी करताना महाराजांविषयीची साधने त्यांनी जमा करून हे चरित्र सिद्धीस नेले.

सयाजीराव महाराजांचे हे चरित्र अत्यंत सोप्या भाषेत लिहिले आहे. त्यामुळे ते वाचनीय आहे. महाराजांच्या अनेक गुणांचा समावेश या चरित्रात होतो. महाराजांच्या व्यक्तित्वावर लक्ष केंद्रित करत महाराजांच्या सुधारणा केंद्रवर्ती मानून या चरित्राची रचना केली आहे. चरित्राच्या प्रारंभी ते म्हणतात, ''जगात पुढारलेले राष्ट्र म्हणून डौल मिरवणाऱ्या ब्रिटिशांना आपल्या सुधारणांपुढे लाजेने खाली मान करावयास लावणारे एकच एक सयाजीराव महाराज गायकवाड होऊन गेले. त्यांचे कर्तुत्व कोणत्याही काळातील राज्यकारभाराला मार्गदर्शक ठरावे अशा योग्यतेचे

होते." (पृ. ५०५) महाराजांच्या सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या होत्या. त्यामुळे महाराज जगभर प्रसिद्ध झाले. प्रजेला सुख समाधान लाभले. ज्या प्रजेच्या पूर्ण जीवनात राजाचे दर्शन होत नव्हते, तो राजा आपणाहून प्रजेच्या भेटीला जात होता. 'हुजूर सवारी' काढत महाराजांनी राज्याच्या प्रत्येक भागाला भेट दिली. महाराजांना प्रजेच्या समस्या जाणून घेतल्या. त्या सोडिवण्यात प्राधान्यक्रम ठरवता आला.

फाटक यांनी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाचे घटना - प्रसंग निवडत चरित्र थोडक्यात पूर्ण करतात. महाराजांना अधिकारप्राप्ती होण्याअगोदर 'राज्यावर येण्यापूर्वीची हालचाल, गोपाळची निवड, बालपणातील गुण, वाढदिवसाचा दरबार, शिक्षणाचा श्रीगणेशा, बापलेकांचे ममत्व, अधिकारग्रहणापूर्वीचे ज्ञानसत्र, प्रथम विवाह' अशा मुद्यांच्या आधारे विवेचन करतात. महाराजांच्या जडणघडणीचा कालखंड अत्यंत महत्त्वाचा असून फाटक या बाबींना महत्त्वाचे स्थान देतात. आणि चरित्रात संक्षेपाने नोंद घेतात.

फाटक यांनी महाराजांच्या जीवनातील कोणताही महत्त्वाचा प्रसंग सोडला नाही. त्या प्रसंगानातर महाराजांविषयी स्वतःचे आकलन मांडले आहे. त्यापैकी फाटक यांचे एक मत पाहिले म्हणजे आपणाला याची कल्पना येईल. महाराजांना अखिल हिंदुस्थान एकसंघ राहावा असे त्यांना नेहमी वाटे, त्याविषयी फाटक म्हणतात, सयाजीरावांची दृष्टी भारतीय होती. बडोद्याचा गौरव म्हणजे भारताचा गौरव असल्याचा त्यांना विश्वास होता तेव्हा भारतीय राज्यघटनेच्या वाटाघाटीत ते आपुलकीने लक्ष घालीत होते. (पृ. ५३२) महाराजांच्या जीवनाविषयी अशा प्रकारे अत्यंत मौलिक विधाने करत चरित्र पूर्ण करतात.

हे समग्र चरित्र आहे. महाराजांची थोडक्यात ओळख होण्यासाठी हे चरित्र उपयोगी आहे. चरित्रामुळे महाराजांच्या विख्यात सुधारणांची ओळख होते. महाराजांची गुणग्राहकता समजते. सयाजीराव महाराजांच्या सुधारणा आणि विचार आजच्या काळातही उपयोगी आहेत. आजच्या काळातील राज्यकर्ते त्यांच्या सुधारणा आणि विचारांच्या आकलानाने सुसंस्कारित राज्य करू शकतील इतका उच्च वारसा महाराजांच्या चरित्रात आहे. म्हणून महाराजांची ही चरित्रे सर्वांसाठी उपयोगी आहेत.

- डॉ. राजेंद्र स. मगर,
निमगाव (म.), जि. सोलापूर.

अनुक्रम

प्रस्तावना / ४९९

प्रस्तावना / ५०१

उपोद्घात / ५०५

परिशिष्ट / ५३७

यशोदयामंडितकान्तदेहो
बाल्येऽपि गोपालजनस्य नेता
गोमंडले पासि बलेन युक्तः।
कथं न राजन् पुरुषोत्तमोऽसि।।

हे राजन्, कीर्ति आणि दया या गुणांच्या भूषणांनी ज्याच्या जीवनाला सौंदर्य लाभले आहे, लहानपणीसुद्धा जो गवळ्याचे नेतृत्व गाजवीत होता, आपल्या बुद्धिसामर्थ्याने जो राज्याचे रक्षण करतो, असा तूच पुरुषोत्तम नव्हेस काय?

(हा श्लोकाचा दुसरा अर्थ कृष्णवाचक आहेः - यशोदेने अलंकार चढवून ज्याच्या देहाचे सौंदर्य वाढविले, लहानपणीच जो गवळ्यांचा पुढारी होता. बलाढ्यतेने जो पृथ्वीचे किंवा गायांच्या खिल्लाराचे (गोमंडले) रक्षण करतो, असा तू राजन् खऱ्या अर्थाने पुरुषोत्तम नव्हेस का?)

श्रीमंत सयाजीराव गायकवाड

उपोद्‌घात

या लेखनाचा विष्सय बडोद्याचे चिरसंस्मरणीय राजे श्रीमंत सयाजीराव गायकवाड हा असून त्यांनी संस्थानिक या नात्याने आपली इहलोकीची यात्रा संपविली. आता संस्थाने जाऊन भारतामध्ये एकजिनसी राज्यकारभार अस्तित्वांत आल्यामुळे संस्थाने व संस्थानिक हा काय प्रकार होता, याची पुढील पिढ्यांना माहिती असण्याचा संभव नाही, म्हणून त्याचे थोडेसे स्पष्टीकरण केलेले बरे. ब्रिटीशांनी भारत जिंकताना पूर्वीच्या राजवटीतील सरदार, जहागिदिारांना शिल्लक ठेवले होते. त्यांची संख्या सुमारे ७०० पर्यंत होती. त्यांतलेच कित्येक महाराणा, महाराजा, महाराव इत्यादि मानाच्या संज्ञा आपल्या नावामागे मिरवणारे लोक ब्रिटीशांच्या व जनतेच्या दृष्टीने संस्थानिक किंवा राजेरजवाडे गणले जात असत. यांच्या ताब्यांत फार मोठा मुलूख व मोठ्या संख्येची प्रजा होती. आपल्या मुलुखाचे मालक व प्रजेचे धनी असूनहि त्यांचा राज्यकारभार म्हणजे बहुधा एक सावळागोंधळ असे. ब्रिटीशांची मर्जी राखून प्रजेचा पैसा चैनीत उधळणे, एवढेच राजेरजवाड्यांतल्या बहुसंख्यांचे ध्येय होते. प्रजा हे आपल्या बेफाम ख्यालीखुशालीचे साधन अशी त्यांतील बहुतेकांची ठाम समजूत होती. त्यांना अडपता दडपता कोणी नव्हता. प्रजेच्या छळाचा अतिरेक झाला किंवा ब्रिटीशांची मर्जी दुखविण्याचा प्रसंग उद्भवला तर ब्रिटीश राज्यकर्ते संस्थानिकांच्या वर्तनक्रमाकडे लक्ष देत असत. संस्थानिकांविषयी त्यांच्या राज्यकारभाराच्या अंदाधुंदीमुळे ब्रिटीश प्रदेशांतील जनतेला कधीच आदर वाटत नव्हता. याला जो अपवाद गेल्या शतकांत निपजला तो म्हणजे या लेखनाचा विषय बडोद्याचे सयाजीराव महाराज हे होत. जगांत सुधारलेले राष्ट्र म्हणून डौल मिरविणाऱ्या ब्रिटीशांना आपल्या सुधारणांपुढे लाजेने खाली मान करावयास लावणारे एकच एक सयाजीराव महाराज गायकवाड होऊन गेले. त्यांचे कर्तुत्व कोणत्याहि काळांतील राज्यकारभाराला मार्गदर्शक ठरावे, अशा योग्यतेचे होते.

राज्यावर येण्यापूर्वीची हालहवाल

बडोद्याचे महाराज मल्हारराव यांना इ. स. १८७५ मध्ये ब्रिटीश सरकारने पदच्युत करावे असा प्रसंग उद्भवला. मल्हारराव हे खंडेराव महाराज यांचे धाकटे बंधु खंडेराव महाराज इ.स. १८५६ मध्ये गादीवर आल्यानंतर मल्हाररावांनी त्यांना मारण्याचे दोन वेळा प्रयत्न केले. या कृष्णकृत्याबद्दल खंडेराव महाराजांनी मल्हाररावांना तुरूंगात डांबून ठेवले होते. खंडेराव महाराजांची कारकीर्द इ.स. १८७० मध्ये अचानकपणे संपली. त्यांना तडकाफडकी मृत्यु आला. ते निपुत्रिक वारले असल्याने इंग्रजांनी मल्हाररावांना तुरूंगातून सोडवून बडोद्यांस आणले. खंडेराव महाराज निपुत्रिक वारले असले तरी याच वेळी त्यांच्या पत्नी राणी जमनाबाई या गरोदर असल्याचे ब्रिटीशांना समजले होते, म्हणून ब्रिटीश रेसिडेंटाने मल्हाररावांकडून त्यांच्या हाती बडोद्याचा राज्यकारभार देतांना असा लेखी करारनामा केला की, राणी जमनाबाई यांना जर पुत्र झाला तर तोच राज्याचा अधिकारी होईल. ह्या करारनाम्याप्रमाणे मल्हाररावांचे राज्यपद स्थिर नव्हते. जमनाबाई राणीसाहेब गरोदर असल्यामुळे त्यांना मुलगा झाल्यास आपले राज्य हंगामी ठरण्याच्या भीतीने मल्हाररावांकडून जमनाबाई राणीसाहेब यांना त्रास पोचत होता. तो असह्यतेच्या म्हणजे जिवावर बेतण्याच्या सीमेस पोचला. तेंव्हा राणीसाहेबांनी ब्रिटीशांकडून आश्रय मिळण्याविषयी विनंती केली व ती ब्रिटीयाांनी स्वीकारून जमनाबाई राणीसाहेबांना मल्हाररावांच्या कांचांतून सोडविले. राणीसाहेब यथाकाल प्रसूत होऊन त्यांना मुलगी झाल्याचे समजल्यावर मल्हाररावांचा आनंद कडेलोटास पोचला. आपले राज्यपद यापुढे निर्विघ्न असल्याच्या खात्रीमुळे मल्हाररावांनी आपल्या वागणुकीत कसलाच ताळतंत्र ठेवला नाही. अशा स्वच्छंदपणाच्या ओघांत तेंव्हाच्या ब्रिटीश रेसिडेंटावर विषप्रयोग केल्याचे प्रकरण उद्भवून त्या पायी मल्हाररावांना राज्यपदास मुकावे लागले. हे प्रकरण निकालांत निघण्यापूर्वी नव्या रेसिडेंटाने मल्हाररावांना पदच्युत होण्याची पाळी आल्यास त्यांच्या मागून बडोदे राज्याची कशी व्यवस्था व्हावी याचाही आपल्या एका खलित्यांत वरिष्ठ सरकारपुढे विचार मांडला होता. 'अल्पवयस्क मुलाची निवड करून बडोदे राज्याची घडी नीट बसवावी' हा त्याच्या शिफारसीचा इत्यर्थ म्हणता येईल. विषप्रयोगाची चौकशी संपून श्रीमंत मल्हारराव यांना पदच्युत करण्याच्या निर्णयाबरोबरच राणी जमनाबाईसाहेबांचा दत्तक घेण्याचा अधिकार जाहीर झाला. आता रिकाम्या पडलेल्या राजसिंहासनावर कोणाला बसवावयाचे याबद्दलची सरकारी चक्रे जोराने फिरू लागली. खुद्द बडोद्यांत गादीवर हक्क सांगणारी गायकवाड मंडळी थोडी नव्हती. परंतु ती सज्ञान आणि वयाने प्रौढ म्हणून त्यांची वर्णी लागण्याचा संभव नव्हताच. जमनाबाई राणीसाहेबांच्या नापसंतीने त्यांना खो बसला. संस्थानी वातावरणात वाढलेला कोणीहि सिंहासनारूढ होऊ नये असा राणी जमाबाईंच्या नापसंतीमागील रोख होता. बडोद्यांतील गायकवाड याप्रमाणे विल्हेस लागल्यावर गायकवाडांच्या नात्यागोत्यांत जवळिकेने बसू शकतील असे नातेवाईक बडोद्याबाहेर जे होते त्यांची पाहणी सुरू झाली. हे काम फारसे अवघड नव्हते. गायकवाड घराण्याचे लोक नाशिक जिल्ह्याच्या मालेगांव तालुक्यांतील 'कवळाणा' गांवी शंभर वर्षे नांदत होते. त्यांचे बडोद्यास येणे-जाणेहि सुरू होते. बडोद्याच्या प्रसिद्ध दमाजीरावाच्या प्रतापराव नामक भावाचे घराणे तेथे होते. त्यांच्याकडे नजर जाऊन व बडोद्याच्या गायकवाडांचा

त्यांच्याशी जुळणारा संबंध तपासून तेथून जी मुले निवडीसाठी योग्य ठरली त्यांनाच पुढे बडोद्यास नेण्यांत आले. प्रतापरावानंतरच्या चौथ्या पिढीतील ही मुलें होती. या तपासणीसाठी ब्रिटीशांनी दोन खास इंग्रज अधिकारी नेमले होते. यांच्या जोडीला बडोद्याचा राजपुरोहितही होता. त्यांनी नाशकास या घराण्याच्या कागदपत्रांची व येऊ घातलेल्या मुलांच्या म्हणून सादर करण्यांत आलेल्या कुंडल्यांची बारकाईने तपासणी केली. निवडीनंतर या तीन मुलांना कवळाणा येथून पोलीस अधिकाऱ्यांच्या खास संरक्षणाखाली बडोद्यास नेण्यांत आले. नाशकाहून त्यांच्या सोबतीस एक बडा गोरा पोलीस अधिकारी ठेवला होता.

गोपाळाची निवड

नाशिक जिल्ह्यांतील तीन मुले बडोद्यास येतांच बडोद्यांतील लोकांमध्ये फारच गडबड उडाली. या मुलांच्याबद्दल कुतूहल निर्माण होऊन यांतून कोण निवडला जातो याबद्दल जिज्ञासा वाढली. याच सुमारास (ता. २२ मे १८७५) रेसिडेंटाने हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा काढून सर्वांना असे बजाविले की बडोद्याच्या हिताकडे लक्ष ठेवून घेण्यांत आलेल्या व्हाईसरॉय यांच्या (भावी) निर्णयाविषयी कोणालाहि हरकत काढता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही. राणी जमनाबाई व सरदार वगैरेंना सर्व गोष्टी समजावून सांगण्यात आल्या असून प्रतापरावांच्या वंशाच्या कायदेशीरपणाबद्दल त्यांची खात्री पटली आहे. त्याच शाखेपैकी एक मुलगा दत्तक घ्यावा असा राणीसाहेबांचा निर्णय आहे. याला जे कोणी विरोध करतील त्यांना शासन करण्यांत येईल. या जाहीरनाम्याच्या प्रती शहरांत सर्वत्र आणि संस्थानच्या इतर प्रमुख स्थळी लावण्यांत आल्या होत्या.

बडोद्यांत आणलेल्या या तीन मुलांची परीक्षा कशी घेण्यांत आली हे एक गूढच आहे. एक आख्यायिका सांगतात की, सदर तीन मुलांना जेंव्हा वाड्यावर नेण्यांत आले व राणीसाहेबांनी या मुलांना विचारले की, तुम्ही येथे कशासाठी आला आहात, त्यावेळी गोपाळ नावाच्या मुलाने 'मी राजा होण्यासाठी आलो आहे' असे ठणठणीत उत्तर दिले. या त्याच्या उत्तराने राणीसाहेबांना तो मुलगा आवडला व त्याची नीट पारख करण्यासाठी कांही अधिकाऱ्यांना सांगण्यात आले. शेवटी गोपाळ हाच सर्वानुमते पसंत होऊन त्याची पत्रिका पाहण्यांत आली. पत्रिकाही अनुकूल असल्याचे दिसून आल्यावर या मुलाची निवड कायम होऊन त्याला दत्तक घेण्याचे ठरले. ता.२७ मे हा शुभ दिवस होता म्हणून गोपाळचा दत्तकविधी आणि राज्यारोहण हे समारंभ उरकण्यांत आले. आता गोपाळचे नामकरण सयाजीराव (तिसरे) असे झाले. त्याच दिवशी रेसिडेंटाशी भेट व्हावी, असेहि ठरले होते. परंतु गोपाळला दत्तकविधानाच्या मागोमाग इतर अनेक धार्मिक विधी व कुलग्रामादि देवतंचे दर्शन अशी अनेक कार्ये उरकावयाची असल्याने नवा बालराजा थकेल व अशा स्थितीत रेसिडेंटाची भेट यथासांग पार पडणार नाही, असे रेसिडेंटाच्या नजरेस आणून ही भेट दुसऱ्या दिवसावर रेसिडेंटाच्या संमतीने पुढे ढकलण्यांत आली. याप्रमाणे कवळाणा खेड्यांतील एका खेडवळ व अशिक्षित मुलाचा कुणाच्याही ध्यानी-मनी-स्वप्नी नसतांहि अकस्मात दैवयोगाने भाग्योदय घडला. 'पुरुषस्य भाग्य' हे सुभाषित सार्थ ठरले.

बाळपणांतील गुण

दत्तकविधी झाला त्यावेळी गोपाळचे वय तेरा वर्षांचे होते. खेडेगांवातील मुलाप्रमाणे त्याला पोहण्याची व खेड्याला शोभणाऱ्या मर्दानी खेळांची आवड असल्याचे त्यांच्या बंधूनी-संपतरावांनी आपल्या आठवणीत नमूद केलेले आहे. परंतु त्याला शिक्षणमात्र अजीबात नव्हते. लहानपणापासून आरोग्य चांगले होते. त्यांच्या बालपणातील दोन प्रसंग विशेष लक्षांत ठेवण्यासारखे असून त्यांचे धैर्य, प्रसंगावधान हे गुण त्यामध्ये आढळतात. एकदा आपल्या सवंगड्याबरोबरते पोहण्यास गेले असता एका सोबत्याने उंचावरून पाण्यात उडी मारली. ज्या ठिकाणी उडी पडली त्या ठिकाणी पाणी खोल नव्हते व पाण्याखाली दगड होता. त्या मुलाची उडी त्या दगडावर पडल्यामुळे त्याचे डोके फुटुन रक्तांबाळ होऊन बेशुद्ध पडला. इतर मुलांना काय करावे हे सुचेना. पण गोपाळने पुढाकार घेऊन त्या रक्तबंबाळ मुलाला बाहेर काढले व त्याच्या घरी पोचते केले. दुसऱ्या प्रसंगात प्रत्यक्ष गोपाळाचा प्राणान्त नसला तरी जबर दुखापत घडण्याची वेळ आली होती. या वेळी मित्रांच्या समवेत गोपाळ रस्त्याने खेळत चालला असतांना एका पोळाने अचानकपणे धांवत येऊन त्याला आपल्या अणकुचीदार शिंगांमध्ये उचलले. हा प्रकार बघताक्षणी मुलेच काय पण आजूबाजूचे लोकहि ओरडू लागले. त्यापैकी कांहीजण त्या पोळाच्या मागे धावू लागले. ज्या मार्गाने पोळ पळत होता तिकडूनच गोपाळचे वडील काशीराव येत होते. एका मुलास शिंगावर घेऊन एक पोळ भरधांव पळत आहे हे दृश्य त्यांना दिसताच ते पुढे होऊन त्यांनी त्या धावणाऱ्या बैलाची शिंगे दोन्ही हातांनी पकडून त्याला अडविले आणि वाकविले. बैलाची धांव थांबताक्षणी इतका वेळ शिंगावर अडकलेल्या गोपाळाने सावधपणे उडी मारली व तो पळाला. त्याने शिंगांत अडकतांच घाबरून कांही हालचाल केली असती तर कदाचित इजा घडण्याचा संभव होता. हा प्रसंग अर्थातच दहापांच मिनिटांचा होता. या प्रसंगात जसा मुलाच्या धैर्याचा तसाच त्याच्या वडिलांच्या धैर्याचा प्रत्यय भरलेला आहे. हा प्रसंग काशीरावांच्या असामान्य सशक्ताणाची, धैर्याची, आत्मविश्वासाची, प्रसंगावधानाचीदेखील ओळख पटविणारा असल्याचे सहज लक्षांत येईल. पुढे सयाजीरावांनी आपल्या जनकाचा जो बैठा पुतळा वाड्यांत तयार करवून ठेवला तो कांशीरावांच्या बलाढ्य देहयष्टीची साक्ष पटविणारा आहे.

वाढदिवसाचा दरबार

कवळाण्याचा गोपाळ हा बडोद्याचा राजा सयाजीराव बनल्यावर त्याच्या वाढदिवसाचा दरबार १६ मार्च १८७६ रोजी भरला. त्या दरबारास रेसिडेंट हजर होता. त्याने दरबार चालू असतां शेजारच्या मानकऱ्याला महाराजांचे वय विचारले. त्याने १४ वर्षांचे असे सांगितले. पण रेसिडेंटाला वय बारा वर्षांहून अधिक नसावे असे वाटल्यामुळे त्याने दिवाणांना पत्र लिहून महाराजांचे वय विचारले. महाराज अधिकारावर आले नाहीत तोच त्यांचे निश्चित वयोमान कळल्यास पुढे प्रत्यक्ष खऱ्या राज्यारोहणप्रसंगी भानगड निघणार नाही; कदाचित वयोमान समजण्याचे लेखी साधन उपलब्ध नसेल तर अंदाजाने वयाचा निकाल पक्का करून घ्यावा व त्याची नोंद हिंदुस्थान सरकारच्या दप्तरी असावी, असा वय विचारण्यामागील उद्देश रेसिडेंटाने आपल्या पत्रांत स्पष्ट

केला होता. यावर दिवाणसाहेबांनी राजवाड्यात चौकशी केली. तेथे मुलाची कुंडली होती. फाल्गुन वद्य ६ शके १७८४ हा त्यांचा जन्मदिवस. इंग्रजी कालगणनेप्रमाणे १० मार्च १८६३, अशी त्या कुंडलीतील माहिती दिवाण साहेबांनी रेसिडेंटाकडे पाठविली. सयाजीरावांचे जनक काशीराव, जननी उमाबाई (सालखोड्यापैकी) असा आणखी मजकूर दिवाणाच्या पत्रांत होता. दत्तक घेणाऱ्या मातुश्री जमनाबाई राणीसाहेब या साताऱ्याकडील रहिमतपुरच्या माने घराण्यांतल्या होत्या. (येथे हा विषय संपविण्यापूर्वी स्पष्ट केले पाहिजे की, १७८४ च्या पंचांगाप्रमाणे इंग्रजी तारीख ११ मार्च अशी आढळते. दिवाणाच्या पत्रांत ती १० मार्च अशी असून पुढे हीच तारीख वेळोवेळी लोकांना सांगण्यांत येऊ लागली. महाराजांचे राज्यारोहण, महाराजांचा ब्रिटीशांकडून मोठ्या किताबाच्या रूपाने होणारा गौरव, प्रख्यात भारतीयांच्या चरित्राचे लेखन, अशा प्रसंगी वृत्तपत्रकारांनी, ग्रंथकारांनी, महाराजांच्या जन्मतिथीचे प्रश्न महाराजांकडे रुजू केले व त्याच्या उत्तरांत १० मार्च ही तारीख पुनः पुनः बिनचूक दृष्टीस पडते. कै. दा. ना. आपटे यांनी लिहिलेल्या चरित्रांत मात्र पंचांगानुसार ११ मार्च हा जन्मदिवस नमूद केला आहे. वाढदिवसाच्या पहिल्या दरबाराची तारीख ज्यांच्या अवलोकनांत किंवा ऐकण्यांत आली त्या चरित्रकारांपैकी काहींनी ता. १६ मार्च व काहींनी १७ मार्च अशी स्वीकारल्याचे दृष्टीस पडते.

शिक्षणाचा 'श्रीगणेशा'

केवळ दैवयोगाने सयाजीरावांना राज्य लाभले. आता या लाभास राजत्वाला साजेशा विद्याकलादिकांची जोड मिळणे अवश्य असल्यामुळे त्यांना सर्वांबाीण शिक्षण देण्याच्या जबाबदारीचा गंभीरपणे विचार करणे राणी जमनाबाईंना व सर टी. माधवराव यांना क्रमप्राप्तच होते. या जबाबदारीस अनुसरून सयाजीरावांच्या शिक्षणाचा प्रारंभ ज्येष्ठ शुद्ध ४ ला (ता. ७ जून १८७५) जुन्या राजवाड्यांत धार्मिक पद्धतीने सरस्वतीपूजन समारंभाने झाला. मुळाक्षरे शिकविण्यासाठी दोन महाराष्ट्रीयांची आणि नंतर थोड्या दिवसांनी गुजरातीसाठी एका गुजराथ्याची शिक्षक म्हणून नेमणूक झाली. बडोदे राज्य गुजरातेत असल्याने गुजराती भाषेच्या ज्ञानाची आवश्यकता सहज पटणारी आहे. मराठी व गुजरातीबरोबरच त्यांना मोडी लिपीचेहि ज्ञान देण्यात आले.

बापलेकांचे ममत्व

या काळांत गोपाळ व काशीराव यांच्या मानसिक स्थितीवर प्रकाश टाकणारा एक चुटका सांगण्याजोगा आहे. गोपाळ राज्यपदी चढला तेंव्हा त्याचे जनक काशीराव हे बडोद्यास राहिले. मुलगा राजा झाला म्हणून पित्याला-तो आनंदसमुद्रात बुडालेला असला तरी आपण अंगाखांद्यावर वाढविलेला तो मुलगा याचा विसर पडणे मुळीच शक्य नव्हते. ज्याने आपले लालनपालन केले त्याच्या विषयीचे अकृत्रिम ममत्व सयाजीरावांच्या ठिकाणी राजत्वसुखाच्या आकस्मिक स्थित्यंतराने तत्काळ लोपण्याइतके कच्चे नव्हते. आपण राजप्रासादात राहू लागलो तरी पूर्वीप्रमाणे आपल्या पित्याचे दर्शन वारंवार घडावे आणि राजा झालेला आपला गोपाळ नित्य आपल्या दृष्टीस पडावा ही उत्सुकता या बापलेकांमध्ये बराच काळ वसत होती. दोघांनी एकमेकांशी उभ्या उभ्या

सुद्धा बोलण्याची मोकळीक नव्हती. बापलेकांच्या नजरानजरीलाहि राणी जमनाबाईंचा डोळा चुकविल्याखेरीज सवड मिळत नव्हती. राणीसाहेब धर्माकर्मात गर्क असतील अशासारखी एखादी वेळ आगाऊ ठरवून बापाने वाड्याखालून जावे आणि मुलाने वाड्यांतून (कदाचित प्रणामपूर्वक) हातवाऱ्याने आपली खुशाली बापाच्या निदर्शनास आणावी, ह्या सारांशाचे हृदयस्पर्शी उद्गार टाटनहॅमबाईंजवळ सयाजीरावांनी काढल्याचे त्या बाईने आपल्या पुस्तकांत लिहून ठेवले आहे. राजत्वाने बापलेकांत जी ताटातूट उत्पन्न केली, ती आरंभी या दोघांच्या मताला जाचत असावी हे जसे त्या उद्गारावरून दिसते, तसेच त्या उद्गारामागील अनुभव सुमारे पन्नास वर्षे होऊन गेल्यावरहि महाराजांच्या हृदयांत ठसून बसलेला होता याचेहि ज्ञान घडते.

शिक्षणाची नवी व्यवस्था व पूर्तता

मराठी गुजरातीच्या भाषाज्ञानावर महाराजांचे शिक्षण थांबले नाही. रेसिडेंटाला महाराजांनी जास्त शिक्षण घेऊन शहाणे व्हावे अशी इच्छा असल्याने त्याने राणीसाहेब व दिवाण यांच्या संमतीने व्हाइसरॉयकडे खलिता लिहून एक नवी शिक्षणयोजना त्यांच्याकडून निश्चित केली. या योजनेचे मुख्य सूत्र म्हणजे सामान्य शाळांतून अनेक मुलांस जसे विविध विषय एकत्र शिकविण्यांत येतात तसे महाराजांना शिकविण्यांत यावे व हे करण्यासाठी वाड्याबाहेरच नव्हे तर शहराबाहेर शिक्षणाची व्यवस्था करावी. याप्रमाणे महाराजांच्यासाठी स्वतंत्र शाळा काढून त्यांत त्यांच्याबरोबर सरदार, दरकदार व बडे शेठ सावकार यांची मुले दाखल केली. या शाळेवर देखरेख ठेवण्यासाठी ईलियट नांवाच्या इंग्रजाची नेमणूक झाली. ईलियट हे इंग्लंडच्या एका बड्या उमराव कुळांतले इंडियन सिव्हिल सर्व्हंट असून त्या वेळी नागपुरास शिक्षणाधिकारी होते. तेंव्हा हिंदुस्थान सरकारची त्यांच्या नेमणुकीस मान्यता मिळावी यांत नवल नाही. सयाजीरावांचे मुख्य शिक्षक या नात्याने ईलियट यांनी १० डिसेंबर १८७५ पासून कामाला सुरुवात केली. ईलियटसारख्या खऱ्या कळकळीचा पुरूष हा सयाजीरावांच्या थोर भाग्याचा पुरावाच समजला पाहिजे. सयाजीरावांनी या हितदक्ष गुरूचे गुण ओळखून त्याच्याशी जो स्नेह जोडला, तो शेवटपर्यंत टिकून राहिला. गुरूत्वाचे काम संपल्यावर विश्वासू सल्लागार व राज्यकारभारातले सहकारी (एका खात्याचे वरिष्ठ अंमलदार) या नात्याने ईलियट साहेब बडोद्यास १८९५ पर्यंत राहिले होते. सयाजीरावांचे शिक्षण इतर मुलांच्याबरोबर उत्तम प्रकारे चालू असतांनाच राजत्वाला आवश्यक असे नेमबाजी, कवाईत व घोड्यावर बसण्याचे शिक्षण देण्यांत येई. महाराजांना असे शिक्षण फक्त सहा वर्षेच घेता आले. या काळांतील त्यांचा दिनक्रम आंखीव होता. सकाळी ६ वाजता उठून नित्यविधी उरकल्यावर, ते घोड्यावर बसून रपेट करण्यास जात अगर इतर व्यायाम करीत. त्यानंतर एक तासपर्यंत ते शाळेचा अभ्यास करीत. मग जमनाबाई यांच्याबरोबर त्यांचे भोजन होत असे. भोजनोत्तर ते शाळेत जात. तेथे १०-३० पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्व मुलांचा अभ्यास चाले. मध्यंतरी एक तास त्यांच्या उपहारासाठी राखून ठेवण्यांत येत असे. पांच वाजता शाळा सुटल्यावर शाळेच्या मैदानांत आट्यापाट्या, खो खो, फरीगदगा, कवाईत वगैरे देशी खेळांचाहि व्यायाम होत असे. इतके झाल्यावर रात्रीच्या सुमारास ते सरकारवाड्यांत परत येत. त्यानंतर दुसऱ्या दिवशीच्या अभ्यासाची तयारी केल्यावर त्यांचे भोजन होई, आणि मग रात्री दहा

वाजण्याच्या सुमारास ते निजण्यास जात. महाराजांना सकाळी लवकर उठण्याची सवय लागली, तिच्यामध्ये त्यांनी पुढील आयुष्यांत बदल केला नाही. शाळेतील इतर मुलांच्या समवेत असून त्यांनी सर्वांना मागे टाकले. त्यांच्याशी अभ्यासांत बरोबरी करणारा त्या शाळेत कोणी नव्हता. या सहा वर्षात त्यांनी जे ज्ञान संपादिले ते विविध आणि व्यापक होते. शाळा संपल्यावरहि त्यांच्या विद्याव्यासंगाला खळ पडला नाही. हा व्यासंग केवळ पुस्तकी नव्हता. परदेशांतील प्रगतीच्या अवलोकनाचा होता. आखाड्याचा व्यायामहि त्यांनी पुष्कळ वर्षे चालू ठेवला होता.

सयाजीरावांनी विद्यार्थीपणाच्या काळात दोन वेळा बडोद्याहून हलावे लागले. पहिल्याप्रथम बादशहा सातवे एडवर्ड हे युवराज असतांना भारत दौऱ्यावर आले त्यासाठी आणि व्हाइसरॉय यांनी कलकत्ता येथे दरबार भरविला तेंव्हा महाराज बडोद्याबाहेर पडले. पण या दोन्ही वेळी राजकारणी इसमांना राजदरबारी कशा प्रकारे वागावे लागते याचे शिक्षण महाराजांना मिळाले. कलकत्त्याहून येतांना त्यांनी भारतातील कांही प्रदेश पाहण्यासाठी प्रवास केला.

शिक्षण घेता घेता सहा वर्षांचा काळ पुरा होऊन महाराज इ.स. १८८१ मध्ये १८ वर्षांचे झाले व त्यांना राज्याची अधिकारसूत्रे देण्याची चर्चा हिंदुस्थान सरकारांत चालू झाली. महाराजांना इतक्यांतच राज्याधिकारसूत्रे देण्यांत यंऊ नयेत असे बडोद्यातील कित्येक दरबारी लोकांना वाटत होते. त्याच्या उलट आपल्या अधिकारप्राप्तीला विलंब होऊ नये व आपण राज्य करावयास लागावे असे सयाजीरावांना वाटणे स्वाभाविक होते. महाराज व दरबारी लोक अशी दोन्ही पक्षांची माणसे व्हाइसरॉय यांच्या खलबतांत दाखल झाली. तेथे विलंबवाद्यांची डाळ शिजली नाही आणि महाराज वयांत येताच अधिकारसूत्रे देण्याचा हुकूम व्हाइसरॉय साहेबांनी काढला.

अधिकारग्रहणापूर्वीचे ज्ञानसत्र

महाराजांना १८८१ अखेरीस खऱ्या अर्थाने राज्याधिकार मिळणार हे अगाऊ ओळखून त्यांना राज्यकारभाराची सर्व अंगोपांगे समजावून देण्याकरिता दिवाण सर टी. माधवरावांनी त्या विषयांची बारीकसारीक माहिती तपशीलवार पुरविणारी एक व्याख्यानमाला १८८१ च्या पहिल्या तिमाहीत आरंभिली. दर शनिवारी सायंकाळी व्याख्यान दिले जात असे. त्या मालेत स्वतः दिवाणांनी ४९ व्याख्यानपुष्पे गुंफली हा सांगण्याजोगा विषय आहे. अशी व्याख्यानमाला बहुधा दुसऱ्या कोणाहि राजाच्या वाटणीला आली नसेल. दिवाणांच्या व्याख्यानांचा गोषवारा 'Minor Hints' या नांवाच्या पुस्तकांत पाहावयाला सापडतो. राज्याच्या एकेका शाखेचे अधिकारी आपापल्या शाखेपूरती संपूर्ण माहितीची व्याख्याने देत होते, ती निराळीच. दिवाणांच्या व्याख्यानाचे विषय खातेवार नसून राजा, राजवाडा, आपमतलबी, तोंडपुंजे व खरे निःस्पृह, हितचिंतक, राजाची हाताखालच्या अंमलदारांशी वागणूक, कीर्ती, तडजोडीची वृत्ति, दुसऱ्यांच्या भावनांची जाणीव, इंग्रजांचे संबंध व हक्क, वक्तशीरपणा, न्यायदान वगैरे महत्त्वाच्या आवश्यक विषयासंबंधाची ती व्याख्याने होती. सर टी. माधवराव हे संस्थानी कारभाराचे जसे पटाईत वाकबगार, तसेच इंग्रजी भाषरेमध्ये निष्णात होते. त्यांनी आपल्या व्याख्यानांत रंग भरला असेल याची कल्पना 'Minor Hints' च्या टिपणवजा मजकुरावर नजर टाकल्यासहि करता येते. त्या व्याख्यानाचे साक्षीदार ईलियट यांचा अभिप्राय उपलब्ध आहे. वक्तृत्व, चातुर्य आणि विषयविवेचनाचे आकर्षकत्व

या गुणांच्या अपूर्व संगमाची त्यांनी आपल्या व्याख्यानविषयक अभिप्रायांत प्रशंसा गाइली असून या व्याख्यानांच्या लेखनाचे (ही व्याख्याने अगोदर लिहून काढण्याचा नियम होता.) सौष्ठव त्यांनी वर्णिलेले आहे. व्याख्यानातील विचार सुसंगत, मार्मिक आणि स्पष्टीकरणांच्या विविधतेने नटलेले आढळतात. विवेचनांत संयम असून शैली निर्दोष असल्याबद्दल ईलियट साहेबांनी ग्वाही दिलेली आहे. त्यांच्या अभिप्रायाचे तात्पर्य पुढील उताऱ्यात दिसून येईल. ''वीस वर्षापूर्वी वाचलेल्या पुस्तकांतील उदाहरणे स्वतःच्या विविध जीवनक्रमांतील दाखले विनोदाच्या मार्मिक छटा, अनुभवाचा परिपाठ व विवेचनाचा मार्मिकपणा या सर्वांची इतकी समृद्धी त्यांच्यातून आढळून येते की, जगभर जपून ठेवण्यासारखा एक अमूल्य ठेवा आहे असे वाटते.'' (आपटे २१४- २१५) ही व्याख्यानमाला राज्यरोहणाला पंधरा दिवसांचा अवधि ठेवून संपविण्यांत आली.

प्रथम विवाह

राजपत्नीखेरीज राज्यलक्ष्मी ही अनवस्था टाळण्याकरिताच की काय सयाजीरावांचा विवाह त्या वेळच्या रूढ पद्धतीप्रमाणे लहान वयांतच त्यांच्या अधिकारग्रहणापूर्वी करण्यांत आला. राजपदस्थ आणि विद्यार्थीदशा या दोन कारणांमुळे त्यांचे लग्न १७ व्या वर्षापर्यंत लांबले. राजा होण्याच्या योगाअभावी कदाचित ते वयाच्या १४ व्या, १५ व्या वर्षीच चतुर्भूज होऊन गेले असते. त्यांचे लग्न करण्याचा निश्चय झाल्यावर वधूसंशोधन सुरू होऊन राणी जमनाबाईंच्या संमतीने तंजावरच्या राजवंशाशी संबंध असलेल्या मोहिते कुळांतील एक वधू निवडली गेली. कोल्हापूर, सातारा किंवा ग्वाल्हेर, धार ऐवजी दक्षिणेतील तंजावराकडे दृष्टि वळण्याला दिवाण तंजावरचे हे कारण विसरता येण्याजोगे नाही. नियोजित वधूचे माहेरचे नांव लक्ष्मी असे होते. ता. ६ जानेवारी १८८० रोजी सयाजीरावांचा विवाह पार पडला. मोहित्यांची लक्ष्मी आता राणी चिमणाबाई या नावाने महाराजांच्या सहधर्मचारिणीच्या पदावर चढली.

सर टी. माधवरावांचा राजीनामा

अशा प्रकारे महाराज सपत्नीक आणि सज्ञान झाल्यावर, ता. २८ डिसेंबर १८८१ रोजी त्यांना राज्यकारभाराचे अधिकार प्राप्त झाले. या प्रसंगी मोठा समारंभ करण्यात आला. या वेळी सयाजीरावांना निरनिराळ्या संस्थांकडून मानपत्रे देण्यांत आली. पुण्याच्या सार्वजनिक सभेनेहि मानपत्र पाठविले होते. हे मानपत्र कै. श्री. सीताराम हरी चिपळूणकर यांनी वाचून दाखविले. या मानपत्राला योग्य शब्दांत महाराजांनी उत्तर दिले. आलेल्या मानपत्रांना अधिकृतपणे पोच देण्याचा प्रसंग उद्भवला, त्या वेळी रेसिडेंटाने ही एक स्वयंमान्य राजकीय उपदेश करणारी संस्था म्हणून सार्वजनिक सभेबद्दल नापसंती दर्शविली. परंतु तिकडे कानाडोळा करून महाराजांनी पोच दिली. अधिकारग्रहणाचा समारंभ उरकल्यावर महाराजांनी कारभारांत लक्ष घालायला सुरूवात केली. थोड्याच अवधीत पहिल्याच घासाला माशी म्हणतात तशी घटना अनुभवास आली.

जगाच्या राज्यकारभाराचा इतिहास पाहिला तर नवा राजा व जुना दिवाण यांच्यामध्ये हळू हळू बेबनाव वाढत जातो. सयाजीराव महाराज अधिकार गाजवू लागले तेंव्हा ह्या अनुभवाची

आवृत्ति घडू लागली. एखाद्या प्रकरणाच्या अंतिम निर्णयासंबंधात महाराज व दिवाण यांच्यामध्ये मतभेद व्हावा व त्यावरून परस्परांचे बिनसावे असे प्रकार वारंवार प्रत्ययास येत चालले. प्रथम ही गोष्ट फारच थोड्यांना माहीत होती. शेवटी या मतभेदाचे पर्यवसान अगदी निराळ्याच गोष्टीने घडून आले. याविषयी एक आख्यायिका अशी सांगितली जाते की, एक दिवस महाराज दिवाणांच्या कचेरीत तेथे काम सुरू होण्याच्या वेळी गेले. पाहतात तो दिवाण आलेले नव्हते. कांही वेळ वाट पाहून महाराज वाड्यावर परतले. याबद्दल महाराजांनी दिवाणांना अवाक्षरानेहि विचारले नाही. पण दिवाण साहेबांनी श्रीमंतांचे शिक्षण चालू असतां वक्तशीरपणाचा कटाक्ष बाळगून त्याचे महत्व महाराजांच्या चित्तावर ठसविले होते. हा उपदेश सदर प्रसंगाने आपल्यावर उलटला याची चुटपुट लागून दिवाण साहेबांनी नोकरीतून निवृत्त होण्याचे ठरविले आणि सहा महिन्यांच्या रजेचा अर्ज केला. रजेची मुदत संपली तेंव्हा त्यांनी आपला राजीनामा पाठविला.

दिवाण राजा सर टी. माधवराव हे त्या काळी अत्यंत बडे प्रस्थ होते. माधवराव हे हिंदुस्थानांतील एक ख्यातनाम राज्यधुरंधर व्यक्ति हणून मशहूर असून त्यांना इंग्रज सरकारकडून त्यांच्या कामगिरीनिमित्त सर व राजा या बहुमानाच्या पदव्या मिळाल्या होत्या. त्रावणकोर आणि इंदूर संस्थानांतून त्यांनी ब्रिटीश पसंतीच्या कार्यक्षमतेने दिवाणपद भूषविले. त्रावणकोरमधील कारकीर्दीत एक पुरोगामी विचारवंत म्हणून त्यांचा बोलबाला झाला. बडोद्यास त्यांचा राज्यकारभार त्यांच्या लौकीकाला साजेसाच चालू होता. अर्थात त्यांचा राजीनामा स्वीकारणे महाराजांना काहीसे अडचणीचे वाटले. गादीवर स्थानापन्न होतात न होतात तोच एका प्रख्यात कर्तबगार मुत्सद्दी दिवाणाला काढल्याचा ठपका त्यांना लोकांनी दिला असता. परंतु राजीनामा स्वीकारण्याबद्दल दिवाणांचा आग्रह असल्यामुळे हा प्रश्न सोडविणे त्यांना काहीसे सोपे झाले, महाराजांनी राजीनामा मंजूर केला आणि त्यांनी तोवर बडोद्याच्या केलेल्या सेवेबद्दल तीन लक्ष रुपयांचे मानधन दिले. राजीनामा मंजूर करतांना महाराजांच्या मनांत काय चालले होते याची कल्पना पुढील उताऱ्यावरून होईल :- ''आपसांतल्या मतभेदांमुळे परिस्थिती बिघडू नये म्हणून सर टी. माधवराव निवृत्त झाले असावे असे वाटते. जो पुरुष सर्वश्रेष्ठ अधिकाराने आजपर्यंत राज्यकारभार करीत होता आणि जवळ जवळ राजाची सत्ता ज्याने उपभोगली, त्याला ज्या ठिकाणी आपली सत्ता पूर्वीइतकी अनियंत्रित राहणार नाही, अशा खाालच्या पायरीवर उतरून समाधान मानणे अर्थातच शक्य नाही.''

सर टी. माधवराव यांच्या रजेची मुदत संपण्यापूर्वीच महाराजांनी काजी शहाबुद्दीन यांना दिवाणपदी नेमण्यासाठी व्हाइसरॉय यांची संमति मिळविली आणि रजेची मुदत संपताच त्यांच्या जागी काजी शहाबुद्दीन यांना नेमले. टी. माधवरावांचे नोकरी सोडतांना जरी सयाजीरावांशी बरे नव्हते तरी सयाजीरावांनी त्या गोष्टीचा विचार न करता पुढे या पहिल्या दिवाणाशी अत्यंत प्रेमाचे संबंध राखले. त्यांचा पत्रव्यवहार आणि भेटीगाठी चालू राहिल्या.

राज्यातील दौरा

राज्याचे सर्वाधिकार मिळाले म्हणून दुसरा कोणी असता तर कांही काळ त्याने चैनीत काढण्याचे ठरविले असते. पण महाराजांच्या ठिकाणी राजत्व व त्याची कर्तव्ये यांचा निदिव्यास

होता म्हणून त्यांनी आपल्या राज्याच्या सीमा, त्यातील प्रदेश, तेथील जनता व तिची स्थिती यांचे ज्ञान होण्यासाठी दौरा आरंभला. महाराज या दौऱ्याच्या वेळी कोठेहि जात व जातीने अवश्य त्या गोष्टीची चौकशी करीत. घोड्यावरून राजमार्गापासून दूर डोंगराळ भागांतील प्रजेची चौकशी करीत असतां त्यांना कर्तव्यपूर्तीचा उल्हास वाटे. अशा प्रवासाने त्यांनी आपल्या प्रदेशाची व तेथील लोकांच्या अडचणींची प्रत्यक्षपणे माहिती करून घेतली. याप्रमाणे मेहेसाणा, कडी, कलोल, देहेगांव, विजापूर, विसनगर इत्यादि प्रदंश पाहिले. यानंतर नवसारी, अमरेली वगैरे तालुक्यांतून फिरून त्यांनी तेथील प्रजेचे अवलोकन केले. अशा रीतीने महाराजांच्या कारभाराचा मोठा आशादायक आरंभ झाला.

पत्नीच्या मृत्यूचा वज्राघात आणि परदेशगमन

या काळांत त्यांचे संसार-सुखहि अबाधित राहिले. पण एखाद्याचे सर्वांगिण सुख ब्रह्मदेवाला बघवत नाही, या अर्थाच्या संस्कृत सुभाषितानुसार इ.स.१८८५ मध्ये त्यांच्या संसारसुखावर वज्राघात झाला. राणीसाहेब प्रसूत होऊन महाराजांच्या भाग्यास पुत्रलाभ जोडला व आपण पुढे थोड्याच अवधीत तान्हा मुलगा मागे सोडून निवर्तल्या. त्यांच्या दुखण्यासाठी अनेक डॉक्टरांची सल्लामसलत व औषधोपचार चालू असूनसुद्धा वैद्य रोग बरे करतो पण मरण टाळू शकत नाही हेच अखेरीस खरे ठरले. राणीसाहेबांच्या मृत्यूचा आघात महाराजांची प्रकृति बिघडण्यास कारणीभूत झाला. त्यांना निद्रानाशाचा रोग जडला. सर्व औषधोपचार झाले. सरतेशेवटी मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर मूर यांचा सल्ला घेतला. त्यांनी परदेशांत थंड हवेच्या ठिकाणी राहण्याने प्रकृतीला फरयदा होईल असा वैद्यकीय सल्ला दिला. परंतु श्रीमंत राणी जमनाबाई व वाड्यांतील इतर आप्त यांना पुन्हा लग्न केल्याने महाराजांस आराम होईल असे वाटून त्या लोकांनी लग्नाची बोलणी सुरू केली. हो ना करता करता अखेर सयाजीरावांनी लग्नाला संमति दिली. या वेळी देवासच्या सरदार घाटग्यांची मुलगी गजराबाई ही निवडली जाऊन ता. २८ डिसेंबर १८८५ मध्येच हा द्वितीय विवाह उरकला. गजराबाई यांना चिमणाबाई हेच नांव मिळाले. परंतु विवाहाच्या उपायाने राजांची प्रकृतीमात्र सुधारली नाही. शेवटी सयाजीरावांनी परदेशांत जाण्याचा निर्णय घेतला. इ.स.१८८७ मध्ये ते पहिल्यांदा परदेशांत गेले. त्या वेळी त्यांना फायदा वाटला. याप्रमाणे महाराजांच्या परदेशयात्रा सुरू झाल्या, त्या पुढे नेहमीच्याच होऊन कधी प्रकृतीसाठी तर कधी ज्ञानलालसेने त्या वाढतच गेल्या. सयाजीरावांची वृत्ति चैनी, खुशालचेंडू किंवा उधळपट्टीची नव्हती. परदेशांत असतांनादेखील सतत त्यांच्या मनांत बडोद्याच्याच उत्कर्षाचा विचार चालू असे. युरोपातील उत्तम उत्तम गोष्टी बडोद्यांत कशा रुजवता येतील याचे ते चिंतन करीत. सुरूवातीस ते प्रवासाला अनाभिज्ञ असल्याने त्यांना प्रवासांत त्रास सोसावा लागला. पण जसजसे ते वारंवार परदेशांतून जाऊ येऊ लागले तसतसे अनुभवाने शहाणे होऊन त्यांना प्रवासाचा खरा फायदा घेणे शक्य झाले. पहिल्याप्रथम प्रवासास जातांना खूप लवाजमा घेण्यांत आला होता; परंतु त्याचा उपयोग न होता तो एक प्रकारे भारच ठरतो हे लक्षात आल्यावर लवाजमा कमी करण्यांत आला, आणि फक्त जरूर तेवढ्या ४ ते ६ इसमांनाच ते बरोबर नेऊ लागले. यामुळे प्रवास करणे सुटसुटीत व आटोपशीर झाले. पहिल्या प्रवासांत त्यांचा सारा मुदपाकखाना बरोबर

होता; त्याकरिता हिंदुस्थानांतून मागविलेल्या धान्ये, मसाले, लोणची, पापड, सरबते, मुरांबे, मुरावळे वगैरे जिनसांच्या लांबच लांब याद्या पाहिल्या की, त्यांच्या लवाजम्याच्या अवडंबराची कल्पना येते.

बडोद्याला पाणीपुरवठा

महाराजांना संपूर्ण अधिकारसूत्रे मिळाली, त्या वेळी दिवाणसाहेबांनी राज्यव्यवस्थेला शिस्त लावली होती. मल्हाररावांच्या कारकीर्दीतील बजबजपुरी नाहीशी करून प्रत्येक खात्याच्या कचेऱ्या वाड्यांतून काढून नव्या इमारतीत नेल्या. पूर्वीचे लोड, गाद्या, मेजे जाऊन खुर्च्या, टेबले आली. अधिकाऱ्यांच्या कामांची वाटणी करून तिला मर्यादा घातली. सुसूत्र व नियमबद्ध कारभाराची योजना केली. पण त्यांतहि सुधारणांना पुष्कळच वाव होता. चालू कारभाराची व्यवस्था म्हणजे लोकांच्या सुखाची सुधारणा नव्हे हे ध्यानांत घेऊन महाराजांनी आपले लक्ष प्रथम शहरांतील पाण्याच्या दुर्भिक्षाकडे वळविले. शहरांत पाण्याचा भरपूर पुरवठा नाही म्हणून स्वच्छता नाही आणि स्वच्छतेच्या अभावी रोगांचे प्राबल्य चालू, असे मनांत आणून महाराजांनी पाणीपुरवठ्यासाठी एक मोठा सरोवर 'सयाजी सरोवर' नांवाचा तलाव बांधला. त्याचे पाणी बडोद्याच्या नागरिकांना घरबसल्या मिळू लागले. यानंतर शेतीसाठी विहिरी बांधणे इत्यादि कामांचे स्वतंत्र खातेच उघडण्यांत आले.

बापट प्रकरण

कोणतीही सुधारणा म्हंटली की तिला द्रव्याचे पाठबळ पाहिजे व असे पाठबळ मिळण्याचे मुख्य साधन जो शेतसारा त्याची पाहणी करण्याचे महाराजांनी मनावर घेऊन ब्रिटीशांच्या इनाम कमिशनसारखे एक कमिशन ईलियट साहेबांच्या प्रमुखत्वाखाली नेमले. जहागिरी इनामांत जमीन विभागली गेल्यास राज्याची तिजोरी आटते :- यासाठी जहागिरी इनामे कितीशी कायदेशीर किंवा पायाशुद्ध आहेत, याची तपासणी करणे अवश्य होते. महाराजांच्या सिंहासनस्थ पूर्वजांनी लहरीप्रमाणे मर्जीच्या माणसांना इनामे बहाल करून वतनांची अंधेरनगरी वाढविल्याचा अनुभव महारातांना येत होता. वस्तुतः हे काम राज्याच्या अधिकारसीमेतील असूनहि ब्रिटीश अधिकाऱ्यांमध्ये पोटदुखी उत्पन्न झाली. ईलियट साहेबांवर महाराजांचा विश्वास हे या पोटदुखीचे मूळ कारण होते. ईलियट साहेबांना बडोद्याच्या कारभारांतून उठविण्याकरिता पोटदुखीच्या अधिकाऱ्यांची धडपड व कारस्थाने चालू होती. तिला हे कमिशन अस्तित्वांत येतांच अवकाश सापडला. ईलियट साहेबांच्या हाताखाली बापट आडनांवाचे एक गृहस्थ होते. ईलियट साहेबांचा त्यावर विश्वास होता. हे गृहस्थ कमिशनचे काम करतांना लाच खातात, अशा मतलबाचे अर्ज दिवाणांच्याकडे गुदरले जाऊ लागले. बापटांविरूद्ध तक्रार करणारे बहुसंख्य अर्जदार गुजराती व त्या वेळचे दिवाण मणिभाई जसभाई हे सुद्धा गुजराती. दिवाणाची रेसिडेंटाशी विशेष सलगी असल्याने या तक्रारींचा निकाल होण्यासाठी चौकशी-मंडळ नेमण्याच्या कल्पनेचे दडपण महाराजांवर पडत चालले. ईलियट साहेबांच्या एका पत्रावरून असे दिसते की, त्या कारस्थानाची चीड येऊन त्यांनी १८९४ मध्ये रजा घेतली व हे प्रकरण संपेपर्यंत ती वाढवीत नेली. त्यांच्या जागी

महाराजांनी दुसरा इंग्रज नेमला तरी बापट हे जाणते, मेहनती व प्रामाणिक म्हणून आपल्या जागी कायम राहिले. दिवाणांची बापटांबद्दल नाराजी वाढायला बापटांनी दिवाणांचे गैरशिस्त हुकूम ऐकले नाहीत, हे एक निमित्त झाले. ईलियट साहेब दिवाणसाहेबांच्या आज्ञा नियमबाह्य असल्याचे अनेक वेळा दाखवून देत असल्यामुळे दिवाणांची नाराजी आंतल्याआंत धुमसत राहिली. या प्रकारांना कंटाळून ईलियट साहेब रजेवर जातांच बापटविरोधी खटपट्यांना रान मोकळे सांपडले. शेवटी मुख्य काम बाजूस राहून बापट कमिशन या नांवाचे नवे प्रकरण उपस्थित होऊन त्याचा गवगवा माजला. बापट हे लोकमान्य टिळकांचे स्नेही. त्यांना बडोद्यांतून बाहेर गेल्याशिवाय गत्यंतर नाही, असे पटतांच चित्रशाळेचे कै. वासुकाका जोशी यांनी टिळकांतर्फे बडोद्यास जाऊन मोठ्या हिकमतीने बापटांना बडोद्याहून पळविले. हा मनोरंजक वृत्तांत कै. न. चि. केळकरांच्या टिळकचरित्रांत जिज्ञासूंना पाहता येईलः-

महाराजांना बरेच दिवस हे प्रकरण माहीत नव्हते. ते समजल्यावर त्यांनी चौकशी-मंडळाला अनुज्ञा दिली. मात्र चौकशी-मंडळासाठी महाराजांनी ज्या व्यक्तींची मागणी ब्रिटीशांकडे केली, ती मागणी त्यांनी धुडकावली. नंतर निराळ्या लोकांचे चौकशी-मंडळ नेमले जाऊन चौकशी सुरू झाली. उभय पक्षांतर्फे मुंबई हायकोर्टातील कसलेले कायदेपंडित काम चालवीत होते. चौकशी-मंडळाला फक्त शिफारशींचा अधिकार दिला होता. निकाल महाराजांनी आपल्या हाती राखला होता. बापट खटला गाजण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्यांत गुजराती विरूद्ध महाराष्ट्रीय असा देण्यांत आलेला रंग हे होय. या खटल्यांतील प्रांतीयतेच्या विषाचा महाराजांना खेद झाला. चौकशी-मंडळाने आपल्या अधिकाराचे उल्लंघन करून आरोपीला शिक्षा फर्मावली. हे चौकशीचे कागद निर्णयाकरिता महाराजांच्याकडे आले तेंव्हा त्यांनी न्यायमंत्री, नायब दिवाण व इतर तज्ज्ञ लोकांची सल्लामसलत घेतली. महाराज दिरंगाई करतात यासाठी त्यांच्यावर हिंदुस्थानसरकारकडून तगादा आणण्याचा प्रयत्न झाला. महाराजांनी या प्रकरणाचा पूर्ण विचारांती निर्णय देऊन बापट यांना निर्दोषी ठरविले. मात्र बापट-विरोधकांच्या समाधानासाठी त्यांना निवृत्त केले, तरी बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांना निवृत्तिवेतन दिले. रेसिडेंटाने आपला डाव फसल्याच्या तीव्र उद्वेगाने त्याचा सूड ईलियट साहेबांवर हिंदुस्थानसरकारामार्फत घेतला. ईलियट साहेबांना रजेवरून परत येतांच मुंबई बंदरावर तारेने बदलीचा हुकूम दिला. त्यांना बडोद्यास जाण्याला सवड ठेवली नाही किंवा या प्रकाराला महाराजांची संमति घेतली नाही.

महाराजांना अंतर्गत कारभारांत रेसिडेंटाने हस्तक्षेप केल्याचे आवडले नव्हतेच, पण त्यापेक्षा ज्याचे जास्त वाईट वाटले ते म्हणजे दिवाणांनी ही गोष्ट घडू दिली याचे. थोड्याच दिवसांत दिवाणांना बदलून त्या जागी मद्रासचे श्रीनिवास राघव अय्यंगार यांची महाराजांनी नेमणूक केली.

ईलियटबद्दल बेपर्वाई

बापट प्रकरण याप्रमाणे निकालांत निघाले, पण महाराजांच्या मनाला ते लागल्याचे त्यांच्या पत्रव्यवहारावरून आढळते. महाराजांवर मात करू पाहणाऱ्या रेसिडेंटाच्या कारवायांना आपले अंमलदार व प्रजा हे दोघेहि जबाबदार असल्याचे महाराजांच्या अनुभवास येऊन महाराज

उद्विग्न झाले. बंधु संपतराव, काजी शहाबुद्दिन यांना त्यावेळी लिहिलेल्या पत्रांतून महाराजांची पूर्वोक्त अस्वस्थ मनोवृत्ति दृष्टीस पडते. आपल्या संबंधात ब्रिटीश सरकारने स्वीकारलेल्या धोरणाबद्दल ईलियट साहेबांनी मुंबई सरकारला पत्र पाठवून तक्रार केली. सात महिने त्याची दादच घेतली गेली नाही व इतक्या दिरंगाईनंतर पाठविलेल्या उत्तराची काय स्थिति होती हे ईलियट यांच्या प्रत्युत्तरांतील पुढील मजकुरावरून ध्यानांत येईल. मुंबई सरकारला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात की, मला हिंदुस्थानांत येतांच तारेने बदलीचा हुकूम देण्यांत आला, परंतु त्यांत बदलीचे कारण देण्यांत आले नव्हते व आता जवळ जवळ सात महिन्यांनंतर कारण कळविण्यांत आले. हे खुलाशाचे पत्र देखील कचेरीची वेळ संपल्यानंतर व मी निवृत्त होईन अशी अटकळ बांधली होती त्या दिवशी माझ्या हाती पडले ! मला लिहिण्यांत आलेले कारण आणि बडोद्याच्या महाराजांना दिलेले कारण यांतले खरे कारण कोणते असा प्रश्न पडतो. माझ्यावर बापट-चौकशीत कांही आरोप करण्यांत आले. त्यांत प्रमुख म्हणजे मी बापट यांना सतत पाठिंबा दिल्यामुळे त्यांना लाचलुचपत चालू ठेवता आली. परंतु माझ्या कानावर लाचलुचपत चालू असल्याचे कोठूनहि आले नाही. आणि ते चौकशीतहि सिद्ध झाले नाही. महाराजांवर या प्रकरणांत हिंदुस्थानसरकारकडून दडपण आणण्याचा प्रयत्न झाला ही गोष्ट मला नामुष्कीची वाटते. महाराजांनी ताबडतोब चौकशी-मंडळाच्या शिफारशींना संमति दिली नाही म्हणून मला बडोद्याहून काढले. चौकशी-मंडळाचा अहवाल वाचून असे वाटते की, "महसूल खात्यांतील नोकर हे गुन्हेगार नसून ते त्या विरूद्ध रचलेल्या कटाचे बळी होत. बापट यांच्या विरूद्ध सादर करण्यांत आलेला पुरावा हा त्यांचा गुन्हा शाबीत न करता उलट त्यांचे निर्दोषित्वच दाखवितो." त्या पत्राला सरकारने उत्तर वगैरे कांही दिले नाही.

एका खेड्यांतला दंगा

याच संदर्भात पुढे घडलेला एक प्रसंग सांगण्याजोगा आहे. शेतसाऱ्याच्या वसुलीवरून एका ठिकाणच्या गांवकऱ्यांनी दंगा माजविला. साऱ्याची वसुली गैरकायदा आहे अशी गांवकऱ्यांची समजूत करून देणारे कांही गुजराती वृत्तपत्रकार आणि वकील होते. दंगा मोडण्यासाठी गोळीबार करण्याला ब्रिटीशांची परवानगी घ्यावी लागते व ब्रिटीश तशी परवानगी देणार नाहीत, अशा समजुतीची गांवकऱ्यांना चिथावणारांनी पुस्ती जोडली होती. त्यायोगाने गांवकरी जमाव करून हत्यारांनिशी बेगुमानपणे वागू लागले, पण लष्कराने गोळीबार केला तेंव्हा दंगा साफ थंडावला. ही हकीकत स्वतः महाराजांनी आपल्या मातुःश्रींना एका पत्राने कळविले आहे. यांत गुजराती-मराठा बेबनावाच्या अंधुक छटा दिसतात.

संस्थानिकांच्या अडचणींचे निवेदन

बडोदे संस्थान हे मुंबई इलाख्याच्या सरकारकडे असल्यामुळे मुंबईच्या गव्हर्नरांशी सयाजीराव महाराजांच्या गांठीभेटी व्हाव्या हे राज्यकारभाराचे एक अंग असले तरी महाराजांनी ज्या विषयी स्नेहबुद्धि बाळगून प्रसंगविशेषी आपले हृदयांतील ज्यांच्यासमोर निःसंकोच ठेवावे. अशा थोड्या गव्हर्नरांपैकी लॉर्ड रे एक गृहस्थ होते; त्यांना एका पत्रांत महाराजांनी संस्थानिकांना जांचणाऱ्या

नानाविध विघ्नांचा जो पाढा सादर केला तो बापट खटल्याच्या समारोपादाखल येथे भावार्थाने निवेदन करण्याजोगा आहे. एखाद्या प्रगतिशील उत्साही संस्थानिकाला प्रजेचे अज्ञान, प्रजेतील परंपरागत दुष्ट रूढींचा अभिमान, जाति व त्याची गुंतागुंत, संस्थानांतील वतनदारांची आणि सरकारदरकदारांची कारस्थाने, या अडचणींशी टक्कर देत प्रगतीची वाटचाल करावी लागते अशी स्थिति सांगून नंतर संस्थानिकाला ब्रिटीश सरकारचे रेसिडेंट आपल्या शिरजोरीने कसा पायबंद लावण्याचा प्रयत्न करतात, याचे चित्र महाराजांनी त्या पत्रांत रेखाटले आहे. वस्तुतः रेसिडेंटाने सहानुभूतिपूर्वक संस्थानिकाला त्याच्या सत्कार्यात साह्य करावयास पाहिजे त्या ऐवजी तो जर संस्थानिकाला पदोपदी कांही तरी कुरापती काढून आडवू लागला व त्यामुळे प्रगति थांबली तर त्याचे अनिष्ट परिणाम संस्थानिकांवर तर घडतातच, पण प्रजेतहि ते फैलावून राजा व प्रजा यांचे नाते बिघडते; इत्यादि आशय रे साहेबांना पाठविलेल्या पत्रांत आहे. ''प्रगतीच्या कांटेरी वाटेवरून जाण्याच्या उत्साहाने स्वतःला हैराण करून घेण्यापेक्षा बायका व दारू किंवा इतर व्यसनांत दंग राहणारे राजे जास्त सुखी होत'' असेहि विचार सोसाव्या लागणाऱ्या काचाच्या वैतागाने कधी कधी आपल्या विश्वासाच्या माणसापाशी महाराजांनी व्यक्त केल्याची उदाहरणे आहेत.

प्लेग-दुष्काळाचे जोड संकट

इंग्रज अधिकाऱ्यांनी उभारलेल्या बापट-प्रकरणाच्या कुभांडांतून सयाजीराव बाहेर पडतात न पडतात तोच प्लेग, दुष्काळ या दोन आपत्तींनी लोकांचा संहार आरंभला. प्लेगपेक्षा दुष्काळाचे स्वरूप फारच अक्राळविक्राळ होते. सरकारकडून करण्यांत येत असलेल्या दुष्काळ-निवारणाच्या अंमलबजावणीची पाहणी सयाजीराव स्वतः जातीने करत होते. शेकडो लोक प्लेग आणि दुष्काळ यांनी मेले. हे मृत्यूचे भीषण तांडव प्रत्यक्ष पाहावे म्हणून नवसारी प्रांताचे सुभे श्री. खासेराव जाधव यांनी महाराजांना तेथे बोलाविले, व महाराजांनी तिकडे प्रयाण केले. महाराज दौऱ्यावर निघाले ते दिवस एप्रिलचे असावेत. बरोबर एकटे खासेराव जाधव होते. सेक्रेटरी किंवा संरक्षक असे बरोबर कोणीच घेतलेले नव्हते. सुरतेहून रेल्वेमार्गाने सोनगडपावेतो व पुढे पन्नास-साठ मैल डोंगराचा जंगली मार्ग घोड्यावरून हिंडावयाचा अशी योजना होती. त्या उजाड जंगलात मुक्कामासाठी तंबू, त्यांतच भोजन, झोप इत्यादींची व्यवस्था होती. दिवसभर तीव्र उन्हाचा मारा विचारू नये असा असे. आंघोळीचे थंड पाणी सुद्धा हात भाजण्यासारखे तापत असे. अशा ठिकाणी पिण्याला थंड पाणी मिळावे म्हणून मुंबईहून बर्फ आणण्याची खास सोय महाराजांनी केलेली होती. मुंबईहून निघणारे बर्फाचे पार्सल सुरतेहून सोनगडला आणि तेथून पन्नास मैलपावेतो महाराजांच्या मुक्कामी रोज उंटावरून आणण्यांत येई.

महाराज व खासेराव रोज सकाळी सातच्या सुमारास न्याहारी वगैरे उरकून घोड्यावरून बाहेर पडत असत ते बारा-एक वाजेचावेतो सारखे हिंडत. मग मुक्कामावर आल्यावर आंघोळ, जेवण उरकत. एके दिवशी रस्त्याने ठिकठिकाणी पडलेल्या प्रेतांमधून मार्ग काढीत थकून गेल्यावर दोघेहि दोन प्रहरी स्नान-भोजनासाठी तंबूवर परतले. मेलेल्या माणसांचे सांपळे पाहून खासेरावांच्या डोळ्यांतून अश्रुधाऱ्या वाहू लागल्या. महाराजांची वृत्ति सहज भावनाविवश होणारी नव्हती.

आपले मन आवरून धरण्याची हातोटी महाराजांना साधली होती. कर्मधर्मसंयोगाने त्या दिवशी मुंबईचे बर्फाचे पार्सल वेळेवर आले नव्हते. महाराज स्नान करून जेवावयास बसले व खासेराव यांना भोजनाचे आमंत्रण दिले. पण डोके दुखत असल्याने आज जेवावयास नाही असा निरोप त्यांनी महाराजांना पाठविला. भोजनप्रसंगी पिण्याचे पाणी बर्फाखेरीज पाहून सयाजीराव संतापले. पाणी गार कां नाही असे विचारतांच नोकराने बर्फ आला नसल्याचे सांगितले. लगेच सयाजीरावांनी कागद-पेन्सिल घेऊन चिठ्ठी लिहिली की, बर्फ न येण्यामागे ज्याची चूक असेल त्यास शंभर रुपये दंड करावा आणि ती चिठ्ठी बजावणीसाठी खासेरावांच्याकडे पाठविली. म्हणून भोजनाच्या टेबलापासून तो निजण्याच्या पलंगापर्यंत किंवा इतर बसण्याउठण्याच्या जागी कोऱ्या चिठ्ठ्यांचे पुडके व दोरीने बांधलेला पेन्सिलाचा तुकडा सदैव ठेवण्याचा महाराजांचा रिवाज होता. रात्री अपरात्रीसुद्धा मनांत आलेला विषय टिपता यावा हा त्यांगील मुख्य उद्देश होता.

बर्फानिमित्त दंडाची चिठ्ठी पाहताच खासेरावांचा मनस्ताप कळसास पोचला. बाहेरून आल्यावर कपडे देखील न काढता तसेच तोंडावर हातरुमाल टाकून खासेराव अश्रु पुशीत पडले होते, ते तसेच उठले व रागारागाने महाराजांच्या तंबूत जाऊन त्यांना म्हणाले, ''लाज नाही वाटत तुम्हाला असले दंड करायला ? नसला बर्फ तर काय बिघडले ?'' मी हा कागद फाडून टाकतो.

सयाजीरावांनी अत्यंत शांतपणे व हळू शब्दांत खासेरावांनी सांगितले की, खासेराव, असे संतापू नका. ''त्या मेलेल्या माणसांबरोबर आपल्याना नाही ना मरावयाचे? आपण जगू तर मरणाच्या दारी पोचलेल्या दुष्काळपीडीतांना वाचवू. आपण कितीही आक्रोश केला तरी मेलेली माणसे कांही उठणार नाहीत. कागद फाडू नका. बजावणीसाठी तो पुढे पाठवा.''

सयाजीराव हे स्वतःचे कर्तव्य बजावण्यांत जितके दक्ष असत तितकेच दुसऱ्याने असावे असा त्यांचा कटाक्ष होता. कामचुकाराला क्षमा होत नव्हती. प्रत्येकाने आपले कर्तव्य करावे हेच त्यांचे सर्वांच्या बाबतीतले धोरण. प्रजेची स्थिति अवलोकन करण्यासाठी ते कोणतेहि कष्ट करण्यांस तयार असत.

राज्यसुधारणा

महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेतल्यापासून (इ.स.१८८१) राज्यांतील निरनिराळ्या बाबतीत जातीने लक्ष घालून सर्वांगीण सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. पहिल्याप्रथम राज्यकारभार सुधारण्यासाठी खटपट केली. इंग्रज लोकांचा लौकीक या बाबतीत विशेष आहे. मुंबई मद्रास व कलकत्ता हे तीन प्रांत राज्यकारभारांत अग्रेसर म्हणून गाजलेले. तेंव्हा महाराजांनी आपले लोक या सरकारांच्याकडे राज्यकारभाराची पाहणी करण्यासाठी पाठविले आणि तसेच या प्रांतातून राज्यकारभारांत निष्णात असलेले इंग्रज लोक संस्थानांत नोकरीवर घेतले. शिवाय सर्वसामान्य सरकारी नोकर हा जर अडाणी असेल तर राज्यकारभार नीट होणे कठीण जाते यासाठी त्यांनी सरकारी नोकरीत येणाऱ्या लोकांसाठी राज्यकाराभाराच्या मूळ तत्वांचे शिक्षण देणारे वर्ग काढले. राज्यांतील वरिष्ठ अधिकारी नेमतांना त्यांच्या लायकीवर भर देण्यांत येऊ लागला. याचे एक उदाहरण येथे नमूद करण्यासारखे आहे. एकाने आपल्या नोकरीची मुदत इतरांहून मोठी (Seniority) म्हणून बढतीचा अर्ज केला त्यावरील हुकुमाच्या टिपणांत महाराजांनी नोकरीची

मुदत ठरविणे कठीण असल्याचे मान्य करून ज्याचे काम चोख तो लायक अशी स्थूल व्याख्या मांडली. लायकीला बढती मिळेल, केवळ नोकरीची मुदत विचारात घेतली जाणार नाही, असा शेरा मारून बढतीचा अर्ज झिडकारला. अशा मासल्याचे वेळोवेळी महाराजांनी आपले राज्यकारभाराबद्दलचे विचार लिहिलेले असून या संभाव्य आज्ञापत्रांची संख्या खूप मोठी आहे. आपापल्या कामाच्या उत्तम ज्ञानाचे व दक्ष अधिकारी आणि राज्यकार्यपटु असे प्रख्यात दिवाण, त्यांच्या कामावर बारीक देखरेख ही महाराजांच्या यशाची गुरूकिल्ली होती.

आपल्या मनांतील प्रत्येक महत्वाचा विचार विसरून नाहीसा होऊ नये याकरिता महाराजांनी चिठ्ठ्यांची योजना केली होती. हे कागद सर्वत्र ठेवलेले असत. रात्री देखील आलेला विचार झोपेत गडप होऊन जाऊ नये म्हणून ते तो विचार लिहून टाकीत. याच कागदांच्या चिठ्ठ्यांना हुजूर हुकूमांचे जूथ असे नांव होते. पुष्कळदा तोंडी हुकूम दिल्याने विपर्यास होण्याची शक्यता असते, नाही तर विसरण्याची शक्यता असते. हे घडू नये म्हणून ही योजना केली होती. प्रत्येक खात्याने दरवर्षी आपल्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर करावे असाहि त्यांनी बंदोबस्त केला. या पद्धतीने वर्षात काय काय करायचे आहे. त्याला किती खर्च होणार हे पटकन समजे, व जे कोणी अंदाजरपेक्षा जास्त खर्च करीत त्याबद्दल महाराजंना जाब द्यावा लागे. महाराजांचे काटकसरीकडे किती लक्ष होते याचे एक उदाहरण त्यांनी आपल्या मातुःश्री जमनाबाई यांना लिहिलेल्या पत्रांत आहे, राणीसाहेबांच्या खर्चीकपणाला सुमार नव्हता. बहुधा त्यांना कर्ज काढावे लागे व मग त्याबद्दल मुलास लिहित, ''आपल्या पत्रांत खर्चाचा विषय नेहमीप्रमाणे असेल हा अंदाज सुद्धा खरा ठरला.'' अशा अर्थाची सौम्य कोपरखळी मारून पुढे महाराजांनी मातुःश्रींच्या द्रव्यमागणीचा विचार केला आहे. जमनाबाईंनी एक देऊळ बांधण्याचे काम हाती घेतले होते व त्याला पुरेसा पैसा त्यांजवळ नव्हता, म्हणून मुलाकडे शब्द टाकावा लागला. देवळे बांधणे हे पुण्यकृत्य या नांवाखाली स्वार्थी माणसे भाविकांना पैसे खर्चायला भाग पाडतात. भाविकांनी पुण्यकृत्याची इष्टनिष्टता, आवश्यकता वगैरे गोष्टींचा नीट विचार करून मग त्याकडे वळावे, नाही तर पैशाप्रमाणे पुण्यकृत्यहि वाया जाते, असा आशय अतिशय जपून त्या पत्रांत महाराजांनी व्यक्त केला आहे.

राज्यांत आकारावयाच्या कराबद्दल महाराजांचा विशेष कटाक्ष असे. प्रजेवर जबर कर बसविले म्हणजे राज्याचे उत्पन्न अधिक येऊ शकते हे खरे पण ही कल्पना त्यांना मान्य नव्हती. ते तिला भ्रामक समजत. प्रजेचे कर देण्याचे सामर्थ्य व तिच्यापासून तो वसूल करण्याची सुव्यवस्था यांवरच करवसुली अवलंबून राहते. जबर कर बसविल्याने कागदोपत्री राज्याचे उत्पन्न फुगलेले दिसले, तरी त्याचा आकार एखाद्या सूज आलेल्या शरीराप्रमाणे असतो. त्यांत सत्त्व नसते. कारण त्या करांचा बोजा प्रजेच्या सहनशक्तीच्या बाहेर असल्याने वसुली होणे कठीण जाते. त्याचप्रमाणे कर कागदोपत्री माफक ठेवलेले असले तरी त्याच्या वसुलीच्या पद्धतीत सुव्यवस्था व एकसूत्रीपणा असल्याशिवाय त्या बाबतीत प्रजेला सुरक्षितपणा वाटत नाही. याचा परिणाम असा होतो की, प्रजेस ते कर देण्याचे सामर्थ्य असले तरी ते देण्याची इच्छा होत नाही हे जाणून त्याप्रमाणे महाराजांनी सुधारणा केली.

सामाजिक सुधारणा

एकीकडे राज्यकारभारांत सुधारणा चालू असतांना शिक्षण, विधवाविवाह, बालविवाह-प्रतिबंध, घटस्फोट, धार्मिक कृत्यांची कपात. पुरोहितांच्या ज्ञानाची किमान इयत्ता वगैरेंकडे महाराजांनी दृष्टी फेकली, बालविवाहाची पद्धत हिंदुस्थानांत सर्वत्रच होती. त्याचे दुष्परिणाम माहीत झाल्यावर ही पद्धत मोडण्याचा कायदा केला. मात्र कायद्याची अंमलबजावणी कडक केली नाही. त्यामुळे तिच्या विरूद्ध चळवळ वगैरे न होता हळूहळू समाजांत कायद्यांना संमति मिळाली, आणि सुधारणा अंगवळणी पडली.

बडोद्यांतील खिचडी व ग्यारमी पद्धत फार प्रसिद्ध होती. ह्या खिचडीचा व ग्यारमीचा उगम दुष्काळांत झाला. खिचडी हिंदूंना व ग्यारमी मुसलमानांना दिली जात असे. खंडेराव महाराजांनी ही पद्धत सुरू केली. परंतु पुढे त्यावर खर्च अफाट वाढला. सयाजीराव महाराज गादीवर आले तेंव्हा खिचडीवर हजारो रुपये खर्च होत असत. महाराजांनी प्रथम या खर्चाला आळा घालण्याकरिता खिचडीसाठी येणाऱ्या लोकांच्या गरजूपणाबद्दल चौकशी सुरू केली व योग्य ठरणाऱ्या इसमांनाच खिचडी देण्याचा प्रघात सुरू केला. नंतर कोरडा शिधा व मागाहून रोकड असा फेरफार केला. पुढे यांवर नियंत्रण वाढवून हा खर्च सात ते आठ हजारांवर आणला. खिचडीवर निर्वाह करणारी माणसे थोडीशी साक्षर व देहाने धड असतील तर महाराजांनी त्यांच्याकडून दप्तरांतील कागदाच्या याद्या करणे यासारखी हलकी कामे करवून घेण्याचा परिपाठ सुरू केला. ऐतखाऊ कामचुकारांना यापुढे साहजिकच खिचडीचा मार्ग सोडणे भाग पडून हा खर्च कमी होत गेला. आता तो संपुष्टांत आलेला आहे.

श्रावणांत ब्राह्मणांना जी दक्षिणा वाटली जात असे, ती येईल त्या ब्राह्मणांना देण्याऐवजी निरनिराळ्या जुन्या शास्त्रांच्या परीक्षा घेऊन त्यांत जे उतरतील त्यांनाच दक्षिणा द्यावी, अशी महाराजांनी नवी पद्धत सुरू केली. पूर्वी दक्षिणा देण्याचा प्रकार निराळा व हिशेबाच्या दृष्टीने गुंतागुंतीचा होता. त्याला आळा घालून दक्षिणेची वांटणी ज्या वर्षीची त्या वर्षी निकालांत काढावी असा महाराजांनी निर्बंध घातला. पुरोहित कायदा करण्यामागे पुरोहिताच्या कामाला अवश्य असणाऱ्या त्या मंत्रतंत्राचे ज्ञान असले पाहिजे हा हेतू होता. अवश्य त्या मंत्रतंत्राची परीक्षा द्यावी परीक्षेत उतरल्याचे प्रशस्तिपत्र घ्यावे आणि मग पुरोहिताचा व्यवसाय आरंभावा, अशा तऱ्हेचा तो कायदा होता. देवस्थानांच्या उत्पनाचा अनैतिक विनीयोग होऊ नये म्हणून देवस्थानच्या नियंत्रणाचा महाराजांनी कायदा अंमलात आणला. महाराजांनी वेदोक्ताचा अंमल अशा कौशल्याने केला की त्याचा मुळीच बभ्रा झाला नाही.

कर्झन व महाराज

दुष्काळनिवारणाचा बंदोबस्त चालू असतां कर्झनसाहेबांना महाराजांविषयी अढी वाढविणारा एक प्रसंग घडला. राणी चिमणाबाईसाहेबांना कांही दुखणे जडले व त्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी महाराज विलायतेस गेले. महाराज परदेशांत पोहोचल्यावर कर्झन साहेबांचे पत्र आले की, दुष्काळनिवारणाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आपण येत आहोत; या वेळी महाराजांनी हजर

असावे. हे पत्र आणि कर्झनसाहेबांच्या दौऱ्याची माहिती विलायतेत समजल्यावर महाराजांनी दिवाणांना कर्झनसाहेबांची उत्तम बडदास्त ठेवण्याचा हुकूम दिला. महाराणी आजारी असल्याने स्वतः येत नसल्याचे कळविले. कर्झनसाहेबांना गुजरात राज्यांतील दौऱ्याच्या वेळी महाराज हजर नसल्याची गोष्ट झोंबली. दिवाणांनी बडोदे स्टेशनवर कर्झनसाहेबांचा योग्य प्रकारे सत्कार केला. यानंतर परत गेल्यावर कर्झनसाहेबांनी एक फतवा काढला, तो 'कर्झन सर्क्युलर' या नावांने प्रसिद्ध आहे. या फतव्याप्रमाणे देशी संस्थानिकांना परदेशांत जाण्यापूर्वी व्हाइसरॉय यांची परवानगी घ्यावी लागणार होती. ही योजना संस्थानिकांचा अपमान करणारी होती. या आदेशाचा रोख बडोद्याच्या महाराजांवर असल्याचे 'लंडन टाइम्स' च्या सिमल्याच्या बातमीदाराने पाठविलेल्या मजकुरावरून दिसते. त्या वृत्तपत्राच्या २५ ऑगस्टच्या अंकात खालील मजकूर प्रसिद्ध झाला. बडोद्याचे गायकवाड व कपुरथाळयाचे महाराज यांना आपल्या संस्थानचा कारभार दिवाणांवर सोपवून वारंवार युरोपास जाण्याची चटक लागली आहे. त्यांच्यावर या सर्क्युलरचा चांगला परिणाम होईल. महाराजांचा इंग्लंडमध्ये याच सुमारास सत्कार झाला, त्या वेळी सयाजीरावांनी राजनिष्ठा व्यक्त केली. परंतु ॲंग्लो-इंडियन वृत्तपत्रांची आगपाखड थांबली नाही. कर्झनसाहेबांच्या या सर्क्युलरवर खुद्द बादशहा नाखूष असल्याने त्याची अंमलबजावणी झाली नाही.

लॉर्ड कर्झन साहेबांना साम्राज्याचा फार दिमाख. राणी व्हिक्टोरिया १९०१ च्या प्रारंभी मृत्यु पावल्या व त्यांचे थोरले चिरंजीव एडवर्ड हे बादशहा झाले. या घटनेचा फायदा घेऊन कर्झन साहेबांनी बादशहांच्या शुभचिंतनाचा दरबार भरविण्याची तयारी केली, पण या वेळी हत्तीवरून मिरवणूक काढण्याचा बूट निघाला व त्याप्रमाणे सर्व संस्थानिकांना पत्रक पाठवून त्यावर त्यांचे प्रांजल मत विचारले. ही गोष्ट सयाजीरावांना पसंत न पडून त्यांनी तसे स्पष्ट कळविले. याचा इंग्रज सत्ताधिकारी लोकांनी विपर्यास केला की, महाराजांना बादशहांबद्दल आदर नाही. याशिवाय दरबारप्रकरणी बडोदेकरांचा आणि व्हाइसरॉय यांचा खटका उडाला. तो म्हणजे राजेरजवाड्यांच्या बरोबर दिल्ली-दरबारास येणाऱ्या त्यांच्या नोकरांचा पोशाख लाल रंगाचा नसावा. शेवटी सार्वभौम सत्तेपुढे महाराजांना नमते घेणे भाग पडले तरी त्यांनी आपले मत स्पष्टपणे मांडण्याचे कर्तव्य बजावले. महाराजांचा हिंदुस्थान सरकारच्या अधिकारी वर्गाबरोबर कांही ना कांही गोष्टींवरून झगडा चालू असे. त्यांतलेच इम्पीरीअल सर्व्हिस ट्रुप्स 'इम्पीरीअल सर्व्हिस ट्रुप्स' योजनेवर बडोदे दरबारने हिंदुस्थान सरकारला पत्र लिहून त्यांतील संस्थानिकांच्या स्वातंत्र्याला व स्वाभिमानाला धक्का देणारे दोष दाखविले. संस्थानिकांचे लष्कर आपले समजून त्याला शिक्षण द्यावे, विश्वासांत घ्यावे, म्हणजे संस्थानिकांवर निराळया फौजेचा खर्च पडणार नाही, हे महाराजांच्या विचाराचे मुख्य सूत्र होते.

व्हाइरॉय कर्झन याचे सामान्य जनतेला जोराचा धक्का देणारे कृत्य म्हणजे बंगालची फाळणी हे होय. बंगालच्या फाळणीने देशांत क्रांतीचे वारे संचारले. ठिकठिकाणी क्रांतिकारक संस्था स्थापन होऊन त्यांतून कांही इंग्रजांचे खून झाले. या राजद्रोही लोकांवर देशी संस्थानिकांनी काय उपाययोजना केली आहे अशी पृच्छा भारत सरकारने केली. या प्रश्नाला बडोदे दरबारने जे उत्तर पाठविले त्याचा विपर्यास करण्यांत आला; व महाराज राजद्रोही असल्याचे प्रच्छन्नपणे

बोलले जाऊ लागले. ''संस्थानाविरूद्ध राजद्रोह नाही ब्रिटीश राज्यकर्त्यांविरूद्ध असलेल्या असंतोषाची कारस्थाने जर संस्थानी हद्दीत चालू असतील तर त्यांची चौकशी होत आहे. असंतोष हा शिक्षणाचा स्वाभाविक परिणाम असल्याने राज्यकर्ते व प्रजा यांचे हितसंबंध समरसतेचे असले पाहिजेत. असंतोषावर आपसांतील हितसंबंधाची एकवाक्यता हाच एक रामबाण उपाय आहे.'' महाराजांच्या विचारसरणीच्या प्रस्तुत सारांशातील कोणत्या वाक्यांचा ब्रिटीशांच्या गोटांत विपर्यास करण्यांत आला असेल हे चाणाक्ष वाचकांना सांगायला नको.

रमेशचंद्र दत्तांची नेमणूक

इ.स. १९०४ साली महाराजांनी सारावसुली खात्याचे कमिशनर (रेव्हेन्यु कमिशनर) म्हणून रमेशचंद्र दत्त यांची नेमणूक केली. महाराजांनी १८९५ साली रमेशबाबूंकडे बडोद्यास येण्याबद्दल बोलावणे पाठविले होते, पण १९०४ मध्ये तसा योग आला. रमेशचंद्र दत्त हे ब्रिटीश राज्याचे पेन्शनर, तेंव्हा त्यांना संस्थानांत नेमणे आक्षेपार्ह मानून ताबडतोब ब्रिटीश सरकारतर्फे महाराजांना याबद्दल जाब विचारला गेला. महाराजांनी पूर्वीचे करार दाखवून इंग्रज किंवा परदेशी माणसाच्या नेमणुकीला परवानगीची अट आहे; परंतु ब्रिटीशांच्या नोकरीतील कुठल्याहि भारतीयाला संस्थानी नोकरीत घेण्यास कोणताच प्रत्यवाय नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आणले. शिवाय कराराप्रमाणे एखाद्या युरोपिअनाने बडोद्याच्या नोकरीत असतांना जर कांही गुन्हा केला तर त्याला शिक्षा करण्याचा संस्थानिकाला अधिकार असल्याचे लिहून कळविले. या उत्तरानंतर इंग्रज सरकार गप्प बसले व रमेशचंद्र संस्थानच्या कारभारांत शिरले. या वाटाघाटीत १८४० च्या सुमारास घडलेली एक गोष्ट संस्थानातर्फे उघड करण्यांत आली आहे. त्या वेळी जेम्स आउटरॅम हे रेसिडेंट होते. त्यांच्याकडे एका इंग्रज इसमाला संस्थानाच्या नोकरीत घेण्याबद्दल संस्थानातर्फे परवानगी मागितली असतां संस्थान व इंग्रज यांचा दोन पिढ्यांचा दाट सलोखा ध्यानांत घेता अशी परवानगी मागण्याचे कलम बाद (Nugatory) झाले आहे. इंग्रजाला बेधडक नोकरीस ठेवा, असे आउटरॅमसाहेबांनी संस्थानास कळविले. १८४० नंतर ६० वर्षांमध्ये ब्रिटीश धोरणांत झालेला फरक रमेशचंद्रांच्या प्रकरणांत दिसतो.

श्री. रमेशचंद्र दत्त यांनी बडोद्याच्या कारभारांत आल्यावर न्याय खाते व अंमलबजावणी खाते यांची फारकत केली व जी गोष्ट इंग्रजांना अंमलात आणता आली नाही ती दत्तबाबूंनी वेळ न दवडता करून दाखविली. या सुधारणेची दखल ब्रिटीश पार्लमेंटमध्ये घेण्यांत आली होती.

आणखी कित्येक सुधारणा

सक्तीचे मोफत शिक्षण, पुनर्विवाह, बालविवाह-प्रतिबंध इत्यादि गोष्टी बडोदे राज्यांत केल्याने महाराजांचा सगळीकडे बोलबाला झाला. शिवाय वाचनालये, फिरती कोर्टे, वगैरे सुधारणांनी जनतेला त्यांनी सुखी केले. सयाजीराव महाराजांची ही लोकप्रियता अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या हृदयास झोंबू लागली. महाराजांच्या कर्तबगारीवर बिब्बा कसा चोळता येईल, यांची संधि मिळण्यासाठी ते टपून बसले होते. अनायासे संधि न मिळाल्यास संधि उत्पन्न करावी, अशा इराद्याने त्यांनी राजद्रोही संस्था व माणसे यांना आश्रय दिल्याचा महाराजांवर आरोप ठेवून

पाहिला. हा आरोप ते सिद्ध करू शकले नाहीत. याचे एक महत्वाचे कारण म्हणजे या वेळी दिवाणपदी सेडन साहेब होते, आणि महाराजांचा जास्त काळ परदेशांत जात होता. शेवटी १९११ च्या बादशाही दिल्लीदरबारने महाराजांविरूद्ध किटाळ उठवायला अशा अधिकाऱ्यांना संधि दिली.

बादशाही दिल्लीदरबार व महाराज

इ.स.१९०७ मध्ये महाराजांची रौप्यज्युबिली बडोद्यांत मोठ्या थाटाने साजरी झाली. इ.स.१९१० मध्ये बादशहा एडवर्ड परलोकवासी होऊन पंचम जॉर्ज हे बादशहा झाले. राज्यारोहणाच्या समारंभाला बोलावणे आल्यावरून महाराज विलायतेस गेले. परत येतांना ते फ्रान्समार्गे आले. या समारंभानंतर १९११ च्या अखेर हिंदुस्थानांत बादशहांनी येऊन येथे आपल्या राज्यारोहणाच्या दरबार भरविण्याचे ठरविले. इंग्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशहा भारतांत प्रथमच येणार असल्याने या दरबाराला विशेष महत्त्व साहजिकच चढले. भारतांतील राजेरजवाडे फार मोठ्या संख्येने दिल्लीस हजर राहिले.

आदल्या दिवशी दरबाराची जी रंगीत तालीम झाली तिच्यांत भाग घेण्यासाठी महाराजांनी आपले बंधु श्री. संपतराव यांना पाठविले होते. दरबारचा दिवस उजाडला. सर्व राजेरजवाडे व आमंत्रित पाहुणे आपापले भरजरी पोषाख आणि बहुमोल अलंकार वाटून दरबारच्या मंडपांत हजर झाले. दरबबारला कै. पं. मोतीलाल नेहरू यांना आमंत्रण असल्याने तेहि गेले होते. मंडपात महाराज व पं. मोतीलाल नेहरू यांचा दरबार सुरू होण्यापूर्वी आपसांत सुखसंवाद चालू होता.

बादशहा येण्याची वेळ होतांच सर्वजण आपापल्या जागी जाऊन बसले. बादशहा आल्यावर कार्यक्रमाला सुरूवात झाली. प्रथम जाहीरनामा वाचण्यांत आला आणि व्हाइसरॉय व सेनापति यांनी मुजरे केले. त्या मागून संस्थानिकांनी मुजरे केले. महाराजांचे नांव पुकारतांच महाराज पुढे जाऊन त्यांनीही मुजरा केला, पण मागे येतांना ते अडखळले, कोठे जावे हे समजेना. जाण्याचा मार्ग विचारण्यासाठी ते पाठमोरे (बादशहाकडे पाठ केली) झाले आणि चौकशी करून आपल्या जागी गेले. सर्वांचे मुजरे झाल्यावर समारंभ संपला.

नित्याप्रमाणे महाराज दुसऱ्या दिवशी सकाळी फिरावयास गेले असतांना त्यांनी मुंबईच्या गव्हर्नरांना भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु गव्हर्नरांनी भेट दिली नाही; असेच वर्तन आणखी कित्येक बड्या इंग्रज प्रस्थांनी महाराजांशी केले. तरी देखील आपल्याकडून कांही अक्षम्य गुन्हा घडल्याची महाराजांना जाणीव नव्हती. त्याच दिवशी दुपारी चार वाजण्याच्या कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखले महाराजांना भेटून त्यांनी व्हाइसरॉयसाहेब रागावले असल्याचे सांगितले व त्या रागाचे कारण म्हणजे महाराजांनी पाठमोरे होऊन बादशहाचा अपमान केला, वगैरे खुलासा महाराजांच्या कानावर घातला. नामदार गोखले यांनी महाराजांना असा सल्ला दिला की, माफी मागितल्याखेरीज गत्यंतर नाही. महाराजांच्या ठिकाणी अपमानाच्या गुन्हेगारीचा गंधहि नव्हता. ना. गोखले यांनी मध्यस्थीची तयारी दाखविली. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून महाराजांवर टीका प्रसिद्ध झाली. शेवटी महाराजांनी व्हाइसरॉय याजकडे पत्राद्वारे झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली, माफी लिहून दिली. व्हाइसरॉयांनी महाराजांच्या दिलगिरीवर हे प्रकरण निकालांत

काढले. पण महाराजांना याहून कांही तरी जास्त जबर शिक्षा व्हावयास हवी होती, असे वाटणाऱ्या बड्या ब्रिटीश अधिकाऱ्यांनी महाराजांशी सलोख्याचे संबंध तोडून-एक प्रकारे वाळींत टाकून स्वतःचे समाधान करून घेतले. यामुळे महाराजांना पुढे थोडी वर्षे उद्वेगजनक स्थितीत पण अत्यंत सावधपणाने काढण्याची पाळी आली.

पं. मोतीलाल नेहरू यांनी त्यांचे चिरंजीव पं. जवाहरलाल नेहरू यांना दरबारानंतर ता. २२ डिसेंबरला जे पत्र लिहिले त्यांत दरबारांतील महाराजांच्या वर्तनाचे वर्णन देऊन त्यावर टीका केली आहे. शेवटी महाराजांना माफी मागावी लागली या समजुतीचाहि तेथे निर्देश आहे. दरबार व दिलगिरी यांतील कालावधि अगदी थोडा आहे. माफी मागण्याची गरज नव्हती. गोखल्यांच्या भिडेला बळी पडून ती मागितली, असे कित्येकांचे मत आढळते. वस्तुतः अशा दिलगिरीच्या अभावी महाराजांचा कोणत्या प्रकारे किती छळ झाला असता त्याचा विचार केल्यास दिलगिरी दर्शवून हे प्रकरण मिटवून महाराजांनी शहाणपणाच केला असे दिसून येते. महाराजांच्या वागणुकीकडे साशंकवृत्तीने पाहण्याचे ब्रिटीश अधिकाऱ्यांचे धोरण कोणत्या बालिश थरापर्यंत पोचले होते याची गंमतीदार हकीकत टॉटमहॅम बाईने लिहिलेल्या पुस्तकांत आढळते. परंतु महाराजांनी आपली धीरगंभीर वृत्ति सोडली नाही. राज्यशकट पूर्वीप्रमाणे चालू ठेवला. आपण कितीहि चांगले वागलो तरी इंग्रजांच्या साम्राज्यशाही धोरणांत बदल होणार नाही ही गोष्ट महाराजांच्या मनांवर या प्रसंगातील अनुभवामुळे जास्त भक्कम ठसली.

दरबार प्रकरणाचा अधिक विचार

महाराजांच्या दिलगिरीला नुसती माफी नव्हे तर दीनत्वाची साक्ष ठरवून जो गवगवा कांही काळ माजला होता, त्याचा खोलांत जाऊन विचार केला तर ज्यांच्याकडे दिलगिरीचे पत्र पाठविले ते लॉर्ड हार्डिंग यांनीसुद्धा आपल्या मनात कांही भ्रम बाळगल्याचा पुरावा आढळतो. त्यांच्या आठवणींचे एक पुस्तक प्रसिद्ध आहे. त्यामध्ये त्यांनी महाराजांकडील पत्र दरबारानंतर एका आठवड्याने आले, असे म्हंटले आहे. दरबार १९११ डिसेंबरच्या १२ तारखेला झाला व महाराजांनी आपले पत्र ता. १४ ला पाठविले. अर्थात हार्डिंग साहेबांचा आठवडा निराधार ठरतो. आपण पत्रापूर्वीच्या आठवड्यांत कसे वागलो हा मजकूर तर मोठ्या दिमाखाचा आहे. हार्डिंग लिहितात, महाराजांच्या दोषाबद्दल काय प्रायश्चित्त योजले आहे? असे मला दरदिवशी अनेकजण विचारीत. मी त्यांना सांगे की, थोडी कळ सोसून काय होते ते पहा. महाराजांनी या मुदतीत वारंवार भेटीची इच्छा दर्शविली; मी ती प्रत्येक वेळा झिडकारली. मग आठवड्याने पत्र आले; ता. १२ व १४ यामध्ये एकच दिवस असल्याने वारंवार केली जाणारी भेटीची याचना ही केवळ खोट्या बढाईची कल्पित कथा आहे, याबद्दल संशय उरत नाही. आपण सेवानिवृत्त होण्याचे दिवस जवळ आले तेंव्हा महाराजांच्या विनंतीवरून मी त्यास दिल्लीस बोलावून भेट घेतली, अशी हार्डिंग साहेबांची आणखी फुशारकी आहे तीहि वरील मासल्याचीच आहे.

टॉटन हॅमबाईंच्या पुस्तकांत आलेली हकीकत निराळ्या स्वरूपाची आहे. महाराजांच्या दरबारांतील वागणुकीत हार्डिंग साहेबांना प्रारंभी मुळीच दोष नाही असे वाटत होते. जेंव्हा दोषाची कटकट कित्येक अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे चालविली तेंव्हा ते महाराजांची बाजू घेऊन बोलत होते; पण

बडोद्याच्या रेसिडेंटाने आपल्या पोटांतील विष ओकून हार्डिंग साहेबांचे मन बिघडविले. बडोदे म्हणजे राज्यद्रोह्यांचे माहेरघर आणि महाराज ह्यांचे आश्रयदाते हा अनुभव बडोद्याबाहेरच्या लोकांना कळणे कठीण आहे, असे रेसिडेंटाने सांगितले. टॉटनहॅमला ही माहिती पुरविणारा हार्डिंगचा चिटणीस होता-महाराजांच्या भेटीविषयी तिने म्हंटले आहे की, एकदा महाराज मसूरीला व हार्डिंगजवळच डेहराडूनला असा योग आला तेंव्हा महाराजांनी त्याला भेटण्याची इच्छा दर्शविली व ती लाथाडली गेली. ह्यानंतर पुनः महाराज भेटीच्या नादांत पडले नाहीत. हार्डिंगच्या स्मृतिपुराणांतील भेटीची कथा टॉटनहॅमच्या सदर वृत्तान्ताने साहजिकच लटकी पडते.

महाराजांबद्दलच्या ब्रिटीश किल्मिषाचा स्फोट

इ.स.१९१४ ते १९१८ च्या पहिल्या महायुद्धांत ब्रिटीशांना जेवढी मदत देणे शक्य होते, तेवढी सयाजीरावांनी मदत केली आणि राजनिष्ठा दाखविली. परंतु अँग्लो-इंडियन समाज व बरेच सरकारी अधिकारी यांच्या मनांतील महाराजांविषयीच्या रागाला उतार पडला नसल्याची या काळांतील उदाहरणे सापडतात. महाराजांचे चिरंजीव जयसिंगराव यांचा जर्मनीत (१९२३) अचानक मृत्यु होऊन 'गायकवाड यांचे निधन' अशी अगदी मोघम स्वरूपाची बातमी प्रसिद्ध झाली. ताबडतोब बऱ्याच अँग्लो-इंडियन व लंडनमधील वर्तमानपत्रांनी महाराजांचा फोटो घालून त्यांच्याबद्दल मृत्युलेख लिहून टाकले. लंडन टाईम्सने जो लेख लिहिला तो इंग्रजी लोकांची वृत्ति दाखविणारा असल्याने वाचनीय आहे. हा लेख ता. २८ ऑगस्ट १९२३ च्या अंकात प्रसिद्ध झाला. या लेखाच्या सुरुवातीला महाराजांची स्तुति आहे, पण टाईम्सकारांचे खरे हृद्गत पुढे प्रगट झाले आहे, ते असे-'ज्या समस्या ब्रिटीशांना आपल्या राज्यकारभारांत सोडविता आल्या नाहीत त्या महाराजांनी केंव्हाच सोडवून टाकल्या यावर महाराजांचे भक्त भर देतात. परंतु यामुळे ते इतर हिंदी राजांहून राज्याबाहेर जास्त दिवस काढतात हेच दृष्टोत्पत्तीस येणारे आहे. राज्यकारभारांतील समस्या सोडविणे व परदेशांत राहाणे यांचा परस्पर संबंध काय? एकदा तर त्यांनी सतत दोन वर्षे परदेशांत घालविली. ते न चुकता प्रत्येक वर्षाचा मोठा भाग परदेशच्या प्रवासांत दवडतात किंवा उटकमंड येथे खर्च करतात. कर्झन साहेबांनी राज्याबाहेर राहण्याचे दुष्परिणाम दाखवून सार्वभौम सत्तेच्या परवानगीखेरीज परदेशी जाऊ नये अशा अर्थाचे जे गाजलेले फर्मान काढले, ते बडोदे महाराजांना उद्देशून काढलेले असेल किंवा नसेल, पण ते या महाराजांना अगदी उत्तम रीतीने लागू पडणारे होते यांत शंका नाही.

महाराज व सार्वभौम सत्ताधारी यांचे आपसांतील संबंध जेवढे सलोख्याचे असावे तेवढे नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. साम्राज्यसेवक सेनेच्या(इम्पीरीअल सर्व्हिस ट्रुप्स) कल्पनेचे बाकीच्या मोठ्या राजांनी सक्रिय स्वागत केले, तर यांनी त्या सेनेला आपल्या विचारसरणीत थारा दिला नाही. लॉर्ड मिंटोंनी अराजक चळवळीविरूद्ध सहकाराची अपेक्षा बाळगून जेंव्हा संस्थानिकांना पत्रे पाठविली तेंव्हा देखील यांनी इतरांवेगळे धोरण स्वीकारले, इतरांनी सहकाराचा मनःपूर्वक उत्साह दर्शविला, तर या स्वारीने मतभेद झाकून अगदी (निरुत्साहकारक) थंड भाषेत त्या पत्राचे उत्तर पाठविले. ब्रिटीश राज्याबद्दल असंतोष बाळगणाऱ्या वृत्तपत्रांनी महाराजांना धन्यवाद दिले.' लंडन टाइम्सच्या लेखांतील एका भागाचा हा भावार्थ दिलेला आहे.

लेख प्रसिद्ध होऊन गेल्यावर सर्व वृत्तपत्रकारांना गायकवाडासंबंधातील चूक लक्षांत आली. मग दिलगिरी, महाराजांच्या वाट्यांस आलेल्या पुत्रवियोगाविषयी दुःखप्रदर्शन, महाराजांना दीर्घायुष्य लाभावे हा आशीर्वाद किंवा शुभेच्छा असल्या उपायांनी वृत्तपत्रकारांना आपली चूक निस्तरण्याची पाळी आली.

ब्रिटीश प्रदेशांतील चळवळी आणि महाराज

संस्थानच्या कारभारांत आणि व्यक्तिशः संस्थानिक या नात्याने महाराजांना ज्या प्रतिकूलतेशी झगडावे लागले त्या स्थितीचा अधिक विचार एकंदर देशांत चाललेल्या चळवळीच्या अनुरोधाने करावासा वाटतो. ब्रिटीशांविरूद्ध कट व संस्थान यांची थोडीशी चर्चा मागे केली आहे. आता कॉंग्रेसच्या संदर्भात जे सांगण्याजोगे आहे त्याचा संक्षेपाने खल करावयाचा आहे.

ब्रिटीश प्रदेशांतील राजकीय चळवळीला संघटित रूप कॉंग्रेसच्या स्थापनेमुळे आले. कॉंग्रेसच्या चळवळीचे वातावरण १९०५ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी बंगालची फाळणी केली तेंव्हा तापले व या तापाची प्रखरता पुढे सारखी वाढत गेली. कॉंग्रेस ही आरंभी एक राजनिष्ठ संस्था असल्यामुळे तिच्याशी संस्थानिकांचा कदाचित संबंध आला तर तो ब्रिटीश राज्यकर्त्यांना सलत नव्हता. पुढे ब्रिटीशांची कॉंग्रेसकडे पाहण्याची दृष्टि बदलली व संस्थानिकहि तिच्यापासून दूरदूर राहू लागले. १९०५ च्या वंगभंगाचा क्षोभ हा राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी या ध्येयांचा जनक होता. सयाजीराव महाराजांनी या ध्येयांपैकी स्वदेशीचा पुरस्कार उघडपणे प्रसंगपरत्वे चालविला आणि राष्ट्रीय शिक्षणाच्या गंगानाथ विद्यालयाला आपल्या राज्यांत आश्रय दिला. त्यांच्या पदरी आलेले बाबू अरविंद घोष हे पुढे कलकत्त्यास जाऊन क्रांतिकारकांचे पुढारी झाले. त्यांचे स्नेही कै. बॅ. केशवराव देशपांडे हे बडोद्याच्या नोकरीत अरविंदांमागून कांही वर्षे होते. राष्ट्रीय शिक्षणाची शाळा, अरविंदबाबूंचा व देशपांडे यांचा संबंध याकडे नजर देऊन महाराजांच्या स्वाभिमानी वृत्तीने चिडलेल्या ब्रिटीश राज्यकर्त्यांना महाराजांविषयी संशय बाळगण्याची सोय झाली. महाराजांचा पिच्छा पुरवून ब्रिटीशांनी ती राष्ट्रीय शाळा बंद पाडली व देशपांड्यांना बडोद्याच्या नोकरीतून हाकलून काढले. क्रांतिकारकांच्या कटांना आपल्या राज्यांत थारा देऊ नये, ब्रिटीशांच्या गैरमर्जीतील वृत्तपत्रांना बंदी करावी, वगैरे मसलतीत महाराज स्वाभिमानाला जागून वावरत होते, याचा अर्थ त्यांनी क्रांतिकारकांना पाठीशी घेतले असा करता येत नाही. ब्रिटीशांना जी वृत्तपत्रे नकोशी वाटतात, त्यांच्या प्रसिद्धीला ब्रिटीश हद्दीत आळा घातल्यास संस्थानिकांनी त्यांना स्वतंत्रपणे मनाई करण्याचा प्रश्नच उपस्थित होणार नाही ही महाराजांची विचारसरणी सयुंक्तिक असूनहि ब्रिटीशांना ती रुचली नाही. बडोद्यास ब्रिटीशांवर कडक टीका करणाऱ्या वृत्तपत्रांचा महाराजांनी ब्रिटीशांची कटकट नको म्हणून बंदोबस्त केला असूनहि ब्रिटीशांच्या मनांतील त्यांच्या संबंधांचे किल्मिष कायम राहिले. १९११ च्या बादशाही दिल्ली दरबारांतील प्रसंगाने हे किल्मिश चांगलेच बळावले. त्याची वाच्यता मागे झाली आहे.

सामान्यतः ब्रिटीश प्रदेशांतील पुढारी संस्थानकांना वगळूनच आपली चळवळ करीत असल्याने संस्थानिकांना त्या चळवळीबाहेर राहण्यासाठी निराळा प्रयत्न करावा लागत नव्हता. म. गांधींच्या काळांत बारडोली तालुक्यांतील साराबंदीच्या स्वीकाराने घरादारास मुकलेले शेतकरी लगतच्या

बडोदे राज्यांत आश्रयांस गेले व महाराजांनी त्यांना तेथून पिटाळले नाही. हा एक आक्षेप महाराजांविरूद्ध ब्रिटीश अधिकाऱ्यांत चर्चिला जात होता. सारा न देणारे शेतकरी हे खुनी, दरोडेखोरांसारखे गुन्हेगार नव्हते; यामुळे अशा गुन्हेगारांना लागू असलेला कायदा सदर शेतकऱ्यांना लागू पडणारा नव्हता. पण विलींग्डन हे बडोद्यास गेल्यावेळी त्यांनी सदर शेतकऱ्यांबद्दल प्रश्न विचारला. महाराजांनी सडेतोड उत्तर देऊन शेवटी 'लोकांचा स्वयंप्रेरित सहकार जुलमाने लाभत नाही, उलट दुरावतो' अशा इषारेवजा उद्गाराने आपले उत्तर संपविले. विलींग्डन आणि महाराज यांची ही भाषणे ब्रिटीशांनी वृत्तपत्रांतून जगापुढे येऊ दिली नाहीत. त्या भाषणांच्या लघुलिपीने तयार केलेल्या टंकलिखित प्रती एकदा उपलब्ध होत्या. महाराजांच्या भाषणामध्ये 'इंग्रजी राज्य आज आहे, उद्या राहीलच अशी खात्री कोण देईल? हे शेतकरी या भूमीची संताने म्हणून सदैव येथेच राहणारे, ते संस्थानिकांच्या हाडामासांचे, त्यांच्याशी वैर म्हणजे पाण्यांत राहून माशांशी वैर करण्यासारखे आहे' असा आशय ध्वनिमार्थाने मनांत ठसविणारे उद्गार होते. 'आम्ही ब्रिटीश साम्राज्यकर्ते तुमचे वाली आहो. आमच्याशी द्रोहाने वागणारांबद्दल आमच्या रक्षणामुळे जीवंत राहणाऱ्या संस्थानिकांनी सहानुभूति बाळगणे हे त्यांच्या राजनिष्ठेला शोभणारे नाही.' अशा अर्थाची कांही विधाने विलिंग्डन साहेबांच्या भाषणांत होती. त्यांचा परामर्श महाराजांच्या पूर्वोक्त वाक्यांत असल्याचे चाणाक्ष वाचकांच्या सहज लक्षांत येईल. ही भाषणे प्रसिद्धिबाहेर कां ठेवली याचाहि बोध कठीण नाही.

ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या लटपटी

असहकारिता, सविनय कायदेभंग या चळवळींच्या काळांत महाराज मोठ्या खबरदारीने वागत असले तरी ते एखाद्या किटाळांत सांपडावे म्हणून ब्रिटीशांचे क्षुद्र अधिकारी कसा प्रयत्न करीत असत हे सांगण्याजोगे आहे. एकदा एक पोलीस अंमलदार सशस्त्र पोलिसांच्या तुकडीसह चळवळीच्या बंदोबस्ताकरिता नवसारी स्टेशनवर उतरला. स्टेशनांतल्या लोकसमुदायाने त्याला सतावले. स्टेशनांत एक संस्थानी पोलीस होता. त्याने आपल्याला मदत केली नाही, अशी तक्रार सदर पोलीस अंमलदाराने वरिष्ठास कळविली. स्टेशनची हद्द ही संस्थानची हद्द नव्हे; तशी असली तरी एका शिपायाला तो जमाव आवरणे कठीण होते, अर्थात संस्थानी पोलीसांची वर्तणूक आक्षेपार्ह म्हणता येत नाही. याप्रमाणे संस्थानातर्फे केलेल्या खुलाशांत ब्रिटीश पोलीस अधिकाऱ्यांजवळ सशस्त्र पोलीस असून व स्टेशनची हद्द त्याच्या आड येणारी नसून त्यांचा उपयोग करायला ह्या अंमलदाराचे हात कोणी धरले होते असा वर उलट सवाल टाकलेला होता. येथे हे लक्षांत ठेवणे आवश्यक आहे की, ज्या देशपांड्यांना बडोद्यांतून बाहेर घालविले, त्यांनी ब्रिटीशांच्या पोलीसांना संस्थानी हद्दीत तेथील अधिकाऱ्यांची पूर्वसंमति न घेता किंवा त्यांना आपण येणार असल्याची रीतसर माहिती न देता जी एका पुस्तकानिमित्त झडतीची दांडगाई केली तिच्याबद्दल तंबी भरली. याला ब्रिटीश अधिकाऱ्यांनी गुन्हा ठरवून त्यांना नोकरीतून उठविले. पुढे ब्रिटीश पोलीसांच्या अशा गैरकायदा वर्तनाबद्दल मुंबईसरकारतर्फे माफी सादर करण्यांत आली; पण देशपांड्यांचे जे नुकसान व्हावयाचे ते होऊन गेले.

कौटुंबिक जीवन

सयाजीराव महाराजांच्या कर्तबगारीचा आढावा बराच सांगून झाल्यामुळे आता त्यांच्या कौटुंबिक जीवनाचे निरीक्षण केल्यास गादीवर आल्यानंतर पहिल्या राणीच्या अकाल मृत्यूनंतरच्या वीस वर्षांत कौटुंबिक सुखांत खेद वाटण्यासारखी महत्त्वाची हानि घडली नसल्याचे दिसून येते. १८७७ मध्ये जनक पिता, १८८९ मध्ये दत्तक घेणारी माता हे कालवश झाले. त्यांची कालवशता सृष्टीच्या स्वाभाविक क्रमांतली गणता येईल. १८८३ च्या पहिल्या पुत्रलाभानंतर जयसिंगराव (१८८८), शिवाजीराव (१८९०), कन्या इंदिरा (१८९२), धैर्यशीलराव (१८९३), याप्रमाणे संततिसुखाची भर पडत गेली. १९०८ मध्ये युवराज फत्तेसिंगराव यांच्या मृत्यूने संतानांच्या चिरवियोगाचा प्रारंभ झाला. तो १९१९ नंतर महाराजांच्या निधनापर्यंत सतत चालू राहिला. १९१९ मध्ये शिवाजीरावाने इहलोक सोडला. १९२२ मध्ये कन्येवर वैधव्य कोसळले. द्वितीय चिरंजीव जयसिंगराव यावर १९२३ मध्ये काळाची झडप पडली. त्यांचे वडील व धाकटे बंधु आनंदराव आणि संपतराव हे अनुक्रमे १९१७ व १९३४ मध्ये महाराजांना सोडून गेले. त्यायोगाने जुन्या स्मृतीं उजळून आनंद भोगण्याचे साधन गेले. १९१९ मध्ये युवराज्ञी पद्मावती यांनी परलोकचा रस्ता धरला. १९०८ ते १९३४ या सुमारे २५ वर्षांच्या कालांतील १९१९ ते १९३४ या पंधरा वर्षांत एकूण जवळच्या सहा नातलगांवर काळाचा घाला पडावा, त्यांत पुनः एखाद्या वर्षामध्ये लहानशा कालावधीत मृत्यूने दोघांचा बळी घ्यावा, हे दुर्दैव उग्र वाटल्याशिवाय राहात नाही. रोजचा राज्यकारभार व नव्या कार्याचे संस्थानांत बीजारोपण, शिवाय देशपरदेशांतल्या परिषदा, प्रदर्शनांचा पसारा, व्हाइसरॉयांचे आगत-स्वागत, यामुळे महाराजांचे चित्त होणाऱ्या दुःखाघाताने क्षणेक्षणी विव्हळत नसले तरी त्याचा परिणाम हळूहळू महाराजांच्या वर्तनक्रमांत औदास्याच्या रूपाने दिसू लागल्याची माहिती त्यांच्याबद्दलच्या आठवणीतून पहावयाला सांपडते. मनुष्य मनाचा कितीहि खंबीर असला तरी वाढत्या वयामध्ये कुटुंबाचा भरारलेला वृक्ष आपल्या डोळ्यांदेखत झडू लागल्याचे दुःख त्याला जाणवल्यावाचून राहात नाही. ते दुःख दबा धरून मानसिक बळ पोखरीत राहते. मनुष्य दिनचर्या पार पाडतो, पण तिच्यांत उत्साह व आनंदाचा भाग नसतो. तो केवळ सवयीच्या बलात्काराने आपली कामे बजावतो. महाराजांना प्रत्येक आघाताचा धक्का बसे. या धक्क्यांनी त्यांची बुद्धि हादरून जाऊन कर्तव्यदक्षतेत कसलीही चलबिचल उडाली नाही, हा त्यांच्या स्वभावाचा कांहीसा अलौकीक विशेष समजला पाहिजे. राजकुमार जयसिंगराव यांच्या मृत्यूनिमित्त त्यांनी लिहिलेल्या एका पत्रांतील पुढील उतारा त्यांची मनोव्यथा निदर्शनांस आणणारा आहे. ते म्हणतात :- ''राजकुमार जयसिंगराव यांच्या मृत्यूने आम्ही फार उदास झालो आहोत व यापूर्वीच्या अशाच इतर आघातांकडे लक्ष गेले असतां आमची उद्विग्नता अधिकच वाढते आणि पुढील कालाकडे नजर टाकण्यास मन कचरते माझ्या या वयांत भविष्यकालाला मला कसे तोंड देता येईल. हे मला समजत नाही.'' (आपटे पृ. ८७६)

मुले होणे हा कौटुंबिक सुखाचा दर्शनी भाग झाला. ती बुद्धिमान, विद्याप्रिय आणि सद्गुणी असणे हा त्या सुखाचा आत्मा समजला पाहिजे. सयाजीरावांना मुलांच्या विद्येसाठी द्रव्य कसे व

किती खर्चावे याविषयी विवंचना नव्हती. अमेरिका, इंग्लंड यासारख्या विद्यावैभवाच्या देशांतून महाराांनी आपले पुत्र शिकायला पाठविले. त्यांतल्या एखाद्याने पदवी पटकावली; परंतु परत स्वदेशी आल्यानंतर कोणत्या गुणांनी चमकून त्यांनी आपल्या पित्याच्या कीर्तिप्रभेला अधिक तेजस्विता आणली किंवा बडोद्याच्या भवितव्याविषयी अपरिहार्य दृढाशा उत्पन्न केली या प्रश्नांचा विचार सोडून देणेच उत्तम. सर्वात धाकट्याखेरीज बाकीचे तिघे २५, ३९, ३५, या वयोमानांत यमलोकी गेले असल्याने या प्रश्नाचा विचार व्यर्थच गणला पाहिजे. शेवटी 'ज्याचा तो' त्यासारखा दुसरा निपजल्याचे जगांत अति विरळ दृष्टीस पडतात. हाच अनुभव मान्य करावा हेच योग्य. महाराजांची मुले या अति विरळात जमा होण्यासारखी नव्हती. तथापि महाराजांच्या कर्तव्याला व कीर्तीला त्या योगाने लवमात्र उणेपणा येत नाही.

महाराजांच्या कौटुंबिक जीवनांतील एक पैलू त्यांच्या व्यक्तिविषयक गुणांच्या थोरवीत भर टाकणारा आहे, तो म्हणजे आप्तेष्टांच्या हितचिंतेचा. महाराजांनी आई-बाप, मुले व त्यांच्या लग्नसंबंधाने उत्पन्न होणारे नातेवाईक यांची विचारपूस करून त्यांस साह्य पुरविणे यांत आश्चर्य वाटण्याजोगे कांही नाही. साधारण सुस्थितीला कोणीही कुटुंबवत्सल मनुष्य असे वागतो. परंतु मल्हाररावांसारख्या ब्रिटीशांनी तक्ताखाली ओढून हद्दपार केलेल्या पूर्वजांच्या बायकांशी अगदी आपुलकीची वागणूक ठेवावी हा त्यांचा स्वभावविशेष दृष्टीआड करण्यासारखा नाही. मल्हाररावांच्या पश्चात त्यांच्या एका पत्नीला महाराजांनी प्रसंगपरत्वे जे पत्र लिहिले आहे, त्यांत त्या राजस्त्रीची आर्थिक दशा ओढगस्तीची असल्याच्या माहितीचा उल्लेख आहे. आर्थिक अव्यवस्थेमुळे कर्ज झाल्याचा नियम छेडून 'संकोच वाटत नसेल तर त्याचा तपशील अगदी खाजगी रीतीने कळवावा,' असे त्याच पत्रांत महाराजांनी सुचविले आहे. अशी पत्रे पाहिली की महाराजांच्या व्यक्तित्वाची खरी उंची गळी उतरते.

महाराजांची प्रगमनशीलता

महाराजांना इ.सन १८८१ च्या अखेर राज्याधिकार मिळाल्यापासून तो १९३९ सालांत मृत्यु येईपर्यंत महाराजांनी आदर्श राज्य निर्मून एक असामान्य कर्तृत्वाचा राज्यकर्ता अशी कीर्ति मिळविली. त्यांच्या बडोदे या राजधानीचा विचार करू लागल्यास ही राजधानी म्हणजे जगांतील प्रसिद्ध राजधान्यांचे एक लहानसे प्रतिरूपच अशी तिची योग्यता दिसून येते.

कांही सुधारणांचा पूर्वी उल्लेख केला, परंतु आणखी कांही सुधारणांची ओळख करून दिल्याशिवाय महाराजांच्या प्रगमनशीलतेची नीट ओळख पटणार नाही. बडोद्याचे कलाभवन प्रसिद्ध आहे. उद्योगधंद्याचे शिक्षण हा त्याचा उद्देश होता. अर्वाचीन काळांत यंत्र व त्याचे तंत्र यांचे जनतेला ज्ञान पुरविल्याशिवाय राष्ट्राचा उद्धार होणार नाही ही कलाभवनाच्या मागील भूमिका होती. घड्याळे तयार करण्यापर्यंत तेथील शिक्षणाची मजल पोचली होती. यासारखीच दुसरी संस्था वैद्यकशास्त्राच्या शिक्षणाची होती. हे शिक्षण गुजराती-मराठी या देशी भाषांतूनच दिले जावे, असा महाराजांचा कटाक्ष होता. केवळ देशी भाषेतून पाश्चात्य वैद्यकाचे ज्ञान संपादून धंद्यांत यशस्वी झालेल्या कांही डॉक्टरांची नांवे सांगता येतील. देशी भाषेसंबंधातील महाराजांच्या कटाक्षाचे एक उदाहरण तयार करविलेल्या राज्यव्यवहाराच्या देशी परिभाषाकोशाचे आहे.

शहरांत उत्तम इमारती बांधून शहराला शोभा आणली. चित्रालयाची-पिक्चर गॅलरी-इमारत बांधून परदेशी व देशी चित्रांचा अमूल्य संग्रह एकत्र केला. हिंदुस्थानांतील प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा यांनी काढलेल्या मूळ अस्सल चित्रांचा सर्वात मोठा संग्रह बडोद्यास आहे जगांतील मूर्तिकारांच्या हातून तयार झालेल्या मूर्तिहि महाराजांनी खूप जमविल्या. देशी भाषांतील ग्रंथसामग्री वाढावी म्हणून निरनिराळ्या ग्रंथमाला सुरू करून लेखकांना उत्तेजन दिले. क्रीडामाला, पाकशास्त्रमाला, राष्ट्रकथामाला, शास्त्रीय ज्ञानविषयक सयाजीज्ञानमंजूषा, आणि लघु ज्ञानमंजूषा, धर्मशास्त्रग्रंथमाला, आणि गायकवाड ओरिएंटल सीरीज इत्यादि गोष्टी सुरू करण्याचे श्रेय त्यांनी घेतले. यासाठी त्यांनी लक्षावधि रुपयांचे वेगवेगळे कायमचे निधी सुरक्षित ठेवले होते. हीरकमहोत्सवात समारंभात एक कोटी रूपयांची देणगी जाहिर करून सर्वांना चकित केले. निनिराळ्या वस्तूंचे कारखाने उत्तेजन देऊन उभे केले. उद्योगधंद्यांना भांडवल मिळण्याकरिता बडोदा बँक स्थापन केली. कोट्यावधि रुपयांचा ट्रस्ट करून विद्यापीठ स्थापण्याचा मानस जगजाहीर करून ठेवला. परदेशी जाऊन महाराज नुसतीच मजा न मारता चांगले काय आहे यावर लक्ष ठेवून ते बडोद्यांत कसे रुजविता येईल याचाच विचार करीत असत. मोफत प्राथमिक शिक्षण, फिरती ग्रंथालये, व्यायामशाळा, उत्तम बागबगीचे इत्यादि गोष्टी परदेशच्या प्रवासांत महाराजांच्या मनावर ठसल्या. या सर्व गोष्टी यांनी बडोदे राज्यांत आणल्या. सामाजिक सुधारणा व शिक्षण यासारख्या गोष्टीत महाराजांना उत्कृष्ट यश मिळाले. एवढ्यानेच महाराजांच्या प्रगमनशीलतेचा व्याप आवरत नाही. त्यांनी आपल्या राज्यांत आगगाड्यांचे दळणवळण सुरू केले. आगगाड्यांचे रस्ते वाढवावे हा त्यांचा एक जबर हव्यास होता. १५-२० मैलांआड तितक्याच क्षेत्रफळाचा ब्रिटीश प्रदेश, पुनः संस्थानाचा लहानसा टापू अशा विचित्र स्थितीत त्यांनी आगगाड्यांचे रस्ते बांधले. ते व्यापारवाढीला व आडभागांतील जनतेच्या दळणवळणाला उपयोगी पडू लागले. गायकवाडी मुलखांत समुद्र असल्याने त्यावरील बंदरांचा लाभ घेण्याचा महाराजांनी यत्न केला. बंदराच्या बांधणीला ब्रिटीशांनी अडथळे आणले. परंतु तडजोडीने या अडथळ्यांतून महाराज निभावले. तडजोडीपायी हवा तेवढा लाभ संस्थानी तिजोरीत पडला नाही, परंतु माफक कां होईना उत्पन्नाचा आंकडा चढला. गायकवाडी हद्दीतील मीठ पिकविण्याचा हक्क महाराजांनी सोडला. तो देखील उत्पन्नाला फार मोठी तूट भोगावी लागणार नाही, अशा हिशोबाने सोडला. बडोद्याला बादशाही या नावांने ओळखले जाणारे स्वतंत्र झाले होते. ब्रिटीश नाणे, मुसलमानी नाणे व बाबाशाही नाणे या तिन्हींच्या किंमतीत फरक असल्यामुळे व्यवहारांत जो गोंधळ उडत असे, तो नाहीसा करण्यासाठी बाबाशाही नाण्याचा नाद महाराजांनी कायमचा आटोपला. नाण्याचा नाद पन्नास वर्षांपुरता तहकूब केला असला तरी चालू भारतीय स्वराज्याने तो कायमचा गुजरातच्या गायकवाडशाहीसकट मिटविला.

बडोदे राज्याबाहेरच्या त्यांनी किती संस्थांना व ग्रंथप्रकाशनाला द्रव्यसाह्य सढळ हाताने पुरविले याची यादी दिल्यास फार जागा अडवावी लागेल, पण बडोद्याबाहेर चाललेल्या विद्यावृद्धीकडे त्यांचे कसे लक्ष असे याचा एक मासला सांगण्याजोगा आहे. वाईस प्राज्ञ पाठशाळेमध्ये ब्रह्मीभूत केवलानंद स्वामींच्या प्रेरणेने धर्मकोशाचे काम सुरू होतांच त्याच्या माहितीचे पत्रक महाराजांना

पाठविले होते. महाराजांना ते पत्रक अमेरिकेत मिळाले आणि वेळ न दवडता त्यांच्याकडून तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांना प्रस्तुत कार्याच्या माहितीसाठी आपण मुंबईस येऊ तेंव्हा भेटावे असे कळविले. मुंबईच्या भेटीनंतर शास्त्रीबुवांना बडोद्यास बोलावले. तेथे महाराजांनी नेमलेल्या कमिटीपुढे तर्कतीर्थांनी धर्मकोशाचे समग्र स्वरूप निवेदन केले. यांच चर्चेच्या वेळी महाराज स्वतः चर्चा ऐकायला बसत असत. इतक्या परीक्षेनंतर त्यांनी मदत दिली. या प्रकरणांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे परदेशी प्रवासांत असले तरी स्वदेशी चाललेल्या सत्कार्याकडे त्यांची दृष्टि असे ही होय.

ब्रिटीश राज्यसुधारणा व महाराज

सयाजीरावांची दृष्टि भारतीय होती. बडोद्याचा गौरव म्हणजे भारताचा गौरव असल्याचा त्यांना विश्वास होता. तेंव्हा भारतीय राज्यघटनेच्या वाटाघाटीत ते आपुलकीने लक्ष घालीत होते. नरेंद्र महामंडळाच्या स्थापनेपासून सयाजीराव हे त्यांतील प्रमुख मानले जात. इ.स.१९३० मध्ये इंग्लंडमध्ये भरलेल्या 'गोलमेज'(Round Table Conference) परिषदेत त्यांनी अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली. या परिषदेत ते संस्थानिकांचे पुढारी होते. भारताला संयुक्त राज्यघटनेची जरूर असल्याचे मर्यादित मनोगत त्यांनी १९१७ मध्ये व्हाइसरॉयला लिहिलेल्या एका पत्रावरून दिसते. पण भारत एकजिनसी समाज नसल्याने जर्मनीसारखी संयुक्त राज्यघटना येथे यशस्वी होणार नाही असेहि त्यांनी त्याच पत्रांत एका ठिकाणी सविस्तर नमूद केले आहे. गोलमेज परिषद संपल्यावर सयाजीराव भारतात आले. येथे हे नमूद करणे अवश्य वाटते की, प्रजासत्ताक राज्यपद्धतीबद्दल त्यांची पूर्ण श्रद्धा नव्हती. राजेरजवाडे सामान्य जनतेहून निराळे राहावे अशी त्यांची धारणा होती.

महाराज व क्रांतिकारक

सयाजीरावांचा क्रांतिकारकांशी निकटचा संबंध असल्याचे अलीकडे कांहीजण बोलू लागले आहेत. महाराज परदेशांत गेले असतांना कांही क्रांतिकारकांनी त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला व त्या गोष्टीचा वाजवीपेक्षा जास्त गवगवा इंगज अधिकाऱ्यांनी जाणून बुजून चालविला. पण महाराजांची राजनिष्ठा अभंग होती. दिल्ली दरबारच्या प्रसंगानंतर वृत्तपत्रांतून त्यांच्यावर होणाऱ्या टीकेत क्रांतिकारकांच्या भेटीगांठीचा उल्लेख करण्यांत आला असतांना क्रांतिकारकांचे पुढारी श्री. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी हे खोटे असल्याचे प्रसिद्ध केले. श्रीमती निवेदिता यांना महाराजांनी बडोद्यास व्याख्यानासाठी बोलाविले असतांना महाराजांनी गुप्त चळवळीस मदत करावी असा विषय बाईंनी महाराजांपाशी काढल्याचे बाबू अरविंद घोष यांच्या चरित्रांत आले आहे. सयाजीरावांनी बाईंचे बोलणे ऐकून घेतले, पण केले मात्र कांही नाही. महाराजांच्या चरित्राकडे पाहिले म्हणजे ते असे कांही संबंध ठेवीत असतील हे संभवत नाही. त्यांचा विश्वास सनदशीर मार्गावर असल्याचे स्पष्ट दिसते. महाराजांच्या अलीकडील कित्येक भक्तांनी जे क्रांतिकारक नव्हते, त्यांना क्रांतिकारक कल्पून इंग्रजांच्या विरोधास न जुमानता महाराजांनी त्यास आश्रय दिल्याच्या कथा महाराजांच्या गुणानुवादांत गोवल्या आहेत.

महाराजांना १९३३ साली सत्तर वर्षे पूर्ण झाल्याने त्यांचा हीरकमहोत्सव सर्वत्र साजरा करण्यांत आला. महाराजांना याच वर्षी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद, जागतिक सर्व धर्मपरिषदेचे अध्यक्षपद, प्राच्यविद्यापरिषदेच्या सातव्या अधिवेशनाच्या उद्घाटनाचा सन्मान मिळाला. आपण बजावलेल्या कामगिरीची पोच घेतांना देखील महाराज विनम्र राहिले. बडोद्यास १९३३ साली भरलेल्या प्राच्यविद्यापरिषदेचे अध्यक्ष पंडित जयस्वाल यांनी सयाजीरावांची भोज राजाबरोबर तुलना करून यथार्थ गौरवोद्गार काढले होते.

पुण्याच्या नगरपालिकेतर्फे देण्यांत आलेल्या मानपत्राला महाराजांनी जे उत्तर दिले ते मननीय तर आहेच, परंतु त्यांत त्यांनी आपणाला मिळालेल्या पन्नास वर्षांच्या राज्यकारभाराचे सारच सांगितले असे वाटते. महाराज म्हणाले, 'राज्यकारभाराचा आजवर मला जो अनुभव आला आहे त्यावरून प्रजा तीन गोष्टींची अपेक्षा राखते. (१) हलका कारभार अथवा कर फार नसावेत. (२) राजा व प्रजा यांच्यामध्ये होता होईल तितके कमी मध्यस्थ असावेत म्हणजे जादा अंमलदार नसावेत. (३) कमी खर्चाळू व शीघ्रपणे न्याय मिळण्याची पद्धत. ह्या तीन गोष्टी साध्य झाल्या म्हणजे ते राज्यतंत्र प्रजेस सुखावह वाटते. आपल्या देशाची परिस्थिती लक्षांत घेता वरील तीन तत्त्वांचा ज्या राज्यकारभारांत अंतर्भाव झाला तो राज्यकारभार चांगला, असे मला वाटते.

(१) मी माझ्या राज्यांत शक्य तितक्या प्रमाणांत ही व्यवस्था अंमलात आणिली आहे. न्याय व अंमलबजावणी ही दोन्ही खाती निरनिराळी ठेविली आहेत. कांही दिवसांपूर्वी मला असे आढळून आले की, आमच्या येथे न्यायखात्यामध्ये कामे तुंबून जाऊन त्यांचा सत्वर निकाल होत नव्हता. म्हणून मी तुंबलेल्या कामांचा निकाल होण्याकरिता अधिक न्यायाधीश नेमून कामे चालू मार्गावर आणविली, व थोड्या दिवसांपूर्वी न्याय मिळण्यामध्ये दिरंगाई होऊ नये म्हणून कांही कायमच्या जागाहि वाढविल्या. कोणत्याहि केलेल्या व्यवस्थेत कांही उणीवा किंवा चुका राहण्याचा संभव असतो. परंतु तशा चुका दृष्टोत्पत्तीस येतांच त्या ताबडतोब दुरुस्त करण्याची मी तत्परता ठेवतो.

(२) आपल्या राज्यांतील सर्व वर्गांच्या लोकांशी मिळून मिसळून वागून जेणेकरून रयतेच्या सुखाची वृद्धि होईल अशा रीतीने राजाने आपल्या राज्यकारभाराचे धोरण ठेविले तर त्याच्या राज्यांत सुधारणा जरूर होतील असे मला वाटते. लोकांमध्ये आत्मविश्वास वाढवून त्यांना कार्यक्षम बनवावे लागते. सुधारणा साधावयाची म्हणजे लोकांमध्ये ज्ञानप्रसार प्रथम केला पाहिजे. लोकांची प्रगति ही त्यांचे ज्ञान, आसपासची स्थिती, ध्येय व देशाचा पूर्वेतिहास इत्यादि गोष्टींवर अवलंबून असते. राजा व प्रजा यांचा सलोखा व मिलाफ आणि सहकार्य जेथे असते तेथे प्रगति झपाट्याने होते. अशी परिस्थिती निर्माण होण्यास राजा व्यवहारदक्ष, ज्ञानी व समजूतदार असावा लागतो. परंतु हे नेहमीच शक्य होते असे नाही.

(३) देशाच्या उत्कर्षासाठी ज्ञानप्रसार जितका अपरिहार्य आहे,तितक्याच महत्वाची गोष्ट म्हणजे रयतेचे आरोग्य हे होय. देशांतील माणसे शरीराने मजबूत व निरोगी असली पाहिजेत. यासाठी रयतेला पुरेसे अन्नपाणी मिळते किंवा नाही, हे पहाणे राजाचे आद्य कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे देशांतील लोकांना शारीरीक व्यायामाचे शिक्षण व स्वच्छतेचे महत्व समजावून देणे

जरूरीचे असते. त्या दृष्टीने मी बडोदे राज्यांत प्राथमिक शिक्षणाइतकेच शारीरीक शिक्षणाकडे लक्ष दिले आहे. दक्षिण प्रान्तापेक्षा गुजराथमध्ये पूर्वी शरीरसंपत्तीकडे लोकांचे दुर्लक्ष होते, अर्थात महाराष्ट्रियाप्रमाणे गुजराथी मंडळींना व्यायामाची नैसर्गिक आवड नव्हती; परंतु ती स्थिती पालटून लोकांचे लक्ष आता शारीरीक शिक्षणाकडे वेधले गेले असून या बाबतीत त्यांनी बरीच प्रगतीहि केली आहे, ही समाधानाची गोष्ट होय. ज्ञान व शारीरीक शिक्षण यांचे बरोबर आमचे राज्यांत ललितकलांचीहि योग्य जोपासना केली जाते. शिक्षण ही गोष्ट अशी आहे की, ते द्यावे तितके थोडेच होणार आहे. तेंव्हा जेणेकरून प्रगति होईल असे शिक्षण रयतेला देणे जरूर आहे.

४. येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती ही की, कोणत्याहि बाबतीत केलेल्या खर्चाचा सदुपयोग होऊन त्याचा योग्य मोबदला मिळत आहे की नाही, हे वरचेवर पाहावे लागते. बडोदे राज्यांत ऐपतीच्या मानाने शिक्षणावर बराच खर्च केला जात आहे. खर्च होतो याबद्दल कांही खेद वाटत नाही. परंतु या खर्चाचा बदला बरोबर मिळत आहे किंवा नाही, याचे संशोधन करून जर कांही उणीवा नजरेस आल्या तर त्या सुधाराव्या लागतील. ह्या हेतूने मी नेहमी राज्यकारभारांतील बाबतींवर सक्त नजर ठेवीत असतो. अशा सक्तीमुळे कित्येक वेळा टीकेचा भडिमारहि सोसावा लागतो. परंतु ध्येयाकडे दृष्टी ठेवून अशा टीकेस मी न जुमानता लोककल्याण साधण्याचे काम अक्षय चालू ठेवितो. लोकनिंदा किंवा अप्रियता सोसण्यास सहसा अंमलदार वर्ग तयार नसतो व त्यामुळे बऱ्याच गोष्टी चालढकलीवर ते टाकीत असतात. परंतु राजास या सर्व गोष्टींवर बारकाईने नजर ठेवून वेळीच सक्तीचे उपाय घ्यावे लागतात.

५. कित्येक वेळा सार्वजनिक हिताच्या नांवाखाली बराच अंधार दृष्टोत्पत्तीस येतो व बरेच अश्लाघ्य प्रकार त्या नांवाखाली मोडले जातात. प्रजाहितास फाजील महत्त्व दिले जाण्याचा संभव असतो. राज्यकारभार सुरळीत चालण्याचे दृष्टीने असे फाजील महत्त्व देऊन भागण्यासारखे नसते. तेंव्हा त्यांतहि राज्यकर्त्याने लक्ष घालून फाजील महत्त्वाला मर्यादा घालणे जरूर असते. राज्यकर्त्याने योग्य ते फेरफार वेळोवेळी जरूर केले पाहिजेत असे माझे मत आहे.

अखेरचे सत्कार व दुखणे

सयाजीराव महाराजांच्या वयाला १९३३ मध्ये ७० वर्षे पूर्ण होणार या निमित्ताने भारतीय जनतेने त्यांचा सत्कार करावयाचे ठरविले. मुंबईमध्ये फार मोठा टोलेजंग असा सत्कार करण्यांत येऊन त्या प्रसंगी महाराजांचा 'सयाजी-गौरव ग्रंथ' त्यांना अर्पण करण्यांत आला. याच वेळी महाराष्ट्रांत महाराजांचे ठिकठिकाणी सत्कार करण्यांत आले व महाराष्ट्राने महाराजांच्या विषयी वाटत असलेला आदर व कृतज्ञता व्यक्त केली. इ.स.१९३६ मध्ये महाराजांना गादीवर बसून ६० वर्षे पूर्ण झाली यामुळे त्यांचा 'हीरक-महोत्सव' साजरा केला. इतक्या दीर्घकाल राज्य करण्याचे भाग्य फारच थोड्यांना लाभते. त्यांतून ज्या थोड्याफार लोकांना हे भाग्य लाभते ते उत्तम राज्य करतात असे नव्हे. सयाजीरावांच्या बाबतीत या दोन्ही गोष्टींचा सुरेख संगम झालेला असल्यामुळे बडोद्याच्या प्रजेने हाहि समारंभ फार उत्साहाने केला. या समारंभाच्या निमित्ताने

महाराजांचा पुतळा तयार करून तो राजमार्गावर उभारण्यांत आला. या समारंभाला देशांतील राजकारणी व पुढारी लोकांच्याकडून संदेश आले तसाच संदेश खुद्द बादशहा पंचम जॉर्ज यांचाहि आला होता. महाराजांची मूळ शरीरप्रकृति निकोप असली तरी इतक्या वर्षांच्या दगदगीमुळे व संततीच्या अकाल मृत्यूमूळे ती खिळखिळी झाली होती. हीरकमहोत्सवाच्या दगदगीने त्यांची प्रकृति बिघडली. ते प्रकृतीस्वास्थ्यासाठी इंग्लंडला गेले. इ.स. १९३६ मध्ये बादशहा पंचम जॉर्ज यांचे देहावसान होऊन त्यांचे थोरले चिरंजीव गादीवर आले. पण थोडेच दिवसांत त्यांनी गादीचा राजीनामा देऊन त्यांचे धाकटे बंधु ड्यूक ऑफ यॉर्क हे सहावे म्हणून इंग्लंडच्या गादीवर स्थानापन्न झाले. बादशहा सहावे जॉर्ज यांच्या राज्याभिषेकाला महाराज हजर राहिले. यानंतर ते भारतात आले. पण प्रकृतीसाठी त्यांना पुन्हा परदेशगमन करणे भाग पडले. इ.स. १९३८ मध्ये ते परदेशांत असतांना त्यांची प्रकृति खूपच खालावली. ते ऑक्टोबरमध्ये भारतात येण्यास एकटेच निघाले. महाराणीसाहेब मागे इंग्लंडमध्येच राहिल्या, महाराजांची प्रकृति बोटीवर असतांनाच बिघडली. मुंबईत ते आले, ते आजारीच आले. मुंबईत त्यांच्यावर डॉक्टरी औषधोपचार सुरू झाले. इंग्लंडमध्ये ही बातमी कळतांच महाराणींनी तेथील डॉक्टर इव्हॅन्स यांना विमानमार्गे मुंबईला आणले. महाराजांना बडोद्याला जाण्याची फार तीव्र इच्छा होती, पण त्यांची प्रकृति प्रवासास योग्य नाही असे डॉक्टरांनी सांगितल्यावरून त्यांना मुंबईस राहावे लागले. शेवटी दुखणे विकोपास जाऊन ता. ६ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता सयाजीराव महाराजांची जीवन-ज्योत समाप्त झाली. या वेळी त्यांच्याजवळ त्यांचे सर्व जवळचे नातलग होते.

महाराजांना खास आगगाडीने बडोद्यास नेण्यांत आले. महाराजांचा पार्थिव देह नेणारी गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी (ता. ७ ला) ८ वाजता बडोद्यास पोहोचली. मग महाराजांचे शव लक्ष्मी-विलास राजवाड्यासमोर नेण्यांत आले, व तेथून महाराजांचा देह वाड्यांत हलविण्यांत आला. महाराजांच्या मृत्यूची बातमी सर्व देशभर पसरतांच भारतातील जनता शोकाकुल झाली. बडोद्यांतील जनतेला तर फारच दुःख झाले. महाराजांच्या देहाचे दर्शन घेण्यासाठी बडोद्यांत खूपच गर्दी झाली होती. महाराजांचा देह लोकदर्शनासाठी लक्ष्मी-विलास राजवाड्यांत दरबारी इतमामाने ठेवण्यांत आला होता. महाराजांची महायात्रा बारा वाजण्याच्या सुमारास सुरू झाली. ज्या बडोदे जनतेने आजवर महाराजांच्या मिरवणूकी व राजवैभव अनेक वेळा पाहिले होते, ती जनता आज सयाजीरावांची शेवटची मिरवणूक पाहण्यासाठी जमली होती. स्मशानयात्रेला मिरवणुकीच्या आघाडीवर महाराजांचा जरीपटका झेंडा व नौबत ही राजचिन्हे ठेवलेले हत्ती चाललेले होते. त्या मागे बडोदा राज्याचे शिपाई व त्यामागून महाराजांची शवपेटी अशी योजना होती. राजमार्गावर रात्रीपासून आजूबाजूच्या खेड्यांचे असंख्य लोक दर्शनासाठी येऊन उभे होते. ही अंत्ययात्रा स्मशानभूमीवर दुपारी तीनच्या सुमारास पोहोचली. तीन वाजून चार मिनिटांनी महाराजांच्या शवास अग्नि देण्यांत आला. या वेळी महाराजांचे चिरंजीव धैर्यशीलराव, दिवाण व इतर अधिकारी हजर होते.

महाराजांच्या मृत्यूची बातमी समजतांच भारतांतील व इंग्लंडमधील वर्तमानपत्रांतून त्यांच्या संबंधात मृत्यूलेख प्रसिद्ध झाले. भारतांतील बहुतेक सर्व वर्तमानपत्रांतून महाराजांच्या गुणगौरवाचे

लेख छापण्यांत आले. या सर्व लेखांमधील 'टाइम्स' (लंडन व मुंबई) मधील मृत्युलेख विशेष उल्लेखनीय आहेत, कारण त्यामध्ये महाराजांवर दिल्ली दरबारच्या प्रसंगी जे राजद्रोहाचे किटाळ आले; त्यामागे कोण होते, हे या लेखांतून आढळते. लंडन टाइम्स व मुंबईचा टाइम्स या दोन्ही पत्रांनी दिल्ली दरबार प्रकरणाला अवास्तव महत्त्व देण्यांत आल्याचे कबूल केले व तसे महत्त्व देण्याचे कांही कारण नव्हते असे म्हटले आहे. याशिवाय मुंबईचे सरकार याच वेळी महाराजांवर रागवण्याला कारण म्हणजे बडोद्याचा कारभार मुंबईकडून केंद्रसरकारकडे गेला हे होय. मुंबई व बडोद्याच्या सरहद्दी एकमेकांना लागलेल्या असल्यामुळे या दोघांत संघर्षाचे वारंवार प्रसंग येत. मुंबई सरकारचा अधिकार गेल्याचा राग त्यांनी महाराजांवर उगवला असेच म्हणावे लागते. महाराजांनी अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी बडोद्याला उत्तम राज्यव्यवस्था दिली हे होय, व उत्तम राज्यकारभार करण्याकडेच त्यांची प्रवृत्ति होती व त्यांचे प्रयत्न चालत.

महाराजांच्या जीवनचरित्राकडे पाहू जाता संत रामदास यांच्या 'मरावे परी कीर्तीरूपे उरावी' या उक्तीची आठवण येते. नाशिक जिल्ह्यांतील एका खेडवळ मुलाने आपल्या कर्तृत्वाने जागतिक किर्ति संपादन करावी व भारताच्या अर्वाचीन राष्ट्रपुरुषांत आपली गणना करून घेण्याइतकी लोकप्रियता मिळवावी हे विशेष आहे. महाराजांचे चरित्र हा अभ्यासूंना निरंतन स्फूर्तिकारक असाच विषय आहे.

●●●

परिशिष्ट

सन	प्रसंग
१८६३ मार्च ११	महाराजांचा जन्म कवळाणे येथे.
१९७५ मे २७	महाराजांचे दत्तकविधान व राज्यारोहण.
१८७५ जून ७	महाराजांच्या शिक्षणाचा आरंभ.
१८७५ नोव्हेंबर८	प्रिन्स ऑफ वेल्स व भावी बादशहा सातवे; एडवर्ड यांची व महाराजांची मुंबईस भेट.
१८७५ नोव्हेंबर १९-२०	प्रिन्स ऑफ वेल्स यांची बडोद्यास भेट.
१८७५ डिसेंबर १०	महाराजांचे शिक्षक मि. इलियट यांचे बडोद्यास आगमन.
१८७७ जानेवारी १	पहिला दिल्ली दरबार, त्या प्रसंगी महाराजांना 'फर्झन्द-न-खास व दौलत-इ-इंग्लिशिया' या पदव्यांची प्राप्ती.
१८७७ जुलै १६	महाराजांचे जनक वडील श्री. काशीराव बाबा यांचे निधन.
१८७७ जानेवारी ८	बडोदा कॉलेजच्या इमारतीचा पाया महाराजांच्या हस्ते बडोदे येथील कमिटी बागेचा उद्घाटन समारंभ.
१८८० जानेवारी ६	महाराजांचा प्रथम विवाह.
१८८० जानेवारी १०	लक्ष्मीविलास राजवाड्याचा पाया.
१८८१ डिसेंबर २७	महाराजांच्या शिक्षणाची समाप्ति.
१८८१ डिसेंबर २८	महाराजांना राज्याधिकारप्राप्ति.
१८८१ डिसेंबर २९	महाराजांना पुणे सार्वजनिक सभा व गुजराथ प्रांतातील जनता यांचेतर्फे मानपत्र समर्पण.
१८८२ ऑक्टोबर	राजा सर टी. माधवराव रजेवर गेले.
१८८२ नोव्हेंबर ते १८८३ जानेवारी	महाराजांची पहिली कडी प्रांतातील स्वारी.
१८८३ मार्च	राजा सर टी. माधवराव यांचा राजीनामा.

१८८२ ऑगस्ट ३	राजपुत्र फत्तेसिंगराव यांचा जन्म.
१८८४ मार्च-मे	नवसारी प्रांतातील पहिली स्वारी.
१८८५ जानेवारी ८	आजबा तलाव खोदण्यास सुरुवात.
१८८५ मे ७	पहिल्या श्री. सौ. महारणीसाहेबांचे निधन.
१८८५ डिसेंबर २८	श्री. सौ. चिमणाबाई (दुसऱ्या) साहेबांशी विवाह.
१८८६ नोव्हेबर ८	व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन यांची बडोद्यास भेट. त्यांच्या हस्ते डफरिन हॉस्पिटलचे उद्घाटन.
१८८७ मे २८	न्यायमंदिराच्या इमारतीचा पाया.
१८८७ मे २९	पहिल्या युरोपच्या सफरीस महाराज निघाले.
१८८७ डिसेंबर ३	महाराणी व्हिक्टोरिया यांच्या हस्ते महाराजांना G.C.S.I ची पदवी समर्पण.
१८८८ मे १२	राजपुत्र श्री. जयसिंगराव यांचा उटकमंड येथे जन्म.
१८९० फेब्रुवारी १०	लक्ष्मीविलास राजवाड्यांत गृहप्रवेश, कलाभवनची स्थापना.
१८९० जुलै ३१	राजपुत्र श्री. शिवाजीराव यांचा जन्म, खिचडीची पद्धती बंद केली.
१८९२ मार्च २	श्री. राजकन्या इंदिरा राजा यांचा जन्म.
१८९२ मार्च २९	आजवा सरोवरांतील पाणी बडोदे शहरांत आणण्याचा महाराजांच्या हस्ते समारंभ.
१८९२ एप्रिल	बडोदे राज्यांतील म्युनिसिपालिट्यांच्या कायद्याला मंजूरी.
१८९२ जून १९	इंग्लंडचे पंतप्रधान मि. ग्लॅडस्टन यांची भेट.
१८९३ मार्च १६	सक्तीच्या मोफत शिक्षणाच्या योजनेला अमरेली प्रांतापुरती मंजूरी.
१८९३ ऑगस्ट ३१	राजपुत्र श्री. धैर्यशीलराव यांचा जन्म.
१८९४ ऑगस्ट १३	बापट कमिशनची नेमणूक.
१८९५ मे १६	बापट कमिशनचा ठराव, आरोपीस ६ महिन्यांची कैद व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा.
१८९५ ऑक्टोबर ९	बापटांवरील केसचा महाराजांकडून अखेरचा निकाल, आरोपीय दोषमुक्त करण्यांत आले.
१८९५ नोव्हेंबर	रा. मणीभाई जसभाई यांची नोकरीतून निवृत्ति व दिवाणाच्या जागेवर मे. जयसिंगराव आंग्रे यांची हंगामी नेमणूक.

१८९६ जुलै १५	मे. श्रीनिवास राघव अय्यंगार यांची कायम दिवाणपदावर नेमणूक.
१८९६ ऑक्टोबर १०	राजघराण्यांत वेदोक्त विधीची सुरूवात.
१८९६ नोव्हेंबर २७	व्हाइसरॉय लॉर्ड एल्जिन यांची बडोद्यास भेट.
१८९६ नोव्हेंबर ३१	न्यायमंदिराच्या इमारतीचे उद्‌घाटन.
१८९७ जानेवारी	श्री. ईलियट यांची नोकरीतून निवृत्ति.
१८९८ एप्रिल ११	पिलवाई गांवी सरकारी मोजणीदारांवर दंगेखोरांचा हल्ला.
१८९८ मे ८	पिलवाईस फौजेची रवरनगी.
१८९८ जून ३	दंगेखोरांवर फौजेचा गोळीबार व दंग्याचा शेवट.
१८९८ नोव्हेंबर २९	महाराणी जमनाबाईसाहेब यांचे निधन.
१८९९ एप्रिल १०	सयाजी क्लबचा उद्‌घाटनसमारंभ.
१८९९ जून २२	लॉर्ड कर्झन यांची सिमल्यास भेट.
१८९९-१९००	बडोद्यास प्लेग व दुष्काळ यांची भयंकर आपत्ति.
१९०० जुलै ११	युरोपांत श्री. सौ. महाराणी साहेबांवरील शस्त्रक्रिया.
१९०० ऑगस्ट १	लॉर्ड कर्झन यांची महाराजांच्या गैरहजेरीत बडोद्यास भेट.
१९०० ऑगस्ट २५	कर्झन सर्क्युलरची गॅझेटमध्ये प्रसिद्धि.
१९०२ डिसेंबर १५	अहमदाबादला औद्योगिक प्रदर्शनाचे उद्‌घाटन.
१९०३ जानेवारी १	लॉर्ड कर्झन यांचा दिल्लीदरबार.
१९०४ फेब्रुवारी ४	युवराज फत्तेसिंहराव यांचा विवाह.
१९०५ एप्रिल ते १९०६ जून	चीन, जपान, अमेरिका या देशांत महाराजांची सफर. तेथे २६.५.१९०६ रोजी प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्याशी मुलाखत व प्रेसिडेंट यांनी महाराजांना दिलेला खाना.
१९०६ जुलै	सर्व राज्यभर सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण लागू केले.
१९०६ सप्टेंबर २०	लालबाग राजवाड्याचा पाया.
१९०६ नोव्हेंबर २०	बडोदे येथे स्वदेशी वस्तूंचे मोठे प्रदर्शन.
१९०६ डिसेंबर २४	कलकत्ता येथे औद्योगिक प्रदर्शनाचे उद्‌घाटन.
१९०७ मार्च ८	बडोदे येथे खंडेराव मार्केटचे उद्‌घाटन.

१९०७ नोव्हेंबर २	राज्याची गादी जुन्या सरकारवाड्यांतून लक्ष्मीविलास राजवाड्यांत आणिली व राजघराण्याचे देव इंदुमती-महालांत आणले.
१९०८ जून २९	राजपौत्र श्री. प्रतापसिंगराव यांचा जन्म.
१९०८ जुलै ९	बडोदा बँकेची स्थापना.
१९०८ सप्टेंबर १४	युवराज श्री. फत्तेसिंगराव यांचे निधन.
१९०९ जून १	श्री. रमेशचंद्र दत्त यांची दिवाणपदी नेमणूक.
१९०९ ऑक्टोबर २४	बडोद्यांतील सहावा साहित्य समारंभ.
१९०९ नोव्हेंबर १३	व्हाइसरॉय लॉर्ड मिंटोंची बडोद्यास भेट.
१९०९ नोव्हेंबर ३०	श्री. रमेशचंद्र यांचा मृत्यु.
१९०९ डिसेंबर १	मि. सेडन यांची दिवाणाच्या जागी नेमणूक.
१९१० मार्च १७	मि. ईलियट यांचा मृत्यु.
१९१० मे	चीन, जपान या देशांत सफर.
१९१० मे २३	जपानच्या बादशहांशी भेट.
१९१० जून १२	अध्यक्ष रूझवेल्ट यांची भेट.
१९१० डिसेंबर १२	मुंबईच्या जयमहाल बंगल्यात गृह-प्रवेश, बडोदे येथील सेंट्रल लायब्ररीची स्थापना.
१९१० डिसेंबर २४	बडोदे येथील मराठा शिक्षण परिषदेच्या चौथ्या अधिवेशनाचे उद्‌घाटन.
१९११ जून २२	बादशहा पंचम जॉर्ज यांचे राज्यारोहण. वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्ये महाराजांची समारंभात उपस्थिती.
१९११ जुलै २८	लंडन युनिव्हर्सिटीच्या पहिल्या अधिवेशनप्रसंगी अध्यक्ष या नात्याने भाषण.
१९११ डिसेंबर १२	बादशहा पांचवे पंचम जॉर्ज यांच्या राज्यारोहणानिमित्त दिल्लीस भरलेल्या समारंभात हजेरी.
१९१२ नोव्हेंबर ७	मुंबई येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाचे उद्‌घाटन.
१९१२ डिसेंबर १२	बडोदे येथील ज्युबिली बागेत गौतम बुद्धांच्या पुतळ्याचे अनावरण.
१९१३ फेब्रुवारी २७	बडोदे येथील श्री. राजपुत्र जयसिंहराव यांचा विवाह.
१९१३ मार्च २८	महाराजांच्या वयाचा सुवर्णोत्सव साजरा.

१९१३ ऑगस्ट २५	लंडन येथे राजकन्या इंदिरा राजे यांचा कुचबिहारचे राजपुत्राशी विवाह.
१९१३ डिसेंबर १९	राजपुत्र श्री. शिवाजीराव यांचा बडोदे येथे विवाह.
१९१४ फेब्रुवारी २०	बडोदे राज्यांतील सहकारी संस्थांच्या प्रथम परिषदेचे हस्ते उद्‌घाटन.
१९१४ मार्च १७	महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे श्री. तुकोजीराव होळकर यांच्या हस्ते अनावरण.
१९१४ मार्च	मे. व्ही. पी. माधवराव यांची दिवाणपदावर नेमणूक.
१९१४ ऑगस्ट	पहिल्या महायुद्धास सुरुवात. श्री. सौ. महाराणीसाहेबांचे ऑस्ट्रिया कार्ल्सबाद येथे अडकून पडणे व तेथून युक्तीने निसटणे.
१९१४ डिसेंबर	महाराज व श्री. सौ. महाराणीसाहेब यांचे युरोपांतून हिंदुस्थानांत आगमन.
१९१५ ऑक्टोबर	देशी भाषांतील ग्रंथप्रकाशनासाठी महाराजांची दोन लक्ष रुपयांची देणगी.
१९१६ जानेवारी १	प्रिन्सेस कॉन्फरन्सचे अधिवेशन दिल्ली. (नरेंद्रमंडळ)
१९१६ मार्च २०	बडोदा येथे अखिल भारतीय संगीत परिषदेचे उद्‌घाटन.
१९१६ मे १	मे. मनुभाई मेहेता यांची दिवाणगिरीवर नेमणूक.
१९१६नोव्हेंबर ३	नरेंद्रमंडळाच्या अधिवेशनप्रसंगी महाराजांचे भाषण.
१९१७ जानेवारी १	महाराजांना इंग्रज सरकारतर्फे G.S.I.E. या पदवीचे दान.
१९१७ जून	महाराजांचे ज्येष्ठ बंधु श्री. आनंदराव गायकवाड यांचे निधन.
१९१७ डिसेंबर ३०	मुंबई येथे भारत मंत्री मि. मॉंटेग्यु व लॉर्ड वुइलिंग्डन महाराजांना भेटले.
१९१८ एप्रिल १	बडोदे येथे राजपौत्री श्री. इंदुमती यांचा कोल्हापूरच्या युवराजांशी विवाह.
१९१८ एप्रिल २९	दिल्ली येथील महायुद्ध-परिषद व त्यांत महाराजांचे भाषण.
१९१९ मार्च २३-२४	व्हाइसरॉय लॉर्ड चेल्म्सफोर्ड यांची बडोद्यास भेट.
१९१९ नोव्हेंबर १०	युवराज्ञी श्री. पद्मावतीबाईसाहेब यांचे बडोदे येथे निधन.

१९१९ नोव्हेंबर २४	राजपुत्र शिवाजीराव यांचे बडोदे येथे निधन.
१९२१ फेब्रुवारी	नरेंद्रमंडळ याची स्थापना.
१९२१ नोव्हेंबर २३-२४	प्रिन्स ऑफ वेल्स याची बडोद्यास भेट.
१९२१ नोव्हेंबर २६	महाराष्ट्र साहित्य-संमेलनाच्या दहाव्या अधिवेशनाचे बडोदे येथे उद्‌घाटन.
१९२१ डिसेंबर ३०	बडोदे येथील दमाजीराव धर्मशाळेच्या इमारतीचे उद्‌घाटन.
१९२२ मार्च १६	बडोदे येथे राजपुत्र श्री. धैर्यशीलराव यांचा विवाह.
१९२२ एप्रिल ३०	राजपौत्री श्री. लक्ष्मी देवी यांचा सावंतवाडीच्या राजेसाहेबांशी विवाह.
१९२२ डिसेंबर २०	महाराजांचे जामात कुचबिहारचे महाराज यांचे लंडन येथे निधन.
१९२३ ऑगस्ट २७	राजपुत्र श्री. जयसिंहराव यांचे युरोपांत फ्लशिंग येथे निधन.
१९२४ जानेवारी १९	बनारस हिंदु विद्यापीठाचा पदवीदान समारंभ व त्या प्रसंगी महाराजांना एलएल.डी. ची पदवी समर्पण.
१९२४ जून ५	पॅरिस येथे ग्वाल्हेरचे महाराज श्री. माधवराव शिंदे यांचा मृत्यु व त्यांच्या उत्तरकार्यप्रसंगी महाराजांची हजेरी.
१९२६ जानेवारी ११-१६	महाराजांच्या राज्यारोहणाचा सुवर्णमहोत्सव
१९२६ जानेवारी २२	लॉर्ड रीडींग यांच्या हस्ते बडोदे येथील सायन्स इन्स्टीट्यूटचा पाया.
१९२६ मार्च	महाराजांची जन्मगांवाला-कवळाण्यास भेट. वेरूळच्या लेण्यांना भेट.
१९२७ फेब्रुवारी १८	रा. ब. कृष्णम्माचारी यांना दिवाणगिरीची वस्त्रे.
१९२७ जुलै २४-२८	बडोद्यास महापूर.
१९२७ डिसेंबर १९	मुंबई येथील अखिल भारतीय तत्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष.
१९२८ फेब्रुवारी	पुराने उध्वस्त झालेल्या भागाची पाहणी व धैर्यपुरा गांवाची स्थापना.
१९२९ जानेवारी ४	राजपौत्र श्री. प्रतापसिंहराव यांचा बडोदे येथे विवाह.
१९२९ सप्टेंबर १४	जिनिव्हा येथील राष्ट्रसंघाच्या बैठकीस महाराजांची भेट.
१९३० जानेवारी २०-२२	व्हाइसरॉय लॉर्ड आयर्व्हिन यांची बडोद्यास भेट.

१९३० एप्रिल २	युवराज श्री. प्रतापसिंहराव यांना पुत्रलाभ व महाराजांना प्रपौत्राचा लाभ. युवराज श्री. फत्तेसिंहराव यांचा जन्म.
१९३० नोव्हेंबर १२	लंडन येथे गोलमेज परिषदेच्या पहिल्या अधिवेशनास सुरुवात. महाराजांची हजेरी व भाषण.
१९३१ सप्टेंबर १४	फेडरल स्ट्रक्चर कमिटीची लंडन येथे सुरुवात. महाराजांची हजेरी व भाषण.
१९३१ सप्टेंबर २१	गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाची सुरुवात व त्यांत महाराजांचे भाषण.
१९३१ सप्टेंबर २५	म.गांधी व महाराज यांची भेट.
१९३२ सप्टेंबर २२	लॉर्ड वुइलिंग्डन यांची बडोद्यास भेट.
१९३२ डिसेंबर २८	कोल्हापूर येथे महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष. महाराजांच्या गैरहजेरीत भाषणाचे वाचन.
१९३३ जानेवारी २८	बडोदा कॉलेजचा सुवर्णमहोत्सव. महाराज अध्यक्ष.
१९३३ मार्च १८	महाराजांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त मुंबईत रॉयल ऑपेरा हाऊसमध्ये मोठा समारंभ. सयाजी गौरव-ग्रंथ समर्पण.
१९३३ ऑगस्ट १८	लंडनहून अमेरिकेस रवाना.
१९३३ ऑगस्ट २७	शिकॅगो येथे सर्व धर्मपरिषदेचे उद्‌घाटन.
१९३३ ऑक्टोबर	जपानचा प्रवास.
१९३३ नोव्हेंबर	शांघाई, सिंगापूर, कोलंबो वगैरे ठिकाणांना भेटी.
१९३३ डिसेंबर २७	बडोदे येथे प्राच्य-विद्यापरिषदेच्या सातव्या अधिवेशनाचे उद्‌घाटन.
१९३४ जानेवारी १९	नवसारी येथे प. वा. दादाभाई नवरोजी यांच्या पुतळ्याचे अनावरण समारंभ. सार्वजनिक बगीचात छत्रपति शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण.
१९३४ मार्च २४	दिल्ली येथील तेविसाव्या अखिल भारतीय हिंदी साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून महाराजांचे भाषण.
१९३४ एप्रिल ९	२३ व्या सफरीसाठी महाराजांचे मुंबईहून प्रयाण.
१९३४ एप्रिल २८	रोम येथे पोप ११ वे पायस यांची भेट.
१९३४ ऑक्टोबर ४	श्री. संपतराव गायकवाड यांचा बडोद्यास मृत्यु.
१९३४ ऑक्टोबर १७	अमेरिकेस प्रयाण.

१९३४ ऑक्टोबर २५	वॉशिंग्टन येथे अमेरिकेचे प्रेसिडेंट रूझवेल्ट यांची भेट.
१९३४ नोव्हेंबर २	युरोपास परत येण्यासाठी अमंरिकेहून प्रयाण.
१९३४ नोव्हेंबर ३ ते १७	बोटीवर महाराजांचा भयंकर संधिवाताचा आजार व नंतर प्रकृतीत सुधारणा.
१९३५ फेब्रुवारी ९ ते १२	जिनिव्हा येथील राष्ट्रसंघ व त्यांतील कामगारशाखेस भेट.
१९३५ फेब्रुवारी १९ ते मार्च १६	इजिप्त देशाची सफर.
१९३५ मे २७	महाराजांच्या हीरकमहोत्सवाचा दिवस. बादशहा पंचम जॉर्ज यांजकडून अभिनंदन.
१९३५ मे ३०	बादशहा पंचम जॉर्ज यांची भेट 'दि लायब्ररी रिव्ह्यू अँड फ्रेंडस.' या संस्थेतर्फे महाराजांच्या सन्मानार्थ मेजवानी.
१९३५ जून ६	बादशहा पंचम जॉर्ज यांच्या ज्युबिलीनिमित्त परदेशी पाहुण्यांना ब्रिटीश सरकारने दिलेल्या मेजवानीत हजेरी.
१९३५ जुलै १	सर्वधर्मपरिषदेच्या कार्यकारी मंडळाची महाराजांच्या अध्यक्षतेखाली भरलेली सभा व तीत पुढील परिषद लंडन येथे भरविण्याचा झालेला ठराव.
१९३५ ऑक्टोबर २८	नेपल्स येथून हिंदुस्थानांस येण्यास निघाले.
१९३५ नोव्हेंबर ७	मुंबईस आगमन.
१९३६ जानेवारी १ ते ११	हीरकमहोत्सवांतील कार्यक्रम.
१९३६ जानेवारी ३	हीरकमहोत्सवानिमित्त कवायतीच्या मैदानावर उभारलेल्या भव्य मंडपांत मानपत्र समारंभ.
१९३६ जानेवारी ६	लॉर्ड वुइलिंग्डन यांचे बडोद्यास हीरकमहोत्सवासाठी आगमन.
१९३६ फेब्रुवारी २४	बडोद्यांतील कीर्तिमंदिराचे उद्घाटन.
१९३६ एप्रिल ११	२४ व्या सफरीसाठी मुंबईहून प्रयाण.
१९३७ मे १२	बादशहा सहावे जॉर्ज यांच्या राज्यारोहणप्रसंगी हजेरी.
१९३८	प्रकृतिस्वास्थ्यासाठी महाराजांचे परदेशगमन.
१९३८ ऑक्टोबर	महाराजांचे हिंदुस्थानकडे प्रयाण. वाटेतच बोटीवर महाराजांना आजारपण सुरू.
१९३९ फेब्रुवारी ६	महाराजांचे रात्री ८.३० वाजता निधन.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांची ऐतिहासिक चरित्रे...

हिंदुस्थानातील अनेक राजा महाराजांनी आपल्या शौर्याने रणांगणावर पराक्रम केले.
अनेक राजांनी आपल्या मनगटाच्या बळावर शत्रूच्या मनात दहशत बसविली.
तर काही राजांनी आपल्या कर्तृत्वाने लोकांच्या मनावर अधिराज्य केले.
अशा सर्व राजा महाराजांची अनेक मराठी चरित्रे उपलब्ध आहेत.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात हिंदुस्थानात अनेक संस्थाने अस्तित्वात होती.
संस्थानाअंतर्गत सुधारणा करण्याचे त्यांना स्वातंत्र्य होते.
प्रजेचे हित जपणारे मोजकेच राजे होते.
त्यात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव आघाडीवर होते.

त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले.
संस्थानात इंग्रजांना अचंबित करणारा आश्वासक बदल केला.
संस्थानाची 'न भूतो न भविष्यती' प्रगती केली.
प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्यामुळे ते हिंदुस्थानात नव्हे तर जगभर प्रसिद्ध आहेत.

त्यांची काळापुढे पाहण्याची दृष्टी होती.
प्रत्येक सुधारणेत आधुनिकता आणि लोकाभिमुखता आणली.
समकालीन जगातील प्रत्येक सुधारणा प्रथम बडोदा संस्थानात केली.
इंग्रजांचा विचाराने पराभव करणारे ते पहिले राजे होते.

त्यांनी जागतिक पातळीवरील वैचारिक राष्ट्रीय परिषदांचे अध्यक्षस्थान भूषविले.
जागतिक पातळीवर विचारवंतांचे नेतृत्व केले.
त्यात आपल्या विचारांचा ठसा उमटवला.
त्यामुळे त्यांची विचारवंत राजा, तत्वज्ञ राजा अशी ओळख निर्माण झाली.

त्यांची स्वातंत्र्यपूर्व कालखंडात चरित्रे लिहिली गेली.
ही चरित्रे आदर्श जीवनाचा आढावा घेणारी आहेत.
दुर्मीळ आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहेत.
आजच्या काळातही मार्गदर्शक आहेत, ती अभ्यासणे महत्त्वाचे ठरेल.

का. ना. गोत्री हे त्यांचे पहिले मराठी चरित्रकार.
त्यानंतर य. रा. दाते, वि. पां. दांडेकर, रियासतकार सरदेसाई आणि ब. न. फाटक यांनी चरित्रे लिहिली.
समकालीन नामांकित साहित्यिकांनी ती लिहिली.
त्या चरित्रांचे संपादन या खंडात केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ